या कर्त्यानें केलेल्या ग्रंथांचीं नांवें.

	रु.	आ.	पै.
१. प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबूल होणें.	०	१	३
२. पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना …………	०	८	०
३. इस्राएलांचा लग्नविधि …………	०	३	०
४. वर्षप्रतिपदेची प्रार्थना …………	१	०	०
५. नवसांची सुटका. …………	०	४	०
६. आन्तिओखोस राजाचा इतिहास अथवा हानुक्याचे सणाची स्थापना …………	०	२	०
७. प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग १ … } ८. ” ” भाग २ … }	१	४	०
९. सद्गुरुवचनें अथवा नीतिशास्त्र …………	०	६	०
१०. इस्राएलांच्या धर्ममताविषयीं शास्त्रांतील प्रमाणें.	०	१	०
११. इस्राएली धर्माचें खरें स्वरूप …………	[illegible]	२	०
१२. इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम …………	०	८	०
१३. इब्री पहिलें पुस्तक (सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी) …………	०	४	०

प्रस्तावना.

इस्राएल लोकांस या देशांत पुष्कळ दिवस झाल्यामुळें त्यांस स्वभाषेचा अगदीं विसर पडला आहे. बहुतेकांस ती भाषा वाचतांहि येत नाहीं; मग अर्थ समजणारे तर फारच थोडे सांपडतील. विद्येचा एवढा प्रसार होत असतांहि आमचे लोक स्वभाषेचें ज्ञानसंपादन करण्यास श्रम घेत नाहींत हें मोठें आश्चर्य. आलीकडे कित्येक तरुण गृहस्थांच्या मनीं स्वभाषा शिकण्याची उत्कंठता उत्पन्न झाली आहे. ती शिकण्यास त्यांस सुलभ व्हावें, आणि कित्येकांस अल्पज्ञान असल्यावरून ते अर्थाचा अनर्थ करितात तो न व्हावा; परंतु त्यांनीं अनुक्रमानें अभ्यास करून पूर्ण ज्ञान संपादावें; ह्मणून "इब्री पहिलें पुस्तक" या नांवाचा हा लहानसा ग्रंथ मी रचून त्यांस नजर केला आहे. ज्यास मराठी भाषेचें ज्ञान आहे त्यानें या पुस्तकावरून इब्री-भाषेचा स्वतां अभ्यास चालविला तरी त्याच्यानें करतां येईल अशा प्रकारें तो रचिला आहे. आणि ईश्वरी सहायानें एक संक्षिप्त व्याकरणही लवकर तयार होईल असी आशा आहे.

इब्री मूळ अक्षरें.

संख्या.	नांवांचा अर्थ.	उच्चार.	नांवें.	शास्त्राची लिपि.
१	बैल.	अ	आलेफ.	א
२	घर.	ब	बेथ.	ב
३	उंट.	ग	गीमेल.	ג
४	दरवाजा.	द	दालेथ.	ד
५	खिडकी, पाहा.	ह	हे.	ה
६	खिळा.	व	वाव.	ו
७	कटार.	झ. ज	झाइन.	ז
८	कुपण.	ह	हेथ.	ח
९	गुंडाळी.	त	तेथ.	ט
१०	हात.	य	योद.	י
२०	तळवा.	क	काफ.	ך כ
३०	पराणी.	ल	लामेद.	ל
४०	डाग. पाणी.	म	मीम.	ם מ
५०	मासा.	न	नून.	ן נ
६०	आधार.	स	समाख.	ס
७०	डोळे. झरा.	अ	आइन.	ע

इब्री मूळ अक्षरें.

संख्या.	नांवांचा अर्थ.	उच्चार.	नांवें.	शास्त्राची लिपि.
८०	तोंड.	प	पे.	ף פ
९०	बाजू. भाला.	त्स	त्साद.	ץ צ
१००	वानर.	क	कोफ.	ק
२००	डोकें.	र	रेश.	ר
३००	दांत.	श	शीन.	ש
४००	खूण.	त	ताव.	ת

ב ג ד כ פ ת या अक्षरांच्या आंत टिंब असल्यास त्यांचा उच्चार ब ग द क प त असा होतो; परंतु टिंब नसल्यास भ घ ध ख फ थ असा होतो.

ך ם ן ף ץ हीं अक्षरें शब्दाच्या शेवटीं मात्र असतात आणि त्यांची संख्याहि निराळी आहे ך ५०० ם ६०० ן ७०० ף ८०० ץ ९००.

שׁ שׂ शीन या अक्षराच्या उजवीकडे टिंब असल्यास त्याचा उच्चार श आणि डावीकडे असल्यास स असा होतो.

इब्री अक्षरांत ﭏ आलेफलाम या शिवाय दुसरें जोडाक्षर नाहीं; त्यांत पहिल्यानें א मग ל याचा उच्चार होतो.

א ה ח ע यांचा उच्चार कंठांतून होतो.
ג י כ ק यांचा उच्चार तालूंतून होतो.
ד ט ל נ ת यांचा उच्चार जिभेंतून होतो.
ז ס ש ר צ यांचा उच्चार दांतांतून होतो.
ב ו מ ף यांचा उच्चार ओठांतून होतो.

इब्री भाषेंतील अक्षरांस मराठी भाषेंतील अक्षरांप्रमाणें स्वरांचीं चिन्हें असतात तीं येणें प्रमाणें.

उदाहरणें.		इब्री चिन्हांसारिखीं मराठी चिन्हें.	चिन्हांचीं नांवें.	चिन्हें.
बा	בָ	ा	कामेत्स	ָ
बा	בַ	ा	पाथाह	ַ
बे	בֵ	े	त्सेरे	ֵ
ब	בְ		शेवा	ְ
बो	בֹ	ो	होलेम	ֹ
बे	בֶ	े	सेगोल	ֶ
बी	בִ	ी	हीरेक	ִ
बु	בֻ	ु	क्बिूस	ֻ
बू	בוּ	ू	वाव शूरेक	וּ
बो	בֳ	ो	हातुफ कामेत्स	ֳ
बा	בֲ	ा	हातुफ पाथाह	ֲ
बे	בֱ	े	हातुफ सेगोल	ֱ

होलेम आणि वाव शूरेक यां खेरीज दुसरीं सर्व चिन्हें अक्षरांच्या खालीं जोडतात; परंतु होलेम हें वर आणि वाव शूरेक हें डाव्या बाजूस असतें.

इब्री बाराखड्या.

אָ	אַ	אֵ	אְ	אֹ	אֶ	אִ	אֻ	אוּ	אֳ	אֲ	אֱ
בָ	בַ	בֵ	בְ	בֹ	בֶ	בִ	בֻ	בוּ	בֳ	בֲ	בֱ
גָ	גַ	גֵ	גְ	גֹ	גֶ	גִ	גֻ	גוּ	גֳ	גֲ	גֱ
דָ	דַ	דֵ	דְ	דֹ	דֶ	דִ	דֻ	דוּ	דֳ	דֲ	דֱ
הָ	הַ	הֵ	הְ	הֹ	הֶ	הִ	הֻ	הוּ	הֳ	הֲ	הֱ
וָ	וַ	וֵ	וְ	וֹ	וֶ	וִ	וֻ	ווּ	וֳ	וֲ	וֱ
זָ	זַ	זֵ	זְ	זֹ	זֶ	זִ	זֻ	זוּ	זֳ	זֲ	זֱ
חָ	חַ	חֵ	חְ	חֹ	חֶ	חִ	חֻ	חוּ	חֳ	חֲ	חֱ
טָ	טַ	טֵ	טְ	טֹ	טֶ	טִ	טֻ	טוּ	טֳ	טֲ	טֱ
יָ	יַ	יֵ	יְ	יֹ	יֶ	יִ	יֻ	יוּ	יֳ	יֲ	יֱ
כָ	כַ	כֵ	כְ	כֹ	כֶ	כִ	כֻ	כוּ	כֳ	כֲ	כֱ
לָ	לַ	לֵ	לְ	לֹ	לֶ	לִ	לֻ	לוּ	לֳ	לֲ	לֱ
מָ	מַ	מֵ	מְ	מֹ	מֶ	מִ	מֻ	מוּ	מֳ	מֲ	מֱ
נָ	נַ	נֵ	נְ	נֹ	נֶ	נִ	נֻ	נוּ	נֳ	נֲ	נֱ
סָ	סַ	סֵ	סְ	סֹ	סֶ	סִ	סֻ	סוּ	סֳ	סֲ	סֱ
עָ	עַ	עֵ	עְ	עֹ	עֶ	עִ	עֻ	עוּ	עֳ	עֲ	עֱ
פָ	פַ	פֵ	פְ	פֹ	פֶ	פִ	פֻ	פוּ	פֳ	פֲ	פֱ
צָ	צַ	צֵ	צְ	צֹ	צֶ	צִ	צֻ	צוּ	צֳ	צֲ	צֱ
קָ	קַ	קֵ	קְ	קֹ	קֶ	קִ	קֻ	קוּ	קֳ	קֲ	קֱ
רָ	רַ	רֵ	רְ	רֹ	רֶ	רִ	רֻ	רוּ	רֳ	רֲ	רֱ
שָ	שַ	שֵ	שְ	שֹ	שֶ	שִ	שֻ	שוּ	שֳ	שֲ	שֱ
תָ	תַ	תֵ	תְ	תֹ	תֶ	תִ	תֻ	תוּ	תֳ	תֲ	תֱ

कामेत्स याचा उच्चार कधीं कधीं हातुफ कामेत्स यासारिखाहि होतो त्याचे नेम येणेंप्रमाणें.:—

१. जर कामेत्सास गाया नसून पुढल्या अक्षरास शेवा असला तर हातुफ कामेत्सासारिखा उच्चार होतो. उदाहरण חָכְמָה होखमा.

२. जर पुढल्या अक्षरांत बिंदु असला तर हातुफ कामेत्सासारिखा उच्चार होतो. उदाहरण רָנּוּ रोन्नु.

३. शेवटल्या उच्चारित अक्षरामागील अक्षरास कामेत्स असतो त्याचा उच्चार बहुतकरून हातुफ कामेत्सासारिखा होतो. उदाहरण יִפְרֹץ इफरोस.

४. बहुतकरून शेवाचा उच्चार कांहींच होत नाहीं, परंतु शब्दाच्या पहिल्या अक्षरास शेवा असला, तर त्याचा उच्चार कांहींसा सेगोल यासारिखा होतो. उदाहरण שְׁלַח शेलाह.

५. ज्या अक्षरांत बिंदु असतो त्याखालीं शेवा असला, तर त्याचा उच्चार कांहींसा सेगोलसारिखा होतो. उदाहरण גִּדְּי गेदी.

६. दोन शेवा एकत्र असले, तर दुसरे शेवाचा उच्चार कांहींसा सेगोलसारिखा होतो. उदाहरण תִּשְׁמְרוּ तिशमेरू.

७. एका जातीचीं दोन अक्षरें एकत्र येऊन पहिले अक्षराखालीं जर शेवा असला, तर त्याचा उच्चार कांहींसा सेगोलसारिखा होतो. उदाहरण הַלְלוּ हालेलू.

८. परंतु ईश्वरीनाम יְהוָה असें असल्यास त्याचा उच्चार करण्यास मनाई आहे ; त्याचा उच्चार आदोनाय या शब्दाप्रमाणें करितात. हें नाम कधीं יי व कधीं ה असेंहि लिहितात ; आणि त्या नामाखालीं יֱהוִה असीं चिन्हें असलीं तर त्यांचा उच्चार אֱלֹהִים या शब्दाप्रमाणें होतो.

धडा पहिला.—א

אָב	बाप.
בַּר	धान्य. शुद्ध.
גַּן	बाग.
דָּג	मासा.
הַר	डोंगर.
וָו	खिळा.
זָר	परका.
חָם	उष्ण. सासरा.
טַל	दहिवर.
יָד	हात.
כַּף	तळवा.
לֵב	मन.
מַס	कर.
נֵר	दिवा.
סַל	टोपली.
עַם	लोक.
פֶּה	तोंड.
צַר	शत्रु.
קַל	हलकें.
רַע	वाईट.
שֵׁם	नाम.
תֵּן	दे.

धडा दुसरा.—ב

אָמַר	बोलला.
בָּנָה	बांधलें.
גֵּאָה	गर्व.
דָּבָר	शब्द. गोष्ट.
הָלַךְ	गेला.
וַעַד	मंडळी.
זָהָב	सोनें.
חָכָם	शाहाणा.
טוֹב	चांगलें.
יֶלֶד	मूल.
כֶּסֶף	रुपें.
לָבָן	पांढरें.
מַיִם	पाणी.
נָתַן	दिल्हें.
סֵפֶר	पुस्तक.
עָנָה	उत्तर दिल्हें.
פֶּתַח	दरवाजा.
צָחַק	हांसला. खेळला.
קָרָא	बोलाविलें.
רָשָׁע	दुष्ट.
שָׁנָה	वर्ष.
תָּמָר	खजूर.

धडा तिसरा.—ג

गाडी.	עֲגָלָה	भित.	חוֹמָה	पेटी.	אַרְגָּז
अवकाश.	פְּנַאי	शुद्ध.	טָהוֹר	धन्य.	בָּרוּךְ
फुलें.	צִצִּים	उजवा.	יָמִין	बळकट	גִּבּוֹר
जवळ.	קָרוֹב	कसा.	כֵּיצַד	न्यायाधीश.	דַּיָּן
दूर.	רָחוֹק	जीभ.भाषा.	לָשׁוֹן	कोठें.	הֵיכָן
डावा.	שְׂמֹאל	पैसे.	מָעוֹת	निश्चयें.	וַדַּאי
प्रार्थना.	תְּפִלָּה	कागद.	נְיָר	माशी.	זְבוּב
		अनिवार.	סוֹרֵר		

धडा चवथा.—ד

कोळसे.	פֶּחָמִים	अशुद्धता.	טוּמְאָה	वाडा.	אַרְמוֹן
खिशमीश.	צִמּוּקִים	पडदा.	יְרִיעָה	वस्त्रें.	בְּגָדִים
बोलावणें.	קְרִיאָה	दुपट.	כִּפְלַיִם	मोठेंपण.	גְּדוּלָּה
दाळिंबें. }	רִמּוֹנִים	सर्वकाळ.	לְעוֹלָם	गवत.	דְּשָׁאִים
कळस. }		रुमाल.	מִטְפַּחַת	सफलता.	הַצְלָחָה
गुलाब.	שׁוֹשַׁנָּה	जोडे.	נְעָלִים	कबूल होणें.	וִידּוּי
अंजिरें.	תְּאֵנִים	तारूं.	סְפִינָה	आठवण.	זִכְרוֹן
		द्राक्षें.	עֲנָבִים	दुकानदार.	חֶנְוָנִי

धडा पांचवा.—ה

तसें.	כֵּן	कशासाठीं.	לָמָּה	आहे.	יֵשׁ
जर.	אִם	कारणकीं.	כִּי	नाहीं.	לֹא
परंतु.	אֲבָל	यासाठीं.	לְמַעַן	नाहीं.	אֵין
पर्यंत.	עַד	कोठून.	מֵאַיִן	नको.	אַל
कोठे.	אַיֵּה	एथून.	מִכָּאן	किती.	כַּמָּה
एथें.	הֵנָּה	तेथून.	מִשָּׁם	थोडें.	מְעַט
तेथें.	שָׁם	कसें.	כֵּיצַד	पुष्कळ.	הַרְבֵּה
अथवा.	אוֹ	असें.	כֹּה	सर्व.	כֹּל

धडा साहावा.—ו

काय, किती.	מָה	काल.	אֶתְמוֹל	केव्हां.	מָתַי
काय.	מֶה	तेव्हां.	אָז	आतां.	עַכְשָׁיו
हा.	זֶה	पूर्वींच.	כְּבָר	नंतर.	אַחַר
ही.	זֹאת	अगोदर.	קוֹדֶם	केव्हां.	אֵימָתַי
हे, ह्या, हीं.	אֵלֶּה	यास्तव.	לָכֵן	आतां.	עַתָּה
कोणता.	אֵיזֶה	अणखी.	עוֹד	एकदांच.	פִּתְאֹם
तो कोणता.	אֵיזֶהוּ	मात्र.	רַק	आज.	הַיּוֹם
		कोण.	מִי	उद्यां.	מָחָר

धडा सातवा.—ז

अनेकवचन.			एकवचन		
आह्मी.		אֲנַחְנוּ. אָנוּ. נַחְנוּ	मी.		אֲנִי
तुह्मी.	पु.	אַתֶּם	तूं.	पु.	אַתָּה
तुह्मी.	स्त्री.	אַתֶּן	तूं.	स्त्री.	אַתְּ
ते.	पु.	הֵם	तो.	पु.	הוּא
त्या.	स्त्री.	הֵן	ती.	स्त्री.	הִיא

धडा आठवा.—ח

आह्मांमध्यें.		בָּנוּ	मजमध्यें.		בִּי
तुह्मांमध्यें.	पु.	בָּכֶם	तुजमध्यें.	पु.	בְּךָ
तुह्मांमध्यें.	स्त्री.	בָּכֶן	तुजमध्यें.	स्त्री.	בָּךְ
त्यांजमध्यें.	पु.	בָּם. בָּהֶם	त्याजमध्यें.	पु.	בּוֹ
त्यांजमध्यें.	स्त्री.	בָּהֶן	तिजमध्यें.	स्त्री.	בָּהּ

धडा नवा.—ט

आह्मांला.		לָנוּ. אוֹתָנוּ	मला.		לִי. אוֹתִי
तुह्मांला.	पु.	לָכֶם·אֶתְכֶם	तुला.	पु.	לְךָ. אוֹתְךָ
तुह्मांला.	स्त्री.	לָכֶן. אֶתְכֶן	तुला.	स्त्री.	לָךְ. אוֹתָךְ
त्यांला.	पु.	לָהֶם. אוֹתָם	त्याला.	पु.	לוֹ. אוֹתוֹ
त्यांला.	स्त्री.	לָהֶן. אוֹתָן	तिला.	स्त्री.	לָהּ. אוֹתָהּ

धडा दाहवा.—י

अनेकवचन.		एकवचन.	
आह्मांबरोबर.	עִמָּנוּ	मजबरोबर.	עִמִּי
तुह्मांबरोबर. पु.	עִמָּכֶם	तुजबरोबर. पु.	עִמְּךָ
तुह्मांबरोबर. स्त्री.	עִמָּכֶן	तुजबरोबर. स्त्री.	עִמָּךְ
त्यांजबरोबर. पु.	עִמָּהֶם. עִמָּם	त्याजबरोबर. पु.	עִמּוֹ
त्यांजबरोबर. स्त्री.	עִמָּהֶן	तिजबरोबर. स्त्री.	עִמָּהּ

धडा अकरावा.—יא

आह्मांपासून.	מִמֶּנּוּ	मजपासून.	מִמֶּנִּי
तुह्मांपासून. पु.	מִכֶּם	तुजपासून. पु.	מִמְּךָ
तुह्मांपासून. स्त्री.	מִכֶּן	तुजपासून. स्त्री.	מִמֵּךְ
त्यांजपासून. पु.	מֵהֶם	त्याजपासून. पु.	מִמֶּנּוּ
त्यांजपासून. स्त्री.	מֵהֶן	तिजपासून. स्त्री.	מִמֶּנָּה

धडा बारावा.—יב

पुल्लिंगीनामें.

मुखपाठ करायाचे धडे.

घोडे.	סוּסִים	घोडा.	סוּס
माझे घोडे.	סוּסַי	माझा घोडा.	סוּסִי
तुझे (पु.) घोडे.	סוּסֶיךָ	तुझा (पु.) घोडा.	סוּסְךָ

अनेकवचन.		एकवचन.	
तुझे (स्त्री.) घोडे	סוּסַיִךְ	तुझा (स्त्री.) घोडा.	סוּסֵךְ
त्याचे घोडे.	סוּסָיו	त्याचा घोडा.	סוּסוֹ
तिचे घोडे.	סוּסֶיהָ	तिचा घोडा.	סוּסָהּ
आमचे घोडे.	סוּסֵינוּ	आमचा घोडा.	סוּסֵנוּ
तुमचे (पु.) घोडे.	סוּסֵיכֶם	तुमचा (पु.) घोडा.	סוּסְכֶם
तुमचे (स्त्री.) घोडे.	סוּסֵיכֶן	तुमचा(स्त्री.)घोडा.	סוּסְכֶן
त्यांचे (पु.) घोडे.	סוּסֵיהֶם	त्यांचा (पु.) घोडा.	סוּסָם
त्यांचे (स्त्री.) घोडे.	סוּסֵיהֶן	त्यांचा(स्त्री.) घोडा.	סוּסָן

धडा तेरावा.—יג

स्त्रीलिंगीनामें.

शास्त्रें.	תּוֹרוֹת	शास्त्र.	תּוֹרָה
माझीं शास्त्रें.	תּוֹרוֹתַי	माझें शास्त्र.	תּוֹרָתִי
तुझीं (पु.) शास्त्रें.	תּוֹרוֹתֶיךָ	तुझें (पु.) शास्त्र.	תּוֹרָתְךָ
तुझीं (स्त्री.) शास्त्रें.	תּוֹרוֹתַיִךְ	तुझें (स्त्री.) शास्त्र.	תּוֹרָתֵךְ
त्याचीं (पु.) शास्त्रें.	תּוֹרוֹתָיו	त्याचें (पु.) शास्त्र.	תּוֹרָתוֹ
तिचीं (स्त्री.) शास्त्रें.	תּוֹרוֹתֶיהָ	तिचें (स्त्री.) शास्त्र.	תּוֹרָתָהּ
आमचीं शास्त्रें.	תּוֹרוֹתֵינוּ	आमचें शास्त्र.	תּוֹרָתֵנוּ

अनेकवचन.		एकवचन.	
तुमचीं (पु.) शास्त्रें.	תּוֹרוֹתֵיכֶם	तुमचें (पु.) शास्त्र.	תּוֹרַתְכֶם
तुमचीं (स्त्री.) शास्त्रें.	תּוֹרוֹתֵיכֶן	तुमचें (स्त्री.) शास्त्र.	תּוֹרַתְכֶן
त्यांचीं (पु.) शास्त्रें.	תּוֹרוֹתֵיהֶם	त्याचें (पु.) शास्त्र.	תּוֹרָתָם
त्यांचीं (स्त्री.) शास्त्रें.	תּוֹרוֹתֵיהֶן	त्यांचें (स्त्री.) शास्त्र.	תּוֹרָתָן

धडा चौदा.—יד

पुढील शब्दांसहि सर्वनामाचे प्रत्यय लागतात.

मजमागें.	אַחֲרַי	मागें, नंतर.	אַחַר
तुजवळ. पु.	אֶצְלְךָ	जवळ.	אֵצֶל
तुजमध्यें. स्त्री.	בֵּינֵךְ	मध्यें.	בֵּין
त्यासाठीं. पु.	לְמַעֲנוֹ	साठीं.	לְמַעַן
तिजपुढें. स्त्री.	לְפָנֶיהָ	पुढें.	לִפְנֵי
आमच्या समोर.	נֶגְדֵּנוּ	समोर.	נֶגֶד
तुह्मांपर्यंत.	עֲדֵיכֶם	पर्यंत.	עַד
तुह्मांकरितां.	בַּעֲבוּרְכֶם	करितां.	בַּעֲבוּר
त्यांवर.	עֲלֵיהֶם	वर.	עַל
त्यांखालीं.	תַּחְתָּם	खालीं.	תַּחַת

अनेकवचन. **धडा पंधरावा.**—טו एकवचन.

		राजे.	מְלָכִים	राजा.	מֶלֶךְ
पासून.	מ	राजांपासून.	מִמְּלָכִים	राजापासून.	מִמֶּלֶךְ
जो.जी.जे.	ש	जे राजे.	שֶׁהַמְּלָכִים	जो राजा.	שֶׁהַמֶּלֶךְ
तो.ती.ते.	ה	ते राजे.	הַמְּלָכִים	तो राजा.	הַמֶּלֶךְ
आणि.	ו	आणि राजे.	וּמְלָכִים	आणि राजा.	וּמֶלֶךְ
प्रमाणें.	כ	राजांप्रमाणे.	כִּמְלָכִים	राजाप्रमाणे.	כְּמֶלֶךְ
ला.	ל	राजांला.	לִמְלָכִים	राजाला.	לְמֶלֶךְ
आंत.	ב	राजांत.	בִּמְלָכִים	राजांत.	בְּמֶלֶךְ
चा.ची.चे	של	राजांचा.	שֶׁל מְלָכִים	राजाचा.	שֶׁל מֶלֶךְ
स.	את	राजांस.	אֶת מְלָכִים	राजास.	אֶת מֶלֶךְ

धडा सोळावा.—טז

संख्या.—מִסְפָּר

पांच.	חֲמִשָּׁה	एक.	אֶחָד
साहा.	שִׁשָּׁה	दोन.	שְׁנַיִם
सात.	שִׁבְעָה	तीन.	שְׁלֹשָׁה
आठ.	שְׁמֹנָה	चार.	אַרְבָּעָה

תִּשְׁעָה	नऊ.	מֵאָה	शंभर.
עֲשָׂרָה	दाहा.	מָאתַיִם	दोनशें.
אַחַד עָשָׂר	अकरा.	שְׁלֹשׁ מֵאוֹת	तीनशें.
עַשְׁתֵּי עָשָׂר	अकरा.	אֶלֶף	हजार.
שְׁנֵים עָשָׂר	बारा.	אַלְפַּיִם	दोन हजार.
תִּשְׁעָה עָשָׂר	एकुणीस.	שִׁבְעַת אֲלָפִים	सात हजार.
עֶשְׂרִים	वीस.	רִבּוֹ	दाहा हजार.
חֲמִשָּׁה וְעֶשְׂרִים	पंचवीस.	רִבּוֹתַיִם	वीस हजार.
שְׁמֹנָה וְעֶשְׂרִים	अठ्ठावीस.	רִאשׁוֹן. רִאשׁוֹנָה	पहिला, पहिली.
שְׁלֹשִׁים	तीस.	שֵׁנִי. שֵׁנִית. שְׁנִיָּה	दुसरा, दुसरी.
שְׁמוֹנִים	ऐशीं.	שְׁמִינִי. שְׁמִינִית	आठवा, आठवी.

धडा सतरावा.—יז

עָנִי	गरीब.	עֲצֵלִים	आळशी.	עָשָׂה	त्यानें केलें.
נְקִיִּים	निर्दोष.	נַעֲרָה	मुलगी.	אֲחוֹתִי	माझी बहिण.
נַעַר	मुलगा.	צְנוּעוֹת	पतिव्रता.	קְטַנּוֹת	लहान.
שְׁמוֹת	नावें.	אָחִי	माझा भाऊ.	בֶּצַע	लाभ.
חוֹלֶה	रोगी.	עֲנָוִים	नम्र.	בַּיִת	घर.
		הָאִישׁ	तो मनुष्य.		

אֲנִי עָנִי*	मी गरीब आहें.
אַתָּה גִּבּוֹר	तूं बळकट आहेस. पु.
אַתְּ חוֹלָה	तूं रोगी आहेस. स्त्री.
אָחִי הוּא	तो माझा भाऊ.
אֲחוֹתִי הִיא	ती माझी बहीण.
זֶה הַנַּעַר	हा मुलगा.
זֹאת הַנַּעֲרָה	ही मुलगी.
מִי הָאִישׁ	तो मनुष्य कोण?
אֵיזֶה בַּיִת	कोणतें घर?
אֲנַחְנוּ נְקִיִּים	आह्मीं निर्दोष आहों.
אַתֶּם עֲצֵלִים	तुह्मीं आळशी आहां.
אַתֶּן צְנוּעוֹת	तुह्मीं पतिव्रता आहां.
הֵם עֲנָוִים	ते नम्र आहेत.
הֵן קְטַנּוֹת	त्या लहान आहेत.
אֵלֶּה שְׁמוֹת	हीं नांवें.
מַה בֶּצַע	काय लाभ?
מֶה עָשָׂה	त्यानें काय केलें?
אֵיזֶהוּ חָכָם	शाहाणा तो कोण?

धडा अठरावा.—יח

עָשִׂיתָ	तूं केलेंस.
תֵּלֵךְ	जाशील, जातोस
שִׁמְךָ	तुझें नाम.
חִדּוּשׁ	नवल, वर्तमान
תָּבֹא	ये, येशील.
תִּתְמַהְמַהּ	थांब, थांबशील
שֵׁב	बैस.
בָּאתָ	तूं आलास.
אָמְרָה	ती बोलली.
צֵא	नीघ.
יוֹדֵעַ	जाणतो.
עֲשֵׂה	कर.
יָבֹא	तो येईल.
שְׁלוֹמְךָ	तुझें कल्याण.

* इब्रीमध्यें अस या क्रियापदाच्या वर्तमानकाळाचीं आहें, आहेस, आहे, आहों, आहां, आहेस हीं रूपें बहुतकरून गाळलीं जातात.

ती काय ह्मणाली ?	מָה אָמְרָה	तो कोण ?	מִי הוּא
तूं कोठून आलास ?	מֵאַיִן בָּאתָ	तूं केलेंस.	אַתָּה עָשִׂיתָ
असें कर.	עֲשֵׂה כֹּה	तूं कोठे जातोस ?	הֵיכָן תֵּלֵךְ
एथून नीघ.	צֵא מִכָּאן	तुझें नांव काय ?	מַה שְּׁמֶךָ
तो केव्हां येईल ?	אֵימָתַי יָבֹא	काय वर्तमान ?	מַה חִדּוּשׁ
मी जाणत नाहीं.	אֵינִי יוֹדֵעַ	तूं मजबरोबर ये.	תָּבֹא עִמִּי
तूं कां जातोस ?	לָמָּה תֵּלֵךְ	थोडा थांब.	תַּמְתִּין מְעַט
तूं कसा आहेस ?	כֵּיצַד שְׁלוֹמְךָ	मजवळ बैस.	שֵׁב אֶצְלִי

धडा येकुणिसावा.—יט

पाहिजे.	רוֹצֶה	तान्हेली.	צְמֵאָה	जातो.	הוֹלֵךְ
खावयास.	לֶאֱכֹל	तूं देशील.	תִּתֵּן	जाते.	הוֹלֶכֶת
थंडी.	קֹר	आण, आणशील	תָּבִיא	बाजार, आळी	שׁוּק
उशीर करशील.	תְּאַחֵר	तास, वेळ.	שָׁעָה	लिहायास.	לִכְתּוֹב
		अवकाश.	פְּנַאי	भुकेला.	רָעֵב

मी घरीं जातों.	אֲנִי הוֹלֵךְ לַבַּיִת
ती बाजारांत जाते.	הִיא הוֹלֶכֶת לַשּׁוּק
तूं मला काय देशील ?	מַה תִּתֵּן לִי
काल तूं कोठे गेला होतास ?	הֵיכָן הָלַכְתָּ אֶתְמוֹל

אָבִי אָמַר לִי	माझा बाप मला बोलला.
אִמָּהּ נָתְנָה לָהּ	तिच्या आईने तिला दिल्हें.
הֲיוֹדֵעַ אַתָּה לִכְתּוֹב	तूं लिहायास जाणतोस काय?
הוּא רָעֵב הַרְבֵּה	तो फार भुकेला आहे.
הוּא רוֹצֶה לֶאֱכֹל	त्यास खावयास पाहिजे.
הִיא צְמֵאָה הַרְבֵּה	ती फार तान्हेली आहे.
תָּבִיא לִי הַסֵּפֶר	मला तें पुस्तक आण.
בְּאֵיזֶה שָׁעָה תָּבוֹא	तूं कोणत्या वेळीं येशील?
אֵין לִי פְּנַאי	मला आवकाश नाहीं.
הַיּוֹם קוֹר הַרְבֵּה	आज फार थंडी आहे.
אַל תְּאַחֵר לָבֹא	तूं येण्यास उशीर करूं नको.
מָה הוּא הַשָּׁעָה	किती तास वाजले?

धडा विसावा.—כ

לִקְנוֹת	विकत घ्यावयास.	אִגֶּרֶת	पत्र.	פֵּרוֹת	फळें.
		זוֹל	स्वस्त.	מוֹר	स्वामी,वडील
יָקָר	माहाग.	קָנִיתָ	तूं विकत घेतलेंस.	תַּקֵּן	नीट कर.
לְטַיֵּל	फिरावयास.			שָׁכַחְתִּי	मी विसरलों.
הַבֶּגֶד	वस्त्र, कापड.	קוּלְמוּס	लेखणी.	מָעוֹת	पैका.

तूं बाजारांत कां गेला होतास?	לָמָּה הָלַכְתָּ בַּשּׁוּק
मी कांहीं फळें विकत घ्यावयास गेलों	הָלַכְתִּי לִקְנוֹת אֵיזֶה פֵּירוֹת
तुजवळ पैसे कोठून? [होतों.	מֵהֵיכָן יֵשׁ לְךָ מָעוֹת
माझ्या स्वामी बापानें मला दिल्हे.	מוֹר אָבִי נָתַן לִי
हें कापड तूं केवढ्यास विकत घेतलेंस?	בְּכַמָּה קָנִיתָ זֶה הַבֶּגֶד
हें स्वस्त आहे किंवा माहाग?	הֲזֶה יוֹקֵר אוֹ זוֹל
तें फार माहाग आहे.	הַרְבֵּה יוֹקֵר הוּא
मीं थोडा फिरायास जातों.	אֲנִי הוֹלֵךְ לְטַיֵּיל מְעַט
मजसाठीं एक लेखणी कर.	תַּקֵּן לִי קוֹלְמוֹס אֶחָד
तूं काय लिहूं इच्छितोस?	מַה אַתָּה רוֹצֶה לִכְתּוֹב
मी आपल्या वडिल भावास पत्र लिहूं इच्छितों. [विसरलों.	אֲנִי רוֹצֶה לִכְתּוֹב אִגֶּרֶת לְמוֹר אָחִי
मी मजबरोबर कागद आणायास	שָׁכַחְתִּי לְהָבִיא עִמִּי הַנְּיָר

धडा एकविसावा.—כא

आठवड्यांत.	בְּשָׁבוּעַ	सहायानें.	בְּעֶזְרַת	मिळालें, मान्य केलें	קִבַּלְתָּ
देवाला.	לָאֵל	कळवायास.	לִפְרוֹס		
तूं करशील.	תַּעֲשֶׂה	तूं सांग.	תֹּאמַר	स्तुति.	תְּהִלּוֹת

הֲקָרָאתָ	तूं वाचलेंस काय?	שֶׁעָבַר	जो गेला, पार झाला	חֶסֶד दया.
לְהָבִיא	आणायास.	וּבְנֵי	आणि लेंकरें, मनुष्यें	הָעֶבֶד तो चाकर.
				לִשְׁתּוֹת प्यावयास.

מָתַי קִבַּלְתָּ אִגֶּרֶת מֵאָחִיךָ	तुझ्या भावाचें पत्र तुला केव्हां मिळालें?
בְּשָׁבוּעַ שֶׁעָבַר	गेल्या आठवड्यांत.
כֵּיצַד שְׁלוֹמוֹ וּבְנֵי בֵיתוֹ	तो व त्याचे घरचीं मनुष्यें कसीं आहेत?
כֻּלָּם בְּטוֹב תְּהִלּוֹת לָאֵל	सर्व चांगलीं आहेत, देवाची स्तुति असो.
מָתַי תִּכְתּוֹב לוֹ	तूं त्यास केव्हां लिहिशील?
מָחָר בְּעֶזְרַת הָאֵל	ईश्वरी सहायानें उद्यां.
תַּעֲשֶׂה לִּי חֶסֶד לִפְרוֹס לוֹ שְׁלוֹמִי	मजवर कृपाकरून माझी सलाम त्यास सांग.
הֲקָרָאתָ אִגֶּרֶת הַחִדּוּשִׁים	तूं वर्तमान पत्र वाचिलेंस काय?
כֵּן אֲבָל אֵין בָּהּ חִדּוּשׁ	होय, परंतु त्यांत कांहीं नवल विशेष नाहीं.
קְרָא אֶת הָעֶבֶד	चाकरास बोलाव.
מָה אַתָּה רוֹצֶה מִמֶּנּוּ	तुला त्याजवळून काय पाहिजे?
תֹּאמַר לוֹ לְהָבִיא לִי מְעַט מַיִם לִשְׁתּוֹת	त्यास मला थोडें प्यावयास पाणी आणायास सांग.

धडा बाविसावा.—כב

पश्चिम.	מַעֲרָב	नवें.	הֶחָדָשׁ	बसतो,राहतो	יוֹשֵׁב
दिवे.	הַנֵּרוֹת	पूर्व.	מִזְרָח	काम.	עֵסֶק
बंद कर.	סְגוֹר	पेटीव.	תַּדְלִיק	दक्षिण.	דָּרוֹם
विझीव.	תְּכַבֶּה	दरवाजा.	הַדֶּלֶת	उघड.	פְּתַח
खिडकी.	הַחַלּוֹן	उत्तर.	צָפוֹן	दोनप्रहर.	הַצָּהֳרַיִם

तो कोणत्या आळींत राहतो?	אֵיזֶה הַשּׁוּק אֲשֶׁר הוּא יוֹשֵׁב בּוֹ
नव्या आळींत.	בַּשּׁוּק הֶחָדָשׁ
दोन प्रहरा नंतर तूं काय करशील?	מַה תַּעֲשֶׂה אַחַר הַצָּהֳרַיִם
तूं मजबरोबर येशील काय?	הֲתֵלֵךְ אִתִּי
नाहीं, मला काम आहे.	לֹא יֵשׁ לִי עֵסֶק
दिवे पेटीव.	תַּדְלִיק הַנֵּרוֹת
ते विझीव.	תְּכַבֶּה אוֹתָן
दरवाजा उघड.	פְּתַח הַדֶּלֶת
खिडकी बंद कर.	סְגוֹר הַחַלּוֹן
मला थोडीं अंजिरें दे.	תֵּן לִי מְעַט תְּאֵנִים
या पेटींतून घे.	תִּקַּח מֵהָאַרְגָּז
पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण.	מִזְרָח מַעֲרָב צָפוֹן דָּרוֹם

धडा तेविसावा.—כג

प्रीति करितो.	אוֹהֵב	पाऊस.	מָטָר	लेंकरें, मुलें.	יְלָדִים
ऐकिलेंस.	שָׁמַעְתָּ	आणि नद्या.	וּנְהָרוֹת	उतरला, पडला.	יָרַד
माग.	שְׁאַל	मोठें.	גָּדוֹל	समुद्र.	יַמִּים
आणि मी देईन.	וְאֶתֵּן	सुमारें, प्रमाणें	כְּמוֹ	तारूं.	סְפִינָה
		तुमच्या देशांत.	בְּאַרְצְכֶם	जी गेली.	שֶׁעָבְרָה
तूं विसरशील	תִּשְׁכַּח			शाळा.	בֵּית הַתַּלְמוּד

शाळेंत किती मुलें आहेत?	כַּמָּה יְלָדִים יֵשׁ בְּבֵית הַתַּלְמוּד
लहान मोठीं सुमारें पन्नास आहेत.	יֵשׁ כְּמוֹ חֲמִשִּׁים גְּדוֹלִים וּקְטַנִּים
मी आपणाकरितां मोठें घर बांधीन.	אֶבְנֶה לִי בַּיִת גָּדוֹל
गेल्या रात्रीं पुष्कळ पाऊस पडला.	בַּלַּיְלָה שֶׁעָבְרָה יָרַד מָטָר הַרְבֵּה
तूं चांगला मुलगा आहेस.	אַתָּה יֶלֶד טוֹב
मीं तुजवर प्रीति करितों. [काय?	הַרְבֵּה אֲנִי אוֹהֵב אוֹתְךָ
तुमच्या देशांत समुद्र व नद्या आहेत	הֲיֵשׁ בְּאַרְצְכֶם יַמִּים וּנְהָרוֹת
तूं आज नवल विशेष काय ऐकिलेंस!	מָה חִדּוּשׁ הַיּוֹם שָׁמַעְתָּ
मीं कांहीं नवल विशेष ऐकिलें नाहीं.	לֹא שָׁמַעְתִּי שׁוּם חִדּוּשׁ
मी एक मोठें तारूं पाहिलें.	רָאִיתִי סְפִינָה גְּדוֹלָה

मजजवळ माग आणि मी देईन.	שְׁאַל מִמֶּנִּי וְאֶתֵּן
मला पत्र लिहावयास विसरूं नको.	אַל תִּשְׁכַּח לִכְתּוֹב אֵלַי

धडा चोविसावा.—כד.

मीं वाढलों.	גָּדַלְתִּי	मीं बोललों.	דִּבַּרְתִּי	राग येईल.	יִחַר
तुझ्या मनांत.	בִּלְבָבְךָ	जेवण.	מִשְׁתֶּה	मी देईन.	אֶתֵּן
जो, जी, जें.	אֲשֶׁר	माझे दिवस.	יָמַי	कृपा.	חֵן
तो शब्द, ती गोष्ट.	הַדָּבָר	तुझें वेतन.	שְׂכָרְךָ	कळीव, सांग.	הַגִּידָה
		मला सांपडली	מָצָאתִי	होवो.	יְהִי
जा.	לֵךְ	तुह्मीं ऐकिलें.	שְׁמַעְתֶּם	दिसण्यांत.	בְּעֵינֵי
मी करीन.	אֶעֱשֶׂה	मागोंत.	בַּדֶּרֶךְ	माझे स्वामी.	אֲדֹנִי

माझ्या स्वामीचे दिसण्यांत रागन येवो	אַל יִחַר בְּעֵינֵי אֲדֹנִי
मी तुझें वेतन देईन.	אֲנִי אֶתֵּן אֶת שְׂכָרְךָ
जर तुमची कृपादृष्टि मजवर होईल,	אִם נָא מָצָאתִי חֵן בְּעֵינֵיכֶם
तूं आपल्या सेवकासीं इब्री भाषेंत बोल	דַּבֵּר נָא אֶל עַבְדְּךָ בִּלְשׁוֹן עִבְרִי
मी बोललों, परंतु तुह्मी ऐकिलें नाहीं.	דִּבַּרְתִּי וְלֹא שְׁמַעְתֶּם
आतां तुझें नांव मला सांग.	הַגִּידָה נָא שְׁמֶךָ
मी त्यांस जेवण करीन.	אֶעֱשֶׂה לָהֶם מִשְׁתֶּה

हें आह्मांस मार्गांत सांपडलें.	זאת מָצָאנוּ בַדֶּרֶךְ
जी गोष्ट मी तुह्मास सांगीतली ती ही.	זֶה הַדָּבָר אֲשֶׁר דִּבַּרְתִּי אֵלֶיךָ
ईश्वर आमचा देव आह्मा संगतीं असो.	יְהִי יְיָ אֱלֹהֵינוּ עִמָּנוּ
माझ्या सर्व दिवसांत मी ज्ञानी लोकांमध्यें वाढलों.	כָּל יְמֵי גָּדַלְתִּי בֵּין הַחֲכָמִים
जा, तुझ्या मनांत जें असेल तें सर्व कर	כֹּל אֲשֶׁר בִּלְבָבְךָ לֵךְ עֲשֵׂה

धडा पंचविसावा.—כה

पुष्कळ.	מְרוּבָה	बाहेर.	בַּחוּץ	वर्षें.	שְׁנֵי
मी होतों.	הָיִיתִי	पाहा.	רְאֵה	तीं मनुष्यें.	הָאֲנָשִׁים
तुजबरोबर.	אִתְּךָ	लहान, तोकडा.	קָצַר	तुझें आयुष्य.	חַיֶּיךָ
कल्पितों.	חוֹשֵׁב	काम, धंदा.	הַמְּלָאכָה	ते बोलले.	אָמְרוּ
पाऊस.	הַגֶּשֶׁם	वेळ.	פַּעַם	तूं उभा आहेस.	תַּעֲמוֹד

तुझें वय किती आहे?	כַּמָּה יְמֵי שְׁנֵי חַיֶּיךָ
तूं बाहेर कां उभा आहेस?	לָמָּה תַעֲמוֹד בַּחוּץ
हीं मनुष्यें काय बोललीं?	מָה אָמְרוּ הָאֲנָשִׁים הָאֵלֶּה
त्यांनीं तुझ्या घरांत काय पाहिलें?	מָה רָאוּ בְּבֵיתְךָ
ही गोष्ट चांगली नाहीं.	לֹא טוֹב הַדָּבָר הַזֶּה

एक वेळा मी मार्गानें जात होतों.	פַּעַם אַחַת הָיִיתִי הוֹלֵךְ בַּדֶּרֶךְ
तूं आपल्या भावांचें कल्याण पाहात	רְאֵה אֶת שְׁלוֹם אַחֶיךָ
मी तुजबरोबर जेवीन. [जा.	אֲנִי אוֹכֵל אִתְּךָ
दिवस लहान आणि काम फार आहे.	הַיּוֹם קָצֵר וְהַמְּלָאכָה מְרוּבָּה
एकापेक्षां दोघे चांगले.	טוֹבִים שְׁנַיִם מִן הָאֶחָד
मला वाटतें कीं आज पाऊस पडेल.	אֲנִי חוֹשֵׁב שֶׁיֵּרֵד הַגֶּשֶׁם הַיּוֹם
तूं त्याचें काय करशील?	מַה תַּעֲשֶׂה בָּהֶן

धडा सव्विसावा.—כו

शाब्बाथ.—שַׁבָּת

आणि विसावा घेतला.	וַיִּנָּפַשׁ	प्रारंभीं.	בְּרֵאשִׁית
आठवण कर.	זָכוֹר	उत्पन्न केलें.	בָּרָא
थोर मानिलेला.	מְכֻבָּד	तें आकाश.	הַשָּׁמַיִם
त्याची बायको.	אִשְׁתּוֹ	ती पृथ्वी.	הָאָרֶץ
अगत्य.	חַיָּב	तो स्वस्थ राहिला.	שָׁבַת
त्यास पवित्र मानायास.	לְקַדְּשׁוֹ	सांभाळायास.	לִשְׁמוֹר
ती खूण.	הָאוֹת	तूं काम कर.	תַּעֲבוֹד
		तो मनुष्य.	הָאָדָם

בְּרֵאשִׁית בָּרָא אֱלֹהִים אֵת הַשָּׁמַיִם וְאֵת הָאָרֶץ׃ בַּחֲמִשָּׁה
יָמִים הָרִאשׁוֹנִים בָּרָא כָּל אֲשֶׁר בָּהֶם׃ וּבְיוֹם הַשִּׁשִּׁי עָשָׂה
אֶת הָאָדָם וְאִשְׁתּוֹ׃ שֵׁם הָאִישׁ אָדָם וְשֵׁם אִשְׁתּוֹ חַוָּה׃
וּבְיוֹם הַשְּׁבִיעִי שָׁבַת וַיִּנָּפַשׁ׃ עַל כֵּן קָרָא אֶת יוֹם הַשְּׁבִיעִי
שַׁבָּת׃ כָּל יִשְׂרָאֵל חַיָּב לִשְׁמוֹר אֶת הַשַּׁבָּת׃ זָכוֹר אֶת
יוֹם הַשַּׁבָּת לְקַדְּשׁוֹ׃ שֵׁשֶׁת יָמִים תַּעֲבוֹד וְעָשִׂיתָ כָּל
מְלַאכְתֶּךָ׃ יוֹם זֶה מְכֻבַּד מִכָּל יָמִים׃ אִם תִּשְׁמוֹר אֶת
הַשַּׁבָּת יְיָ יִשְׁמוֹרְךָ מִכָּל רָע׃ זֶה הָאוֹת אֲשֶׁר נָתַן יְיָ בֵּינוֹ
וּבֵין בְּנֵי יִשְׂרָאֵל׃

प्रारंभीं देवानें आकाश आणि पृथ्वी यांस उत्पन्न केलें. पहिल्या पांच दिवसांत त्यांत जें सर्व तें उत्पन्न केलें. आणि साहाव्या दिवशीं मनुष्य व त्याची बायको यांस केलें. त्या पुरुषाचें नांव आदाम व त्याचे बायकोचें नांव हाव्वा. आणि सातव्या दिवशीं स्वस्थ राहून विसावा घेतला. यास्तव त्यानें सातव्या दिवसास शाब्बाथ असें ह्मटलें. सर्व इस्राएलांनीं शाब्बाथ अगत्य पाळावा. शाब्बाथ दिवस पवित्र पाळावा ह्मणून त्याची आठवण कर. साहा दिवस उद्योग करून आपलें सर्व काम कर. हा दिवस सर्व दिवसांपेक्षां थोर मानिलेला आहे. जर तूं शाब्बाथ पाळशील तर ईश्वर तुला सर्व वाईटापासून सांभाळील. ईश्वरानें आपणामध्यें व इस्राएलांच्या लेंकरांमध्यें खूण दिल्ही ती हीच.

धडा सत्ताविसावा.—כז־

खरी भक्ति.—עֲבוֹדַת אֱמֶת

कोठें.	אָנָה	सेवा करणारा.	עוֹבֵד
मी बांधीन.	אֶבְנֶה	मूर्ति.	אֱלִילִים
वेदी.	מִזְבֵּחַ	आणि भयंकर.	וְנוֹרָא
आणि त्यानें उत्तर दिल्हें.	וַיַּעַן	इच्छितों.	חָפֵץ
आणि तो ह्मणाला.	וַיֹּאמֶר	त्याची सेवा करायास.	לְעָבְדוֹ
तूं ती बांध.	בְּנֵהוּ	आणि अर्पायास.	וּלְהַקְרִיב
प्रीति करायास.	לְאַהֲבָה	होम, अर्पण.	זֶבַח
आणि लगटून राहायास.	וּלְדָבְקָה	बोल, सांग.	אֱמוֹר

וַיְהִי הַיּוֹם וַיָּבֹא לִפְנֵי רַבִּי נָתָן אִישׁ עוֹבֵד אֱלִילִים
וַיֹּאמֶר לוֹ אֱלֹהֵי יִשְׂרָאֵל אֲשֶׁר אַתָּה עוֹבֵד אֵל גִּבּוֹר וְנוֹרָא
הוּא׃ וַאֲנִי חָפֵץ לְעָבְדוֹ וּלְהַקְרִיב זֶבַח לְפָנָיו׃ אֱמוֹר לִי
רַבִּי אָנָה אֶבְנֶה לוֹ מִזְבֵּחַ׃ וַיַּעַן לוֹ רַבִּי נָתָן וַיֹּאמֶר בְּנֵהוּ
עַל לִבְּךָ לְאַהֲבָה אוֹתוֹ וּלְדָבְקָה בוֹ׃

एके दिवशीं असें झालें (कीं), एक मूर्तिपूजक रिब्बी नाथान याज-कडे आला, आणि ह्मणाला कीं, इस्राएलांचा देव ज्याची सेवा तूं

करितोस तो समर्थ व भयंकर देव आहे. त्याची सेवा करावी व त्यापुढें यज्ञ वाहावा असें मी इच्छितों. (तर) हे माझे गुरु, त्याजकरितां मी वेदी कोठें बांधूं हें मला सांग. रिब्बी नाथान त्यास उत्तर देऊन ह्मणाला (कीं), त्याजवर प्रीति करावी व त्यासच लगटून राहावें, ह्मणून तूं ती आपले हृदयावर बांध.

धडा अठ्ठाविसावा.—כח

एक धर्मभ्रष्ट इस्राएल.—הַמּוּמָר

הַקֵּיסָר	बादशाहा.
הֵמִיר	पालटला.
דָּתוֹ	त्याचा धर्म.
לָשֵׂאת	उचलायास, मिळविण्यास.
וַיְנַשְּׂאֵהוּ	आणि तो त्यास उंचावील.
בְּהִדָּבֵק	लगटून राहण्यांत.
בֶּאֱמוּנַת	विश्वासांत.
בָּזָה	त्याने धिःकारिला.
אָשִׂים	मी ठेवीन.
בִּטְחוֹנִי	माझा भरंवसा.
וַיִּמְכּוֹר	आणि तो विकील, स्वाधीन करील.
אוֹיְבֶיהָ	तिचे शत्रु.

בִּימֵי הַקֵּיסָר נָאפּוֹלֵיאוֹן אִישׁ יִשְׂרָאֵל שַׂר חֲמִשִּׁים הֵמִיר
אֶת דָּתוֹ לָשֵׂאת חֵן בְּעֵינֵי הַמֶּלֶךְ אֲשֶׁר לֹא מִבְּנֵי יִשְׂרָאֵל

הוּא׃ וַיְבַקֵּשׁ מֵאִתּוֹ אֲשֶׁר יְגַדְּלֵהוּ וִינַשְּׂאֵהוּ עַל הַמַּעֲשֶׂה אֲשֶׁר עָשָׂה בְּהִדָּבֵק עוֹד לְמַלְכּוֹ בִּהְיוֹתוֹ כָּמוֹהוּ בֶּאֱמוּנַת הַדָּת׃ אַךְ הַמֶּלֶךְ בָּזָה אוֹתוֹ בְּלִבּוֹ׃ וַיֹּאמֶר אֲנִי לֹא אֲגַדֵּל אוֹתוֹ וְלֹא אֲנַשֵּׂא אוֹתוֹ וְלֹא אָשִׂים בִּטְחוֹנִי בוֹ׃ כִּי הָאִישׁ אֲשֶׁר הֵמִיר אֶת אֱלֹהָיו וַיִּמְרֶה בוֹ יַמְרֶה גַם אֶת פִּי מַלְכּוֹ וְיִמְכּוֹר גַּם אֶת אַרְצוֹ בְּיַד אוֹיְבֶיהָ׃

नेपोलियन बादशाहाचे दिवसांत एक इस्राएली मनुष्य पन्नासांचा सर्दार यानें, तो राजा इस्राएलाच्या संतानांतला नव्हता ह्मणून, त्याच्या दृष्टींत कृपा मिळविण्याकरितां आपला धर्म पालटला. आणि अशी गोष्ट केली, ह्मणून त्यानें आपणास थोरपणा व उंच पदवी द्यावी असा त्यानें त्याजपाशीं अर्ज केला; कारण धर्माच्या विश्वासामध्यें तो त्यासारिखाच झाल्यामुळें तो आपले राजास अधिक लगटून राहाणार होता. परंतु राजानें त्यास आपले मनीं धिःकारलें. आणि तो ह्मणाला कीं, मी त्यास थोरपणा व उंच पदवी देणार नाहीं, आणि मी आपला विश्वास त्याजवर ठेवणार नाहीं. कारण जो मनुष्य आपला देव पालटून त्याजवर बंडावा करितो; तो आपले राजाच्या आज्ञेविरुद्धही बंडावा करून आपला देशही शत्रूच्या स्वाधीन करील.

धडा एकुणतिसावा.—כט

मनुष्य—הָאָדָם

הָעֶלְיוֹן	थोर, श्रेष्ठ.	יָנוּעַ	हालतो, जातो.
הָאֲדָמָה	भूमि, पृथ्वी.	רֵיחַ	वास.
מַשְׂכִּיל	समजतो.	טַעַם	रुचि.
רוֹדֶה	धनीपण करितो.	מִשּׁוּשׁ	स्पर्श.
וְכוֹבֵשׁ	आणि अमलाखालीं आणितो	בְּאָזְנַיִם	कानानें.
גּוּף	शरीर.	בְּאַפַּיִם	नाकपुड्यानें.
וּנְשָׁמָה	आणि आत्मा.	מוֹתָר	श्रेष्ठ.
מֵחוֹמֶר	मातीपासून.	יָכוֹל	शकतो.
נֶעֱלָמָה	गुप्त.	לְגַלּוֹת	प्रगट करायास.
חוּשִׁים	इंद्रियें.	מַחֲשַׁבְתּוֹ	त्याचा विचार.
חָכְמָה	बुद्धि.	יָצַר	त्यानें घडलें.
וּבִינָה	आणि ज्ञान, समज.	בְּבֶטֶן	उदरांत.
וְיָשֵׁן	आणि निजतो.	וְחוֹנֵן	आणि दया करितो.
וּבִרְצוֹנוֹ	आणि तो आपल्या इच्छेनें		

הָעֶלְיוֹן עַל כָּל הַחַי אֲשֶׁר עַל פְּנֵי הָאֲדָמָה הוּא הָאָדָם׃ כִּי הוּא מַשְׂכִּיל וּמְדַבֵּר וּבְחָכְמָתוֹ רוֹדֶה בַּכֹּל וְכוֹבֵשׁ בְּהֶמָד

וְחַיָּה׃ הָאָדָם הוּא גּוּף וּנְשָׁמָה׃ גּוּפוֹ מֵחוֹמֶר וְהַנְּשָׁמָה
אֲשֶׁר הִיא נֶעֱלָמָה מִכָּל חוּשִׁים נוֹתֶנֶת לוֹ חָכְמָה וּבִינָה׃
הוּא אוֹכֵל שׁוֹתֶה וְיָשֵׁן וּבִרְצוֹנוֹ יָנוּעַ מִמָּקוֹם לְמָקוֹם׃ יֵשׁ
לוֹ חֲמִשָּׁה חוּשִׁים וְאֵלּוּ הֵן מַרְאֶה שְׁמַע רֵיחַ טַעַם
וּמִשּׁוּשׁ׃ הוּא רוֹאֶה בְּעֵינַיִם שׁוֹמֵעַ בְּאָזְנַיִם מֵרִיחַ בְּאַפַּיִם
טוֹעֵם בְּפֶה וּמְמַשֵּׁשׁ בְּיָדַיִם׃ אֵין הָאָדָם מוֹתַר מִן הַבְּהֵמָה
רַק כְּשֶׁהוּא יָכוֹל לְגַלּוֹת מַחֲשַׁבְתּוֹ בְּדִבּוּר וְיוֹדֵעַ אֶת
יוֹצְרוֹ אֲשֶׁר יָצַר אוֹתוֹ בְּבֶטֶן אִמּוֹ וְחוֹנֵן עָלָיו כָּל יְמֵי חַיָּיו׃

जे सर्व प्राणी पृथ्वीच्या पाठीवर आहेत, त्यांपेक्षां मनुष्य थोर आहे. कारण तो समजतो, बोलतो, आणि आपल्या बुद्धीनें सर्वांवर धनीपण करितो, आणि गुरें व श्वापदें यांस आपले अंमलाखालीं आणितो मनुष्य शरीर व आत्मा (यांचा केलेला) आहे. शरीर हें मातीपासू आहे; आणि आत्मा जो सर्व इंद्रियांपासून गुप्त आहे, तो त्यास बुद्धि व ज्ञान देतो. तो (मनुष्य) खातो, पितो, निजतो आणि आपल्य इच्छेप्रमाणे, (एका) ठिकाणाहून (दुसऱ्या) ठिकाणीं जातो. त्यां पांच (प्रकारिचे) इंद्रियबोध आहेत; ते हेः—पाहाणें, ऐकणें, हुंगणें रुचि घेणें, आणि स्पर्श करणें. तो डोळ्यांनीं पाहतो, कानांनीं ऐकते नाकपुड्यांनीं हुंगतो, तोंडानें रुचि घेतो आणि हातांनीं स्पर्श करिते

मनुष्य पशूंपेक्षां श्रेष्ठ नाहीं; (परंतु एवढेंच) मात्र कीं, तो आपले विचार शब्देंकरून प्रगट करूं शकतो, आणि ज्यानें त्यास त्याच्या आईच्या उदरीं घडिलें; आणि जो त्याच्या आयुष्याच्या सर्व दिवसांत त्याजवर कृपा करितो, त्या आपल्या घडणारास (उत्पन्न करणारास) तो जाणतो (ओळखतो).

धडा तिसावा.—ל.

देव एकच आहे.—יְיָ אֶחָד

सारखेपणा.	דּוֹמֶה	तें जग.	הָעוֹלָם
वरील.	מִמַּעַל	थोर.	אַדִּיר
पवित्र.	קָדוֹשׁ	कांहीं.	מְאוּמָה
शिवाय, वांचून.	בִּלְתִּי	त्याचें जाणणें.	יְדִיעָתוֹ
खडकरूप आश्रय.	צוּר	तो इच्छितो.	יִרְצֶה
घडलेला.	נוֹצָר	शेवटला.	אַחֲרוֹן
आणि त्यानें आज्ञा केली.	וְצִוָּה	उगववितो.	מַצְמִיחַ
एकत्व मानायास.	לְיַחֵד	मांस.	בָּשָׂר
दोन वेळ.	פַּעֲמַיִם	त्या वांचून.	מִלְּבַדּוֹ

יְיָ אֱלֹהִים אֲשֶׁר בָּרָא אֶת הָעוֹלָם אַדִּיר הוּא וְעָשָׂה כֹּל אֲשֶׁר חָפֵץ בַּשָּׁמַיִם וּבָאָרֶץ ׃ וְלֹא נַעֲשָׂה מְאוּמָה בִּלְתִּי

יְדִעָתוֹ וְחֶפְצוֹ וְלוֹ יֵעָשֶׂה דָּבָר אֲשֶׁר לֹא יִרְצֶה׃ הוּא רִאשׁוֹן
וְהוּא אַחֲרוֹן׃ הוּא מַצְמִיחַ חָצִיר לַבְּהֵמָה וְנוֹתֵן לֶחֶם
לְכָל בָּשָׂר וְאֵין עוֹד מִלְּבַדּוֹ׃ אֵין אֱלֹהִים עִמּוֹ וְאֵין דּוֹמֶה
לוֹ׃ מִי אֵל בַּשָּׁמַיִם מִמַּעַל וְעַל הָאָרֶץ מִתַּחַת כַּיְיָ אֱלֹהִים׃
אֵין קָדוֹשׁ כַּיְיָ כִּי אֵין בִּלְתּוֹ וְאֵין צוּר כֵּאלֹהִים׃ הוּא
הָיָה וְהוּא הֹוֶה וְהוּא יִהְיֶה לְפָנָיו לֹא נוֹצַר אֵל וְאַחֲרָיו לֹא
יִהְיֶה׃ הוּא אֶחָד וּשְׁמוֹ אֶחָד׃ וְצִוָּה אוֹתָנוּ לְיַחֵד שְׁמוֹ
בְּכָל יוֹם פַּעֲמַיִם בְּאַהֲבָה׃ שְׁמַע יִשְׂרָאֵל יְיָ אֱלֹהֵינוּ
יְיָ אֶחָד׃

परमेश्वर देव ज्यानें हें जग उत्पन्न केलें तो थोर आहे; आणि त्यानें आपल्या इच्छे प्रमाणें आकाश व पृथ्वी यांत सर्व केलें. त्यास समजल्या वांचून व त्याच्या इच्छे वांचून कांहींच केलें जात नाहीं; आणि तो इच्छीत नाहीं असें कांहींच केलें जाणार नाहीं. तोच पहिला व तोच शेवटला. तोच पशूंकरितां गवत उगववितो, आणि सर्व मांसमयांस भाकर देतो; त्यावांचून अणखी कोणी नाहीं. त्या संगतीं कोणी देव नाहीं, आणि त्यासारिखाहि कोणी नाहीं. वर आकाशांत व खालीं पृथ्वीवर परमेश्वर देवासारिखा कोण आहे! परमेश्वरासारिखा कोणी पवित्र नाहीं, कारण त्याशिवाय कोणी नाहीं, आणि

देवासारिखा कोणी खडकरूप आश्रय नाहीं. तो होता व तो आहे व तोच असेल; त्याच्या पूर्वी कोणी घडलेला देव नव्हता व त्यानंतरहि होणार नाहीं. तो एक व त्याचें नामही एकच; प्रतिदिवशीं दोन वेळां त्याच्या नामाचें एकत्व प्रीतीनें मान्य करावें असी त्यानें आपणास आज्ञा केली आहे. हे इस्राएला, ऐक, परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे.

תם ונשלם שבח לאל בורא עולם:

पृथ्वी उत्पन्नकर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

BOMBAY: PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA.

HEBREW PRIMER.

इब्री

पहिलें पुस्तक

(सुधारून वाढविलेली आवृत्ती दुसरी)

हें

योसेफ येहेजकेल राजपुरकर
दावीद सासोन यांच्या शाळेंतील मुख्य गुरु,
इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे चिटणीस,
व
मुंबईच्या युनिवर्सिटीचे फेलो यांनीं केलें,

तें

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीनें

लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें
एज्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

सन १८८१
इस्राएली ५६४१

השער הראשון

לשון הקודש

(דפוס מתוקן ונוסף)

מאת

יוסף יחזקאל ראגפורכר יצ״ו

מלמד בבית התלמוד של הג׳ דוד ששון נ״ע סופר של חברת תקון בני ישראל

וחבר ליוניורסיטי של במבי

נדפס פעם שנית על ידי

חברת תקון בני ישראל הי״ו


במבי יע״א

בשנת. פעמי הכן באמרתך לפ״ק

השער הראשון
אל
לשון הקודש

HEBREW PRIMER.

इब्री पहिलें पुस्तक.




किंमत ४ आणे.

יסודי דקדוק לשון הקודש

ELEMENTARY HEBREW GRAMMAR.

इब्री लघु व्याकरण.



सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिलें असे.

किंमत १० आणे.

יסודי דקדוק לשון הקודש

בלשון מראטי

לילדי בני ישראל

מאת

יוסף יחזקאל ראגפורכר יצ״ו

מלמד בבית התלמוד

של

הג׳ דוד ששון נ״ע

סופר של חברת תקון בני ישראל

וחבר ליוניורסיטי של במבי׳

במבי יע״א

נדפס בבית הדפוס של אדיוכישן סוסייטי

בשנה מה נמלצו לחכי אמרתך מדבש לפי לפ״ק

ELEMENTARY HEBREW GRAMMAR,

IN MARATHI,

FOR

BENE-ISRAEL CHILDREN,

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKAR,

HEAD MASTER DAVID SASSOON BENEVOLENT INSTITUTION; SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY; AND FELLOW OF THE UNIVERSITY OF BOMBAY.

इब्री लघु व्याकरण.

हें

इस्राएल लोकांच्या मुलांकरितां

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोन यांच्या शाळेंतील मुख्य गुरु,

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे चिटणीस,

व

मुंबईच्या युनिवर्सिटीचे फेलो यांनीं केलें.

तें

मुंबईमध्यें

एज्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

सन १८८२.—इस्राएली ५६४२.

प्रस्तावना.

आपल्या पवित्र भाषेचा अभ्यास करण्याची इच्छा तरुणांच्या मनीं दिवसानुदिवस वाढत आहे, हें पाहून त्यांस माझ्यानें जेवढें सहाय करवेल तें करण्याकरितां, मी इब्री पहिलें पुस्तक सुधारून वाढविलें, आणि त्याची दुसरी आवृत्ति इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीकडून छापविली. परंतु व्याकरणावांचून कोणतीही भाषा शिकविणें दुर्घट आहे. आणि आपली भाषा शिकण्याकरितां आपणापासीं असें साधन नाहीं, कारण पूर्वी दाक्तर विलसन साहेबांनीं जें इब्री भाषेचें मराठी व्याकरण केलें होतें, तेंहि आतां मिळत नाहीं. यामुळें जे कोणी इब्री भाषेचा अभ्यास करूं इच्छितात, त्यांस पहिल्यानें इंग्लिश भाषेचा अभ्यास करून, मग इंग्लिश पुस्तकांच्या सहायानें इब्रीभाषेचा अभ्यास करावा लागतो. तर असी अडचण न पडावी ह्मणून मी हें इब्री लघु व्याकरण रचिलें आहे. यांत इब्री भाषेच्या व्याकरणाच्या बहुतेक मुख्य नियमांची माहिती दिल्ही आहे. आणि तें शाळांमध्यें व कुटुंबांमध्येंहि उपयोगी पडावें ह्मणून मराठी बालव्याकरणासारिख्या सोप्या भाषेत व प्रश्नोत्तरावळीप्रमाणें रचून मी तें आपल्या प्रिय इस्राएल बांधवांस, आणि विशेषें करून त्यांच्या मुलांस नजर केलें आहे. ते त्याचा यथायोग्य उपयोग करून लवकरच आपल्या पवित्र शास्त्राचा व प्रार्थनेचा खरा अर्थ समजूं लागतील असी आशा करितों.

इब्री लघु व्याकरण.

मूळाक्षरें.

प्र० इब्री भाषेंत किती मूळाक्षरें आहेत?

उ० इब्री भाषेंत बेवीस मूळाक्षरें आहेत; א ב इत्यादि ת पर्यंत.

प्र० त्यांत दोन आकारांचीं अक्षरें किती व तीं कोणतीं?

उ० त्यांत दोन आकारांचीं अक्षरें כ מ נ פ צ असीं पांच आहेत.

प्र० त्यांचे दोन आकार ते कसे?

उ० शब्दाच्या आरंभीं व मध्यें हीं अक्षरें כ מ נ פ צ असीं, आणि शेवटीं ך ם ן ף ץ असीं लिहिलीं जातात.

प्र० दोन उच्चारांचीं अक्षरें किती व कोणतीं?

उ० तीं ב ג ד כ פ ת असीं साहा आहेत.

प्र० यांचे दोन उच्चार ते कसे?

उ० या अक्षरांमध्यें टिंब नसल्यास त्यांचा उच्चार कांहींसा ב भ, ג घ, ד ध, כ ख, פ फ, ת थ, असा होतो; परंतु टिंब असल्यास בּ ब, גּ ग, דּ द, כּ क, פּ प, תּ त, असा होतो.

प्र० जीं अक्षरें लिहितांना ओळींतील जागा भरण्याकरितां रुंदावलीं जातात तीं किती व कोणतीं?

उ० तीं א ה ל ת ם ר असीं साहा आहेत.

प्र० इब्री मूळाक्षरांचे उच्चारांच्या भिन्न भिन्न स्थानांवरून त्यांचे विभाग केले आहेत ते कसे?

उ० त्यांचे भिन्न भिन्न स्थानांवरून पांच विभाग केलें आहेत, ते व त्यांचीं स्थानें येणें प्रमाणें :—

א ה ח ע यांचें कंठस्थान.

ב ו מ ף यांचें ओष्ठस्थान.

ג י כ ק यांचें तालुस्थान.

ד ט ל נ ת यांचें जिव्हास्थान.

ז ס צ ר ש यांचें दंतस्थान.

प्र० इब्री मूळाक्षरांचे अणखी किती विभाग आहेत?

उ० सहायकारी अक्षरें व धातूचीं अक्षरें असे दोन विभाग आहेत.

प्र० सहायकारी अक्षरें कोणतीं?

उ० איתן משה וכלב या तीन शब्दांतील अकरा अक्षरांस सहायकारी अक्षरें ह्मणतात.

प्र० धातूचीं अक्षरें कोणतीं?

उ० חט ספר גוע צדק या चार शब्दांतील अकरा अक्षरांस धातूचीं अक्षरें ह्मणतात.

प्र० पहिल्या अकरा अक्षरांस सहायकारी असें कां ह्मणतात?

उ० हीं अक्षरें शब्दांच्या आरंभीं उपसर्गाप्रमाणें, आणि शेवटीं प्रत्याप्रमाणें लागतात ह्मणून.

प्र० दुसऱ्या अकरा अक्षरांस धातूचीं अक्षरें असें कां ह्मणतात?

उ० त्या अक्षरांकडून धातु होतो ह्मणून.

प्र० सहायकारी अक्षरांकडून धातु होत नाहीं काय?

उ० सहायकारी अक्षरांकडूनही धातु होतो; परंतु धातूचीं अक्षरें उपसर्गा प्रमाणें व प्रत्यया प्रमाणें लागत नाहींत.

प्र० अनुच्चारित अक्षरें किती व तीं कोणतीं?

उ० तीं י ו ה א असीं चार आहेत.

प्र० या चार अक्षरांस अनुच्चारित असें कां ह्मणतात?

उ० हीं अक्षरें शब्दांत असतांही त्यांचा उच्चार होत नाहीं ह्मणून त्यांस अनुच्चारित असें ह्मणतात. उ० מָצָאתָ, עָשָׂה, רוּחוֹ, בָּנֶיהָ, इत्यादि.

प्र० या अक्षरांत अणखी विशेष गुण काय आहेत?

उ० १. कधीं कधीं हीं अक्षरें एकाबद्दल दुसरें असीं लागतात. उ० רָפָא רָפָה, מִפֹּה מִפּוֹ, אַתָּה אָתָא, תֹּאסִיפוּן תּוֹסִיפוּן, נִבֵּאתָ נִבֵּיתָ. इ०.

२. कधीं कधीं हीं अक्षरें गाळलीं जातात. उ० תֹּאמְרוּ תֹּמְרוּ, מָצָאתִי מָצָתִי, חוֹכַחַת תֹּכַחַת इ०.

३. कधीं कधीं आणि विशेषेंकरून कवितेंत हीं चार अक्षरें व ן हें पांचवें अक्षर असीं अधिक जोडलीं जातात. • उ० הֶהָלְכוּ הֶהָלְכוּא, רֵד רְדָה, בָּמֳתֵי בָּמוֹתֵי, עֲוֹנָיִךְ עֲוֹנָיְכִי, יְקוּמוּ יְקוּמוּן, इ०.

स्वर.

प्र० इब्री भाषेंत स्वर किती आहेत?

उ० ָ कामेस, ַ पाथाह, ֵ सेरे, ְ शेवा, ֹ होलेम, ֶ सेगोल, ִ हीरेक,

ֻ किब्बूस, וּ वाव शूरेक, ֳ हातूफ कामेस, ֲ हातूफ पाथाह,
ֱ हातूफ सेगोल, असे बारा स्वर आहेत.

प्र० स्वरांच्या जाति किती आहेत?

उ० दीर्घ स्वर, ऱ्हस्व स्वर, अर्ध स्वर आणि संधि स्वर अशा चार जाति आहेत.

प्र० दीर्घ स्वर कोणते?

उ० ָ, ֵ, ִי, וֹ, וּ हे दीर्घ स्वर.

प्र० ऱ्हस्व स्वर कोणते?

उ० ַ, ֶ, ִ, ָ (कामेस हातूफ), ֻ हे ऱ्हस्व स्वर.

प्र० अर्ध स्वर व संधि स्वर कोणते?

उ० ְ, ֲ, ֳ, ֱ हे अर्ध स्वर; आणि यांतील मागल्या तीन स्वरांस संधि स्वर असेंही ह्मणतात.

प्र० शेवा (ְ) हा स्वर कोठे जोडला जातो?

उ० ज्या अक्षरास कोणताहि स्वर नसतो, अशा अक्षरास शेवा हा स्वर जोडला जातो; आणि त्यामुळें बहुतकरून स्वराचा उच्चार न होतां त्या अक्षराचा मात्र उच्चार होतो.

प्र० शेवाचा उच्चार केव्हां होतो?

उ० १. शब्दाच्या पहिल्या अक्षरास शेवा लागतो तेव्हां. उ० שְׁלַח.

२. ज्या अक्षरांत टिंब (दाघेश) असतें त्यास लागतो तेव्हां. उ० דִּבְּרוּ.

३. एक शेवा नंतर दुसरा लागतो तेव्हां. उ० תִּשְׁמְרוּ.

४. दोन सारखीं अक्षरें एकत्र येऊन पहिल्यास लागतो तेव्हां. उ० הַלְלוּ.

५. जेव्हां ו खेरीज करून दुसऱ्या दीर्घ स्वरांनंतर लागतो तेव्हां.
उ० נֵלְכָה, אוֹמְרִים.

प्र० कामेस हा दीर्घ स्वर असतां ऱ्हस्व ह्मणजे कामेस हातूफ कधीं होतो?

उ० १. कामेसानंतर येणाऱ्या अक्षरांत द्वित्त दाघेश असतो तेव्हां.
उ० רָנִּי.*

२. कमेसास (ָ) गाया हें आघाताचें चिन्ह नसून त्यानंतर शेवा येतो तेव्हां. उ० חָכְמָה.

३. शब्दाच्या शेवटल्या पदास कामेस असून त्या पदाचें शेवटलें अक्षर उच्चारित असतें, आणि तो शब्द दुसऱ्या शब्दास (־) मकाफ या आघाताच्या चिन्हानें जोडला जातो तेव्हां.
उ० לֶאֱכָל־לֶחֶם.†

४ शब्दाच्या आरंभीं וַ असून नंतर दोन कामेस येतात, व त्यांतील पहिल्या कामेसास आघाताचें चिन्ह जोडलेलें असतें व शेवटीं उच्चारित अक्षर असतें तेव्हां. उ० וַיָּקָם, וַיָּמָת.

दाघेश.—דָּגֵשׁ.

प्र० दाघेश ह्मणजे काय?

उ० अक्षरामध्यें जें टिंब येतें त्यास दाघेश ह्मणतात.

प्र० दाघेश किती प्रकारचे आहेत?

उ० दोन प्रकारचे आहेत; लघु दाघेश व द्वित्त दाघेश.

प्र० लघु दाघेश कोणता?

---

* या नियमास בָּתִּים, לַבָּתִּים, הַבָּתִּים हे अपवाद आहेत.

† या नियमास קָם, קָם हे अपवाद आहेत.

उ० शब्दाच्या अथवा पदाच्या आरंभीं येणाऱ्या ב ג ד כ פ ת अक्षरांमध्यें जो दाघेश येतो, त्यास लघु दाघेश ह्मणतात.

प्र० लघु दाघेशाकडून काय होतें?

उ० लघु दाघेशाकडून ב ג ד כ פ ת या अक्षरांचा कांहींसा भ, घ, ध, ख, फ, थ, असा होणारा उच्चार पालटून ब, ग, द, क, प, त, असा होतो.

प्र० हा लघु दाघेश केव्हां गाळला जातो?

उ० जर एकादे अनुच्चारित अक्षरानंतर ב ג ד כ פ ת हीं अक्षरें आलीं, तर त्यांतील लघु दाघेश गाळला जातो. उ० פְּנֵי תְהוֹם. परंतु जर ה ו י या अक्षरांचा उच्चार होतो, अथवा א या अक्षरा पुढील अक्षरास शेवा हा स्वर असतो, अथवा मागल्या शब्दाच्या शेवटल्या पदास आघाताचें भेदक चिन्ह जोडलेलें असतें, तेव्हां हा दाघेश गाळला जात नाहीं. उ० יֵדְעוּ כָּל, וַיַּרְא פִּינְחָס, יָדָיו תְּבִיאֶנָּה, בְּצָרָה תְּשִׂים, इ०.

प्र० द्वित्त दाघेश कोणता?

उ० एकादें अक्षर गाळलें जाऊन त्याबद्दल त्यानंतरच्या अक्षरांत जो दाघेश येतो, त्यास द्वित्त दाघेश ह्मणतात.

प्र० द्वित्त दाघेशा कडून काय होतें?

उ० ज्या अक्षरांत द्वित्त दाघेश असतो, त्या अक्षराचा उच्चार दुप्पट होतो. उ० הַדָּבָר हाद्दाबार.

प्र० कोणत्या अक्षरांत दाघेश मुळींच येत नाहीं?

उ० कंठस्थानाचीं अक्षरें ह्मणजे ע ח ה א आणि ר यांत दाघेश मुळींच येत नाहीं.

प्र० जें टिंब הּ मध्यें येतें त्यास काय ह्मणतात?

उ० त्यास מַפִּיק मप्पीक ह्मणतात.

प्र० जेव्हां הּ मध्यें मप्पीक असतें, तेव्हां काय समजावें?

उ० तेव्हां הּ हें अक्षर अनुच्चारित नव्हे परंतु उच्चारित आहें असें समजावें.

प्र० हें मप्पीक הּ या अक्षरांत केव्हां येत असतें?

उ० शब्दाच्या शेवटीं ה हें अक्षर असल्यास त्यांत कधीं कधीं मप्पीक येतें.

प्र० जेव्हां הּ मध्यें मप्पीक असतें, तेव्हां त्यास ַ पाथाह हा स्वर लीगल्यास त्याचा उच्चार कसा होतो?

उ० जेव्हां הּ मध्यें मप्पीक असतें, तेव्हां त्यास ַ हा स्वर लागला, तर त्या अक्षराचा उच्चार करितांना पहिल्यानें त्या स्वराचा व नंतर ה या अक्षराचा उच्चार केला जातो. उ० גָּבֹהַּ गाबोवाह.

प्र० अणखी कोणत्या अक्षरांस ַ पाथाह लागल्यानें त्याचा असा उच्चार होतो?

उ० शब्दाच्या शेवटीं येणाऱ्या ח आणि ע या अक्षरांस ַ पाथाह लागल्यानें ही त्याचा असा उच्चार होतो. उ० רוּחַ रूवाह, יוֹדֵעַ योदेयाअ, इ०.

प्र० जेव्हां ַ पाथाह या स्वराचा याप्रमाणें उच्चार होतो, तेव्हां त्यास काय ह्मणतात?

उ० त्यास פַּתַח גְּנוּבָה ह्मणजे चोरलेला पाथाह असें ह्मणतात.

शब्दविचार.

प्र० इब्री भाषेंतील शब्दांचे भेद किती आहेत?

उ० नाम, विशेषण, सर्वनाम, क्रियापद आणि अव्यय असे पांच आहेत.

नाम.

प्र० नाम ह्मणजे काय?

उ० इतर शब्दांसीं संबंध नसतां ज्या शब्दापासून वस्तूचा बोध होतो त्या शब्दास नाम असें ह्मणतात. उ० אִישׁ मनुष्य, דָּג मासा, בַּיִת घर, שִׂמְחָה आनंद, इत्यादि.

प्र० नामाच्या जाति किती आहेत?

उ० विशेष आणि सामान्य अशा दोन आहेत.

प्र० विशेष नाम ह्मणजे काय?

उ० कोणे एकेच वस्तूचें जें नाम तें विशेष नाम. उ० דָּוִד, רָחֵל, שְׁכֶם, इत्यादि.

प्र० सामान्य नाम ह्मणजे काय?

उ० जातिमात्राचें जें नाम तें सामान्य नाम. उ० אִישׁ मनुष्य, עוֹף पक्षी, עִיר नगर, इत्यादि.

प्र० नामाचे अणखी किती विभाग आहेत?

उ० सिद्ध आणि साधित असे नामाचे अणखी दोन विभाग आहेत.

प्र० सिद्ध नाम ह्मणजे काय?

उ० मूळचें जें नाम, ह्मणजे जें नाम दुसऱ्या शब्दावरून साधलें नसतें तें सिद्ध नाम. उ० דָּבָר, מֶלֶךְ, इ०.

प्र० साधित नाम ह्मणजे काय?

उ० धातु शब्दास ה א מ נ ת י ו या सहायकारी अक्षरांतून एक किंवा अधिक अक्षरें लागून जें नाम उत्पन्न होतें तें साधित नाम. उ० קוּם מָקוֹם, זָכַר זִכְרוֹן, इ०.

प्र० नामास काय काय लागतें?

उ० नामास लिंग, वचन आणि विभक्ति हीं लागतात.

प्र० लिंगें किती आहेत?

उ० पुल्लिंग आणि स्त्रीलिंग असीं दोन आहेत.

प्र० पुल्लिंगी नामें कोणतीं?

उ० १. पुरुषवाचक पदार्थांचीं जा नामें तीं. उ० דָּוִד दावीद, אָב बाप, इ०.

२. राष्ट्रांचीं नामें. उ० יִשְׂרָאֵל इस्राएल, עֲמָלֵק आमालेक, इ०.

३. नद्यांचीं नामें. उ० יַרְדֵּן यार्देन. פְּרָת पेराथ, इ०.

४. पर्वतांचीं नामें. उ० חֶרְמוֹן हेरमोन, כַּרְמֶל कर्मेल, इ०.

५. धातूंचीं नामें. उ० זָהָב सोने, כֶּסֶף रुपें, इ०.

६. महिन्यांची नामें. उ० אֲדָר आदार, זִו जीव, इ०.

७. आणि बहुत करून ज्या नामांच्या शेवटीं ָה आणि ת हीं अक्षरें नसतात तीं.

प्र० स्त्रीलिंगी नामें कोणतीं?

उ० १. स्त्रीजातीच्या पदार्थांचीं जीं नामें तीं. उ० שָׂרָה सारा, אֵם आई, इ०.

२. देशांचीं व नगरांचीं नामें. उ० אַשּׁוּר अश्शुर, חֶבְרוֹן हेबरोन, इ०.

३. शरीराच्या दुहेरी अवयवांचीं नामें, उ० יָד हात, רֶגֶל पाय, इ०.

४. ज्या नामाच्या शेवटीं बहुत करून ה आणि ת आणि कवितेंत תה हीं अक्षरें असतात तीं. उ० יוֹנָה पारवा, אַרְנֶבֶת ससा, इ०.

प्र० पुल्लिंगाचें स्त्रीलिंग कसें होतें?

उ० पुल्लिंगास शेवटीं הָ, תֶ किंवा ת हीं अक्षरें जोडल्यानें स्त्रीलिंग होतें. उ० שַׂר सरदार, שָׂרָה सरदारीण, גְּבִיר धनवान पुरुष, גְּבֶרֶת धनवान स्त्री, מִצְרִי मिसरी मनुष्य, מִצְרִית मिसरी बायको.

प्र० वचनें किती आहेत?

उ० एकवचन, द्विवचन आणि बहुवचन असीं तीन वचनें आहेत.

प्र० पुल्लिंगी एकवचनी नामाचें द्विवचन कसें होतें?

उ० पुल्लिंगी एकवचनी नामाच्या शेवटीं ַיִם जोडल्यानें द्विवचन होतें. उ० יוֹם दिवस, יוֹמַיִם दोन दिवस.

प्र० स्त्रीलिंगी एकवचनी नामाचें द्विवचन कसें होतें?

उ० स्त्रीलिंगी एकवचनी नामाच्याहि शेवटीं ַיִם जोडल्यानें द्विवचन होतें; परंतु त्या नामाच्या शेवटीं ה असल्यास तो पालटून ת जोडावा लागतो. उ० דֶּלֶת दरवाजा, דְּלָתַיִם दोन दरवाजे, שָׁנָה एक वर्ष, שְׁנָתַיִם दोन वर्षें, इ०.

प्र० पुल्लिंगी एकवचनी नामाचें बहुवचन कसें होतें?

उ० पुल्लिंगी एकवचनी नामाच्या शेवटीं ִים जोडल्यानें बहुवचन होतें. उ० מֶלֶךְ राजा, מְלָכִים राजे, סוּס घोडा, סוּסִים घोडे, इ०.

प्र० स्त्रीलिंगी एकवचनी नामाचें बहुवचन कसें होतें ?

उ० स्त्रीलिंगी एकवचनी नामाच्या शेवटीं וֹת जोडल्यानें बहुवचन होतें. उ० תּוֹרָה शास्त्र, תּוֹרוֹת शास्त्रें, זְקֵנָה ह्मातारी, זְקֵנוֹת ह्मातान्या.

प्र० जें एकच नाम पुल्हिंगी व स्त्रीलिंगी ही असतें, आणि ज्या नामास बहुवचनीं पुलिंगी व स्त्रीलिंगी प्रत्यय लागतात तें कोणते लिंगीं समजावें ?

उ० तें नाम सामान्य लिंगी समजावें. उ० בֶּגֶד वस्त्र ए०, בְּגָדִים व בְּגָדוֹת वस्त्रें ब०, גַּן बाग ए०, גַּנִּים व גַּנּוֹת बाग, ब०, इ०.

प्र० विभक्ति किती आहेत ?

उ० प्रथमा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी, आणि संबोधन अशा आठ विभक्ति आहेत.

प्र० या आठ विभक्ति אִישׁ पुरुष या नामास लागल्या असतां प्रथमे पासून संबोधनापर्यंत प्रति विभक्तीचीं रूपें कशीं होतात तीं सांग ?

	वि०	नाम.		चिन्ह
उ०	प्र०	אִישׁ	पुरुष.	. .
	द्वि०	אֶת אִישׁ	पुरुषास, पुरुषाला, पुरुषातें.	אֶת
	तृ०	אִישׁ	पुरुषानें, पुरुषाशीं.	. .
	च०	לְאִישׁ अथवा אֶל אִישׁ	पुरुषाकारणें, पुरुषासाठीं.	לְ, אֶל
	पं०	מֵאִישׁ	पुरुषापासून.	מִ, מֵ

ष० שֶׁל אִישׁ अथवा לְאִישׁ पुरुषाचा.

स० בְּאִישׁ पुरुषांत.

सं० הָאִישׁ अथवा אִישׁ हे पुरुषा.

प्र० षष्ठी विभक्तीचा अर्थ अणखी कोणत्या रीतीनें होतो?

उ० संयुक्तरूपानें.

वियुक्त व संयुक्त रूपें.

प्र० नामास किती रूपें असतात?

उ० नामास वियुक्त आणि संयुक्त असीं दोन रूपें असतात.

प्र० वियुक्त रूप ह्मणजे काय?

उ० नामाचें मूळचें जें रूप त्यास वियुक्त रूप असें ह्मणतात.
उ० דָּבָר शब्द, इ०.

प्र० संयुक्त रूप ह्मणजे काय?

उ० निरनिराळ्या अर्थांचीं दोन नामें एकत्र आलीं असतां त्यांतील पहिले नामास जें रूप प्राप्त होतें, त्यास संयुक्त रूप असें ह्मणतात.

प्र० संयुक्तरूपावरून काय होतें?

उ० संयुक्तरूपावरून कधीं कधीं पहिल्या नामाचे स्वर पालटून दुसऱ्या नामाकडून षष्ठीचा अर्थ होतो. उ० דָּבָר शब्द आणि הַמֶּלֶךְ तो राजा, यांचें संयुक्त रूप דְּבַר־הַמֶּלֶךְ राजाचा शब्द, इ०.

प्र० पुल्लिंगी नामाच्या एकवचनाचें संयुक्त रूप कसें होतें?

उ० पुल्लिंगी नामाच्या एकवचनाचें संयुक्त रूप करण्या करितां कधीं

त्या नामाचे दीर्घ स्वराच्या ठिकाणीं ऱ्हस्व स्वर लागतात, आणि कधीं मूळचेच स्वर राहतात. उ० בֵּן पुत्र यापासून בֶּן דָּוִד दावीदाचा पुत्र, דֶּרֶךְ मार्ग यापासून דֶּרֶךְ הַמֶּלֶךְ राजाचा मार्ग, इ०..

प्र० स्त्रीलिंगी नामाच्या एकवचनाचें संयुक्त रूप कसें होतें?

उ० ज्या स्त्रीलिंगी नामाच्या शेवटीं ָה हा प्रत्यय असतो त्याच्या ठिकाणीं ַת ֶת असे प्रत्यय लागतात; परंतु ज्याच्या शेवटीं ֶת हा प्रत्यय असतो, तो प्रत्यय तसाच राहतो. उ० סֻכָּה मंडप यापासून סֻכַּת שָׁלוֹם शांतीचा मंडप, מַמְלָכָה राज्य यापासून מַמְלֶכֶת כֹּהֲנִים याजकांचें राज्य, כְּתֹנֶת अंगरखा यापासून כְּתֹנֶת יוֹסֵף योसेफाचा अंगरखा, इ०.

प्र० पुल्लिंगी नामाच्या द्विवचनाचें व बहुवचनाचें संयुक्त रूप कसें होतें?

उ० ज्या पुल्लिंगी नामास द्विवचनी ַיִם आणि बहुवचनी ִים असे प्रत्यय असतात, त्या नामास त्या प्रत्ययांच्या ठिकाणीं ֵי हा प्रत्यय लागतो. उ० יָדַיִם दोन हात यापासून יְדֵי עֵשָׂו एसावाचे हात, יָמִים दिवस यापासून יְמֵי דָוִד दावीदाचे दिवस, इ०.

प्र० स्त्रीलिंगी नामाच्या द्विवचनाचें व बहुवचनाचें संयुक्त रूप कसें होतें?

उ० ज्या स्त्रीलिंगी नामाच्या द्विवचनाचे शेवटीं ַיִם असा प्रत्यय असतो, त्या नामास त्या प्रत्ययाच्या ठिकाणीं ֵי हा प्रत्यय

लागतो; आणि बहुवचनाचा וֹת हा प्रत्यय पालटत नाहीं. उ० דְּלָתַיִם दोन झडपा, यापासून דַּלְתֵי הַשַּׁעַר दरवाज्याच्या दोन झडपा, חוֹמוֹת भिंती यापासून חוֹמוֹת הָעִיר नगराच्या भिंती, इ०.

प्र० या नियमास कांहीं अपवाद आहेत काय?

उ० होय; אָב बाप, אָח भाऊ आणि חָם सासरा यांचें संबंधीरूप אֲבִי אֲחִי חֲמִי असें होतें.

प्र० हीं दोन रूपें अणखी कशास असतात?

उ० हीं दोन रूपें विशेषणास व सामान्यार्थी क्रियापदासही असतात.

विशेषण.

प्र० विशेषण ह्मणजे काय?

उ० पदार्थाचा गुण, दोष किंवा त्याची संख्या दाखविणारा जो शब्द त्यास विशेषण असें ह्मणतात.

प्र० विशेषणें किती प्रकारचीं आहेत?

उ० विशेषणें दोन प्रकारचीं आहेत; गुणविशेषण आणि संख्याविशेषण; उ० טוֹב चांगला. רַע वाईट इत्यादि गुणविशेषणें; आणि אֶחָד एक, שְׁנַיִם दोन, רִאשׁוֹן पहिला, שֵׁנִי दुसरा, इत्यादि संख्याविशेषणें.

प्र० गुणविशेषणास काय काय लागतें?

उ० गुणविशेषणास नामाप्रमाणें लिंग, वचन, विभक्ति आणि संबंधीरूप हीं लागतात.

प्र० गुणविशेषणाच्या किती कोटी आहेत?

उ० गुणविशेषणाच्या मूल कोटी, तुलना कोटी आणि पराकाष्ठा कोटी अशा तीन कोटी आहेत.

प्र० मूल कोटींतील विशेषण कोणतें?

उ० जें विशेषण कांहीं अधिक किंवा उणें केल्या वांचून पदार्थाचा गुण दाखवितें तें. उ० מָתוֹק गोड, קָטֹן लहान, इ०.

प्र० तुलना कोटींतील विशेषण कोणतें व त्याचा अर्थ कसा होतो?

उ० ज्या विशेषणाच्या मागून येणाऱ्या नामास מ हा उपसर्ग लागतो आणि त्यामुळें त्या विशेषणाचा अर्थ मूल कोटीच्या अर्थापेक्षां अधिक होतो तें. उ० מָתוֹק מִדְּבַשׁ मधेपेक्षां गोड, טוֹבָה מִפְּנִינִים माणिकांपेक्षां चांगलें.

प्र० पराकाष्ठा कोटींतील विशेषण कोणतें व त्याचा अर्थ कसा होतो?

उ० १ ज्या विशेषणास ה आणि त्यामागून येणाऱ्या नामास ב असे उपसर्ग लागतात आणि त्या विशेषणाचा अर्थ सर्वांहून अधिक होतो. तें. उ० הַיָּפָה בַּנָּשִׁים स्त्रियांत सुंदर ह्मणजे सर्व स्त्रियांपेक्षां सुंदर, इ०.

२ ज्या विशेषणाच्या मागून מְאֹד हा शब्द येतो तें; उ० גָּדוֹל מְאֹד अतिमोठा.

३ जें विशेषण दोन वेळ येतें तें. उ० עָמוֹק עָמוֹק ओंड ओंड ह्मणजे अतिओंड, इ०.

प्र० संख्याविशेषणें किती प्रकारचीं आहेत?

उ० संख्याविशेषणें दोन प्रकारचीं आहेत; एक संख्याविशेषण आणि दुसरें क्रमसंख्याविशेषण.

प्र० संख्याविशेषणें कशीं असतात तीं सांग.

उ० संख्या विशेषणांत एक पासून दाहा पर्यंत मात्र वियुक्त व संयुक्त असीं दोन रूपें असतात; आणि अकरापासून वीस पर्यंत मात्र लिंगें असतात, परंतु त्या पुढील संख्या सर्व सामान्यलिंगी असते. उ०:—

पुल्लिंग. वि०रू.	पुल्लिंग. सं०रू.	स्त्रीलिंग. वि०रू.	स्त्रीलिंग. सं०रू.	अर्थ.	
אֶחָד	אַחַד	אֶחָת	אַחַת	एक.	א
שְׁנַיִם	שְׁנֵי	שְׁתַּיִם	שְׁתֵּי	दोन.	ב
שְׁלֹשָׁה	שְׁלֹשֶׁת	שָׁלֹשׁ	שְׁלֹשׁ	तीन.	ג
אַרְבָּעָה	אַרְבַּעַת	אַרְבַּע	אַרְבַּע	चार.	ד
חֲמִשָּׁה	חֲמֵשֶׁת	חָמֵשׁ	חֲמֵשׁ	पांच.	ה
שִׁשָּׁה	שֵׁשֶׁת	שֵׁשׁ	שֵׁשׁ	साहा.	ו
שִׁבְעָה	שִׁבְעַת	שֶׁבַע	שְׁבַע	सात.	ז
שְׁמוֹנָה	שְׁמוֹנַת	שְׁמֹנֶה	שְׁמוֹנֶה	आठ.	ח
תִּשְׁעָה	תִּשְׁעַת	תֵּשַׁע	תְּשַׁע	नऊ.	ט
עֲשָׂרָה	עֲשֶׂרֶת	עֶשֶׂר	עֶשֶׂר	दाहा.	

पुल्लिंगी.	स्त्रीलिंगी.		
אַחַד עָשָׂר עַשְׁתֵּי עָשָׂר	אַחַת עֶשְׂרֵה עַשְׁתֵּי עֶשְׂרֵה	अकरा.	יא
שְׁנַיִם עָשָׂר שְׁנֵי עָשָׂר	שְׁתַּיִם עֶשְׂרֵה שְׁתֵּי עֶשְׂרֵה	बारा.	יב

		स्त्रीलिंगी.	पुल्लिंगी.
יג	तेरा.	שְׁלֹשׁ עֶשְׂרֵה	שְׁלֹשָׁה עָשָׂר
יד	चौदा.	אַרְבַּע עֶשְׂרֵה	אַרְבָּעָה עָשָׂר
טו	पंधरा.	חֲמֵשׁ עֶשְׂרֵה	חֲמִשָּׁה עָשָׂר
טז	सोळा.	שֵׁשׁ עֶשְׂרֵה	שִׁשָּׁה עָשָׂר
יז	सतरा.	שְׁבַע עֶשְׂרֵה	שִׁבְעָה עָשָׂר
יח	अठरा.	שְׁמוֹנֶה עֶשְׂרֵה	שְׁמֹנָה עָשָׂר
יט	एकुणीस.	תְּשַׁע עֶשְׂרֵה	תִּשְׁעָה עָשָׂר

सामान्यलिंगी.

כ	वीस.	עֶשְׂרִים
כא	एकवीस.	אֶחָד וְעֶשְׂרִים
כב	बेवीस.	שְׁנַיִם וְעֶשְׂרִים
כג	तेवीस.	שְׁלֹשָׁה וְעֶשְׂרִים
כד	चोवीस.	אַרְבָּעָה וְעֶשְׂרִים
ל	तीस.	שְׁלֹשִׁים
לא	एकतीस.	אֶחָד וּשְׁלֹשִׁים
מ	चाळीस.	אַרְבָּעִים
נ	पन्नास.	חֲמִשִּׁים
ס	साठ.	שִׁשִּׁים
ע	सत्तर.	שִׁבְעִים
פ	ऐंशी.	שְׁמוֹנִים
צ	नव्वद.	תִּשְׁעִים

ק	शंभर.	מֵאָה
ר	दोनशें.	מָאתַיִם
ש	तीनशें.	שְׁלֹשׁ מֵאוֹת
ת	चारशें.	אַרְבַּע מֵאוֹת
ך	पांचशें.	חֲמֵשׁ מֵאוֹת
ם	साहाशें.	שֵׁשׁ מֵאוֹת
ן	सातशें.	שְׁבַע מֵאוֹת
ף	आठशें.	שְׁמֹנֶה מֵאוֹת
ץ	नऊशें.	תְּשַׁע מֵאוֹת
	हजार.	אֶלֶף
	दोन हजार.	אַלְפַּיִם
	तीन हजार.	שְׁלֹשֶׁת אֲלָפִים
	चार हजार.	אַרְבַּעַת אֲלָפִים

सामान्यलिंगी.

חֲמֵשֶׁת אֲלָפִים पांच हजार.
עֲשֶׂרֶת אֲלָפִים, רִבּוֹ दाहा हजार.
רִבּוֹתַיִם वीस हजार, इ०.

प्र० संख्याविशेषणाकडून ज्या नामाची संख्या दाखविली जाते, तें नाम कोणत्या वचनीं असतें?

उ० १. दोन पासून दाहा या संख्यांस बहुवचनीं नाम जोडलें जातें. उ० שְׁנֵי יָמִים दोन दिवस, שְׁלֹשָׁה דְבָרִים तीन गोष्टी, इ०.

२. त्यांपुढें संख्या नामा अगोदर असली, तर बहुत करून तें नाम एकवचनीं असतें; उ० אַחַד עָשָׂר יוֹם अकरा दिवस שְׁמוֹנִים אִישׁ ऐशीं मनुष्यें, אַלְפַּיִם אַמָּה दोन हजार हात, इ०.

३. परंतु नामानंतर संख्या असली, तर बहुत करून तें नाम बहुवचनीं असतें; उ० אֵילִם שְׁנַיִם עָשָׂר बारा मेंढे, עַתֻּדִים שִׁשִּׁים साठ बोकड, इ०.

प्र० क्रमसंख्याविशेषणें कसीं असतात तें सांग.

उ० क्रमसंख्याविशेषणांत एक पासून दाहा पर्यंत मात्र लिंगाप्रमाणें क्रम चालतो. उ०.

पुल्लिंग.		स्त्रीलिंग.	
רִאשׁוֹן	पहिला.	רִאשׁוֹנָה	पहिली.
שֵׁנִי	दुसरा.	שֵׁנִית व שְׁנִיָּה	दुसरी.
שְׁלִישִׁי	तिसरा.	שְׁלִישִׁית व שְׁלִישִׁיָּה	तिसरी.

पुल्लिंगी.		स्त्रीलिंगी.	
רְבִיעִי	चौथा.	רְבִיעִית	चौथी.
חֲמִישִׁי	पांचवा.	חֲמִישִׁית	पांचवी.
שִׁשִּׁי	साहावा.	שִׁשִּׁית	साहावी.
שְׁבִיעִי	सातवा.	שְׁבִיעִית	सातवी.
שְׁמִינִי	आठवा.	שְׁמִינִית	आठवी.
תְּשִׁיעִי	नववा.	תְּשִׁיעִית	नववी.
עֲשִׂירִי	दाहावा.	עֲשִׂירִית	दाहावी.

प्र० दाहा या संख्येच्या पुढें क्रमसंख्याविशेषणें कसीं होतात?

उ० दाहा या संख्येच्या पुढें क्रमसंख्याविशेषणें नसल्या कारणानें संख्याविशेषणाचाच उपयोग करितात.

प्र० मग संख्याविशेषण आणि क्रमसंख्याविशेषण यांमध्यें भेद तो कोणता?

उ० जें संख्याविशेषण नामाच्या पूर्वीं येतें तें मात्र संख्याविशेषण असें जाणावें. उ० שְׁנֵי יָמִים दोन दिवस, חֲמִשָּׁה סְפָרִים पांच पुस्तकें, חֲמֵשׁ עֶשְׂרֵה שָׁנָה पंधरा वर्षें इ०; परंतु जें संख्याविशेषण नामाच्या मागून येतें व त्यास कधीं कधीं ה असा उपसर्गही लागतो तें क्रमसंख्याविशेषण जाणावें; उ० יוֹם שֵׁנִי दुसरा दिवस; סֵפֶר חֲמִישִׁי पांचवें पुस्तक; שְׁנַת הַחֲמֵשׁ עֶשְׂרֵה पंधरावें वर्ष, इ०.

सर्वनाम.

प्र० सर्वनाम ह्मणजे काय?

उ० अवघ्या नामांच्या ठिकाणीं जो शब्द लागतो, त्यास सर्वनाम असें ह्मणतात.

प्र० सर्वनामें किती प्रकारचीं आहेत?

उ० सर्वनामें साहा प्रकारचीं आहेत; पुरुषवाचक सर्वनाम, षष्ठ्यंत सर्वनाम, संबंधी सर्वनाम, दर्शक सर्वनाम, प्रश्नार्थक सर्वनाम आणि सामान्य सर्वनाम.

प्र० सर्वनामास काय काय लागतें?

उ० सर्वनामास नामाप्रमाणें लिंग, वचन व विभक्ति लागून पुरुषही लागतात.

प्र० पुरुष किती आहेत व ते कोणते?

उ० पुरुष तीन आहेत; प्रथम पुरुष, द्वितीय पुरुष, आणि तृतीय पुरुष.

प्र० पुरुषवाचक सर्वनामें कोणतीं?

उ०

		एकवचन.		बहुवचन.	
प्रथम पुरुष.	पु. स्त्री.	אֲנִי, אָנֹכִי	मी.	אֲנַחְנוּ, אָנוּ, נַחְנוּ	आह्मी.
द्वितीय पुरुष.	पु.	אַתָּה	तूं.	אַתֶּם	तुह्मी.
,,	स्त्री.	אַתְּ	तूं.	אַתֵּן, אַתֵּנָה	तुह्मी.
तृतीय पुरुष.	पु.	הוּא	तो.	הֵם, הֵמָּה	ते.
,,	स्त्री.	הִיא	ती.	הֵן, הֵנָּה	त्या.

प्र० या प्रत्येक पुरुषवाचक सर्वनामास विभक्ति कशा लागतात त्या सांग.

उ०

प्रथमपुरुष सामान्यलिंग.

	एकवचन.	बहुवचन.
प्र०	אֲנִי मी.	נַחְנוּ, אֲנַחְנוּ, אָנוּ आह्मी.
द्वि०	אֹתִי मला.	אֹתָנוּ आह्मांस,-ला.
तृ०	אֲנִי मी, म्यां.	אֲנַחְנוּ आह्मी.
च०	אֵלַי, לִי मजकारणें,-साठीं.	אֵלֵינוּ, לָנוּ आह्मांकारणें-साठीं.
पं०	מִמֶּנִּי मजपासून.	מִמֶּנּוּ आह्मांपासून.
ष०	שֶׁלִּי, לִי माझा,-झी,-झें.	שֶׁלָּנוּ, לָנוּ आमचा,-ची,-चें.
स०	בִּי मजमध्यें.	בָּנוּ आह्मांमध्यें.
सं०	(नाहीं)	(नाहीं)

द्वितीयपुरुष पुल्लिंग.

	एकवचन.	बहुवचन.
प्र०	אַתָּה तूं.	אַתֶּם तुह्मी.
द्वि०	אֹתְךָ तुला.	אֶתְכֶם तुह्मांस,-ला.
तृ०	אַתָּה तूं, त्वां.	אַתֶּם तुह्मीं.
च०	אֵלֶיךָ, לְךָ तुजकारणें,-साठीं.	אֲלֵיכֶם, לָכֶם तुह्मांकारणें,-साठीं.
पं०	מִמְּךָ तुजपासून.	מִכֶּם तुह्मांपासून.
ष०	שֶׁלְּךָ, לְךָ तुझा,-झी,-झें.	שֶׁלָּכֶם, לָכֶם तुमचा,-ची,-चें.
स०	בְּךָ तुजमध्यें.	בָּכֶם तुह्मांमध्यें.
सं०	אַתָּה अरे तूं.	אַתֶּם अहो तुह्मी.

द्वितीयपुरुष स्त्रीलिंग.

	एकवचन.	बहुवचन.
प्र०	אַתְּ तूं.	אַתֵּנָה, אַתֵּן तुह्मी.
द्वि०	אֹתָךְ तुला.	אֶתְכֶן तुह्मांस,-ला.
तृ०	אַתְּ तूं, त्वां.	אַתֵּן तुह्मीं.
च०	אֵלַיִךְ, לָךְ तुजकारणें,-साठीं.	אֲלֵיכֶן, לָכֶן तुह्मांकारणें,-साठीं.
पं०	מִמֵּךְ तुजपासून.	מִכֶּן तुह्मांपासून.
ष०	שֶׁלָּךְ, לָךְ तुझा,-झी,-झें.	שֶׁלָּכֶן, לָכֶן तुमचा,-ची,-चें.
स०	בָּךְ तुजमध्यें.	בָּכֶן तुह्मांमध्यें.
सं०	אַתְּ अगे तूं.	אַתֵּן अहो तुह्मी.

तृतीयपुरुष पुल्लिंग.

	एकवचन.	बहुवचन.
प्र०	הוּא तो.	הֵם ते.
द्वि०	אֹתוֹ त्यास,-ला.	אֶתְהֶם, אֹתָם त्यांस,-ला.
तृ०	הוּא त्यानें.	הֵם त्यांनीं.
च०	אֵלָיו, לוֹ त्याकारणें,-साठीं.	אֲלֵיהֶם, לָהֶם त्यांकारणें,-साठीं
पं०	מִמֶּנּוּ त्यापासून.	מֵהֶם त्यांपासून.
ष०	שֶׁלּוֹ, לוֹ त्याचा,-ची,-चें.	שֶׁלָּהֶם, לָהֶם त्यांचा,-ची,-चें.
स०	בּוֹ त्याजमध्यें.	בָּהֶם त्यांजमध्यें.
सं०	(नाहीं)	(नाहीं)

तृतीयपुरुष स्त्रीलिंग.

	एकवचन.	बहुवचन.
प्र०	הִיא ती.	הֵן त्या.
द्वि०	אֹתָהּ तिला.	אֶתְהֶן, אֹתָן त्यांस,-ला.
तृ०	הִיא तिनें.	הֵן त्यांनीं.
च०	אֵלֶיהָ, לָהּ तिजकारणें,-साठीं.	אֲלֵיהֶן, לָהֶן त्यांकारणें-साठीं.
पं०	מִמֶּנָּה तिजपासून.	מֵהֶן त्यांपासून.
ष०	שֶׁלָּהּ, לָהּ तिचा,-ची,-चें.	שֶׁלָּהֶן, לָהֶן त्यांचा,-ची,-चें.
स०	בָּהּ तिजमध्यें.	בָּהֶן त्यांजमध्यें.
सं०	(नाहीं)	(नाहीं)

षष्ठ्यंत सर्वनामें.

प्र० षष्ठ्यंत सर्वनामें कसीं असतात व तीं कोणतीं ?

उ० षष्ठ्यंत सर्वनामें प्रत्ययांच्या रूपांत मात्र असतात; त्यांकडून पुरुषवाचक सर्वनामांच्या षष्ठीचा अर्थ होतो; आणि तीं येणें प्रमाणें:—

एकवचनी नामांस लागणारीं षष्ठ्यंत सर्वनामें.

	एकवचन.	बहुवचन.
प्र. पु. स्त्री.	ִי माझा,-झी,-झें.	ֵנוּ आमचा,-ची,-चें.
द्वि. पु.	ְךָ ֵךְ ֶךָ तुझा,-झी,-झें.	ְכֶם तुमचा,-ची,-चें.

	एकवचन.	बहुवचन.
द्वि. स्त्री.	ַיִךְ ֵךְ तुझा,-झी,-झें.	ָכֶן तुमचा,-ची,-चें.
तृ. पु.	מוֹ ָיו ֵהוּ ָה וֹ त्याचा,-ची,-चें.	מוֹ ָם त्यांचा,-ची,-चें.
तृ. स्त्री.	ָהּ तिचा,-ची,-चें.	ָן त्यांचा,-ची,-चें.

बहुवचनी नामांस लागणारीं षष्ठ्यंत सर्वनामें.

	एकवचन.	बहुवचन.
प्र.पु.स्त्री.	ַי ָי माझे,-झ्या,-झीं.	ֵינוּ आमचे,-च्या,-चीं.
द्वि. पु.	ֶיךָ तुझे, झ्या,-झीं.	ֵיכֶם तुमचे,-च्या, चीं.
द्वि. स्त्री.	ַיִךְ तुझे,-झ्या,-झीं.	ֵיכֶן तुमचे,- च्या,-चीं.
तृ. पु.	ָיו त्याचे,-च्या,-चीं.	ֵיהֶם त्यांचे,-च्या,-चीं.
तृ. स्त्री.	ֶיהָ तिचे,-च्या,-चीं.	ֵיהֶן त्यांचे,-च्या,-चीं.

प्र० ज्या नामांस हे षष्ठ्यंत सर्वनामाचे प्रत्यय लागतात त्या नामांमध्यें कांहीं फेरफार होतो कीं काय?

उ० होय; बहुत करून त्या नामांचे स्वर पालटतात; आणि स्त्रीलिंगी नामाचे शेवटीं येणारा ה याच्या ठिकाणीं ת लागतो.

प्र० हे षष्ठ्यंत सर्वनामाचे प्रत्यय דָּבָר शब्द या पुल्लिंगी नामास आणि תּוֹרָה शास्त्र या स्त्रीलिंगी नामास लावून दाखीव.

३०.

पुल्लिंगीनाम.

	एकवचन.	बहुवचन.
	דָּבָר शब्द.	דְּבָרִים शब्द.
पु.स्त्री.	דְּבָרִי माझा शब्द.	דְּבָרַי माझे शब्द.
पु०	דְּבָרְךָ तुझा शब्द.	דְּבָרֶיךָ तुझे शब्द.
स्त्री०	דְּבָרֵךְ तुझा शब्द.	דְּבָרַיִךְ तुझे शब्द.
पु०	דְּבָרוֹ त्याचा शब्द.	דְּבָרָיו त्याचे शब्द.
स्त्री०	דְּבָרָהּ तिचा शब्द.	דְּבָרֶיהָ तिचे शब्द.
पु.स्त्री.	דְּבָרֵנוּ आमचा शब्द.	דְּבָרֵינוּ आमचे शब्द.
पु०	דְּבַרְכֶם तुमचा शब्द.	דִּבְרֵיכֶם तुमचे शब्द.
स्त्री०	דְּבַרְכֶן तुमचा शब्द.	דִּבְרֵיכֶן तुमचे शब्द.
पु०	דְּבָרָם त्यांचा शब्द.	דִּבְרֵיהֶם त्यांचे शब्द.
स्त्री०	דְּבָרָן त्यांचा शब्द.	דִּבְרֵיהֶן त्यांचे शब्द.

स्त्रीलिंगी नाम.

	एकवचन.	बहुवचन.
	תּוֹרָה शास्त्र.	תּוֹרוֹת शास्त्रें.
पु.स्त्री.	תּוֹרָתִי माझें शास्त्र.	תּוֹרוֹתַי माझीं शास्त्रें.
पु०	תּוֹרָתְךָ तुझें शास्त्र.	תּוֹרוֹתֶיךָ तुझीं शास्त्रें.
स्त्री०	תּוֹרָתֵךְ तुझें शास्त्र.	תּוֹרוֹתַיִךְ तुझीं शास्त्रें.
पु०	תּוֹרָתוֹ त्याचें शास्त्र.	תּוֹרוֹתָיו त्याचीं शास्त्रें.
स्त्री०	תּוֹרָתָהּ तिचें शास्त्र.	תּוֹרוֹתֶיהָ तिचीं शास्त्रें.

	एकवचन.	बहुवचन.
पु.स्त्री.	תּוֹרָתֵנוּ आमचें शास्त्र.	תּוֹרוֹתֵינוּ आमचीं शास्त्रें
पु०	תּוֹרַתְכֶם तुमचें शास्त्र.	תּוֹרוֹתֵיכֶם तुमचा शास्त्रें.
स्त्री०	תּוֹרַתְכֶן तुमचें शास्त्र.	תּוֹרוֹתֵיכֶן तुमचीं शास्त्रें.
पु०	תּוֹרָתָם त्यांचें शास्त्र.	תּוֹרוֹתֵיהֶם त्यांचीं शास्त्रें.
स्त्री०	תּוֹרָתָן त्यांचें शास्त्र.	תּוֹרוֹתֵיהֶן त्यांचीं शास्त्रें.

प्र० इब्रीमध्यें संबंधी सर्वनामें किती आहेत?

उ० इब्रीमध्यें אֲשֶׁר ह्मणजे जो, जी, जें हें एकच संबंधी सर्वनाम आहे, याचें संक्षेपरूप שֶׁ हें अक्षर होय.

प्र० दर्शक सर्वनामें कोणतीं?

उ० पु. הַלָּזֶה, זֶה हा.
स्त्री. הַלֵּזוּ, זוֹ, זֹה, זֹאת ही.
पु.स्त्री. הַלָּז, זוּ हा, ही.
(पु.) (स्त्री.) } אֵלֶּה, אֵל हे, ह्या, हीं.

पु. הַהוּא तो. (पु.) הָהֵם ते.
स्त्री. הַהִיא ती. (स्त्री.) הָהֵן त्या.

प्र० दर्शक सर्वनामाचा अर्थ अणखी कशावरून होतो?

उ० नाम आणि विशेषण यांस लागणारा הַ व त्यानंतर येणाऱ्या अक्षरांत द्वित्त दाघेश या उपसर्गावरूनही दर्शकसर्वनामाचा अर्थ होतो.

प्र० या उपसर्गाचा स्वर केव्हां पालटतो?

उ० कंठस्थानांच्या अक्षरांत व ר या अक्षरांत दाघेश येत नाहीं म्हणून त्या अक्षरापुढें या उपसर्गाचा स्वर पालटून ָ व ֶ असे होतात;

म्हणजे א, ע व ר यांपुढें ָ आणि ה व ח यापुढें ֶ लागतो व कधीं मूळचाच स्वर राहतो उ० הַקּוֹל, הָאִישׁ, הֶחָכָם, הַחַי इ०.

प्र० प्रश्नार्थक सर्वनामें कोणतीं ?

उ० מִי कोण, आणि מַה, מָה, מֶה काय, हीं प्रश्नार्थक सर्वनामें.

प्र० या प्रश्नार्थक सर्वनामांचा उपयोग कसा होतो ?

उ० मनुष्यजाती करितां מִי या शब्दाचा उपयोग होतो; इतर ठिकाणीं बहुत करून מַה या शब्दाचा उपयोग होतो; परंतु ज्या शब्दाचें पहिलें अक्षर א ה किंवा ר असतें, त्यापुढें מָה आणि ज्या शब्दाचें पहिलें अक्षर ח किंवा ע असतें, त्यापुढें מֶה हा शब्द लागतो; उ० מִי הִגִּיד לְךָ, מַה בֶּצַע מָה אָמְרוּ, מֶה עָשִׂיתָ, इ०.

प्र० सामान्य सर्वनामें कोणतीं ?

उ० כֹּל सर्व, אִישׁ प्रत्येक, אַחֵר दुसरा, אֵין कोणी नाहीं, רַבִּים पुष्कळ, इत्यादि सामान्य सर्वनामें.

क्रियापद.

प्र० क्रियापद म्हणजे काय ?

उ० कृति किंवा स्थिति या अर्थाचे जे शब्द, त्यांस क्रियापद असें म्हणतात; उ० רָאָה त्यानें पाहिलें, אָמַר तो बोलला, הָיָה तो होता, इ०.

प्र० क्रियापदांचे प्रकार किती आहेत ?

उ० सकर्मक आणि अकर्मक असे दोन प्रकार आहेत.

प्र० सकर्मक क्रियापद कोणतें ?

उ० ज्या क्रियेचा व्यापार कर्त्यापासून निघून कर्मावर ह्मणजे दुसऱ्या पदार्थावर घडतो, ती क्रिया दाखविणारें सकर्मक क्रियापद होय. उ० וְיִשְׂרָאֵל אָהַב אֶת יוֹסֵף इस्राएलानें योसेफावर प्रीति केली.

प्र० अकर्मक क्रियापद कोणतें?

उ० ज्या क्रियेला कर्म नसतें, ह्मणजे ज्या क्रियेचा व्यापार कर्त्यावरच असतो, तें अकर्मक क्रियापद होय. उ० וַיֵּצֵא יַעֲקֹב आणि याआकोब निघाला.

प्र० इब्री क्रियापदांचे अणखी किती भेद आहेत?

उ० नियमित व अनियमित असे अणखी दोन भेद आहेत.

प्र० नियमित क्रियापदास अणखी काय ह्मणतात?

उ० नियमित क्रियापदास पूर्ण क्रियापद असेंहि ह्मणतात.

प्र० अनियमित क्रियापदें किती जातींचीं आहेत?

उ० अनियमित क्रियापदें अपूर्ण, अनुच्चारिताक्षरी, आणि द्वित्ताक्षरी अशा तीन जातींचीं आहेत.

प्र० इब्री क्रियापदांचे नियमित ह्मणजे पूर्ण आणि अनियमित ह्मणजे अपूर्ण, अनुच्चारिताक्षरी आणि द्वित्ताक्षरी, असे भेद कशावरून केले जातात?

उ० क्रियापदाच्या धातूंतील अक्षरांवरून.

प्र० धातूमध्यें विशेषे करून किती अक्षरें असतात?

उ० तीन.

प्र० धातु बहुत करून कसा असतो?

उ० धातु बहुत करून स्वार्थीं, भूतकाळीं, पुल्लिंगी तृतीय पुरुषाच्या एकवचनीं असतो, परंतु क्वचित सामान्यार्थींही असतो. उ० לָמַד, קוּם, इ०

प्र० पूर्ण क्रियापद कोणतें ?

उ० ज्या क्रियापदाच्या धातूच्या तीन अक्षरांतून कोणतेंही गाळलें जात नाहीं, आणि त्या तींही अक्षरांचा पूर्ण उच्चार होतो तें. उ० לָמַד तो शिकला, יִלְמַד तो शिकेल, इ०.

प्र० अपूर्ण क्रियापद कोणतें ?

उ० ज्या क्रियापदाच्या धातूच्या तीन अक्षरांतून एक किंवा दोन अक्षरें गाळलीं जातात तें. उ० נָתַן दिल्हे, יִתֵּן देईल, לָתֵת द्यावयास, इ०.

प्र० अनुच्चारिताक्षरी क्रियापद कोणतें ?

उ० ज्या क्रियापदाच्या धातूमध्यें י ו ה א या अनुच्चारिताक्षरांतून एक किंवा दोन अक्षरें असतात तें. उ० אָכַל त्यानें खाल्लें, יָצָא तो निघाला, קוּם उठणें, इ०.

प्र० द्वित्ताक्षरी क्रियापद कोणतें ?

उ० ज्या क्रियापदाच्या धातूमध्यें दुसरें आणि तिसरें हीं अक्षरें सारखीं असतात तें. उ० סָבַב त्यानें वेढिलें, इ०.

प्र० अनियमित क्रियापदें अणखी किती प्रकारें विभागिलीं जातात ?

उ० अनियमित क्रियापदें अणखी सात प्रकारें विभागिलीं जातात; या सात प्रकारांस निरनिराळीं नावें देण्याकरितां פָּעַל या शब्दांतील अक्षरें अनुक्रमानें घेऊन, कोणतेंही धातूच्या पहिल्या अक्षरास פ, दुसऱ्यास ע आणि तिसऱ्यास ל असीं नावें दिल्हीं आहेत; आणि:–

१. अपूर्ण क्रियापदांत धातूचें पहिलें अक्षर बहुत करून נ असतें, ह्मणून त्यास פ״נ असें ह्मणतात. उ० נָפַל.

२. अनुच्चारिताक्षरी क्रियापदांत ज्या धातूचें पहिलें अक्षर א असतें त्यास פ״א असें ह्मणतात. उ० אָכַל.

३. अनुच्चारिताक्षरी क्रियापदांत ज्या धातूचें पहिलें अक्षर י असतें त्यास פ״י असें ह्मणतात. उ० יָלַד.

४. अनुच्चारिताक्षरी क्रियापदांत ज्या धातूचें दुसरें अक्षर ו अथवा י असतें त्यास ע״ו किंवा ע״י असें ह्मणतात. उ० קוּם, בִּין.

५. अनुच्चारिताक्षरी क्रियापदांत ज्या धातूचें तिसरें अक्षर א असतें त्यास ל״א असें ह्मणतात. उ० מָצָא.

६. अनुच्चारिताक्षरी क्रियापदांत ज्या धातूचें तिसरें अक्षर ה असतें त्यास ל״ה असें ह्मणतात. उ० גָּלָה.

७. द्वित्ताक्षरी क्रियापदांत दुसरें व तिसरें अक्षर सारखें असतें ह्मणून त्यास ע״ע असें ह्मणतात; उ० סָבַב.

प्र० क्रियापदास काय काय लागतें.

उ० क्रियापदास अर्थ, काळ, प्रयोग, रूप, पुरुष, लिंग, आणि वचन हीं लागतात.

प्र० इब्री क्रियापदांत किती अर्थ आहेत?

उ० इब्री क्रियापदांत तीन अर्थ आहेत, स्वार्थ, सामान्यार्थ आणि आज्ञार्थ.

प्र० स्वार्थ काय दाखवितो?

उ० स्वार्थ हा केवळ क्रियेचें घडणें दाखवितो. उ० וְיִשְׂרָאֵל אָהַב אֶת יוֹסֵף आणि इस्राएलानें योसेफावर प्रीति केली.

प्र० सामान्यार्थ काय दाखवितो?

उ० सामान्यार्थ हा पुरुष लिंग व वचन यांच्या भेदावांचून केवळ सामान्य रीतीनें क्रियेचा अर्थ दाखवितो; उ० אֱכֹל खाणें.

प्र० सामान्यार्थाचे किती प्रकार आहेत?

उ० वियुक्त व संयुक्त असे सामान्यार्थाचे दोन प्रकार आहेत.

प्र० वियुक्त सामान्यार्थ कसा असतो, आणि संयुक्त सामान्यार्थ कसा असतो?

उ० वियुक्त सामान्यार्थास ב כ ל מ हे उपसर्ग लागत नाहींत. उ० שְׁמוֹר संभाळणें, אֱכֹל खाणें इ; परंतु संयुक्त सामान्यार्थास ते उपसर्ग लागतात, आणि पूर्ण क्रियापदांत तो अर्थ बहुतकरून आज्ञार्थाच्या पुल्लिंगी एकवचनासारखा असतो; उ० שְׁמוֹר सांभाळणें לִשְׁמוֹר सांभाळायास, אֱכֹל खाणें לֶאֱכֹל खावयास इ०.

प्र० आज्ञार्थ काय दाखवितो?

उ० आज्ञार्थ आज्ञा करणें, उपदेश करणें व विनंती करणें दाखवितो; उ० לֵךְ אֱכֹל בְּשִׂמְחָה לַחְמֶךָ जा, आनंदानें आपली भाकर खा.

प्र० इब्री क्रियापदास किती काळ आहेत?

उ० इब्री क्रियापदास दोन काळ आहेत; भूतकाळ ह्मणजे गेला जो काळ तो, आणि भविष्य काळ ह्मणजे येणार जो काळ तो.

प्र० मग वर्तमान काळ ह्मणजे चालता जो काळ, याचा बोध कसा होतो?

उ० वर्तमान काळाचा बोध कधीं भूत काळावरून होतो; उ० אַתֶּם יְדַעְתֶּם तुह्मी जाणतां; कधीं भविष्य काळावरून

होतो; उ० לֹא נֵדַע आह्मी जाणत नाहीं; आणि कधीं कृदंता-
वरून होतो; उ० אָנֹכִי הוֹלֵךְ मी जाणारा ह्म० जात आहें, इ०.

प्र० कृदंत ह्मणजे काय?

उ० कृदंत हें क्रियापदाचें एक रूप आहे, त्यावर क्रियापद व विशेषण या दोघांचा धर्म राहतो.

प्र० कृदंतें किती आहेत?

उ० कर्तरि आणि कर्मकर्तरि असीं दोन कृदंतें आहेत.

प्र० कर्तरि आणि कर्मकर्तरि हे काय आहेत?

उ० कर्तरि आणि कर्मकर्तरि हे इब्री क्रियापदाचे दोन प्रयोग आहेत.

प्र० कर्तरि प्रयोग कोणता?

उ० जेथें वाच्यपदच कर्ता असतें तो कर्तरि प्रयोग; उ० קָטַל त्यानें कापलें, इ०.

प्र० कर्मकर्तरि प्रयोग कोणता?

उ० जेथें वाच्यपदावर क्रियेचा व्यापार घडतो, ह्मणजे वाच्यपद क्रियेचा विषय होतें, तो. उ० נִקְטַל तो कापला गेला, इ०.

प्र० इब्री क्रियापदास किती रूपें आहेत?

उ० इब्री क्रियापदास קַל अथवा פָּעַל, נִפְעַל, פִּעֵל, פֻּעַל, הִפְעִיל, הָפְעַל आणि הִתְפַּעֵל; असीं सात रूपें आहेत; या प्रत्येक रूपाच्या नामाचे स्वर त्या प्रत्येक रूपांतील क्रियापदास बहुतें करून लागतात; परंतु कधीं कधीं आणि विशेषें करून त्यांत एकादें कंठस्थानाचें अक्षर अथवा अनुच्चारित अक्षर असल्यास ते पालटतात.

प्र० या सातही रूपांचे अर्थ व त्यांचीं मुख्य लक्षणें सांग.

उ० १. קַל अथवा פָּעַל या रूपाचा अर्थ कर्तरि प्रयोगांत होतो; त्यांत धातुशब्द असतो, व त्यांत कांहीं आधिक उणें होत नाहीं. याच कारणास्तव या रूपास קַל ह्मणजे हलकें असें नाम दिल्हें आहे. आणि या रूपांत धातुशब्दास ָ ַ असेहि स्वर लागतात. उ० לָמַד तो शिकला, שָׁבַר त्यानें मोडलें, כָּבֵד तो भारी झाला किंवा वाढला, इ०.

२. נִפְעַל या रूपाचा अर्थ קַל या रूपाच्या कर्मकर्तरि प्रयोगांत होतो; भूतकाळीं धातुशब्दापुढें נִ असा उपसर्ग लागतो; आज्ञार्थीं, आणि सामान्यार्थीं ה असा उपसर्ग लागून या दोन अर्थीं व भविष्य काळीं נ हा उपसर्ग लागत नाहीं ह्मणून त्या-बद्दल धातुशब्दाच्या पहिल्या अक्षरांत द्वित्त दाघेश येतो. उ० נִלְמַד तो शिकला गेला, נִשְׁבַּר तो मोडला गेला; יִשָּׁבֵר तें मोडलें जाईल, इ०.

३. פִּעֵל या रूपाच्या अर्थांत बहुतकरून क्रियेचा वेग दिसून येतो, आणि जें क्रियापद קַל रूपांत अकर्मक असतें तें या रूपांत सकर्मक होतें; आणि यांतील धातुशब्दाच्या दुसऱ्या अक्षरांत द्वित्त दाघेश असतो. उ० לִמֵּד त्यानें शिकविलें, שִׁבֵּר त्यानें मोडून तुकडे केले, इ०.

४. פֻּעַל या रूपाच्या अर्थांतहि बहुतकरून क्रियेचा वेग दिसून येतो, परंतु तो कर्मकर्तरि प्रयोगांत असतो. यांतील धातु-शब्दाच्या दुसऱ्या अक्षरांत द्वित्त दाघेश असतो, आणि त्यांत आज्ञार्थ नसतो, उ० לֻמַּד तो शिकविला गेला, שֻׁבַּר त्याचे मोडून तुकडे झाले, इ०.

५. הִפְעִיל या रूपाचा अर्थ प्रयोजक ह्मणजे दुसऱ्याकडून क्रिया करविण्याच्या अर्थाच्या कर्तरि प्रयोगांत होतो; यास הִ असा उपसर्ग लागून धातुशब्दांतील दुसऱ्या अक्षरास י ִ असा स्वर लागतो. उ० הִלְמִיד त्यानें शिकवविलें; הִשְׁבִּיר त्यानें मोडविलें, इ०.

६. הָפְעַל या रूपाचा अर्थ הִפְעִיל या रूपाच्या कर्मकर्तरि प्रयोगांत होतो, यास הָ असा उपसर्ग लागतो; आणि यांत आज्ञार्थ नसतो. उ० הָלְמַד तो शिकवविला गेला, הָשְׁבַּר तो मोडविला गेला. इ०.

७. הִתְפַּעֵל या रूपाचा अर्थ करितांना क्रियेचा गुण कर्त्यावरच लावावा लागतो; यास הִתְ हा उपसर्ग लागतो आणि धातुशब्दाच्या दुसऱ्या अक्षरांत द्वित्त दागेश असतो; उ० הִתְלַמֵּד त्यानें आपणास ह्मणजे स्वतांस शिकविलें. जर धातुशब्दाचें पहिलें अक्षर שׁ किंवा ס असलें, तर הִתְ या उपसर्गांतील ת हें अक्षर त्यानंतर येतें; जर צ हें असलें, तर उपसर्गांतील ת बदलून ט होतो, आणि ז हें असलें तर ת बदलून ד होतो. उ० הִשְׁתַּמֵּר, מִסְתַּתֵּר, יִצְטַדֵּק, הִזְדַּמֵּן,

प्र० इब्री क्रियापदांस पुरुष, लिंग आणि वचन हीं कसीं लागतात?

उ० इब्री क्रियापदांस पुरुष, लिंग आणि वचन हीं उपसर्गांप्रमाणें व प्रत्ययांप्रमाणें लागतात.

प्र० भूतकाळीं काय लागतात?

उ० भूतकाळीं मात्र प्रत्यय लागतात; ते येणें प्रमाणें:—

एकवचन.	बहुवचन.
३. पु० धातु—	३. पु० स्त्री० וּ—
३. स्त्री० הָ ָ—	

एकवचन.		बहुवचन.	
२. पु०	תָּ—	२. पु०	תֶּם—
२. स्त्री०	תְּ—	२. स्त्री०	תֶּן—
१. पु० स्त्री०	תִּי—	१. पु० स्त्री.	נוּ—

प्र० भविष्य काळीं काय लागतात ?

उ० भविष्य काळीं उपसर्ग आणि प्रत्यय हे लागतात, ते येणेप्रमाणें:-

एकवचन.		बहुवचन.	
३. पु०	—יְ	३. पु०	וּ—יְ
३. स्त्री०	—תְּ	३. स्त्री०	נָה—תְּ
२. पु०	—תְּ	२. पु०	וּ—תְּ
२. स्त्री०	ִי—תְּ	२. स्त्री०	נָה—תְּ
१. पु० स्त्री०	—אֶ	१. पु० स्त्री०	—נְ

प्र० आज्ञारूपास काय लागतात ?

उ० आज्ञारूपास मात्र प्रत्यय लागतात व ते येणेप्रमाणें:—

एकवचन.		बहुवचन.	
२. पु०	•—	२. पु०	וּ—
२. स्त्री०	ִי—	२. स्त्री०	נָה—

प्र० कृदंतांस काय काय लागतात ?

उ० कृदंतांस नाम व विशेषण यांप्रमाणें लिंग आणि वचन व रूप हीं लागतात.

	एकवचन.	बहुवचन.
पु०	—	ִים—
स्त्री०	ָה, ֶת —	וֹת—

प्र० इब्री क्रियापदाचे सातही रूपांस पुरुष, लिंग, आणि वचन हीं लावून दाखीव ?

पूर्णक्रियापदांची रूपावली.

भूतकाळ.	קַל	נִפְעַל	פִּעֵל	פֻּעַל	הִפְעִיל	הָפְעַל	הִתְפַּעֵל
३. पु० एक०	לָמַד	נִלְמַד	לִמֵּד	לֻמַּד	הִלְמִיד	הָלְמַד־הָ	הִתְלַמֵּד
३. स्त्री०	לָמְדָה	נִלְמְדָה	לִמְּדָה	לֻמְּדָה	הִלְמִידָה	הָלְמְדָה	הִתְלַמְּדָה
२. पु०	לָמַדְתָּ	נִלְמַדְתָּ	לִמַּדְתָּ	לֻמַּדְתָּ	הִלְמַדְתָּ	הָלְמַדְתָּ	הִתְלַמַּדְתָּ
२. स्त्री०	לָמַדְתְּ	נִלְמַדְתְּ	לִמַּדְתְּ	לֻמַּדְתְּ	הִלְמַדְתְּ	הָלְמַדְתְּ	הִתְלַמַּדְתְּ
१. पु० स्त्री०	לָמַדְתִּי	נִלְמַדְתִּי	לִמַּדְתִּי	לֻמַּדְתִּי	הִלְמַדְתִּי	הָלְמַדְתִּי	הִתְלַמַּדְתִּי
३. पु० स्त्री०	לָמְדוּ	נִלְמְדוּ	לִמְּדוּ	לֻמְּדוּ	הִלְמִידוּ	הָלְמְדוּ	הִתְלַמְּדוּ
२. पु० [बहु०	לְמַדְתֶּם	נִלְמַדְתֶּם	לִמַּדְתֶּם	לֻמַּדְתֶּם	הִלְמַדְתֶּם	הָלְמַדְתֶּם	הִתְלַמַּדְתֶּם
२. स्त्री०	לְמַדְתֶּן	נִלְמַדְתֶּן	לִמַּדְתֶּן	לֻמַּדְתֶּן	הִלְמַדְתֶּן	הָלְמַדְתֶּן	הִתְלַמַּדְתֶּן
१. पु० स्त्री०	לָמַדְנוּ	נִלְמַדְנוּ	לִמַּדְנוּ	לֻמַּדְנוּ	הִלְמַדְנוּ	הָלְמַדְנוּ	הִתְלַמַּדְנוּ
सामान्यार्थ.							
वियुक्त.	לָמוֹד	הִלָּמֹד	לַמֹּד	לֻמֹּד	הַלְמֵיד	הָלְמֵד	הִתְלַמֵּד
संयुक्त.	לְמֹד	הִלָּמֵד	לַמֵּד	לֻמַּד	הַלְמֵד	הָלְמַד	
आज्ञार्थ.							
पु० एक०	לְמֹד	הִלָּמֵד	לַמֵּד	नाहीं	הַלְמֵד	नाहीं	הִתְלַמֵּד
स्त्री०	לִמְדִי	הִלָּמְדִי	לַמְּדִי		הַלְמִידִי		הִתְלַמְּדִי

आज्ञार्थ.

पु० बहु०	לִמְדוּ	הִלָּמְדוּ	לַמְּדוּ	नाहीं	הַלְמִידוּ	नाहीं	הִתְלַמְּדוּ
स्त्री०	לְמֹדְנָה	הִלָּמַדְנָה	לַמֵּדְנָה		הַלְמֵדְנָה		הִתְלַמֵּדְנָה

भविष्यकाळ.

३. पु० एक०	יִלְמֹד	יִלָּמֵד	יְלַמֵּד	יְלֻמַּד	יַלְמִיד	יָלְמַד	יִתְלַמֵּד
३. स्त्री०	תִּלְמֹד	תִּלָּמֵד	תְּלַמֵּד	תְּלֻמַּד	תַּלְמִיד	תָּלְמַד	תִּתְלַמֵּד
२. पु०	תִּלְמֹד	תִּלָּמֵד	תְּלַמֵּד	תְּלֻמַּד	תַּלְמִיד	תָּלְמַד	תִּתְלַמֵּד
२. स्त्री०	תִּלְמְדִי	תִּלָּמְדִי	תְּלַמְּדִי	תְּלֻמְּדִי	תַּלְמִידִי	תָּלְמְדִי	תִּתְלַמְּדִי
१. पु० स्त्री०	אֶלְמֹד	אֶלָּמֵד	אֲלַמֵּד	אֲלֻמַּד	אַלְמִיד	אָלְמַד	אֶתְלַמֵּד
३. पु० बहु०	יִלְמְדוּ	יִלָּמְדוּ	יְלַמְּדוּ	יְלֻמְּדוּ	יַלְמִידוּ	יָלְמְדוּ	יִתְלַמְּדוּ
३. स्त्री०	תִּלְמֹדְנָה	תִּלָּמַדְנָה	תְּלַמֵּדְנָה	תְּלֻמַּדְנָה	תַּלְמֵדְנָה	תָּלְמַדְנָה	תִּתְלַמֵּדְנָה
२. पु०	תִּלְמְדוּ	תִּלָּמְדוּ	תְּלַמְּדוּ	תְּלֻמְּדוּ	תַּלְמִידוּ	תָּלְמְדוּ	תִּתְלַמְּדוּ
२. स्त्री०	תִּלְמֹדְנָה	תִּלָּמַדְנָה	תְּלַמֵּדְנָה	תְּלֻמַּדְנָה	תַּלְמֵדְנָה	תָּלְמַדְנָה	תִּתְלַמֵּדְנָה
१. पु० स्त्री०	נִלְמֹד	נִלָּמֵד	נְלַמֵּד	נְלֻמַּד	נַלְמִיד	נָלְמַד	נִתְלַמֵּד

कृदंत.

कर्तरि.	לוֹמֵד	—	מְלַמֵּד	—	מַלְמִיד	—	מִתְלַמֵּד
कर्मकर्तरि.	לָמוּד	נִלְמָד	—	מְלֻמָּד	—	מָלְמָד	—

प्र० ज्या क्रियापदांत कंठस्थानाचें अक्षर अथवा ר हें अक्षर असतें, त्यांत काय फेरफार होतो?

उ० कंठस्थानाच्या अक्षरांस व ר या अक्षरास बहुतकरून शेवा लागत नाहीं, आणि त्यांत दाघेश येत नाहीं, ह्मणून त्या क्रियापदाचे स्वर पालटतात ते येणेप्रमाणें :—

१. जेथें कंठस्थानाच्या अक्षरांत शेवा लागावयाचा तेथें त्यास ֲ ֱ ֳ या संधिस्वरांतला एकादा लागतो. उ० נֶעֱמַד, סֻעֲרוּ, יַעֲמֹד, יֵעָמֵד, इ०.

२. निफआल रूपांत जेथें कंठस्थानाच्या अक्षरांत दाघेश यावयाचा तेथें त्याबद्दल त्याच्या अगोदरच्या अक्षरांस बहुतकरून दीर्घ स्वर लागतो. उ० הֵעָמֵד, इ०.

३. जेव्हां धातूचें दुसरें किंवा तिसरें कंठस्थानाचें अक्षर असतें, तेव्हां धातूच्या दुसऱ्या अक्षरास ַ हा स्वर लागतो. उ० יִבְעַל, יִשְׁמַע, इ०.

४. जेव्हां धातूचें तिसरें कंठस्थानाचें अक्षर असतें, तेव्हां भूतकाळीं द्वितीय पुरुषाच्या स्त्रीलिंगांत, सामान्यार्थी व कृदंताच्या पुलिंगीं एकवचनांत त्या कंठस्थानाच्या अक्षरास ַ हा स्वर लागतो. उ० שָׁמַעַתְּ, שְׁמוֹעַ, שֹׁמֵעַ, שָׁמוּעַ, इ०.

प्र० ज्या पूर्ण क्रियापदांचें पहिलें, दुसरें किंवा तिसरें कंठस्थानाचें अक्षर असतें, त्या क्रियापदांच्या प्रत्येक रूपांत भूतकाळ, सामान्यार्थ, आज्ञार्थ, भविष्य काळ आणि कृदंतें कसीं होतात तें सांग.

उ० १. ज्या क्रियापदांत पहिलें कंठस्थानाचें अक्षर असतें त्याची संक्षिप्त रूपावली.

हिथ.	होफ.	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִתְעַמֵּד	הָעֳמַד	הֶעֱמִיד	עֻמַּד	עִמֵּד	נֶעֱמַד	עָמַד	भूतकाळ.
הִתְעַמֵּד	הָעֳמַד	הַעֲמִיד	עֻמַּד	עַמֵּד	הֵעָמֵד	עָמוֹד	सामान्यार्थ
הִתְעַמֵּד	——	הַעֲמֵד	——	עַמֵּד	הֵעָמֵד	עֲמֹד	आज्ञार्थ.
יִתְעַמֵּד	יָעֳמַד	יַעֲמִיד	יְעֻמַּד	יְעַמֵּד	יֵעָמֵד	יַעֲמֹד	भविष्यका.
מִתְעַמֵּד	——	מַעֲמִיד	——	מְעַמֵּד	——	עוֹמֵד	कृदंतकर्तृ.
——	מָעֳמָד	——	מְעֻמַּד	——	נֶעֱמָד	עָמוּד	कृदंतकर्म.

२. ज्या क्रियापदांत दुसरें कंठस्थानाचें अक्षर असतें त्याची संक्षिप्त रूपा०

हिथ.	होफ.	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִתְבָּרֵךְ	הָזְעַק	הִזְעִיק	בֹּרַךְ	בֵּרֵךְ	נִזְעַק	זָעַק	भूतकाळ.
הִתְבָּרֵךְ	הָזְעַק	הַזְעִיק	בֹּרַךְ	בָּרֵךְ	הִזָּעֵק	זָעוֹק	सामान्यार्थ.
הִתְבָּרֵךְ	——	הַזְעֵק	——	בָּרֵךְ	הִזָּעֵק	זְעַק	आज्ञार्थ.
יִתְבָּרֵךְ	יָזְעַק	יַזְעִיק	יְבֹרַךְ	יְבָרֵךְ	יִזָּעֵק	יִזְעַק	भविष्यका.
מִתְבָּרֵךְ	——	מַזְעִיק	——	מְבָרֵךְ	——	זוֹעֵק	कृदंतकर्त्त.
——	מָזְעָק	——	מְבֹרַךְ	——	נִזְעָק	זָעוּק	कृदंतकर्म.

३. ज्या क्रियापदांत तिसरें कंठस्थानाचें अक्षर असतें त्याची संक्षिप्त रूपा०

हिथ.	होफ.	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִשְׁתַּבֵּחַ	הָשְׁבַּח	הִשְׁבִּיחַ	שֻׁבַּח	שִׁבַּח	נִשְׁבַּח	שָׁבַח	भूतकाळ.
הִשְׁתַּבֵּחַ	הָשְׁבֵּחַ	הַשְׁבִּיחַ	שֻׁבֹּחַ	שַׁבֵּחַ	הִשָּׁבֵחַ	שָׁבוֹחַ	सामान्यार्थ
הִשְׁתַּבַּח	——	הַשְׁבִּיחַ	——	שַׁבַּח	הִשָּׁבֵחַ	שְׁבַח	आज्ञार्थ.
יִשְׁתַּבֵּחַ	יָשְׁבַח	יַשְׁבִּיחַ	יְשֻׁבַּח	יְשַׁבֵּחַ	יִשָּׁבַח	יִשְׁבַּח	भविष्यका.
מִשְׁתַּבֵּחַ	——	מַשְׁבִּיחַ	——	מְשַׁבֵּחַ	——	שׁוֹבֵחַ	कृदंतकर्त्त.
——	מָשְׁבָּח	——	מְשֻׁבַּח	——	נִשְׁבָּח	שָׁבוּחַ	कृदंतकर्म.

פנ अपूर्ण क्रियापद.

प्रं० अपूर्ण क्रियापदाचीं मुख्य लक्षणें कोणतीं?

उ० १. या क्रियापदांत काल रूपाच्या भविष्यकाळांत व आज्ञार्थांत निफआल रूपाच्या भूतकाळांत व कृदंतांत, आणि हिफईल व होफआल या रूपांत נ हें धातूचें पहिलें अक्षर गाळलें जातें, आणि त्याच्या ठिकाणीं त्यामागून येणाऱ्या अक्षरांत दाघेश येतो. कधींकधीं काल रूपांतील सामान्यार्थाच्या संयुक्त रूपांतूनही נ हें अक्षर गाळलें जाऊन राहिलेले दोन अक्षरांस ֶ ֶ हे, स्वर लागून शेवटीं ת हें अक्षर लागतें. उ० יִגַּשׁ, יַגִּשׁ, גַּשׁ, נִגַּשׁ, הִגִּישׁ, הֻגַּשׁ, גֶּשֶׁת, इ०.

२. परंतु धातूचें दुसरें जर एकादे कंठस्थानाचें अक्षर असलें, तर त्यांतील נ हें अक्षर गाळलें जात नाहीं. उ० נִאֵץ, יִנְאַץ, נָחַת, תִּנְחַת, इ०.

३. जर धातूचें तिसरें अक्षर ה किंवा ע हें असलें तर कालरूपांत संयुक्त सामान्यार्थीं נ हें अक्षर गाळलें जाऊन राहिलेले दोन अक्षरांस ַ ַ हे स्वर लागून शेवटीं ת हें अक्षर लागतें; उ० נַפַּת, פַּחַת, इ०.

४. जर धातूचें पहिलें व तिसरें अक्षर נ हेंच असलें, तर कालरूपांत जेथें शेवटले נ या अक्षरास शेवा लागायाचा तेथें तें נ हें अक्षर गाळलें जातें; आणि सामान्यार्थीं दोन्हीं נ गाळलीं जाऊन व राहिलेले एका अक्षरास ֵ हा स्वर लागून शेवटीं ת हें अक्षर लागतें; उ० נָתַן, נָתַתָּ, תֵּת, इ०.

प्र० दुसरीं कोणतीं क्रियापदें या वर्गांत गणिलीं जातात?

उ० ज्या धातूंचें पहिलें अक्षर י असतें त्यांतील יָנַח, יָצַב, יָצַג, יָצַע, יָצַק, יָצַר, יָצַת, יָקַע आणि לָקַח व לָתַע हीं क्रियापदेंही या वर्गांत गणिलीं जातात.

प्र० या क्रियापदांच्या प्रत्येक रूपांत भूतकाळ, सामान्यार्थ, आज्ञार्थ, भविष्यकाळ, आणि कृदंतें कशीं होतात हें सांग.

उ० פ״נ क्रियापदांची संक्षिप्त रूपावली.

हिथपा.	होफ.	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִתְנַגֵּשׁ	הֻגַּשׁ	הִגִּישׁ	נֻגַּשׁ	נִגֵּשׁ	נִגַּשׁ	נָגַשׁ	भूतकाळ.
הִתְנַגֵּשׁ	הֻגַּשׁ	הַגִּישׁ	נֻגַּשׁ	נַגֵּשׁ	הִנָּגֵשׁ	נְגֹשׁ	सामान्यार्थ.
הִתְנַגֵּשׁ	—	הַגֵּשׁ	—	נַגֵּשׁ	הִנָּגֵשׁ	גֵּשׁ	आज्ञार्थ.
יִתְנַגֵּשׁ	יֻגַּשׁ	יַגִּישׁ	יְנֻגַּשׁ	יְנַגֵּשׁ	יִנָּגֵשׁ	יִגַּשׁ	भविष्यकाळ.
מִתְנַגֵּשׁ	—	מַגִּישׁ	—	מְנַגֵּשׁ	—	נֹגֵשׁ	कृदंतकर्तरि.
—	מֻגָּשׁ	—	מְנֻגָּשׁ	—	נִגָּשׁ	נָגוּשׁ	कृदंतकर्मणि.

अनुच्चारिताक्षरी क्रियापदें.

प्र० अनुच्चारिताक्षरी क्रियापदें किती प्रकारचीं आहेत?

उ० अनुच्चारिताक्षरी क्रियापदें पांच प्रकारचीं आहेत ह्मणजे פ״א, פ״י, ע״ו अथवा ע״י, ל״א आणि ל״ה.

פא क्रियापद.

प्र० ज्या क्रियापदाच्या धातूचें पहिलें अक्षर א असतें, त्या क्रियापदाचीं मुख्य लक्षणें कोणतीं?

उ० १. या क्रियापदाच्या धातूचें पहिलें अक्षर א यांत दाघेश येत नाहीं व त्यास बहुतकरून शेवा लागत नाहीं, ह्मणून या क्रियापदाचे स्वर पूर्ण क्रियापदासीं निराळे असतात. उ० יֹאכַל, יֹאכֵל, יַאֲכִיל, יֵאָכֵל, इ०.

२. परंतु पिएल, पुआल आणि हिथपाएल या रूपांस पूर्ण क्रियापादाचेच स्वर लागतात. उ० אִכֵּל, אַכֵּל, הִתְאַכֵּל, इ०.

३. काल रूपाच्या भविष्यकाळांत प्रथम पुरुषाच्या एकवचनांत दोन א एकत्र येऊं शकत नाहीं, ह्मणून त्यांतील एक कधीं कधीं गाळला जातो. उ० אֹכַל, इ०.

प्र० या क्रियापदाच्या प्रत्येक रूपांत भूतकाळ, सामान्यार्थ, आज्ञार्थ, भविष्य काळ आणि कृदंतें कसीं होतात हें सांग.

उ० פא क्रियापदांची संक्षिप्त रूपावली.

हिथपा.	होप.	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִתְאַכֵּל	הָאֳכַל	הֶאֱכִיל	אֻכַּל	אִכֵּל	נֶאֱכַל	אָכַל	भूतकाळ.
הִתְאַכֵּל	הָאֳכַל	הַאֲכִיל	אֻכֹּל	אַכֵּל	הֵאָכֵל	אֱכֹל	सामान्या.
הִתְאַכֵּל	——	הַאֲכֵל	——	אַכֵּל	הֵאָכֵל	אֱכוֹל	आज्ञार्थ.
יִתְאַכֵּל	יָאֳכַל	יַאֲכִיל	יְאֻכַּל	יְאַכֵּל	יֵאָכֵל	יֹאכַל	भवि. का.
מִתְאַכֵּל	——	מַאֲכִיל	——	מְאַכֵּל	——	אוֹכֵל	कृ.कर्तरि.
——	מָאֳכָל	——	מְאֻכָּל	——	נֶאֱכָל	אָכוּל	कृ.कर्मणि

פ״י क्रियापद.

प्र० ज्या क्रियापदाच्या धातूचें पहिलें अक्षर י असतें त्या क्रियापदाचीं मुख्य लक्षणें कोणतीं?

उ० १. ज्या क्रियापदाच्या धातूचें पहिलें अक्षर י हें असतें, त्या क्रियापदाच्या आज्ञार्थीं, व भविष्यकाळीं व कधीं कधीं सामान्यार्थीं י हें अक्षर गाळलें जातें. उ० יָשַׁב, שֵׁב, אֵשֵׁב, שֶׁבֶת, इ०.

२. क्वचित् तें י अक्षर राखलेंही जातें. उ० יָטַב, יִיטַב, יָטוֹב, इ०.

३. निफआल, हिफईल आणि होफआल या रूपांत י बदलून ו हें अक्षर लागतें. उ० נוֹשַׁב, יִוָּשֵׁב, הוֹשִׁיב, יוֹשַׁב इ०.

४. कालरूपाच्या संयुक्त सामान्यार्थीं י हें अक्षर गाळलें जाऊन व राहिलेले दोन अक्षरांस ֶ ֶ हे स्वर लागून शेवटीं ת हें अक्षर लागतें; परंतु जर त्या धातूचें शेवटलें अक्षर ח किंवा ע हें असलें तर त्या दोन अक्षरांस ַ ַ हे स्वर लागून शेवटीं ת हें अक्षर लागतें. उ० שֶׁבֶת דַּעַת, इ०.

५. יָכֹל या धातूच्या दुसऱ्या अक्षरास ֻ हा स्वर लागतो, आणि त्याचा भविष्यकाळ יוּכַל असा होतो.

६. कित्येक क्रियापदाच्या हिथपाएल रूपांत י बदलून ו हें अक्षर लागतें. उ० יָדָה הִתְוַדָּה, इ०.

प्र० या क्रियापदाच्या प्रत्येक रूपांत भूतकाळ, सामान्यार्थ, आज्ञार्थ, भविष्यकाळ आणि कृदंतें कसीं होतात हें सांग.

उ० פ״י क्रियापदांची संक्षिप्त रूपावली.

हिथपा.	होफ.	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִתְיַלֵּד	הוּלַד	הוֹלִיד	יֻלַּד	יִלֵּד	נוֹלַד	יָלַד	भूतकाळ.
הִתְיַלֵּד	הוּלַד	הוֹלִיד	יֻלּוֹד	יַלֵּד	הִוָּלֵד	לֶדֶת	सामान्यार्थ.
הִתְיַלֵּד	—	הוֹלֵד	—	יַלֵּד	הִוָּלֵד	לֵד	आज्ञार्थ.
יִתְיַלֵּד	יוּלַד	יוֹלִיד	יְיֻלַּד	יְיַלֵּד	יִוָּלֵד	יֵלֵד	भविष्यकाळ.
מִתְיַלֵּד	—	מוֹלִיד	—	מְיַלֵּד	—	יוֹלֵד	कृदंत कर्तरि.
—	מוּלָד	—	מְיֻלָּד	—	נוֹלָד	יָלוּד	कृदंत कर्मणि.

ע״ו किंवा ע״י क्रियापद.

प्र० ज्या क्रियापदाच्या धातूचें दुसरें अक्षर ו किंवा י असतें, त्या क्रियापदाचीं मुख्य लक्षणें कोणतीं ?

उ० १. ज्या क्रियापदाच्या धातूचें दुसरें अक्षर ו किंवा י असतें त्या क्रियापदाचा धातु नेहमी सामान्यार्थीं असतो. उ० קוּם उठणें, בִּין जाणणें, इ०.

२. त्या क्रियापदाच्या कालरूपांत भूतकाळीं व कर्तरि कृदंतांत आणि हिफईल व होफआल या रूपांत ו हें अक्षर गाळलें जातें. उ० קָם, הֵקִים, הוּקַם, इ०.

३. पिएल, पुआल आणि हिथपाएल या रूपांत धातूचें तिसरें अक्षर दोन वेळ येतें. उ० קוֹמֵם, קוֹמַם, הִתְקוֹמֵם, इ०.

४. कालरूपाच्या भविष्यकाळाचे, निफआल रूपांच्या भूतकाळाचे, आणि हिफईल व होफआल या रूपांचे उपसर्गांचे स्वर अनियमित असतात. उ० יָקוּם, נָקוֹם, הֵקִים, הוּקַם, इ०.

५. या वर्गांतील कित्येक क्रियापदांस कालरूपाच्या भूतकाळीं ו असा स्वर लागतो, आणि कित्येकांस तृतीय पुरुषीं ֵ हा स्वर लागतो. उ० בּוֹשׁ, בּוֹשְׁתִּי, מֵת, מֵתוּ, इ०.

६. कालरूपाच्या भविष्यकाळास जर ו हा उपसर्ग लागला, तर धातूच्या पहिल्या अक्षराचा स्वर पालटून त्यास कामेस हातूफ लागतो. उ० וַיָּקָם ; आणि हिफईल रूपाच्या भविष्य काळास जर ו हा उपसर्ग लागला, तर त्यांतील धातूच्या पहिल्या अक्षराचा स्वर पालटून ֶ हा स्वर लागतो. उ० וַיָּקֶם, इ०.

७. या वर्गांत गणिलेल्या ज्या क्रियापदाचे धातूचें दुसरें अक्षर י हें असतें त्याचीं सातही रूपें, ज्या धातूचें दुसरें अक्षर ו असतें त्याच्या रूपांप्रमाणेंच असतात; परंतु कालरूपाच्या सामान्यार्थीं, आज्ञार्थीं, व भविष्यकाळीं मात्र त्या धातूचे मूळचे स्वर राहतात. उ. בָּן, בִּין, יָבִין, נָבוֹן, בּוֹנֵן, בּוֹנַן, הֵבִין, הוּבַן, הִתְבּוֹנֵן.

प्र० या क्रियापदाचे प्रत्येक रूपांत भूतकाळ, सामान्यार्थ, आज्ञार्थ, भविष्यकाळ, आणि कृदंतें कसीं होतात तीं सांग ?

उ० ע״ו किंवा ע״י क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

हिथपा.	होफ	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִתְקוֹמֵם	הוּקַם	הֵקִים	קוֹמַם	קוֹמֵם	נָקוֹם	קָם	भूतकाळ.
הִתְקוֹמֵם	הוּקַם	הָקִים	קוֹמַם	קוֹמֵם	הִקּוֹם	קוּם	सामान्या.
הִתְקוֹמֵם	—	הָקֵם	—	קוֹמֵם	הִקּוֹם	קוּם	आज्ञार्थ.
יִתְקוֹמֵם	יוּקַם	יָקִים	יְקוֹמַם	יְקוֹמֵם	יִקּוֹם	יָקוּם	भवि. काळ.
מִתְקוֹמֵם	—	מֵקִים	—	מְקוֹמֵם	—	קָם	कृ. कर्तरि.
—	מוּקָם	—	מְקוֹמָם	—	נָקוֹם	קוּם	कृ. कर्मणि.

לא क्रियापद.

प्र० ज्या क्रियापदाच्या धातूचें शेवटलें अक्षर א असतें, त्या क्रियापदाचीं मुख्य लक्षणें कोणतीं ?

उ० १. ज्या क्रियापदाच्या धातूचें शेवटलें अक्षर א असतें, त्या क्रियापदाचे स्वर बहुतकरून पूर्ण क्रियापदाच्या स्वरांसारिखे असतात. परंतु शेवटीं א असतो ह्मणून धातूचे दुसरे अक्षरास ַ या स्वराबद्दल ָ हा स्वर लागतो; उ० מָצָא, קָרָא, इ०.

२. या वर्गांतील טָמֵא, יָרֵא, מָלֵא, आणि שָׂנֵא या चार धातूंच्या दुसऱ्या अक्षरास मात्र कालरूपाच्या भूतकाळांत ֵ हा स्वर लागतो.

३. या वर्गांतील क्रियापदाचें शेवटलें א हें अक्षर יָצָתִי आणि מָלֵתִי या दोन शब्दांत एक एक ठिकाणीं मात्र गाळलेलें आढळतें; दुसऱ्या कोणत्या क्रियापदांत तें गाळलें जात नाहीं.

४. קָרָא या धातूच्या दुसऱ्या अक्षरास कालरूपाच्या भूतकाळीं ָ हा स्वर राहतो. उ० קָרָאוּ. आणि निफआल रूपाच्या भूतकाळीं धातूच्या दुसऱ्या अक्षरास ָ या स्वराबद्दल ֵ हा स्वर लागतो. उ० נִקְרֵאוּ, נִקְרֵאתִי, इ०.

निफआल रूपाच्या कृदंतांत स्त्रीलिंगास ה हें अक्षर लागण्याबद्दल ת हें अक्षर लागतें. उ० נִקְרָאת, נִפְלָאת, इ०.

प्र० या क्रियापदाच्या प्रत्येक रूपांत भूतकाळ, सामान्यार्थ, आज्ञार्थ, भविष्यकाळ आणि कृदंतें कसीं होतात हें सांग ?

उ० ## לא क्रियापदांची संक्षिप्त रूपावली.

हिथपा.	होफ.	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִתְמַצֵּא	הָמְצָא	הִמְצִיא	מֻצָּא	מִצֵּא	נִמְצָא	מָצָא	भूतका.
הִתְמַצֵּא	הָמְצָא	הַמְצִיא	מֻצָּא	מַצֵּא	הִמָּצֵא	מָצוֹא	सामा.
הִתְמַצֵּא	——	הַמְצֵא	——	מַצֵּא	הִמָּצֵא	מְצָא	आज्ञा.
יִתְמַצֵּא	יָמְצָא	יַמְצִיא	יְמֻצָּא	יְמַצֵּא	יִמָּצֵא	יִמְצָא	भ. का.
מִתְמַצֵּא	——	מַמְצִיא	——	מְמַצֵּה	——	מוֹצֵא	कृ. कर्त.
——	מֻמְצָא	——	מְמֻצָּא	——	נִמְצָא	מָצוּא	कृ. कर्म.

לה क्रियापद.

प्र० ज्या क्रियापदाच्या धातूचें शेवटलें अक्षर ה असतें, त्या क्रियापदाचीं मुख्य लक्षणें कोणतीं?

उ० १. ज्या क्रियापदाच्या धातूचें शेवटलें अक्षर ה असतें, त्या क्रियापदाच्या भूतकाळीं तृतीय पुरूषाच्या बहुवचनांत ה हें अक्षर गाळलें जातें; उ० גָּלוּ, נִגְלוּ, इ०.

२. आज्ञार्थीं व भविष्यकाळीं जेथें शेवटीं ִי व וּ असे प्रत्यय लागतात, तेथें ה हें अक्षर गाळलें जातें. גְּלִי, גְּלוּ, תִּגְלוּ, תִּגְלִי, इ०.

३. कर्तरि कृदंतांतील बहुवचनांत, आणि कर्मकर्तरि कृदंतांत ה हें अक्षर गाळलें जातें. उ० גֹּלִים, גֹּלוֹת, גָּלוּי, इ०.

४. भूतकाळीं तृतीय पुरूषाच्या स्त्रीलिंगीं एकवचनांत ה या अक्षरापुढें ת हें अक्षर लागतें; उ० גָּלְתָה, נִגְלְתָה, इ०.

५. भूतकाळीं प्रथम पुरुषांत व द्वितीय पुरुषांत ה या अक्षराबद्दल י हें अक्षर लागतें. उ० גָּלִיתִי, גָּלִיתָ, גָּלִינוּ, נִגְלֵיתֶם, इ०.

६. आज्ञार्थी व भविष्यकाळीं जेथें נָה हा प्रत्यय लागतो, तेथें ה या अक्षराबद्दल י हें अक्षर लागतें. उ० גְּלֶינָה, תִּגְלֶינָה, इ०.

७. कालरूपाच्या वियुक्त सामान्यार्थीं मात्र ה राहतो; परंतु संयुक्त सामान्यार्थांत व दुसऱ्या सर्व रूपांच्या सामान्यार्थांत त्याच्याबद्दल ת हें अक्षर लागतें. उ० גָּלֹה, גְּלוֹת, הִגָּלוֹת, גַּלֹּה, इ०.

८. आज्ञार्थी व भविष्यकाळीं कधीं कधीं ה हें अक्षर गाळलें जाऊन त्याबद्दल कांहींच लागत नाहीं. उ० צַוֵּה यापासून צַו, יִגְלֶה यापासून יִגֶל, תִּפְנֶה यापासून תֵּפֶן असे होतात.

९. ज्या क्रियापदाच्या धातूच्या शेवटीं הּ (हे मप्पीक) हें अक्षर असतें, त्या क्रियापदांत ה हें अक्षर गाळलें जात नाहीं, आणि तें शेवटीं येत असतांही कित्येक ठिकाणीं त्यास ַ हा स्वर लागतो; आणि हें क्रियापद बहुतकरून शेवटीं कंठस्थानाचें अक्षर असणाऱ्या पूर्ण क्रियापदाप्रमाणें चालतें. उ० גָּבַהּ, גָּבֹהַּ, הִגְבַּהּ, יִגְבַּהּ, הִגְבִּיהַּ, इ०.

प्र० या क्रियापदाच्या प्रत्येक रूपांत भूतकाळ, सामान्यार्थ, आज्ञार्थ, भविष्यकाळ आणि कृदंतें कसीं होतात हें सांग?

उ० גלה क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

हिथपा.	होफ.	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִתְגַּלָּה	הָגְלָה	הִגְלָה	גֻּלָּה	גִּלָּה	נִגְלָה	גָּלָה	भूतकाळ.
הִתְגַּלּוֹת	הָגְלוֹת	הַגְלוֹת	גֻּלּוֹת	גַּלּוֹת	הִגָּלוֹת	גְּלוֹת	सामान्यार्थ.
הִתְגַּלֵּה	——	הַגְלֵה	——	גַּלֵּה	הִגָּלֵה	גְּלֵה	आज्ञार्थ.
יִתְגַּלֶּה	יָגְלֶה	יַגְלֶה	יְגֻלֶּה	יְגַלֶּה	יִגָּלֶה	יִגְלֶה	भविष्यकाळ.
מִתְגַּלֶּה	——	מַגְלֶה	——	מְגַלֶּה	——	גֹּלֶה	कृदंत कर्त.
——	מָגְלֶה	——	מְגֻלֶּה	——	נִגְלֶה	גָּלוּי	कृदंत कर्म.

עע द्वित्ताक्षरी क्रियापद.

प्र० द्वित्ताक्षरी क्रियापदांचीं मुख्य लक्षणें कोणतीं?

उ० १. द्वित्ताक्षरी क्रियापद ह्मणजे ज्याच्या धातूचें दुसरें व तिसरें अक्षर सारखें असतें, त्या क्रियापदाच्या (कृदंतें खेरीज करून) काल, निफआल, हिफईल व होफआल या रूपांत त्या दोन सारख्या अक्षरांतून एक गाळलें जातें, आणि दुसऱ्यास जर कांहीं स्वर लागला, तर त्यांत द्वित्त दाघेश येतो; उ०. סָבַב, סַבָּה, נָסַב; נָסַבָּה, इ०.

२. या क्रियापदांत कालरूपाच्या भविष्यकाळास, निफआल रूपाच्या भूतकाळास व कृदंतास व हिफईल व होफआल रूपांस लागणाऱ्या उपसर्गांचे स्वर अनियमित असतात; उ० יָסֹב, נָסַב, יָסֵב, יוּסַב, इ०.

३. कित्येक द्वित्ताक्षरी क्रियापदें कालरूपाच्या भूतकाळांत व पिएल आणि हिथपाएल या रूपांत पूर्ण क्रियापदाप्रमाणें चालतात ; उ० בַּז בָּזָה, קָלַל קָלֵל, פָּלַל הִתְפַּלֵּל, इ०.

४. निफआल व हिफईल रूपांत धातूच्या पहिल्या अक्षराचे स्वर अनियमित असतात. उ० הֵמַם, הֲרוֹם, הֵסַבּוּ, इ०.

५. कालरूपाच्या भविष्यकाळास जर וַ हा उपसर्ग लागला, तर धातूच्या पहिल्या अक्षराचा स्वर पालटून त्यास कामेस हातुफ लागतो ; उ० וַיָּסָב ; आणि हिफईल रूपाच्या भविष्यकाळास जर וַ हा उपसर्ग लागला तर त्यांतील धातूच्या पहिल्या अक्षराचाहि स्वर पालटून ֶ हा स्वर लागतो ; उ० וַיָּגֶל, इ०.

प्र० या क्रियापदाच्या प्रत्येक रूपांत भूतकाळ सामान्यार्थ, आज्ञार्थ, भविष्यकाळ आणि कृदंतें कसीं होतात तीं सांग.

उ० סבב द्वित्ताक्षरी क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

हिथपा.	होफ.	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִסְתּוֹבֵב	הוּסַב	הֵסֵב	סֻבַּב	סֹבֵב	נָסַב	סַב	भूतकाळ.
הִסְתּוֹבֵב	הוּסַב	הָסֵב	סוֹבַב	סוֹבֵב	הִסַּב	סוֹב	सामान्यार्थ.
הִסְתּוֹבֵב	—	הָסֵב	—	סוֹבֵב	הִסַּב	סוֹב	आज्ञार्थ.
יִסְתּוֹבֵב	יוּסַב	יָסֵב	יְסוֹבַב	יְסוֹבֵב	יִסַּב	יָסוֹב	भविष्यकाळ.
מִסְתּוֹבֵב	—	מֵסֵב	—	מְסוֹבֵב	—	סוֹבֵב	कृदंत कर्तृ.
—	מוּסָב	—	מְסוֹבָב	—	נָסָב	סָבוּב	कृदंत कर्म.

प्र० अनियमित क्रियापदांच्या या सात प्रकारांशिवाय आणखी कांहीं प्रकार आहेत कीं काय ?

उ० होय.

प्र० त कसे असतात ?

उ० १. कित्येकांत अनियमित क्रियापदांचीं दोन अक्षरें असतात ; उ० נָשָׂא, נָטָה, נָתַן, יָרֵא, יָרָה, יָצָא, בּוֹא, इ०.

२. कित्येक दोन धातूपासून उत्पन्न होतात ; उ० הָלַךְ यापासून הִתְהַלֵּךְ आणि יָלַךְ यापासून הוֹלִיךְ, इ०.

३. कित्येकांच्या धातूंतील एक किंवा दोन अक्षरें दोन दोन वेळा येतात ; उ० גָּלַל גִּלְגַּלְתִּי, טוּל טִלְטֵל, תָּעָה מִתַעְתֵּעַ, इ०.

४. कित्येकांच्या धातूमध्यें चार अक्षरें असतात ; उ० כִּרְסֵם יְכַרְסְמֶנָּה, इ०.

प्र० ज्यांत अनियमित क्रियापदांचीं दोन अक्षरें असतात, अशा कांहीं क्रियापदांचीं होणारीं रूपें, अर्थ, काळ व कृदंतें सांग.

उ० १. ज्या क्रियापदाच्या धातूचें पहिलें अक्षर נ व तिसरें अक्षर א असतें त्या क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

פנ व לא נָשָׂא या क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

हिथ.	होफ.	हिफ.	पु.	पि.	निफ.	काल.	
הִתְנַשֵּׂא	הֻשָּׂא	הִשִּׂיא	——	נִשֵּׂא	נִשָּׂא	נָשָׂא	भूतकाळ.
הִתְנַשֵּׂא	הֻשָּׂא	הַשִּׂיא	——	נַשֵּׂא	הִנָּשֵׂא	שְׂאֵת	सामान्यार्थ.
הִתְנַשֵּׂא	——	הַשִּׂיא	——	——	——	שָׂא	आज्ञार्थ.
אֶתְנַשֵּׂא	——	אַשִּׂיא	——	אֲנַשֵּׂא	אֶנָּשֵׂא	אֶשָּׂא	भविष्यकाळ.
מִתְנַשֵּׂא	——	——	——	מְנַשֵּׂא	——	נֹשֵׂא	कृदंत कर्तृ.
——	——	——	מְנֻשָּׂא	——	נִשָּׂא	נָשׂוּא	कृदंत कर्म.

२. פנ व לה נָטָה या क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

हिफ.	निफ.	काल.
הִטֵּיתִי	נִטֵּיתִי	נָטִיתִי
הַטּוֹת	הִנָּטוֹת	נְטוֹת
הַט, הַטֵּה	הִנָּטֵה	נְטֵה
אַט, אַטֶּה	אֶנָּטֶה	אֵט, אֶטֶּה
מַטֶּה	——	נוֹטֶה
——	נִטֶּה	נָטוּי

३. פנ व לנ נָתַן या क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

हॊफ.	निफ.	काल.	
—	נִתַּתִּי	נָתַתִּי	भूतका०
—	הִנָּתוֹן	נָתוֹן, תֵּת	सामा०
—	הִנָּתֵן	תֵּן	आज्ञा०
אֻתַּן	אֶנָּתֵן	אֶתֵּן	भ० का.
——	——	נוֹתֵן	कृ. कर्तृ.
—	נִתָּן	נָתוּן	कृ. कर्म.

४. פי व לא יָרֵא या क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

पि.	निफ.	काल.	
——	נוֹרָא	יָרֵאתִי	भूतकाळ.
——	הִוָּרֵא	יְרֹא	सामान्यार्थ.
——	——	יְרָא	आज्ञार्थ.
אֲיָרֵא	אִוָּרֵא	אִירָא	भवि. का०
——	——	יָרֵא	कृ. कर्तृ.
——	נוֹרָא	יָרֵא	कृ. कर्म.

५. פי व לה יָרָה या क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

हिफ.	निफ.	काल.	
הוֹרֵתִי	——	יָרִיתִי	भूत०
הוֹרוֹת	——	יָרֹה, יְרוֹת	सामा०
הוֹרֵה	——	יְרֵה	आज्ञा०
——	אִיָּרֶה	אִירֶה	भवि०
מוֹרֶה	——	יוֹרֶה	कृ. क०
——	——	——	कृ. क०

פ׳ व לא יָצָא या क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

होफ.	हिफ.	काल.
הוּצֵאתִי	הוֹצֵאתִי	יָצָאתִי
——	יְצֹא,צֵאת הוֹצִא	
——הוֹצֵא,הוֹצִיא		צֵא
——אוֹצֵא,אוֹצִיא		אֵצֵא
——מוֹצֵא,מוֹצִיא		יוֹצֵא
מוּצָא	———	——

ע׳ व לא בּוֹא या क्रियापदाची संक्षिप्त रूपावली.

होफ.	हिफ.	काल.	
הוּבֵאתִי	הֵבֵאתִי	בָּאתִי	भूत०
——	הָבִיא	בֹּא	सामा.
——	הָבֵא	בֹּא	आज्ञा.
אוּבָא	אָבִיא	אָבוֹא	भवि.
——	מֵבִיא	בָּא	कृ.क.
מוּבָא	——	——	कृ.क.

कर्मवाचक प्रत्ययान्त सर्वनाम.

प्र० कर्मवाचक प्रत्ययान्त सर्वनाम ह्मणजे काय ?

उ० ज्या सर्वनामाकडून क्रियेचें कर्म दर्शविलें जातें, त्या सर्वनामास कर्मवाचक प्रत्ययान्त सर्वनाम असें ह्मणतात. तें द्वितीयान्त असतें.

प्र० कर्मवाचक प्रत्ययान्त सर्वनामें क्रियापदांस कसीं लागतात ?

उ० कर्मवाचक प्रत्ययान्त सर्वनामें क्रियापदांस प्रत्ययांप्रमाणें लागतात.

प्र० हे प्रत्यय विशेषेंकरून कोणत्या रूपांस लागतात ?

उ० हे प्रत्यय विशेषेंकरून काल, पिएल, आणि हिफईल या रूपांस लागतात ; उ० דְּרַשְׁתִּיךָ मी तुला शोधिलें, לִמַּדְתַּנִי तूं मला शिकविलेंस, הוֹשַׁעְתָּנוּ तूं आमचें तारण करविलेंस, יְהַלְלוּךָ ते तुला स्तवितील, इ०.

प्र० हे प्रत्यय लागल्यानें क्रियापदांत कांहीं फेरफार होतो कीं काय?

उ० होय; हे प्रत्यय लागल्यानें क्रियापदाचे स्वरांत फेरफार होतो; उ० תִּי דְרַשְׁתִּי मी शोधिलें, דְרַשְׁתִּיךָ मी तुला शोधिलें. אֶדְרוֹשׁ मी शोधीन, אֶדְרְשֵׁם मी त्यांस शोधीन, इ०.

प्र० क्रियापदांस लागणारे कर्मवाचक प्रत्ययान्त सर्वनामें कोणतीं?

उ०

एकवचन.

१. पु. स्त्री. ְנִי, ַנִי, ֵנִי, ֶנִּי, ַנִּי, ַי मला.
२. पु. ְךָ, ֶךָּ, ְךָ, ָךְ तुला.
२. स्त्री. ֵךְ, ֵךְ तुला.
३. पु. וֹ, ָהוּ, ֵהוּ, ֶנּוּ, ָו त्याला.
३. स्त्री. ֶנָּה, ֶהָ, ָהּ तिला.

बहुवचन.

१. पु. स्त्री. ְנוּ, ָנוּ, ֵנוּ आह्मांला.
२. पु. ְכֶם तुह्मांला.
२. स्त्री. ְכֶן तुह्मांला.
३. पु. ָם, ָם, ֵם त्यांला.
३. स्त्री. ָן, ָם, ֵם त्यांला.

प्र० कोणकोणत्या अर्थांत या प्रत्ययांचा अर्थ कर्मवाचक होतो?

उ० स्वार्थी व आज्ञार्थी या प्रत्ययांचा अर्थ कर्मवाचक होतो.

प्र० सामान्यार्थी व कृदंतांत या प्रत्ययांचा अर्थ कसा होतो?

उ० सामान्यार्थी व कृदंतांत या प्रत्ययांचा अर्थ षष्ठीविभक्तीप्रमाणें होतो; उ० קוּמִי माझें उठणें, שׁוֹמְרִי माझा सांभाळणारा, इ०.

प्र० कर्मवाचक प्रत्ययान्त सर्वनामाचा अर्थ आणखी कोणत्या रीतीनें होतो?

उ० कधीं कधीं אֵת या अव्ययास हे प्रत्यय लागल्यानेही कर्मवाचक प्रत्ययान्त सर्वनामाचा अर्थ होतो, उ० אֲהַבְתַּנִי तूं मजवर प्रीति केलीस, अथवा אֲהַבְתָּ אוֹתִי तूं मजवर प्रीति केलीस, इ०.

अव्यय.

प्र० अव्यय ह्मणजे काय?

उ० ज्या शब्दांत कांहीं कार्य विशेष होत नाहीं, व मूळचें जसें त्याचें स्वरूप असतें तसेंच बहुतकरून राहतें व ज्याचा वाक्यरचनेंत फार उपयोग पडतो, त्यास अव्यय असें ह्मणतात.

प्र० इब्रीभाषेंत अव्ययें कसीं असतात?

उ० इब्रीभाषेंत अव्ययें शब्दरूपांत व उपसर्गरूपांत असतात.

प्र० अव्ययांचे प्रकार किती आहेत?

उ० अव्ययांचे प्रकार चार आहेत; क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय, आणि केवलप्रयोगी अव्यय.

प्र० कोण कोणत्या अव्ययांचें रूपांतर होतें व तें कसें होतें?

उ० कांहीं क्रियाविशेषण अव्ययांस व कांहीं शब्दयोगी अव्ययांस षष्ठ्यन्त सर्वनामाचे प्रत्यय लागून त्यांचें रूपांतर होतें.

प्र० ज्या अव्ययांस षष्ठ्यन्त सर्वनामाचे प्रत्यय लागतात त्यांस ते सारखे लागतात कीं काय ?

उ० नाहीं ; कित्येकांस एकवचनी नामाप्रमाणें व कित्येकांस बहुवचनी नामाप्रमाणें षष्ठ्यन्त सर्वनामांचे प्रत्यय लागतात.

क्रियाविशेषण अव्यय.

प्र० क्रियाविशेषण अव्यय ह्मणजे काय ?

उ० ज्या शब्दाकडून क्रियेच्या, विशेषणाच्या अथवा दुसऱ्या क्रियाविशेषणाच्या गुणाचा अथवा प्रकाराचा बोध होतो, तो शब्द क्रियाविशेषण अव्यय होय.

प्र० क्रियाविशेषणं अव्ययें कोणतीं ?

उ० פֹּה एथें, שָׁם तेथें, אַיֵּה कोठें, עַתָּה आतां, טֶרֶם पूर्वीं, אָז तेव्हां, עוֹד अणखी, מָתַי केव्हां, מַהֵר लवकर, עֵקֶב शेवटीं, כְּבַר पूर्वीं, הַרְבֵּה पुष्कळ, יוֹתֵר अधिक, מְעַט थोडें, מְאֹד, फार, כֹּה כָּכָה असें, לֹא नाहीं, אַל नको, בַּל בְּלִי בִּלְתִּי वांचून, אֶפֶס शिवाय, לְבַד एकटा, רַק मात्र, אַךְ निश्चयें, יַחַד एकत्र, אוּלַי कदाचित्, לָמָּה מַדּוּעַ कशासाठीं, כַּמָּה किती, אֵיךְ कसें, חִנָּם व्यर्थ, כֵּן तसें, אָכֵן, אָמְנָם, אוּלָם निश्चयें, इ०.

प्र० ज्या क्रियाविशेषण अव्ययांस षष्ठ्यन्त सर्वनामांचे प्रत्यय लागतात तीं कोणतीं ?

उ० אַיֵּה, אַיִן, בִּלְתִּי, לְבַד आणि עוֹד या क्रियाविशेषण अव्ययांस मात्र षष्ठ्यंत सर्वनामांचे प्रत्यय लागतात, उ० אַיָּם ते कोठें आहेत, אֵינֶנִּי मी नाहीं, בִּלְתֶּךָ तुजवांचून, לְבַדְּךָ तूं एकटाच, עוֹדָם ते करीत असतां, इ०.

शब्दयोगी अव्यय.

प्र० शब्दयोगी अव्यय ह्मणजे काय?

उ० ज्या शब्दाकडून स्थलाचा, कालाचा अथवा मानसिक संबंधाचा बोध होतो, त्यास शब्दयोगी अव्यय असें ह्मणतात.

प्र० शब्दयोगी अव्ययें कोणतीं?

उ० אַחַר नंतर, אֶל कडे किंवा कारणें, אֵצֶל जवळ, אֵת स किंवा ला, בִּגְלַל करितां, בֵּין मध्यें, בְּלִי בִּלְעַד בִּלְתִּי वांचून, זוּלַת शिवाय, לִפְנֵי पुढें, מִן पासून, מוּל נֹכַח נֶגֶד समोर, עַד पर्यंत, עִם बरोबर, תַּחַת खालीं, इ०.

प्र० कोण कोणत्या शब्दयोगी अव्ययास षष्ठ्यंत सर्वनामाचे प्रत्यय लागतात?

उ० בְּלִי, מוּל आणि נֹכַח यांवाचून दुसऱ्या सर्व शब्दयोगी अव्ययांस षष्ठ्यंत सर्वनामांचे प्रत्यय लागतात.

प्र० कोणतीं सहायकारी अक्षरें शब्दयोगी अव्ययांच्या उपसर्गाप्रमाणें उपयोगी पडतात?

उ० ב כ ל מ हीं चार अक्षरें शब्दयोगी अव्ययांच्या उपसर्गाप्रमाणें उपयोगी पडतात. ב ह्मणजे आंत, כ ह्मणजे सारिखे, ל ह्मणजे कारणें ला, आणि מ ह्मणजे पासून.

प्र० कोणतें सहायकारी अक्षर शब्दयोगी अव्ययाच्या प्रत्ययाप्रमाणें उपयोगी पडतें.

उ० ה ह्मणजे कडे किंवा आंत, उ० מִצְרַיְמָה मिसराकडे किंवा मिसरांत, याप्रमाणें व या अर्थानें लागणाऱ्या या ה अक्षरास स्थलवाचक ה असें ह्मणतात.

उभयान्वयी अव्यय.

प्र० उभयान्वयी अव्यय ह्मणजे काय?

उ० ज्या शब्दाकडून दोन शब्द अथवा दोन वाक्यें जोडलीं जातात त्यास उभयान्वयी अव्यय असें ह्मणतात.

प्र० उभयान्वयी अव्ययें कोणतीं?

उ० אֲבָל परंतु, אוֹ अथवा, אוּלָם तरी, אִלּוּ जरी, אִם जर, אֲשֶׁר कीं, בַּעֲבוּר कीं किंवा करितां, יַעַן कारण कीं, כִּי कारण कीं, כְּמוֹ जसें, לוּלֵא नाहीं तर, לָכֵן यास्तव, עֵקֶב कारण कीं, פֶּן नाहीं तर कदाचित्, इ०.

प्र० कोणतीं सहायकारी अक्षरें उभयान्वयी अव्ययांप्रमाणें उपयोगी पडतात?

उ० שׁ כ ו हीं तीन अक्षरें उभयान्वयी अव्ययांप्रमाणें उपयोगी पडतात; ו ह्मणजे आणि, כ ह्मणजे जसें, जेव्हां, שׁ ह्मणजे कीं.

केवलप्रयोगी अव्यय.

प्र० केवलप्रयोगी अव्यय ह्मणजे काय?

उ० ज्या शब्दाकडून मनाचे विकार अथवा उद्गार दर्शविले जातात त्यास केवलप्रयोगी अव्यय असें ह्मणतात.

प्र० केवलप्रयोगी अव्ययें कोणतीं ?

उ० אֲהָהּ, אוֹי, אוֹיָה, אַלְלַי, הוֹי अरेरे, हायहाय, חָלִילָה ईश्वर न करो, אָנָּא, נָא, בִּי मी विनंति करितों, הֵן, הִנֵּה, רְאֵה पाहा, הֶאָח अरेरे, לוּ, לוּא असें असतें तर बरें, הָבָה, לְכָה चल, ये, इ०.

सहायकारी अक्षरें.

प्र० सहायकारी अक्षरें कसीं उपयोगी पडतात ?

उ० सहायकारी अक्षरें धातूपासून नाम उत्पन्न करण्यास, आणि शब्दांचें लिंग, वचन, विभक्ति, पुरुष, अर्थ, काल, रूप, इत्यादि दर्शविण्याकरितां उपयोगी पडतात.

प्र० धातूपासून नाम उत्पन्न करण्यास जीं अक्षरें उपयोगी पडतात तीं कोणतीं ?

उ० ה א מ נ ת י ו.

प्र० भूतकाळीं लिंग, वचन आणि पुरुष दर्शविण्याकरितां जीं अक्षरें उपयोगी पडतात तीं कोणतीं ?

उ० ת ה י מ ו ן; हीं अक्षरें मात्र प्रत्ययाप्रमाणें लागतात.

प्र० भविष्यकाळीं लिंग, वचन आणि पुरुष दर्शविण्याकरितां जीं अक्षरें उपयोगी पडतात तीं कोणतीं ?

उ० א י ת ן; हीं अक्षरें उपसर्गाप्रमाणें लागतात; आणि ה נ ו י; हीं अक्षरें प्रत्ययांप्रमाणें लागतात.

प्र० आज्ञार्थीं लिंग आणि वचन दर्शविण्याकरितां जीं अक्षरें उपयोगी पडतात तीं कोणतीं ?

उ० י ו נ ה ; हीं मात्र प्रत्ययांप्रमाणें लागतात.

प्र० सहायकारी अक्षरांतील מ ש ה ו כ ל ב या प्रत्येक अक्षरांचे अर्थ, आणि तीं नाम, विशेषण व सर्वनाम यांस उपसर्गांप्रमाणें लागल्यास त्यांचे उपयोग कसे होतात ते सांग.

उ० מ ह्मणजे पासून, हून किंवा पेक्षां ; पंचमी विभक्ति आणि तुलना कोटी दर्शविणारें शब्दयोगी अव्यय ; या उपसर्गास बहुतकरून ◌ִ हा स्वर लागून त्यानंतर येणाऱ्या अक्षरांत द्वित्त दाघेश येतो ; परंतु कंठस्थानाचीं अक्षरें व ר यांमध्यें दाघेश येत नाहीं ह्मणून त्यांपुढें हा उपसर्ग लागल्यास त्यास ◌ֵ हा स्वर लागतो.

ש ह्मणजे जो, जी, जें, संबंधी सर्वनाम ; अथवा कीं, उभयान्वयी अव्यय ; या उपसर्गास बहुतकरून ◌ֶ हा स्वर लागतो.

ה ह्मणजे तो, ती, तें दर्शक सर्वनाम ; या उपसर्गास बहुतकरून ◌ַ हा स्वर लागून त्यानंतर येणाऱ्या अक्षरांत द्वित्त दाघेश येतो. परंतु ज्या अक्षरांत दाघेश येत नाहीं त्यांतील ה व ח या अक्षरापुढें हा उपसर्ग लागल्यासही त्यास ◌ַ हाच स्वर लागतो ; परंतु त्या ה व ח या अक्षरांस जर ◌ָ हा स्वर असला, तर या उपसर्गास ◌ֶ हा स्वर लागतो ; आणि א ע व ר या अक्षरांपुढें जर हा उपसर्ग लागला, तर त्यास ◌ָ हा स्वर लागतो.

ה म्हणजे काय; प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय; या उपसर्गास बहुतकरून ◌ֲ हा स्वर लागतो; आणि कंठस्थानाच्या अक्षरांपुढें व उच्चारित (◌ְ) शेवापुढें या उपसर्गास ◌ַ हा स्वर लागतो; परंतु त्या कंठस्थानांच्या अक्षरांस जर ◌ָ हा स्वर असला, तर या उपसर्गास ◌ֶ हा स्वर लागतो.

ו म्हणजे आणि, परंतु, जर, उभयान्वयी अव्यय; यांस बहुतकरून ◌ְ हा स्वर लागतो, परंतु ओष्ठस्थानाचीं अक्षरें व ◌ְ यांपुढें हा उपसर्ग וּ असा लागतो; जर ו या अक्षरास ◌ְ असला तर तो शेवा गाळला जाऊन त्यापुढें या उपसर्गास ◌ִ लागतो; एकपदी शब्दापुढें आणि हा उपसर्ग लागल्यास त्यास गाया हें अथवा दुसरें कोणतें आघाताचें चिन्ह लागत असल्यास या उपसर्गास ◌ָ हा स्वर लागतो. आणि काळांतर करणाऱ्या ו या उपसर्गास म्हणजे ו हा उपसर्ग लागल्यानें जेव्हां क्रियापदाचा काल पालटतो, तेव्हां भूतकाळीं लागणाऱ्या या उपसर्गास ◌ְ हा स्वर लागल्यानें भविष्यकाळ होतो; आणि भविष्यकाळीं लागणाऱ्या या उपसर्गास ◌ַ हा स्वर लागल्यानें भूतकाळ होतो.

כ म्हणजे प्रमाणें, शब्दयोगी अव्यय; या उपसर्गाचे स्वर ו या उपसर्गाच्या स्वरांप्रमाणें बदलतात.

ל म्हणजे कारणें, कडे, किंवा चा ची चें; चतुर्थी व षष्ठी विभक्ति दर्शविणारें शब्दयोगी अव्यय; या उपसर्गाचे स्वर ו या उपसर्गाच्या स्वरांप्रमाणें बदलतात.

ב म्हणजे आंत, वर, सहित, सप्तमी दर्शविणारें शब्दयोगी अव्यय; या उपसर्गाचे स्वर ו या उपसर्गाच्या स्वराप्रमाणें बदलतात.

धातुशोध.

प्र० इब्री शब्दांचा धातु कसा समजावा?

उ० इब्री शब्दांस उपसर्ग प्रत्यय इत्यादिकांप्रमाणें जीं सहायकारी अक्षरें लागतात तीं काढून टाकिलीं ह्मणजे धातु राहतो.

प्र० उपसर्ग प्रत्यय इत्यादिकांप्रमाणें लागणारीं सर्व सहायकारी अक्षरें काढून टाकिल्यावर किती अक्षरें राहतात?

उ० कधीं तीन, कधीं दोन, कधीं एकही अक्षर राहतें.

प्र० तीन अक्षरें राहिल्यास काय समजावें?

उ० तीन अक्षरें राहिल्यास तोच धातु असें समजावें, कारण इब्री शब्दांचा धातु तीन अक्षरांचा असतो; उ० אַזְכַּרְתָּה.

प्र० जेव्हां दोन अक्षरें राहतात, तेव्हां त्यांस तिसरें अक्षर लावण्याचे मुख्य नियम कोणते?

उ० १. जर राहिलेल्या दोन अक्षरांतील पहिल्यामध्यें दाघेश असला, तर त्यास पहिल्यानें נ हें अक्षर लावावें. उ० יִטֹּשׁ धातु נָטַשׁ, תִּגַּע धातु נָגַע इ०.

२. जर צב, צג, צע, צק, צר, व צת असीं दोन अक्षरें राहिलीं तर त्यापुढें י हें अक्षर लावावें. उ० מַצִּב धातु יָצַב, יַצִּג धातु יָצַג, הַצִּיעַ धातु יָצַע, אַצִּק धातु יָצַק, יִצְּרֵהוּ धातु יָצַר, וַתַּצֵּת धातु יָצַת इ०.

३. जर קח व עת असीं दोन अक्षरें राहिलीं, तर त्यास पहिल्यानें ל हें अक्षर लावावें. उ० בְּקַחְתּוֹ धातु לָקַח, הַתְעִי धातु לָתַע, इ०.

४. जर राहिलेल्या दोन अक्षरांतील दुसऱ्यामध्यें दाघेश असला, तर त्याच अक्षरासारखें आणखी एक अक्षर शेवटीं लावावें. उ० גַּלּוֹתִי धातु גָּלַל इ०.

५. जर राहिलेल्या दोन अक्षरांतील दुसऱ्यामागें י किंवा ו लागत असला, तर शेवटीं ה हें अक्षर लावावें; उ० עָלִיתָ धातु עָלָה, לַעֲשׂוֹת धातु עָשָׂה इ०.

६. जर राहिलेल्या दोन्ही अक्षरांत दाघेश नसला, आणि त्याच्या उपसर्गास ֵ י किंवा ו असे स्वर लागत असले, अथवा उपसर्गाच्या आणि राहिलेल्या अक्षरांतील पहिल्याच्या मध्यें ָ असें अक्षर असलें, तर पहिल्यानें י हें अक्षर लावावें ; उ० תֵּשֵׁב धातु יָשַׁב, מוֹרָשָׁה धातु יָרַשׁ, מוּסָר धातु יָסַר, הוֹדַע धातु יָדַע इ०.

७. जर राहिलेल्या दोन अक्षरांस वरील नियमांतून कोणताच नियम लागत नसला, तर त्या राहिलेल्या अक्षरांमध्यें ו हें अक्षर लावावें ; उ० אֲכוֹנְנָה धातु כּוּן इ०.

प्र० जर एकच अक्षर राहिलें तर काय करावें?

उ० १. तर पहिल्यानें נ आणि शेवटीं ה असीं अक्षरें लावावीं ; उ० תֵּרֵה धातु נָבָה इ०.

२. अथवा पहिल्यानें נ आणि शेवटींही ן असीं अक्षरें लावावीं ; परंतु असा एकच धातु आहे ; उ० לָתֵת धातु נָתַן.

आघाताचीं चिन्हें.

प्र० पवित्र शास्त्रांतील ग्रंथांत स्वरांच्या चिन्हां शिवाय जीं दुसरीं चिन्हें असतात तीं कशाचीं ?

उ० तीं आघाताचीं चिन्हें.

प्र० आघाताच्या चिन्हांचे मुख्य उपयोग कोणते ?

उ० आघाताच्या चिन्हांवरून अक्षरांचा व शब्दांचा स्पष्ट उच्चार करतां येतो; शब्दांचा व वाक्यांचा खरा अर्थ समजतो; आणि त्यांतील कांहीं चिन्हें विरामा करितां उपयोगी पडतात.

प्र० आघाताचीं चिन्हें किती आहेत व तीं कोणतीं ?

उ० आघाताचीं चिन्हें छत्तीस आहेत, तीं येणेप्रमाणें:—

שׁ֥	מַרְכָא	שׁ֗	רְבִיעַ	שׁ֮	זַרְקָא
שׁ֑	אַתְנָח	שׁ֤	שׁוֹפָר מְהוּפָּךְ	שׁ־	מַקַּף
שֿׁ	רָפֵה	שׁ֨	קַדְמָא	שׁ֣	שׁוֹפָר הוֹלֵךְ
שּׁ	דָּגֵשׁ	שׁ֨֨	תְּרֵי קַדְמִין	שׁ֒	סְגוֹלְתָא
שׁ֚	יְתִיב	שׁ֔	זָקֵף קָטוֹן	שׁ֡	פָּזֵר גָּדוֹל
שׁ֙	תַּרְצָא	שׁ֕	זָקֵף גָּדוֹל	שׁ֪	יָרֵחַ בֶּן יוֹמוֹ
שׁ֩	שְׁבוֹלֶת	שׁ֓	שַׁלְשֶׁלֶת	שׁ֟	קַרְנֵי פָרָה
שׁ֫	שְׁבוֹלֶת	שׁ֞	שְׁנֵי גְרִישִׁין	שֽׁ	גַּעְיָא
הּ	מַפִּיק בְּהֵא	שׁ֦	תְּרֵי טַעֲמֵי	שׁ֠	תְּלִשָׁא
שְׁ	שְׁוָא גַּעְיָא	שׁ֧	דַּרְגָּא	שׁ֜	אַזְלָא
שְׁ	גַּעְיָא שְׁוָא	שׁ֛	תְּבִיר	שׁ֜	גֵּרֵשׁ
שׁ׃	סוֹף פָּסוּק	שׁ֥	מַאֲרִיךְ	שׁ׀	פָּסֵק

प्र० यांतून अक्षरांच्या व शब्दांच्या स्पष्ट उच्चाराकरितां जीं चिन्हें उपयोगी पडतात तीं कोणतीं?

उ० १. מַקֵּף हें चिन्ह दोन शब्दांमध्यें जोडलें जातें व ते दोन शब्द एकदाच उच्चारिले जातात; उ० בֶּן־דָּוִד बेनदाविद.

२. גַּעְיָא हें चिन्ह ज्या अक्षराखालीं जोडलें जातें, त्या अक्षराचा उच्चार लांबविला जातो; उ० אָֽמְרוּ आ-मरू.

३. רָפֶה हें चिन्ह ज्या अक्षरावर असतें, त्यांत नियमाप्रमाणें दाघेश किंवा मप्पीक हें असावें तें नाहीं, ह्मणून दाघेश किंवा मप्पीक नसतां जसा उच्चार होतो, तसा त्या अक्षराचा उच्चार केला जातो; उ० מִקְנֵה मिकसे, וַיִּמַה वइमाह לָה ला. इ०.

४. דָּגֵשׁ हें चिन्ह लघु असल्यास त्याकडून ב ג ד כ פ ת या अक्षरांचा काहींसा भ ग ध ख फ थ असा होणारा उच्चार पालटून ब ग द क प त असा होतो. उ० כֶּסֶף केसेफ इ० परंतु तें द्वित्त असल्यास, ज्या अक्षरांत तें असतें, त्या अक्षराचा उच्चार दुप्पट होतो. उ० הַכֶּסֶף हाकेसेफ, इ०.

५. שִׁבֹּלֶת ह्मणजे शीन या अक्षराच्या उजवेकडे टिंब असलें, ह्मणजे त्याचा उच्चार श या अक्षरा सारिखा होतो. उ० שָׁם शाम, इ०.

६. שִׂבֹּלֶת ह्मणजे शीन या अक्षराच्या डावेकडे टिंब असलें, ह्मणजे त्याचा उच्चार स या अक्षरासारिखा होतो. उ० שָׂם साम, इ०.

७. מַפִּיק בְּהֵא ह्मणजे शब्दाच्या शेवटीं येणाऱ्या ה या अक्षरांत टिंब असलें ह्मणजे तें अक्षर अनुच्चारित नसतें, परंतु त्याचा उच्चार केला जातो. उ० לְמִינָהּ लमीनाह, इ०.

प्र० यांशिवाय जीं दुसरीं आघाताचीं चिन्हें आहेत, त्यांच्या किती जाती आहेत ?

उ० संयोजक आणि वियोजक अशा दोन जाती आहेत.

प्र० आघाताचीं संयोजक चिन्हें कोणतीं व वियोजक चिन्हें कोणतीं ?

उ० पुढल्या शब्दासीं असणारा संबंध दाखविण्या करितां जीं चिन्हें लागतात तीं संयोजक, असीं चिन्हें दाहा आहेत; तीं येणेप्रमाणें:-

זַרְקָא, שׁוֹפָר הוֹלֵךְ, יֶרַח בֶּן־יוֹמוֹ, תַּלְשָׁה, אַזְלָא, שׁוֹפָר מְהוּפָּךְ, קַדְמָא, תְּרֵי טַעְמֵי, דַּרְגָּא आणि מַאֲרִיךְ.

या दाहा आणि अक्षरांच्या व शब्दाच्या स्पष्ट उच्चाराकरितां लागणाऱ्या सात, अशा सतरा चिन्हां शिवाय जीं एकुणीस चिन्हें आहेत, तीं वियोजक ह्मणजे जेथें संबंध तुटतो तेथें लागणारीं असें जाणावें.

प्र० हीं चिन्हें विशेषेंकरून कोठें जोडलीं जातात ?

उ० हीं चिन्हें विशेषेंकरून शब्दाच्या अंत्यपदास किंवा उपांत्यपदास जोडलीं जातात.

प्र० अंत्यपदास जेव्हां हें चिन्ह लागतें, तेव्हां त्या शब्दास काय ह्मणतात ?

उ० त्यास מִלְּרַע मिल्लेरा असें ह्मणतात.

प्र० उपांत्यपदास जेव्हां हें चिन्ह लागतें, तेव्हां त्या शब्दास काय ह्मणतात ?

उ० त्यास מִלְּעֵיל मिल्लेएल असें ह्मणतात.

प्र० याप्रमाणें या चिन्हाचें स्थान पालटल्यानें शब्दांच्या अर्थांत कांहीं फेरफार होतो कीं काय ?

उ० होय; कधीं कधीं त्या शब्दाचा अर्थ अगदींच पालटतो. उ० בָּנוּ हा शब्द मिलेएल असल्यास त्याचा अर्थ "आह्मांमध्यें" असा होतो, परंतु तोच शब्द בָּנוּ मिलेरा असल्यास त्याचा अर्थ "आह्मी बांधिलें" असा होतो. असीं उदाहरणें अनेक आहेत.

प्र० हीं चिन्हें लागल्यानें शब्दाच्या स्वरांत कांहीं फेरफार होतो कीं काय ?

उ० होय; हीं चिन्हें लागल्यानें शब्दाच्या स्वरांत अनेक फेरफार होतात. उ० ज्या शब्दानंतर मकाफ लागतो, त्या शब्दाच्या शेवटले पदास लागणारा दीर्घ स्वर पालटून ऱ्हस्व स्वर होतो; जेथें आथना किंवा सोफ पासूक लागतो, तेथें लागणारा ऱ्हस्व स्वर पालटून दीर्घ होतो, इ०.

प्र० कोणत्या ठिकाणीं आघाताचें चिन्ह लागत नाहीं ?

उ० ज्या अक्षरास ְ शेवा हा स्वर, किंवा शेवाच्या ठिकाणीं लागणाऱ्या संधि स्वरांतून एकादा स्वर असतो, त्या अक्षरास आघाताचें चिन्ह लागत नाहीं.

प्र० एका शब्दास आघाताचीं दोन चिन्हें लागतात कीं काय ?

उ० होय; ज्या शब्दामध्यें दोन पदांपेक्षां अधिक पदें असतात, त्या शब्दास कधीं कधीं आघाताचीं दोन चिन्हेंही लागतात.

प्र० या चिन्हांचें स्थान विशेषें करून केव्हां पालटतें ?

उ० १. बहुतेक अनुच्चारिताक्षरी क्रियापदांत भविष्यकाळीं कालांतर करणारा ו लागला, ह्मणजे जो शब्द मिलेरा असतो, तो मिलेएल होतो.

२. भूतकाळीं प्रथम पुरुषांतील व द्वितीय पुरुषांतील शब्द जर मिलेएल असला तर तो मिलेरा होतो.

३. जर एक शब्द मिलेरा असून त्यानंतर येणारा शब्द मिलेएल असला, तर पहिला शब्द मिलेएल होतो.

प्र० या तिसऱ्या नियमास कांहीं अपवाद आहेत कीं काय?

उ० होय;

१. जर पहिल्या शब्दास वियोजक चिन्ह लागत असेलः—

२. जर त्या शब्दापुढें मक्काफ हें चिन्ह लागत असेलः—

३. जरी त्या शब्दास संयोजक चिन्ह लागत असेल, परंतु दुसऱ्या शब्दास कदमा हें चिन्ह लागत असेलः—

४. ज्या अक्षरास हें चिन्ह लागून त्यांत दागेश येत असेलः—

५. ज्या अक्षरास हें चिन्ह लागणार त्यापुढें ׃ शेवा हा स्वर असेलः—

६. जर शेवटलें अक्षर उच्चारित असून, त्यापुढील अक्षरास दीर्घ स्वर असेलः—

७. जर त्या शब्दाच्या शेवटीं הֶן, הֶם, כֶן, כֶם, תֶן, תֶם असीं पदें असलीं:—

तर पहिला शब्द मिलेराच राहतो.

प्र० जीं विरामा करितां उपयोगी पडतात तीं चिन्हें किती व कोणतीं?

उ० तीं चार आहेत; רְבִיעַ हें अल्पविराम, זָקֵף קָטֹן हें अर्धविराम, אַתְנָח हें अपूर्ण विराम, आणि סוֹף פָּסוּק हें पूर्णविराम जाणावें.

पुरवणी.

अनियमित नामें.

किल्येक नामांस मागें सांगितलेलें लिंग आणि वचन यांचे नियम लागत नाहींत; ह्मणून कांहीं नामांचें लिंग त्यांस लागणारें विशेषण सर्वनाम व क्रियापद यांकडून समजतें, कारण नामाचेंच लिंग वचन त्याच्या विशेषणास, सर्वनामांस व क्रियापदास लागतें.

किल्येक नामें कधीं पुल्लिंगीं व कधीं स्त्रीलिंगीं असतात. उ० אֶרֶץ भूमि, אֵשׁ अग्नि, גֶּדֶר कुपण, דֶּרֶךְ मार्ग, חָצֵר चौक, נֶפֶשׁ जाव, רוּחַ आत्मा, תְּהוֹם डोहो, שֶׁמֶשׁ सूर्य, इ०.

किल्येक नामांचे पुल्लिंगी व स्त्रीलिंगी शब्द निरनिराळे असतात; उ० אָב बाप, אֵם आई, חָתָן नवरा, כַּלָּה नवरी, בָּחוּר कुमार, בְּתוּלָה कुमारी, אָדוֹן धनी, גְּבִירָה किंवा גְּבֶרֶת धनीन, עֶבֶד दास, אָמָה किंवा שִׁפְחָה दासी, חֲמוֹר गाढव, אָתוֹן गाढवी, שׁוֹר गोऱ्हा, פָּרָה पारडी, אַיִל मेंढा, רָחֵל मेंढी, इ०.

खनिज पदार्थांच्या व प्रवाही ह्मणजे पाण्यासारिख्या पदार्थांच्या नामास बहुवचन नसतें: उ० כֶּסֶף रुपें, זָהָב सोनें, בַּרְזֶל लोखंड, בְּדִיל कथील, נְחוֹשֶׁת तांबें, עֹפֶרֶת शिसें, גָּפְרִית गंधक, מֶלַח मीठ, יַיִן द्राक्षरस, תִּירוֹשׁ नवा द्राक्षरस, יִצְהָר तेल, דְּבַשׁ मध, इ०.

किल्येक नामें द्विवचनांतच असतात. उ० שָׁמַיִם आकाश, צָהֳרַיִם दुपार, מָתְנַיִם कमर, חָפְנַיִם पसा, מֹאזְנַיִם तागडी, इ०.

कित्येक बहुवचनांतच असतात; उ० נְעוּרִים पोरपण, עֲלוּמִים तरुणपण, בְּתוּלִים कुवारपण, זְקֻנִים म्हातारपण, חַיִּים जीवन, इ०.

कित्येक पुल्लिंगी नामाचें बहुवचन स्त्रीलिंगी नामाप्रमाणें होतें. उ० אָב बाप אָבוֹת, בּוֹר खांच בּוֹרוֹת, גַּג गच्ची גַּגּוֹת, נֵר दीवा נֵרוֹת, עוֹר कातडें עוֹרוֹת, קוֹל वाणी קוֹלוֹת, שֵׁם नाम שְׁמוֹת, इ०.

कित्येक स्त्रीलिंगी नामाचें बहुवचन पुल्लिंगी नामाप्रमाणें होतें. उ० יוֹנָה पारवा יוֹנִים, לְבֵנָה ईंट לְבֵנִים, מִלָּה शब्द מִלִּים, נְמָלָה मुंगी נְמָלִים, שִׁבֹּלֶת कणीस שִׁבֳּלִים, תְּאֵנָה अंजीर תְּאֵנִים, इ०.

कित्येक पुल्लिंगी नामाचें बहुवचन पुल्लिंगाप्रमाणें व स्त्रीलिंगाप्रमाणेंही होतें. उ० מַעְיָן झरा מַעְיָנִים מַעְיָנוֹת, כִּיּוֹר गंगाळ כִּיּוֹרִים כִּיּוֹרוֹת, מִבְצָר किल्ला מִבְצָרִים מִבְצָרוֹת, इ०.

आणि कित्येक स्त्रीलिंगी नामांचें बहुवचन पुल्लिंगाप्रमाणें व स्त्रीलिंगाप्रमाणेंही होतें. उ० אֲשֵׁרָה उपवन אֲשֵׁרִים אֲשֵׁרוֹת, אֲלֻמָּה पेंढी אֲלֻמִּים אֲלֻמּוֹת, इ०.

पूर्ण क्रियापदाच्या रूपावलीचा अर्थ.

काल रूप.

स्वार्थाचा भूतकाळ.—तो शिकला, ती शिकली, तूं शिकलास, तूं शिकलीस, मी शिकलों किंवा शिकलें. ते शिकले किंवा त्या शिकल्या, तुह्मी शिकलां, तुह्मी शिकलां, आह्मी शिकलों.

सामान्यार्थ.—शिकणें, शिकणें.

आज्ञार्थ.—तूं शीक, तूं शीक, तुह्मी शिका. तुह्मी शिका.

स्वार्थाचा भविष्यकाळ.—तो शिकेल, ती शिकेल, तूं शिकशील, तूं शिकशील, मी शिकेन, ते शिकतील, त्या शिकतील, तुह्मीं शिकाल, तुह्मी शिकाल, आह्मी शिकूं.

कृदंतें.—शिकणारा, शिकलेला.

निफआल रूप.

स्वार्थाचा भूतकाळ.—तो शिकला गेला, ती शिकली गेली, तूं शिकला गेलास, तूं शिकली गेलीस, मी शिकला गेलों किंवा शिकली गेलें, ते शिकले गेले किंवा त्या शिकल्या गेल्या, तुह्मी शिकलां गेलां, तुह्मी शिकलां गेलां, आह्मीं शिकलों गेलों किंवा शिकल्या गेलों.

सामान्यार्थ.—शिकला जाणें.

आज्ञार्थ.—तूं शिकला जा, तूं शिकली जा, तुह्मीं शिकले जा, तुह्मीं शिकल्या जा.

स्वार्थाचा भविष्यकाळ.—तो शिकला जाईल, ती शिकली जाईल, तूं शिकला जाशील, तूं शिकली जाशील, मी शिकला किंवा शिकली जाईन, ते शिकले जातील, त्या शिकल्या जातील, तुह्मीं शिकले जाल, तुह्मीं शिकल्या जाल, आह्मीं शिकले किंवा शिकल्या जावूं.

कृदंत—शिकला जाणारा.

पिएल रूप.

स्वार्थाचा भूतकाळ.—त्यानें शिकविलें, तिनें शिकविलें, तूं शिकविलेंस, तूं शिकविलेंस, मी शिकविलें, त्यांनीं शिकविलें, तुह्मीं शिकविलें, तुह्मीं शिकविलें, आह्मीं शिकविलें.

सामान्यार्थ.—शिकविणें.

आज्ञार्थ.—तूं शिकीव, तूं शिकीव, तुह्मी शिकवा, तुह्मी शिकवा.

स्वार्थाचा भविष्यकाळ.—तो शिकवील, ती शिकवील, तूं शिकवशील, तूं शिकवशील, मी शिकवीन, ते शिकवतील, त्या शिकवतील, तुह्मी शिकवाल, तुह्मी शिकवाल, आह्मीं शिकवूं.

कृदंत.—शिकवणारा.

पुआल रूप.

स्वार्थाचा भूतकाळ.—तो शिकविला गेला, ती शिकविली गेली, तूं शिकविला गेलास, तूं शिकविली गेलीस, मी शिकविला गेलों किंवा शिकविली गेलें, ते शिकविले गेले किंवा त्या शिकविल्या गेल्या, तुह्मीं शिकविले गेलां, तुह्मीं शिकविल्या गेलां, आह्मीं शिकविले किंवा शिकविल्या गेलों.

सामान्यार्थ.—शिकविला जाणें.

स्वार्थाचा भविष्यकाळ.—तो शिकविला जाईल, ती शिकविली जाईल, तूं शिकविला जाशील, तूं शिकविली जाशील, मी शिकविला किंवा शिकविली जाईन, ते शिकविले जातील, त्या शिकविल्या जातील, तुह्मीं शिकविले जाल, तुह्मीं शिकविल्या जाल, आह्मीं शिकविले किंवा शिकविल्या जाऊं.

कृदंत.—शिकविला जाणारा.

हिफईल रूप.

स्वार्थाचा भूतकाळ.—(दुसऱ्याकडून) त्यानें शिकविलें, तिनें शिकविलें, तूं शिकविलेंस, तूं शिकविलेंस, मी शिकविलें, त्यांनीं शिकविलें, तुह्मीं शिकविलें, तुह्मीं शिकविलें, आह्मी शिकविलें.

सामान्यार्थ (दुसऱ्या कडून).—शिकविणें.

आज्ञार्थ (दुसऱ्या कडून).—तूं शिकीव, तूं शिकीव, तुह्मी शिकवा, तुह्मी शिकवा.

स्वार्थाचा भविष्य काळ (दुसऱ्या कडून).—तो शिकवील, ती शिकवील, तूं शिकविशील, तूं शिकविशील, मी शिकवीन, ते शिकवितील, त्या शिकवितील, तुह्मी शिकवाल, तुह्मी शिकवाल, आह्मी शिकवूं.

कृदन्त.—(दुसऱ्या कडून) शिकविणारा.

होफआल रूप.

स्वार्थाचा भूतकाळ (दुसऱ्या कडून).—तो शिकविला गेला, ती शिकविली गेली, तूं शिकविला गेलास, तूं शिकविली गेलीस, मी शिकविला गेलों किंवा शिकविली गेलें, ते शिकविले गेले किंवा त्या शिकविल्या गेल्या, तुह्मी शिकविलां गेलां, तुह्मी शिकविल्या गेल्यात, आह्मी शिकविले किंवा शिकविल्या गेलों.

सामान्यार्थ (दुसऱ्या कडून.)—शिकविला जाणें.

स्वार्थाचा भविष्यकाळ (दुसऱ्या कडून).—तो शिकविला जाईल, ती शिकविली जाईल, तूं शिकविला जाशील, तूं शिकविली जाशील, मी शिकविला किंवा शिकविली जाईन, ते शिकविले जातील, त्या शिकवल्या जातील, तुह्मी शिकविले जाल, तुह्मी शिकविल्या जाल, आह्मी शिकविले किंवा शिकविल्या जावूं.

कृदंत (दुसऱ्या कडून).—शिकविला जाणारा.

हिथपाएल रूप.

या रूपाचा अर्थ बहुतकरून कालरूपाप्रमाणें किंवा पिएल रूपाप्रमाणें होतो; परंतु सर्व अर्थी व काळीं आणि कृदंतांत स्वतां हा शब्द लागतो. उ० तो स्वतां शिकला, स्वतांस शिकविणें, तूं स्वतांस शिकीव, तो स्वतांस शिकवील, स्वतांस शिकविणारा, इ०.

पुढें עָמַד तो उभा राहिला, זָעַק तो ओरडला, בֵּרַךְ यानें आशीर्वाद दिल्हा, שָׁכַח तो विसरला, נָגַשׁ तो जवळ आला, אָכַל यानें खाल्लें, יָלַד यानें जन्मविलें, קוּם उठणें, בִּין समजणें, מָצָא याला सांपडलें, גָּלָה यानें उघडें केलें, किंवा धरून नेलें, סָבַב यानें घेरिलें, נָשָׂא यानें उचललें, נָטָה यानें ताणिलें, נָתַן यानें दिल्हें, יָרֵא तो भ्याला, יָרָה यानें टाकलें, יָצָא तो निघाला, בּוֹא येणें, या क्रियापदांच्या ज्या संक्षिप्त रूपावल्या दिल्ह्या आहेत, यांचा अर्थ मागील पूर्ण क्रियापदाच्या रूपावलीच्या अर्थावरून सहज करतां येईल.

תם ונשלם שבח לאל בורא עולם :

पृथ्वी उत्पन्नकर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

वर्गणीदारांचीं नांवें.

मुंबई.

नांवें.	प्रति.
अ. शेमूएल इसहाक पिंगले. हेड आकौ.	२
,, सीलेमान सदकीएलजी भास्लेकर ...	१
,, शेलोमो येलोजी खानावकर	१
,, दावीद रऊबेनजी चरीकर	१
,, आहारोन शेमूएल नौगांवकर	१
,, आहारोन आब्राहाम मजगांवकर ...	१
,, रेऊबेन आब्राहामजी कोरलेकर व मुलगे	२
इस्राएली धर्मसंरक्षक मंडळीचें पुस्तकालय	१
अ. येहूदा येलीयाहू नवगांवकर.........	१
,, योसेफ दानीएल कोलेंकर. दाक्तर.	१
,, शालोम शेमूएलजी नौगांवकर. द्राम्स.	२
,, शेमूएल येहजकेल पेझारकर. द्राम्स.	२
,, इसहाक आहारोनजी भास्तेकर ...	१
,, आब्राहाम सकोबा पेणकर. चो. ...	२
,, बिनयामीन आब्राहाम तेलुलकर ...	१
,, याकोब शेलोमो दीघोरकर.........	१
,, येलोजी आहारोनजी पेणकर. सु.	१
,, याकोब फकीरजी शापुरकर	१
,, सीलेमान आबाजी चरीकर. नाईक.	१
,, बाळाजी पिठाजी भोरपकर.........	१
,, शेमूएल रेऊबेनजी चरीकर. सर्वेर.	१
,, शालोम सीलेमानजी कुरुलकर ...	१

नांवें.	प्रति.
अ. आब्राहाम दानीएलजी नौगांवकर...	१
,, शालोम दावीदजी तलकर	१
,, इसहाक योसेफजी नौगांवकर	१
,, येलीएझेर रेऊबेनजी गडकर	१
,, येहेजकेल बिनयामीनजी पेणकर. मेस्त्री. चो.	१
,, रेऊबेन सीलेमानजी नागांवकर मे.	१
,, हाईम आबाजी मळेकर............	१
,, दानिएल येहेजकेल सातामकर ...	१
,, शेमूएल मोशे किह्लेकर. चो.	१
,, आहारोन शेमूएल किह्लेकर	१
,, दावीद दानिएल नौगांवकर..........	[illegible]
,, येलीया शेमूएल तलकर	१
,, अब्राहाम याकोब तळेगांवकर. मे.	१
,, इसहाक आब्राहाम तळेगांवकर ...	१
,, याकोब शेमूएल ब्रिरकोलकर......	१
,, याकोब येलीया पिंगले............	१
,, मोशे येलीया राजपुरकर	१
,, दावीद शेलोमो बोरघरकर. चो....	१
,, आहारोन रेऊबेन थलकर	१
रा. हरीचंद्र भाऊ भाटकर	१
अ. शेमूएल येलीया वरोलकर. गव्बाय.	२
,, शेमूएल. उ. याफेत रेऊबेन पुगांवकर.	२
रा. लक्ष्मण गोपाळ कल्याणपूरकर....	१

नांवें.	प्रति.
अ. सदकीएल सीलेमान नागांवकर ...	१
,, आब्राहाम दानीएलजी सातामकर. मे.	१
,, दानीएल आब्राहाम सातामकर ...	१
,, शेमूएल हाईमजी फणसापुरकर...	१
,, शेलोमो मोशे झीराटकर. काजी...	१
,, आहारोन आब्राहाम केहीमकर....	१
,, आहारोन शालोमजी दीघोरकर...	१
,, दावीद आहारोनजी गडकर. चो. ...	१
,, रेऊबेन बिनयामीनजी पेणकर....	२
,, हाईम रेऊबेनजी पेणकर.........	१
,, दावीदहाय रेऊबेनजी पेणकर......	१
,, शेमूएल हाईमजी पेझारकर......	१
,, रेऊबेन बापूजी मळेकर. सु.	१
,, योसेफ शेमूएल केहीमकर. चो....	२
,, रेऊबेन शेमुएल केहीमकर.........	१
,, शालोम शेमूएल केहीमकर. पंतोजी.	१
,, दानीएल दावीद उमर्डेकर. डे.पो.मा.	१
,, मेनश्शे दानीएल उमर्डेकर	१
,, येहेजकेल शेमूएल आवासकर......	१
,, योसेफ याकोब तळकर.....	१
,, बिनयामीन शालोम गडकर	१
,, मोशे शेलोमो झीराटकर. काजी...	१
,, आहारोन याकोब दिवेकर	१

ठाणें.

अ. रेऊबेन धोंडजी आष्टमकर. सु. मे. स. बा.	१
,, शेमूएल इसहाकजी जावलीकर. सु. मे. स. बा	१

नांवें.	प्रति.
अ. मुसाजी दानीएलजी कोलेटकर. सु. मे. स. बा.	१
,, दावीद दानियल पेणकर. सु.	१
,, शिमशोन आब्राहामजी तलकर. सर्वेर	१
,, ए. डी. रेऊबेन आवासकर.........	१
,, रेऊबेन शालोम पेणकर. दा.......	१
,, योएल शेमूएल शिरकोलकर	१
,, शेलोमो आब्राहाम मजगांवकर. हा.	१
,, शालोम येहेजकेल बेलकर पंतोजी	१
,, के. एस. शेमूएल..................	१

पनवेल.

अ. आब्राहाम दावीदजी चरीकर. हे.	१
,, शेमूएल सीलेमानजी नौगांवकर...	१
,, इसहाक शेमूएलजी नौगांवकर......	१
,, शेमूएल शालोमजी चीचोलकर गब्बाय	१
,, आब्राहाम येहेजकेलजी दीवेकर. क. सु.	१
,, आब्राहाम दावीदजी भास्तेकर......	१
,, शुकूर इसहाकजी नौगांवकर. जमा.	१
,, इसहाक सीलेमानजी दीवेकर. क.	१
,, शेमूएल आब्राहामजी तरणखोपकर. पंतोजी	१
,, आहारोन शिमशोन आष्टमकर. हा. आ. इन. चार्ज दवाखाना पनवेल.	१
,, मुसाजी सलिमानजी नागावकर. मे.	१
,, शिमशोन रेऊबेनजी भास्तेकर...	१
,, योसेफ आहारोनजी खुलाबकर....	१
,, येलीएझेर सीलेमानजी तलकर...	१

नांवें.	प्रति.
चिरनेर.	
अ. दानीएल मुसाजी फणसापुरकर ...	१
वरसोली.	
अ. दावीद येलोजी शापुरकर...	१
आलीबाग.	
अ. शालोम सीलेमानजी पेझारकर. दा.	१
रेवदंडा.	
अ. शेमूएल योसेफ राजपूरकर. हा. पं.	१
रा. केशव गणेश फडनीस...........	१
अ. हाईम बिनयामीन दांडेकर.........	१
,, योसेफ येलीया शापूरकर.........	१
,, इसहाक सीलेमानजी आष्टमकर...	१
,, आब्राहाम शेमूएल राजपुरकर......	१
आंबेपूर.	
अ. शेलोमो शालोम झीराटकर काजी...	१
पुणें.	
अ. दानीएल राहामीम तलकर.सु.मे.बा.	१
,, आहारोन दानीएलजी तलकर......	१
,, येलीएझेर दानीएलजी तलकर......	१
,, रेऊबेन दानीएलजी तलकर......	१
,, शेमूएल आहारोनजी तलकर......	१
,, शालोम बाळाजी तलकर. सु.......	१
,, हाईम शेमूएलजी पेझारकर. सु....	१
,, शिमओन शेमूएलजी चरीकर......	१
,, येलोजी दावीदजी चरीकर. हा......	१
,, राहामीम हाईमजी मलेकर.........	१
,, येहेजकेल मोशे नागांवकर. दा....	१
,, मीखाएल येहेजकेल नागांवकर...	१
,, शाऊल येहेजकेल नागांवकर......	१

नांवें.	प्रति.
अ. मेनश्शे येहेजकेल नागांवकर......	१
,, रतनबाईबाथ येहेजकेल मोशे नागां.	१
,, मोशे बिनयामीन.................	१
,, सादीक बिनयामीन कांदलेकर. दा.	१
,, येलीएझेर दानीएलजी कोलेटकर...	१
,, योसेफ शेलोमो झीराटकर.........	१
,, येलीया शालोम वालवटकर.........	१
,, शेमूएल मोशे आष्टमकर. सु.	१
,, मेनाहेम इसहाक राजपूरकर. काजी.	१
,, आब्राहाम दावीदजी सायगांवकर.दा.	१
,, दानीएल आब्राहाम..............	१
रा. मनाजी मैराल कडू..............	१
अ. आहारोन इसहाक आष्टमकर......	१
,, जे. आब्राहाम....................	१
,, मोशे येहेजकेल सानकर...........	१
अहमदनगर.	
अ. बापूजी आब्राहामजी वरघरकर. सु.	२
,, रोबेन आब्राहामजी किल्लेकर इन्स्पे.	१
,, शालोम बापूजी वरघरकर. चिटणीस	१
भोसावल.	
अ. दावीदजी सीलेमानुजी बेलकर......	१
सुरत.	
अ. येहुदा रेऊबेन नौगांवकर	१
अहमदाबाद.	
अ. आब्राहाम बिनयामीनजी येरूलकर दा.	४
,, शेलोमो येलीया वाकूलकर. सु. मे. स. बा.	४
,, आब्राहाम बिनयामीन शिरगांवकर.सु.	४
,, हाईम शेमूएल झीराटकर काजी...	१

नांवें.	प्रति.
अ. येहेजकेल बिनयामीन कांदलेकर. गार्ड	२
,, शेलोमो येहेजकेल सायगांवकर. ने. मे. प्यू.	१
,, आब्राहाम शेमूएल झीराटकर. ने. मे. प्यू.	१
,, आहारोन बिनयामीन येरूलकर...	१
,, येलीया शेमूएलजी ढोकरकर......	१
,, बिनयामीन शेमूएलजी तलकर....	१
,, येहेजकेल शालोमजी पेणकर......	१
,, येलीया शेलोमो चेऊलकर.........	१
,, आहारोन शालोम आवासकर......	१
,, योसेफ शेलोमो दांडेकर. दा.	१
,, योसेफ शिमशोन सानकर. फ. क्ला. आ. आपोथीक्यारी........	१
,, मेनश्शे योसेफ सानकर	१
,, शेमूएल योसेफ दांडेकर............	१
,, दावीद योसेफ दांडेकर............	१
,, बिनयामीन शेलोमो दांडेकर......	१
,, राहामीम शालोम..................	१

ढोलका.

अ. मोर्देखाय शालोमजी. दा............	१

बोरसाद.

अ. शेमूएल शेलोमो	१

रोहरी.

अ. मोशे शेलोमो झेडेकर गार्ड	१

कराची.

अ. शालोम दावीदजी उमर्डेकर. सर्वेर.	१
गेरशोन शालोम उमर्डेकर	१

नांवें.	प्रति.
अ. बिनयामीन आब्राहाम चरीकर ...	१
,, येलीयाहू शिमशोनजी मजगांवकर.	१
,, येलीयाहू आहारोन नागोठनेकर ...	१
,, शेमूएल शिमशोन	१
,, जे. रेऊबेन........................	१
,, आहारोन दानीएलजी कांबरलेकर.	१
,, रेऊबेन मोशे सातांमकर	१
,, आर. शेमूएल. स्टे. मास्तर	१
,, बी. दानीएल	१
,, रेऊबेन इसहाक केहीमकर	१

थारूशा.

अ. मोशे येलीया पेणकर. दा.	१

रेजिमेन्ट ३ रें.

अ. हाईम शेमूएलजी चरीकर. सु.......	१
,, इसहाक सदकीएलजी वरोलकर. सु.	१
,, सोलेमान सदकीएलजी वरोलकर. क्वा. मा. हा.	१

रेजिमेन्ट ५ वें.

अ. शिमओन रेऊबेनजी उमर्डेकर ...	१
,, येलीयाहू येहेजकेल इंदापूरकर ...	१

रेजिमेन्ट ८ वें.

अ. शेलोमो दानीयल कोर्लेकर. सु. ...	२

रेजिमेन्ट १० वें.

अ. शालोम मोशे नागांवकर. सु.	१
,, शालोम याकोबजी खरीलकर. ज.	१
,, शेमूएल याकोबजी खरीलकर. ज.	१
,, येहेजकेल शिमशोनजी किह्लेकर. दा.	१
,, येहेजकेल याकोबजी मेंद्रीकर. ना.	१

नांवें.	प्रति.
रेजिमेन्ट. १२ वें.	
अ. मोशे बापुजी मलेकर. सु. मे. स. बा.	१
,, सीलेमान सदकीएलजी कोकबनकर सु.	१
,, जखरीएलचो कांदलेकर. सु.	१
,, बनाजी सीलेमानजी भास्तेकर. सु.	१
,, शेमूएलजी भास्तेकर. द्री. हा.......	१
,, रेऊबेनजी भास्तेकर. क. हा......	१
,, आब्राहामजी थलकर. हा	१
,, येहूदा याकोबजी कासूकर. हा. ...	१
,, येलीयाहू याकोबजी कासूकर. ना.	१
,, याकोबजी भाऊजी तलकर. चौधरी.	१
,, राहारीम आब्राहाम शापूरकर. ला.ना.	१
,, दानीएल बंधूजी दीघोरकर........	१
अ. रेऊबेन येहेजकेलजी मळेकर	१
,, सीलेमान मुसाजी वोरघरकर. हाज्जान.	१
रेजिमेन्ट. १७ वें,	
अ. इसहाक मोशे कोलेटकर ना.	१
,, शेलोमो मोशे कोलेटकर. ना.	१
रेजिमेन्ट. १९ वें.	
अ. शेमूएल दानीएलजी दीवेकर. ना....	१
रेजिमेन्ट २४ वें.	
अ. योसेफ शिमशोनजी किल्लेकर. सु. मे. बा.	२
स्यापर्स आन्ड मैनर्स.	
अ. मोशे बिनयमीन..................	१

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
३४.	४.	शिकवविलें	शिकविलें
३४.	८.	शिकवविला	शिकविला
३९.	१३.	आज्ञारूपास	आज्ञार्थास
३९.	१९.	आज्ञारूपास	आज्ञार्थास

BOMBAY : PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA.

या कर्त्यानें केलेल्या ग्रंथांचीं नांवें.

	रु.	आ.	पै.
१. प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबूल होणें.	०	१	३
२. पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना....................	०	८	०
३. इस्राएलांचा लग्नविधि	०	३	०
४. वर्षप्रतिपदेची प्रार्थना	१	०	०
५. नवसांची सुटका व समुद्रतीरीं करायाची प्रार्थना.	०	४	०
६. आन्तिओखोस राजाचा इतिहास अथवा हानुक्याचे सणाची स्थापना	०	२	०
७. प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग १ ... ⎫			
८. " " भाग २ ... ⎭	१	४	०
९. सद्गुरुवचनें अथवा नीतिशास्त्र..........................	०	३	०
१०. इस्राएलांच्या धर्ममताविषयीं शास्त्रांतील प्रमाणें.	०	१	०
११. इस्राएली धर्माचें खरें स्वरूप	१	२	०
१२. इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम	०	८	०
१३. इब्री पहिलें पुस्तक (सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी)	०	४	०
१४. इब्री लघु व्याकरण	०	१०	०

SCRIPTURE PROOFS

OF THE

Jewish Doctrines.

इस्त्रायलांच्या धर्ममत्ताविषयीं शास्त्रांतील प्रमाणें.

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

हें

पुस्तक

इस्राएल लोकांच्या सद्गुण शाधिक मंडळीनें

मुंबई मध्यें

ईगल छापखान्यांत छापविलें

१८७६.—५६३७.

प्रस्तावना.

काहीं वर्षांपूर्वी इस्त्राएल लोकांची त्यांच्या धर्मावर जशी श्रद्धा होती, तशी आतां नाहीं; पूर्वी जरी हे लोक अज्ञान होते, तरी जीं धर्मतत्त्वें त्यांस त्यावेळीं माहीत होतीं, त्यांस ते अगदीं लगटून राहिले होते. परंतु ही श्रद्धा अलिकडे उणी होत चालली आहे; याचें कारण असें असावें कीं, ते आपल्या ईश्वरदत्त शास्त्राचें लक्षपूर्वक मनन करीत नाहींत; आणि या दीर्घ प्रवासांत कदाचित् ईश्वरानें त्यांस टाकलें असा संशय त्यांच्या मनीं येत असावा. हा संशय दूर व्हावा, आणि त्यांच्या धर्मावरील त्यांची श्रद्धा वाढून दृढ व्हावी, म्हणून त्यांच्या धर्मतत्त्वांतून कित्येकांविषयीं प्रमाणें शास्त्रांतून दाखविलीं आहेत. हीं त्यांनीं वांचून पाहिल्यास ईश्वरी वचनांत कांहींच अंतर पडलें नाहीं असें त्यांस स्पष्ट दिसून येईल. आणि जर ते ईश्वरी वचनावर पूर्ण भरंवसा ठेऊन व आपलें आचरण सुधारून त्याच्या आज्ञाप्रमाणें वर्त्ततील, तर परम दयाळू देव त्यांवर दया करीलच करील.

इस्रायलांच्या धर्ममत्ताविषयीं शास्त्रांतील प्रमाणें.

देव एकच आहे.

हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे. अनुवाद ६, ४.

परमेश्वर इस्राएलांचा राजा आणि त्यांचा उद्धारणारा सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं, मी पहिला व शेवटलाहि मी आहें आणि मजवांचून कोणी देव नाहीं. यशाया ४४, ६. इत्यादिक.

देवपणांत देवासंगातें कोणी नाहीं.

आतां तुह्मी पहा कीं, मी हाच मी, आणि मजसंगतीं देव नाहीं; मी मरण देतों, जिणेंहि देतों; घायाळ करितों, बरेंहि मीच करितों, आणि माझ्या हातांतून सोडविणारा कोणी नाहीं. अनुवाद ३२ ,३९.

देव कशासारिखा नसून कोणाचीही उपमा त्यास दिल्ही जात नाहीं.

तर तुह्मी देवाची बरोबरी कोणाशीं कराल ? आणि कोणती प्रतिमा त्याशीं लावून पहाल ? यशाया ४०,१८.

तर तुह्मी कोणाशीं माझी बरोबरी कराल ? आणि मी *समान होईन ?* असें पवित्र ह्मणतो. यशाया ४०, २५.

हे परमेश्वरा, तुझ्यासारिखा कोणी नाहीं, आणि आह्मीं आपल्या कानांनीं जें ऐकिलें, त्या अवघ्या प्रमाणें तुझ्या वांचून कोणी देव नाहीं. १ काल वृतांत. १७, २०.

देव निराकार आहे.

तर तुह्मी आपल्याविषयीं संभाळा; कारण कीं ज्यादिवशीं परमेश्वर होरेबांत अग्निमधून तुह्मांसीं बोलला, त्यांत तुह्मी कांहीं प्रतिमा पाहिली नाहीं. अनुवाद. ४,१५

देव अनादी आहे.

हे प्रभू, तूं पिढींपिढीं आमचा आश्रय आहेस. डोंगर उपजले आणि त्वां पृथ्वि व सृष्टि यांचा प्रारंभ केला यां पूर्वीं तूं सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत तूं देव आहेस. गीत. ९०, १–२.

प्रारंभीं त्वां पृथ्वीचा पाया घातला आणि आकाश तुझ्या हाताचें काम आहे. तीं नाश पावतील, परंतु तूं टिकून राहशील; तीं सर्वांहि वस्त्रासारखीं जीर्ण होतील; तूं त्यांस पांघरूणा सारखें फिरविशील, आणि तीं पालटलीं जातील; परंतु तूं तसाच आहेस, आणि तुझीं वर्षें समाप्त होणार नाहींत गीत १०२, २५–२७.

मोशेचें शास्त्र ईश्वरदत्त आहे.

तेव्हां परमेश्वरानें मोशाला सांगितलें तूं डोंगरावर मजपासीं चढ, आणि तेथें ऐस, मग त्यांस शिकवायास धोंड्याच्या पाट्या व शास्त्र व आज्ञा ज्या म्यां लिहिल्या, त्या मी तुला देईन. निर्गम २४, १२.

मोशे जो माझा सेवक याला होरेबांत सर्व इस्राएलां-

साठीं जें नेमशास्त्र म्यां (ईश्वरानें) अज्ञापिलें त्या नियमास, आणि न्यायास तुह्मी स्मरा. मलाखी ३, २२.

मोशेचें शास्त्र सर्वकाळ पाळलें जावें.

तेंव्हा परमेश्वर मोशाला बोलला, पहा, मी तुजकडे निबिड मेघांत येतों. मी तुजशीं बोलतांना लोकांनीं ऐकावें आणि त्यांनीं तुजवर सर्वकाळ विश्वास ठेवावा. निर्गम १९, ९.

आणि परमेश्वर ह्मणतो, त्यांशीं माझा करार हाच आहे, जो माझा आत्मा तुझ्या ठायीं आहे, व जे माझे शब्द म्यां तुझ्या मुखांत घातले आहेत ते तुझ्या मुखांतून, अथवा तुझ्या संतानाच्या मुखांतून, अथवा तुझ्या संतानांच्या संतानांच्या मुखांतून, आतां पासून सर्वकाळ पर्यंत सरणार नाहींत, असें परमेश्वर ह्मणतो. यशाया ५९, २१

इस्राएलांकडून सर्व लोकांस ईश्वरी ज्ञान मिळेल.

म्यां परमेश्वरानें तुला (इस्राएलाला) न्यायें करून बोलाविलें आहे, मी तुझा हात धरीन, व तुला रक्षीन, आणि तूं लोकांचा करार व राष्ट्रांचा प्रकाश होस असें करीन. यशाया ४२, ६.

पहा, म्यां त्याला (इस्राएलाला) लोकांचा साक्षी, लोकांचा नायक व आज्ञा करणारा केलें आहे. पहा, जें राष्ट्र तूं जाणत नाहींस, तें तूं बोलविशील; आणि ज्या राष्ट्रांनीं तुला जाणिलें नाहीं, तीं तुजकडे धांवतील. परमेश्वर जो तुझा देव, जो इस्राएलांचा पवित्र त्याज करितां; कारण कीं, त्यानें तुला गौरविलें आहे. ५५. ४–५

तेव्हां राष्ट्रें तुझ्या (इस्राएलाच्या) प्रकाशाकडेस व राजे तुझ्या उदयाच्या प्रभेकडेस येतील. यशाया. ६०, ३.

आणि तुह्माला (इस्राएलाला) परमेश्वराचे याजक ह्मणतील; लोक तुह्मास आमच्या देवाचे सेवक ह्मणतील; तुह्मी राष्ट्रांचें धन खाल, आणि त्याच्या गौरवांत आपला मोठेपणा मिरवाल. यशाया. ६१, ६.

जसें इस्राएलांस तसें सर्व लोकांस मोशेचे शास्त्रांतील विधि पाळावे लागतील.

आणि बहुत लोक जाऊन ह्मणतील, अहो, या, आपण परमेश्वराच्या पर्वतावर याकोबाच्या देवाच्या घरांत चढूं, ह्मणजे तो आपले मार्ग आह्मास शिकवील, तेव्हां आह्मी त्याच्या वाटांत चालूं; कां कीं जीयोनेंतून नेमशास्त्र आणि येरुशालेमेंतून परमेश्वराचें वचन निघेल. यशाया. २, ३.

सर्व लोक शाब्बाथ व अमावास्या पाळितील.

आणि असें होईल कीं, प्रत्येक अमावास्येस व प्रत्येक शाब्बाथास सर्व मनुष्य जात मज समोर भजायाला येत जाईल, असें परमेश्वर ह्मणतो. यशाया ६६, २३.

सर्व लोकांस मंडपाचा सण पाळावा लागेल.

आणि असें होईल कीं, जीं सर्व राष्ट्रें यरुशालेमे विरुद्ध येत असत, त्यांतून जीं सर्व उरलीं असतील, तीं वर्षोवर्षीं राजा जो सैन्यांचा परमेश्वर त्याला भजायाला आणि मंडपाचा सण पाळायाला तिकडे चढत जातील.

आणि असें होईल कीं, पृथ्वींतल्या कुळांतले जे कोणी यरुशालेमेकडे राजा जो सैन्यांचा परमेश्वर त्याला भजायाला चढत येणार नाहीं, त्यांजवर पाऊस पडणार नाहीं. आणि जर मिसऱ्यांचा वंश चढत येणार नाहीं तर त्यांवरही पाऊस पडणार नाहीं; जीं राष्ट्रें मंडपाचा सण पाळायाला चढत येणार नाहींत, त्यांस ज्या पीडेनें परमेश्वर हाणील ती त्यांस लागेल. जखार्या. १४, १६–१८.

सर्व लोकांस सुंता कराव्या लागतील.

सीयोना, जागा हो, हो जागा, आपला पराक्रम धारण कर. यरुशालेमा पवित्र नगरा, आपलीं शोभिवंत वस्त्रें लेऊन घे; कारण असुंती व अपवित्र पुन्हा तुजमध्यें येणार नाहीं. यशाया ५२, १.

प्रभू परमेश्वर ह्मणतो, कीं इस्राएलाच्या वंशामध्यें जो कोणी विदेशी असेल, त्याकडचा कोणताही असुंति हृदय अथवा असुंति देह विदेशी माझ्या पवित्र स्थानांत शिरणार नाहीं. येहेजकेल ४४, ९.

अर्पणें पुनः चालु होतील.

तेव्हां जसें पुरातन दिवसांत, आणि जसें पूर्वींच्या वर्षांत तसें यहुदाचें आणि यरुशालेमेचें अर्पण परमेश्वराला मनोरम होईल. मलाखी. ३, ४.

ईश्वरी आज्ञाप्रमाणें न वर्तल्यामुळें इस्राएल सर्व जगांत विखरले जातील.

आणखी परमेश्वर लोकांमध्यें तुमची दाणादाण करील, आणि ज्या राष्ट्रांमध्यें परमेश्वर तुह्मास नेईल, त्या-

मध्यें तुमची संख्या थोडकी करील. अनुवाद ४, २७. इत्यादिक.

आणि परमेश्वर पृथ्वीच्या या कांठापासून त्या कांठा पर्यंत सर्व लोकांमध्यें तुझी दाणा दाण करील; आणि तेथें लांकडाचे व दगडाचे दुसरे देव, जे तुला व तुझ्या पूर्वजांस ठाऊक नव्हते, त्यांची सेवा तूं करशील. अनुवाद १८, ६४.

इस्राएलांचा समूळ नाश होणार नाहीं.

तरी असें असतांहि ते (इस्राएल) आपल्या शत्रूंच्या देशांत राहतील, तेव्हा मी त्यांची समाप्ती करावी आणि त्यांशीं म्या केलेला करार मोडावा, असा मी त्यांस धिःकारणार नाहीं, आणि त्यांचा कंटाळाहि करणार नाहीं; कां तर मी परमेश्वर त्यांचा देव आहें. लेवीय २६, ४४.

कारण कीं तुमचा देव परमेश्वर कृपाळु देव आहे; तो तुह्माला सोडणार नाहीं; आणि तुह्माला नाहींसे करणार नाहीं; आणि त्यानें तुमच्या पूर्वजांसीं जो करार शपथ वाहून केला, त्याला तो विसरणार नाहीं. अनुवाद ४, ३१.

ईश्वर इस्राएलांच्या पश्चात्तापाची वाट पाहील.

तर या करितां परमेश्वर तुह्मावर कृपा करायाला वाट पाहील, आणि यामुळें तो तुह्मावर दया करायाला उंचावेल; कारण कीं, परमेश्वर न्यायाचा देव आहे, सर्व जे त्याची वाट पाहतात, ते धन्य आहेत. यशाया ३०, १८.

इस्राएलांसहि ईश्वरी कृपेची वाट पाहावी लागेल.

याकरितां परमेश्वर ह्मणतो कीं, जों पर्यंत मी लुट

करायाला उठें तों पर्यंत तुह्मी माझी वाट पाहत जा; कारण कीं, माझा संकल्प असा आहे कीं, राष्ट्रें एकत्र मिळवावीं, राज्यें एकवट करावीं, अशासाठीं कीं त्या त्यांवर आपला कोप, आपला सर्व संतप्त क्रोध घालावा, कां कीं माझ्या आवेशाच्या अग्नी कडून सर्व पृथ्वि खाऊन जाईल. सेफानया. ३, ८.

इस्राएलांची ईश्वरीकृपेविषयीं निराशाहि होईल.

मग त्यानें मला ह्मटलें, मनुष्य पुत्रा, हीं हाडें इस्राएलाचे सर्व वंश आहेत, पहा, ते ह्मणतात, कीं, आमचीं हाडें सुकलेलीं आहेत, आणि आमची आशा बुडाली आहे; आह्मी आपण नाहींसे झालों आहों. येहेजकेल ३७, ११.

शेवटीं ईश्वर इस्राएलांवर आपल्या नामाकरितां दया करील.

तुझा विनाश करावा, ह्मणून मी आपल्या नामासाठीं आपल्या क्रोधाला विलंब करील, आणि आपल्या प्रशंसेकरितां तो तुजविषयीं आटपता धरीन. पहा, म्या तुला गाळून पाहिलें आहे, परंतु रूप्याप्रमाणें नव्हे; म्या तुला पिडेच्या भट्टींतून निवडिलें आहे. मी आपणाकरितां आपणाकरितांच असें करीन; कां तर माझ्या नांवाला बट्टा लागूं नये, आणि मी आपलें गौरव इतराला देणार नाहीं. यशाया ४८, ९-११.

तर इस्राएलांच्या वंशानों, म्या तुह्माला तुमच्या दुरा-

चाराप्रमाणें अथवा तुमच्या दुष्कर्माप्रमाणें नव्हे परंतु माझ्या नामा करितां केलें, ह्मणजे मी परमेश्वर आहें, असें तुह्मी जाणाल, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो. येहेजकेल २०,४४.

परंतु जें माझें पवित्र नाम इस्राएलांच्या वंशांनीं, जेथें ते गेले तेथें राष्ट्रांमध्यें अप्रतिष्ठीत केलें होतें, त्याविषयीं म्या करुणा केली; यामुळें तूं इस्राएलाच्या वंशांस सांग, प्रभु परमेश्वर ह्मणतो कीं, इस्राएलाच्या वंशांनों, तुह्माकरितां नव्हें; परंतु जें माझें पवित्र नाम तुह्मी जेथें गेलां तेथें राष्ट्रांमध्यें अप्रतिष्ठीत केलें आहे, त्याजकरितां मी असें करितों आहे. येहेजकेल ३६, २१–२२

ईश्वरा वांचून कोणी तारणारा नाहीं.

मी मीच परमेश्वर आहें; आणि मजवांचून कोणी तारणारा नाहीं. यशाय ४३, ११.

त्यांस जवळ आणून दाखवा, तेहि एकत्र मसलत करोत, पूर्वींपासून हें कोणी सांगितलें? पुरातनकालापासून हें कोणी दाखविलें? म्या परमेश्वरानेंच कीं नाहीं? तर जो मी न्यायी देव व तारणारा मजवांचून कोणी दुसरा देव नाहीं, मजविना कोणी नाहीं. यशाया ४५, २१.

तथापि ज्यानें तुला मिसर देशांतून आणिलें, तो मी परमेश्वर तुझा देव आहें; आणि तूं मजवांचून कोणत्याहि इतर देवास जाणणार नाहींस; आणि मजवांचून कोणी तारणारा नाहीं. होशेहा १३, ४.

मध्यस्थ नसतांहि ईश्वर तारण करितो.

आणि कोणी सज्जन नाहीं, असें त्यानें पाहिलें, आणि

कोणी मध्यस्थ नाहीं, ह्मणून त्यास आश्चर्य वाटलें, तेंव्हां त्याच्याच बाहुनें त्यासाठीं तारण केलें, आणि त्याच्याच न्यायानें त्याला धारण केलें. यशाया. ५९,१६.

तर कोणी सहाय करणारा नाहीं, असें म्यां पाहिलें; आणि कोणी उद्धारणारा नाहीं ह्मणून मला आश्चर्य वाटलें; तेंव्हां माझ्याच हातानें मजसाठीं तारण केलें व माझ्या रागानें मला उद्धारिलें. यशाया. ६३, ५.

ईश्वर इस्राएलांकरितां एक महा पुरुष* उत्पन्न करील.

तो माझ्या दृष्टीस पडेल, परंतु आतां नाहीं; मी त्याला न्याहाळीन, परंतु जवळ नाहीं; याकोबांतून तारा येईल, आणि इस्राएलांतून काठी उठेल, आणि मोआबाच्या सीमांस फोडील; शेथाच्या सर्व संतानांचाहि नाश करील. गणना. २४, १७.

हे यहोशुवा मुख्य याजका, तूं ऐक आणि जे तुझे सोबती तुजसमोर बसले आहेत, तेहि ऐकोत; कां कीं ते

---

*एथें महापुरुष हा शब्द माशीयाह करितां योजिला आहे; असें करण्याचें कारण असें कीं, इस्राएलांचा उद्धार करण्या करितां ईश्वर जो महापुरुष उत्पन्न करणार त्यास माशीयाह हें नाव खरोखर पाहिलें असतां शास्त्रांत कोठेंच दिल्हेलें नाहीं. गीत २. २; आणि दानिएल ९. २५ या दोन वाक्यांत हें नाव सांपडतें, परंतु तें त्या महापुरुषास लागत नाहीं. पहिल्या वाक्यांतिल दावीदास व दुसरे वाक्यांतिल मुख्य याजकास दिल्हें आहे. या महापुरुषास माशीयाह हें नाव शास्त्रा मागून झालेले ग्रंथांत सांपडतें. आतां पुढें या ग्रंथांत माशीयाह हेंच नांव राखूं

उत्तमांचे मनुष्य आहेत, कारण कीं, पहा, मी आपला सेवक जो कोंब तो आणणार आहें. जखार्या. ३, ८.

आणि त्याला सांग, कीं, सैन्यांचा परमेश्वर असें ह्मणतो, कीं, ज्या मनुष्याचें नांव कोंब आहे, तो पहा; आणि तो आपले ठायांतून उगवेल, आणि तो परमेश्वराचें मंदीर बांधील. जखार्या ६, १२.

माशीयाह दावीदाचे कुळांत जन्मेल.

आणि इशायाच्या बुडख्यापासून कोंब निघेल आणि त्याच्या मुळांतून अंकूर फुटेल. यशाया ११, १.

परमेश्वर ह्मणतो, पहा, ज्यांत मी दावीदासाठीं न्यायी कोंब उगववीन, आणि राजा राज्य करील, व कार्य साधील, आणि पृथ्वींत नीति व न्याय करील, ते दिवस येतात. इर्मया २३, ५.

माशीयाह त्याचा पूर्वज दावीद याच्या नांवानें राज्य करील.

आणि परमेश्वर त्यांचा देव त्याची आणि दावीद जो त्यांचा राजा मी त्यांसाठीं स्थापीन; त्याचीहि सेवा ते करितील. इर्मया ३०, ९.

आणि मीं त्यांजवर एक पालक, ह्मणजे माझा सेवक दावीद ठेवीन; मग तो त्यांला चारील; तो त्यास पाळील, आणि तोच त्यांचा पालक असत जाईल. येहेजकेल ३४, २३.

आणि माझा सेवक दावीद त्यांचें राज्य करील; आणि त्यां सर्वांचा एकच पालक असत जाईल, आणि ते माझ्या न्यायाप्रमाणें वर्ततील, आणि माझ्या नियमांस पा-

ळितील, आणि त्यांस आचरतील. आणि जो देश म्या आपल्या याकोब सेवकाला दिल्हा, ज्यांत तुमचे पुर्वज वसले त्यांत ते वसतील, तेच व त्यांचीं लेंकरें व त्यांच्या लेंकरांचीं लेकरें त्यांत सर्वकाळ वसतील, आणि माझा सेवक दावीद सर्वकाळ पर्यंत त्याचा अधिकारी असत जाईल. येहेजकेल ३७, २४—२५.

त्या नंतर इस्राएलाचे वंश फिरतील, आणि परमेश्वर जो त्यांचा देव त्याला, आणि दाविद जो त्यांचा राजा त्याला ते शोधतील; आणि पुढल्या दिवसांत ते परमेश्वराचें आणि त्याच्या चांगलेपणाचें भय धरितील. होशेहा ३, ५.

माशीयाह येण्याची वेळ कोणास माहीत नाहीं.

आणि दिवस एकच होईल, तो दिवस नाहीं, रात्रं नाहीं, असा परमेश्वराला विदित होईल; आणि असें होईल, कीं, संध्याकाळीं प्रकाश होईल. जेखार्या. १४, ७.

माशीयाहचें येणें प्रगट करायास त्या पूर्वी एलीया भविष्यवादी येईल.

पहा परमेश्वराचा मोठा आणि भयंकर दिवस येईल, ह्यापूर्वीं मी तुह्माकडे एलीयाभविष्यवादी पाठवीन. मलाखी. ३, २३.

माशीयाहचेवेळीं विखरलेले सर्व इस्राएल एकवट होतील.

आणि त्यादिवशीं असें होईल कीं प्रभू आपले लोकांचें शेष जे अश्शुरापासून व मिशरापासून व पथरोसा

पासून व खुशापासून व एलामापासून व शिनारापासून व ह्माथापासून व समुद्रांतल्या द्वीपांपासून उरलें आहे, तें परत घ्यावयास आपला हात पुनः लावील. यशाया ११, ११.

आणि त्यांस सांग, प्रभू परमेश्वर ह्मणतो पहा, मी इस्राएलांचे वंश जेथें ते गेले आहेत तेथून राष्ट्रांमधून काढून घेईन, आणि त्यांस चहूंकडून एकवटीन व त्यांस त्यांच्या भुमिवर आणीन. आणि मी त्यांस देशांत इस्राएलाच्या पर्वतांवर एक राष्ट्र करीन, आणि एकच राजा त्या सर्वांचा राजा होईल, आणि तें पुढें दोन राष्ट्रें असणार नाहींत आणि ते पुन्हां दोन राज्यें असें वेगळे होणार नाहींत. येहेजकेल. ३७, २१–२२.

मूर्ति पुजा नाहिसी होईल.

आणि मूर्ति अगदीं नाहीशा होतील. यशाया. २, १८.

आणि सैन्यांचा परमेश्वर म्हणतो, त्यासमयीं असें होईल कीं, मीं मुर्त्तींचीं नावें देशांतून नाहींसीं करीन, मग तीं पुढें कोणी स्मरणार नाहींत. आणि भविष्य वाद्यांस व अशुद्ध आत्म्याला देशांतून घालवीन. जेखार्या. १३, २.

परमेश्वर त्यांस भयंकर होईल, कां कीं तो पृथ्वींतल्या सर्व देवांस क्षीण करिल; आणि राष्ट्रांचीं सर्व द्वीपें प्रत्येक आपल्या स्थानांतून त्याला भजतील. सफानया. २, ११.

गोग मागोगची मोठी लढाई होईल.

प्रभू परमेश्वर ह्मणतो, त्यावेळेस असें होईल कीं तुझ्या (गोगाच्या) मनांत भावना येतील, आणि तूं वाईट कल्पना कल्पिशील; आणि ह्मणशील, मी गांवकुसा खेरीज गांव आहेत अशा देशावर चढेन, जे स्वस्थ असून निर्भय वसतात,

जे सर्व कोटांवाचून आणि अडसर व द्वारें यांवांचून वसतात, त्यांवर मी जाईन. येहेजकेल ३८. ११ इत्यादिक.

सर्व जगांत शांतता होईल.

आणि राष्ट्रांमध्यें तो न्यायाधिशी करील, आणि बहुत लोकांचा निर्णय करील, तेव्हां ते आपल्या तरवारी मोडून फाळ करितील, आणि आपल्या भाल्यांचीं पातीं मोडून कोयत्या करितील, राष्ट्र राष्ट्रावर तरवार उचलणार नाहीं, लोक फिरून लढाई शिकणार नाहींत. यशाय. २. ४.

आणि त्यासमयीं मी त्यांसाठीं रानांतल्या पशूंसीं व आकाशांतल्या पक्षांसीं व भूमीवरल्या सरपटणाऱ्यांसीं करार करीन, आणि धनुष्य व तरवार व लढाई पृथ्वींतून मोडून टाकीन, आणि त्यांस निर्भय निजूं देईन. होशेहा. २. १८

पूर्वीं सारिखा खनान देश वंशांप्रमाणें वांटला जाईल.

प्रभू परमेश्वर ह्मणतो, ज्या सीमेंत तुह्मी इस्राएलाच्या बारा वंशाप्रमाणें देशाचें वतन कराल ती हीच आहे; येहेजकेल ४७, १३. इत्यादिक.

पवित्र मंदिर पुन्हा बांधलें जाईल.

आणि माझें पवित्र स्थान त्यां मध्यें सर्वकाळ असतांना राष्ट्रें जाणतील कीं; मी परमेश्वर इस्राएलांस पवित्र करितों. येहजकेल ३७, २८.

आणि त्यांत पवित्र स्थान व परम पवित्र स्थान हीं होतील. येहेजकेल. ४५, ३.

आणि त्याच्या मध्यें परमेश्वराचें पवित्र स्थान होईल येहेजकेल ४८, १०.

येहेजकेल अध्याय ४० पासून अध्याय ४९ पर्यंत शेवटीं बांधलें जाणाऱ्या मंदिराचेंच वर्णन केलें आहे.

इस्राएलांमध्यें पूर्वी प्रमाणें ईश्वराचा साक्षात-कार राहील.

आणि मी पुन्हा आपलें मुख त्यांजपासून अच्छादणार नाहीं; का कीं मी आपला आत्मा इस्राएलांच्या वंशावर घातला आहे, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो. येहेजकेल ३९, २९.

आणि त्या दिवसापासून नगराचें नाव परमेश्वर तेथें आहे असें असत जाईल. येहेजकेल ४८, ३९.

अगे सीयोनेचे कन्ये, उत्सव व हर्ष कर, कां तर, पाहा, मी येतों, व मी तुजमध्यें वसेन असें परमेश्वर ह्मणतो. जखार्या. २. १०.

समाप्त.

इस्राएललोकांच्या सद्गुण शोधक मंडळीनें छापविलेलीं पुस्तकें.

	रु.	आ.	पै.
प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबूल होणें … … … …	,,	१	३
पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना … …	,,	८	,,
इस्राएलांचा लग्नविधि … … …	,,	३	,,
वर्ष प्रतिपदेची प्रार्थना … … …	१	,,	,,
नवसांची सुटका व समुद्रतीरीं करायाची प्रार्थना … … … …	,,	८	,,
आनतिओखोस राजाचा इतिहास अथवा हान्नुकयाच्या सणाची स्थापना	,,	२	,,
इब्री पहिलें पुस्तक… … … …	,,	४	,,
प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग १ } ,, ,, ,, ,, ,, २ }	१	४	,,
सद्गुरुवचनें अथवा, नितिशास्त्र …	,,	६	,,
इस्राएलांच्या धर्म मत्तांविषयीं शास्त्रांतील प्रमाणें … … … …	,,	१	,,

इस्राएलांची पंचोपोषणें }
इब्री दुसरें पुस्तक } तयार होत आहेत.

THE

ETHICS OF THE FATHERS.

פרקי אבות

सद्गुरुवचनें

अथवा

नीतिशास्त्र.

किंमत ६ आणे.

THE

ETHICS OF THE FATHERS,

(With Notes from Gemara.)

TRANSLATED FROM HEBREW INTO MARATHI,

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKER,

HEAD MASTER, DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION,

AND

SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

Published by the Bene-Israel Improvement Society.

Registered under Act XXV of 1867.

Bombay:

PRINTED AT THE "ORIENTAL PRESS."

1870.—5630.

Price 6 Annas.

פרקי אבות

सद्गुरुवचनें

अथवा

नीतिशास्त्र.

(सटीक)

या ग्रंथाचें इब्री मूळग्रंथावरून,

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक

आणि

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे चिटणीस

यांनीं

मराठी भाषेंत भाषांतर केलें.

तें

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीने

लोकोपयोगाकरितां,

मुंबईमध्यें

ओरिएन्टल छापखान्यांत छापविलें.

सन १८७०.-इस्राएली ५६३०.

(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें नोंदिलें आहे.)

TO

SAMUEL ELIJAH VARULKER GUBBAY, Esq.,

PRESIDENT OF THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY,

WHO HAS MANAGED THE SOCIETY WITH GREAT ZEAL AND INTEREST, AND HAS SHEWN EVERY KINDNESS AND AFFECTION TO ITS MEMBERS.

THIS LITTLE WORK IS DEDICATED

WITH

GREAT LOVE AND RESPECT

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKER.

अज्जम शेमुएल येलीया वरोलकर गब्बाय

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे अध्यक्ष ;

जे या मंडळीचें काम मोठ्या आवेशाने व हर्षाने

चालवून तिच्या सभासदांशीं मोठ्या

सख्यत्वाने व स्नेहभावाने

वागत असतात

त्यांस,

योसेफ येहेजकेल राजपुरकर

यांनीं

हा लहानसा ग्रंथ

मोठ्या आदराने व प्रीतीने

नजर केला असे.

प्रस्तावना.

इब्री भाषेंत ज्याप्रमाणें शास्त्रीय विषयावर ग्रंथ आहेत, त्याप्रमाणें उपयुक्त ज्ञानाच्या विषयांवरहि आहेत. युरोपांतील निरनिराळे देशांत, आणि मिसर देश, आरबस्थान, तुर्कस्थान इत्यादिक देशांत इस्राएल लोकांमध्यें मोठमोठाले विद्वान होऊन त्यांनी तत्वज्ञान, गणित, इतिहास, वैद्यक, नीति इत्यादिक विषयांवर अनेक ग्रंथ रचिले आहेत. परंतु आमच्या इस्राएल लोकांस या देशांत फार दिवस झाल्यामुळें स्वभाषेचें ज्ञान कांहींच राहिलें नाहीं; आणि हल्लीं इंग्लिश भाषेच्या आधारानें त्या भाषेचें ज्ञान संपादण्यास बरीच सोय असतांहि आमचे लोक तिजकडे दुर्लक्ष करितात; अशा कारणावरून त्या ग्रंथांची आमच्या लोकांस फारसी माहिती नाहीं. असे उपयुक्त ज्ञानाच्या विषयांवर आपल्या भाषेंत ग्रंथ आहेत, असें त्यांस कळावें ह्मणून नीतीच्या विषयावरील हा लहानसा ग्रंथ मी भाषांतर केला आहे. हा ग्रंथ मिशना या ग्रंथांतील एकेताळीसावा भाग आहे; त्याचें इब्री नांव "पिरके आबोथ" ह्मणजे पूर्वजांचे (नीतिवरील) अध्याय.

हा ग्रंथ इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीकरितां कांहीं वर्षांपूर्वी भाषांतर होऊन तयार झाला होता;

तो छापण्याकरितां त्या मंडळीच्या अंगीं पुरें सामर्थ्य नसल्यामुळें राहिला होता. तरि अशा थोर व मंडळीच्या उद्देशासारिख्या विषयावरील ग्रंथ अगत्य प्रसिद्ध झाला पाहिजे, ह्मणून आतां तो सर्वांपुढें सादर केला आहे. तो सर्वांस समजावा ह्मणून त्यावर टीकाहि केली आहे; आणि बहुतकरून ती गेमारा या इब्री ग्रंथांतून घेतली आहे. जे इब्री भाषेचा अभ्यास करितील त्यांसहि तो सुलभ होईल अशा प्रकारें हें भाषांतर केलें आहे. जेथें शब्दार्थांत भेद पडला आहे, तेथें पृष्ठाखालीं इ. ह्मणजे इब्री असी सूचना करून त्या शब्दाचा खरा अर्थ दाखविला आहे.

शेवटीं आमच्या प्रिय बंधुजनांस असी विनंती आहे कीं, जसें अद्यापपर्यंत तसें यापुढें त्यानीं आपल्या स्वभाषेकडे दुर्लक्ष करूं नये. त्यांनीं मोठ्या उत्सुकतेनें तिचा अभ्यास करावा, ह्मणजे त्या भाषेंतील ग्रंथांमधील ईश्वरी व उपयुक्त ज्ञानाचें गुप्त राहिलेलें धन त्यांपुढें प्रगट होईल. आणि त्या भाषेचें ज्ञान नसल्या कारणानें आपल्या ईश्वरदत्तशास्त्राचा खरा अर्थ सोडून जे अनेक अर्थ लाविले जातात, तसें न होतां, पवित्र शास्त्राचें खरें ज्ञान त्यांस प्राप्त होईल.

सूचना.

या मंडळीकडून पूर्वीं प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांस ज्यांनीं आश्रय दिल्हा असेल त्यांस हा ग्रंथ मंडळीकडून बक्षीस दिल्हा जाईल.

सद्गुरुवचनें

अथवा

नीतिशास्त्र.

सर्व इस्राएलांस पुढील जगांत विभाग आहे; जसें ह्मटलें आहे कीं, "तुझे सर्व लोक न्यायी होतील; आणि त्या गौरविलेलें व्हावें ह्मणून, जसें माझ्या लावण्याचें रोप, माझे हाताचें कर्म, तसें ते सर्वकाल भूमीचें वतन भोगितील".*

अध्याय १.

१ मोशेला पवित्रशास्त्र सीनाय पर्वतावर मिळालें, तें त्यानें यहोशूवाचे स्वाधीन केलें, यहोशूवानें न्यायाधीशाचे, न्यायाधीशानें भविष्यवाद्यांचे आणि भविष्यवाद्यांनीं मोठ्या सभेच्या सभासदांच्या स्वाधीन केलें. ते तीन गोष्टी ह्मणाले, न्यायांत विचारशील असा; पुष्कळांस (शिकवून) शिष्य करा; आणि पवित्र शास्त्रास कुंपण घाला. †

---

* यशाया. ६०, २१.

† शास्त्रांतील आज्ञा, विधि व नियम तुह्माकडून सर्व पूर्ण व्हावे आणि उलंघिले न जावे ह्मणून सावध राहा.

२ शिमओन जो यथार्थ तो त्या मोठया सभेचा शेवटला सभासद होता. तो असें ह्मणत असे कीं, शास्त्र, देवभक्ति आणि परोपकार या तीन गोष्टींवर पृथ्वी उभी आहे.

३ शिमओन जो यथार्थ यानें तें शास्त्र सोखोमध्यें राहणारा आन्तीगोनस याचे स्वाधीन केलें. तो ह्मणत असे कीं, जे सेवक वेतनाच्या आशेने आपल्या स्वामीची सेवा करितात त्यांसारिखे तुह्मी होऊं नका; परंतु जे सेवक वेतनाची आशा न धरितां स्वामीची सेवा करितात, त्यांसारिखे तुह्मी असा; आणि ईश्वराचें * भय तुह्मी बाळगा.

४ त्याकडून तें शास्त्र सेरेदांत राहणारा योजेराचा पुत्र योसे, आणि यरुशालेमेंत राहाणारा योहानानाचा पुत्र योसे यांस मिळालें. योजेराचा पुत्र योसे ह्मणत असे कीं, तुमचें घर शान्यांचें मंडळगृह असें होवो, आणि तुह्मी त्यांच्या पायधुळीसारिखे होऊन त्यांचीं वचनें तृषेने प्राशन करा.

५ येरुशालेमेंत राहाणारा योहानानाचा पुत्र योसे ह्मणतो कीं, तुमचें घर अगदीं उघडें ठेवा, आणि तुमच्या घरांत गरीबास आश्रय असो, आणि स्त्रीबरोबर फारसें भाषण करूं नका. हें त्याचें भाषण स्वतांच्या स्त्रीविषयीं आहे; तर परक्याच्या † स्त्रीबरोबर फारच उणें भाषण

---

* इ. आकाशाचें.

† इ. शेजाऱ्याच्या.

असावें असें अनुमान होतें. यावरून सुज्ञ जन ह्मणतात कीं, प्रत्येक वेळीं जेव्हां मनुष्य स्त्रीबरोबर अधिक भाषण करितो, तेव्हां तो आपणावर वाईट आणितो, शास्त्राभ्यास सोडितो आणि शेवटीं नर्कवास पावतो.

६ त्यांपासून तें शास्त्र पेराहायाचा पुत्र येहोशुवा आणि नाताय आरबाली यांस मिळालें; पेराहायाचा पुत्र येहोशुवा ह्मणतो कीं, तूं आपणास गुरू करून घे, मित्र करून ठेव, आणि सर्व मनुष्यांविषयीं आपल्या मनीं सुविचार राख.

७ नाताय आरबाली ह्मणतो, वाईट शेजाऱ्यापासून दूर राहा, दुष्टाची संगत करूं नको, आणि (शेवटल्या) शासनाविषयीं निश्चित राहूं नको.

८ त्यांपासून तें शास्त्र तब्बायचा पुत्र येहुदा, आणि शाताहचा पुत्र शिमओन यांस मिळालें. तब्बायचा पुत्र येहुदा ह्मणतो, तूं वकील* होऊं नको; आणि जेव्हां वादी तुजसमोर न्यायांत उभे असतात, तेव्हां ते तुझ्या दिसण्यांत दोषी असे असोत; परंतु ते तुजपुढून गेल्यावर, त्यांनी तुझा निवाडा मान्य केला, ह्मणून ते तुझ्या दिसण्यांत निर्दोष असोत.

९ शाताहचा पुत्र शिमओन ह्मणतो; साक्ष्यांची बा-

---

* वकीलीचे कामांत खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें करावें लागतें.

रकाईने चौकशी कर; आणि तुह्मीं वचनें सांभाळ, नाहीं तर तीं लबाडी करायास शिकतील.

१० त्यांपासून तें शास्त्र शेमाया आणि आबतालयोन यांस मिळालें. शेमाया ह्मणतो, तूं आपल्या कामावर आवड ठेव; मोठेपणा धिक्कार; आणि अधिकाऱ्यांस आपली ओळख देऊं नको.

११ आबतालयोन ह्मणतो, अहो सुज्ञ जन, तुह्मी आपलीं वचनें सांभाळा, नाहीं तर तुह्मावर पाडावपणाचा दंड लागू होऊन तुह्मी रोगी पाण्याच्या ठिकाणीं पाडाव करून नेले जाल, आणि तुमच्या मागें चालणारे तुमचे शिष्य तें पिऊन मरतील; आणि ईश्वरी नाम विटाळलें जाईल.*

१२ त्यांपासून तें शास्त्र हिल्लेल आणि शाम्माय यांस मिळालें. हिल्लेल ह्मणतो, आहारोन जो शांततेवर प्रीति करून शांतताच राखीत असे, त्याचे शिष्य तुह्मी होऊन मनुष्यमात्रांवर प्रीति करून त्यांस शास्त्राकडे वळवा.

१३ तो ह्मणत असे कीं, जो स्वतां आपलें नांव वाढवितो तो तें नाशितो; जो ज्ञान वाढवीत नाहीं तो छेदला जाईल; जो शास्त्र शिकवीत नाहीं तो मृत्युपात्र आहे.

---

* या लाक्षणिक वाक्याचा अर्थ असा, कीं तुह्मीं आपलीं वचनें सांभाळा; नाहीं तर तुह्मी अन्य धर्माच्या लोकांत विखरले जाल; तेथील लोक तुमच्या वचनाविषयीं अनेक मतें काढून नाश पावतील.

आणि जो ईश्वरी नामाने गुण करूं पाहतो तो * भस्म होईल.

१४ तो असेंहि ह्मणत असे कीं, मीच आपला (स्वार्थ) पाहात नाहीं, तर माझा (स्वार्थ) कोण (पाहील). जर मी आपला (स्वार्थ पाहात) नाहीं, तर मी काय? आणि जर आतां नव्हे, तर केव्हां?

१५ शाम्माय ह्मणतो, तुह्मी शास्त्राभ्यासाविषयीं नियम करा; थोडें भाषण करून पुष्कळ कार्यें करा; आणि हास्य वदनानें सर्व मनुष्यांचें आगतस्वागत करा.

१६ रब्बान गमलीएल ह्मणतो, तूं आपणास गुरु करून संशय दूर करून घे; आणि संशयाने दाहावा भाग देण्याची रीति लावूं नको.

१७ त्याचा पुत्र शिमओन ह्मणतो, मी आपल्या सर्व दिवसांत ज्ञान्यांमध्यें वाढलों, आणि मुकें राहाणें यासारिखी शरिरास समाधान देणारी दुसरी गोष्ट मला सांपडली नाहीं; आणि अभ्यास नव्हे परंतु वर्तणूक मुख्य; आणि जो अतिशय भाषण करितो तो दोषांत पडतो.

१८ गमलीएलाचा पुत्र रब्बान शिमओन ह्मणतो, न्याय, सत्य आणि शांति या तीन गोष्टींवर पृथ्वी उभी आहे; जसें ह्मटलें आहे कीं, "तुह्मी आपल्या दारांत खरेपणाचा आणि शांतीचा न्याय करा." †

---

* या वाक्याचा अर्थ कोणी असा करितात कीं जो शास्त्रावर निर्वाह चालवितो तो भस्म होईल.

† जखार्या. ८, १६.

अध्याय २.

१. गुरु ह्मणतो, जो सरळ मार्ग मनुष्यानें आपणाकरितां निवडावा तो कोणता ? ज्या सर्व मार्गांकडून त्यांत चालणारास शोभा येते, आणि लोकांकडून प्रशंसा होते तो. आणि जश्या मोठ्या तश्याच लहान आज्ञाहि सांभाळण्याविषयीं तूं तत्पर ऐस; कारण आज्ञा सांभाळण्याचें योग्य वेतन तूं जाणत नाहींस; आणि एकादी आज्ञा भंग केल्याने जी हानि होते त्याची, व पाळल्याने जो लाभ होतो त्याची तुळणा करून पाहा; आणि आज्ञाभंग केल्याने जो लाभ होतो त्याची व हानि होते त्याची तुळणा करून पाहा. तीन गोष्टींविषयीं विचार कर ह्मणजे तूं पापाच्या मार्गाकडे वळणार नाहींस; तुझ्यावर काय आहे, हें तूं जाण; तुझ्यावर पाहाणारा डोळा, आणि ऐकणारा कान आहे; आणि तुझीं सर्व कर्में पुस्तकांत लिहिलीं जातात.

२. रिब्बी येहुदा हान्नासी याचा पुत्र रब्बान गमलीएल ह्मणतो, संसार करून शास्त्राभ्यास करणें उत्तम, कारण या दोघांच्या संयोगाने पापाचा विसर पडतो; परंतु शास्त्राभ्यास असून उद्योग नसल्याने तें निष्फल होऊन दोषाचें कारण होतें. आणि जे कोणी मंडळीचें काम चालवितात, त्यांनी त्यांचें काम ईश्वरी नामाकरितां चालवावें; ह्मणजे त्यांच्या वडिलांचें पुण्य त्यांस सहाय करील; आणि त्यांची यथार्थता सर्वकाळ राहील; *आणि*

तुह्मी तें केल्याप्रमाणें मी तुह्मास मोठ्या वेतनास योग्य असें मानीन.

३. राज्याधिकाऱ्यांविषयीं सावध राहा; कारण स्वतांच्या स्वार्थाकरितां मात्र ते दुसऱ्या मनुष्याशीं मैत्री करितात, अणि लाभाच्या वेळीं प्रीति करणारे दिसतात; परंतु संकटसमयीं ते कोणत्याहि मनुष्याजवळ उभे राहत नाहींत.

४. तो असें ह्मणत असे कीं, दुसऱ्याने आपली इच्छा तुझ्या इच्छेप्रमाणें पूर्ण करावी, ह्मणून तूं आपल्या इच्छेप्रमाणें दुसऱ्याची इच्छा पूर्ण कर; दुसऱ्याने आपली इच्छा तुझ्या इच्छेपुढें रद्द करावी, ह्मणून तूं आपली इच्छा दुसऱ्याच्या इच्छेपुढें रद्द कर. हिल्लेल ह्मणतो, मंडळीपासून वेगळा राहूं नको; आणि तुझ्या मरणदिवसापर्यंत तूं आपणावर भरंवसा ठेवूं नको; आणि तुझ्या शेजाऱ्याची स्थिति तुला प्राप्त होईपर्यंत तूं त्याजविषयीं कांहीं तर्क करूं नको; समजण्यासारिखें नसून शेवटीं समजेल असें कोणतेंहि भाषण करूं नको.* आणि मला अवकाश सांपडेल, तेव्हां मी पश्चात्ताप करीन असेंहि ह्मणूं नको; कदाचित तुला कधींच अवकाश सांपडणार नाहीं.

५. तो ह्मणत असे कीं, मूर्खास पापाचें भय नसतें,

---

* सर्वदा सोपें व उघड भाषण करावें. समजायास गूढ आणि कष्ट पाडणारें भाषण कोणाशीं करूं नये.

गव्हार यथार्थ नसतो, लज्जा धरणारा विद्वान होत नाहीं, रागिट शिक्षक होण्यास योग्य नाहीं, व्यवहारांत फार गुंतलेला ज्ञानी होत नाहीं; जेथें कोणी मनुष्य नसेल, तेथें मनुष्य होण्यास तूं यत्न कर.*

६. त्यानें एक कवटी पाण्यावर पोहतांना पाहिल्यावरून तिला ह्मणाला, तूं दुसऱ्यांस पोहविलेंस ह्मणून त्यांनी तुला पोहविलें; आणि शेवटीं ज्यांनी तुला पोहविलें तेहि स्वतां पोहतील.

७. तो ह्मणत असे कीं, जो मांस वाढवितो तो किडे वाढवितो, जो द्रव्य वाढवितो तो काळजी वाढवितो, जो बायका वाढवितो तो चेटक वाढवितो, जो दासी वाढवितो तो दुराचार वाढवितो, जो चाकर वाढवितो तो चोरी वाढवितो; परंतु जो शास्त्राभ्यास वाढवितो तो जीवन वाढवितो, जो विद्यालयांत विद्या वाढवितो तो ज्ञान वाढवितो, जो विचार वाढवितो तो चातुर्य वाढवितो, जो यथार्थता वाढवितो तो शांति वाढवितो, जो चांगलें नांव मिळवितो तो आपणासाठींच मिळवितो, जो शास्त्राचें ज्ञान मिळवितो तो आपणाकरितां पुढील जगाचें जीवन मिळवितो.

८. हिल्लेल आणि शाम्माय यांपासून तें शास्त्र जक्कायचा पुत्र रब्बान योहानान यास मिळालें. तो ह्मणत

---

* जेथें लोक मनुष्यधर्माप्रमाणें वर्तत नसतील तेथें योग्य रीतीनें वर्तून मानवी धर्म त्यांस शिकीव.

असे कीं, जर तूं शास्त्राचा फार अभ्यास केलास, तर तूं स्वतां गर्व करूं नको; कारण याजकरितांच तुला उत्पन्न केलें आहे. जक्कायचा पुत्र रब्बान योहानान याचे पांच शिष्य होते, ते हे;-होरकानोसाचा पुत्र रिब्बी येलीएझेर, हानानयाचा पुत्र रिब्बी येहोशुवा, रिब्बी योसे उपाध्या, नेथानएलाचा पुत्र रिब्बी शिमओन, आणि आराखाचा पुत्र रिब्बी येलीएझेर. तो त्यांची योग्यता याप्रमाणें ठरवीत असे;-होरकानोसाचा पुत्र रिब्बी येलीएझेर हा, ज्यांतून एक थेंबहि जात नाहीं त्या गिलावा केलेल्या टांकीसारिखा आहे; रिब्बी येहोशुवा, धन्य त्याचीं मायबापें; रिब्बी योसे यथार्थ; नेथानएलाचा पुत्र रिब्बी शिमओन, हा पापाचें भय बाळगणारा; आणि आराखाचा पुत्र रिब्बी येलीएझेर हा मोठा झरा. तो असें ह्मणत असे कीं, इस्राएलांतील सर्व ज्ञानी कांस्याच्या एका पारड्यांत असले, आणि होरकानोसाचा पुत्र रिब्बी येलीएझेर दुसऱ्या पारड्यांत असला, तर तो त्या सर्वांपेक्षां वजनांत अधिक भरेल. त्याच्या नांवाने आब्बा शाउल ह्मणतो, इस्राएलांतील सर्व ज्ञानी कांस्याच्या एका पारड्यांत असले, आणि होरकानोसाचा पुत्र रिब्बी येलीएझेर हाहि त्यांबरोबर असला, आणि आराखाचा पुत्र रिब्बी येलीएझेर दुसऱ्यांत असला, तर तो ह्या सर्वांपेक्षां वजनांत अधिक भरेल. तो त्यांस ह्मणाला, मनुष्याने लगटून राहावें असा चांगला मार्ग कोणता हें जाऊन पाहा. रिब्बी येलीएझेर ह्मणतो, चांगली दृष्टि; रिब्बी येहोशुवा ह्मणतो, चांगला मित्र; रिब्बी योसे ह्मणतो,

चांगला शेजारी; रिब्बी शिमओन ह्मणतो, जो गोष्टीचा अंत लक्षांत आणितो तो; रिब्बी येलीएझेर ह्मणतो, चांगलें अंत:करण. यावरून तो ह्मणाला, तुह्मा सर्वांच्या गोष्टींमध्यें आराखाचा पुत्र रिब्बी येलीएझेर याची गोष्ट मला (उत्तम) दिसते, कारण तुमच्या सर्व गोष्टी त्यांत येतात.

९. तो त्यांस ह्मणाला, मनुष्याने दूर राहावें असा वाईट मार्ग कोणता हें जाऊन पाहा. रिब्बी येलीएझेर ह्मणतो, वाईट दृष्टि; रिब्बी येहोशुवा ह्मणतो, वाईट मित्र; रिब्बी योसे ह्मणतो, वाईट शेजारी; रिब्बी शिमओन म्हणतो, जो उसनें घेतो आणि फेडीत नाहीं तो; कारण मनुष्यापासून उसनें घेणें विश्वंभरापासून उसनें घेण्यासारिखें आहे, जसें म्हटलें आहे कीं, "दुष्ट उसनें घेतो, आणि फेडीत नाहीं; परंतु सात्विक दयेने देतो";* रिब्बी येलीएझेर ह्मणतो, दुष्ट अंत:करण. यावरून तो म्हणाला, तुम्हां सर्वांच्या गोष्टींमध्यें आराखाचा पुत्र रिब्बी येलीएझेर याची गोष्ट मला (उत्तम) दिसते, कारण तुमच्या सर्व गोष्टी त्यांत येतात.

१०. ते तीन गोष्टी ह्मणाले; रिब्बी येलीएझेर ह्मणतो, तुझ्या मित्राचा लौकिक तुझ्या लौकिकासारिखा तुला प्रिय असो. आणि तुझा राग लवकर चेतूं देऊं नको, आणि तुझ्या मरणापूर्वीं एक दिवस पश्चात्ताप कर; †

---

* गीत ३७, २१.

† मरण केव्हां येईल याचा भरंवसा नाहीं ह्मणून नित्य पश्चात्ताप करावा.

आणि सुज्ञ जनांच्या विस्तवाशीं शेकत राहा; परंतु त्यांच्या इंगळांनीं तुला भाजूं नये ह्मणून सांभाळ, कारण त्यांचा दंश लांडग्याच्या दंशासारिखा, त्यांचा फणका विंचवाच्या फणक्यासारिखा, त्यांचा दाह सर्पाच्या दाहासारिखा आहे; आणि त्यांचीं वचनें अग्नीच्या इंगळासारिखीं आहेत.*

११. रिब्बी येहोशुवा ह्मणतो, वाईट दृष्टि, दुष्ट वासना आणि प्राणीमात्रांचा हेवा, हीं मनुष्यास जगांतून नाहींसें करितात.

१२. रिब्बी योसे ह्मणतो, तुझ्या मित्राचें द्रव्य तुला तुझ्या द्रव्यासारिखें प्रिय असो; आणि शास्त्राभ्यास करण्यास तूं आपणास सिद्ध राख, कारण तें तुला वारस्यानें मिळत नाहीं; आणि तुझीं सर्व कर्मे देवाच्या नामाकरितां होवोत.

१३. रिब्बी शिमओन ह्मणतो, "शेमा इस्राएल"† ह्मणण्याविषयीं आणि प्रार्थना करण्याविषयीं तूं सावध राहा; आणि जेव्हां तूं प्रार्थना करितोस तेव्हां तूं आपली प्रार्थना नेमलेली आहे ह्मणून करूं नको;‡ परंतु विश्वंभरापुढें

---

* सुज्ञजनांपासून ज्ञान संपादन कर, आणि त्यांचीं वचनें सांभाळ; नाहीं तर तुझा नाश होईल.

† हें वाक्य अनुवाद अध्याय ६ ओवी ४ एथें सांपडतें; आणि तेंच इस्राएली धर्माचें मुख्य तत्व आहे.

‡ प्रार्थना हा एक ओझ्यासारिखा नियम आहे, असें समजून करूं नको.

दया आणि कृपा मागण्याकरितां कर; जसें ह्मटलें आहे कीं, "कारण तो कृपाळू व दयाळू, मंदक्रोध व फार मायाळू आणि विपत्तीविषयीं अनुतापी आहे." * आणि तूं आपल्याच (अंतःकरणा) पुढें दुष्ट होऊं नको. ‡

१४. रिब्बी येलीएझेर ह्मणतो, शास्त्राभ्यासांत तूं चपळ ऐस, आणि नास्तिकास † उत्तर काय द्यावें हें जाण, आणि तूं कोणापुढें कष्ट करितोस हेंही जाण, आणि तुझा यजमान § विश्वासू आहे, तो तुझ्या कष्टाचें फळ तुला देईल.

१५. रिब्बी तरफोन ह्मणतो, दिवस लहान असून काम फार आहे. आणि घरधनी § त्वरा करितो, तरी खपणारे आळस करितात.

१६. तो ह्मणत असे कीं, काम पुरें केलेंच पाहिजे असें नाहीं, तरी त्यापासून तूं आपला हात आटोपावा एवढा स्वतंत्र तूं नाहींस. जर तूं शास्त्राभ्यास फार केलास तर तुला मोठें वेतन दिल्हें जाईल, कारण तुझा यजमान§ विश्वासू आहे, तो तुला तुझ्या कष्टांचें फळ देईल; परंतु जाण कीं, सात्विकांच्या वेतनाची देणगी पुढील (जगांत) आहे.

---

* योएल. २, १३.

‡ पाप चांगलें असें कोणाचेंहि अंतःकरण साक्ष देत नाहीं, ह्मणून त्याविरुद्ध वागून दुष्टाई करूं नये.

† याच्या इब्री शब्दाचा अर्थ विलासी असाहि होतो.

§ ईश्वर.

अध्याय ३.

१ माहालालएलाचा पुत्र आकीबा म्हणतो, तीन गोष्टींविषयीं विचार कर, म्हणजे तूं पापाच्या मार्गाकडे वळणार नाहींस. तूं कोठून आलास; कोठें जात आहेस; आणि तुला कोणासमोर हिशेब व झडतीं द्यावी लागेल हें जाण. तूं कोठून आलास ? घाणेऱ्या थेंबांतून; तूं कोठें जात आहेस ? माती, किडे व जंतु यांच्या ठिकाणीं; आणि पुढें तुला कोणासमोर हिशेब व झडती द्यावी लागेल ? राजा, राजांचा राजा, पवित्र व धन्य जो त्यासमोर.

२ रिब्बी हानीना दुय्यम उपाध्या म्हणतो, तूं राज्याच्या शांतिसाठीं प्रार्थना करीत ऐस ; कारण त्याचें भय नसतें तर मनुष्यें एक प्रत्येकास जीवंत गिळतीं. तेरादयोनाचा पुत्र रिब्बी हानीना म्हणतो, जे दोघे (एकत्र) बसले असतां, त्यांमध्यें शास्त्राच्या गोष्टी चालत नाहींत, तर पाहा; तें केवळ निंदकांचें आसन आहे. जसें म्हटलें आहे कीं, "आणि जो निंदकांच्या आसनावर बसत नाहीं".* परंतु दोघे (एकत्र) बसले असतां त्यांमध्यें शास्त्राच्या गोष्टी चालतात, त्यांजवर शेखीना† पाखर घालितो ; जसें म्हटलें आहे कीं, "तेव्हां जे परमेश्वराचें भय धरीत असत, ते परस्परें बोलत होते, आणि परमेश्वरानें कान देऊन ऐकिलें; मग जे परमेश्वराचें भय धरीत असत, आणि

---

* गीत १, १. † देवाचा साक्षात्कार.

त्याच्या नामाचा सन्मान करीत असत, त्यांकरितां त्यासमोर स्मरणांचें पुस्तक लिहिलें" * (हें वाक्य) माझ्या (एकल्या) विषयीं नाहीं, परंतु दोघांविषयीं आहे. जरी एकटा बसून शास्त्राभ्यास करितो, तरी पवित्र व धन्य जो, तो त्याचें वेतन नेमून ठेवितो हें कशावरून? तर असें ह्मटलें आहे कीं, "तें परमेश्वरानें त्याजवर ठेविलें आहे, ह्मणून तो एकांतीं बसून उगा राहतो".†

३ रिब्बी शिमओन ह्मणतो, जे तिघे एका मेजावर जेवतात आणि तेथें शास्त्राच्या गोष्टी करीत नाहींत, तर त्यांनीं मेलेल्यांच्या‡ अर्पणांतून खाल्ल्यासारिखें आहे; जसें ह्मटलें आहे कीं, "सर्व मेजें ओक व मळ यांनीं भरलीं आहेत; कांहीं निर्मल जागा नाहीं."§ परंतु जे तिघे एका मेजावर जेवतात, आणि तेथें शास्त्राच्या गोष्टी करितात, तर त्यांनीं सर्व व्यापक देवाच्या मेजावरून खाल्ल्यासारिखें आहे. जसें ह्मटलें आहे कीं, "आणि तो मला बोलला कीं, जें मेज परमेश्वरासमोर असतें तें हेंच आहे." ¶

४ रिब्बी हाखीनाय ह्मणतो, पाहा, रात्रीं भटकणारा, मार्गानें एकटाच प्रवास करणारा, आणि व्यर्थतेकडे आपलें मन वळविणारा, आपल्याच जीवाविरुद्ध दोष करितो.

५ हाकानाचा पुत्र रिब्बी नेहुनया ह्मणतो, जो शास्त्राचा

---

* मलाखी. ३, १६. † विलाप. ३, २८.
‡ या इब्री शब्दाचा अर्थ मूर्त्ति असाहि होतो.
§ यशाया २८, ८. ¶ येहेजकेल ४१, २२.

अधिकार आपणावर मान्य करितो, तो राज्याधिकारापासून व संसाराच्या अधिकारापासून मोकळा होतो; परंतु जो आपणावरून शास्त्राचा अधिकार उडवितो, त्याजवर राज्याधिकार व संसाराचा अधिकार बसेल.

६ हानानया गावांत राहणारा दोसाचा पुत्र रिब्बी हालाफता ह्मणतो, जे दाहा जण (एकत्र) बसून शास्त्राभ्यास करितात, त्यांजवर शेखीना पाखर घालितो. असें ह्मटलें आहे कीं, "देव श्रेष्ठांच्या सभेंत उभा राहतो."[1] यावरून पांचहि; कारण असें ह्मटलें आहे कीं, "त्याने आपलें सैन्य पृथ्वीवर नेमिलें आहे".[2] यावरून तीनहि; कारण असें ह्मटलें आहे कीं, "तो अधिकाऱ्यांमध्यें न्याय ठरवितो".[3] यावरून दोघेहि; कारण असें ह्मटलें आहे कीं, "तेव्हां जे परमेश्वराचें भय धरीत असत, ते परस्परें बोलत होते; आणि परमेश्वराने कान देऊन ऐकिलें".(इत्यादि)[4] यावरून एकहि; कारण असें ह्मटलें आहे कीं, "ज्या प्रत्येक ठिकाणीं मी आपल्या नामाचें स्मरण करवितों, तेथें मी तुझ्याजवळ येऊन तुला आशीर्वाद देईन".[5]

७ बारतोथांत राहणारा रिब्बी येलीएझेर ह्मणतो, जें त्याचें (देवाचें,) त्यांतूनच त्याला दे, कारण तूं व जें तुझें हें सर्व त्याचें. आणि दावीदहि तसेंच ह्मणतो कीं, "अवघें तुझें, आणि तुझ्याच हातांतलें तुला दिल्हें आहे."[6] रिब्बी

---

१ गीत ८२, १.
२ आमोस. ९,६.
३ गीत ८२,१.
४ मलाखी ३,१६.
५ निर्गम २०,२४.
६ कालवृत्तांत २९,१४.

शिमओन ह्मणतो, कीं जो मार्गानें शास्त्राचें ध्यान करीत चालतो; परंतु तें आपलें ध्यान सोडून हें झाड किती सुंदर, हा मळा किती सुंदर असें ह्मणतो, तो आपल्याच जीवाविरुद्ध दोषी आहे असें शास्त्रांत मानिलें आहे.

८ रिब्बी योनायचा पुत्र रिब्बी दोसेथाय ह्मणतो, कीं जो आपल्या अभ्यासांतून एकादी गोष्ट विसरतो, तो आपल्याच जीवाविरुद्ध दोषी आहे असें शास्त्रांत मानिलें आहे; जसें म्हटलें आहे कीं, "केवळ तूं आपल्याला संभाळ, म्हणजे आपला जीव फार संभाळ कीं, ज्या गोष्टी तुझ्या दृष्टीस पडल्या, त्या कदाचित तूं विसरशील.[1]" असेंहि होईल, कीं त्याचा धडा कठीण असेल. याविषयीं शास्त्र असें म्हणतें कीं, "तुझ्या आयुष्याच्या सर्व दिवसांत त्या तुझ्या हृदयांतून कदाचित जातील;[1]" असें असल्यास तो जाणून [2] त्यांस आपल्या हृदयांतून दूर करीपर्यंत तो आपल्या जीवाविरुद्ध दोषी होत नाहीं. दोसाचा पुत्र रिब्बी हानीना म्हणतो, ज्यास बुद्धीपेक्षां पापाचें भय अधिक, त्याची बुद्धि स्थिर राहते; परंतु ज्यास पापाच्या भयापेक्षां बुद्धि अधिक, त्याची बुद्धि स्थिर राहत नाहीं.

९ तो ह्मणत असे कीं, ज्याचीं सत्कर्में त्याच्या बुद्धीपेक्षां अधिक असतात त्याची बुद्धि स्थिर राहाते; परंतु ज्याची बुद्धि त्याच्या सत्कर्मांपेक्षां अधिक असते, त्याची बुद्धि स्थिर राहात नाहीं. तो ह्मणत असे कीं, ज्या कोणाविषयीं मनुष्यमात्रांचा आत्मा संतोषित असतो, त्याजविषयीं विश्वं-

---

१ अनुवाद. ४,९. २ इ. बसून.

भराचा आत्माहि संतोषित असतो; परंतु ज्या को-णाविषयीं मनुष्यमात्रांचा आत्मा संतोषित नसतो, त्याज-विषयीं विश्वंभराचा आत्माहि संतोषित नसतो. होखीनासाचा पुत्र रिब्बी दोसा ह्मणतो, सकाळची नीज, दोन प्रहरची दारू, लहान मुलांबरोबरचें भाषण, आणि मूर्खांच्या मंड-ळींत बसणें मनुष्यास जगांतून नाहींसें करितात.

१० रिब्बी येलिएझेर हाम्मोदाय ह्मणतो, जो पवित्र पदार्थ विटाळितो, पर्वणी धिक्कारितो, बहुतांमध्यें आपल्या शेजाऱ्यास विस्मित करितो, आपला बाप आब्राहाम याचा करार [१] मोडितो, आणि शास्त्रांतील गोष्टींचा अर्थ रीतीप्रमाणें सांगत नाहीं, तो जरी शास्त्र पढलेला अ-सला, आणि त्याच्या हातून सत्कर्में घडलीं असलीं, तरी त्यास पुढील जगांत विभाग नाहीं.

११ रिब्बी इश्माएल ह्मणतो, श्रेष्ठासीं नम्रतेनें आणि कनिष्ठासीं मायेने वाग, आणि सर्व मनुष्यांचें आगतस्वागत हर्षानें कर.

१२ रिब्बी आकीबा ह्मणतो, हासणें आणि मस्करी यांकडून बदफैलाची सवय लागते. शास्त्राची कुंपण मासोरेथ, [२] द्रव्याची कुंपण दाहावा भाग, [३] इंद्रियदमनाची

१ हा सुंतेचा करार.

२ मासोरेथ या नांवाच्या इब्री ग्रंथास शास्त्राची कुंपण असें नांव आहे. शास्त्राचा लेख कोणी पालटूं नये ह्मणून सुज्ञ जनांनी शास्त्रांतील सर्व पुस्तकांचे अध्याय, ओंव्या, शब्द, अक्ष-रें व स्वरांचीं चिन्हें यांजवर एक ग्रंथ रचिला आहे, त्यास मासोरेथ हें नांव दिल्हें आहे.

३ शास्त्रांत लिहिल्याप्रमाणें उत्पन्नाचा दाहावा भाग परो-पकाराकडे लाविल्याने ईश्वरकृपेने द्रव्यास कांहीं भय नसतें.

कृपण नवस,[१] आणि शाहाणपणाची कृपण मुकें राहणें.

१३ तो ह्मणत असे कीं, मनुष्य ईश्वराने आपल्या प्रतिमेसारिखा उत्पन्न केला आहे, ह्मणून तो प्रिय आहे; परंतु त्यास ईश्वराने आपल्या प्रतिमेसारिखा उत्पन्न केला, याजवरून त्यावरील अधिक प्रीति दिसून येते. जसें ह्मटलें आहे कीं, देवाच्या प्रतिमेप्रमाणें मनुष्यास घडलें."[२] इस्राएलांस विश्वंभराचीं लेंकरें ह्मटलें आहे, ह्मणून ते प्रिय आहेत; परंतु त्यांस विश्वंभराचीं लेंकरें ह्मटलें आहे, यावरून त्यांजवरील अधिक प्रीति दिसून येते. जसें ह्मटलें आहे कीं, "तुह्मी आपला देव परमेश्वर याचीं लेंकरें आहां.[३]" इस्राएलांस प्रीतिपात्र[४] दिल्हें, ह्मणून ते प्रिय आहेत; परंतु ज्याकडून पृथ्वी उत्पन्न झाली तें प्रीतिपात्र त्यांस दिल्हें, यावरून त्यांजवरील अधिक प्रीति दिसून येते. जसें ह्मटलें आहे कीं, मी तुह्माला उत्तम विद्या देतों, माझा नेम सोडूं नका. ५

१४ सर्व गोष्टी पाहिल्या जातात, आणि (मनुष्यास) पूर्ण मोकळीक दिल्हेली आहे. आणि जगाचा न्याय चांगुलपणनें होतो; आणि जसीं कृत्यें अधिक असतील तसें ठरतें.

---

१ कोणताहि गोष्ट आपले हातून सुटत नसली, तर ती न करण्याविषयीं शपथ पूर्वक नवस करावा, ह्मणजे शपथ तुटण्याच्या भयामुळें तरी सुटेल.

२ उत्पत्ति ९, २१. ३ अनुवाद १४, १.

४ सीनायवर दिल्हेलें शास्त्र. ५ नीति ४, २.

१५ तो ह्मणत असे कीं, सर्व गोष्टी हमीवर दिल्ह्या जातात, आणि सर्व प्राणिमात्रांवर जाळें पसरलेलें आहेच. दुकान उघडें आहे, दुकानदार जम्मा उधार घेत आहे, खातें उघडें आहे, आणि हात लिहीत आहे; ज्या कोणांस कर्ज काढणें आहे त्यांनी येऊन घ्यावें. परंतु वसूल करणारे प्रति दिवस फिरत आहेत; आणि मनुष्य मान्य असो किंवा नसो, यद्यपि ते (त्यापासून) फेड करून घेतात; कारण त्यांच्या हातीं मोठी सत्ता आहे; न्याय यथार्थ आहे, आणि मेजवानीची सर्व (सामग्री) तयार आहे.*

१६ आजार्याचा पुत्र रिब्बी येलीएझेर ह्मणतो, शास्त्राभ्यास नसल्यास सभ्यता नसते; सभ्यता नसल्यास शास्त्राभ्यास होत नाहीं; ज्ञान नसल्यास ईश्वरभय नसतें, ईश्वरभय नसल्यास ज्ञान नसतें. विद्या नसल्यास चातुर्य नसतें; चातुर्य नसल्यास विद्या होत नसते; आहार † नसल्यास शास्त्राभ्यास होत नाहीं; शास्त्राभ्यास नसल्यास आहार मिळत नाहीं.

१७ तो ह्मणत असे कीं, ज्या सर्वांचें ज्ञान त्यांच्या

---

* मनुष्यांस सर्व गोष्टी त्याच्या कर्माप्रमाणें मिळतात. सर्वकाळ त्याचे पदरीं मरण आहेच; सर्वांस इच्छेप्रमाणें वर्तण्याची मोकळीक आहे; आणि सर्व गोष्टी देवापुढें लिहिल्या जातात. ज्या कोणास दुराचार करून शिक्षेस पात्र होण्याची इच्छा असेल त्यानें व्हावें; परंतु शेवटीं मरण येऊन त्यांस बळेंकरून शिक्षा होईल. परंतु जे सदाचरणानें वर्ततात त्यांसाठीं सुख राखून ठेविलें आहे.

† इ. पीठ.

कर्मांपेक्षां अधिक असतें, ते कशासारिखे असतात? ज्या झाडाच्या डाहाळ्या अधिक आणि मुळें थोडीं असतात, आणि हवा येऊन त्यांस उपटून पालथें पाडिते त्यासारिखे. जसें ह्मटलें आहे कीं, "आणि तो जंगलांतल्या झुडपासारिखा होईल, आणि जेव्हां कुशल येतें तेव्हा तें तो अनुभवणार नाहीं आणि रानांतल्या सुक्या जाग्यांत खाऱ्या न वसलेल्या भूमींत वस्ती करील."[1] परंतु ज्यांचीं कर्में त्यांच्या ज्ञानापेक्षां अधिक असतात, ते कशासारिखे असतात? ज्या झाडाच्या डाहाळ्या थोड्या असून मुळें फार असतात, आणि पृथ्वींतील सर्व हवा येऊन त्यांजवर वाहिली तरी ती त्यांस त्यांचे जागेवरून हालवण्यासहि शकणार नाहीं; जसें ह्मटलें आहे कीं, "आणि तो पाण्याजवळ लाविलेल्या झाडासारिखा होईल, जें आपलीं मुळें ओघाजवळ पसरितें, आणि जेव्हां झळ येती तेव्हां तिला अनुभवीत नाहीं, आणि त्याचें पान हिरवेंगार राहतें; आणि सुकव्याच्या वर्षांत तें चिंताक्रांत होत नाहीं, आणि फल देणें सोडीत नाहीं."[2]

१८ हिसमाचा पुत्र रिब्बी येलीएझेर ह्मणतो, पारव्याचे[3] आणि ऋतूचे नियम मुख्य आहेत;[4] आणि ज्योतिष व भूमिति ज्ञानाचे शृंगार आहेत.

---

१ इर्मया १७,६. २ इर्मया १७,८. ३ इ. घरोट्याचे.
४ पक्षांचे नियम व ऋतूचे नियम हे मिशनामध्यें दोन भाग आहेत; त्यांत स्त्रियांच्या शुद्धतेचा विषय आहे, आणि ते नियम निष्ठेने राखले पाहिजेत.

अध्याय ४.

१. बेन झोमा ह्मणतो, सुज्ञ कोण? जो सर्व मनुष्यांपासून (कांहीं तरी) शिकतो तो; जसें ह्मटलें आहे कीं, "मी आपल्या सर्व शिक्षकांपासून बुद्धि मिळविली."[1] शूर कोण? जो आपले मनोविकार जिंकतो तो; जसें ह्मटलें आहे कीं, "मंद क्रोध पराक्रम्यापेक्षां, आणि जो आपला आत्मा स्वाधीन ठेवितो, तो नगर हल्ला करून घेणाऱ्यापेक्षां उत्तम आहे"[2] श्रीमंत कोण? जो आपले भाग्यांत आनंद मानितो तो; जसें ह्मटलें आहे कीं, "तूं आपल्या हाताचें कष्टफल खाशील, तूं धन्य, आणि तुझें कल्याण होईल;"[3] (ह्मणजे) या जगीं तूं धन्य, आणि पुढील जगीं तुझें कल्याण होईल. प्रतिष्ठित कोण? जो मनुष्यमात्रांचा आदर करितो तो; जसें ह्मटलें आहे कीं, "जे मला मानितात त्यांचा मान मी करीन; परंतु जे मला अवमानितात ते अवमानित होतील."[4]

२. बेन उज्जाय ह्मणतो, जशी मोठी तशी लहान आज्ञा पाळण्याकरितां त्वरा कर, आणि उल्लंघनापासून पळ काढ; कारण एक आज्ञा दुसऱ्या आज्ञेचें कारण, आणि एक दोष दुसऱ्या दोषाचें कारण होतें; आणि

---

१ गीत ११९, ९९. २ नीति १६,३२.
३ गीत १२८,२. ४ शमुएल २,३०.

एका आज्ञेचें प्रतिफल दुसरी, आणि एका दोषाचें प्रतिफल दुसरा दोष होतो.*

३. तो म्हणत असे कीं, कोणत्याहि मनुष्याचा तिरस्कार मानूं नको; आणि कोणत्याहि पदार्थाशीं प्रतिकूल असूं नको; कारण ज्यास प्रसंग सांपडत नाहीं असा कोणीहि मनुष्य नाहीं, आणि ज्यास स्थल नाहीं असा कोणताहि पदार्थ नाहीं. †

४. याब्नेत राहणारा रिब्बी लेवीतास म्हणतो, अति नम्र आत्म्याचा हो; कारण मनुष्याची प्रतीक्षा किड्याप्रत आहे.

५. बेरोकाचा पुत्र रिब्बी योहानान म्हणतो, जे कोणी ईश्वराचें नाम गुप्तांत विटाळितात, त्यांस उघड शासन होईल; जो न जाणून तें नाम विटाळितो तो, आणि जो जाणून विटाळितो तो, हे (सारिखेच दोषी आहेत.)

६. रिब्बी इस्माएल म्हणतो, जो शिकविण्याच्या संकेतानें शिकतो, त्याच्या हातीं शिकण्याचें व शिकविण्याचेंहि सामर्थ्य येतें; परंतु जो त्याप्रमाणें वर्तण्याच्या

---

* ज्याचे हातून एक सत्कर्म घडलें त्याचे हातून दुसरें सहज घडेल; परंतु ज्यानें एक लबाडी केली त्यास ती लपविण्याकरितां दुसरी करावी लागते.

† कोणत्या मनुष्याशीं केव्हां प्रसंग पडेल, आणि कोणत्या वस्तूचें केव्हां अगत्य पडेल हें माहीत नसतें, ह्मणून सर्वांशीं प्रीतीनें वागावें, आणि कोणतीहि वस्तु वेळेवर सांपडावी, ह्मणून ती हाताजवळ राखून ठेवावी.

संकेतानें शिकतो, त्याच्या हातीं शिकण्याचें, शिकविण्याचें, सांभाळण्याचें व त्याप्रमाणें वर्तण्याचेंहि सामर्थ्य येतें. रिब्बी सादोक म्हणतो, तूं (आपल्या बुद्धीचा) उपयोग थोरपणा मिळविण्याकरितां मुगुटासारिखा अथवा छेदण्याकरितां कुऱ्हाडीसारिखा करूं नको. कारण हिलेल असें म्हणत असे कीं, जो ईश्वरी नामानें गुण करूं पाहतो तो भस्म होतो. यावरून तूं जाण कीं, शास्त्राच्या वचनावरून आपणास लाभ करून घेतो, तो जगांतून आपलें आयुष्य खुंटितो.

७. रिब्बी योसे म्हणतो, जे कोणी शास्त्राचा सन्मान करितात, ते स्वतां मनुष्यमात्रांकडून सन्मान पावतात; परंतु जे कोणी शास्त्रास अवमानितात ते स्वतां अवमानिले जातील.

८. जो आपणास न्याय (करण्यापासून) दूर राखितो तो आपणास हेवा, चोरी आणि खोटी शपथ यांपासून टाळितो; परंतु न्याय करण्यांत जो गर्व मानितो, तो मूर्ख, दुष्ट आणि उन्मत्त आहे.

९. तो म्हणत असे कीं, तूं एकटाच न्यायाधीश होऊं नको; कारण एकावांचून* एकटा न्यायाधीश दुसरा कोणी नाहीं; आणि माझेंच मत मान्य करा असें म्हणूं नको; कारण इतरांस (आपल्या मताप्रमाणें वर्तण्यास) मोकळीक आहे, परंतु तुला (त्यांवर बलात्कार करण्यास अधिकार) नाहीं.

---

* ईश्वरावांचून.

१०. रिब्बी योनाथान म्हणतो, जे, दरिद्रावस्थेंत शास्त्रांतील आज्ञांप्रमाणें वर्ततात, ते शेवटीं सधन झाल्यासहि त्यांप्रमाणें वर्ततील; परंतु जे सधन असतां शास्त्रास अवमानितात, ते शेवटीं दरिद्रावस्थेंतहि तें अवमानितील.

११. रिब्बी मेईर ह्मणतो, प्रपंच उणा करून शास्त्राभ्यासाकरितां श्रम घे; आणि सर्व मनुष्यांसमोर नम्र आत्म्याचा हो. जर एक वेळ तूं शास्त्राभ्यास सोडलास, तर मग तुला पुष्कळ अडथळे येतील; परंतु शास्त्राभ्यासाकरितां जर श्रम घेतलेस, तर तुला मोठें वेतन दिल्हें जाणार आहे.

१२. याकोबाचा पुत्र रिब्बी येलीएझेर ह्मणतो, जो एक आज्ञा पूर्ण करितो, तो आपणाकरितां एक स्वपक्षवक्ता * मिळवितो; परंतु जो एक उल्लंघन करितो, तो आपणाकरितां एक वादी † उत्पन्न करितो. पश्चात्ताप आणि सत्कर्में या शासनापुढें ढाली आहेत.

१३. रिब्बी योहानान हासानदेलार ह्मणतो, ज्या सर्व मंडळ्या ईश्वरी नामाकरितां असतात, त्या शेवटीं स्थापित होतील; परंतु ज्या ईश्वरी नामाकरितां नसतात त्या शेवटीं स्थापित होणार नाहींत. शामुवाचा पुत्र रिब्बी येलीएझेर ह्मणतो, तुझ्या शिष्याचा लौकिक तुझ्या लौकिकासारिखा तुला प्रिय असो; आणि तुझ्या मित्राचा लौकिक तुझ्या गुरूच्या भयासारिखा, आणि तुझ्या गुरूचें भय दे-

* आपल्या तर्कानें समजविणारा.

† आपल्याविरुद्ध साक्ष देणारा.

वाच्या भयासारिखें तुला असो. रिब्बी येहुदा ह्मणतो, शास्त्राभ्यासाविषयीं सावध ऐस, कारण त्यांत चूक पडली असतां हट्टानें केलेल्या अपराधासारिखी गणिली जाते. रिब्बी शिमओन ह्मणतो, तीन मुगुट आहेत, ते हे,— शास्त्राचा मुगुट, आचार्यपणाचा मुगुट, आणि राजकीय मुगुट; परंतु सुकीर्तीचा मुगुट सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे.

१४. रिब्बी नेहुराय ह्मणतो, ज्या ठिकाणीं शास्त्र असेल तेथें तूं जा; आणि तें तुझ्या मागें येईल आणि तुझे मित्र तें तुझ्या हातीं स्थापन करून देतील असें ह्मणूं नको; आणि तूं आपल्याच बुद्धीवर भरंवसा ठेवूं नको.

१५. रिब्बी योनाय ह्मणतो, दुष्टांचा उत्कर्ष आणि सात्विकांची शिक्षा आपल्या स्वाधीन नाहीं. हारेशाचा पुत्र रिब्बी मत्ताय ह्मणतो, सर्व मनुष्यांचें क्षेम विचारण्यास सिद्ध ऐस; आणि सिंहाचें पुच्छ होऊन राहा, परंतु कोल्ह्याचें डोकें होऊं नको.*

१६. रिब्बी याकोब ह्मणतो, हें जग पुढील जगापुढें दिवाणखान्याच्या पुढील कोठडीसारिखें आहे; तर जेवणाच्या दिवाणखान्यांत तूं जावेंस ह्मणून तूं आपणास दिवाणखान्याच्या पुढील कोठडींत सिद्ध कर.†

१७. तो ह्मणत असे कीं, या जगीं पश्चात्तापांत व सत्कर्मांत खर्चिलेला एक तास पुढील जगांतील सर्व जी-

---

* शाहाण्याचा चाकर व्हावें, परंतु मूर्खाचा धनी होऊं नये.

† पुढील जगाचा सुखानुभव मिळावा ह्मणून या जगीं सत्कर्मे करून पुढील जगीं जाण्यास सिद्ध असावें.

वनापेक्षां उत्तम आहे; आणि पुढील जगांतील जीवाच्या समाधानाचा एक तास, या जगांतील सर्व जीवनापेक्षां उत्तम आहे.

१८. येलीएझेरचा पुत्र रिब्बी शिमओन ह्मणतो, क्रोधाच्या वेळीं तूं आपल्या मित्रास शांत करायास, त्याच्या (आप्ताचें) प्रेत त्यापुढें असतां त्यास समजवायास, तो जेव्हां कांहीं नवस करितो तेव्हां त्याविषयीं त्यास विचारायास, आणि त्याचे अरिष्टाचे वेळेस त्यास भेटायास जाऊं नको.*

१९. धाकटा शेमुएल ह्मणतो, तुझा शत्रु पडला तर तूं आनंद मानूं नको; आणि तो ठेंचळला असतां तूं हसूं नको; नाहीं तर परमेश्वर तें पाहील आणि त्याच्या दृष्टींत वाईट येईल, आणि तो आपला राग त्यावरून फिरवील.

२०. आबुयाचा पुत्र येलीशा ह्मणतो, जो लहान मुलास शिकवितो, तो कोणासारिखा आहे? तो कोऱ्या कागदावर लिहिणाऱ्यासारिखा आहे. आणि जो वृद्धास

---

* क्रोधाच्या वेळीं कोणापुढें जाऊं नये, कारण तो मित्र असला तरीं कदाचित् आपलाहि अपमान करील, आणि त्याच्या (आप्ताचें) प्रेत त्यापुढें असतां तो समजणार नाहीं, आणि ज्या गोष्टीविषयीं त्यानें नवस केला ती गोष्ट गुप्त असल्यास अथवा स्वल्प रीतीनें त्याला साध्य झाली असल्यास त्याच्यानें ती आपणाजवळ सांगतां येणार नाहीं, आणि त्यावर अरिष्ट येतांच त्याच्या भेटीस गेलें असतां तो विस्मित होईल. ह्मणून तसें करूं नये, हीं सभ्यतेचीं लक्षणें आहेत.

शिकवितो तो कोणासारिखा आहे? तो मळीण कागदावर लिहिणाऱ्यासारिखा आहे.*

२१. बाबेलेंतील एका गावांत राहणारा येहुदा याचा पुत्र रिब्बी योसे ह्मणतो, जो लहान मुलांपासून शास्त्र शिकतो तो कोणासारिखा आहे? तो आंबट द्राक्षें खाणारा आणि नवा द्राक्षरस पिणाऱ्यासारिखा आहे. आणि जो वृद्धांपासून शिकतो तो कोणासारिखा आहे? तो पिकलेलीं द्राक्षें खाणारा आणि जुना द्राक्षरस पिणाऱ्यासारिखा आहे. रिब्बी मेईर ह्मणतो, शिशाकडे पाहूं नका, परंतु त्यांत जें असतें त्याकडे पाहा; कारण नव्या शिशांत जुना द्राक्षरस असतो, परंतु जुन्या शिशांत नवा द्राक्षरसहि नसतो.†

२२. रिब्बी येलीएझेर हाक्कापर ह्मणतो, हेवा, मोह, आणि थोरपणाचा लोभ मनुष्यास जगांतून नाहींसें करितात.

२३. तो म्हणत असे कीं, जन्मलेले ते मरणार, मेलेले (पुन:) जीवंत होणार; जीवंत झालेल्यांचा न्याय होणार; अशाकरितां कीं, आपण जाणावें व समजावें

---

* लहान मुलांस विद्या शिकविली असतां त्याचे मनीं ठसते व तो विसरत नाहीं, कारण त्याचें मन प्रपंचांत पडलेलें नसतें; परंतु वृद्धांचें मन प्रपंचांत फार गुंतलेलें असतें, ह्मणून त्याच्याने बहुधा विद्या होत नाहीं.

† मनुष्याच्या वयावरून बुद्धीचें अनुमान होत नाहीं; कारण, कित्येक तरुण चतुर असतात आणि कित्येक वृद्ध अज्ञान असतात.

आणि आपणांस कळावें कीं देव, खंडणारा, उत्पन्न करणारा, बुद्धिवंत, न्यायाधीश, साक्ष, फिर्याद करणारा, तोच; आणि तोच पुढें न्याय करणारा. तो धन्य; कीं त्याजपुढें दुष्टाई, विसर पडणें, तोंडओळख धरणें, किंवा लांच घेणें हे कांहींच नाहीं; कारण सर्व त्याचेंच आहे. आणि जाण कीं, सर्व हिशोबाप्रमाणें होईल; आणि कबर तुझें आश्रयस्थान होईल असा तूं आपल्या विचारावरून भरंवसा ठेवूं नको; कारण तुझ्या इच्छेविरुद्ध तूं उत्पन्न झालास, तुझ्या इच्छेविरुद्ध तूं जन्मलास, तुझ्या इच्छेविरुद्ध जीवंत आहेस, तुझ्या इच्छेविरुद्ध तूं मरशील, आणि तुझ्या इच्छेविरुद्ध राजा, राजांचा राजा, पवित्र व धन्य (देव) यासमोर तुला झडती व हिशोब द्यावा लागेल.

अध्याय ५.

१. दाहा शब्देंकरून* ईश्वरानें जग उत्पन्न केलें; परंतु असें कां ह्मटलें आहे? तो एक शब्देंकरून तें उत्पन्न करूं शकला नसता काय? (होय;) परंतु जे दुष्ट दाहा शब्देंकरून उत्पन्न झालेल्या जगाचा नाश करूं पाहतात त्यांस शासन करण्याकरितां; आणि जे यथार्थ

---

* उत्पत्तीच्या पहिल्या अध्यायांत "देव ह्मणाला, उजेड होवो;" "देव ह्मणाला, पाण्याच्यामध्यें अंतराळ होवो." अशा आज्ञा नऊ वेळा सांपडतात. आणि याचप्रमाणें आकाश आणि पृथ्वी होवो अशी देवाने आज्ञा केली असावी असें अनुमान होतें. याप्रमाणें ईश्वराकडून दाहा वेळ आज्ञा होऊन हें जग उत्पन्न झालें.

दाहा शब्देंकरून उत्पन्न झालेल्या जगास स्थापन करूं पाहतात त्यांस चांगलें वेतन देण्याकरितां तसें केलें.[1]

२ आदामापासून नोहापर्यंत दाहा पिढ्या[२] झाल्या; त्यावरून ईश्वरापाशीं किती सहनशलिता आहे हें कळून येतें; कारण तो त्यांवर प्रलय आणी तोंपर्यंत त्या सर्व पिढ्यांनी त्यास चेतविलें. नोहापासून आब्राहामापर्यंत दाहा पिढ्या[३] झाल्या, त्यावरून त्यापाशीं किती सहनशीलता आहे हें कळून येतें; कारण आपला बाप आब्राहाम येऊन सर्वांचें वेतन आपणच मिळवीपर्यंत त्या सर्वांनी त्यास चेतविलें.

३ आपला बाप आब्राहाम याच्या दाहा परिक्षा[४] करून (ईश्वराने) ताडलें, आणि त्या सर्वांतून तो पार पडला; यावरून आपला बाप आब्राहाम याची देवावर केवढी प्रीति होती हें कळून येतें.

---

१ ईश्वरास एक शब्देंकरून जग उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असतां, जसें त्याने दाहा शब्देंकरून तें उत्पन्न केलें; तसें ईश्वर दुष्टास पहिल्या अपराधाकरितां शासन करीत नाहीं, परंतु अनेक वेळा क्षमा केल्यावर शिक्षा करितो; आणि एकच सत्कर्म केल्याने नव्हे, परंतु सर्वकाळ सदाचरणाने वर्तल्यास ईश्वराची दया होते; आणि दाहापट किंवा हजारपट चांगलें वेतन मिळतें.

२ आदाम, शेथ, येनोश, केनान, माहालालएल, यारेद, हानोख, मेथुशेला, लामेख, आणि नोहा.

३ शेम, आर्फाक्षाद, शेलाह, एबेर, पेलेग, रेऊ, शरूग, नाहोर, तेरा आणि आब्राहाम.

४ वर्षप्रतिपदेची प्रार्थना टीका ८ पाहा.

४ आपल्या पूर्वजांकरितां मिसरांत दाहा चमत्कार [1] आणि (सूफ) समुद्रावर दाहा चमत्कार [2] झाले. पवित्र व धन्य (देवानें) मिसरी लोकांस मिसरांत दाहा प्रकारची [3] आणि समुद्रावर दाहा प्रकारची [4] शिक्षा लाविली.

---

१ सर्व मिसर देशावर आणिलेल्या दाहा पटक्यांतून आपल्या पूर्वजांस दाहा वेळ रक्षिलें.

२ सूफ समुद्रावर केलेले दाहा चमत्कार येणेंप्रमाणें;–१ पाणी दुभागलें. २ दोहीं बाजूंस व वरहि पाणी जमून मधून वाट झाली. ३ त्याच्या मार्गांत चिखल नसून कोरडया भूमीवरून ते चालले. ४ मिसरी लोक चिखलांत रुतून बुडाले. ५ प्रत्येक वंशास एक अशा अर्धवर्तुलाकार बारा वाटा झाल्या. ६ पाणी जमून कठीण दगडासारिखें झालें. ७ त्या जमलेले पाण्याचा एकच तुकडा झाला नाहीं, परंतु निरनिराळे तुकडे होऊन रचल्यासारखे होते. ८ तें जमलेलें पाणी लखलखित व कांचेसारिखें पारदर्शक होतें; असें कीं, निरनिराळ्या वाटेनें जाणारे लोक एक प्रत्येकास पाहूं शकत असत. ९ थिजलेल्या पाण्यावरून त्यांस पिण्याकरितां गोडें पाणी उतरत असे. १० तें गोडें पाणी त्यांनीं प्यावें ह्मणून एकत्र होत असे, आणि ते प्याल्यावर तें जमत असे.

३ मिसरी लोकांस मिसरांत लाविलेल्या दाहा शिक्षा, निर्गम अध्याय ७ पासून अध्याय १२ चे शेवटपर्यंत सांपडतात.

४ या शिक्षा निर्गम अध्याय १५ एथें सर्व सांपडतात. १ घोडा व त्यावरील स्वार समुद्रांत टाकिला. २ रथ व त्याचें सैन्य समुद्रांत उडविलें. ३ निवडलेले सरदारहि समुद्रांत बुडाले. ४ अगाध जळांनीं त्यांस झांकिलें. ५ ते धोंडयासारिखे तळीं गेले. ६ शत्रूला आपटून टाकिलें. ७ त्यांस

आपल्या पूर्वजांनीं रानांत दाहा वेळ पवित्र व धन्य (देवाची) परीक्षा करून त्यास ताडून पाहिलें.* जसें ह्मटलें आहे कीं, "आणि त्यांनीं या दाहा वेळा माझी परीक्षा केली, आणि माझा शब्द ऐकिला नाहीं."†

५. आपल्या पूर्वजांकरितां पवित्र मंदिरीं दाहा चमत्कार घडून आले; (ते हे;-) पवित्र अर्पणाच्या मासाच्या वासानें कोणत्याहि स्त्रीचा गर्भपात झाला नाहीं; पवित्र अर्पणाच्या मासास कधींच दुर्गंधी सुटली नाहीं; खाटीकवाड्यांत माशी कधींच दृष्टीस पडली नाहीं; प्रायश्चित्ताच्या दिवशीं मुख्य उपाध्यास कधींच अपाय झाला नाहीं; रचिलेल्या लांकडांची आग पावसानें कधींच विझाली

पाडिलें. ८ ते भुसासारिखे नष्ट झाले. ९ समुद्रानें त्यांस आच्छादिलें. १० शिस्यासारिखे बुडाले; परंतु पृथ्वीनें त्यांस गिळलें हें त्यांत गणलें नाहीं. याचें कारण असें कीं, जरी ते स्वाभाविक मरणानें मेले असते, तरी त्यांस भूमींतच पुरलें असतें.

* इस्रायलांनी ईश्वराची रानांत दाहा वेळा परीक्षा केली ती येणेंप्रमाणें;-१ सूफ समुद्राजवळ ह्मणाले कीं, मिसरांत प्रेतस्थलें नव्हतीं ह्मणून त्वां आह्मांस रानांत मरण्यास कां आणिलें कीं काय, २ मारा एथें पाण्याकरितां कुरकुर केली, ३ सीन रानांत अन्नाकरितां कुरकुर केली, ४ कित्येकांनी मोशेचें न ऐकून मान सकाळपर्यंत ठेविलें, ५ शाब्बाथ दिवशीं मान गोळा करायास गेले, ६ रेफीदीमांत पाण्याकरितां कुरकुर केली, ७ होरेब डोंगरावर वांसरूं केलें, ८ ताबएरांत कुरकुर केली, ९ किब्रोथ हात्ताआव्वा एथें मास खावयास मागितलें, १० पारानांत हेरांनीं आणिलेल्या खनान देशाच्या वर्तमानावरून कुरकुर केली. † गणना १४, २२.

नाहीं; खांबासारिखा चढता धूर वाऱ्याने कधींच उधळला नाहीं; ओमेरांत, ओंवाळायाच्या दोन भाकरींत आणि दर्शनीय भाकरींत कधींच खोड सांपडली नाहीं; लोकांस उभें राहायास दाटी होत असे, परंतु नमन करितांना जागा विस्तीर्ण असे; सर्पानें आणि विंचवानें येरुशालेमांत कोणास दंश केला नाहीं; अथवा येरुशालेमांत राहण्यास मला जागेची अडचण आहे, असें कोणीच आपले शेजाऱ्यास ह्मणाला नाहीं.

६ शाब्बाथ दिवसाच्या आदल्या दिवशीं धुंदुकांमध्यें दाहा पदार्थ उत्पन्न झाले, आणि ते हे;– भूमीचें मुख,[१] झऱ्याचें मुख,[२] गाढवाचें मुख,[३] धनुष्यबाण, मान, (मोशेची) काठी, शामीर,[४] अक्षरें, दाहा आज्ञांचा लेख, दाहा आज्ञांच्या पाट्या; आणि कोणी ह्मणतात कीं, भूतें, मोशेची कबर व आब्राहामाचा मेंढाहि; आणि कोणी ह्मणतात, सिद्ध केलेला गावी हें शस्त्रहि.[५]

७ सात गोष्टी मूर्खाच्या अंगीं आणि सात सुज्ञाच्या अंगीं सांपडतात. जो सुज्ञ असतो तो, जो आपणापेक्षां

---

१ जेथें भूमीनें कोऱ्हास गिळलें तें.

२ रानांत जो झरा इस्राएलांबरोबर असे त्याचें मुख.

३ बिलआमाच्या गाढवाचें मुख.

४ शामीर हा एक प्रकारचा किडा होता, ज्याप्रमाणें दगडासारिख्या पदार्थास कापणें असे, त्याप्रमाणें त्या किड्यास चालविला असतां तो पदार्थ कापला जात असे.

५ ईश्वर सर्वज्ञ आहे ह्मणून त्यानें या सर्व गोष्टी उत्पत्तीच्या वेळेपासूनच नेमून ठेविल्या असाव्या.

बुद्धींत अथवा वयांत श्रेष्ठ त्यापुढें बोलत नाहीं, तो आपल्या शेजाऱ्याच्या भाषणामध्यें अडखळा आणीत नाहीं, उत्तर देण्यास त्वरा करीत नाहीं, विषयाची (पूर्ण) चौकशी करून रीतिप्रमाणें उत्तर देतो, पहिल्याविषयीं पहिल्यानें व शेवटल्याविषयीं शेवटीं भाषण करितो, जें ऐकलें नसेल त्याविषयीं (उघड) ह्मणतो कीं, मी तें ऐकलें नाहीं, आणि सत्य कबूल होतो. आणि याच्याच विपरीत गोष्टी मूर्खांत सांपडतात.

८ सात मुख्य दोषांकरितां जगांत सात प्रकारची शिक्षा उद्भवते. कित्येकांनीं (आपल्या उत्पन्नाचा) दाहावा भाग दिल्हा आणि कित्येकांनीं न दिल्हा, तर क्षोभाचा दुष्काळ पडतो, असा कीं कित्येक भूके मरतात, आणि कित्येक तृप्त असतात; परंतु जेव्हां सर्वच देत नाहीं, तेव्हां मोठ्या क्षोभाचा आणि गोंधळाचा दुष्काळ पडतो; आणि पहिल्या उंड्याची भाकर * न वाहिल्यामुळें मोठ्या क्षयाचा दुष्काळ पडतो.

९ ज्या अपराधांविषयीं शास्त्रांत ठार मारण्याची शिक्षा सांगितली आहे, परंतु त्यांची चौकशी न्यायसभेकडून होऊं शकत नसल्यास, अशा अपराधांमुळें, आणि सातव्या वर्षाच्या फळाच्या नियमाकडे दुर्लक्ष झालें असतां जगांत पटकी उठते. न्याय करण्यास विलंब लावला असतां, आणि न्याय पालटला असतां, आणि शास्त्र रीतीप्रमाणें न शिकविलें असतां जगांत तरवार उठते.

---

* गणना. १९. २०.

१० खोटी शपथ वाहिल्यामुळें, आणि पवित्र नाम विटाळल्यामुळें जगांत घातक पशु उठतात. मूर्तिपूजा, व्यभिचार, रक्तपात, आणि भूमीला सातव्या वर्षी विसावा न दिल्हा तर त्यामुळें जगांत दासत्व येतें. पटकी चार वेळ उद्भवते, चवथ्या वर्षी, सातव्या वर्षी, सातव्या वर्षाच्या समाप्तीस आणि वार्षिक सणाच्या शेवटीं. तिसऱ्या वर्षाचा गरीबांचा दाहावा भाग न दिल्ह्यामुळें चौथ्या वर्षी; साहाव्या वर्षाचा गरीबाचा दाहावा भाग न दिल्ह्यामुळें सातव्या वर्षी; सातव्या वर्षाच्या उत्पन्नाच्या नियमाकडे दुर्लक्ष केल्यामुळें सातव्या वर्षाच्या समाप्तीस; आणि गरीबाची दंगगी न दिल्ह्यामुळें वार्षिक सणाच्या शेवटीं पटकी उद्भवते.

११ मनुष्यांत चार गुण असतात. कोणी माझें तें तुझें आणि तुझें तें माझें असें ह्मणतो; हा मूर्ख. कोणी माझें तें माझें आणि तुझें तें तुझें असें ह्मणतो, हा मध्यम गुण, आणि कोणी ह्मणतात कीं, ही सेदोमांतील रीति. कोणी माझें तें तुझें आणि तुझें तेंहि तुझें असें ह्मणतो; हा सात्विक. कोणी माझें तें माझें आणि तुझें तेंहि माझें असें ह्मणतो; हा दुष्ट.

१२ रागाच्या चार प्रति आहेत. जो लवकर रागास चढतो आणि लवकर शांत होतो, त्याच्या लाभापेक्षां हानि मोठी; जो रागास मंद व शांत होण्यासहि मंद त्याच्या हानीपेक्षां लाभ मोठा. जो रागास मंद असून लवकर शांत होतो तो सात्विक. आणि जो रागास लवकर चढतो आणि शांत होण्यास मंद असतो तो दुष्ट.

१३ विद्यार्थ्यांमध्यें चार गुण असतात. जो लवकर समजतो [1] आणि लवकर विसरतो त्याच्या लाभापेक्षां हानि मोठी. जो समजायास मंद असून लवकर विसरत-हि नाहीं, त्याच्या हानीपेक्षां लाभ मोठा. जो लवकर समजतो आणि लवकर विसरत नाहीं, त्यास चांगलें वेतन आहे. परंतु जो समजायास मंद असून लवकर विसरतो, त्यास वाईट वेतन आहे.

१४ दान धर्म करणारांमध्यें चार गुण असतात. जो स्वतां देतो आणि दुसऱ्यांनीं द्यावें असें इच्छीत नाहीं, तो दुसऱ्यांविषयीं दुष्टदृष्टि राखतो. जो दुसऱ्यांनीं द्यावें असें इच्छितो आणि स्वतां देत नाहीं, तो आपणाविषयींच दुष्टदृष्टि राखतो, जो स्वतां देतो आणि दुसऱ्यांनींहि द्यावें असें इच्छितो तो सात्विक. परंतु जो स्वतां देत नाहीं आणि दुसऱ्यानें द्यावें असेंहि इच्छीत नाहीं तो दुष्ट.

१५ विद्यालयांत जाणारांमध्यें चार गुण असतात. जो जातो परंतु शिकत नाहीं, त्यास जाण्याचेंच मात्र वेतन मिळतें. जो शिकतो परंतु जात नाहीं, त्यास त्याचें कष्टफल मिळतें. जो जातो आणि शिकतो तो सात्विक. परंतु जो जात नाहीं आणि शिकतहि नाहीं तो दुष्ट.

१६ सुज्ञांजवळ बसणारांमध्यें चार गुण असतात. ह्मणजे स्पंजासारिखे, गळणीसारिखे, गाळणीसारिखे आणि चाळणीसारिखे; जे सर्वच शोषून घेतात ते स्पंजासारिखे;

---

१ इ. ऐकतो.

जे एका बाजूने ग्रहण करितात आणि दुसऱ्या बाजूने सोडतात ते गळणीसारिखे, ज्यांतून द्राक्षरस बाहेर पडतो आणि गाळ राहातो ते गाळणीसारखे, परंतु ज्यांतून कोंडा बाहेर पडतो आणि धान्य[1] राहातें ते चाळणीसारिखे आहेत.[2]

१७ जी प्रीति (वाईट) कारणाकरितां जडलेली असते, ती तें कारण झाल्यावर लयास जाते; परंतु जी प्रीति वाईट कारणाकरितां जडलेली नसते, ती कधींच लयास जात नाहीं. वाईट कारणाकरितां जडलेली प्रीति ती कोणती ? ही आमनोन व तामार यांमधील प्रीति.[3] आणि जी अशा कारणाकरितां जडलेली नसते, ती दावीद आणि योनाथान यांमधील प्रीति [4]

१८ जे सर्व विवाद ईश्वरी नामाकरितां चालतात ते शेवटीं स्थापन होतात; आणि जे ईश्वरी नामाकरितां नसतात, ते शेवटीं स्थापन होत नाहींत. ईश्वरी नामाकरितां जो विवाद तो कोणता ? हिल्लेल आणि शाम्माय यांमधील विवाद तो. परंतु जो विवाद ईश्वरी नामाकरितां नसतो, तो कोऱ्हा व त्याची मंडळी (यानी मोशेवरोबर) केलेला वाद तो. जो बहुतांस नीतीच्या मार्गाकडे वळवितो त्याचे हातून पाप घडत नाहीं; परंतु जो बहुतांस

---

१ इ. पीठ.

२ कोणी दुसऱ्याचे सर्व गुण अंगिकारतात; कोणी एका कानानें ऐकतात दुसऱ्या कानाने सर्व सोडतात; कोणी चांगले गुण सोडून वाईट गुण अंगिकारतात; आणि कोणी वाईट गुण सोडून चांगले गुण अंगिकारतात.

३ दुसरा शेमुएल अध्याय १३. ४ पहिला शेमुएल १९,२.

पापांत पाडितो, त्याच्या हातून पश्चात्ताप घडत नाहीं. मोशे स्वतां नीतिमान असून त्याने बहुतांस नीतीकडे वळविलें, आणि बहुतांची पुण्याई त्यावर अवलंबून राहिली होती; जसें म्हटलें आहे कीं "त्याने इस्राएलाच्या संगतीं परमेश्वराची नीति व त्याचे न्याय नेम पाळिले."* यारबामाने स्वतां पाप करून बहुतांकडूनहि पाप करविलें; आणि बहुतांचा दोष त्यावर अवलंबून राहिला होता; जसें म्हटलें आहे कीं, "असीं यारबामाने जीं पापें केलीं आणि जीं इस्राएलांकडून करविलीं त्यांमुळें तो त्यांस टाकून देईल." †

१९ ज्याच्या अंगीं या तीन गोष्टी असतात तो आपला बाप आब्राहाम याचे शिष्यांतील एक असा आहे; परंतु ज्याच्या अंगीं त्यांच्या विपरीत गोष्टी असतात तो दुष्ट बिलआमाचे शिष्यांतील एक असा आहे. ज्याची दृष्टि चांगली, जो नम्र आत्म्याचा आणि तृप्त मनाचा तो आपला बाप आब्राहाम याच्या शिष्यांतील एक असा आहे; परंतु ज्याची दृष्टि वाईट, जो उन्मत्त आत्म्याचा आणि क्रोपिष्ट स्वभावाचा तो दुष्ट बिलआमाच्या शिष्यांतील एक असा आहे. आपला बाप आब्राहाम याचे शिष्यांमध्यें आणि दुष्ट बिलआम याचे शिष्यांमध्यें भेद कोणता ? आपला बाप आब्राहाम याचे शिष्य आपल्या श्रमाचे फलाचा या जगीं व पुढील जगींहि उपभोग घेतात; जसें म्हटलें आहे कीं, "जे मजवर प्रीति ठेवितात,

* अनुवाद ३३. २१. † १ राजे. १४. १६.

ते संपत्ति मिळवीत असें म्या करावें म्हणून; आणि त्यांचीं भांडारें मी भरीन." [१] परंतु दुष्ट बिलआमाचे शिष्य नरकवास पावतात आणि नाशाचे खाचेंत उतरतात; जसें म्हटलें आहे कीं, "परंतु हे देवा, तूं त्यांस नाशाच्या खांचेंत उतरविशील; रक्तपाती व कपटी माणसें आपलें अर्धे आयुष्य पावणार नाहींत, मी तर तुजवर आशा ठेवीन."[२]

२० तेमाचा पुत्र येहुदा ह्मणतो, तूं आपल्या आकाशांतील बापाची इच्छा पूर्ण करण्याकरितां चित्याप्रमाणें धीट, गरुडाप्रमाणें हलका, हरिणाप्रमाणें चपळ आणि सिंहाप्रमाणें बळकट हो. तो ह्मणत असे कीं, जे निर्लज्ज ते नरकास व मर्यादशील ते स्वर्गास [३] योग्य आहेत. (तो असी प्रार्थना करीत असे कीं,) हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, पवित्र मंदिर लौकरच आमच्या दिवसांत त्वां बांधावें, असी तुझी प्रसन्नता होऊन तुझें शास्त्र आमचें वतन होऊं दे.

२१ तो असें ह्मणत असे कीं, पांच वर्षांच्या मुलानें शास्त्राभ्यास करावा; दाहा वर्षांच्या वयांत मिशनाचा [४] अ-

---

१ नीति. ८. २१. २ गीत. ५५. २३. ३ एदेनबागास.
४ मिशना ह्मणजे (शास्त्राचा) अनुवाद या नांवाचा एक इब्री ग्रंथ आहे; त्याचे साहा भाग आहेत. हा ग्रंथ रिब्बी येहुदा हाक्कादोश ह्मणजे पवित्र, ज्यास रिब्बी येहुदा हान्नासी ह्मणजे न्यायसभेचा अधिपति असेंहि ह्मणतात, त्यानें रचिला. यांत इस्राएली धर्माच्या संप्रदायाचें निरूपण केलें आहे.

भ्यास करावा; तेरा वर्षांच्या वयांत नेम पाळूं लागावें. पंधरा वर्षांच्या वयांत गेमाराचा १ अभ्यास करावा. अठराव्या वर्षाच्या वयांत लग्न करावें. वीस वर्षांच्या वयांत संसार करूं लागावें; २ तीस वर्षांच्या वयांत तो जोमांत येतो; चाळीस वर्षांच्या वयांत समजदार होतो; पन्नास वर्षांच्या वयांत विचार (सांगण्यास) योग्य होतो; साठ वर्षांच्या वयांत वृद्ध होतो; सत्तर वर्षांच्या वयांत (अगदीं) पिकतो; ऐशीं वर्षांच्या वयांत ईश्वरकृपेने दृढ होतो; नव्वद वर्षांच्या वयांत ध्यान करीत बसतो; आणि शंभर वर्षांच्या वयांत जसा मेला, गेला, आणि जगांतून नाहींसा झाला असा होतो. बेन बाग बाग ३

१ मिशना या ग्रंथावर येरुशालेमांत राहणारा रिब्बी योहानान याने एक टीका केली आहे; आणि दुसरी टीका बाबेलेंत राहणारे रिब्बी आशे व रिब्बी आबीना या दोघांनी रचिली. या दोन्ही ग्रंथांस गेमारा ह्मणजे (शास्त्राची) पूर्णता असें नांव आहे, आणि त्यांची भाषा कालदी भाषेने मिश्रित आहे. मिशना व गेमारा एकत्र असल्यास त्यास तालमुद असें नांव दिल्हें आहे. यावरून एक तालमुद बाबली व एक तालमुद येरुशालमी असे दोन आहेत.

२ द्रव्य संपादण्यास लागावें.

३ बेन बाग बाग आणि बेन हे हे हीं दोन्हीं एकाच मनुष्याचीं नावें आहेत. त्यास निरनिराळ्या कारणावरून हीं दोन नावें पडलीं आहेत. हा कोणी अन्यजातीचा असून त्याने इस्राएली धर्म स्वीकारलेला होता असें ह्मणतात.

ह्मणतो. (शास्त्राविषयीं) पुनः आणि पुनः विचार कर, कारण सर्व गोष्टी त्यांतच आहेत; त्याचें ध्यान करीत वृद्ध हो व त्यांतच केश पिकीव, आणि त्यापासून वळूं नको; कारण तुजकरितां त्यापेक्षां दुसरा कोणताहि गुण श्रेष्ठ नाहीं. बेन हे हे* ह्मणतो, व्यातीसारिखी प्राप्ति आहे.

अध्याय ६.

सुज्ञ जनांनीं मिशनाच्या परिभाषेचा अभ्यास केला; जो त्यांवर आणि त्यांच्या अभ्यासावर आवड ठेवितो तो धन्य.

१ रिब्बी मेईर ह्मणतो, शास्त्राचें ज्ञान व्हावें ह्मणूनच जो त्याचा अभ्यास करितो, त्यास पुष्कळ गोष्टि अनुकूळ असतात एवढेंच नव्हे, परंतु सर्व जग त्यास ऋणी असें आहे. तो प्रिय मित्र, विश्वंभरास प्रिय व मनुष्यमात्रांस प्रिय, विश्वंभरास संतोषविणारा, व मनुष्यमात्रांस संतोषविणारा असा ह्मटलेला आहे. तें (शास्त्र) त्यास नम्रतेने आणि (ईश्वर) भयाने वेष्टितें; सात्विक, यथार्थ, सरळ आणि विश्वासू होण्याच्या मार्गास लावतें, त्यास पापाच्या मार्गापासून दूर राखितें; आणि पुण्याई साध्य होण्याच्या (मार्गा) जवळ नेतें; आणि त्याकडून इतरांस विचार, सुबोध, बुद्धि आणि सामर्थ्य यांचा लाभ होतो; जसें ह्मटलें

---

* पृष्ठ ३९ टीका २ पाहा.

आहे कीं "मसलत व सुबोध हीं माझीं आहेत, मी बुद्धि आहें, मला सामर्थ्य आहे."[१]

२. तें त्यांस राज्य, अधिकार, व न्यायशक्ति देतें, शास्त्राचीं मर्में त्यांपुढें प्रगट होतात, तो वाढत्या झऱ्यासारिखा आहे आणि न खुटणाऱ्या व (नेहमीं) वाहाणाऱ्या नदीसारिखा आहे. तो मर्यादशील, सहनशील व आपणास केलेले अपराधांची क्षमा करणारा असा होतो. तें त्याचें महत्व व वैभव सर्व पदार्थांपेक्षां अधिक वाढवितें. रिब्बी येहोशुवा बेन लेवी ह्मणतो, होरेब डोंगरावरून प्रतिदिवशीं आकाशवाणी निघते, आणि ती असें प्रगट करून सांगते कीं, जे कोणी[२] शास्त्रास अवमानितात त्यांस हायहाय; कारण जे कोणी श्रम घेऊन शास्त्राभ्यास करित नाहींत, ते बहिष्कृत ह्मटलेल आहेत. जसें ह्मटलें आहे कीं, "सुंदर स्त्री विवेकहीन असली तर जसी डुकराच्या नाकाडांत सोन्याची नथ तसी आहे."[३] अणखी असें ह्मटलें आहे कीं, "आणि त्या पाट्या देवाचें काम होत्या, आणि लिहिणें तें देवाचें लिहिणें, पाट्यांवर कोरलेलें असें होतें."[४] या वाक्यांत लिहिल्याप्रमाणें "कोरलेलें" असें वाचूं नका, परंतु "मुक्ति पावलेलें" असें वाचावें; कारण जे शास्त्राभ्यासांत श्रम घेतात त्यांशिवाय दुसरे कोणी मुक्ति पावत नाहींत; यासाठीं कीं, जे शास्त्राभ्यासांत श्रम घेतात, ते थोरपणास चढतात; जसें ह्मटलें आहे कीं,

---

१ नीति.८.१४. २ इ. मनुष्यमात्र. ३ नीति. ११,२२. ४ निर्गम ३२.१६.

" आणि मत्तानापासून नाहालीएलास, आणि नाहालीएलापासून बामोथास."*

३. आणि जो आपल्या मित्रापासून एकादा अध्याय अथवा एकादें वाक्य, अथवा एकादी ओवी, अथवा एकादें अक्षर जरी शिकतो, त्याने त्याचा सन्मान केला पाहिजे. कारण इस्राएलांचा राजा दावीद याने तसेंच केलेलें आढळतें, कीं तो अहितोफेलापासून दोन गोष्टींपेक्षां† कांहीं एक अधिक न शिकला असतां,

---

* गणना २१. १९. मत्ताना, नाहालीएल आणि बामोथ हीं रानांत इस्राएलानी तळ दिल्हेल्या गांवांचीं नावें आहेत. त्या गांवांचा शब्दार्थ पाहिला असतां मत्ताना ह्मणजे देणगी, नाहालीएल ह्मणजे देवाचें वतन; आणि बामोथ ह्मणजे उच्चस्थान. या वाक्याच्या आधारावरून सुज्ञ जनांनी असें सिद्ध केलें आहे कीं, सीनाय डोंगरावर इस्राएलांस शास्त्राची देणगी मिळाल्यावर, त्यांस खनान देशाचें वतन मिळालें आणि त्यानतर त्यांस राज्य इत्यादिक थोरपणा मिळाला. आणि याचप्रमाणें जे कोणी शास्त्राभ्यास करितात त्यांसहि थोरपणा मिळेल.

† अहितोफेलानें दाविदास एकवेळ एकटाच अभ्यास करितांना व पुन: उन्मत्तपणें विद्यालयांत जातांना पाहिल्यावरून दोन्ही वेळा निषेधिलें. कोणी ह्मणतात कीं, तो उन्मत्तपणें नव्हे, परंतु एकटाच गेल्यावरून त्याने त्यास निषेधिलें. एकटाच अभ्यास करीत होता ह्मणून त्यास निषेधिलें याचें कारण असें कीं, त्याजवळ त्याची चूक सुधारण्यास कोणी नव्हता. तो उन्मत्तपणें गेल्यावरून त्यास निषेधिलें याचें कारण, अशा ठिकाणीं ईश्वरभय धरून गेलें पाहिजे. असें नसल्यास तो एकटा गेल्यावरून त्यास निषेधिलें याचें कारण, लोक संगातें असल्यास राजास प्रतिष्ठा येते.

त्यास आपला गुरु, मित्र व ओळखी असें ह्मणाला; जसें म्हटलें आहे कीं, "परंतु माझ्या समान असा मनुष्य, माझा मित्र व माझा ओळखी तो तूंच" १ यावरून असें अनुमान होतें कीं, इस्राएलांचा राजा दावीद, जो अहितोफेलापासून दोन गोष्टी मात्र शिकला म्हणून त्यानें त्यास गुरु, मित्र व ओळखी असें म्हटलें; तर जो आपल्या मित्रापासून एकादा अध्याय, एकादें वाक्य, एकादी ओवी अथवा एकादें अक्षर शिकतो, तर त्यानें त्याचा किती सन्मान राखावा. परंतु शास्त्रावांचून दुसरा कोणताहि सन्मान नाहीं; जसें म्हटलें आहे कीं, "ज्ञानी गौरवाचा विभाग पावतील." २ आणि "जे यथार्थ ते चांगलें वतन पावतील." ३ आणि शास्त्रावांचून (दुसरें) कांहींच उत्तम नाहीं; जसें म्हटलें आहे कीं, "मी तुम्हाला उत्तम विद्या देतों, माझा नेम सोडूं नका."४

४ शास्त्राभ्यास करण्याची रीति अशी आहे,—मीठासंगें भाकर खावी, आणि नेमस्तपणें पाणी प्यावें, भुमीवर निजावें, कष्टांत आयुष्य घालवावें, आणि शास्त्राभ्यासाकरितां श्रम घ्यावे.५ जर तूं असें करितोस तर "तूं सुखी होशील आणि तुझें कल्याण होईल.६" ह्मणजे या लोकीं

१ गीत. ५५,१३. २ नीति. ३,३५. ३ नीति. २८,१०. ४ नीति ४. २. ५ विद्यार्थ्यानें खाण्यापिण्याकडे फारसें लक्ष ठेवूं नये; आणि असें असल्यास तो जरी गरीब असला, तरी त्याकडून विद्या व शास्त्राभ्यास होऊं शकतात. ६ गीत. १२८, २.

तूं सुखी होशील, आणि परलोकीं तुझें कल्याण होईल. तूं स्वतांसाठीं थोरपणा शोधूं नको; आणि तुझ्या विद्येस योग्य त्यापेक्षां अधिक मान मिळण्याचा लोभ धरूं नको. आणि राजांच्या मेजांवर बसण्याची इच्छा ठेवूं नको; कारण त्यांच्या मेजापेक्षां तुझें मेज श्रेष्ठ, आणि त्यांच्या मुगुटापेक्षां तुझा मुगुट श्रेष्ठ आहे; यासाठीं कीं, तुझा यजमान* विश्वासू आहे, तो तुला तुझ्या कष्टाचें फळ देईल.

५. याजकपणा आणि राज्य यांपेक्षां शास्त्र अधिक श्रेष्ठ आहे; कारण राज्य तीस लक्षणांवरून, याजकपणा चोवीस लक्षणांवरून, परंतु शास्त्र अठ्ठेचाळीस लक्षणांवरून साध्य होतें. तीं लक्षणें येणेंप्रमाणें.—अभ्यास, कान देऊन ऐकणें, भाषणांत वक्तृत्व,† समजदार मन, सरळ अंतःकरण, भय, सन्मान, नम्रता, उल्हास, निर्मळपणा, गुरूंची सेवा, मित्रांबरोबर सूक्ष्म विचार, विद्यार्थ्यांशीं संवाद, स्थिरपणा, शास्त्रांतील पुस्तकांचा अभ्यास, मिशनाचा अभ्यास, नेमस्त व्यापार, नेमस्त जगरीति, नेमस्त विलास, नेमस्त निद्रा, नेमस्त भाषण, नेमस्त हसणें, मंद क्रोध, चांगलें मन, गुरूंवर विश्वास, (धैर्यानें) संकटें सहन करणें.

६ स्वतांचे स्थितीचें ज्ञान, स्वतांच्या भाग्यांत तृप्ति, भाषणांत सावधपणा, आपस्वार्थीपणाचा त्याग, विश्वंभरावरील प्रीति व त्याची प्रीति संपादणें, मनुष्यमात्रांवरील प्रीति, यथार्थतेची आवड, सरळ गोष्टींची आवड, सुबोधाची आवड, थोरपणाचा त्याग, आपल्या विद्येच्या गर्वाचा त्याग,

---

* ईश्वर. † इ. ओंठाची सिद्धता.

न्यायाधीशपणांत हर्ष मानण्याचा त्याग, मित्रांच्या कष्टांत सहाय, त्यास योग्यतेकडे वळविणें, सत्य व शांति यांस लगटून राहाणें, अभ्यासाकडे चित्त लावणें, (विषयावर) प्रश्न करून रीतीप्रमाणें उत्तर देणें, ऐकलेलें (ज्ञान) वाढविणें, शिकविण्याच्या संकेतानें शिकणें व त्याप्रमाणें वर्तण्याच्या संकेतानें शिकणें, आपल्या गुरूचें ज्ञान वाढविणें, ऐकलेल्या गोष्टीवर लक्ष ठेवणें, (ऐकलेली गोष्ट) ती ह्मणणाऱ्याच्या नांवानें सांगणें. यावरून असें अनुमान होतें कीं, (ऐकलेली गोष्ट) ती म्हणणाराच्या नांवानें जो सांगतो, तो जगांत आपणास मोकळा करून घेतो;[१] जसें ह्मटलें आहे कीं, आणि ती गोष्ट एस्तेरेनें राजाला मोर्देखायाच्या नांवानें सांगितली.[२]

७ शास्त्र श्रेष्ठ आहे, कारण त्याप्रमाणें वर्तणारांस तें या जगीं व पुढल्या जगींही जीवन देतें, जसें ह्मटलें आहे कीं, "ज्याला तीं सापडतात, त्यांला तीं जीवनच आहेत, आणि त्याच्या सर्व देहाला आरोग्य आहेत.[३] अणखी असें ह्मटलें आहे कीं, "हें तुझ्या नाभीला आरोग्य आणि तुझ्या हाडांला मज्जा असें होईल."[४] अणखी असें ह्मटलें आहे कीं, "जे तें धरितात त्यांला तें जीवनाचें झाड आहे, आणि

---

१ एकादी दोष देण्यासारिखी गोष्ट आपण ज्याकडून ऐकिली, ती सांगण्याचें अगत्य पडल्यास त्याच्या नांवानें सांगितल्यानें आपणावरील दोष उडून जातो.

२ एस्तेर. २,२२. ३ नीति. ४,२२. ४ नीति ३,८.

जे तें बाळगतात ते प्रत्येक धन्य आहेत."[१] अणखी असें ह्मटलें आहे कीं, "ते तुझ्या डोक्याला सुशोभित वेष्टन आणि तुझ्या गळ्यांत माळा असे होतील."[२] अणखी असें ह्मटलें आहे कीं, "तें तुझ्या डोक्याला शोभेचें वेष्टन देईल, सुंदर मुगुट तुला सोंपील." [३] अणखी असें ह्मटलें आहे कीं, "त्याच्या उजव्या हातांत दीर्घायुष्य आणि त्याच्या डाव्या हातांत धन व गौरव आहे,[४] अणखीं असें हटलें आहे कीं, "त्याकडून तुला दीर्घायुष्य व वयोवृद्धि व कुशल प्राप्त होईल." [५]

८ येहुदाचा पुत्र रिब्बी शिमओन, रिब्बी शिमओन बेन योहाय याच्या नांवाने ह्मणतो कीं, सुंदरपणा, सामर्थ्य, द्रव्य, लौकिक, ज्ञान, वृद्धपण अथवा पिकलेले केंस, आणि लेंकरें, सात्विकांस शोभतात आणि या जगांतहि शोभतात. कारण असें ह्मटलें आहे कीं, "पिकलेले केंस न्यायत्वाच्या मार्गांत असले, तर शोभेचा मुगुट असे आहेत."[६] अणखी असें म्हटलें आहे कीं, तरण्याची शोभा त्यांचा पराक्रम आहे, आणि ह्मातार्‍यांची प्रतिष्ठा पिकलेले केंस आहेत."[७] अणखी असें ह्मटलें आहे कीं "लेंकरांचीं लेंकरें वृद्धांचा मुगुट आहेत, आणि लेंकरांची शोभा त्यांचे बाप आहेत.[८] अणखीं असें ह्मटलें आहे कीं, "परमेश्वर जेव्हां सियोन पर्वतावर व यरुशालेमांत व आपल्या पूर्वजांसमोर

---

१ नीति ३,१८. २ नीति १,९. ३ नीति. ४,९. ४ नीति. ३, १६. ५ नीति. ३,२. ६ नीति १६,३१. ७ नीति. २०,२९. ८ नीति १७,६.

गौरवानें राज्य करील, तेव्हां चंद्र ओशाळा होईल, आणि सूर्य लाजेल."*

९ मेनासयाचा पुत्र रिब्बी शिमओन ह्मणतो, जीं सात्विकाचीं सात लक्षणें सुज्ञजनानीं गणिलीं आहेत तीं, सर्व रिब्बी † व त्याचे पुत्र यांचे अंगीं पूर्ण होतीं. कीसमाचा पुत्र रिब्बी योसे ह्मणाला, एक वेळ मी मार्गानें जात असतां मला एक मनुष्य भेटला; त्यानें मला सलाम केला, आणि मीहि त्यास परत सलाम केला. तो मला ह्मणाला, अहो गुरु, तुह्मी कोठून आलां? मी त्यास उत्तर केलें कीं, ज्या मोठ्या नगरांत पुष्कळ सुज्ञजन व लिहिणारे आहेत, तेथून मी आलों. तो मला ह्मणाला, तुमची इच्छा असली तर तुह्मी एथें आह्मासंगातें राहा; मी तुह्मास दाहा लक्ष रुपये, हिरे आणि मोतें देईन. मी त्यास ह्मणालों, हे माझ्या लेंकरा, जरी तूं मला पृथ्वींतील सर्व रुपें, सोनें, हिरे, आणि मोतें दिल्हींस, तरी जेथें शास्त्र असतें त्या ठिकाणावांचून मी दुसऱ्या ठिकाणीं कधींच राहाणार नाहीं. कारण जेव्हां मनुष्य मरण पावतो, तेव्हां त्यासंगातें रुपें, सोनें, हिरे,

---

* यशाया २४,२३.

† जरी एथें त्या रिब्बीचें नांव लिहिलेलें नाहीं, तरी तो रिब्बी येहुदा हाकादोश ह्मणजे येहुदा जो पवित्र, ज्यास रिब्बी येहुदा हन्नासी ह्मणजे येहुदा जो अधिपति असेंहि ह्मणतात, तो समजावा. आणि इब्री ग्रंथांत जेथें मोहोगम असें लिहिलेलें आहे तें सर्व याविषयींच लिहिलेलें आहे. यानें मिशना हा ग्रंथ रचिला.

अथवा मोतें हीं कांहींच येत नाहींत, परंतु शास्त्र आणि सत्कर्मे मात्र येतात; जसें ह्मटलें आहे कीं, "तूं चालत असतां (ह्मणजे या जगीं असतां) ती तुला नेईल; तूं निजला असतां (ह्मणजे मरणानंतर) ती तुला रक्षील, आणि जागृत होसील तेव्हां (ह्मणजे पुनरुत्थितीच्या वेळीं) ती तुजशीं संभाषण करील"[१] आणि इस्राएलाचा राजा दावीद याच्या हातून गीतांच्या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, "सोनें व रुपें यांच्या हजारोंपेक्षां, तुझ्या तोंडचें शास्त्र मला बरें आहे."[२] अणखी असें ह्मटलें आहे कीं, "रुपें माझें आणि सोनेंहि माझें आहे, असें सैन्याचा परमेश्वर ह्मणतो."[३]

१०. पवित्र व धन्य(ईश्वराने)आपल्या जगांत पांच गोष्टी आपली संपत्ति अशा मानिल्या आहेत, शास्त्र ही एक संपत्ति, आकाश व पृथ्वी ही एक संपत्ति, आब्राहाम ही एक संपत्ति, इस्राएल ही एक संपत्ति, आणि पवित्र मंदिर ही एक संपत्ति. शास्त्र (ही एक संपत्ति) हें कशावरून? कारण असें लिहिलें आहे कीं, "परमेश्वराने आपल्या मार्गाच्या आदि, आपल्या पुरातन कर्मांपूर्वी माझें धारण केलें."[४] आकाश आणि पृथ्वी (ही एक संपत्ति) हें कशावरून? कारण असें लिहिलें आहे कीं, "आकाश माझें सिंहासन आणि पृथ्वी माझें पादासन आहे; तर मजसाठीं जें तुह्मी घर बांधाल तें कोठें आहे? आणि कोठें माझें विसांव्या-

---

१ नीत. ६, २२. २ गीत. ११९, ७२.
३ हग्गाय. २, ८. ४ नीति. ८, २२.

चें स्थान आहे!"[१] अणखी असें ह्मटलें आहे कीं, "हे परमेश्वरा, तुझीं कृत्यें किती आहेत! तीं सर्व त्वां चातुर्यानें केलीं; पृथ्वी तुझ्या संपत्तीने भरली आहे."[२] आब्राहाम (ही एक संपत्ति) हें कशावरून? कारण असें लिहिलें आहे कीं, "परात्पर देव जो आकाश व पृथ्वीचा धनी, त्याकडून आब्राहाम आशीर्वादित आहे."[३] इस्राएल (ही एक संपत्ति) हें कशावरून? कारण असें लिहिलें आहे कीं, "हे परमेश्वरा, तुझे लोक पार जातील, जे लोक त्वां विकत घेतले ते पार जातील तोंपर्यंत."[४] अणखी असें ह्मटलें आहे कीं, "पृथ्वीवर जे पवित्र त्यांसच मात्र, तेच मान्य; त्यावर माझी पूर्ण आवड आहे."[५] पवित्र मंदिर (ही एक संपत्ति) हें कशावरून? कारण असें लिहिलें आहे कीं, "हे परमेश्वरा, तें ठिकाण त्वां आपल्या वस्तीसाठीं केलें आहे. हे प्रभु, तें पवित्र स्थान तुझ्या हातानीं सिद्ध केलें आहे."[६] अणखी असें ह्मटलें आहे कीं, "मग त्याने आपल्या पवित्र सीमेंतला हा डोंगर, जो त्याच्या उजव्या हाताने घातला, एथें त्यांस आणिलें."[७]

११. जें सर्व पवित्र व धन्य (ईश्वराने) आपल्या पृथ्वींत उत्पन्न केलें आहे, तें त्याने आपल्या गौरवासाठींच मात्र उत्पन्न केलें आहे. जसें ह्मटलें आहे कीं,

---

१ यशाय. ६६, १. २ गीत. १०४, २४. ३ उत्पत्ति. १४, १९. ४ निर्गम १५, १६. ५ गीत. १६, ३. ६ निर्गम. १५, १७. ७ गीत. ७८, ५४.

"ज्या प्रत्येकास माझें नाम ठेविलें आहे, त्याला आण;
कारण कीं म्या आपल्या गौरवासाठीं त्याला उत्पन्न केलें,
निर्माण केलें, व घडविलें आहे." १ अणखी असें ह्मणतात
कीं "परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील."२

१२. आकाशयाचा पुत्र रिब्बी हानानया असें ह्मणतो
कीं, इस्राएलास पुण्यवंत करावें ह्मणून शास्त्र व आज्ञा
वाढवाव्या असी ईश्वरी इच्छा झाली. जसें म्हटलें आहे
कीं, "त्याच्या न्यायाकरितां परमेश्वर संतोषित आहे;
तो नेमशास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील."३

१ यशाया ४३, ७. २ निर्गम १५,१८. ३ यशाया ४२,२१.

पृथ्वी उत्पन्नकर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीनें छापविलेलीं पुस्तकें.

	रु.आ.पै.
प्रायश्चित्ताच्या दिवसीं पापाविषयीं कबूल होणें	०—१—३
पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना	०—८—०
इस्राएलांचा लग्नविधि	०—३—०
वर्षप्रतिपदेची प्रार्थना	१—०—०
नवसांची सुटका व समुद्रतीरीं करायाची प्रार्थना	०—४—०
आनातिओखोस राजाचा इतिहास अथवा हान्नुक्याच्या सणाची स्थापना	०—२—०
इब्री पहिलें पुस्तक	०—४—०
प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग १ / " " " भाग २	१—४—०
सद्गुरुवचनें अथवा नीतिशास्त्र	०—६—०
इस्राएलांचीं पंचोपोषणें. / इब्री दुसरें पुस्तक	तयार होत आहेत.

THE HISTORY

OF

ANTIOCHUS EPIPHANES

OR THE

INSTITUTION

OF THE

FEAST OF DEDICATION

מגילת אנטיוכוס

आनतिओखोस राजाचा इतिहास

अथवा

हान्नुक्याचे सनाची स्थापना.

THE HISTORY

OF

ANTIOCHUS EPIPHANES

OR THE

INSTITUTION

OF THE

FEAST OF DEDICATION

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKER

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

AND

SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

BOMBAY:

PRINTED AT GUNPUT CRUSHNAJI'S PRESS.

1866-5626.

Price 2 Annas.

מגילת אנטיוכוס

आनतिओखोस राजाचा

इतिहास,

अथवा

हानुक्याचे सनाची स्थापना.

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दाविद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक;

व

इस्राएल लोकांच्या सद्गुण शोधक मंडळीचे चिटणीस

यांणीं

भाषांतर केलें

तें

इस्रायल लोकांच्या सद्गुण शोधक मंडळीनें लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें

गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापिलें.

इ. स. १८६६.

इस्रायली ५६२६.

किंमत २ आणे.

प्रस्तावना.

ईश्वराची दया इस्राएल लोकांवर पूर्ण आहे, हें शास्त्रावरूनच दिसून येतें असें नाहीं; परंतु त्यांबरोबरचे दुसरे लोक नाहींसे होत असतां, ते मोठमोठ्या विघ्नांतून बांचून आजपर्यंत राहिले आहेत, यावरूनहि उघडपणें दिसून येतें. फारो, हामान व दुसरे कित्येकांनी इस्राएलांचें नाव जगांतून नाहींसें करावें असें योजिलें होतें; परंतु त्यांचाच नाश होऊन यांस कांहींच अपाय झाला नाहीं. याप्रमाणें दुसरें पवित्र मंदिर बांधलें जाईपर्यंत ईश्वरानें जे चमत्कार इस्राएलांसाठीं केले, ते सर्व पवित्र शास्त्रांत लिहिलेले आहे. त्यानंतरचा त्यांचा वृत्तांत शास्त्रांत नाहीं; परंतु इस्राएलांतील व अन्य लोकांतील ग्रंथकारांनींहि लिहून ठेविला आहे. यावान म्हणजे ग्रीक लोकांचा राजा आनतिओखोस यानें इस्राएलांचें नाव व त्यांचा धर्म जगांतून नाहींसा करावा असें योजिलें होतें; परंतु त्यांतूनही त्यांस सोडविलें. याचा वृत्तांत शास्त्रांत नाहीं, परंतु इतिहासांत सांपडतो. या तारणाची इस्राएलांस सर्वकाळ आठवण राहावी म्हणून हान्नुका हा सन नेमिला आहे. यास्तव आजच ईश्वरानी आपणास ह्या संकटांतून सोडविलें असें समजून आणि त्याचे थोर उपकार मानून हा सन पाळावा.

आनतिओखोस राजाचा इतिहास,

अथवा

हान्नुक्याचे सनाची स्थापना.

यावानांचा राजा आनतिओखोस, जो मोठा बळवान आणि आपले राज्यांत शूर होता, आणि ज्याचे हुकुमांत सर्व राजे होते; त्याच्या दिवसांत असें झालें कीं, त्यानें पुष्कळ नगरें व बळवान राजे जिंकून त्यांचे कोट मोडिले, नासिले, त्यांचे वाडे जाळिले आणि त्यांच्या लोकांस बंदांत ठेविलें. मग त्यानें आपणा करितां राजधानीसाठीं समुद्राच्या किनाऱ्यावर एक मोठें नगर बांधून आपल्या नामाप्रमाणें त्यास आनतिओख असें नांव दिल्हें. त्याचा प्रधान बगरीस यानेंहि त्या नगरासमोर दुसरें नगर बांधून आपल्या नावांप्रमाणें त्यास बगरीस असें नाव दिल्हें; आणि हीं त्यांचीं नावें आजपर्यंत आहेत. त्याच्या राज्याच्या तेविसावे वर्षी, म्हणजे देवाचें मंदिर बांधल्यानंतर दोनशें तेराव्या वर्षी, येरुशालेमेवर चढून जाण्याचा बेत त्यानें केला. आणि तो आपल्या सरदारांस म्हणाला कीं, आपल्या राज्यांत येरुशालेमे मध्यें येहुदी लोक आहेत; हें तुम्ही जाणत नाहीं

काय ? ते आपल्या देवांस अर्पण करीत नाहीं; आपल्या धर्मास अनुसरत नाहीं; आणि राजाचे नेम सोडून आपल्याच नेमाप्रमाणें वागतात. आणि राजांच्या व अधिकाऱ्यांच्या नाशाची वाट पाहून; आमचा राजा आम्हावर केव्हां राज्य करील! देशांवर आणि समुद्रावर आमचा अधिकार केव्हां चालेल ! आणि सर्व पृथ्वी आमच्या हातीं केव्हां येईल ! असें ते म्हणतात. तर त्यांस जगांत राहू देणे हें (आपल्या) राज्यास भूषण नाहीं. यास्तव आतां चला, आपण त्यांवर चढून जाऊ आणि त्यांच्या देवानें त्यां बरोबर केलेले शाब्बाथ, प्रतिपदा आणि सुंता, हे करार आपण रद्द करूं. ही गोष्ट त्याच्या सरदारांच्या व त्याच्या सर्व सैन्याच्या दिसण्यांत चांगली दिसून आली. तेव्हां आनतिओखीसानें आपला प्रधान नीकानोर यास, मोठें सैन्य व पुष्कळ लोक त्या बरोबर देऊन येहुद्यांचें नगर येरुशालेम, याजवर पाठविलें. तेथें त्यानें मोठा वध करून पवित्र मंदिरांत अन्यदेवांचें उंच स्थान बांधिलें; आणि इस्राएलांच्या देवानें आपले सेवक भविष्यवादी यांस सांगितलें होतें कीं, मी तेथें आपला शेखिना सर्वकाळ ठेवीन; त्या ठिकाणीं त्यांनीं डुकर कापून त्याचें रक्त पवित्र अंगणांत आणिलें.

मग मतातयाचा पुत्र योहानान मुख्ययाजक यानें असें घडून आलें हें जेव्हां ऐकिलें; तेव्हां तो क्रोधानें संतप्त होऊन त्याच्या तोंडाचें तेज पालटलें, आणि या विषयीं काय करावें याचा विचार करूं लागला. तेव्हां त्यानें आपणाकरितां दोन हात लांब आणि एक वीत रुंद असी तरवार

करून आपल्या वस्त्राखालीं लपवून ठेविलीं. आणि येरुशालेमांस येऊन राजाच्या दारापुढें उभा राहिला, आणि द्वारपाळांस बोलावून त्यांस म्हणाला कीं, मी मतातयाचा पुत्र योहानान राजापुढें जावयास आलों आहें. तेव्हां ते द्वारपाळ आणि पाहरेकरी येऊन त्यास म्हणाले कीं, येहुद्यांचा मुख्य याजक द्वाराजवळ उभा आहे. तेव्हां नीकानोर म्हणाला कीं त्यास येऊंद्या. मग ते योहानानास नीकानोरापुढें घेऊन आले. तेव्हां नीकानोर योहानानास म्हणाला कीं, ज्यांनीं राजावर बंडावा केला, आणि जे त्याच्या राज्याचें कल्याण इच्छित नाहींत, त्यांतील तूं एक आहेस. योहानान त्यास उत्तर करून म्हणाला हे स्वामी, मी तोच; परंतु आतां मी तुज पुढें आलों आहें; जसी तुझी इच्छा असेल तसें मी करीन. तेव्हां नीकानोर त्यास म्हणाला कीं, जर तूं माझ्या इच्छेप्रमाणें करणार, तर एक डुकर घेऊन त्या उंचस्थानावर काप; म्हणजे राजकीय वस्त्रें तुला लेववून व राजाच्या घोड्यावर तुझी स्वारी काढून राजाच्या प्रियकरांतला तूं एक होशील. हें जेव्हां योहानानानें ऐकिलें, तेव्हां तो त्यास उत्तर देऊन म्हणाला, हे स्वामी, मी इस्राएल लोकांस भितों; त्यांनीं कदाचित हें ऐकिलें तर ते मला धोंडमार करून मारून टाकितील. ही गोष्ट त्यांस कदाचित कळेल, म्हणून तुझ्या समोरचीं सर्व मनुष्यें घालीव. यावरून निकानोरानें त्याच्या समोरचीं सर्व मनुष्यें घालविलीं. तेव्हां मतातयाचा पुत्र योहानान यानें आपले डोळे आकाशाकडे उंचावून आपल्या देवास प्रार्थना केली. आणि म्हणाला —हे माझ्या देवा, आणि माझे पूर्वज आब्राहाम, इसहाक व याकोब यांच्या देवा,

आतां मी विनंती करितों कीं, या निर्सुंत्याचे हातीं मला देवूं नको. कारण जर त्यानें मला मारिलें तर तो आपल्या देवाच्या देउळांत जाऊन त्याची स्तुति करील आणि म्हणेल कीं, माझ्या देवानें त्यास माझ्या हातीं दिल्हें. त्यावेळीं त्यानें त्यावर तीन पाउलें चालून जाऊन ती तरवार त्याच्या उरांत भोंसकली. आणि त्याचा मुड्दा पवित्र अंगणांत आकाशाच्या देवापुढें पाडिला. मग योहानान पुनः उत्तर करून म्हणाला कीं, हे माझ्या देवा, मी त्यास पवित्र ठिकाणीं मारिला म्हणून, तें मजकडे पाप असें मोजूं नको. आणि आतां जे लोक त्याबरोबर येहुदास आणि येरुशालेमास पीडा करण्याकरितां आले आहेत, त्यांसहि तसेच माझे हातीं दे. मग मतातयाचा पुत्र योहानान यानें निघून त्यालोकां बरोबर लढाई केली, आणि त्यांचा मोठा वध केला. त्यादिवशीं इकडले व तिकडले जे मारले गेले त्यांची संख्या सात लक्ष बाहत्तर हजार. तिकडून परतल्यावर त्यानें आपल्या कीर्तीं करितां एक खांब बांधून त्यास बळवानांस मारणारा माकाबी * असें नाव दिल्हें.

---

* माकाबी हा शब्द इब्री मध्यें מכבי असा आहे. हा शब्द מי כמוך באלים יי हे परमेश्वरा, देवांमध्यें तुजसारिखा कोण ? या वाक्याचा संक्षिप्त आहे. या शब्दांचीं पहिलीं अक्षरें एकत्र जोडून מכבי हा शब्द केला आहे. हीं अक्षरें त्यांच्या मावट्यावरही होतीं. तेव्हांपासून मतातयाचे कुटुंबास मकाबी असें नाव पडलें.

आणि असें झालें कीं, आनतिओखोस राजानें त्याचा प्रधान नीकानोर मारला गेला असें जेव्हां ऐकिलें; तेव्हां त्यास फारच दुःख झालें. मग त्यानें बगरीस, जो स्वतः दुष्ट असून आपल्या लोकांसहि (दुष्टाई कडे) वळवीत असे, त्यास बोलाविलें. आणि आनतीओखोस बगरीसास उत्तर करून म्हणाला कीं, इस्राएलांच्या पुत्रांनीं मजशीं काय केलें तें, त्यांनीं माझें सैन्य मारून, माझा तळ व माझे सरदारांस लुटिलें हें तूं जाणत नाहींस काय ? व तूं ऐकिलें नाहींस काय ? तर आतां तुम्हीं तुमच्या द्रव्याचा भरंवसा ठेऊं शकतां काय ? आणि तुमचीं घरें तुमचीच असें म्हणूं शकतां काय ? या आपण त्यांवर चढून जावूं आणि आकाशाचे देवानें त्यांसीं शाब्बाथ, प्रतिपदा आणि सुंता हे जे करार केलेले आहेत, ते आपण रद्द करूं. यावरून दुष्ट बगरीस व त्याचें सर्व सैन्य येरुशालेमास घेऊन तेथे त्यांनीं मोठा वध केला आणि शाब्बाथ, प्रतिपदा व सुंता हे करार न पाळावे असा त्यानें एक पूर्ण ठराव केला. ही राजाची गोष्ट अमलांत आल्यावर, आपल्या पुत्राची सुंता केली असा एक मनुष्य त्यांस सांपडला; तेव्हां त्यांनीं त्यास व त्याच्या बायकोस आणून त्या मुलाच्या समोर त्यांस फांशी दिल्हें. त्यावेळीं एका बाईस तिचा नवरा मेल्यावर पुत्र झाला, त्याची तिने आठव्या दिवशीं सुंता करून आपल्या पुत्रास हातावर घेऊन येरुशालेमेच्या तटावर चढली. आणि बगरीसास हाक मारून म्हणाली, हे दुष्ट बगरीसा, शाब्बाथ, प्रतिपदा व सुंता हे आमच्या पूर्वजांचे करार आम्ही कधींच रद्द करणार नाहीं व लेकरां-

च्या लेकरांसहि ते उणे होणार नाहीं. (असें बोलून) तिने आपले मुलांस भूमीवर टाकिला आणि त्यामागून तिनेही उडी टाकिली; आणि तीं दोघें एकदांच मरण पावलीं. त्या दिवसांत इस्राएलाच्या संतानांतून बहुतेकांनीं असें केलें; परंतु त्यांनीं आपल्या पूर्वजांचा करार पालटिला नाहीं.

त्यावेळीं इस्राएल लोक एकेकास म्हणूं लागले कीं, कदाचित शाब्बाथ विटाळेल म्हणून चला, आपण एका गुहेंत जाऊन विसांवा घेऊं. परंतु कोणे एकानें याची चाहाडी बगरीसा पुढें केली. तेव्हां दुष्ट बगरीसानें लढाऊ मनुष्यें पाठवून त्या गुहेच्या तोंडाजवळ बसविलीं. तीं त्यांस म्हणालीं कीं, अहो येहुदी लोक, तुम्ही आह्मांकडे बाहेर या, आमची भाकर खा, आमचा द्राक्षरस प्या, आणि आमच्या कर्मा प्रमाणे तुम्हीं करा. तेव्हां इस्राएल लोक एक प्रत्येकास म्हणाले कीं, त्या देवानें आपणास सीनाय डोंगरावर आज्ञा दिल्ही कीं, साहा दिवस उद्योग करून आपलें सर्व काम करा, आणि सातव्या दिवशीं तुम्ही विसावा घ्या; त्या परमेश्वर देवाचें आपण स्मरण करीत आहों. तर आतां, शाब्बाथ दिवस विटाळण्या पेक्षां आपण या गुहेंतच मरावें हें उत्तम. जेव्हां असें झालें, आणि ते त्यांकडे बाहेर आले नाहींत, तेव्हां त्यांनीं लांकडें आणून त्या गुहेच्या तोंडाशीं जाळिलीं; त्यांत पुरुष व स्त्रिया मिळून सुमारें एक हजार मनुष्यें मेलीं. यानंतर मतातयाचा पुत्र योहानान व त्याचे चौघे भाऊ निघाले, आणि त्यांनीं त्यालोकांबरोबर लढून त्यांचा मोठा वध केला; कारण

त्यांनीं आकाशाच्या देवावर भरंवसा ठेविला होता. तेव्हां दुष्ट बगरीस एका तारवावर चढून आनतिओखोस राजाकडे पळून गेला; आणि जे तरवारेपासून वांचले तेहि त्याबरोबर गेले. तिकडे गेल्यावर बगरीस, आनतिओखोस राजास उत्तर करून म्हणाला कीं, हे राजा, येहुद्यांतून शाब्बाथ, प्रतिपदा व सुंता हीं रद्द करायास तूं आज्ञा दिल्ही होतीस; परंतु त्यामुळें दगा व मोठा बंडावा झाला. जरी सर्व लोक व राष्ट्रें गेलीं, तरी मतातयाचे पांच पुत्रांपुढें त्यांचे कांहींच चालायाचें नाहीं. ते सिंहा पेक्षां बलकट, गरुडापेक्षां हलके, आणि आस्वला पेक्षां चपळ आहेत. तर आतां थोडक्या मनुष्यांनी तूं लढूं नको, जर त्यांसी लढशील तर राजा पुढें तूं लज्जित होशील; हें माझें मत्त तुला चांगलें आहे. यास्तव सर्व सैन्याच्या सरदारांनीं यावें, त्यांतून एकानेंही राहूंनये; आणि त्या बरोबर कवच पांघरलेले हत्तीहि असावे, असीं पत्रें लिहून तुझ्या राज्याच्या सर्व नगरीं पाठीव. ही गोष्ट आनतिओखोस राजास बरी दिसून त्यानें आपल्या राज्याच्या सर्व नगरीं पत्रें पाठविलीं; त्यावरून सर्व लोकांचे व राज्याचे सरदार आले आणि त्यांबरोबर कवच पांघरलेले हत्तीहि आले. मग दुसऱ्या वेळीं दुष्ट बगरीस उठून येरुशालेमास आला आणि (नगराच्या) भिंती फोडून व दरवाजे मोडून पवित्र मंदिरांतहि त्यानें तेरा छिद्रें केलीं. आणि घुमटहि फोडून त्यानें माती केली. तो आपल्या मनांत असें समजला कीं, यावेळीं ते मजवर (प्रबल होऊं) शकणार नाहीं; कारण माझें सैन्य मोठें असून माझा हात प्रबल आहे; आणि आकाशाचे देवाचे मनींहि असें

नाहीं. हें जेव्हां मतातयाचे पांच पुत्रांनीं ऐकिलें, तेव्हां ते उठून गिलआदांतील मिसपाहास आले; कारण शेमुएल भविष्यवाद्याचें दिवसांत तें आश्रमाचें ठिकाण होतें. आणि आकाशाची देवाची कृपा संपादन करण्यास त्यांनीं उपास केले, आणि भूमीवर बसले; तेव्हां त्यांस एक चांगला विचार सुचला. त्यामध्यें येहुदा ज्येष्ठ, दुसरा शिमाओन, तिसरा योहानान, चौथा योनाथान, पांचवा एलआझार. त्यांच्या बापानें त्यास आशीर्वाद देऊन असें म्हणाला कीं, हे माझा पुत्रा येहुदा, याकोबाचा पुत्र येहुदा जो सिंहासारिखा होता, त्यावरून जसी, तसी मी तुजवरून स्तुति करीन. हे माझ्या पुत्रा शिमओना, याकोबाचा पुत्र शिमओन, ज्यानें शेखेमाचे राहाणारे मारिले, यावरून जसी, तसी मी तुजवरून स्तुति करीन. हे माझ्यापुत्रा योहानाना, इस्राएलाचे सैन्याचा सरदार नेराचा पुत्र आबेनर यावरून जसी, तसी मी तुजवरून स्तुति करीन. हे माझ्या पुत्रा, योनाथाना, शाऊलाचा पुत्र योनाथान ज्यानें पेलिस्ती लोकांस मारिलें यावरून जसी, तसी मी तुजवरून स्तुति करीन. हे माझ्या पुत्रा एलआझारा, एलआझाराचा पुत्र पिनहास ज्यानें आपले देवाचा आवेश धरून इस्राएल लोकांस सोडविलें, यावरून जसी, तसी मी तुजवरून स्तुति करीन.

यावरून मतातयाचे पांच पुत्र त्याच दिवशीं निघून त्यांनीं त्या लोकांबरोबर लढाई करून त्यांतील पुष्कळांस मारिलें; परंतु यांतून येहुदाहि मारला गेला. येहुदा मारला गेला हें जेव्हां मतातयाचे पुत्रांनीं पाहिलें, तेव्हां ते परत आपल्या बापाकडे आले. तेव्हां तो त्यांस म्ह-

णाला, तुम्ही कां परतला? त्यांनीं उत्तर केलें कीं, आम्हा सर्वांत जो चांगला तो आमचा भाऊ येहुदा मारला गेला म्हणून (आह्मी परतलों). यावरून त्यांचा बाप मतातया हा त्यांस उत्तर करून म्हणाला कीं, मी तुम्हांबरोबर येऊन त्या लोकांशीं लढेन, नाहींतर कदाचित इस्राएलाचे घराण्याचा नाश होईल; आणि तुह्मी तर आपल्या भावा करितां विस्मित झालां. मग मतातया आपल्या पुत्रांबरोबर निघाला, आणि त्यालोकांशीं लढला. आकाशाच्या देवानेंहि त्या लोकांतील सर्व बळवान त्यांच्या हातीं दिल्हे; आणि त्यांनीं तरवार चालिवणाऱ्यांचा, धनुर्धाऱ्यांचा, सैन्याच्या सरदारांचा व दुसरे सरदारांचा मोठा वध केला; असा कीं यांतून कोणीच वांचला नाहीं; आणि लोक समुद्रा कडील प्रांतांत पळून गेले. एलआझार हा हत्ती मारण्याच्या कामांत गुंतला होता; परंतु हत्ती त्याजवर पडून तो गडद झाला. त्याचे भाऊ परत येऊन त्याचा शोध केल्यावर तो त्यांस हत्तीच्या खालीं गडद झालेला सांपडला. तरी इस्राएलाचे पुत्रांचे हातीं त्यांचे शत्रू मिळाले, म्हणून त्यांनीं हर्ष केला; आणि त्यांतून कित्येकांस जाळून, कित्येकांस तरवारीनें भोंसकून, कित्येकांस सुळावर फांशीं देऊन मारिलें. आणि दुष्ट बगरीस जो आपल्या लोकांस वांकड्या मार्गाकडे वळवीत असे, त्यासहि इस्राएलाचे घराण्यानें अग्नीनें जाळिलें. याप्रमाणें दुष्ट बगरीस व त्याबरोबरचे सैन्याचे सर्व सरदार मारले गेले. हें जेव्हां आनतिओखोस राजानें ऐकिलें; तेव्हां तोहि एका तारवावर चढून समुद्रा कडील प्रांतांकडे पळून गेला. परंतु जेथें जेथें

तो गेला तेथें तेथें त्यावर बंडावा होऊन (तेथील लोक) त्यास पळपुटा असें बोलूं लागले.

यानंतर हाशमोनायचे पुत्र पवित्र मंदिरांत आले, आणि त्यांनीं मोडके दरवाजे बांधिले, भोकें बंद केलीं आणि अगणित मुड्यांनीं व अमंगळ पदार्थांनीं मंदिर विटाळलें होतें तें त्यांनीं शुद्ध केलें. मग (तेथील) समई पेटविण्याकरितां जाईताचें शुद्ध तेल ते शोधूं लागले; परंतु त्यांस एक कुपि मात्र सांपडली. तिजवर मुख्य याजकाची मोहर केलेली होती, यावरून तें शुद्ध होतें असें त्यांस वाटलें. त्यांत एक दिवस जळेल एवढेंच मात्र (तेल) होतें; परंतु आकाशाचा देव ज्यानें आपलें नाव तेथें ठेविलें होतें, त्यानें त्यास आशीर्वाद दिल्यावरून त्याकडून आठ दिवस दिवे लागले.

यावरून हाशमोनायचा पुत्रांनीं असा ठराव केला आणि आपणा बरोबर सर्व इस्राएलांवरहि असा दृढ नियम केला कीं, आकाशाचे देवानें दिल्हेला जय प्रगट करण्या करितां शास्त्रांत लिहिलेल्या सना प्रमाणें हे आठ दिवस आनंदाचे व हर्षाचे मानून त्यादिवशीं दिवे लावावे. आणि (या दिवसांत) शोक करूनये आणि उपास किंवा दुःख ठरवूंनये; परंतु या गोष्टीमध्यें जें त्यांकरितां घडून आलें, त्यावरून त्यांनीं आपल्या देवाची प्रार्थना करावी. परंतु हाशमोनाय व त्यांचे पुत्र व त्याचे बंधू यांनीं, उद्योग करून काम करण्यास मना आहे असें कांहीं ठरविलें नाहीं. या वेळेपासून यावानांचे राज्याची कीर्ति वाढली नाहीं. तेव्हांपासून देवाचे मंदिराचा नाश होईपर्यंत म्हणजे दोनशें सहा वर्षें हाशमोनायच्या पुत्रां

चा व त्याच्या पुत्रांच्या पुत्रांचा राज्याधिकार चालत होता. यावरून त्या दिवसापासून दासत्वांतहि इस्राएलाचें संतान हे दिवस, म्हणजे किसलेव (मार्गशीर्ष) महिन्याचे पंचवीसावे तारखे पासून आठ दिवस पाळून त्यांस आनंदाचे दिवस असें म्हणतात. आणि पवित्र मंदिराचे समयीं याजकांनीं, लेवीयानीं व ज्ञान्यांनी जें त्यांवर व त्यांच्या लेकरांच्या लेकरांवर ठरविलें आहे, तें कधींच उणें होणार नाहीं. ज्या देवानें त्यांकरितां आश्चर्य कर्म व अद्भुत चमत्कार केला, तो आपणाकरितांही आश्चर्य कर्मैं व अद्भुत चमत्कार करो; आणि " तुला मिसरांतून काढिलें त्यादिवसां प्रमाणें मी त्यास चमत्कार दाखवीन" हे वाक्य आपणावर पूर्ण होवो.

हानुक्याचे दिवसांत दिवे लावितांना जी स्तुति करितात ती येणें प्रमाणें

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा जगताच्या राजा, आम्हास हानुक्याचा दिवा लावण्यास आज्ञा देऊन पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा आमच्या देवा जगताच्या राजा, आमच्या पूर्वजां करितां त्या दिवसांत याच वेळीं अद्भुत कर्मैं करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

हें पहिल्या दिवशीं मात्र बोलतात:

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा जगताच्या राजा, आम्हास हा वेळपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

הנרות הללו आमच्या पूर्वजांकरितां त्या दिवसांत याचवेळीं तुझ्या पवित्र याजकांच्या हातून जीं अद्भुत कर्में, जो उद्धार, जे पराक्रम, जें तारण, जे चमत्कार व जीं सांत्वनें तूं केलींस त्यां करितां आम्ही हे दिवे लावितों. हान्नुक्याचे हे सर्व आठ दिवस हे दिवे पवित्र आहेत; त्यांकडून काहीं एक काम करण्यास आम्हास मोकळीक नाहीं; परंतु तुझ्या अद्भुत कर्मांवरून तारणांवरून, व चमत्कारांवरून तुझ्या नामाची स्तुति करावी एवढ्या करितां मात्र ते आहेत.

या तारणावरून प्रार्थनेंत जी स्तुति करितात ती.

על הנסים आमच्या पूर्वजांकरितां त्या दिवसांत याच वेळीं जीं अद्भुत कर्में, जो उद्धार, जे पराक्रम, जें तारण, जे चमत्कार व जीं सांत्वनें तूं केलींस, म्हणजे योहानानाचा पुत्र मतातया मुख्य याजक जो हाशमोनाय, याच्या व त्याच्या पुत्रांच्या दिवसांत तुझे लोक इस्राएल यांस तुझ्या शास्त्राचा विसर पाडण्याकरितां आ-

णि तुझ्या प्रसन्नतेचे करारें उलंघविण्याकरितां दुष्ट यावानाचा राज्याधिकार जेव्हां उठला होता; तेव्हां तूं आपल्या परम दयेने त्यांच्या संकटसमयीं त्यासाठीं उभा राहिलास, त्यांचा वाद तूं केलास, त्यांचा न्याय तूं निवडिलास, आणि त्यांचा सूड तूं उगवून अशक्तांच्या हातीं बलवानांस, थोडक्यांच्या हातीं पुष्कळांस, सात्विकांच्या हातीं दुष्टांस, शुद्धांच्या हातीं अशुद्धांस, आणि तुझ्या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांच्या हातीं गर्विष्ठांस सोंपून दिल्हेंस. आणि तूं आपणाकरितां मोठी व पवित्र कीर्त्ति करून, केवळ आजच असें तूं आपले लोक इस्राएल यांचें मोठें तारण व उद्धार केलास. यानंतर तुझ्या लेकरांनीं तुझ्या पवित्र देवळांत येऊन तुझें मंदिर स्वच्छ केलें, तुझें पवित्र स्थान शुद्ध केलें, तुझ्या पवित्र अंगणांत दिवे लाविले, आणि हे आठ दिवस स्तुतीचे आणि कीर्त्तनाचे ठरविले; याप्रमाणें अद्भुत कर्म व चमत्कार तूं केलेस, म्हणून आम्ही तुझ्या मोठ्या नामास स्तवितों. सेलाह.

תם ונשלם שבח לאל בורא עולם

पृथ्वी उत्पन्न कऱ्यां देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीनें छापविलेलीं पुस्तकें.

इत्री पहिलें पुस्तक छापायास दिल्हें आहे. ..

इस्राएलांचा लग्नविधि.

THE

JEWISH MARRIAGE CERIMONY.

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKER

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

BOMBAY.

PRINTED AT GUNPUT CRUSHNAJEE'S PRESS.

1862—5622.

Price 3 *Annas.*

חופה

इस्राएलांचा लग्नविधि.

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर
दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक

यांणीं

भाषांतर केलें

तें

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीनें
लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें
गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत छापविलें.
इ. स. १८६२.
इस्राएली ५६२२.

किम्मत, ३ आणे.

प्रस्तावना.

मनुष्यास उत्पन्न केल्यावर ईश्वरानें जे त्यास नियम लाऊन दिल्हे, त्यांतील लग्न हा पहिलाच नियम आहे. मनुष्यानें एकटेंच राहावें हें ईश्वरास न आवडल्यामुळें, त्यानें त्यास सहायकारी स्त्री उत्पन्न केली. त्या उभयतांमध्यें एवढी प्रीति लाऊन दिल्ही आहे, कीं मनुष्य आपल्या आईबापास सोडतो आणि आपल्या स्त्रीस जडतो. पुरुष आणि स्त्री यांचे परस्परांकडील मुख्य धर्म असे आहेत कीं पुरुषानें आपल्या स्त्रीशीं प्रीतीनें व विश्वासूपणानें राहावें; आणि स्त्रीनें आपल्या नवऱ्याशीं प्रीतीनें, विश्वासूपणानें आणि आज्ञांकितपणानें राहावें. हे धर्म त्यांकडून पूर्ण व्हावे ह्मणून त्यांचें लग्न वयांत आल्यावर झालें पाहिजे. लहानपणीं लग्न केलें असतां पुष्कळ अनर्थ घडतात. त्यांतील एक असा आहे कीं, लग्नाचीं क्रियाकर्में होते समयीं नवरा असी शपथ करितो कीं, मी आपल्या नवरीचें योग्यरीतीने पोषण पालन करीन. परंतु तो अल्पवयाचा असल्यामुळें आणि ज्या भाषेंत हे उपचार होतात ती भाषा त्यास

समजत नसल्यामुळें; तो त्या शपथेविषयीं अगदीं निश्चित राहून त्या उभयतांमध्यें योग्यरीतीप्रमाणें प्रीति राहत नाहीं. त्यांचे धर्म त्यास समजले आसतां फारकरून असें होणार नाहीं, या आशेने मी हें मूळ ग्रंथावरून भाषांतर केलें आहे.

हा ग्रंथ वाचतांना फारकरून नवऱ्याचे धर्म अढळतील; आणि नवरीचे धर्म उघडपणे सांगितलेले सांपडणार नाहीं. यद्यपि तिला असें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, पाप जगांत तिच्यामुळेंच आलें; कारण सातानाच्या शब्दास स्त्रीने पहिल्यानें मोहित होऊन ईश्वराच्या आज्ञेचा भंग केला; ह्मणजे बरें व वाईट जाणण्याच्या झाडाचें फळ खाल्लें, मग आपल्या नवऱ्या कडूनहि खावविलें. यावरून तिला आपल्या वर्तणुकीविषयीं फारच सावध राहिलें पाहिजे. ती मोशे व इस्राएल यांच्या नियमा प्रमाणे आपल्या नवऱ्याची स्त्री होते; ह्मणून तिची वर्तणुक इस्राएलांच्या शास्त्रास अनुसरून असली पाहिजे; ह्मणजे तिची इच्छा तिच्या नवऱ्याचे स्वाधीन होऊन त्याने तिजवर धनीपण करावें. याशिवाय स्त्रीचे धर्म शास्त्रांत पुष्कळच सांगितले आहेत; परंतु थोडक्यांत समजावे, ह्मणून सद्गुणी स्त्रीचीं लक्षणें शेवटीं उतरून घेतलीं आहेत.

आणि माझ्या प्रिय बंधुजनास असी सूचना आहे कीं आपण अन्यलोकांत मिसळले नजावे; ह्मणून ईश्वरानें एवढे नियम व विधि लाऊन दिल्हे आहेत. त्यांच्या कर्मांप्रमाणे आपण कांहींच करूं नये याविषयीं निर्गम २३,२४. एथें स्पष्टसांगितलें आहे. कारण असें करणे ईश्वरास ओंगळ आहे. असें असतां, लग्न या शुभ कार्यास अन्य लोकांच्या चालीं कडून अशुभ करणे मला अगदीं अयोग्य दिसतें. अशा कर्मांकडून नवरा व नवरीस ईश्वरी कोपास पात्र नकरितां, आपल्या खऱ्या रीतिप्रमाणे सात दिवस या ग्रंथांत सांगितलेल्या सभाशीर्वादांकडून ईश्वराचें स्तवन करून त्यांजवर त्याचा आशीर्वाद मागावा हें उत्तम आहे. तर माझे प्रिय बंधू अशा अनहित कारक चाली सोडून सुधारलेल्या व हितावह रीतींचा अंगीकार करितील असी आशा करितों.

नवऱ्याचा आशीर्वाद.

יי אלהים אמת परमेश्वर देव सत्य आहे, आणि तोच जीवनाचा देव व जगताचा राजा आहे. परमेश्वर राज्य करितो, परमेश्वरानें राज्य केलें, परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. मी या मंडळीच्या आज्ञेवरून या नवऱ्यास जो आशीर्वाद देतों, तो आशीर्वाद ईश्वरास मान्य असो. हे नवऱ्या, शास्त्रांत जीं वाक्यें लिहिलीं आहेत, तीं तुजवर काईम होवोत. तीं असीं कीं, मी तुला मोठी प्रजा करीन, आणि तुझें नाव असें मोठें करीन कीं तें आशीर्वादरूप होईल, आणि जे तुला आशीर्वाद देतात त्यांस मी आशीर्वाद देईन, आणि जो तुला शाप देतो, त्याली मी शाप देईन, आणि तुजकडून पृथ्वींतील सर्व वंशी आशीर्वाद पावतील. आणि जसा आब्राहाम दिवसांच्या गतीनें वृद्ध झाला असतां, अवघ्यां विषयीं परमेश्वरानें आब्राहामाला आशीर्वाद दिल्हा, तसा अवघ्याविषयीं तो तुलाहि आशीर्वाद देवो. आणि हे नवऱ्या, शास्त्रांत जीं वाक्यें लिहिलीं आहेत तीं तुजवर काईम होवोत; तीं असीं कीं

"तेव्हां इसहाकानें त्या देशांत पेरिलें आणि त्याच व· र्षीं त्याला शंभरपट मिळालें; असा परमेश्वरानें त्या· ला आशीर्वाद दिल्हा. आणि (याकोबानें) जवळ येऊन (इसहाकाचें) चुंबन घेतलें आणि त्यानें त्या च्या वस्त्राचा वास घेतला, आणि त्याला आशीर्वाद देतांना ह्मटलें, पाहा, ज्या शेताला परमेश्वरानें आ· शीर्वाद दिल्हा त्याच्या वासासारिखा माझ्या पुत्राचा वास आहे. तर आकाशांतील दंव व भूमीचीं पुष्ट· पणें आणि पुष्कळ धान्य व द्राक्षांचा नवा रस, हीं देव तुला देवो. लोक तुझी सेवा करोत आणि प्र· जा तुला नमन करोत; तूं आपल्या भावाचा स्वामी हो; आणि तुझ्या आईचीं संतानें तुला नमन करोत; तुझे शाप देणारे प्रत्येक शापग्रस्त होवोत, आणि तुझे आशीर्वाद देणारे प्रत्येक आशीर्वादित होवोत. आ· णि सर्व-समर्थ देव तुला आशीर्वाद देवो, आणि तुला सफळकरून असें वाढवो कीं त्वां राष्ट्रांचा समुदाय व्हावा. आणि तुला आब्राहामाचा आशीर्वाद देवो; तुला आणि तुझ्यासुद्धां तुझ्या संतानाला असें कीं, तुझ्या प्रवासाचा जो देश देवानें आब्राहामाला दि· ल्हा त्याचें वतन त्वां पावावें. तुझ्या बापाच्या दे· वाकडून तुझें सहाय होईल, म्हणजे सर्व समर्थ या· च्यानें, आणि तो वरील आकाशांतील आशीर्वादांनीं,

आणि खालीं राहाणाऱ्या खोलस्थलांतील आशीर्वादांनीं, आणि स्थनाच्या व गर्भाच्या आशीर्वादांनीहि, तुला आशीर्वाद प्राप्त होईल. तुझ्या बापाच्या आशीर्वादांनीहि, हे अक्षय पर्वतांच्या आशीर्वादांवर आणि सर्वकाळच्या डोंगरांच्या इष्ट वस्तूंवर समर्थ झाले आहेत; ते योसेफाच्या मस्तकावर होय, जो आपल्या भावापासून वेगळा झाला त्याच्या टाळूवर होतील. तर तूं आपल्या देवाकडे फीर, तूं दया व न्याय सांभाळ, आणि नित्य आपल्या देवाची वाट पाहा. ह्मणजे तो तुझा पांय सरकूं देणार नाहीं; तुझा राखणारा निजत नाहीं, पाहा, इस्राएलाचा राखणारा निजत नाहीं, आणि झोंप घेत नाहीं. परमेश्वर तुझा राखणारा; परमेश्वर तुझ्या उजव्या हाताकडे तुझी छाया आहे. दिवसास सूर्य व रात्रीं चंद्र तुला बाधणार नाहीं. परमेश्वर तुला सर्व वाईटापासून राखील, तुझा प्राण राखील; तुझें बाहेर जाणें व तुझें आंत येणें, आतांपासून सर्वकाळपर्यंतहि परमेश्वर राखील. वाईट तुला प्राप्त होणार नाहीं; आणि तुझ्या राहोटीस पटकी लागणार नाहीं; कांतर तुझ्या सर्व मार्गांत तुला राखावें, म्हणून तो आपल्या दूतांस तुजविषयीं आज्ञा देईल. तुझ्या नाभीला आरोग्य आणि तुझ्या हाडांला मज्जा आणि तुझ्या

सर्व देहाला आरोग्य असें होईल. हे इस्राएला, तुजवर आशीर्वाद आहेत; तुजसारिखा लोक कोण? तूं परमेश्वराकडून तारलेला आहेस, तोच तुझ्या सहायासाठीं ढालरूप आणि तुला जयाची तरवार आहे; यास्तव तुझे शत्रू तुझ्यापुढें खोटे होतील, आणि तूं त्यांच्या उंचठिकाणावर पाय देशील. आणि हे नवऱ्या, शास्त्रांत चढण्याच्या गीतांत जें लिहिलें आहे तें तुजवर काईम होवो; तें असें कीं, जो कोणी परमेश्वराला भीतो, जो त्याच्या मार्गांत चालतो तो धन्य. कारण कीं तूं आपल्या हातांचें कष्टफळ खाशील; तूं धन्य; आणि तुझें बरें होईल. तुझी स्त्री तुझ्या घराच्या बाजूंच्या सफळ द्राक्षवेलासारिखी होईल; तुझीं लेंकरें तुझ्या मेजासभोंवतीं जाईत रोप्यासारिखीं होतील. पाहा, जो पुरुष परमेश्वराला भितो, तो असा आशीर्वाद पावतो. सीयोनांतून परमेश्वर तुला असा आशीर्वाद देईल कीं, तूं, आपल्या आयुष्याच्या सर्व दिवसांत यरूशालेमाचें बरें पाहसील. आपल्या लेकरांच्या लेकरांसुद्धां इस्राएलावर समाधानहि पाहशील. आणि हे नवऱ्या, शास्त्रांत जें आणखी वाक्य लिहिलें आहे, तें तुम्हां उभयतांवर काईम होवो. तें असे कीं, "आणि परमेश्वरानें मोश्याला सांगितलें कीं तूं आहारोनाला आणि त्या-

च्या पुत्रांस बोलून सांग कीं, तुह्मी इस्राएलांच्या संतानास आशीर्वाद देत असतां, त्यांस असें ह्मणा कीं, परमेश्वरानें तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वरानें आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वराने आपली दृष्टि तुजवर लावून तुझें कल्याण करावें. तसें त्यांनी माझें नाव इस्राएलाच्या संतानावर लावावें, ह्मणजे मी त्यांस आशीर्वाद देईन.” तुला महा सुख, चांगलें व सुकाळाचें दीर्घ आयुष्य, आनंदाची वर्षें, आशीर्वादांचे पूर, पुष्कळ दानें, शिंगाचें *उभारणें, उंच बांधा, मोकळे मार्ग, प्रकाश, आशीर्वाद, हर्ष, मोकळीक, महत्व, यथार्थता, दया, शुद्धता, वतन, वैभव, सुशोभित शृंगार, खुश नजर, जीवाची शांति, रहस्य, नम्रता, मुक्ति, सात्विकत्व, उभारलेलें शिंग व पूर्ण विसावा (शांम) होवो. आणि पवित्र जो धन्य (देव) तो तुला या जगांत चांगलें वेतन व पुढील जगांत चांगला विभाग देवो. आणि आकाश व पृथ्वीच्या स्वामी पुढें असी प्रसन्नता होवो कीं, नेम शास्त्रांत भविष्य कथनांत व (पवित्र) +लेखांत, ह्मणजे शास्त्राच्या चोवीस पुस्तकांत जे कांहीं धन्यवाद सांगि-

* ही मोठेपणाची एक ह्मण आहे.

+ हे शास्त्राचे तीन विभाग आहेत.

तले असतील, ते सर्व तुजवर, तुझ्या संतानावर व तुझ्या संतानाच्या संतानावर येऊन ते तुह्मांवर काईमहि होवोत. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा. आणि शास्त्राचा अभ्यास करणाऱ्या व इस्राएलांच्या आज्ञा पूर्णकरणाऱ्या पुत्रांकडून, कन्यांकडून व पुत्रांच्या पुत्रांकडून तूं सफल हो, वाढ, पुण्याइकर, मोठा हो, आणि दीर्घ आयुष्य पाव. तूं आशीर्वादाचें वतन पावशील व कधींहि लाजणार व घाबरणार नाहीं. तूं सुखी, तुझे घराणे सुखी, व तुझें जें कांही असेल तेंहि सुखी होऊन तुझ्या आयुष्याचे दिवस आणि जीवनाचीं व सुखाचीं वर्षें वाढून तूं आपल्या दृष्टीने महत्व व कल्याण पाहशील.

नवरीचा आशीर्वाद.

קוּמִי אוֹרִי (हे नवरे), ऊठ, तेजस्वी हो, कांकीं तुझी प्रभा आली आहे, आणि तुजवर परमेश्वराचें गौरव उगवलें आहे. जसें शास्त्रांत लिहिलें आहे कीं, हे परमेश्वरा, तूं माझा दिवा आहेस, आणि परमेश्वर प्रकाश करून माझा अंधार घालवील. तुझें वचन माझ्या पांयांस दीप, व माझ्या वाटेस प्रकाश असें आहे. कारण तुझ्या ज-

वळ जीवनाचा झरा आहे; तुझ्या प्रकाशानें आम्ही प्रकाश पाहतों. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो; परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देतो. आणि परमेश्वरानें जसें सांगितलें होतें, तसें सारेची भेट घेतली, आणि परमेश्वराने जें वचन दिल्हें होतें, त्याप्रमाणे सारे सार्थ केलें. आणि त्यांनी (लाबान व त्याच्या घरचीं मनुष्यें यांनी) रिबकेला आशीर्वाद देऊन तिला म्हटलें, तूं आमची बहीण बहुत हजार असी हो, आणि तुझें संतान आपले वैऱ्याचे दरवाज्याचें वतन पावो. तर तूं सोन्याने व रूप्याने भुषिलेली असस, आणि तुझें पांघरुग स्वच्छ पांढरें वस्त्र व रेशमी व वेलबुटींचें वस्त्र असे. आणि तूं उत्कृष्ट पीठ व मध व तेल खाईस; आणि तूं अत्यंत सुंदर होस आणि राज्य पावेस असी सफल झालीस, आणि तुझ्या सुंदरपणामुळें तुझी कीर्त्ति बाहेर राष्ट्रांमध्यें गेली. कारण कीं माझी जी शोभा म्या तुजवर घातली, तिजकडून ती पूर्ण होती असें प्रभु परमेश्वर म्हणतो. तुझ्या कोटामध्यें कल्याण, तुझ्या वाड्यांत सुख होवो. मी आपल्या भावासाठीं व आपल्या मित्रासाठीं बोलेन" तुझ्यामध्यें कल्याणच असो." आमचा देव परमेश्वर याच्या मंदिरासाठीं मी तुझें बरें पाहीन.

आणि (तूं) आपल्या लेकरांच्या लेकरांसुद्धां इस्रा-एलावर समाधानहि पाहशील. जे तुझ्या शास्त्रावर प्रीति करितात त्यांचें फार कल्याण आहे; आणि त्यांस काहीं अडथळा होणार नाहीं. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो, परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देतो. आणि आकाश व पृथ्वीच्या स्वामी पुढें असी प्रसन्नता होवो कीं, नेम शास्त्रांत, भविष्य कथनांत, व पवित्र लेखांत; म्हणजे (शास्त्राच्या) चोवीस पुस्तकांत, जे काहीं धन्यवाद सांगितले आहेत, ते सर्व तुजवर, तुझ्या संतानावर व तुझ्या संतानाच्या संतानावर येऊन ते तुम्हावर काईम होवोत. आणि तुम्ही तथास्तु म्हणा. आणि शास्त्राच्या अभ्यास करणाऱ्या आणि इस्राएलाच्या आज्ञा पूर्ण करणाऱ्या पुत्रा कडून कन्यांकडून व पुत्रांच्या पुत्रांकडून तूं सफळ हो, वाढ, पुण्याई कर, मोठा हो, आणि दीर्घ आयुष्य पाव. आणि परमेश्वरानें मोश्याला सांगितलें कीं, तूं अहारोनाला आणि त्याच्या पुत्रांस बोलून सांग कीं, तुम्ही इस्राएलाच्या संतानास आशीर्वाद देत असतां, त्यास असें म्हणा कीं, परमेश्वरानें तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वरानें आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. पर-

मेश्वरानें आपली दृष्टी तुजवर लावून तुझें कल्याण करावें. असें त्यांनी माझें नाव इस्राएलाच्या संतानावर लावावें; म्हणजे मी त्यांस आशीर्वाद देईन. तुला महासुख चांगलें व सुकाळाचें दीर्घ आयुष्य, आनंदाची वर्षे, आशीर्वादांचे पूर, पुष्कळ दानें, शिंगाचें उभारणें, उंच बांधा, मोकळे मार्ग, प्रकाश, आशीर्वाद, हर्ष, मोकळीक, गौरव, महत्व, यथार्थता, दया, शुद्धता, वतन, वैभव, सुशोभित शृंगार, खुश नजर, जीवाची शांति, रहस्य, नम्रता, मुक्ति, सात्विकत्व, उभारलेले शिंग, व पूर्ण विसावा (प्राप्त) होवो. आणि पवित्र जो धन्य (देव) तो तुला या जगांत चांगलें वेतन व पुढील जगांत चांगला विभाग देवो. आणि तूं सुखी, तुझें घराणे सुखी व तुझें जें काहीं असेल तेंहि सुखी होऊन तुझ्या आयुष्याचे दिवस व जीवनाचीं व सुखाचीं वर्षें वाढून तूं आपल्या दृष्टीनें सामर्थ्य व कल्याण पाहाशील.

नवरा नवरीच्या घरीं गेल्यावर हातीं द्राक्षरसाचा प्याला व अंगावर सिसिथ घेऊन पंचापुढें तोंडीं जो करार करितो तो येणे प्रमाणे.

ברשותכם नवरा म्हणतो. तुमच्या आज्ञेने (मी हें कार्य करितों).

मंडळी म्हणते. देवाच्या*आज्ञेने

न० आमच्या गुरूच्या आज्ञे वरून (मी हें कार्य करितों).

मं० देवाच्या आज्ञेवरून.

न० तुम्ही परमेश्वराची उपकार स्तुति करा. कारण कीं तो चांगला आहे.

मं० त्याची दया सर्वकाळची आहे.

न० इस्राएलांत हर्ष वाढो.

मं० आजच्या दिवसा प्रमाणें येरूशालेमांतहि (हर्ष) होवो.

न० पवित्र मंदिर बांधलें जाऊन आणि येली या भविष्यवादी व दावीदाच्या पुत्र माशीयाह, याचें येणें होऊन सर्व (इस्राएल) आनंदित, उल्हासित व चांगल्या (हर्षित) मनाचे होवोत.

हे परमेश्वरा, आमच्या देवा. जगताच्या राजा, द्राक्षफळ उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा आमच्या देवा जगताच्या राजा, ज्यानें आपल्या आज्ञांकडून आह्मास पवित्र करून त्या आज्ञा आह्मास दिल्या; आह्मास लाजिरवाण्या गोष्टी पासून

---

* मूळ ग्रंथांत देव या शब्दकरितां " आकाश " असा शब्द आहे; आणि इश्री ग्रंथांत देवाच्या नावा बद्दल आकाश या शब्दाचा उपयोग केलेला पुष्कळ वेळा आढळतो.

वेगळें केलें; (जो) आह्मास मागणी केलेली बरोबर जडवितो; आणि लग्न व त्या संबंधी क्रियाकर्मां कडून विवाहित होण्यास आह्मास मोकळीक दिल्ही आहे, तो तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा, लग्न व त्या संबंधी क्रियाकर्में यां कडून इस्राएलांस पवित्र करणाऱ्या, तुं धन्य आहेस.

מאורסת לי (अमुक) स्वामीची कन्या कुमारी* नवरी, तूं (अमुक), (अमुक) स्वामीचा पुत्र (अमुक) जो मी, मजसाठीं, तूं हा जो प्याला पीशील त्याकडून, या रुप्याकडून+ व ज्यावर माझा हक्क आहे त्या सर्वांकडून, साक्षींच्या व आपल्या गुरुंच्या समक्ष मोशे व इस्राएल यांच्या शास्त्राप्रमाणे वरली व मजशीं विवाहित झाली आहेस.

द्राक्षरसाचा जो प्याला नवऱ्याच्या हातीं असतो, त्यांतिल अर्धा अपण स्वतां पिऊन तो प्याला नवरीच्या हातीं देताना हें दोन वेळा॥ह्मणावें.

בא קדושיכי यांतच तुझें पवित्रकरण होतें. (याच क्रियेवरून तूं मजशीं विवाहित होत आहेस.)

---

* नवरी विधवा किंवा सुटपत्र मिळालेली असल्यास, विधवा अथवा सुट पत्र मिळालेली हे शब्द जोडतात. + द्राक्षाच्या प्याल्यांतील रुप्याची आंगठी. II हें वाक्य नवरीच्या हातीं प्याला देताना एक वेळा आणि त्याप्याल्यातील आंगठी उजव्या हाताच्या तर्जनी बोटांत घालताना एक वेळा, असेंहि ह्मणण्याची चाल आहे.

जेथें हें मागील वाक्य नवरीच्या हातीं द्राक्षरसाचा प्याला देतांना दोन वेळा बोलतात, तेथे आंगठी घालतांना हें पुढलि वाक्य ह्मणतात. आणि मागणीच्या दिवशीं आंगठी देतानांही नवरा हेंच वाक्य ह्मणतो.

הרי את पाहा, या आंगठी कडून मोशे व इस्राएल यांच्या शास्त्राप्रमाणे तूं मजशीं विवाहित झाली आहेस.

यानंतर केथुबा म्हणजे लग्नाचें करारपत्र जें पूर्वींच लिहून तयार केलेलें असतें, तें वाचावें.

בשם רחמן ज्याचें नाम सुवंदित, त्या पूर्ण दयाळू दयासागराच्या नामानें, ज्याला मोठेपणा शोभतो; जो सर्व धन्यावाद व स्तुति या पेक्षा श्रेष्ठ त्याच्या नामानें; चांगल्या व प्रौढ चिन्हानें; सुवेळीं, सुमुहूर्तीं (हें कार्य होत आहे); म्हणून या नवरा नवरीचा व यां मिळालेल्या मंडळीचाहि परस्परांमधील सहवास वर्णनीय होऊन, त्यास हर्ष, उल्हास, आनंद, उत्साह होवो; त्यास उद्धार, तारण व मुक्ति मिळो; आणि त्याच्या सर्व मागण्या पूर्ण होवोत. हीं उभयतां आनंद व उल्हास पावोत, बहुफल होऊन

वाढोत, नांदोत व सफल होवोत; (कारण) ज्याला बायको मिळाली त्याला उत्तम अर्थ मिळाला आहे, आणि त्याला परमेश्वराजवळून अनुग्रह प्राप्त झाला आहे. घर आणि धन वडीलांपासून आलेला विभाग आहेत; परंतु शाहाणी बायको परमेश्वराचें देणें आहे. (हे नवऱ्या,) तुझी स्त्री तुझ्या घराच्या बाजूच्या सफळ द्राक्षवेला सारिखी होवो; तुझीं लेकरें तुझ्या मेजा भोंवतीं जाईत रोप्यासारिखीं होतील. पाहा, जो पुरुष परमेश्वराला भितो, तो असा आशीर्वाद पावतो. जीयोनांतून परमेश्वर तुला असा आशीर्वाद देवो कीं, तूं आपल्या आयुष्याच्या सर्व दिवसांत यरुशालेमाचें बरें पाहशील, आपल्या लेकरांच्या लेकरां सुद्धां इस्राएलांवर समाधानहि पाहशील.

לבריאת עולם या (अमुक) नगरांत, जें मोठ्या समुद्रांत वाहून जाणाऱ्या नदीच्या काठीं वसलेलें आहे, त्यांत ज्याप्रमाणे आह्मी पृथ्वी उत्पत्तीच्या प्रकारें गणित करितों, त्याच्या

वर्षाच्या महिन्याच्या तारखेस

रोजीं, (अमुक) प्रतिष्ठित स्वामीचा पुत्र सुंदर कुमार (अमुक), हा अमुक प्रतिष्ठित स्वामीची कन्या कुमारी नवरी, जसी प्रिय हरिणी व सुंदर पणाचा मुगुट जी (अमुक), इला ह्मणाला कीं, तूं

मोशे व इस्राएल यांच्याशास्त्राप्रमाणे माझी स्त्री हो. आणि जसे इस्राएलांतील पुरुष श्रम करून व आपल्या स्त्रीयांसी प्रीतीनें वागून त्यांस अन्न व सुशोभित वस्त्रें पुरवितात; तसें मीहि ईश्वराच्या सहायानें श्रम करून व प्रीतीनें वागून तुला अन्न वस्त्र पुरवीन. आणि तुझ्या कुंवारपणाचें मोल दोनशें जूज*, ज्याचे शुद्ध रुप्याचे पंचवीस जूज होतात, तें मी तुला दिल्हे पाहिजे आणि तुला अन्न, वस्त्र व ज्याचें तुला अगत्य असेल तें व जगरीती प्रमाणे तुझा योगहि पूर्वीन. आणि ही मशारनिल्हे कुमारी नवरी (अमुक) त्यास स्त्री होण्यास मान्य झाली आहे, आणि (अमुक)कीमतीचे सोन्या रुप्याचे दागिन्यांचें व वस्त्र पांघरूणाचें जें आंदण तिने आपल्या बापाच्या घराहून नवऱ्याच्या घरीं आणिलें, तें या मशानिल्हे नवऱ्यानें आपल्या हातीं घेऊन आपले स्वाधीन ठेविलें आहे. तें त्यानें आपणावर कर्ज, आणि मेंढरें व लोखंड या मालाप्रमाणे त्यानें तें आपणा जवळ ठेविलें आहे; त्यांत जो नफा तोटा होईल तो त्याचा. आणि हा मशानिल्हे नवरा (अमुक) स्वइच्छेनें या करार पत्राच्या भांडवलाकरितां त्याशिवाय तिला (अमुक) रुपये अधिक देतों. यावरून आंदणाचे

* जूज हें एक प्रकारचे नाणें आहे.

व अधिक दिल्हेले रुपये एकंदर (अमुक) होतात. आणि मशार्निल्हे नवरा (अमुक) आह्मास असें ह्मणाला कीं, या करार पत्राचें जडजोखीम मजवर आणि माझ्या संपत्तीवर असावें यास मी मान्य आहें; आणि माझ्या मागें, आकाशाखालीं ज्यावर माझा हक्क लागेल, अशा माझ्या माल मिळकतींच्या उत्तमातून त्याची फेड व्हावी. जो माल मी विकत घेतला आहे व पुढें घेईन व जो जोखिमाचा असेल यांवर आणि माझ्या खाद्यांवरील (अंगांतील) अंगरख्यावरहि या करारपत्राचें जडजोखीम व हक्क असून तेंहि यांत धरलें आहे. ज्यांची आठवण आशीर्वादित अशा ज्ञान्यांच्या चाली प्रमाणे व ठरावाप्रमाणे पूर्वींपासून या काळापर्यंत (चालत आलेल्या) इस्राएलांतील कन्यांच्या करार पत्रांचे जड जोखिमाप्रमाणे या करार पत्राचें जडजोखीम आहे; आणि हें केवळ दाखले पत्रा सारिखे किंवा नकैले सारिखें नाहीं, यावरील पृथ्वींतील सर्व प्रकारचा दावा रद्द असे. आणि बारशीच्या प्रकरणांत गांवच्या चालीप्रमाणे सर्व करावें.

וקנינן आणि आह्मी खालीं सह्या करणारे साक्ष यांनी, मशार्निल्हे नवरा (अमुक) याजकडून, जें यांत लिहिलें व सांगितलें आहे, त्या विषयीं

योग्य रीतीचे शपथ करविली आहे; आणि हें सर्व सरळ, उघड, सत्य, सिद्ध व स्थापित आहे

साक्ष   नवऱ्याची सही

करार पत्राचें शेवटलें वाक्य वाचल्या अगोदर नवऱ्याच्या अंगावरील सीसीथींचे चौहों कोणाचे भागे नवऱ्याच्या हातीं देऊन व हज्जानानेहि धरून हें तीन वेळ बोलावें.

מפי קדוש हज्जान ह्मणतो. जो पवित्र, पवित्र मानलेला आणि सर्वशक्तिमान, याच्या मुखांतून सीनाय पर्वतावर साक्षातपणें असा नियम लाऊन दिल्हा आहे कीं, "(जर कोणी बायको करून घेतो,) तर तिचें अन्न वस्त्र व तिजशीं व्यवहार यामें कमी करूं नये."

नवरा ह्मणतो. मी तिचें अन्न वस्त्र व तिजशीं व्यवहार कमी करणार नाहीं.

हा० यास तूं मान्य आहेस?

न० मी यास मान्य आहें.

हा० आकाश व पृथ्वीची शपथ?

न० आकाश व पृथ्वीची शपथ.

मंडळी ह्मणते. इस्राएलांस पवित्र करणारा धन्य असो.

करारपत्र नवऱ्यानें स्वतां नवरीच्या हातीं देतांना हें बोलावें.

סבי כתובתיכי हे तुझें करारपत्र व

तुझा लेख आपल्या हातीं घे; आणि ज्यावर माझा अधिकार चालतो असें जें त्यांत लिहिलेलें आहे, तें या साक्षींच्या व गुरूंच्या समक्ष मोशेच्या व इस्राएलांच्या नियमाप्रमाणे तुझें असे.

הא כתובתיכי हें तुझें करार पत्र असे.

החתן במלבושים नवरा आपल्या भूषणाकडून पुरुषांत, आणि स्त्री आपल्या लग्नाच्या क्रियाकर्मांवरून स्त्रियांत शोभतात.

מקדישים בקדושים (यावरून) सीनाय पर्वतावर पवित्र झालेले (लोक) पवित्रते कडून (देवास) पवित्र मानितात.

אהוב נגלה प्रिय, धन्य व सामर्थ्यवान् (देव) सीनाय पर्वतावर प्रगट होऊन त्यानें शूर (इस्राएलांस) नेम शास्त्राचें वतन दिल्हें. מקדישים

דגול . נגלה श्रेष्ठ, महत्त्ववान, व अनादि (देव) सीनाय पर्वतावर प्रगट होऊन त्यानें शूर (इस्राएलांस) नेम शास्त्राचें वतन दिल्हें מקדישים

זכאי נגלה निर्मळ, कृपाळू, व शुद्ध (देव) सीनाय पर्वतावर प्रगट होऊन त्यानें शूर (इस्राएलांस) नेम शास्त्राचें वतन दिल्हें. מקדישים

יחיד נגלה एकच जो, महान व आद्यंत (देव) सीनाय पर्वतावर प्रगट होऊन त्यानें शूर (इस्राएलास) नेम शास्त्राचे वतन दिल्हें מקדישים

מלך נגלה राजा, भयंकर व आश्रय देणारा (देव) सीनाय पर्वतावर प्रगट होऊन त्यानें शूर (इस्राएलांस) नेम शास्त्राचें वतन दिल्हें. מקדישים

עוזר נגלה सहाय कर्त्ता, उद्धारक, व यथार्थ (देव) सीनाय पर्वतावर प्रगट होऊन त्यानें शूर (इस्राएलांस) नेम शास्त्राचें वतन दिल्हें. מקדישים

קדוש נגלה पवित्र, दयाळू व सर्व समर्थ (देव) सीनाय पर्वतावर प्रगट होऊन त्यानें शूर (इस्राएलांस) नेम शास्त्राचें वतन दिल्हें. מקדישים

תמים נגלה अखंडित, आधार देणारा, व पराक्रमी (देव) सीनाय पर्वतावर प्रगट होऊन त्यानें शूर (इस्राएलांस) नेम शास्त्राचें वतन दिल्हें. מקדישים

हें बोलते समयीं द्राक्षरसाचे दोनप्याले भरून एक नवऱ्यानें व एक हाजानानें आपले हातीं घ्यावा

שבע ברכות सप्ताशीर्वाद.

סברי מרנן गुरूच्या मताप्रमाणें

ברוך אתה יי हे परमेश्वरा! आमच्या

देवा, जगताच्या राजा, द्राक्ष फल उत्प
तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे पर
देवा, जगताच्या राजा, आपलें महत्
करितां) सर्व पदार्थ उत्पन्न कर
आहेस.

ברוך אתה יי हे
देवा, जगताच्या राजा, मनुष्यास
आहेस.

רוך אתה יי
च्या देवा, जगताच्या
तिमे प्रमाणे व आप
आणि त्यासाठीं सर्व
वणाऱ्या तूं धन्य
णाऱ्या, तूं धन्य

תשיש
लेंकरें त्वरेनें व
नंदित व उल

\+ इमा
लावलेला अ
जगांत राखणाऱ्या

\+ वांझे सा

वशीं नवऱ्यास शास्त्र वाचायास
या अगोदर हें गीत बोलावें.

אַרְבָּעָה כ आकाशांतून चार
तरले; म्हणजे शास्त्राचा मुगुट, आचा-
जकीय मुगुट, आणि कीर्तीचा मुगुट;
शे भविष्यवाद्यानें धारण केला;
आहारोन आचार्यानें धार-
गट दावीद राजाने धारण केला.
आंनी धारण केला. आणि
केलें (मिळविलें); सरळ;
णा मिळविला; यथा-
आणि नम्र आत्म्या-
कीर्ति चांगली.
उटणे खर्चिलें आ-
लय होत नाहीं.
सांत, आणि तु-
च्या आयुष्यांत
तुम्ही तथा-
, हे नव-
ी नवऱ्या
ने उभा राहा.

THE

PRAYERS

OF THE

FIVE JEWISH FASTS.

TRANSLATED

From Hebrew into Marathi

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKAR,

HEAD MASTER, DAVID SASSOON BENEVOLENT INSTITUTION,

FELLOW OF THE UNIVERSITY OF BOMBAY,

AND

JUSTICE OF THE PEACE.

Bombay:

PRINTED AT THE "NIRNAYA-SAGARA" PRESS.

1890—5650.

Registered under Act XXV. of 1867.

סדר חמש תעניות·

E FIVE JEWISH FASTS.

इस्त्राएलांचीं पंचोपोषणें.

किंमत एक रुपया दहा आणे.

סדר חמש תעניות

इस्राएलांचीं पंचोपोषणें.

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठीभाषेंत,

योसेफ येहेजकेल राजपूरकर,

दावीद सासोनच्या शाळेचे मुख्य गुरु,

मुंबईच्या युनिवर्सिटीचे फेलो

व

जस्टिस आफ धी पीस,

यांनीं भाषांतर केलें

तें,

मुंबईमध्यें,

निर्णयसागर छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९०. इस्राएली ५६५०.

TO

The Memory

OF

MY DEAR UNCLE,

MR. ELIJAH JOSEPH RAJPURKAR,

(MAY HIS SOUL BE BOUND UP IN THE BAND OF THE LIVING.)

HAZZAN TEACHER &c. &c.,

OF THE

OLD SYNAGOGUE IN BOMBAY; WHO CONDUCTED HIS VARIOUS DUTIES FOR THIRTY-SIX YEARS; WHO LOVED AND WAS LOVED AND VENERATED BY THE WHOLE CONGREGATION; DURING THE LONG PERIOD OF WHOSE MINISTRY THE CONGREGATION ENJOYED PEACE AND HARMONY AND THE SYNAGOGUE SIGNAL PROSPERITY; AND WHO DEPARTED THIS LIFE

ON THE

First Day of the Feast of Passover,

6TH APRIL 1871.

AT THE AGE OF 59 YEARS;

THIS TRIBUTE IS INSCRIBED AS A TOKEN OF GREAT VENERATION TO HIS DEPARTED MERITS BY HIS AFFECTIONATE NEPHEW,

JOSEPH EZEKIEL.

माझे प्रिय चुलते

अ. एलीया योसेफ राजपूरकर.

(त्यांचा आत्मा स्वर्गवासी जनांशीं मिळालेला असो.)

ज्यांनीं मुंबईतील जुन्या प्रार्थनामंदिराच्या हाज्जानचे शिक्ष-
काचें इत्यादि अनेक कामें ३६ वर्षें चालविलीं; जे
सर्वांवर प्रीति करून सर्वांस प्रिय व बहुमान्य
होते; ज्यांच्या वेळीं समाजांत शांति
व समेट असून प्रार्थनामंदिराचा
उत्कर्ष होता; आणि जे
आपल्या आयुष्याच्या
५९ व्या वर्षी
पेसाहच्या पहिल्या दिवशीं
तारीख ६ एप्रिल १८७१
गुरुवार रोजीं
एदेनांत विश्रांति पावले;
त्यांच्या गुणांच्या सन्मानास

हा ग्रंथ,

मीं मोठ्या आदरानें समर्पिला असे.

योसेफ येहेजकेल राजपूरकर.

प्रस्तावना.

इस्राएल हे पूर्वी ईश्वराचे प्रिय व खासगी लोक असून त्यांजवर त्याची पूर्ण कृपा होती. त्यांजकरितां अनेक वेळां मोठमोठे चमत्कार करून, त्यांच्या व सर्व जगाच्या कल्याणाकरितां उत्तम नियम त्यांस लावून देऊन, आणि त्यांच्या रक्षणाकरितां आपल्या गौरवाच्या रूपानें त्यांमध्यें स्वतां वास करून ही कृपा त्यानें स्पष्ट दाखविली. परंतु ही कृपा त्यांनीं आपणांवर राखिली नाहीं. त्यांनीं अनेक वेळां त्याच्या आज्ञा मोडिल्या, ह्मणून त्यानेंही त्यांस अनेक वेळां लहान लहान शिक्षा केल्या. शेवटीं ते आपल्या परमदयाळू देवास विसरून मूर्तिपूजा करूं लागले; तेव्हां त्यानें बाबेलच्या राजाकडून त्यांच्या राज्याचा, त्यांच्या पवित्र नगराचा व मंदिराचाही नाश करवून त्यांस बाबेलदेशीं दास्यत्वांत पाठविलें. या शिक्षेवरून त्यांस बोध होऊन मूर्तिपूजेचा त्यांस अगदीं वीट आला. तेव्हां त्यानें त्यांस त्यांच्या देशीं परत नेऊन पूर्वीप्रमाणें त्यांचें राज्य, त्यांचें पवित्र मंदीर इत्यादि गोष्टी पुनः स्थापन केल्या. परंतु त्या दुसऱ्या मंदिराचाही नाश झाला. हा नाश अभिमान, परस्परांत वैर व हेवा यांवरून झाला आहे व दीर्घ वाढला आहे; तो होऊन अठराशें बेवीस वर्षें होत आलीं.

इतिहासावरून असें कळून येतें कीं, जोंपर्यंत त्यांमध्यें ऐक्य होतें, तोंपर्यंत ते प्रतापी व समर्थ होते व त्यांजवर इतर मोठमोठाल्या राजांचेंही कांहीं चाललें नाहीं; परंतु जेव्हां त्यांस अभिमान येऊन ते परस्परांत भांडूं लागले, तेव्हां रोमी लोकांस चढून येऊन त्यांचा देश जिंकून घेण्यास व त्यांच्या दुसऱ्या पवित्र मंदिराचा नाश करण्यास साधलें. लढाईस आरंभ होतेवेळीं वेढा पडल्यास दोन लक्ष मनुष्यांस वीस वर्षें पुरे एवढें अन्न येरूशालेमेंत होतें; परंतु त्यांमधीलच अभिमानी लोकांचे तीन पक्ष होऊन त्यांनीं परस्परांत लढून तें सर्व जाळिलें. यामुळें त्यांचें सामर्थ्य उणें होऊन शेवटीं त्यांचा सर्वस्वीं नाश झाला; आणि त्यांस हल्लींची दशा प्राप्त झाली आहे.

आतां ही आपल्या पूर्वजांची दशा आपणांस उघड दिसून येत असतांही आपण या पश्चिम हिंदुस्थानांतील इस्राएल सावध होऊन बोध न घेतां त्याच रिपूंच्या स्वाधीन होऊन तसेच वर्ततों, आणि त्यामुळें आपणांस अधिकाधिक

निकृष्ट अवस्था प्राप्त होत आहे ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. ही स्थिति सुधारणें आपल्याच हातीं आहे. या ग्रंथावरून या प्रार्थनेचा अर्थ समजेल एवढेंच नाहीं, परंतु आपल्या पवित्र मंदिराचा नाश कसा व कां झाला, त्यामुळें आपल्या लोकांस कोणती दशा प्राप्त झाली आहे, आपल्या धर्माच्या सत्यतेकरितां व ईश्वरी नामाच्या एकत्वाकरितां कोणीं कोणीं व कशीं कशीं दुःखें सोसून आपले प्राणही दिले हें कळून येऊन त्यांच्या उदाहरणांवरून आपल्या ईश्वरदत्त धर्मावरील आपला विश्वास दृढ होईल; आणि या ग्रंथीं वर्णिलेल्या दुःखांविषयीं व आपल्या लोकांच्या हल्लींच्या स्थितिविषयीं विचार करून, पूर्ण पश्चात्ताप करून आपल्या दयाळू बापास शरण गेल्यानें, आणि जेखार्या भविष्यवाद्यानें सुचविल्याप्रमाणें सत्य व शांति यांजवर आवड ठेविल्यानें सर्व दुःखें दूर होऊन सुखप्राप्ति होऊं लागेल, आपला बाप पुनः आपला अंगिकार करील, आणि त्यानें अभय वचन दिल्ह्याप्रमाणें इस्राएलांच्या उद्धाराचे दिवस लवकरच येतील अशी आशा करितों. हा प्रवास दीर्घ वाढून उद्धाराचे दिवस येण्याची वाट पाहावी लागेल, आणि कित्येक त्याविषयीं निराशही होतील अशीं शास्त्रांत सांगितलेलीं भविष्यें ज्याप्रमाणें पूर्ण होत आहेत, त्याप्रमाणें इस्राएलांचा पूर्ण उद्धार होऊन सर्वसमर्थ देवाचें राज्य सर्व पृथ्वीवर स्थापन होईल, हीं भविष्येंही पूर्ण झाल्यावांचून राहणार नाहींत.

इस्राएलांचीं पंचोपोषणें.

पंचोपोषणांच्या दिवसांच्या प्रार्थनेचे नियम.

या पांच उपोषणांतील पहिल्या चार उपोषणांच्या म्हणजे गेदाल्याच्या, तेबेतच्या, एस्तेरच्या व तम्मुजच्या उपोषणांसंबंधानें संध्याकाळच्या प्रार्थनेंत कांहीं अधिक उणें नसतें; ही प्रार्थना नित्याच्या संध्याकाळच्या प्रार्थनेसारिखीच असते; जें कांहीं अधिक किंवा उणें तें पाहांटेच्या व तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेंत असतें. पाहांटेची प्रार्थना तीही אדני שפתי पर्यंत नित्यासारिखीच असते; तरी उपोषणाकारणें אדני שפתי मध्यें नित्याच्या प्रार्थनेंत लिहिल्याप्रमाणें עננו אבינו हा भागहि म्हणावा लागतो. याप्रमाणें אדני שפתי पुनः मोठ्यानें म्हटल्या नंतर (गेदाल्याच्या उपासाच्या दिवशीं प्रायश्चित्ताच्या दिवसांत त्यामागून म्हणायाचीं אבינו מלכנו हीं वाक्यें म्हणून) पुढें लिहिल्याप्रमाणें वाचितात.

על ידי רחמיך हे आमच्या बापा, तूं आपल्या मोठ्या दयेनें आह्मांस क्षमा कर, कारण वेडेपणानें आह्मीं पुष्कळ चुका केल्या आहेत; हे आमच्या राजा आह्मांस माफ कर, कारण आमचे अपराध फार वाढले आहेत. तूं मंदक्रोधी देव आहेस; तुझ्या दयेचा व कृपेचा मोठेपणा तुझ्या प्रियकरांच्या संततीकरितां आज तूं आठीव. तूं दयेनें आह्मांकडे फीर, कारण तूं दयेचा स्वामि आहेस; आणि नम्र (मोशे) यास कळविल्याप्रमाणें आह्मी प्रार्थना व काकळूत करीत तुजपुढें येतों. तर तुझ्या शास्त्रांत लिहिल्याप्रमाणें तूं आपल्या क्रोधापासून फीर; मग ज्या दिवशीं हे परमेश्वरा तूं मेघांत उतरलास, त्या दिवसाप्रमाणें आह्मी तुझ्या पंखाच्या छायेमध्यें आश्रय व निवारा घेऊं. ज्या दिवशीं तूं तेथें (मोशे) जवळ उभा राहिलास, त्या दिवसाप्रमाणें आमचें उल्लंघन दूर कर व आमचा अपराध क्षमा कर. ज्या दिवशीं तो परमेश्वराचें नाम मोठ्यानें बोलला, त्या दिवसाप्रमाणें आमची विनंति ऐक, आणि प्रसन्नतेनें आमच्या ह्मणण्याकडे कान लाव. (आणि तेथें येणेंप्रमाणें ह्मटलें आहे:—)

ויעבור.

אבלה נפשי माझा जीव दुःखानें दुर्बळ झाला, आणि माझी मुखचर्या काळी पडली आहे. माझा मनोरम वाडा[1] सिंहाच्या[2] हातून भस्म

१ पवित्र मंदीर. २ सिंह ही उपमा एथें बाबेलचा राजा नेबूखादनेसार यास दिल्ही आहे.

पराधांची क्षमा करणाऱ्या, आणि आपणाकरितां त्यांतील एक एक पार करणाऱ्या, तूं आपल्या लोकांसाठीं आणि पूर्वीप्रमाणें प्रसन्नतेच्या वेळीं आपल्या सत्वशीलांसाठीं सीनाय पर्वतावरील उभें राहणें स्मर. जी काकळूत ते करतात, ती तूं आपल्या दयेनें मान्य कर, जुलुमगारांच्या हातांतून तूं आपल्या लोकांस सोडीव; हे दयावंता व कृपावंता! तुझा साक्षात्कार व तुझें पादासन हीं त्याच्या ठिकाणीं पुनः स्थापन करण्यास आपलीं पावलें उचल. ज्याचें काम पूर्ण असा जो खडकरूप आश्रय, हजारांशीं दया राखणारा, आणि गर्विष्ठांकडून पाठलाग होतो ह्मणून तारणाची आशा करणाऱ्या लोकांच्या अपराधाची क्षमा करणारा, त्याच्या पूर्वजांची यथार्थता व पुण्याई मागतो. हे देवा, तूं आपल्या लोकांस एकवट कर आणि तार, त्यांच्या आरोळीकडे कान लाव, आणि संतुष्ट होऊन आपल्या लोकांस सुख दे; आरीएल[1] बांध आणि त्यांची इच्छा पूर्ण होऊन त्यांनीं देवाचें नाम गावें ह्मणून तूं प्रकाशित हो. तूं आपल्या लोकांस तारणाचें शुभवर्तमान ऐकीव, त्यांची आरोळी ऐक, आणि आपल्या लोकांस तारायास मान्य हो, हारएल[2] बांध व त्यास स्थापित कर, मग जसें (मोशे) भविष्यवाद्यानें तु[3]जपुढें ह्मटलें, त्याप्रमाणें ते सुंदर गीत गाऊन ऐकवितील.

אנשי אמונה नि. प्रा.
אל מלך नि. प्रा.
תמהנו מרעות नि. प्रा.
אל מלך नि. प्रा.

ובשחטאו ישראל जेव्हां इस्राएलांनीं रानांत पाप केलें; तेव्हां मोशेनें तुजपुढें उभें राहून प्रार्थना केली, आणि तुझ्या इस्राएल लोकांवर त्वां कृपा करावी ह्मणून त्यानें विनंति केली; आणि तो आपल्या प्रार्थनेंत असें ह्मणाला कीं, तूं आपल्या मोठ्या दयेप्रमाणें, आणि मिस-

---

१ हें येरूशालेमेस दिल्हेलें नाम आहे; आणि येहेजकेल अ. ४३ ओ. १५ एथें यज्ञवेदीस दिल्हेलें नाम आहे. २ हारएल याचा अर्थ देवाचा डोंगर असा होतो, यावरून हें नाम येरूशालेमेसहि शोभतें; परंतु येहेजकेल अ. ४३ ओ. १५ एथें हें नाम यज्ञवेदीस दिल्हें आहे. ३ इ त्यापुढें.

रांतून एथपर्यंत ज्याप्रमाणें त्वां या लोकांचें सहन केलें, त्याप्रमाणें या लोकांस क्षमा कर. त्वांहि आपल्या चांगुलपणाच्या रीतीप्रमाणें त्यांवर दया करून त्यास शुभवर्तमान ऐकविलें, आणि त्यास उत्तर देवून ह्मणालास कीं, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें म्यां क्षमां केली आहे.

דניאל איש חמודות दानीएल जो प्रिय मनुष्य, तो तुजपुढें ह्मणाला, कीं हे माझ्या देवा, तूं आपला कान लावून ऐक, आपले डोळे उघड, आणि आमचीं ओसाड स्थानें व ज्या नगराला तुझें नांव दिलेलें आहे तेंहि पाहा; कारण आह्मीं आपल्या न्यायीपणामुळें नव्हे, परंतु तुझ्या फार दयेमुळें आपली विनंति तुजपुढें करितों. हे प्रभु, ऐक, हे प्रभु, क्षमा कर, हे प्रभु, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपल्याकरितां असें कर, कां कीं, तुझ्या नगरास व तुझ्या लोकांस तुझें नाम दिलें आहे. आणि तूं आपल्या येरूशालेम नगरास ह्मणाला आहेस, कीं पाहा, मीं पाप केलें नाहीं, असें तूं ह्मणतीस, ह्मणून मीं तुजशीं वाद करीन. तर आमच्या कर्मांमुळें आह्मांस लज्जा प्राप्त होती, आणि आमच्या अपराधांमुळें आह्मी विस्मित होतों; आह्मांस तुजकडे परतायास तोंड आणि डोकें[1] उंच करायास धैर्य नाहीं.

אָנָּא על תעש पा. क्ष. प्रा.
אנא יי पा. क्ष. प्रा.
אשמנו מכל עם पा. क्ष. प्रा.
אשמנו באומר पा. क्ष. प्रा.
לעינינו עשקו पा. क्ष. प्रा.
אשמנו בגרנו पा. क्ष. प्रा.

עזרא הסופר एज्रा जो लेखक, तो तुजपुढें ह्मणाला कीं, हे माझ्या देवा, हे माझ्यां देवा, मला तुजकडे आपलें तोंड वर करायास लाज वाटती व मी विस्मित होतों; कां कीं, आमचे अन्याय आमच्या डोक्यावरतीं वाढले आहेत, आणि आमचा दोष आकाशापर्यंत मोठा झाला आहे. परंतु तूं क्षमाशील, कृपाळू व दयाळु, मंदक्रोध व बहुप्रसाद

१ इ० कपाळ.

देव आहेस, ह्मणून (आमचे पूर्वज याप्रमाणें असतांहि) तूं त्यास सोडिलें नाहींस.

אבינו על תעזבנו तर हे आमच्या बापा! आह्मासहि सोडूं नको, हे आमच्या राजा! आह्मास धिक्कारूं नको; आणि हे आमच्या उत्पन्न कर्त्या! आह्मास विसरूं नको; आणि आमच्या पाडावपणांत आमचा निःपात करूं नको; आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा भविष्यवादि इर्मेया याजकडून जें अभयवचन तूं आह्मास दिलें आहेस कीं, "त्या दिवसांत, त्या समयींच इस्राएलांचा अन्याय शोधण्यांत येईल, परंतु कांहीं नाहीं; आणि यहूदांचीं पातकें शोधण्यांत येतील, परंतु तीं सांपडणार नाहींत; कारण ज्यांस मी राखून ठेवितों त्यांस क्षमा करीन;" (हें वचन) तूं पूर्ण कर. आणि आमच्या सर्व पापांकडून व अपराधांकडून आमच्या प्रार्थनेस अडथळा होऊं देऊं नको; परंतु आमचे सर्व अपराध माफ व क्षमा कर; कारण तूं चांगला व क्षमाशील आहेस.

אל ארך אפים नि. प्रा.

ויעבור नि. प्रा.

והוא רחום नि. प्रा.

ויאמר דוד नि. प्रा.

לדוד אליך नि. प्रा.

יי אלהי ישראל नि. प्रा.

गेदालयाच्या उपासाच्या दिवशीं हें पुढील ह्मणतात.

עד מתי יי हे परमेश्वरा, तूं आपल्या चारण्याच्या मेंढरांवर सूड उगवायासाठीं क्रोध चढावा ह्मणून कोठपर्यंत आपला राग चेतविशील! शत्रूनें तर रागानें व क्रोधानें आमचा नाश केलाच आहे. ते ह्मणतात आमचा हात उंचावलेला आहे; त्यांनीं मजशीं विनाकारण दगा केला. मजवर जुलूम करणारे सिंहासारखे गर्जले; याच दिवशीं त्यांनीं आहीकामाचा पुत्र गेदालया यास मारिलें. आणि जे वांचले ते अतिशय व्याकुळ झाले, आणि परमे१श्वरानें त्यांस दक्षिणेकडे व पूर्वेकडे विखरलें. हे माझ्या देवा, त्यांच्या हातांच्या कर्मांचें फळ तूं त्यांस केव्हां देशील!

---

१ इ. परमेश्वराच्या मुखानें ह्मणजे परमेश्वराच्या वचनाप्रमाणें ते विखरले.

आणि त्यांची योग्य शिक्षा ते केव्हां भोगतील! लूबीम व कूशीम[1] या लोकांनीं त्यांचा नाश करायास एकत्र मसलत केली; अश्शूरहि त्यांशीं मिळाला. त्यांची योग्य शिक्षा त्यांस मिळो. तुझें तारण आमच्या दृष्टीपुढें दाखीव, आणि आमच्या शत्रूंच्या पदरीं सातपट घाल.

तेबेतच्या उपासाच्या दिवशीं हें ह्मणतात.

"יגוני" हे परमेश्वरा, ज्या दिवशीं बाबेलचा राजा येरूशालेमेवर चढून आला, त्या दिवशीं माझीं दुःखें मला शोक करावयास लावितात[2] त्यानें आपलें सैन्य चालविलें, आणि आपला गर्व दाखविला, आणि त्याच्या उजव्या हातीं येरूशालेमेविरुद्ध शकून होता. ईश्वरी इच्छेप्रमाणें करणारांनीं[3] (इस्राएलांचें) रक्त येरूशालेमेभोंवतें पाण्यासारखें वाहविलें. येहूदाच्या वैभवाचा व येरूशालेमेच्या वैभवाचा नाश करून त्यांनीं मला अशक्त व उदास करून टाकिलें आहे. त्यांनीं गड पाडिला, चांदवा कोसळविला, आणि सीयोनेंत अग्नि लावून येरूशालेमेंतील वाडे भस्म केले. त्यानें बाबेलचे लोक माझ्या लोकांवर उठविले, कारण हें विघ्न येरूशालेमेच्या द्वारीं ईश्वराकडून आलें. केदाराची[4] पूर्ती फेड कर; उगा राहूं नको. हे परमेश्वरा, जीं एदोमाचीं लेंकरें, येरूशालेमेच्या नाशाच्या दिवशीं (तिला पाडून टाका) असें ह्मणालीं, त्यांची आठवण कर. आणि पाहा, (कोणी सहाय करणारा) उरलेला अथवा एकीकडे राहिलेला असाहि नाहीं. आणि येरूशालेम पडली ह्मणून शत्रूनें माझी पाठ पुरविली आहे. आह्मी आपणांवरील घावाकरितां उपायाची आशा करितों; परंतु पाहा, नाशच पुढें येतो; तर तूं कोठपर्यंत येरूशालेमेवर दया करणार नाहींस !

एस्तेरच्या उपासाच्या दिवशीं हें ह्मणतात.

"אויב גבר" हे परमेश्वरा, आहाश्वेरोशाच्या दिवसांत शत्रु पवित्र व शुद्ध लोकांवर बळावला; आबालवृद्धांस मारायास त्यांनीं एकत्र जमून विचार केला; आणि तुझा द्वेष करणारांनीं आपलें डोकें उंचावलें. त्या ओंगळ छळणारानें कंपनाच्या प्याल्यानें माझी तहान भागविली, आणि

---

१ लूबीम हे मीसराच्या पश्चिमेस व कूशीम हे दक्षणेस राहणारे रानटी लोक होते.
२ इ. बोलवितात. ३ इ. आकाशाचें काम करणारांनीं. ४ इश्माएलाचें संतान.

मला विष प्यावयास दिल्हें. संकटसमयीं उत्तर देणारानें त्या शत्रूवर आपला हात फिरविला, तेव्हां तो डोकें झांकून शोक करीत गेला. पूर्वींच्या पिढ्या उत्पन्न करणारानें आपल्या लोकांचें शांतवन करण्याकरितां दयेनें त्यांचा शोध ठेविला; सर्वांहून श्रेष्ठ असा जो उंचावलेला देव, त्यानें, ते शत्रूच्या देशांत असतां त्याजविषयींचें आपलें वचन पूर्ण केलें.

तम्मूजच्या उपासाच्या दिवशीं हें ह्मणतात.

שׁטוּפָה " हे परमेश्वरा, पूर्ण सुंदरि सीयोन दडपली, असडली आणि मरणानें छेदली गेली आहे. शत्रूनें आपला राग अतिशय चेतविला, आणि क्रोधानें सीयोनेच्या कन्येच्या वेशींत आग लाविली. माझें पवित्र मंदिर शम्मा आणि मिज्जा[2] यांनीं लुटलें, आणि त्यांनीं सीयोनेस आग लाविली. जेव्हां तिनें दुःखाचा शब्द ऐकिला, तेव्हां ती शोक करून म्लान झाली; प्रभूच्या क्रोधानें सीयोनेच्या कन्येस कशी झांकिली आहे! सीयोनेची आठवण करून आह्मी रडतों, आणि हातावर हात आपटितों. आमच्या अपराधांनीं आह्मास खांडलें व आह्मावर घाव केले; ज्यांनीं आह्मास बंदिवान करून नेलें, त्यांनीं आह्मास सीयोनेचें एखादें गीत गावयास सांगितलें; (परंतु आह्मी ह्मणालों कीं,) आमचें दुःख वाढलें आणि मोठें झालें आहे, तर आह्मी परमेश्वराचें गीत कसें गावूं! आमच्या पुष्कळ अपराधांमुळें आह्मी दास्यत्वाचें जोकड वाहत आहों. सर्व असें आहे, तरी मला आशा आहे कीं, देव सीयोनेचें तारण करील. (हे देवा,) तूं येहूदा व एफ्राईम यांचें शांतवन करच कर, येरूशालेमेचीं गांवकुसें बांध आणि आपल्या प्रसन्नतेनें सीयोनेचें बरें कर. अगे सीयोनेंत राहणारिणी! मोठ्यानें ओरड व उत्सव कर, असें शुभवर्तमान ऐकविणाराचा शब्द फुकट विकले गेलेले लोकांस लवकर ऐकीव. हे परात्परा! शांतवनाचा दृष्टांत लवकर प्रत्ययास आण, ह्मणजे सीयोनेंतून पाडाव करून नेलेले जेव्हां परततील, तेव्हां आह्मास केवळ स्वप्नावस्था प्राप्त होईल.

यानंतर שׁוּב מֵחֲרוֹן אַפֶּךָ, אָבִינוּ מַלְכֵּנוּ אָבִינוּ אַתָּה. आणि קַדִּישׁ לְעֵילָא वाचून प्रत्येक सोमवार व गुरुवार या दिवसांप्रमाणें दोन אֵל אֶרֶךְ אַפַּיִם इत्यादि बोलून, शास्त्र काढितात, आणि त्यामधून וַיְחַל מֹשֶׁה ह्मणजे निर्गम अ० ३२ ओ० ११-१४ व अ० ३४ ओ० १-१० पर्यंत वाचायास तीन मनुष्यें बोलवितात. शास्त्र वाचणें पूर्ण झाल्यावर

---

१ इ. बोलविणारानें. २ शम्मा आणि मिज्जा हे एसावाचे कुळांतील नायक होते.

קדיש לעילא वाचून पुढें प्रार्थना चालवितात; आणि शास्त्र नेऊन ठेविल्यावर תפלה לדוד הטה יי या गीताबद्दलः—

गेदालयाच्या व तेवतच्या उपासाच्या दिवशीं गीत ८३.

एस्तेरच्या उपासाच्या दिवशीं गीत २२.

तम्मूजच्या उपासाच्या दिवशीं गीत ७९. याप्रमाणें वाचून नित्याप्रमाणें प्रार्थना पूर्ण करितात.

तिसऱ्या प्रहरची प्रार्थना.

ही प्रार्थना नित्याप्रमाणें אשרי יושבי च्या शेवटपर्यंत करून קדיש לעילא वाचितात. मग जसें पाहांटेच्या प्रार्थनेंत तसें शास्त्र काढितात; परंतु उपास जर शुक्रवारीं असला तर आणि एस्तेरच्या व तिशाआबेआबच्या उपासांच्या दिवशीं दोन אל ארך אפים ह्मणण्याबद्दल संक्षिप्त יהי יי ह्मणून शास्त्र काढितात, आणि त्यामध्यें ויחל משה हा भाग वाचायास तीन मनुष्यांस बोलावितात, आणि तिसरा मनुष्य गेदालयाच्या उपासाच्या दिवशीं यशाया अ० ५५ ओ० ६ पासून अ० ५६ ओ० ८ च्या शेवटपर्यंत पुढील व मागील धन्यवाद करून हाफतारा वाचितो; परंतु मागील धन्यवाद מגן דוד पर्यंत मात्र करितो. मग יהללו इत्यादि बोलून शास्त्र परत नेऊन ठेवितात; परंतु तेबेतच्या उपासाच्या दिवशीं יהללו ह्मणण्यापूर्वी गीत २० יענך יי; तो उपवास शुक्रवार असल्यास गीत १२६ שיר המעלות בשוב יי आणि एस्तेरच्या उपासाच्या दिवशीं गीत १२४ לולי יי ह्मणतात. शास्त्र ठेविल्यावर קדיש לעילא वाचून पाहांटेच्या प्रार्थनेप्रमाणें ארני שפתי हळू व मोठ्यानें वाचून (गेदालयाच्या उपासाच्या दिवशीं प्रायश्चित्ताच्या दिवसांत त्यामागून ह्मणायाचीं אבינו מלכנו हीं वाक्यें ह्मणून) पाहांटेच्या प्रार्थनेंतील על ידי רחמיך हा भाग त्या मागील ויעבור च्या शेवटपर्यंत वाचितात; त्यानंतर אנשי אמונה पासून על תעזבנו אבינו च्या शेवटपर्यंत; त्यानंतर אבינו מלכנו אבינו אתה יי אלהי ישראל, ויאמר דוד हें वाक्य, קדיש, תתקבל, तפלה לעני गीत १०२. עלינו לשבח व קדיש יהא שלמא हे भाग वाचून प्रार्थना पूर्ण करितात. परंतु तेबेतचा उपास शुक्रवारीं असल्यास תפלה לעני गीत १०२ बद्दल יי מלך גאות गीत ९३ वाचितात. एस्तेरच्या उपासाच्या दिवशीं ארני שפתי नंतर लागलाच למנצח על אילת השחר गीत २२. קדיש תתקבל आणि עלינו לשבח व יהא שלמא वाचून प्रार्थना पूर्ण करितात. परंतु पुरीम आदितवारीं असल्याकारणें उपवास बृहस्पतवारीं असतो; तेव्हां ही प्रार्थना गेदालयाच्या उपासाच्या प्रार्थनेप्रमाणें करितात; मात्र गीत १०२ बद्दल गीत २२ वाचितात.

तेबतचा उपास.

या उपासाच्या दिवशीं ארני שפתי पर्यंत प्रार्थना केल्यानंतर हें पुढील ह्मणावें.

וארץ שפל רומי माझा थोरपणा पडून धुळीस मिळाला आहे,

आणि माझा खेद वाढला आहे. ज्या दिवशीं सिंह[1] माझ्या पवित्र डोंगरावरील सुंदर सीयोन नगरासमोर येऊन पोहोंचला, त्या दिवशीं मी चकित होऊन बसतों, आणि त्या दाहाव्या महिन्यांत मी शोक व विलाप करितों. या दाहाव्या महिन्यांत तो सिंह विक्राळपणें चढून[3] आला, आणि या दशमीस त्यानें मजसमोर मोरचा बांधिला, आणि मजवर व माझ्या लोकांवर सूड घ्यावा ह्मणून तो आपल्या सैन्यासहित जवळ येऊन ठेपला, आणि त्यानें लढाईची तयारी केली. हे माझ्या सामर्थ्या व तारका! माझ्या शत्रूशीं व मला नमविणाऱ्याशीं तूं लढाई [2]चालीव. हे परमेश्वरा, माझ्या मेंढपाळा! हे माझ्या ढालरूप आश्रया व माझ्या तारणाच्या शिंगा! तूं त्यांस मिश्रणानें भरलेला प्याला पाज.

בחדש העשירי या दाहाव्या महिन्यांत शत्रु तरवार घेऊन माझ्या पाठीस लागला; आणि या दशमीस तो मजवर दबा धरून बसला; याकरितां मी शोक करितों, आणि माझा हर्ष नाहींसा [4]होतो. आह्मांस हाय हाय! कारण दिवस सरला, आणि संध्याकाळची छाया आह्मांवर पसरली आहे. ही संध्याकाळ पालटून सकाळ [5]होवो, आणि दगा करणारे वर्चस्व न पावोत. तूं आपल्या लोकांवर दया कर; आणि त्यांचीं दुःखें दूर कर. हे मारणाऱ्या व जीवंत करणाऱ्या, कबरेंत उतरणाऱ्या व (तिजमधूनही) वर चढविणाऱ्या, जेव्हां मी आपले हात व तळवे तुजकडे पसरितों, तेव्हां माझ्या पूर्वजांसीं केलेला करार तूं मजकरितां आठीव.

בחדש העשירי या दाहाव्या महिन्यांत रानांतील [6]लांडग्यानें माझ्या लोकांवर डरकाळ्या फोडल्या; त्यांतून जे कोणी बाहेर निघाले, त्या सर्वांचे त्यानें या दशमीस फाडून तुकडे केले; कारण चिंता टपत बसलाच होता. त्यांस पुष्कळ दुःखें देऊन त्यांनीं त्यांचें नगर जाळिलें. हे परमेश्वरा, गर्विष्ठांचा नाश करायास तूं आपलें सामर्थ्य

---

१ एथें सिंह ही उपमा नेबुखादनेसारास दिल्ही आहे. २ इ. ठेव. ३ हें २ राजे अ: २५ वरून लिहिलें आहे. ४ इ. अंधारमय होतो. ५ हे दुःखाचे दिवस जाऊन सुखाचे दिवस येवोत. ६ ही उपमा नेबुखादनेसारास दिल्ही आहे. ७ ही उपमा नेबुखादनेसाराचे सरदारास दिल्ही आहे.

उंचाव, ह्मणजे हे इस्राएलाच्या पवित्रा, सैन्याच्या परमेश्वरा, जेव्हां तूं आमच्या कल्याणाचें सुचिन्ह आह्मांस दाखविशील, तेव्हां ते लज्जित होतीलच होतील.

בחדש העשירי या दाहाव्या महिन्यांत ते ढाल व कवच धारण करून निघाले, आणि या दशमीस विश्वासू नगरीवर लढाईची सिद्धता करून येणाऱ्या मनुष्याप्रमाणें चढून आले. तर अगे सुखवासी मंडळी! तूं तरट पांघर आणि आपले डोईवरील केंसांचा मुगुट कातरून उडवून टाक, आणि उंच टेंकड्यांवर (बसून) शोक कर. हे देवा, तुझे लोक आज तुजपुढें शोकाचेंच भाषण करीत आहेत. आणि तुझ्या वस्तिस्थानाच्या नाशाकरितां आमच्या डोळ्यांच्या पाल्यांतून पाणी वाहात आहे. ज्या शत्रूंनीं तुझ्या मंदिरीं गोंधळ केला, त्यांचा सूड घेण्याचा दिवस उगीव. हे परमेश्वरा, तुझ्या वाटा मला कळीव, आणि तुझे मार्ग मला शिकीव.

בחדש העשירי या दाहाव्या महिन्यांत माझ्या पीडकांनीं माझ्या नगरासमोर गडगे रचिले; या दशमीस (शत्रूनें) माझा मुगुट उडविला, आणि माझी शोभा पडली. मजवर त्रासदायक घाव करणारांनीं मला घेरिलें; ह्मणून माझीं आंतडीं, माझीं आंतडीं कळवळतात. जो पवित्रांच्या मंडळींत मोठ्या भयास योग्य, त्या देवाची मी वाट पाहीन; आणि उल्लंघनें व ऋणें पार घालविणाऱ्यापुढें मी प्रार्थना करीन. तूं आमची दुष्टाई मनावर धरूं नको, आणि आमचीं नोंदलेलीं पापें पुसून टाक; हे परमेश्वरा, आह्मांस तूं आपणाकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं.

ויעבור על ידי רחמיך आणि पृष्ठ १.

אז בבוא יום जेव्हां भविष्यकथनाच्या खोऱ्याच्या[3] पाहाणीचा दिवस आला, तेव्हां परमेश्वराच्या चेतलेल्या रागामुळें अग्नीचे इंगळ त्याजवर उडविले[3] गेले; कारण "तूं आपणासाठीं या दिवसाचें, याच दिवसाचें नांव लिहून ठेवें" असें बूझीचा पुत्र जो भविष्यवादी यास तूं कळविलेंच होतेंस. मी आपल्या चेतलेल्या आवेशानें या फितुरी घराण्यांच्या नाशा-

१ इ. ओतले. २ टीका १. ३ हें येहेजकेल अ. १० यावरून लिहिलें आहे. ४ येहेजकेल अ. २४ ओवी २. ५ येहेजकेल भविष्यवादी.

विषयीं बोललों कीं, पाहा, क्रोधामुळें मी तिला भयंकर वादळ असा झालों आहें; मी त्यांस ह्मणीसारखें अपशब्दासारखें आणि "थाली अग्नीवर ठेव, अग्नीवर ठेव" असें ह्मटल्याप्रमाणें[1] त्यांस निंदास्पद केलें आहे. सियोनेला व तिच्या मंदिराला मोठ्या वादळानें गांठलें; तिच्या जिवाला थरकांप सुटला, आणि तिचें सैन्य विरघळून गेलें. तिजमध्यें घायाळांचे तुकडे एकवट कर, असें ज्या वेळीं ह्मटलें जातें, त्या वेळीं तिचें मन फाटून जातें. तिजशीं वाद करणारांस मी बंदिवानांनीं व लुटीनें भरीन; तिचे याजक व तिचें सुगंधाचें मिश्रण करणारे यांस मी सर्वकाळ पाडावपणांत[2] पाठवीन. मग निवडक शेरडें[3] धरलीं जातील; आणि त्यांस मुक्त करणारा कोणीच रहाणार नाहीं. अगे लोकांवर अधिकार करणारे![4] ते तुजवर अधिकार करतात व तुझी थट्टाहि करतात. आतां तूं सर्वकाळ सोडलेली या नामानें ह्मटली व ओळखली जातेस. तुझे वैरी तुजविषयीं साक्ष देऊन ह्मणतात कीं, रक्तपाति नगरीस हाय हाय! तिनें आज्ञा मोडिली, सरळ मार्ग सोडिला, आणि अनंताचा करार मोडिला. तिनें उल्लंघन केलें व दुष्टाई केली, ह्मणून ती खांचेंत बुडाली आहे. ती ओरडते; परंतु देव तिचें रडणें ऐकत नाहीं; कारण तिचे रक्ताचा दोष तिजवरच आहे. पीडकांकडून पीडलेल्यांची वाणी (हे देवा) तूं ऐक; त्यांची तळतळ व त्यांचें ओरडणें व्यर्थ जाऊं देऊं नको;[5] कारण सात्विक सातवेळ जरी पडला, तरी तो उठेल. हे मोठ्या व भयंकर देवा, आह्मी आपल्या दुष्टाईमुळें बहकलों आहों; आणि जरी आमचीं उल्लंघनें वाढलीं आहेत, तरी तुझी दया प्रबळ होऊं दे. तूं दया कर; नाहीं तर तुझ्या क्रोधामुळें ते लवकर छेदले जाऊन नाहींसे होतील. जरी (अनेक) दुःखें व संकटें आह्मांवर आलीं; तरी परमेश्वराच्या नामानें आह्मी हाक मारूं. थोडके उरलेल्या लोकांकरितां तुझ्या दयेला द्रव येऊं दे; आणि तूं आपल्या कृपेनें सर्व लोकांच्या देखतां त्यांस उंचाव. हे उंचांत वास करणाऱ्या व दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा, तूं आपले चमत्कार त्यांस दाखीव.

---

१ येहेजकेल अ. २४ ओ. ३. २ दीर्घपाडावपणांत पाठवीन. ३ इस्राएलांतले मोठमोठाले लोक. ४ अगे सियोन नगरी. ५ रिकामे परतवूं नको.

אל מלך नि:. प्रा.

שׁעה עליון हे परात्परा ! गरीबाच्या वाणीकडे लक्ष दे, त्याची विनंति तूं धिक्कारूं नको. कारण "तूं आपणासाठीं या दिवसाचें, याच दिवसाचें नांव लिहून ठेव" असें ज्या दिवशीं बूझीचा पुत्र जो भविष्यवादी[1] यास सांगितलें गेलें, त्या दिवशीं त्याचें मन खेदित होतें. हे सैन्याच्या परमेश्वरा, ज्या संकटाकडून मला अतिशय दुःख प्राप्त होतें, त्याची आठवण कर; कारण या मकर राशींत[2] मजविरुद्ध तीन संकटांचा[3] एकच मेळ मिळाला नव्हता काय ? तिजमध्यें डळमळलेल्या लोकांमध्यें पटकी उठली, तुझ्या नामाविरुद्ध अपवाद करणारा त्याच्या हर्षयुक्त नगरीसमोर आला, आणि द्वारपालांचा नायक जो एज्रा याजक, तो नाहींसा झाला. हीं सर्व व यांसारखीं आणखी पुष्कळ दुःखें मजवर आलीं. या दिवशीं सिंह हर्षित झाला, आणि त्यानें माझ्या नगरावर तीर सोडण्यास आज्ञा केली, ती दाहावी राशि या दशमीस दाहाव्या वंशाच्या[4] राहिलेल्या शेषास नष्ट करायास, आणि फळांच्या घुडाचा नाश करून माझीं निवडक द्राक्षें टिपून न्यावयास उठली; यासाठींच आश्शूर जो मला दुःख देण्यास उमेदवार आहे, त्याच्या दास्यत्वांत मी आहें; याप्रमाणें मी नष्ट होत आहें, तर यासाठीं किंवा त्यासाठीं मी रडावें हें मला कळत नाहीं. ज्या दिवशीं सिंह तुझ्या पवित्र नगरासमोर आला त्या या दिवशीं तूं आपल्या लोकांचें सहाय कर; या[5] महिन्याच्या दशमीस त्यांचें ओरडणें ऐक व त्यांचीं पापें क्षमा कर; दडपून गेलेलें राज्य पूर्वींच्या दिवसाप्रमाणें नव्यानें स्थापन कर; आणि हे अनंता ! पूर्वींप्रमाणें तुझ्या नामाची पवित्रता स्तविली जाऊं दे; मग आमचे सर्व द्वेषणारे व पीडणारे तुझ्या क्रोधाच्या सामर्थ्यानें तुडविले जातील; आणि जसे बाराकाच्या दिवसांत कादेशाजवळ तसे ते धरले व नष्ट केले जातील; तर हे परात्परा ! सीयोनेकडे फीर, ह्मणजे आह्मी तुला तोंडातोंड पाहूं, आणि सुवचनानें ह्मणूं कीं, हा आमचा देव पाहा.

יושב בשמים हे आकाशांत वास करणाऱ्या ! अग्नीच्या

---

१ येहेजकेल. २ बारा राशींतील जी दाहावी. ३ टीका. २. ४ योसेफाच्या वंशाच्या. ५ न्यायाधीश. अ. ४ पाहा.

(ज्वालांत) व पाण्याच्या (डोहांत) पडलेल्यांवर कृपादृष्टि कर, आणि ज्या लोकांस त्यांच्या पापाकरितां दुप्पट शिक्षा झाली आहे, त्यांजवर ज्या दिवशीं शत्रूनें इस्राएलाच्या सैन्याच्या समुदायास वेढा घालण्यास आरंभ केला, आणि बाबेलचा राजा येरूशालेमेवर चढून आला, त्या या दिवशीं दया कर. हे संकटीं उत्तर देणाऱ्या, गरीबाचें दुःख तूं धिक्कारूं नको. या दाहाव्या महिन्याच्या दशमीस, ज्या दिवशीं बूझीचा पुत्र जो भविष्यवादी यास दृष्टांत दाखवून "तूं आपणासाठीं या दिवसाचें, याच दिवसाचें नांव लिहून ठेव" असें सुचविलेंस, आणि ज्या दिवशीं सिंह व चित्ता[१] हे त्वरेनें आमच्या दाराजवळ येऊन ठेपले, त्या दिवशीं आमच्या दुःखाकडे लक्ष लावून पाहा. ज्या दिवशीं ते शत्रु आमच्या वतनाच्या गौरवयुक्त व मनोहर वाड्यावर चढून आले, त्याच दिवशीं धुळीनें माखलेल्या लोकांवर पटकी चालू झाली, त्याच दिवशीं एज्रा जो याजक व लेखक तो (आपल्या लोकांशीं) मिळाला[२]. आणि त्या दिवशीं किरयाथ सेफेर एथें जय मिळविणाऱ्या सारख्या[३] वीरांचें मन पाण्यासारखें झालें; कारण बाबेलचा राजा येरुशालेमेसमोर चढून आला होता.

एस्तरचा उपास.

या उपासाच्या दिवशीं אדני שפתי पर्यंत प्रार्थना केल्यानंतर हें पुढील ह्मणावें.

על ידי רחמיך पृष्ठ १.

אגגי בהעמיקו जेव्हां आगागीनें[४] पवित्र लोकांचा नाश व विध्वंस करण्याकरितां गुप्त मसलत करून आपल्या युक्तीचे विचार लपवून ठेविले, तेव्हां ईश्वरानें आपल्या लोकांस टाकूं नये ह्मणून येमीनी[५] हा आकाशांत राहणाऱ्या खडकरूप आश्रयापुढें हंबारून रडला. आगागीनें या दिवशीं इस्राएलाचे शेष नष्ट करायाचा व आमचा विध्वंस व समूळनाश करण्याचा बेत करून पूर ह्मणजे पण पाडला; परंतु येमीनी

---

१ नेबूखादनेसार व त्याचा सरदार नेबूझारआदान. २ मरणपावला. ३ टीका. ३. ४ आगागी कुटुंबांतला जो हामान यानें. ५ येमीनी ह्मणजे बिनयामीनी कुटुंबांतला मोर्देखाय.

हा त्यास मान देण्याकरितां त्यासमोर उठला नाहीं, व त्यास भ्यालाहि नाहीं; कारण जे परमेश्वरावर भरंवसा ठेवितात, त्यांस त्याची दया वेष्टिते. आगागीस त्याच्या पशुवत् विचाराच्या गर्वानें ठकविलें, त्यानें विखरलेल्या शेरडांचा नाश करण्याकरितां वीस हजार किक्कार[1] लागलेच तोलून दिल्हे; परंतु येमीनीनें आपलें मन शुद्ध करून उपास केला व अन्नपाणी त्यजिलें, कारण संकटाच्या दिवशीं परमेश्वर चांगला आश्रय आहे. आगागी आपल्या रंगमाहालांतून आनंदानें निघाला, आणि सत्वशील मनुष्यांस फांशीं देण्याकरितां त्यानें लांकडाचा खांब तयार केला; परंतु येमीनीनें ईश्वरी कृपा धारण करून ऐश्वर्यानें वेष्टिलेला, आणि पोरक्यांचा बाप व विधवांचा न्यायाधीश (जो देव,) त्याजवर भरंवसा ठेविला. आगागीनें त्वरेनें आपल्या सुज्ञ मित्रांस व आपल्या भांडखोर बायकोस बोलाविलें; परंतु त्यांनीं त्यास असा सल्ला दिला कीं, तूं लज्जायमान होऊन त्यापुढें पडशीलच पडशील; येमीनीनें सर्व गुह्य हादस्सेस[2] कळविलें, तेव्हां तिनें राजकीय वस्त्रें पांघरूण आपल्या जीवावर उपासाचें बंधन करून घेतलें. आगागी जेव्हां त्या निमित्ताच्या जेवणास बसला, तेव्हां त्या प्रिय व परोपकारी बाईनें चतुरपणें आपलें मुख उघडून (भाषण केलें), आणि येमीनी हा हामानाचा गुप्त मोड पाहून हंसला, आणि त्यानें जाणिलें कीं, पवित्रांच्या मंडळींत देव फार भयास योग्य आहे. हे आकाशांतील सेरफीम दूतांच्या मंडळीमध्यें पवित्र भयास योग्य असणाऱ्या (देवा) ! माझी विश्वासू मंडळी तुझा थोरपणा उच्चारिते; आणि मी तुझ्या तारणाची वाट पाहतों; तर हे परमेश्वरा ! तुझे शत्रु असे नाश पावोत. सर्व लोकांपेक्षां उणे झालेल्यांकरितां तूं आपल्या दयेला द्रव येऊं दे, आणि हे उंच आकाशीं वासकरणाऱ्या खडकरूप आश्रया, आणि दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा ! तूं आपल्या दयेनें सर्व लोकांसमक्ष त्यांचें रक्षण करून तूं आपला चमत्कार त्यांस दाखीव.

יחלת עבריך तूं आपल्या सेवकांस आपल्या दृष्टांताच्या लेखाव-

१ हें एक प्रकारचें फार मोठ्या किमतीचें नाणें आहे. २ एस्तेरचें नांव हादस्सा असेंहि होतें.

रून अशी आशा दिल्ही आहेस कीं, त्यांच्या सर्व पाडाव नेणारांसमक्ष तूं त्यांजवर दया करशील; आणि जरी ते आपल्या शत्रूच्या देशांत आहेत, तरी त्यांचीं दुःखें दूर करण्याविषयीं[1] तूं त्यांच्या मनाची शांति केली आहेस. परंतु सिंहानें[2] तर मला माझ्या सफल द्राक्षवेलावरून तोडून दास्यत्वांत आणि दुःखाच्यां[3] देशांत नेलें आहे. पूर्वीं तूं आपल्या सुज्ञ नियमाचें ध्यान करणाऱ्या चौघां (भक्तांस), ह्मणजे दानीएल, हानानया, मीशाएल व आजारया यांस रक्षिण्याकरितां त्वरा केलीस; आणि ते आपल्या शत्रूच्या देशांत असतां पहिल्यास सिंहापासून आणि दुसऱ्यांस अग्नीच्या ज्वालांतून तूं वांचविलेंस. एडक्यानें व डुकरानें[4] मला त्रास देण्याकरितां व तुडविण्याकरितां त्वरा केली, माझा प्रकाश बहुतकरून अंधारमय झाला, आणि माझ्या सूर्याचें तेज झांकलें गेलें; तरी येमीनी व हादस्सा यांजकडून तूं माझे उजवे हाताचा आश्रय झालास. तेव्हां ज्या धनुर्धरांनीं जे तीर मजवर मारले, ते परत जाऊन त्यांच्याच उरांत लागले. माझ्या उल्लंघनामुळेंच तो पशुवत् मुर्ख मजवर उठला; जसें रानांतलें डुकर तसें त्यानें आपलें मुख मजवर पसरिलें. परंतु पूर्वींच तूं मजकरितां (आमच्या) मोकळ्या धर्माविषयीं भांडणांमध्यें उत्तर देणारें देऊन ठेविलें आहेस; आणि जरी ते आपल्या शत्रूच्या देशांत आहेत, तरी मी त्यांच्या बुद्धीविषयीं व त्यांच्या वचनाविषयीं आनंद मानितों.

ואף גם זאת आणि ते आपल्या शत्रूंच्या देशांत राहत असतां, त्यांची समाप्ति करावी व मी त्यांशीं केलेला करार मोडावा, असा मी त्यांस धिक्कारणार नाहीं; कां तर मी परमेश्वर त्यांचा देव आहें. आणि मी याकोबाशीं जो माझा करार तो आठवीन, आणि इसहाकाशीं जो माझा करार व आब्राहामाशीं जो माझा करार तो आठवीन, आणि देशहि आठवीन. संकटांत मी परमेश्वरास हाक मारिली, तेव्हां प्रशस्तस्थानीं त्यानें मला उत्तर दिल्हें. परमेश्वर माझा आहे, मी भिणार नाहीं; मनुष्य माझें काय करील? जे माझें सहाय करितात त्यांबरोबर परमेश्वर माझा आहे; ह्मणून मी आपल्या वैऱ्यांस पाहीन. मनुष्यावर

१ इ. रोग बरे करण्याविषयीं. २ नेबुखादनेसारानें. ३ इ. अंधाराच्या देशांत. ४ आहाश्वेरोशानें व हामानानें. ५ इ. घसा.

विश्वास ठेवणें, यापेक्षां परमेश्वराचा आश्रय धरणें, उत्तम आहे. अधिपतींवर विश्वास ठेवण्यापेक्षां परमेश्वराचा आश्रय धरणें उत्तम आहे. सर्व लोकांनीं मला वेढिलें, परंतु परमेश्वराच्या नामानें मी त्यांस छेदून टाकीन. मीं पडावें ह्मणून तूं मला ढकललें; परंतु परमेश्वरानें मला सहाय केलें.

יהירים קמו בכל דור पिढोपिढीं गर्विष्ठ (मजवर) उठले, परंतु देवानें मला रक्षिलें. पहिल्यानें सिंह उठला, त्यानें मला कोना कोपऱ्यांत दडपिलें; त्यामागून पिलीं हरण केलेली आस्वल उठली, तिनें मला अति नीचास विकून टाकिलें. मीं पडावें ह्मणून त्यांनीं मला ढकललें, परंतु परमेश्वरानें मला सहाय केलें. जेव्हां मी मिसऱ्यांच्या जुलमांतून निघालों, तेव्हां मी थकलेला व व्याकूळ असतां माझें मन दचकविण्यासाठीं मार्गांत सैर्पानें मला आडविलें; परंतु तूं त्याच्या मांड्यांवर व तंगड्यांवर मारून त्याचे तुकडे केलेस, ज्या दिवशीं नम्र (ह्मटलेल्यानें) आपले हात वर केले, तेव्हां तूं मला सबळ केलेंस. जेव्हां हामान जो आगागी अजगरासारखा मला गिळावयास उठला, आणि एकेच दिवशीं मला छेदून टाकण्याकरितां, जेव्हां त्यानें मजवर दोषारोप लिहिला, तेव्हां देवानें मजकरितां आकाशांतून सहाय पाठवून मला तारिलें, जीवंत राखलें, आणि सामर्थ्यानें व तारणानें मला वेष्टिलें. तुझें नाम माझा भरंवशाचा दुर्ग आहे; हे देवा, तूं मला (माझ्या आईच्या) उदरांतून काढिलेंस, आणि मरणापासून व कबरेपासून माझे जीवास, अश्रूंपासून माझे डोळ्यांस व ठेंच लागण्यापासून माझे पायांस मुक्त केलेंस; आणि परमेश्वर देवानें माझ्या पाडावपणाच्या देशांत मला वाढविलें.

דחה דחיתני मीं पडावें ह्मणून तूं मला ढकललेंस, परंतु परमेश्वरानें मला सहाय केलें. परमेश्वर माझें सामर्थ्य व माझें गीतच आहे; तो माझें तारणहि झाला आहे. हर्षाचा व तारणाचा शब्द नीतिमा-

---

१ नेबुखादनेसार. २ आहाश्वेरोश, ज्यानें हामानानें वीस हजार रुप्याचे किकार देवूं केल्यावरून सर्व इस्राएलांचा नाश करण्याचा हुकूम त्यास दिल्हा तो. ३ मिसरांतून निघाल्यावर इस्राएलांशीं पहिल्यानेंच जो आमालेक लढला त्यानें. ४ आमालेकांशीं लढाई चालत असतां मोशे एका टेंकडीवर गेला; तेथें जेव्हां तो आपले हात वर करी तेव्हां इस्राएल बलावत असत.

नांच्या वस्त्यांत आहे, परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करितो. परमेश्वराचा उजवा हात उंचावलेला आहे; परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करितो. मी मरणार नाहीं परंतु वांचेन; आणि परमेश्वराचीं कर्में कथीन. अनंतानें मला मोठी शिक्षा लाविली; परंतु मरणाच्या हातीं मला सोंपिलें नाहीं. मजसाठीं तुह्मी नीतीचीं द्वारें उघडा, मी त्यांतून आंत जाऊन परमेश्वराला स्तवीन. हें परमेश्वराचें द्वार आहे, यांतून नीतिमान आंत जातील. तूं मला उत्तर दिल्हेंस, व तूं माझें तारणहि झालास ह्मणून मी तुला स्तवीन. जर परमेश्वर आह्मांकडे नसता, (तर त्यांनीं आह्मांस सजीव गिळलें असतें) असें इस्राएल ह्मणतो.

אֵיךְ זֵרִים अघोर शत्रूंनीं मला मधमाशांसारखें कसें वेढिलें! जेव्हां हामान या वेळीं उठला, आणि आपलें योग्य वेतन समजून त्यानें मला लुटिलें; तेव्हां माझ्या पुष्कळ अपराधांमुळें, ज्यावर कांहीं उपाय चालत नाहीं असा कंपनाचा प्याला त्यानें मला पाजिला; परंतु जर परमेश्वर आह्माकडे नसता, तर ह्यांनीं आह्मास सजीव गिळलें असतें. त्यांनीं त्यांस जगांतून अगदींच नाहींसें करण्याकरितां कशी योजना व कल्पना केली! इस्राएलांच्या विलक्षण राष्ट्रांचा संहार करण्याकरितां त्यांनीं विचार केला; त्यांचा समूळ नाश करण्याकरितां त्यांनीं गुप्त मसलत केली; आणि भट्टी व चूल यांमध्यें सांपडले असतांहि पाण्यानें आह्मास बुडविलें असतें. शत्रु उठला आणि त्यानें आपला पूर्ण हेवा व वैर मजवर चेतविला, आणि सर्व समर्थाची मंडळी व त्याचें वतन असें मानिलेल्या लोकांचा नाश करण्याकरितां राजाचा हुकुमनामा बजावण्यास त्यानें वेळ नेमिला; परंतु खडकरूप आश्रयानें दया व कृपा करून त्याचा व त्याचे पुत्र ज्यांनीं आह्मास दुःख दिल्हें, त्यांचा नाश व संहार करून आपलें सामर्थ्य दाखविलें. संकटसमयीं शत्रूनें विचार करून पूर ह्मणजे पण पाडिला; परंतु खडकरूप आश्रयानें त्याकडे लक्ष देऊन त्याची फेड त्याच्याच शिरीं केली, या आदार महिन्यांत जे आह्मास मारीत होते, त्यांस गौरववान देवानें मारून व त्यांचा समूळ नाश करून आपल्या मंडळीस आपलें सामर्थ्य दाखविलें.

१ इ. राष्ट्राच्या कन्येचा.

" לולי " इस्राएल ह्मणतो कीं, जर परमेश्वर आह्माकडे नसता, जेव्हां मनुष्यें आह्मावर उठलीं, आणि जेव्हां आह्मावर त्याचा क्रोध संतप्त झाला, तेव्हां जर परमेश्वर आह्माकडे नसता, तर त्यांनीं आह्मास सजीव गिळलें असतें. जलांनीं आह्मास बुडविलें असतें; प्रवाह आमच्या जीवावर गेला असता. तेव्हां उचंबळलेलीं जलें आमच्या जीवावर गेलीं असतीं. परमेश्वर ज्यानें आह्मास त्यांच्या दांतांसाठीं आहारसा दिला नाहीं, तो सुवंदित असो. जसा पक्षि पारध्यांच्या फासांतून, तसा आमचा जीव मुक्त झाला आहे; फांस तुटला आणि आह्मी मुक्त झालों आहों. परमेश्वर जो आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्नकर्त्ता, त्याच्या नामांत आमचें सहाय आहे.

אדני שמעה हे प्रभू, ऐक; हे प्रभू, क्षमा कर; हे प्रभू, कान देऊन कार्य कर; उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कां कीं, तुझ्या नगराला व तुझ्या लोकाला तुझें नांव ठेविलें आहे. हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव, ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वींप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

तम्मूजचा उपास.

या उपासाच्या दिवशीं אדני שפתי पर्यंत प्रार्थना केल्यानंतर हें पुढील ह्मणावें.

ואדץ שפל רומי माझा थोरपणा पडून धुळीस मिळाला आहे; ज्या दिवशीं दुष्टानें मला नमविण्याची योजना केली, (त्या दिवशीं) माझ्या मनाचा हर्ष बंद झाला; कारण माझ्या विश्रांतीच्या ठिकाणांतून मी हांकून लाविला गेलों; माझे उदार व परोपकारी लोक ज्या दिवशीं नाहींसे झाले, त्या दिवशीं माझ्या वेसींत दुःख व शोक ऐकूं येतो; ह्मणून मीहि प्रतिवर्षीं[1] चौथ्या महिन्यांत शोक करितों.

בחדש הרביעי चौथ्या महिन्यांत दुःखांनीं व संकटांनीं मला घेरिलें, या सतराव्या तारखेस मी दुःखामुळें थकलों, आणि कोठेंच मला आश्रय मिळत नाहीं, मोठ्यानें मोठ्यानें मी रडतों, आणि आह्मा सर्वांच्या डोक्यावर टक्कल[2] आलें आहे; कारण याच दिवशीं पाट्या फुटल्या[3]. त्या पाट्या माझ्या हातांतून गेल्या, संकटांनीं मला घेरिलें,

---

१ इ. दिवसेंदिवस. २ डोक्यावरील टक्कल ही दुःखाची खूण होती. ३ टीका ४.

माझ्या शत्रूचा हात मजवर बळावला, आणि त्यानें कोनोंकोनीं माझी दाणादाण केली; तर (हे देवा,) आतां तुझ्या आश्चर्यकारक वेळाची वाट पाहणारांचें तूं वेष्टन हो, आणि त्यांचें रक्षण कर; कारण सैन्याचा देव सूर्य व ढाल असा आहे.

בחדש הרביעי चौथ्या महिन्यांत मी चिखलाच्या लोंढ्यांतून वर येण्याची योजना केली, परंतु आधार देणारा कोणी नव्हता. त्याच्या सतराव्या तारखेस शत्रूनें मला मारूनें माझा नाश करावा ह्मणून मी (त्याचे हातीं) लूट असा सांपडलों, आणि कोठेंच मला आश्रय मिळत नाहीं. माझीं दुःखें नेहेमीं मजसमोरच आहेत; कारण याच दिवशीं नित्याचें अर्पण बंद पडलें. ज्या दिवशीं नित्याचें अर्पण बंद पडलें, त्या दिवशीं एग्लाईमाच्या आक्रांतासारखा माझा आक्रांत वाढतो, आणि हादादरिम्मोनाच्या शोकापेक्षां माझा शोक दुप्पट होतो. तर हे आकाशांत वास करणाऱ्या देवा, तूं आमचें वेष्टन हो, आणि आमच्या गाढ झोंपेंत पडलेल्यांस जागृत कर. तोच आह्मास दोन दिवसांनंतर सजीव करील.

בחדש הרביעי चौथ्या महिन्यांत मीं आपल्या खडकरूप आश्रयाचा क्रोध व त्याचा मजवर चेतलेला राग सोसिला; त्याच्या सतराव्या तारखेस मला थरकांप सुटला, आणि वादळानें मला उधळलें; सेईराच्या वादामुळें मी पूर्वींचं सुख विसरलों, आणि माझ्या जीवानें शांतीचा तिरस्कार केला; कारण या दिवशीं नगर फोडलें गेलें; ज्या दिवशीं तेमान व मगदीएल हे उठले, त्या दिवशीं नगर फोडलें गेलें, माझा हात अशक्त झाला आणि मला कोठूनच सहाय मिळालें नाहीं. तर (हे देवा,) आतां फीर, आरीएलाच्या शेषास तूं पवित्र कर; ह्मणजे तेहि याकोबाच्या पवित्रास व इस्राएलाच्या देवास पवित्र मानितील.

בחדש הרביעי चौथ्या महिन्यांत हायहायचा, निषेधाचा व क्रोधाचा दिवस होता, त्याच्या सतराव्या तारखेस माझें महत्त्व गेलें,

---

१ इ. खाऊन. २ टीका ५. ३ टीका ६. ४ टीका ७. ५ टीका ८. ६ तेमान व मगदीएल हे उत्पत्ति अ० ३६ एथें सांगितलेल्या एदोमाच्या नायकांतले दोघे होते. ७ आरीएल हें नांव यशाया अ. २९ ओं. १–२ एथें येरूशालेमेस दिलें आहे.

आणि माझी शोभा लुटली गेली; माझ्या भंगास कांहीं उपाय झाला नाहीं, मजवरील घाव वाहूं लागले, आणि माझें हृदय फुटून गेलें; कारण त्या दिवशीं आपोसतेमोसानें शास्त्र जाळलें. ज्या दिवशीं शास्त्र जाळलें गेलें त्या दिवशीं मला नवीन दुःख झालें, आणि माझे वृद्ध व ज्ञातारे पवित्र नगरांतून पाडाव होऊन गेले; तर (हे देवा,) आतां फीर आणि आपल्या सामर्थ्यानें आपल्या सत्वशील मंडळीवर दया करून, त्यांजवर बुद्धीचा व परमेश्वराच्या भयाचा आत्मा घाल.

בחרש הרביעי चौथ्या महिन्यांत परक्यानें माझा दुराचार मापानें मापिला[2] आणि सतराव्या तारखेस त्या परक्यानें माझें मंदिर ओसाड केलें व याकोबास खाऊन टाकिलें. या दिवशीं प्रतिवर्षीं अनेक कारणांवरून मला दुःख करावें लागतें[3]; कारण याच दिवशीं पवित्र ठिकाणीं मूर्ति स्थापली गेली.[4] ज्या दिवशीं पवित्र ठिकाणीं मत्सरयुक्त व ओंगळ मूर्ति स्थापन झाली, त्यादिवशीं माझे जीवावर घाव होतात, आणि माझे आशेची निराशा होते. तर (हे देवा,) आतां तूं आपल्या लोकांचा भ्रष्टाचार नीट कर, आणि दयेनें त्यांजवर प्रीति कर. हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं.

ויעבור על ידי רחמיך. आणि पृष्ठ १.

אזי בבגדי जेव्हां मीं आकाशांत वस्ति करणाराचीं वचनें धिक्कारलीं, आणि त्यामुळें जेव्हां माझे अपराध एकत्र झाले; तेव्हां माझ्या पिडणारानें मजवरील जोकड भारी केलें; शत्रुचा हात मजवर प्रबल झाला, हातोडीनें त्यानें मला ठेंचलें, त्यानें आपल्या रागानें फाडून माझे तुकडे केले. त्यानें (देवानें) जो मार्ग मला शिकविला होता, तो मीं धिक्कारला; यास्तव पाहा, त्याचा राग, क्रोध व संताप मजवर चेतला, त्यानें आपला राग मजवर ओतला, मजवर नेम धरण्याकरितां मला उभें करून त्यानें आपले तीर मजवर सोडले. या दिवशीं एकामागून एक अशीं पांच अरिष्टें[5] मजवर आलीं; त्यांनीं माझी मंडळी विदारिली, आणि मला

---

१ टीका ९. २ माझ्या दुराचाराची झडती घेतली, किंवा योग्य शिक्षा केली.. ३ इ. खावें लागतें. ४ टीका १०. ५ टीका ११.

ओसाड करून ठेविलें आहे; माझा जीव थकला व भागला; या गोष्टी ऐकून मी घाबरा झालों व पाहून भयभीत झालों. हें जेव्हां मला आठवतें, तेव्हां माझें कण्हणें चेततें, मजमध्यें ज्वाला पेटतात, आणि माझ्या अंतरमाळेचा व गुर्दकमळांचा भडका होतो; मी मोठ्या दुःखानें शोक करितों, आणि (सर्व) हर्ष दूर करितों; कारण या दिवशीं पाट्या फुटल्या. मजविरुद्ध परके जमा झाले, व त्यांचें सैन्य एकत्र मिळालें; त्यांनीं मला पाण्यासारखें घेरिलें, त्यामध्यें मी बुडालों, मला उभें करणारा कोणी नाहीं; याकरितां मी आपल्या मुखानें शोक व नेहमीं आक्रंदन करितों; कारण यादिवशीं नित्याचें अर्पण बंद पडलें. माझ्या नाश करणारांनीं नदीच्या पुराच्या धुमाळीप्रमाणें धुमाळी केली, त्यांनीं दास्यत्वांत माझा जीव नाहींसा केला, (माझें प्रेत पशूस) खाण्यासाठीं दिलें; त्यांनीं मजवर जमाव बोलविला, आणि माझी मंडळी अगदीं नागविली आहे; कारण यादिवशीं पवित्र ठिकाणीं मूर्त्ति स्थापिली गेली. परक्यानें माझ्या मोठ्या लोकांस दुःख दिलें, त्यांचीं द्वारें त्यानें जाळून उघडलीं; रागाच्या व क्रोधाच्या दिवशीं त्यानें माझा द्राक्षमळा ओसाड करून टाकिला; परक्यानें आपली इच्छा पुरवून घेतली व त्याचा हात सामर्थ्यानें प्रबल झाला;[१] कारण या दिवशीं आपोसतेमोसानें शास्त्र जाळलें. ज्या दिवशीं परमेश्वराचा राग मजवर चेतला, त्यादिवशीं दुष्टांनीं मजवर दांत करकरविले; त्या परक्या शत्रूनें लहानथोरांतून कोणावरहि दया केली नाहीं; त्याचा राग मजवर चेतला, व त्याचे इंगळ मजमध्यें पेटले; कारण या दिवशीं नगर फोडलें गेलें. हे परमेश्वरा, शोकग्रस्तांवर दया कर व त्यांच्या मनाचें समाधान कर; हे अनंता! दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा, या सतराव्या तारखेस उदास होऊन बसणाऱ्यांवर तूं आपल्या दयेचा लोट येऊं दे.

אל מלך नि. प्रा.

שעה נאסר बंदांत पडलेले आणि बाबेलच्या व नगरावर (पाठविलेल्या) सरदाराच्यां हातीं सोंपलेल्यांकडे कृपादृष्टीनें पाहा; किती दिवसांपासून ते तुजकडे ओरडतात, आणि लहान मुलाप्रमाणें

१. नेबूझारआदान जो येरूशालेमेवर चढून येण्यास नेमिला होता त्याचे.

काकळूत करितात! हे खडकरूप आश्रया, ज्या दिवशीं शत्रु प्रबल झाला आणि नगर मोडलें गेलें, त्या दिवशीं खेदित मनानें व कळकळणाऱ्या अंतर्यामानें ते तुजपुढें दयेकरितां आग्रह करितात. यावरून ह्मणजे या दिवशीं मजवर पांच अरिष्टें आलीं ह्मणून मी ओ-णवा होऊन हातावर हात आपटीत आहें; (रानांत केलेल्या) वां-सरापायीं (पहिल्या) पाट्या माझ्या हातांतून गेल्या; परक्यानें माझा किल्ला जिंकून मला बंदांत नेलें; नित्याच्या अर्पणाचा त्यानें नाश केला, आणि तें अर्पिण्यास त्यानें मनाई केली; सुंदर मंदिरांत मूर्त्ति मांडिली गेली, आणि त्या परक्या शत्रूनें तुझें नेमशास्त्र अग्नीनें पेटविलें. सर्व समर्थानें ज्या दिवशीं मला निराश्रित टाकिलें, त्या दिवशीं मी कष्टी होतों व थरथर कांपतों; कवड्या[1] सापानें उत्तरेकडून येऊन लोंढ्याप्रमाणें मजवर प्रलय केला, सुंदर देशांतून त्यानें मला पाडाव करून नेलें आणि चेंडूप्रमाणें उडविलें; त्या दिवशीं शेशाखानें माझा प्रकाश अंधार-मय केला, आणि लोटून मला पारासाचे हातीं दिलें; आणि त्यानें मला खाऊन फस्त केलें, यावरून मी शोक करितों. हे माझ्या आश्रया! तुझा राग मजवर सर्वकाळ चेतेल काय? पेरेसाच्या पुत्राकडूनें[3] माझी मोडलेली कुंपण नीट करीव, कांट्यांतून गुलाबाचीं फुलें निवडून घे[4], आपले डोळे उघडून माझी प्रार्थना पुष्पार्पणाप्रमाणें मान्य[2] कर, तुझ्या वस्तीचें मंदिर बांध, कर्मेल व बाशान या सीमा पुनः स्थापन कर, आणि मुक्यांचा न्याय कर; ह्मणजे (तुझ्या पवित्र मंदिराच्या) धुंडाळ-णाराची व तें जाळणाराची योग्य फेड होईल.

אלהי ישעתנו हे आमच्या तारणाच्या देवा, आमच्या अरोळी-कडे लक्ष दे, आणि आमच्या नाशाकडे व आमच्या दीर्घ पाडावपणा-कडे पाहा; आमच्या पूर्वजांवर ज्या दिवशीं पांच संकटें आलीं, त्या दिवशीं प्रतिवर्षी आमच्या दुःखाची आह्मास आठवण होते. हे (सर्व) प्राणि-मात्रांच्या देवा, गुप्त गुर्दकमळें पारखणाऱ्या, आह्मी विनंति करितों कीं,

---

१ एथें कवड्यासापाची उपमा नेबूखादनेसारास दिल्ही आहे. २ टीका १२. ३ दावीदाचा पूर्वज पेरेस याच्या कुळांत जन्मणाऱ्या माशीयाहकडून. ४ ही उपमा शेलोमाच्या गीतांत इस्राएलांस अनेक वेळ दिल्हेली आहे.

हांकून लावलेल्या आणि चोहों दिशांकडे विखरलेल्या शेरडांकडे लक्ष लाव, तीं प्रतिवर्षी या वेळीं दुःख करितात; ज्या दिवशीं तीं दुष्टाईकडे[1] वळलीं त्या दिवशीं पाट्या फुटल्या, ह्मणून त्या दिवशीं आह्मी आमच्या आयुष्याच्या सर्व दिवसांत आपल्या दुःखावरून शोक करितों. चिखलाच्या लोंढ्यांत रुतलेल्यांस तूं सोडीव, त्यांस उभे करणारा कोणी नाहीं; ह्या (तुझ्या) कळपानें खाल्लें, लुटिलें व नासिलें जावें ह्मणून तूं त्यांस सोडून दिलें आहेस; प्रतिवर्षी दुःख करण्यास (तो कळप) यादिवशीं एकत्र होतो; यादिवशीं शत्रूनें आपला हात उभारला, आणि याचदिवशीं आमच्या पुष्कळ अपराधांमुळें व मोठ्या पापामुळें नित्याचें अर्पण बंद पडलें. हे अनंता व सर्वशक्तिमान देवा, ज्या वांकड्या व मूर्ख मनुष्यानें याकोबाचे शेष खाऊन टाकिले आहेत, त्यांच्या हातांतून अगदीं अपत्यहीन झालेल्या (लोकांस) खंडून घे; प्रतिवर्षी या दिवशीं ते दुःखावर आपला निर्वाह चालवितात[2], कारण शत्रूनें मजसमक्ष पवित्र ठिकाणीं मूर्त्ति उभी केली, यावरून आह्मावर आलेल्या विघ्नामुळें आमचे अश्रू वाहतात. आमचा नाश[3] किती भयंकर; कारण जो भयपात्र व आपणांस गौरवानें आच्छादणारा यापासून आह्मी वळलों, त्यानें माझी फेड सर्वांस दाखविली आहे; मी प्रतिवर्षी या दिवशीं शोक शोधितों, कारण यादिवशीं आपोसतेमोसानें शास्त्र जाळलें; यावरून व आमच्या शोभायमान मंदिराचा नाश झाला ह्मणून आह्मी लज्जित होऊन पडून राहतों. दयाळू देव आमचे अपराध क्षमा करील, तो आपला पूर्ण राग चेतविणार नाहीं; (हे देवा,) तुझ्या विखरलेल्या व धिःकारलेल्या शेरडांस सेईराच्या हातांतून खंडून घेण्यास त्वरा कर; ज्या दिवशीं शत्रू प्रबल झाला व नगर फोडलें गेलें, त्या दिवशीं प्रतिवर्षी माझें अंतर्याम कळकळतें; कारण आह्मी आमच्या भोंवतालच्यांस थट्टा व हंसें असे झालों आहों. हे दयावंता! पिडलेल्या सीयोनेकडे दयेनें फीर, आणि खेद करणारीस शांतवन त्वरेनें पाठीव, ह्मणजे आमचे विखरलेले जेव्हां एकवट केले

---

१ रानांत सोन्याचें वांसरूं करण्याच्या दुष्टाईकडे. २ उपोषणानें हा दिवस कांढितात. ३ इ० भंग.

जातील, आणि आमचे पाडावपणांतून तूं आह्मांस नेशील, तेव्हां आह्मी तुझ्या नाश पावलेल्या कन्येविषयीं गायन करूं.

यानंतर व मागील प्रत्येक उपासाच्या भागानंतर אל מלך, אנשי אמונה इत्यादि वाचावें.

तम्मूजच्या उपासानंतर पहिल्या शाब्बाथ दिवशीं.

דברי נביאים भविष्य जाणणाऱ्या भविष्यवाद्यांचीं वचनें पूर्वी देवाच्या सर्व लोकांत ऐकविलीं जात असत, तीं अशीं कीं, तुह्मी आपल्या खडकरूप आश्रयापुढें आपलीं हृदयें फाडा, परंतु त्यांनीं व्यर्थ मेहेनत केली व निष्फळ श्रम केले. त्यांनीं त्यांच्या निषेधाकडे कान दिल्हा नाहीं व ऐकिला नाहीं; त्यांनीं ईश्वराचा विवेक नाकारिला. त्यांच्या पापांनीं त्यांस पूर्वेकडे व पश्चिमेकडे हांकून लाविलें आहे; ते आपल्या वतनावरून जाऊन बंदिशाळेंत पडले आहेत. त्यांचें तेज अंधारमय झालें आहे, तें आपल्या पवित्र वस्तिस्थानांतून जाऊन पृथ्वीच्या तळाशीं बुडालें आहेत. त्यांच्या भंगामुळें मी याजेरासारखा[1] शोक करितों; त्यामुळें माझे कान ठणकतात व माझ्या डोळ्यांतून अश्रु वाहतात. ते अन्य लोकांच्या देशीं असतां, हे खडकरूप आश्रया! त्यांजवर दया कर; कारण तुझ्या शिक्षेमुळें व रागामुळें ते ओणवे झाले आहेत. त्यांकरितां उद्धारक पाठवून आपली ज्योति प्रकाशित कर; मग तुझें सामर्थ्य[2] व तुझा प्रकाश प्रफुल्लित होईल.

לו ישקלו माझे शेजारी माझा व्याकुलपणा ताडून पाहते तर बरें! तो माझ्या अतिक्रमाप्रमाणें समुद्राच्या कांठावरील रेतीसारिखा वाढला आहे. यास्तव मला मूर्च्छा येऊन माझीं वचनें गोंधळतात, व माझे सर्व विचार नाश पावतात. जर माझी मंडळी वधली गेली आहे, आणि माझ्या मंदिराचा नाश झाला आहे; तर मीं पहिल्यानें कशाविषयीं शोक करावा! बऱ्यावरून व वाइटावरूनहि प्राणिमात्रांनीं तुला स्तवावें हें योग्य आहे; ह्मणून माझा एकुलता जीव तुझी स्तुति करितो.

נשמת שרודים नाश पावलेल्या व विखरलेल्या लोकांचा आत्मा पिडकाच्या देशांतहि तुला स्तवितो; ते लोक याजकांतील हिलकीयाचा

१ टीका १३. २ इ. हातामुळें.

पुत्र इर्मेया याच्या वचनाचें शोकानें ध्यान करितात. आनाथोथांतील भविष्यवाद्याच्या[1] वचनाविरुद्ध बंडावा करून आपलीं मनें कठोर करणारांचा आत्मा त्या भविष्यवाद्यांच्या गोष्टी ह्मणजे ज्या देवानें त्यांस पाठविलें त्याच्या गोष्टी आठवून वर्षोवर्षी तुला वर्णितात. कंपायमानाच्यांचा व शोक करणाऱ्या मजुरांचा आत्मा तुझें सामर्थ्य मान्य करितो; त्यांनीं आपले कान बंद केले होते, आणि त्यांनीं एकत्र होऊन एक चित्तानें भविष्यवाद्यांचीं वचनें ऐकिलीं नाहीं. आपल्याच पापाच्या फांसांत व जाळ्यांत गुंतलेल्यांचा आत्मा तुजसाठीं उत्कंठित होत आहे; तूं त्यांस शांतवनाच्या वचनानें शुभवर्त्तमान कळवून त्यांच्या कल्याणाच्या गोष्टी आरंभून पूर्ण कर. जे आपल्या अपवादाच्या बंडामुळें नीच झाले आहेत, त्यांचा आत्मा शोकाच्या वेळीं तुझें गायन करो, आणि आमचीं तोंडें समुद्रासारखीं गायनानें भरोत.

לפדות עם דל माझ्या पीडकाच्या दास्यत्वांतून गरीब लोकांस सोडवायास, आतां माझ्या प्रभूचा थोर पराक्रम दिसून येवो. तेथें पारवा[2] परक्याच्या हातीं कोठपर्यंत राहील! सूर्याची पूजा करणाराचा हात तर बळावला आहे, दासीपुत्रानें माझा मळा ओसाड करून ठेविला आहे. हे परमेश्वरा, ऊठ, झोंपीं कां जातोस! तो कष्टकऱ्यांवर अणखी जुलूम करून त्यांस जोंकुडास जुंपतो, ह्मणून मूर्त्तींची सेवा करणारांचा नाश व क्षय कर, आणि विखरलेल्यांस तूं आपल्या मंदिरीं पुनः वसीव, मग "परमेश्वर उंचावला जावो" असें ते नेहमीं ह्मणतील.

שנה בשנה वर्षोवर्षी पारव्यासारखा मी ध्यान करितों, कारण सकुमार नगरी व्यभिचारिणी झाली आहे. तिच्या राज्याच्या व तिच्या लोकांच्या नीच पदावरून आश्चर्य वाटतें, तिच्या द्वेषणाऱ्यांनीं तिजवरील हार व कुंडलें हिरावून घेतलीं, तिचें ठिकाण रानगाढवाची आश्रयाची जागा झालें आहे, ईश्वरी साक्षात्काराच्या ठिकाणीं घातक पशु व शाहामृग राहतात ह्मणून हर्षाबद्दल आकांत व शोक होत आहे. तिच्या ओळखीच्या व परिचयाच्या मनुष्यांस विसावा कोठें सांपडेल! तिच्या आसनीं केदाराचे[3]

---

१ इर्मेया. २ इस्राएल, शेलोमोच्या गीतांत इस्राएलांस पारव्याची उपमा अनेक वेळ दिलेली आहे. ३ केदार हा इश्माएलाचा पुत्र होता.

आणि हामाचे पुत्र बसले आहेत; ती (नगरी) आपले पापांत असतां, तूं तिचें सांत्वन कसें करशील? सर्व प्रांतोप्रांतीं तिची थट्टा होत आहे; तिनें लज्जेचा व विस्मयाचा वांटा उचलला आहे. धि:कारलेले व अनाथ, आणि संकटांत पडलेले गरीब व दरिद्री लोकांच्या प्रार्थनेकडे फीर, शिनआरांत विखरलेल्यांस सीयोनेंत एकवट कर, मग ते आमाना पर्व[1]ताच्या शिखरावरून धूपाच्या डोंगराकडे[2] देवाला धन्य ह्मणत येतील.

יונה נכאבה दु:खानें गांजलेल्या पारव्यांचा[3] जीव क्षीण होत आहे; तो आकाशांत वस्ति करणाराच्या मंदिरास प्रतिदिवशीं प्रदक्षिणा करीत असतो[4]. मोठ्या वाणीनें तो आपल्या प्रियकराची काकुळति करितो; तो जाणतच आहे कीं, त्याच्या मूर्खपणामुळें हा प्रवास दीर्घ वाढला आहे; जर तो सुवर्णमय करारावर[5] आवड ठेविता, तर किती बरें असतें! त्याच्या खडकरूप आश्रयानें त्यास त्याच्या डोळ्याच्या पुतळीप्रमाणें व बाहुलीप्रमाणें पुन: पूर्वस्थितीस आणिला असता. हे प्रियकन्ये! ऊठ, आतां बसली राहा; अगे सुंदर मुली! तुजवर उजेड प्रकाशला आहे, तुजवरील राग निघून गेला आहे; आतां तूं दासी होणार नाहींस; आणि शेबा व सेबा[6] यांचे प्रलय तुजवरील प्रीतीचा नि:पात करूं शकणार नाहींत.

तम्मूजच्या उपासानंतर दुसऱ्या शाब्बाथ दिवशीं.

שמעו והאזינו अहो! तुह्मी माझें ह्मणणें ऐका व त्याकडे कान लावा; माझा आश्रय जो देव, त्यास मी ह्मणतों कीं, तूं मला कां विसरलास! माझे पीडणारे वाढून व एकवट होऊन मला मारितात; मग मी आणखी कशाची आशा करूं? मोआब व आराब यांच्या लेंकरांनीं मला फासांत धरण्याकरितां खांच खणिली, अशीं अनेक संकटें मजवर आलीं. जरी पूर्वीं[7] त्वां मला डाव्या हातानें धक्क्यावर धक्के दिल्हे; तरी आतां[8] तूं आपल्या उजव्या हाताच्या सामर्थ्यानें मला आपणाजवळ घे. माझ्या ओंठांच्या वचनाकडे कान लाव, आणि ह्मण कीं, "माझ्या लेंकरांविषयीं व माझ्या

---

१ आमानापर्वत खनान देशाच्या उत्तर शीमेवर आहे. २ टीका १४. ३ इस्राएलाचा. ४ मंदिर पुन: बांधलें जावें ह्मणून नित्य प्रार्थना करीत असतो. ५ पवित्रशास्त्रावर. ६ शेबा व सेबा हे हामाचे वंशज होते. ७ इ. काल. ८ इ. आज.

हाताच्या कामाविषयीं मला आज्ञा कराल काय ?" ज्या दिवशीं (सर्व) प्राणी माझी सेवा करायास उभे राहतील, (त्या दिवशीं) मी त्यांचा जीव माझें स्तवन करायास आपल्या पवित्र नगरा जवळ आणीन.

נשמת ילדים आरीएलेच्या नाशामुळें एकांतवासांत बसलेल्या लेंकरांचा आत्मा लज्जित व विस्मित होतो; कारण "याकोबाच्या घराण्या व इस्राएलाच्या वंशांच्या कुळांनो, तुह्मी परमेश्वराचें वचन ऐका" हें देवाचें वचन त्यांनीं ऐकिलें नाहीं. माझी छाया निघून गेल्यादिवसापासून[3] निराशा झालेल्या दरिद्र्यांचा आत्मा, हे यथार्थ बोलणाऱ्या, तुला सत्य मानितो; कारण तूं त्यांस सांगितलें होतें कीं, "लेंकरांनो, माझे शब्द ऐका; तुमच्या पूर्वजांस माझ्या अंगीं कोणता अन्याय सांपडला, ह्मणून ते मजपासून दूर गेले? पवित्र लोक जे भट्टीच्या व चुलीच्या मध्यें पडले आहेत, त्यांचा आत्मा शोक करीत चालला आहे; कारण त्यांनीं आकाशांत वस्ति करणाराचा नियम धिःकारला, आणि ज्या परमेश्वरानें आह्मास मिसर देशांतून आणिलें, तो कोठें आहे?" असें त्यांनीं विचारिलेंहि नाहीं. दुःखानें गांजलेले व बंदांत गुंतलेले लोकांचा आत्मा तुला थोर मानितो; आणि (ते लोक) आपली वाणी समुद्राच्या व लाटांच्या गर्जनेसारखी उंचावून विनंति करितात आणि ह्मणतात हीं आमचीं तोंडें समुद्रासारखीं गायनानें भरोत.

את אויביך אל हे देवा, तूं आपल्या शत्रूंचा लवकर व थोडक्या वेळांत नाश व निःपात कर. त्याच(देवाला) मात्र मी ध्यान करून हाक मारितों, कारण माझ्या संकटीं माझें सहाय असा तो ह्मटलेला आहे? आणि माझ्या वैऱ्यांवर राग, क्रोध व क्षोभ येवो, आणि त्यांचा सूर्य मावळो. हे पवित्र व भयंकर (देवा), आणि आश्चर्यकृत्यें करणाऱ्या, तुझी मंडळी जी चिखलानें व मळानें भरली आहे, तिला बंदिशाळेंतून काढ, आणि माझ्या लोकांवर बलात्कार करणारांचा नाश व निःपात कर. हे परात्पर देवा, तुझें नाम थोर मानिलें जावो; तूं आपल्या गरीब व दरिद्री लोकांवर दया कर, आणि अन्य भाषेच्या लोकांचें तोंड विरस करून त्यांमधून त्यांस सीयोन डोंगराकडे चढीव.

---

१ टीका १५. २ येरूशालेमेच्या. ३ माझा आश्रय नाहींसा झाल्यापासून.

יום כמו נר ईश्वराचा आशीर्वाद पावलेल्यांचें संतान, जे पवित्र लोक, त्यांकरितां आज माझ्या तोंडावर केवळ अश्रूंचे ढीगच उभे आहेत. त्यांचें सर्व गौरव निघून गेलें, आणि त्यांच्या सुंदरपणाचें सामर्थ्य नमलें; कारण परमेश्वर रागानें त्यांशीं वाद करावयास उभा आहे. भविष्यवाद्यांनींहि लज्जा पांघरून आपलें डोकें झांकून घेतलें आहे; आतां त्यांस ईश्वराचा दृष्टांत होत नाहीं. ते या प्रवासांत आपले हात सत्यानें दृढ करितात, कारण परमेश्वर दयाळू व कृपाळू आहे. ते तुला थोर मानून प्रत्येक आपल्या भावास हाक मारून ह्मणतात कीं, तुह्मी देवाला स्तवा, आणि परमेश्वराचें सुवंदन करा.

ער און צבי हांकून लावलेल्या हैरणास कोठपर्यंत कोणीच एकवट करणारा नसेल ! तें दुःखांत पडून गुंतलें आहे, त्याच्या तिडकाहि फारच वाढल्या आहेत, ह्मणून तें मोठ्यानें ओरडून कडवटपणें आपल्या दुःखाच्या क्लेशामुळें रडतें; त्याची थट्टा, धिःकार, व पाठलाग करणारानें त्याच्या मानेवर जोकड ठेविलें आहे, तें तें वाहत आहे. जुलमामुळें मी देवाकडें ओरडतों, परंतु कोणीच उत्तर देत नाहीं; यास्तव माझें मन फारच रिचवितें व खेदित होतें; मी आपली पाठ परक्यास व अन्य सरदारांस तुडवायास दिली आहे; आणि मृत्युलोका एवढ्या खोल खांचेंतून मी ओरडत व कण्हत आहें. परक्याच्या लेंकरांनीं माझ्या दिसण्यांतील सर्व आवडत्या वस्तु आपल्याशा करून घेतल्या आहेत. माझे वंश व माझीं लेंकरेंही पाडावपणांत गेलीं आहेत, शत्रूनें माझ्या पवित्र स्थानाचा व वसतिस्थानाचा नाश केला आहे; रागानें त्यांनीं स्त्रिया व लेंकरेंहि मारिलीं, त्यांनीं माझ्या डाहाळ्या कापून गजर केला आहे. हे तारण करणाऱ्या देवा, ऊठ, आणि उंचाविला जा; तुझी आशा करणाऱ्या लोकांस खंडून घे, त्वरा व उतावळ करून आह्माकरितां उद्धारक पाठीव, तो आह्मास आश्रय होईल; हे निर्माणकर्त्या ! आह्माकरितां अरोग्यतेचा उपाय पाठीव; कारण आमचा उद्धार करायास तुजवांचून कोणीच खडकरूप आश्रय नाहीं.

---

१ इस्राएलास.

आब ह्मणजे श्रावण महिन्याच्या प्रतिपदेची सूचना करितांना कोठें कोठें हें ह्मणतात.

אשׁוּר עָרָי मीं आपल्या मंडळीस पाहावयास त्वरा करावी, तर ती अति पीडित आहे; मीं आपल्या मंदिराचा समाचार घ्यावयास जावें, तर तें अगदीं ओस पडलेलें मला सांपडतें. त्याच्या कुंपणी कोसळल्या आणि त्याच्या भिंती झुकल्या आहेत; त्याजवर काळोख व अंधार असून तें मूर्च्छित व कोरडें पडलें आहे. तेथें बगळा ओरडतो, कावळा आपला घरोटा बांधितो, आणि शाहामृग व अजगर दुःखाचा शोक करितात. सरडा, वनपशु, घार व गीध विलाप व आक्रोश करून शोकाच्या वाणीनें ओरडतात. मी त्यांस विचारिलें कीं, प्रिय हरणीचीं पिलीं, हरणें आणि बंदिस्तीच्या कोठडींतील पारवे कोठें आहेत? स्फटीकानें व उंच एरेझ झाडाच्या लांकडानें बांधलेल्या कोठड्या कोठें आहेत व शेथीया[1] दगड कोठें आहे? राजवाडे व त्यांचे मोलवान पाये, आणि हरणीच्या पिलांचीं अंगणें व हरणीचीं मंदिरें कोठें आहेत? कशीद्याचीं विचित्र वस्त्रें पांघरणाऱ्या आणि रंगमहालांतील पूर्ण गौरवी कुमारी कोठें आहेत? विलास कोठें आहे? आणि सुगंधि तेलें, हर्षाचे द्राक्षरस व निर्मळ सपीठ कोठें आहे? पूजन कोठें, प्रमाणनेम कोठें, याजकपणा कोठें, व लेवीपणा कोठें आहे? न्यायानें, निर्मळ वचनानें[3] व कपटावांचून स्थापन केलेलें राज्य कोठें आहे? उरावर पाळलेलें चंद्रासारखें (सुंदर) आणि सूर्याच्या खालोखाल तेजस्वि असें जें सत्य तें कोठें आहे? त्यांच्या भविष्यवाद्यांनीं त्यांची वस्ति खोलवटींत, भूमीच्या बिळांत व विस्मरणाच्या खिंडींत होईल, असें सांगून ठेविलेंच आहे. त्यांच्या पाठीवर गवत व हिरवळ वाढून तें मेंकरें तुडवितात व त्यावर कोंकरें चरतात. सकाळीं व संध्याकाळीं थंडीनें व उन्हानें त्यांस खाल्लें. ते पुराच्या लोटांत व मोठ्या प्रलयांत सांपडले आहेत. सागरांत ते बुडाले आहेत, त्यांच्या पाडावपणांत त्यांच्या जिवाच्या दुःखाचा व शरीराच्या नाशाचा अंत नाहीं. ते समुद्रांत फिरतात, अधोगतींत त्यांचा मार्ग, मृत्यु त्यांचा नावाडी, आणि कबर त्यांची नाव झाली आहे. त्यांस कंप, विस्मय, भय व त्रास वाटतो; कारण त्या अवघ्या तारवांत कांहींच

१ टीका. १६. २ टीका १७. ३ इ. ओंठांनीं.

वाणी व उत्तर नाहीं. सुंदरमंडळी पूर्ण नाशाकरितां, चेचरली जाण्याकरितां, विखरली जाण्याकरितां आणि उपसलेल्या तरवारीनें मारिली जाण्याकरितां विकली गेली आहे. तिचें विखरलेलें संतान चिरडून व तुडवून गेलें आहे; पिढोपिढीं त्यांजवर नव्या पीडा व जखमा होतात. त्यांच्या बापानें त्यांच्या आईचा[१] व त्यांचा धि:कार केला आहे; ह्मणून अन्य लोकांच्या कन्या त्यावर स्वामित्व करितात. जशा एमोरी, हित्ती, हगरी, कित्ती, मिद्यानी व मोआबी. तरी त्यांचा बाप दयेंकरून आपल्या अनाथ लेंकरांवर दया करील, आणि विखरलेल्यांस पवित्र देशांत एकवटील. हे महान व थोर ईश्वरा, नीचकरणाऱ्या व उंच करणाऱ्या, घायाळ करणाऱ्या व निरोगी करणाऱ्या, मारणाऱ्या व जीवंत करणाऱ्या, तूं आपल्या नगराकडे फीर, आपलें मंदिर बांध, आपल्या घरीं वास कर; आणि परागंदा झालेल्यांस एकवट कर. हे महिने नवे करणाऱ्या, पवित्र मंडळींतील पुरुषांस व स्त्रीयांस बंदिस्तीच्या नगरीं एकवट; आणि हा महिना शुभ होऊन, हे महान् कृत्यें करणाऱ्या देवा, (आह्मांवर) तुझी प्रसन्नता होण्याची आज्ञा कर.

तम्मूजच्या उपासानंतरच्या तिसऱ्या ह्मणजे तिशआबेआबच्या अगोदरच्या शनवार दिवशीं.

आव महिन्यास आरंभ झाल्यावर आनंद उणा करितात; आणि जर कोणा इस्राएलाचा एखाद्या अन्य जातीच्या मनुष्याबरोबर कांहीं वाद असला, तर या दिवसांत इस्राएलांचें भाग्य वाईट असतें, ह्मणून इस्राएलानें त्या अन्य जातीच्या मनुष्यापासून दूर राहावें. आव महिन्याच्या प्रतिपदेपासून नवमीपर्यंत नवीं वस्त्रें पांघरीत नाहींत व शिवीतहि नाहींत. आणि मास खाऊं नये व द्राक्षरस पिऊं नये अशीहि चाल आहे. कोणी तम्मूज महिन्याच्या सतराव्या तारखेपासून असें करितात. ज्या सप्तकांत तिशआबेआव येतो, त्या सप्तकांत हजामत करवूं नये, आणि वस्त्रेंहि धुवूं नयेत. तिशआबेआव झाल्यावर तीं पांघरणें असेल तरी, आणि तें एकच वस्त्र असलें तरी आणि प्रतिपदेपासून तिशआबेआवपर्यंत पशु व पक्षि कापणें बंद करितात.

אפתח פי मी आपलें मुख स्तुति करावयास उघडितों, आणि मोठा आकांत करून ओरडतों; "जो ह्मणतांच ही पृथ्वी झाली" (ही स्तुति करितांना) मी देवास धन्य ह्मणतों. देवाच्या मंदिराच्या

---

१. ईश्वर जो त्याचा बाप यानें त्यांच्या आईसमान येरूशालेम नगरीचा.

नाशाकरितां, माझ्या अश्रुधारा वाहतात; जशी डोंगरासारखी भिंत कोसळते, तसा नाश झालेल्या लेंकरांकरितां, जशी खिंडींतून नदी, तसें माझ्या डोळ्यांतून पाणी वाहतें; ज्या वेळीं हा न्यायाचा निवाडा होऊन व त्याजवर मोहोर होऊन तो पूर्ण झाला, तो हाच वेळ. मंदिराचा नाश होण्याच्या या दिवशीं माझीं दुःखें वाढतात, माझ्या पुष्कळ क्लेशांमुळें मला लज्जा प्राप्त होते व मी विस्मित होतों; मजकरितां होणाऱ्या चमत्कारांची वाट पाहतां माझ्या डोळ्यांची ज्योति नाहींशी झाली; हाय्योथ व ओफन्निम देवदूतहि आपल्या पाहऱ्यावरून (असेंच) उत्तर देतात. चांगल्यावरून (ईश्वरास) सुवंदावें हा सर्व मनुष्यांचा धर्म आहे; त्याप्रमाणें जरी त्यांजवर वाईट आलें, तरी त्यांनीं पश्चात्ताप करून त्याची स्तुतिच करावी; तर सर्व गायनापेक्षां (तुझें गायन) आह्मी पुनः उंचवावें, ह्मणून तूं आह्मास फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं.

אשר אר״ה सिंह गर्जला, त्यास क्रोध चढला, रागाच्या संतापानें त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें केलें, त्यानें आपल्या पायानें व पंजानें वृद्धास व लेंकरांस मंदिरांत व देवडीवर तुडविलें व विदारिलें; जो बोलतांच पृथ्वी झाली तो सुवंदित असो. माझें डोकें भट्टीच्या व चुलीच्या मध्यें पडलें आहे; मारले गेलेले व पाडाव केलेले यांकरितां व तान्हीं बालकें यांकरितां माझ्या डोळ्यांतून पाण्यासारख्या अश्रुधारा वाहतात, मी फारच चकित व अगदीं मुका होऊन बसलों आहें. शेरडें विखरलीं आहेत, त्यांस कोणी मेंढपाळ नाहीं; तीं सर्व कोनाकोपऱ्यांत गेलीं आहेत, कुरणांतून त्यांस हांकून लाविलें आहे; त्यामध्यें सिंह येऊन पोंचले, त्यांनीं त्यांच्या बाळकांसहि फाडून टाकिलें आहे, माझा मेंढपाळ मजपासून कोठें लपाला आहे! कुमारि कोंडल्या आहेत, विधवा शोक करीत आहेत, आई पुत्रहीन व कन्याहीन झाल्या आहेत, त्या शोक, विलाप व आक्रोश करितात, त्यांनीं आपलें हृदय व आपले डोळे वर जगताच्या देवाकडे लाविले आहेत. मी कैदेंत उभा आहें, कारण माझा पाय गुतला आहे; सर्वसमर्थ मजशीं कडवटपणें वागतो, ह्मणून माझी शक्ति खचती, दुःखानें माझें हृदय उकळतें व माझे आयुष्याचे दिवस संपतात; अशा वाईट व दुःखाच्या गोष्टीवरून माझे लोक ह्मणतात कीं, खडकरूप आश्रय जो जगताचा देव, हा आह्मांस विसरला आहे.

איך משכני परत्पराचें वसतीस्थान कसें नाशास गेलें! त्याचीं लें-करें आपल्या सीमेपासून दूर प्रवासांत गेलीं आहेत. तीं पळालीं व प-रागंदा झालीं, तरी तीं तरण्या सिंहांच्या मध्यें सांपडलीं आहेत, ह्मणून तीं कण्हतात; त्यांच्या पिलांनीं त्यांची थट्टा मांडिली आहे. ज्या दि-वशीं परक्यांनीं त्यांस हांकून नेलें, त्या दिवसापासून तीं अगदीं उभीं राहूं शकत नाहींत. त्यांच्या शोकांच्या अश्रूंनीं दगडहि झिजून गेले. आपणांस झालेली लज्जा व आपला झालेला धिःकार हीं त्यांनीं साहिलीं; कारण त्यांनीं आपले बंडखोर ओंठ थट्टा करण्यास उघडले होते. ते हात आपटतात, कारण ते आपल्या पापांत बुडाले आहेत; आणि ते त्याला चोखितात. त्यांनीं थोर मानिलेल्या खडकरूप आश्रयाच्या द-र्शनाची प्रतिदिवशीं ते वाट पाहतात; पाहा, त्याची दया व त्याचा न्यायहि ते यथार्थ मानितात. जो देव आपणावर आवड धरणाऱ्यांच्या फुटलेले मनावर झालेले घायांस पट्टी बांधितो, त्या देवास ज्या दिवशीं ते त्याचे दार ठोकितात, त्या दिवशीं ते मान्य होवोत. आपल्या नि-र्माणकर्त्यास लगटून राहावें, ह्मणून ते कीर्तन करितात, कारण सा-त्विकांचे जीव देवाशीं लगटून राहतात.

הלנופלים תקומה दुःखाच्या खांचेंत पडलेल्यांच्यानें उठवेल काय? आणि जे मौन्यरूपि खाड्यांत बुडाले, त्यांच्यानें वर येववेल काय? माझ्या मंदिराचा नाश झाल्या दिवशीं मला कधींच हर्ष होत नाहीं, माझें गौ-रव पालटून मला धिःकार प्राप्त होतो, माझें गायन पालटून शोक होतो, माझी ज्योत अंधारमय होते, तिजवर ढग येऊन बसले आहेत, चंद्र व सूर्यहि आपल्या ठिकाणाच्या एका कोंपऱ्यांत बुडाले आहेत, सप्तऋषि व अगस्त्य हीं नक्षत्रेंहि भूमीच्या तळीं जाऊन पोहोंचलीं. माझ्या पाडाव-पणाचें दास्यत्व पालटून त्याचा शेवट व अंत होईल काय? अथवा माझ्या दुःखाच्या वेदनांस कांहीं उपचार होईल काय! सेब्राच्या व हावीलाच्या[1] पुत्रांनीं माझी वतनभूमि[2] आपली करून घेतली आहे, माहानाथ व तेमा[3] माझ्या डेऱ्यांत विश्रांति घेतात, नेबायोथ व शम्मा[4] यांच्या हातून माझा

१ सेबा व हावीला हे हामाचे वंशज होते. २ इ. सीमा. ३ मानाहाथ व तेमा हे एसावाचे वंशज होते. ४ नेबायोथ हा इस्माएलाचा पुत्र व शम्मा हा एसावाचा नातु होता.

नाश होत आहे. हे देवा, मजविषयीं तूं कोठपर्यंत उगा राहशील व मौन धरिशील! तुझीं लेकरें चकित होऊन चिमणीसारखीं परक्याच्या फांसांत पडलीं आहेत; तीं भ्रमतात आणि कठोर स्वामीच्या हातून धक्के खातात; ऊठ, त्यांचा सूड घे, ह्मणजे ते नमतील; आणि लोरूहामा[1] इला तूं (आश्रयाचा) दुर्ग व कोट असा हो. जे लोक तुझा क्रोध साहतात, त्यांस दुःखाच्या खांचेंतून काढ; त्यांनीं आपलीं मनें व आपले डोळे तुझ्या आसनाकडे लाविले आहेत; त्यांच्या सैन्यास कैद केलेल्या बंदिशाळेंतून काढ, आणि पूर्वीप्रमाणें उभारलेल्या हातानें दक्षिणेकडून व पूर्वेकडून, आणि हादाद व तेमा[2] या लोकांमधून त्यांस तूं आपल्या मंदिराकडे फिरीव. योसेफाचे शेष खंडून काढण्यासाठीं तूं आपला पराक्रम[3] पुनः त्यांस कळीव; क्षीण झालेल्या व बहकलेल्या (इस्राएलांस) सर्व देशांपेक्षां जो रम्य देश, त्यांत तूं एकवट कर; मग सर्व बुद्धिवान प्राणी तुझी सेवा करण्याची आवड धरितील, आणि सर्व गुडघे व शरिराचे बांधे प्रतिदिवशीं तुजपुढें नमन करतील; आणि प्रत्येक आत्मा तुझी स्तुति करील.

נשמת אמונים प्रामाणीक मनुष्यांचा आत्मा क्रोधाच्या दिवशीं थरथरतो व म्लान होतो, आणि आकांत करून रडतो; आणि आपणावर आलेल्या वाईटाविषयीं प्रतिवर्षीं ध्यान करून ह्मणतो कीं, जें नगरें लोकांनीं भरलेलें असे, तें कसें एकटेंच बसलें आहे! लेंकरांचा आत्मा ओझ्याच्या भारामुळें ओरडून व आकांत करून रडतो; त्यांचें ओंगळ पाप प्रगट झाल्यादिवसापासून, जें नगर सर्व प्रांतांत मुख्य होतें, तें कर देणारें झालें आहे, यावरून तीं शोक करितात. विषानें व कडू पदार्थांनीं धालेल्यांचा आत्मा विस्मरणाच्या कोनीं मोठ्यानें आकांत करून रडतो, तो निघून पाडावपणांत गेला व तेथें विस्मित होऊन बसला आहे; तो रात्रीं फारच रडतो व त्याचे अश्रू त्याच्या गालांवरून वाहतात. परात्पर देवाच्या रागानें चेंचरलेल्यांचा आत्मा आकांत करून रडतो; आणि ईश्वरानें आपल्या रागानें सीयोनेच्या कन्येस कशी झांकिली!

---

१ लोरूहामा ह्मणजे दया न पावलेली, हें नांव इस्राएलास होशेया अ. १. एथें दिलें आहे. २ हे इश्माएलाचे पुत्र होते. ३ इ. हात. ४ येरूशालेम.

याविषयीं शोक व विलाप करीत आणि चिंताक्रांत तो बसला आहे. रानांत व कोनाकोंपऱ्यांत हांकून लावलेल्यांचा आत्मा, ज्या दिवशीं लोकांनीं भरलेली वस्ति विधवेसारखी झाली, त्या दिवशीं आकांत करून रडतो, (आणि ह्मणतो) विश्वासू नगरी कशी व्यभिचारिणी झाली! पाडावपणाच्या देशांत कंपायमान व खिन्न झालेल्यांचा आत्मा, त्यांचीं लेकरें, त्यांचे शेष, व त्यांचें संतान देवाकडे काकुळति करून ह्मणतात कीं, आमचीं तोंडें गायनानें भरोत.

לִילֵל נִלְאָה जरी आमचीं तोंडें अक्रोशानें भरलीं, तरी आमच्या भंगाविषयीं ओरडतांना आह्मी थकलों आहों. जरी समुद्राची शाई केली, उंच आकाशासारखे पट्ट ताणिले, आणि सर्व रोथेम झाडांच्या लांकडांच्या लेखकाकरितां लेखण्या केल्या, तरी माझ्या दुःखाचा एखादा अंशहि लिहिण्यास तीं पुरणार नाहींत. माझ्या मंदिराचा नाश झाला, माझें पवित्र स्थान धुळीस मिळालें, माझे सुज्ञजन व माझ्या पाठशाळा हीं नाहींशीं झालीं; माझे रथ व माझा दळभार कोठें आहेत? यांकरितां आमचे डोळे अंधारयुक्त होतात. देवाच्या घराच्या जळण्यावरून माझ्या मनाचा दाह होतो, वेदीहि नाहीं आणि हारएल नांवानें ह्मटलेलें स्थंडिलहि नाहीं, आणि आमच्या सर्व पापांचें प्रायश्चित्त व्हावें ह्मणून देवाचें पूजन करायास मुख्य याजकहि नाहीं. दिव्याचें झाड, मेज, दर्शनीय भाकरी, केरूबीम, (संकेतलेखाचा) कोश, लेवी, उपाध्ये व गीत हीं सर्व नाहींशीं होऊन संकटें आलीं, आणि नृत्याचें गायन पालटून शोक झाला आहे. सुगंध, थावराचा[1] आवाज, तांबडी [2]कालवड, मान मोडण्याची [3]कालवड, नैवेद्याचें तर्पण, लोग, हीन, एफा[4], आणि आमचें अतिक्रमाचें प्रायश्चित्त होण्याचा[5] [6]एडका हें सर्व बंद पडलें

१ स्थंडिलावरील अग्नीचे इंगळ ज्या थावरानें काढीत असत तो; त्याचा आवाज मोठा होत असे. २ पोंवळी सांगोपांग कालवड जिची राख गणना अ. १९ प्रमाणें शुद्धतेकरितां पाण्यांत मिश्र करून शिंपडीत असत ती. ३ शोध न लागलेल्या खुनाच्या दोषाचें प्रायश्चित्त होण्यासाठीं अनुवाद अ. २१ ओ ४ प्रमाणें ज्या कालवडीची मान मोडित असत ती. ४ लोग, हीज व एफा हीं निरनिराळ्या प्रकारचीं मापें होतीं. ५ इ. शुभ्र होण्याकरितां. ६ हा लेवी अ. १६ एथें लिहिलेला आजाजेलचा एडका, ज्यास प्रायश्चित्ताच्या दिवशीं रानांत नेऊन कड्यावरून लोटीत असत तो.

आहे. आमच्या पवित्र मंदिरांतील पूजन पुनः चालू कर, प्रवासांत विखरलेल्यांस एकवट कर, आमच्या नाशामुळें आह्मांस प्राप्त झालेल्या नीचपणांतून आह्मांस उंचाव, आणि आमच्या पूर्वस्थीतीस आह्मांस आण; ह्मणजे हे अनंता! आह्मी हास्यवदन करूं.

היכל יי היכל יי परमेश्वराचें मंदिर, परमेश्वराचें मंदिर, परमेश्वराचें मंदिर (आमच्या पापांच्या प्रायश्चित्ताकरितां आहे; असें समजून दोष करूं नका) असें (भविष्यवादि) मोठ्यानें ह्मणत नव्हता कार्य ! यद्यपि माझे अपराध वाढले. ज्या दिवशीं (ईश्वरी साक्षात्कार) मंदिरांतील (दयासनावरून) केरूबावर जाऊन बसला, त्या माझ्या नाशाच्या दिवशीं मी हाय हाय करून ओरडतों; माझीं दुःखें बळावलीं, ह्मणून माझें मन वितळतें; आणि माझ्या पुष्कळ अपराधांमुळें माझें कपट मजसमक्ष साक्ष देतें, व भयंकर वाणी माझ्या कानीं येते. माझ्या खडकरूप आश्रयानें माझ्या पापामुळें माझी शोभा नाहींशी केली आहे, त्यानें माझा मुगुट उंचावरून खालीं जमिनीवर पाडिला आहे, क्लेशामुळें माझ्या अंगावरील रोमांच उभे राहतात, मला विषाच्या व कडूदवण्याच्या ओहोळांत हर्ष मानावा लागतो, आणि माझ्या दृष्टीसमोर माझा सूर्य अंधारमय झाला आहे. शत्रूनें सोडत काढण्याचा विचार करून मजविषयीं पण पाडिला होता; आणि जे लोक पूर्वी सीनाय पर्वताजवळ शिक्षण पावले, त्यांतील किती लक्षावधि तरवारीच्या धारेच्या भयानेंच मेले, आणि माझ्यांतले किती लेवी व याजक यांस मारायास नेलें. शोक करणाऱ्या लेंकरांचें शांतवन तूं केव्हां करशील? मुख्यजनांच्या शेषास सीयोनेकडे तूं केव्हां परतविशील? आणि तेथील मूर्त्ति तूं केव्हां जाळशील? मग हे परमेश्वरा, तुझ्या शत्रूचा छेद होतांना मी ह्मणेन कीं, "हे परमेश्वरा, तुझीं कृत्यें किती महान आहेत!

יום נלחמו בי ज्या दिवशीं माझे मित्र एकत्र होऊन मजशीं लढले, त्या दिवशीं परमेश्वराची दया माझें शस्त्र होतें. जशी हरणाची

---

१ हें वाक्य इर्मेया अ. ७ ओ. ४ एथें सांपडतें. २ हें येहेजकेल अ: २१ ओ. २१ वरून लिहिलें आहे; ही सोडत बाबेलचा राजा नेबुखदानेसार यानें येरुशालेमेवर चढून येण्यापूर्वी काढिली होती.

इच्छा पाण्याच्या ओहोळावर, तसा मी उत्कंठित झालों आहें; माझे शत्रू तर आनाकीमाच्या पुत्रांसारखे[1] उंच वाढले आहेत, आणि आकाशांतील प्रकाशाच्या ज्योति अंधारमय झाल्या आहेत, माझ्या लेंकरांच्या पेंढ्या नमल्या आहेत[2], माझें तोंड उतरलें, आणि माझ्या आयुष्याच्या वर्षांची मला आवड राहिली नाहीं. बाप जीवंत असतां लेंकरें अनाथ झालीं आहेत; देवास नाकारणारे त्यांजवर उठले आहेत, त्याच्या बालकांचें रक्त त्यांनीं पाण्यासारखें वाहविलें, माझ्या दृष्टीसमोर माझ्या लोकांच्या मोठाल्या समुदायास त्यांनीं टांगिलें, आणि आईस तिच्याच पुत्रावर आपटून मारिलें. अगणित संकटें मजवर आलीं, सुंदर स्त्रिया भुकेनें मेल्या, त्यांचींच लेंकरें त्यांचा भक्ष झालीं, लहान बालकें भाकर भाकर करीतच मेलीं; हे परमेश्वरा, याकरितां तूं आपणास दयेपासून आकळिशील काय! मारले गेलेल्यांस (शत्रूनें) पाय धरून ओढीत नेलें, आणि त्यांस झाडावर टांगून तेथेंच त्यांस सोडून गेले, (नेहमीं) हर्ष करणाऱ्या कुमारींस पाडाव करणारांनीं घेरिलें; याविषयीं माझ्यांतले वृद्ध शोक करितात; सण व शाब्बाथ यांस देव विसरला आहे. शोक करणारांस तूं शांतवन केव्हां ऐकविशील? पृथ्वीच्या कोनांतून आपलीं लेंकरें एकवट करून नाश झालेलीं नगरें पुनः जेव्हां वसविशील, तेव्हां माझे गवयी व सूरकरी तुझ्या मंदिरीं गातील, आणि हे परमेश्वरा, ते तुझें नाम सुवंदितील.

קול אהלה आहोलाची[3] वाणी धापा देत आहे, पाडावपणांतून ती कष्टपणें शोक करून ओरडत आहे; आहोलीबाच्यी[4] पाडावपणांतील वाणीनें व तिच्या शोकाच्या वाणीनें माझें मन फाटून जातें. रेऊबेनास सुंदर वंत नाहीं, शिमओन दगड एकवटींत आहे, इस्साखार बुद्धिवंत

---

१ आनाकीमाचे पुत्र हे खनान देशांत राहणारे प्राचीन व महाकाय लोक होते. गणना अ. १३. ओ. ३२–३३ पाहा. २ उत्पत्ति अ. ३७. ओ. ७. एथील योसेफाच्या स्वप्नांत नीचपद दर्शविण्यास या ह्मणीचा उपयोग केला आहे. ३ आहोला हें नांव येरूशालेमेस व येहुदाचे राज्यास दिल्हेलें आहे. ४ आहोलीबा हे नांव शोमरोनास व इस्राएलाचे राज्यास दिल्हेलें आहे.

आहे काय! असें शत्रु ह्मणातात, जेबूलुन तोंड उघडून एक शब्दही काढीत नाहीं, तो डोंगरांवरून व टेकड्यांवरून पळतो. येहूदा चिखलांत कसा रुतला? लेवी आणि बिनयामीन हे कसे रंडके झाले! आणि पवित्र मंदिरीं सूर्याची मूर्ति कशी बसली! हें सर्व माझ्या तारुण्यांतील अपराधांचें फळ आहे, तें एथपर्यंत कीं ऋणानें माझा जीव भरून गेला आहे. योसेफ आणि गाद हे कसे परागंदा झाले! आशेर आणि नफताली हे कसे दूर गेले! दानाचें सैन्य कसें गुंतलें! त्यांच्या राहुट्याही ताणिलेल्या नाहींत; त्यांच्या नाशावरून वेळही हर्षित होतो. सर्व कन्यांमध्यें जी प्रियंकर तिला एकवट कर, तिला दानें पाठीव, (भविष्यवाद्यांनीं) कथिलेल्या सत्य भविष्यांप्रमाणें तिचें सुंदर स्वरूप सर्व लोकांस दाखीव; कारण अनंत देवानें याकोबास निवडून घेतलें आहे.

בורא ער אנה हे उत्पन्न कर्त्या! तुझा पारवा फांसेपारध्याच्या सांपळ्यांत व जाळ्यांत कोठपर्यंत गुंतलेला राहील! तो कष्ट व पीडा भोगीत आहे, पिलांविरहित होऊन तो एकटाच बसला आहे, आणि हे माझ्या बापा! हे माझ्या बापा! अशा हाका मारीत आहे. तो पारवा आपल्या घरोट्यापासून भटकत व हिंडत आहे; दिवस व रात्रीं उन्हामध्यें व थंडीमध्यें तो राहतो; शत्रूच्या तरवारीमुळें व तरुण सिंहांच्या दांतांमुळें तो थरथर कांपत आहे. हे अनंता! ज्यावेळीं त्वां त्यांस फाडणारांच्या हातीं सोंपून दिल्हें, तेव्हां त्यांनीं त्याची मान खाऊन व त्याची नरडी फोडून टाकिली; शत्रूचें जोकड वाहातां वर्षांचीं वर्षें व किती हिंवाळे व उन्हाळे लोटले. आपल्या प्रियकराकडे आपल्या रंगमाहालांत टेंकड्यांवरून व डोंगरांवरून उडत व कुदत येण्यास त्यास गरुडाचे पंख कोण देईल! (असें होतांच) माझ्या कष्टांचा मला विसर पडेल. परक्या पीडकांनीं त्याजवर दुष्ट विचार योजिले; भारी जोकडाच्या लज्जेनें व विस्मयानें त्यांस अगदीं अगदीं अशक्त करून ठेविलें आहे; यामुळें माझा खेद वाढतो. हे उंचांत वास करणाऱ्या देवा! त्यांच्या मनाचें

---

१ हें छलनेचें भाषण आहे; कारण १ कालवृत्तांत अ. १२ ओ. ३२. येथें इस्साखाराच्या वंशांत पुष्कळ ज्ञानी होते असें लिहिलें आहे. २ इ. जेबूलुन तोंड उघडीत नाहीं. ३ इस्राएल. ४ शेलोमोचे गीतांत इस्राएलांस अनेक वेळ हें नांव दिल्हेलें आहे.

शांतवन कर; शोकग्रस्तांच्या मनाचें समाधान कर, अन्य लोकांमध्यें फांकलेल्यांस व विखरलेल्यांस एकवट कर; आणि उद्धारक येऊं दे.

तिशआबेआबच्या आदल्या दिवसाचें वर्तन.

या दिवशीं तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेकरितां प्रार्थनामंदिरीं इतर दिवसांपेक्षां कांहींसें लवकर जाऊन इतर दिवसांप्रमाणें प्रार्थना करितात, परंतु तोंडावर उपडें पडून जो भाग ह्मणायाचा असतो, तो ह्मणत नाहीं. नंतर घरीं जाऊन बराच दिवस आहे इतक्यांत शेवटलें जेवण आटोपून घेतात. या जेवणांत मांस खात नाहींत, द्राक्षरस पीत नाहींत, व दोन प्रकारचें शिजविलेलें अन्न खात नाहींत. जो कोणी शकतो, तो मिठासंगें कोरडी भाकर व वाटीभर पाणी पिऊन राहतो. आणि भुईवर बसतात व जेवणानंतरचा धन्यवाद एकत्र करीत नाहींत; जर तिघे असले, तर प्रत्येक हा धन्यवाद एकटाच बसून करितो. आणि शिजविलेली डाळ अथवा अंडीं खाण्याची चाल आहे, कारण हें सुतक्याचें खाणें आहे. जर तिशआबेआब रविवारीं आला, किंवा शनिवारीं आला ह्मणून रविवारावर गेला, तर या शेवटल्या जेवणांत मांस खातात, द्राक्षारस पितात, आणि शेलोमो राजा राज्य चालवीत असतां त्याच्या जेवणाच्या वेळेस जसें त्याचें मेज सजवीत असत, तसें जरी आपलें मेज सजविलें तरी चालेल. या तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेंत צדקתך ह्मणत नाहींत.

तिशआबेआबच्या रात्रीची रीति.

प्रार्थनामंदिरीं जातांना पायतणें काढून ठेवावीं, आणि प्रार्थनामंदिरीं गेल्यावर भुमीवर बसावें, आणि ज्याप्रमाणें रात्रीस त्याप्रमाणें दिवसास तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेपर्यंत करावें. आणि या दिवसाचीं शोकप्रद गीतें व इर्मेयाचा विलाप वाचण्याकरितां मात्र एक दिवा लावावा. या दिवशीं खाणें व पिणें, सुखाकरितां अंगास सुगंध लावणें व अंघुळ करणें, (सकाळीं हात धुणें ते बोटांच्या सांध्यापर्यंत मात्र धुवावे,) कातड्याचीं पायतणें घालणें, आणि स्त्रीपुरुष एका बिछान्यावर निजणें मना

आहे. आणि जसें रात्रीस तसेंच दिवसास. आणि या सर्व गोष्टी प्रायश्चित्ताच्या दिवसाप्रमाणें तीनसांजांपासून मना आहेत. आणि शास्त्राभ्यासहि बंद करितात; परंतु शास्त्रांतून इयोब व इर्मेयाचें पुस्तक याशिवाय आणखीं कांहीं वाचण्याची मनाई आहे; आणि यांतहि जीं शांत्वनाचीं वाक्यें असतात तींहि सोडून देतात. शाब्बाथ समाप्त होतांना जर तिशआबेआब असला, तर दिवस असतांच जेवण आटोपून ध्यावें. सूर्य मावळल्यावर सुतक धरितात व पायांतून पायतणें काढितात; आणि दिवा पाहिल्यावर בורא מאורי האש हा धन्यवाद करितात. मग हाज्जान पुढें लिहिल्याप्रमाणें आरंभ करून प्रार्थना करितो. (परंतु पुढें लिहिल्याप्रमाणें आरंभ करण्यापूर्वीं अनुवाद अ. ३२ ओ. १–४२ वाचण्याची चाल आहे.)

על נהרות בבל बाबेलच्या नद्यांजवळ आमच्या ज्योतींचा प्रकाश अंधारमय झाला, आणि आमच्या शोकाच्या वाणीनें आमच्या कर्ण्याचा आवाज नाहींसा झाला. बाबेलच्या कन्येस आमच्या दुःखांत हर्ष करणें आवडलें; परंतु आह्मी आपले विणे तेथील वाळुजावर टांगून ठेविले.

על נהרות בבל गीत १३७.

पुढें नित्याप्रमाणें प्रार्थना चालते, परंतु ארני שפתי मध्यें उपासाच्या दिवशीं ह्मणायाचा עננו אבינו हा जो भाग आहे, तोहि ह्मणतात; आणि שים שלום व אלהי נצור यांबद्दल हा पुढील भाग ह्मणतात; आणि पाहांटेच्या प्रार्थनाहि याप्रमाणें करितात.

עושה השלום हे शांति राखणाऱ्या! (तूं आपल्या) मोठ्या सामर्थ्यानें व शांतीनें आह्मांस आशीर्वाद दे; कारण तूं शांतीचा स्वामि आहेस. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देणाऱ्या! तूं धन्य आहेस.

यानंतर קדיש לעילא

इर्मेयाचा विलाप वाचण्यापूर्वीं हें ह्मणतात.

למי אבכה कशाकरितां मी शोक करूं, हात आपटूं, रडून आकांत करूं; आणि दुःखानें भरलेलें मन कोणास सांगूं. मंदिर, कोश, अ-

थवा केरूब ज्यांच्या ठिकाणीं कावळे व बगळे ओरडतात त्यांकरितां काय! लेव्यास देवाचें गीत गाव्रयास उभें राहण्यास केलेले मंचकासाठीं काय! ऊरीम व थुम्मीम ज्यांकडून याजक आपल्या हृद्यावर नेमिला जात असे, त्यांसाठीं मी चकित होतों. देवालयांतील सुज्ञ लोकांस ठोक्यानें शकुन पाहणारा व नक्षत्रांवरून प्रश्न पाहणारा यानें येऊन वधिलें यासाठीं काय! विधींचा प्रकाश कसा अंधारमय झाला! तालमूद कसें एकीकडे पडलें! तें आतां कोणास समजतें काय! शास्त्राचा गुह्यार्थ उघड करणारा कोणी आहे काय! आणि या पिढीस आश्रय देणारा असा कोणी आहे काय! बाळकें व तान्हीं यांचे मुडदे पडले; त्यांस उठविणारा कोणी नाहीं व त्यांची करुणा करणारा व त्यांजवर दया करणारा कोणी नाहीं. या सर्व गोष्टींवरून अवघा दिवस व अवघी रात्र मी अक्रोश करितों; अतिशय दुःखामुळें सुतक्यासारखा मी शोक करितों. मी अतिखेदानें शोक करितों, बगळ्यास आपला भाऊ असें ह्मणतों, आणि आपल्या अश्रूंकडून सीयोनेच्या मातीवरील माझी ममता दर्शवितों. गायनाची वाणी ऐकविणें मी बंद करितों. आणि (जी वस्ति लोकांनीं भरली होती) ती कसी एकलीच बसली आहे, असें ह्मणून विलाप करितों.

इर्मेयाचा विलाप.

" זכור " हे परमेश्वरा! आह्मांस काय झालें आहे तें स्मर; हाय हाय! आमची निंदा लक्ष लावून पाहा; हाय हाय, आह्मांस काय झालें! अवघें वर्षभर मी शोक करितों, आणि माझे अश्रू नेहमीं वाहतात; हाय हाय! पाण्याच्या डोहांत मी सांपडलों आहें, आणि माझीं दुःखें नेहमीं मजसमोरच आहेत; हाय हाय, आह्मांस काय झालें! माझें महत्त्व गेलें, आणि माझा प्रकाश अंधारमय झाला; हाय हाय! मला माझ्या वस्तिस्थानांतून हांकूनहि लाविलें; पाहा, मी मनुष्यांच्या धिक्कारास व लो-

---

१ प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग २ टीका १ पाहा. २ नेबूखादनेसार यानें येरूशालेमेवर चढून येण्यापूर्वीं शकुन पाहिला होता असें येहेजकेल अ २१ ओ. २६ वरून कळतें. ३ इस्राएली धर्माचें खरें स्वरूप पृष्ठ ५६–५९ पाहा.

कांच्या तिरस्कारास पात्र झालों आहें; हाय हाय, आह्मास काय झालें! कूथीईम लोकांनीं मला ठेंचिलें, आणि त्यांनीं माझी छलना केली व मजसमोर गर्जना केली; हाय हाय! माझे सर्व पाहणारे माझी थट्टा करितात हाय हाय, आह्मांस काय झालें! दुष्टांच्या संतानानें लांडग्याप्रमाणें मला वेढिलें; हाय हाय! त्यांनीं माझ्या पवित्र मंदिराचा नाश केला, पुष्कळ गोऱ्ह्यांनीं मला वेष्टिलें; हाय हाय, आह्मांस काय झालें! माझ्या सामर्थ्याच्या पवित्र मंदिराचा झाडून नाश केला, आणि माझ्या विश्रांतीच्या ठिकाणाहून त्यांनीं मला हांकून लाविलें; हाय हाय! माझी शक्ति फुटक्या खापरासारखी सुकली; हाय हाय, आह्मांस काय झालें! परक्यांनीं माझा क्षय केला, आणि माझा जीव मरणाच्या पंथास पोंचला आहे; हाय हाय! कारण अजगरांच्या ठिकाणीं त्वां आह्मांस ठेंचलें, आणि मृत्युच्छायेनें आह्मांस झांकिलें; हाय हाय, आह्मांस काय झालें! त्यांनीं मला अगदीं ग्लान करून सोडिलें, त्यांनीं माझ्या कुमाऱ्यांस द्राक्षारसाच्या कुंडांत तुडविलें; हाय हाय! माझें महत्त्व धुळीस मिळालें, आणि माझीं हाडें खिळखिळीं झालीं; हाय हाय, आह्मांस काय झालें! माझ्या शत्रूनें डोंगरांपर्यंत व टेंकड्यांपर्यंत त्यांचा पाठलाग केला; हाय हाय! ते रडून व ओरडून ह्मणतात कीं, हे परमेश्वरा, तुझी पूर्वींची दया कोठें आहे! हाय हाय, आह्मांस काय झालें.

בליל זה या रात्रीं माझे मंदिराचा नाश झाला व माझा वाडा जळाला, त्या या रात्रीं माझीं लेकरें रडून अक्रोश करितात; आणि इस्राएलाचीं सर्व कुटुंबें माझ्या दुःखामुळें चिंतन करितात, आणि ईश्वरानें जें जाळून टाकिलें त्याविषयीं रडतात. या रात्रीं अनर्थाच्या पांच कठोर गोष्टी मजवर आल्या; आमच्या पूर्वजांनीं पवित्र देशीं जाऊं नये असा त्याविषयीं ठराव झाला, त्याप्रमाणें त्यांस शासनहि झालें, पहिल्या व दुसऱ्या मंदिराचा ह्मणजे जुन्याचा व पुनः बांधलेल्या नव्याचाहि नाश झाला, व नांगरणारांनीं तें उखळून टाकिलें, आणि बित्तेर नगर जिंकलें जाऊन पारध्यांच्या फासांत तें सापडलें, या रात्रीं असें व्हावें असा

१ अश्शूराचा राजा शाल्मनेसार याणें, इस्राएलांचें राज्य घेऊन त्यांस पाडाव करून नेल्यावर बाबेल कूथा इत्यादि गांवचे लोक आणून इस्राएलांच्या देशांत वसविले ते. २ टीका १८.

परमेश्वराचा नियमच होता. या रात्रीं जी पीडलेली एकांतवासांत बसली आहे, ती दुःखानें शोक करिते, जशी कीं ती आजच आपल्या बापाच्या घरांतून हरण झाली आहे, आणि नाशकारक ज्वालेनें तिचें मंदिर भस्म झालें ह्मणून ती विलाप करून रडते; परंतु ते इंगळ व तो अग्नि परमेश्वराकडूनच निघालीं. या रात्रीं मला पाडाव करून नेलें, आणि माझ्या मंदिराचा नाश झाला; या महिन्याच्या नवमीस संध्याकाळच्या वेळीं मी येहोयारीबाच्या पहाऱ्यावर[1] पहारा करीत असतां, शत्रूनें आंत शिरून मोठा वध केला, आणि ईश्वराची आज्ञा नसतांहि त्यानें पवित्र मंदिरीं येऊन आपलीं अर्पणें[2] वाहिलीं.

מרי שנה प्रतिवर्षी या रात्रीं नेमिलेला विलाप होतो; कारण सत्यशील नगरी या रात्रीं विधवेसारखी झाली. या रात्रीं मी रडतों व शोक करितों, व माझें तोंड म्लान होतें, दिवसोदिवस मी शोकाची वाणी उचलितों. सर्व रात्रींपेक्षां या रात्रीं सर्व मंडळ्यांमध्यें शोक होतो, त्या कंपणाचा प्याला प्यालेल्या आहेत, सीयोनेचे मार्ग शोक करीत आहेत. याच रात्रीं खडकरूप आश्रयानें आपल्या क्रोधानें शासन करून मजवर अग्नीचे इंगळ ओतिले, त्यानें मजवर घातक घाय केले आहेत, त्याच्या झुंजुरक्याचे तारे अंधारमय झाले आहेत. दुःख व कष्ट पाहून ग्लान झालेला मनुष्य तो मीच, याच रात्रीं माझ्या दुष्टाईची फेड झाली, परमेश्वरानें मला भस्म केलें, दया केलीच नाहीं. याच रात्रीं बुरूज व गढी पायापासून कोसळण्याचा अपघात मजवर घडून आला, माझे सरदार खंदकांत पडले, अंधारानें त्यांस ग्रासिलें.

על זה היה דוה या (सर्व गोष्टींवरून) आमचें मन मूर्च्छित होतें, आणि आमच्या डोळ्यांवर झांक येती. आमच्या पवित्र नगराचा नाश झाल्यामुळें या रात्रीं आह्मी दुःख करितों, आमचें गायन पालटून शोक झाला आहे. आमची चमत्कारिक नगरी, जी ओस पडली आहे, तिजविषयींहि; तिच्या नेमशास्त्राकडे व आज्ञांकडे आमचे कान बंद पडले आहेत. आमचें मंदिर मोडलें ह्मणून आह्मी मोठ्या वाणीनें शोक

---

१ टीका १९. २ जसे अर्पणाकरितां पशु वधले जात असत, तशीं त्यानें मनुष्यें वधिलीं.

करितों; ज्या दिवशीं आमच्या लोकांचीं अगणित प्रेतें पडलीं, त्या दिवशीं आह्मावर हें काय आलें! हाय हाय! स्थंडिल व कोश हीं नाहींशीं झालीं, कारण (ईश्वरी) कोप फारच वाढला; परका आमच्या प्रभूच्या मंदिरीं मोठ्यानें ओरडला. शत्रूच्या जुलमामुळें आमची शक्ति नाहींशी झाली व गळून गेली, कारण आह्मी आपल्या शेजाऱ्यांस ह्मण व हसें झालों आहों. मेलेल्यांप्रमाणें आह्मी मनांतून विसरलों गेलों, शत्रु आह्मांस वधितो व तानितो; ह्मणून शत्रूच्या त्रासामुळें आह्मी देवाकडे ओरडतों, परंतु आह्मास कोणी उत्तर देत नाहीं. एकाएकीं हा अनर्थ आह्मांवर आला, आमची शक्ति थकली, आमच्या स्वामीचा क्रोध चेतल्यामुळें, जुल्मगाराचा हात आह्मांवर प्रबळ झाला आहे.

על יום חרבן पवित्र मानिलेल्या मंदिराच्या नाशाच्या दिवसाविषयीं, पवित्र नगराविषयीं, आणि पवित्र मंदिराविषयीं नवीन शोक उत्पन्न होतो. अहो सेफारादांतील पाडावांनो! मोठा आकांत करून रडा; आमचें मन तर अतिशय उडून जातें व थरथरतें; कारण पवित्र वस्तिस्थान आश्चर्यकारक रीतीनें नीचावलें आहे, आणि जसा पेंढा तुडवितात तसे परके त्यास तुडवितात. यावरून सर्वांचा जीव कुडींतून उडून जातो, आणि डोळ्यांतून अश्रु गळतात व वाहतात; केशेद, हाजो, पिलदाश व इदलाफ यांनीं दिलेल्या दुःखामुळें हर्षाबद्दल या रात्रीं शोक होतो. त्यांनीं विटलेल्या जीवानें व गर्विष्ठपणें जिवंत देवाच्या पुत्रांचा सूड घेतला; आणि यथार्थतेनें पवित्र झालेल्या पवित्र मंदिरास अग्नि लावून तें ओसाड करून ठेविलें आहे.

אוי כי ירד אש हाय हाय! कारण आकाशांतून येरूशालेमेवर अग्नि पडला; यासाठीं माझ्या डोळ्यांतून माझ्याडोळ्यांतून अश्रुधारा वाहतात. पवित्र वाडा कसा मोडला! हे आकाशांत वस्ति करणाऱ्या! तूं कोठपर्यंत रागावशील? राजकन्या तर दासी व उघड वेशा अशी झाली आहे. या आब महिन्यांत माझा सूर्य अंधारमय होतो; कारण या महिन्यांत आहारोन

---

१ इ. आमचीं. २ इ. आमचा हात दुर्बल झाला. ३ टीका २०. ४ केशेद, हाजो, पिलदाश व इदलाफ हे नाहोराचे पुत्र होते. ५ इ. उंच हातानें.

याजक मरण पावले[1] आणि सुंदर नगर यांतच दोन वेळ नाश पावलें. या रात्रीं मी अति दुःख करितों, ही प्रख्यात रात्र मला शोकाची रात्र झाली आहे; (इस्राएलांस) मिसरांतून काढणाऱ्या देवानेंच माझा नाश करविला आहे. तरी अनंत देव माझा प्रकाश पहांटच्या उजेडाप्रमाणें फांकवील; खडकरूप आश्रय दुष्टांवर आपला क्रोध चेतवील; आणि येरूशालेमेस निवडून घेणारा पुनः आपल्या लोकांस निवडून घेईल.

זכור יי ליהודה हे परमेश्वरा! येहूदा व ऐफ्राईम[2] ज्याचें रक्त येरूशालेमेभोवतालें पाण्यासारखें पाडलें, त्यांची आठवण कर. हे परमेश्वरा! ज्या अभिषिक्त[3] ह्मटलेल्याच्या शरीराची (शत्रूंनीं) चाळण केली, आणि ज्यामध्यें रुतला नाहीं असा एकहि तीर राहिला नाहीं,[4] त्याची आठवण कर; यास्तव मी त्याजविषयीं दुःखित मनानें रडतों, आणि या भंगामुळें सर्वांचें सामर्थ्य खचलें आहे.[5] हे परमेश्वरा! जे ऐशीं हजार अधिकारी इश्माएली लोकांकडे पळून गेले, आणि त्यांस पाहून त्यांनींही आपले तंबू मारिले, त्यांची आठवण कर; परंतु (त्या इश्माएली लोकांनीं) कांहीं अन्न व हवेनें फुगविलेल्या मसका बरोबर आणून त्यांत पाणी नसतां तान्हेच्या वेळीं त्यास पाजिलें.[6] हे परमेश्वरा! होमकरणाऱ्या याजकाच्या रक्तासाठीं राजरक्षकांच्या सरदारानें[7] ज्या बापांस व लेंकरास मारिलें आणि जसें पक्ष्यांस तसें त्यांस फासांत गुंतविलें,[8] त्यांची आठवण कर; या भंगाविषयीं (ऐकून) कान बहिरे होतात. हे परमेश्वरा! ज्या पतिव्रता विधवा बाईच्या सात पुत्रांस दुष्ट अन्यायी यावानाच्या राजानें मारिलें,[9] आणि जिनें शेवटीं स्वतांहि पडून प्राणत्याग केला, तिची आठवण[10] कर; यावरून सर्वांचीं आंतडीं कळकळतात. हे परमेश्वरा! जे

१ इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम वर्ष २४८७ पाहा. २ येहूदाच्या राज्यांतले व इस्राएलाच्या राज्यांतले लोक. ३ इर्मयाचा विलाप अ.४ ओ २० एथें अभिषिक्त हें नांव योशीया राजास दिल्हेलें आहे. ४. २ कालवृत्तांत अ ३५ ओं २३ यावरून हें लिहिलें आहे. ५ इ. सर्व हात अशक्त झाले आहेत. ६ टीका २१. ७ नेबुखादनेसाराचा सरदार नेबूझारआदान यानें. ८ टीका. २२. ९ या बाईची व तिच्या मुलांची गोष्ट संक्षेपांत पुढील בת עמי या गीतांत आणि माकाबीचें दुसरें पुस्तक अ. ७ एथें दिल्हेली आहे. १० इ. गळून पडली.

दहा वयस्क[1]जन आकाशांत वस्ति करणाराच्या नामाच्या पवित्रतेकरितां कठोर धन्यांच्या हातीं सांपडले, जे तरवारीस व अग्नीच्या ज्वालेस वाहिले गेले, आणि मेंढरांसारखे व बकऱ्यांसारखे सोलले गेले, त्यांची आठवण कर.

אליכם עדה קדושה अहो पवित्र मंडळींतील लोकहो! मी तुह्मांस कांहीं प्रश्न करितों. सर्व रात्रींपेक्षां आजची रात्र कशामुळें निराळी आहे? पेसाहाच्या रात्रीं आपण मस्सा व मारोर कां खातों? आतां या रात्रीं तर आपण धि:कारानें धालों आहों; यथार्थ व सरळ याच्या संतानाच्या झालेल्या वधावरून मी आक्रोशानें रडतों, आणि वेदना लागलेल्या प्रसवणारीसारिखी मी आपली वाणी उंचावितों. पेसाहाच्या रात्रीं (आपलें) मेज हर्षानें कां सिद्ध केलेलें असतें? आतां या रात्रीं तर आपल्या अपराधांमुळें (सर्व कडे) उच्छ्वासाची वाणी निघते; अरेरे! आमच्या पायांच्या तळव्यांस कोठेंच आधार मिळत नाहीं; हाय हाय! कारण संकट आलें, व त्यामुळें मी नृत्य वाद्येंहि विसरलों. पेसाहाच्या रात्रीं आपण धन्यवाद करून द्राक्षारसाचे प्याले कां पितों? आतां या रात्रीं तर आपण विलापाचें पुस्तक वाचितों; माझी वस्ती पाडावपणांत व माझें येणें विस्मयाच्या देशांत कसें घडलें! यास्तव अशाविषयीं मी आरोळीची वाणी काढितों. पेसाहाच्या रात्रीं आपण नेहेमीं हाग्गादा (ह्मणजे मिसरांतून निघण्याचें[2] वर्णन) कां वाचितों? आतां या रात्रीं तर आपण आक्रोश व शोक करितों; हाय हाय! कीं मी मेशेखांत वस्ती[3] करितों आणि झडतीचा वेळहि आला आहे; प्रिय नगरीकरितां व भजनालयांकरितां हाय हाय! पेसाहाच्या रात्रीं आपण नेहेमीं पूर्ण स्तुति कां करितों? आतां या रात्रीं तर आपण आरोळी, शोक व विलाप करितों; यांसाठीं कीं आपल्या अपराधांमुळें आपण आतां प्रार्थना करूं शकत नाहीं, कारण पवित्र मंदिर विटाळलें गेलें आणि देवालयांचाहि नाश झाला आहे. पेसाहाच्या रात्रीं "जीं राष्ट्रें तुला जाणत नाहींत, आणि जीं राज्यें

---

१ या दहा जनांचीं नांवें व त्यांच्या दु:खांचें वर्णन पुढील אלה אזכרה या गीतांत आहे. २ टीका २३. ३ हें वाक्य गीत १२० ओ. ५ एथून घेतलें आहे; व त्याचा अर्थ, मी अन्यायी व क्रूर लोकांत वस्ती करितों असा आहे.

तुझ्या नामानें हाक मारीत नाहीं, त्यांजवर तूं आपला राग ओत," हें गीत गायनानें कां ह्मणतों ? आतां या रात्रीं तर आपण विष, पित्तरूप विष, आणि कडूविष पीत आहों; हाय हाय! कारण हर्ष उणा होऊन सीयोनेचे मार्ग शोक करीत आहेत. अहो कोरड्या रानांत वस्ती करणाऱ्या लेंकरांनो! तुह्मी आपल्या पाडावपणांत शांतवन पावा; नीचत्वांतून मी तुह्मास उंचावीन, सीयोनेंतील पूजन (पुनः) स्थापीन, आणि माझा रंगमहाल बांधीन; मग तुह्मी हर्षानें आनंद कराल.

शाब्बाथ समाप्त होतांना तिशआबेआव असला तर
" שובה " बद्दल हें पुढील गीत ह्मणतात.

אוי כי קינה רבת हाय हाय! पुत्रांच्या व कन्यांच्याहि मुखीं अति शोक आहे; शाब्बाथाच्या समाप्तीस "प्रभु आमचा देव याची प्रसन्नता आह्मांवर होवो,"[1] हें वाक्य ह्मणणें बंद झालें आहे. शाब्बाथामध्यें व इतर दिवसांमध्यें भेद करितांना आह्मास कंप सुटून आह्मी आक्रोशाच्या वाणीनें रडतों कीं, कीर्तिमान सीयोन कशी छेदली गेली व कोमेली, अकस्मात ती कशी गडबडली, आणि पवित्र मंदिरीं कशा ज्वाला पडल्या! सर्व गायन पालटून हाय हाय, आणि सर्व नृत्य पालटून शोक कसा उत्पन्न झाला! अतिखेद होऊन अति वेदना लागल्या आहेत; ज्या दिवशीं मला अति त्रास झाला, त्या दिवशीं (द्राक्षरसाच्या) प्याल्यावरून पवित्रदिवस व सामान्य दिवस यांमध्यें भेद करणें नाहीं, माझ्या प्रिय विभागाप्रमाणें जें माझें पवित्र मंदिर तें परक्यानें आपलें वतन करून घेतलें आहे. अतिक्रमाची झडती होण्याच्या या रात्रीं संकटांत पडलेल्यांस व नाशपावलेल्या दुःखितांस सुगंधि झाडांचा वास घेण्याची मनाई आहे;[2] सुगंधी धूप दाखविण्याच्या वेळीं अन्य लोकांतील उन्मत्तांनीं त्यांस तुडविलें, आणि त्यादिवसापासून सर्वकाळ या दिवशीं शोक करण्याचें हेंच कारण आहे. (या शाब्बाथाच्या समाप्तीच्या वेळीं) "प्रभु आमचा देव याची प्रसन्नता आह्मांवर होवो." हें ह्मणण्याबद्दल सर्वांच्या

---

१ प्रत्येक शाब्बाथाच्या समाप्तीच्या वेळीं जी प्रार्थना करितात तिजमध्यें गीत ९० ओ १३ पासून गीत ९१ चे शेवटपर्यंत ह्मणावें लागतें, त्यामध्यें हें वाक्य आहे.
२ प्रत्येक शाब्बाथाच्या समाप्तीच्या वेळच्या प्रार्थनेनंतर जसा सुगंधि पदार्थांचा वास घ्यावा लागतो तसा.

मुखांतून दुःखाचे सुसकारे निघतात; डोळ्याच्या पुतळीप्रमाणें सांभाळलेल्या प्रियकरांस त्यांच्या कुरणांतून हाकून नेल्यादिवसापासून लोकांनीं भरलेलें नगर क्रोधाखालीं कसें राहिलें आहे!

शाब्बाथ समाप्त होतांना तिशआबेआब असल्यास
हें गीतहि ह्मणतात.

אני הגבר אקונן जो शोक करितो, आणि आजच्या रात्रीं आक्रोशानें रडतो, तो मनुष्य मीच; "प्रभु आमचा देव याची प्रसन्नता आह्मांवर होवो" हें वाक्य ह्मणण्याबद्दल "सोनें कसें निस्तेज झालें" हें वाक्य ह्मणतों. हा शाब्बाथ जो आब महिन्याच्या नवमीस (ह्मणजे तिशआबेआबच्या दिवशीं) आला आहे, तो समाप्त होतांना शोक करून मी मूर्च्छित होतों; हावदालाच्या प्याल्याबद्दलें मी विषाचा प्याला चोखितों; या रात्रीं शोक करावा असा कित्येक पिढ्यांपासून नियम चालू आहे, ह्मणून मी विलाप करितों, रडतों व निराश्रित होऊन बसतों, सुगंधि झाडांचा मी वास घेत नाहीं. माझ्या पापामुळें मला फारच क्लेश होतात; हे अग्नीपासून प्रकाश उत्पन्न करणाऱ्या! पवित्र नगर जळाल्यामुळें माझे कष्ट मजवर वाढले. हे पवित्र व अपवित्र यांमध्यें भेद करणाऱ्या! शाब्बाथाच्या समाप्तीच्या वेळीं मला हाय हाय; निश्चयें माझ्या मनाचा हर्ष बंद पडला, आणि माझे क्लेश वाळूसारखे वाढले. पाहा, शांतवन करणारा कोणी नाहीं, जुलूम करणारा दया करण्यापासून फिरला, आणि नाशाच्या आब महिन्याच्या नवमीपासून आह्मी पोरके झालों आहों, आह्मांस बाप नाहीं. आमचे पूर्वज अल्पविश्वासामुळें स्वर काढून रडले, त्यादिवसापासून[3] मला रडण्याचा आणि शोक व खेद

१ इर्मयाचा विलाप अ. ४ ओ. १. २ शाब्बाथाच्या समाप्तीच्या वेळच्या प्रार्थनेनंतर द्राक्षरसाच्या प्याल्यावर पवित्र दिवसामध्यें व व्यवहारिक दिवसांमध्यें भेद दर्शविण्याकरितां धन्यवाद करितात त्यास हावदालाचा प्याला असें ह्मणतात. ३ मोशेनें रानांतून पवित्र देश हेरायासाठीं जीं बारा मनुष्यें पाठविलीं होतीं, त्यांतून दहा जणांनीं त्या देशाविषयीं खोटें वर्त्तमान सांगितल्यावरून गणना अ. १४ ओ १ एथें लिहिल्याप्रमाणें जो व्यर्थ शोक केला, आणि मिसरांतून निघालेल्यांतून येहोशूवा व कालेब यांवांचून पवित्र देशांत कोणी जाणार नाहीं, हा देवाकडून जो नियम झाला, तो याच दिवशीं झाला.

करण्याचा नियम झाला आहे. आमच्या पूर्वजांनीं पाप केलें, आणि आतां ते नाहींत; तर त्यांच्या अपराधामुळें मीं दुःख भोगावें काय? हे आकाशांत वस्ति करणाऱ्या! बापांकरितां लेंकरांनीं मरावें काय? हे आमच्या देवा, तूं आपल्या दयेनें ऊठ, आह्मावर दया कर, आणि आमचा शोक पालटून हर्ष कर; हे प्रभू, पूर्ण मनानें आह्मी तुझ्या तारणाची वाट पाहात आहों. इस्राएलाचे पाडाव परतवून आणि सीयोनेकरितां उद्धारणारा पाठवून, तुजकडील तारणाची व उद्धाराची वाट पाहाणारे जे सीयोनेकरितां शोक करितात, त्यांचें शांतवन कर.

" ברוך אתה हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा! अग्निच्या ज्योति उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

या दिवशीं सुगंधावर धन्यवाद करीत नाहीं; परंतु हा तिशआबेआबचा उपास समाप्त होतांना प्रार्थनेनंतर द्राक्षरसाच्या प्याल्यावर בורא פרי הגפן आणि המבדיל בין קודש לחול हे धन्यवाद मात्र करितात.

אז בחטאינו पूर्वीं आमच्या पापांमुळें आमच्या पवित्रमंदिराचा नाश झाला, आमच्या अपराधांमुळें आमचें प्रसादस्थान जळालें; यावरून मजबूत बांधलेल्या नगरामध्यें[1] शोक चालला आहे[2], आणि आकाशांतील सैन्येंहि विलाप करितात. उंच आकाशीं याकोबाचे वंशं[3] रडतात, राशीहि अश्रू गाळितात, येशुरूनाच्या[4] झेंड्यांनीं आपलीं डोकीं नमविलीं आहेत, अगस्त्य व कृत्तिका यांची मुखचर्या अंधारमय झाली आहे. आमच्या पूर्वजांनीं विनवणी केली, परंतु देवानें जशी ऐकिलीच नाहीं, लेंकरेंहि ओरडतात, परंतु बाप त्यांस उत्तर देत नाहीं; शास्त्राची वाणीहि दुःखानें ओरडते, परंतु विश्वासू मेंढपाळ त्यांजकडे आपला कान लावीत नाहीं. पवित्र संतान गोणताट पांघरतें, आकाशांतील सैन्येंहि आपणांस गोणताटानें झांकून घेतात, सूर्य अंधारमय झाला आहे, चंद्रहि दिपला आहे, आणि ताऱ्यांचें तेज नाहींसें झालें आहे. (राशींतील) पहिला मेष खेदित जीवानें ओरडत आहे, कारण शेरडें वधायास नेलीं

१ येरूशालेमेमध्यें, या नगरास मजबूत बांधलेलें नगर असें गीत १२२ ओ० ३ एथें म्हटलें आहे. २ इ. बांधला आहे. ३ योसेफानें स्वप्नांत पाहिलेले तारे. ४ येशूरून हें नांव इस्राएलास अनुवाद अ० ३२ ओ० १५ अ० ३३ ओ० २६ इत्यादि अनेक ठिकाणीं दिलेलें आहे.

आहेत; उंच आकाशीं वृषभ राशीचा आकांत ऐकूं येतो, कारण गुरांतील ज्येष्ठ यांचीं शिंगें नमलीं[१] आहेत. मिथून राशीचे तारे खेदानें पीडित आहेत, कारण बांधवांचा वध होऊन पाण्यासारखें रक्त वाहत आहे; कर्क राशी भूमीवर पडूं पाहते, कारण आह्मी तृषेनें व कोरडेपणानें मूर्च्छित झालों आहों. सिंह राशीच्या गर्जनेनें आकाश थरथरतें, कारण आमचें ओरडणें आकाशावर चढलें आहे; तरणे व तरण्या हीं मारलीं गेलीं यामुळें कन्या राशीचें तोंड काळें पडलें आहे. तूळ राशीचीं पारडीं उलटलीं आहेत, तिची करुणा यावी ह्मणून ती काकुळती करिते, कारण आमच्या जीवनाच्या पारड्यापेक्षां मरणाचें पारडें भारी झालें आहे; वृश्चिक राशीस भय व कंप यांनीं व्यापिलें आहे, कारण आमच्या शत्रूंनीं आह्मास विंचवांमध्यें बांधून टाकिलें आहे. धन राशीचें मुख मागें वळलें आहे, कारण आमच्या खडकरूप आश्रयानेंच आह्मावर शत्रूप्रमाणें धनुष्य ताणिलें आहे; आमच्या डोक्यावरून पाणी वाहातें ह्मणून कुंभ राशी मोठ्यानें ओरडते, आणि घडे भरलेले असतांहि आमचा घसा कोरडा पडला आहे. मकर राशीच्या शोकाची वाणी ऐकण्यांत येते, कारण होम नाहींसा होऊन कोंकरूं व दोषहारक यज्ञाचा बोकड यांचा समूळ नाश झाला आहे; मीन राशीस कंप व थरथराट सुटला आहे, कारण आह्मी माश्यासारखे वाईट जाळ्यांत सांपडलों आहों. हे सर्वसमर्था! आमचे कष्ट पाहून आह्माकडे आपल्या दयेनें फीर, आमचे अपराध दडपून टाक, आणि आमचें पवित्र मंदिर बांध, ह्मणजे आह्मी आपल्या डोळ्यांनीं पाहून आमचें मन हर्षित होईल.

עד אנא सीयोनेकरितां आह्मीं कोठपर्यंत रडावें, आणि येरूशालेमेकरितां कोठपर्यंत खेद करावा! तूं फिरून सीयोनेवर दया कर, आणि येरूशालेमेचीं गांवकुसें बांध.

עורה נא ימינך आतां तूं आपला उजवा हात उंच उभार, आणि तुझ्या क्रोधास पात्र झालेलीस शांतवन पावलेली असें ह्मण; मग खेदित भिकारीण पीडलेली व तळमळणारी भिकारीण शांतवन पाव-

१ शिंगांचें उभारणें ही थोरपणाची व नमणें ही नीचपणाची ह्मण आहे.
२ इ. टाळा.

लेली अशी ह्मटली जाईल. आतां तूं आपला आटोपून धरलेला हात उभार, आणि तुजकडील तारणाचा वेळ कळीव; मग एकांतवासांत पडलेलीं, पीडलेलीं व तळमळणारीं शेरडें शांतवन पावलेलीं अशीं ह्मटलीं जातील. हे परात्परा ! आतां तूं आपला उजवा हात उभार, आणि दयेनें सीयोन नगरी बांध; मग दीन व दरिद्री लोकांस परमेश्वरानें सीयोनेचें शांतवन केलें आहे असें ह्मटलें जाईल. हे देवा ! आतां तूं आपला उजवा हात उभार, आणि दयेनें इस्राएलांस खंडून घे; मग तुजपुढें मागणाऱ्या दीनास सीयोनेचा उद्धरणारा आला आहे, असें ह्मटलें जाईल.

या नंतर ואני זאת हें वाक्य सोडून ואתה קדוש आणि सुतक्यांचा קדיש דהוא עתיד ह्मणून प्रार्थना पूर्ण करितात. मग दिवे मालवून हाज्जान भुमीवर बसून हें पुढील ह्मणतो.

אחינו בית ישראל अहो इस्राएलाचे घराण्यांतील आमचे बांधवहो! ऐका; आपल्या पवित्र व वैभवाच्या मंदिराचा नाश होऊन आज एक हजार आठशें—वर्षें झालीं;[१] आपल्या डोईवरील मुगूट पडला आहे; हाय हाय! कीं, आपण पाप केलें.

על היכלי माझ्या मंदिराकरितां लागलेल्या वेदना मला सर्पासारख्या दंश करितात; आणि सीयोनेच्या नाशामुळें मी अंधारांत बसलों आहें. ज्या दिवशीं माझी ज्योत अंधारमय झाली, त्या दिवशीं माझा दिवा विझाला, जें माझें नगर लोकांनीं भरलें होतें, त्याचा विध्वंस झाला त्या दिवशीं, त्या रागाच्या व कोपाच्या दिवशीं सर्वत्र अंधार होतो. मी आपल्या सुंदर वाड्याकरितां दुःखानें थक्क होऊन बसलों आहें, नायक व आज्ञा करणारो येण्याची मी नित्य वाट पाहात आहें; आणि उजेडाची आशा करितों, परंतु पाहावें तर अंधारच. मी आपला बिछाना काळोखांत ताणितों; शोक व विलाप यांतच माझा हर्ष झालेला नाहीं काय ? देवानेंच मजकरितां हा बिभाग ठेविला आहे; आणि माझ्या मार्गावर

---

१ हें टैटसाच्या हातून झालेल्या येरुशालेमेच्या दुसऱ्या नाशाचें वर्ष. हा नाश इसवी सन ६८ मध्यें झाला. नेबूखादनेसाराच्या हातून जो पहिला नाश, तो इसवी शकाच्या ४२२ वर्षांपूर्वीं झाला. इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम वर्ष ३३३८ व वर्ष ३८२८ पाहा. २ माशीयाह.

अंधारच आहे. पराक्रमी व गौरववान देवच माझ्या घावांस आरोग्यता पाठवील, जो प्रकाश करणारा तोच माझा प्रकाश पहिल्याप्रमाणें प्रज्वलीत करील, तोच माझा दीपक उजळील, आणि त्याच्या प्रकाशापुढें अंधार नाहींसा होईल.

प्रार्थनेनंतर दुःखानें व खेदानें घरीं जावें आणि एकमेकास सलाम करूं नये, कोणी बेसमज असल्यास त्यास हळू शब्दानें उत्तर द्यावें.

तिशआबेआबची पाहांटेची प्रार्थना.

ही प्रार्थना सीसीथीवांचून व तेफीलीनीवांचून करितात, आणि नित्याप्रमाणें कीर्त्तनाचा भाग वाचितात; परंतु למנצח מזמור לדוד השמים מספרים गीत १९ याबद्दल האזינו गीत १३७ आणि על נהרות בבל निर्गम अ. १५ ओ० १—१९ बद्दल אז ישיר अनुवाद अ० ३२ ओ० १—४३ वाचून השמים पर्यंत नित्याप्रमाणेंच प्रार्थना करितात परंतु ארני שפתי संध्याकाळच्याप्रमाणें वाचून तोच भाग पुनः मोठ्यानें वाचितांना נקרישך बद्दल हा पुढील भाग ह्मणतात, आणि पुढें उपाध्यांनीं आशीर्वाद देण्यासंबंधी जो भाग आहे तो ह्मणत नाहींत.

נקדש את שמך जसें वर आकाशांत, जें तुझ्या भविष्यवाद्याच्या हाताकडून लिहिलें आहे, कीं ते एकमेकाला मोठ्यानें बोलत ह्मणाले "पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवानें भरली आहे." याप्रमाणें तुझें नाम पवित्र मानितात, तर या तुझ्या पृथ्वीमध्यें आह्मी तें पवित्र मानितों, त्यांचे जे असतात, ते स्तुति करून असें ह्मणतात कीं त्यांच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. आणि तुझ्या पवित्र वचनांमध्यें असें लिहिलें आहे कीं "परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो; हे सीयोने, तुझा देव पिढोपिढीं आहे; तुह्मी परमेश्वराला स्तवा.

मोठ्यानें ארני שפתי पूर्ण झाल्यावर पुढील ह्मणतात.

וארץ שפל רומי माझा थोरपणा पडून धुळीस मिळाला, माझा, मानभंग झाला, माझा जीव मातीशीं मिळाला, आणि माझा हात आखूड झाला आहे. जेव्हां मी आपलीं दुःखें आठवितों, तेव्हां माझ्या हृदयांत लाटा भरून येतात, आणि अग्नीचे इंगळ पेटतात. हे परमेश्वरा! तूं मजवर ढालरूप असतां, माझा आश्रय नाहींसा होईल काय? आणि पाउलें संकोचित होतील काय? सैन्याच्या मोठ्या सरदारानें मजविरुद्ध

लढाइची सिद्धता केली, त्यानें माझ्या गौरवाचें तेज विटाळलें, मोडलें, आणि तुडविलें, ह्मणून आज दिवस, जो पांचव्या महिन्याचा नऊवा दिवस त्यास मी उपासाचा दिवस ह्मणत नाहीं काय! आणि लोकांस बोलावून मी सभा करीत नाहीं काय!

בחדש החמישי या पांचव्या महिन्यांत माझ्या वसतीस्थानाचीं द्वारें शोक व विलाप करितात; आणि या महिन्याच्या नवमीस माझे डोळे अंधुक व मंद होतात. सिंहाच्या राशीमध्यें सिंह गर्जतो, या दिवशीं जेव्हां देवाच्या उंचस्थानावर सिंह ओरडतो, तेव्हां माझे कान ठणकतात. हे परमेश्वरा! मला नीच करायास तूं अतिक्रोधायमान होऊं नको; आणि मला दोषी ठरविण्याकरितां तूं माझे अपराध कधींच आंठवूं नको. हे माझ्या ढालरूप आश्रया व माझ्या तारणाच्या शिंगा! तूं आपल्या वसतीस्थानांतून माझ्या अरोळीची वाणी ऐक.

ירדתי לתחתיות मी खोल खांचेच्या तळास पोहोंचलों, माझी आशा बुडाली, माझा शोभायमान मुगूट व माझ्या कपाळावरील फूल हीं गेलीं, न्याय शिकविणारे गेले ह्मणून माझा मार्गहि वांकडा झाला आहे. मी आपल्या खडकरूप आश्रयास धिक्कारलें असें तो ह्मणतो ह्मणून माझा चंद्र मावळला आहे; शोकानें मजपुढून गायनाचे नियम काढून टाकिले आहेत, आणि माझ्या जीवाचें जीवन त्यांतच होऊन राहिलें आहे. माझ्या अति अशक्ततेमुळें माझा जीव नाश पावतो, माझें आयुष्य खुटतें, जळजळाटानें मला व्यापिलें, मी आपल्याच फांसांत सांपडलों, प्रतिवर्षीं पांचव्या महिन्यांत मी रडणें व शोक चालवितों, आणि माझा जीव विलापाचें ध्यान करितो.

בחדש החמישי पांचव्या महिन्यांत माझ्या सामर्थ्याचा कमरबंद तुटून त्याचे तुकडे झाले. या महिन्याच्या नवमीस जसें खळें मळणीच्या वेळीं, तुडवितात तसा मी तुडविला जातों. सिंहाचे राशींत जेव्हां सिंह आपल्या झाडींतून त्यांजवर चढून आला, तेव्हां त्यानें माझे लोकांस ओढून ताणून विदेशी केलें. तो आपल्या झाडींतून चढून आला, आणि विषाचा प्याला त्यानें मला पाजिला. त्यानें मला खाऊन फस्त

1 मुख्य याजकाचा.

केलें, आणि फांसांत गुंतविलें. हे मारणाऱ्या व जीवंत करणाऱ्या, खोलस्थानीं उतरणाऱ्या व त्यांतून वर चढविणाऱ्या! विषाच्या प्याल्यामुळें जे मूर्च्छित पडले आहेत, त्यांस आतां तूं सजीव कर.

רוק ותוג רעשו राष्ट्रांमध्यें जी श्रेष्ठ ती ज्या दिवशीं विधवेसासारखी झाली, (त्या दिवशीं) आकाश व पृथ्वी हीं कांपलीं, ढगामुळें मजवर काळोख पडला, प्रकाशाच्या सर्व ज्योति आणि सूर्य व चंद्र हेही अंधारमय झाले. सत्यशील मनुष्यें ठेंचलीं जाऊन मूर्च्छित होऊन पडलीं; यास्तव मी प्रतिवर्षी "नीतीनें भरलेली नगरी व्यभिचारिणी कशी झाली?" असें ह्मणून आक्रंदन करितों. सर्व पृथ्वीमध्यें संतोषकारी सुंदर डोंगरावरील दावीदाची राहण्याची नगरी इजमधील लोक नाश पावले व मोडले आहेत, आणि ह्मण व हंसें असे झाले आहेत; तिजमधील सर्व लोक कण्हत आहेत, त्यांस कोठेंच दया सांपडत नाहीं; तिचे सर्व वीर बलात्काऱ्यांच्या तरवारी पुढें कुंठित झाले. याखीन व बोआर्ज हे आरावनाच्या खळ्यांतूनं[3] मुळांतून उपटले गेले, शेखीनां[4] राहण्याचें ठिकाण परक्यांनीं तुडविलें व तेथें ते गर्जतात.

שכינה צועקת शेखीना अरोळी करून ओरडतो, कीं, अहो लेंकरांनो! वाईट करणें सोडा; कारण पाय ताणायास खाट न पुरे एवढी आखूड झाली[5] आहे. जेव्हां गर्विष्ठांनीं माझ्या वसतीस्थानांत मूर्त्ति शिरविल्या, तेव्हां आंतील जें पवित्र स्थान तेथून शेखीना निघाला, आणि ह्मणाला कीं, ते आपलें पातक अंगीकारीत आणि माझें मुख शोधीत, तोंपर्यंत मी आपल्या राहण्याच्या ठिकाणीं परत जातों. तो मंदिरांतून चढून एका करूबावर बसला; आणि त्यानें लोकांस आकाशांतील राशींस व नक्षत्रांच्या सैन्यास नमन करितांना पाहिलें; तेव्हां तो ह्मणाला कीं, या आपण (ईश्वराकडे) फिरूं, असें ते ह्मणत तोंपर्यंत मी आपल्या स्थानीं परत जाईन. तो त्या करूबावरून वळून दुसऱ्या करूबावर जाऊन बसला, मग त्यानें त्यांचीं तोंडें पूर्वेकडील दरवाज्या-

१ गीत ४८ ओ. ३ एथें हें नाम सीयोन नगरास दिल्हें आहे. २ टीका २४. ३ टीका २५. ४ ईश्वरी साक्षात्कार. ५ पवित्र मंदिरीं मूर्त्तींस, जागा न पुरे एवढी दाटी झाली आहे.

कडे पाहिलीं, तेव्हां तो ह्मणाला कीं, ते आपल्या संकटांत मनापासून मला शोधीत, तोंपर्यंत मला रानांत कोण नेईल? तो त्या करूबावरून मंचकाच्या उंबऱ्याकडे फिरला; आणि त्यांनीं देवाच्या मंदिराकडे पाठ केली, असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां तो ह्मणाला कीं, ते देवाचें वचन शोधायास फिरत, तोंपर्यंत मी आपल्या सैन्यास सोडून जाईन. मग तो उंबऱ्यावरून निघून अंगणांतील चौकांत गेला; आणि त्यांस घाणेरडा वास सोडितांना पाहिलें, तेव्हां तो ह्मणाला कीं, हे देवा, झोपीं कां जातोस? ऊठ; असें ते ह्मणत तोंपर्यंत मी आपलें मुख त्यांजपासून लपवीन. शेवटीं तो रागानें त्या अंगणांतून गच्चीवर चढला; आणि त्यानें त्यांस आकाशांतील सैन्याकडे ध्यान करून प्रदक्षिणा करितांना पाहिलें;[१] तेव्हां तो तें पवित्र स्थान सोडून निष्ठुरपणें ह्मणाला कीं, भांडखोर स्त्रीबरोबर राहण्यापेक्षां गच्चीच्या कोंपऱ्यांत जाऊन बसणें बरें आहे.

בת ציון שמעתי मी सीयोनेचे कन्येस दुःखाचे उद्गार काढितांना ऐकतों; हाय हाय! मीहि तोच प्याला पितों व त्यांतील गाळ चोखितों. अगे सुंदरी! जशी कुमारी गोणताट नेसून आपल्या तरुणपणाच्या नवऱ्याकरितां आकांत करिते, तशी शेखीनाचा प्रकाश अंधारमय झाला आहे, ह्मणून तूंहि आकांत कर. हे लबानोनाच्या अरण्या! शोक कर, कारण अग्नीनें तुझे गंधसरू भस्म केले आहेत; सीयोनेचे दरवाजेहि विलाप करितात, कारण देवानें तिचा विध्वंस केला आहे; अंगण (राखेंत) लोळतें, कारण होम बंद पडला आहे; न्यायसभेची कोठडीहि विलाप करिते, कारण तिजमधील न्यायसभा नाहींशी झाली आहे. (पवित्र) मंदिरांतील कोठडी रडून ह्मणते, अहारोनाच्या संतानाकरितां हाय हाय! त्यांतील अतिपवित्रस्थान ह्मणतें कीं, कोश गडद झाला. ह्मणून हाय हाय! पडदा ओरडून ह्मणतो, माझ्या ठिकाणाचें महत्त्व राहिलें नाहीं, कारण जुलुमगारानें त्याच्या गुप्त गोष्टी पाहून उघड केल्या आहेत. धुपाटणें शोक करून ह्मणतें, सुगंध कोठें आहेत?

---

१ ईश्वरी साक्षात्कार राहण्याचें पवित्र ठिकाण मंदिराच्या पश्चिमेस होतें त्याकडे पाठ फिरवून आणि पूर्वेकडे आपलीं तोंडें करून पूर्वेस उगवणाऱ्या सूर्यास नमन करतांना पाहिलें.

ऊरीम व थूम्मीम[1] यांकरितां आहारोनाची छाती फाटते; वेदि होमाकरितां व शांतीकारक यज्ञाकरितां थरथरून ह्मणते कीं, पूजनाचा प्रकार वेळेवर कां सिद्ध होत नाहीं! माझें गायन कोण गाईल? असें ह्मणून लेव्याचा विणा रडतो; त्यास शुद्ध दिव्याचें झाड उत्तर करितें कीं, माझे दिवे कोण पेटवील! पडदे कोण ताणील! याविषयीं राहुटि खेद करिते; आणि शास्त्राचा प्रकाश बंद पडला ह्मणून तें कांपतें. दर्शनीय भाकरी रचायास कोणी नाहीं, ह्मणून मेज थरथरतें; पूजन कसें बंद पडलें! असें ह्मणून याजकपण ध्यानस्थ बसलें आहे; आणि या सर्व गोष्टींकरितां माझ्या लोकाची कन्या अश्रुधारा गाळिते, कारण तिच्या शत्रूनें तिचे सर्व सरदार पाडाव करून नेले आहेत. हे खडकरूप आश्रया, तुझ्या प्रसन्नतेच्या दिवसाची तिनें कोठपर्यंत वाट पाहावी? परक्याच्या हातीं गुंतलेल्या चिमणीसारिखी ती आहे, तिजला सहाय्य करणारा व आश्रय देणारा कोणी नाहीं, खडकावरील मळ्याच्या फांद्या सुकण्यापूर्वीं तूं ऊठ; ज्या त्याग केलेल्या द्राक्षमळ्याचीं कुंपणें तूं मोडिलींस त्यास दर्शन दे.

רממו שרפים ज्या दिवशीं न्यायाच्या निवाड्यावर मोहोर होऊन तो अमलांत आला, त्या दिवशीं सेराफीम दूतांनीं कीर्त्तन करणें बंद केलें; हाय्योथ व ओफन्निम दूत पाहाऱ्यावर स्तब्ध राहिले, आणि शांतीच्या दूतांनीं रडून आकांत केला. ज्योति उगवतांना अंधारमय झाल्या, आकाशांतील सैन्यानें आपणास गोणताटानें झांकून घेतलें, हाय्योथ व त्या समोरील ओफन्निम दूतहि शोकानें रडतात. ज्या दिवशीं परक्याचा हात पवित्र ठिकाणावर बळावला, आणि अग्नीनें मंदिरांत व अति पवित्र ठिकाणीं नाश केला, त्या दिवसापासून हाय्योथ दूतांचे दोन पंख गळून पडले, ह्मणून मी एकांत बसून शोकप्रद गीतें रचितों. हे प्रियकरा! तूं आपल्या वसतीस्थानाकडे केव्हां फिरशील, आणि बापांचें मन लेंकरांकडे केव्हां फिरविशील? तेव्हां सत्यशीलांचे कोंबे[2] हर्ष करून तुझा सन्मान करतील; आणि हाय्योथ व ओफन्निम दूत तुला पवित्र मानितील. परंतु आतां से-

---

१ प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग २ टीका १ पाहा. २ आब्राहाम, इसहाक व याकोब यांचें संतान.

राफीम दूत वक्तृत्वानें, ओफन्निम दूत कीर्त्तनाच्या वाणीनें, आणि शांतीचे दूत रडून आकांत करितात, आणि त्यांच्या मनांत उकळ येऊन ते ओरडतात; आणि एकमेकांस हाक मारून ह्मणतात.

בחדש החמשי पांचव्या महिन्यांत (मोशेच्यावेळीं) हेरांनीं खोटा मजकूर प्रगट करण्याविषयीं विचार केला; तेव्हां त्या महिन्याच्या नवमीस शोक व वादाची वाणी ऐकूं आली. सिंहराशींत त्यांचे हात अशक्त झाले, आणि त्यांस आरोग्य सांपडलें नाहीं; आळशी ह्मणाला, मार्गांत सिंह आहे, रस्त्यांत त्याचें पिलूं आहे. रस्ते हाय हाय, शोक व आकांत यांनीं भरले आहेत, लेंकरें व तान्हीं खडकावर विखरलीं आहेत; तर हे पवित्रा, इस्राएलांच्या स्तुतींत वास करणाऱ्या! आरीएलाच्या समुदायाशीं कुंठित मनुष्यासारखा तूं कां वागतोस?

בחדש החמישי पांचव्या महिन्यांत अग्नीच्या इंगळासारखे तीर त्यांनीं आमच्या हृदयीं मारले, या महिन्याच्या नवमीस आमचा जीव घाबरून खेदित झाला आहे; सिंहराशींत सिंह समुद्राच्या व नदीच्या गरजण्यासारिखा गरजतो, ती सिंहाचीच गर्जना व त्याच्या पिलाचीच ओरड आहे; त्या पिलानें झडप घालून माझा उंच बांधा छेदला व त्यानें मला खाऊन फस्त केलें आहे; माझ्या मिष्टान्नानें त्यानें आपल्या पोटाची खाखाई पुरविली; हे अनंता, मनुष्यास बुद्धि शिकविणाऱ्या देवा! तूं आपला बाहु उघड आणि गौरवानें प्रगट हो.

בחדש החמישי पांचव्या महिन्यांत रस्तोरस्तीं हायहायची ओरड झाली, या महिन्याच्या नवमीस नाशावर नाश झाले; सिंहराशींत धुमसणें, शोक, विलाप व भय हीं एकदांच येऊन पडलीं; मग सिंह गर्जला तर कोण भिणार नाहीं! तीक्ष्ण तीरांचा भडिमार झाला असतां कोण भिणार नाहीं! ते सिंहाच्या पिलासारखे असून आस्वलाप्रमाणें गर्जतात; तर दुःखितांकरितां तुझ्या दयेच्या पुरास धैर्य येऊं दे; आणि "अहो विपरीत वर्त्तनाच्या लोकांनो! फिरा;" असें जें तूं विपरीत वर्त्तणाऱ्यांस ह्मटलें आहेस, त्याप्रमाणें तूं आमचा वावगेपणा निटाव.

---

२ गणना अ. १३ व १४ पाहा. १ पहिल्या मंदिराचा, दुसऱ्या मंदिराचा व बित्तेर शहराचा नाश हे याच महिन्यांत व याच तारखेस झाले.

אֵךְ זֶה הַיּוֹם निश्चयें, माझ्या ऋणाची झडती होण्याचा दिवस तो हाच; या दिवशीं माझ्या चोहोंकडे शोकच ऐकण्यांत येतो; कारण या दिवशीं शत्रु प्रबळ झाला, आणि सिंहिणीसारखा विदारूं लागला. माझे संकल्प व माझे मनोरथहि मोडले. नाशाच्या दिवशीं लुटारू आला, आणि त्याचीं मुळें वाढलीं; माझ्या शोभायमान मंदिराचे दरवाजे अग्नीच्या ज्वालांनीं भस्म झाले; त्यांतील राजेरजवाडे अन्य लोकांमध्यें शत्रूच्या तरवारीनें वधले गेले; याकरितां त्याची भिंत व त्याचे कोट शोक करून मूर्च्छित पडलीं आहेत. गर्वानें हर्ष करणारांनीं माझें पवित्र मंदिर नासिलें; त्यांनीं मला खाऊन फस्त केलें, माझ्या सर्व सुंदर वस्तु संपविल्या, मला फाडितांना न थांबतां जो सूड त्यांनीं उगविला, तो (हे देवा,) त्वां पाहिला; कां तर त्यांनीं याकोबाला खाल्लें, आणि त्याची वस्ति ओसाड केली आहे. आस्वलानें[1] द्वारें तुडविलीं व कोट मोडिले; जी परगण्यामध्यें मुख्य होती, तिला ओसाड करून टाकिली आहे; तिचे याजक रागानें, क्रोधानें व संतापानें वधले गेले; बाहेर तरवार, आणि खोल्यांमध्यें भय व्यंग करिते. सीयोनेचीं लेकरें संकटसमयीं ह्मणतात कीं, जरी देवानें आपला हात आह्मांवरून आटोपून धरिला आहे, तरी तो दया करण्यास विसरला काय? संकटीं त्वां दयेचीं द्वारें बंद केलीं ह्मणून तिचीं तान्हीं शत्रूपुढें पाडाव होऊन गेलीं आहेत; तुझ्या पवित्र वस्तिस्थानीं यावानी लोकांचीं सैन्यें आलीं; तुझा पवित्र वाडा, जें आमचें आश्रयस्थान, तें त्यांनीं विटाळलें; ज्याविषयीं त्वां आज्ञा केली होती कीं, त्यानें तुझ्या मंडळींत येऊं नये, त्या दुष्टांनीं तुझ्या स्तुतीचें मंदिर भ्रष्ट करून टाकलें आहे. सीयोन ह्मणते मला हाय हाय! कारण सर्व समर्थानें मला अन्हेरिलें आहे, माझे छळणारे चढले आहेत; माझ्या कुमाऱ्या पाडावपणांत गेल्या, आणि माझीं तान्हीं आपटून मारलीं गेलीं; हे माझे शब्द लिहिले जाते तर किती बरें! याप्रमाणें माझ्या पवित्र स्थानाचा नाश होत असतां, व माझे अडसर मोडले असतां; माझ्या पाडावपणाच्या देशांत मी कोठपर्यंत कैदेंत राहावें? अहो माझे मित्र व बंधु हो! माझ्या दुःखासारखें (दुसऱ्या कोणाचें)

---

१ शत्रूनें.

दुःख आहे काय ? माझा बाप जीवंत असतांहि मी पोरकी झालें आहें. हे दयावंता ! तुझें वतन ओसाड, विखरलेलें व त्यागानें परक्याच्या हातीं कोठपर्यंत राहील ? हे सर्वसमर्था ! तिच्या शोकाकडे दृष्टि लाव, आणि तिच्या कण्हण्याकडे कान लाव. हे परमेश्वरा, आह्मांस तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मीं फिरूं.

गीत ७९.

" עַד מָתַי " हे परमेश्वरा, शत्रूनें तुझें प्रार्थनामंदिर जाळिलें व तुझ्या करारार्चीं लेंकरें वधिलीं; ह्मणून तुझ्या मंडळीनें या दिवशीं तुजकडे कोठपर्यंत शोक करून ओरडावें ? हे देवा, राष्ट्रें तुझ्या वतनांत शिरलीं आहेत. हे परमेश्वरा, तुजवर उठणारांची गर्दी, तुझ्या मंदिराचा नाश, आणि तुझे लोक जे तुजकरितां जुल्म सोशितात, आणि तुझ्या नामाकरितां वधले जातात, त्यांचें विखरणें तूं कोठपर्यंत विसरशील ? आणि तुझे लोक जे तुझ्या घराच्या नाशाविषयीं खेद करितात, त्यांची प्रार्थना तूं रागानें कोठपर्यंत नाकारशील ? ज्या बलात्काऱ्यांनीं याकोबास[1] खाल्लें व सर्वदा त्यांस लुटिलें, ते कोठपर्यंत प्रबल होतील ! मी त्यांचें कल्याण इच्छितों, तरी ते माझ्या टाळूवरील केंस उपटतात व कातरतात, धिक्कारानें माझ्या गालावर मारितात, आणि खोट्या ओंठांनीं कुटिलपणा करितात; हे परमेश्वरा, दुष्ट कोठपर्यंत हर्षित होतील ? तुझा सेवक तुझ्या दासीचा पुत्र यानें पाडावपणांत कोठपर्यंत ओरडत असावें ? हे परमेश्वरा, मी खाटिकवाड्यांत कोठपर्यंत वस्ति करावी ? आणि कोठपर्यंत भट्टीच्या व चुलीच्या मध्यें पडून राहावें ? त्यामुळें माझे डोळे अंधूक झाले आहेत; पेटलेला अग्नि संध्याकाळीं, सकाळीं व दुपारीं माझ्या पाठीं लागला आहे; दोनवेळां झालेल्या नाशामुळें मी कोठपर्यंत विस्मित राहावें ? तूं येरूशालेमेवर कोठपर्यंत दया करणार नाहींस ? तुझ्या कुरणांतल्या शेरडांच्या शेषानें कोठपर्यंत खेद करीत असावें !

אֵיכָה צֹאן הַהֲרֵגָה वधावयास काढलेलीं शेरडें गोठणीवरून कशीं विखरलीं ? त्यांच्या तोंडांवर काळी मस जमली आहे; तीं चिखलांत लोळतात; उघड्या रस्त्यावरहि त्यांस पाहणारांच्या नजरेस तीं ओ-

१. याकोबाच्या संतानास.

ळखूं येत नाहींत; त्यांचें मुखतेज कोळशांपेक्षां काळें पडलें आहे; त्यांस आळ्यांत कोणी ओळखीत नाहीं. शोक करणें आणि शहामृगास भाऊ होऊन राहाणें, आणि तंतुवाद्यें व इतर मंगलवाद्यें यांबद्दल दवडलेल्या पारव्यांकरितां व घरोब्यांतून नेलेल्या त्यांच्या पिलव्यांकरितां शोक व विलाप करून ध्यान करित बसणें मला शोभतें; तीं शुभ्र पांढऱ्या वस्त्रांवर पाळलेलीं होतीं, परंतु आतां तीं भुकेनें मरतात; मिष्टान्नें खाणारीं आळ्यांत नाश पावतात. ज्या दिवशीं तरवार दुयम उपाध्यांवर येऊन पोंचली, आणि अग्नि पेटून भस्म करूं लागली, तेव्हां ते ओरडले, परंतु कोणीच उत्तर दिल्हें नाहीं; त्यांतून कांहीं अग्नीमध्यें पडले व कांहीं शत्रूच्या तरवारीनें पडले; त्यांनीं जाणलें कीं, झुडपांत वस्ति करणाराकडूनच[2] याप्रमाणें ठराव झाला आहे, आणि ह्मणूनच पवित्र मंदिराचे दगड सर्व आळ्यांमध्यें विखरले आहेत. बालकें नागवीं, भुकेलीं व अनवाणीं फिरतानां सांपडतात, भाकर कोठें आहे असें तीं विचारतात. आणि तान्हेनेंहि व्याकुळ होतात; त्यांस कैद करून नेणारांची तीं काकळूत करितात, तरी त्यांस भाकर सांपडत नाहीं, तीं आपल्या उत्पन्नकर्त्याच्या दयेची आशा करितात, तरीहि तान्हीं आळ्यांच्या चवाठ्यांत भुकेनें मूर्च्छित होऊन पडतात. देवानेंच आपलें धनुष्य ताणून आज्ञावर हें सर्व रचिलें आहे, शत्रूनें ज्यादिवशीं आरंभ करून पूर्ण नाश केला, तेव्हां काकळूत करणारांच्या वाणीस उत्तर देणारा कोणी नव्हता, लेंकरांनीं मेंढ्याप्रमाणें आपल्या माना लांबवून माना मोडणाराच्या हातीं दिल्ह्या; पवित्र मंदिरांचे सर्व चवाठे त्याच्या भक्तांच्या रक्तानें भरले, आणि आबालवृद्धांचे मुडदे चवाठ्यांत भूमीवर पडले. हे देवा ! फीर; कोठपर्यंत तूं आपला क्रोध त्यांजवर पाठविशील ? त्यांचीं पापें तूं कोठपर्यंत क्षमा करणार नाहींस ? त्यांजकडे तूं आपले तीर कोठपर्यंत लाविशील, आणि त्याच्या काळजास कोठपर्यंत भोंकें पाडिशील ? हे देवा, शेतांवर पाऊस पाडणाऱ्या ! भादरलेल्या नाझीरांच्या[3] विटाळास शुद्धता पाठीव.

---

१ शहामृगासारखें एकांतवासांत राहाणें. २ मोशेला पहिल्यानें होरेब डोंगरावर झुडपांत दर्शन देणाऱ्या देवाकडून. ३ नाझीर ह्मणजे ज्याच्या डोईवर जन्मापासून केंस असत त्याच्या, त्याविषयींचे सर्व नियम गणना अ. ६ येथें लिहिले आहेत.

שאי קינה अगे सीयोनेचे कन्ये! खेदानें शोक व विलाप कर; माझें पवित्र व वैभवयुक्त मंदिर नाशास गेलें ह्मणून मुकी बैस; इथोन व तेदी[1] या (दरवाज्यावर) कांहीं अवचट येऊन ते गडले; माझा प्रियकर पळाला ह्मणून माझा नाश करणारा मजवर चढून आला आणि माझें गौरव गेलें. ज्या दिवशीं सर्वसमर्थ मजशीं कडवटपणें वागला, त्या दिवशीं मी मोठ्यानें आकांत करितों; ज्या लढाईच्या दिवशीं प्रार्थनेच्या घरावर अग्नि ओतला गेला, त्या दिवशीं मी तरट पांघरतों; कारण स्तविलेलें नाम व लिशकाथ हाग्गोलो[2] या नावाची कोठडी, हीं विटाळलीं गेलीं; माझें बळकट आश्रयस्थान नाशास गेलें, आणि माझें प्रख्यात भरंवशाचें मंदिर उघडें पडलें. (अर्पणें) जाळायास वरून येणाऱ्या अग्नीबद्दल खालच्या अग्नीनें मला भस्म केलें; अर्पणें जाळण्याचें ठिकाण आणि एबेन हाज्जोहेलेथ दगडें[3] हीं पेटलीं; देवानें गाबरीएल दूतास पाठविलें, आणि त्यानेंहि अग्नि विखरलों[4]. परकीय लोकांचा अग्नि व वाणी माझ्या सभामंदिरांत आली. क्रोधाच्या दिवशीं आकाशांत शोक व आकांत व्हावा, अशी देवानें आज्ञा केली ह्मणून दूतांनीं आपणास पंखांनीं झांकून घेऊन मोठा शोक केला; तेव्हां राष्ट्रांचा बाप[5] कबरेवर हात देऊन रंगमहालीं आला, आणि हाय हाय! ह्मणाला; तेव्हां अनंतानें त्यास उत्तर केलें कीं, माझ्या प्रियकरास माझ्या मंदिरीं येण्यासारखें काय दुःख झालें आहे? तेथील ज्वाला दूरदेशांतहि आकाशापर्यंत दिसत होत्या; तेव्हां माझे भरंवशाचे मनुष्य जे याजक, त्यांतील ऐशीं हजार एकामागून एक टोळीनें आले, आणि गच्चीवर चढले; ते पळाले नाहीं, परंतु त्यांनीं अग्नींत उड्या टाकून हरपळले. याचदिवशीं सेईराच्या[6] हात व त्याची तरवार मजवर उठली; त्यानें बित्तेरास येऊन तेथेंच चार लक्षांस वधिलें, तेव्हां सरळ मनुष्यांची[7] वाणी ढगांनीं झांकलेली देवापुढें येऊन (ह्मणाली) कीं, त्यानें मला मारिलें, घायाळ केलें व मजवरील शेलाहि त्यानें काढून घेतला. लढाईच्या दिवशीं आरब लोकांकडे ऐशीं हजार तरुण पळाले, ते तान्हेले व पाण्यासाठीं कासावीस

---

१ टीका २६. २ टीका २७. ३ टीका २८. ४ येहेजकेल अ. १० ओ. २ एथें लिहिल्याप्रमाणें हें घडून आलें. ५ आब्राहाम. ६ एसावाचे संतानाचा. ७ याकोबाची.

असतां त्यांनीं त्यास खार पदार्थ खावविले; त्यांचे डोळे द्राक्षरसाकडे लागले होते, परंतु त्या हावेनें फुगविलेल्या मसका होत्या; त्यांचें शांतवन करणारा कोणी नव्हता, त्यांजवर दया करणारा कोणी नव्हता, आणि माझ्या फांकाफांक झालेल्यांस एकवट करणारा कोणी नव्हता. हे परमेश्वरा! माझ्या सर्व छळणारांची आठवण कर, आणि त्यांच्या कर्मांचें योग्य फल त्यांस दे; आणि तारले जाणाऱ्या लोकांच्या तारणाकरितां त्वरा करून त्यांजवरील जोकडाच्या शिवळी मोड; मग शोक करणारे पहिल्याप्रमाणें गायन करून हर्ष करितील; आणि हाच माझा मित्र हाच माझा प्रियकर असें आह्मीहि गायनगृहांत गायन करूं.

גרושים מבית תענוגיהם रंगमहालांतून हाकून लावलेल्याच्या वधलेल्यामुळें माझा जीव व्याकुळ होतो, त्याच्या पडलेल्या मुडद्यांमुळें माझें मन, माझें मन धगधगतें, आणि त्यांच्या वधलेल्यामुळें माझीं अंतडीं माझी अंतडीं कळकळतात. ज्या दिवशीं कुमाऱ्या त्याच्या महालांतून निघून गेल्या, आणि आई त्यांच्या तान्ह्यांपासून पारक्या झाल्या, आणि लुटाऱ्यांच्या हातीं लूटीसारख्या उघड्या मिळाल्या, ज्या दिवशीं त्याचा शोक फारच वाढला, ज्या दिवशीं त्यांच्या (गळ्यांतील) कंठ्यांबद्दल त्याच्या मानेवर जोकड बसलें, आणि त्या धरून नेणारांच्या हातीं तरवारीच्या पाडाव अशा झाल्या तो हाच दिवस. जे वधले गेले त्यांच्या कण्हण्यामुळें, तान्ह्यांच्या ओरडण्यामुळें आणि बाळांच्या शोकामुळें माझे कान भणभणतात, कारण याच दिवशीं त्याच्या रक्ताचे लोट वाहिले, प्रार्थनामंदिर विटाळलें जाऊन धुळीस मिळालें, पवित्रशास्त्र रक्तांत लोळलें, आणि त्यांच्या सुज्ञांचीं तोंडें विस्मित झालीं. याच दिवशीं माझीं तान्हीं खडकावर आपटून त्यांचे तुकडे तुकडे झाले; माझे शेष भनानले व त्यांस कोणीच एकवटिलें नाहीं; ज्या लोकांनीं माझ्या देवाचें नाम धिक्कारलें, त्यांनीं माझें गौरव विटाळलें, माझें पवित्र स्थान भ्रष्ट केलें; याच दिवशीं सिंहाचीं पिलीं माझ्या मागें लागलीं, आणि त्यांच्या गरजण्यानें माझें मन वितळलें. जीं लेंकरें किरमिजी वस्त्रांवर वाढलीं व जीं किरमिजी वस्त्रें पांघरून मिष्टान्नें खात असत, तीं ज्या धन्यास दया नाहीं अशा विकणारांच्या व विकत घेणारांच्या हातीं कशीं धक्के खाऊं लागलीं? याच दिवशीं त्यांजवर सैन्याचीं सैन्यें चढून आलीं,

या त्याच्या पाठी लागणारांचा मार्ग गरुडासारिखा हलका झाला. आकाशांतील ताऱ्यांप्रमाणें रचिलेली मंडळी मातीच्या फुटक्या मडक्याप्रमाणें कशी विखरली ! ती पाडाव होऊन पूर्वेस व उत्तरेस कशी गेली ! तिजमध्यें सूड घेणारी तरवार कशी चालली ! तिचे द्राक्षमळ्याचा नाश होऊन तो कसा ओसाड पडला ! आणि त्याच्या डाहळ्या पांढऱ्या फिकट कशा पडल्या !

איך גוי שורר माझें वस्तिस्थान कसें ओस पडलें आणि माझा प्रियकर कसा उडून पळून गेला ? लोकांनीं भरलेलें नगर कसें एकटेंच बसलें ! जी विश्वासु होती, ती विधवेसारिखी कशी एकटीच बसली आहे ! यासाठीं प्रतिवर्षी या दिवशीं मी शोक करितों, अघोर जीवांसारिखें मी आक्रंदन करितों व घुबडासारिखा विलाप करितों. भयंकर (देवानें) आपल्या क्रोधानें आपलें वचन पूर्ण केलें, सीयोनेच्या कन्येच्या राहुटींत त्यानें आपला राग अग्नीप्रमाणें ओतिला; ज्या मंडळींविषयीं "याकोबाचे रज:कण कोण मोजील[1]" असें ह्मटलें आहे, तिजवर त्याचा कोप नेमिलेलाच होता. तान्हीं बाळें त्यांच्या स्थानांकडे तोंडें पसरितात व बाळकें भाकर मागतात, परंतु त्यांच्या पुढें (भाकर तुकडा) ठेवणारा कोणी नाहीं; कारण आकाशांत वस्ति करणारानेंच त्याजवर दया केली नाहीं. हारएल, आरीएल[2] व पवित्र मंदिर हीं जळालीं; देवच शत्रु होऊन त्यानें इस्राएलाचा विध्वंस केला; ज्या इस्राएल लोकांस त्यानें आपलें वतन असें मानून घेतलें होतें, त्यास त्यानें धिक्कारिलें. मी दिवसोदिवस अश्रुधारा वाहवितों, आणि दु:खाची वाणी काढून ध्यान करीत व घुमत बसतों; याजकांतील तरुणांसाठीं मी पारव्यासारखा घुमतों. आश्रयासाठीं स्थापिलेल्या खडकानेंच[3] मला कांपविलें, त्यानें रागानें येहूदाच्या कन्येचा कोट मोडिला; येहूदा हा प्रांतोप्रांतीं (लोकांमध्यें) ह्मण व थट्टा असा झाला आहे. कांपतांना व थरथरतांना माझा जीव मजमध्यें म्लान होतो; अवघा दिवस व अवघी रात्र माझीं अंतडीं, माझीं अंतडीं तिडका देतात; मी तिडका देऊन

---

१ गणना अ. २३. ओ १०. २ हारएल व आरीएल हीं यज्ञवेदींचीं नावें होतीं. ३ देवानें.

शोक व खेद करितों. परक्यांनीं व जुलूम करणारांच्या लेंकरांनीं इश्माएल, मोआब व हागरी[1] यांच्या डेऱ्यांत मला पीडिलें; हागरीम लोकांनीं माझी छलना केली; आणि मला कडू दवणा (हें विष) पाजिलें. दु:खानें व क्लेशानें नमलेल्या जीवास विश्रांति सांपडूं दे, आणि हर्षाची व आनंदाची वाणी ऐकूं दे; शोक करणारांस आनंद व आनंद करणारांस शोक करूं दे; ह्मणजे प्रतिवर्षी या दिवशीं आह्मी शोक करणार नाहीं, आणि परमेश्वरानें उद्धरलेले गायन करीत सीयोनेस परत येतील.

ככתוב ופדויי יי जसें लिहिलेलें आहे कीं, परमेश्वराचे उद्धरलेले गायन करीत सीयोनेस परत येतील; आणि त्यांच्या माथ्यावर सर्व काळचा हर्ष राहील; ते आनंद व हर्ष पावतील आणि शोक व कण्हणें पळून जातील[2] अणखी असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर ह्मणतो, त्या दिवसांत, त्या समयींच इस्राएलांचा अन्याय शोधण्यांत येईल, परंतु कांहीं नसेल; आणि येहूदाचीं पातकें शोधण्यांत येतील, परंतु तीं सांपडणार नाहींत; कारण ज्यास मी राखितों, त्यास क्षमा करीन[3]. आणि यापुढें कोणताहि अन्याय व कोणताहि अपराध यांकडून आमच्या प्रार्थनेस तुजपुढें येण्यास अडथळा होणार नाहीं.

אליכם עדה נאמנה अहो विश्वासू मंडळींतील लोकहो ! मी तुह्मांस एका विषयाविषयीं विचारितों. सर्व वर्षामध्यें हाच दिवस विख्यात कां ? पेसाहाच्या दिवशीं मधुरवाणीनें आपण प्रार्थना कां करितों ? आतां तर आपल्या अपराधामुळें आपण कावळ्यासारिखी वाणी काढितों; कारण पवित्र नगरी भाल्यांनीं व तरवारींनीं नाश पावली; विश्वासू नगरी विधवेसारिखी कसी झाली ! पेसाहाच्या दिवशीं सर्व इस्राएल हर्षित कां असतात ? आतां तर आपल्या अपराधांमुळें आपण शोक व खेद करितों; कारण किरमिजी वस्त्रांवर वाढलेल्यास मुख्य हस्तक्यानें वधिलें; हा दिवस विश्वासू मंडळीस विषाप्रमाणें कडू झाला आहे. पूर्वीच्या काळांत येशुरूनाचे वंशी[4] सरदार कां होते ? आतां तर आपल्या अपराधामुळें ते मारले जाण्यास व नाश पावण्यास परक्यांच्या

---

१ हागारीचें संतान. २ यशया अ. ५१ ओ ११. ३ इर्मेया अ. ५० ओ. २०. ४ इस्राएलाचे वंश.

ह्मणजे मोआब व हागारी यांच्या लेंकरांच्या हातीं विखरले आहेत; अवघें वर्ष तूं त्यांस अल्पवेतनाच्या लोकांकडून कोंडून ठेविलें आहे. पूर्वींच्या काळांत आपण राष्ट्रांचे अधिपति कां होतों ? आतां तर आपल्या अपराधामुळें आपण सर्व लोकांपेक्षां नीच झालों आहों; खुनी मनुष्यांच्या हातीं हांकून नेलेले व पीडलेले आहों; लोकांनीं भरलेली नगरी कोठपर्यंत व केव्हांपर्यंत विधवेसारिखी राहील ?

אש תוקד בקרבי मी मिसरांतून निघतानां जें घडून आलें, तें मनीं आणिलें असतां माझ्या अंतर्यामांत अग्नि चेततो.

मी येरूशालेमेंतून निघतांना झालेल्या गोष्टी आठविल्या तर शोक करावा लागतो.

मी मिसरांतून निघतांना विसरलें जाणार नाहीं असें गीत[1] मोशेनें गाइलें.

मी येरूशालेमेंतून निघतांना इर्मेया रडला, आणि त्यानें अति मोठा शोक केला.

मी मिसरांतून निघतांना माझ्या राहुटीवर[2] देवाचें लक्ष होतें, आणि त्याजवर ढग होतें.

मी येरूशालेमेंतून निघतांना देवाचा राग मजवर ढगाप्रमाणें येऊन राहिला.

मी मिसरांतून निघतांना समुद्राच्या लाटा गरजल्या, परंतु त्या भिंतीसारिख्या उभ्या राहिल्या.

मी येरूशालेमेंतून निघतांना पाण्याचे लोट वाहिले, आणि माझ्या डोक्यावरून पूर गेले.

मी मिसरांतून निघतांना आकाशांतून अन्न उतरलें व खडकांतून पाणी वाहिलें.

मी येरूशालेमेंतून निघतांना मला विष, शोक व कडू पाणी हीं प्राप्त झालीं.

मी मिसरांतून निघतांना सकाळीं व संध्याकाळीं मी होरेब डोंगराच्या आसपास असें.

---

१ हें गीत निर्गम अ. १५ एथें आहे. २ इ. घरावर.

मी येरूशालेमेंतून निघतांना मला बाबेलच्या नद्यांजवळ शोक करावयास सांगितलें.

मी मिसरांतून निघतांना देवाच्या गौरवाची प्रतिमा मजपुढें भस्म करणाऱ्या अग्नीसारखी चालत असे.

मी येरूशालेमेंतून निघतांना वधायासाठीं पाजवलेली तरवार उपसलेली होती.

मी मिसरांतून निघतांना पशूचे होम, तर्पण व अभिषिक्त करण्याचें तेल होतें.

मी येरूशालेमेंतून निघतांना देवानें आपली संपत्ति असे मानिलेले लोकांस जशीं शेरडें कापायास नेतात तसें चालविलें होतें.

मी मिसरांतून निघतांना सण व शाब्बाथ स्थापन झाले, आणि चमत्कार व अद्भुत कृत्यें होत असत.

मी येरूशालेमेंतून निघतांना उपास व शोक स्थापन झाले, आणि व्यर्थतेमागें धांवणें होत असे.

मी मिसरांतून निघतांना चोहोंबाजूंस (उडणाऱ्या) झेंड्यांच्या मध्यें सुंदर राहुट्या असत.

मी येरूशालेमेंतून निघतांना सभोंवतीं इश्माएली लोकांच्या राहुट्या व परकीय लोकांच्या सैन्याचे तळ असत.

मी मिसरांतून निघतांना योबेल[1] व शेमित्ता[2] चालू असून लोकांमध्यें[3] शांतता असे.

मी येरूशालेमेंतून निघतांना इस्राएल सर्वकाळ विकले गेले, आणि (ईश्वराकडून) त्यांस सुटपत्राचा ठराव झाला.

मी मिसरांतून निघतांना दयासन, कोश व स्मरणाचीं रत्नें[4] होतीं.

मी येरुशालेमेंतून निघतांना गोफणीचे धोंडे व गडपकरणारीं शस्त्रें होतीं.

मी मिसरांतून निघतांना लेवी, याजक व सत्तर वृद्ध लोक होते.

---

१ पन्नासावें वर्ष लेवी अ. २५ पाहा. २ सातवें वर्ष लेवी अ. २५ व अनुवाद अ. १५ पाहा. ३ इ. देशामध्यें. ४ निर्गम अ. २८ ओ. ९–१२ पाहा.

मी येरुशालेमेंतून निघतांना कहर करणारे, जुल्म करणारे, व वि-
कणारे व विकत घेणारे होते.

मी मिसरांतून निघतांना मोशेनें मेंढवळण केलें, आहारोनानें (आ-
ह्मांस) चालविलें.

मी येरुशालेमेंतून निघतांना नेबूखादनेसार व आद्रीआनोस केसार
यांनीं (आह्मांस कैद करून नेलें.)

मी मिसरांतून निघतांना लढाईची तयारी केली असतां परमेश्वर तेथें
सहाय असे.

मी येरूशालेमेहून निघतांना (ईश्वर) दूर झाला, आणि पाहावें
तर तो नाहींच.

मी मिसरांतून निघतांना (साक्षात्पणाच्या राहुटींत) पडद्याच्या
आड असणाऱ्या गुप्त वस्तु व बाहेर रचिलेल्या
दर्शनीय भाकरी असत.

मी येरूशालेमेंतून निघतांना (ईश्वरानें आपला) क्रोध मजवर ओ-
तला व (आह्मास) गिचाडांत गुंतविलें.

मी मिसरांतून निघतांना होम, यज्ञ व सुवासिक होत्र चालत असे.

मी येरूशालेमेंतून निघतांना सीयोनेचीं महत्ववान लेंकरें तरवारीनें
भोसकलीं जात असत.

मी मिसरांतून निघतांना याजक सन्मानाकरितां [1]नेमलेलें सुंदर पा-
गोटें घालीत असत.

मी येरूशालेमेंतून निघतांना ओरडणें व गोंगाट, थट्टा व छल होत असे.

मी मिसरांतून निघतांना सोन्याचें [2]फूल, अधिकार व सामर्थ्य हीं होतीं.

मी येरूशालेमेंतून निघतांना सहाय नाहींसें झालें, आणि आमचा
मुगुट उडविला गेला.

मी मिसरांतून निघतांना पवित्रता, भविष्यकथन व भयंकर साक्षा-
त्कार असे.

मी येरूशालेमेंतून निघतांना आह्मामध्यें विटाळ, भय व अशुद्ध
आत्मा असे.

---

१ टीका. २९. २ मुख्य याजकाच्या कपाळावरील फूल, निर्गम अ. २८ ओ.
३६–३८ पाहा.

मी मिसरांतून निघतांना हर्ष, तारण व वाजवयाचे करणे होते.
मी येरूशालेमेहून निघतांना रडणें व घायाळ झालेल्यांच्या आरोळ्या
ऐकूं येत होत्या.
मी मिसरांतून निघतांना मेज, दिव्याचें झाड, सकलहोम व धूप
दाखविणें होतें.
मी येरूशालेमेंतून निघतांना मूर्ति, ओंगळ वस्तु, कोरींव देव व
स्तंभरूप देव होते.
मी मिसरांतून निघतांना शास्त्र, प्रमाण नेम व भजनपद्धति हीं होतीं.
मी येरूशालेमेंतून निघतांना शास्त्राभ्यास करणारे उणे झाले व
नित्यार्पण बंद झालें.
मी मिसरांतून निघतांना जसे, तसे चमत्कार सैन्याचा देव आह्मांस
दाखवो.
सीयोनेंत तो आपला साक्षात्कार, येरूशालेमेंत तो आपलें पूजन
पुनः स्थापन करो.

אֱלִי עֲרִנִי अहो माझ्या समाजांतील लोकहो! ज्या दिवशीं माझा मुगुट पडला, माझी सारंगी शोक करूं लागली, माझा पोंवा रडण्याचा सूर काढूं लागला, त्या दिवशीं तुह्मी शोक व विलाप करा; माझ्या अश्रुधारा तर वाहातच आहेत, कारण माझीं दुःखें फारच वाढलीं आहेत. माझ्या अत्यानंदाच्या दिवशीं देवानें माझ्या मार्गांत कुंपण घातली, लालबुंद दिसणारी मंडळी नागवी पडली, जसा केवळ तिच्या अघोर अन्यायाचा दंडच झाला आहे; या दिवशीं माझे अपराध मजविरुद्ध साक्ष देतात, आणि माझ्या दुष्कर्मामुळें मी लज्जित होतों. हे माझ्या जीवा! ज्या दिवशीं तुझ्या खडकरूप आश्रयानें तुझें मंदिर परक्यांच्या हातीं, आणि तुझा पवित्र डोंगर व तुझें नगर अन्य लोकांच्या व तुझ्या शत्रूंच्या हातीं दिलें, आणि ज्या दिवशीं माझ्या सर्व युक्ति निष्फल झाल्या, आणि माझ्या सर्व विचारांमुळें मी विस्मित झालों, त्या दिवशीं तूं खेदानें शोक कर. या दिवशीं परक्या लोकांनीं माझा माहाल ओसाड केला, त्यांतील पूजन करणारांची मंडळी शोक करीत बसली आहे, आणि त्यांतील सर्व मोलवान पदार्थ व माझ्या पवित्र मंदिरांतील व यज्ञवेदीवरील सर्व भांडीं

आम्मोन व गबाल यांच्या पुत्राकडे गहाण पडलीं आहेत, तीं वैऱ्यांच्या व द्वेषणाऱ्यांच्या वाड्यांत गेलीं. पवित्र डोंगर व टेंकड्या ओसाड पडल्या आणि पवित्र स्थानांतून शेखीनाचें पाखर घालणारें गौरव नाहींसें झालें, यामुळें ज्या दिवशीं माझा वाडा तुडविला गेला, आणि गांवकुसूं पडतांना मोठा आवाज झाला; त्या दिवशीं माझ्या डोळ्यांतून नाले वाहतात आणि अश्रूंच्या नद्या चालतात. अहो खेदित जीवांनो! तुह्मी माझ्या ऋणाच्या झडतीच्या दिवशीं पूर्वजांच्या कबरा ज्या नगरीं आहेत, त्या नगराकरितां, व उदारमनाच्या लोकांच्या वसतिस्थानाकरितां रडा, आणि जसें पखालींतून व निबिड मेघांतून पाणी ओतितात, तशा तुमच्या डोळ्यांतून धारा लागूं द्या; मजवरील जुलुमामुळें व संकटामुळें माझ्या आयुष्याच्या सर्व वर्षांपर्यंत मी भटकत फिरत आहें. हे शुद्ध नजरेच्या (देवा)! वाईट पाहिल्यामुळें नागवा पडलेल्या बंदिवानावरील तूं आपली दया आवरून व आटोपून धरितोस; तर मीं आपल्या ऋणामध्यें कोठपर्यंत राहत असावें? आणि तूं आपला क्रोध माझ्या किती पिढ्यांपर्यंत वाढविशील! आणि पूर्वी झालेले चमत्कार मी पुन्हां पाहणार नाहीं काय? मद्यप्यासारिखें माझें मन भ्रमतें, आणि माझे सर्व शांतवन करणारेच मला छळतात; ज्या दिवशीं बापानें आपला ज्येष्ठ पुत्र विकला, त्या दिवसाची मला सर्वदा आठवण होते; तर जी आज्ञा तूं आठवायास व सांभाळायास सांगितली आहेस, त्या आज्ञेची तुझ्या तरुणपणाच्या स्त्रीकरितां आठवण कर; माझे अपराध तूं सर्वकाळ आठवशील काय? आणि माझ्या वाङ्निश्चयाची प्रीति विसरशील काय? प्रत्येक दिवस तारणाची वाट पाहतां पाहतां माझे डोळे अंध झाले, माझ्या आयुष्यभर राहिलेल्या धिक्कारामुळें माझा जीव कंटाळला, (पवित्र नगराच्या) भिंती व त्याचे कोट हीं पडल्यामुळें माझा घांस कडू आणि माझे प्यावयाचे पदार्थ विष व कडू दवणा यासारिखे झाले आहेत.

---

१ हेबरोन नगराकरितां. २ निर्गम अ. ४ ओ. २२ एथें लिहिल्याप्रमाणें इस्राएल. ३ शाब्बाथाची आज्ञा; इजविषयीं निर्गम अ. २० ओ. ८ एथें आठवायास आणि अनुवाद अ. ५ ओ. १२ एथें सांभाळायास सांगितलें आहे. ४ यशाया अ. ५४ ओ. ६ वरून अशी उपमा दिल्ही आहे.

איך ידידות נפש प्राणसखी[1] आपल्या घरोट्यांतून कशी उडून गेली; आणि क्रोधाच्या दिवशीं तिला तिच्या पवित्र शोभेंतून कशी हांकून लाविली ? ज्या दिवशीं तिचा नाश झाला, त्या दिवशीं लेंकरें हरवलेली व विधवा यांजसारिखी ती शोक करिते; तिनें जन्म दिल्हेल्या लेंकरांतून तिला चालवायास कोणी नाहीं व तिचा हात धरायासहि कोणी नाहीं. तिच्या टोळ्या पृथ्वीच्या सर्व कोनीं घाबरलेल्या मनानें व नाकाच्या अशक्त श्वासोच्छ्वासानें पवित्र स्थानाच्या नाशाकरितां व ओसाड पडलेल्या द्वाराकरितां[2] दुःखानें रडत आहेत; सोडलेल्या व आपल्या प्रियकरापासून वेगळी झालेल्या स्त्रीप्रमाणें त्या धापा देतात. हाय हाय! डोक्यावरील गौरव पायांनीं तुडविलें जातें, कारण तरुणपणाची स्त्री लवकरच धिक्कारली गेली, तिच्या दृष्टीपुढील सुंदर पदार्थ चोरले व लुटले गेले, तिला तिच्या पवित्र वसतिस्थानांतून व सुंदर उंच स्थानांतून हांकून लाविलें आहे. हाय हाय! कारण जीवंत देवाच्या लेंकरांचे डोळे त्याच्या शोभिवंत व तेजस्वी दिसणाऱ्या (पवित्र मंदिराकडे) आशेनें पाहातां पाहातां अंध झाले आहेत; जुलूम करणारांच्या देशीं ते आपल्या पापामुळें क्षीण होत आहेत; त्यांचे क्लेश पाहून त्यांची आईहि मोठ्यानें ओरडून शोक करिते, आणि ह्मणते, हाय हाय! कारण माझीं लेंकरें गेलीं, नाहींशीं झालीं; माझी शक्ति थकली, कारण शत्रूचा हात त्यांजवर बळावला. मला एकीकडून धक्की मिळते व दुसरीकडूनहि धक्की मिळते; एका जुलमांतून सुटलों नाहीं इतक्यांत दुसऱ्या जुलमांत पडतों; माझा खडकरूप आश्रय ज्याची बरोबरी करण्यासारिखा दुसरा कोणी नाहीं, त्यामागून जेव्हां मी वळलों, तेव्हां पळतां पळतां माझे गुडघे गळून पडले; संकटामुळें, देशांतरामुळें व मोठ्या भयंकर वाणीमुळें मी पश्चात्ताप करून आपली मांडी थापटितों. सेफारादांतील पाडावें[3] वनांतील लांडग्याच्या तावडीस कसे सांपडले ? संकटामुळें, अधिकाऱ्यांच्या जुलमामुळें व अतिशय त्रासामुळें बाप आपल्या लेंकरांकडे वळून पाहातहि नसत; वृद्ध, तरुण व लेंकरें यांची त्यांनीं एकदाच कत्तल उडविली; यामुळें जशी पहिल्यानें प्रसूत होणारी प्रसवतेवेळीं कांपते, तशी देवाची मंडळी भयानें कांपत आहे.

१ शखीना. २ इ. द्वाराच्या उंबऱ्याकरितां. ३ टीका २० पाहा.

שכורה ולא מיין अगे द्राक्षरस न पितां मस्त झालेले! तूं आपला डफ उडीव, आपलें टक्कल कर, केंस कातर आणि आपला चेहेरा कुरूप कर; उंच टेंकड्यांवर बसून शोक कर आणि आपल्या सर्व देशांत फीर; तुझ्या वाईट इच्छिणारांनीं ज्या शासनाच्या दिवसाची वाट पाहिली, तो आला ह्मणून तूं विलाप कर; तुझ्या उंबऱ्याच्या नाशाकरितां तूं ईश्वरापुढें आरोळी कर, आणि त्याजकडे आपले तळहात पसर. राजधानीचें नगर सीयोन इजमध्यें परका व शत्रु कसा आला! परक्यांचें पाय पवित्र भूमि कसे तुडवितात! जेथें मुख्य याजकहि जावयास भीत असे, तेथें पडद्याच्या आंतहि कुटिल लोक आले; आणि जेव्हां ते आले, तेव्हां जरी याजक अर्पणें सिद्ध करीत होते, तरी पाण्याच्या लोटाप्रमाणें त्यांचें रक्त वहात जाईपर्यंत ते आपल्या पाहाऱ्यावरच राहिले, आणि त्यांनीं आपलें काम सोडिलें नाहीं; मग त्यांनीं छप्परें व उजेडाच्या खिडक्या मोडून टाकिल्या. सीयोनेच्या कन्येच्या कण्हण्याचा शब्द दुरून ऐकूं येतो; ती हेशबोनासारिखा शोक व मेफाआथासारिखा विलाप करिते; जो प्याला मी पितों, त्यांतील सर्व गाळहि मला चोखावा लागतो; माझी शोभा भूमीवर उडविलेली आहे, आणि माझें शिंग कापून पडलें आहे; सिंहाच्या ह्मणजे नाश करणाऱ्या बाबेलच्या कन्येच्या आणि पारासाच्या दुष्ट कन्येच्या दांतांनीं व त्यांच्या तीक्ष्ण दाढांनीं मला खाऊन टाकिलें आहे; अगे सीयोने! तुझें पाप माहितेच आहे, मग तूं कां शोक करतेस; तूं आपल्या भविष्यवाद्यांस अव्हेरिलेंस, व आपल्या मूर्तींची वाणी ऐकिलीस, ह्मणून तुझ्या बहुत अपराधांमुळें तुझे लोक नकळत पाडाव करून नेलेले आहेत. हे माझ्या शत्रू! माझा नाश झाला ह्मणून तूं हर्ष करूं नको; कारण जरी मी पडलों, तरी मी पुनः उठेन व परमेश्वर मला सहाय होईल; मी आपल्या बोध करणारांस सोडिलें ह्मणून त्यानें मला बंदांत घातलें आहे; परंतु ज्या देवानें मला

---

१ यशाया अ. ५१ ओ. २१ एथें याप्रमाणें येरूशालेमेस म्हटलें आहे. २ इ. सैन्यांत. ३ एमोऱ्यांचा राजा सीहोन याची राजधानी हेशबोन जी मोशेनें जिंकून घेतली तिजसारिखा, गणना अ. २१ ओ. २५–२९ पाहा. ४ हें मोआबाच्या एका नगराचें नाम आहे, तें इर्मेया अ. ४८ ओ. २१ येथें सांपडतें; मोआबाचा नाश होऊन हें मेफाआथ नगर व दुसरीं नगरें मोठा आक्रोश करितील असें भविष्य आहे.

विखरिलें आहे, तोच आतां मला एकवटील; ज्या खडकरूप आश्रयानें मला विकिलें आहे, तोच मला खंडून घेईल; जो प्याला मला प्यावा लागला आहे, तोच तुला प्यावा लागेल; मग मीहि तुझीं बाळकें खडकांच्या छिद्रांमध्यें विखरीन.

יום אכפי הכברתי ज्या दिवशीं माझ्या प्रभूच्या मंदिराच्या अंगणांत मी भविष्यवाद्याच्या रक्तांत आपला हात बुडविला, त्या दिवशीं माझ्या अपराधांचें पारडें वजनांत भारी होऊन माझा अपराध दुप्पट झाला; आणि मला पीडणाराची तरवार येईपर्यंत, त्याचें रक्त समुद्रासारखें उसळत होतें, आणि ती तरवार माझ्या समुदायावर येईपर्यंत पृथ्वीनेंहि तें रक्त झांकिलें नाहीं, आणि ईश्वर आश्चर्यानें त्याचा सूड घेईपर्यंत तें स्थिरावलें नाहीं; यावरून येहूदाच्या कन्येचा शोक व विलाप वाढला. अरेरे ! मला हाय हाय ! राजरक्षकांचा नायक येईपर्यंत तें रक्त अधिकाधिक उसळत होतें; आणि जेव्हां तो परमेश्वराच्या मंदिरीं आला, तेव्हां त्यानें तें उकळ्या देतांना पाहिलें; मग तेथें जे याजक अर्पण करीत होते, त्यांस त्यानें त्याविषयीं विचारिलें; त्यांनीं उत्तर केले, कीं हें अर्पिलेल्या पशूंचे रक्ताशिवाय दुसरें कांहीं नाहीं; मग त्यानें हें काय ? आणि हें असें कां ? याचा शोध लावण्यास त्यानेंहि अर्पण केलें; तेव्हां मी आपल्या जीवास ह्मणालों, हें तुझें पाप व हेंच त्याचें फळ. इतकें होत असतांहि तें रक्त स्थिरावलें नाहीं, परंतु तें समुद्रासारिखें आणखी खवळलें; मग त्या गोष्टीच्या चौकशीअंतीं दिसून आलें कीं, अपराधावांचून मारला गेलेल्या ईश्वरी मनुष्याचें रक्त तें होतें; तेव्हां नेबूझारआदान ह्मणाला, त्याचे रक्ताचाहि झाडा घेतला जाईल, अशावरून ईश्वरहि थांबणार नाहीं व उगाच बसणार नाहीं; तर आतां (सर्व) याजकांस अनंताच्या मंदिरांतून बाहेर आणून मजजवळ एकवट करा, जेखार्या भविष्यवाद्याचें रक्त स्थिर होईपर्यंत मीहि स्थिर राहणार नाहीं. त्यानें शेंकडों वृद्धांस व हजारों तरुणांस भोसकलें, सैन्याच्या परमेश्वराच्या याजकांस व बापाच्या दृष्टीसमोर शाळेंत जाणाऱ्या बालकांस वधावयास नेलें, तरी तें निर्दोष रक्त शांत होईना; ती एक आश्चर्यकारक खूणच झाली; याप्रमाणें परक्याची तरवार सूड घेऊं ला-

गली, तेव्हां सर्व नगरीमध्यें गोंधळच झाला, आणि पूर्वीं कधींच नव्हती अशी शोकाची वाणी ऐकूं आली. मग त्यानें तान्हेबालकांसहित स्त्रियांस वधावयाचा क्रम चालविला, आणि जेव्हां त्यांचें रक्त त्या निर्दोष रक्तांत पाण्यासारिखें सोडिलें, आणि तें त्याच्या रक्तांत समुद्रासारिखें व मिसराच्या नदीसारिखें वाहूं लागलें, तेव्हां नेबूझारआदान आपले डोळे आकाशाकडे लावून ह्मणाला कीं, त्या रक्ताची शिक्षा येरूशालेमेच्या कन्यांवर अद्याप पुरे झाली नाहीं काय? कैद्यांच्या शेषाचा तूं समूळ नाश करितोस काय? तेव्हां तें निर्दोष रक्त स्थिरावलें, आणि तेव्हां त्या सूडघेणाऱ्या तरवारीची तृप्तता झाली. हे आमच्या देवा, आह्मी तुजविरुद्ध पाप, अतिक्रम व दुष्टाई हीं केलीं, आह्मी तुझ्या भविष्यवाद्यांस मारिलें, परंतु आमची दुष्टाई आतां आह्मास कळून येते; आमचें शांतवन व्हावें ह्मणून तूं आह्मावर दया कर, कारण खोलस्थानांतून आह्मी तुजकडे ओरडत आहों, आमच्या दुष्कर्मांची शिक्षा आह्मी किती भोगीत आलों! दुःखांत पडलेले व वादळांत सांपडलेले "लोरूहामावर[1]" कृपा कर; ती आपली दृष्टि तुजकडेसच लाविते, आणि तुझ्याच सहाय्याची वाट पाहाते.

בת עמי תיילל हान्ना व तिचे सात पुत्र यांवरून माझ्या लोकांची कन्या दुःखानें शोक करिते; कारण ते सातहि तिच्या दृष्टिसमोर वधले गेले, आणि तीहि आपल्या पुत्रांवर पडून मरण पावली. त्यांनीं देवास सोडावें व बेल देवाची सेवा करावी ह्मणून शत्रूनें त्यांस भुलविलें; परंतु त्यांनीं पृथ्वी स्थापन करणाराच्या एकत्वाविषयीं साक्ष देत असतां व त्यांच्या आईचे अश्रू तिच्या तोंडावरून वाहात असतां (परमेश्वराच्या) वतनाचा वांटा[2] जुलूम करणाराच्या हातीं कसा आला! तो जुलूम करणारा पहिल्यानें धाकट्यास ह्मणाला, कीं तूं अन्य देवापुढें नमन करायास मान्य होशील, तर मी तुझा आदरसत्कार करीन व राज्यकारभारांत तूं माझा सहायकारी असा होशील; (परंतु त्यानें उत्तर केलें

१ "लोरूहामा" म्हणजे दया न पावलेली. होशेया अ. १ ओ ६ एथें हें विशेष नाम इस्राएलांस दिल्हें आहे. २ इस्राएल; हें नाम त्यांस मोशेनें अनुवाद अ. ३२ ओ. ९ एथें दिल्हें आहे.

कीं), पराक्रमानें वेष्टिलेल्या देवास मी कसा विसरूं ! तेव्हां त्यानें हुकूम करून लागलेंच त्याचें डोकें उडविलें; तरी त्याच्या आईनें मोठ्या थाटानें त्याचें चुंबन घेतलें. मग तो क्रोधायमान होऊन दुसऱ्यास ह्मणाला, कीं, माझ्या मूर्त्तीचें वंदन कर, कारण तिचा उजवा हात महाप्रतापि आहे; त्यानें उत्तर केलें कीं, आकाशांत वस्ति करणारा, ज्यानें आपली संपत्ति असें मानिलेल्या (इस्राएलांस) त्यांच्या पीडकांच्या हातांतून सोडविलें, त्या एकावांचून (दुसऱ्या कोणाचीहि) मी सेवा करणार नाहीं. मग तिसऱ्यास तो ह्मणाला कीं, मूर्त्तीपुढून माझी अंगठी उचलून घे, ती नाकारूं नको, आणि माझे नियम सिद्धीस ने; अशाकरितां कीं, मी हटलों, आणि मी व्यर्थ शपथ वाहिली असें माझ्या प्रतिनिधींनीं ह्मणूं नये; त्यानें उत्तर केलें कीं, मीहि आपल्या जिभेनें नाहींच ह्मणतों. इतक्यांत आकाशांतून एक वाणी ओरडतां ऐकूं आली कीं, अहो हान्नाचे सात पुत्र हो ! तुह्मी धन्य; तुह्माकरितां एदेन बागेंत वतन सिद्ध करून ठेविलें आहे, कारण तुह्मी विश्वासूपणें आपल्या देवाची सेवा केली; ती आई आतां एदेनांत आपल्या पुत्रांसहित हर्ष करीत आहे.[1]

על אלה माझ्या पापामुळें माझ्या वसतिस्थानाचा नाश कसा झाला ! त्याकरितां मी आपल्या गालावरून अश्रू वाहावितों, या दिवशीं मी मोठ्यानें शोक करितों, आणि दिवसेंदिवस मी विलाप करितों. रिब्बी इश्माएल मुख्य याजक याच्या पुत्राविषयीं व त्याच्या कन्येविषयींहि माझें मन कष्टी होतें, आणि शांतवन करणारा कोणी नाहीं,[2] माझ्या दुःखाच्या वेदनांपासून सर्व दूर झाले आहेत; त्या गोष्टीची जेव्हां मला आठवण होते, तेव्हां माझ्या हृदयीं केवळ अग्नीच पेटतो. ज्या वेळीं तीं (दोन्ही भावंडें) कैदेंत गेलीं, त्या वेळीं तीं दोघां धन्यांच्या हातीं आलीं, ते दोघे समोरासमोर राहणारे शेजारी होते; ते कांहीं विषयावर भाषण करीत असतां त्यांतून एक दुसऱ्यास ह्मणतो, कीं सीयोनेच्या लढाईतून किरमिजी वस्त्रें पांघरणारी अशी एक दासी मीं पाडाव करून आणिली आहे; तिचें तेज व तिची मुखचर्या चंद्रासारिखी असून ती

१ ही गोष्ट माकाबीचें पुस्तक दुसरें अ. ७ एथें सविस्तर लिहिलेली आहे २ इ. शांतवन बंद पडलें.

केसीया व येमीमी यांसारिखी आहे. त्याच्या शेजाऱ्यानें या विषयावर भाषण करितांना आपल्या गुलामाची दुप्पट प्रशंसा केली, आणि ह्मणाला, मीहि येरूशालेमेच्या लढाईतूनच आलों, तेथून दिसण्यांत सुंदर असा एक गुलाम मीं पाडाव करून आणिला आहे, त्याचें तेज दोन प्रहरच्या सूर्यासारिखें आहे; ये, आपण त्यांचें लग्न लावूं, मग त्यांस आकाशांतील ताऱ्यांसारिखीं जीं लेंकरें होतील, तीं आपण दोघे वांटून घेऊं; ही गोष्ट ऐकून माझे कान ठणकतात, आणि जेव्हां मला याची आठवण पडते, तेव्हां मी आपला झगा फाडितों. ही गोष्ट त्या दोघांस जेव्हां मान्य झाली, तेव्हां संध्याकाळीं त्यांनीं त्या दोघांस एका कोठडींत बंद केलें आणि आपण बाहेर बसून आनंद करूं लागले; परंतु आंत तीं दोघें भयानें, धास्तीनें, दुःखानें, त्रासानें व क्लेशानें शोक करीत होतीं. त्या मुलाचें मन विलापानें तप्त होऊन अगदीं वितळून जाऊन (तो ह्मणाला कीं,) आहारोनाच्या पुत्रानें दासीशीं कसें लग्न करावें ! तीहि आपल्या दुर्दैवास रडून ह्मणाली कीं, योखेबेदच्या कन्येनें गुलामाबरोबर विवाह कसा करावा ! इस्राएलांमध्यें असें कधींच झालें नाहीं; हा त्याचा शोक सकाळ होईपर्यंत थांबला नाहीं. उजेडतां त्यांनीं एकमेकांस ओळखिलें; आणि अरे माझ्या भावा हाय हाय ! अगे माझ्या बहिणी हाय हाय ! असें ह्मणून त्या उभयतांनीं अतिशय खेद केला, आणि शुद्धीवर येऊन भयानें, दुःखाने व क्लेशानें त्यांचे जीव निघून जातपर्यंत तीं एकमेकांस आलिंगून राहिलीं; याविषयीं सप्तर्षि, अगस्त्य व कृत्तिका हीं नक्षत्रेंहि शोक करितात.

ועל שור אבכה माझें नांदणें ओस पडलें यावरून मी रडतों आणि उलाय नदीसारिखे माझ्या नेत्रांतून झरे वाहतात. अरेरे, हाय हाय ! वैऱ्याच्या हातून नाश पावलेला पवित्र देश, ज्याचा उपभोग मजपेक्षां नीच व राखलेल्या गुलामाप्रमाणें मानिलेले इश्माएली व हागारी लोक घेत आहेत ह्मणून, आणि ते माझ्या हद्दींतील सुंदर महालाचे धनी झाले आहेत ह्मणून मी रडतों. अरेरे, हाय हाय ! पवित्र मंदिरा-

१ या ईयोबाच्या कन्या होत्या, व रूपांत त्या अतिसुंदर होत्या; ईयोब अ. ४२ ओ. १४–१५ पाहा. २ ही नदी बाबेल देशांत आहे. ३ हागारीचें संतान.

करितां ह्मणजे देवाच्या घराकरितां मी रडतों; अरे अरीएला अरीएला, हाय हाय! कोणी खंडून घेणारा व उद्धरणारा आहे काय? अशी मी आरोळी करितों; मजवर अधिकार करणारांनीं माझ्या उद्धाराचा वेळ बंद केला आहे; माझा अधिकार चालविणारा कोणीच राहिला नाहीं. अरेरे, हाय हाय! दहा आज्ञांच्या पाट्या, कोश, आहारोनाच्या कपाळावरील फूल व त्याचा मुगुट, एफोद व त्याच्या खांद्यावरील स्मरणसूचक रत्नें, त्याच्या झग्याच्या कांठावरील घांटा व त्याचीं वस्त्रें[1] असे जे पदार्थ नाहींसे झाले आहेत, त्यांकरितां मी रडतों; माझ्या तंतुवाद्याचा हर्षाचा नाद पालटून शोकाचा नाद निघत आहे. अरेरे, हाय हाय! लेव्याचा उभें राहण्याचा मंचक व अंगण याकरितां, मेज व शुद्ध समई याकरितां, आणि उरपट, एफोद व त्यावरील मोलवान रत्नें यांकरितां मी रडतों; ज्या मेंढ्यांकडून व एडक्यांकडून माझ्या अघोर अपराधांचें प्रायश्चित्त होत असे, ते आतां कोठें आहेत? अरेरे, हाय हाय! याजकांतील सुंदर तरुणांकरितां[2] मी रडतों; सत्वशील मनुष्यांकरितां, लेव्यांच्या गायनाकरितां व स्तुतीकरितां, राजा व भविष्यवादि यांकरितां, माझे न्यायाधीश व अधिकारी यांकरितां मी शोक करितों; माझ्या वाटा नीट करणारे कोठें आहेत? अरेरे, हाय हाय. मी आपल्या खडकरूप आश्रयाकडे रडून याचना करितों; तोच माझ्या डोक्यावर मुगुट घालील[3], तोच आपल्या मंदिराला[4] गौरवयुक्त करील; ईश्वर करो आणि माझें रडणें पालटून नृत्य होवो, मग मी तंतुवाद्यांवर गायन करीन; ईश्वर असें करो.

לאראשי הדוהי अहो येहूदाचे व इस्राएलाचे लोकहो! जाणा कीं, मी फारच खेदित आहें; माझ्या पापामुळें मला थरकांप सुटला आहे; जेव्हां मी रडणें ऐकतों, तेव्हां मीहि रडावें असें माझ्या मनीं येतें, ज्या समयीं मी हर्ष पाहातों, त्या समयीं माझ्या अंगाचे कांटे उभे राहातात. अरे पुत्रा, अरे भावा, अहो बहिणी, अगे आई आणि अहो माझे सर्व नातलग हो! तुह्मीं आपलीं कुटुंबें एकत्र करून रडा, आणि आपणांवर फांसण्यों घ्या. अरे प्रिय मित्रा, अहो पुरुषांनो व स्त्रीयांनो, तुह्मीहि रडा,

१ आहारोनाच्या सर्व वस्त्रांचें वर्णन प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग २ रा टीका १ पाहा. २ इ. याजकपणाच्या फुलांकरितां. ३ इ. बांधील. ४ अनुवाद अ. १४ ओ. १ एथें लिहिल्याप्रमाणें फांसण्या घेणें ही पूर्वीं दुःख दर्शविण्याची खूण होती.

मी तर रडतांना थरथर कांपतों, कारण पवित्र मंदिराचा अगदींच नाश झाला, याचा आठव मला झाला ह्मणून माझें गायन व माझा हर्ष सरला आहे. हे येहूदा, ऊठ, आणि हे इस्राएला, तूंहि शोक कर; कारण देवाची मंडळी आणि शास्त्र व नीति शिकणारे सरले आहेत. माझें विशेषत्व सरत व उणें होत चाललें आहे, माझ्या मंडळ्या नाहींशां झाल्या व त्यांचा सत्यनाश झाला आहे. समयाप्रमाणें घडून येणाऱ्या गोष्टींवरून माझी बुद्धि सरत जाते, आणि मला गायनाचा, तंतुवाद्यांचा व नृत्याचा वीट येतो. विद्वानाचें शिक्षण देणारे विचार सरले; शत्रूनें त्यांतील निवडक लोकांस शेरडांप्रमाणें व रानगाढवांप्रमाणें वधिलें. देवाची कृपा सरली व त्याच्या दयेचा विसर पडला, तो मजशीं निष्ठुरासारिखा झाला आहे व अगदीं कडवटपणें वागतो. पूर्वजांची पुण्याई सरली, तिजकडून त्यांच्या बीजास व संतानांस कांहींच आश्रय सांपडत नाहीं, ते थरथर कांपतात. प्रतिष्ठित स्त्रियांचें पातिव्रत्य सरून त्यांस गर्व चढला; ज्या दिवशीं त्या परक्याच्या हातीं सांपडल्या, त्या दिवशीं त्यांची कत्तल उडाली. येहूदींचें शांतवन सरलें व त्याच्या मनीं निराशा उत्पन्न झाली, कारण तो बंदांत पडलेलाच आहे. माझ्या लोकांच्या लेंकरांस मारणारांवरील, लुटणारांवरील व खोटे आळ घेणारांवरील ईश्वरी न्याय सरला. शास्त्राची व त्यांतील आज्ञांची सत्यता सरली, कारण परक्या लोकांच्या गर्वामुळें आह्माकडून त्यांचा अभ्यास सुटला आहे. माझ्या लोकांच्या लेंकरांचें सुख सरलें, परंतु (त्यांचीं दुःखें सरलीं) नाहींत; त्यांची योग्यता, त्यांचें सत्व व त्यांच्या ज्ञान्यांचें ज्ञान सरलें, त्याजवर गंज चढला आहे. त्यांच्या आरोळीस दिव्य उत्तर मिळणें सरलें. त्यांस उत्तर देणारा व त्यांजवर दया करणारा कोणी नाहीं; संकटामुळें ते अगदीं म्लान झाले आहेत. खालीं इस्राएलामध्यें पवित्र मंदिरीं वास करणारा शेखीना सरला, त्यानें (केरूबांवर) पाखर घालणें सोडिलें. **कद्दीशास** उत्तर देणें व **बारेखूस**

---

१ सर्व इस्राएल लोकांचें. २ शास्त्र व त्यांतील आज्ञा ईश्वरदत्त असल्याकारणें सत्यच आहेत; परंतु अलीकडे इस्राएलांतहि कित्येक शहाण्या लोकांस शास्त्राच्या सत्यतेचा संशय येऊं लागला आहे. ३ ईश्वरी साक्षात्कार. ४ कद्दीश आणि बारेखू हे प्रार्थनेंतील ईश्वरस्तुतीचे मुख्य भाग आहेत; त्यांजकडे सर्वांचें विशेष लक्ष असून त्यांचीं उत्तरें देण्यांत तत्पर असलें पाहिजे.

उत्तर देणें सरलें, प्रार्थनामंदिरें पायांतून तळसून काढलीं आहेत. खडकरूप आश्रय जो सैन्याचा परमेश्वर याचें व त्याच्या **याह, एलोहीम, एल** व **शद्दाय** या नामांचें स्मरण सरलें जात आहे. मजमधील भविष्यकथन सरलें व सर्व दृष्टांत बंद पडले आहेत; ऊरीम व थुम्मीम[1] यांचे गुण व ईश्वरी संयुक्त नामाचें गुह्यहि सरलें. शास्त्राभ्यासहि सरला, तो इतका कीं, ज्या वेळीं (तो अभ्यास) लेंकरांकडून पूर्ण व्हावा, तो होत नाहीं ह्मणून तीं तरट पांघरतात व त्यानें तीं अगदीं वेष्टिलेलीं आहेत. शाब्बाथाचें महत्त्व सरलें व त्याप्रमाणें सणांचेंहि, ह्मणून तुह्मी आपल्या अंथरुणावर अंधार करा व काळें वस्त्र अंथरा. प्रार्थना मंदिरीं नेमिलेल्या प्रार्थना करण्याच्या गायनाचा, मफतीरें[2] वाचणाराचा व वक्तृत्वानें भाषण करणाऱ्या कवीचा मंजुळ शब्दहि सरला. जो महापुरुष दावीदाचा पुत्र तो राज्य करीपर्यंत येहूदाच्या राज्याचें गौरव सरलें आहे; परंतु तो माझ्या लोकांस पुनः मुळांतून सजीव करील.

יתומים היינו परक्या देशांत आह्मी पोरके झालों आहों; यामुळें माझे डोळे नेहमीं अश्रू गाळितात. मी आपल्या विश्रांतीच्या नगरीं असतां, सर्व परगण्यांची राजकन्या, राष्ट्रांत थोर व पुष्कळ लेंकरांनीं तृप्त अशी होतें; परंतु आतां मी दास्यत्वांत पडलें आहें, माझीं दुःखें वाढतात, आणि येरूशालेमेकडे माझे डोळे आशेनें लागले आहेत. माझ्या सर्व प्रियकरांतून मजवर दया करणारा कोणीच नाहीं; माझ्या आप्तांनींहि मला अव्हेरिलें, माझें शांतवन करणारा कोणीच नाहीं; लेंकरें भाकर मागतात; परंतु पाहा, मी तर पीडलेली व वादळांत सांपडून एकटीच बसलें आहें. अनेक संकटें मजवर येतात, शत्रु व दुःखें माझ्या पाठीस लागतात; हाय हाय ! माझ्या अपराधांनीं मला गांठलें आहे, यामुळें मी ओंगळ होऊन राहिलें आहें. माझ्या नांदणुकीच्या घराच्या नाशामुळें अश्रूनें माझे डोळे अंधारमय झाले आहेत; परमेश्वराच्या सामर्थ्याचें वर्णन कोण करूं शकतो ? त्याची स्तुति असो, त्याचीच मी मुकाट्यानें आशा करीन. जरी आमच्या अंगीं सत्कर्में नाहींत, तरी तूं

[1] प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग २ टीका १ पाहा. [2] शास्त्र वाचणें पुरें झाल्यावर पुनः कांहीं वाक्यें वाचून भविष्यकथनांतील जो भाग वाचितात तो.

आपली दया वाढीव, तुझ्या शत्रूंचा व वैऱ्यांचा निःपात कर; (कारण तूं ह्मटलें आहेस कीं), तुह्मी जर मजकडे फिराल, तर मीहि तसें करीन; पाहा, मी तुह्मांकडे एलीया भविष्यवाद्यास पाठवीन.

עיני עיני येरूशालेमेच्या नाशामुळें माझ्या डोळ्यांतून, माझ्या डोळ्यांतून पाणी वाहतें. माझ्या लोकांच्या कन्येच्या वधावरून मी रात्रंदिवस रडतों, आणि आकाशीं वासकरणारापुढें मी आपला जीव व आपलें रक्त ओतितों. माझीं सर्व गायनें पालटून शोक झाला आहे, माझा सतार व वीणा फुटला आहे; येहूदा व एफ्राईम यांच्या लेंकरांकरितां माझ्या पायांत बिडी पडली आहे. शत्रु मजवर हंसतात व सिंहाप्रमाणें दांत कडकडवितात, तोंडानें ते मजवर फुसकारतात व हातानें टाळ्या वाजवितात. अगे आई! आतां (तूं आपल्या) लेंकरांकरितां, तरुणांकरितां वृद्धांकरितां व तान्ह्याबालांकरितां शोक, अक्रोश व विलाप कर. परमेश्वरानें आपली यज्ञवेदि अव्हेरिली आहे; त्यास त्यांच्या विश्रांतीच्या पवित्र स्थानाचा वीट आला आहे, त्यानें येरूशालेमेचीं गांवकुसें आपल्या धिक्कारणारांच्या हातीं सोंपलीं आहेत. ज्या आब महिन्याच्या नवमीस शत्रूनें पवित्र मंदिराचा व सीयोन या पवित्र नगरीचा नाश केला, त्या दिवसापासून आह्मां सर्वांचे हात शक्तिहीन झाले आहेत. हे खडकरूप आश्रया! आपला राग व क्रोध सोड, ऊठ आणि आह्मांस तट असा हो, आणि सूर्याचा प्रकाश सातपट तेजस्वी कर.[1]

הרגת ביום אפך तूं आपल्या क्रोधाच्या दिवशीं (आमच्या लोकांचा) वध केलास व त्यांची कत्तल उडविलीस; तुजला दया आलीच नाहीं. पूर्वी आह्मी पवित्र राष्ट्र व देवदूतांच्या बरोबरीचे होतों; परंतु आतां आह्मी मेंढरांसारिखे बहकलों आहों, आणि तुझ्या आज्ञा उल्लंघिल्या आहेत. स्त्रीच्या प्रसूत वेळेसारिखे भंगामागून भंग आह्मांवर आले; जवळून जाणारे सर्व मजवर दांत कडकडवितात; ते तुझ्या वतनींहि शिरले आहेत. अनेक दुःखांनीं मला गांठिलें, आई लेंकरांवर आपटून मेली, तुझ्या कुरणांतल्या शेरडांचा शेष रात्रीं थंडींत उघडा पडत आहे. आमच्या सर्व शत्रूंनीं आमचा वध केला, आमच्या सर्व मनःप्रिय वस्तु

---

१ ही ह्मण यशाया अ. ३० ओ. २६ वरून घेतली आहे.

त्यांनीं घेतल्या, आणि आमच्या सर्व पापांमुळें त्यांनीं तुझ्या पवित्र स्थानाचा नाशहि केला. दुःखाचेच दिवस मजपुढें येतात, माझा सर्व हर्ष खेदकारक होतो, रात्रीं माझें मन भ्रमतें, तरी आतां तुझें मुखकमल पहाण्याची आवड मला झाली आहे. वादळांत सांपडलेली व पीडलेली अशा नामानें म्हटलेली खोल खांचेंतून ओरडत आहें; तर आतां तूं एलीया भविष्यवाद्यास पाठीव म्हणजे तुझ्या इष्ट बंदरीं[1] आम्ही तुझी स्तुति करूं.

זאבי ערב अधाशी लांडगे व दबा धरून बसणारे सर्व अस्वल यांनीं माझी हर्षयुक्त नगरी ओसाड केली आहे, त्यांनीं मला तरवारीनें जिंकून पाडाव करून नेलें आहे; माझा न्याय कोणीच करीत नाहीं व माझा वाद कोणीच उचलीत नाहीं; पाहा, मी पारव्यासारिखी (सुंदर) असतां, कावळ्यासारिखी काळी पडलें आहें; कारण त्यानें माझ्या घराचा नाश केला आहे. माझें पवित्र मंदिर पाणकोळी व सायाळ यांचें वतन झालें आहे, म्हणून रडण्यानें व शोकानें माझें डोकें जलमय झालें आहे; एफोदाबद्दल[2] मूर्ति दृष्टीस पडतात, तर मी आश्रयाकरितां कोणाजवळ रडूं, शोक करूं व लोटांगण घालूं? कोश व होरेबांत मिळालेल्या पाट्या राखून ठेवण्याच्या मंदिरीं वधस्थंभाची पीडा मात्र दिसून येते[3], माझ्या पापामुळें कादेशांत मी रडलों व अश्रू गाळिलीं, (केनाआन देशाविषयीं) वाईट वर्तमान आणणारांच्या शब्दांवर भरंवसा ठेविल्यामुळें माझ्या पवित्र वसतिस्थानांतून (देवानें) मला हांकून लाविलें; ज्या रात्रीं मी तेथें रडलों, त्याच रात्रीं पिढोपिढीं रडण्याचा नियम चालत आला आहे; मी येहूदाच्या कन्येचा पक्ष धरून बोलतों, कारण आश्रय नाहींसा झाला आहे. परात्पर देवाचे पुत्र आश्चर्यकारक प्रकारें नीचावले आहेत; ते खंडणी भरूनहि सोडविले जाणार नाहींत, आशाप्रकारें विकले गेले आहेत; कारण सीयोनेच्या कन्येचें गौरव ओसरलें, तिच्या मंगलमंचकाचें वैभव गेलें, अनेक जातीचे लोक एकत्र होऊन

---

१ तुझ्या प्रिय येरूशालेम नगरीं. २ एफोद म्हणजे मुख्य याजकाचा उरपट. ३ कोणीं हें वाक्य "सकाळीं व संध्याकाळीं पिडाच दिसण्यांत येतें" असें वाचितात. ४ इ. वाणीवर. ५ इ. संध्याकाळची छाया ओसरली आहे.

परमेश्वराच्या राहुटींत राहणारांवर व जवळ जाणारांवर खोटे आळ घेतात. माझे सर्व दिवस दुःखांत जातात व संपतात, कारण मी बंदांत पडलों आहें, त्यांतून मी निघूं शकत नाहीं; माझे स्वस्त असणारे शत्रु चढले आहेत, त्यांनीं माझ्या लेंकरांस धरून नेलें व त्यांजवरील सर्व अलंकार हिरावून घेतले, आणि नेऊन आश्शुराच्या वाद करणाऱ्या राजास नजर केले. हे माझ्या पारव्या ! तूं माझी व माझ्या वचनाची आशा कर; कारण मी पुनः पूर्वीप्रमाणें आपला मंडप उभारीन, आणि तेथें मी आपला राजा दावीद याचा दीपक सिद्ध करीन; तूं शुद्ध होऊन प्रतीक्षा कर, ह्मणजे सुंदर मुखाची व मंजुळ शब्दाची जी मंडळी, तिजवर दबा धरून येणाऱ्या पशूंचा मी निषेध करीन.

שומרון קול תתן शोमरोनें मोठ्यानें ओरडून ह्मणते, मला माझ्या अपराधांनीं गांठलें आहे, आणि माझीं लेंकरें मजपासून परदेशीं गेलीं आहेत; आणि आहोलीबा आरोळी करून ह्मणते, माझा वाडा जळाला, आणि सीयोन ह्मणते, परमेश्वरानें मला सोडिलें आहे. (शोमरोन उत्तर करून ह्मणते), अगे आहोलीबा ! माझ्या दुःखासारिखें तुझें दुःख आहे असें तूं समजूं नको; माझ्या भंगाशीं तुझ्या भंगाची तुळणा करितेस काय ? मी आहोला (आपल्या सरळ) मार्गापासून वळलें व ताठरपणें फितूर केला, माझा दगा मजवर उठला व माझें बंड मजविरुद्ध साक्ष देतें; हें माझें ऋण मला थोडक्याच दिवसांत फेडावें लागलें; तिगलाथ पिलएसेर यानें माझ्या कष्टांचें फल खाल्लें, त्यानें माझे अलंकार लुटले व माझे मोलवान पदार्थ हिरावून नेले, आणि हाला व हाबोर एथें मला कैद करून ठेविलें, अगे आहोलीबा ! उगी राहा, मी रडतें तसी तूं रडूं नको, मला दूर हांकून लाविलें आहे व माझे क्लेश पुरे असे झाले आहेत, तुझीं वर्षें वाढलीं तशीं माझीं वर्षें वाढलीं नाहींत. आ-

---

१ प्रियकर इस्राएला. २ इस्राएलांमध्यें दुफळी झाल्यावर इस्राएलांची राजधानी. ३ हें नांव येरूशालेमेस व येहूदाच्या राज्यास दिल्हेलें आहे. ४ हे नांव शोमरोनास व इस्राएलाच्या राज्यास दिलें आहे. ५ आश्शूराचा राजा; २ राजे अ. १६ ओ ७ पाहा. ६ इस्राएलाचें राज्य गेल्यावर १३३ वर्षांनीं येहूदाचें राज्य गेलें, इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालाअनुक्रम यांत ३२०५ आणि ३३३८ हीं वर्षें पाहा.

होलीबानें उत्तर केलें, मीहि तसेंच केलें व आहोलाप्रमाणें मीहि आपल्या तरुणपणाच्या भ्रताराशीं दगा केला; अगे आहोला! तूं उगी राहा; मला दु:खाची शिक्षा झाली आहे; तुला तर एकवेळ हांकून लाविलें, परंतु मला अनेक वेळा हांकून लाविलें; पाहा कासद्यांच्याच हातीं मी दोनवेळ पडलें, ज्या माझ्या मंदिरीं माझें वैभव होतें तें जळालें, नंतर पीडलेल्या पाडावाप्रमाणें मी बाबेलास गेलें; पुन: सीयोनेस परत येऊन मी आपल्या मंदिराचा पाया घातला, परंतु यावेळींहि कांहीं वेळ टिकलें नाहीं, इतक्यांत शत्रूनें मला नेलें, आणि बहुश: माझा नाश झाला आहे व माझा समुदाय सर्व देशीं विखरला आहे. हे सर्वांवर दया करणाऱ्या (दयासागरा!) त्यांच्या अपकर्षाची तुला दया येऊंदे, त्यांच्या ओसाडीकडे व त्यांच्या दीर्घ प्रवासाकडे तूं पाहा, त्यांची दरिद्रावस्था वाढावी ह्मणून तूं अतिशय संतप्त होऊं नको, त्यांचे अपराध व त्यांचा मूर्खपणा सदा तूं आठवूं नको, तूंच त्यांजवरील घाव बरे कर व त्यांच्या शोकाचें शांतवन कर; कारण तुजवरच त्यांची आशा व तृषा आहे; तूंच त्यांचे दिवस पूर्वीप्रमाणें नवे कर ह्मणजे "मग परमेश्वरानें मला सोडिलें" असें सीयोन ह्मणणार नाहीं.

קול יללה मी आक्रोश करून रडतों, आणि मोठा आकांत करून ओरडतों, यावरून सर्वांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहातात; माझें डोकें पाण्यानें कोण भरील! आणि माझे डोळे अश्रूचे झरे असे कोण करील! आक्रोशाची वाणी चवाठ्यांत व रस्त्यांत कसी ओरडते! आणि घायाळ झालेले कसे कण्हतात! माझ्या लोकांच्या कन्येच्या ओरडण्याची वाणी दूर देशाहून ऐकूं येते; यामुळें माझ्यानें शांत रहावत नाहीं. आक्रोशाची वाणी व नाशाची वाणी सर्व प्रदेशीं ऐकूं येते, माझें नगर घायाळ झालेल्यांनीं व कबरेंत उतरणाऱ्या प्रेतांनीं भरलें ह्मणून प्रत्येक मनुष्यानें आपले हात कंबरेवर ठेविले आहेत असें मी पहातों, यावरून मीहि आपलें डोकें डुलवितों. आक्रोशाची वाणी काढून बाप व पुत्र कसे एकत्र रडतात! सर्वांचीं तोंडें कशीं पिकट झालीं! (याचें कारण असें कीं,) तरवारीनें आपली तृप्ति करून घेतली आहे, ती मानेवर येऊन पोंचली आहे.

---

१ येहोयाखीन राज्याच्या वेळीं एकवेळ २ राजे अ २४ ओ ११, आणि सिदकीया राजाच्या वेळीं एक वेळ. २ राजे अ. २५. २ ही म्हण इर्मेया अ. ३० ओ. ६ येथून घेतली आहे.

אלה אזכרה या (पुढील) गोष्टींचा जेव्हां मला आठव होतो तेव्हां मी आपणावर आपला जीव ओतितों; कारण लांडग्यांनीं[1] न उलथलेल्या भाकरीसारिखें[2] मला गिळलें; आणि केसाराच्या दिवसांत धर्मावेशामुळें राजाज्ञेनें मारले गेलेल्या दहा (ईश्वरभक्तांस) कांहीं उपाय साधला नाहीं. गव्हांच्या राशीची उपमा[3] मिळालेल्या सुज्ञजनांच्या तोंडचें पुस्तक वाचून व लक्षांत घेऊन तो (केसार) त्या धर्मशास्त्रावर टीका करूं लागला, आणि निर्गम अध्याय २१ उघडून त्यांतील "जो मानसाला चोरून त्याला विकतो, किंवा हा त्याच्या हातांत सांपडतो, तर त्याला जिवें मारावें" या वाक्यावर त्यानें कुभांड रचिलें. त्या दुष्ट मूर्त्तिपूजकानें मनीं गर्व मानून आपल्या महालीं पायतनें भरायास आज्ञा केली, आणि शास्त्र व त्यांतील नियम व त्यांचें मर्म जाणणाऱ्या दाहा थोर सुज्ञ ग्रहस्थांस बोलाविलें. तो ह्मणाला "कोणी माणूस आपल्या भावांतला, ह्मणजे इस्राएलांच्या संतानांतला प्राणी चोरून बंद करितो किंवा त्याला विकितो" याचा न्याय तुह्मी सत्यतेनें करा, त्यांत कांहीं विपरीत करून खोटा न्याय सांगूं नका, परंतु जें सत्य तेंच प्रकाशांत आणा. त्यांनीं त्यास उत्तर केलें कीं, तो चोर मरो; तेव्हां तो ह्मणाला कीं, मी शिक्षा करावी ह्मणून ज्यांनीं आपल्या भावांस विकलें आणि इश्माएली काफल्याशीं त्याचा व्यापार केला, आणि पायतनांबद्दल त्यांस दिल्हें, ते तुमचे पूर्वजे[4] आतां कोठें आहेत? तर आतां तुह्मी आपणावर तो ईश्वरी न्याय मान्य करा, कारण त्यांच्या दिवसांपासून तुह्मांसारिखे कोणी सांपडले नव्हते; जर ते आतां जीवंत असते, तर त्यांचा न्याय मी तुह्मांसमक्षच केला असता; परंतु तुह्मीच आतां आपल्या पूर्वजांची शिक्षा भोगा. (ते ह्मणाले,) आह्मांस तीन दिवसांचा अवकाश दे, इतक्यांत हा नियम आकाशांतून झाला आहे काय? हें आह्मांस कळेल; आणि जर आह्मी दोषी व अपराधी असलों, तर दयासागराचा निवाडा

---

१ क्रूर लोकांनीं. २ ही म्हण होशेया अ. ७ ओ. ८ एथून घेतली आहे; तिचा अर्थ असा आहे कीं, भुकेला मनुष्य भाकरी भाजतांना जशी ती अर्धकची घेऊन खातो, तसें मला क्रूर लोकांनीं अधाशीपणें गिळलें आहे. ३ ही उपमा सुज्ञजनांस शेलोमोचें गीत अ. ७ ओ. ३ एथें दिल्ही आहे. ४ याकोबाचे दहा पुत्र ज्यांनीं योसेफास विकलें ते.

आह्मी मान्य करूं. यावरून ते सर्व मूर्छित झाले, त्यांस घाम सुटला व ते थरथर कांपूं लागले; आणि हा निवाडा त्यांच्या ईश्वराकडूनच आहे, हें जाणण्याकरितां एलीशाचा पुत्र रिब्बी इश्माएल मुख्य याजक यानें ईश्वरी नाम स्मरून त्यांच्या प्रभूकडे चढून जावें ह्मणून त्या सर्वांनीं आपली दृष्टि त्याजकडे लाविली. रिब्बी इश्माएलानें शुद्ध होऊन मोठ्या भक्तिभावानें ईश्वरी नामाचें स्मरण केलें, आणि सणाचीं वस्त्रें पांघरणाऱ्या एका दूतास त्यानें विचारिलें; तेव्हां तो ह्मणाला, अहो प्रिय, सात्विक व सुज्ञ गृहस्थ हो! तुह्मी हें मान्य करा, कारण यांत तुह्मी सांपडले आहां, असें मी पडद्यामागून ऐकिलें आहे. रिब्बी इश्माएल उतरला, आणि हें ईश्वरी वचन त्यानें आपल्या मित्रांस कळविलें; तेव्हां त्या दुष्टानें इस्राएलांतील जे दोघे मुख्य, ह्मणजे एलीशाचा पुत्र रिब्बी इश्माएल मुख्य याजक आणि गमलीएलाचा पुत्र रब्बान शिमओन, जो इस्राएलांचा मुख्य अधिकारी यांस पहिल्यानें हिंमतीनें व धैर्यानें मारावें अशी आज्ञा केली. तेव्हां (रब्बान शिमओनानें) अर्ज केला, कीं आकाशांत वस्ति करणाराच्या सेवकाचें मरण मीं पाहूं नये, ह्मणून पहिल्यानें माझें डोकें उडविण्याची कृपा कर; यावरून त्या सर्पानें सोडत काढण्यास आज्ञा केली, आणि ती सोडत रब्बान शिमओनावर निघाली. त्या दुष्टानें लागलेंच बैल व पाडे यांच्या रक्ताप्रमाणें त्याचें रक्त पाडिलें, तेव्हां रिब्बी इश्माएल मोठ्यानें[1] व दुःखानें ओरडून ह्मणाला कीं, जी जीभ वक्तृत्वानें सुंदर भाषणें करीत असे ती कशी माति चाटूं लागली! तो थरथर कांपून मोठ्या दुःखानें त्याजविषयीं रडला, तेव्हां त्या दुष्टाची कन्या त्याच्या रडण्याची वाणी ऐकून उभी राहिली, आणि त्याचे सुंदर स्वरूपावरून ती आपल्या मनीं लुब्ध झाली, आणि तिनें आपल्या बापास त्याचा जीव वांचविण्याकरितां विनंति केली. त्या दुष्टानें ही गोष्ट नाकारिली; मग पहिल्यानें त्याच्या तोंडावरील कातडें काढावें असें तिनें त्याजपाशीं विनंति केली; तेव्हां त्या वैऱ्यानें तसें करायास अवकाश लाविला नाहीं; यावरून रिब्बी इश्माएल मोठ्या दुःखाच्या वाणीनें आपल्या आत्म्याच्या घडणाराकडे ओरडला. आकाशांतील सेराफीम दूतहि मोठ्या दुःखानें ओरडून ह्मणाले, हे झग्याप्रमाणें प्रकाश

१ इ. करण्याच्या आवाजाप्रमाणें.

परिधान करणाऱ्या ! शास्त्र हेंच काय ? आणि त्याचें वेतन हेंच काय? हे थोर व भयंकर देवा ! तुझा शत्रु तुझ्या नामाविरुद्ध अपवाद करितो; तो तुझ्या शास्त्रांतील वचनांची निंदा व त्यांचा धिक्कार करितो. तेव्हां आकाशवाणी होऊन असें उत्तर आलें कीं, जर पुनः एक शब्द निघाला, तर मी पृथ्वी पालथी घालून ती सर्व जलमय करीन, आणि माझें पादासन अस्ताव्यस्त व शून्य करीन; तर अहो दोन हजार वर्षें राखून ठेविलेलें शास्त्र आचरणारेहो ! हा निवाडा मजकडून झाला आहे, तो तुह्मी मान्य करा. शास्त्रांतील नियम मोठ्या निष्ठेनें आचरणारे आणि बहुतकरून प्रार्थनामंदिरींच वास करणारे मारले गेले. डाळिंबाप्रमाणें त्यांच्या अंगीं पुण्याई भरली होती, ठिकाणोठिकाणीं[2] ते शास्त्रीय विषयांवर व्याख्यानें देत असत, त्यांतील एक रिब्बी आकीबा जो अक्षरांवरील निरनिराळ्या चिन्हांचाहि अर्थ सांगत असे, त्यास आणायास त्या दुष्टानें आज्ञा केली, आणि खवणीसारख्या टोंकांच्या शस्त्रानें त्याचें मास खवणिलें. मग त्यानें तेरादयोनाचा पुत्र रिब्बी हानानया यास त्याच्या एकांत अभ्यास करण्याच्या कोठडींतून आणायास आज्ञा केली, आणि जळून त्याची लवकर खाक होऊं नये ह्मणून द्राक्षवेलाच्या डाहळ्या त्याच्या अंगाभोंवत्या बांधिल्या, आणि भिजलेल्या लोंकरेचे थर त्याच्या हृदयावर ठेविले; तरी तो आणि त्याजबरोबर शास्त्राची एक प्रत अशीं लागलींच जळून भस्म झालीं. अहो सर्वभावें न त्यागलेल्या लोकांनो ! शोक करा; कारण नम्र लोक मारिले गेले, आणि त्यांचा रक्तपात झाला आहे; त्यांनीं ईश्वरी नामाकरितां आपले प्राणहि अर्पण केले; याप्रमाणेंच रिब्बी हुसपिथ जो तर्जुमा करणारा हा मारला गेला. रिब्बी एलआझार जो शम्मूवाचा पुत्र याच्या वधाची गोष्ट ऐकणारास थरकांप सुटो, त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालोत, आणि त्याचा सर्व हर्ष पालटून खेद होवो. मौज करणाऱ्या लोकांनीं (आपल्या मौजेकरितां) आमचा नाश व विघात केला आहे; पृथ्वीवरील सर्व राजांपेक्षां त्यांनीं आमचा अधिक पाठलाग केला आहे; आणि दामाचा पुत्र यहुदा यासारिखे आह्मांमधले त्यांनीं किती मारले आहेत ! आह्मी शास्त्रांतील आज्ञा मोडाव्या ह्मणून त्यांनीं आह्मांवर फारच जबरी केली; त्याकरितां जें द्रव्य

---

१ टीका ३०. २ कोनोकोनीं.

व जी खंडणी आह्मी त्यांस देत होतों; ती त्यांनीं नाकारिली आणि इशबाब जो लेखक यासारख्या शास्त्रांतील मधुर वचनाचें मनन करणाराचे प्राण घेण्यास त्यांनीं हट्ट धरिला. माझ्या शत्रूंनीं व पीडणारांनीं माझा मोड केला, माझ्या मोलवान पदार्थांनीं त्यांनीं आपलीं पोटें भरून घेतलीं, आणि हाखीनायाचा पुत्र जो रिब्बी हानीना याच्या वधावरून त्यांनीं मला केवळ विष प्यावयास व कडू दवणा खावयास दिल्हा आहे. (हे देवा,) तूं ह्मटलें आहेस, कीं याकोबाचा घराणा अग्नि व योसेफाचा घराणा जाळ आहे; परंतु पाहा ! आतां त्यांचा अग्नि विझाला आहे; कारण शत्रूंनीं शत्रुत्वानें मसलत करून त्या मारलेल्या दहा सात्विकांमध्यें बाबाचा पुत्र येहुदा यासहि त्यांनीं मारिलें. आशा नेमिलेल्या नाशाप्रमाणें मारले जाणारांचें कण्हणें पिढोपिढीं ऐकूं येतें; शत्रु त्यांस ह्मणतात कीं, अहो नायकांनो ! तुह्मी दूर व्हा, कारण तुमच्या अंगीं पालीसारिखी अशुद्धता आहे; तर आतां मला सहाय कोठून येईल ! परमेश्वर जो आकाशाचा व पृथ्वीचा कर्त्ता, याकडूनच मला सहाय होईल.

אמרה ציון सीयोन ह्मणते, मी आपल्या अपराधांत सांपडलें, आणि माझीं लेंकरें परक्या देशांत निघून गेलीं आहेत; परंतु माझीं उल्लंघनें जरी वाढलीं आहेत, आणि मी जाणून केलेले अपराध जरी बहुत झाले आहेत, तरी हे परमेश्वरा ! तुझी पूर्वींची दया कोठें आहे ?

परमेश्वर ह्मणतो, हे सीयोने, तूं माझें विश्रांतिस्थान होतीस, सर्व लोकांपेक्षां तुझे लोकांस[1] माझा खासगी लोक असें मीं ह्मटलें होतें; परंतु तूं माझे निषेधास मान्य झाली नाहींस, आणि तूं माझें शास्त्र सोडलेंस, ह्मणून मीं आपला राग तुजवर ओतला आहे.

सीयोन ह्मणते, माझ्या आशेचा भंग झाला आहे, माझीं अनाथ झालेलीं लेंकरें, जीं थरथर कांपून ओरडतात, त्यांच्या ओरडण्याची वाणी ऐकून माझा प्रकाश अंधारमय झाला आहे; तरी कृपा करायास देव विसरला आहे काय ? क्रोधेंकरून त्यानें आपला कळवळा बंद केला आहे काय ?

परमेश्वर ह्मणतो, तूं आपलीं ओंगळ कर्में वाढविलीं आहेस, तूं अनेक वेळा अविश्वासानें वागलीस, ह्मणून तुझा नवरा जो तुझा उत्पन्नकर्त्ता, यानें तुला धिक्कारिलें आहे, तुझ्या उदरांतून निघालेल्या दगाखो-

१ इ. तूं

रांनीं तुजशीं दगा केला आहे, आणि तुझ्याच लेंकरांतून तुझे मोडणारे व तुला ओसाड करणारे निघाले आहेत.

सीयोन ह्मणते पहिल्यानें मी कशाकरितां रडूं? माझ्या पवित्र मंदिराच्या नाशाकरितां काय? अथवा या भयंकर पाडावपणाकरितां काय? हे माझ्या पवित्र खडकरूप आश्रया! ज्या त्वां आमचा क्षय केला आहेस त्या तुजकडे आमच्या प्रार्थनेनें चढूं नये ह्मणून त्वां आपणास ढगांनीं झांकून घेतलें आहे काय?

परमेश्वर ह्मणतो, पाहा, तूं आपल्याच फांसांत गुंतली आहेस, तुझ्या अतिलोभामुळें तुझ्या पवित्र मंदिराचा नाश झाला आहे, तुझ्या पवित्र खडकरूप आश्रयानें तुझ्या तारुण्यांतील पापांची झडती घेतली आहे; कारण तूं आपल्या नवऱ्यावर फितून भ्रष्ट झाली आहेस.

सीयोन ह्मणते, मी काय उत्तर देऊं! आणि मी काय ह्मणूं! माझ्या बहुत अपराधांमुळें माझा हर्ष पालटून शोक झाला आहे, आणि माझ्या वस्तिस्थानाच्या नाशाकरितां मी मोठ्या खेदानें ओरडत आहें; पाहा, कुशलाच्या ठिकाणीं मला मोठें दुःख प्राप्त झालें आहे.

परमेश्वर ह्मणतो, तुझ्या आश्रय देणारानें तुजशीं दगा केला आहे, कारण तुझ्या शत्रूनें व तुझ्याच पाहारेकऱ्यानें एकत्र मसलत केली; या गोष्टी मी तुला सर्व भविष्यवाद्यांच्या भयंकर व उग्र वचनांकडून कळविल्याच होत्या.

सीयोन ह्मणते, माझ्या अपराधांमुळें मला हाय हाय असो! कारण खरोखर व निश्चय यामुळेंच माझ्या राजवाड्याचा नाश झाला; परंतु जरी मीं उल्लंघनें केलीं, आणि माझे अपराध वाढले, तरी परमेश्वर सर्वकाळ मला अव्हेरील काय?

परमेश्वर ह्मणतो, तूं आपल्या पाडावपणांत शांतवन पाव, जरी तुझ्या पापांमुळें मी तुझ्या वस्तिस्थानाचा नाश केला आहे, तरी तुझ्या कल्याणाकरितां मी तुझी आठवण करीन, आणि तुझ्या पाडावांस परत आणीन; कारण तुझ्या परिणामाविषयीं आशा आहे.

לשכינה עלתה शेखीना वर निघून गेला ह्मणून शोक फार वाढला आहे; अरेरे, मला हाय हाय!

१ इ. विख्यात.

शास्त्र जळालें ह्मणून तुह्मी खेदानें शोक करा; अरेरे मला हाय हाय!

प्रार्थनामंदिरांकरितां आणि विचारवंत गृहस्थांकरितांहि; अरेरे, मला हाय हाय!

तरुणांच्या वधाकरितां आणि सात्विकांच्या कत्तलीकरितांहि; अरेरे, हाय हाय!

पवित्र मंदिरांच्या नाशाकरितां तुह्मी कठोर शोक करा; अरेरे, मला हाय हाय!

गर्भार आणि स्तन पाजणाऱ्या बाया, ज्यांचे जीव भुकेनें व तान्हेनें व्याकुळ झाले आहेत त्यांकरितां; अरेरे, मला हाय हाय!

तान्हीं लेंकरें, ज्यांचे प्राण पाण्याकरितां शोषले आहेत त्यांकरितां; अरेरे, मला हाय हाय!

शाळेंत जाणाऱ्या अर्भकांच्या भयंकर नाशाकरितां; अरेरे, मला हाय हाय!

אללי לי אללי माझ्या दुराचारामुळें हाय हाय, मला हाय हाय! माझ्या बालकांच्या पाडावपणामुळें हाय हाय, मला हाय हाय! माझें आयुष्य दुःखांतच कसें संपतें! सर्व नालायक मनुष्यें मजशीं वादच करितात, मी चाकरासारिखा होऊन ते मजवर अधिकार चालवितात, माझा धनी कोण, हें मला कळत नाहीं; एक त्रास देतो, दुसरा पीडा करितो, आणि तिसरा हटकून छळतो; अगे माझ्या आई! तूं मला कलहाचा पुरुष व विवादाचा पुरुष असा प्रसवली आहेस ह्मणून मला हाय हाय! मी रात्रंदिवस रडत बसतों, कारण माझ्या भंगाचा शेवट होणें तो लांबविला आहे; मी आईच्या उदरीं असतांच कां मेलों नाहीं! माझी आईच माझी कबर कां झाली नाहीं! कारण जो कोणी इस्री या नामानें ह्मटला जातो, त्यास सर्व मनुष्यांचा धिक्कार सोसावा लागतो; मजवरील घाव वाढूं लागले आहेत, माझा मोड झाला ह्मणून मला हाय हाय! मजवर वार करणारानें मला पाडाव करूनहि नेलें आहे, त्यानें माझे मार्ग दगडानें आडविले आहेत; माझा दिवा अकस्मात विझाला, दिवस असतांहि माझा सूर्य अंधारमय झाला; इस्राएलांचें वैभव गेलें, त्यांस रूप नाहीं व शोभा नाहीं; माझ्या सूर्याचें तेज दिपलें, माझा प्र-

काश तेजरहित झाला; मी मेशेखांत प्रवास करितों, व केदाराच्या डे-ऱ्यांजवळ वास करितों ह्मणून मला हाय हाय! माझें वैभव लवकर सुकणाऱ्या गच्चिवरील गवतासारिखें झालें आहे; मळाप्रमाणें मी उडविला गेलों, सर्व प्राण्यांपुढें मी खतासारिखा झालों आहें; शत्रु माझ्या पाठीस लागून (आपल्या सोबत्यांस) हाक मारून ह्मणतात, पीक तयार आहे ह्मणून इळा घाला; मी वगळलेल्या उन्हाळ्यांतल्या फलाप्रमाणें व हंगामांतल्या द्राक्षाप्रमाणें झालों आहें ह्मणून मला हाय हाय!

הנותן בים דרך जो समुद्रांत मार्ग करणारा आणि अगाध जलांत वाटा पाडणारा, तोच आमच्या तारणाकरितां त्वरा करील, आणि तोच आमचा पक्ष धरून आमचा वाद चालवील; तोच आमच्या पूर्व स्थितीपेक्षां आमची उत्तर स्थिति चांगली करील. हे परमेश्वरा! आह्मास तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं; जसें लिहिलें आहे, कीं हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

עד אנה सीयोनेंत शोक व येरूशालेमेंत विलाप कोठपर्यंत चालेल? हे परमेश्वरा! फीर, सीयोनेवर दया कर, आणि येरूशालेमेचीं गांवकुसें बांध; जसें लिहिलें आहे, कीं तूं उठून सीयोनेवर दया करशील, कां तर तिजवर कृपा करण्याची वेळ झाली आहे; ह्मणजे ह्मटल्याप्रमाणें परमेश्वराचे उद्धरलेले उत्सवानें सीयोनेस परत येतील, आणि त्यांच्या माथ्यांवर अक्षय हर्ष होईल, ते आनंद व हर्ष पावतील, आणि शोक व कण्हणें पळून जातील.

यानंतर קדיש דהוא עתיד ह्मणून शास्त्र काढितांना हें पुढील ह्मणतात.

על היכלי मी आपल्या मंदिराकरितां, आणि विटाळलेल्या सीयोन नगराच्या सुंदरपणाकरितां रात्रंदिवस रडत आहें. सुंदर देश व सुंदर येरुशालेम यांचा दोन वेळ नाश झाला ह्मणून, आणि त्यांतील लोक पाडावपणांत गेले ह्मणून मी नेहमीं रडत आहें. माझ्या सुंदर मंदिराचा शत्रूनें नाश करून टाकिला आहे, आणि नेबायोथ व शम्मा यांच्या हातीं

१ मेशेख हा याफेताचा पुत्र व केदार हा इश्माएलाचा पुत्र होता, या दोघांचीं संतानें फार क्रूर व रानटी होतीं. २ नेबायोथ हा इश्माएलाचा पुत्र व शम्मा हा एसावाचा नातू होता.

मला कैद करून ठेविलें आहे ह्मणून मी शोकाच्या वाणीनें नेहमीं रडत आहें. हे शास्त्रा, तुझें सुंदरपण विटाळलें गेलें ह्मणून शोक कर; तुझा नाश झाल्या दिवसापासून तुझा मुगुट पडला आहे; तर तूं आहोलीबा व [1]आहोला यासाठीं विलाप कर. अहो माझे लोकहो! धैर्य धरा; लवकरच मी तुमचें मंदिर बांधीन; सूड घेण्याचीं वस्त्रें पांघरून मी तुह्मांस तुमच्या पाडावपणांतून परत आणीन; आणि पूर्वीप्रमाणें मी आपल्या मंदिरीं वास करीन; कारण सीयोनेंतून शास्त्र व स्तुति हीं निघतील.

ספרי והלילי हे येकूथीऐलच्या[2] शास्त्रा! आरीऐलाच्या[3] पाडावपणाकरितां, आणि जे एदोम व इश्माएल यांमध्यें मोठ्या संकटानें प्रवास करीत आहेत, त्यांकरितां शोक व विलाप कर, आणि तरट पांघरून सुंभाचा कंबरबंध बांध; पवित्र देवाचे लोक यांच्या वधाकरितां तूं रड; कारण तरवारीनें इस्राएलाचे शेष खाऊन टाकिले आहेत. हे पवित्र शास्त्रा! सर्व देशांमध्यें मुख्य असा जो इस्राएलाचा देश, त्याकरितां शोक व विलाप कर; पुष्कळ अपराधांमुळें तो परस्वाधीन झाला आहे; पवित्र डोंगराकरितां व हैरएलांच्या[4] नाशाकरितां तूं रड. हे पूर्ण शास्त्रा! पवित्र मंदिरांत परक्यांनीं येऊन रागानें व क्रोधानें अग्नि लाविला ह्मणून शोक व विलाप कर आणि अश्रु गाळून व हृदय फोडून याजविषयीं रड.

קומי וספרי תורה हे शास्त्रा! ऊठ आणि शोक कर; या आब महिन्याच्या नवव्या तारखेस संकटाच्या, त्रास होण्याच्या, व क्रोधाच्या दिवसाची, आणि ज्या दिवशीं (ईश्वराचा) राग मजवर चेतला, आणि मंदिराचा व त्यांतील आंगणाचा नाश झाला त्याची आठवण करून विलाप कर; मोठ्यानें व खेदानें ओरड, कारण शास्त्राचा असाच नियम आहे. तूं आपल्या मनीं अत्यंत दुःखानें प्रश्न कर, कीं शेखीनाचें राहण्याचें ठिकाण आणि लेव्यांचीं घरें व त्यांचीं मंचकें कोठें आहेत? सत्यशील मनुष्यें कोठें आहेत? विश्वासू नगरीचें वैभव कोठें गेलें? पहिल्यानें मागणी केलेली कशी वेश्या झाली? यावरून प्रसूत होणाऱ्या स्त्रीच्या वेदना सोसणाऱ्या मनाप्रमाणें तुझें मन मोठ्या खेदानें

---

१ येरुशालेम किंवा येहूदाचें राज्य, व शोमरोन किंवा इस्राएलांचें राज्य. २ मोशेच्या. ३ येरुशालेमेच्या. ४ येरुशालेमेच्या.

ओरडो. तुझे पाठशाळेचे अध्यक्ष कोठें आहेत? आणि तुझी सनहेद्रीनें सभा कोठें आहे? तुझ्या नीतीच्या मार्गानें वर्तून तुझ्या गौरवाचें तेज प्रकाशित करणारे कोठें आहेत? तुझ्यांतील गुह्य गोष्टी विचारणारांस उत्तरें सिद्ध करून ठेवणारे कोठें आहेत? तुझ्या रीतिभातींचे शोध करणारे हजारों हजार शत्रूच्या हातीं बंदांत पडले आहेत. अर्पणें वाहणारे कोठें आहेत? तेल काढणारें कोठें आहेत? होमांचे तुकडे रचणारे आणि दर्शनीय भाकरींचें गुह्य जाणणारे कोठें आहेत? हुजऱ्यांच्या सरदारानें येऊन आईबाप व लेंकरें यांस एकदांच मारिलें; आणि सरदारांनीं बांधलेले दरवाजे शोक व विलाप करीत आहेत; कारण. ईश्वरानेंच आपली तरवार बोलाविली आहे, आणि आपले तीर सोडले आहेत.

בִּמְקוֹם אַשְׁרֵי הָעָם हे लोक धन्य असें ह्मणावें, तर सोनें[२] कसें निस्तेज झालें? परमेश्वराला थोर माना असें आमच्या समुदायानें ह्मणावें, तर आमच्याच डोक्यावरील मुगुट पडला आहे. तो मुगुट आह्मीं घालावा तर आह्मास नागाचें विष व कडू पदार्थ चोखावे लागले आहेत. (शास्त्राच्या प्रतीवर) सुंदर रुमाल घालावा तर पडदा सुद्धां नाहींसा झाला आहे. आकाशानें हर्ष करावा असें ह्मणावें तर आह्मास दुप्पट शोक करावा लागला आहे. त्यांचा प्रकाश तेजस्वी असावा परंतु त्यांस गोणताटानेंच झांकून टाकिलें आहे.

בִּמְקוֹם יִשְׂמְחוּ הַשָּׁמַיִם आकाशानें हर्ष करावा असें ह्मणावें तर अहो आकाशांनो! तुह्मी याविषयीं विस्मित व्हा, असें ह्मणावें लागलें आहे. पृथ्वीनेंहि हर्ष करावा असें ह्मणावें, तर विघ्नेंच येतात, ह्मणून माझें मन खेदित झालें आहे. सीयोन डोंगरानें हर्ष करावा असें ह्मणावें, तर माझ्या बंडखोर विचारामुळें माझे हात अशक्त होऊन गळून पडले आहेत. येहूदाच्या कन्यांनीं हर्षावें असें ह्मणावें, तर मीच आज शोक व विलाप करीत आहें. (ईश्वर) सर्वांपेक्षां थोर मानिला जावो असें ह्मणावें, तर मीच आपल्या डोईवरील केंस उपटितों, आणि माझें रडणें बंद होत नाहीं. तो पवित्र मानिला जावो असें ह्मणावें; तर

---

१ टीका. ३१ २ ही सोन्याची उपमा इस्राएलांस दिली आहे; ती विलापाचें पुस्तक अ. ४ ओ. १ एथून घेतली आहे.

पवित्र वस्तु व पवित्र मंदिर यांच्या नाशामुळें मलाच नवीन शोक करावा लागतो. जें देवानें उत्पन्न केलें आहे त्या जगभर मी यादिवशीं बादळांतून ओरडतों. आणि भयंकर देवाच्या मंदिराचा नाश, आणि याजकांचा व भविष्यवाद्यांचा हुद्दा रद्द होणें, या गोष्टी त्याच्या व त्याच्या भिणारांच्या इच्छेविरुद्ध झाल्या ह्मणून शास्त्र उदास व शून्य होऊन बसलें आहे. आपले लोक इस्राएलांचें घराणें यांच्या इच्छेविरुद्ध अरे आरीएला, हाय हाय अशी अरोळी तें आज करितें. आमच्या नेमशास्त्राच्या कोशावरून शेखीना निघून वर गेला ह्मणून आह्मास लज्जा प्राप्त होते. आणि आह्मी आपल्या हद्दींत जाऊं तोंपर्यंत हर्ष करण्याबद्दल आह्मी दु:खाचे उसासे टाकीत आहों. (तर हे देवा!) तूं आपला राज्याधिकार प्रगट करून आह्मास दाखीव.

यानंतर शास्त्रांतून अनुवाद अ. ४ ओ. २९ पासून ओ. ४० पर्यंत वाचायास तीन मनुष्यें स्वतां उठून जातात; तिसरा मनुष्य शेवटपर्यंत वाचून קריש לעילא वाचितो, आणि पुढील व मागील धन्यवाद करून हाफतारा ह्मणजे भविष्यकथनांतील भाग इर्मेया अ. ८ ओ. १३ पासून अ. ९ ओ.२४ पर्यंत वाचितो; मागील धन्यवाद तो מגן דוד एथपर्यंत मात्र वाचितो. मग हाज्झान אשרי व दुसरें वाक्य सोडून ובא לציון व תתקבל קריש वाचून शास्त्र ठेवायास नेतो; आणि तें नेतांना יהללו बद्दल על נהרות בבל गीत १३७ म्हणतो. मग इर्मेयाचा विलाप व ईयोब हीं पुस्तकें वाचितात; आणि त्या मागून בית יעקב इत्यादि नित्याप्रमाणें वाचून प्रार्थना पूर्ण करितात. या दिवशीं कोणताहि व्यवहार करूं नये; केल्यास तो सफल होत नाहीं; आणि दोनप्रहरपर्यंत पशू किंवा पक्षी कापूं नये व जेवणाची तयारी करायास लागूं नये अशी चाल आहे.

तिसऱ्या प्रहरची प्रार्थना.

ही प्रार्थना करतेवेळीं धन्यवाद करून सीसीथ पांघरतात व तेंफीलीन बांधितात. मग हाज्झान नित्याच्या तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेप्रमाणें למנצח על הגתית इत्यादि קריש לעילא पर्यंत वाचितो; मग संक्षेपांत יהי יי व ברוך המקום इत्यादि ह्मणून शास्त्र काढितो. त्यांतून इतर उपासांप्रमाणें ויחל משה हा भाग तीन मनुष्यें वाचितात, आणि तिसऱ्या मनुष्यानें तें वाचन संपविल्यावर तो पुढील व मागील धन्यवाद करून हाफतारा ह्मणजे भविष्यकथनांतील भाग होशेया अ. १४ ओ. २-१० आणि मीखा अ. ७ ओ. १८-२० वाचितो; परंतु मागील धन्यवाद-מגן דוד पर्यंत मात्र करितो. मग יהללו ह्मणून शास्त्र परत नेऊन ठेवितात; आणि קריש לעילא ह्मणून नित्याच्याप्रमाणें ארני שפתי ही प्रार्थना हळू व पुनः मोठ्यानें करितात, आणि तिजमध्यें उपोषणाकारणें עננו אבינו हा भाग, आणि תשכון בתוך ירושלם या भागाच्या शेवटच्या धन्यवादा अगोदर हें पुढील ह्मणावें लागतें.

נחם יי हे परमेश्वरा आमच्या देवा, सीयोनेकरितां शोक करणारांचें,

आणि येरुशालेमेकरितां शोक करणारांचें, आणि त्या नाश पावलेल्या, धिक्कारलेल्या व ओस पडलेल्या नगरीचें शांतवन कर. ती आतां लेंकरांवांचून बसली आहे; ज्या वांझेला लेंकरें झालीं नाहींत, त्या स्त्रीसारिखी ती बोडकी होऊन बसली आहे. गर्विष्ठांनीं तिला गिळलें आहे; आणि मूर्त्तिपुजकांनीं तिचें वतन घेतलें आहे. त्यांनीं तुझ्या इस्राएल लोकांस तरवारी पुढें टाकिलें आहे; आणि परात्पराच्या यथार्थ (भक्तास) हट्टानें वधिलें आहे. यास्तव सीयोन खेदानें रडते, आणि येरुशालेम मोठी वाणी काढून ह्मणते कीं, त्यांच्या पडलेल्या मुडद्यांवरून माझें मन धगधगतें, आणि त्यांच्या वधलेल्यावरून माझें अंतरयाम, माझें अंतरयाम कळकळतें. कारण हे परमेश्वरा, तूं तिला अग्नीनें जाळिलेंस; आणि तूं तिला पुनः अग्नीनें बांधिशील. जसें लिहिलें आहे, कीं परमेश्वर ह्मणतो, मी तिजभोंवता अग्नीचा कोट असत जाईन; आणि तिजमध्यें गौरव असा होईन.

याप्रमाणें אדני שפתי वाचल्यानंतर हीं पुढील गीतें व वाक्यें ह्मणतात.

נחמו נחמו עמי माझ्या लोकांचें शांतवन करा, शांतवन करीं,[1] असें कापराचा गेंद ह्मणतो; शास्त्रांत जें सर्व लिहिलेलें सांपडतें, त्याप्रमाणें त्यांचें शांतवन व्हावें आणि सीयोनेकरितां शोक करणारांस राखेच्या ठिकाणीं शोभा प्राप्त व्हावी (ह्मणून तसें करा). माझ्या लोकांच्या कन्येच्या पडलेल्या मुडद्यावरून, देवडीचा नाश झाल्यावरून व माझें मंदीर, ज्यास मी आपल्या नामानें ह्मटलें होतें, आणि ज्यास मी आपलें पादासन असें नांव दिल्हें होतें, तें ओसाड पडल्यावरून माझें मन धगधगतें; कारण एफा व एफेर[2] यांच्या संतानानें त्यांचा नाश करून ढीग करून ठेविले आहेत. सीयोनेच्या मनाशीं शांतवनाच्या गोष्टी करा, आणि तिनें आपणावरून आपल्या पाडावपणाचें वस्त्र काढून टाकावें असें तिला हाक मारून सांगा; कारण जेव्हां ती पश्चात्ताप करील, तेव्हां ईश्वर पुनः तिचें मंदीर विटाळूं देणार नाहीं; आणि परका लोक त्या सुंदर व मनोरम वतनावर अधिकार करणार नाहीं. (हे देवा,) या

१ यशाया अ. ४० ओ. १. २ ही उपमा शेलोमोचें गीत अ. १. ओ. १४ एथें ईश्वरास दिल्ही आहे. ३ आब्राहामाची बायको केटूरा इजपासून जन्मलेला मिदयान याचे हे पुत्र होते.

शोक करणाऱ्या लोकांचें शांतवन कर; जें जोकड ते वाहतात तें हलकें कर, त्यांस प्राप्त झालेली लज्जा दूर कर; त्यांजवरील भय दूर करण्याकरितां[1] दयेचा दूत पाठीव; नाशापासून तूं आपले लोकांस सोडीव; आणि त्यांची पूर्ण खंडणी पोंचली आहे असें ह्मण.

נחמו נחמו עמי माझ्या लोकांचें शांतवन करा, शांतवन करा, असें कापराचा गेंद ह्मणतो; शास्त्रांत जें सर्व लिहिलेलें सांपडतें, त्याप्रमाणें त्यांचें शांतवन व्हावें व सीयोनेकरितां शोक करणारांस राखेच्या ठिकाणीं शोभा प्राप्त व्हावी (ह्मणून तसें करा). मी राष्ट्रांकरितां, व सर्व पृथ्वीवर वास करणाऱ्यांकरितां आणि वतनाचा वांटा ह्मटलेल्या लोकांस[2] एलाम, एबाल, एफा व एफेर यांच्या देशांतून सीयोन डोंगराकडे परत आणण्याकरितां, आणि शोकाच्या ठिकाणीं त्यांच्या डोक्यावर त्यांस आनंदाचें तेल प्राप्त व्हावें ह्मणून मी झेंडा उभारीन. मूर्च्छित पडलेल्यांच्या समुदायास मी त्यांच्या पवित्र मंदिराकडे परतवीन, मी त्यांच्या शोकाचें शांतवन करीन, मग ते नृत्यानें हर्ष करितील. मी त्यांचा शोक पालटून आनंद करीन, आणि त्यांच्या दुःखांत मी त्यांस हर्षित करीन, तेव्हां त्यांचे शत्रु व पिडणारे आपणांस लज्जेनें व अपमानानें झांकून घेतील. मी येरूशालेम बांधीन, आणि तिच्या सभोंवतें अग्नीचा कोट आणि तिच्या वस्तीच्या घरांस गौरव असें होईन; तेव्हां ते तिच्या पुष्कळ कल्याणावरून ह्मणतील कीं, परमेश्वरानें सीयोनेचें शांतवन केलें आहे, तिच्या सर्व ओसाड्यांचें शांतवन केलें आहे; तोच त्याचें मधूर वचनाचें वतन पावलेल्या लोकांस तिजकडे परतवून तिजमध्यें सर्वकाळ स्थापन करील.

शांतवनाचीं ईश्वरी वचनें.

נחמו נחמו עמי माझ्या लोकांचें शांतवन करा, शांतवन करा असें तुमचा देव ह्मणतो. येरूशालेमेच्या मनाशीं समाधानाच्या गोष्टी करा आणि तिला हाक मारून सांगा कीं, ती आपल्या सैन्यानें पुनः भरेल, तुझें युद्ध करणें समाप्त झालें आहे, तुझ्या अन्यायाची क्षमा झाली आहे, आणि त्वां आपल्या सर्व पापांसाठीं परमेश्वराच्या हातून दुप्पट घेतलें आहे. जो तुझें शांत्वन करितो तो मी, मीच आहें; तूं अशी कशी

---

१ इ. बरें करण्याकरितां. २ इस्राएलास.

कीं, मनुष्य जो मरतो व मनुष्याचा पुत्र जो गवतासारिखा होतो त्या-जला तूं भितेस. तर परमेश्वर सीयोनेचें शांतवन करील, आणि तिच्या सर्व ओसाड्यांचें शांतवन करील; आणि तिचें रान एदेनासारिखें व तिचें जंगल परमेश्वराच्या बागासारिखें करील; त्यामध्यें आनंद व हर्ष, उपकार मानणें व गायनाचा शब्द हीं होतील. अहो आकाशांनो! उत्सव करा; अगे पृथ्वी! तूं उल्हास कर; अहो पर्वतांनो! गायन करीत सुटा; कां कीं, परमेश्वरानें आपल्या लोकांचें शांतवन केलें आहे, आपल्या पिडलेल्यांवर दया केली आहे. जे तुह्मी येरूशालेमेवर प्रीति ठेवितां, ते सर्व तिजसंगतीं हर्ष व उल्हास करा, जे तुह्मी तिजविषयीं शोककरितां, ते सर्व तिजशीं हर्षेंकरून आनंद करा. यासाठीं कीं, तुह्मी तिच्या शांतवनाचें स्तन पिऊन तृप्त व्हावें, आणि तिच्या गौरवाची विपुलता चोखून संतुष्ट व्हावें. जशी कोणेकाची आई त्याचें शांतवन करीती, तसा मी तुमचें शांतवन करीन; आणि येरूशालेमेंत तुह्मी शांतवन पावाल. तुझे पाहरेकरी आपला शब्द उंचावतील, शब्दानें एकदांच उत्सव करितील, कारण परमेश्वर सीयोनेला यथास्थित करील, तेव्हां ते प्रत्यक्ष दृष्टीनें पाहतील. येरूशालेमेच्या ओसाड स्थलांनो! एकदांच उत्सव करीत सुटा; कां तर परमेश्वरानें आपल्या लोकांचें शांतवन केलें आहे, येरूशालेम त्यानें खंडून घेतली आहे. मग परमेश्वरानें उद्धरलेले उत्सवानें सीयोनेस परत येतील, आणि त्यांच्या डोक्यावर सर्वकाळ हर्ष होईल, ते आनंद व हर्ष पावतील आणि शोक व कण्हणें पळून जातील. तुझा सूर्य पुनः मावळणार नाहीं व तुझ्या चंद्राचा क्षय होणार नाहीं; कारण कीं, परमेश्वर तुझी सर्वकाळची प्रभा होईल, आणि तुझ्या शोकाचे दिवस पूर्ण होतील. तर तुह्मी घाईनें निघणार नाहीं, आणि पळ काढित चालणार नाहीं; कारण कीं, परमेश्वर तुह्मापुढें चालेल, आणि इस्राएलाचा देव तुमच्यामागें संभाळील. तुझे सर्व लोक न्यायी होतील; आणि माझा महिमा व्हावा ह्मणून जसे माझ्या लावण्याचे रोप, माझ्या हाताचें कर्म तसे ते सर्वकाळ भूमीचें वतन भोगतील. जो लहान तो हजार होईल, आणि जो धाकटा तो मोठें राष्ट्र होईल; हें समयीं लवकर घडे असें मी परमेश्वर करीन. आणि असें होईल कीं, सीयोनांत जो वांचलेला व येरूशालेमांत जो उरलेला

त्याला पवित्र ह्मणतील; प्रत्येक जो येरूशालेमांतल्या जीवंतांमध्यें लिहिलेला आहे तो. गळते हात बळकट करा, लटपटीत गुडघे दृढ करा, जे घाबऱ्या हृदयाचे त्यांस ह्मणा, धैर्यवान असा, भिऊं नका, पाहा, तुमचा देव सूड उगवीत येईल, देव फेड करीत येईल, तोच येऊन तुह्माला तारील. मग तुह्मी हर्षानें निघाल, आणि तुमचें चालविणें कुशलानें होईल; तुह्मापुढें पर्वत व डोंगर उत्सव करीत सुटतील, आणि सर्व वनांतील वृक्ष टाळ्या वाजवितील. परमेश्वराच्या प्रसन्नतेचें वर्ष व आमच्या देवाचा सूड घेण्याचा दिवस गाजवून सांगायाला (त्यानें मला पाठविलें आहे.) बंदिवानांस बाहेर जा, जे अंधारांत आहेत त्यांस उघड दृष्टी पडा असें ह्मणायास (मला पाठविलें आहे). ते मार्गांवर चालतील व सर्व उंचवट्यांवर त्यांची चरण होईल. सीयोनांतल्या शोक करणारांस राखेच्या ठिकाणीं शोभा, शोकाच्या ठिकाणीं आनंदाचें तेल, खिन्न आत्म्याच्या ठिकाणीं प्रशंसेचें वस्त्र नेमून द्यावयाला; आणि त्याचा महिमा व्हावा ह्मणून त्यांस न्यायाचे वृक्ष परमेश्वराचें लावणें असें ह्मटलें जावें (ह्मणून त्यानें मला पाठविलें आहे). सीयोन न्यायेंकरून उद्धरेल; नीतीकरून तिचे परत आलेले उद्धतील. हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळेस तुजकडे माझी प्रार्थना आहे, हे देवा, तूं आपल्या परम कृपेनें, आपल्या उद्धारक सत्यतेनें मला उत्तर दे. परमेश्वराविषयीं माझा जीव उल्हासेल, त्याच्या तारणामुळें संतोष पावेल. म्यां तुझ्या दयेवर भाव ठेविला आहे, माझें हृदय तुझ्या तारणाविषयीं उल्हासेल; परमेश्वरानें मजवर उपकार केले आहेत, ह्मणून मी त्याला गाईन. हे प्रभू, ऐक; हे प्रभू, क्षमा कर; हे प्रभू, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कां कीं, तुझ्या नगरास, आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

यानंतर קדיש תתקבל, שיר המעלות בשוב יי, קדיש יהא שלמא, עלינו व לשבח वाचून ही तिसऱ्याप्रहरची प्रार्थना पूर्ण करितात.

उपोषणांचा दिवस समाप्त झाल्यावर संध्याकाळची प्रार्थना ही नित्याप्रमाणें करून चंद्रावरून करायाचा धन्यवाद तो करितात.

תם ונשלם שבח לאל בורא עולם

पृथ्वी उत्पन्न कर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

टीका.

टीका १.

भविष्यकथनाचा खोरा.

भविष्यकथनाचा खोरा ह्मणजे येरूशालेम; शास्त्रांतील बहुतेक भविष्यें तिजविषयीं कथलेलीं आहेत, ह्मणून तिजला असें नांव दिलें आहे.

टीका २.

तेबेत महिन्याच्या दशमीस इस्राएलांवर आलेलीं तीन अरिष्टें.

गणना अ. १७ ओ. ११ एथें लिहिलेली पटकी, नेबूखादनेसाराचें चढून येणें आणि एज्रा जो याजक व लेखक याचा मृत्यु, या दुःखाच्या तीन गोष्टी तेबेत महिन्याच्या दशमीस घडून आल्या.

टीका ३.

किरयाथ सेफेर एथें जय मिळविणारा वीर.

कालेबास हेब्रोन हें शहर मिळाल्यावर त्यानें असा पण मांडिला होता कीं, जो कोणी किरयाथ सेफर हा गांव जाऊन घेईल, त्यास मी आपली कन्या देईन; यावरून त्याचा भाऊ ओथनीएल यानें जाऊन तो गांव जिंकून घेतला आणि तो पणहि जिंकला. न्यायाधीश अ. १ ओ १२—१५ पाहा.

टीका ४.

पहिल्या पाट्या.

मोशे सीनाय डोंगरावर असतां इस्राएलांनीं सोन्याचें वांसरूं केलें; आणि त्यामुळें मोशेनें वरून येतांना ईश्वरानें दिल्हेल्या पहिल्या पाट्या फोडून टाकल्या. ही गोष्ट याच दिवशीं घडून आली. इस्राएलाच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम या पुस्तकांत २४४८ हें वर्ष पाहा.

टीका ५.

नित्याचें अर्पण बंद होणें.

दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं रोमी लोकांनीं जेव्हां येरूशालेमेस वेढा

घातला, तेव्हां अर्पणाचे पशु मिळत नाहीं असें झालें, ह्मणून नित्याचें अर्पण बंद पडूं लागलें, आणि तें पहिल्यानें तम्मूज महिन्याच्या सतराव्या तारखेस बंद पडलें. इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम या पुस्तकांत ३८२८ वें वर्ष पाहा.

टीका ६.

एग्लाईमाचा आक्रांत.

एग्लाईम हें मोआब देशांतील एक नगर होतें. त्याचें नांव शास्त्रांत यशाया अ. १५ ओ ८ एथें सांपडतें. या अध्यायांत मोआबाचा नाश होऊन एग्लाईमांत मोठा आक्रांत होईल असें ह्मटलें आहे; ह्मणून कवीनें एथें त्याची उपमा घेतली आहे. कोणी ह्मणतात कीं, मोआब देशांत एग्लाईम नांवाची एक नदी होती; तिजमधील वाहते पाण्याचा आवाज फार मोठ्यानें होत असे, ह्मणून त्या आवाजाची उपमा एथें मोठ्या आक्रांतास दिल्ही आहे. कोणी एग्लाईम या शब्दाचा अर्थ इयोब अ. ३८ ओ. २८ एथील אגלי טל या शब्दांच्या अर्थासारखा करून दहिंवराच्या टांकांतून जसें दहिंवर वाहतें, तसे मी अश्रु गाळितों, असा करितात.

टीका ७.

हादादरिम्मोनाचा शोक.

हादादरिम्मोन हें मेगिद्दो या सपाटीवरील एक ठिकाण होतें. कालवृतांत अ. ३५ ओ. २४–२५ एथें लिहिल्याप्रमाणें योशीया राजास मिसराचा राजा फारो नीखो यानें या ठिकाणीं मारलें, ह्मणून लोकांनीं तेथें मोठा शोक केला. यावरून जेखार्या अ. १२ ओ. ११ एथें मोठा शोक करणें यास हादादरिम्मोनाचा शोक अशी उपमा दिल्ही आहे.

टीका ८.

दोन दिवसांनंतर सजीव होणें.

हें वाक्य होशेया अ. ६ ओ. २ एथें सांपडतें हें ह्मणणें बाबेलच्या व हल्लींच्या या दोन प्रवासांविषयीं आहे, ह्मणजे या दोन प्रवासांनंतर ईश्वर आपल्या परम दयेनें इस्राएलांचें तारण करील.

टीका ९.

आपोसतेमोस.

आपोसतेमोस याविषयीं गेमारा ताआनीथ अ. ४ याशिवाय शास्त्रांत किंवा इतिहासांत कोठेंच लिहिलेलें नाहीं. आणि तेथेंहि याची ही गोष्ट पूर्वज सांगत आल्यावरून लिहिली आहे, असें एक टीकाकार ह्मणतो. कित्येक असें ह्मणतात कीं, आन्तिओखोस एपिफेनस, ज्यानें दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं येरूशालेमेवर चढून येऊन तें मंदिर विटाळलें, आणि इस्राएलामधून शाब्बाथ, सुंता इत्यादि मुख्य नियम बंद करायास प्रयत्न केला, तोच हा आपोसतेमोस असावा.

टीका १०.

पवित्र ठिकाणीं मूर्त्तीची स्थापना.

२ राजे अ. २१ ओ. ७ एथें लिहिल्याप्रमाणें यहूदाचा राजा मेनश्शे यानें पवित्र मंदिरांत जी मूर्त्ति मांडिली, ती चौथ्या महिन्याच्या सतराव्या तारखेस मांडिली असें गेमारा ताआनीथ अ. ४ एथें लिहिलें आहे.

टीका ११.

तम्मुजमहिन्याच्या सतराव्या तारखेस इस्राएलांवर आलेलीं पांच अरिष्टें.

या तारखेस पहिल्या पाट्या फुटल्या, नित्याचें अर्पण बंद पडलें, येरूशालेम नगर फुटलें, आपोसतेमोसानें शास्त्र जाळलें, आणि पवित्र मंदिरामध्यें मूर्त्ति स्थापन झाली. येरूशालेम नगर या दिवशीं फुटलें याविषयीं इर्मेया अ. ५२ ओ. ६–८ आणि इस्राएलांच्या प्राचिन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम वर्ष. ३३३८ पाहा.

टीका १२.

शेशाख.

शेशाख हें नांव इर्मेया अ. २५ ओ. २६ आणि अ. ५१ ओ. ४१ या दोन ठिकाणीं मात्र सांपडतें. तें या दोन्ही ठिकाणीं बाबेलेस दिलें आहे. इब्री ग्रंथकारामध्यें शास्त्रांचा अर्थ करण्याच्या ज्या अनेक रीति आहेत, त्यांमध्यें תמורה ही एक रीति आहे. या रीतीनें את בש ह्मणजे א

या अक्षराबद्दल ת, ב या अक्षराबद्दल ש, ג या अक्षराबद्दल ר इत्यादि किं-
वा אל בם ह्मणजे א या अक्षराबद्दल ל, ב या अक्षराबद्दल מ, ג या अक्षराब-
द्दल נ इत्यादि, अशीं अक्षरें एकाबद्दल दुसरीं लावून अर्थ करण्याची रीति आहे. याप्रमाणें בבל या शब्दांतील तीन अक्षरांबद्दल वर सांगितलेल्या את בש या पहिल्या रीतीप्रमाणें अक्षरें लाविलीं, तर ששך या नांवांतून בבל असें नांव उत्पन्न होतें. यावरून ששך हें नांव בבל यास योजून लिहिलें आहे, असें सर्व इस्राएल व कित्येक खीस्ती टीकाकारहि मान्य करितात. आणि यावरून अशा रीतीनें शास्त्रांतील शब्दांचा व वाक्यांचा गुप्तार्थ काढण्याची रीति पूर्वींपासून चालत आली आहे, असें दिसून येतें.

टीका १३.

याजेरा सारखा शोक.

याजेर हें मोशेनें जिंकलेलें एमोऱ्यांचें एक शहर होतें. मोशेनें त्यांतील व आसपासच्या गांवांतील राहणाऱ्यांस जेव्हां हांकून लाविलें, तेव्हां त्या लोकांनीं मोठा आकांत केला; आणि यावरून मोठा शोक दर्शविण्याकरितां "याजेरासारखा शोक" अशी ह्मण झाली. या ह्मणीचा उपयोग येशाया अ. १६ ओ. ९ आणि इर्मेया अ. ४८ ओ. ३२ एथें केलेला आहे.

टीका १४

धूपाचा डोंगर

धूपाचा डोंगर हें नांव मोरीया डोंगर ज्यावर पवित्र मंदिर बांधलें होतें, त्यास दिल्हें आहे. हें नांव देण्याचें कारण असें कीं, पवित्र मंदिर स्थापन असतां त्या डोंगरावर नित्य धूप जळत असे.

टीका १५.

"माझ्या लेंकरांविषयीं व माझ्या हाताच्या कामाविषयीं मला आज्ञा कराल काय?"

हें वाक्य यशाया अ. ४५ ओ. ११ एथें सांपडतें. जेव्हां सर्वसमर्थ परमेश्वर आपल्या परम दयेनें आपला पुत्र इस्राएल याचें तारण करील, तेव्हां त्यास कोणी आड येऊं शकणार नाहीं, आणि त्याच्या पुत्राविषयीं व त्याच्या हाताच्या कामांविषयीं अन्य राष्ट्रांतून कोणीहि कोणत्याहि प्रकारें त्यास आज्ञा

करूं शकणार नाहीं; परंतु ज्या वेळीं इस्राएलाचें तारण करणें तो मनावर घेईल; त्याच वेळीं तो करूं शकेल, अशा अर्थाचें हें वाक्य आहे.

टीका १६.

हरणें.

ही उपमा शेलोमोचें गीत अ. ४ ओ. ५ वरून घेतली आहे. कोणी ती इस्राएलांकडे, कोणी पवित्र कोशाच्या काठ्यांकडे, आणि कोणी त्या कोशावरील केरूबांकडे लावितात.

टीका १७.

शेथीया दगड.

या दगडाच्या "शेथीया" या नांवावरून हा कांहीं पायाचा दगड असावा असें अनुमान होतें; आणि अशा अनुमानावरून हाखामीम लोक असें ह्मणतात कीं, ज्या डोंगरावर येरूशालेम नगर बांधलें होतें, त्या डोंगराच्या पायाचा हा दगड होता. कित्येक या नामाचा "शेथाया" असा उच्चार करून अनंत देवानें मांडलेला दगड असा अर्थ करितात. हा दगड पहिल्या भविष्यवाद्याच्या दिवसापासून अति पवित्र ठिकाणीं भूमीच्या वर तीन बोटें निराधार होता, असें משנה च्या יומה या भागांत सांगितलें आहे. पहिल्या पवित्र मंदिराच्या वेळीं सुगंधाचें धुपाटणें कोशाच्या दोन काठ्यांच्या मध्यें ठेवीत असत; परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं तें धुपाटणें या शेथीया दगडावर ठेवीत असत.

टीका १८.

बित्तेर.

रोमन लोकांनीं दुसऱ्या पवित्र मंदिराचा नाश केल्यावर निमित्तें काढून इस्राएलांवर ते फारच जुलूम करूं लागले. ज्या दिवशीं येरूशालेमेचा व पवित्र मंदिराचा दोन वेळ नाश झाला, त्या आब महिन्याच्या नवव्या तारखेस रोमन लोकांचा एक सण होता; त्या दिवशीं इस्राएल लोकांनीं आपणावर राज्य करणाऱ्या लोकांबरोबर आनंद करण्याबद्दल शोक केला. यावरून त्यांच्या अंगीं राजभक्ति नाहीं असा अरोप ठेवून त्यांजवर जुलूम चालविला.

एके वेळीं हानुक्काचे सणांत बादशाहाचा कोणी नातलग मेला; तेव्हां इस्रा-

एलांनीं आपणांवर राज्य करणाऱ्या लोकांसारखें दुःख दर्शविण्याबद्दल आपल्या सणाच्या नेमाप्रमाणें दिवे लाविले. परंतु राजाच्या कुटुंबास दुःख झाल्यावरून त्यांनीं ही आरास करून आनंद केला असें रोमन लोकांस वाटलें, व ह्यामुळें ते त्यांजवर जुलूम करूं लागले.

आणखी एक वेळ असें झालें कीं, बादशाहाच्या मुलीची स्वारी इस्राएलांच्या देशांतून जात असतां, तिच्या गाडीचा आंस मोडला. तो नीट करण्याकरितां तिचे शिपाई इस्राएलांच्या दारांसमोरील झाडें तोडूं लागले. हीं झाडें त्या इस्राएलांनीं आपल्या पुत्रांच्या व कन्यांच्या जन्माच्या आठवणीकरितां व त्यांच्या लग्नांच्या समयीं त्यांच्या लांकडांचे त्यांकरितां पलंग करण्याकरितां लाविलीं होतीं, ह्मणून तीं त्यांनीं तोडूं दिल्हीं नाहींत. यावरून आपणाविषयीं व बादशाहाविषयीं इस्राएलांच्या मनीं हेवा आहे, असें रोमन लोकांस वाटून ते त्यांजवर जुलूम करूं लागले.

हा जुलूम सहन न झाल्यामुळें इस्राएलांनीं बंडावा करून लढाई चालू केली. या लढाईंत बारकोखाब व रिब्बी आकीबा हे पुढारी होते. त्यांनीं अनेक लढाईंत रोमनलोकांचा पराजय करून एका वर्षांत पन्नास किल्ले व नऊशें पस्तीस शहरें जिंकून घेतलीं. या बरोबर येरूशालेम नगरही त्यांच्या हातीं आलें होतें; परंतु लढाई चालू असल्याकारणें त्यांच्यानें तें पुनः बांधून पूर्वीप्रमाणें त्याची बंदिस्ती झाली नाहीं. शोमरोनाजवळ बित्तेर ह्मणून जें मोठें व बळकट नगर डोंगरावर होतें, त्याचीच त्यांनीं बंदिस्ती केली. या नगराविषयीं असें ह्मटलें आहे कीं त्याजमध्यें ४०० पाठशाळा, प्रत्येक शाळेंत ४००शिक्षक व प्रत्येक शिक्षकापाशीं शिष्यांची तशीच मोठी संख्या असे. एखाद्या शत्रूस त्यांतील विद्यार्थ्यांनींच हटविलें असतें; त्यांतील सैन्यामध्यें १६०००० फक्त करणे वाजविणारे होते. या शहराचा नाश झाल्यावर त्याजमध्यें जुन्या तफीलीनीनें भरलेल्या ३०००० पेट्या सांपडल्या. या शहरचें हें वर्णन फारच अतिशयोक्तिचें दिसतें, तरी त्यावरून तें फार मोठें व मजबूत असावें असें अनुमान होतें.

याप्रमाणें कांहीं दिवस इस्राएल लोक फारच बळावले; आणि त्यांच्या देशांतून रोमन लोकांचा राज्याधिकार लयास जाण्याच्या लागास आला होता. परंतु असे जय मिळाल्यावरून इस्राएल लोक व त्यांचे सैन्यपति फारच उन्मत्तपणें व निश्चितपणें वागूं लागले. आणि जसे येरूशालेमेच्या दुसऱ्या ना-

शाच्या वेळीं, तसे आपणांतच भांडूं लागले. यामुळें रोमन लोक पुन: बळावून जे किल्ले व जीं शहरें इस्राएलांनीं घेतलीं होतीं तीं सर्व त्यांनीं परत घेऊन बित्तेर नगरास वेढा घातला. हा वेढा एक वर्षपर्यंत होता; आणि तो लांबवेल ह्मणून आंतील इस्राएलांनीं आंतून लांबपर्यंत भुयमार्ग खणिले होते. या मार्गांनीं त्यास अन्नाचा, हत्यारांचा व सहायासाठीं सैन्याचाहि पुरवठा होत असे; आणि जवळूनच एक नदी वाहत होती, तिजकडून पाण्याचा पुरवठा होता. परंतु शोमरोनी लोकही इस्राएलांचा हेवा करीत असत, ह्मणून त्यांनीं आपला वाद साधण्याकरितां शत्रूस हे भुयमार्ग दाखविले व त्यांनीं वेढलेल्या लोकांचा सर्व प्रकारचा पुरवठा बंद केला. जेव्हां असा प्रसंग आला, तेव्हां मोदीन शहरांतील एक वृद्ध रिब्बी एलीएझेर हा बित्तेर नगराच्या तटावर चढून मोठ्या दु:खानें व उपास करून ईश्वराची प्रार्थना करूं लागला. याच्या भक्तिभावावरून ईश्वर खरोखर दयाकरील व बित्तेर नगर शत्रूच्या हातीं कधींच लाभूं देणार नाहीं, अशी सर्व इस्राएलांची व शोमरोनी लोकांचीही खात्री होती. मग एक शोमरोनी मनुष्य कृत्रीम करून शहरांत गेला; आणि शत्रूकडून रिब्बी एलीएझेरास कांहीं गुप्त निरोप आहे असें दर्शविण्याकरितां तो प्रार्थनेंत निमग्न असतां नकळत त्यापाशीं गेला. आणि परत जात असतां जवळच्या शिपायांनीं त्यास धरून बारकोखाबापाशीं नेलें. बारकोखाब त्यास ह्मणाला, तूं रिब्बी एलीएझेर याच्या कानांत काय सांगितलेंस तें सांग. तेव्हां खरें सांगीतलें तरी मरणार व खोटें सांगितलें तरी मरणार असें जाणून तो ह्मणाला कीं, मेलों तरी मजसांगातें शत्रूनें पाठविलेला गुप्त निरोप सांगणार नाहीं. मग बारकोखाबानें रिब्बी एलीएझेरास आपणासमोर बोलावून त्या शोमरोनी मनुष्यानें त्याच्या कानांत काय सांगितलें तें विचारलें. परंतु त्या शोमरोनी मनुष्यानें खरोखर त्याशीं कांहींच भाषण केलें नव्हतें, ह्मणून त्यानें ती सर्व गोष्ट नाकारिली. यावरून बायकोखाबास राग येऊन त्याने त्यास लातेनें उडविलें व तो तेथेंच लागलाच मरण पावला. रिब्बी एलीएझेराच्या मरणामुळें बित्तेर शहराकरितां सर्व लढणारांचें धैर्य खचलें; आणि वेढलेले इस्राएलांची सर्व प्रकारें तंगचाई झाल्यामुळें रोमन लोक हल्ला करून शहरांत शिरले. तरी इस्राएल लोक मोठ्या शौर्यानें लढले; आणि असें तुंबळ युद्ध झालें कीं, रक्ताच्या नद्या वाहिल्या; आणि शत्रूनें असा जुलूम केला कीं, एका दगडा-

खालीं ३०० मुलांचीं डोकीं चेंचून त्यांस मारिलें असें ह्मणतात. याप्रमाणें इस्राएलांवर महासंकट येऊन बित्तेर शहराचा नाश झाला तोहि आब महिन्याच्या नवव्या तारखेसच इशवी सन १३४ मध्यें झाला.

टीका १९.

येहोयारीबाचा पहारा.

१ कालवृत्तांत अध्याय २४ एथें सांगितल्याप्रमाणें दावीदानें पवित्रस्थानाच्या सेवेसाठीं जे चोवीस याजक नेमिले होते, त्यांमध्यें ओ. ७ प्रमाणें पहिली नेमणूक येहोयारीबाची होती. आणि ज्या अर्थीं याप्रमाणें २४ याजकांची नेमणूक होती, त्या अर्थीं दिवसाच्या प्रत्येक तासास एकाची नेमणूक असावी; आणि येहोयारीबाची नेमणूक पहिलीच होती ह्मणून ती संध्याकाळच्या पहिल्या तासांत असावी. यावरून "मी येहोयारीबाच्या पहाऱ्यावर पहारा करीत असतां," या लिहिण्याच्या संप्रदायाचा अर्थ "मी संध्याकाळच्या पहिल्या पहाऱ्याच्या वेळीं अथवा पहिल्या तासांत पहाऱ्यावर असतां," असा होतो.

टीका २०.

सेफाराद.

युरोपांतील स्पेन आणि पोर्टुगाल देशांस इब्री भाषेंत सेफाराद असें ह्मणतात. या देशांत पंधराव्या शतकांत आणि विशेषेंकरून १४८१ या वर्षीं राजा फर्डिनान्ड व त्याची राणी इझेबेला यांकडून इस्राएलांचा पराकाष्ठेचा छल होऊन कित्येकांस त्यांनीं जुलमानें ख्रिस्ती केलें, कित्येकांस त्यांचें सर्व द्रव्य घेऊन जिवें मारिलें, आणि राहिलेल्यांस आपल्या देशांतून हांकून लाविलें.

टीका २१.

इश्माएली लोकांनीं मारलेले ऐशीं हजार.

यशाया अ. २१ ओ. १३-१४ यांजवर रशीनें केलेली टीका व इर्मेयाचे विलापावर केलेली मिद्राश नामें टीका यांजमध्यें असें लिहिलें आहे कीं, बाबेलचा राजा नेबूखादनेसार हा जेव्हां येरूशालेमेवर चढून आला, आणि अतिशय नाश करूं लागला, तेव्हां ऐशीं हजार अधिकारी लोक जीव घेऊन रानांत पळाले, तेथें इश्माएली लोकांस पाहून, तेहि आब्राहामाचें संतान आहेत, ह्मणून आश्रय देतील, या आशेनें त्यांजकडे गेले. परंतु त्यांनींहि आपला वाद साधिला. जेव्हां

त्यांनीं त्यांपाशीं प्यावयास पाणी मागितलें, तेव्हां ते दग्यानें ह्मणाले कीं, पहिल्यानें कांहीं खा, मग पाणी प्या. त्यांच्या या भाषणावरून त्यांस हें निष्कपटाचे व प्रीतीचे भाषण असें वाटलें. परंतु त्यांनीं त्यांस खारविलेलें अन्न दिल्हें आणि त्यामुळें त्यांस अधिक तहान लागली. मग पाणी मागूं लागले तेव्हां त्यांनीं हवेनें भरलेल्या मसका त्याच्या तोंडांशीं धरिल्या आणि त्या मसकांतील हवा त्यांच्या तोंडांत फुंकल्यावरून त्यांचीं पोटें फुगून ते ऐशीं हजार लोक इस्माएली लोकांच्या हातून मारले गेले.

टीका २२.

याजकाच्या रक्तासाठीं मारले गेलेले.

हें वाक्य येहोयादाचा पुत्र जेखार्या याजक याजविषयीं लिहिलें आहे. योआश राजाच्या वेळीं इस्त्राएल पुनः मूर्त्तिपुजा करूं लागले, तेव्हां येहोयादाचा पुत्र जेखार्या याजक याजवर ईश्वरी आत्मा येऊन त्यानें त्यांचा निषेध करून त्यांच्या नाशाविषयीं भविष्यकथन केलें. यावरून लोकांनीं त्याजवर उठून त्यास उपाध्यांच्या आंगणांत जिवें मारिलें; तेव्हां तो ह्मणाला "परमेश्वर पाहून न्याय करील" ही गोष्ट २ कालवृत्तांत अ. २४ ओ. १७–२२ एथें सांपडते. याजविषयीं मिद्राशमध्यें अशी टीका आहे कीं, जेथें तो मारला गेला, त्या आंगण्याच्या फरसबंदीवर त्याचें रक्त उकळ्या देत असतां, नेबूखादनेसाराचा सरदार नेबूझारआदान हा येरूशालेमेवर चढून आल्यावर त्याच्या नजरेस जेव्हां हें आलें; तेव्हां त्यानें त्याविषयीं इस्त्राएलांजवळ चौकशी केली. ते ह्मणाले कीं, हें गोऱ्ह्यांचे व मेंढ्यांचें रक्त आहे. परंतु त्यास संशय उत्पन्न होऊन त्यानें गोऱ्ह्यांचें, मेंढ्यांचें व दुसऱ्या कित्येक पशूंचें रक्त तेथें आणविलें; परंतु तें त्या रक्ताशीं जमलें नाहीं; आणि जेखार्याच्या रक्ताचा उकळ बंद राहिला नाहीं. मग तो इस्त्राएलांस ह्मणाला, खरें सांगा; नाहीं तर मी तुमचें मांस खवणीनें खवणीन. तेव्हां त्यांनीं झालेलें सर्व वर्तमान खरोखर सांगितलें. मग आतां मी त्याचा सूड उगवितों, असें ह्मणून त्यानें मोठे सनहेद्रीम ह्मणजे न्यायसभेचे लोक, त्यांमागून लहान सनहेद्रीमचे लोक, त्यांमागून तरुण याजक लोक, शेवटीं तान्हीं बालकें आणून तेथें मारिलीं; तरी तें रक्त शांत होईना. मग तो जेखार्यास हाक मारून ह्मणाला, हे जेखार्या! तुझ्या लोकांतील उत्तम यांस तर मीं मारिलें; आतां

मी सर्वांचा नाश करावा अशी तुझी इच्छा आहे काय? हे शब्द त्याच्या मुखांतून निघतांच त्या रक्ताच्या उकळ्या बंद झाल्या. शेवटीं नेबूझार-आदान यासहि पश्चात्ताप होऊन त्यास असें वाटलें कीं, जो रक्त पाडतो, त्याचें रक्त पाडिलें जावें हा न्याय आहे. मग मी एवढ्या लोकांचें रक्त पाडिलें ह्मणून माझी दशा काय होणार! अशा त्याच्या पश्चात्तापावरून ईश्वरास करुणा आली, आणि तें रक्त लागलेंच तेथच्या तेथें आटून गेलें. ही गोष्ट ३१०० या वर्षीं घडून आली. इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम यांत पाहा.

टीका २३.

सर्व रात्रींपेक्षां आजची रात्र कशामुळें निराळी आहे?

हा प्रश्न मुळीं पेसाहाच्या पहिल्या दोन रात्री हाग्गादामध्यें केला जातो. परंतु सप्तकांतील ज्या दिवशीं पेसाहाचा पहिला दिवस असतो, त्याच दिवशीं तिशआबेआब येतो, ह्मणून एथें या रात्रीविषयींही तोच प्रश्न करून या गीतांत पेसाहाची व तिशआबेआबची तुळणा केली आहे.

टीका २४.

याखीन व बोआझ.

याखीन व बोआझ हीं शेलोमोनें बांधलेल्या पवित्र मंदिरांतील दोन खांबांचीं नांवें होतीं. हे खांब पितळेचें होते. त्यांचें पूर्ण वर्णन १ राजे अ. ७. ओ. २१–२२ आणि इर्मेया अ. ५२ ओ. २१–२३ एथें सांपडतें. याखीन या नांवाचा अर्थ "(ईश्वर) स्थापन करील" असा, आणि बोआज या नांवाचा अर्थ "त्यांत (ईश्वरांत) बळकटी आहे" असा होतो. या खांबांस हीं नांवें योजून या मंदिरास ईश्वरानें स्थापन करून बळकटी द्यावी असें शेलोमोनें इच्छिलें होतें.

टीका २५.

आरावनाचा खळा.

आरावना हा येरूशालेमेंत राहणारा एक यबूसी होता. दावीदानें लोकांची गणती केल्यामुळें ईश्वराचा राग होऊन जी पटकी उठली होती, ती बंद होण्याकरितां गाद भविष्यवाद्यानें दावीदास सांगितलें कीं, आरावना यबूसी याच्या खळ्यांत वेदि बांध व तेथें होम कर. तेव्हां दावीद तो खळा

त्याजवळ विकत मागूं लागला; परंतु ही जागा ईश्वरी पूजेकरितां दावीद मागतो, असें जेव्हां आरावनानें पाहिलें; तेव्हां तो ती जागा, व होमाकरितां बैल, लांकडें इत्यादि फुकट देऊं लागला. परंतु दावीदानें न ऐकतां त्यास किंमत देऊन तो खळा विकत घेतला व तेथें वेदि बांधून होम केला; तेव्हां ईश्वरी कोप शांत झाला. हा खळा येरूशालेमेंत मोरीया डोंगरावर होता; आणि त्याच ठिकाणीं शेलोमोनें पवित्र मंदिर बांधलें होतें. २ शेमूएल अ. २४ पाहा.

टीका २६.

इथोन व तेदी.

पवित्र मंदिरीं इस्राएलाच्या अंगणास जे सात दरवाजे होते, त्यांतील एक दरवाजाचें नांव इथोन असें होतें; यास बहुत करून निकानोराचा दरवाजा असें ह्मणत. आणि तेदी हा मंदिराच्या दक्षिण बाजूच्या भिंतींतील दरवाजा होता. असें गेमारा मिद्दोथ अ. १ एथें सांपडतें.

टीका. २७.

लिशकाथ हाग्गोला.

दुसऱ्या पवित्र मंदिरीं लिशकाथ हाग्गोला या नांवाची एक कोठडी होती. बाबेलच्या प्रवासांतून परत आलेल्या लोकांनीं तिजमध्यें एक विहीर खणिली होती; या विहिरीचें पाणीं त्या मंदिराच्या सर्व अंगणांत पुरत असे असें गेमारा मिद्दोथमध्यें सांपडतें.

टीका २८.

एबेन हाज्जोहेलेथ.

एबेन हाज्जोहेलेथ या नांवाचा अर्थ सरपटणारा दगड असा होतो. या दगडाविषयीं शास्त्रांत १ राजे अ. १ ओ. ९ एथें लिहिलें आहे. या दगडास असें नांव पडण्याच्या कारणाविषयीं अनेक मतें आहेत. कोणी ह्मणतात कीं तरुण लोक आपली शक्ति ताडून पाहाण्याकरितां तो ओढीत असत; कोणी ह्मणतात कीं त्याजवळून एन रोगेल हा झरा वाहात होता ह्मणून; कोणी ह्मणतात कीं त्या दगडाचा आकार सरपटणाऱ्या प्राण्यासारखा होता ह्मणून त्यास असें नांव पडलें. योनाथानाच्या तर्गूम भाषांतरांत असें आहे, कीं हा द-

गड उंच होता, आणि नजर फार दूर जावी ह्मणून लोक त्याजवर उभे राहात असत.

टीका २९.

आद्रीआनोस केसार.

हा रोम शहराचा बादशाहा होता; त्याचें पूर्ण नाम ईलीयस आद्रीयन असें होतें. हा इशवी सन ११७ च्या सुमारास राज्य करूं लागला. यानें येरूशालेम नगर पुनः बांधून त्यास आपल्या नांवासारखें "ईलीया क्यापिटोलीना" असें नांव दिल्हें, पवित्र मंदिराच्या ठिकाणीं ज्युपिटर ह्मणजे बृहस्पति याचें देऊळ बांधलें, आणि इस्राएलांस येरूशालेमेजवळ जाण्याची सक्त मनाई केली. याच्याच वेळीं बित्तेर शहराचा नाश झाला. यानें इस्राएलांस अतिशय छळिलें.

टीका ३०.

दोन हजार वर्षें राखून ठेवलेलें शास्त्र.

नीति अ. ८ ओ. २२–२५ यावरून कित्येक राबी लोक असें अनुमान करितात, कीं मोशेच्या हातून इस्राएलांस दिल्हेलें शास्त्र पृथ्वीच्या उत्पत्तीच्या दोन हजार वर्षांपूर्वीं उत्पन्न झालें होतें. परंतु कित्येकांचें ह्मणणें असें आहे, कीं पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर सुमारें दोन हजार वर्षें होऊन जातपर्यंत ईश्वरानें तें कोणासही दिल्हें नाहीं; परंतु मोशे जो २३६८ व्या वर्षीं जन्मला त्याच्या हातून २४४८ व्या वर्षीं तें त्यानें इस्राएलांस दिल्हें. इस्राएलांच्या प्राचिन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम या पुस्तकांत पाहा.

टीका ३१.

सनहेद्रीन.

सनहेद्रीन हा ग्रीक भाषेंतील शब्द आहे. या शब्दाचा उपयोग शास्त्रांत कोठेंच केलेला नाहीं; परंतु मागाहून झालेल्या ग्रंथांत सांपडतो. ग्रीक भाषेंत याचा अर्थ एकत्र बसणें असा होतो, परंतु इब्री ग्रंथांत न्यायसभा अशा अर्थानें या शब्दाचा उपयोग केलेला आहे. गणना अ. ११ ओ. १६–१७ या वाक्यांवरून या न्यायसभेची स्थापना मोशेच्या वेळेपासून होती असें अनुमान होतें; परंतु तिजला सनहेद्रीन हें नांव दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं

पडलें. सनहेद्रीन हें लहान व मोठें असें दोन प्रकारचें असे. लहान सनहेद्रीनांत तेवीस सभासद असत; आणि मोठ्या सनहेद्रीनांत एकाहत्तर सभासद असत. हे सभासद ईश्वरभक्त, विद्वान, अनेक भाषा जाणणारे, शाहाणे व नम्र असून ते लोकांकडून नेमिले जात असत; त्यांस कांहींच वेतन नसे, प्रत्येकास आपला धंदा करून हें काम करावें लागत असे. ज्या गांवीं एकशें वीस कुटुंबें असत, त्या गांवीं एक लहान सनहेद्रीन असे. याशिवाय येरूशालेमांत दोन लहान व एक मोठें अशीं तीन सनहेद्रीनें असत. लहान सनहेद्रीन प्रत्येक सोमवारीं व गुरुवारीं भरत असे; त्यास दिवाणी व फौजदारी मुकदम्यांचा व देहांतशिक्षा करण्याचा अधिकार असे. येरूशालेमेंतील पहिलें लहान सनहेद्रीन पवित्र मंदिराच्या द्वार हाब्बाइथ या ठिकाणीं, दुसरें लहान सनहेद्रीन आजारा या ठिकाणीं, आणि मोठें सनहेद्रीन लिशकाथ हाग्गाझीत या ठिकाणीं भरत असे. हीं दोन्ही प्रकारचीं सनहेद्रीनें अर्धवर्तुलाकृतीनें बसत असत; अध्यक्ष हा मधोमध बसून दुसरे सभासद त्याच्या उजवीकडे व डावीकडे बसत असत, आणि शेवटास निवाडे लिहिण्याकरितां लेखक असत. कोणी ह्मणतात, कीं अध्यक्षाच्या उजवीकडे न्यायाधीश व डावीकडे मंत्री हे असत. अध्यक्ष सभेंत येतांना तो आपल्या जागीं जाऊन सर्वांस बसायास सांगेपर्यंत सर्व सभासद उभे असत; न्यायाधीस येतांना तो आपल्या जागीं जाऊन बसेपर्यंत उभे असत; आणि मंत्री येतांना प्रत्येक सभासद त्यास नमन करून आपल्या जागीं बसत असे. जर एखाद्या गोष्टीचा निवाडा बाहेर गांवच्या सनहेद्रीनाच्यानें न करवला, तर ती गोष्ट येरूशालेमेंतील पहिल्या सनहेद्रीनाकडे, त्याच्यानें न झाल्यास दुसऱ्या लहान सनहेद्रीनाकडे, व त्याच्यानेंही न झाल्यास ती गोष्ट मोठ्या सनहेद्रीनाकडे जात असे. या मोठ्या सनहेद्रीनाकडून झालेला निवाडा शेवटला असून फिरला जात नसे; कारण या मोठ्या सनहेद्रीनाचा अधिकार सर्वांहून मोठा असे; आणि कायदे करणें, ते अमलांत आणणें, लढाई चालू करणें व बंद करणें इत्यादि सर्व मोठमोठ्या कामांची सत्ता या सनहेद्रीनाच्या हातीं होती. यांचे सर्व ठराव बहुमतानें होत असत. जर एखाद्या वरच्या सनहेद्रीनांत एखादी जागा रिकामी झाली, तर ती त्याच्या खालच्यास व त्याची जागा त्याच्या खालच्यास आणि शेवटल्याची जागा खालच्या सनहेद्रीनांतील पहिल्यास अशा क्रमानें भरली जात असे.

वर्गणीदारांचीं नांवें.

मुंबई.

नांवें.	प्रती.
अ. शेमूएल इसाजी पिंगले. जस्टीस आफ धी पीस, डेप्यूटि एक्झामिनर पी. डब्ल्यू. आकौंट्स	२
,, आब्राहाम सकोबा पेणकर, चोगले.	१
,, रेऊबेन बिनयामीन पेणकर	१
,, हाईम रेऊबेनजी पेणकर.	१
,, दावीद हाय रेऊबेनजी पेणकर.	१
,, मोशे रेऊबेनजी पेणकर.	१
,, योसेफ शेमूएलजी ढोकरकर, मेस्त्री.	१
,, सीलेमान सकोजी भास्तेकर.	१
,, आब्राहाम शिमशोनजी रामराजकर.	१
,, मोशे शेमूएलजी आष्टमकर.	१
,, इसहाक बाबनजी थळकर....	१
,, आहारोन आब्राहामजी केहिमकर.	१
,, दावीद रेऊबेनजी कोर्लेकर.	१
,, आब्राहाम शेमूएलजी राजपूरकर.	१
,, शेमूएल शालोमजी बोरघरकर.	१
,, जे. एस. जेकब.	१
,, मोजेस स्यामूएल मिलरैट.	१
,, शेमूएल हाईमजी फनसापूरकर.	१
,, शालोम योसेफ पेणकर, हाज्जान.	१
,, शेमूएल याकोबजी खरीलकर, सु. पे.	१
,, शिमशोन मोशे दिवेकर, टौन सबपोस्टमास्तर.	१
,, दावीद शेलोमो बोरघरकर, चोगले.	१
,, आब्राहाम दावीदजी बोरघरकर, बेलीफ.	१
,, योसेफ रेऊबेनजी कोर्लेकर, मेक्यानिक फोरमन.	१

अ. शेमूएल शालोमजी आष्टमकर. १
,, मोशे एलीया राजपूरकर, चोगले. १
,, येहेजकेल शालोमजी कासूकर, गार्ड. १
,, शिमओन बिनयामीनजी चरीकर. १
,, शिमशोन शेमूएलजी आक्षीकर. १
,, याकोब बिनयामीनजी दांडेकर. १
,, शेमूएल मोशे किल्लेकर, चोगले. १
,, आहारोन शेमूएलजी किल्लेकर. १
,, आहारोन मोशे उमर्डेकर.... ... ... १
,, शिमशोन शालोमजी वरोलकर. १
,, याकोब आब्राहामजी शापूरकर. १
,, मोशे बिनयामीनजी काशुकर. १
,, मोशे शेलोमो काजी झिराटकर. १
,, शेमूएल बिनयामीन चोर्डेकर. १
,, बिनयामीन इसहाक तलकर. १
,, बिनयामीन दावीदजी वासकर. १
,, बिनयामीन शालोम गडकर... ... ... १
,, रेऊबेन शालोम गडकर. १
,, योसेफ आब्राहामजी तलकर, गवई. १
खानसाहेब हाईम शेलोमो चीचोलकर, सुपरवैझर, पी. डब्ल्यू. डी.... १
अ. शिमओन दानीएलजी कोलाटकर. १
,, मोशे बिनयामीन, स्टेशनमास्तर, बी. बी. आन्ड सी. ऐ. रेलवे.... १
,, एलीया शालोम वालवटकर. १
,, आहारोन शेलोमो वरसोलकर, सु. पे. १
,, शिमशोन मोशे काजी झीराटकर. १
,, योसेफ रेऊबेनजी पेझारकर. १
,, इसहाक एलीया शापूरकर... ... ... १
,, इसहाक आहारोनजी भास्तेकर... ... ... १
,, येहेजकेल इसहाकजी पुगांवकर, दाक्तर. १
,, आहारोन दानीएलजी तलकर, चोगले. १

अ. शेमूएल सिलेमानजी वरोलकर... ... ... १
,, मोशे येहेजकेलजी तलकर. १
,, दावीद सिलेमानजी पेझारकर... ... ... १
,, योएल शेमोएलजी शिरकोलकर दाक्तर. १
,, याकोब एलीया पिंगले... ... ... १
,, याकोब शेमूएलजी शिरकोलकर. १
,, एज्रा रेऊबेन नौगांवकर, बी. ए. १
,, एज्रा शेमूएल तलकर. १
,, लेवी येहेजकेल तलकर. १

बेने इस्राएल बालोत्तेजक सभेच्या तर्फे.

रेवरेन्ड जे. एच. लॉर्ड. १
अ. योसेफ आहारोन तलकर. १
,, इसहाक आब्राहामजी शापूरकर. १
,, शेमूएल मोशे राजपूरकर. १
,, मीखाएल रेऊबेनजी मलेकर. १
,, रेऊबेन येहेजकेलजी मलेकर. १
,, दानीएल दावीदजी मलेकर. १
,, मेनश्शे हाईमजी बामनोलकर. १
,, बिनयामीन एलीएझेरजी बामनोलकर. १
,, रेऊबेन आब्राहामजी भिंजेकर, मेस्त्री. १
,, रेऊबेन सीलेमानजी नागांवकर, मेस्त्री. १

पुणें.

अ. बिनयामीन शालोमजी नागांवकर, सु. मे. पे. १
,, रेऊबेन येहेजकेलजी ह्यशीलकर, सु. पे. १
,, एलीएझेर शिमशोनजी किल्लेकर, सु. पे. १
,, शालोम शेमूएलजी चरीकर, ज. पे. १
,, शिमओन शेमूएलजी चरीकर. १
,, शिमशोन योसेफ शिमशोनजी किल्लेकर. १
,, शेमूएल निस्सीमजी कोर्लेकर, दाक्तर. १
,, इसहाक शेमूएलजी आष्टमकर, दाक्तर. १

अ. येहेजकेल शिमशोनजी किल्लेकर, दाक्तर, पे. १
,, शाऊल येहेजकेलजी नागांवकर. १
,, आब्राहाम दानीएल बेनजामिन कांदलेकर, सिगनलर... ... १
,, दानीएल आब्राहामजी चरीकर. १
,, दानीएल राहामीम तलकर, सु. मे. बा. पे. १
,, सालोमन एलायझा वांकुलकर, सु. मे. स. बा. पे. १
,, आब्राहाम बिनयामीन शिरगांवकर, सु. पे. १
,, शालोम शेमूएलजी तलकर, सु. पे. १
,, एलीएझेर दानीएलजी कोलेटकर, ड्राफ्समन. १
,, आहारोन दानीएलजी तलकर, रैटर. १
,, आहारोन येहेजकेल सानकर, रैटर. १
,, शेमूएल मोशे आष्टमकर, सु. पे. १
,, रेऊबेन आहारोन दीघोरकर, दाक्तर. १
,, योसेफ शेलोमो झीराटकर. २
,, आब्राहाम शेमूएल दिवेकर, सु. पे. १
,, शेमूएल शेलोमो झिराटकर. १
,, रेऊबेन शेलोमो झिराटकर. १
,, सालेमन शालोम आपटेकर. १
,, जे. जेकब. १
,, इसहाक शेलोमो घोसालकर. १
,, हाईम शालोमजी बंदरकर, मेस्त्री. १
,, दावीद शेलोमो झीराटकर. १
,, शालोम रेऊबेन आष्टमकर. १

कराची.

अ. राहामीम स्यामूएल भास्तेकर, स्टेशनमास्तर. १
,, ज्यूडा स्यामूएल झेडेकर, क्लार्क. १
,, दावीद बनाजी नागांवकर, मेस्त्री. १
,, शालोम रेऊबेन शिमशोन कामरलेकर, क्लार्क. १
,, ईलाईझा एरन नागोठणेकर, मेक्यानिक. १
,, शालोम दावीदजी उमर्डेकर, म्युनिसिपल सर्वेर. २

अ. दावीद मुसाजी दीघोरकर, सु. पे. १
,, एहेजकेल शेमूएलजी तलकर, रैटर. पे. १
,, दावीदजी दानीएलजी नागांवकर, हेडक्लार्क. १
,, गेरशोन शालोमजी उमर्डेकर, ओव्हरसीयर, पी. डब्ल्यू. डी. ... १
,, येलीएझेर बिनयामीनजी कांदलेकर, दाक्तर. १
,, मोशे येलीया पेणकर, दाक्तर हा. आ. १
,, रेऊबेन आहारोनजी भोनकर, हे. क्ला. पे. १
,, शालोम येहेजकीएल सायगांवकर, दाक्तर. १
,, रेऊबेन मुसाजी सातामकर, मेस्त्री. १
,, शेमूएल बिनयामीनजी भास्तेकर, ड्राफ्समन पी. डब्ल्यू. डी. ... १
,, याकोबजी दानीएलजी कांमरलेकर. १
,, दावीद मुसाजी घोसाळकर, कूपर. १

रेवदंडा.

अ. शेमूएल योसेफ राजपूरकर, हाज्जान पंतोजी. १
,, योसेफ एलीया शापूरकर. १
,, इसहाक धमाजी सानकर, शम्माश. हा. पे. १
,, आहारोन येलोजी पेणकर, हाज्जान. १
,, इसहाक सीलेमानजी आष्टमकर. १
,, शालोम एलिया शापूरकर. १
,, शालोम आहारोनजी ढोकरकर. १
,, आहारोन दावीदजी ढोकरकर. १

ठाणें.

अ. शालोम मोशे पेणकर, सु. मे. पे. १
,, शेमूएल इसहाकजी जावलीकर, सु. मे. स. बा. पे. १
,, शेमूएल मोशे नागांवकर, सु. गब्बाय. १
,, दानीएल बिनयामीनजी गारसुलकर, दाक्तर, पे. १
,, राहामीम इसहाकजी पिंगले, रैटर. १
,, आब्राहाम रेऊबेनजी आष्टमकर. १
,, योसेफ इसहाकजी दिवेकर, क. सु. १

नागपूर.

अ. शालोमजी येलोजी चेऊलकर, हेड मेस्त्री.... ... ... १
,, शिमशोन दानीएलजी पेणकर, मेस्त्री. १
,, आब्राहाम येलोजी चेऊलकर, आसिस्टंट क्यारेज आन्ड व्यागन फोरमन. १
,, बारूख सिलेमानजी वरसोलकर. १
,, येहूदा आहारोनजी येरूलकर, फिटर. १
,, राहामीम हाईमजी मलेकर. १

अहमदाबाद.

अ. योसेफ शिमशोनजी सानकर, आपोथीकारी. १
,, योसेफ शेलोमो दांडेकर, दाक्तर. १
,, शेमूएल योसेफजी दांडेकर. १
,, इसहाकजी मोशेजी कोलेटकर, फौजदार १
,, शेमूएलजी सीलेमानजी काजी झिराटकर, सु. पे. १
,, हाईमजी शेमूएलजी काजी झिराटकर. १

पनवेल.

अ. आहारोन शिमशोन आष्टमकर हेल्थ आफिसर, ... १
,, इसाजी शेमूएलजी नागांवकर, आणि बंधु. १
,, योसेफ आहारोनजी खुलाबकर. १
,, आब्राहाम दावीदजी भाचेकर... ... ... १
,, शालोम बापुजी बामलोनकर.... ... ... १
,, शेमूएल आब्राहामजी तरणखोपकर, पंतोजी. १

बीना.

अ. एलीएझेर सिलेमानजी तलकर. १
,, योसेफ याकोबजी मेंद्रीकर. १
,, योसेफ दानीएलजी कामरलेकर. १

कुरलें.

अ. हाईम शेमूएलजी चरीकर, मेस्त्री. १
,, रेऊबेन आब्राहामजी बेलकर, मेस्त्री. १

आलीबाग.

अ. सिलेमान सत्केलजी कोगबानकर, सु. पे.... ... ... १
,, सिलेमान योसेफजी तलकर, सु. पे. १

रोहें.

अ. आहारोनजी दावीदजी मल्यानकर, हा. पे... ... ... १

वरसोली.

अ. दावीद येलीया शापूरकर... ... ... १

लोनावली.

अ. शेमूएल हासकेलजी वरवटनेकर. १

अहमदनगर.

अ. बापुजी आब्राहाम वरघरकर, सु. पे. १

बऱ्हाणपूर.

अ. याकोब शेमूएलजी वासकर, दाक्तर. १

कपडवंज.

अ. आब्राहाम शालोमजी पेझारकर, दाक्तर. १

डीसा.

अ. ए. इ. बेनजामीन कांदलेकर, गव्हरमेंट टेलेग्राफर १

चरखी दादरी स्टेशन.

अ. इसहाक बिनयामीनजी कांदलेकर, इन्स्पेकटर. १

प्रांतीज.

अ. योसेफ बिनयामीन बामनोलकर, दाक्तर. १

नीमच.

अ. याकोब येहेजकेलजी पिंगले, गार्ड. २

शिमोगा.

अ. आब्राहाम शेमूएलजी नागांवकर एल्. सी. ई. एक्झीक्युटिव इन्जिनीयर. १

रेजिमेन्ट ८ वें.

अ. शेलोमो दानिएलजी कोलेकर, सु. मे. २

अ. येहूदा येलीया आष्टमकर, हा. पे. रैटर. १

,, रेऊबेन शेलोमो वर्सोलकर, क्वार्टर मास्तर हा. १

रेजिमेन्ट १७ वें.

अ. येहूदा याकोबजी कासूकर, जमादार. १

,, शेलोमो मोशे कोलाटकर, क्वार्टर मास्तर हा. १

रेजिमेन्ट २४ वें.

अ. एज्रा शेमूएल भोनकर. १

रेजिमेन्ट २५ वें.

अ. आर. शालोमजी आगरवारकर, दाक्तर. १

बेने इस्राएल बालोत्तेजक सभा.

अवश्य वाचा व **सहाय करा.**

पुस्तकालय.

ही सभा डिसेंबर ता० १६ सन १८८८ दिवशीं स्थापन झाली व तिचा पहिला वार्षिक समारंभ डिसेंबर ता० २२–२३ सन १८८९ मध्यें झाला. या सभेचा उद्देश तरुणांस नीतीचें वळण लावण्यास, त्यांकडून चांगला विद्याभ्यास करविण्यास, त्यांस वक्तृत्वानें भाषण करण्याचा सराव पाडण्यास, सर्वांशीं स्नेहभावानें वागण्यास आणि धर्मावर श्रद्धा ठेवण्यास उत्तेजन देण्याचा आहे. हा उद्देश पूर्ण व्हावा ह्मणून प्रत्येक रविवारीं संध्याकाळीं सभा भरून तेथें सभासदांकडून अनेक विषयांवर शक्त्यनुसार निबंध वाचले जातात व व्याख्यानें दिलीं जातात व त्यांवर वादविवाद होत असतात. आणि तरुणांनीं आपला वेळ व्यर्थ दवडूं नये आणि त्यांस पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचण्याची गोडी लागून अनेक राष्ट्रांच्या उत्कर्षाचीं व आपकर्षाचीं कारणें कळूं यावीं आणि आपल्या लोकांची हल्लींची निकृष्ट स्थिति सुधारण्याचे उपाय सुचावे ह्मणून पुस्तकालय काढिलें आहे. या पुस्तकालयास हल्लीं तीनशाहून अधिक इंग्लीश, मराठी व इब्री पुस्तकें मिळालीं आहेत व कांहीं उदार गृहस्थांकडून मदत झाली आहे व आणखी होण्याची आशाही आहे. परंतु हीं कामें सतत चालावींत ह्मणून ह्या सभेकडून सर्व इस्राएल बांधवांस व बायांस विनंति करण्यांत येते कीं, त्यांनीं आपणांकडून व आपल्या मित्रमंडळीकडून मदत करावी, कारण या सत्कार्यास मदत केल्यानें आपण सर्व इस्राएल बांधवांस व त्यांच्या लेंकरांस उत्तेजन दिलें असें होईल.

या पुस्तकालयासंबंधानें मेहेरबान सेलीम एस. सालोमन, आंग्लोज्यूइश आसोसिएशनच्या मुंबईतील शाखेचे आनरेरी सेक्रेटरी, मेहेरबान एज्रा रेऊबेन नागांवकर बी. ए. व दुसऱ्या कांहीं सद्गृहस्थांनीं आपलीं चांगलीं मतें दर्शविलीं आहेत.

या संबंधीं विशेष माहिती खालीं सही करणाराकडे मिळेल. आश्रय पाठविणारांनीं अ. आब्राहाम रेऊबेन भिंजेकर खजीनदार, ठिकाणा डोंगरी बाजार, पोस्ट उमरखाडी मुंबई, यांच्या नांवें पाठविल्यास आभारपूर्वक मान्य केला जाईल.

आपला नम्र,

मुंबई,
ता० १५ जुलई, १८९०.

विनयामीन एलीएजेर वामनोलकर,
चिटणीस.

त्वरा करा व सभासद व्हा! आयुष्य क्षणभंगुर आहे!! मरण केव्हां येईल याचा भरंवसा नाहीं!!!

खात्री वाटेल.

स्वजनकल्याणेच्छु सभा.

व्यवस्था नीट.

समस्त इस्राएलबंधुजनांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, वरील नांवाची मंडळी स्थापन झाली आहे. मंडळीचे हेतु फारच फायदेशीर असून "**स्वार्थ**" व "**परमार्थ**" दोन्ही घडण्याचा संभव आहे तर सर्वांनीं या सभेपासून लाभ करून घेण्याची संधी दवडूं नये. सर्वांस सभासद होण्यास सुलभ पडावें ह्मणून वर्गणीदारांचे "**अ**" आणि "**ब**" असे दोन वर्ग केले आहेत.

"**अ**" या प्रथम वर्गाच्या सभासदांच्या चार प्रती केल्या आहेत. त्यांची मासिक वर्गणी अनुक्रमें १ रुपया, बारा आणे, आठ आणे, आणि चार आणे आहे. वर्गणीचा ४ था हिस्सा वर सांगितलेल्या धर्मकृत्यास व मुख्यत्वें करून "**बेने इस्राएल आर्फनेज**" (निराश्रित बालगृह) फंडामध्यें जमा केला जाईल व बाकीचे तीन हिस्से सभासदांच्या मागें त्यांच्या कुटुंबांस किंवा वारसांस परत करण्यांत येतील.

"**ब**" या दुसऱ्या वर्गणीदारांच्या सभासदास फक्त प्रवेश फी दोन रुपये पडतील, एखादा सभासद मरण पावेल तेव्हां प्रत्येक सभासदास एक रुपया द्यावा लागेल. हे जमलेले रुपये मृत सभासदाचे कुटुंबास किंवा वारसास पावती घेऊन देण्यांत येतील. जर पांचशें सभासद असले तर त्या मृत सभासदाचे कुटुंबास त्याच्या पश्चात् ५०० रुपये मिळण्याचा संभव आहे.

स्त्री व पुरुष या सर्वांस या सभेचे सभासद होतां येतें; पण सभासदाचें वय २० वर्षांचे वर व ६० वर्षांचे आंत असून तो साधारण सशक्त असला पाहिजे. हें पाहणें चिटणीस व डैरेक्तर यांजकडे आहे.

कोणी उदार गृहस्थानें देणगी दिल्यास तिचा आभारपूर्वक स्वीकार केला जाईल. विशेष माहिती चिटणीसांकडे मिळेल.

आपला नम्र,

शिमशोन शमोएल आक्षीकर,

चिटणीस,

डोंगरीस्ट्रीट घरनंबर ४३, मांडवी.

THE TRU[illegible] ASPECT OF JUDAISM.

קראה אמונת י[illegible]

[illegible]ाएली धर्माचें खरें स्वरूप.

מראה אמונת ישראל

THE TRUE ASPECT OF JUDAISM;

BEING

DISCOURSES ON THE THIRTEEN ARTICLES OF THE JEWISH FAITH,

DELIVERED AT THE OLD SYNAGOGUE, BOMBAY;

WITH

AN INTRODUCTORY LECTURE

ON

A GENERAL VIEW OF JUDAISM.

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKAR,

HEAD MASTER DAVID SASSOON BENEVOLENT INSTITUTION;
SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY;
AND FELLOW OF THE UNIVERSITY OF BOMBAY.

Bombay:

PRINTED AT THE
EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA.

1879—5640.

(Registered under Act XXV. of 1867.)

To the Memory

OF

MY BELOVED BROTHER,

MR. ELEAZER EZEKIEL RAJPURKAR,

(MAY HIS SOUL BE BOUND UP IN THE BAND OF THE LIVING!)

WHO BY HIS AMIABLE DISPOSITION AND LOVE OF PEACE GAINED
THE RESPECT AND AFFECTION OF ALL HIS RELATIONS
AND ACQUAINTANCES,

AND

WHO DEPARTED THIS LIFE IN THE FLOWER OF HIS YOUTH
FOR THE ENJOYMENT OF REST IN EDEN,

ON THE

5TH JUNE 1878,

AT THE AGE OF TWENTY-EIGHT YEARS,

AS A LAST TRIBUTE TO HIS DEPARTED WORTH,

FROM HIS AFFECTIONATE BROTHER

THE AUTHOR.

इस्त्राएली धर्माचें खरें स्वरूप;

ह्मणजे

इस्त्राएली धर्माचे तेरा मूलतत्वांवर

इस्त्राएलांच्या जुन्या प्रार्थनामंदिरीं केलेला धर्मोपदेश,

व

उपोद्घाताप्रमाणें

इस्त्राएली धर्माविषयीं साधारण विचार या विषयावर लिहिलेलें व्याख्यान.

हा ग्रंथ

योसेफ येहेज्केल राजपुरकर,

दावीद सासोनच्या शाळेंतील मुख्य गुरु,

इस्त्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे चिटणीस,

व

मुंबईच्या युनिवर्सिटीचे फेलो,

यांनी तयार केला.

तो

मुंबईमध्यें

एज्युकेशन सोसायटीच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

सन १८७९

इस्त्राएली ५६४०

לזכר כבוד

הרודף אהבה ושלום

והאהוב והנכבד לכל קרוביו ויודעיו

אחי ודיד נפשי

המרוחם כה״ר אליעזר יחזקאל ראגפורכר נ״ע

שנתבקש בשם טוב בישיבה של מעלה בדמי ימיו

בן כ״ח שנה

ביום ד׳ ד׳ לחודש סיון ה׳תרל״ח׳ ליצירה

ת׳נ׳צ׳ב׳ה

מאתי

אחיו המחבר

הצעיר יוסף יחזקאל יצ״ו

माझा प्रिय व सुशील बंधु.

अ. येलीएझेर येहेज्केल राजपुरकर.

(त्याचा आत्मा स्वर्गवासी जनांसीं मिळालेला असो:)

जो आपल्या प्रियकर गुणांमुळें व सत्यत्वाच्या आवडीमुळें

आपल्या सर्व आप्तांमध्यें व इष्टमित्रांमध्यें सन्मान्य व

प्रीतिपात्र होता; आणि जो आपल्या तारुण्याच्या

ऐन भरांत अठ्ठाविसाव्या वर्षी

ता० ५ माहे ज्यून १८७८

बुधवारीं,

एदेनांत विश्रांति पावला;

त्याच्या गुणांच्या स्मरणास

हा ग्रंथ

मी मोठ्या प्रेमाने समर्पिला असे.

ग्रंथकर्ता.

प्रस्तावना.

कोणतीहि गोष्ट आपण प्रत्यक्ष पाहिल्या वांचून, अथवा तिजविषयीं आपली पूर्ण समजूत झाल्यावांचून, आपला विश्वास त्या गोष्टीवर बसत नाहीं; आणि जरी बसला तरी तो दृढ नसतो. आणि ती गोष्ट आपणापेक्षां अधिक ज्ञानी लोकांनी, अथवा आपल्या पूर्वजांनी मानिली इतक्याच आधारावरून आपणहि तीं मान्य करावी हें कारण पुरें नव्हे; आपणाकडून तिजविषयीं जेवढा शोध होईल, तेवढा केलाच पाहिजे. अशा ज्या अनेक गोष्टी आहेत, त्यांजमध्यें धर्म ही मोठ्या महत्वाची गोष्ट आहे; कारण त्याजवर मनुष्याचें ऐहिक व पारमार्थिक सुख अवलंबून आहे. यासाठीं प्रत्येक मनुष्यानें त्याजविषयीं पूर्ण खातरी करून घेतली पाहिजे. याप्रमाणें जे इस्राएली धर्म आचरितात, त्यांनी आपल्या धर्मामध्यें मानिल्या पाहिजेत अशा गोष्टी कोणत्या आहेत? आणि त्यांच्या अंगीं कितपत खरेपणा आहे? हे जाणणें अवश्य आहे. या गोष्टींची पूर्ण माहिती नसल्या कारणानें कांहीं जनांचा विश्वास त्याच्या ईश्वरदत्त धर्मावरून ढळला आहे. तरी असें न व्हावें म्हणून अशा विषयांवर एकादा ग्रंथ आपल्या इस्राएल लोकांस अगत्य असावा, यास्तव बहुतेक मित्रांच्या अत्याग्रहावरून मी आपल्या अल्पमतीप्रमाणें "इस्राएली धर्माचें खरें स्वरूप" या नांवाचा हा लहानसा ग्रंथ प्रिय बंधुजनांची समजूत होण्याकरितां केला आहे. यांत इस्राएली धर्माचीं तेरा मूलतत्वें जीं प्रत्येक इस्राएलानें प्रतिदिवशीं पठन केलींच पाहिजेत तीं व त्यांचें भाषांतर, आणि सन १८७७ सालीं मुंबईतील जुन्या प्रार्थनामंदिरीं त्या तत्वांवर केलेला धर्मोपदेश, आणि त्या तत्वांच्या स्पष्टीकरणार्थ गेमारा, मिदराश इत्यादिक इब्री ग्रंथांतील सुरस व बोधपर गोष्टी, आणि इस्राएली धर्म कसा आहे? आणि त्याचे अंगीं कोणकोणते गुण आहेत? हें समजण्याकरितां उपोद्घाताप्रमाणें ता० ५ माहे जुलै सन १८७९ शनवार रोजीं संध्याकाळीं इस्राएल लोकांच्या सद्गुण शोधक मंडळीच्या संबंधानें "इस्राएली धर्मा-

विषयीं साधारण विचार" याजवर दिल्हेलें व्याख्यान, इतके विषय आहेत. या विषयांचें निरूपण करून इस्राएली धर्म हा सदसद्विचारास व सृष्टीच्या नियमांस अनुसरून आहे, असें मी आपल्या शक्त्यनुसार सिद्ध करून दाखविलें आहे. तर माझ्या प्रिय इस्राएल बंधुजनांनी हा माझा लहानसा ग्रंथ वाचून त्याजविषयीं पूर्ण विचार केला असतां, त्यांच्या धर्मावर त्यांचा विश्वास दृढ व्हावा, असी मी आशा करितों. असें झाल्यास माझ्या श्रमाचें फल मला त्यांकडून पूर्णपणें मिळालें असें मी समजेन.

आणि वर लिहिल्याप्रमाणें सन १८७७ सालीं जुन्या प्रार्थनामंदिरीं प्रत्येक शाब्बाथ दिवशीं जो धर्मोपदेश होत असे, तो विशेषें करून एदेन बागीं विश्रांति पावलेला माझा प्रिय बंधु अ. येलीएझेर येहेजकेल राजपुरकर याच्या प्रयत्नाने चालू झाला व एक वर्ष पर्यंत चालला; परंतु त्या माझ्या कित्येक धर्मोपदेशांमधून जो या ग्रंथीं छापला आहे, तो आपल्या बांधवांमध्यें छापून प्रसिद्ध होईपर्यंतहि त्याचें आयुष्य वाढलें नाहीं, म्हणून हा ग्रंथ मी त्याच्या स्मरणार्थ छापून प्रसिद्ध केला आहे.

अनुक्रमणिका.

वर्गणीदारांचीं नांवें.

मुंबई.

नांवें.	प्रती.
अज्जम योसेफ शिमशोन सानकर, फस्ट क्लास आसिस्टन्ट आपोथीक्यारी	२५
,, आब्राहाम सकोजी पेणकर, चोगले	१
,, मोशे येलीया राजपुरकर	१
,, शेमूएल मोशे राजपुरकर	१
,, हिल्लेल मोशे उमर्डेकर	१
,, मीखाएल हिल्लेल उमर्डेकर	१
,, शेमूएल मोशे किल्लेकर, चोगले	१
,, आहारोन शेमूएल किल्लेकर	१
,, आहारोन मोशे उमर्डेकर	१
,, मोशे शेलोमो झीराटकर, काजी	१
,, शालोम बिनयामीनजी चीचोलकर	१
,, दावीद याकोबजी चरीकर, चोगले	१
,, योसेफ आब्राहामजी तलकर, गब्बाय	१
,, शेमूएल इसहाकजी पिंगळे, हेड आकौन्टन्ट	१
,, आब्राहाम शालोमजी भास्तेकर	१
,, याकोब शेमूएलजी शिरकोलकर	१
,, योएल शेमूएलजी शिरकोलकर	१
,, इसहाक शेलोमो घोसालकर	१
,, येलीया शिमशोन सानकर	१
,, शेमूएल हाईम पेझारकर	१
,, शेमूएल येलीया वरोलकर, गब्बाय	१
,, शिमशोन मोशे दीवेकर	१

नांवें.		प्रती.
अज्जम	शेमूएल आहारोनजी अष्टमकर	१
,,	दावीद आहारोनजी गडकर	१
,,	रेऊबेन बिनयामीनजी पेणकर	१
,,	हाईम रेऊबेनजी पेणकर	१
,,	सीलेमान येहेजकेलजी नौगांवकर	१
,,	शेमूएल सीलेमानजी नागांवकर	१
,,	इसहाक आहारोनजी भास्तेकर	१
,,	शिमशोन येहेजकेलजी पिंगले	१
,,	लेवी येहेजकेलजी तलकर	१
,,	रेऊबेन आव्राहामजी भिंजेकर, मेस्त्री	१
,,	आहारोन याकोबजी आवासकर, चोगले	१
,,	दावीद मोशे सानकर	१
,,	बिनयामीन शालोमजी गडकर	१
,,	आव्राहाम याकोबजी गडकर	१
,,	हाईम याकोबजी सानकर	१
,,	याकोब शेमूएलजी दीवेकर	१
,,	इसहाक आव्राहामजी दीवेकर	१
,,	मोशे येलीया पिंगले	१
,,	याकोब येलीया पिंगले	१
,,	येहेजकेल शेमूएलजी आवासकर	१
,,	आव्राहाम रेऊबेन राजपुरकर	१
,,	बाबन बापुजी थलकर, मेस्त्री	१
,,	आव्राहामजी सीलेमानजी दीघोरकर, दाक्तर	१
,,	आहारोन शेमूएलजी नौगांवकर	१

ठाणें.

,,	शेमूएल इसहाकजी जावलीकर, सुभेदार मेजर सरदार बहादर पेनशनर	१
,,	शेमूएल मोशे नागांवकर, सुभेदार पेनशनर	१

नांवें.	प्रती.
अञ्जम शेमूएल दानीएल खरीलकर, फस्ट क्लास हास्पीटाल आसिस्टन्ट	१
,, बिनयामीन येहेजकेल जावलीकर, थर्ड क्लास हास्पीटाल आसिस्टन्ट	१
,, आब्राहाम हाईम, बेलीफ	१
,, शिमशोन आब्राहामजी तलकर, सर्वेर	१
,, शेलोमो दानीएल नौगांवकर	१

पनवेल.

,, योसेफ आहारोनजी कुलाबकर	१
,, शेमूएल आब्राहामजी तरणखोपकर	१
,, आब्राहाम येहेजकेलजी दीवेकर, कमोदान मुकादम....	१
,, शेमूएलजी सीलेमानजी नौगांवकर	१
,, आब्राहाम दावीदजी चरीकर, हाज्जान	१
,, शेमूएल शालोमजी चीचोलकर, गब्बाय..........	१
,, आहारोनजी शिमशोनजी अष्टमकर, हास्पीटाल आसिस्टन्ट इन चार्ज पनवेल डिस्पेनसरी	१
,, मुसाजी सीलेमानजी नागांवकर, मेस्त्री............	१

पेण.

,, येहेजकेल राहामीम पेणकर	१
,, बिनयामीन हासाजी पेणकर	१
,, मोशे शेमूएल नागांवकर	१

रेवदंडा.

,, शेमूएल योसेफ राजपुरकर, हाज्जान	१
,, दावीद आहारोनजी ढोकरकर	१
,, इसहाक सीलेमानजी अष्टमकर	१
,, शालोम येलीया शापुरकर	१

नांवें.	प्रती.
अज्जम इसहाक धंबाजी सानकर, शम्माश	१
,, मोशे दावीद मळेकर	१

चेऊल.

,, बिनयामीन याकोबजी दांडेकर	१

कोर्लई.

,, येलोजी याकोबजी दांडेकर	१

अष्टमी.

,, आहारोन शेमूएलजी अष्टमकर, म्हेतर	५

पुणें.

,, मोशे येहेजकेलजी सानकर	१
,, सादीक येलीया चरीकर	१
,, मेनाहेम इसहाक काजी राजपुरकर	१
,, शिमओन शेमूएलजी चरीकर	१
,, येहेजकेल मोशे नागांवकर, फस्ट क्लास हास्पीटाल आसिस्टन्ट	१
,, येलीया शालोम वालवटकर	१
,, आहारोन दानीएल तलकर	१
,, रेऊबेन येलीया दुदकर	१
,, आब्राहाम रेऊबेन दुदकर	१

अहमदनगर.

,, हाईम बापुजी वरघरकर	१
,, हाईम सीलेमानजी चीचोलकर, ओव्हरसियर धोंड आन्ड मनमाड स्टेट रेलवे	१
,, रेऊबेन आब्राहामजी किलेकर कमीसेरीयट इन्स्पेक्टर ..	१

सातारा.

,, शालोमजी बापुजी वरघरकर	१

नांवें. प्रती.

कारवार.

अञ्जम येसेफ दानीएल........................ १
,, शालोम सीलेमानजी आपटेकर...................... १

येलापूर.

,, आब्राहाम शालोमजी पेझारकर १

भोसावळ.

,, बिनयामीन आब्राहाम श्रीवर्धनकर.............. १
,, येलीएझेर सीलेमानजी तलकर १
,, येहेजकेल बिनयामीनजी रामराजकर.............. १
,, दावीद सीलेमानजी बेलकर १
,, येसेफ हाईम, गार्ड........................ १

भडोच.

,, शिमशोन येसिफजी घोसालकर, वीव्हिंग ज्योबर...... १
,, शालोम सीलेमानजी पेझारकर, दाक्तर १
,, दानीएलजी सकोजी कांदलेकर १

लारकाना.

,, येहेजकेल इसहाकजी पुगांवकर, दाक्तर १

रेजिमेन्ट २ ग्रेनेडीयर.

,, शेमूएल शालोमजी किल्लेकर, दाक्तर............ १

रेजिमेन्ट ३.

,, हाईम शेमूएलजी चरीकर, सुभेदार १
,, इसहाकजी सदकीएलजी वरोलकर, जमादार........ १
,, सीलेमानजी सदकीएलजी वरोलकर, कार्टरमास्तर हवलदार १
,, मोशे येलीया पेणकर, सेकंड क्लास हास्पीटाल असिस्टन्ट. १

नांवें. प्रती.

रेजिमेन्ट ४ रैफल कोर.

अज्जम दानीएल राहामीमजी तलकर सुभेदार मेजर आन्ड बहादर . . १
" थेलीएझेर दानीएलजी तलकर १
" रेऊबेन दानीएलजी तलकर १

रेजिमेन्ट ८.

" शालोमजी नागांवकर सुभेदार १
" शालोमजी दानीएलनी कोर्लेकर, सुभेदार १
" येहुदा इसहाक् अष्टमकर, जमादार १

रेजिमेन्ट १०.

" शालोम मोशे नागांवकर, जमादार नेटिव आडज्यूटन्ट . . १
" येहेजकेल शिमशोनजी किलेकर, दाकर १
" सादीकजी सीलेमानजी थलकर, शिपाय १
" शालोमजी याकोबजी खरीलकर, जमादार १
" शेमूएल याकोबजी खरीलकर, कलर हवलदार १

रेजिमेन्ट १६.

" शालोमजी मुसाजी पेणकर, सुभेदार मेजर १

रेजिमेन्ट १७.

" मोशे दानीएलजी कोलेटकर, सुभेदार मेजर बहादर . . १

रेजिमेन्ट २२.

" आब्राहाम बिनयामीनजी शिरगांवकर, सुभेदार १

इस्त्राएली धर्माचें खरें स्वरूप.

इस्त्राएली धर्माविषयीं साधारण विचार.

जगांतील पहिला धर्म.

ईश्वरानें मनुष्यास बुद्धिवान, पवित्र व पूर्ण सुखी असा उत्पन्न केला होता ; परंतु त्याला एक आज्ञा लावून दिल्ही होती ती त्याच्याने राखविली नाहीं, ह्मणून तो आपल्या पूर्व स्थितीस मुकला. याप्रमाणें जगांत पाप शिरल्याकारणानें त्याच्या सर्व संतानांस हा कालिमा लागला आहे. उत्तरोत्तर पाप इतकें वाढलें कीं, जरी ईश्वर दयाळू आहे, तरी त्याच्या न्यायीपणा प्रमाणें त्यास योग्य शिक्षा करण्याकरितां त्यानें प्रलय आणिला. परंतु पृथ्वी व तिजवरील प्राणी जें आपलें हस्तकर्म, त्यांचा समूळ नाश न व्हावा, आणि जसी आकाशांत तसी पृथ्वीवरहि आपली स्तुति व्हावी, ह्मणून त्यानें त्यांतून एक कुटुंब वांचविलें, व त्या एका कुटुंबाच्या संतती कडून ही पृथ्वी पुनः वसविली. या मनुष्य संततीनें या मोठ्या शिक्षेपासून कांहीं बोध न घेतां त्यांनी आपली वृत्ति पुनः अधिक पालटली असी कीं, तीं मनुष्यें परस्परा विरुद्ध वर्तूं लागलीं एवढेंच नव्हे, परंतु आपल्या उत्पन्नकर्त्या ईश्वराविरुद्धहि वर्त्तून अन्य देवांची व मुर्तींची पूजा करूं लागलीं. ही मूर्तिपूजा वाढून जगांत आपणास ओळखणारा कोणीच राहणार नाहीं, यास्तव ईश्वरानें आपणा करितां आब्राहामास व त्याचें संतान इस्त्राएल यांस निवडून घेतलें व त्यांस मोशेचे हातून नीतिसंबंधी, न्यायसंबंधी व उद्धारासंबंधी उत्तम नियम लावून दिल्हे. याप्रमाणें इस्त्राएली धर्माची स्थापना इस्त्राएल लोक मिसरांतून निघाले त्या वर्षी ह्मणजे सुमारें तीन हजार दोनशें सहा वर्षां पूर्वीं झाली. तरी हा धर्म

जगांतील पहिला व पहिल्या स्त्रीपुरुषांचा धर्म होता, व त्याची स्थापना त्यांच्या उत्पत्ती बरोबर झाली असें ह्मटल्यासहि कांही चिंता नाहीं. कारण हा धर्म शुद्ध एकेश्वरी धर्म आहे, ह्मणजे जगाचा उत्पन्नकर्त्ता व नियंता जो परमेश्वर त्या एकाचीच मात्र भक्ति करावी, हा या धर्माचा मुख्य नियम आहे. आणि या त्यांच्या उत्पन्नकर्त्या एका ईश्वरासच त्या प्रथम स्त्रीपुरूषांनी जाणिलें असावें; आणि त्यावांचून दुसऱ्या कोणासहि त्यांनी मानिलें नसावें असें आपणास साधारण विचारा अंतीं व पवित्र शास्त्रावरून कळून येतें. याच प्रमाणें इस्राएली धर्मांतील दुसरे कांहीं नियम असे शाब्बाथ, अर्पण, शुद्धाशुद्ध पशूंचे भेद, यांविषयींचे नियम हेहि प्रथम स्त्रीपुरुषांपासून चालत आले असावे असें शास्त्रावरून अनुमान होतें. अशा कारणावरून या धर्माची स्थापना आदाम व हाव्वा यांच्या वेळींच झाली हें स्पष्ट आहे. परंतु उत्तरोत्तर मनुष्य ईश्वरास सोडून अधिकाधिक विपरीत मार्गानें चालूं लागल्या कारणानें, ईश्वरानें आपल्या परम दयेकरून सर्व लोकांच्या सुधारणुकीकरितां व कल्याणाकरितां तोच धर्म मोशेचे हातून दिल्हेल्या शास्त्रद्वारें पुनः स्पष्ट रीतीनें लावून दिला आहे.

शास्त्राचें अगत्य.

आतां कित्येक लोक कुतर्क काढून असें ह्मणतात कीं, ईश्वरानें मनुष्यास बुद्धि व सदसद्विचार हे दिल्हे आहेत; मग शास्त्राची गरज काय? तें ईश्वरानें दिल्हें आहे हें कशावरून? आणि मोशेचें शास्त्र व त्यानें लावून दिल्हेला धर्म हींच ईश्वरानें दिल्हेलीं असें कशावरून? परंतु असे प्रश्न करणारांनी अमळसा विचार करून असें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, मानवी बुद्धि अल्प व संकोचित आहे; मनुष्यास सर्वच गोष्टी समजतात असें नाहीं. अगत्याच्या व महत्त्वाच्या अनेक गोष्टी त्याच्या बुद्धीपलिकडे आहेत; आणि त्या सर्वज्ञ ईश्वरासच माहीत असाव्या. परंतु ईश्वर परम दयाळू असल्या कारणानें त्यानें त्या गुप्त ठेवून मनुष्यास अडचणींत व दुःखांत पाडावें असी त्याची इच्छा नसावी, व नाहीं; आणि त्यास सुख प्राप्त व्हावें ह्मणून त्यानें त्यास सुखसाध्य कर-

ण्याचे मार्ग व उपाय कळविले असावे; व ते मोशेच्या शास्त्रद्वारें कळविले आहेत. असें असून सर्वांची बुद्धि सारखीहि नाहीं; यामुळें एकाद्या गोष्टीविषयीं अनेक मनुष्यांचीं अनेक मतें असतात. आणि यामुळें त्यांमध्यें मतभेद व विरोध व शेवटीं कलह उत्पन्न होऊन जें खरें तें कधींच स्थापन होत नाहीं; ह्मणून ते सर्वकाळ संशयांतच राहतात. ईश्वराने आपली इच्छा प्रगट करण्याकरितां व मनुष्यास त्याच्या सुखाचा मार्ग दर्शविण्याकरितां जें शास्त्र दिल्हें आहे, तें शास्त्र जे कोणी मान्य करीत नाहींत त्यांची गति असीच आहे. त्यांमध्यें अशा महा अगत्याच्या गोष्टींविषयीं सर्वदा मतभेद पडून ते सर्वकाळ संशयांतच राहतात. परंतु याप्रमाणें अशा गोष्टींविषयीं त्यांमध्यें मतभेद व विरोध नसावा, व त्यांनी त्यांविषयीं सर्वकाळ अज्ञान व संशयांतच राहूं नये, ह्मणून ईश्वराने दयेकरून त्या त्यांस कळविल्या असाव्या व मोशेच्या शास्त्रद्वारें कळविल्या आहेत.

होब्रोथ हालिबाबोथ या नांवाच्या ग्रंथाचा कर्त्ता त्या ग्रंथाचे प्रस्तावनेंत याजविषयीं असें ह्मणतो कीं, मनुष्यास ईश्वरी नियमांचें व शास्त्राचें ज्ञान व्हावें ह्मणून त्याने तीन द्वारें उघडीं ठेविलीं आहेतः तीं हीं:— एक बुद्धि, जिच्या योगानें मनुष्य आपणास दुसऱ्यांच्या उपद्रवापासून रक्षूं शकतो; दुसरें इंद्रियज्ञान, ज्याच्या योगानें तो सृष्टींतील पदार्थ ओळखूं शकतो; आणि तिसरें शास्त्र, जें भविष्यवाद्यांकडून आपल्या पूर्वजांस व त्यांकडून आपणास मिळालें आहे तें. येणेप्रमाणें आपल्या अनुभवावरून व सुज्ञ व विद्वज्जनांच्या लेखावरून असें सिद्ध होतें कीं, सर्वच गोष्टीं विषयीं आपल्याच्याने बुद्धीवरच आधार धरून राहवत नाहीं, ह्मणून ज्या आपल्या हिताच्या गोष्टी आपल्या बुद्धीपलिकडे आहेत, त्या ईश्वराने आपणास मोशेच्या व आपल्या दुसऱ्या भक्तांच्या हातून कळविल्या आहेत, त्या आपण नम्रतेने मान्य करून त्याप्रमाणें आचरण करावें हा आपला धर्म आहे.

आतां जें खरें आहे त्याचा खरेपणा सिद्ध करण्याकरितां बहुतकरून बाहेरील प्रमाणें नकोत; त्याच्या खरेपणाचीं प्रमाणें त्याच्याच अंगीं

असतात. याप्रमाणें इस्राएली धर्माच्या खरेपणाचीं जीं प्रमाणें त्याच्याच अंगीं आहेत, तीं वाचकां पुढें सादर केलीं आहेत.

इस्राएली धर्माचा साहजिकपणा.

इस्राएली धर्म हा साहजिक धर्म आहे; अशावरून कीं, त्याची माहिती करून घेण्यास फारसा विद्याभ्यास व शोध करावा लागतो असें नाहीं. आपण आपणा सभोंवते सृष्टींत जे अनेक पदार्थ आहेत, त्यांजवर लक्षपूर्वक अवलोकन करून विचार केला असतां, या धर्मांतील मूळतत्वांची माहिती होते एवढेंच नाहीं, परंतु तीं तत्वें सृष्टीच्या नियमांस अनुसरून बुद्धीस ग्राह्य आहेत असें स्पष्ट दिसून येतें. ईश्वराचें अस्तित्व व त्याचा अनाद्यंतपणा, सर्वज्ञपणा, सर्वव्यापकपणा इत्यादिक त्याच्या गुणाविषयीं सृष्टि, जी त्याचें हस्तकर्म, तिजपेक्षां सबल व स्पष्ट असें दुसरें प्रमाण तें कोणतें? याचप्रमाणें परलोकावस्था, कर्मफल, पुनरुत्थिति या गोष्टीहि कित्येक इस्राएल व इतर ग्रंथकारांनीं सृष्टीवरूनच सिद्ध करून दिल्ह्या आहेत; व त्यावरून नास्तिक अगदीं कुंठित व निरुत्तर होतात. हा साहजिकपणा शास्त्रांतहि दर्शविलेला आहे; अनुवाद अध्याय ३० ओवी ११-१४ एथें असें आहे कीं, "मी आज तुला जी आज्ञा लावून देतों, तीहि तुला अवघड नाहीं, ती दूरहि नाहीं. ती आकाशांत असी नव्हे, कीं तुह्मी ह्मणावें "आमच्यासाठीं कोण आकाशांत चढून तिला आमच्या जवळ आणील कीं आह्मी ती ऐकून तिचें आचरण करावें." आणि ती समुद्राच्या पलिकडे असी नव्हे, कीं तुह्मी ह्मणावें कीं, "समुद्राच्या पलिकडे आमच्यासाठीं कोण जावून तिला आमच्या जवळ आणील, कीं आह्मीं ती ऐकून तिचें आचरण करावें." परंतु ही गोष्ट तुला फार जवळ आहे, ती मानण्याविषयीं तुझ्या तोंडीं व तुझ्या हृदयीं आहे.

सुलभपणा.

जसा हा धर्म साहजिक आहे, तसा तो आचरण्यासहि अवघड नाहीं, फारच सुलभ आहे. जे या धर्माप्रमाणें वर्तूं इच्छितात त्यांस

मुख्यत्वें करून दोनच आज्ञा मात्र लक्षांत ठेविल्या पाहिजेत. त्या दोन आज्ञांमध्यें सर्व इस्राएली धर्माचें व शास्त्राचें सार आहे, त्यांतील पहिली आज्ञा וְאָהַבְתָּ אֵת יְיָ אֱלֹהֶיךָ בְּכָל לְבָבְךָ וּבְכָל נַפְשְׁךָ וּבְכָל מְאֹדֶךָ׃ "तूं आपल्या सर्व अंतःकरणाने व आपल्या सर्व जीवाने व आपल्या सर्व शक्तीने आपला देव परमेश्वर यावर प्रीति कर." अनुवाद अध्याय ६ ओवी ५. आणि दुसरी आज्ञा ही कीं וְאָהַבְתָּ לְרֵעֲךָ כָּמוֹךָ׃ "तूं आपल्या सारिखी आपल्या शेजाऱ्या वर प्रीति कर." लेवीय अध्याय १९ ओवी १८. या दोन आज्ञा पूर्णपणें लक्षांत ठेवून जो आचरण करील त्याने शास्त्रांतील सर्व आज्ञा पाळिल्या समान आहे. कारण जो आपल्या सर्व अंतःकरणाने, जीवाने व शक्तीने ईश्वरावर प्रीति करितो, तो ईश्वरा पेक्षां अधिक अथवा त्या सारिखा मान दुसऱ्या कशासहि देणार नाहीं; आणि तो अन्य देवाची अथवा मूर्तीची पूजा करण्यास कधींच प्रवृत्त होणार नाहीं; परंतु तो त्याचेंच भय धरून त्याच्याच आज्ञा पाळण्यांत सर्वदा तत्पर राहील. आणि जो आपल्या सारखी आपल्या शेजाऱ्यावर ह्मणजे इतरावर प्रीति करील, तो जसा आपल्या जीवाची, द्रव्याची अथवा नांवाची हानि करून घेण्यास प्रवृत्त होणार नाहीं, तसा तो इतरांच्या जीवाची, द्रव्याची अथवा नांवाची हानि कधींच करणार नाहीं. मग यापेक्षां श्रेष्ठ नीतीचा मार्ग तो कोणता! आणि हा आचरण्यासहि किती सुलभ! याविषयीं गेमारा शाब्बाथ पृष्ठ ३१ एथें एक गोष्ट आहे ती असी :—

रिब्बी हिल्लेल व एक मूर्तिपूजक यांची गोष्ट.

एके वेळीं एक मूर्तिपूजक रिब्बी हिलेल याजकडे येऊन म्हणाला कीं, महाराज, इस्राएली धर्म स्वीकारावा असी माझी इच्छा आहे. परंतु त्याची माहिती करून घेण्यास माझ्याने फारसा वेळ खर्चवत नाहीं; तर मी माझ्या एका पायावर उभा आहें इतक्यांत मला तुमचें सर्व शास्त्र शिकवा. हिलेल ह्मणाला, "बरें, तर दुसऱ्याने तुजला करूं नये, तें तूं दुसऱ्यासीं करूं नको; ह्मणजे जसी तूं आपणावर प्रीति करितोस त्याप्रमाणें तूं दुसऱ्यावर प्रीति कर. हें सर्व इस्राएली धर्माचें सार आहे. याशिवाय ज्या दुसऱ्या आज्ञा आहेत, त्या सर्व या आज्ञेच्या स्पष्टीकरणा-

करितां आहेत. याप्रमाणें तूं वर्तल्यास तुझ्या हातून सर्व शास्त्र पूर्ण झाल्या प्रमाणें आहे." या मागें सांगितलेल्या दोन आज्ञांची एकच आज्ञा जरी केली तरी होते. ती असी कीं, तूं ईश्वरावर व त्याच्या हस्त-कर्मावर पूर्ण प्रीति कर. सारांश इस्राएली धर्म हा प्रीति या सोप्या व उत्तम गुणावर रचिलेला आहे.

सार्वजनिकपणा.

हा धर्म सार्वजनिक आहे. सर्वांनी याच धर्माप्रमाणें आचरण केलें पाहिजे. जगांतील सर्व मनुष्यें एक मूळ स्त्रीपुरुषांपासून उत्पन्न झालीं आहेत. त्या मूळ स्त्रीपुरुषांचा जो धर्म तोच त्यांच्या सर्व संततीचा धर्म असावा. मागें सिद्ध करून दाखविल्या प्रमाणें प्रथम स्त्रीपुरुषांचा धर्म इस्राएली धर्म होता; या कारणें त्यांच्या सर्व संततीनेंहि इस्राएली धर्मच आचरिला पाहिजे. इस्राएल नसतां अथवा इस्राएली धर्म प्रसिद्धपणें न स्वीकारितां जे त्यांतील न्याय व नीतिसंबंधी आज्ञांप्रमाणें वर्ततात त्यांसहि ईश्वर पावतो, असें लेवीय अध्याय १८ ओवी ९ एथें स्पष्ट सांगितलें आहे. तें वाक्य येणे प्रमाणें וּשְׁמַרְתֶּם אֶת חֻקֹּתַי וְאֶת מִשְׁפָּטַי אֲשֶׁר יַעֲשֶׂה אֹתָם הָאָדָם וָחַי בָּהֶם׃ "तुह्मी माझ्या नेमणुकी व माझे न्याय पाळाच; कांकीं जर कोणताहि माणूस ते आचरील तर तो त्यांकडून वांचेल." याविषयीं इयोब हें एक मोठें उदाहरण आहे. तो इस्राएल नसतांहि नीतीनें व ईश्वरभय धरून वागल्यामुळें, जरी त्याची परीक्षा होतांना त्यास बरींच दुःखें सोसावीं लागलीं, तरी शेवटीं त्यास ईश्वराचा पूर्ण आशीर्वाद प्राप्त झाला. या सिद्धांताविषयीं राबी लोकांचेंहि मत असेंच आहे. रिब्बी मोशे बार मेमोन ज्यास हारमबाम असेंहि नांव आहे तो ह्मणतो कीं, सर्व राष्ट्रांतील सात्विक जनास पुढल्या जगीं विभाग आहे. חֲסִידֵי הָאוּמּוֹת יֵשׁ לָהֶם חֵלֶק לְעוֹלָם הַבָּא׃ इस्राएली धर्मांत इतर लोकांविषयीं असे नियम आहेत कीं, ज्यांची इस्राएली धर्माच्या सत्यतेविषयीं खात्री होऊन जे इस्राएली धर्म स्वीकारितात, त्यांस गेरे सेदक ह्मणजे नीतिमत्त्वाचे वि-देशी असें नांव आहे; त्यांनी इस्राएली धर्मांतील न्याय, नीति व विधि सर्व आचरिले पाहिजेत. परंतु जे इस्राएली धर्म न स्वीकारितां न्यायानें व

नीतीने वर्त्ततात त्यांस गेरे तोशाब अथवा गेरे हाश्शाआर ह्मणजे दारा-जवळ राहणारे विदेशी अथवा बेने नोव्हा ह्मणजे नोव्हाचें संतान असीं नांवें आहेत. यांनी नोव्हाचे वेळीं ईश्वराने दिल्हेल्या सात आज्ञा मात्र राखिल्या पाहिजेत; त्या उत्पत्ति अध्याय ९ एथें सांपडतात. त्यांमध्यें मूर्त्तिपूजा, ईश्वराचा अनादर, खून, व्यभिचार, दगा व चोरी, अन्याय, आणि रक्त अथवा जीवंत प्राण्याचें मास भक्षिणें यांची मनाई आहे. या सात गोष्टींविषयीं विचार केला असतां त्यांजमध्यें सर्वच न्याय व नीति येतात असें उघड दिसून येतें. इस्राएली धर्मांतील विधि संभाळण्याचें यांस कांहींच अगत्य नाहीं; कारण जे आपणास इस्राएल ह्मणवितात त्यांसच मात्र ते लावून दिल्हे आहेत. परंतु इस्राएली धर्मांतील न्याय व नीति सर्व जनास लाभकारक आहेत व त्याप्रमाणें सर्व जनास वर्त्तलें पाहिजे.

इस्राएली व इतर धर्मांमधील अंतर.

आतां हा धर्म सार्वजनिक असल्या कारणाने त्यामध्यें व दुसऱ्या धर्मांमध्यें किती अंतर आहे हें पाहूं या. जगांत जे अनेक धर्म आहेत, त्यांतून कित्येक धर्म असे आहेत कीं, त्यांत जन्मल्याविना अथवा ते स्वीकारिल्याविना आचरतां येत नाहींत; परंतु इस्राएली धर्म नोव्हाचे पुत्रास दिल्हेल्या सात नियमां प्रमाणें कोणीहि आचरावा. दुसरें:— इतर धर्मांतले लोक धर्माभिमानामुळें आपणांस थोर मानून आपणांमध्यें व परकीय लोकांमध्यें भेद राखितात; परंतु इस्राएली धर्माप्रमाणें इस्राएल व विदेशी हे समान आहेत; व त्यांस सारखा नियम असावा, असी आज्ञा अनेक ठिकाणीं आहे ती आज्ञा येणे प्रमाणें; מִשְׁפַּט אֶחָד יִהְיֶה לָכֶם כַּגֵּר כָּאֶזְרָח יִהְיֶה כִּי אֲנִי יְיָ אֱלֹהֵיכֶם׃ "तुह्मांसीं एक न्याय व्हावा; जसा देशस्थांस तसाच विदेशांसहि असावा, कांकीं मी परमेश्वर तुमचा देव आहें." लेवीय अध्याय. २४. ओवी २२. अणखी या वाक्यांत "मी परमेश्वर तुमचा देव आहें." हें ईश्वरी ह्मणणें उभय पक्षासीं आहे; ह्मणजे जसा मी इस्राएलांचा देव आहें, तसाच विदेशांचाहि आहें. तिसरें:—जगांत जे दुसरे अनेक धर्म आहेत त्या प्रत्येकांत अनेक पंथ आहेत. एकाच धर्मांतले कांहीं लोक एक

पंथ स्वीकारून एक गोष्ट मानितात; कांहीं दुसरा पंथ स्वीकारून दुसरी गोष्ट मानितात. असे एका धर्मांतच कोठें कोठें दाहा पंथ असतात. आणि एका पंथांतील लोकांचे मत दुसऱ्या पंथांतील लोकांच्या मतापासून भिन्न असल्यामुळें, ते एकाच धर्मांत असतांहि एक प्रत्येकाचा द्वेष करितात. परंतु इस्राएली धर्माची गोष्ट असी नव्हे. सर्व इस्राएलांचा एकच धर्म व एकच पंथ आहे. कालाच्या व स्थलाच्या अंतरामुळें त्यांमध्यें एकहि निराळा पंथ उद्भवला नाहीं.* जो धर्म व पंथ मोशेने लावून दिल्हा, तोच आतां त्यानंतर सुमारें तीन हजार वर्षें सारखा चालत आहे. आणि जरी इस्राएल सर्व पृथ्वीच्या पाठीवर विखरलेले आहेत, तरी पृथ्वीच्या एका शेवटा कडे राहणाऱ्या इस्राएलाचा जो धर्म आहे, तोच दुसऱ्या शेवटाकडे राहणाऱ्या इस्राएलाचा आहे. त्या दोहोंमध्यें तिलमात्र भेद नाहीं. हा इस्राएली धर्माचा एक मोठा व अगत्याचा गुण आहे. चौथें:—इतर धर्म आपले अनुयायी लोकांचेंच मात्र कल्याण इच्छितात, परंतु इस्राएली धर्म जगांतील सर्व लोकांचें कल्याण इच्छितो. इस्राएलांचे पूर्वज आब्राहाम, इसहाक व याकोब या प्रत्येकांस असा आशीर्वाद दिल्हेला आहे कीं, וְהִתְבָּרְכוּ בְזַרְעֲךָ כֹּל גּוֹיֵי הָאָרֶץ׃ ह्मणजे तुझ्या संतानामध्यें पृथ्वींतील सर्व राष्ट्रें आशीर्वाद पावतील." यामध्यें मात्र त्यांच्या संतानाचें कल्याण नव्हे, परंतु सर्व लोकांचें कल्याण इच्छिलेलें आहे. परंतु कोणी असा प्रश्न करतील कीं, माशीयाहाचे

---

* दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं पेरूशी, सादोकी, हासीदी, हेरोदी, गालीली अशा कांहीं मंडळ्या होत्या, परंतु त्या राज्यकारभारामुळें व कित्येकांच्या अंगीं धर्माचा अत्यावेश असल्यामुळें झाल्या होत्या. तरी एका मंडळीचें मत दुसऱ्या मंडळीच्या मता विरुद्ध होतें असें नव्हे. ते सर्व लोक आपणास एकच मानीत असत, आणि त्यांचीं अर्पणें, त्यांचे विधि इत्यादिक एकच वेळीं, एकच ठिकाणीं व एकच रीतीप्रमाणे होत असत. जे सादोकी होते, ते मात्र पुनरुत्थिति व परलोकावस्था मानीत नसत. परंतु हे फारच थोडे लोक होते व त्यांचें मत लवकरच नाहींसें झालें. हल्लींचे सेफारादी, आशकेनाझी व माभाराबी हेही पंथ नव्हत. हीं वस्तीच्या ठिकाणावरून दिल्हेलीं नांवें आहेत. यांसर्वांचाहि एकच पंथ. शोमरोनी हे शालमेनेझार राजाने दहा वंशांस पाडाव करून नेल्यावर जे कुथी, आवी, हामाथी इत्यादिक लोक आणून शोमरोन देश वसविला, त्यांचें संतान आहेत. हे पवित्र शास्त्रांतून मोशेचीं पांच पुस्तकें मात्र मान्य करितात; यावरून ते इस्राएलांत गणिले जात नाहींत, व ते पूर्वींपासून आजपर्यंत निराळेच आहेत. याशि-

वेळीं मात्र इस्राएलांचेंच महत्त्व वाढणार व त्यांसच सर्वस्वी सुख प्राप्त होणार, यांत सर्व जगांतील लोकांचें कल्याण तें कसें! याचें उत्तर हेंच कीं माशीयाहाचे वेळीं जगांतील सर्व लोकांमधून हेवा, वैरभाव इत्यादिक दुर्गुण नाहींसे होऊन लढाई नाहींशी होईल, व त्यामुळें सर्व जगांत शांति राहील. आणि सर्वांस ईश्वरी ज्ञान प्राप्त होऊन ते परस्परांसीं न्यायानें, नीतीनें व प्रीतीनें वागून ईश्वर जो सर्व जगाचा उत्पन्नकर्त्ता व नियंता त्यासच मात्र भजतील; आणि त्या एका बापाचीं आपण सर्व लेकरें आहों, असें समजून सर्व लोक एका कुटुंबाप्रमाणें प्रीतीनें, आनंदानें, सुखानें व निर्भयपणें नांदतील. अशा अर्थाचीं भविष्यें शास्त्रांत पुष्कळ आढळतात. हा माशीयाहाचा वेळ केवळ इस्राएलांच्याच कल्याणाचा नव्हे, परंतु सार्वजनिक कल्याणाचा वेळ आहे.

इस्राएली धर्मांतील नीति.

आतां या धर्माकडे नीतीच्या संबंधानें आपण पाहूं या. जर हा धर्म ईश्वरदत्त आहे, तर त्यामध्यें उत्तम प्रकारची नीति असली पाहिजे. आणि त्याप्रमाणें ती आहे; हा सिद्धांत इस्राएलांतील सुज्ञ व विद्वान गृहस्थांनींच मान्य केला आहे असें नाहीं, परंतु अन्य लोकांतील सुज्ञ व विद्वान गृहस्थांनींहि मान्य करून त्या विषयावर त्यांनी अनेक ग्रंथहि रचिले आहेत. या सिद्धांतास अणखी एक सबळ प्रमाण हें कीं, या धर्मांत उत्तम नीति आहे, ह्मणूनच या धर्माच्या आधारावर दुसरे कांहीं धर्म उभारलेले आहेत.

वाय कराईम लोक जे युरोपांतील तुर्कस्थानांत व त्याच्या आसपासच मात्र विशेषेंकरून सांपडतात व जे संख्येंतहि फार थोडे आहेत, तेही आपणास इस्राएलांत मिसळायास पाहतात. परंतु ते पाठशास्त्र वर्ज्य करून लेखी शास्त्र मात्र मान्य करितात, आणि त्याचा असा विलक्षण रीतीनें अर्थ करितात कीं, त्यांच्या रीतिभाति इस्राएलांहून अगदींच भिन्न आहेत. यावरून व दुसऱ्या अनेक कारणांवरून त्यांस इस्राएल ह्मणण्यास कांहींच आधार नाहीं. जर यास पंथ ह्मणावा, तर तो धर्मसंबंधी मतभेदामुळें उत्पन्न झाला नाहीं. आनान या नांवाच्या मनुष्यास नासी ह्मणजे सर्व इस्राएलांवर अधिकारी होण्याची आशा होती; परंतु त्याची निराशा झाल्यामुळें त्यानें आपणाकडेस कांहीं मनुष्यें मिळवून हट्टानें इस्राएलांच्या रीती विरुद्ध आचरण चालविलें. अशा कारणावरून झालेल्या पंथास धर्माचा पंथ ह्मणवत नाहीं.

या धर्मांत सांगितलेली नीति पाहावयास फार दूर जावयास नको. ईश्वरानें सीनाय पर्वतावर आपलें वैभव प्रगट करून ज्या दाहा आज्ञा दिल्या आहेत त्याच पाहा. त्यापेक्षां श्रेष्ठ असे नीतीचे मार्ग ते कोणते? या दाहा आज्ञांमध्यें व त्यांच्या स्पष्टीकरणाकरितां ज्या दुसऱ्या आज्ञा आहेत, त्यांमध्यें मनुष्याचें त्यांच्या उत्पन्नकर्त्यासीं, इतर मनुष्यांसीं व आपल्या स्वतांसीं जें कर्त्तव्य, तें उत्तम रीतीनें दर्शविलें आहे.

ईश्वरासीं कर्त्तव्य.

ईश्वरासीं जें आपलें कर्त्तव्य आहे तें असें कीं, आपण त्याजवर प्रीति करावी, आणि त्याचें भय धरून त्याच्या आज्ञा पाळाव्या. हें ईश्वरासीं जें कर्त्तव्य तें नीतीच्या सर्व कर्त्तव्यांमध्यें पहिलें व मुख्य आहे. कारण רֵאשִׁית חָכְמָה יִרְאַת יְיָ "ईश्वराचें भय ज्ञानाचें मूळ आहे." जे खरोखर ईश्वरावर प्रीति करितात व त्यास भितात तेच नीतीने वर्ततात. ज्यांच्या अंगीं ईश्वराची प्रीति व भीति नसते, त्यांस अनीतीने वर्तण्यास कोणताच अडथळा राहत नाहीं; मग ते सहज दुराचार करायास प्रवृत्त होतात. परंतु अशा दुराचाराच्या मार्गाकडे इस्राएलांनी वळूं नये, आणि त्यांनी आपल्या मनीं ईश्वरभीति सर्वदा राखावी, ह्मणून शास्त्रांत त्यांस अनेक वेळा व निक्षून सांगितलें आहे इतकेंच नाहीं, परंतु ईश्वरानें आपला अम्मल व राज्याधिकार त्यांजवर स्थापून सुमारें आठशें वर्षें त्यांजमध्यें साक्षात् वासहि केला. त्यावेळीं त्यानें मानवी राजाप्रमाणें त्यांमध्यें आपलें वैभव राखिलें होतें. जी साक्षात्पणाची राहुटी ही त्याचा माहाल, त्यांमधील दयासन हें त्याचें सिंहासन, त्यांतील पवित्र ठिकाण ही त्याची कचेरी, त्याच्या बाहेरील अंगण हें त्याचें भोजनगृह, बाहेरील अंगण हें त्याचें स्वयंपाकगृह, त्यांतील समई, मेज इत्यादिक जें सामान तेंहि राजडौलासारिख्या उंच किमतीचें होतें. राजवाड्यासारिखा तेथें नित्य सुगंध जाळिला जात असे. आहारोन हा त्याचा प्रधान, मोशे हा त्याचा मुख्य न्यायाधीश. या न्यायाधीशानें, शास्त्र जें कायद्याचें पुस्तक, त्याप्रमाणें लोकांचा न्याय ठरवावा. त्याकडून निवाडा न होण्यासारिखा न्याय, जसा सेलोफहादाच्या कन्यांचा, शाब्बाथ दिवशीं लांकडें वेचणाऱ्याचा, ईश्वरी

नामास दुर्भाषण करणाऱ्याचा, असे न्याय त्याने राजा जो ईश्वर त्यापुढे आणावे. हा सर्व कारभार चालविण्यांत त्याच्या सहायासाठीं पार्लमेंट सभेसारिखी एक सत्तर वडिलांची सभा होती. लेवी लोक हे त्या दरबारांतले चाकर, यांच्या खर्चासाठीं उत्पन्नाचा दाहावा भाग हा त्याने लोकांवर कर बसविलेला होता. दोषहारक यज्ञ हे दंडासमान वाहिले जात. याशिवाय राजा प्रसन्न होऊन कांहीं लाभ झाल्यास लोक आपल्या शक्तीप्रमाणें राजापुढें नजराणा आणीत असत. याप्रमाणें त्या साक्षात्पणाच्या राहुटीची व त्यामध्यें जो पूजनाचा प्रकार होत असे, त्याची राजनीतीसीं तुलना करून पाहिली, तर तीं अगदीं सारखीं दिसून येतात.

इतरांसीं कर्त्तव्य.

दुसरें ह्मणजे इतरांसीं जें आपलें कर्तव्य तें असें कीं, सर्व मनुष्यमात्रांसीं प्रीतीने, दयेने व न्यायाने वर्तावें; कोणाच्या जीवाची, मालाची अथवा नांवाची कोणत्याहि प्रकारें हानि करूं नये. शत्रु जरी असला, तरी त्याचा सूड उगवूं नये आणि मनांत त्याचा हेवाहि करूं नये; कारण सूड घेणें आणि फेड करणें, अनुवाद अध्याय ३२ ओवी ३५ प्रमाणें ईश्वराने आपल्याच हातीं ठेविलें आहे.

बेरूरियेची गोष्ट.

गेमारा बेराखोथ पृष्ठ १० एथें बेरूरिया इजविषयीं असी गोष्ट लिहिली आहे कीं, तिच्या शेजारीं कोणी वाईट भांडखोर मनुष्य राहत असे, व त्याकडून तिचा नवरा रिब्बी मेईर यास फारच त्रास होत असे. एके दिवशीं कंटाळल्या मुळें रिब्बी मेईर याचे तोंडांतून "असा दुष्ट मरो" असे शब्द निघाले. हे शब्द, रिब्बी मेईर याची बायको बेरूरिया, जी विद्वान व स्वभावाने फारच गरीब व मायाळू होती, इच्या कानीं जेव्हां पडले, तेव्हां ती आपल्या नवऱ्यास ह्मणाली, स्वामी, असें कां ह्मणतां! पापी नाहींसे होवोत असें नव्हे, परंतु पापें नाहींसीं होवोत असें शास्त्रांत ह्मटलें आहे. तर ईश्वराजवळ पाप नाहींसें होवो असें मागणें मागा; पापी

नाहींसे होवोत असें मागणें मागूं नका. ते जगोत आणि ईश्वरी सहायानें ते पापापासून वळोत. पाप नाहींसें झालें, ह्मणजे कोणी दुष्ट होणार नाहीं.*

कोंकऱ्याचा दृष्टांत.

याच अर्थाची दुसरी एक गोष्ट हाखामीम लोकांनी दृष्टांताकरितां रचिली आहे ती असी कीं,—ईश्वरानें मोशेचे शास्त्रांतील नियम इस्राएलांस लावून दिल्यावरून इस्राएल लोक भयभीत होऊन व घाबरून मोशे जवळ येऊन म्हणाले कीं, तूं आम्हास सदाचरणाने आचरायास, नीतीने व परोपकारबुद्धीने वर्त्तायास, शांतवेवर प्रीति करून युद्धाचा त्याग करायास सांगतोस; तर ईश्वराने जे धर्म आम्हास नेमून दिल्हे आहेत, त्यांप्रमाणें आम्ही सर्व जनासीं वर्तूं; परंतु त्याचप्रमाणें जे आम्हासीं वर्तणार नाहींत, त्यांसीं आम्ही कसें वर्त्तावें? ते आह्मावर चढून आल्यावर आम्ही समेट करूं पाहूं, तर ते आम्हास भितरे म्हणतील, आमच्या नम्रतेमुळें ते आह्मास शौर्यहीन समजतील. मग आम्ही कोणत्या शस्त्रांचा उपयोग करावा? आणि आम्ही त्यांसीं कसें लढावें? मोशेने हा पुढील दाखला देवून त्यांस उत्तर केलें कीं, भितऱ्या स्वभावाचा जो कोंकरा यास उत्पन्न केल्यावर तो लागलाच ईश्वरापुढें येऊन ह्मणाला, हे प्रभू! तूं मला असें दुर्बल कां केलें? हिंसक प्राण्यांमध्यें मी कसा राहूं! कांहींकांस सोंड, कांहींकांस शिंगें, कांहींकांस पंजे व कांहींकांस भयंकर दांत असून मी सर्वकाळ असा निराश्रित व काळजींतच राहावें काय! ईश्वराने उत्तर केलें, तूं आपल्या शत्रूवर वार करावेस ह्मणून तुला शिंगें पाहिजेत काय? कोंकरा ह्मणाला, नको महाराज, मी कोणावर वार करूं इच्छीत नाहीं. तर तूं आपल्या शेजाऱ्यास गिळावेंस ह्मणून तीक्ष्ण दंतयुक्त तोंड तुला पाहिजे काय? कोंकरा ह्मणाला, नको महाराज, मी

---

* या गोष्टींत बेरूरियेने प्रमाणाकरितां गीत १०४ ओवी ३५ יִתַּמּוּ חַטָּאִים מִן הָאָרֶץ וּרְשָׁעִים עוֹד אֵינָם या वाक्याचा उपयोग केला आहे. या वाक्यांतील חַטָּאִים या शब्दाचा अर्थ जरी पापी असा बहुत करून केला जातो, तरी त्या शब्दाचा खरा अर्थ पापें असा आहे. आणि पापी यास חוֹטְאִים असा शब्द होतो. यावरून त्या वाक्याप्रमाणें חוֹטְאִים पापी नव्हे, परंतु חַטָּאִים पापें हीं जगांतून नाहींसीं होवोत; ह्मणजे अणखी कोणी दुष्ट होणार नाहीं.

आपल्या शेजाऱ्यासीं समेटाने वागूं इच्छितों. तर तूं आपल्या शत्रूबरोबर लढावेंस आणि आपणावरील विघ्न टाळावेंस ह्मणून तुला पंजे अथवा सोंड पाहिजे काय? कोंकरा ह्मणाला नको, महाराज, मी कोणासीं शत्रुत्व राखायास इच्छित नाहीं. तर मग तूं काय मागतोस? कोंकरा ह्मणाला, महाराज, ते जो मला उपद्रव करूं इच्छितील त्याचा निवारणोपाय मात्र मी मागतों. ईश्वर ह्मणाला, होय, आतां मी समजलों, जा, तुझ्या अंगीं नम्रता ही तुझी ढाल, आणि सहनशीलता ही तरवार तुला दिली आहे, तुझ्या शत्रूने तुला कितीं जरी पीडिलें, तरी तुझा नाश होणार नाहीं. हा दाखला देवून मोशे इस्राएलांस ह्मणाला, अहो इस्राएलाच्या पुत्रानो, ईश्वराने आपल्या शास्त्राच्या रक्षणाकरितां तुह्मास निवडून घेतलें असतां, लोक तुह्मास पीडितील अशा भयामुळें तुह्मी शस्त्रहीन आहां असी कुरकुर कां करितां? त्यांसारिखे क्रूर होण्यास तुह्मी इच्छितां काय? इस्राएल ह्मणाले, नाहीं, आह्मी क्रूर होऊं इच्छित नाहीं. मोशे ह्मणाला, तुह्मी त्यांसारिखे अन्यायी, मत्सरी, डंशी व घातक होवूं इच्छितां काय? इस्राएल ह्मणाले, नाहीं नाहीं. मोशे ह्मणाला, तर मग तुह्मी काय मागतां? इस्राएल ह्मणाले, आह्मी त्या कोंकऱ्यासारिखीं शस्त्रें मागतों. यावरून मोशे त्यांस ह्मणाला, तुमची इच्छा पूर्ण होवो. जे तुह्मास उपद्रव करूं इच्छितील त्यांसमोर नम्रता ही ढाल तुह्मी धरा, आणि जे तुह्मास पीडूं इच्छितील त्यांजवर तुमच्या सद्गुणांचें शस्त्र चालवा.

या गोष्टीचें तात्पर्य काय तें पाहा. ज्यांच्या अंगीं नम्रता असते, त्यांसीं कोणी वैरभाव राखीत नाहीं; आणि जे सदाचरणाने वर्ततात, त्यांस कांहीं उपद्रव करण्याचें प्रयोजन कोणास पडत नाहीं. नम्रता व सदाचरण यांपासून उभयपक्षीं लाभ आहेत; ते असे कीं, ज्याच्या अंगीं हे गुण असतात, ते दुसऱ्यांच्या उपद्रवापासून रक्षिले जातात, आणि दुसरे त्यांस उपद्रव करण्याच्या दोषापासून रक्षिले जातात. असी दुसऱ्याबरोबर वागण्याची रीति इस्राएली धर्मांत सांगितली आहे.

स्वतांसीं कर्त्तव्य.

आतां आपल्या स्वतांसीं जें आपलें कर्त्तव्य तें हेंच कीं, आपण आपला

जीव रक्षावा, आणि या लोकींचें व परलोकींचें सुख प्राप्त करून घेण्यास झटावें. या गोष्टी साध्य होण्यास नीतीचें वर्त्तन, सहनशीलता, समाधान, ईश्वरी इच्छेवर भार, उद्योग इत्यादिक सद्गुण अंगीं असणें अवश्य आहे. याशिवाय आपली शरीरसंपत्ति नीट राहावी ह्मणून आहार व स्वच्छता यांस जपलें पाहिजे. तर जे पदार्थ अपकार करणारे आहेत ते न भक्षण्याविषयीं, मिताहाराविषयीं उघड आज्ञा असून, विधिसंबंधी ज्या आज्ञा आहेत, त्या बहुतकरून अशाच अर्थाच्या आहेत.

सृष्टींतील दुसऱ्या पदार्थांसीं कर्त्तव्य.

याप्रमाणें या धर्मांत ईश्वरासीं व मानवी प्राण्यांसीं मात्र वागण्याचे नियम आहेत असें नाहीं; निर्बुद्धि असे जे इतर प्राणी, व निराधार असी जी वनस्पति, यांसहि विनाकारण दुःख होऊं नये ह्मणून त्यांचेंहि संरक्षण केलेलें आहे. सारांश मागें सांगितल्या प्रमाणें ईश्वरावर व त्याच्या सर्व हस्तकर्मांवर प्रीति करावी, हा या धर्मांतील नीतीचा सार आहे.

सुंतेचीं कारणें.

इस्राएली धर्मामध्यें जे विधि लावून दिल्हे आहेत, त्यांमध्यें सुंता ही पहिली व मुख्य. मुलगा जन्मल्यावर आठव्या दिवशीं सुंता करावी लागते. ही आब्राहामापासून चालू आहे. ईश्वराने आब्राहामाच्या ज्या दाहा परीक्षा घेतल्या, त्यांतील ही आठवी. या परीक्षेत तो चांगला उतरला ह्मणून त्यास "पूर्ण" ही संज्ञा मिळाली व सुंता ही ईश्वराच्या व त्याच्यामध्यें व त्याच्यामागें त्याच्या संतानांमध्यें कराराची खूण झाली आहे. ही संज्ञा त्याच्या संतानांसहि मिळावी, आणि उभयपक्षीं तो करार राखला जावा ह्मणून इस्राएलांस सुंता करावी लागते. सुंतेचें दुसरें कारण असें कीं, इस्राएलांनी शुद्ध असावें; व्यभिचारासारिख्या नीच व ओंगळ कर्मास प्रवृत्त होऊं नये. कदाचित् अशा कर्माकडे त्याचें मन वळूं लागलें, तर लागलीच त्यास त्या कराराची आठवण होऊन त्यापासून त्याने वळावें. आणि याप्रमाणें त्याने आपलें मनही शुद्ध राखून त्यांतून कामबुद्धि व विषयासक्ति दूर करावी, आणि सर्व प्रकारें ईश्वराचेंच भय मनीं राखावें,

ह्मणजे जशी ते आपल्या देहाची सुंता करितात, तशी त्यांनीं आपल्या मनाचीहि सुंता करावी, अशा सूचनेविषयीं हें चिन्ह आहे. अशा अर्थाचीं वाक्यें शास्त्रांत पुष्कळ व अनेक ठिकाणीं आहेत. इस्राएल मूर्तिपूजेच्या, शाब्बाथ मोडण्याच्या व अशा दुसऱ्या दोषांत पडले, परंतु त्यांकडून हा करार मोडला गेला असें शास्त्रांत अथवा इतिहासांत बहुतकरून कोठेंच आढळत नाहीं. हा करार त्यांजकडून मोडला जावा ह्मणून अनेक वेळीं अनेक राजांनीं त्यांजवर जुलूमहि केला, परंतु त्यांनीं तसें न करतां आपले प्राणहि दिल्हे असीं उदाहरणें सांपडतात.

शाब्बाथाचीं व दुसऱ्या सणांचीं कारणें.

आतां या धर्मांतले सण कसे, आणि कोणत्या कारणास्तव स्थापिले आहेत याचा विचार करूं. त्यांमध्यें शाब्बाथ हा मुख्य, व आठवड्याचा सण आहे. हा मनुष्याच्या आरोग्यतेच्या रक्षणासाठीं स्थापिला आहे; कारण त्या दिवशीं संसारसंबंधी कोण्पतेंहि काम करण्याची मनाई आहे. मनुष्याच्या प्रारब्धीं कष्ट आहेतच; אָדָם לְעָמָל יוּלָּד तो कष्टासाठीं जन्मला आहे; तरी सतत त्याच्यानें कष्ट करवणार नाहींत. तसें केल्यानें तो लवकर क्षीण होणार, म्हणून त्यास पुर्ति विश्रांति असावी. ही विश्रांति त्यास मिळावी आणि कष्टांमुळें त्याची प्रकृति बिघडूं नये हें शाब्बाथाचें एक कारण. दुसरें कारण असें कीं, संसारसंबंधी कामांत जेव्हां मनुष्य गुंततो, तेव्हां बहुधा त्यास त्याच्या उत्पन्नकर्त्याची आठवण पडत नाहीं, अथवा हयगईमुळें तो त्यास विसरतो, परंतु तसें होऊं नये. मनुष्यानें आपला उत्पन्नकर्त्ता, पाळणकर्त्ता व पोषणकर्त्ता याच्या भजनीं आपल्या आयुष्याचा कांहीं काळ लावावा, म्हणून हा दिवस याच कामाकरितां नेमिला आहे. तिसरें कारण असें कीं, शाब्बाथ दिवस पवित्र मानिल्यानें ईश्वर हाच जगाचा उत्पन्नकर्त्ता असें आपण मान्य करितों. शाब्बाथ हा उत्पत्तीच्या आठवणी करितां आहे. ईश्वरानें सृष्टींतील सर्व पदार्थ साहा दिवसांत उत्पन्न करून सातव्या दिवसास आशीर्वाद देऊन पवित्र केलें, असें जो मान्य करितो त्यास शाब्बाथ दिवस अगत्य पाळिला पाहिजे. याजविषयीं एबेन एझरा, चौथ्या आज्ञेवर टीका

करितांना ह्मणतो कीं, כָּל הָעוֹשֶׂה מְלָאכָה בְּשַׁבָּת הוּא מַכְחִישׁ בְּמַעֲשֵׂה בְרֵאשִׁית׃ जो शाब्बाथ दिवशीं काम करितो तो उत्पत्तीचें काम अवमानितो. आणि जो उत्पत्तीचें काम अवमानितो, त्यानें सर्वच शास्त्र अवमानिल्या प्रमाणें आहे. हीं शाब्बाथाचीं मुख्य कारणें आहेत. पेसा, शाबूओथ व सुकोथ हे तीन सण, ईश्वरानें इस्राएलांवर पूर्वीं अपार उपकार केले आहेत, त्यांच्या स्मरणार्थ आणि मनुष्याच्या पोषणाकरितां व पाळणा करितां ऋतूमध्यें जे पालट होतात, त्यांवरून त्याची उपकारस्तुति व्हावी ह्मणून लावून दिल्हे आहेत. पेसा या सणास मिसरांतून निघण्याच्या आठवणी करितां पेसा हें नांव दिल्हें आहे. आणि हा सण वसंत ऋतूमध्यें येतो, तेव्हां सृष्टींतील पदार्थांचें सौंदर्य पाहून ईश्वराची स्तुति व्हावी ह्मणून या सणास חַג הָאָבִיב ह्मणजे कोंवळ्या कणिसाचा सण असेंहि नांव आहे. शाबूओथ हा सप्तकांचा सण, सीनाय पर्वतावरील शास्त्राच्या देणगीच्या आठवणीकरितां आहे. तोच हंगामाचा वेळ, त्या वेळीं शेतें पिकून कापण्या सारिखीं होतात यावरून ईश्वराची स्तुति व्हावी, म्हणून या सणास חַג הַקָּצִיר कापणीचा सण असें नांव आहे. तिसरा सुकोथ मंडपाचा सण, हा इस्राएल लोक चाळीस वर्षें रानांत मंडपासारिख्या राहुटींत राहात असतां, सर्व विघ्नापासून व संकटांपासून ईश्वरानें त्यांस रक्षिलें याच्या आठवणी करितां नेमिला आहे. यास חַג הָאָסִיף म्हणजे धान्य गोळा करण्याचा सण असेंहि नांव आहे. शेतांत चांगलें पीक येऊन ईश्वरानें आपल्या व आपल्या कुटुंबाच्या पोषणापुरतें व अधिक अन्न आपणास वाढलें, यावरून त्याचे उपकार मानावे, आणि पुढेंहि असीच त्याची कृपा व्हावी, म्हणून त्याजकडे आपलें मागणें करावें, यावरून या सणाची स्थापना आहे. या शिवाय רֹאשׁ הַשָּׁנָה वर्षप्रतिपदेचा सण जो आहे, तो अशा साठीं कीं, मागील वर्षीं ईश्वरानें दयेंकरून आपणास सुरक्षित राखिलें म्हणून त्याची उपकारस्तुति करावी; आणि मागिल वर्षाच्या आपल्या वर्तणुकी विषयीं विचार करून जीं वाईट कर्में आपल्या हातून झालीं असतील, त्यांजविषयीं पूर्ण पश्चात्ताप करून तीं सोडावीं यासाठीं; आणि כִּפֻּר प्रायश्चित्ताचा दिवस हा त्या पापांचें प्रायश्चित्त करून ईश्वरानें तीं सर्व क्षमा करावीं, म्हणून त्याजपुढें विनंती करण्यासाठीं नेमिले

आहेत. असीं हीं इस्राएली धर्मातील सणांचीं व पर्वकाळांचीं कांहीं कारणें आहेत.

इस्राएली धर्माच्या मुख्य गुणांचा सारांश.

असा हा इस्राएली धर्म साहजिक, स्वल्प, सार्वजनिक व उत्तम नीतीचा आहे. त्याकडून सदाचरणानें व परोपकारबुद्धीनें वर्तायास पूर्ण मोकळीक आहे; परंतु मनुष्यानें अनीतीनें वर्तूं नये, ह्मणून निषेध करून त्याच्या कर्माचें, वाचेचें व मनोवृत्तीचेंहि आकलन केलें आहे. त्याकडून ईश्वराचा योग्य सन्मान, व मनुष्याचा व पश्वादि प्राण्यांचा हक्क कसा राखावा, आणि इहलोकीं व परलोकीं सुख कसें प्राप्त होतें हें समजतें. त्यांतील नियम सर्वांस मान्य होण्यासारिखे, सर्वांस उपयोगीं व सर्वांस लाभकारक आहेत. असा धर्म व असे त्यांतील नियम लावून देण मानवी बुद्धीच्या पलिकडे आहे. हा धर्म व हे त्यांतील नियम, जो सर्वज्ञ त्यानेच लावून दिल्हे असावेत. दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत असी नीति व असे नियम नाहींत. याविषयीं अनुवाद अध्याय ४ ओवी ८ एथें मोशे असें ह्मणतो कीं וּמִי גּוֹי גָּדוֹל אֲשֶׁר לוֹ חֻקִּים וּמִשְׁפָּטִים צַדִּיקִם כְּכֹל הַתּוֹרָה הַזֹּאת אֲשֶׁר אָנֹכִי נֹתֵן לִפְנֵיכֶם הַיּוֹם׃ "हें शास्त्र जें मी आज तुमच्या पुढें ठेवितों, त्यांतल्या अवघ्यांसारिखे यथार्थ नियम व नीति कोणत्या मोठ्या राष्ट्रांस आहेत." हे जे या धर्माचे कांहीं गुण एथें सांगितले आहेत, तेच त्याचीं प्रमाणें समजून त्याजविषयीं विचार केला, आणि मोशेचें शास्त्र वाचून त्याजविषयीं नम्रतेनें, विचारानें व निःपक्षपातानें शोध केला, तर या धर्माचा खरेपणा व ईश्वरदत्तपणा उघड दिसून येईल.

इस्राएली धर्माविषयीं आरिस्टाटलाचें मत.

या धर्माविषयीं ग्रीस देशांतील आरिस्टाटल नांवाचा महातत्त्वज्ञानी, ज्यानें दैहिक, मानसिक व आत्मिक विषयांवर अनेक ग्रंथ रचिले आहेत, त्यानें आपला शिष्य आलेक्सांडर बादशाहा यास लिहिलेले एका पत्रांत आपलें मत दर्शविलें आहे. या पत्राची हकिकत व त्याचें इब्री भाषांतर शलशेलेथ हाक्कब्बाला या ग्रंथांत आहे; तें येणेंप्रमाणें:—जो देव आंधळ्यांस दृष्टि देतो व पाप्यांस मार्गीं लावितो, तो धन्य. त्यानें मजवर दया

व परम कृपा करून माझें अत्यंत हित केलें. मीं तत्त्वज्ञानाच्या शोधास लागून आपल्या बुद्धीच्या समजाप्रमाणें सर्व गोष्टी ठरवीत असें; अशा ज्या पूर्ण अज्ञानांत मी होतों, त्यांतून त्यानें मला काढिलें ह्मणून तो योग्य स्तुतीनें स्तविला जावो. माझ्या आयुष्याच्या शेवटल्या दिवसांत इस्राएलांतील सुज्ञजनांतून एका* बरोबर माझें संभाषण होईपर्यंत, मी पुष्कळ ग्रंथ करून त्यांजकडे पाहाणारांस मी बहकाविलें. परंतु त्या लोकांस सीनाय पर्वतावर वतनाप्रमाणें दिल्हेल्या शास्त्रांत त्यानें आपली निपुणता दाखवून, आणि ईश्वराच्या पवित्र नामानें केलेल्या खऱ्या इंद्रियगोचर अशा खुणा व असे चमत्कार त्यानें मला दाखवून; त्या शास्त्राकडे त्यानें माझें मन वळविलें. परंतु मी अज्ञान असल्यामुळें त्या समजत नव्हतों; कारण त्यांतील बहुतेक गोष्टी बुद्धीपलिकडे आहेत. आणि जेव्हां मी हें पाहिलें, तेव्हां इस्राएलांचा धर्म माझ्या सर्व शक्तीनें समजण्या करितां मी आपलें मन त्याजकडे लाविलें. तर पाहा, तो जसा पूर्ण दगडांवर रचिलेला आहे; तो तत्त्वज्ञानाप्रमाणें दुर्बोध नाहीं. यास्तव हे माझ्या विनोदि शिष्या, महाराजा आलेक्सांडरा, तुला व तुझे मित्र तत्त्वज्ञानी यांस माझ्या ग्रंथांनी बहकवूं नये. पृथ्वीच्या शेवट पर्यंत विखरलेले माझे ग्रंथ जर मी एकवट करूं शकतों, तर इतरांच्या बुद्धीस त्यांकडून भ्रम न व्हावा ह्मणून ते सर्व मी अग्नीनें जाळून टाकिले असते, व त्यांतून एकहि राहूं दिल्हा नसता. कारण मी जाणतों कीं, त्यांकडून मी स्वतां पाप केलें, व दुसऱ्यांकडूनही पाप करविलें; ह्मणून मला देवाकडील मोठा दंड भोगावा लागेल. यास्तव हे माझ्या पुत्रा, आलेक्सांडरा, तुजपुढें व जगांत येणाऱ्या सर्वांपुढें मी असें मान्य करितों कीं, बुद्धीकडून समजणाऱ्या गोष्टींतून बहुतेक खोट्या आहेत; कारण जो उंचाहून उंच तो त्या आपले स्वाधीन राखितो. तर आतां माझ्या दैवीं दंड भोगणें आहे. आणि पश्चिमेकडे विखरलेल्या माझ्या ग्रंथां विषयीं मी सत्यानें असें कळवितों कीं, त्यांजविषयीं विचार करावा व त्यांचें मनन करावें अशा योग्यतेचे ते नाहींत; कारण तें मनन करणें व तें तत्त्वज्ञान खोटें आहे. परंतु पाहा, ईश्वरापुढें आतां

---

* आरिस्टाटल याचें संभाषण शिमओन हासद्दीक जो त्या वेळीं मुख्य याजक होता याजबरोबर झालें असावें.

मी निर्दोष आहें, कारण मजकडून हें पाप न जाणतां घडलें आहे. तर जे त्याजविषयीं विचार करितात त्यांस हाय हाय! कारण ते थेट अधोलोकास जातील. आणि तूं जाण कीं, ज्याप्रमाणें त्या सुज्ञ मनुष्यानें या ज्ञानाविषयीं मला दाखविलें, त्याचप्रमाणें दावीदाचा पुत्र शलोमो यानेंहि आपल्या दृष्टांत वचनांत भविष्य कथन करून म्हटलें आहे कीं, "त्यानें (पवित्र शास्त्रानें) तुला परनारीपासून, जी स्त्री आपल्या वचनांनी आर्जव करिती तिजपासून राखावें," अणखी असें लिहिलें आहे कीं, "तुझें मन तिच्या मार्गाकडे वळूं नये", अणखी असें लिहिलें आहे कीं, "तिजकडे कोणी गेले तर परत येत नाहींत."* जे डोळे अशा गोष्टींकडे पाहतात त्यांस हाय हाय! आणि जे कान अशा गोष्टी ऐकितात त्यांस हाय हाय! मी आपलें शरीर अशा गोष्टी करितां झिजविलें म्हणून मला हाय हाय! आणि लाभकारक नसून उपद्रविक, व उत्कर्ष न करतां अपकर्ष करणाऱ्या गोष्टीं करितां मी आपल्या आयुष्याचा काल हरविला म्हणून मला हाय हाय! मी अनेक ग्रंथ केले म्हणून सर्व लोकांत माझी कीर्त्ति झाली आहे; आणि ही माझी कीर्त्ति सर्वकाळ राहील असें तूं कां म्हणतोस? अशा निराळ्या प्रकारच्या ग्रंथावरून माझी कीर्त्ति न वाढतां, पवित्र शास्त्रावरून माझी कीर्त्ति वाढली असती तर मला अधिक आवडतें. ते माझे ग्रंथ (चोहोंकडे) विखरण्या पेक्षां मी फांस घेऊन मरावें हें बरें असें मला वाटतें. कारण शास्त्रास धरून राहणारे, जो जीवनाचा प्रकाश त्या प्रकाशांत चालतात; परंतु जे तत्वज्ञान धरून राहतात, ते नाशाच्या खांचेंत जातात; म्हणून पुढें सर्वांच्या शासना एवढें मोठें शासन मला भोगावें लागेल. ही गोष्ट मी तुला या पूर्वीं अशा करितां कळविली नाहीं कीं, कदाचित् तूं मजवर रागावशील आणि मला कांहीं उपद्रव करशील; परंतु आतां मी जाणतों कीं, हें पत्र तुजकडे पोहोंचल्या पूर्वीं मी मरून भूमींत जाऊन निजेन. हे महाराजा, आलेक्सांडरा, अक्षयवासस्थानीं जाणारा तुझा शिक्षक आरिस्टाटल याचा तुला सलाम.

* शास्त्राप्रमाणें या वाक्यांत परनारीची उपमा परधर्म व मूर्तिपूजा यांस दिल्ही आहे.

जगांतील शेवटला धर्म.

आतां एथें असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, जर इस्राएली धर्माच्या अंगीं असे गुण आहेत, तर इस्राएल लोक आपल्या उपदेशकांकडून त्याचा प्रसार कां करीत नाहींत? यास उत्तर असें कीं, इस्राएलांवर हें काम सोंपलेलें नाहीं. या कामांत इस्राएलांचा हात नसतां ईश्वरी साधनानेच तो पसरेल. कारण जें सत्य तें कांहीं लोकांस कांहीं वेळ गैर समजुतीमुळें मान्य नसतें, तरी शेवटीं सत्यास जय मिळतोच. हल्लीं जरी अनेक धर्म व पंथ उत्पन्न झालेले आहेत, तरी असा प्रकार सर्वकाळ चालेल असें अगदीं वाटत नाहीं; शेवटीं जगांतील सर्व लोक, त्यांचा उत्पन्नकर्ता, जो खरा व जीवंत देव त्यासच ओळखतील. आणि जखार्या अध्याय १४ ओवी ९ एथें ह्मटल्याप्रमाणें וְהָיָה יְיָ לְמֶלֶךְ עַל כָּל הָאָרֶץ בַּיּוֹם הַהוּא יִהְיֶה יְיָ אֶחָד וּשְׁמוֹ אֶחָד׃ "परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्या समयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच." आणि इस्राएली धर्म जो जगांतील पहिला धर्म होता, तोच सत्य असल्या कारणाने शेवटला धर्म होईल. हा समय जवळ येत आहे असीं चिन्हें दिसण्यांत येतात. अनेक धर्मांतले व देशांतले लोकांस त्यांची चूक दिसूं लागली आहे; आणि ते मूर्तिपूजा सोडून जो जगाचा उत्पन्न कर्त्ता व नियंता, त्याच्याच भक्तीचा मार्ग स्वीकारूं लागले आहेत. यांत इस्राएलांचा कांहींच हात नसतां ईश्वरी साधनानेंच असें होत चाललें आहे. याजविषयीं जखार्या अध्याय १४ ओवी ८ "आणि त्या समयीं असें होईल कीं, जीवंत जलें येरूशालेमांतून निघतील; त्याचा अर्धभाग पूर्वेच्या समुद्राकडे, आणि त्याचा दुसरा अर्ध भाग पश्चिमेच्या समुद्राकडे असे जातील", या वाक्यावर एका टीकाकाराने असें म्हटलें आहे कीं, येरूशालेमांतून निघणारीं जीवंत जलें, हें ईश्वरी ज्ञान पूर्वेकडे महमदी धर्माकडून व पश्चिमेकडे ख्रिस्ती धर्माकडून पसरलें. या दोन्ही धर्मांत इस्राएली धर्माप्रमाणें मूर्तिपूजेचा अगदी वीट मानिलेला आहे, म्हणून वरील वाक्यार्थाप्रमाणें ते ईश्वरी ज्ञानाचा प्रसार होण्याचीं साधनेंच आहेत, असें म्हटल्यास अडचण नाहीं.

इस्राएलांस निवडून घेण्याचें कारण.

मग ईश्वरानें इस्राएलांस दुसऱ्या लोकांमधून एवढ्या आवडीनें निवडून घेतलें तें कशासाठीं? त्यांस בְּנִי בְכוֹרִי יִשְׂרָאֵל׃ "इस्राएल माझे ज्येष्ठ पुत्र" निर्गम अध्याय ४ ओवी २२, מַמְלֶכֶת כֹּהֲנִים׃ "आचार्यांचें राज्य." निर्गम अध्याय १९ ओवी ६ असीं प्रिय व थोर नांवें दिल्हीं तीं कां? आणि त्यांवर काम सोंपलें तें कोणतें? तर याच दोन नांवांविषयीं एथें विचार करूं या. ईश्वर जो सर्व जगताचा बाप, यानें सर्व लोक जेहीं त्याचीं लेकरेंच आहेत, त्यांतून इस्राएलांस आपले ज्येष्ठ पुत्र अशासाठीं मानून घेतले कीं, जसा बाप, त्याचे दुसरे पुत्र अज्ञान असल्यास आपलें अमोलिक धन आपल्या ज्येष्ठपुत्राच्या स्वाधीन करितो; व तें त्यानें सांभाळून त्यानें आपल्या वर्तणुकीच्या उदाहरणानें आपल्या भावांस नीतीच्या मार्गास लावावें हें काम त्याजवर सोंपितो; तसेंच ईश्वरानें इस्राएलास, आपले "ज्येष्ठपुत्र" मानून पवित्र शास्त्र हें उत्तम धन त्यांच्या स्वाधीन करून, तें सांभाळण्याचें, आणि त्याप्रमाणें आचरण करून दुसऱ्या लोकांस ईश्वरभीतीच्या व नीतीच्या आचरणाचें उदाहरण दाखविण्याचें काम त्यांजवर सोंपिलें आहे. "आचार्यांचें राज्य" या नांवाचाहि अर्थ असाच होतो; ह्मणजे आचार्यांप्रमाणें त्यांनीं आपल्या धर्मांतील न्याय, नीति व विधि सांभाळून व आपल्या आचरणानें शुद्ध असून, शुद्ध आचरणाचें उदाहरण दुसऱ्यांस दाखवावें, हेंच त्याचें मुख्य कर्त्तव्य आहे. जेव्हां इस्राएल असे वर्ततील तेव्हां ईश्वरी कृपा त्यांवर होईलच. मग त्याचें कुशल पाहून जखार्या अध्याय ८ ओवी २०–२३, एथें ह्मटल्याप्रमाणें כֹּה אָמַר יְיָ צְבָאוֹת עֹד אֲשֶׁר יָבֹאוּ עַמִּים וְיֹשְׁבֵי עָרִים רַבּוֹת׃
וְהָלְכוּ יוֹשְׁבֵי אַחַת אֶל אַחַת לֵאמֹר נֵלְכָה הָלוֹךְ לְחַלּוֹת אֶת פְּנֵי יְיָ וּלְבַקֵּשׁ אֶת יְיָ צְבָאוֹת אֵלְכָה גַּם
אָנִי׃ וּבָאוּ עַמִּים רַבִּים וְגוֹיִם עֲצוּמִים לְבַקֵּשׁ אֶת יְיָ צְבָאוֹת בִּירוּשָׁלַיִם וּלְחַלּוֹת אֶת פְּנֵי יְיָ׃ כֹּה אָמַר
יְיָ צְבָאוֹת בַּיָּמִים הָהֵמָּה אֲשֶׁר יַחֲזִיקוּ עֲשָׂרָה אֲנָשִׁים מִכֹּל לְשׁוֹנוֹת הַגּוֹיִם וְהֶחֱזִיקוּ בִּכְנַף אִישׁ יְהוּדִי
לֵאמֹר נֵלְכָה עִמָּכֶם כִּי שָׁמַעְנוּ אֱלֹהִים עִמָּכֶם׃ "सैन्याचा परमेश्वर असें म्हणतो कीं, बहुत लोक व बहुत नगरांचे राहणारे येतील; आणि एका नगराचे राहणारे दुसऱ्या नगराकडे जाऊन म्हणतील, आपण परमेश्वरापासीं विनंति करायाला, आणि सैन्याचे परमेश्वरास शोधायाला निश्चयें जाऊं, मी

हि जाईन. होय, बहुत लोक व समर्थ राष्ट्रें येरूशालेमांत सैन्याच्या परमेश्वरास शोधायास, आणि परमेश्वरापासीं विनंति करायास येतील. सैन्याचा परमेश्वर ह्मणतो, त्या दिवसांत असें होईल कीं, सर्व भाषांच्या राष्ट्रांचे दाहा मनुष्य यहुदी मनुष्याचा पदर धरतीलच, आणि ह्मणतील, आम्ही तुह्मां संगतीं जाऊं, कारण देव तुह्मापासीं आहे असें आम्हीं ऐकिलें आहे." हीं मुख्य दोन कामें जीं इस्राएलांवर सोपिलीं आहेत, त्यांतील पहिलें ह्मणजे शास्त्र व धर्मरक्षणाचें काम बहुतकरून त्यांनी योग्य रीतीनें बजाविलें आहे. कित्येकांनी यासाठीं आपले प्राणहि दिल्हे आहेत असें इतिहासावरून कळतें. परंतु दुसरें ह्मणजे स्वतां ईश्वरभक्तीच्या व सदाचरणाच्या मार्गानें वागून, दुसऱ्या लोकांस उदाहरण दाखविण्याचें काम, अद्याप त्यांकडून यथायोग्य रीतीनें बजाविलें जात नाहीं.

इस्राएलांवरील ईश्वरी अवकृपेचीं कारणें व कृपा साध्य करण्याचे उपाय.

तर अहो प्रिय बांधवहो! आपण आपल्या आचरणाकडे पाहून, आपण ईश्वराचे "ज्येष्ठ पुत्र व" आचार्यांचें राज्य, ज्या नांवांवरून आपण मोठा अभिमान बाळगतों, त्या नांवानी म्हटले जाण्यास योग्य आहों कीं काय! याचा विचार करूं या. खरोखर पाहिलें असतां आपण या नांवांस तर योग्य नव्हे, परंतु לא רחמה "दया न पावलेली" होशेया अध्याय १ ओवी ६, आणि לא עמי "माझे लोक नव्हत" होशेया अध्याय १ ओवी ९ या नांवास योग्य आहों. आणि ईश्वराने आपणास इतकीं वर्षें या दीर्घ प्रवासांत अव्हेरिलें आहे, हेंच याचें प्रमाण. तरी जसा बहुतेक पुरातन राष्ट्रांचा समूळ नाश झाला, तसा त्याने आपला समूळ नाश केला नाहीं. आपणास त्याने आपली "खासगी संपत्ति" मानून जें वचन केलें, तें त्याने राखिलें आहे. तर आपणहि अशा नांवांस योग्य होण्यास प्रयत्न करावे हें आपणास उचित होय. परम दयाळू आपला बाप पुनः आपला अंगीकार करण्यास या क्षणीं सिद्ध आहे; आणि त्याने याविषयीं

जखार्या अध्याय ८ ओवी १४-१५ एथें वचनहि दिल्हें आहे. तें असें
כִּי כֹה אָמַר יְיָ צְבָאוֹת כַּאֲשֶׁר זָמַמְתִּי לְהָרַע לָכֶם בְּהַקְצִיף אֲבֹתֵיכֶם אֹתִי אָמַר יְיָ צְבָאוֹת וְלֹא
נִחָמְתִּי׃ כֵּן שַׁבְתִּי זָמַמְתִּי בַּיָּמִים הָאֵלֶּה לְהֵיטִיב אֶת יְרוּשָׁלַםִ וְאֶת בֵּית יְהוּדָה אַל תִּירָאוּ׃ "कारण सैन्याचा परमेश्वर ह्मणतो, तुमच्या पूर्वजांनी मला कोपित केलें, तेव्हां जसें म्या तुमचें अरिष्ट करायाला संकल्पिलें आणि अनुताप केला नाहीं; तसा म्या या दिवसांत फिरून यरूशालेमाचें व यहुदाच्या वंशाचें हित करायाला संकल्पिलें आहे, भिऊं नका." आणि त्यानें याचा सुलभ उपायहि आपणास सुचविलेला आहे, तो असा ;—जखार्या अध्याय ८ ओवी १६-१७,
אֵלֶּה הַדְּבָרִים אֲשֶׁר תַּעֲשׂוּ דַּבְּרוּ אֱמֶת אִישׁ אֶת רֵעֵהוּ אֱמֶת וּמִשְׁפַּט שָׁלוֹם שִׁפְטוּ בְּשַׁעֲרֵיכֶם׃ וְאִישׁ
אֶת רָעַת רֵעֵהוּ אַל תַּחְשְׁבוּ בִּלְבַבְכֶם וּשְׁבֻעַת שֶׁקֶר אַל תֶּאֱהָבוּ כִּי אֶת כָּל אֵלֶּה אֲשֶׁר שָׂנֵאתִי נְאֻם יְיָ׃
"ज्या गोष्टी तुह्मी कराव्या त्या ह्याच आहेत, तुह्मी एकमेकासीं खरें बोला, आपल्या द्वारांत सत्यतेचा व शांतीचा न्याय करा; आणि तुह्मी आपल्या मनांत एकमेकाविषयीं वाईट कल्पूं नका, आणि खोटी शपथ तुह्माला आवडूं नये; कां कीं ज्या गोष्टींचा द्वेष मी करितों त्यांतल्या या सर्व आहेत, असें परमेश्वर ह्मणतो." याप्रमाणे ईश्वर आपणास सत्य, न्यायीपणा व शांति हे सद्गुण स्वीकारायास आणि हेवा व खोटी शपथ हे दुर्गुण वर्जायास सांगतो. हे सद्गुण आपले अंगीं तर मुळींच नसून या दुर्गुणांत मात्र आपण निपुण आहों. दुसऱ्या कोणत्याहि लोकांच्या अंगीं हे दुर्गुण एवढ्या पराकाष्ठेनें नसावेत; ह्मणून हल्लीं आपण अशा नीच स्थितीमध्यें आहों व दिवसोदिवस अधिकाधिक नीचपदास येत चाललों आहों. परंतु ही दुरवस्था आपणावरून दूर करणें हें आपल्याच हातीं आहे. आपण हे सद्गुण संपादण्यास प्रयत्न करावे, आणि ते आपले प्रयत्न सफल व्हावे आणि परमेश्वरानें ज्ञानाचा, बुद्धीचा, बोधाचा आणि ईश्वरभीतीचा आत्मा आपणावर ठेवावा, ह्मणून आपण आपल्या पूर्ण अंतःकरणानें त्याजपासीं विनंती करावी, ह्मणजे आपली दुरवस्था नाहींसी होऊन आपला उत्कर्ष होत जाईल. आणि जखार्या अध्याय ८ ओवी १९ כֹּה אָמַר יְיָ צְבָאוֹת צוֹם הָרְבִיעִי וְצוֹם הַחֲמִישִׁי וְצוֹם הַשְּׁבִיעִי וְצוֹם
הָעֲשִׂירִי יִהְיֶה לְבֵית יְהוּדָה לְשָׂשׂוֹן וּלְשִׂמְחָה וּלְמֹעֲדִים טוֹבִים וְהָאֱמֶת וְהַשָּׁלוֹם אֱהָבוּ׃ "सैन्याचा परमेश्वर ह्मणतो, चौथ्या महिन्याचा उपास, पांचव्या महिन्याचा उपास, सातव्या महिन्याचा उपास व दाहाव्या महिन्याचा उपास हे यहुदाच्या

वंशाला आनंद व हर्ष व सुखाचे सण असे होतील ह्मणून तुह्मी सत्यावर, व शांतीवर आवड ठेवा." तर असे सत्यावर व शांतीवर आवड ठेवण्याचे विचार ईश्वर आपल्या सर्वांच्या मनीं लवकर उत्पन्न करो, आणि येरुशालेमे करितां जे उपासाचे दिवस झाले आहेत, ते पालटून आनंदाचे, हर्षाचे व सणाचे दिवस लवकरच होवोत. आमेन.

इस्राएली धर्माच्या तेरा मूल तत्वांचें निरूपण.

इस्राएली धर्मांतील मुख्य तीन गोष्टी.

इस्राएली धर्मामध्यें ईश्वराचें अस्तित्व, शास्त्राची सत्यता आणि परलोकावस्था ह्या तीन गोष्टी मुख्य आहेत. ह्या तीन गोष्टींवरून रिब्बी मोशे बार मेमोन याने, इस्राएल ह्मणविणाराने निश्चयें करून विश्वासिलीं पाहिजेत असीं जीं तेरा मूल तत्वें नेमून ठेविलीं आहेत, तीं येणे प्रमाणें:—

तत्व १ ईश्वराचें अस्तित्व.

יִגְדַּל אֱלֹהִים חַי וְיִשְׁתַּבַּח: נִמְצָא וְאֵין עֵת אֶל מְצִיאוּתוֹ:

"जीवंत देव थोर मानिला व स्तविला जावो. तो आहेच,
आणि त्याच्या अस्तित्वास कालरूप सीमा नाहीं."

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה שֶׁהַבּוֹרֵא יִתְבָּרַךְ שְׁמוֹ הוּא מְנַהִיג וּבוֹרֵא לְכָל הַבְּרוּאִים וְהוּא לְבַדּוֹ עָשָׂה וְעוֹשֶׂה וְיַעֲשֶׂה לְכָל הַמַּעֲשִׂים:

"मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम असा जो उत्पन्न कर्त्ता, तोच सर्व पदार्थांचा उत्पन्न कर्त्ता व नियंता; आणि सर्व उत्पत्ति त्यानेच केली, तोच करितो आणि तोच करील."

ईश्वर आहे आणि तोच या सृष्टीचा कर्त्ता, हें या सृष्टीवरूनच सिद्ध होतें. या सृष्टीस कोणी कर्त्ता नाहीं, तिनेच आपणास उत्पन्न केलें, असें जर ह्मणावें, तर ती उत्पन्न झाल्या पूर्वींच तिच्या अंगीं उत्पन्न करण्याची शक्ति आली असें होतें, हें अगदी असंभाव्य आहे. आणि जर ती आपोआप उत्पन्न झाली असें ह्मणावें, तर कर्त्यावांचून कोणतेंहि कार्य होत नाहीं, ह्मणून तिचा कोणी तरी कर्त्ता असावा.

याच प्रमाणें सृष्टींतील प्रत्येक पदार्थावरूनहि ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करतां येतें. एकादें लहानसें फूल हातीं घेऊन विचार केला, तर त्याच्या सुंदर रंगांत व सुगंधांत व शोभायमान रचनेंत, तसीच मनुष्याच्या

शरिरांत व सृष्टींतील प्रत्येक पदार्थांत मोठया चातुर्याची योजना दिसून येते. या पदार्थांस त्यांची आश्चर्यकारक रचना व त्यांच्या अंगीं जे अनेक उपयुक्त गुण आहेत, ते योजनेवांचून त्यांस प्राप्त झाले नसावे; ह्मणून त्यांची योजना करणारा कोणी तरी असावा.

आणि ही सृष्टि व तिजमधील सर्व पदार्थ उत्पन्न झाल्यापासून नियमाने चालत आहेत; ह्मणून त्यांचा नियंता ह्मणजे त्यांस नियमाने चालविणारा कोणी तरी असावा.

सारांश या सृष्टीला उत्पन्न कर्त्ता नसता, तर ती मुळींच उत्पन्न झाली नसती; जर तिची योजना करणारा नसता, तर तिला असी आश्चर्यकारक रचना प्राप्त झाली नसती, आणि तिच्या अंगीं असे अनेक उपयुक्त गुण नसते; आणि जर तिचा कोणी नियंता म्हणजे तिला कोणी नियमाने चालविणारा नसता, तर ती नियमाने चालली नसती, तिजमध्यें सर्व गोंधळ असता. परंतु ती उत्पन्न झाली आहे, तिजमध्ये सर्व प्रकारें चातुर्याची योजना दिसून येते, आणि ती नियमाने चालते, ह्मणून तिला उत्पन्न करणारा, तिची योजना करणारा, आणि तिचा नियंता म्हणजे तिला नियमाने चालविणारा आहे; आणि तो ईश्वरच आहे असें मान्य केलें पाहिजे.

इयोब जो पुरातन काळीं एक मोठा तत्त्वज्ञानी व सात्विक पुरुष होता आणि ज्याच्या वेळीं ईश्वराने आपलें पवित्र शास्त्र दिल्हेलें नसावें, त्यानेहि सृष्टि व तिजमधील पदार्थ यांवरूनच ईश्वराचें अस्तित्व आपल्या मित्रांस सिद्ध करून दाखविलें आहे. तो ह्मणतो, "पशूंला पूस ह्मणजे ते तुला शिकवितील, आणि आकाशांतल्या पक्ष्यांला विचार ह्मणजे ते तुला सांगतील. अथवा पृथ्वीसीं बोल ह्मणजे ती तुला सुचवील, आणि समुद्रांतले मासे तुला कथन करितील. या सर्वांकडून कोण जाणत नाहीं कीं, परमेश्वराच्या हाताने हें केलें आहे? त्याच्या हातांत प्रत्येक जिवाचा प्राण आणि सर्व मनुष्यांचा आत्मा आहे. इयोब अध्याय १२ ओवी. ७—१०.

ही सृष्टि व तिजमधील सर्व पदार्थ ईश्वराने शब्देंकरून शून्यापासून उत्पन्न केले. "परमेश्वराच्या शब्दाने आकाश, त्याच्या मुखश्वासाने त्यांतलें सर्व मंडळहि उत्पन्न झालें." "आकाश देवाचें गौरव वर्णितें, आणि

अंतराळ त्याच्या हातांचें कृत्य दाखवितें." या उत्पत्तीच्या कामांत त्यास कोणी सहाय करणारा नाहीं, आणि त्यास दुसऱ्याच्या सहायाची गरजहि नाहीं, कारण तो सर्वसमर्थ आहे. जें कांहीं उत्पन्न झालें, होत आहे व पुढें होईल तें सर्व त्याकडूनच झालें, होत आहे आणि होईल. यशाया अध्याय ४५, ओवी १२ एथें ईश्वराचें असें ह्मणणें आहे कीं, "पृथ्वी म्या घडिली, आणि तिजवर मनुष्य उत्पन्न केलें; आकाश म्याच माझ्या हातानें पसरिलें व त्याच्या सर्व सैन्यांस आज्ञापिलें."

असीं व इतकीं प्रत्यक्ष प्रमाणें असल्या कारणानें ईश्वर आहे असा विश्वास धरणें मनुष्यास योग्य आहे. परंतु या प्रमाणांकडे दुर्लक्ष करून, जे ईश्वर नाहीं असें ह्मणतात, त्यांस नास्तिक असी संज्ञा आहे; आणि दावीदानें गीत १४, ओवी १ एथें त्यांस मूर्ख असें यथायोग्य नांव दिल्हें आहे. ते असें मत धरितात याचें कारण असें कीं, मनुष्यांचें मन जन्मापासून पापिष्ठ आहे, आणि त्यामुळें त्यांकडून वारंवार पाप होतें. आणि ईश्वर आहे असें मान्य केल्यानें त्यापुढें आपणास आपल्या कर्मांचा हिशेब द्यावा लागेल, आणि केलेले पापामुळें दुःख भोगावें लागेल, असें सहज त्यांच्या मनीं येऊन भय व दुःख प्राप्त होतें, तें भय व दुःख दूर करण्याकरितां ते असें विपरीत मत स्वीकारून आचरण करितात. परंतु असें करून ईश्वर नाहीं असा विश्वास धरण्याच्या व त्यामुळें दुराचरण करण्याच्या दुप्पट दोषांत पडण्यापेक्षां, ईश्वर आहे असें मान्य करून व सदाचरणानें वागून सुखाची आशा करणें उत्तम होय.

गोष्ट.

फारोचा गर्व.

ज्या दिवशीं मोशे व आहारोन मिसराचा राजा फारो याजकडे पहिल्यानेंच गेले, तो दिवस त्या फारो राजाचा राज्याभिषेक होण्याचा वार्षिक दिवस होता. त्या दिवशीं इतर मांडलीक राजे त्याचा आदर सत्कार करण्यास त्याच्या मंदिरीं जमले होते. त्यांमागून मोशे व आहारोन हे जाऊन राजवाड्याच्या दरवाज्यापासीं उभे राहिले. तेव्हां द्वारपालानें जाऊन फारोस सांगितलें कीं, कोणी दोघे वृद्ध मनुष्य दरवाज्या

जवळ उभे आहेत. हे दोघेहि आपला आदर सत्कार करण्यासच आले असावे, असें समजून त्यानें त्यांस आंत येऊं देण्याची आज्ञा केली. परंतु जेव्हां हे दोघे फारोपुढें गेले, तेव्हां त्यांनी त्यास सलाम सुद्धां केला नाहीं. फारोनें त्यांची असी अशिष्ट वर्तणूक पाहून त्यांस विचारिलें कीं, तुह्मी कोण आहां?

मोशे व आहारोन यानीं उत्तर केलें कीं, पवित्र व धन्य जो परमेश्वर, त्याकडले जासूद आह्मी आहों.

फारो—तुमचा काय अर्ज आहे?

मोशे—परमेश्वर इस्राएलांचा देव असें ह्मणतो कीं, माझ्या लोकांनी मजसाठीं रानांत सण करावा, ह्मणून तूं त्यांस जाऊं दे. निर्गम अ. ५ ओ. १.

यावरून फारोस मोठा राग येऊन तो त्यांस ह्मणाला कीं, परमेश्वर कोण आहे? कीं म्या त्याची आज्ञा ऐकून इस्राएलांस जाऊं द्यावें. त्यांस मजकरितां खिलात अथवा भेट पाठविणें सुचलें नाहीं काय? असें असतां तुह्मी त्याचा असा निरोप घेऊन येतां तर मी परमेश्वराला जाणत नाहीं? आणि मी इस्राएलांस जाऊं देणार नाहीं. बरें थांबा, मी आपल्या दप्तरांत तुमच्या देवाचें नांव शोधून पाहतों. असें ह्मणून तो आपले दप्तरखान्यांत गेला, आणि दप्तरें उलटून पाहतां मोआब, आम्मोन, सीदोन इत्यादिक लोकांच्या मूर्तींचीं नांवें त्यांत सांपडलीं; परंतु इस्राएलांच्या देवाचें नांव त्यास सांपडलें नाहीं. तेव्हां तो परत येऊन मोशे व आहारोन यांस ह्मणाला कीं, माझ्या दप्तरांत तुमच्या देवाचें नांव कोठेंच सांपडत नाहीं.

मोशे—होय, जर तूं आमच्या जीवंत देवाचें नांव मेलेल्यांमध्यें शोधिसील तर तें तुला कसें सांपडेल?

फारो—तो तरुण आहे किंवा वृद्ध आहे? त्याचें वय किती आहे? त्यानें किती शहरें हस्तगत करून घेतलीं व किती देश जिंकले आहेत? आणि तो राज्याभिषिक्त होऊन किती दिवस झाले?

मोशे—आमच्या देवाच्या सामर्थ्यानें व पराक्रमानें सर्व जग भरलें आहे; पृथ्वी उत्पन्न झाली नव्हती तेव्हांपासून तो आहे, व ती नाहींसी झाल्यावरहि तो असेल; त्यानें तुला घडिलें आहे, आणि त्यानेंच तुजमध्यें जीवनाचा आत्मा घातला आहे.

फारो—त्याचीं कृत्यें तरी कोणतीं?

मोशे—त्यानें आकाश विस्तारिलें आहे, आणि पृथ्वीचा पाया घातला आहे; त्याचा शब्द अग्नीचे जाळ चिरितो; डोंगर उपटून टाकितो आणि खडक फोडितो; अग्नि त्याचें धनुष्य, ज्वाला त्याचे तीर, भडका त्याचे बाण, अभ्रें त्याची ढाल व वीज त्याची तरवार आहे. तो डोंगर व टेकड्या उत्पन्न करितो, डोंगरांस गवताने आच्छादितो, पर्जन्य व दहिंवर वर्षवितो, गर्भिणीस उत्तर देतो व गर्भास त्याच्या आईच्या उदरीं सांभाळितो, पृथ्वीवर वारा वाहवितो, राजांस पदच्युत करितो व अभिषिक्त करितो.

या प्रमाणांवरून व त्याच्या गर्वामुळें त्याजवर व त्याच्या लोकांवर पाठविलेल्या पीडांवरून, शेवटीं फारोनें आपला अपराध पदरीं घेऊन, ईश्वर आहे असें मान्य केलें व म्हणाला कीं, "या वेळीं मी पाप केलें; परमेश्वर नीतिमान आहे, आणि मी व माझे लोक अपराधी आहों." निर्गम अध्याय ९ ओवी २७.

तत्व २ ईश्वराचें एकत्व.

אֶחָד וְאֵין יָחִיד כְּיִחוּדוֹ: נֶעְלָם וְגַם אֵין סוֹף לְאַחְדוּתוֹ:

"तो एकच आहे, आणि त्याच्या एकत्वा सारिखें दुसरें एकत्व नाहीं;
तो अदृश्य आहे, आणि त्याच्या एकत्वास अंतहि नाहीं."

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה שֶׁהַבּוֹרֵא יִתְבָּרַךְ שְׁמוֹ הוּא יָחִיד וְאֵין יְחִידוּת כָּמוֹהוּ בְּשׁוּם פָּנִים וְהוּא לְבַדּוֹ אֱלֹהֵינוּ הָיָה הֹוֶה וְיִהְיֶה:

"मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम असा जो उत्पन्नकर्त्ता, तो एकच; आणि कोणत्याहि प्रकारचें एकत्व त्याच्या एकत्वा सारिखें नसून, तो एकच आमचा देव होता, आहे व (सर्वकाळ) असेल."

जसें सृष्टीच्या उत्पत्तीवरून, रचनेवरून व व्यवस्थेवरून ईश्वर तिचा उत्पन्नकर्ता, रचिता व नियंता आहे हें स्पष्ट दिसून येतें; तसेंच तो तिचा उत्पन्न कर्त्ता, रचिता, व नियंता एकच आहे हेंहि स्पष्ट दिसून येतें. जर तो अशा महान व आश्चर्यकारक कृत्यांवरून सर्वांहून थोर आहे, तर त्याची बरोबरी करणारा कोणी नाहीं; कारण सर्वांहून थोर असा एका-

पेक्षां अधिक असणें हें अशक्य आहे. तो सर्व सृष्टीचा उत्पन्न कर्त्ता व नियंता आहे, आणि त्याचीं कामें सर्व ठिकाणीं सर्वकाळ घडत असतात, ह्मणून तो सर्वव्यापक आहे; आणि जर तो सर्व व्यापक आहे, तर दुसरा राहण्यास ठिकाण नाहीं. आणि जर तो सर्व समर्थ व सर्वज्ञ आहे तर दुसरा देव असण्याची कांहींच गरज नाहीं. त्याच्या अंगीं पूर्ण एकत्व आहे; त्याच्या एकत्वासारिखें पृथ्वींत दुसऱ्या कशाचेंहि एकत्व नाहीं. पृथ्वीवरील सर्व पदार्थ एकापेक्षां अधिक पदार्थांच्या मिश्रणानें झाले आहेत; परंतु ईश्वर तसा नाहीं. तो एकच आहे; त्यासारिखा कोणीं नाहीं, आणि त्या संगतींहि कोणी नाहीं. जसें सर्व पदार्थांच्या अंगीं विभागत्व आहे, म्हणजे त्यांचे मिश्रित भाग निरनिराळे केले जातात, तसें विभागत्व त्याच्या अंगीं नाहीं; परंतु पूर्ण एकत्व आहे. आणि जसा तो पूर्वीं एकच होता व आतां आहे, तसाच तो सर्वकाळ एकच असेल. असा जो सर्वांहून थोर, जो सर्व समर्थ, सर्व व्यापक व सर्वज्ञ त्या एकावांचून दुसऱ्या कोणासहि परमेश्वर हें नांव शोभणार नाहीं.

ईश्वराचें एकत्व दर्शक वाक्यें शास्त्रांत अनेक आहेत; त्यांमध्यें "हे इस्राएला, ऐक, परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे," हें वाक्य मुख्य आहे. ईश्वराच्या एकत्वाचा इस्राएलांस विसर पडूं नये, परंतु त्याचा आठव सर्वदा राहावा, ह्मणून हें वाक्य त्यांनीं आपले लेंकरांस पुनः पुनः सांगावें, तें सकाळीं व संध्याकाळीं म्हणत असावें, आपल्या हाताशीं व आपल्या कपाळावर बांधावें, आणि आपल्या दरवाज्यांवर लिहावें असें निक्षून सांगितलें आहे. आणि या आज्ञेप्रमाणें लहान बाळ, भाषण करूं लागतांच त्याच्या कोमल हृदयावर ईश्वराच्या एकत्वाचा ठसा बसावा, म्हणून त्यांनीं "हे इस्राएला, ऐक, परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे," हें वाक्य पहिल्यानें शिकवावें. मग जसें तें बाळ वाढत जातें, तसा त्याच्या मनीं ईश्वराच्या एकत्वाचा विश्वास दृढ होत जातो. अंतकाळींहि प्रत्येक इस्राएलानें त्याच्या अंगीं शक्ति असल्यास हेंच वाक्य म्हटलें पाहिजे. जर एवढीहि शक्ति नसली, तर जे त्याचे आप्त अथवा इष्टमित्र त्याजवळ असतील, त्यांनीं हे ईश्वरी एकत्वदर्शक शब्द त्याच्या कानीं पाडले पाहिजेत. जे आपणास इस्राएल म्हणवितात,

त्यांनी हें वाक्य प्रतिदिवशीं सकाळीं व संध्याकाळीं अगत्य म्हटलें पाहिजे, आणि हातावर व कपाळावर बांधायास सांगितल्याप्रमाणें त्यांनी "तेफीलीन" बांधिलीच पाहिजे; आणि घराच्या खांद्यावर व दरवाज्यांवर लिहावयास सांगितल्याप्रमाणें "मेझूझा" लावलाच पाहिजे. "तेफीलीन" व "मेझूझा" यांमध्यें याच विषयाचे शास्त्रांतील भाग लिहिलेले असतात. हें निक्षून सांगण्याचें व एवढा प्रकार लावून देण्याचें मुख्य कारण हेंच कीं, इस्राएलांचें मन अन्य देवाकडे किंवा मूर्तीकडे वळूं नये; परंतु त्यांनीं एकच जो परमेश्वर त्याचेंच मात्र स्मरण करावें.

गोष्ट.

अयोग्य प्रश्नास योग्य उत्तर.

रोम शहराचा बादशाहा हेद्रीयन याच्या खनान देशांतील सैन्याचा सेनापति रूफस, ज्यानें इस्राएलांस मूर्त्तिपूजेकडे वळविण्याकरितां पुष्कळ प्रयत्न केले, तो एके दिवशीं रिब्बी आकीबास ह्मणाला, "तुमचा देव आम्हा मूर्त्तिपूजक लोकांचा त्याग कां करितो? आपण हा प्रश्न पुर्त्तेपणीं उमजलों नाहीं असें दर्शवून, रिब्बी आकीबा मोठ्या उदासीपणानें म्हणाला कीं, गेल्या रात्रीं मी स्वप्न पाहिलें त्यांत रूफस नांवाचा एक कुत्रा व रूफिना नांवाची एक कुत्री असीं मीं पाहिलीं. यापुढें रिब्बी आकीबा आपलें स्वप्न सांगत होता, इतक्यांत तो सेनापति क्रोधायमान होऊन म्हणाला, काय! त्या स्वप्नांत पाहिलेल्या कुत्र्यांस देण्याकरितां माझ्या व माझ्या बायकोच्या नांवाशिवाय तुला दुसरीं नांवें नव्हतीं काय? यावर रिब्बी आकीबानें उत्तर केलें कीं, महाराज, तुमचा राग हाच तुह्मी मला विचारिलेल्या प्रश्नाचें उत्तर होय. कारण हुशार, बळकट, धैर्यवान व विश्वासू जो कुत्रा यास स्वप्नांत मी तुमचें नांव दिल्हें म्हणून तुह्मास एवढा राग आला. तर परमेश्वर जो पृथ्वीवरील सर्व पदार्थांचा एकच कर्त्ता, त्याचें नांव धोंड्याच्या व लांकडाच्या केलेल्या अनेक नीच निर्जीव मूर्त्तीस देऊन तें तुह्मी विटाळीत असतां, मला असा प्रश्न विचारितां हें कसें? हें ऐकून रूफस अगदीं निरुत्तर झाला.

तत्व ३.

ईश्वराचा निराकारपणा.

אֵין לֹא דְמוּת הַגּוּף וְאֵינוֹ גוּף׃   לֹא נַעֲרוֹךְ אֵלָיו קְדֻשָּׁתוֹ׃

"त्यास शरीराकृति नाहीं व शरीरहि नाहीं. त्याच्या पवित्रतेची बरोबरी कोणी करूं शकत नाहीं."

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה שֶׁהַבּוֹרֵא יִתְבָּרַךְ שְׁמוֹ אֵינוֹ גוּף וְלֹא יַשִּׂיגוּהוּ מַשִּׂיגֵי הַגּוּף וְאֵין לוֹ שׁוּם דִּמְיוֹן כְּלָל׃

"मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम असा जो उत्पन्न कर्त्ता, तो निराकार आहे; आणि ज्या विकारांस पदार्थ पात्र आहेत, त्यांस तो पात्र नसून त्यास कशाचीहि प्रतिमा नाहीं."

हें तत्व उत्पत्ति अध्याय १ ओवी २६ च्या अगदीं विपरीत दिसतें; कारण या तत्वावरून ईश्वरास कांहींच आकार व प्रतिमा नाहीं; परंतु त्या वाक्यावरून त्यास प्रतिमा आहे असें समजून येतें. खरोखर पाहिलें असतां ईश्वर निराकार आहे, आणि त्यास कांहींच प्रतिमा नाहीं. तर उत्पत्तीच्यां वाक्यांत "आपण आपल्या प्रतिछायेप्रमाणें आपल्या प्रतिमेसारिखें मनुष्य उत्पन्न करूं," असें भाषण ईश्वराने कां केलें? तें कोणासीं केलें? व तें कोणत्या अर्थाने केलें? याचा विचार करणें अगत्य आहे.

त्या वाक्यावरूनच दिसून येतें कीं, हें भाषण ईश्वराने आपणासींच नव्हे, परंतु तें दुसऱ्या कोणासीं केलें असावें. तरी त्या भाषणेंकरून ईश्वराने त्या दुसऱ्याचें सहाय अथवा मत मागितलें नाहीं; कारण तो स्वतां सर्व समर्थ व सर्वज्ञ आहे. परंतु माणसास द्विगुणी, म्हणजे त्याचा देह मृत्तिकेच्या गुणांचा, आणि त्याचा आत्मा ईश्वरी गुणांचा, व सर्व पदार्थांमध्यें व प्राणिमात्रांमध्यें श्रेष्ठ करण्याचा हेतु दर्शविण्याकरितां ईश्वराने असें भाषण केलें असावें; आणि याच कारणावरून हें भाषण ईश्वराने मृत्तिकेसीं केलें असावें असें स्पष्ट दिसून येतें. त्या वाक्यांत ईश्वर मृत्तिके सारिख्या निर्जीव पदार्थांसीं भाषण करितो याविषयीं कोणास आश्चर्य वाटूं नये. ही भाषणाची एक रूढि आहे; आणि शास्त्राची भाषा मनुष्याच्या

साधारण भाषणासारिखीच आहे. उत्पत्तीच्या त्याच अध्यायाच्या ११, २०, आणि २४ या ओव्यांमध्यें ईश्वर, भूमि व पाणी यांस आज्ञा करितो; आणि त्याच्या आज्ञेवरून भूमि, वनस्पति व पशु यांस उपजवितें, आणि पाणी, मासे व त्यांतील दुसरे जीवजंतु यांस उपजवितें. याप्रमाणें जर ईश्वरानें मृत्तिकेसीं मिळून मनुष्य उत्पन्न केला नसता, आणि आपल्याच प्रतिमेसारिखा केला असता, तर तो सर्वस्वी आत्मिक असता; आणि जर मृत्तिकेच्या मात्र प्रतिमेसारिखा केला असता, तर तो सर्वस्वी दैहिक असता. परंतु तो याप्रमाणें नसून तो दोघांच्या प्रतिमेसारिखा आहे, म्हणजे मृत्तिकेच्या प्रतिमेसारिखा त्याचा देह इंद्रियगोचर, निर्बुद्धि व नाशवंत असा आहे; आणि त्याचा आत्मा ईश्वराच्या प्रतिमेसारिखा निराकार, अदृश्य, अमर, व बुद्धिवान आहे. यावरून निराकारपणा, अदृश्यपणा, अमरपणा व बुद्धि हीच ईश्वराची प्रतिमा असें जाणलें पाहिजे.

जर या वाक्याचा अर्थ याप्रमाणें होतो, तर ईश्वर निराकार आहे असें सिद्ध करण्यास दूर जावयास नको. मनुष्यानें जर आपल्याच रचनेकडे लक्ष दिलें, तर या तत्वांतील सिद्धांत ठरतो. मनुष्याचा आत्मा निराकार व अदृश्य आहे हें कोणाच्यानें नाकारवणार नाहीं. तर ज्याच्या प्रतिमेसारिखा तो आहे, तोहि निराकार व अदृश्य असावा.

मोशे जो नेहेमी ईश्वरासीं मित्राप्रमाणें भाषण करीत असे, त्यानेंहि ईश्वराचा कांहीं आकार अथवा कोणती प्रतिमा पाहिली नाहीं. त्यानें ईश्वरी गौरव पाहण्याची जेव्हां आवड धरिली, तेव्हां त्यानें त्यास आपल्या गौरवाचा मागला भाग मात्र दाखविला. आणि अनुवाद अध्याय ४ ओवी १५ एथें असें आहे कीं, "ज्या दिवशीं परमेश्वर होरेबांत अग्नीमधून तुह्मास (इस्राएलांस) बोलला, त्यांत तुह्मी कांहीं प्रतिमा पाहिली नाहीं." असें असतां मनुष्य आपल्या अल्प मतीनें ईश्वराच्या आकाराविषयीं काहींच कल्पना करूं शकत नाहीं; मग त्यानें त्याची प्रतिमा कशासारिखी करावी? यशाया अध्याय ४० ओवी २५ एथेंहि हाच प्रश्न केलेला आहे; "तुह्मी कोणासी माझी बरोबरी कराल, आणि मी समान होईन? असें परमेश्वर ह्मणतो." मूर्त्तिपूजकांप्रमाणें त्यास मनुष्याचा अथवा इतर

पदार्थाचा आकार देणें, हा मोठा दोष आहे; याविषयीं दुसऱ्या आज्ञेंत बजावून निषेध केला आहे.

जसा ईश्वर निराकार आहे, तसा तो निर्विकार व अविनाशीहि आहे. जसे मनुष्यास व सृष्टींतील दुसऱ्या पदार्थांस अनेक कारणांवरून अनेक विकार होतात, आणि शेवटीं ते लयास जातात, तसे विकार त्यास कांहींच होत नाहींत. तो जसा आहे तसाच राहतो आणि तो सदा जीवंत व अपालट आहे. प्रारंभीं जसा तो होता, तसाच आतां आहे व तसाच तो सर्वकाळ राहील.

ईश्वर निराकार आत्मा असल्यामुळें तो आपणास आपल्या देहरूप डोळ्यानें दिसत नाहीं; त्यास अंतःकरणाच्या डोळ्यानें पाहिलें पाहिजे, आणि त्यानेंच तो दिसतो. तसाच तो बाह्यात्कारी भक्तीनें संतोषित होत नाहीं; जीवात्मा लावून त्याची भक्ति केली पाहिजे.

गोष्ट.

ईश्वराचें साकारत्व.

रोम शहरचा एक बादशाहा एका दिवशीं रिब्बी येहोशूवा बेन हानानया या बरोबर, इस्राएलाच्या रीतिभाति इतर लोकांपेक्षां अगदीं भिन्न आहेत, व त्यामुळें ते इतर लोकांमध्यें मिसळले जात नाहींत; या विषयावर संभाषण करीत असतां त्यानें असा प्रश्न केला कीं, तुझा देव सर्व शक्तिमान व जगांतील सर्व पदार्थांचा स्वामी आहे असें तूं जर म्हणतोस, तर तो मला दाखीव. रिब्बी येहोशूवा यानें पाहिलें कीं, उघड रीतीनें जर याचा अपमान केला, तर तो आपणास लागलाच सुळीं देईल; ह्मणून त्यानें त्यास उत्तर केलें कीं, महाराज, जर आपण उद्यां दोन प्रहरीं मला गांवाबाहेर मैदानांत भेटाल, तर मी तुमची इच्छा पूर्ण करीन. दुसऱ्या दिवशीं ठरावाप्रमाणें भेट झाल्यावर बादशाहानें रिब्बी येहोशूवा यास पुनः विचारिलें कीं, आतां तरी तूं आपला देव मला दाखवितोस काय? रिब्बी येहोशूवा ह्मणाला, होय होय; महाराज, आपण आपली दृष्टि वर करून पहिल्यानें त्या तेजस्वी सूर्याकडे लावा. हें ऐकून त्यानें आपली

दृष्टि सूर्याकडे लाविली; परंतु त्याच्या तेजामुळें त्याचे डोळे लागलेच दिपून गेले. तेव्हां रिब्बी येहोशूवा ह्मणाला कीं, सूर्य जो ईश्वराच्या अगणित व महान हस्तकर्मांतून लहानसा आहे, त्याजकडे जर तुम्ही एक क्षण पाहूं शकत नाहीं, तर ज्याचें गौरव अपार व ज्याची स्तुति आकाशांतील दूत व पृथ्वीवर मनुष्यें व इतर प्राणी गाऊन ह्मणतात कीं, "पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे, त्याच्या गौरवाने सर्व जग भरलें आहे," त्या सर्वसमर्थ परमेश्वरास तुमच्या मृत्यूस पात्र असणाऱ्या डोळ्यानें तुम्ही कसे पाहूं शकाल?

तत्व ४.

ईश्वराचा अनाद्यंतपणा.

קַדְמוֹן לְכָל דָּבָר אֲשֶׁר נִבְרָא׃ רִאשׁוֹן וְאֵין רֵאשִׁית לְרֵאשִׁיתוֹ׃

"तो सर्व निर्माण केलेल्या पदार्थांच्या पूर्वींचा आहे;
तोच पहिला आणि त्याच्या मुळास आरंभ नाहीं."

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה שֶׁהַבּוֹרֵא יִתְבָּרַךְ שְׁמוֹ הוּא רִאשׁוֹן וְהוּא אַחֲרוֹן׃

"मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम असा जो उत्पन्न कर्त्ता, तोच पहिला व तोच शेवटला आहे."

सर्व पदार्थांचा कर्त्ता व त्यांचें मूळकारण ईश्वर आहे, आणि त्याच्या पूर्वीं कांहींच नव्हतें; ह्मणून तो स्वयंभू आणि स्वतां कधींच व कोणाकडूनहि उत्पन्न न झालेला आहे. तो सर्वांच्या आधींचा आहे, त्याच्या अस्तित्वाचें कारण व आधार त्याच्याच मध्यें आहे. जर तो अनादि आहे, तर तो अनंतहि असावा; कारण ज्यास आदि नाहीं त्यास अंत कोठून असेल? तो अनादिकालापासून अनंतकालपर्यंत ह्मणजे सनातन आहे. तो नव्हता असा कोणताहि काळ झाला नाहीं, आणि तो नसेल असाहि काळ कधीं होणार नाहीं. या सृष्टींत जे पदार्थ आहेत त्यांतून कित्येकांचा अद्यापि पूर्ण शोध लागत नाहीं; पृथ्वीचे उत्तर आणि दक्षिण ध्रुवांचा शोध लावण्यास कित्येकांनीं अनेक वेळां प्रयत्न केले;

परंतु ते सर्व निष्फल होऊन त्यांचा कांहींच अंत लागत नाहीं. याचप्रमाणें सूर्य, चंद्र, तारे हे काय पदार्थ आहेत, व त्यांत मनुष्यांची व इतर प्राण्यांची वस्ती आहे किंवा नाहीं इत्यादिक गोष्टींचा कांहींच शोध लागत नाहीं; मग त्यांचा उत्पन्न कर्त्ता जो परमेश्वर, त्याचा व त्याच्या आद्यंताचा माग कोठून लागणार? त्याचा शोध करितांना सहजच ज्ञान्यांचे विचार स्तब्ध होतात, आणि चतुरांच्या कल्पना चकित होतात; ह्मणून ईश्वराच्या आद्यंताचा शोध लावण्याचा विचारच मनीं न आणावा हेंच मोठें शाहापण आहे. डोंगर उपजले आणि पृथ्वी व सृष्टी यांचा प्रारंभ झाला, त्यापूर्वी सर्व काळापासून सर्वकाळ पर्यंत तोच देव आहे. आकाश व पृथ्वी विस्तारल्या पूर्वीपासून आणि ज्योती प्रकाशल्या पूर्वीपासून तो होता, आणि पृथ्वी वस्त्राप्रमाणें जीर्ण झाल्यावर व आकाश धुराप्रमाणें विरघळून गेल्यावरहि तो असेल. दावीद गीत १०२ ओवी २५–२७ एथें असें ह्मणतो कीं, "(हे देवा) प्रारंभीं त्वां आकाशाचा पाया घातला, आणि आकाश तुझ्या हातांचें काम आहे. तीं नाश पावतील, परंतु तूं टिकून राहशील; तीं सर्व वस्त्रासारिखीं जीर्ण होतील; तूं त्यांस पांघुरणासारिखें फिरविशील, आणि तीं पालटलीं जातील; परंतु तूं तसाच आहेस, आणि तुझीं वर्षें समाप्त होत नाहींत."

जेव्हां मोशेला ईश्वरानें होरेब डोंगरावर जळत्या झुडपांत पहिल्यानेच दर्शन दिल्हें, आणि मिसरांत जाऊन इस्राएलांस बंदांतून मुक्त करायास सांगितलें; तेव्हां त्याची खातरी करून देण्याकरितां ईश्वरानें त्यास अनेक चिन्हें दाखविलीं. शेवटीं जेव्हां मोशेनें असी आज्ञा व असे चमत्कार करणाराची चौकशी केली, तेव्हां ईश्वरानें "मी जो आहें तोच आहें" निर्गम अध्याय ३, ओवी १४ ह्मणजे मी सनातन परमेश्वर आहें हें आपलें नांव त्यास कळविलें. आणि तो सनातन आहे म्हणून हेंच सर्वकाळ त्याचें नाम, आणि हीच पिढोपिढीं त्याची आठवणूक राहील. याचप्रमाणें दावीद ह्मणतो, "हे परमेश्वरा, तुझें नाम सर्वकाळ पर्यंत आहे, तुझें स्मरण हे परमेश्वरा, युगोयुगींच आहे." गीत १३५, ओवी १३.

गोष्ट.

आब्राहामाचें बाळपणचें धोरण.

आब्राहाम जन्मण्या पूर्वीं एका रात्रीं निमरोद राजानें सूर्यापेक्षां अधिक तेजस्वी असा एक तारा उगवतां पाहिला. या कौतुकावरून त्यास मोठें आश्चर्य वाटलें, ह्मणून त्यानें आपल्या ज्योतिष्यांस त्याचा अर्थ विचारिला. त्या सर्वांनी याचा अर्थ असा काढिला कीं, कोणी बलाढ्य राजा लवकरच जन्मेल. हें ऐकून निमरोद फारच गडबडला; आणि हें न घडावें ह्मणून त्यानें अनेक प्रकारचे जुलमी हुकूम दिल्हे. त्या वेळीं आब्राहामाची आई गरोदर होती, तिचा प्रसवण्याचा वेळ जवळ आला, तेव्हां ती भयानें एका गुप्त गुहेंत गेली, आणि तेथें आब्राहामाला प्रसवली. कांहीं वेळानें ती तेथून निघाली, आणि त्या गुहेच्या दरवाज्याचा चांगला बंदोबस्त करून, आपल्या नवऱ्याकडे परत आली; आणि आपणास झालेला मुलगा जन्मतांच मरण पावला असें त्यास सांगितलें. जेव्हां जेव्हां आब्राहामाची आई आपल्या बाळाच्या समाचारास व स्तनपानास जात असे, तेव्हां तेव्हां त्या बाळास आपल्या दोहों हातांचीं बोटें चुंफितांना ती पाही. त्याच्या एका हाताचीं बोटें मधीनें व दुसऱ्या हाताचीं बोटें दुधानें भरलेलीं असत; यावरून तें बाळ फारच लवकर वाढत गेलें; आणि पांच महिन्यांत पांच वर्षांच्या मुला एवढें झालें, व त्याची बुद्धिहि फारच वाढूं लागली; यावरून तिला फारच आश्चर्य वाटलें; आणि निमरोदानें केलेल्या जुलमी हुकमांवरून आपल्या बाळास कांहींच धोका होणार नाहीं असी तिची खातरी झाली. मग तिनें या सर्व गोष्टी आपल्या नवऱ्यास कळविल्या; तेव्हां असा गुणी पुत्र आपणास झाला आहे; त्यास पाहाण्यास आब्राहामाचा बाप थारा मोठ्या त्वरेनें गेला, आणि त्यास पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटलें व मोठ्या आनंदानें त्यास आलिंगिलें. घरीं आल्यावर आपल्या पुत्रास शहरांत आपले घरीं आणावें व निमरोदाच्या दरबारीं ठेवावें, असा विचार थारानें आपले बायकोसीं केला. तेव्हां आब्राहामाची आई संध्याकाळीं आपल्या मुलास घरीं आणण्या करितां त्या गुहेकडे गेली. जन्मल्यापासून आब्राहाम त्या गुहेंतच होता, ह्मणून

घरीं येतेवेळीं सृष्टींतील अनेक पदार्थ पाहून त्यास मोठें नवल वाटलें, आणि त्यांजविषयीं आपल्या आईस विचारून त्यानें त्यांचीं नांवें, गुण इत्यादिकांची कांहीं माहिती करून घेतली. नंतर हे सर्व पदार्थ कोणी उत्पन्न केले! असें त्यानें तिला विचारिलें.

आई— उत्पन्नकर्त्यावांचून व स्वामीवांचून अगदीं स्वतंत्र असा एकहि पदार्थ जगांत नाहीं.

आब्राहाम— जर असी गोष्ट आहे, तर मला या जगीं कोणीं आणिलें; मला कोणाचा आधार आहे?

आई— तुला माझा आधार आहे.

आब्राहाम— मग तुझा धनी कोण?

आई— तुझा बाप थारा माझा धनी.

आब्राहाम— माझा बाप थारा याचा स्वामी कोण?

आई— निमरोद राजा.

आब्राहाम— निमरोदाचा स्वामी कोण?

असा प्रश्न जेव्हां त्यानें केला, तेव्हां ती मोठ्या अडचणींत पडली, आणि आब्राहामास म्हणाली, माझ्या पुत्रा, तूं या गोष्टींचा शोध एवढ्या बारकाईनें करूं नको; यामुळें तुझा जीव धोक्यांत येणार आहे.

आब्राहामास घरीं जातांना रात्र झाली, आणि जरी त्याच्या आईनें त्यास निषेधिलें, तरी तसेच विचार त्याच्या मनीं घोळत होते. आकाशाकडे पाहतां अगणित ताऱ्यांमध्यें त्यास शुक्र अति तेजस्वी दिसला, म्हणून त्यास वाटलें कीं "हाच जगाचा प्रभु देव असावा." परंतु कांहीं वेळानें जेव्हां तो मावळला, तेव्हां त्यास वाटलें कीं, तो सृष्टीचा स्वामी नसावा, कारण त्याचा असा परिणाम व्हावा हें अगदीं असंभाव्य दिसतें. कांहीं वेळानें चंद्र उगवला, त्याचें मोठें तेज पाहून तो म्हणाला, "आतां हा उत्पन्न कर्त्ता प्रभुदेव प्रगटला." तोहि कांहीं वेळानें मावळला; तेव्हां त्याची निराशा होऊन, जसा तो शुक्राविषयीं म्हणाला तसा या चंद्राविषयींहि म्हणाला; आणि रात्रभर याच गोष्टीचें चिंतन करीत राहिला. सकाळीं तो येऊन शहराच्या दारासीं पोहंचला; तेव्हां लोक उगवत्या सूर्यास नमन करून त्याची पूजा करितांना त्यानें पाहिलें. तेव्हां तो

म्हणाला, "अरे आश्चर्यकारक प्रभाकरा! तूं आपला प्रकाश सर्व सृष्टीवर पाडून तिला शोभा आणितोस, यावरून तुलाच तिचा कर्त्ता व स्वामी सहज मानावा; परंतु दुसऱ्या लहान ताऱ्यांसारिखा तूंहि मावळून नाहींसा होशील, मग तुला माझा निर्माणकर्त्ता व प्रभुदेव कसा म्हणूं? तो कोठें असावा?"

काहीं दिवसांनंतर एके दिवशीं थाराने आब्राहामास निमरोदाच्या दर्बारीं नेलें, तेव्हां राजा उंच सिंहासनावर बसलेला असून त्याच्या सभोवतें पुष्कळ रूपवंत दास व दासी सेवेंत उभ्या होत्या. हें पाहून आब्राहामाने आपले बापास हा उंच आसनीं बसलेला गृहस्थ कोण? असें विचारिलें. बापाने त्यास उत्तर केलें कीं, तो त्याच्या सभोंवतालच्या सर्व मनुष्यांचा अधिपति आहे; त्यास ते सर्व आपला देव असा मानितात. यावरून त्याकडे लक्ष देऊन पाहतां आब्राहामास तो अगदीं उग्र व असौम्य मुद्रेचा दिसला; म्हणून त्याने बापास म्हटलें कीं, ज्यास तुम्ही देव असें म्हणतां, त्याने आपल्या प्राण्यांस आपणापेक्षां अधिक रूपवंत केलें आहे, हें कसें? वास्तविक पाहतां उत्पन्नकर्त्ता हा त्याच्या प्राण्यांपेक्षां पूर्णगुणाचा नसावा काय? या प्रश्नास बापाच्याने उत्तर करवलें नाहीं. परंतु यावेळीं व मागाहून अनेक वेळीं त्याच्या अंगीं खरा जो एकच व अनाद्यंत परमेश्वर याचा मोठा आवेश पाहून त्याचा राग चेतला, आणि त्याने आब्राहामास निमरोदाच्या कचेरींतील सुज्ञ, व वृद्ध गृहस्थांबरोबर संवाद करायास लावलें. परंतु त्यांनीहि या लहान ईश्वरभक्ताच्या मुखांतून निघालेल्या खऱ्या गोष्टी मान्य केल्या नाहींत. शेवटीं या संवादाची अवई निमरोदाच्या कानीं गेली, तेव्हां अशा उद्धट भाषणावरून, व त्याने आपल्या बापाच्या मूर्त्तीहि फोडल्या यावरून त्या गर्विष्ठ व क्रूर राजाने लागलाच आब्राहामास अग्नीच्या भट्टींत टाकण्याचा हुकूम केला. परंतु त्यास त्या अग्नीच्या ज्वालेकडून कांहींच दुखापत न होतां तो त्या भट्टींतून सुखरूप बाहेर निघाला. याच प्रमाणें जे ईश्वरी नामाचा खरा आवेश धरितात त्यांस परम दयाळू परमेश्वर दुष्टांच्या हातीं देत नाहीं; परंतु तो त्यांस त्यांच्या सर्व संकटीं रक्षितो.

तत्व ५.

ईश्वराची पूज्यता.

הִנּוֹ אֲדוֹן עוֹלָם לְכָל נוֹצָר׃ יוֹרֶה גְדֻלָּתוֹ וּמַלְכוּתוֹ׃

"पाहा, तो जगाचा स्वामी सर्वांस घडणारा आहे;
तें त्याचें महत्त्व व त्याचा अधिकार दाखवितें."

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה שֶׁהַבּוֹרֵא יִתְבָּרַךְ שְׁמוֹ לוֹ לְבַדּוֹ רָאוּי לְהִתְפַּלֵּל וְאֵין לְזוּלָתוֹ רָאוּי לְהִתְפַּלֵּל׃

"मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम असा जो उत्पन्न कर्त्ता, त्याची मात्र प्रार्थना करणें योग्य आहे; त्यावांचून दुसऱ्याची प्रार्थना करणें योग्य नाहीं."

ज्यानें आपणांस जन्म दिल्हा, त्यासच मात्र जसा आपण बाप ह्मणतों; तसेंच ज्यानें आपणास जीवन दिल्हें आहे, आणि जो आपलें पोषण व पालन करितो, त्यासच आपण प्रभु असें मानिलें पाहिजे. आणि जसे आपले पोषणाचे व प्रावरणादिकाचे पदार्थ आपण बापाजवळून सत्तेनें मागतों; तशा आपल्या सर्व गरजा, इच्छा व आशा आपण, ईश्वरापुढेंच ठेवाव्या; त्यासच त्या पुरविण्याचें सामर्थ्य आहे, व तोच त्या सर्व पुरवील. आणि तोच सर्वसमर्थ व सर्व सत्ताधारी, आणि सर्व प्राणिमात्रांचें व मनुष्यमात्रांचें सुखदुःख त्याच्याच हातीं आहे. मग दुसऱ्या कोणाचीच गरज आपणास नाहीं, त्यासच मात्र शरण जाऊन, त्याचीच मात्र सेवा केली पाहिजे. आणि जीं सुखें आपण अनुभवतों तीं सर्व त्याच्याच दयेनें आपणास प्राप्त होतात; आणि त्याच्या दयेवांचून एक क्षण वांचणें अशक्य आहे; मग उपकार मानून दुसऱ्या कोणाची स्तुति करावी! देवदूत, आकाशांतील नक्षत्रें ह्मणजे सूर्य, चंद्र, तारे इत्यादिक, आणि वायु, जल, अग्नि इत्यादिक या सर्वांस ईश्वरानें मनुष्यां सारिखे अथवा (त्याहून) कनिष्ठ असे उत्पन्न करून त्यांस निरनिराळीं कामें लावून दिल्हीं आहेत; तीं कामें मात्र ते बजावतात. यापेक्षां अधिक शक्ति त्यांच्या अंगीं नाहीं. मग अशा पदार्थांची सेवा करणें, अथवा त्यांस मध्यस्थ समजून ईश्वराची प्रार्थना करणें

यांत काय लाभ? जो रागिष्ठ स्वभावाचा आणि कठोर मनाचा असतो, त्यापुढें अर्ज करितांना, त्याची समजूत देण्याकरितां व कांहीं रदबदली करण्याकरितां कदाचित् मध्यस्थाची गरज लागते. परंतु ईश्वर रागिष्ठ स्वभावाचा अथवा कठोर मनाचा नाहीं; तो दयाळू व कृपाळू, मंदक्रोध व फार दयेचा देव आहे; त्याकडे आपणास अथवा आपल्या प्रार्थनेस नेण्याकरितां कोणीच मध्यस्थ नको. जे त्यास खरेपणानें हाक मारितात त्यांच्या जवळच तो आहे. यप्रमाणें मध्यस्थावांचून ईश्वर कृपा करितो, असें प्रमाण शास्त्रांतहि आहे. यशाया अध्याय ५९, ओवी १६ "कोणी सज्जन नाहीं, असें त्यानें पाहिलें, आणि कोणी मध्यस्थ नाहीं, ह्मणून त्यास आश्चर्य वाटलें; तेव्हां त्याच्याच बाहूनें त्यासाठीं तारण केलें, आणि त्याच्याच न्यायानें त्याला धारण केलें;" आणि यशाया अध्याय ६३, ओवी ५ "तर कोणी सहाय करणारा नाहीं, असें म्यां पाहिलें; आणि कोणी उद्धारणारा नाहीं ह्मणून मला आश्चर्य वाटलें; तेव्हां माझ्याच हातानें मजसाठीं तारण केलें व माझ्या रागानें मला उद्धरिलें."

असें असतां जो सन्मान ईश्वरालाच देणें, तो अन्य देवांस अथवा मूर्त्तींस देणें हें मोठें पातक आहे; आणि याचा ईश्वरास मोठा वीट आहे. जसा याविषयीं तसा दुसऱ्या कोणत्याहि दोषांविषयीं शास्त्रांत अनेक वेळां आणि निक्षून निषेध केलेला नाहीं. सर्व मनुष्यजातीनें अन्य देवांचा आणि मूर्त्तींचा त्याग केला पाहिजे. परंतु इस्राएलानें तर त्यांपासून अगदींच दूर राहिलें पाहिजे. कारण, त्यांच्या शास्त्रांत या पापाचा निषेध केला आहे एवढेंच नव्हे, परंतु या दोषाच्याच कारणानें त्यांस अनेक वेळीं कठोर शिक्षा भोगावी लागली आहे. येहेज्केल अध्याय २२, ओवी ४ एथें ईश्वर येरूशालेमेस ह्मणजे इस्राएलांस असें ह्मणतो कीं, "तुझ्या ज्या मूर्त्ति त्वां केल्या आहेत, त्यांकडून त्वां आपणाला विटाळिलें आहे, आणि त्वां आपले दिवस जवळ आणिले आहेत, आणि तूं आपल्या वर्षांस पोंचली आहेस; याकरितां म्यां तुला राष्ट्रांला निंदेसाठीं आणि सर्व देशाला धिक्कारासाठीं केलें." हा मोठा दोष इस्राएलांनी आपणावरून दूर करावा, ह्मणजे एकच ईश्वराच्या भक्तीचा मार्ग व उदाहरण दाखविण्याच्या ज्या हेतूनें ईश्वरानें त्यांस आपले लोक असे निवडून

घेतलें आहे, तो ईश्वरी हेतु पूर्ण होऊन शास्त्रांत लिहिल्याप्रमाणें त्यांचें उदाहरण पाहून अन्य लोक बोध घेतील; आणि शेवटीं एकाच खऱ्या देवापुढें प्रत्येका अमावास्येस व प्रत्येका शाब्बाथास नमन करायास येतील.

गोष्ट.

भक्तिभाव.

एके दिवशीं कर्फबेर नांवाचा एक इस्राएल, फ्रान्सचा राजा चौदावा लुई याजपासीं इस्राएलांकरितां कांहीं मागणें मागायास वरसेल एथील माहालीं गेला. त्या दिवशीं दरबारांत एवढी दाटी झाली होती कीं, त्याचा अर्ज देण्याकरितां त्यास फार वेळ खोटी राहावें लागलें. तिसरा प्रहर होऊन गेला तरी त्यास आपला अर्ज राजाच्या हातीं देण्याची सवड सांपडली नाहीं, म्हणून मिनहा म्हणजे दोन प्रहरां नंतरची प्रार्थना, जी प्रत्येक इस्राएलास दिवस मावळल्या अगोदर केलीच पाहिजे, ती करावी असें त्याच्या मनीं आलें, आणि तो त्या दिवाणखान्याच्या एका कोंपऱ्यांत गेला. तेथें तो एकचित्तानें प्रार्थना करीत असतां, राजा त्याचा अर्ज घेण्यासाठीं खोटी आहे म्हणून चोपदार त्यास हांका मारूं लागला. अशा त्या चोपदाराच्या अनेक हांका ऐकून त्यानें आपली प्रार्थना पुरी करण्यास त्वरा न करितां, मोठ्या भक्तिभावानें पुरी करून राजापुढें गेला. राजानें जेव्हां त्यास एवढा वेळ लावण्याचें कारण विचारिलें, तेव्हां तो म्हणाला, महाराज, तुम्हांपेक्षां थोर असा जो एकच राजा परमेश्वर, याजपुढें उभा असल्या कारणानें मला उशीर लागला. राजानें त्याच्या अशा भक्तिभावावरून व पूर्वीं प्रत्ययास आलेल्या त्याच्या राजनिष्ठेवरून, त्यानें सांगितलेलें कारण मान्य करून आलसेस गांवच्या इस्राएलां करितां त्यानें केलेला अर्ज कबूल केला.

तत्व ६.

भविष्यकथनाची सत्यता.

שֶׁפַע נְבוּאָתוֹ נְתָנוֹ אֶל . אַנְשֵׁי סְגֻלָּתוֹ וְתִפְאַרְתּוֹ׃

"त्याने आपली भविष्यकथनाची प्रेरणा आपल्या संपत्तिरूप आणि महत्वयुक्त मनुष्यांस दिल्ही."

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה שֶׁכָּל דִּבְרֵי נְבִיאִים אֱמֶת׃

"मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, शास्त्रांतील सर्व भविष्यभाष्यांचीं वचनें सत्य आहेत."

ईश्वराने मनुष्यास उत्पन्न केल्यानंतर तो लवकरच त्यास व त्याच्या आज्ञांस विसरला; आणि त्यामागून त्याचें संतान उत्तरोत्तर अधिकाधिक विसरल्यामुळे ईश्वराने जलप्रलय आणून सर्व पृथ्वीचा नाश केला. इतकें होत असतांहि पुनः उत्पन्न झालेल्या लोकांनीहि ईश्वरास चिडविलें.

असें मनुष्याचें मन पापाकडे वळणारें आहे; तर जगाचा पुनः नाश होऊं नये, आणि ईश्वराचें व त्याच्या आज्ञांचें व गुणांचें ज्ञान जगांत राहावें, मनुष्यास त्याचीं कर्तव्यकर्मे समजावीं, आणि ईश्वराची कृपा संपादन करण्याचा मार्ग त्यास कळावा, ह्मणून ईश्वराने आब्राहामास निवडून घेतलें; आणि त्याचे संतानास आपल्या भक्तांकडून या सर्व गोष्टी कळविल्या. ज्या पवित्र मनुष्यांकडून ह्या गोष्टी कळून आल्या, त्यांस भविष्यवादी असें नांव मिळालें आहे. ह्या गोष्टी ईश्वराने त्यांस स्वतां भाषण करून, प्रेरणेने किंवा दृष्टांताने कळविल्या. जसें होशेयाह अध्याय १२, ओवी १० एथें लिहिलें आहे कीं;—"आणि मी भविष्यवाद्यांकडून बोललों आहें, आणि म्या दृष्टांत दर्शनें बहुत करविलीं आहेत, आणि भविष्यवाद्यांच्या योगाने दाखले सांगितले आहेत."

हीं भविष्यवाद्यांचीं वचनें शास्त्रांत नियमांच्या, भविष्यांच्या व सुबोधांच्या रूपाने आहेत. हे नियम, हीं भविष्यें व हे सुबोध पवित्र शास्त्राच्या चोवीस पुस्तकांत सांपडतात. मनुष्याच्या आचरणाकरितां ईश्वराने आपली इच्छा प्रदर्शित करून जे नियम लावून दिल्हे आहेत, ते "तोरा"

नियमशास्त्र ह्मणजे मोशेचीं पांच पुस्तकें यांमध्यें; जे भविष्यवाद ते बहुतकरून "नेबीईम" भविष्यवाद्यांचीं पुस्तकें, ह्मणजे यशाया, इर्मेया, येहेजकेल, दानिएल, होशेया इत्यादिक यांमध्यें; आणि जे सुबोध ते "केथुबिम" पवित्रलेख ह्मणजे गीतें, नीति, उपदेशक इत्यादिक यांमध्यें सांपडतात. हे नियम लावून देणारे, हीं भविष्यें कथणारे व हे सुबोध करणारे या सर्वांस भविष्यवादी असें नांव पडलें आहे; व त्या सर्वांचीं वचनें सत्य आहेत. खोटा भविष्यवादी ओळखण्याची एक मोठी खूण ही कीं, त्याचीं वचनें बहुतकरून पूर्ण होत नाहींत. जसें ह्मटलें आहे कीं, "तर जेव्हां भविष्यवादी परमेश्वराच्या नामानें बोलेल आणि ती गोष्ट घडत नसतां प्रत्ययास येतच नाहीं, तेव्हां जी गोष्ट परमेश्वरानें सांगितली नाहीं ती तीच; त्या भविष्यवाद्यानें धट्टाई करून ती सांगितली आहे, त्याला तूं भिऊं नको." अनुवाद अध्याय १८, ओवी २२. याप्रमाणें खरा भविष्यवादी ओळखण्याची जी खूण आहे ती असी कीं, त्याचें भाषण ईश्वरानें लावून दिल्हेल्या नियमशास्त्रास अनुसरून असून तें पूर्ण झालें पाहिजे. कारण अनुवाद अध्याय १३, ओवी १–३ एथें असें लिहिलें आहे कीं:—"जरी भविष्यवादी किंवा स्वप्न पाहणारा तुह्मामध्यें उत्पन्न होऊन तुह्माजवळ खूण किंवा चमत्कार सांगून ठेवितो, आणि जी खूण किंवा चमत्कार तुला सांगतो, तो अशा अर्थानें प्रत्ययास येतो कीं, आपण दुसऱ्या देवांच्या मागें लागून त्यांची सेवा करूं, जे तुला ठाऊक नाहींत त्यांच्या मागें, तरी त्या भविष्यवाद्याच्या किंवा त्या स्वप्न पाहणाऱ्याच्या गोष्टी तूं ऐकूं नको; कारण कीं तुमचा देव परमेश्वर तुमची परीक्षा पाहतो, असी कीं तुह्मी आपल्या सर्व हृदयानें व आपल्या सर्व जीवानें आपला देव परमेश्वर यावर प्रीति करीत आहां किंवा नाहीं हें जाणावें ह्मणून." सारांश खोट्या भविष्यवाद्यांचीं वचनें घडून येत नाहींत; आणि तीं वचनें अन्य देवांच्या नांवानें असून जरी घडून येतात, तरी तीं ईश्वराकडूनच घडून येतात असें समजावें; कारण तेणेकरून आपण अन्य देवाकडे फिरतों किंवा नाहीं याची परीक्षा ईश्वर करितो. या खुणाप्रमाणें ज्या भविष्यवाद्यांचीं वचनें शास्त्रांत आहेत, तीं प्रत्ययास येतात व तीं ईश्वरी नामानें असून प्रत्ययास येतात, ह्मणून ते भविष्यवादी व त्यांचीं वचनें सत्य आहेत.

या भविष्यवाद्यांनी जीं भविष्यें कथिलीं आहेत, तीं ज्या गोष्टींविषयीं आहेत, त्या गोष्टी घडण्याच्या शेंकडो वर्षांपूर्वीं त्यांनीं कथिलीं आहेत. आणि ज्या ज्या वेळीं तीं घडून येणार त्या त्या वेळीं तीं घडून आलीं व येत आहेत. यावरून ही भविष्यें जाणण्याची शक्ति त्यांच्या अंगीं ईश्वरी प्रेरणेवांचून नसावी. कारण ईश्वरावांचून कोणास भविष्य कळत नाहीं. आणि हे भविष्य कथणारे मानव असून ही शक्ति त्यांच्या अंगीं होती, तर ती ईश्वराकडूनच होती. आणि ते सत्यास अनुसरणारे, आणि नीतीच्या मार्गानें वर्तणारे होते. तर त्यांस ईश्वरी प्रेरणा होती असी त्यांची खातरी होती ह्मणूनच त्यांचीं वचनें ईश्वरप्रेरित आहेत, असें त्यांनी हजारों लोकांपुढें उघडपणें सांगितलें. त्यांस ईश्वरी प्रेरणा नसती तर त्यांच्यानें अशा गोष्टी प्रगट करवल्या नसत्या; यास्तव ते नीतिमान व सत्यवंत असून त्यांचीं वचनें ईश्वरप्रेरित आहेत असें त्यांनी खातरीनें सांगितलें आहे, यावरून त्यांस ईश्वरी प्रेरणा होती. आणि त्यांचीं वचनें ईश्वरप्रेरणेनें असल्या कारणानें तीं वचनें ईश्वराचींच व सत्यच आहेत असें मानिलें पाहिजे.

गोष्ट.

मिर्यामीचें भविष्य.

इस्राएल लोक मिसरांत असतां, त्यांची संख्या फारच वाढूं लागली, म्हणून फारो राजानें इस्राएलांच्या जन्मलेले पुत्रांस नदींत टाकण्याचा हुकूम केला. यावरून आपल्या पोटच्या पुत्रांचा प्राणघात आपल्याच हातून न व्हावा व त्यांच्या यातना आपल्या दृष्टीस न पडाव्या, ह्मणून कित्येक इस्राएलांनी आपल्या बायकाहि सोडून दिल्या. त्यांबरोबर आमरामानेंहि आपली बायको योखेबेद इला सोडिलें. यापूर्वीं आमरामास मिर्याम व आहारोन असीं दोन लेकरें होतीं. याप्रमाणें तीं उभयतां तीन वर्षें वेगळीं राहिल्यावर मिर्यामीवर ईश्वरी आत्मा आला; आणि ती आपले बापास ह्मणाली, बापा, तूं माझे आईस आपणा जवळ पुनः घे. आणि

या वेळीं तुह्मास पुत्र होईल तो इस्राएलांस मिसरांतून सोडवील. आमरामाने आपल्या मुलीच्या भविष्यवचनावर विश्वास ठेवून आपल्या बायकोस पुनः आपणाजवळ घेतली, व ती गरोदर होऊन सात महिन्यांनीं मोशे जन्मला. या बाळावर लहानपणीं अनेक संकटें आलीं. 'हा बाळ जन्मणार व पुढें तो मोठा होऊन त्याच्या हातून आपला व आपल्या लोकांचा नाश होणार, असें फारोस त्याने पाहिलेल्या स्वप्नाच्या अर्थावरून पूर्वींच समजलें होतें, म्हणून त्याने इस्राएलांत जन्मलेल्या मुलांचा शोध करण्यास मिसरी बाया ठेविल्या होत्या. या भयानें मोशेच्या आईने त्यास तीन महिने लपवून ठेविल्यावर, पुढें त्यास लपवून ठेववत नाहीं, म्हणून त्यास नदींत सोडिलें. नदींतून फारोच्या कन्येने त्यास वांचविलें, व तिने त्यास आपले घरीं नेल्यावर, एके दिवशीं त्याने फारोच्या डोईवरून त्याचा मुगुट काढून आपल्या डोईवर घातला. यावरून फारो त्यास जिवें मारीत होता. परंतु जेव्हां त्यापुढें एक सोन्याचा तुकडा व एक अग्नीचा इंगळ ठेविला, तेव्हां त्याने तो अग्नीचा इंगळ उचलून तोंडांत घातला, यावरून त्यानें निर्बुद्धीने तसें केलें असें सिद्ध झाल्यामुळें, फारोने त्यास जीवदान दिल्हें. असा तो अनेक संकटांतून वांचला, आणि जेव्हां ईश्वराकडून नेमिलेला वेळ आला, तेव्हां त्याने इस्राएलांस मिसरांतून सोडविलें. येणेंप्रमाणें मोशेचे जन्माविषयीं व इस्राएलांच्या सुटके विषयीं मिर्यामीने कथलेलें भविष्य पूर्ण झालें; आणि निर्गम अ० १५ ओ० २० एथें लिहिल्याप्रमाणें तिला भविष्यवादीण असें नांव मिळालें.

तत्व ७.

मोशेचा श्रेष्ठपणा.

לֹא קָם בְּיִשְׂרָאֵל כְּמֹשֶׁה עוֹד׃ נָבִיא וּמַבִּיט אֶת תְּמוּנָתוֹ׃

"ज्याने त्याचें गौरव पाहिलें त्या मोशे सारिखा
इस्राएलांत कोणी दुसरा भविष्यवादी उठला नाहीं."

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה שֶׁנְּבוּאַת מֹשֶׁה רַבֵּנוּ עָלָיו הַשָּׁלוֹם הָיְתָה אֲמִתִּית וְשֶׁהוּא הָיָה אָב לַחֲכָמִים לַקּוֹדְמִים לְפָנָיו וְלַבָּאִים אַחֲרָיו׃

"मी पूर्णविश्वासाने असें मान्य करितों कीं, आमचा गुरु मोशे

(त्याजवर शांति असो) त्याचें भविष्यकथन सत्य आहे; आणि त्याच्या पूर्वी झालेल्या व मागाहून झालेल्या सर्व ज्ञान्यांचा तो गुरु होता."

सहाव्या तत्वांत लिहिल्याप्रमाणें मोशेचीं अनेक भविष्यकथनें घडून प्रत्ययास आलीं, आणि त्याचीं सर्व भविष्यकथनें ईश्वरी नामानें आहेत, यावरून शास्त्रांतील दुसऱ्या खऱ्या भविष्यवाद्यांप्रमाणें तोहि खरा आहे, आणि त्यांच्या वचनांप्रमाणें, त्याचीं वचनेंहि खरींच आहेत एवढेंच नव्हे; परंतु तो त्या सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे. कारण ईश्वरानें आपणाकरितां निवडून घेतलेले लोक, ज्यांकडून सर्व लोकांस ईश्वरी ज्ञान मिळणार, व ज्यांकडून सर्वलोक आशीर्वाद पावणार, आणि ज्यांस याच कारणावरून आचार्यांचें राज्य असें ह्मटलें आहे, त्या लोकांस मिसऱ्यांच्या बंदांतून सोडवायास, व ज्या नियमांवर सर्व लोकांचें पुढील सुख अवलंबून आहे, ते लावून देण्यास, मोशे यासच निवडून घेतलें. आणि सर्व मनुष्यांपेक्षां ईश्वराच्या पूर्णपणाचें व गुणांचें ज्ञान त्याच्या अंगीं विशेष होतें. आणि जेव्हां तो सीनाय पर्वतावर दहा आज्ञा आणावयास गेला होता, तेव्हां त्याच्या शरीराची शक्ति व त्याचीं इंद्रियें व त्याची बुद्धि एवढी तत्पर झाली होती कीं, त्याच्या अंगीं केवळ आत्मिक प्राण्याची शक्ति आली होती. यामुळें ईश्वरानें त्या बरोबर दूतांच्या योगानें अथवा स्वप्नांत भाषण न करितां, तोंडोतोंड भाषण केलें.

मोशे दुसऱ्या भविष्यवाद्यांपेक्षां मुख्य चार कारणांवरून श्रेष्ठ आहे. त्यांतील पहिलें कारण असें कीं, वर सांगितल्याप्रमाणें ईश्वरानें जसें दुसऱ्या भविष्यवाद्यां बरोबर दुतांच्या योगानें भाषण केलें, तसें त्यासीं केलें नाहीं; त्यासीं तोंडोतोंड भाषण केलें. दुसरें कारण असें कीं दुसऱ्या सर्व भविष्यवाद्यांस झोंपेंत असतां, किंवा स्वप्नांत किंवा रात्रींच्या दृष्टांतांत, किंवा दिवसा गाढ झोंप लागली असतां, आणि त्यांचे शरीराचे अवयव व त्यांचीं इंद्रियें स्तब्ध असतां, त्यांस भविष्यकथनाची प्रेरणा प्राप्त झाली. परंतु मोशे साक्षात्काराच्या राहोटींत दयासनाजवळ उभा असतां, ईश्वर त्यासीं संभाषण करीत असे. याचें प्रमाण निर्गम अध्याय २५, ओवी २२ एथें सापडतें; तें असें कीं, "मी (ईश्वर) तेथें तुला साक्षात् भेटेन, आणि इस्राएलाच्या संतानासाठीं ज्या आज्ञा तुला देईन त्या सर्व दयासनावरून

संकेतलेखाच्या कोशावर जे दोन केरूब आहेत त्यांच्या मधून तुला सांगेन. याविषयीं अणखी प्रमाण, गणना अध्याय १२ ओवी ६–८ एथें सांपडतें. तें येणेप्रमाणें:—"जर तुमच्या मध्यें भविष्यवादी असला, तर त्याला मी परमेश्वर दृष्टांताने प्रगट होईन; स्वप्नांत त्यासीं बोलेन. माझा सेवक मोशे तसा नाहीं; तो माझ्या सगळ्या घरामध्यें विश्वासू आहे. मी तोंडोतोंड दर्शन देऊन त्यासीं बोलत जाईन, कूट वाक्यांनी (त्यासीं बोलणार) नाहीं, इत्यादिक. मोशे यास दुसऱ्या भविष्यवाद्यां पेक्षां श्रेष्ठ म्हणण्याचें तिसरें कारण असें कीं, दुसऱ्या भविष्यवाद्यांस ईश्वराकडून दृष्टांत दर्शन होत असे, तेव्हां त्यांच्या अंगीं एवढा थरकांप सुटे कीं, त्यांच्या तंतीं प्राण उरे. ही अवस्था दानीएलास प्राप्त झाली होती, असें दानीएल अध्याय १० ओवी ८–९ यावरून कळतें. दानीएल म्हणतो, "मी एकटाच राहिलों, आणि म्या हा मोठा दृष्टांत पाहिला, मग माझ्या ठायीं शक्ति राहिली नाहीं, आणि माझें तेज माझ्या ठायीं पालटून म्लानत्व आलें, आणि मी बलहीन झालों. आणि मी त्याच्या वचनाचा शब्द ऐकिला; आणि मी त्याच्या वचनाचा शब्द ऐकत होतों तेव्हां मी उपडा असून, माझें मुख भूमीकडे असून गाढ झोपेंत होतों." परंतु ईश्वराचें भाषण मोशे बरोबर तोंडोतोंड आणि जसें मित्रांमध्यें, तसें होत असे. तो ईश्वराच्या साक्षात्कारामुळें व भाषणामुळें थरथरत व घाबरत नसे. त्याच्या शरीराचे अवयव व त्याची बुद्धि स्थिर असे. ज्या चौथ्या कारणावरून मोशे दुसऱ्या सर्व भविष्यवाद्यां पेक्षां श्रेष्ठ म्हटला गेला आहे, तें असें कीं, दुसऱ्या भविष्यवाद्यांच्या अंगीं भविष्यकथनाची शक्ति सर्वदा नसे. जसजसें त्यांस प्रयोजन पडत असे, तसतसी ईश्वर आपली इच्छा त्यांस कळवीत असे. परंतु कित्येकांस कित्येक वर्षें पर्यंत ईश्वराकडून कोणत्याहि प्रकारचा दृष्टांत होत नसे. आणि कित्येक, त्यांस भविष्य समजावें म्हणून ध्यानस्थ बसत असत, अथवा प्रार्थना करीत असत. येलीशा हा भविष्य समजावें म्हणून, दुसरे राजे अध्याय ३ ओवी १९ एथें लिहिल्याप्रमाणें वाजंत्र्यांच्या नादांत निमग्न झाला होता; आणि दानीएलास ईश्वराचा दृष्टांत समजला नाहीं म्हणून प्रार्थना करावी लागली. परंतु मोशे हा सर्वदा ईश्वरासीं संभाषण करण्यास योग्य असे; आणि ईश्वरहि त्यास त्याच्या

प्रश्नाचें उत्तर लागलेंच देत असे. जसें गणना अध्याय ९, ओवी ७–१० एथें लिहिलें आहे कीं, कांहीं लोक मोशे जवळ येऊन म्हणाले कीं, "आम्ही प्रेतांनी अशुद्ध झालों आहों, तथापि आम्ही वल्हांडण सणाचें अर्पण यथाकाळीं कां न वाहावें, आणि कां वेगळें व्हावें." तेव्हां मोशेनें त्यांस उभें राहायास सांगितलें, आणि ईश्वराच्या सूचने प्रमाणें त्यांस लागलेंच उत्तर दिल्हें. याचप्रमाणें गणना अध्याय २७ यांत लिहिल्या प्रमाणें, सेलोफहादाच्या कन्यांच्या वादाचें उत्तर त्यांस त्यानें ईश्वराच्या सूचनेप्रमाणें लागलेंच दिल्हें.

याशिवाय ईश्वरानें स्वतां त्यास "माझ्या सगळ्या घरामध्यें विश्वासू" असें जें नाम दिल्हें आहे, त्यावरून तो ईश्वरास किती प्रिय असावा हें उघड दिसून येतें. यासारिखी प्रीति ईश्वरानें दुसऱ्या कोणत्याहि भविष्यवाद्यां-विषयीं, अथवा दुसऱ्या कोणाविषयींहि दर्शविली नाहीं. यासाठीं ज्या अर्थी ईश्वरानें स्वतां त्याजविषयीं असें प्रमाण दिल्हें आहे, त्या अर्थी तो दुसऱ्या सर्व भविष्यवाद्यांपेक्षां व साधारण मनुष्यांपेक्षां श्रेष्ठ असावा यांत संशय नाहीं. आणि थोरपणा मिळण्याचें मूळ कारण नम्रता होय; तीहि त्याच्या अंगीं सर्व मनुष्यांपेक्षां अधिक होती, असें त्याच्या चरित्रावरून दिसून येतें. आणि गणना अध्याय १२, ओवी ३ एथेंहि या प्रमाणेंच लिहिलें आहे कीं, तो मनुष्य मोशे तर पृथ्वीच्या पाठीवरल्या सर्व मनुष्यांमध्यें अति नम्र होता." अशावरून त्यास थोरपणा योग्य आहे; आणि त्यापूर्वी व त्या मागून त्यासारिखा भविष्यवादी कोणी झाला नाहीं हें अगदीं अक्षरशः खरें आहे.

गोष्ट.

मोशेचा व दुसऱ्या ईश्वरभक्तांचा विवाद.

मोशे आपल्या अंतकाळीं जेव्हां इस्राएलांस आशीर्वाद देऊं लागला, तेव्हां प्रथम पुरुष आदाम त्यापुढें येऊन ह्मणाला कीं, ईश्वरानें मला आपल्या प्रतिमेप्रमाणें उत्पन्न केलें; या वाक्याप्रमाणें मी ईश्वरी प्रतिमे-

सारिखा उत्पन्न झालेला आहें, ह्मणून मी तुजपेक्षां श्रेष्ठ आहें; इस्राएलांस आशीर्वाद देण्याचा हक माझा आहे. मोशे ह्मणाला, मी तुजपेक्षां श्रेष्ठ आहें; तुझा सुंदरपणा निघून गेला आहे, कारण तुजविषयीं ह्मटलें आहे कीं, "आदामाचा (मनुष्याचा) सुंदरपणा राहत नाहीं." गीत ४९ ओवी १२. परंतु ईश्वराने जी मुखचर्या मला दिल्ही आहे ती मजवरून गेली नाहीं. मजविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "त्याची दृष्टी मंद झाली नाहीं, आणि त्याचें जिवटपणहि उडून गेलें नाहीं." अनुवाद अध्याय ३४, ओवी ७. याप्रमाणें जेव्हां आदाम कुंठित झाला, तेव्हां नोहा आला; आणि ह्मणाला कीं, मी तुजपेक्षां श्रेष्ठ आहें, कारण जलप्रलयांत बुडालेल्या लोकांतून मीच मात्र वांचलों. मोशेने त्यास उत्तर केलें; असें नाहीं, मी तुजपेक्षां श्रेष्ठ आहें. तूं आपले स्वतांसच वांचविलेंस, तुला तुझ्या वेळच्या लोकांस वांचविण्यास सामर्थ्य नव्हतें, परंतु जेव्हां इस्राएलांनी रानांत वासरूं केलें व त्यामुळें त्यांचा नाश होणार होता, तेव्हां मी आपले स्वतांस आणि त्या माझ्या वेळच्या इस्राएल लोकांसहि वांचविलें. जसें ह्मटलें आहे कीं, "परमेश्वराने आपल्या लोकांचें जें वाईट करावें ह्मणून ह्मटलें, त्याविषयीं पश्चात्ताप केला." निर्गम अ० ३२, ओवी १४. हें ऐकून नोहा निरुत्तर झाला. तेव्हां आब्राहाम आला, आणि ह्मणाला कीं, मी येणाऱ्या जाणाऱ्या वांटसरांचा पाहुणचार करून त्यांस जेवण वाढीत असें, ह्मणून मी तुजपेक्षां श्रेष्ठ. मोशेने त्यास उत्तर केलें कीं, तूं तर असुंति लोकांस जेवण वाढलेंस; परंतु मीं सुंति लोकांस पोसिलें; या शिवाय तूं त्यांस वसतीच्या ठिकाणीं जेवण वाढलेंस, परंतु मीं त्यांस रानांत पोसिलें. यापुढें आब्राहामास उत्तर करवलें नाहीं. मग इसहाक आला, आणि ह्मणाला कीं, ईश्वरी नामाकरितां अर्पिला जाण्यास सिद्ध होऊन स्थंडिलावर मी आपली मान ताणिली, त्यावेळीं ईश्वरी साक्षात्कारहि मी पाहिला. मोशे ह्मणाला, असो, तरी मी तुजपेक्षां श्रेष्ठ, कारण तूं ईश्वरी साक्षात्कार पाहिल्यामुळें तुझी दृष्टी मंद झाली व याप्रमाणें लिहिलें आहे. उत्पत्ति अध्याय २७, ओवी १ "आणि असें झालें कीं, इसहाक म्हातारा झाला आणि त्याला दिसेना असे त्याचे डोळे मंद झाले," परंतु मी त्या ईश्वरी साक्षात्काराबरोबर तोंडोतोंड भाषण केलें; तरी माझी दृष्टि

मंद झाली नाहीं. जसें ह्मटलें आहे कीं, "(मोशे) त्यासीं (ईश्वरासीं) बोलल्यामुळें त्याच्या तोंडाची त्वचा तेजस्वी झाली हें मोशेला ठाऊक नव्हतें." निर्गम अध्याय ३४, ओवी २९. मग याकोब आला आणि ह्मणाला कीं मला ईश्वरी दूत भेटला, व त्यास मी जिंकिलें. त्यास मोशेने उत्तर दिल्हें कीं, तो दूत तुला तुझ्या हद्दींत भेटला; परंतु मी वरतीं ईश्वरी दूतांच्या हद्दींत गेलों व ते मला पाहून भ्याले. कारण असें ह्मटलें आहे कीं, "सैन्याचे राजे उड्या मारीत मारीत पळाले." याप्रमाणें मोशेने आपला श्रेष्ठपणा सिद्ध करून दाखविल्यावरून, त्याला इस्राएलांस आशीर्वाद देण्याचा हक्क मिळाला, व त्याने अनुवाद अध्याय ३३ एथें लिहिल्या प्रमाणें इस्राएलांच्या बारा वंशांस आशीर्वाद दिल्हा.

तत्व ८.

शास्त्राचा अस्सलपणा.

תּוֹרַת אֱמֶת נָתַן לְעַמּוֹ אֵל׃ עַל יַד נְבִיאוֹ נֶאֱמַן בֵּיתוֹ׃

"देवाने आपल्या लोकांस आपला भविष्यवादी आणि आपल्या घरचा विश्वासू, यांचे हातून खरें नियमशास्त्र दिल्हें आहे."

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה שֶׁכָּל הַתּוֹרָה הַמְּצוּיָה עַתָּה בְּיָדֵינוּ הִיא הַנְּתוּנָה לְמשֶׁה רַבֵּינוּ עָלָיו הַשָּׁלוֹם׃

"मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, आमचा गुरु, मोशे (त्याजवर शांति असो) यास जें दिल्हेलें, तेंच सर्व नेमशास्त्र हल्लीं आह्माजवळ आहे."

इस्राएल लोकांजवळ जें शास्त्र आहे, तेंच ईश्वराने त्या लोकांस मोशेचे हातून दिल्हेलें शास्त्र, असें सिद्ध करण्यास अनेक प्रमाणें आहेत. ज्या आज्ञा ईश्वराने मोशेचे हातून इस्राएलांस दिल्ह्या त्या, आणि ज्या झालेल्या व होणाऱ्या गोष्टी ईश्वराने आपल्या प्रेरणेने त्यास सुचविल्या त्या सर्व त्याने शास्त्राच्या पहिल्या पांच पुस्तकांत लिहून ठेविल्या आहेत. याची प्रत त्याने उपाध्यांच्या स्वाधीन केली व ती कराराच्या कोशाजवळ ठेवा-

यास सांगितली. हीच प्रत योशिया राजाच्या वेळीं हिलकीया याजकास पवित्र मंदिरांत सांपडली ती असावी. या शिवाय प्रत्येक राजानें आपणाजवळ शास्त्राची एक प्रत ठेवावी असा नियमहि होता. यावरून पहिल्या मंदिराच्या शेवटपर्यंत या शास्त्राची खरी प्रत इस्राएलांजवळ होती यांत संशय नाहीं. यानंतर जेव्हां इस्राएलांस नेबुखादनेसार राजानें बाबेलांत पाडाव करून नेलें, तेव्हां एज्रानें या शास्त्राचीं सर्व पुस्तकें एकत्र मिळवून एक प्रत केली. यानंतर इस्राएल लोकांची धर्मनिष्ठा व शास्त्रावरील प्रीति पूर्वीं पेक्षां अधिक वाढली; आणि ते पवित्र शास्त्रांतील आज्ञा व विधि फारच जपून पाळूं लागले. तर दुसऱ्या पवित्र मंदिराच्या शेवटपर्यंत त्यांचें पवित्र शास्त्र त्यांजवळ होतेंच यांतहि कांहींच संशय नाहीं. त्यानंतर आज दिवसपर्यंत अनेक व महासंकटें जरी त्यांवर आलीं, तरी हें शास्त्र त्यांनी आपल्या अमोलिक धनापेक्षांहि अधिक रक्षिलें आहे.

या तत्वाच्या खरेपणाचें दुसरें प्रमाण असें कीं, मोशेचे शास्त्रांत इतिहाससंबंधी ज्या गोष्टी आहेत, त्यांविषयीं प्राचीन विख्यात अशा बहुत विधर्मी ग्रंथकारांनीहि लिहिलें आहे. आणि ज्या ठिकाणीं त्या गोष्टी घडून आल्या, त्या ठिकाणच्या जुन्या इमारती व त्यांवरील चित्रें व लेख त्यांविषयीं साक्ष देतात.

तिसरें प्रमाण हें कीं, ख्रिस्ती लोक ज्यांचा धर्म दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं उपस्थित झाला, तेहि हें शास्त्र खरें असें मानितात.

सेपट्युएजिन्ट भाषांतर.

प्राचीन काळीं झालेलीं भाषांतरें हें चौथें प्रमाण. या शास्त्राचें पहिलें भाषांतर ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं सुमारें २४४ वर्षें, ह्मणजे येरूशालेमेचा पहिला नाश झाल्यानंतर १७८ वर्षांनी, मिसराचा राजा टालेमी फिलिडेलफस यानें करविलें. हा राजा विद्येस व विद्वानांस उत्तेजन देणारा होता. यानें आलेक्सांड्रीया शहरामध्यें एक मोठें पुस्तकालय स्थापन केलें होतें, त्यांत इस्राएल लोक जे सर्व काळांत व सर्व देशांत विख्यात आहेत, त्यांचें शास्त्र व त्याचें भाषांतरहि असावें, ह्मणून त्यानें त्याचें भाषांतर

सुमारें आठ लक्ष रुपये खर्च करून करविलें. हें भाषांतर करण्यास त्यानें त्या वेळीं येरूशालेमेंत येलीएझेर नांवाचा जो मुख्य याजक होता, त्याजकडून कांहीं जाणते लोक मागविले. त्या मुख्य याजकानें बाहात्तर जाणते लोक पाठविले. त्यांनी हें भाषांतर ग्रीक भाषेंत केलें. हें शास्त्राचें पहिलेंच भाषांतर; या पूर्वीं शास्त्राचें भाषांतर दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत झालें नव्हतें. या भाषांतरास सेपट्युएजिन्ट असें ह्मणतात. या भाषांतराविषयीं प्राचीनकाळचे अनेक इतिहासकर्त्ते साक्ष देतात; आणि तें ख्रिस्ती व इस्राएल या उभयपक्षांस मान्य आहे.

तारगुम.

यासारिखीं तारगुम हीं भाषांतरेंहि फारच जुनीं आहेत. तारगुम या शब्दाचा अर्थ आरब्बी व हिंदुस्थानी तर्जुमा या शब्दाप्रमाणें भाषांतर असा होतो. तारगुम हें नाम कालदी भाषेंत केलेलें पवित्र शास्त्राच्या अथवा त्यांतील कांहीं भागाच्या भाषांतरास दिल्हेलें आहे. तारगुम या नामाचीं भाषांतरें एकंदर अकरा आहेत. पहिलें ओनकेलोसाचें, जें हल्लीं मोशेचे पांच पुस्तकांबरोबर छापलेलें असतें तें; दुसरें योनाथान बेन उज्जिएल यानें केलेलें भविष्यवाद्यांच्या पुस्तकांचें. तिसरें तारगुम येरूशालेमी; चौथें योनाथान बेन उज्जिएल याच्या नांवानें केलेलें मोशेचें पांच पुस्तकांचें; पांचवें एक डोळ्या योसेफाचें पवित्र लेखांतील इयोब, गीतें, व नीति यांचें; साहावें पांच मेगिलोथ ह्मणजे रूथ, एस्तेर, उपदेशक, शेलोमोचें गीत आणि इर्मेयाचा विलाप यापुस्तकांचें; सातवें पहिल्या व दुसऱ्या कालवृत्तांताचें; आठवें, नववें आणि दाहावें एस्तेरच्या पुस्तकाचें; आणि अकरावें तारगुम येरूशालेमी या नांवाचें भविष्यवाद्यांच्या पुस्तकांचें असीं आहेत. यांतून ओनकेलोसाचें, योनाथान बेनउज्जिएल याचें आणि तारगुम यरूशालेमी हीं तीन फारच प्राचीन व चांगल्या माहितीचीं आहेत. शोधाअंतीं असें दिसून येतें कीं, ओनकेलोसाचें तारगुम भाषांतर ख्रिस्ती शकाच्या नंतर सुमारें शंभर वर्षांनी झालें असावें. ओनकेलोस हा अन्य जातीचा असून, त्यानें इस्राएलांचा धर्म स्वीकारिला; आणि या धर्मावर त्याची निष्ठा एवढी बसली कीं, त्यानें चांगला

अभ्यास करून हें मोशेच्या पांच पुस्तकांचें भाषांतर केलें. हें भाषांतर बहुतकरून शब्दास शब्द दिल्हेला असें आहे; यामुळें तें शास्त्राचा अभ्यास करणारास फारच उपयोगी आहे. आणि तें इस्राएल लोकांस एवढें पसंत पडलें आहे कीं, प्रति शाब्बाथ दिवशीं, शास्त्राचा जो भाग वाचायाचा तो प्रत्येकानें या भाषांतरासहित अगत्य वाचावा, असा सुज्ञजनांनी नियम लावून दिल्हा आहे.

योनाथान बेन उज्जिएल याचें जें दुसर तारगुम, तेंहि ख्रिस्तीशकाच्या पूर्वींच झालेलें आहे. योनाथान बेन उज्जिएल हा प्रख्यात रिब्बी हिल्लेल याचा पहिल्या प्रतीचा शिष्य होता. यानें भविष्यकथनांत गणिलेलें पुस्तकांचें भाषांतर केलें. या भाषांतराची भाषा शुद्ध कालदी नाहीं; त्यांत ग्रीक व लाटीन भाषांतील अनेक शब्द सांपडतात. चौथें जें मोशेच्या पांच पुस्तकांचें भाषांतर, तेंहि याच कर्त्याच्या नांवानें आहे. परंतु या चौथ्या तारगुमाची भाषा दुसऱ्या तारगुमाचे भाषेसीं मिळत नाहीं; यावरून तें योनाथान बेन उज्जिएल याच्या हातचें नसावें; दुसऱ्या कोणीं केलें असावें.

तारगुम येरुशालेमी हें कोणी केलें याचा पूर्ण शोध लागत नाहीं. त्यांत कोणत्याहि सगळ्या पुस्तकाचें भाषांतर नाहीं; कोठें वाक्यें, आणि कोठें अध्याय सोडून निवडक भागाचेंच मात्र भाषांतर त्यांत आहे. त्याची भाषा व लिहिण्याची पद्धत योनाथानाच्या नांवानें केलेल्या मोशेच्या पांच पुस्तकांच्या तारगुमाच्या भाषेप्रमाणें आहे; यावरून हीं दोन्हीं एकानेच केलीं असावीं असें अनुमान होतें. हें तारगुम येरुशालेमांत केलेलें असावें. यावरून, अथवा जी कालदी भाषा येरुशालेमांत चालत होती, त्या भाषेंत तें लिहिलेलें असावें, म्हणून त्यास तारगुम येरुशालेमी हें नांव मिळालें आहे असें वाटतें. आणि रूथ, एस्तेर, उपदेशक, शलोमोचें गीत, इर्मयाचा विलाप, आणि कालवृत्तांताचीं दोन पुस्तकें, यांचें तारगुम बहुतकरून एकडोळ्या रिब्बी योसेफ बाबेलच्या पाठशाळेचा नायक याकडून तेराशें वर्षांपूर्वीं झालें असें वाटतें. परंतु त्यास तारगुम असें नांव शोभत नाहीं; कारण त्यामध्यें अनेक कहाण्या व दृष्टांत आहेत. दानीएल, एज्रा व नेहेमीया या पुस्तकांचें तारगुम नाहीं; कारण

दानीएल व एज्रा या पुस्तकांचे बहुतेक भाग कालदी भाषेतच आहेत; आणि नेहेमीया हें पुस्तक एज्राच्या पुस्तकाचाच एक भाग आहे असें मानितात.

जुन्या प्रति व मासोरेथ.

जुन्या, हाताने लिहिलेल्या प्रतींचें प्रमाण पांचवें. एकाद्या जुन्या ग्रंथाच्या जुन्या पांच दाहा प्रति जोडून पाहिल्या, आणि त्यांचा मेळ मिळाला, म्हणजे तो ग्रंथ खरा असा मानिला जातो. याप्रमाणें अनेक राबी लोकांनी शास्त्राच्या अनेक काळच्या अनेक प्रति मिळवून त्या जोडून पाहिल्या; आणि त्यांवरून शास्त्राचा खरेपणा दाखविण्याकरितां, व त्यांत पुढें कांहीं फेरफार होऊं नये, म्हणून त्यांनी "मासोरेथ" हा ग्रंथ रचून ठेविला आहे. हा ग्रंथ सुमारें पंधराशें वर्षांमागें झाला असावा असें वाटतें. या ग्रंथांत शास्त्राच्या प्रत्येक पुस्तकांतील अध्याय, ओव्या, शब्द, अक्षरें, आणि त्यांतील मध्य ओवी, मध्य शब्द व मध्याक्षर इत्यादिकांचें, आणि त्यांत ज्या चुका पडल्या आहेत त्यांचें, आणि विषयाच्या अर्थाप्रमाणें ते शब्द कसे असावे, याचें टिपण करून ठेविलें आहे. एज्रा ज्यानें शास्त्राचीं पुस्तकें पहिल्यानेच एकत्र करून त्यांच्या हल्लींच्या अनुक्रमानें लावून ठेविलीं आहेत, त्याच्या वेळेपासून असें टिपण करण्याची चाल असावी असें वाटतें. अलिकडे युरोपखंडांतील कांहीं विद्वानांनीहि निरनिराळया देशांतील निरनिराळया वेळच्या शास्त्राच्या प्रति मिळवून त्या जोडून पाहिल्या आहेत. डीरोसाय यानें इब्री ७९१ प्रति मिळवून जोडून पाहिल्या; त्यांतून दोन प्रति हजार वर्षां पेक्षांहि जुन्या आहेत. केनीकाट यानें ६३०· जोडून पाहिल्या. शास्त्रांतील दुसऱ्या पुस्तकांपेक्षां मोशेच्या पांच पुस्तकांच्या प्रति फारच जुन्या सांपडतात. बगदाद पासून सुमारें पन्नास कोसांच्या अंतरावर येहेजकेल भविष्यवादी याची कबर आहे; तेथें येहेजकेलाच्या हातीं लिहिलेलीं मोशेचीं पांच पुस्तकें आहेत असें म्हणतात. स्पेन देशांत राहणारा बिनयामीन नांवाचा एक गृहस्थ, जो पृथ्वीच्या पाठीवर विखरलेल्या आपल्या भावांच्या शोधास ७१९ वर्षांपूर्वीं निघाला होता; तो या येहेजकेलाच्या हातच्या प्रतीविषयीं

साक्ष देतो. आणि इस्राएल बेन योसेफ बिनयामीन जो सन १८४६ पासून सन १८५५ पर्यंत आपल्या लोकांच्या शोधास फिरत होता, तो हि ह्मणतो कीं, ही येहेजकेलाच्या हातची प्रत तेथें आहे. शोमरोनीम लोक* ह्मणतात कीं, पिनहासाचा पुत्र आबीशुआ याचे हातची मोशेच्या पांच पुस्तकांची प्रत हल्लीं त्याजवळ आहे. ही प्रत त्यानी प्रख्यात रेवरेंड डाक्तर विलसन, हे जेव्हां त्या देशांत गेले होते, तेव्हां त्यांस दाखविली. आणि रेवरेंड मोझेस मर्गोलियोथ यानेहि सन १८४८ सालांत दोनवेळ ही प्रत पाहिली; आणि जेव्हां त्याने त्याजवळ जी आतांची मोशेचे पांच पुस्तकांची प्रत होती, तिजसीं ती जोडून पाहिली तेव्हां त्यामध्यें त्यास फारसा भेद दिसून आला नाहीं. याच गृहस्थाने दम्मेसेक शहरांत ११२२ वर्षांपूर्वी लिहिलेली मोशेचे पांच पुस्तकांची प्रत, आणि सुमारें १३०० वर्षांपूर्वी लिहिलेली अवघ्या शास्त्राची प्रत पाहिली आहे.

येणेप्रमाणें ह्मणजे इस्राएलानीं मोशेचें शास्त्र आपणा जवळ आजपर्यंत मोठ्या काळजीने सांभाळलें आहे. आणि त्यामध्यें सांगितलेल्या इतिहाससंबंधी गोष्टींचे दाखले, ज्या ठिकाणीं त्या गोष्टी घडून आल्या त्या देशांत सांपडतात; आणि ख्रिस्ती लोक त्याच्या खरेपणाविषयीं साक्ष देतात; आणि त्याच्या प्राचीन भाषांतरांसीं व जुन्या प्रतींसीं मेळ मिळतो. या पांच प्रमाणांवरून हल्लीं जें शास्त्र इस्राएलांजवळ आहे तेंच मोशेला दिल्हेलें शास्त्र याविषयींचे सर्व संशय दूर होतात.

पाठशास्त्र.

अणखी या तत्वांत "मोशेस जें दिल्हेलें, तेंच सर्व नेमशास्त्र आह्माजवळ आहे" असें लिहिलें आहे. तर रिब्बी मोशे बार मेमोन, ज्याने हीं तत्वें नेमून ठेविलीं आहेत, त्याने या तत्वांत "सर्व नेमशास्त्र," अशा शब्दांची योजना केली आहे; याचें कारण हेंच कीं, जसें मोशेचें लेखी शास्त्र खरें आहे, तसें त्याचें पाठशास्त्रही खरें आहे. एथे पाठशास्त्र हें

* जसें इस्राएलांचें पवित्र स्थान येरूशालेम, तसें शोमरोनीम लोकांनी आलेक्सांडर बादशाहाची परवानगी घेऊन गेरीझीम डोंगरावर आपणाकरितां पवित्र स्थान केलें आहे.

नांव "मिशनी" आणि "गेमारा" अथवा "तालमुद" या ग्रंथास दिल्हें आहे. जे महत्वाचे ह्मणजे न्याय, नीति, अर्पणें, इत्यादिकांसंबंधी जे नियम, ते ईश्वरानें सांगितल्याप्रमाणें मोशेनें लेखी शास्त्रांत लिहिलेले आहेत. परंतु जे नियम सर्वांस प्रतिदिवशीं करावे लागतात, तेहि नियम ईश्वरानें मोशेस कळविले, ते त्या वेळीं सर्वांस माहीत व पाठ असावे. जसें अनुवाद अध्याय १२, ओवी २१ एथें मास खाण्याविषयीं जी आज्ञा दिल्ही आहे, त्यांत "मी तुला आज्ञा दिल्याप्रमाणें कापून खा" असें आहे. त्यावरून मेंढरें आणि गुरें कापण्याविषयीं ईश्वरानें कांहीं तरी आज्ञा दिल्ही असावी; आणि ती आज्ञा सर्वांस जाणणें अगत्य होतें, ह्मणून शास्त्रांत लिहिण्यापेक्षां सर्वांकडून पाठ करविली असावी. याचप्रमाणें लेवी अध्याय २३, ओवी ४० एथें "शोभायमान झाडाचें फल, खारकी झावळ्या, पालवट झाडाच्या फांद्या व नदीजवळचें वाळुंज घेऊन उत्सव करा," असें सांगितलें आहे. परंतु हे सर्व पदार्थ घेऊन त्यांचें काय करावें, अथवा ते घेऊन उत्सव कसा करावा हें स्पष्ट लिहिलेलें नाहीं. आणि त्याच अध्यायाची ओवी ४२ एथें सात दिवस मंडपांत राहावयास सांगितलें आहे. परंतु हा मंडप कसा असावा, त्यांत राहवें कसें, रात्रंदिवस किंवा दिवसाचें, पुरुषांनी मात्र, किंवा सर्व कुटुंबासहित? या विषयींचे व अशा दुसऱ्या गोष्टींविषयींचे नियम लेखी शास्त्रांत नाहींत; ह्मणून ते त्या वेळीं सर्वांस पाठ असावे असें अनुमान होतें. या गोष्टी सर्वांस वारंवार कराव्या लागत व त्या वेळीं सर्व इस्राएल एकत्र होते, ह्मणून त्यांच्या नियमांची माहिती वहिवाटीवरून व परिचयावरून पिढीपिढी पाठ राहिली असावी. परंतु दुसऱ्या मंदिराच्या नाशानंतर जेव्हां इस्राएल निरनिराळे देशांत विखरले, तेव्हां रिब्बी येहुदा हान्नासी यानें ते नियम विसरले न जावे म्हणून इसवी सन १४१ चे सुमारास "मिशना" हा ग्रंथ रचिला. मागाहून मिशनामधील नियम स्पष्ट समजत नाहींत, ह्मणून त्यावर "गेमारा" ही टीका झाली. मिशनासहित गेमारा असतो त्यास "तालमुद" असें ह्मणतात. हें तालमुद दोन प्रकारचें आहे. येरुशालेमेंतील रिब्बी योहानान यानें इसवी सन ४६९ च्या सुमारास रचिलेले तालमुदास "तालमुद येरुशालेमी" असें ह्मणतात. आणि रिब्बी

आशे याने रिब्बी आबीना याच्या सहायाने इसवी सन ५०४ चे सुमारास बाबिलांत जें तालमुद रचिलें त्यास "तालमुद बाबली" असें नांव आहे. हे मिशनांतील व गेमारांतील नियम पूर्वी पाठ होते, आणि मागाहून लिहिले गेले; ह्मणून त्यांस पाठशास्त्र असें नांव दिल्हें आहे; आणि त्यांतील नियम मोशेचे वेळेपासून सतत चालत आल्याकारणाने खरे असावेत. मिदराश, बेरायथा व तोसिफता हे ग्रंथहि पाठ शास्त्रांमध्यें गणिले जातात. यांतहि शास्त्रावर टीकाच केलेली आहे.

तालमुद बाबलीचे मोठाले बारा भाग छापलेले असतात; त्यांत एकंदर ५२० अध्यायांचीं ६३ पुस्तकें असतात. त्यास विद्येचा संग्रह अथवा सागरही ह्मटल्यास चिंता नाहीं; कारण त्यांत इस्राएली धर्माचें स्पष्टीकरण असून, अनेक विद्या व अनेक शास्त्रें यांतील विषय त्यांत सांपडतात. त्याची भाषा विशेषेंकरून कालदी अथवा तार्गूम असून अलंकारभरित आहे. जे शांतपणें त्याचा पूर्ण अभ्यास करितात, त्यांसच त्यांतील लाक्षणिक भाषा व दृष्टांत समजतात. परंतु सरासरी अभ्यास करणारे, त्यांतील गूढ विषय न समजल्यामुळें, त्यास दोष लावून ह्मणतात कीं, तें बहुतकरून खोटें व अविश्वसनीय आहे. उदाहरण:—गेमारा सोफरीम अध्याय १५ एथें मोशेचे शास्त्रास पाण्याची, मिशनास द्राक्षरसाची व तालमुदास सुगंधित द्राक्षरसाची उपमा दिल्ही आहे. ज्यास या अलंकाराचा अर्थ समजत नाहीं, ते इस्राएलांस असा दोष देतात कीं, ते ईश्वरदत्त शास्त्रास हलकें मानून हाखामीम लोकांचे लेख श्रेष्ठ मानितात. परंतु याचा खरा अर्थ पाहूं गेल्यास अगदींच तसा होत नाहीं. जसें पाणीं प्राणरक्षणासाठीं अति अगत्याचें आहे, तसेंच मोशेचें ईश्वरदत्त शास्त्र होय. त्याचा अभ्यास सर्वांनीं अगत्य केलाच पाहिजे. आणि ज्यास पाणीसुद्धां मिळत नाहीं त्यास द्राक्षरस कोठून मिळणार? आणि जरी मिळाला तरी केवळ द्राक्षरसापासून लाभ होण्याबद्दल हानि मात्र होईल. याप्रमाणें जे शास्त्राभ्यास न करतां मिशनाचा मात्र अभ्यास करितात, त्यांस तो मुळींच समजत नाहीं व ते त्याचा भलभलताच अर्थ करितात. याच प्रमाणें शास्त्राचा व मिशनाचा अभ्यास न केल्यास सुगंधित द्राक्षरससमान तालमुदाचा अभ्यास अशक्य आहे. यावरून

मिशना व तालमुद यांपेक्षां शास्त्र कनिष्ठ नव्हे, परंतु श्रेष्ठ असें सिद्ध होतें. तरी ज्यास या तिघांकडून लाभ होतात, तो फारच सुखी असें समजावें. त्याच गेमारांच्या त्याच अध्यायांत याच अर्थाप्रमाणें शास्त्रास मिठाची, मिशनास मिऱ्यांचीं व तामुदास सुगंधाची अशा दुसऱ्याहि उपमा दिल्ह्या आहेत.

गोष्ट.

पाठ शास्त्राच्या सत्यतेचें लहानसें प्रमाण.

हिलेल ह्यासी यास त्याच्या एका उद्धट शिष्यानें असा प्रश्न केला कीं, महाराज ईश्वरानें आपणास किती शास्त्रें दिल्हीं आहेत?

हिलेलनें उत्तर केलें, एक लेखी शास्त्र व एक पाठ शास्त्र, असीं दोन शास्त्रें ईश्वरानें आपणास दिल्हीं आहेत.

शिष्य—लेखी शास्त्रावर माझा विश्वास बसतो, परंतु पाठ शास्त्रावर माझ्यानें विश्वास ठेववत नाहीं.

तेव्हां हिलेल ज्याच्या अंगीं अशा अवघड प्रश्नाचीं उत्तरें देण्याचें मोठें चातुर्य होतें, तो त्यास ह्मणाला, “मुला अम्मळ थांब.” आणि एके पाटीवर इब्री मूळाक्षरें लिहून व त्यांतील पहिल्या अक्षराकडे बोट दाखवून तो ह्मणाला, मुला, हें अक्षर कोणतें?

शिष्य—आलेफ.

हिलेल—बरें; मग दुसऱ्या अक्षराकडे बोट दाखवून त्यास विचारिलें, हें अक्षर रे कोणतें?

शिष्य—बेथ.

हिलेल—पहिलें अक्षर आलेफ, आणि दुसरें अक्षर बेथ असा तुझा पूर्ण विश्वास आहे काय?

शिष्य—होय, महाराज.

हिलेल—बरें. परंतु तें अक्षर आलेफ व हें अक्षर बेथ हें तुला कशावरून कळलें?

शिष्य—माझ्या गुरुजी, तुह्मी व माझ्या पूर्वजांनीं सांगितल्यावरून.

हिल्लेल—बरें तर जसा तूं या गोष्टीवर विश्वास ठेवितोस, तसाच तुला पाठ शास्त्रावरहि विश्वास ठेविला पाहिजे; कारण तेंहि आपणास आपल्या गुरूंनी व पूर्वजांनीं पढविलें आहे.

पाठशास्त्राची लाक्षणिक भाषा.

गोष्ट.

नोव्हाचा द्राक्षमळा.

जलप्रलया नंतर नोव्हा द्राक्षमळा लावीत असतां सातान त्याजकडे येऊन ह्मणतो, महाराज, आपण काय लावितां?

नोव्हा—मी द्राक्षमळा लावीत आहें.

सातान—कशाकरितां तुह्मी हा मळा लावितां?

नोव्हा—त्याच्या फळाकरितां, कारण त्याचें फळ ताजें असतां व सुकल्यावरही गोडच असतें; आणि त्यापासून होणारा द्राक्षरस मनुष्याचे ह्रदयाला आनंदवितो.

सातान.—महाराज, मी आपल्या मदतीस येऊं काय?

नोव्हाने त्याचें ह्मणणे मान्य केलें, व ते दोघे त्या मळ्यांत काम करीत असतां, त्या दगेखोर सातानाने एक कोंकरा, एक सिंह, एक डुकर व एक वानर आणून त्यांस तेथें एका मागून एक असे कापिले व त्यांचें रक्त त्या सर्व मळ्यांत शिंपडलें.

तात्पर्य.

ही गोष्ट याप्रमाणेंच घडून आली असेल असें वाटत नाहीं; परंतु मनुष्य मद्य प्याल्या अगोदर कोंकरा सारिखा नम्र असतो. कांहींसें मद्यपान केल्यावर सिंहासारिखा तो उन्मत्त होऊन ह्मणूं लागतो कीं, जगांत मजसारिखा कोण आहे? अधिक प्याल्यावर तो डुकरासारिखा चिखलांत व मळांत लोळूं लागतो; व शेवटीं उड्या मारून माकडचेष्टा करूं लागतो, व तो काय करितो याची त्यास शुद्धिहि राहात नाहीं.

तत्व ९.

शास्त्राचा अपालटपणा.

לא יחליף האל ולא ימיר דתו לעולמים לזולתו׃

"देव आपल्या या नियमाशिवाय दुसरा लावून देण्याक-
रितां कधींहि तो पालटणार आणि बदलणार नाहीं."

אני מאמין באמונה שלמה שזאת התורה לא תהא מחלפת ולא תהא תורה אחרת מאת הבורא יתברך שמו׃

मी पूर्ण विश्वसाने असें मान्य करितों कीं, हें शास्त्र कधींच पालटणार नाहीं; आणि धन्य ज्याचें नाम असा जो उत्पन्न कर्ता, तो दुसरें शास्त्र कधींच देणार नाहीं.

ईश्वराने पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे व सृष्टींतील इतर पदार्थ यांस उत्पन्न करून, त्यांच्या उत्पत्तीच्या वेळीं जे नियम त्यांस लावून दिल्हे आहेत, ते नियम ते पदार्थ सतत पाळीत आहेत. जर अशा निर्जीव व निर्बुद्धि पदार्थांस लावून दिल्हेले नियम जर ईश्वर पालटीत नाहीं; तर सर्व प्राणिमात्रांपेक्षां व इतर पदार्थांपेक्षां श्रेष्ठ व बुद्धिमान, आणि ईश्वरास बुद्धिरूप नेत्रांनी ओळखणारा असा जो मनुष्य, ज्याचा आत्मा अमर असून, त्या आत्म्यास ईश्वराने दिल्हेल्या शास्त्रांतील नियम सांभाळल्यामुळें किंवा मोडल्यामुळें सर्वकाळचें सुख अथवा दुःख प्राप्त होणार, ते नियम ईश्वर कसे पालटील! सृष्टीला लावून दिल्हेले नियम सतत सारखे चालतात यावरून ईश्वराच्या अपार बुद्धीचा अचलपणा दिसून येतो. आणि जसा ईश्वर एकच आहे, तसें त्याचें वचनहि एकच आहे. जसा तो निर्विकार आहे, तसें त्याचें वचनहि निर्विकार आहे. आणि जसा तो सर्वकाळ स्थापित आहे, तसें त्याचें वचनहि सर्वकाळ स्थापित आहे. दावीद ह्मणतो, "हे देवा! तुझें वचन सर्वकाळासाठीं आकाशांत स्थिर केलेलें आहे." गीत ११९. ओवी ८९. याचप्रमाणें यशाया अध्याय ४०, ओवी ८ एथें ह्मटलें आहे कीं, आमचे देवाचें वचन सर्वकाळ टिकेल. हें ईश्वराचें वचन पवित्रशास्त्र आहे; तें त्याने स्वतां लावून दिल्हेलें आहे,

आणि मोशेने तें लिहून मात्र ठेविलें आहे. हें पवित्र शास्त्र ईश्वराचे तोंडचें व त्याच्या आज्ञेवरून लिहिलें गेलें आहे, ह्मणून तें कधींच पालटूं नये व कधींच पालटलें जाणार नाहीं. याप्रमाणें ईश्वराने मोशेसहि स्पष्ट सांगितलें आहे. निर्गम अध्याय १९, ओवी ९ एथें ईश्वर मोशेसही ह्मणतो कीं, "पहा, मी तुजकडे निबिड मेघांत येतों; मी तुजसीं बोलतांना लोकांनी ऐकावें, आणि त्यांनी तुजवर सर्व काळ विश्वास ठेवावा." आणि या शास्त्रांत मनुष्यास दैहिक व आत्मिक सुख मिळण्याच्या सर्व गोष्टी सांपडतात आणि त्यांतील विषय सर्व सत्य, यथार्थ व पवित्र असून, ज्याच्या अंगीं सर्व प्रकारें पूर्णता, सत्यता, यथार्थता व पवित्रता हे गुण आहेत, त्या ईश्वराने तें स्वतां दिल्हें आहे; यावरून तें शास्त्रहि पूर्ण, सत्य, यथार्थ व पवित्र आहे. दावीद जो सद्गीतें गाणारा राजा, तोहि १९ व्या गीतांत याचप्रमाणें ह्मणतो. आणि पूर्णता, सत्यता, यथार्थता, व पवित्रता हे सर्वोत्कृष्ट गुण आहेत; त्यांत कांहींच न्यूनता नाहीं; आणि त्यांपेक्षां श्रेष्ठ असे दुसरे कोणतेच गुण नाहींत. तर ज्यामध्यें हे सर्व गुण आहेत त्यापेक्षां श्रेष्ठ अथवा उत्तम असें दुसरें शास्त्र होणें हेंहि अगदीं अशक्य आहे. हें शास्त्र पालटून दुसरें दिल्हें जाणार नाहीं एवढेंच नाहीं; परंतु त्यांत कांहीं अधिक उणेंहि होऊं शकत नाहीं. याचेंहि उदाहरण सृष्टींतील पदार्थांमध्यें सांपडतें. तें असें कीं, सृष्टी उत्पन्न झाल्या दिवसापासून तिला व तिजमधील पदार्थांस जे नियम दिल्हे आहेत, त्यांजमध्यें कांहींच अधिक उणें झालेले नाहींत. मग शास्त्रांत सांगितलेल्या महत्वांच्या नियमांत अधिक उणें कोठून होणार? याविषयीं अनुवाद अध्याय १२, ओवी ३२ एथेंहि निक्षून सांगितलें आहे. तें असें:—"जी कांहीं आज्ञा मी तुह्मास लावून देतों, तीच तुह्मी संभाळून पाळा; तिला तूं अधिक करूं नको, आणि तिजमधून काढूं नको". याप्रमाणें जर ईश्वरानेच शास्त्रांतील नियमांमध्यें अधिक उणें करायास मना केलें आहे, तर तोच तें शास्त्र पालटून दुसरें शास्त्र लावून देईल, असी अगदींच कल्पना करवत नाहीं; आणि अशा गोष्टीस शास्त्राधारहि नाहीं.

असें असतां कित्येक असें मानितात कीं, मोशेचे हातून दिल्हेल्या शास्त्रांतील नियम रद्द होऊन दुसरे नियम दिल्हे जातील. आणि अशा वि-

श्वासाच्या आधाराकरितां, ते इर्मेया अध्याय ३१ ओवी ३१-३३ हीं वाक्यें दाखवितात. तीं वाक्यें येणेप्रमाणें:—"परमेश्वर म्हणतो, पाहा, मी इस्राएलाच्या वंशांसीं व यहुदाच्या वंशांसीं नवा करार करीन असे दिवस येतील; म्या त्यांच्या पूर्वजांस मिसर देशांतून बाहेर आणायासाठीं त्यांचा हात धरिला, तेव्हां जो म्या त्यांसीं करार केला त्यासारिखा नव्हे, तो माझा करार मी त्यांचा पति झालों असतांहि त्यांनी मोडला, असें परमेश्वर म्हणतो. परंतु परमेश्वर म्हणतो, त्या दिवसांनंतर जो करार मी इस्राएलाच्या वंशांसीं करीन तो हाच, मीं आपलें नेम शास्त्र त्यांच्या अंतर्यामांत ठेवीन व त्यांच्या हृदयांत तें लिहीन; आणि मी त्यांचा देव असत जाईन व ते माझे लोक असत जातील." खरोखर पाहिलें असतां या वाक्यांवरून ईश्वर नवें शास्त्र देईल असें तर नव्हे; परंतु तेंच मोशेचे हातून दिल्हेलें शास्त्र इस्राएलांमध्यें स्थापन होईल असें स्पष्ट दिसून येतें.

या वाक्यांत "मी इस्राएलांच्या वंशांसीं व येहुदाच्या वंशांसीं नवा करार करीन" असें लिहिलें आहे, यावरून ईश्वर नवें शास्त्र देणार असा अर्थ ते करितात. परंतु "करार" आणि "शास्त्र" या दोन शब्दांचा अर्थ अगदीं भिन्न आहे. करार म्हणजे दोन पक्षांमध्यें जो ठराव होतो तो. त्यांतून जर एका पक्षाकडून तो ठराव मोडला जातो, तर दुसऱ्या पक्षाकडूनहि तो राखला जात नाहीं. परंतु मनुष्यानें आपल्या उत्पन्न कर्त्यासीं, इतरांसीं व आपल्या स्वतांसीं कसें वर्तावें यासंबंधी जे नियम आहेत, त्यांस शास्त्र म्हणतात. असे या शब्दांचे अर्थ असतां, या सगळ्या वाक्यांचा अर्थ पाहूं गेल्यास निराळाच होतो. या वाक्यांत व याच प्रमाणें निर्गम अध्याय १९, ओवी ५ आणि अनुवाद अध्याय २६, ओवी १७,१८ एथें लिहिल्याप्रमाणें ईश्वरानें इस्राएलां बरोबर होरेबांत करार केला होता कीं, जर तुम्ही माझ्या शास्त्राप्रमाणें वर्ताल, तर मी तुमचा देव होईन. या कराराप्रमाणें इस्राएल वागले नाहींत, आणि ईश्वराच्या शास्त्रांतील आज्ञा त्यांनी पाळल्या नाहींत, म्हणून ईश्वरानेहि त्यांस सोडलें आहे. तरी त्यानें आपले प्रियकर आब्राहाम, इसहाक व याकोब यांस दिल्हेले वचना प्रमाणें व या इर्मेयांतील वाक्या प्रमाणें तो त्यांस सर्वकाळ अव्हेरणार नाहीं. तो पुन: त्यांजबरोबर करार करील, आणि या करारामध्यें "मी

आपलें नेम शास्त्र त्यांच्या अंतर्यामांत ठेवीन, व त्यांच्या हृदयांत तें लिहीन" असें म्हटल्या प्रमाणें ईश्वरच स्वतां त्यांस मोशेचे हातून दिल्हेले शास्त्रप्रमाणें वागण्यास सामर्थ्य देईल; आणि ते त्या आज्ञा मोठ्या निर्धारानें पाळितील; मग पुनः ते त्याचे लोक होतील; आणि पुनः तो त्यांचा अंगीकार करील. आणि जर याप्रमाणें ईश्वर पुढें आपलें शास्त्र इस्राएलांच्या अंतर्यामांत ठेवणार व त्यांच्या हृदयांत लिहिणार तर तें अद्याप रद्द झालें नाहीं व पुढें होणारहि नाहीं.

गोष्ट.

रिब्बी येहीया व राजा आलफान्सो.

पोर्टुगालचा राजा आलफान्सो हा रिब्बी येहीया याजबरोबर धर्मविषयावर वारंवार संवाद करीत असे. त्यानें एके दिवशीं रिब्बी येहीया यास असा प्रश्न केला कीं, तुमचें शास्त्र सर्व काळ चालेल, आणि ईश्वर तें रद्द करून दुसरें देणार नाहीं यास प्रमाण कोणतें?

रिब्बी येहीया—होय महाराज, यास अनेक प्रमाणें आहेत. परंतु आत्म्याच्या शांतीकरितां पहिलें किंवा दुसरें शास्त्र, किंवा दोनी हितकारक आहेत, हें आपणच पहिल्यानें सांगा. जर दुसरें शास्त्र आत्म्याच्या शांतीकरितां हितकारक असें आपण ह्मणतां, तर ईश्वरानें पूर्वींच्या लोकांस पहिलें शास्त्र देऊन त्यांसीं एवढा वांक केला असावा. आणि जर पहिलें ह्मणतां, तर मागच्या लोकांस दुसरें शास्त्र देऊन त्यानें त्यांसी वांक करण्याचें काय कारण असावें? जर दोन्ही ह्मणाल तर तसेंहि होऊं शकत नाहीं; कारण वादांत दोन्ही पक्ष खरे ठरवूं गेल्यास दोन्ही खोटे पडतात.

राजा.—माझ्या मतें दोन्हीं शास्त्रें खरीं आहेत, परंतु कालदेशप्रमाणें पहिल्यामध्यें फेरफार करून दुसरें द्यावें लागलें आहे. पाहा, तुमच्या शास्त्रांतील पेसा सण पाळण्याविषयीं, तफीलीन बांधण्याविषयीं, इत्यादिक आज्ञा, तुह्मां लोकांची मिसरांतून सुटका झाली या कारणावरून लावून दिल्या आहेत. परंतु मिसराशीं आमचा कांहींच संबंध

नाहीं; मग त्या आज्ञा आह्मी कां पाळाव्या? त्यांबद्दल आतां आह्मास दुसऱ्या लावून दिल्या आहेत.

रिब्बी येहीया.—महाराज, जर आपण असें ह्मणतां, तर सर्वच आज्ञा मिसराच्या कारणामुळें लावून दिल्हेल्या नाहींत. ज्या त्या कारणामुळें नाहींत त्यांप्रमाणें मग तुह्मी कां न आचरावें? अशावरून आमचें सर्वच शास्त्र आपण रद्द करितां हें कसें? अणखी पाहा, दैहिक उपचारांची व आत्मिक उपचारांची गोष्ट सारिखीच असावी. जसे दैहिक उपचार पालटत नाहीं, तसे आत्मिक उपचारहि पालटत नाहीं.

राजा.—मी तुमचें पहिलें कारण मान्य करितों, परंतु दुसरें माझ्यानें मान्य करवत नाहीं; कारण दैहिक उपचार सृष्टीच्या नेमा प्रमाणें चालतात, परंतु शास्त्र मानणें किंवा न मानणें हें इच्छेवर आहे.

रिब्बी येहीया.—महाराज, देह हा क्षणभंगुर असतां त्यावरील उपचार सृष्टीच्या नेमा प्रमाणें सतत चालतात, पालटत नाहींत; तर आत्मा जो अमर आहे त्यावरील उपचार कसे पालटतील? शास्त्र मानणें किंवा न मानणें हें इच्छेवर आहे ही गोष्ट तर खरीच; परंतु जें सत्य तेंच आपण मान्य करावें व असत्य वर्ज्य करावें असी इच्छा आपण मनीं धरिली पाहिजे, आणि याच कारणास्तव ईश्वरानें आपणास बुद्धि दिल्ही आहे. यापुढें या विषयावर भाषण करण्यास राजास सुचेनासें झालें, मग त्यानें दुसरा प्रश्न केला.

तत्व १०.

ईश्वराचा सर्वज्ञपणा.

צוֹפֶה וְיוֹדֵעַ סְתָרֵינוּ׃ מַבִּיט לְסוֹף דָּבָר בְּקַדְמוּתוֹ׃

"तो आमचीं सर्व गुह्यें पाहतो, व जाणतो;
सर्व गोष्टींचा शेवट तो पूर्वींच लक्षांत आणितो."

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה שֶׁהַבּוֹרֵא יִתְבָּרַךְ שְׁמוֹ יוֹדֵעַ כָּל מַעֲשֵׂה בְּנֵי אָדָם וְכָל מַחְשְׁבוֹתָם
שֶׁנֶּאֱמַר הַיּוֹצֵר יַחַד לִבָּם הַמֵּבִין אֶל כָּל מַעֲשֵׂיהֶם׃

"मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो

उत्पन्न कर्त्ता, तो मनुष्यपुत्रांचीं सर्व कृत्यें व विचार जाणतो; जसें ह्मटलें आहे कीं, तो त्यांचें हृदय एकसारिखें घडितो; त्यांचीं सर्व कामें ध्यानांत आणितो."

सृष्टींतील थोर व आश्चर्यकारक कृत्यांवरून ईश्वराचा सर्वसमर्थपणा स्पष्ट आहे; आणि ही सृष्टि त्याच्याच हस्तकर्माने भरली आहे; त्या सर्वांची व्यवस्था तोच राखितो, आणि तोच आपला अधिकार त्यांवर चालवितो; आणि हीं त्याचीं कृत्यें सर्वकाळ, सर्व ठिकाणीं घडून येतात, यावरून त्याचा सर्वव्यापकपणा सिद्ध होतो. याचप्रमाणें सृष्टींतील प्रत्येक पदार्थाचा प्रारंभ व शेवट तो जाणतो, आणि त्यास तो मोठ्या चातुर्याने उत्पन्न करून मोठ्या चातुर्याच्या नियमाने चालवितो, यावरून तो सर्वज्ञ आहे, ह्मणजे त्याचें ज्ञान अपार आहे असें स्पष्ट दिसून येतें. तो सर्वकाळ सर्व ठिकाणीं आहे, ह्मणून सर्वकाळ सर्व ठिकाणीं ज्या गोष्टी घडून येतात, त्या सर्व तो जाणतो; ह्मणजे त्यास भूत, वर्तमान व भविष्य हें सर्व कळतें. एकाद्या गोष्टीस आरंभ होण्यापूर्वींच तो त्याचा शेवट जाणतो; आणि ती गोष्ट घडल्या पूर्वींच तो तिजविषयीं सांगतो. त्यास प्रगट झालेल्या गोष्टी मात्र कळतात एवढेंच नाहीं; परंतु गुप्त गोष्टीहि त्यास कळतात. तो जगांतील सर्व गुह्यें आणि प्राणिमात्रांचीं गुप्त कर्मे जाणतो. सर्वांचीं अंतर्यामें पारखितो; मन व गुर्दकमळें निरखितो. त्यापुढें कांहींच झांकलें जात नाहीं; आणि त्याच्या दृष्टीपासून कांहींच लपलें जात नाहीं. डोळे नसतां तो पाहतो; कान नसतां तो ऐकतो. त्यापुढें काळोखांतहि कांहीं आच्छादिलें जात नाहीं; रात्र देखील दिवसासारिखी प्रकाशमय होती; त्यास जसा उजेड तसाच काळोख आहे. "त्या समोर नरक उघडा आहे; आणि नाशाशयावर कांहीं झाकण नाहीं." परंतु जरी ईश्वर सर्वव्यापक व सर्वज्ञ आहे, तरी तो मनुष्याच्या कामास आड येत नाहीं; त्याने त्यास बरें व वाईट जाणण्याची शक्ति दिल्ही आहे; आणि त्याच्या दिसण्यांत जें त्यास नीट दिसेल त्याप्रमाणें वर्तण्याची मोकळी-कहि त्यास दिल्ही आहे; ह्मणून ईश्वरभीतीने व सदाचरणाने वागणें हें मनुष्याच्या इच्छेवर आहे. याविषयीं सुज्ञजनांची इब्री भाषेंत असी एक ह्मण आहे कीं, "ईश्वरभीतिवांचून सर्व गोष्टी ईश्वराच्या स्वाधीन आहेत."

पाहिलें असतां सृष्टींत ईश्वरी सत्तेवांचून एक पानहि हालत नाहीं. ज्या सर्व गोष्टी मनुष्यास व इतर पदार्थांस घडून येतात, त्या सर्व त्याच्याच सत्तेनें घडतात: परंतु मनुष्याच्या सदाचरणावर, ह्मणजे ईश्वरी भीति राखून करण्याच्या आचरणावर, तो आपली सत्ता चालवीत नाहीं; कारण त्यानें आपल्या अपार दयेनें त्यास बरें व वाईट जाणण्याची शक्ति दिल्ही आहे. यासाठीं त्यानें जें चांगलें तेंच निवडावें, आणि जें वाईट तें वर्जावें. परंतु जे आपणास इस्राएल असें ह्मणवितात, त्यांनीं आपल्या वर्तणुकीविषयीं फारच सावध असलें पाहिजे. कारण ईश्वरानें त्यांस दुसऱ्यांसारिखी बरें व वाईट जाणण्याची शक्ति देऊन, स्वतां प्रगट होऊन त्यांस उत्तम नियमहि दिल्हे आहेत; त्यांत त्यानें त्यांस जें उत्तम व ज्याकडून जीवन प्राप्त होणार तेंच निवडायास सांगितलें आहे. जसें अनुवाद अध्याय ३०, ओवी १९ एथें लिहिलें आहे:—"मी आज तुह्मा विषयीं आकाश व पृथ्वी हे साक्षीदार करून घेतों; जीवन व मरण, आशीर्वाद व शाप तुज-पुढें ठेवितों, तर तूं जीवन निवडून घे."

सदाचरणाचीं साधनें.

मनुष्यास सदाचरणाच्या मार्गास लावणारीं साधनें मुख्यत्वें करून तीन आहेत. एक सदसद्विचार ह्मणजे बरें व वाईट जाणण्याची शक्ति; दुसरें, ईश्वराच्या सर्वव्यापकपणाचा व सर्वज्ञपणाचा आठव; आणि तिसरें, पवित्र शास्त्रांतील विवेक. यांतील पहिलीं दोन साधनें तर त्या-जवळ सतत असतात; तरी तो त्याजकडे दुर्लक्ष करून दुराचार करितो. या साधनांचा त्यास एवढा विसर पडतो कीं, ज्या मार्गानें तो वर्ततो तो मार्ग केवळ सरळच आहे, आणि जो सर्वव्यापक व सर्वज्ञ त्याची दृष्टि त्याच्या मार्गापर्यंत पोहोंचत नाहीं, असें त्यास वाटतें. दावीद अशा ज-नांस पशुशील आणि मूर्ख अशा संज्ञा देऊन, गीत ९४ ओवी ७–१० एथें निषेध करून म्हणतो कीं, (त्यांच्या मनांत) "परमेश्वर पाहाणार नाहीं आणि याकोबाचा देव मन लावणार नाहीं; परंतु पशुशील हो! समजा आणि मूर्खांनो! केव्हां तुम्ही बुद्धि पावाल? ज्यानें कान रचिले तो ऐकणार नाहीं काय? ज्यानें डोळा निर्मिला तो पाहणार नाहीं काय? जो राष्ट्रांस

शिक्षितो तो शासन करणार नाहीं काय? जो मनुष्यास ज्ञान शिकवितो तो जाणणार नाहीं काय.?"

याप्रमाणें जर आपल्या आचरणाकडे ईश्वराची दृष्टि सर्वकाळ आहे, तर आपण आपलें आचरण सर्वकाळ सरळ व यथार्थ राखलें पाहिजे, परंतु मनुष्याचा स्वभाव जन्मापासून पापी, आणि त्याचें मन पापाकडे वळणारें आहे; तरी त्यापासून दूर राहण्यास आपण संपूर्ण मनानें सतत प्रयत्न करून दावीदा प्रमाणें ईश्वरा कडून असें सहाय मागावें कीं, "असत्य मार्ग मजपासून दूर कर;" "आपला मार्ग मला दाखीव;" "तूं आपल्या आज्ञांच्या मार्गांत मला चालीव;" "जीवनाचा मार्ग मला कळीव." हें मागणें आपल्या मनापासून असल्यास, आणि पापाकडे न वळावें म्हणून मनापासून प्रयत्न केल्यास, तें खरोखर आपणापासून दूर होईल, आणि ईश्वराची कृपादृष्टि आपणावर होईल.

गोष्ट.

दुःख कळत असतां सुख.

एका मूर्त्तिपूजकानें रिब्बी येहोशूवास प्रश्न केला कीं, ईश्वर भूत, वर्तमान व भविष्य जाणतो असें तुम्हीं मानितां कीं नाहीं?

रिब्बी येहोशूवा—होय.

मूर्त्तिपूजक—तर, ईश्वर ह्मणाला कीं, "पृथ्वीवर जें कांहीं मी केलें आहे, तें सर्व पुसून टाकीन, कारण मी त्यांस उत्पन्न केलें याविषयीं मला अनुताप झाला आहे;" असें लिहिलें आहे हें कसें? मनुष्य भ्रष्ट होईल हें ईश्वरास पूर्वींच माहीत नव्हतें काय?

रिब्बी येहोशूवा—होय; परंतु जेव्हां तुला पुत्र झाला, तेव्हां तूं काय केलेंस?

मूर्त्तिपूजक—मीं मोठा आनंद केला.

रिब्बी येहोशूवा—तो मरेल हें तुला माहीत नव्हतें काय? मग तुला आनंद करण्याचें काय कारण?

मूर्त्तिपूजक—होय; परंतु आनंदाचे वेळीं पुढें होणाऱ्या गोष्टीविषयीं मी विचार केला नाहीं.

रिब्बी येहोशूवा—याच प्रमाणें ईश्वरानें केलें; मनुष्य पाप करील असें तो जाणत होता; परंतु त्याकडून त्याच्या उत्पत्तीच्या परोपकारी कामास कांहीं अडथळा झाला नाहीं.

तत्व ११.

कर्मफल.

גּוֹמֵל לְאִישׁ חָסִיד כְּמִפְעָלוֹ׃ נוֹתֵן לְרָשָׁע רַע כְּרִשְׁעָתוֹ׃

" तो धार्मिक मनुष्याची फेड त्याच्या कर्माप्रमाणें करितो:
आणि दुष्टास त्याच्या दुष्टाईप्रमाणें वेतन देतो, शासन करितो."

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה שֶׁהַבּוֹרֵא יִתְבָּרַךְ שְׁמוֹ גּוֹמֵל טוֹב לְשׁוֹמְרֵי מִצְוֹתָיו וּמַעֲנִישׁ לְעוֹבְרֵי מִצְוֹתָיו׃

"मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम असा जो उत्पन्न कर्त्ता, तो आपल्या आज्ञा पाळणारांस चांगलें प्रतिफळ देतो, आणि आपल्या आज्ञाभंग करणारांस शासन करितो."

ईश्वर न्यायी आहे; तो स्वतां न्यायाने वर्ततो, आणि सर्वांचा न्याय खऱ्या रीतीने करून प्रत्येकास त्याच्या कर्माप्रमाणें योग्य वेतन देतो. मानवी राजापुढें जर अपराधी मनुष्य आला, तर तो राजा त्यास योग्य शिक्षा करितो; आणि एकादें मोठें व चांगलें कृत्य करणारास योग्य देणगी देतो. असें न केल्यास त्या राजाच्या न्यायत्वास बाध येतो. परंतु जो आकाश व पृथ्वीचा स्वामी व सर्व सृष्टीवर राज्य करणारा व जो पवित्र व धन्य असा जो राजांचा राजा, त्याच्या न्यायत्वास कधींच बाध येणार नाहीं. तो आपल्या सर्व मार्गांत यथार्थ, आणि आपल्या सर्व कामांत प्रामाणिक आहे. त्यापुढें सर्व मानवी प्राण्यांस आपल्या कर्मांचा हिशोब द्यावा लागेल; आणि तो आपल्या न्यायत्वाच्या गुणाप्रमाणें प्रत्येकास योग्य वेतन देईल. हा हिशोब या जन्मानंतर जेव्हां मनुष्याचा आत्मा त्याच्या उत्पन्नकर्त्याकडे

परत जाईल तेव्हां द्यावा लागेल. याविषयीं शलोमो उपदेशक अध्याय १२, ओवी १४ एथें असें म्हणतो कीं "प्रत्येक कर्म, प्रत्येक गुप्त गोष्टी सुद्धां, बरें असो वाईट असो, देव न्यायांत आणील." आणि यशाया अध्याय ३, ओवी १०, ११ एथें असें लिहिलें आहे कीं, "न्यायीविषयीं म्हणा कीं बरें होईल, कारण ते आपले कर्मांचें फल भोगितील; दुष्टाला हाय हाय, त्याचें वाईट होईल, कारण तो आपल्या हाताच्या कामाचें फल भोगील. बहुधा मनुष्यास त्याच्या कर्माचें वेतन याच जगीं प्राप्त होतें; याविषयीं प्रत्यक्ष प्रमाणें असून, शास्त्रांत नीति अध्याय ११, ओवी ३१ एथेंहि लिहिलें आहे; तें असेंः—"पृथ्वींत न्यायीला कर्मफल प्राप्त होईल; दुष्ट व पातकी यांस तर निश्चयें." परंतु कधीं कधीं न्यायी दुःख भोगितां व दुष्ट सुख भोगितां अढळतात; यावरून ईश्वराच्या न्यायत्वाचा संशय येतो. हा संशय दावीद राजा जो ईश्वराचा मोठा भक्त होता, त्यासहि आला, असें गीत ७३ यांत लिहिलेलें सांपडतें. परंतु त्याचा संशय दूर करण्या करितां ईश्वरानें त्यास दुष्टांचा परिणाम लागलाच दाखविला.

जर ईश्वर आपल्या न्यायत्वाप्रमाणें खास रीतीनें न्याय करील, तर मनुष्याचा अगदींच निभाव लागणार नाहीं. तो जन्मापासून पापी असल्या कारणानें शिक्षेस पात्र आहे, आणि सर्वस्वी त्याचा नाश होईल. परंतु ईश्वराची दया अपार आहे. जे त्याच्या दयेचा आश्रय धरितात, त्यांस क्षमा साध्य होऊन त्यांची सुटका होते. कारण ईश्वर जगाच्या नाशाची आवड करीत नाहीं; आणि दुष्टाच्या मरणानें संतोषत नाहीं. शास्त्रांतहि याप्रमाणें ईश्वरी वचन आहे; तें असेंः—"प्रभु परमेश्वर ह्मणतो, दुष्टाच्या मरणाविषयीं मी कांहीं संतोषतों काय? त्यानें आपला मार्ग सोडून वांचावें, याविषयीं मी, संतोषतों कीं नाहीं?" येहेजकेल अध्याय १८, ओवी २३. "आणखी असें त्यांस सांग, प्रभु परमेश्वर ह्मणतो, मी जीवंत आहें, निश्चयें मी दुष्टाच्या मरणाविषयीं संतोषत नाहीं, परंतु दुष्ट आपल्या मार्गापासून फिरला व वांचला तर संतोषतों; अहो इस्राएलाच्या वंशांनो! फिरा, आपल्या कुमार्गापासून फिरा; तुह्मी कां मरतां?" येहेजकेल अध्याय ३३, ओवी ११. परंतु जरी मनुष्य सर्व प्रकारें दोषी आहे, आणि त्यामुळें शिक्षेस पात्र आहे, आणि निर्दोष असा कोणीच नाहीं;

तरी त्यास निराश होण्याचें कारण नाहीं. ईश्वरानें आपल्या अपार दयेनें क्षमासाधन होण्याचा उपाय त्यास दाखवून दिल्हाच आहे. हा उपाय पश्चात्ताप. जे खरोखर पश्चात्ताप करून आपल्या पापाची ईश्वराजवळ क्षमा मागतात, त्यांचीं पापें तो क्षमा करून त्यांच्या दंडापासून त्यांस मुक्त करितो; कारण तो न्यायी असून दयाळू व सर्वसमर्थ आहे.

पश्चात्ताप कसा करावा?

पश्चात्ताप करणारास मुख्यत्वेंकरून चार गोष्टींकडे अगत्य लक्ष दिल्हें पाहिजे. त्यांतील पहिली गोष्ट ही कीं, आपण पापी आहों असी त्याची खात्री झाली पाहिजे; दुसरी, त्यानें आपलीं पापें ईश्वरापुढें कबूल केलीं पाहिजेत; तिसरी, पापें करून आपण ईश्वराची आज्ञा मोडली याविषयीं मनोभावें दुःख मानिलें पाहिजे; आणि चौथी, त्यानें आपले कुमार्ग सोडून सुमार्गानें वर्तलें पाहिजे. आणि पश्चात्ताप करणें तो, आपले हातून पाप घडतांच, आणि तें आपले हातून घडलें असें आपल्या मनास वाटतांच केला पाहिजे. याविषयीं रिब्बी येलीएझेर ह्मणतो कीं, "मरणापूर्वीं एक दिवस पश्चात्ताप कर." यावरून कित्येक असें अनुमान करितील कीं, आपल्या हातून घडलेले पापांचा पश्चात्ताप लागलाच करणें नको. परंतु असें अनुमान करण्यापूर्वीं त्यांनी असा विचार करावा कीं, आयुष्याचा अगदीं भरंवसा नाहीं, कारण तें क्षणभंगुर आहे. मृत्यु केव्हां गांठील हें सांगवत नाहीं; कारण तो जसा वृद्धांस तसाच तरुणांस व लहान बाळांसहि आपले फांसांत आणितो. यासाठीं आपले हातून पाप घडतांच नित्य पश्चात्ताप केला पाहिजे. रिब्बी हिल्लेल याचेंहि ह्मणणें असेंच आहे; तो ह्मणतो, "मला अवकाश सांपडेल, तेव्हां मी पश्चात्ताप करीन असें ह्मणूं नको; कदाचित् तुला कधींच अवकाश सांपडणार नाहीं."

सारांश ईश्वर सर्वज्ञ आहे, तो मनुष्याचे सर्व विचार व कर्मे जाणतो, आणि त्यापुढें मनुष्यास आपल्या सर्व कर्मांचा हिशोब द्यावा लागेल; आणि त्याप्रमाणें त्यास यथायोग्य वेतन मिळेल; ह्मणून मनुष्यानें सदाचरणानें वर्तावें, आणि त्याच्या हातून घडलेले पापाविषयीं दुःख मानून

आपलें आचरण सुधारावें; कारण," पश्चात्ताप आणि सत्कर्मे या शासना पुढें केवळ ढालीच आहेत.

गोष्ट.

आंधळा व पांगळा.

एका दिवशीं आन्तोनैनस नांवाचा मनुष्य, रिब्बी येहुदा बरोबर संभाषण करीत असतां त्यानें त्यास असें विचारिलें कीं, पुढील जगीं जेव्हां मनुष्य सर्वसमर्थ जो उत्पन्न कर्त्ता याजपुढें न्यायांत उभा राहील, तेव्हां "पाप देहाकडून घडलें, मी देहापासून अगदीं निराळा आहें, पापें मजकडून घडलीं नाहींत," असें आत्म्यास आपल्या दुराचरणाचें निमित्त सांगतां येणार नाहीं काय? रिब्बी येहुदा ह्मणाला, याजविषयीं मी तुला एक दृष्टांत सांगतों ऐक :—एका राजानें एक अंजिराचा बाग लाविला होता, व तो त्या राजास अति प्रिय होता. अंजीर चोरीस न जावे ह्मणून त्यानें त्या बागेंत दोन पाहारेकरी ठेविले होते; आणि त्यांनींहि तीं फळें खाऊं नये, ह्मणून पाहारेकऱ्याचे कामाकरितां एक आंधळा व दुसरा पांगळा असेच ते मनुष्य नेमिले होते. एके दिवशीं ते दोघे पाहारेकरी बागेंत असतां पांगळा आपल्या मित्रास ह्मणाला, गड्या, हे अंजीर किती सुंदर दिसतात, ते फारच गोड असावे, आणि, माझें मन त्यांजवर गेलें आहे; मला त्या झाडाखालीं घेऊन चल, ह्मणजे मी त्यावरून कांहीं तोडीन आणि आपण दोघे खाऊं. त्या आंधळ्यानें त्या पांगळ्यास आपल्या खांद्यावर घेऊन त्या झाडाखालीं नेलें; व त्या पांगळ्यानें त्या झाडावरील कांहीं फळें तोडिलीं तीं त्या उभयतांनीं खाल्लीं. जेव्हां राजा बागेंत आला तेव्हां कांहीं अंजीर चोरीस गेले असें त्याच्या लक्षांत आलें; ह्मणून ते काय झाले याजविषयीं त्यानें त्या पाहारेकऱ्यांजवळ चौकशी केली. तेव्हां आंधळा ह्मणाला, मला माहीत नाहीं, मीं आंधळा आहें, मला ते दिसत सुद्धां नाहींत, मग मी ते कसे चोरीन? पांगळा ह्मणाला, माझ्यानें त्यांजवळ चालून जाववत नाहीं; मीही ते चोरिले नाहींत. परंतु तो राजा शाहाणा होता म्हणून त्यांचें कृत्रिम त्यास लाग-

लेंच कळून आलें ; तो म्हणाला कीं आंधळ्यानें पांगळ्यास उचलून नेलें व आंधळ्यानें तीं तोडिलीं. असे ते दोघेहि या कामांत सामील असल्या कारणानें त्या उभयतांस त्यानें शिक्षा केली.

याचसारिखी आपली गति आहे. हें जग अनाद्यंत देवाचा बाग आहे; त्यानें तो सांभाळण्यास, त्यांतील जमीन राबण्यास व तिचें उत्पन्न रक्षिण्यासाठीं आपणास त्याजमध्यें ठेविलें आहे. परंतु आत्मा व देह मिळून मनुष्य आहे, या दोहोंपैकीं जर एकानें ह्मणजे देहानें देवाची आज्ञा उल्लंघिली तर दुसऱ्यानें ह्मणजे आत्म्यानेंहि उल्लंघिली असें होतें. मी केलेल्या पापाचा दोष ज्या देहासीं मी जडलेला आहें त्याजकडे आहे, असें आत्म्याच्यानें मरणानंतर ह्मणवणार नाहीं. याकरितां जसें त्या बागेच्या धन्यानें केलें तसें ईश्वर आपणासीं करील.

तत्व १२.

माशीयाह.

יִשְׁלַח לְקֵץ יָמִים מְשִׁיחֵנוּ׃ לִפְדּוֹת מְחַכֵּי קֵץ יְשׁוּעָתוֹ׃

“त्याच्या तारणाच्या वेळेची वाट पाहाणारांस खंडून घेण्या करितां शेवटल्या दिवशीं तो आमच्या माशीयाहास पाठवील.”

אֲנִי מַאֲמִין בֶּאֱמוּנָה שְׁלֵמָה בְּבִיאַת הַמָּשִׁיחַ וְאַף עַל פִּי שֶׁיִּתְמַהְמֵהַּ עִם כָּל זֶה אֲחַכֶּה לּוֹ בְּכָל יוֹם שֶׁיָּבֹא׃

“मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, माशीयाह येईल; आणि जरी त्याच्या येण्यास एवढा विलंब झाला आहे, तरी त्याच्या येण्याची मी प्रतिदिवशीं वाट पाहीन.”

हल्लींच्या दिवसांत या तत्वांतील विषय महान अगत्याचा आहे व त्याकडे इस्राएलांनी विशेष लक्ष दिल्हें पाहिजे. आणि हें तत्व पूर्ण विश्वासानें मान्य करण्याच्या अगोदर त्यांत म्हटलेला माशीयाह कोण? हा केव्हां येणार? तो येणार तेव्हां कोणतीं चिन्हें होणार? तो खरा माशीयाह हें कोणत्या गोष्टींवरून जाणावें? आणि तो येऊन काय करणार? या पांच गोष्टींविषयीं पूर्ण विचार केला पाहिजे.

इस्राएल लोकांच्या मताप्रमाणें, माशीयाह हें नांव पुढें इस्राएलांमध्यें होणाऱ्या महापुरुषास दिल्हें आहे; आणि पवित्र शास्त्रांत त्याच्या येण्याविषयीं अनेक भविष्यें आहेत. परंतु जीं भविष्यें खरोखर त्याजविषयीं आहेत, त्यांमध्यें त्यास माशीयाह हें नांव कोठेंच दिल्हेलें सांपडत नाहीं; परंतु "तारा" "कोंब" "डाहाळी" "राजा" "दावीद" असीं निरनिराळीं नांवें आढळतात. गीत २, ओवी २ आणि दानीएल अध्याय ९, ओवी २६ या दोन वाक्यांत माशीयाह हें नांव सांपडतें; आणि कित्येक या वाक्यांचा अर्थ करितांना तें नांव त्या महापुरुषास लावितात. परंतु इस्राएल लोकांच्या मताप्रमाणें त्या वाक्यांतील तें नांव त्या महापुरुषास दिल्हेलें नाहीं. पहिल्या वाक्यांत हें नांव दावीदास; आणि दुसऱ्या वाक्यांत तें मुख्य याजकास दिल्हेलें आहे. शास्त्रामागून झालेल्या ग्रंथांत मात्र त्या महापुरुषास माशीयाह हें नांव दिल्हेलें आहे. माशीयाहाविषयीं अनेक मतें आहेत. कोणी ह्मणतात कीं, तो देवाचा अवतार झाला व होणार. कोणी म्हणतात कीं, तो इस्राएलांत कोणी बलाढ्य पुरुष उत्पन्न होऊन इस्राएलांस पीडणारांला कठोर शिक्षा लावणार. कोणाचें मत असें आहे कीं, माशीयाह हा कोणी मनुष्य नव्हे, परंतु सर्व राष्ट्रें ज्या वेळीं सुखानें नांदतील, त्या वेळची कल्पना मात्र आहे. परंतु इस्राएली धर्माच्या मताप्रमाणें माशीयाह हा खरोखर दावीदाच्या राजकीय कुळांत एक महापुरुष जन्मेल, आणि त्याच्या अंगीं ईश्वराकडून मोठें सामर्थ्य येईल.

माशीयाहाच्या येण्याची वेळ व त्या वेळचीं चिन्हें.

या महापुरुष्याच्या जन्माचा वेळ शास्त्रांत स्पष्ट सांगितलेला नाहीं; ह्मणून तो कोणासच माहीत नाहीं. हा वेळ ईश्वरासच माहीत आहे; जसें जखार्या अध्याय १४, ओवी ७ एथें लिहिलें आहे कीं, "आणि दिवस एकच होईल, तो दिवस नाहीं, रात्र नाहीं असा परमेश्वरास विदित होईल; आणि असें होईल कीं संध्याकाळीं प्रकाश होईल." या वेळेविषयीं दानिएलनेहि कांहीं लिहिलें आहे; परंतु तें इतकें गूढ आहे कीं, कोणासच त्याचा अर्थ समजत नाहीं. त्यावरून एवढेंच मात्र दिसून येतें कीं, त्याचें येणें शेवटले दिवसांत होणार.

माशीयाहाच्या येण्यापूर्वीं व त्याच्या वेळीं अनेक चिन्हें होणार; त्यांतील मुख्य तीं येणेंप्रमाणें:—मलाखी अध्याय ३, ओवी २३ एथें लिहिल्याप्रमाणें, त्याचें येणें प्रगट करण्याकरितां, त्यापूर्वीं एलीया भविष्यवादी येईल, तें वाक्य असें, "पाहा, परमेश्वराचा मोठा आणि भयंकर दिवस येईल, त्यापूर्वीं मी तुह्माकडे एलीया भविष्यवादी पाठवीन." दुसरें चिन्ह असें कीं, त्याच्या येण्यापूर्वीं येहेजकेल अध्याय ३९ आणि ४० एथें लिहिल्या प्रमाणें गोग मागोगचें तुंबळ युद्ध होईल. "सर्व भाषांच्या राष्ट्रांचे दाहा मनुष्य यहुदी मनुष्यांचा पदर धरितील, आणि ह्मणतील, आह्मी तुह्मा संगतीं जाऊं, कारण देव तुह्मापासीं आहे असें आह्मी ऐकिलें आहे." जखार्या अध्याय ८, ओवी २३. "आणि जसें पाणी समुद्राला व्यापितें तसी पृथ्वी परमेश्वराच्या ज्ञानानें भरेल." यशाया अध्याय ११, ओवी ९. मग "जे कोरींव मूर्तींवर भाव ठेवितात ते मागें फिरतील व फार लज्जित होतील; तुह्मी आमचे देव असें जे ओतींव मूर्तींला ह्मणतात तेहि." यशाया अध्याय ४२, ओवी १७. शेवटीं "मूर्त्ति अगदीं नाहींशा होतील." यशाया अध्याय २, ओवी १८. आणि "परमेश्वरापुढें प्रत्येक गुडघा टेकील आणि प्रत्येक जीभ शपथ वाहील." यशाया अध्याय ४५, ओवी २४. मग "परमेश्वर सर्व पृथ्वीचा राजा होईल; त्या समयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नांव एकच." जखार्या अध्याय १४ ओवी ९. आणि खनान देश त्याच्या वंशाप्रमाणें पुनः वांटला जाईल, येहेजकेल अध्याय ४७, त्यामधील ईश्वराचें पवित्र मंदिर पुनः बांधलें जाईल, येहेजकेल अध्याय ४०—४५; आणि ईश्वर त्या मंदिरीं पूर्वीप्रमाणें वास करूं लागेल, येहेजकेल अध्याय ३७, ओवी २६–२८ आणि योएल अध्याय ३, ओवी २७.

माशीयाहाचीं कृत्यें.

माशीयाहावर ईश्वरी कृपा असल्याकारणानें तो अद्भुत कृत्यें करील; त्यांतील त्याचीं मुख्य कामें तीं हीं; "तो राष्ट्रांसाठीं झेंडा उभारील, आणि इस्राएलांच्या पाडावांस एकत्र मिळवील, आणि पृथ्वीच्या चोहों दिशांपासून यहुदाच्या पांगलेल्यांस (त्यांच्या देशांत) एकवटील." यशाया अध्याय

११, ओवी १२. आणि तो सर्व जगावर ईश्वराचें राज्य स्थापन करील, व तें सर्वकाळ चालेल. जसें दानीएल अध्याय ७, ओवी १३, १४ एथें लिहिलें आहे, "मी रात्रींच्या दृष्टांतांत पाहात होतों; आणि पाहा, मनुष्याच्या पुत्रासारिखा एक आकाशाचे मेघासहित येत होता, आणि दिवसांच्या पुरातनाकडे पोंचला, आणि कित्येकांनीं त्याला त्यासमोर जवळ आणिलें. आणि त्याला प्रभुत्व व राज्य व वैभव दिल्हें; आणि सर्व लोक, जाति व भाषा हीं त्याची सेवा करितीं झालीं. त्याचें प्रभुत्व सनातन आहे, तें ढळायाचें नाहीं, आणि तें क्षीण व्हावयाचें नाहीं, असें त्याचें राज्य आहे." आणि तो दावीदाच्या कुळांत जन्मून, व दावीदाचे नामानें ह्मटला जाऊन, त्याचे लोक इस्राएल यांमध्यें तो ईश्वराचें राज्य स्थापन करणार, ह्मणून इर्मेया अध्याय ३, ओवी १७ एथें लिहिल्याप्रमाणें हल्लीं ओसाड पडलेली येरूशालेम, ही राजधानी होईल. आणि ईश्वर-कृपेनें तो स्वतां प्रामाणिक, परोपकारी, ज्ञानी व समर्थ असून "तो प्रामाणिकपणें दुर्बलांचा न्याय करील, पृथ्वींतल्या दरिद्र्यांसाठीं यथार्थता ठरवील, आणि तो आपल्या मुखाच्या काठीनें पृथ्वीला हाणील, आणि आपल्या ओंठाच्या श्वासानें दुष्टाला मारील; आणि न्याय त्याचा कंबरकसा आणि विश्वासूपण त्याचें कटीवेष्टन होईल." यावरून सर्व लोक आनंदानें व सुखानें नांदतील, आणि पृथ्वींत वादविवाद व लढाई यांचें नांवहि राहाणार नाहीं. (सर्व लोक) "आपल्या तरवारी मोडून फाळ करितील आणि आपल्या भाल्यांचीं पातीं मोडून कोयत्या करितील; राष्ट्र राष्ट्रावर तरवार उचलणार नाहीं; लोक फिरून लढाई शिकणार नाहींत." यशाया अध्याय २, ओवी ४. ही जगांतील मोठी शांतता व हा महासुखाचा व आनंदाचा वेळ यशाया भविष्यवाद्यानें लाक्षणिक भाषणाच्या रूपानें फार सुंदर रीतीनें दर्शविला आहे. तो ह्मणतो, "लांडगा कोंकरापासीं राहील, बकऱ्यापासीं चित्ता बसेल, वासरूं व सिंह व पुष्ट पशु एकत्र बसतील, आणि धाकटा पोर त्यांस नेईल. कालवड व अस्वल एकत्र चरतील, त्यांचीं वांसरें एकत्र निजतील, आणि सिंह बैलासारिखें गवत खाईल, तान्हें बाळक नागाच्या बिळावर खेळेल, आणि थान सुटलेलें पोर सापाच्या गुहेवर आपला हात ठेवील." यशाया अध्याय ११, ओवी ६–८

या परम सुखाच्या समयीं सर्व पृथ्वीवर शांतता होऊन सर्व लोक, एकच जो परमेश्वर त्यासच मात्र भजूं लागतील; आणि ईश्वरानें आपल्या परम दयेनें मनुष्याच्या कल्याणा करितां मोशेचे हातून इस्राएल लोकांच्या स्वाधीन जें शास्त्र केलें आहे, त्यांत लिहिलेला भक्तीचा मार्ग, म्हणजे अर्पणें इत्यादिक, मलाखी अध्याय ३, ओवी ३ प्रमाणें पुनः चालू होऊन, सर्व लोक त्या शास्त्रांतील नियम व विधि पाळूं लागतील. तसेंच यशाया अध्याय ६६, ओवी २३ प्रमाणें सर्व लोक शाब्बाथ पाळितील; आणि जखार्या अध्याय १४, ओवी १६ प्रमाणें मंडपाचा सण पाळितील.

इस्राएलांची निराशा.

आतां येरूशालेमेचा व त्यांतील पवित्र मंदिराचा नाश होऊन अठराशें वर्षें होऊन गेलीं; तरी माशीयाहाचे येण्याचीं चिन्हें कांहींच दिसत नाहींत, यावरून तो येऊन गेला असावा, अथवा तो आतां मुळींच येणार नाहीं असे तर्क निघतात. परंतु "दृष्टांत अजून नेमलेले समया पर्यंत आहे, परंतु तो शेवटीं प्रत्ययास येईल, फसविणार नाहीं; त्यानें विलंब केला तरी त्याची वाट पाहा, कांकीं तो येईलच, तो उशीर करणार नाहीं;" या हबकूक अध्याय २, ओवी ३ एथें लिहिलेले वाक्याप्रमाणें त्याच्या येण्याची वाट पाहावी लागेल; आणि "मनुष्यपुत्रा, हीं हाडें इस्राएलाचे सर्व वंश आहेत, पाहा, ते म्हणतात कीं, आमचीं हाडें सुकलेलीं आहेत, आणि आमची आशा बुडाली आहे, आम्ही आपण नाहींसे झालों आहों;" येहेजकेल अध्याय ३७, ओवी ११ एथें लिहिलेले वाक्याप्रमाणें शेवटीं निराशाहि होईल, असीं भविष्यवचनें पवित्र शास्त्रांत पूर्वींच कथलेलीं आहेत. आणि त्याची वाट पाहावी लागेल आणि शेवटीं त्याविषयीं निराशाहि होईल, हीं व दुसरीं अनेक भविष्यें जर आपल्या प्रत्ययास येतात; तर तो येण्याविषयीं जें भविष्य आहे तेंहि पूर्ण झाल्यावांचून राहणार नाहीं.

माशीयाहाचे येण्यास इस्राएलांकडून अडथळा.

माशीयाहाचें येणें एवढें लांबविलें, याचें कारण आपण इस्राएलच आहों. जरी त्याच्या येण्याचा वेळ स्पष्ट सांगितलेला नाहीं. तरी अनुवाद

अध्याय ३०, ओवी २, ३ एथें मोशे असें ह्मणतो कीं, "मी आज तुला आज्ञापितों त्या अवघ्याप्रमाणें तूं आपल्या लेंकरांसुद्धां, आपल्या सर्व अंतःकरणानें व आपल्या सर्व जिवानें आपला देव परमेश्वर याकडे फिरसील, आणि त्याची गोष्ट ऐकसील; तर तुझा देव परमेश्वर, तुझ्या धरून नेलेल्यांस फिरवील, आणि तुजवर ममता करील; आणि ज्या लोकांमध्यें तुझा देव परमेश्वर यानें तुझी दाणादाण केली आहे, त्या सर्वांतून (त्या माशीयाहाच्या हातून, कारण तें त्याचें एक मुख्य काम आहे,) तुला फिरून गोळा करील." या वाक्यांवरून उघड दिसून येतें कीं, जेव्हां आपण इस्राएल ईश्वराकडे फिरूं, आणि त्याच्या आज्ञाप्रमाणें वर्तूं, तेव्हां ईश्वर आपणावर दया करील, आणि माशीयाहास पाठवून, पृथ्वीच्या चौहों कोनीं विखरलेले इस्राएल लोकांस एकवट करून, त्यांस त्यांच्या देशांत परत नेईल. तर जसजसे इस्राएल लोक आपलें नीतिसंबंधी व धर्मसंबंधी आचरण सुधारितील, तसतसा माशीयाहाच्या येण्याचा वेळ जवळ येत जाईल. इस्राएलांचें नीतिसंबंधी व धर्मसंबंधी आचरण ईश्वरेच्छेप्रमाणें नसल्याकारणानेच माशीयाहाचें येणें लांबविलें आहे असें खचित मानिलें पाहिजे.

ईश्वरी वचन पूर्ण झालेंच पाहिजे.

यशाया अध्याय ६०, ओवी २२ एथें ईश्वर असें ह्मणतो कीं, हें स्वसमयीं लवकरच घडे असें मी करीन. असें ईश्वरी वचन असतां हा वेळ एवढा कां लांबविला आहे? या प्रश्नाचें उत्तर याच वाक्यांत मिळतें; तें असें कीं, इस्राएलांच्या अंगीं योग्यता असल्यास लवकर घडे असें करीन; परंतु योग्यता नसल्यास स्वसमयीं, ह्मणजे ही गोष्ट घडण्याचा जो वेळ ईश्वराकडून नेमिलेला असेल त्या वेळीं घडे असें करीन." गेमारा सान हेद्रीममध्यें याविषयीं असें आहे कीं, "इस्राएलांतून गर्विष्ठ नाहींसे होत पर्यंत दावीदाचा पुत्र येणार नाहीं;" "यथार्थतेनेच मात्र येरूशालेम मुक्त केली जाईल;" आणि "जर इस्राएल पश्चात्ताप करतील तर ते मुक्त होतील, नाहीं तर ते मुक्त होणार नाहींत." परंतु इस्राएलांनी पश्चात्ताप न केला, आणि आपलें आचरण न सुधारिलें, आणि दुराचारांतच राहिले, तर ईश्वर माशीयाहास पाठविणार नाहीं,

असें यावरून समजूं नये; कारण ईश्वरी वचन पूर्ण झाल्यावांचून राहणार नाहीं. मग ईश्वर, जो वेळ त्यासच माहीत आहे त्या वेळीं आपल्या नामाकरितां ही दया करील. हें वचन येहेजकेल अध्याय ३६, ओवी २२ एथें, आहे; तें असें:—"प्रभु परमेश्वर ह्मणतो कीं, अहो इस्राएलाच्या वंशानो, तुह्मांकरितां नव्हे; परंतु जें माझें पवित्र नाम तुह्मी जेथें गेलां तेथें राष्ट्रांमध्यें अप्रतिष्ठित केलें आहे, त्याजकारितां मी असें करीन;" ह्मणजे मी तुह्मास एकवटीन व तुह्मास तुमचे भूमीवर आणीन, आणि तुह्मी माझे लोक व्हाल. परंतु यापेक्षां आपण आपल्या सदाचरणानें ईश्वरी कृपेस योग्य होऊन तो परम सुखाचा वेळ लवकर येई असें करावें व त्याची प्रतीक्षा करावी. माशीयाहाच्या येण्याविषयीं ईश्वरानें जें वचन दिल्हें आहे तें पूर्ण झाल्याविना राहणार नाहीं. "देव मनुष्य नव्हे कीं तो लबाडी करील; तो आदामाचा पुत्र नव्हे कीं तो अनुतापेल. तो वचन देऊन पूर्ण करणार नाहीं काय? त्यानें जें सांगितलें, तें तो स्थापन करणार नाहीं काय?"

गोष्ट.

नवरा व नवरी.

एके मनुष्यानें एके रूपवंत व सत्यशील कुमारीस आपल्या पूर्ण प्रीतीचें वचन देऊन तिजसीं लग्न केलें. कांहीं दिवस त्या उभयतांनी मोठ्या आनंदांत व सुखांत घालविले. नंतर कांहीं कारणामुळें नवऱ्यास आपले स्त्रीस सोडून परगांवीं जावें लागलें, ह्मणून तो गेला. त्याच्या बायकोनें त्याची पुष्कळ दिवस वाट पाहिली, परंतु तो आला नाहीं. तिच्या मित्रांस तिचा मोठा कळवळा येत असे; परंतु जे तिचे वैरी होते, ते तिला चिडवून ह्मणत असत कीं, "अद्याप तूं आपल्या नवऱ्याची काय वाट पाहतेस? तो तुला सोडून गेला आहे; तो परत येणार नाहीं." हें ऐकून ती आपल्या कोठडींत जाऊन आपल्या नवऱ्यानें जीं पाठविलेलीं पत्रें, त्यांत त्यानें तिला पूर्ण प्रीतीचें व विश्वासाचें वचन दिलें होतें, तीं पत्रें एकांतपणें वाचीत असे. तीं पत्रें वाचतांना तिच्या डोळ्यांतून

अश्रुधारा वाहत असत ; परंतु तिच्या नवऱ्याच्या वचनांचा तिला कांहींच संशय नव्हता, ह्मणून ती आपले मनीं शांति धरून आपल्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू पुशीत असे. शेवटीं ईश्वरी नेमाप्रमाणें तिचा प्रियकर तिजला येऊन भेटला आणि तिला फारच हर्ष झाला. आणि त्याच्या येण्याविषयीं दुसऱ्यास संशय होता, असें जेव्हां त्यास समजलें, तेव्हां तिला त्याच्या येण्याविषयीं कशावरून खात्री होती, असें त्यानें तिला विचारिलें. तिनें लागलींच त्याचीं पूर्ण प्रीतीचीं व भरंवशाची पत्रें त्यास दाखविलीं.

तात्पर्य.

ईश्वरानें इस्राएलांस आपले लोक मानिलें व त्याच्या आश्रयाखालीं त्यांनी सुख भोगिलें. हल्लीं त्यांस ईश्वरानें सोडल्यामुळें ते दुःखांत व दासत्वांत पडले आहेत ; आणि दुसरीं राष्ट्रें त्यांची थट्टा करितात व ते अद्याप उद्धाराची आशा करितात ह्मणून त्यांस हंसतात ; त्यांच्या सुज्ञांची चेष्टा व त्यांतील ईश्वरभक्तांची हेळणा होत आहे. ते आपल्या प्रार्थनामंदिरांत जाऊन त्यांनी त्यांस पाठविलेलें पत्र ह्मणजे शास्त्र वाचितात, व त्यांतील त्याच्या वचनावर भरंवसा ठेवितात. शेवटीं ईश्वर त्यांचा उद्धार करील आणि दुसरे सर्व लोक थट्टा करीत असतां तुमचा पूर्ण विश्वास कसा बसला असें तो विचारील ; तेव्हां ते त्यानें दिल्हेलें शास्त्र त्यापुढें करून ह्मणतील कीं "जर तुझें शास्त्र माझा सुखानंद नसतें ; तर मी आपल्या पीडेंत नष्ट झालों असतों.

तत्व १३.

पुनरुत्थिति.

מתים יחיה אל ברוב חסדו׃ ברוך עדי עד שם תהלתו׃

"देव आपल्या बहुत दयेनें मेलेल्यांस जीवंत करील ;
त्याचें स्तुत्य नाम सदा सर्वकाळ धन्य असो."

אני מאמין באמונה שלמה שיהיה תחית המתים בעת שתעלה רצון מאת הבורא יתברך שמו ויתעלה זכרו לעד ולנצח נצחים׃

"मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, सदा सर्वकाळ धन्य

ज्याचें नाम व थोर ज्याचें स्मरण असा जो उत्पन्न कर्त्ता, त्याची जेव्हां इच्छा होईल, तेव्हां मेलेल्यांची पुनरुत्थिति होईल."

या तत्वांतील विषय फारच गहन आहे; कारण मरणानंतर मनुष्याचा देह तर मातीस मिळतो, परंतु आत्म्याचें काय होतें? त्याचा क्षय होतो किंवा तो तसाच राहतो? तो आत्मा व त्याचा देह जो मातीस मिळतो, तो पुनः एकत्र होऊन तोच मनुष्य पुनः सजीव होईल कीं काय? याविषयीं या तत्वांत विचार केला आहे. खरोखर पाहिलें असतां या गोष्टी बहुतांशीं मनुष्याच्या बुद्धीच्या पलिकडे आहेत. त्या, ईश्वरासच पूर्ण माहीत आहेत. तथापि सृष्टीच्या नियमावरून अनुमान केल्यानें, व ईश्वरानें आपल्या अपार दयेनें आपली इच्छा प्रगट करण्याकरितां जें शास्त्र आपणास दिल्हें आहे त्यावरून त्यांचें ज्ञान प्राप्त होतें.

आत्म्याचा अमरपणा.

पुनरुत्थिति होईल हें सिद्ध करण्याकरितां पहिल्यानें आत्मा अमर आहे, हें सिद्ध केलें पाहिजे. आतां तत्वज्ञानी लोकांनी सृष्टींतील पदार्थांविषयीं असें ठरविलें आहे कीं, ते पदार्थ जरी नाहींसे होतात, तरी त्यांचा अगदींच क्षय होत नाहीं. ज्या तत्वांच्या मिश्रणानें ते पदार्थ केलेले असतात, तीं प्रत्येक तत्वें आपापल्या जातीस जाऊन मिळतात. याचप्रमाणें मनुष्यदेहाविषयीं व आत्म्याविषयींहि असावें; ह्मणजे मरणा नंतर देह जो मातीचा आहे तो मातीस मिळतो; आणि आत्म्याचा क्षय न होतां ज्यानें त्याला मनुष्यदेहांत फुंकिला, त्याजकडे तो जाऊन राहत असावा. शास्त्रांत उपदेशक अध्याय १२, ओवी ७ एथेंहि असेंच आहे. "धूळ पूर्वींसारिखी भूमीस पुनः मिळेल; आणि ज्या देवानें जीवात्मा घातला त्याजकडे तो परत जाईल." तत्वज्ञानी लोकांच्या मतें धुळीसारिख्या क्षुल्लक पदार्थाचा जर क्षय होत नाहीं; तर आत्म्यासारिख्या अमोलिक पदार्थाचा क्षय कसा होईल?

मनुष्याचा आत्मा अमर आहे ही गोष्ट पृथ्वी उत्पन्न झाल्या पासून सर्व लोकांस मान्य असावी. उत्पत्ति अध्याय पहिला एथें असें लिहिलें आहे कीं ईश्वरानें मनुष्यास मातीचा घडून आपल्या प्रतिमेसारिखा उत्पन्न केला, ह्मणजे देह मातीच्या प्रतिमेसारिखा आणि आत्मा आपल्या प्रतिमेसारिखा

उत्पन्न केला. परंतु तिसऱ्या तत्त्वाप्रमाणें ईश्वर निराकार आहे आणि त्यास कांहीं व कशाचीहि प्रतिमा नाहीं. तर त्या वाक्यांत लिहिलेली ईश्वराची प्रतिमा हे ईश्वराचे गुण, असें समजलें जातें; व याप्रमाणें सर्व मान्य करितात. तर जसे अदृश्यपणा, बुद्धि इत्यादिक ईश्वरी गुण आत्म्याच्या अंगीं आहेत, तसा सनातनपणा किंवा अमरपणा हा गुणही त्याच्या अंगीं असावा यांत संशय नाहीं. याच प्रमाणें उत्पत्ति अध्याय ९, ओवी ५ एथें आत्महत्येचा निषेध केला आहे, आणि जे आत्महत्या करितात, त्यांच्या जीवांचा झाडा त्यांच्या आत्म्यापासून ईश्वर घेणार असें ह्मटलें आहे. यावरून आत्महत्या करणारा जरी मरण पावला, तरी ईश्वर त्याच्या आत्म्याचा झाडा घेणार; ह्मणून मरणानें आत्म्याचा क्षय होत नाहीं; तो अमर आहे असें अनुमान होतें. आणि ही गोष्ट पूर्वीचे इस्राएल मात्र मान्य करीत होते असें नाहीं; अन्यलोकहि मानीत होते. गणना अध्याय २३, ओवी १० एथें बिलआम जो अन्य जातीचा चेटकी होता, तो ह्मणतो कीं, "नीतिवंताच्या मरणासारिखें माझें मरण व्हावें, आणि त्याच्यासारिखा माझा परिणाम व्हावा." अशा बिलआमाच्या ह्मणण्यावरून नीतिवंताच्या मरणांत कांहीं तरी सुख, व त्याचा परिणाम चांगला, आणि अनीतीनें वर्तणाराचे मरणांत दुःख व त्याचा परिणाम वाईट असें तो मानीत असे असें दिसतें. आणि हें मरणानंतर होणारें सुख किंवा दुःख आत्मा नसल्यास निर्जीव जो देह त्यासच मात्र प्राप्त होईल असें नाहीं; परंतु आत्म्यासहि प्राप्त होईल असें अनुमान होतें. ह्मणून आत्मा अमर आहे.

पुनरुत्थिति मानण्यास आधार.

आतां पुनरुत्थितीविषयीं विचार करितांना मरणानंतर देह कुजून धुळीस मिळतो, आणि आत्मा अमर राहतो, म्हणून आत्म्यासच मात्र पुढें सुख किंवा दुःख प्राप्त होईल असें नाहीं. आत्मा आणि देह मिळून मनुष्य होतो; केवल आत्म्यास अथवा केवल देहास मनुष्य म्हणतां येत नाहीं. आणि मनुष्य जीं सत्कर्में अथवा दुष्कर्में करितो, तीं आत्मा योजितो, आणि देह सिद्धीस नेतो. आत्म्याच्यानेच मात्र तीं कर्में सिद्धीस नेतां येत नाहींत; अथवा देहाच्यानेच त्यांची योजना करवत नाहीं. यासाठीं

जीं कर्में मनुष्य करितो, तीं आत्मा आणि देह यांच्या संयोगामुळें होतात, म्हणून त्या कर्मांचें वेतन त्या उभयतांस असावें. तर केलेल्या कर्मांचें वेतन भोगण्यास देह आणि आत्मा एकत्र होऊन पुनरुत्थिति होईल.

आणि जर ईश्वर सर्वसमर्थ आहे, तर त्यास कोणतीहि गोष्ट अशक्य नाहीं. यावरून जसा त्यानें एक वेळ मनुष्य रचिला, तसाच जरी देह मातीस मिळाला, आणि जरी त्याचे कण विखरले तरी ते कण एकत्र करून तोच देह पुनः रचायास त्यास सामर्थ्य आहे. आणि मनुष्याच्या कर्मांप्रमाणें त्याचा न्याय होऊन त्यास यथायोग्य वेतन मिळालेंच पाहिजे, म्हणून मनुष्याचा आत्मा आणि देह एकत्र होऊन पुनरुत्थिति होईल.

मनुष्याचा आत्मा व देह एकत्र होऊन पुनरुत्थिति होईल असें अनुमान करण्यास अनेक कारणें आहेत; तरी त्यांतील एथें दर्शविण्यासारिखीं कांहीं घेतलीं आहेत. तीं असीं :—जरी एकादे झाडाच्या डाहाळ्या व त्याचा बुंधा इत्यादिक आपण तोडिला, तरी त्याचीं मुळें जीं जमिनींत असतात, त्यांस जीव असला तर त्यांतून तें झाड पुनः उत्पन्न होऊन त्यास पहिल्याप्रमाणें पानें डाहाळ्या इत्यादिक सर्व येतात. याचप्रमाणें मनुष्याच्या देहाचें मूळ म्हणजे आत्मा अमर असतां, त्यास त्याचा देह व त्याचे सर्व अवयव प्राप्त होणार नाहींत काय? अणखी सुरवंट हा लहान प्राणी मेल्यानंतर कांहीं दिवसांनीं पुनः त्यास अवयव प्राप्त होऊन त्यांतून पतंग निघतो; आणि त्या पतंगापासून पुनः सुरवंट उत्पन्न होतो. याचप्रमाणें मनुष्याच्या मरणानंतर त्यास पुनः देह व त्याचे अवयव प्राप्त होणें शक्य आहे.

असींच पुनरुत्थितीविषयीं प्रमाणें, आपणाजवळ जो पुरातन लेख ह्मणजे जें शास्त्र आहे, त्यांतहि सांपडतात. जसे सांप्रत अनेक धर्मांचे लोक पुनरुत्थिति मान्य करितात त्याप्रमाणें पूर्वींहि, जसे इस्राएल लोक, तसे अन्य लोकहि मान्य करीत होते असें कळतें. यशाया अध्याय २६, ओवी १९ एथें यशाया असें म्हणतो कीं, "तुझे मेलेले जीवंत होतील, माझ्या प्रेतासहित उठतील." आणि दानिएल अध्याय १२, ओवी २ एथें असें लिहिलें आहे कीं, "जे भूमीच्या धुळींत निजलेले आहेत, त्यांतले बहुतेक जागे होऊन उठतील; कितीएक सर्वकाळच्या जीवनासाठीं व कितीएक सर्वकाळ निंदेसाठीं व सर्वकाळच्या धिक्कारासाठीं

उठतील. याचप्रमाणें इयोब जो इस्राएल नव्हे परंतु अन्य जातीचा होता, तोहि पुनरुत्थिति मान्य करून, असें म्हणतो "मी जाणतों कीं, माझा खंडणारा जीवंत आहे, आणि अंतकाळीं भूमीवर उभा राहील; आणि माझी त्वचा नष्ट झाल्यानंतर किड्यांनी हें शरीर नासलें, तरी मी आपल्या देहाच्याठायीं देवाला पाहीन; त्याला मी आपणासाठीं स्वतां पाहीन आणि माझेठायीं दुसरा असें नाहीं, तर माझेच डोळे अवलोकन करितील, माझ्या उदरीं माझीं आंतडीं नष्ट झालीं तरी." इयोब अध्याय १९ ओवी २५–२७. आणि एवढेंच नव्हे, परंतु येहेजकेल अध्याय ३७, एथें लिहिल्याप्रमाणें ईश्वराने येहेजकेलास मनुष्यांच्या शुष्क झालेल्या आणि विखरलेल्या हाडाने भरलेले खोऱ्यांत नेलें, आणि तेथील प्रत्येक हाड त्याच्या हाडासीं जोडून, त्यांवर स्नायु व मांस आणून त्यांस कातडीनें आच्छादून आणि त्यांमध्यें श्वास घालून त्या सर्व मनुष्यांस सजीव केलें; हें पुनरुत्थितीचें प्रत्यक्ष प्रमाणहि दाखविलें आहे. या सर्व प्रमाणांवरून पुनरुत्थिति होईल याविषयीं कांहींच संशय राहत नाहीं.

गोष्ट.

शंकासमाधान.

कांहीं चांचे, आराम देशाच्या किनाऱ्यावर फिरत असतां त्यांनी एक तारूं मारिलें, त्यांत चौघे राबी स्पेन देशास परत जात होते, त्यांस त्यांनी गुलामासारिखें विकावें ह्मणून त्यांच्या हातापायांत बेड्या घातल्या. त्यांतून एका राबीची बायको त्यांजबरोबर होती. तिने या दुष्टांच्या हातून आपले हाल न व्हावे, आणि राहिलेल्या आपल्या आयुष्यभर आपणास गुलामगिरीचें दुःख भोगायास न लागावें, ह्मणून मरण्याचा निश्चय केला. तिने आपलें मन दृढ केलें, आणि तिला मरणाचें भय वाटलें नाहीं; परंतु असें केल्याने कदाचित् आपणास पुढल्या जगीं सर्वकाळचें सुख प्राप्त होणार नाहीं, याची मात्र शंका तिला वाटत होती. हा संशय दूर करण्याकरितां ती आपले नवऱ्या जवळ गेली, आणि त्यास कांहीं संशय न यावा अशा रीतीने तिने त्यास असा प्रश्न केला कीं, "जीं समुद्रांत मरतात तीं पुनरुत्थितीचे दिवशीं पुनःजीवंत होऊन

उठतील काय?" नवऱ्यानें उत्तर केलें, "यांत काय संशय; कारण ईश्वर स्वतां असें ह्मणतो कीं "मी त्यांस समुद्राच्या तळापासून माघारें आणीन." गीत. ६८ ओवी २२. या धैर्यवान बाईस असें खात्रीपूर्वक उत्तर मिळाल्यावर, तिला अधिक उत्तेजन येऊन तिनें लागलींच समुद्रांत उडी टाकिली.

गोष्ट.

फुटकें पात्र.

एके इस्राएली धर्मोपदेशकानें, या जगांतील सुख केवळ अशाश्वत आहे, या विषयावर उपदेश केला.

तो आटोपल्यावर एका नास्तिकानें त्या उपदेशकाजवळ जाऊन त्यास असा प्रश्न केला कीं, मेलेल्यांची पुनरुत्थिति होईल असें कोणी बुद्धिमंत मनुष्य मान्य करूं शकेल काय? आपले शरीरांतून प्राण निघून गेला ह्मणजे तें कुजून जातें, आणि कांहीं वेळानें पुनः त्याची माती होते. ती माती पुनः सजीव होणें शक्य आहे काय? त्या उपदेशकानें उत्तर केलें, माझ्या मुला, याविषयीं मी तुला पूर्ण खात्रीचें उत्तर देवूं शकत नाहीं; कारण हें आपलें आयुष्य दोन अनाद्यंत काळांच्या मधला काळ आहे. तरी कुंभार एकाद्या फुटक्या पात्राचे तुकडे कुटून त्याची माती पुनः मळून व ठोकून तिला पूर्वींचा आकार रंग वगैरे देवूं शकतो हें तुला पुर्त्तेपणी माहीत असतां, ईश्वर जो सर्वसमर्थ जगाचा उत्पन्न कर्त्ता त्याच्या अंगीं ही शक्ति नाहीं, असें तूं कसें ह्मणतोस? तर जरी मनुष्यदेह कुजून त्याच्या मातीचे कण सर्व पृथ्वीवर विखरले, तरी तो ते एकवट करून त्यांचा पूर्ववत् मनुष्य रचून व त्यांत त्याचा अमर आत्मा घालून त्यास तो पुनः सजीव करूं शकत नाहीं काय?

गोष्ट.

जलीखा बाईची धर्मनिष्ठा.

आफ्रिका खंडांतील मोराको देशांत टानसा नांवाचा एक गांव आहे, तेथें शेलोमा हातवील नांवाचा एक इस्राएल आपली बायको व तरुण

मुली यांसहित आनंदानें नांदत होता. त्याची जलीखा नांवाची कन्या अति रूपवती असल्यामुळें आईबापांची व आप्तांचीं ती फारच लाडकी होती. तिचें वय इसवी सन १८३१ इस्राएली ५५९१ सालीं बारा वर्षांचें होतें. इच्या रूपावरून शेजारच्या मुसलमान लोकांच्या मनीं हेवा उत्पन्न झाला; आणि असें सुंदर रत्न इस्राएलांजवळ असणें व तें त्यांजवळ आपण असूं देणें हें मोठें पाप आहे असें त्यांस वाटलें. नंतर जलीखेनें महमदी धर्म स्वीकारण्याची इच्छा आपणाजवळ प्रदर्शित केली, असे खोटे साक्षी उभे करून कांहींजण तिच्या बापाच्या घरांत जबरीनें शिरून, तिला फेझ नांवाच्या दुसऱ्या गांवीं नेऊन आपला राजपुत्र जो बादशाहाचा वारस यास नजर केली. या मुलीला पाहून त्या राजपुत्राचेहि डोळे दिपले; आणि त्याचा महमदी धर्म तिनें स्वीकारल्यास तिला आपली पट्टराणी करून सर्व धन, मान व महत्त्व तिलाच देण्याचें त्यानें कबूल केलें. तिनें ही देणगी शांतपणें व निश्चयाने नाकारिली; आणि त्यानें स्वतां व आपल्या दरबारच्या उमरावां कडून तिची समजूत करण्यास पुष्कळच प्रयत्न केले, परंतु ते सर्व व्यर्थ गेले. तिनें त्यांस उत्तर केलें कीं "ईश्वरा पुढें व त्याच्या पवित्र शास्त्रा पुढें सर्व जग व त्यांतील सुंदर पदार्थ व धन हे कांहींच नाहींत. तो आकाश व पृथ्वी यांचा धनी व सर्व प्राणिमात्रांचा उत्पन्नकर्त्ता व स्वामी आहे. जन्मापूर्वीं व मरणानंतरहि ते सर्व त्याच्या सत्तेखालीं आहेत. त्यानें आमच्या पूर्वजांस मिसरांतून सोडवून आह्मास आपल्या पवित्र शास्त्राचे रक्षक करून ठेविलें आहे. या ईश्वरी शास्त्राच्या अधीन मी आहें; आणि त्याकरितां मरायासहि मी सिद्ध आहें; आणि ईश्वराची इच्छा असल्यास मी आपले स्वतांस स्वसंतोषानें त्या शास्त्राकरितां अर्पण करितें. जरी जगांतील सर्व द्रव्य तुह्मी आणून माझ्या पायांसीं ठेविलें, तरी या माझ्या शब्दां पलीकडे मी एक केसभरहि हटणार नाहीं. तर तुमची इच्छा असेल तसें तुह्मी मला करा.

याप्रमाणें त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले, हें पाहून त्यानें क्रूर उपायाची योजना करून जलीखेस अंधारकोठडींत घालण्याचा हुकूम केला. कांहीं दिवस ती तेथें राहिल्यावर त्रासामुळें व एकांत वासामुळें तिचा तारूण्याचा भर उतरला असेल, असी कल्पना करून ज्या इस्राएली बायांनीं महमदी

धर्म स्वीकारिला होता, त्यांनी अनेक आशा दाखवून व आपलीं उदाहरणें देऊन जलीखेस आपला धर्म सोडण्यास फुसलावावें ह्मणून त्यानें त्यांस तिजकडे पाठविलें. त्यानींही मोठ्या चातुर्यानें तिला मोठ मोठ्या सुखाची आशा दाखवून, आणि शेवटीं एकादा धीट पुरुषहि ज्यामुळें खचला असता, असें भय घालूनहि पाहिलें. परंतु जलीखेचा दृढ निश्चय हटला नाहीं. तिनें त्यांस शांतपणें व भक्तिभावानें उत्तर केलें कीं, तुम्ही माझी समजूत करूं पाहतां; परंतु पाहा, ऐहिक जिणें ओसरण्याऱ्या छायेसारिखें आहे. अनादिकाळासीं त्याची तुळणा केली असतां, तें केवळ क्षणासारिखें चपळ आहे. हें आयुष्य आनंदांत व विलासांत घालवून पुढील जगीं अपार दुःख भोगावें, यापेक्षां कांहीं वेळ दुःखांत व क्लेशांत घालवून पुढील अनंत सुख साध्य करावें हें बरें. सर्वांस मेलेंच पाहिजे. जे अति पराक्रमी व थोर तेहि किड्यांचा भक्ष होणार आहेत. सैन्याचा परमेश्वरच मात्र अनंत आहे. त्याच्या सूत्रास मी संतोषानें मान्य आहें. तुह्मी म्हणतां कीं, माझी अति क्षुल्लक इच्छाहि पूर्ण होईल; बरें तर, ईश्वरानें मला आपली सेवा करण्या करितां बळ व सामर्थ्य द्यावें आणि इस्राएलाची कन्या म्हटली जाण्याची योग्यता माझ्या अंगीं यावी, असें मी परमेश्वराजवळ मागतें. तर आतां जें होणार तें लवकर होऊं द्या.

शेवटीं त्या राजपुत्रानें हा एक उपाय केला. त्यानें त्या शहरांतील हाखामीम लोकांस बोलावणें करून असें सांगितलें कीं, माझी इच्छा पूर्ण करण्याकरितां जर तुह्मी जलीखेचें मन वळविणार नाहींत, तर सर्व इस्राएल रहिवास्यांच्या जीवासीं गांठ पडणार आहे. आतां आपल्या व आपल्या लोकांच्या प्राणांसीं गांठ आहे हें पाहून त्यांस थरकांप सुटला, आणि ते लागलेच बंदीशाळेंत त्या बाईकडे गेले; आणि एस्तेर, जिच्या वजनानें तिच्या लोकांचें कल्याण झालें, तिचें उदाहरण त्यांनी तिला दिल्हें. परंतु तिनें त्यांसहि लागलेंच निरुत्तर करून सोडलें. ती ह्मणाली, एस्तेर राणीस आपल्या पूर्वजांचा पवित्र धर्म सोडावा लागला नव्हता, परंतु मला सोडावा लागत आहे. हें जर तुह्मास नीट दिसत आहे, तर तुह्मी आपल्या लेंकी त्या राजपुत्रास कां देत नाहीं? ईश्वरी इच्छा असल्यास मी आपल्या मृत्यूकडून त्याचें शास्त्र पूर्ण करीन.

राजसत्तेसीं एवढा हट्ट धरण्याचा शेवट मृत्यूच होणार ह्मणून तिचा शिरच्छेद करण्याचा हुकूम झाला; आणि त्या पूर्ण सद्गुणी व तारूण्याच्या भरांत आलेल्या सुंदरीला वधस्थानीं नेलें. परंतु तेथेंहि तिला फुसलावण्याचा प्रयत्न करण्यास मांगासहि हुकूम झाला होता; ह्मणून जेव्हां त्यानेंहि आपल्या निर्दयपणानुरूप अनेक वेळा तिच्या मानेंत तरवार भोसकून वश्य होण्यास सांगितलें; तेव्हां ती धीट कुमारी ह्मणाली, "अरे काफराच्या लेका, काफरा! तूं तरी इतके कष्ट कां घेतोस?" यानंतर तिच्या मुखांतून "शेमा इस्राएल" ह्मणजे "हे इस्राएला, ऐक, परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे," हें वाक्य पूर्ण होतांच मांगानें तिचें डोकें उडविलें. तिच्या रक्ताचा स्राव पाहून त्या राजपुत्राचा राग शमला आणि केलेल्या गोष्टीविषयीं त्यास शेवटीं पश्चात्तापहि झाला. तिचें प्रेत इस्राएलांनी नेऊन पुरलें व तिची कबरहि बांधिली. ती कबर इस्राएलांचें व मुसलमान लोकांचेंहि क्षेत्रच झालें आहे. आणि तिच्या नांवाची वाहिलेली शपथ अद्याप पवित्र मानिलेली आहे. पश्चात्ताप झाल्यावर त्या राजपुत्रानें त्या बाईच्या मातापितरांस वर्षासन लावून दिलें, परंतु तिच्या दुःखानें तिच्या दोघी बहिणींस वेडहि लागलें.

ज्याच्या ग्रंथावरून ही गोष्ट घेतली आहे, त्याने सन १८५४ मध्यें या बाईच्या कुटुंबाची ओळख करून् घेतली, व ज्यांनी हा सर्व प्रकार आपल्या दृष्टीनें पाहिला त्यांच्या सांगण्यावरून त्यानें ती आपल्या ग्रंथीं लिहिली. जलीखा बाईचें धारिष्ट व धर्मनिष्ठा या विषयावर आफ्रिकेंतील हाखामीम लोकांनीं अनेक कविता रचिल्या आहेत. ईश्वर करो आणि असें धारिष्ट व असी धर्मनिष्ठा आपल्या सर्वांच्या अंगीं येवो. आमेन.

אֵלֶּה שְׁלֹשׁ עֶשְׂרֵי לְעִקָּרִים׃ הֵן הֵם יְסוֹד דַּת אֵל וְתוֹרָתוֹ׃

हीं आपल्या धर्माचीं तेरा मूळ तत्वें आहेत. पाहा!
तीं ईश्वराच्या नियमांचे व त्याच्या शास्त्राचे पाये आहेत.

תָּם וְנִשְׁלָם שֶׁבַח לָאֵל בּוֹרֵא עוֹלָם׃

पृथ्वी उत्पन्न कर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

या कर्त्यानें केलेल्या ग्रंथांचीं नांवें.

		रु.	आ.	पै.
१	प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबूल होणें	०	१	३
२	पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना	०	८	०
३	इस्राएलांचा लग्नविधि	०	३	०
४	वर्षप्रतिपदेची प्रार्थना	१	०	०
५	नवसांची सुटका व समुद्रतीरीं करायाची प्रार्थना	०	४	०
६	आन्तीओखोस राजाचा इतिहास अथवा हान्नुक्याचे सणाची स्थापना	०	२	०
७	इब्री पहिलें पुस्तक	०	४	०
८	प्रायश्चित्ताचे दिवसाची प्रार्थना भाग १ } ..	१	४	०
९	,, ,, ,, ,, २ }			
१०	सद्गुरुवचनें अथवा नीतिशास्त्र	०	६	०
११	इस्राएलांच्या धर्ममताविषयीं शास्त्रांतील प्रमाणें	०	१	०
१२	מראה אמונת ישראל इस्राएली धर्माचें खरें स्वरूप.			

סליחות

THE

JEWISH PROPITIATORY PRAYER.

पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना

THE JEWISH PROPITIATORY PRAYER:

OR

A PRAYER

FOR THE

FORGIVENESS OF SINS.

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKER

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

BOMBAY

PRINTED AT GUNPUT KRUSHNAJEE'S PRESS

1859—5619

Price 8 Annas

סליחות

पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक

यांणीं

भाषांतर केलें

तें

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीनें

लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें

गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत छापविलें

इ. स. १८५९

इस्राएली ५६१९.

किम्मत ८ आणे

प्रस्तावना.

अलीकडे आपल्या लोकांच्या मनांत प्रार्थनेचा अर्थ समजून घेण्याची फारच उत्कंठता उत्पन्न झाली आहे; हें जाणून मी סליחות ह्मणजे पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना या इब्रीग्रंथाचें भाषांतर केलें आहे. ही प्रार्थना प्रायश्चित्ताच्या दिवसापूर्वी चाळीस दिवस पर्यंत करावी लागती; आणि त्यादिवशीं पापाच्या प्रायश्चित्तासाठीं सर्वांनी आपल्या पापाची क्षमा मागून अगोदरच सिद्ध असावें, हा या प्रार्थनेचा मुख्य उद्देश होय. हा उद्देश लक्षांत ठेवून जे कोणी अंतःकरण पूर्वक ही प्रार्थना करितात त्यांची मात्र ईश्वरापुढें मान्य होईल; कारण यशायाचा भविष्यवाद अध्याय ६६ ओवी २ एथें परमेश्वर असें ह्मणतो कीं, जो दीन व अनुतापी आत्म्याचा असून माझ्या वचनाचें भय धरितो, त्याकडे मी पाहीन.

ही प्रार्थना मूळ भाषेंत रचणाऱ्याने मोठ्या चातुर्याने रचिली आहे; ती असी कीं, तो पहिल्याने प्रार्थना करणारास त्याच्या निद्रेपासून, ह्मणजे त्याच्या दुराचारी मार्गापासून दूर राहावयास, आणि केलेले पापाविषयीं पूर्ण पश्चात्ताप करून ईश्वराच्या भयाने व सदाचरणाच्या मार्गाने वर्तायास सांगतो. आणखी तिजमध्यें ईश्वरास कळवळा आणण्यासारिखा गुण असून तो साध्य करण्याकरितां सर्वांचीं मनें दुसऱ्या गोष्टीकडे न लागतां, तिजकडे मात्र लागावीं, ह्मणून जेव्हां ते संसारसंबंधी कामापासून मोकळे असतात, तेव्हां ह्मणजे मोठ्या पाहांटेस ती करावी असें ठरविलें आहे. जे कोणी या प्रार्थनेस आरंभ झाल्या अगोदर देवाळयांत जातात, ते दावीदाने केलेल्या गीतांतून काहीं गीतें;

ह्मणजे १७, २७, ३२, ५१, ६५, ८५, १०२, १०३, १०४, असीं वाचितात. हीं सर्व गीतें त्या पुस्तकांत आहेत, ह्मणून एथें उतरून घेतलीं नाहींत.

हें भाषांतर इब्री भाषेच्या व्याकरणाच्या नियमाकडे, आणि शब्दांच्या व वाक्यांच्या खऱ्या अर्थाकडे फारच लक्ष देऊन केलें आहे; आणि तें मराठी भाषेच्याहि रीतीप्रमाणे होण्याकरितां कित्येक शब्द जोडावे व कित्येक सोडावे लागले आहेत. जे शब्द मूळ ग्रंथांत नसतां, यांत जोडले आहेत, ते बहुतकरून कौंसांत लिहिले आहेत. हा ग्रंथ सर्वांस समजावा या हेतूने सोप्या भाषेचा उपयोग करून लिहिला आहे; ह्मणून तो सर्वांस मान्य होईल असी आशा आहे.

सूचना

हें पुस्तक वाचणारांस असी सूचना केली जाते कीं, या ग्रंथांतील ज्या शब्दांच्या अर्थाविषयीं मतभेद पडतो, ते एथे दर्शविले आहेत.

पृष्ठ ओळ

९ १० यथार्थतेने वागणारा. याच्या इब्री शब्दाचा अर्थ कोणी परोपकार करणारा असाहि लावतात.

९ २१ दोषास निर्दोषी ठरविणारच नाहीं. शास्त्रांतील अर्थ पालटूंनये; ह्मणून पूर्ण अर्थ घेतला आहे. जर ונקה याचा खरा अर्थ पाहिला, तर निर्दोष करणे असा होतो; परंतु कोणी त्याचा अर्थ निर्दोषी करणारा असा लावतात.

५९ १८ तेहि (एक वेळ) न्यायांत बसणारे (न्याय करणारे) होते. या वाक्यांतील "न्यायांत" याचा इब्री शब्द מדין असा आहे; परंतु דין हा मूळ शब्द असून त्यापुढे על आणि מ असे दोन अन्यय लागतात; ह्मणून מדין हा मूळ शब्द समजून कोणी त्याचा अर्थ गाद्या असा करितात, आणि कोणी डोल्या असाहि करितात. यांतील शेवटला अर्थ त्या वाक्यास लावला असतां; ते डोल्यांत बसून (भयाभीत होऊन प्रवास करणारे) आहेत; असा होतो.

या प्रार्थनेच्या मागें התרת הנדרים ह्मणजे नवस, शपथी, इत्यादिकांपासून मोकळें होण्यासाठीं जी प्रार्थना आहे, तिचेंहि भाषांतर होऊन तयार आहे; परंतु कांहीं विशेष कारणामुळें याबरोबर छापलें गेलें नाहीं.

शुद्धि पत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२	२५	सिद्ध हो	सिद्ध हो आणि जग (त्यांतून निभाव;)
४	२३	आमचें तारण	त्याचें तारण
६	८	तूं प्रार्थना ऐकणारा	हे आमच्या राजा, तूं प्रार्थना ऐकणारा
११	१७	यथार्थतेच्या	यथार्थाच्या
१६	१९	अतिक्रय	अतिक्रम.
१६	२३	अपवाद केला	अपवाद केला, व्यभिचार केला.
२९	१७	प्रार्थना ऐकणारा	(आकाश) मंडळावर स्वारी करणारा, प्रार्थना ऐकणारा.
३०	१३	विश्वंभर	सर्व समर्थ
५६	३३	तो तुह्मास	तो दयेने आह्मास

याशिवाय आणखी कांहीं चुका असल्यास, सुज्ञांनी क्षमा करावी.

पापाच्या क्षमेसाठीं

प्रार्थना.

ישן אל תרדם हे निद्रेंत असणाऱ्या, झोंपीं जाऊं नको; तूं आपला आळस सोड, आणि मनुष्य पुत्रांच्या मार्गापासून दूर राहा. तूं आपल्या उंचत्वाच्या मार्गाकडे पाहा, आणि जसे तुला उजेड देणारे तारे (आपला मार्ग क्रमण करायासाठीं) धांव घेतात; तसा तूं अनादि खडकरूप आश्रयाची सेवा करायास धांव.

מה לך נרדם तुला झोंप कां लागली? ऊठ; आणि आपले देवाला हाक मार.

הקץ לראות त्याच्या आकाशाकडे व त्याच्या अंगुळीच्या कृत्यांकडे पाहावयास जागा हो, आणि त्याची वरील राहोटी (आकाश), जी त्याच्या (सर्व शक्तिमान) भुजेसीं अवलंबून राहिली आहे, तिजकडे, आणि तारे, जे त्याच्या मोहोरी व त्याच्या आंगठीचे शिक्के आहेत, त्यांकडे अवलोकन कर, आणि त्याच्या भयामुळें कांपत राहून त्याच्या तारणाची वाट पाहा; नाहींतर तुझ्या महत्वाचा वेळ आल्यावर तुझें मन गर्विष्ठ होईल. מה לך נרדם

וצא בחצות הלילות ज्यांच्या जिभेंत(मुखांत) स्तुति असून, त्यांमध्यें कांहींच कपट व ठकविणें नसतें, अशा

नामांकित मनुष्यांच्या टांचेजवळ (चरणाजवळ) तूं अर्ध रात्रीं जा; रात्रीं ते प्रार्थना करितात व दिवसास ते उपवास करितात; देवाचा मार्ग त्यांच्या ध्यानांत असतो, आणि त्याच्या सिंहासनाजवळ त्यांस स्थान सांपडतें. ईश्वराकडे चढून जाण्यास (स्वर्ग मिळीवण्यास) त्यांचा मार्ग शिडीसारिखा आहे. מה לך נרדם

דמעות תזיל עניך तूं आपल्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूंदे, आणि आपल्या उल्लंघनाविषयीं पश्चात्ताप कर; तुला आपलें वतन मानून घेणारा पुढें काकळूत कर, आणि वाईटपणांत लपून राहूं नको; तूं आपला गर्व अगदीं पाडून (सोडून) चांगलें कर, कारण तें (करणें) सुंदर आहे. तूं आपल्या द्रव्यानें, तारणारे चढून येत तोंपर्यंत देवाचा सन्मान कर, आणि उंच स्वरानें आपल्या देवाला हाक मारायास सिद्ध हो. מה לך נרדם

דלים אשר עפר יסודם त्यांचें मुळतत्व धूळ. असे जे दरिद्री (मातीपासून घडलेला मनुष्य), त्यांस ज्ञान कोठून असेल? मनुष्य पशूपेक्षां श्रेष्ठ नाहीं, तो आपल्या गौरवाच्या खडकरूप आश्रयास पाहाण्यावरूनच मात्र (श्रेष्ठ आहे); परंतु तें पाहाणे मनाचें आहे, नेत्राचें पाहाणे नव्हे; आणि द्राक्षरसापेक्षां चांगला, असा जो त्यांच्या मूळाचा (जीवनाचा) झरा, तो त्यांस सांपडतो. हे मास व रक्तमया (मनुष्या), असाच तुला तुझा देव सांपडेल. מה לך נרדם

האהיה אשר אהיה अनंत जो आहे, तोच आहे; त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें सर्व कृत्यें केलीं आहेत; तोच मारणारा व जीवंत करणारा, कबरेंत उतरविणारा व त्यांतून काढणारा असा आहे. ह्मणून (हे मनुष्या), न्यायांत उभा राहायासाठीं सिद्ध हो; आणि देव कोठे आहे? तो केव्हां न्याय करील? वर काय व खालीं काय आहे? असें ह्मणणारें

तुझें बंड व कुकर्म सोड, आणि निश्चयें, तूं आपला परमेश्वर देव याजवळ परिपूर्ण हो. מה לך נרדם

יהי חסדך हे परमेश्वरा, जसी आह्मी तुजवर आशा ठेविली आहे, तसी तुझी दया आह्मावर होवो. जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहेमी तुझा उत्सव करितील. सेलाह. जे लोक असे आहेत, ते धन्य; आणि ज्या लोकांचा देव परमेश्वरच आहे, ते धन्य.

गीत १४५.

תהלה לדוד "दावीदाकडून. हे माझ्या देवा, तूं राजा, मी तुला उंचावीन; आणि सदासर्वकाळ तुझ्या नांवाची स्तुति करीन. सर्व दिवशीं तुझी स्तुति करीन; आणि सदासर्वकाळ तुझ्या नावाचें स्तवन करीन. परमेश्वर थोर, आणि फार स्तुतिमान आहे; त्याचें थोरपण अपार आहे. पिढ्यानपिढी तुझ्या कृत्यांची प्रशंसा करील, आणि तुझ्या पराक्रमाचें निवेदन करील. तुझी स्तुति गौरवी महानपणाची, आणि मी तुझ्या आश्चर्य कृत्यांच्या गोष्टींचे विचार काढीन. लोक तुझ्या भयंकर कृत्यांतला पराक्रम सांगतील आणि मी तुझें थोरपण वर्णीन. ते तुझ्या मोठ्या बरेपणाची आठवण करितील, तुझें नीतिमत्त्व गाजवितील. परमेश्वर कृपाळू व ममताळू; मंद क्रोध व मोठ्या दयेचा आहे. परमेश्वर सर्वांसीं चांगला; आणि त्याच्या सर्व कृत्यांवर त्याची फार ममता आहे. हे परमेश्वरा, तुझीं सर्व कृत्यें तुला स्तवितात, आणि तुझे भक्त तुझी स्तुति करितात; तुझ्या राज्यांतले गौरव सांगतात,' आणि तुझ्या पराक्रमाविषयीं बोलतात; यासाठीं कीं

आपण त्याच्या पराक्रमाचीं कृत्यें व त्याच्या राज्यांतलें वैभवि गौरव आदामाच्या संतानांस कळवावें. तुझें राज्य सर्व युगाचें राज्य; आणि तुझा अधिकार पिढीच्या पिढींतल्या सर्वांवर आहे. जे पडत आहेत, त्या सर्वांस परमेश्वर आधार देतो; आणि सर्व ओणव्यांस तो उभें करितो. सर्वांचे डोळे आशेने तुजकडे लागतात; आणि तूं त्यांचें भक्ष्य यथाकाळी त्यांस देतोस. तूं आपल्या मुठी उघडून सर्व जिवांची इच्छा पूर्ण करितोस. परमेश्वर आपल्या सर्व चालीनी पवित्र; आणि आपल्या सर्व कृत्यांवर उपकारीक आहे. जे सर्व परमेश्वराला हाक मारितात, जे सर्व सत्यतेने त्याला हाक मारितात, त्या सर्वांस तो जवळ आहे. जे त्याचें भय धरितात, त्याचा मनोरथ तो पूर्ण करितो; आणि त्यांचें ओरडणें ऐकून त्यांस तारितो. जे परमेश्वरावर प्रीति करितात, त्या सर्वांस तो राखितो; परंतु सर्व दुष्टांचा नाश करील. माझें तोंड परमेश्वराची स्तुति उच्चारील; आणि सर्व दैहिक त्याच्या पवित्र नामाची स्तुति सदासर्वकाळ करिल. आह्मी परमेश्वराला आतांपासून सर्वकाळपर्यंत धन्य ह्मणूं. हालेलुया."

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचावलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, आणि सर्व इस्राएलांच्या घराण्याच्या आयुष्याच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन, आमचें तारण उगवो आणि अभिषिक्ताचें येणे लवकर होवो. तथास्तु; त्याचे थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जी सिद्धि जगांत गाजविली जाते, त्यासर्वांपेक्षां; पवित्र

जो धन्य त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचावलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुह्मीहि तथास्तु ह्मणा.

בן אדם हे मनुष्यपुत्रा, तुला कां झोंप लागली आहे? काकळूत करीत उठून प्रभूच्या प्रभूस हाक मार, आणि आपले हाई ओतून (सांगून) त्यापासून क्षमा शोध (माग). दिवस फिरल्या अगोदर स्नान करून शुद्ध हो; उशीर करूंनको. त्वरा करून आकाशांत वस्ति करणाऱ्याकडे, सहायाकरितां धांवत जा; आणि उल्लंघनापासून व दुष्टाईपासून पळून जा (दूर राहा), आणि शासनाचा धाक असूंदे. (हे देवा), मी विनंती करितों, कीं विश्वासू इस्राएल, तुझें नाव जाणणारे, यांचा तूं अंगिकार कर.

לך אדני הצדקה हे परमेश्वरा, तुला न्यायीपण आहे, परंतु आह्मास तोंड दाखविण्याची लाज आहे.

עמוד כגבר शूराप्रमाणें उभा राहून तूं आपली पापें कबूल करण्याकरितां धैर्य धर; आणि उल्लंघनाचे प्रायश्चित व्हावें, ह्मणून भारी मस्तकाने (धीटपणें) तूं अनंत ईश्वराला शोध, कारण गुप्त कर्में त्यापुढें कधींही लपली जात नाहींत. आणि ज्या सर्व ह्मणी ह्मटल्या जातात, त्या ते (इस्राएल) त्यापुढें ह्मणतात; ह्मणून जो दयाळू, तो जसा बाप आपल्या पुत्रावर, तसी आह्मावर दया करील. לך אדני

לך אדני הצדקה हे परमेश्वरा, तुला न्यायीपण आहे; परंतु आह्मास तोंड दाखविण्याची लाज असतां, आह्मी काय निमित्त देऊं? काय ह्मणूं? काय सांगूं? आणि आपणास यथार्थ कसें मानूं? पश्चात्ताप करणाऱ्यांचा अंगिकार करण्याकरितां तुझा उजवा

हात लांबविलेला आहे; ह्मणून आह्मीं आपले मार्ग शोधून व पारखून तुजकडे फिरतों.

שָׁבִים אֵלֶיךָ ते आपल्या सर्व मनाने तुजकडे वळतात; ह्मणून दयेने तूं त्यांचें ओरडणे मान्य कर. तुझ्या पुष्कळ दयेंत आह्मी तुजपुढें गरीब व दरिद्र्यांसारिखें येऊन तुझा दरवाजा ठोकीत आहों; हे दयावंता व कृपावंता, आह्मी तुझा दरवाजा ठोकीत आहों, तुजसमोरून आह्मास रिकामें परतवूं नको. तूं प्रार्थना ऐकणारा आहेस; ह्मणून आह्मास तुजसमोरून रिकामें परतवूं नको. हे प्रार्थना ऐकणाऱ्या, सर्व मांसमय (मनुष्यें) तुजकडे येतील. हे विनंती ऐकणाऱ्या, सर्व प्राणी तुजकडे येतील. तुजकडे सर्व जीव व प्राणीहि येतील. प्राण हा तुझा, व शरीरहि तुझेंच कृत्य आहे; ह्मणून तूं आपले हस्तकर्मांवर दया कर. हे खडकरूप आश्रया, तुजसारिखा कोणीच नसतां, प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे; ह्मणून तूं आपले हस्तकर्मांवर दया कर. हे परमेश्वरा, प्राण हा तुझा आणि शरीरहि तुझेंच कृत्य आहे; ह्मणून तूं आपल्या नामाकरितां तसें कर. तुझें नांव दयाळू व कृपाळू देव राजा, असें आहे; (हें ऐकून) आह्मी येतों; ह्मणून तुझ्या नामाकरितां तसें कर. हे परमेश्वरा आमच्या देवा, तुझ्या नावांने आह्मी ह्मटलों गेलों आहों. तुझें नाम आह्मामध्यें गाजविलें जातें; ह्मणून हे परमेश्वरा आमच्या देवा, तूं आह्मास सोडूं नको. हे देवा, आमच्या कर्मांमुळें आह्मास लाज वाटती, आणि आमच्या पापामुळें आह्मी फजित होतों. आह्मास (तुजकडे) परतायास तोंड, आणि डोकें उंच करायास कपाळ नाहीं; कारण तुजविरुद्ध आह्मी केलेले अपराध फार वाढले आहेत. आह्मी आपल्या वाडिलांसहित तुजशीं वांकडे वर्तून दुष्टाई केली असतां,

हे परमेश्वरा, आमच्या देवा, आह्मी तुजपुढें काय ह्मणूं? काय सांगूं? आणि आपणास यथार्थ कसें मानूं? हे उंच स्थानीं राहणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय ह्मणूं? आणि हे आकाशांत वस्ति करणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय कळवूं? तूं गुप्त व उघड गोष्टी जाणत नाहींस कीं काय? तूं जगांतील सर्व गुह्य आणि प्राण्याचीं गुप्तकर्में जाणतोस. तूं सर्वांचीं अंतर्यामें पारखितोस; मन व गुर्दकमळें पाहतोस, आणि तुझ्या दृष्टीपासून कांहींच लपलें जात नाहीं. जरीं आमचे अपराध आह्मास दोषी ठरवितात; तरीं हे देवा, तूं आपल्या नामाकरितां आह्मास क्षमा कर. जर आमच्या पातकांकडे तूं लक्ष देशील, तर हे अनंत देवा, तुजपुढें कोण उभा राहूं शकेल? तुझें भय धरिलें जावें; ह्मणून तुजपासीं क्षमा आहे; आणि तुझ्याजवळ जीवनाचा उगम आहे; तुझ्या प्रकाशाने आमच्या दृष्टीस प्रकाश असतो. आमच्या न्यायीपणामुळें नव्हे, परंतु तुझ्या फार दयेमुळें आह्मी आपल्या विनंत्या तुजपुढें ओतितों (करितों.)

שמעה ११ हे प्रभो, ऐक; हे प्रभो, क्षमा कर; हे प्रभो, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कांकीं तुझ्या नगरास, आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे.

השיבנו ११ हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वींप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

(नव्या वर्षाच्या सनानंतर पश्चात्तापाच्या दिवसांत שבט יהודה बद्दल ११ אלהי הצבאות ह्मणावें).

אלהי הצבאות ११ हे करूबांवर बसणाऱ्या परमेश्वरा, सैन्याच्या देवा, तूं आपल्या लोकांस वचन केलें आहेस कीं, अहो मार्गें फिरणाऱ्या लेंकरांनों, फिरा; मजकडे मधुर गोष्टी करीत या; मला शोधा;

ह्मणजे तुह्मी पुष्कळ दिवस जगाल. तुझी वचनें सर्वकाळ स्थापित नाहीं-त कीं काय ? त्यांवरच भरंवसा टेकून आह्मी तुजकडे येतों. तूं चांगल्या जीवनांत आमची आठवण कर, तुझ्या फार दयेपैकीं आह्मावर दया कर. तूं चांगल्यासीं व वाईटांसींहि चांगला आहेस; व पश्चात्ताप करणाऱ्यांस अंगिकारण्यासाठीं तुझा उजवा हात लांबिवलेला आहे. तूं अपराध्यांच्या मरणाची आवड धरीत नाहींस; ह्मणून आह्मी (तुजकडे) सकाळीं व संध्याकाळीं (येतों). हे करूबांच्या सैन्यांत स्तुति पावलेल्या राजा, तूं आह्मास आमच्या पापांपासून व दोषांपासून शुद्ध कर; आमचीं अपार वाढलेलीं उल्लंघनें तूं क्षमा कर. कोरलेले खडकांकरितां (ज्या पूर्वजांपासून आह्मी कोरले गेलों अथवा उपजलों आहों), त्यांकरितां तूं आह्मास उत्तर दे; पश्चात्तापाचीं द्वारें बंद होऊं देऊं नको; परंतु आमचें ओरडणें तुजकडे येऊं दे. हे ज्वाला फाडणाऱ्या, तूं आह्मास आपणाजवळ घे; गुरें व मेंढरें अर्पिल्याप्रमाणें तूं आह्मास प्रसन्न हो. आह्मी आबाळ वृद्ध तुझ्या पुष्कळ दयेवर भरंवसा व विश्वास धरून तुजकडे फिरतों; ह्मणून हे उंचांत वास करणाऱ्या खडकरूप आश्रया आणि दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, आह्मांवर दया कर.

שבט יהודה येहुदाचा वंश जुलुमाखालीं व दुःखांत आहे; (आतां) रानांत सिंह (भक्ष्यावांचून) गर्जेल काय ? त्यांतील बाप व लेक, गरीब व दरिद्री तुझ्या तारणाची आशा करितात. आमच्या खंडनाच्यासमयीं, व आह्मी हासण्याचें पात्र होऊं नये ह्मणून, आह्माकरितां तूं उभा राहा; हे परमेश्वरा, तूं दूर कां उभा राहतोस ? हे करूबांवर बसणाऱ्या, तुझें खबुत्र (प्रिय लोक) मरणाच्या दरवाजाजवळ पोहोंचलें आहे, त्यावर प्रकाशीत हो; संकटसमयीं आह्मास सहाय दे (कर). देवाचा हात आखूड आहे काय ? जुन्या झालेल्या प्रवासांत आमचे दिवस नवे कर; (हे देवा), उठ, झोंपी कां जातोस (उगा कां राहतोस) ? जो देश त्यांचा नाहीं, तेथे तुझें पुत्र असतां,

त्यांची आठवण कर; परक्यांस त्यांजवळ येऊं देऊं नको. मोहोर करून गुप्त राखलेला शेवट (निवाडा) एकुलत्यांस कळीव; मग जियोन ऐकून संतोष पावेल, आणि येहुद्यांच्या कंन्या हर्ष करितील. हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, आमच्या विनंतीला वरील आकाशांत तूं चढूं दे.

אל מלך हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा, दयेकरून वर्तणाऱ्या, आपल्या लोकांच्या पापाची क्षमा करणाऱ्या, त्यांतील एक एक पार (दूर) करणाऱ्या, पाप्यास फारच क्षमा आणि उल्लंघन करणाऱ्यांस माफी करणाऱ्या, सर्व मांसमयांबरोबर व प्राण्याबरोबर यथार्थतेने वागणाऱ्या, त्यांच्या वाईटकृत्यांप्रमाणें त्यांची फेड नकरणाऱ्या; हे देवा, तुझे तेरा गुण उच्चारायास त्वां आह्मास शिकविलें आहेस, आणि पूर्वी नम्र (मोशे) यास कळविलेल्या त्या तेरा गुणांच्या कराराची* आज आह्मांकरितां आठवण कर. आणि शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर मेघांत उतरला, आणि तेथें त्याजवळ उभा राहिला, आणि त्याने परमेश्वराचें नाव मोठ्याने सांगितलें.

ויעבור "तेव्हां परमेश्वराने त्याच्या पुढें जवळून जाऊन मोठ्यानें असें ह्मटलें कीं, परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी आणि फार दयेचा व सत्यतेचा; हजारोंसीं दया राखितो; अन्याय व उल्लंघने व पाप यांची क्षमा करितो; आणि दोष्यांस निर्दोषी ठरविणारच नाहीं; ह्मणून आमच्या अन्यायाची, व आमच्या पापाची क्षमा कर, आणि आह्मास तुझें वतनरूप कर.

ויאמר אני אעביר तेव्हां तो बोलला कीं, मी

*निर्गम. ३४ १०

आपलें सर्व बरेंपण तुझ्यापुढें जवळून चालवीन, आणि तुझ्यापुढें परमेश्वराचें नाम प्रगट सांगेन, आणि ज्यावर दया करीन त्यावर दया करीनच, आणि ज्यावर ममता ठेवीन त्यावर ममता ठेवीनच."

רחמנא אדכר לן हे दयावंता, प्रियकर आब्राहामाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर.

בריל ויעבור पार जातांना (कळविलेल्या तुझ्या गुणा) करितां

हे दयावंता, बंधन पावलेल्या इसहाकाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर. בריל ויעבור

हे दयावंता, पूर्ण याकोबाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर

हे दयावंता, यथार्थ योसेफाच्या पुण्याची आह्मासाठीं आठवण कर

हे दयावंता, मोशे भविष्यवाद्याबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर.

हे दयावंता, आहारोन आचार्याबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर.

हे दयावंता, आवेशी पिनहासाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर.

हे दयावंता, अभिषिक्त दावीदाबरोबर केलेल्या कराराची आह्मासाठीं आठवण कर. "

हे दयावंता, शलोमो राजाच्या प्रार्थनेची आह्मासाठीं आठवण कर. "

हे दयावंता, तुझा उजवा हात उभारून आपलें तारण उगीव. "

हे दयावंता, लज्जित तोंडाने आह्मी तुला हाक मारायास आलों आहों; ह्मणून आह्मावर दया कर. בר״ל ויעבור

हे दयावंता, तुझें सामर्थ्य आह्मांमध्यें प्रगट कर. „

हे दयावंता, आमचे न्यायत्व प्रकाशांत आण. „

हे दयावंता, तुझें गौरव आह्मावर ठेव. „

हे दयावंता, आमच्या दुष्ट कृत्याप्रमाणे आमची फेड करूंनको. „

हे दयावंता, तुझें वैभव आह्मावर ओत. „

हे दयावंता, आह्माकरितां यथार्थता योज „

हे दयावंता, आह्मावर चांगलें योज. „

हे दयावंता, आह्मावर पुष्कळ चांगलें येऊं दे. „

हे दयावंता, तुझी दया आह्मावर लोट. „

(पश्चात्तापाच्या दाहा दिवसांत खालीं लिहिलेलीं पांच वाक्यें बोलावीं.)

हे दयावंता, आह्मास जीवनाच्या पुस्तकांत लिही. „

हे दयावंता, आह्मास दयेच्या पुस्तकांत लिही. „

हे दयावंता, आह्मास यथार्थतेच्या पुस्तकांत लिही. „

हे दयावंता, आह्मास सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत लिही. „

हे दयावंता, आह्मास चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिही. „

हे दयावंता, आह्मावरून तूं आपला राग व क्रोध जिंक (काढ.) „

हे दयावंता, तूं आमचा शेवट (नाश) करूंनको. „

हे दयावंता आमचीं ऋणें व आमचे अपराध आह्मास सोड व क्षमा कर. „

हे दयावंता, तुझ्या चांगुलपणाचा उजेड आह्मावर प्रकाशित कर. בדיל ויעבור

हे दयावंता, (तूं) आह्माकरितां आश्रय व साहायकारी हो. „

हे दयावंता, आमचें चांगलें होण्याची खूण कर. „

हे दयावंता, आमच्या प्रार्थनेसाठीं आकाश उघड. „

हे दयावंता, प्रसन्नतेने आमची प्रार्थना कबूल कर. „

हे दयावंता जाचणुकीच्या वेळीं आमच्या प्रार्थना व आमचे अर्ज कबूल कर. „

हे दयावंता, (आमच्या) जीवावर दया कर. „

हे दयावंता, चांगलें वर्ष आह्मांवर येऊंदे. „

हे दयावंता, तूं आपल्या क्रोधापासून फीर. „

हे दयावंता, तुजपुढून आह्मास रिकामे परतवूं नको. „

אנא כעב זדוני (हे देवा,) मी विनंती करितों कीं, माझे अधर्म तूं ढगाप्रमाणे पुसून टाक; आणि माझे अपराध क्षमा कर; कां तर ते पुष्कळ आहेत.

וסלחת לעוני आणि माझे अपराध क्षमा कर; कां तर ते पुष्कळ आहेत.

אך ימחה परंतु माझ्या बापासमोर लिहिलेलें कसें पुसून टाकलें जाईल ? कारण जें लिहिलें आहे, तें माझ्या वादाच्या दिवशीं पुसून टाकायास माझ्या विचाराप्रमाणे त्याच्या मनांतील विचार नाहींत; तें लिहिणे देवाचें लिहिणे आहे. וסלחת

בנא אם תחקור हे खडकरूप आश्रया, आतां जर तूं माझ्या तारुण्याचा शोध व चौकशी करितोस, (तर

पाहा) रात्रदिवस मी दुष्टाईची योजना केली; आणि जर माझ्या पापाचा व अतिक्रमाचा तपास करितोस, तर मी पायांच्या तळव्यापासून डोक्यापर्यंत दोषी आहें. וסלחת

יהרסון. ויבגון ज्या दिवशीं माझीं पातकें मजसमोर साक्ष देतात, तेव्हां माझे विचार कधीं मोडले जातात, आणि कधीं आशेने बांधले जातात. परंतु देव पाप क्षमा करणारा, कृपाळू व दयाळू आहे; ह्मणून निश्चयें माझे विचार बांधले जातील (स्थिर होतील). וסלחת

מה לידידי जें कांहीं माझ्या प्रियाचें व राज्याचें गुह्य आहे, त्यासाठीं मी प्रार्थना करितों; परंतु ती मान्य केली जात नाहीं; आणि माझ्या अंधक (खोल) स्वभावाविषयीं विचारितों; तर कोणीच मला त्याचा अर्थ सांगत नाहीं. मग मी ह्मणतों कीं, मी (तें समजूं) शकणार नाहीं; कारण त्यावर (देवाची) मोहोर आहे. וסלחת

שובה שיבת पाडाव करून नेलेले व भिसळलेले लोकांच्या शेषास तूं परतीव, आणि कराराप्रमाणे तुझ्या क्रोधाचा शेवट कळविण्याकरितां सुवार्ता घोषक पाठवून, जरी ते लोक बुद्धिमान नसले; तरीं तूं त्यांचें सांत्वन कर. וסלחת

הוסף יד (तूं आपला) हात आह्मावर पुनः लांबवून दुसऱ्यावेळीं आपला दूत (भविष्यवादी) पाठीव; आणि दडपलेलें व दुःखांत पडलेलें शिंग उगीव; ह्मणजे तो प्रबळ होऊन, जें कांहीं करील, तें सफळ होईल. तेव्हां ते जाणतील, कीं तो देवाचा अभिषिक्त आहे. וסלחת

ויעבור " " तेव्हां परमेश्वराने त्याच्या पुढें जवळून जाऊन मोठ्याने असें ह्मटलें कीं, परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी आणि फार दयेचा व सत्यतेचा; हजारो-

सीं दया राखितो; अन्याय, उल्लंघनें व पाप यांची क्षमा करितो; आणि दोष्यांस निर्दोषी ठरविणारच नाहीं; ह्मणून तूं आमचे अन्यायांची व आमच्या पापांची क्षमाकर, आणि आह्मास तुझें वतनरूप कर."

אנשי אמונה प्रमाणिक मनुष्यें नाहींसीं झालीं आहेत, तीं (आपल्या सत्कर्मांच्या) सामर्थ्याने (तुजपुढें) येत असत; खंडन सोसायास तीं शक्तिमान होतीं आणि तीं दुःखाचें निवारणहि करीत असत. क्रोधाच्यासमयीं तीं आह्मास भितीसारिखीं व आश्रयासारिखीं होतीं; तीं आपल्या गुह्य प्रार्थनेकडून राग शमवीत असत. हे देवा, त्यांनी तुला हाक मारिल्या अगोदर, त्वां त्यांस उत्तर दिल्हेंस. तीं तुला विनवायास व तुझी प्रसन्नता मिळवायास जाणत असत; ह्मणून तूं त्यांवर बापाप्रमाणे प्रीति करून, त्यांच्या तोंडांस (त्यांस) रिकामे परतविलें नाहींस. परंतु आमच्या पुष्कळ अपराधामुळें तीं नाहींसीं झालीं; आणि आमच्या पापामुळें तीं आपल्या पूर्वजांसी मिळालीं आहेत. आपण विसांव्याप्रत जाऊन, त्यांनी आह्मास धापादेण्यास मागें टाकलें आहे. कुपण नीट करणारे मोडकळीस गेले; राग फिरविणारे शांत (मृत) झाले. आतां खंडनांत उभे राहणारे (संकट दूर करणारे) कोणी नाहींत; तुझ्या प्रसन्नतेची वाट पाहणारे नाहींसे झाले. आह्मी पृथ्वीच्या चोहोंकोनीं भटकत फिरत आहों; परंतु कोठेच आह्मास अरोग्यता सांपडत नाहीं. आतां लज्जित तोंडाने क्षमा साधनाच्या वेळीं, हे देवा; आह्मी तुला शोधायास आलों आहों.

אל מלך पृष्ट. ९

תמהנו מרעות आह्मी वाईटामुळें अपधाकतों, संकटामुळें आमचें बळ खचतें; आह्मी फारच नीच होऊन धुळीस

मिळालों आहों. हे दयावंता, आमचा स्वभावहि तसाच आहे; आह्मी ताठर मानेचे व बंडखोर आहों. जरी आह्मी आपल्या तोंडाने ओरडून तुला हाक मारितों; तरी आह्मी पाप करितों व आमचे मन वाकडें व विपरित आहे. यद्यपि हे परात्परा! तुझी दया सर्वकाळापासून आहे, आणि क्षमा ती तुझ्या जवळच आहे. तूं वाईटाविषयीं अनुतापत असतोस, आणि दयेकडे वळतोस; ह्मणून अशा वेळीं लपून राहूं नको, कारण आह्मी मोठ्या विपत्तींत पडलों आहों. आह्मावरील तुझें चांगुलपण व दया सर्वांच्या दृष्टीस समजीव (पाड); आह्माविषयीं चाहाडी करूं नये, ह्मणून सातानाचें तोंड बंदकर; त्यास धमकाव ह्मणजे तो उगा राहील. आणि आह्मास यथार्थ ठरविण्याकरितां चांगला मध्यस्थ उभा कर; ह्मणजे तो आमचा सरळपणा कळवील. हे दयावंता व कृपावंता, जेव्हां तुझा घरचा विश्वासू (मोशे) याने तुजपुढें येऊन विनंती केली; तेव्हां तूं आपला मार्ग त्यास कळविलास व आपली सत्यता त्यास समजविलीस.

אל מלך पृष्ठ ९

אנא אל תעש हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, तूं आमचा विध्वंस नकरितां, न्यायांत आपला हात आटोपून धर. आह्मी तुझ्या समक्ष निषेध पावायास आलों असतां, तूं आमचीं नावें तुझ्या पुस्तकांतून पुसून टाकूं नको. जेव्हां तूं शिक्षण शोधायास (करायास) लागतोस; तेव्हां (आह्माकडे) रागापूर्वीं तुझी दया येऊंदे. चांगल्या कृत्यांविषयीं तुझ्या दृष्टींत आमचीं न्यूनता दिसून आली असतां, तुझी उपकारबुद्धि आह्माजवळ आण. हे आमच्या बापा, आह्मी ओरडत व विनंती करीत आहों, तुझी प्रार्थना करितांना आमचें तारण व्हावयास आज्ञा कर. सरळाच्या राहाटयांस

दासत्वांतून परतीव; कारण पाहा, त्याच्या (नगराचीं) द्वारें ओसाड पडलीं आहेत. तुझ्या वाक्याची आठवण राखून, त्याच्या संततीच्या मुखांतून प्रमाण नेमाचा विसर पडूं देऊंनको. त्या मोहोर केलेले प्रमाण नेम उघड, आणि तुझें गुह्य तुझ्या शिष्यांमध्यें; ह्मणजे पृथ्वीच्या मध्यभागीं अर्धचंद्राच्या आकृतिसारिखी वाटोळी बसणाऱ्या मोठ्या न्यायसभेच्या सभासदांमध्यें व त्या मोठ्या सभेचा एक तृतीयांस, ज्या लहान सभेंत असे, तिच्या सभासदांमध्यें स्थापित कर. हे अनंता! जे तुला ओळखितात, त्यांस तूं स्वीकार; परंतु जें राष्ट्र तुला जाणत नाहीं, त्यास नाकार; आणि आशेने बांधलेल्या (आशालागलेल्या) बंदिवानास दुर्गांकडे फिरीव.

११ אנא ११ हे परमेश्वरा, आमचा देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची प्रार्थना तुजपुढें यावी असें आह्मी मागतों; आणि आमच्या विनंतिपासून तूं लपून राहूं नको; कारण आह्मी यथार्थ आहों, आह्मी पाप केलें नाहीं, असें तुजपुढें बोलायास, हे आमच्या देवा व आमच्यापूर्वजांच्या देवा, आह्मास धिटाई व धारिष्ट नाहीं. निश्चये आह्मी व आमच्या वडिलांनींहि पाप केलें आहे.

אשמנו בגדנו आह्मी अतिक्रम केले, विश्वासघात केला, लुटलें, चाहाडी व वाईट भाषणेंहि केलीं. अपराध केले, दुष्टाई केली, गर्व केला, जुलूम केला, खोटें रचिलें, व वाईट योजनाहि केल्या. भोंदलें, थट्टा केली, बंडावा केला, अपवाद केला, आह्मी व्यर्थ व खोट्या शपथीहि वाहिल्या. अनिवार झालों, वांकडे वर्तलों, उल्लंघने केलीं, दुःख दिल्हें, आह्मी आपली मान ताठरहि केली. दुराचार केलें, नासलें, ओंगळ केलें, बहकलों आणि दुसऱ्यासहि बहकविलें. आणि

आह्मी तुझे सुंदर नियम व न्याय सोडून फितूर झालों; परंतु तेणेंकरून आह्मास कांहीं लाभ झाला नाहीं. तथापि जे अव- घें आह्मांवर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहेस, परंतु आह्मी दुष्टाई केली आहे.

אשמנו מכל עם आह्मी सर्व लोकांपेक्षा अधिक अतिक्रम केले आहेत; सर्व राष्ट्रांपेक्षां आह्मास अधिक लज्जा प्राप्त झाली आहे. आमचा हर्ष मावळला आहे; आमच्या पा- पामुळें आमचें ऱ्हदय मूर्छित झालें आहे. आमची आशा व्यर्थ गेली; आमचे अलंकार आह्मावरून हिरावून नेले आहेत. आ- मच्या पापामुळें आमच्या पवित्र मंदिराचा नाश होऊन नगर ओसाड पडलें आहे; आमचा सुंदर देश परक्यांस, आणि आ- मची संपत्ती इतरांस (दिल्ही गेली आहे.) असें असतां अद्या- प आह्मी आपल्या परिचारापासून परत येत नाहीं. मग हे आ- मच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी यथार्थ आहों; आह्मी पाप केलें नाहीं; असें तुजपुढें बोलायास आह्मास धिटाई व धारिष्ट कोठून असेल ? निश्चयें, आह्मी व आमच्या पूर्वजांनीं- हि पाप केलें आहे.

רבונו של עולם हे जगदीशा, उत्तररात्रीं मी आ- पलीं लाहान व मोठीं उल्लंघनें कबूल करितों. मी आपल्या कुकल्पनेंकडून व दुष्ट कृत्यांकडून तुला चिडविलें; (ह्मणून मी भयानें ह्मणतों,) पाहारेकऱ्या रात्रीचें काय ? पाहारेकऱ्या रात्रीचें काय? माझ्या मनानें व नेत्रांनीं पाप करण्याविषयीं मसलत केली, आ- णि रात्रंदिवस त्यांस विसावा नव्हता; आणि माझ्या उरलेल्या अवयवांनीं तुझ्या दृष्टीपुढें वाईट करण्याकरितां आपणामध्यें फु- सफुस केली, अवघा दिवस व अवघी रात्र ते उगेच राहात

नाहींत. आणि त्यां करायाच्या व नकरायाच्या आज्ञा मोडल्या, ह्मणून सर्व रात्रीं आपलें आंथरूण पाणीगत करितों; आपल्या अश्रूंनीं आपल्या पलंगास भिजवितों. ज्याचीं कृत्यें भयंकर (देव) तो कदाचित् माझ्या शोकाची वाणी ऐकेल; ह्मणून रात्रंदिवस मी ओरडत आहें. मी आपल्या उल्लंघनामुळें व आज्ञाभंग करण्यामुळें आपली वाणी उचलून ओरडतों; रात्रीं मला विश्रांती नाहीं. जो भविष्य जाणणारा (सर्वज्ञ,) त्यापुढें आपल्या पापाचा कांहींसा भाग आठवून, मी स्तुति करायास उठून येतों; आणि आजच्या रात्रीं मी देवासमोर आपलीं उल्लंघनें आणि अधर्म कबूल करितों.

אשמנו באמר आह्मी शब्देंकरून व कृत्यांकडून दोषी आहों; दुष्कर्में करण्याकरितां आह्मी तुझ्या नियमाचा धिःकार केला; न्याय व यथार्थतेचा आह्मी तिरस्कार केला; आणि आमचा मार्ग कांटेरी कुपणासारिखा झाला आहे. आह्मी करार मोडून, उल्लंघनें अपार वाढविलीं आहेत; तूं शिकविलेलें चांगलें आह्मी टाकून दिल्हें; आणि तूं धिःकारलेल्या वाईटासाठीं आह्मी श्रम केले. आह्मी खोटें व कपट रचिलें; आणि पापाची व दोषाची योजना केली; जगत्संबंधीं व्यर्थतेमध्यें आह्मी आपलीं (आयुष्याचीं) वर्षें संपविलीं; तूं सर्व गुप्त गोष्टीविषयीं आमचा न्याय करशील याची आठवण राखिलीच नाहीं. आह्मी ज्ञानाचा बोध धिःकारला; बुद्धि आणि ज्ञानाविषयीं आह्मी मूढ झालों आहों. तुझ्या यथार्थ न्यायाविषयीं आह्मीं असंतुष्ट झालों; आणि तुझ्या नियमाचा मार्ग आह्मीं सोडिला. आमचे तोंड (लक्ष) आमच्या आवडी पूरविण्याकडे लागलें आहे; आह्मी आमच्या वांछाच्या खाणींत बुडालों; ज्ञ. त्याच्या तोंडच्या निषेधामुळें आह्मास राग आला; दुष्टाईच्या

भाषणें करून सफळ व्हावें, ह्मणून आह्मी आपलें तोंड उघडलें. तुजपासून निरंतरचें फिरणें आह्मी फिरलों आहों; निषेधणाऱ्या मनुष्यास आह्मी ओंगळ मानिलें आहे. तथापि जें अवघें आह्मावर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहे, परंतु आह्मी दुष्टाई केली.

לעינו עשקו आमच्या दुष्कर्मांमुळें आमचे डोळे पीडित झाले आहेत; व आह्मी विखरलेले व लुचाडलेले आहों. शत्रूनें आह्मावर आपलें जोकड ठेविलें आहे; तें आह्मी आपल्या खांद्यावर वाहात आहों; दासांनी आह्मावर प्रभुत्व केलें; आह्मांस त्यांच्या हातांतून सोडवायास कोणी नाहीं. पुष्कळ संकटांनी आह्मास घेरिलें आहे; हे परमेश्वरा, आमच्या देवा, आह्मी तुला हांक मारितों, परंतु पाहा, आमच्या पापामुळें तूं आह्मांपासून दूर झाला आहेस. आह्मी तुझ्या मागून वळलों, आणि शेरडांप्रमाणें बहकून नाश पावलों; असें असतां, अद्यापि आह्मी आपल्या परिचारापासून मागें वळत नाहीं. मग हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी यथार्थ आहों; आह्मी पाप केलें नाहीं; असें तुजपुढें बोलायास आह्मास धिटाई व धारिष्ट कोठून असेल? निश्चयें, आह्मी व आमच्या पूर्वजांनीहि पाप केलें आहे

אשמנו בגדנו पृष्ठ १६.

ליי אלהינו הרחמים प्रभु, जो आमचा देव, त्याविरुद्ध जरीं आह्मी पाप केलें; तरीं त्याला दया आणि क्षमा आहे. प्रभु, जो आमचा देव, त्याविरुद्ध जरीं आह्मी बंडावा केला; तरीं त्याला दया आणि क्षमा आहे. (हे आमच्या प्रभो!) जें पाप आह्मी मूर्खपणाने व पापिष्ठपणाने केलें, तें आह्मावर लावूं नको.

חטאנו צורנו हे आमच्या खडकरूप आश्रया, आह्मी पाप केलें आहे; हे आमच्या निर्मानकर्त्या, आह्मास क्षमा कर.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे.

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे; परमेश्वर तोच देव आहे. (दोन वेळा बोलावें)

אראלי מעלה वरील आरआलीम दूत ह्मणतात कीं, परमेश्वर आमचा प्रभु आहे; आणि निवडलेली संपत्ति (इस्राएल) उत्तरेंकरून ह्मणते कीं, परमेश्वर तोच देव आहे. יי הוא האלהים

גלגלי מעלה वरील गलगालीम दूत ह्मणतात कीं, परमेश्वर आमचा प्रभु आहे; आणि प्रख्यात संपत्ति (इस्राएल) उत्तरेंकरून ह्मणते कीं, परमेश्वर तोच देव आहे. יי הוא האלהים

יי מלך परमेश्वर राज्य करीत आहे, परमेश्वरानें राज्य केलें आणि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. (दो. वे.)

בטרם שחקים आकाश व पृथ्वी विस्तारल्यापूर्वीपासून परमेश्वर राज्य करीत आहे; ज्योति प्रकाशल्यापूर्वी परमेश्वरानें राज्य केलें; आणि पृथ्वी वस्त्राप्रमाणें जीर्ण झाल्यावर व आकाश धुराप्रमाणें विरघळून गेल्यावरहि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. יי מלך

ועד לא עשה पृथ्वी व शेतें उत्पन्न केलीं नव्हतीं तेव्हांपासून परमेश्वर राज्य करीत आहे; पृथ्वीवरील घडिवलेले पदार्थ सिद्ध केल्या अगोदर परमेश्वरानें राज्य केलें; आणि परागंदा झालेले, चोहोंकडून एकत्र होण्याच्या वेळनंतरहि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. יי מלך

מיוחד באהיה जो आहे तोच खुद्द आहे; तोच होता, तोच आहे व तोच असेल; तोच मारणारा व जि-

वंत करणारा; कोणीं निर्माण झालेला देव त्याच्यापूर्वीं नव्हता, व त्याच्यानंतरहि कोणीं व्हायाचा नाहीं.

אחד אלהנו आमचा देव एकच, आमचा प्रभु मोठा, त्याचें नाव पवित्र व भयंकर आहे. तर तुझी दया आकाशा एवढी, आणि तुझी सत्यता आभाळा एवढी मोठी आहे. तूं मोठा आणि आश्चर्याचीं कृत्यें करणारा आहेस. तूंच केवळ देव आहेस. ज्या राष्ट्रांनीं तुला जाणिलें नाहीं, त्यांवर; आणि ज्या राजांनी तुझें नाम घेतलें नाहीं, त्यांवर; तूं आपला संताप ओत.

לקדושת שמך आह्मास नको; परंतु तुझ्या पवित्र नामास गौरव दे. हे परमेश्वरा, आह्मास नको; परंतु तूं आपल्या दयेवरून व आपल्या सत्यतेवरुन आपल्या नामास गौरव दे. राष्ट्रांनीं कां ह्मणावें ? कीं, त्यांचा देव आतां कोठें आहे ! तर आमचा देव आकाशांत; एकच जो देव, तो आकाशांत आहे. प्रत्येक दिवशीं दोन वेळा आह्मी (त्याचें एकत्व) मानितों. तो जिवंत व निश्चल आहे; तो दयेने व यथार्थतेनें व्यापलेला आहे. त्याला जें आवडलें, तें सर्व त्यानें आकाशांत व पृथ्वींत केलें आहे. तूं काय करितोस ? असें त्यास ह्मणणारा कोणीं नाहीं; आणि तूं काय चालविलें आहेस ? असें त्यास ह्मणणारा कोणीं नाहीं; कारण सर्व त्याच्या हाताचीं कामें आहेत.

אלהנו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणीं ऐक, आणि प्रसन्नतेनें आमची प्रार्थना कबूल कर.

אמן तथास्तु.

हे आमच्या आकाशांतील देवा, या आमच्या दीर्घ दासत्वांत तूं आमचा नाश करूं नको. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, जे आमच्या वाईटावर उठतात, त्या सर्वांचा नाश कर. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, तूं आपल्या कराराची आठवण कर, आह्मास विसरूं नको. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या अन्नपाण्यास आशीर्वाद दे. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास शुभवर्तमान ऐकीव. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, सर्व कठोर व वाईट शासनें आह्मावरून रद्द कर (उडीव). ”

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या राज्याचें वैभव आह्मामध्यें लवकर प्रगट कर. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांविषयीं चांगला निवाडा कर. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मी तुझा शोध करीत असतां, आह्मास सांपड. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मावर उठणाऱ्यांपासून आमच्या रक्ताची झडती घे. ”

हे आमच्या अकाशांतील देवा, आज व नेहमी तूं आमची प्रार्थना ऐक. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास तुजकडे पूर्ण पश्चात्तापानें परतीव. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या आशेविषयीं आह्मास लाजवूं नको. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मी हाक मारितों आणि तूं आह्मास उत्तर दे. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, तूं आपल्या समोर आमची चांगली आठवण कर. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या न्यायांत आह्मास यथार्थ ठरीव. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमची आणि आमच्या मुलांलेकरांची करुणा तुला येऊं दे. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या पापापासून आह्मास शुद्ध कर. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या विटाळापासून आह्मास शुद्ध कर. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्माविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे. „

पश्चात्तापाच्या दाहा दिवसांत खालीं लिहिलेलीं पांच वाक्यें ह्मणावीं.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिही. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास यथार्थ व धार्मिक लोकांच्या पुस्तकांत लिही. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत लिही. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास शुद्धतेच्या पुस्तकांत लिही. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिही. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास जिंकणाऱ्यांस तूं जिंक. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा तूं विध्वंस करूं नको. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, जर आह्माकरितां नाहीं; तर तूं आपल्या नामाकरितां आमचें कार्य कर. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मावर जुलूम करणाऱ्यांवर तूं जुलूम कर „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्माबरोबर लढणाऱ्यांशीं तूं लढ. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचे मनोरथ चांगल्या प्रकारें पूर्ण कर. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा सूड तूं उगीव. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या खचण्याच्या वेळीं आह्मास आश्रय दे. „

हे आमच्या आकाशांतील देवा, दावीदाच्या पडलेल्या मंडपास आश्रय दे. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या विनंतीचें उत्तर दे. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मी हाक मारितों त्या दिवशीं आह्मांस उत्तर दे. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या सर्व शत्रूंच्या हातांतून आह्मास सोडीव. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या वाईट विचारापासून आह्मास मोकळें कर. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मावर तुझा आशीर्वाद होण्याविषयीं आज्ञा कर. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास तुझें तारण मि-

मिळावें, ह्मणून आज्ञा कर. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या न्यायांत आह्मास यथार्थ ठरीव. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या उद्धाराचा वेळ आह्माजवळ आण. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या तारणाचा दिवस आह्माजवळ आण. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करायासाठीं आह्मास जवळ ने. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा वाद करून आह्मास सोडीव. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांच्या दुःखाकडे पाहा. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचे रोग दूर कर. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, जुलूमाच्या वेळीं आह्माकडे पाहा. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचें ओरडणें मान्य कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मांमध्यें शांति राख. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या वाड्यांत सुख असूं दे. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या प्रभुराजास जीवन व शांति दे. ”

हे आमच्या आकाशांतील देवा, त्याच्या मनांत आह्मांविषयीं चांगलें घाल. ”

हे आमच्या आकाशांतीलदेवा, पृथ्वीवर शांतता असूंदे. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, जगांत तृप्तता असूं दे. „

हे आमच्या आकाशांतील देवा, या राज्यांत शांतता असूं दे. „

हे आमच्या आकाशांतील देवा, पृथ्वीवर दंहिवर व पर्जन्य आशीर्वादरूप व्हावे; ह्मणून त्यांच्या योग्यसमयीं त्यांस पडूं दे. „

हे आमच्या आकाशांतील देवा, पेरायास बीज व खावयास भाकर दे.

हे आमच्या आकाशांतील देवा, (आमच्या) कुटुंबाच्या संख्येप्रमाणे भाकर देत ऐस. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमची प्रार्थना तुजसमोर धूपासारिखी मानिली जावो. „

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचें चांगलें होण्याची, आमचें तारण होण्याची, आणि आह्मास दया प्राप्त होण्याची, खूण कर; मग आमचे द्वेष्टे पाहून लाजतील, आणि आमचे शत्रू अवलोकन करून घाबरतील; कारण तूंच आमचें सहाय व समाधान करणारा आहेस. क्रोधाच्या समयीं (आब्राहामावर झालेली) दया स्मर; क्रोधाच्यासमयीं (इसहाकाचें) बांधले जाणें स्मर; क्रोधाच्या समयीं (याकोबाची) पूर्णता स्मर; आणि क्रोधाच्यासमयीं प्रीति आठवून, त्वां आह्माबरोबर केलेला करार न मोडतां, या वेळीं व या दुःखांत आह्मास उत्तर दे.

אלהים אתה ידעת हे देवा, माझे मूर्खपण व माझे अतिक्रम तुला कळले आहेत, आणि माझा सर्व गर्व तुजपुढें गुप्त नाहीं; ह्मणून जेव्हां मी आपल्या मनांत पुष्कळ वि-

चार करितों, तेंव्हां मी पाण्यासारिखा रिचविला जातों, आणि माझीं हाडें खिळखिळीं होतात. तुझा दयेचा दरवाजा ठोकणारा करितां, आणि तुजपासून क्षमा मागण्याकरितां, जे भिकाऱ्यासारिखे उभे आहेत, त्यांकरितां कोपाच्यासमयीं तूं दया स्मर; कारण तुझा मोठेपणा कळविण्याकरितां माझे डोळे रात्रीच्या प्रहराची वाट पाहातात; मी या पिढीला तुझें बळ, व जो येईल, त्याला तुझा पराक्रम दाखवीन. माझे डोळे उघड, मग मी तुझा शास्त्रांतील अद्भुत कृत्यें पाहीन; आश्चर्य गोष्टींच्या वेळाची वाट पाहाणारे तुझ्या नामाचें कीर्तन करितात; ह्मणून तूं त्याच्या विखरलेल्या वस्त्या सर्व प्रदेशांतून परतीव; कारण तूंच परमेश्वर सैन्याचा देव आहेस. हे सैन्याचा देवा, आह्माकडे फीर, तूं न्यायानें आह्मास भयंकर उत्तर दे, तुझा अभिषिक्त दाखीव आणि आमची ढाल (तारणारा) आह्मास पाहूं दे; मग जे तुजवर भरंवसा ठेवितात, ते सर्व आनंदीत होऊन सर्वकाळ हर्ष शब्द करितील. हे आमच्या बापा आह्मास उत्तर दे.

אבינו עננו हे आमच्या बापा, आह्मास उत्तर दे.

עננו आह्मास उत्तर दे.

हे आमच्या उत्पन्न कर्त्या, आह्मास उत्तर दे. עננו

हे आमच्या उद्धारका, आह्मास उत्तर दे. ”

हे आह्माविषयीं चौकशी ठेवणाऱ्या, आह्मास उत्तर दे. ”

हे तेज व महत्त्व यांनी वेष्टिलेल्या, आह्मास उत्तर दे. ”

हे सूड घेण्यांत न्यायी असणाऱ्या, आह्मास उत्तर दे. ”

हे यथार्थ व सरळ (देवा,) आह्मास उत्तर दे, ”

हे जिवंत व निश्चल (देवा) आह्मास उत्तर दे. ”

हे निर्मळ दृष्टीच्या, आह्मास उत्तर दे. ”

हे आकाशांत राहणाऱ्या, आह्मास उत्तर दे. ”

हे सर्व शक्तिमान (देवा) आह्मास उत्तर दे. ”

हे दुष्टाईची आवड न धरणाऱ्या, आह्मास उत्तर दे. עננו
हे राजा, व राजांच्या राजा, आह्मास उत्तर दे. „
हे भयंकर व गड्रूप (देवा,) आह्मास उत्तर दे. „
हे पडलेल्यांस आश्रय देणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे गरीबांचें सहाय करणाऱ्या, आह्मास उत्तर दे „
हे खंडून घेणाऱ्या, व संकटांतून मुक्त करणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे यथार्थ आणि यथार्थ ठरविणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे हाक मारणाऱ्यांच्या जवळ असणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे उंच व महत्त्ववान् (देवा), आह्मास उत्तर दे. „
हे आकाशांत वस्ति करणाऱ्या, आह्मास उत्तर दे. „
हे पूर्ण लोकांच्या आश्रया, आह्मास उत्तर दे. „

עננו מלך מלכי המלכים हे राजा, आणि राजांच्या राजा, आह्मास उत्तर दे.

हे आब्राहामाच्या देवा, आह्मास उत्तर दे.
हे प्रसन्नतेच्यावेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.
हे इसहाकाच्या भयपात्रा, आह्मास उत्तर दे.
हे संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.
हे याकोबाच्या बळदाऱ्या, आह्मास उत्तर दे.
हे दयेच्यावेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.
हे दावीदाच्या रक्षका, आह्मास उत्तर दे.
हे (करूबांच्या) रथांत बसणाऱ्या, आह्मास उत्तर दे.
हे दयावंता, व कृपावंता, आह्मास उत्तर दे.

רחום וחנון हे दयावंता व कृपावंता, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

אדון הסליחות हे क्षमाशील देवा, मने पारख-णाऱ्या, खोल गोष्टी प्रगट करणाऱ्या, आणि सत्य वक्त्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

הדור בנפלאות हे चमत्काराने सुशोभित, सू-ड घेण्यांत न्यायी असणाऱ्या, पूर्वजांच्या कराराची आठवण रा-खणाऱ्या आणि गुप्त कमळें शोधणाऱ्या, आह्मी तुजपुढें पाप के-लें आहे; आह्मावर दया कर

טוב ומטיב לבריות हे मनुष्यमात्रांशी चांगला असणाऱ्या, व चांगलें करणाऱ्या, सर्व गुप्त गोष्टी जाणणाऱ्या, (आमचे) अपराध धूळीस मिळविणाऱ्या व सात्विकपणा प-रिधान करणाऱ्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

מלא זכיות हे यथार्थतेनें भरलेल्या,स्तुतीनें भयंकरा, दोष क्षमा करणाऱ्या आणि संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

פועל ישועות हे उद्धारका, भविष्य जाणणाऱ्या, पिढ्यांस बोलविणाऱ्या (उत्पन्न करणाऱ्या,) प्रार्थना ऐक-णाऱ्या, आणि पूर्ण बुद्धीचा, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

אל רחום שמך तुझें नाव दयाळू देव व तुझें नाव कृपाळू देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל אדיר שמך तुझें नाव बळवंत, धन्य, मोठा व कीर्तिमान देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टां-कडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל הדור שמך तुझें नाव सुशोभित, न्यायी, यथार्थ व कृपाळू देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל טהור שמך तुझें नाव निर्दोष, एकच, पराक्रमी व अनादी देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל מלך שמך तुझें नाव राजा, भयंकर, आश्रय देणारा व सहाय करणारा देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל פודה שמך तुझें नाव उद्धारक, सात्विक, पवित्र व दयाळू देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל שדי שמך तुझें नाव विश्वंभर, पूर्ण, आधार देणारा व प्रबळ देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל רחום שמך तुझें नाव दयाळू देव, तुझें नाव कृपाळू देव, तुझें नाव मंदक्रोधी देव, व तुझें नाव करुणासागर असें आहे; आणि तुझें नाम आह्मामध्यें गाजीवलें जातें; ह्मणून तुझ्या नामाकरितां (आमची विनंती मान्य) कर.

पश्चात्तापाच्या दाहा दिवसांतच मात्र खालीं
लिहिलेलीं वाक्यें ह्मणावीं.

יי חננו והקימנו हे परमेश्वरा, आह्मावर दयाकरून आह्मास स्थापित कर.

ובספר חיים आणि आह्माविषयीं आठवण करून जीवनाच्या पुस्तकांत लिही.

हे परमेश्वरा, कृपा करून तारणाचे दिवसाचें शुभवर्तमान आह्मास ऐकिव. ובספר חיים

हे परमेश्वरा, तुझ्या दयेचा पूर आह्मावर येऊं दे. „

हे परमेश्वरा, कृपा करून तुझी दया आह्मापुढें येऊं दे. „

हे परमेश्वरा, आह्माविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे. „

हे परमेश्वरा, आज आह्मास तूं आपल्या ह्रदयावर मोहोरीप्रमाणें करून ठेव. „

हे परमेश्वरा, आमचा वाद व आमची लढाई तूं कर. „

हे परमेश्वरा, आमचा अन्नपाण्यास आशीर्वाद दे. „

לְמַעַן עֲשֵׂה יי हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां (आमची विनंती मान्य) कर. „

וחוסה על ישראל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर. „

हे परमेश्वरा, तुझ्या पूर्णतेमध्यें जन्मलेल्या (आब्राहामाकरितां) आमची विनंती मान्य कर. וחוסה על ישראל

हे परमेश्वरा, तुझ्या खांबांशी बांधला गेलेल्या (इसहाकाकरितां) आमची विनंती मान्य कर. „

हे परमेश्वरा, आकाशांतून शिडीवरून उत्तर मिळालेल्या (याकोबाकरितां) आमची विनंती मान्य कर. „

हे परमेश्वरा, तुझा यथार्थ योसेफ, याच्या पुण्याकरितां आमची विनंती मान्य कर. „

हे परमेश्वरा, पाण्यांतून काढलेल्या (मोशेकरितां) आमची विनंती मान्य कर. „

हे परमेश्वरा, तुझ्या उरीम व थुम्मीमाने आचार्यपणा चा-

लविणाऱ्या (आहारोनाकरितां) आमची विनंती मान्य कर. ”

हे परमेश्वरा, तुझ्या नामाचा शुद्ध (खरा) आवेश॰ धरणाऱ्या (पिनहासाकरितां) आमची विनंती मान्य कर. ”

हे परमेश्वरा, (दाविदाच्या) सुंदर गीतांकरितां आमची विनंती मान्य कर. וחוסה על ישראל

हे परमेश्वरा, तुझ्या नामासाठीं मंदिर बांधणाऱ्या (शलोमो) राजाकरितां आमची विनंती मान्य कर. ”

हे परमेश्वरा, तुझ्या नामाच्या एकत्वाकरितां, जे मारले व जाळले गेले, त्यांकरितां आमची विनंती मान्य कर. ”

हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां आमची विनंती मान्य कर. ”

עשה למען שמך (हे परमेश्वरा,) तूं आपल्या नामाकरितां आमची विनंती मान्य कर. तूं आपल्या सत्यतेकरितां, आपल्या कराराकरितां, आपल्या मोठेपणाकरितां, आपल्या नियमाकरितां, आपल्या महत्वाकरितां, आपल्या वचनाकरितां, आपल्या आठवणीकरितां, आपल्या दयेकरितां, आपल्या चांगुलपणाकरितां, आपल्या सरळपणाकरितां, आपल्या गौरवाकरितां, आपल्या मततत्वाकरितां, आपल्या राज्याकरितां, आपल्या अनाद्यंततेकरितां, आपल्या गुप्त भावाकरितां, आपल्या सामर्थ्याकरितां, आपल्या वैभवाकरितां, आपल्या यथार्थतेकरितां, आपल्या पवित्रतेकरितां, आपल्या दयेकरितां, आपल्या साक्षात्काराकरितां, आणि आपल्या शास्त्राकरितां, आमची विनंती मान्य कर.

עשה למען אברהם (हे परमेश्वरा), आब्राहाम, इसहाक व याकोब यांकरितां; मोशे व आहारोन यांकरितां; दावीद व शलोमो याकरितां; पवित्र यरूशालेम नगराक-

रितां; सीयोन, जें तुझ्या गौरवाचें वसतिस्थान, त्याकरितां; तुझ्या नाश पावलेल्या मंदिराकरितां; तुझ्या ओसाड पडलेल्या वाड्याकरितां; गरीब इस्राएल लोकांकरितां; दरिद्री इस्राएल लोकांकरितां; दुःख सोसणाऱ्या इस्राएल लोकांकरितां; विधवा व पोरक्याकरितां; तान्हे बाळाकरितां; दुध पित्याकरितां; शाळेंत शिकणारांकरितां व ज्याकडून कांहींच पाप घडले नाहीं, त्यांकरितां आमची विनंती मान्य कर.

עשה למענך जर आह्माकरितां नाहीं, तर तूं आपणाकरितां (आमची विनंती मान्य कर;) तूं आपणा करितां तसें करून आमचें तारण कर आणि आज व नित्य आमच्या प्रार्थना ऐकून आह्मास तार व आह्मास उत्तर दे; कारण तूंच आमचें स्तुतिपात्र आहेस.

ענני ענני हे गरीबांस उत्तर देणाऱ्या,

עננו आह्मास उत्तर दे.

हे दुःखीतांस उत्तर देणाऱ्या, עננו

हे नम्र आत्म्याच्यांस उत्तर देणाऱ्या ”

हे उदासी मनाच्यांस उत्तर देणाऱ्या, ”

हे खिन्न आत्म्याच्यांस उत्तर देणाऱ्या, ”

हे आब्राहामास मोरिया डोंगरावर उत्तर देणाऱ्या, ”

हे इसहाकास स्थंडिलाच्या बाजूवर उत्तर देणाऱ्या, ”

हे याकोबास बेथएलांत उत्तर देणाऱ्या, ”

हे योसेफास बंदिशाळेंत उत्तर देणाऱ्या, ”

हे मोशेला व आमच्या पूर्वजांस सूफ समुद्राच्या (तीरीं) उत्तर देणाऱ्या, ”

हे आहारोनास धूप दाखवितांना उत्तर देणाऱ्या, ”

हे पिनहासास शित्तीमांत उत्तर देणाऱ्या, ”

हे यहोशुवास गिलगालांत उत्तर देणाऱ्या, עֲנֵנוּ

हे एलीस रामांत उत्तर देणाऱ्या, "

हे शमुएलास मिजपांत उत्तर देणाऱ्या, "

हे दावीद व त्याचा पुत्र शलोमो यांस यरूशालेमांत उत्तर देणाऱ्या, "

हे एलीयास कार्मेल डोंगरावर उत्तर देणाऱ्या, "

हे एलीशास येरीहोंत उत्तर देणाऱ्या, "

हे हिज्किकियास रोगाचे समयीं उत्तर देणाऱ्या, "

हे योनास माशाच्या पोटांत उत्तर देणाऱ्या, "

हे हनानया, मीशाएल आणि आजार्या यांस जळत्या अग्नीच्या भट्टींत उत्तर देणाऱ्या, "

हे दानीएलास सिंहाच्या गुहेंत उत्तर देणाऱ्या, "

हे मुर्देखाय व एस्तेर यांस शूशान राजवाड्यांत उत्तर देणाऱ्या, "

हे एज्रास दासत्वांत उत्तर देणाऱ्या, "

हे होनीस कुंडलींत*उत्तर देणाऱ्या, "

हे पिढीपिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर देणाऱ्या,"

---

* एन इस्राएल या नावाच्या एका ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, होनी हा कोणी सात्विक मनुष्य होता; तो ज्या देशांत राहत असे, त्या देशांत ईश्वरी अवकृपेमुळें पर्जन्य पडला नाहीं. तेव्हां तेथील सर्व लोकांनी त्याजवळ येऊन असी विनंती केली कीं, आपण देवाजवळ काकळूत करून पर्जन्य मागावा. मग त्यानें आपणा भोंवतें कुंडली करून असी शपथ वाहिली कीं, ईश्वर या देशावर पर्जन्य पाडील तेव्हांच मी या कुंडलींतून बाहेर पडेन. असी शपथ करून तो तेथे ईश्वरास विनवीत बसला असतां, पर्जन्याची शिडशिडी आली; परंतु त्याचे शिष्य

רחמנא עניגן हे दयावंता, आह्मास उत्तर दे; हे दयावंता, आमचा उद्धार कर; हे दयावंता, आह्मास सोडीव; हे करुणासागरा, आह्मावर, आमच्या कुटुंबांतील सर्व मनुष्यावर आणि आमच्या सर्व इस्राएल बांधवांवर दयाकर; आणि तूं आपल्या मोठ्या नावाकरितां आह्मास अंधारांतून काढून उजेडांत आण.

אם אפם जरीं पाखर घातलेला घरोटा*नाहींसा झाला आहे, आणि जरीं नांदती राहोटी ओसाड पडली आहे; तरीं (हे देवा) आमच्या वृद्ध बापाकरितां (आब्राहामाकरितां) तूं आमचा नाश करूं नको. (त्यास असी आज्ञा झाली होती कीं,) तूं आपला प्रिय पुत्र घे, आणि त्याचें रक्त स्थंडिलाच्या बाजूस पीळ, त्याची तूं भीड धर; कारण आह्मी त्याच्या पुण्याची तुजपुढें आठवण करितों. (असी आज्ञा होतांच) आणि त्याचा जीव त्यासीं गुंतला असतांहि; तो आपला पुत्र पवित्र करायास (अर्पायास) धांवला; आणि त्याच्या देवाचा मुगूट (देवाची कृपा) त्याच्या डोईवर असतांहि, त्याने त्यास सरपणाने व अग्नीने वेष्टिलें. तो एकुलता हरणाप्रमाणे त्वरित चालत असतां ह्मणाला, बापा, पाहा, आपण अग्नी व सरपण आणिलें आ-

त्यास ह्मणाले कीं, त्या शपथीपासून मोकळें व्हावें ह्मणूनच ती शिडशिडी आली, तेणेकरून देशांत चांगलें पीक होणार नाहीं. असें ऐकून तो आणखी प्रार्थना करूं लागल्यावर पावसाची झोड लागली. तेव्हां त्याचे शिष्य त्यास ह्मणाले कीं, अशा पर्जन्याने आमची अधिक नासाडी मात्र होते. मग तिसऱ्या वेळीं त्याने प्रार्थना केल्यावर चांगला पाऊस पडूं लागला. असे त्याचे शिष्य तृप्त झाल्यावर तो त्या कुंडलींतून बाहेर निघाला.

* ईश्वराच्या वैभवाने भरलेलें पवित्र मंदिर.

हे; परंतु भेटीसाठीं कांहींच आणिलें नाहीं. तेव्हां पुत्र घाबरूं नये, यासाठीं बाप मृदु शब्दें करून उत्तर देऊन ह्मणाला; हे माझ्या पुत्रा, देव आपणाकरितां तें पाहून मिळवील; आणि त्याविषयीं कसें तें परमेश्वर आपणास कळवील. (हे देवा) तुझ्या आज्ञा त्या दोघांनींहि सांभाळल्या, आणि तुझ्या मागून वळायास संशय नघेतां, उतावळीनें व घाईनें एका डोंगरावर गेले. त्यांनी एक लोंबतें ढग पाहिल्यावर एका आवडीनें (प्रेमानें) होमाची लांकडें व आणखी सर्व उतावळीनें सिद्ध केलें, आणि रानांतील मार्ग (अर्पणाची जागा) नीट केले. जेव्हां त्या एकुलत्यानें पाहिलें कीं, अर्पणासाठीं कोंकरा पाहिजे तो तोच आहे; तेव्हां तो आपल्या परीक्षित बापास ह्मणाला, जसें शेरडूं अर्पितात, तसें तूं मला कर; मजवर दया करूं नको व मला लपवून ठेऊं नको. माझी आवड व इच्छा तसीच आहे माझें मन अवांकत नाहीं; जरीं तूं माझा शेवट करायास (अर्पायास) हयगई केलीस, तरीं माझा आत्मा व माझा जीव त्याकडे परत घेतला जाईल. मग त्यानें त्याचे हात व पाय बांधून आपली तरवार तपासून पाहिली, आणि त्यास लाकडांवर ठेवायास त्वरा करून स्थंडिलावर अग्नीहि पेटविला. मग पुत्रानें आपली मान लांबविल्यावर, त्याचा बाप आपल्या स्वामीच्या नामाकरितां त्यास वधायास जवळ आला असतां, पाहा, देव येऊन त्याजवळ उभा राहिला. जें कांहीं तो करीत होता, तें पाहिल्यावर, असें दिसून आलें कीं, हा बाप आपल्या पुत्रामुळें उगाच राहिला नाहीं; त्यानें आपलें मन हातावर घेतलें होतें. मग लवकरच (देवानें) त्यास हांक मारून ह्मटलें कीं, पाहा, तुझ्या ताडलेल्या पुत्राबद्दल (अर्पायास) एक एडका आहे, तो घे आणि अर्प; उशीर करूं नको. (हे देवा). त्याच्या श्वासा-

बद्दल जें वाहतों तें धुपासारिखेंच स्थाप (मान्य कर), आणि तें अर्पण व त्याबद्दल आह्मी जें वाहतों, तेंहि तुजपुढें चढूं दे.

זכרון לפניך (आमची) आठवण तुजपुढें आकाशांत सर्वकाळ राहावी; ह्मणून ती पुस्तकांत कोरून ठेव, आणि आब्राहाम व इसहाक यांबरोबर केलेला सर्वकाळचा करार तूं मोडूं नको. तुला हाक मारणारे तुजपुढें नमन करायास येतात, तर संकटसमयीं बांधला गेलेला (इसहाकास) उठीव (स्मर); आणि तुझ्या शेरडांची दयेनें पाहणी करून त्यांचें तोंड पट्टेदारांकडे लाव (त्यांस अन्य लोकांपासून वेगळें कर.) हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, तुझ्या गौरवास उठवून, जे झोपीं गेले आहेत, त्यांस जागृत कर; आणि जे दूर केलेले तुझ्यामुळें कांपत, आज पाहांटेस तुजपासून क्षमा मागायास आले आहेत, त्यांस तुजसाठीं खंडून काढ.

אל מלך पृष्ठ ९

סלח לנו אבינו हे आमच्या बापा, आह्मी पाप केलें आहे; ह्मणून आह्मास क्षमा कर; हे आमच्या राजा, आह्मीं उल्लंघनें केलीं; ह्मणून आह्मास माफ कर. कां तर हे प्रभू! तूं चांगला, क्षमाशील आणि जे तुला हांक मारितात त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. तूं आपल्या प्रसन्नतेनें सियोनेचें बरें कर; यरूशालेमाची गांवकुसें बांध. तेव्हां नीतीचे यज्ञ, होम व सर्वांग होम तुला आवडतील, तेव्हां तुझ्या वेदीवर खोंडाचे होम करितील.

(सुंता अथवा दुसरें कोणतेंही शुभकार्य असल्यास एथून

אתאנר पर्यंत सोडावें, आणि तें बोलल्यावर

שומר ישראל बोलावें.)

למתודה חטאתיו (हे क्षमाशील देवा, तुझ्यामागून वळलेला इस्राएल) आपलीं पापें कबूल करायास, आणि पुष्कळ वाढलेले अतिक्रम पत्कारायास आला आहे; त्यांचीं वर्षें व्यर्थतेमध्यें व त्याचें आयुष्य दुःखांत संपलें; ह्मणून तो आपल्या संकटामुळें, आणि जे त्यांवर उठतात त्यांच्या वादामुळें ओरडत आहे.

נפלה נא (ते ह्मणतात), आह्मी परमेश्वराच्या हातांत पडूं कांकीं त्याची दया मोठी आहे.

מהיותי משכתי मी आपल्या सर्व आयुष्यांत दुष्टपणाच्या दोऱ्यांनी अन्याय ओढिले, ह्मणून मी फिरून पश्चात्ताप करितों; कारण कोणत्यादिवशीं माझा न्याय होईल तें मी जाणत नाहीं. आणि कदाचित माझा उद्धारक मजवर दया करील, ह्मणून मी आपले मांस अर्पितों (दुःख केल्यावरून मी शुष्क होतों) आणि आपल्या डोळ्यांतील अश्रू वाहातों; कारण त्याची दया नाहींसी झाली नाहीं. נפלה נא

שדי גילי माझ्या हर्षाचीं स्तनें कोरडीं पडलीं, ह्मणून मी पेथेन सर्पाचें विष चोखितों; आणि दगडाप्रमाणें कठीण झालेल्या दुःखामुळें माझ्या डोळ्यांतील पाणी आटून गेलें. ते बापाच्या दयेसाठीं आग्रह करितात परंतु तो लेंकरावर दया करीत नाहीं; त्याच्या आंतड्यांतील (मनांतील) कळव-

ला व त्याची करुणा मजवरून बंद झाली आहे. נפלה נא

הביאני בבור त्यानें (देवानें) मला सिंहाच्या गुहेंत नेऊन टाकिल्यावरून त्यांचा क्रोध माझें वतनच झालें आहे; त्यानें मला बंदीशाळेंत सोडिलें आहे, आणि तेथील रोषाच्या समुद्रांत मला बुडविलें आहे; परंतु जेव्हां त्याचा राग मजवरून फिरेल, तेव्हां नित्य मजकरितां चमत्कार उतरतील (केलेजातील). तरी आतां देव कृपा करायास विसरला कीं काय? त्यानें आपली ममता रागानें आटोपली कीं काय?

(कोणी בזכרי למתודה याबद्दल ह्मणतात)

בזכרי मी बिछान्यावर आपल्या मनांतील अहंकाराची व अतिक्रमांची आठवण करून, देवाच्या घरीं त्याच्या पादासनांजवळ उठून आलों आहें; आणि आपले डोळे उंच करून त्याच्या आकाशाकडे विनंती करीत आहें. נפלה נא

לך אלי हे देवा, माझ्या सामर्थ्याच्या खडकरूप आश्रया (तुला मी विनवितों;) हे संकटसमयीं आश्रय देणाऱ्या, या प्रवासांत मी आपली आशा, आवड व इच्छा तुजवर ठेविली आहे; माझ्या मनांतील सर्व मागण्या व माझ्या सर्व वांछा तुजसमोर आहेत; यास्तव तुजकडे ओरडणाऱ्या तुझ्या चाकरास त्याजवर अधिकार करणारांच्या व त्याजवर उठणारांच्या हातांतून सोडीव. נפלא נא

עננו יי עננו हे परमेश्वरा, संकटसमयीं जेव्हां मी तुला हाक मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे; मला उत्तर दे; मग लोक असें समजतील, कीं तुझा हात आखूड नाहीं; आणि जो गरीब शत्रूच्या वादामुळें ओरडून, आपलीं उल्लंघनें व गु-

मांत केलेलीं पापें तुजपुढें कबूल करीत आहे, त्याचें दुःख तूं धिःकारूं नको. נפלה נא

מה יתאונן मातीचा घडलेला (मनुष्य) ज्याचें शरीर बारीक धुळीसारिखें चेंचरलें जाईल, तो काय निमित्त देईल? काय ह्मणेल? काय सांगेल? आणि आपणास यथार्थ कसें मानील? जरी तो दोषी अथवा यथार्थ असला, तरीं हे देवा, तो तुला काय देईल? त्याचीं वचनें व कृत्यें कालवृत्तांताच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत काय? נפלה נא

חצות לילה तुझे सेवक अर्ध रात्रीं उठून तुझी स्तुति करीत आले आहेत; हे याकोबाच्या पवित्रा, त्यांस खंडून घेणाऱ्या, त्यांच्या पूर्वजांचें पुण्य त्यांकरितां तूं आठीव, आणि त्यांचीं कुत्सित कर्मैं मनावर धरूं नको; पूर्वींच्या दिवसाप्रमाणें तूं आपल्या समुदायास खंडून घे; मग वर (आकाशांत) शांति राखणारा देव उंचाविला जाईल. נפלה נא

—*—

भूमीवर पडून हें बोलावें.

ויאמר דוד तेव्हां दावीदानें गादाला ह्मटलें, मी फार संकटांत आहें, आतां मी परमेश्वराच्या हातांत पडेन; कांकीं त्याची दया मोठी आहे, आणि माणसाच्या हातांत न पडावें.

רחום וחנון हे दयाळू व कृपाळू, आह्मी तुजविरुद्ध पाप केलें आहे; तर आह्मावर दया कर व आह्मास तार.

गीत २५

" לדוד אליך " हे परमेश्वरा, मी आपला जीवात्मा तुझ्याकडे वर लावितों. हे माझ्या देवा, त्या

तुजवर आशा ठेविली आहे; त्या लज्जित न व्हावें, माझ्या शत्रूंस मजवर हर्ष्रू देऊं नये. जे तुझ्या आशेवर राहतात, ते सर्व लज्जित न व्हावे; जे उगेच दगा करितात, ते लज्जित व्हावें. हे परमेश्वरा, तूं आपले मार्ग मला कळीव, आपल्या, वाटा मला शिकीव. तूं आपल्या सत्यतेच्या मार्गाने मला चालीव आणि मला शिकीव, कारण कीं तूं माझ्या तारणाचा देव आहेस; सर्व दिवस मी तुजवर आशा ठेवितों. हे परमेश्वरा, तूं आपल्या फार ममतेची, आपल्या फार दयेची आठवण कर, कांतर त्या सर्वकाळापासून आहेत. हे परमेश्वरा, तूं माझ्या बाळपणांतलीं पापें, आणि माझे अतिक्रम आठवूं नको; तुझ्या दयेप्रमाणें, तुझ्या चांगुलपणा मुळें माझी आठवण कर. परमेश्वर चांगला व नीट आहे; यास्तव तो पाप्यांस मार्गी लावितो. दीनास न्यायाने चालवितो; आपलाच मार्ग दीनांस शिकवितो. जे परमेश्वराचा करार व त्याचे नेम पाळितात, त्यांसीं त्याच्या सर्व वाटा दयारूप व सत्यतारूप आहेत. हे परमेश्वरा, तूं आपल्या नामामुळें माझा अन्याय क्षमा कर, कारण कीं तो मोठा आहे. जो माणूस परमेश्वराला भितो, तो कोण ? त्यास तो निवडलेल्या मार्गांत शिकवील. त्याचा जीव सुखी राहील, आणि त्याचें संतान पृथ्वीचें वतन पावेल. परमेश्वराचें रहस्य त्याच्या भिणाऱ्यांसी आहे, आणि तो आपला करार त्यांस कळवील. माझे डोळे परमेश्वराकडे नेहमी आहेत, कारणकीं, तो माझे पाय जाळयांतून काढितो. तूं मजकडे पाहा आणि मजवर दया कर; कारण कीं मी एकला व दुःखित आहें. माझ्या ऱ्हदयांतलीं संकटें वाढविलेलीं आहेत; तूं माझ्या पेंचांतून मला काढ. माझें दुःख व माझे कष्ट पाहा, आणि माझीं सर्व पापें क्षमा कर. माझ्या शत्रूंवर पाहा कांकीं ते बहुत

आहेत, आणि त्यांनी कठोर द्वेषानें मला द्वेषिलें आहे. तूं माझा जीव राख आणि मला सोडीव; त्या लज्जित न व्हावें, कां तर मी तुजवर आशा ठेविली आहे. यथार्थपण व नीटपण यांनी मला राखावें; कां तर मी तुजवर आशा ठेवितो. हे देवा, इस्राएलाला त्याच्या सर्व संकटांतून खंडून काढ. तोच इस्राएलाला त्याच्या सर्व अन्यायांतून खंडून घेईल."

אלהי ישראל ׳׳ हे परमेश्वरा, इस्राएलाच्या देवा, तूं आपल्या रागाचा संताप सोड, आणि आपल्या लोकांवरच्या या वाईटाविषयीं पश्चात्ताप कर (मन पालट).

रविवारची प्रार्थना.

שועת עמך ׳׳ हे परमेश्वरा, तुझ्या लोकांच्या ओरडण्याकडे कान लाऊन, आमचे बरें होण्याची खूण कर; कारण तुझ्या इस्राएल लोकांसारिखे दुसरें कोणतें राष्ट्र आहे? त्यांस सिंहाच्या दातांपासून सोडवून, चोहोंदिशांपासून एकवट कर; आणि त्यांतील एक प्रत्येकाच्या जवळ आण. तुझी राहोटी (मंदिर) जडून एक होण्याकरितां, सियोनेच्या विलापाचें शांत्वन कर; आणि भटकत फिरणाऱ्या आहोलीबावर* तूं दया कर. एदोम व मोआब यांनी माझा जीव खांचेंत नाहींसा केला; त्यांनी निंदाकरून माझ्या गालावर चपराका मारिल्या; एक इकडून व एक इकडून. गुप्तांत त्यांनी मजकरितां फांस मांडिला व खांच खणिली; त्यांनी मजविरुद्ध एकत्र फुसफुस केली, चांगलें करणारा कोणी नाहीं, एक देखील नाहीं. हे मजबूत आकाशांत वस्तिकरणाऱ्या, तूं आपल्या लोकांस धैर्य दे: मग तुझे शत्रू नाहींसे व दंडास पात्र होतील; आणि परमेश्वर

* येहेजके २३, ४ एथे आहोलीबा हे नाव विटाळलेल्या येरूशालेमेस दिल्हें आहे.

सर्व पृथ्वीवर राजा होईल, त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नामहि एकच.

सोमवारची प्रार्थना.

בוחן לבות ׳׳ हे परमेश्वरा, मनुष्य पुत्रांचीं मनें शोधणारा व गहन मोठालीं कृत्यें करणारा तूं एकटाच आहेस; (तुझ्याच सामर्थ्यानें) संध्याकाळ व सकाळ होऊन दुसरा दिवस झाला. तुझ्या सेवकाचें हार्द व ह्मणणे ऐक, त्याच्या खांद्यावर प्रवासाचें ओझें आहे; तर त्याच्या पडण्याच्या दिवशीं त्यास उठवायास एकावांचून दुसरा नाहीं. जे लोक तुजसमोर ओरडत आहेत, त्यांकरितां तुझ्या कराराची आठवण कर; तुझा सेवक याकोब, याच्या पुत्रांचे दुसऱ्याने (तारण होण्यास) आज्ञा कर. हे माझ्या प्रियकरा, आमची विनंती ऐक, आणि सुआराचा पुत्र नेथानिएल याने दुसऱ्या दिवशीं अर्पिलेल्या होमाच्या पुण्याईकरितां आमची प्रार्थना नजराण्याप्रमाणें मान्य कर. तुझ्या लोकांच्या प्रार्थनेकडे कान लाव, आणि आह्मासाठीं तुझ्या पुण्याचा अभिषिक्त पाठीव; मग आह्मी तुजपुढें सकाळीं एक व संध्याकाळीं एक असे मेंढे अर्पण करूं. हे माझ्या राजा, माझे मन धीट कर, आणि जर माझा मार्ग गुप्त आहे, तर माझा अंधार प्रकाशित करायास त्वरा कर, आणि आज सोमवारीं तूं आपल्या सेवकास सफल कर.

मंगळवारची प्रार्थना.

דלו עיני ׳׳ हे परमेश्वरा, वर पाहून माझे डोळे थकले आहेत; हे प्रभू! माझ्या दुःखामुळें मी ओरडतों; आणि मला फार क्लेश व यातना झाल्यामुळें माझा आत्मा माझ्यांत बुडून जातो; ह्मणून मी आपला जीव ईश्वरापुढें ओतितों (मी आपला मनोदय ईश्वराजवळ कळवितो). हे अनंता! माझें ह्म-

णणें ऐकून माझें चांगलें होण्याची खूण कर; कारण हे परमेश्वरा, त्वां पुष्कळ (चांगलें) केलें आहेस. हे यथार्थ देवा व तारका, मी दुबळा आहे, मला तार; म्या तुझ्या तारणाची वाट पाहिली आहे. जरीं माझे शत्रू मजवर उठतात, तरीं माझें मन भिणार नाहीं; कारण हे परमेश्वरा, म्या तुजवर आशा ठेविली आहे. हे माझ्या रक्षका, तरवार नाहीं, परंतु मी आपला हात तुझ्यामुळें उभारितों; कारण तरवार व भाला यांकडून परमेश्वर संरक्षण करीत नाहीं. माझे शत्रु वाढले व ते मजवर अधिकार करूं लागले असतां, हे परमेश्वरा, तूं आपणास आकळिशील काय? हे सूड घेणाऱ्या, आणि रोषयुक्त देवा, त्वां आपलें तोंड कां लपविलें? पाहा, शत्रुने मला वेढिलें आहे. देव सर्वकाळ आव्हेरील काय? असा माझा जीव विचार करितो; व त्यामुळें माझें मन घाबरतें. गर्विष्ठ मजसीं वाद करितात; परंतु माझे विचार मला उत्तर देतात कीं, देव सर्वकाळ आव्हेरणार नाहीं. तुझ्या दयेची मी आवड धरितों; कारण हे परमेश्वरा, मी तुझीच वाट पाहतों; हे प्रभू देवा, तूंच मला उत्तर दे.

बुधवारची प्रार्थना.

אם גדל ११ हे परमेश्वरा, जरीं माझा दंड सोसण्यापेक्षां अधिक झाला असेल, आणि म्या वेडेपणा केला असेल, तरी तूं आपल्या चाकराचा न्याय करायास येऊं नको. माझ्या मनांवर झालेले घाय लक्षांत आण, माझ्या तारुण्यांतील पापें पार कर; आणि आपल्या सेवकाला गर्विष्ठ लोकांपासून आवरून धर. माझा शोक वाढला आणि माझ्या कण्हण्यामुळें माझें मन भंगलें असतां, तूं आपल्या दासाचा जीव हर्षित कर. माझे वाईट इच्छिणारे मजवर वाढले, माझ्या नाशामुळें ते आनंदित होतात; ह्मणून तूं आपल्या चाकरापासून आपलें तोंड

२८७१ नोबमध्यें सभामंडप उभारण्यास आरंभ*; एथें १३ वर्षें अर्पणें व होम होत होते. १ शे. अ २१ ओ १.

२८७१ शेमूएल भविष्यवाद्यानें ११ वर्षें न्याय केला. १ शे. अ ७ ओ १५–१६.

२८७६ शेमूएलानें दावीदास अभिषेक केला. १ शे. अ १६ ओ १–१३.

२८७७ दावीदानें गोल्याथ पेलिशती जो युद्धवीर यास जीवें मारिलें. १ शे. अ १७.

२८७७ शाऊलाकडून दावीदाचा पाठलाग. १ शे. अ १८ ओ २९.

२८८२ शेमूएल ५१ वर्षांचा होऊन मरण पावला. ता० २८ ईयार. १ शे. अ २५ ओ १.

२८८४ पेलिशती लोकांनी शाऊलाचा पराजय करून त्याचे तिघे पुत्र योनाथान, आबीनादाब व मलकीशूवा यांस मारिलें. १ शे. अ ३१ ओ १–२.

२८८४ शाऊल जखमी झाल्या मुळें त्यानें आत्महत्या केली. १ शे. अ ३१ ओ ३–६.

---

* १ शे. अ ४. एथें लिहिलेली-इस्राएल व पेलिशती यांमध्यें जी लढाई झाली, त्या लढाईमध्यें इस्राएलांचा पराजय होऊन पेलिशत्यांनी कराराचा कोश नेला, व तो आशदोदांत दागोन मूर्तीच्या देवळांत ठेविला. दुसऱ्या दिवशीं दागोनाचे पुजारी जेव्हां देवळांत गेले, तेव्हां त्यांनी दागोन कोशापुढें भूमीवर पालथा पडलेला व त्याचें डोकें व हात उंबऱ्यावर मोडून पडलेले पाहिले; आणि आशदोदांतील लोकांस मुळव्याधीचा रोग झाला. मग त्या लोकांनी तो कोश तेथून गाथास नेला. तेथील लोकांसहि तोच रोग झाला. मग तेथून एक्रोनास नेला; तेथेंहि असाच प्रकार घडून आला. शेवटीं सात महिन्यां नंतर त्यांनी तो कोश त्याजबरोबर कांहीं अर्पणें देऊन स्वतां बेथशेमेश या ठिकाणीं आणून पोंचविला. इस्राएलांनी तो तेथून किर्याथ येआरीम एथें नेऊन ठेविला. परंतु हा कोश जरी किर्याथ येआरीम एथें होता, तरी १ शे. अ २१ ओ १-७ वरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, सभामंडप नोबामध्यें असावा. कारण दर्शनीय भाकरी ज्या सभामंडपांत वाहिल्या जात त्या तेथें होत्या. याप्रमाणें सुमारें तेरा वर्षें पर्यंत दुसरीं अर्पणेंही नोबांतच वाहिलीं जात असत.

उत्पत्तीचें वर्ष.

२८८४ गिबओनांत* सभामंडप उभारण्यास आरंभ. २ का. अ १ ओ ३.

२८८४ दावीदाने हेब्रोनांत साडेसात वर्षें राज्य केलें. २ शे. अ २ ओ १–४.

२८८४ शाऊलाचा पुत्र इशबोशेथ यास आबनेराने राजा नेमिला, यावरून त्याची व दावीदाची लढाई. २ शे. अ २ ओ ८– अ ४.

२८९२ दावीदाने येरूशालेमेंत साडे बत्तीस वर्षें राज्य केलें. २ शे. अ ५ ओ ५.

२८९२ येरूशालेम इस्राएलांची राजधानी झाली. २ शे. अ ५ ओ ९.

२९१२ शेलोमो राजाचा जन्म. २ शे. अ १२ ओ २४.

२९१३ आमनोन व तामार यांची गोष्ट. २ शे. अ १३.

२९२१ आबशालोमाचें बापा विरुद्ध बंड. २ शे. अ १५.

२९२२ बिनयामीनी वंशांतील बिखरीचा पुत्र शेबा याने दावीदा विरुद्ध बंड केलें, परंतु एका शाहाण्या बाईने त्याचा शिरच्छेद करून आबेल नगराच्या भिंतीवरून त्याचें डोकें दावीदाचा सरदार योआब याचे स्वाधीन केलें. २ शे. अ २० ओ १–२६.

२९२३ आदोनीयाने राज्यकारभार आपले हातीं घेतला. १ रा. अ १ ओ ५.

२९२४ दावीदाचा मृत्यु. १ रा. अ २ ओ १०-११

२९२४ शेलोमोने ४० वर्षें राज्य केलें. १ रा अ. २ ओ १२

२९२४ आहीया शीलोनी भविष्यवादी. १ रा. अ ११. ओ २९.

२९२५ दोन कसबीणींच्या वादाचा शेलोमो कडून निवाडा. १ रा. अ ३ ओ १६–२८.

---

* १ शे. अ २२. ओ १९ एथें लिहिल्या प्रमाणें शाऊलाने नोब शहराचा नाश केल्यावर शाऊलाच्या मरणानंतर सभामंडप गिबओनांत उभारला; व अर्पणें व दुसरे विधि सर्व तेथेंच होत असत, परंतु कराराचा कोश तेथें नव्हता, तो दावीद येरूशालेमेस नेई पर्यंत किर्याथ येआरीम एथेंच होता.

उत्पत्तीचें वर्ष.

२९२८ शेलोमोनें मिसरांतून निघण्याच्या ४८० व्या वर्षी पवित्र मंदिर बांधण्यास आरंभ केला. १ रा. अ ६.

२९३५ शेलोमोच्या हातून पवित्र मंदिर पूर्ण झालें. ता० २३ तिशरी. १ रा. अ ६ ओ ३८.

२९४८ शेलोमोने हीरामास वीस नगरें दिल्हीं. १ रा. अ ९ ओ ११.

२९४८ शेलोमो एसयोन गेबेरास गेला व तेथून त्याने ओफीरास तारवें पाठविलीं. २ का. अ ८ ओ १७.

२९६१ यारबआमाचें बंड. १ रा. अ ११ ओ २६.

२९६४ शेलोमो ४० वर्षें राज्य करून मरण पावला. १ रा. अ ११ ओ ४०–४१.

येहूदाचे व इस्राएलांचे राजे.

२९६४ रहबआम शेलोमोचा पुत्र, याने १७ वर्षें राज्य केलें. १ रा. अ १२ ओ १.

२९६४ यारबआम नेबाताचा पुत्र इस्राएलांच्या दाहा वंशांवर राज्य करूं लागला, याने २२ वर्षें राज्य केलें. १ रा. अ १२ ओ २५.

२९६९ शीशाक मिसराचा राजा, याने येरूशालेम जिंकून पवित्र मंदिर लुटलें. १ रा. अ १४ ओ २५–२६.

२९८१ आबीया रहबआमाचा पुत्र येहूदाचा राजा, याने ३ वर्षें* राज्य केलें. १ रा. अ १५ ओ १.

२९८२ आबीयाने यारबआमावर जय मिळविला. २ का. अ १३ ओ ३–२०.

२९८३ आसा आबीयाचा पुत्र येहूदाचा राजा, याने ४१ वर्षें राज्य केलें. १ रा. अ १५ ओ ८–१०.

२९८५ नादाब इस्राएलांचा राजा, याने २ वर्षें राज्य केलें. १ रा. अ १५ ओ २५.

* खरोखर हिशेब करून पाहातां आबीयाने दोन वर्षें व कांहीं महिने मात्र राज्य केलें असें सांपडतें.

उत्पत्तीचें वर्ष.

२९८६ बाआशाने नादाबास मारिलें व आपण इस्राएलांचा राजा झाला, याने २४ वर्षें राज्य केलें. १ रा. अ १५. ओ २७-२८.

२९९३ येहूदाच्या राज्यांतील दाहा वर्षांच्या शांततेची समाप्ति. २ का. अ १४ ओ ६.

२९९८ जेराह कुशी हा येहूदाचा राजा आसा याजवर चढून आला व त्याचा पराजय झाला. २ का. अ १४ ओ ९-१५.

३००९ एला बाआशाचा पुत्र इस्राएलांचा राजा, याने २ वर्षें राज्य केलें. १ रा. अ १६ ओ ८.

३०१० जिम्री याने एला यास मारिलें व आपण इस्राएलांचा राजा झाला, याने ७ दिवस राज्य केलें. १ रा. अ १६ ओ ९-१०.

३०१० ओम्री जो जिम्रीच्या सैन्याचा सरदार, याने जिम्रीस मारिलें व आपण इस्राएलांचा राजा झाला, याने १२ वर्षें राज्य केलें. १ रा. अ १६ ओ १६.

३०१० इस्राएलांचें राज्य ओम्री व तिबनी यांमध्यें दुभागलें. १ रा. अ १६ ओ २१.

३०१४ ओम्री एकछत्री राज्य करूं लागला. १ रा. अ १६ ओ २२-२३.

३०२० ओम्रीने शोमरोन नगर बांधिलें. १ रा. अ १६ ओ २४.

३०२१ आहाब इस्राएलांचा राजा, याने २२ वर्षें राज्य केलें. १ रा. अ १६ ओ २९.

३०२२ आसाचे पायास रोग झाला. २ का. अ १६ ओ १२.

३०२४ येहोशाफात आसाचा पुत्र येहूदाचा राजा, याने २५ वर्षें राज्य केलें. १ रा. अ १५ ओ २४.

३०२७ येहोशाफाताने आपले सरदारांस येहूदाचे नगरांत शिकवायास पाठविलें. २ का. अ १७ ओ १७.

३०३४ शोमरोनांतील मोठा दुष्काळ. १ रा. अ १८ ओ २.

३०३४ ओबादया भविष्यवादी. १ रा. अ १८ ओ २.

३०४१ आहाबास येहोशाफाता बरोबर रामोथ गिलआदामध्यें आरामाचे राजासीं लढतांना घाय झाला. १ रा. अ २२ ओ ३४.

उत्पत्तीचें वर्ष.

३०४१ आहाजिया आहाबाचा पुत्र, इस्राएलांचा राजा, यानें २ वर्षें राज्य केलें. १ रा. अ २२ ओ ४०.

३०४२ येहूदाचीं व इस्राएलांचीं तारवें एकत्र होऊन तारशीशास जातांना मार्गांत फुटलीं. २ का. अ २० ओ ३६.

३०४३ येलीशा भविष्यवादी १ रा. अ १९ ओ १९.

३०४३ येलीया भविष्यवादी वादळांत चढून गेला. २ रा. अ २ ओ ११.

३०४३ योराम आहाबाचा पुत्र, इस्राएलांचा राजा, यानें १२ वर्षें राज्य केलें. २ रा. अ ३ ओ १.

३०४७ येहोराम येहोशाफाताचा पुत्र येहूदाचा राजा, यानें बाप असतां कांहीं वर्षें राज्य चालवून पुढें ८ वर्षें राज्य केलें. २ रा. अ ८ ओ १६.

३०५० येहोरामानें आपले सर्व भावांस मारून टाकिलें. २ का. अ २१ ओ २–४.

३०५० येलीया भविष्यवाद्याचें पत्र* येहोरामास आलें. २ का. अ २१ ओ १२.

३०५५ येहूनें योरामास मारिलें आणि आपण इस्राएलांचा राजा झाला, यानें २८ वर्षें राज्य केलें. २ रा. अ ९. ओ ११–२६.

३०५५ आहाजिया येहोरामाचा पुत्र येहूदाचा राजा, यानें १ वर्ष राज्य केलें. २ रा. अ ८ ओ २४–२६.

३०५५ येहोयादा मुख्य याजक. २ रा. अ ११ ओ ४.

३०५५ योना† भविष्यवादी यानें येहूच्या दिवसांत भविष्य कथन केलें. २ रा. अ ९ ओ १.

---

* येलीया वादळांत चढून गेल्यानंतर सात वर्षांनी हें त्याचें पत्र कसें आलें यावरून कोणास संशय येईल. परंतु हें पत्र त्यानें वादळांत चढून जाण्या अगोदर लिहून ठेविलें असावें; अथवा इस्राएली टीकाकारांच्या मताप्रमाणें त्यानें दुसऱ्या कोणा भविष्यवाद्यास दृष्टांत देऊन त्यास हें पत्र लिहावयास व येहोरामास देण्यास सांगितलें असावें.

† रशीव रद्दाक या टीकाकारांच्या मतें २ रा. अ ९. ओ १. या वाक्यांतील येलिशानें बोलावलेला भविष्यवाद्यांचा एक तरणा तोच योना; अणखी २ रा. अ ११. ओ २५. एथें ही योनाचें नांव सांपडतें.

उत्पत्तीचें वर्ष.

३०५६ आहाजिया येहूसीं लढतांना मरण पावला. २ रा. अ ९.

३०५६ आथालया राणी येहोरामाची बायको व आहाजियाची आई इनें आहाजियाचा पुत्र योआश याखेरीज सर्व राजकीय कुटुंबाचा नाश करून आपण स्वतां राज्य करूं लागली, इनें ६ वर्षे राज्य केलें. २ रा. अ ११ ओ १.

३०६१ आथालया राणीस लोकांनी मारिलें. २ रा. अ ११. ओ २०.

३०६१ येहोआश आहाजियाचा पुत्र सात वर्षांच्या वयांत येहूदावर राज्य करूं लागला, यानें ४० वर्षे राज्य केलें. २ रा. अ १ ओ ११.

३०७० जेखार्या येहोयादाचा पुत्र मुख्य याजक २ का. अ २४ ओ २०.

३०८३ येहोआहाज येहूचा पुत्र इस्राएलांचा राजा, यानें १७ वर्षें* राज्य केलें. २ रा. अ १३ ओ १.

३०८४ येहोआश राजानें पवित्र मंदिराची मरामत करविली. २ रा. अ १२ ओ ४–१६.

३०९० होशेया भविष्यवादी. हो. अ १ ओ १.

३०९८ योआश येहोआहाजाचा पुत्र इस्राएलांचा राजा, यानें १६ वर्षें राज्य केलें. २ रा. अ १३. ओ ९.

३१०० जेखार्या येहोयादाचा पुत्र यास येहोआश राजानें शाब्बाथ असून किप्पूरच्या दिवशीं पवित्र मंदिराच्या अंगणांत मारिलें. २ का. अ २४ ओ २२.

३१०० येहोआश राजानें आरामाचा राजा हाजाएल यास पुष्कळ द्रव्य देऊन आपला देश त्याच्या हातांतून सोडविला. २ रा. अ १२ ओ १७, १८.

---

* जरी येहोआहाजानें १७ वर्षें राज्य केलें असें लिहिलें आहे, तरी त्याच्या राज्याच्या १५ व्या वर्षी त्याचा पुत्र योआश राज्य करूं लागला असें हिशोबा अंतीं सांपडतें. यावरून येहोआहाज व त्याचा पुत्र योआश या दोघांनी २ वर्षें एकत्र राज्य चालविलें असावें असें सिद्ध होतें.

उत्पत्तीचें वर्ष.

३१०० येहोआश आपल्या चाकराच्या हातून मारला गेला. २ रा. अ १२ ओ २१,२२.

३१०० आमासिया येहोआशाचा पुत्र येहूदाचा राजा, याने २९ वर्षें* राज्य केलें. २ रा. अ १४. ओ १,२.

३१०९ येलीशा भविष्यवादी मरण पावला. २ रा. अ १३ ओ १४-२०.

३११० आमोस भविष्यवादी. आमो. अ १ ओ १

३११२ आमासियाने एदोमी लोकांचा पराजय केला. २ रा. अ १४ ओ ७.

३११३ योआशाने आमासियाचा पराजय करून त्यास कैदेंत नेलें. आणि येरूशालेम व पवित्र मंदिर हीं लुटलीं. २ रा. अ १४ ओ ९-१४.

३११५ उज्जिया हा त्याचा बाप आमासिया जीवंत असतां १५ वर्षांच्या वयांत येहूदावर राज्य करूं लागला, त्याने ५२ वर्षें राज्य केलें. २ रा. अ १४ ओ २१.

३११५ यारबआम दुसरा योआशाचा पुत्र इस्राएलांचा राजा, याने ४१ वर्षें † राज्य केलें. २ रा. अ १३ ओ १३.

३१२९ आमासियास लोकांनी बंड करून मारिलें. २ रा. अ १४ ओ १७-२०.

३१४० येशाया भविष्यवादी. येशा. अ १. ओ १.

३१५३ जेखार्या यारबआमाचा पुत्र, इस्राएलांचा राजा, याने ६ महिने राज्य केलें, यास शलुम याने मारिलें. २ रा. अ १५ ओ ८-११.

३१५४ शलुम इस्राएलांचा राजा याने १ महिना राज्य केलें, यास मेनाहेम याने मारिलें. २ रा. अ १५ ओ १३.

३१५४ मेनाहेम इस्राएलांचा राजा, याने १० वर्षें राज्य केलें. २ रा. अ १५ ओ १४-१८.

---

* हीं २९ वर्षें त्याच्या मरणा पर्यंत गणिलीं आहेत.

† दुसऱ्या यारबआमाने बाप जीवंत असतां तीन वर्षें राज्य चालविलें, म्हणून ४१ वर्षें मोजिलीं जातात. त्याने स्वतां एकट्याने ३८ वर्षें राज्य केलें.

उत्पत्तीचें वर्ष.

३१५५ मेनाहेमानें आश्शुराचा राजा पूल यास सुमारें १२००००० रुपये देऊन आपला देश त्याच्या हातांतून सोडविला. २ रा. अ १५ ओं १९-२१.

३१६० मीखा भविष्यवादी. मी. अ १ ओ १

३१६५ पेकाया मेनाहेमाचा पुत्र इस्राएलांचा राजा, यानें २ वर्षें राज्य केलें, यास पेकानें मारिलें. २ रा. अ १५ ओ २२, २३.

३१६७ पेका इस्राएलांचा राजा, यानें २० वर्षें राज्य केलें. २ रा. अ १५ ओ २५-२८.

३१६८ योथाम उज्जियाचा पुत्र येहूदाचा राजा, यानें १६ वर्षें राज्य केलें. २ रा. अ १५ ओ ७.

३१७४ योथामाचा पुत्र आहाज यास हिजकीया हा पुत्र झाला. येशा. अ ९ ओ ६.

३१८४ आहाज योथामाचा पुत्र येहूदाचा राजा, यानें १६ वर्षें राज्य केलें. २ रा. अ १६ ओ १.

३१८६ आहाजावर आरामाचा राजा रेसीन व इस्राएलांचा राजा पेका हे चढून आले, परंतु त्यांचा पराजय झाला. २ रा. अ १६ ओं ५-१८.

३१८७ रेऊबेन, गाद व मेनाश्शेचा अर्धा या अडीच वंशांस आश्शुराचा राजा तिगलाथ पिलएसेर यानें पाडाव करून नेलें. २ रा. अ १५ ओ २९.

३१८७ आहाजानें तिगलाथ पिलएसेर याजबरोबर तह केला. २ रा. अ १६ ओ ७-१०.

३१८७ होशेया इस्राएलांचा राजा, यानें पेकास मारिलें व आपण राज्य करूं लागला. २ रा. अ १५ ओ ३०

३१९० योएल भविष्यवादी. शलशेलेथ हाकब्बाला.

३१९५ होशेयानें मिसराचा राजा सो याच्या सहायानें आश्शुराचा राजा सालमनेसार याजवर बंडावा केला; परंतु पराजय पावला. २ रा. अ १७ ओ ३, ४.

उत्पत्तीचें वर्ष.

३१९९ येहिजकीया आहाजाचा पुत्र येहूदाचा राजा, याने २९ वर्षें राज्य केलें. २ रा. अ १८ ओ १, २.

३२०१ सालमनेसार हा इस्राएलांची राजधानी शोमरोन या नगरावर चढून आला व त्यास वेढा घातला. २ रा. अ १८ ओ ९.

३२०५ इस्राएलांचे दाहा वंश पाडावपणांत गेले. याप्रमाणें इस्राएलांचें राज्य २४१ वर्षें चालून लयास गेलें. २ रा. अ १८ ओ ३१.

३२१२ येहीजकीयाने आश्शुराच्या राजा विरुद्ध मिसराच्या व कूशाच्या राजांसीं तह केला, ह्मणून आश्शुराचा राजा सानहेरीब येहूदावर चढून आला, त्यास येहिजकीयाने मंदिरांतलें द्रव्य देऊन परत पाठविलें. २ रा. अ १८.

३२१३ सानहेरीब पुनः येहूदावर चढून आला; परंतु एका रात्रींत त्याचीं १८५००० मनुष्यें मारलीं गेलीं. २ रा. अ १९.

३२१३ येहिजकीया राजा रोगी झाला व त्याचें आयुष्य १५ वर्षें वाढलें. २ रा. अ २०. ओ १–११.

३२२८ मेनाश्शे येहिजकीयाचा पुत्र १२ वर्षांचे वयांत येहूदावर राज्य करूं लागला, याने ५५ वर्षें राज्य केलें. २ रा. अ २१ ओ १.

३२४० नाहूम भविष्यवादी शलशेलेथ हाकब्बाला.

३२४९ मेनाश्शे बाबेलांत कैदी गेला. २ का. अ ३३ ओ १.

३२५० मेनाश्शेने पश्चात्ताप केला. २ का. अ ३३ ओ १२, १३.

३२५४ हाबक्कूक भविष्यवादी, शलशेलेथ हाकब्बाला.

३२८० सेफानया भविष्यवादी, सेफा. अ १ ओ १.

३२८३ आम्मोन मेनाश्शेचा पुत्र येहूदाचा राजा, याने २ वर्षें राज्य केलें. २ रा. अ २१ ओ १८–२६.

३२८५ योशीया आम्मोनाचा पुत्र ८ वर्षांचे वयांत येहूदावर राज्य करूं लागला, याने ३१ वर्षें राज्य केलें. २ रा. अ २२ ओ १.

३२९० योशीया आपला पूर्वज दावीद याच्या देवाचा शोध करूं लागला. २ रा. अ २२ ओ १३.

उत्पत्तीचें वर्ष.

३२९७ योशीयानें येहूदा व येरूशालेम यांस मूर्त्तिपूजेपासून शुद्ध करायास आरंभ केला. २ रा. अ २३ ओ ४–२०.

३२९८ इर्मेया भविष्यवादी, इ. अ १ ओ १.

३३०३ योशीयानें पवित्र मंदिराची मरामत करविली व ती होतेवेळीं हिलकीया याजकास शास्त्राची एक प्रत सांपडली. २ रा. अ २२ ओ ३–१०.

३३०३ हूलदा भविष्यवादीण, इनें येरूशालेमेचा नाश पुढें होईल, परंतु योशीयाचे वेळीं होणार नाहीं असें भविष्य कथिलें. २ रा. अ २२ ओ १४–२०.

३३१६ योशीया राजा हा मिसराचा राजा फारो नीखो यासीं लढतांना मारला गेला. २ रा. अ २३ ओ २९–३०.

३३१६ येहोआहाज योशीयाचा पुत्र २३ वर्षांचा असतां येहूदावर राज्य करूं लागला; यानें मात्र ३ महिने राज्य केलें. त्याजपासून फारो नीखो सुमारें २००००० रुपये मागूं लागला, ते त्यानें दिले नाहींत म्हणून त्याच्या भावास गादीवर बसविलें. २ रा. अ २३. ओ ३१–३३.

३३१६ येहोयाकीम येहोआहाजाचा भाऊ येहूदावर राज्य करूं लागला, यानें ११ वर्षें राज्य केलें. २ रा. अ २३. ओ ३४–३६

३३१८ नेबुखादनेसार बाबेलांत राज्य करूं लागला. इ. अ २५. ओ १.

३३१९ नेबुखादनेसारानें येहोयाकीमाचा पराजय करून, त्यास ३ वर्षें आपल्या अमलाखालीं ठेविलें. २ रा. अ २४ ओ १.

३३१९ दानीएल ज्यास बाबेलच्या राजानें बेलतेशासार असें नांव दिल्हें तो, व दुसरे मोठमोठाले लोक बाबेलास कैदेंत गेले, दा. अ १ ओ ६.

३३२१ इर्मेयानें नाशाविषयीं भविष्यकथन केलें. इ. अ ३६.

३३२३ येहायाकीमानें नेबुखादनेसारावर बंडावा केला. २ रा. अ २४ ओ १.

३३२७ **येहोयाकीम बाबेलास कैदेंत जातांना मार्गांत मरण पावला.** इ. अ ३६ ओ २९-३१.

३३२७ **येहोयाखीन येहोयाकीमाचा पुत्र येहूदाचा राजा, यानें मात्र ३ महिने राज्य केलें.** २ रा. अ २४ ओ ८.

३३२७ **येहोयाखीनास नेबूखादनेसाराने बाबेलास नेऊन कैद केलें.** २ रा. अ २४ ओ १०-१६.

३३२७ **सिदकीया येहोयाकीमाचा भाऊ* यास नेबूखादनेसारानें येहूदाचें राज्य दिल्हें, यानें ११ वर्षें राज्य केलें.** २ रा. अ २४ ओ १८.

३३३० **सोशन्नाची गोष्ट. ही बाई येहोयाकीम नामे याजकाची बायको व हिलकीयाची कन्या होती. इजवर दोघां न्यायाधीशांनी दुष्ट वासना केली; परंतु ती पतिव्रता त्यांच्या दुष्टाईस मान्य झाली नाहीं, म्हणून त्यांनी तिजवर खोटा आळ घालून, तिने एका तरुणा बरोबर व्यभिचार केला असा आरोप तिजवर आणिला, आणि त्या दोघांच्या साक्षीवरून तिला देहांत शिक्षा ठरली. त्या वेळीं दानीएल वयांत लहान असून चतुर होता, तो म्हणाला, या बाईच्या रक्ताचा दोष मजवर नसो; कारण हा तिजवर खोटा आळ आहे. यावरून सर्व लोक चकित होऊन या वादाची चौकशी दानीएलास पुनः करावयास सांगितली. त्याने त्या दोघांस निरानिराळे करून पुनः त्यांच्या जबान्या घेतल्या; तेव्हां त्यांत पडलेला भेद सर्वांस दाखवून त्या बाईस निर्दोष ठरवून त्या दोघांस योग्य शिक्षा केली.** सेफर योहासीन पृ. १५४.

३३३१ **इर्मेयाने नाशाविषयीं अणखी भविष्यकथन केलें.** इ. अ ५१.

---

* १ का. अ ३ ओ १५ व १६ प्रमाणें येहोयाकीमाचे भावाचें व त्याच्या पुत्राचेंहि नांव सिदकीया होतें; परंतु सिदकीया राजा हा २ का॰ अ ३६ ओ १० प्रमाणे येहोयाखीनाचा भाऊ म्हणजे येहोयाकीमाचा पुत्र नव्हता, तो २ रा. अ २४ ओ १७ व इर्मे. अ १ ओ ३ प्रमाणे येहोयाकीमाचा भाऊ होय.

उत्पत्तीचें वर्ष.

३३३२ येहेज्केल भविष्यवादी याचा पहिला भविष्यवाद येहे. अ १ ओ १, २.

३३३६ येहेज्केलाने येरूशालेमेविषयीं भविष्यकथन केलें. येहे. अ २४.

३३३६ नेबुखादनेसाराच्या जुलमामुळें सिदकीयाने बंडावा केला. २ रा. अ २६ ओ १३.

३३३६ नेबुखादनेसाराने येरूशालेमेस वेढा घातला. ता० १० तेबेत. २ रा. अ २५ ओ १.

३३३७ इर्मेयाने नाशाविषयीं पुनः भविष्यकथन केलें. इ. अ ३२.

३३३८ येरूशालेमेचीं गांवकुसें पडलीं. ता० १७ तम्मुज. इ. अ ५२ ओ ६-७.

३३३८ सिदकीया राजासमोर त्याच्या पुत्रांचा वध. २ रा. ५२ ओ १०.

३३३८ सिदकीया राजाचे डोळे काढून त्यास बाबेलांत कैदी करून नेलें. इ. ५२ ओ ११.

३३३८ पहिल्या पवित्रमंदिराचा नाश होऊन दावीद व त्याचे वंशज यांचें राज्य ४५४ वर्षें चालून संपलें. हें पवित्र मंदिर बांधल्यानंतर ४१० वर्षांनी नाश पावलें. ता० ९ आब. इ. अ ५२ ओ १२-२९.

बाबेलांतील पाडावपणा.

३३३९ गेदालया आहीकामाचा पुत्र व येहूदा देशांत राहिलेले लोकांवर नेमलेला अधिकारी हा मारला गेला. ता० ३ तिशरी. २ रा. अ २५ ओ २५.

३३४० नेबुखादनेसाराचीं स्वप्नें. व दानीएलाकडून त्यांचा उलगडा. रा. अ २ ओ १.

३३४२ नेबुजारआदानाने अणखी ७४५ मनुष्यें पाडाव करून नेलीं. इ. अ ५२ ओ ३०.

३३४६ नेबुखादनेसाराने मिसर देश जिंकला. येहे. अ २९ओ १९-२१.

३३५० बारूख नेरायाचा पुत्र. इ. अ ३६ ओ ४.

उत्पत्तीचें वर्ष.

३३५२ येहेजकेलाचें अणखी भविष्यकथन. येहे. अ ९.

३३६३ हानानया, मीशाएल व आजार्या ज्यांस बाबेलांत शेद्राख-मेशाख व आबेदनेगो असें म्हणत असत, त्यांस नेबुखादनेसाराने अग्नीच्या जळत्या भट्टींत टाकलें व ते तिजमधून कांहीं उपद्रव न होतां निघाले. दा. अ ३.

३३६४ एवील मेरोदाखाचें बाबेलांत राज्य. २ रा. अ २५ ओ २७.

३३६४ एवील मेरोदाखाने येहोयाखीनास ३७ वर्षांच्या बंदांतून सोडविलें. २ रा. अ २५ ओ २७.

३३८६ बेलशासाराचें बाबेलांत राज्य. दा. अ ७ ओ १.

३३८७ कोरेश प्रसिद्धीस येऊं लागला. शलशैलेथ हाकब्बाला.

३३८९ बेलशासाराची देवनिंदक मेजवानी. या मेजवानींत अकस्मात् एक हात दिसला व त्या हाताच्या बोटांनी "मेने मेने तेकेल ऊफारसीन" असे शब्द लिहिले. या शब्दांचा अर्थ कोणाच्यानें सांगविला नाहीं. तेव्हां दानीएलाने त्यांचा अर्थ राजास असा करून दाखविला कीं, तुला तागडीनें तोलिलें आहे, तूं उणा निघाला आहेस, म्हणून तुझें राज्य विभागलें आहे, आणि मादी व फारसी यांस दिल्हें आहे. दा. अ ५.

३३८९ दर्यावेश व कोरेश यांनी बाबेल देश जिंकला व बेलशासार मारला गेला. दा. अ ५ ओ ३०, ३१.

३३९० दानीएलाने बाबेलांतील बेल नांवाची मूर्त्ति फोडिली. एके दिवशीं दर्यावेश राजाने दानीएलास मोठ्या आदरानें आमंत्रण करून असा प्रश्न केला कीं, बेल मूर्त्ति जी प्रति दिवशीं १२ फरे पीठ, ४० मेंढरें आणि ६० घडे द्राक्षारस एवढें अन्न भक्षिते, तिला तूं कां भजत नाहींस? दानीएल म्हणाला, मी जीवंत देवास मात्र भजतों; बेलासारिख्या निर्जीव मूर्त्तीस मी भजत नाहीं. राजा म्हणाला, एवढें अन्न ती प्रतिदिवसीं भक्षित असतां, तूं तिला निर्जीव असें कसें म्हणतोस? दानीएल म्हणाला, महाराज, ही मूर्ति

आंतून सर्व माती आहे व बाहेरून पितळेनें मढविलेली आहे. एवढें अन्न ती मूर्त्ति भक्षिते, अथवा दुसरे कोणी भक्षितात हें मी उद्यां आपणास दाखवीन. राजा ह्मणाला, जर तूं आपलें भाषण सिद्ध करून दाखविलेंस तर बेलाच्या सत्तर पूजाऱ्यांचा कुटुंबासुद्धां मी नाश करीन; नाहीं तर तूं आपले जीवास मुकशील. या ठरावास मान्य होऊन दानीएल व राजा त्या मूर्त्तीच्या देवळांत गेले; आणि नेमाप्रमाणें पुजाऱ्यां कडून तेवढें अन्न त्या मूर्त्तीपुढें ठेवविलें. मग सर्व पुजाऱ्यांस बाहेर काढून मागाहून राजा व दानीएल बाहेर आले. आणि दरवाज्यांतून कोणी आंत जाऊंनये ह्मणून दानीएलानें राजाकडून दरवाज्यावर त्याची मोहोर करविली. दुसऱ्या दिवशीं दानीएल व राजा देवळाकडे गेले आणि पाहतात तर राजानें केलेली मोहोर तसीच आहे; परंतु आंत जाऊन पाहतात तों मूर्त्तीपुढें कांहींच अन्न उरलेलें नाहीं. हें पाहून राजा दानीएलास ह्मणतो, कां हें अन्न कोणी खाल्लें? दानीएल म्हणाला, महाराज, अमळ खालीं दृष्टि करून भूमीवर उमटलेलीं पावलें पाहा. राजा पाहतो तर खरोखर मनुष्याचीं पावलें उमटलीं आहेत. यावरून राजास संशय आला, आणि चौकशी अंतीं पुजारी लोक तळमार्गानें येऊन मूर्त्तीपुढील अन्न खातात असें सिद्ध झालें. हें कृत्रिम उघडकीस आल्यावर राजानें त्या पुजाऱ्यांस मारून टाकिलें व दानीएलाकडून त्या मूर्त्तीचा व तिच्या देवळाचा नाश करविला. योसीफून. अ ३.

३३९० दानीएलास राजानें मोठी पदवी दिल्यावरून, दुसऱ्या कामदारांच्या व लोकांच्या मनांत हेवा उत्पन्न होऊन, त्याजवर कांहीं निमित्त काढण्याकरितां त्यांनी राजाकडून असा ठराव करविला कीं, जो कोणी राजाच्या मूर्त्तीवांचून दुसऱ्या देवास भजेल, तो सिंहाच्या गुहेंत टाकला जाईल. परंतु दानीएल या ठरावास न भितां आपल्या परात्पर देवाचें

दिवसांत तीन वेळा उघडपणें भजन करूं लागला. यावरून व त्यानें बेलमूर्त्ति फोडिली यावरून त्यास सिंहाचे गुहेंत टाकला. तेथें हाबक्कूक भविष्यवाद्यानें दुताच्या सहायानें त्यास अन्न पुरविलें. आणि दानीएल त्या गुहेंतून कांहींच उपद्रव नहोतां निघाला; परंतु ज्यांनी दानीएलास दोष लाविला होता, त्यांस जेव्हां त्याच गुहेंत टाकिलें, तेव्हां सिंहांनी त्यांच्या हाडांचें चूर्ण केलें.* दा. अ ६.

इस्राएलांची केनाआन देशांत पुनः स्थापना.

३३९० कोरेशानें बाबेलांतील इस्राएलांस येरूशालेमेस परत जाऊन पवित्र मंदिर पुनः बांधण्याची जाहिरात दिल्ही.† एज. अ १ ओ १–४.

३३९१ जेरूबाबेलानें पवित्र मंदिराचा पाया घातला. एज. अ ३ ओ ८–१३.

३३९२ आहाशवेरोशाचें पारास देशावर राज्य. ए. अ १ ओ १.

३३९५ आहाशवेरोशाची मोठी जेवणावळ. ए. अ १ ओ ३.

३३९९ आहाशवेरोशानें एस्तेरीला राणी करून घेतली. ए. अ २ ओ १६-१७.

३४०४ हामामानें येहूदी लोकांच्या नाशाविषयीं सोडत काढून पाहिली. ए. अ ३ ओ ७.

३४०४ एस्तेर राणीनें येहूदी लोकांस हामानाच्या हातांतून वांचविलें. ए. अ ८.

३४०४ पूरीम सणाची स्थापना. ए. अ ९ ओ २६–३२.

---

* कोणी म्हणतात कीं, दानीएलास वरील दोन कारणांवरून दोन निरनिराळ्या वेळीं सिंहाच्या गुहेंत टाकलें होतें.

† या जाहिराती वरून जेरूबाबेल व दुसरे पुष्कळ लोक येरूशालेमेस परत गेले, व त्यांनी पवित्र मंदिराचा पाया घातला; तेव्हां शोमरोनी लोक त्यांच्यांत मिसळूं लागले, परंतु त्यांस मिसळूं दिल्हें नाहीं; म्हणून ते या कामास आड आले व कांहीं वर्षें हें काम बंद पडलें होतें.

उत्पत्तीचें वर्ष.

३४०६ **दर्यावेश जो आर्ताहशस्ते आहाशवेरोश व एस्तेर यांचा पुत्र, याचें राज्य.** ने. अ २ ओ १.

३४०८ **हाग्गाय, जेखार्या व मलआखी यांचा भविष्यवाद.** शलशेलेथ हाकब्बाला.

३४०८ **दुसरें पवित्र मंदिर बांधण्यास आरंभ.** हा. अ १.

३४१२ **दुसरें पवित्र मंदिर बांधून पूर्ण झालें. ता० ३ आदार.** एज. अ ६ ओ १५.

३४१३ **एज्रा बाबेलाहून यरूशालेमेस गेला.** एज. अ ७ ओ ६.

३४२६ **नेहेमीयानें येरूशालेमेचीं गांवकुसें बांधिलीं.** ने. अ २ ओ १२-२०.

३४४२ **आलेकस्यांडर बादशाहा राज्य करूं लागला.** योसीफून. अ ५.

३४४२ **हाग्गाय, जेखार्या व मलआखी यांचा मृत्यु.** सेफेर योहासीन पृ. १४

३४४८ **आलेकस्यांडर बादशाहानें अनेक देश जिंकून त्यांजवर आपला अम्मल बसविला.** योसीफून अ ५

३४४८ **शिमओन जो यथार्थ* तो मुख्य याजकपणा चालवूं लागला.** सेफेर योहासीन. पृ. ६९.

---

* जोंपर्यंत हा शिमओन मुख्य याजकपणा चालवीत होता तोंपर्यंत साहा चमत्कारिक गोष्टी घडून येत. त्या येणे प्रमाणें. १ प्रायश्चित्ताच्या दिवशीं आजाजेलाचा बकरा जो कड्या वरून लोटला जात असे, तो अर्ध्या कड्या खालीं आला नाहीं इतक्यांत त्याचे तुकडे तुकडे होऊन जात; परंतु मागाहून सर्व कड्या वरून येऊन तो जीवंत राहत असे, म्हणून हें दुर्दैवाचें चिन्ह असें मानिलें जात असे. २ प्रायश्चित्ताचे दिवशीं ईश्वरी नामाची सोडत नेहेमी उजव्या हातीं, व आजाजेलाची सोडत नेहमी डाव्या हातीं येत असे. त्याच्या मागें हा प्रकार कधीं उलटही होत असे, आणि तेंही दुश्चिन्ह मानिलें जात असे. ३ आजाजेलाच्या बकऱ्याच्या शिंगामध्यें जो किरमिजी दोरा बांधीत, तो त्याच दिवशीं शुभ्र पांढरा होत असे; यावरून पापाची क्षमा झाली असा भरंवसा येत असे. ४ सोन्याच्या समईंतील पश्चिमे कडील दिवा कधीं विझाला नाहीं. ५ स्थंडिलावरील अग्नि कधीं विझाला नाहीं; आणि त्यास एक दोन लांकडें लाविलीं असतां तो दिवसभर जळत असे. ६ शाबूओथच्या दिवशीं वाहिलेल्या नव्या उत्पन्नाच्या दोन भाकरी व प्रत्येक शाब्बाथ दिवशीं वाहिलेल्या बारा भाकरी सर्व याजकांस व त्यांच्या कुटुंबांस पुरत असत. कोणी ग्रंथकर्ते हा शिमओन जो यथार्थ यास यादोवा असेंहि नांव देतात.

उत्पत्तीचें वर्ष.

३४४८ आलेकस्यांडर बादशाहा येरूशालेमेवर चढून आला तेव्हां शिमओन जो यथार्थ, तो त्यास सामोरा गेला, आलेकस्यांडराने त्यास नमन करून त्याचा सन्मान केला. सेमाह दावीद.

३४४८ शोमरोनी लोकांनी आपणा करितां गेरीझीम डोंगरावर निराळें मंदिर बांधिलें व तेथें येरूशालेमे सारिखें पूजन चालविलें. योसीफून अ ५.

३४४८ दस्तैवजाचा शक चालू झाला* सेमाह दावीद.

३४४८ येशूवा सीराहचा पुत्र, यानें नीतीवर एक ग्रंथ लिहिला आहे. सेमाह दावीद.

३४५४ आलेकस्यांडर बादशाहा मरण पावला. योसीफून अ १३.

३४५७ टालमीनें येहूदी देश जिंकून १२०,००० लोक कैदी करून मिसरांत नेले. शलशेलेथ हाकब्बाला.

३४६० आन्तिगोनस सोखोमध्यें राहाणारा हा सानहेद्रीम म्हणजे न्यायसभा इचा पहिला अध्यक्ष होता. याचें म्हणणें असें होतें कीं, “जे सेवक वेतनाच्या आशेने स्वामीची सेवा करितात त्यांसारिखे तुम्हीं होऊं नका; जे वेतनाची आशा न धरितां स्वामीची सेवा करितात त्यांसारिखे तुम्ही व्हा.” या त्याच्या म्हणण्याचा अर्थ बरोबर न उमजल्या मुळें सादोकी मत म्हणजे परलोकावस्था व कर्मफल नाहीं असें मत निघालें. सेफर योहासीन. पृ. १५.

३४६० सादोक व बायथोस, यांनी सादोकी मत काढलें. सेफेर योहासीन. पृ. १५.

---

* उत्पत्ती पासून मिसरांतून निघण्यापर्यंत पूर्वजांच्या आयुष्यां वरून, त्यानंतर मिसरांतून निघण्या पासून, व त्यानंतर राजांच्या वेळां वरून कालाचा हिशोब ठेवित असत. हा शेवटला प्रकार शिमओन जो यथार्थ याच्या दिवसांपर्यंत चालला. मग जेव्हां आलेकस्यांडर बादशहाने इस्राएलांवर अनेक प्रकारें दया केली, तेव्हां त्याने त्यांस पवित्र मंदिरीं एक मूर्त्ति बसवायास सांगितलें. परंतु हें शास्त्रा विरुद्ध असी समजून दिल्यावर त्याने ती आज्ञा रद्द केली. तरी इस्राएलांनी त्याच्या आठवणी करितां त्यावर्षीं जन्मलेले सर्व मुलांस आलेकस्यांडर असें नांव ठेविलें; व दस्तैवजीं त्याचा शक चालविला. हा शक गेमाराचे रचने पर्यंत चालला; तेव्हां पासुन उत्पत्तीचा शक चालत आहे. अन्य लोकांतील ग्रंथकर्ते या शकास आलेकस्यांडराचा शक असें नांव देतात.

उत्पत्तीचें वर्ष.

३४६३ अन्तिगोनस राजाने टालमी राजापासून येहूदी देश परत घेतला. शलशेलेथ हाकब्बाला.

३४६५ टालमीने येहूदी देश पूर्णपणें आपले हस्तगत करून घेतला. शलशेलेथ हाकब्बाला.

३४६७ हानानया मुख्य याजक व शिमओन मंदिराचा कारभारी यांमध्यें वाद पडल्या मुळें शिमओनाने आरामाचा राजा सील्यूकस यास सांगितलें कीं, पवित्र मंदिरांत पुष्कळ द्रव्य आहे. तें काढून नेण्या करितां त्याने आपला सरदार हेलीयोडोरस यास पाठविलें; त्यास मुख्य याजक आंत जाण्याची मनाई करीत असतां तो पवित्र मंदिरीं जाऊं लागला, तेव्हां त्यास मूर्च्छा येऊन तो पडला. योसीफून. अ १६.

३५०० योसे योजेराचा पुत्र अध्यक्ष व योसे योहानानाचा पुत्र उपाध्यक्ष, हे दोघे त्यांच्या उत्कृष्ट गुणांवरून, लोकांस प्रिय व सन्मान्य होते. सेफेर योहासीन. पृ. १५.

३५१६ टालमी फीलेडेलफस नामें मिसराचा राजा यानें ७२ विद्वान इस्राएलांकडून शास्त्राचें ग्रीक भाषांतर करविलें: या कामास सुमारें ८,००,००० रुपये खर्च झाला. या भाषांतरास सेपट्यूएजिन्ट असें म्हणतात. योसीफून. अ १७.

३५१६ आन्तिओखोस तिसरा यानें आपल्या दुसऱ्या रयतेप्रमाणें इस्राएलांचा हक्क चालू केला. शलशेलेथ हाकब्बाला.

३५३४ आबारखास नांवाचा मोठा ज्योतिषी. सेफेर योहासीन पृ. १६

३५५० टालमी फीलोपेटर यास इस्राएल मना करीत असतां, त्याने पवित्र मंदिरांत जुलमाने शिरण्याचा प्रयत्न केला; परंतु तो मूर्च्छा येऊन पडला. याचा सूड उगविण्या-करितां मिसरांत गेल्यावर ६०,००० इस्राएलांस त्याने जीवें मारिलें. शलशेलेथ हाकब्बाला.

३५८० येहोशूवा पेराहयाचा पुत्र अध्यक्ष व नाताय आरबाली उपाध्यक्ष. योहानान हिरकानस राजाच्या जुलमामुळें

येहोशूवा मिसरांत पळून गेला होता, परंतु त्याचा शिष्य शिमओन शाथाहाचा पुत्र, यानें आलेकस्यांडर राजाची राणी त्याची बहीण इच्या सहायानें त्यास परत बोलावून आणिलें. सेफेर योहासीन. पृ. १६

३६१६ आन्तिओखोस चौथा एपिफेनस यानें पवित्र मंदिर लुटून विटाळलें; आणि इस्राएलांस शाब्बाथ व सुंता पाळायास व मोशेचीं पुस्तकें वाचायास मनाई केली.* योसीफून. अ २०.

३६१६ हान्ना व तिचे सात पुत्र यांनी आन्तिओखोसाच्या पुतळ्या पुढें नमन केलें नाहीं व अशुद्ध पशूचें मांस भक्षिलें नाहीं ह्मणून त्यानें त्यांस अतिशय हाल करून मारिलें. योसीफून. अ १९.

३६२१ येहूदा ताब्बायचा पुत्र अध्यक्ष व शिमओन शाथाहचा पुत्र उपाध्यक्ष, शिमओनानें आश्केलोनांतील ऐंशीं चेटकीणी मारिल्या; परंतु त्यांच्या नातलगांनी खोटे साक्षी उभे करून त्याच्या पुत्रावर आरोप आणिला व त्यास देहांत शिक्षा ठरली; आणि त्यास मारायास नेतांना त्यानें आपल्या निर्दोषाविषयीं भाषण केलें, तें पटत असतां व साक्षिदारांनी आपली साक्ष रद्द केली असतांहि तो मारला गेला. शलशेलेथ हाकब्बाला.

हाशमोनी अथवा माकाबी कुटुंबांतील राजे.

३६२१ पहिला राजा, मत्तातया मुख्य याजक जो हाशमोनाय अथवा माकाबी. यानें यावान लोकांचा राज्याधिकार इस्राएलांवरून काढून टाकिला; आणि आपल्या पांच पुत्रांस धैर्य व आशीर्वाद देऊन यावानी लोकांचा सूड घ्यावयास सांगितलें; आणि आपणामागें आपला पुत्र येहूदा यास मुख्य याजकाचे कामीं नेमिलें. योसीफून. अ २०.

* या वेळे पासून शाब्बाथ दिवसीं हाफतारा वाचण्याची चाल चालू झाली.

उत्पत्तीचें वर्ष.

३६२२ दुसरा राजा येहूदा मत्तातयाचा पुत्र, याने आन्तिओखो-
स एपीफेनसाचे सरदार आपोलोनीयस व नीकानोर यांचा
पराजय केला; आपोलोनीयस मारला गेला व नीकानोर
पळून गेला. शेवटीं आन्तिओखोस मोठें सैन्य घेऊन
चढून गेला, परंतु मार्गांत त्यास रोग झाला, आणि तो रथा-
वरून पडला, यामुळें तो मरण पावला. येहूदाने आपल्या
राज्याचा काल सर्व लढण्यांत घालविला. योसीफून. अ २०.

३६२२ पवित्र मंदिराची शुद्धता व हानुक्याच्या सणाची स्थापना.
तारिख २५ किसलेव. योसीफून. अ २०.

३६२२ येहूदीथ व हालीफार्नेस यांची गोष्ट. येहूदीथ ही रूप-
वती व पतिव्रता बाई विधवा असून धनवान होती.
ती आपल्या पतीच्या मरणामुळें एकांतवासांत आपलें
आयुष्य घालवीत होती; इतक्यांत हालीफार्नेस नांवाच्या
कोणी सरदाराने येऊन येरूशालेमेस वेढा घातला. सर्व
नगरांत आकांत झाला; व जाऊन त्यासीं लढायाचें साम-
र्थ्य कोणाच्याच अंगीं राहिलें नाहीं. शेवटीं आपलें पवित्र
नगर शत्रूच्या हातीं जाणार, असें पाहून ईश्वरी सहाय
मागून आपलें नगर शत्रूच्या हातांतून सोडविण्याचा विडा
या बाईने उचलिला. आणि आपला विधवेपणाचा पोषाक
काढून उंच सुशोभित पोषाक पांघरून शत्रूच्या सैन्याजवळ
गेली. तेव्हां पाहेरेकऱ्याने तिला विचारिलें कीं, बाई, तूं
कोण? कोठून आलीस व कोठे जातेस? ती म्हणाली, मी
इस्राएलाची कन्या आहें. तुमच्या हातीं आमचें नगर
जाणार हें जाणून मी आपला व आपल्या कुटुंबाचा जीव
वांचविण्या करितां आपणाकडे आलें आहें; कृपा करून
मला आपल्या सरदाराकडे न्यावें. पाहेरेकऱ्याने तिला
हालीफार्नेसाकडे नेलें. तो तिचें रूप पाहून मोहित झाला;
आणि येहूदीथही त्याची बायको होण्यास मान्य झाली,
परंतु तिने असें मागणें मागितलें कीं, माझ्या शुद्धते करितां

उत्पत्तीचें वर्ष.

मध्यान रात्रीं मला नदीवर जावें लागेल, तेव्हां मला किंवा माझ्या दासीला कोणी अटकावूं नये, आणि आम्हांसी कोणी भाषणहि करूं नये. हें तिचें मागणें राजानें मान्य करून सर्वांस त्याप्रमाणें जाहीर केलें. आपणास शत्रूकडील असी रूपवंत बायको मिळाली यावरून हालीफार्नेसास अत्यानंद होऊन संध्याकाळीं त्यानें आपल्या लोकांस मोठी मेजवानी केली, त्या मेजवानींत पिऊन तो अतिशय मस्त झाला. तेव्हां येहूदीथ रात्रीं त्याजवळ एकटी असतां तिनें त्याचीच तरवार घेऊन त्याचा शिरच्छेद केला आणि त्याचें धड बिछान्यावर पडलेलें ठेवून त्याचें डोकें घेऊन ती आपल्या दासीं संगतीं निघाली; आणि दिल्हेल्या जाहिराती मुळें आपलें पातिव्रत्य राखून सुखरूपपणें येरूशालेमेस आली. मग इस्राएलांनी हालीफार्नेसाचें शीर ओळखून शत्रूचे सैन्याचा पाठलाग केला, आणि त्यांतून कित्येकांस मारिलें व कित्येकांस पळविलें. * सेमाह दावीद.

३६२२ येहूदानें रोमी लोकांबरोबर तह केला; या तहाचे ठराव ताम्रपत्रावर कोरलेले होते. योसीफून. अ २३.

३६२५ आन्तिओखोस पांचवा युपेटर यानें येहूदासीं लढायास मोठें सैन्य पाठविलें, परंतु त्याचा पराजय होऊन त्यानें तह केला. या लढाईंत येहूदाचा भाऊ येलीएझेर हा हत्तीं मारीत असतां एका हत्तीखालीं सांपडून मेला. योसीफून. अ २५.

३६२८ येहूदा डेमेट्रीयस सोटर यांच्या सैन्या बरोबर लढत असतां त्याचें सैन्य त्यास सोडून गेलें म्हणून मारला गेला. योसीफून. अ. २५.

३६२८ तिसरा राजा योनाथान येहूदाचा भाऊ यानें बाखीदसाचा पराजय केला म्हणून डेमेट्रीयससोटर हा आणखी सैन्य घेऊन आला; त्यानें याचाहि पराजय केला. योसीफून. अ २६.

---

*ही गोष्ट कोणत्या वेळीं झाली हें निश्चयपूर्वक सांगवत नाहीं; तरी अलिकडील ग्रंथकार मानितात, कीं ती हान्नूका सण-स्थापन होण्याच्या वेळीं झाली असावी.

उत्पत्तीचें वर्ष.

३६३४ चौथा राजा शिमओन योनाथानाचा भाऊ यानें आपली मुलगी टालमी यास दिल्ही; त्यानें येहूदी देशाचें राज्य आपणास मिळावें म्हणून मेजवानीच्या निमित्तें आमंत्रण करून शिमओनास व त्याच्या कांहीं मुलांस मारिलें व त्याच्या बायकोस व एका मुलास कैदेंत ठेविलें, त्याचा मुलगा योहानान हिरकानस हा मात्र त्याच्या हातांतून सुटला. योसीफून. अ २७.

३६४२ पांचवा राजा योहानान हिरकानस शिमओनाचा मुलगा यानें आपले बापाचा व भावाचा सूड उगविण्या करितां टालमीश्वर लढाई आरंभिली व त्यास दागोन शहरीं वेढिलें. टालमीनें आपणांवरील संकट पाहून, व योहानानानें वेढा उठवावा ह्मणून त्याच्या आईस व भावास तटावर चढवून योहानाना समोर त्यांस यातना देऊं लागला व त्यांस कडेलोट करण्याचें भयहि घातलें; तरी योहानानाच्या आईनें हें सर्व सोसून आपल्या पुत्रास लढाई चालविण्यास सांगितलें. योसीफून. अ २७.

३६४६ अन्तिओखोस पैयस येरूशालेमेवर चढून आला, परंतु योहानानानें त्याचा पराजय केला; शेवटीं त्यानें तह करून पवित्र मंदिरास मोठी व मोलवान देणगी दिल्ही. योसीफून. अ २८.

३६४८ योहानानानें गेरीझीम डोंगरावरील शोमरोनी लोकांचे मंदिराचा नाश केला. योसीफून. अ २८.

३६४८ येलीएझेर पेऊराचा पुत्र यानें योहानानास चिडवून ह्मटलें कीं, महाराज, आपणास राजकीय मुगुट पुरे. आपणास याजकपणाचा मुगुट शोभत नाहीं; तो आहारोनाच्या वंशजांसच शोभतो. असें म्हणण्याचें कारण हें कीं, त्याची आई कोणी पाडाव करून आणिलेली होती असा लोकांस संशय होता; आणि याजकास असली बायको करून घेण्याची मनाई आहे.* या भाषणावरून योहानानास राग

* लेवी. अ २१ ओ ७.

आला, आणि त्यानें येलीएझेरास अग्नीनें जाळून, जे त्याच्या मतास अनुसरून होते, त्यांतील बहुतांस त्यानें त्या दिवशीं मारिलें. सेमाह दावीद.

३६६५ साहावा राजा आरिस्ताबुलस योहानानाचा पुत्र, यानें मुख्य याजकपणा सोडून राज्याधिकार मात्र चालविला. त्यानें आपली आई व आपला भाऊ आलेकस्यांडर यांस कैदेंत ठेविलें. एके वेळीं तो दुखणाईत असतां त्याचा भाऊ अन्तिगनोस त्याचे भेटीस येत होता, तेव्हां राणीच्या कृत्रिमामुळें द्वारपाळानें त्यास राजवाड्यांत शिरतांना मारिलें. हें वर्तमान ऐकून राजानें आपल्या उरांत मारून घेतलें, त्यामुळें रक्त ओकून तो मरण पावला. योसीफून. अ ३०.

३६६६ सातवा राजा आलेकस्यांडर आरिस्ताबुलसाचा भाऊ, यानें एदोम, मोआब, आम्मोन असे देश जिंकून त्यांतील बहुतेक लोकांच्या सुंता करून त्यांस इस्राएली धर्मांत आणिलें योसीफून अ ३०.

३६६७ आलेकस्यांडर हा टालमी लाथुरसा बरोबर लढतांना त्याचीं ३०,००० मनुष्यें मारलीं गेलीं. योसीफून. अ ३१.

३६६९ आलेकस्यांडरानें मिसराची राणी क्लीयोपाट्रा इजबरोबर तह केला. योसीफून. अ ३२.

३६७४ आलेकस्यांडरावर लोकांनी बंडावा करून होशाना रब्बाचे दिवशीं त्यांनी त्यास आपल्या हातांतील माहाळुंगांनी मारिलें; परंतु त्याच्या शिपायांनीं लोकांतील ६००० मनुष्यें मारिलीं. योसीफून. अ ३३.

३६८५ आठवी राणी आलेकस्यांड्रा, आलेकस्यांडराची बायको ही शाहाणी व सद्गुणी होती. इनें आपला वडील पुत्र हिरकानस यास मुख्य याजक नेमिला व दुसरा मुलगा आरिस्टाबुलस यास सैन्याचा सरदार नेमिला. योसीफून. अ ३३.

३६९४ आलेकस्यांड्राच्या दोघे मुलांचा वाद लागला, यावरून

उत्पत्तीचें वर्ष.

तिने दोघांस येरूशालेमेच्या बाहेर घालवून आपण शांततेने राज्य करूं लागली. योसीफून. अ ३४.

३६९७ आलेकस्यांड्राने रोमी लोकांबरोबर तह केला, या तहाचे नियम ताम्र पत्रावर कोरलेले असून त्याची एक प्रत रोम शहरीं व एक येरूशालेमेंत राखून ठेविली होती. योसीफून. अ ३७.

३६९७ आलेकस्यांड्रा जीवंत असतांच तिचा मुलगा आरिस्टाबुलस याने आपले हातीं राज्याधिकार घेण्यास प्रयत्न चालविला; आणि आपला भाऊ हिरकानस याजवर चढून आला. त्याने येरूशालेम आपल्या स्वाधीन घेऊन त्या शहराची मजबुती केली. मग लोकांनी त्या दोघांचा सल्ला करून आरिस्टाबुलसास नववा राजा आणि हिरकानसास मुख्य याजक असे नेमिले. योसीफून. अ ३६.

३६९७ आन्तिपेटर एदोमी, ज्याने इस्राएली धर्म स्वीकारिला होता, तो प्रसिद्धीस येऊं लागला. योसीफून. अ ३७.

३६९७ त्या दोघां भावांचा वाद पुनः चालू झाला. हिरकानसाने आरबस्थानाचा राजा आरीतास याच्या सहायाने आरिस्टाबुलसाचा पराजय करून त्यास येरूशालेमेंत वेढिलें. त्या वेळीं पेसाह सण जवळ आला होता; तर पवित्र मंदिरांतील पूजन बंद पडूं नये म्हणून आरिस्टाबुलस व त्याच्या पक्षकारांनी वेढा घालणारांस आंतून सांगून पाठविलें कीं, आम्ही तटावरून तुम्हास पैसे देऊं व तुम्ही आम्हास होमाकरितां मेंढरें व गुरें द्यावीं. हें म्हणणें आरीतासाने मान्य केलें परंतु पैका हातीं आल्यावर मेंढरें व गुरें पुरविलीं नाहीं यामुळें आंतील लोकांनीं होमा बद्दल प्रार्थना अर्पण करून काम चालविलें. योसीफून. अ ३७.

३६९७ होनी हाम्माअगेल नावांचा सात्विक. ज्या देशांत हा राहात असे, त्या देशांत ईश्वरी अवकृपेमुळें पर्जन्य पडला नाहीं; तेव्हां तेथील सर्व लोकांनी त्याजवळ येऊन विनंति

केली कीं, आपण देवाजवळ काकळूत करून पर्जन्य मागावा. मग त्याने आपणा भोंवतीं कुंडली करून शपथ वाहिली कीं, ईश्वर पर्जन्य पाडील, तेव्हांच मी या कुंडलींतून बाहेर पडेन. असी शपथ करून तो ईश्वरास विनवीत असतां पर्जन्याची शिडशिडी आली; तेव्हां त्याचे शिष्य त्यास म्हणाले कीं, तूं शपथेपासून मोकळें व्हावें ह्मणूनच ती शिडशिडी आली; तेणेंकरून चांगलें पीक होणार नाहीं. असें ऐकून तो आणखी प्रार्थना करूं लागल्यावर पावसाची झोड लागली; तेव्हां त्याचे शिष्य त्यास म्हणाले कीं, अशाने आमची अधिक नासाडी होते. मग तिसऱ्या वेळीं त्याने प्रार्थना केल्यावर चांगला पाऊस पडूं लागला, तेव्हां तो त्या कुंडलींतून बाहेर पडला. हा होनी आरिस्टाबुलस व हिरकानस यांच्या बखेड्यामुळें एकीकडे जाऊन राहिला होता. त्यास हिरकानसाच्या पक्षकारांनी आणून आरिस्टाबुलसाविरुद्ध प्रार्थना करायास सांगितलें. परंतु त्याने हें मान्य केलें नाहीं; शेवटीं त्यांच्या अत्याग्रहामुळें तो प्रार्थना करून म्हणाला, "हे परमेश्वरा, हे बाहेरील तुझे लोक आहेत व आंत वेढलेलेहि तुझे याजक आहेत; म्हणून यांच्या प्रार्थनेवरून त्यांस व त्यांच्या प्रार्थनेवरून यांस कांहींच बाधा होऊं देऊं नको. त्याचें असें म्हणणें ऐकून त्याजवळ जे उभे होते, त्यांनी त्याला तेथेंच मारिलें. योसीफून. अ ३७.

३६९७ या वादाचा निवाडा व्हावा म्हणून ते दोघे दम्मेसेक शहरीं रोमी सरदार पाम्पी याजकडे गेले. त्याने हिरकानसास राज्याधिकार दिल्हा, हें आरिस्टाबुलसास न आवडून तो येरूशालेमेस परत आला; पाम्पीने त्याच्या मागें येऊन त्याच्या बहुतेक पक्षकारांस मारिलें, आणि त्यास व त्याचा मुलगा आन्तिगोनस यास रोम शहरीं कैद करून नेलें. परंतु ते दोघेही कैदेतून पळून गेले, आणि सैन्य जमवून पुष्कळ रोमी लोकांस त्यांनीं मारिलें. शेवटीं रोमी लोकांचा

उत्पत्तीचें वर्ष.

जय होऊन आरिष्टाबुलसास फांसीं देण्याचा हुकूम झाला, परंतु ज्यावर हें काम सोंपिलें होतें त्यास त्याची दया येऊन त्यानें त्याबद्दल दुसऱ्यास फांसीं दिल्हें. योसीफून. अ ४१.

३७०० दहावा राजा हिरकानस व त्याचा प्रधान आन्तिपीटर हे राज्यकारभार चालवूं लागले. योसीफून. अ ४०.

३७०० आरिस्टाबुलसाचा मुलगा आलेकस्यांडर यानें रोमी लोकांवर बंडावा केला; परंतु ताबोर डोंगराजवळ लढाई होऊन त्याचा पराजय झाला व त्याचे पुष्कळ लोक मारले गेले. जेव्हां ज्युलियस सीझर व पाम्पी यांजमध्यें वाद पडला, तेव्हां आरिस्टाबुलस व आलेकस्यांडर सीझरास सहाय झाले, परंतु आरिस्टाबुलसाच्या कारणानें पुनः संकट प्राप्त होऊं नये म्हणून लोकांनी त्यास विष चारून मारिलें व त्याचे मुलास पाम्पीनें फांसीं चढविलें. योसीफून. अ ४१—४२.

३७०० क्रासास नामें रोमी सरदारानें पवित्र मंदिर लुटून पुष्कळ द्रव्य नेलें. योसीफून. अ ४२.

३७१२ ज्युलियस सीझर रोमशहराचा बादशाहा झाला; त्यानें हिरकानसाचा सन्मान करून पाम्पीनें घेतलेला सर्व देश त्यास परत केला; आणि प्रतिवर्षी पवित्र मंदिरास मोठी देणगी देऊं लागला. याच्या वेळीं रोमी व इस्राएल यांमध्यें फार सख्यत्व चालत होतें. योसीफून. अ ४३-४४.

३७१३ रिब्बी योहानान बेन जक्काय याचा जन्म. सेफेर योहासीन पृ. १९.

३७१९ ज्युलियस सीझर याजबरोबर पुनः तह झाला. योसीफून. अ ४५.

३७२१ अकरावा राजा आन्तिगोनस. हा हाशमोनी कुटुंबांतील शेवटला राजा. यानें पारथीयाचे राजाच्या सहायानें आपला चुलता हिरकानस याचा पराजय करून त्यानें पुढें याजकपणास योग्य न व्हावें म्हणून त्याचा कान कापून टाकिला.* योसीफून. अ ४८.

---

* लेवी. अ २१. ओ १६-२३ प्रमाणें आहारोनाचें खोडकर संतान याजकपण चालविण्यास अयोग्य आहे.

उत्पत्तीचें वर्ष.

३७२२ क्यासीयस रोमी सरदार याने येहूदी देशावर सुमारें ८,५०,००० रुपयांचा कर बसविला. योसीफून. अ ४६.

३७२२ शेमाय्या अध्यक्ष व आबतालयोन उपाध्यक्ष, हे दोघे आश्शुराचा राजा सान्हेरीब याचे वंशज होते. इस्राएली धर्म स्वीकारून व शास्त्राचा चांगला अभ्यास करून हे मोठ्या पदास चढले. सेफेर योहासीन. पृ १६.

३७२४ आन्तिगोनस व हेरोद आन्तिपाटर याचा मुलगा यांची लढाई होऊन, हेरोदाचा सहायकारी सोशियस याच्या हातून आन्तिगोनस मारला गेला. योसीफून. अ ४९.

हेरोदी कुटुंबांतील राजे.

३७२४ पहिला राजा हेरोद हा रोमी बादशाहा आगस्टस याच्या सहायाने पहिल्याने गालील प्रांताचा सुभेदार, नंतर येहूदी देशाचा राजा झाला. हा क्रूर स्वभावाचा होता; त्याने हाशमोनी कुटुंबाचा समूळ नाश केला व आपली बायको मिर्याम इलाही संशयावरून मारिलें; तो मेला म्हणजे लोक कदाचित् हर्ष करितील तो त्यांनी न करावा व सर्व प्रजेमध्यें आकांत व्हावा, म्हणून मरणापूर्वी कित्येक मोठमोठाले गृहस्थांस कैद करून त्यांचा प्राण निघतांच त्या सर्वांचीं डोकीं उडवावीं असी आज्ञा त्याने दिल्ही होती. योसीफून. अ ४५.

३७२८ हिलेल अध्यक्ष व शाम्माय उपाध्यक्ष यांची पाठशाला. हिलेल पहिल्याने बाबेलांत राहत होता. त्यास विद्याभ्यासाची फारच आवड होती; परंतु त्याचा भाऊ धनवान् असतांहि त्याने त्यास कांहींच सहाय केलें नाहीं, म्हणून तो चाळीस वर्षांच्या वयांत येरुशालेमेस आला. तेथें तो लांकूडफोड्याचें काम करून विद्याभ्यासही करीत असे. जी मजुरी तो मिळवीत असे, त्यांतील अर्ध्यावर तो आपला

निर्वाह चालवून अर्ध्याने विद्यालयाची देणगी देत असे. हिंवाळ्यांत एके दिवशीं, त्यास ती देणगी देण्यापुर्ती कमाई झाली नाहीं, म्हणून द्वारपाळाने त्यास आंत जाऊं दिलें नाहीं. त्या दिवसाचा पाठ आपल्या हातून जाऊं नये, म्हणून तो बाहेरून भिंतीवर चढून एका खिडकीजवळ व्याख्यान ऐकत बसला; परंतु संध्याकाळ पर्यंत बर्फ पडून तो तेथेंच अखडून त्या बर्फांत गर्द झाला. दुसऱ्या दिवशीं नित्याप्रमाणें उजेड पडत नाहीं, म्हणून शिक्षकाने चौकशी करून पाहिलें, तेव्हां हिल्लेल त्या खिडकींत मरायास टेंकलेला सांपडला. मग शिक्षकाने उपचार करून त्यास हुशार केला, व त्याच्या उत्कंठेवरून त्यास देणगीवांचून विद्यालयांत येऊं दिलें. असा त्याने चाळीस वर्षें अभ्यास करून त्याच पाठशाळेचे मुख्य गुरूचें काम चाळीस वर्षें चालविलें. शाम्माय हा धनवान व आदर-उपचार बारकाईने पाहाणारा होता. शेवटीं शास्त्रार्थावरून या दोघांत अतिशय वाद पडला. सेफेर योहासीन. पृ १८.

३७२८ योनाथान उज्जिएलाचा पुत्र याचें तार्गूम भाषान्तर. सेफेर योहासीन. पृ १९.

३७३१ केनाआन देशांत मोठा भूकंप, याकडून सुमारें १०,००० मनुष्यांचा नाश झाला. योसीफून. अ ५३.

३७३७ केनाआन देशांत मोठा दुष्काळ. योसीफून. अ ५५.

३७४२ हेरोदाने पवित्र मंदिर बांधण्यास आरंभ केला; हें काम ७ वर्षें चाललें. या कामास कांहीं अडथळा येऊं नये, म्हणून या सात वर्षांत दिवसाचा कधींच पाऊस पडला नाहीं. योसीफून. अ ५५.

३७५२ हेरोदाने पुष्कळ द्रव्याच्या आशेने दावीदाची कबर उघडिली. परंतु त्याच्या दोघे शिपायांवर वीज पडून ते, तेथेंच मेले. शलशेलेथ हाक्कब्बाला.

उत्पत्तीचें वर्ष.

३७५७ योसेफ गिरयोनाचा पुत्र इतिहासकर्त्ता व याजक याचा जन्म. योसीफून अ. ८४.

३७६० ख्रिस्ती शकास आरंभ. सेमाह दावाद.

३७६० रिब्बी आकीबा योसेफाचा पुत्र याचा जन्म; हा प्रख्यात मनुष्य, ज्या सीसराचा देबोराने २६३६ व्या वर्षी पराजय केला, व जो याएलीचे हातीं मरण पावला, त्याचा वंशज असून, त्याने इस्राएली धर्म स्वीकारिला होता. तो पहिल्याने कलबा साबूवा नामें धनवानाचा गुराख्या होता. त्याच्या मुलीची प्रीति त्याजवर बसली व ती त्यासीं लग्न करायास मान्य झाली. बापानें तिला याविषयीं अनेक वेळा निषेध करून व शेवटीं शपथ करून म्हणाला कीं, जर तूं या मूढ भिकाऱ्याशीं लग्न करसील, तर माझ्या द्रव्यांतून तुला एक दमडीहि मिळणार नाहीं. यावरूनही तिचें मन खचलें नाहीं. तिने आपल्या बापाच्या इच्छेविरुद्ध त्यासीं लग्न केलें, म्हणून तिच्या सर्व नातलगानी तिला सोडिलें, व तीं उभयतां अति दरिद्रावस्थेंत आपले दिवस काढूं लागलीं. शेतांतून गवत आणून त्याजवर निजावें. असें फार दिवस चालणार नाहीं व उभयतांमधील प्रीतीवरच निर्वाह होणार नाहीं, असें पाहून बारा वर्षें पाठशाळेंत अभ्यास केल्याने दारिद्र फिटेल व प्रतिष्ठाहि मिळेल असें तिने आपल्या नवऱ्यास सुचविलें. याप्रमाणें तो आपल्या प्रिय स्त्रीस सोडून गेला व पाठशाळेंत त्याने अभ्यास चालविला. इकडे ती बाई झोंपडींत राहून आपल्या केसांच्या जटा विकून निर्वाह चालवी; परंतु आपल्या नवऱ्याचा अभ्यास चांगला चालला आहे हें ऐकून आनंद मानीत असे. असीं हीं बारा वर्षें लोटल्यावर, तो आपल्या घरीं त्वरेने परत आला, परंतु आंत जात असतां, त्याच्या बायकोचें व तिच्या बापाचें संभाषण चाललें होतें, तें ऐकायास तो बाहेरच उभा राहिला. तिचा बाप जेव्हां तिला निषेधूं लागला, तेव्हां

तिने मोठ्या धैर्याने उत्तर केलें कीं, तो अणखी बारा वर्षें तिकडे राहिला, तरी मी त्याविषयीं फारसी काळजी करीत नाहीं. हे आपल्या बायकोचे शब्द ऐकून तो तिला न भेटतां लागलाच पाठशाळेस परत गेला; व अणखी बारा वर्षें अभ्यास करून तेथील मुख्य गुरु झाला. या चोवीस वर्षांच्या वियोगानंतर आपण आपल्या प्रिय स्त्रीस भेटावें, असी इच्छा उत्पन्न होऊन तो आपल्या शिष्यांसहित आपल्या गांवीं आला. तेव्हां कोणी मोठा रब आपल्या गांवीं येत आहे, असें वर्तमान ऐकल्यावरून त्या गांवचे हजारों लोक त्यास गांवाबाहेर सामोरे गेले. त्यांबरोबर ही बाईहि आपल्या दरिद्रावस्थे प्रमाणें चिंध्या पांघरून मोठ्या प्रेमाने निघाली. अशा थोर मनुष्यापुढें अशा मळिण चिंध्या पांघरणारीने जाऊंनये म्हणून कित्येक तिला धक्के देऊन माघारें हटवीत; तरी ती मोठ्या आवेशाने सरसावून पुढें गेली. आणि जेव्हां त्या उभयतांनी एकमेकांस ओळखिलें, तेव्हां रिब्बी आकीबाने तिला मोठ्या प्रेमाने आलिंगून लोकांकडे वळून म्हणाला, “मित्रानो, तिला असूंद्या; कारण जें सर्व मला व मजकडून तुम्हांला प्राप्त झालें आहे, तें सर्व आपणास तिच्यामुळें प्राप्त झालें आहे.” हें ऐकून सर्व लोक चकित होऊन त्यांनी त्या उभयतांस मोठ्या गौरवाने घरीं पोहोंचविलें. परंतु आपण धिक्कारलेला तोच हा रिब्बी आकीबा, असें त्याचे सासऱ्यास माहित नव्हतें. कोणी मोठा विद्वान आपले गांवीं आला आहे, इतकेंच त्याच्या कानीं असल्यावरून, आपण आपल्या मुलीविषयीं वाहिलेल्या शपथेपासून मोकळें होण्याचा मार्ग समजून घेण्याकरितां त्याने रिब्बी आकीबास मोठ्या आदराने आमंत्रण केलें. आतां त्यास पश्चात्ताप झाला हें पाहून रिब्बी आकीबा त्यास म्हणाला, “जर तुमच्या मुलीने कोणा विद्वानासीं लग्न केलें असतें,

तर तुम्ही असी शपथ वाहिली असती काय? त्याचा सासरा कांहींसा भ्रांत होऊन म्हणाला, नाहीं. रिब्बी आकीबा म्हणाला, बरें, तर, ज्यास लोक मोठा विद्वान म्हणतात, तोच मी असें जरी माझ्यानें स्वतां म्हणवत नाहीं, तरी ज्यानें तुमच्या मुलीबरोबर लग्न केलें तोच मी आकीबा. हें ऐकून तो अगदी विस्मित झाला, आणि आपली शपथ मूढाविषयीं होती, विद्वानाविषयीं नव्हती असें निमित्त करून आपले मुलीस पुष्कळ धन देऊन सुखी केलें. आपल्या बायकोनें आपल्या करितां इतकीं दुःखें सोसिलीं म्हणून रिब्बी आकीबानें आपल्या प्रीतीच्या खुणे साठीं तिजकरितां डोक्यांत एक सोन्याचें फूल करवून त्यावर येरूशालेमेचें सुंदर चित्र कोरविलें. या फुलावरून रब्बान गमलीएल जो अध्यक्ष, याच्या बायकोच्या मनीं हेवा उत्पन्न होऊन, तिला तें फूल डोईंत घालण्याची मनाई करण्यास तिनें आपल्या नवऱ्यास सांगितलें. परंतु त्यानें तिला असें उत्तर केलें कीं, जिनें आपल्या नवऱ्यासाठीं आपल्या केसांची माती केली, तिच्या नवऱ्याच्या प्रीतीची खूण आंगावर घालण्यास माझ्यानें तिला मना करवत नाहीं. रिब्बी आकीबानें अनेक विषयांवर लिहिलें आहे. येरूशालेमेच्या नाशानंतर बारकोखाब नांवाच्या मनुष्यानें जें रोमी लोकांविरुद्ध बंड केलें, त्यामुळें आद्रीआनोस केसाराच्या आज्ञेनें खवणी सारिख्या शस्त्रानें रिब्बी आकीबाचें सर्व शरीर खवणिलें. ही यातना भोगीत असतांहि जेव्हां प्रार्थनेचा वेळ झाला, तेव्हां तो प्रार्थना करूं लागला; आणि "शेमा इस्राएल" हें वाक्य त्याच्या तोंडांतून निघतांच त्याचा प्राण निघून गेला. तो १२० वर्षें जगला. सेफेर योहासीन. पृ ६८.

३७६१ हेरोदानें, त्याच्या दोन पुत्रांनी त्याजवर बंडावा योजिला, म्हणून त्या दोघांस फांसीं चढविलें. योसीफून. अ ५८.

३७६१ दुसरा राजा आरखीलस हेरोदाचा पुत्र, यानें पेसाहाच्या

उत्पत्तीचें वर्ष.

दिवशीं आपल्या शिपायांकडून पवित्र मंदिरांत १००० मनुष्यांचा प्राणघात करविला. योसीफून. अ ६१.

३७६८ रब्बान योहानान जक्कायचा पुत्र प्रसिद्धीस आला. सेफेर योहासीन. पृ २०.

३७६८ रब्बान गमलीएल हिल्लेलचा नातु, याचा बाप रब्बान शिमओन फारसा प्रख्यात नव्हता; परंतु हा आपले आजा सारिखा अध्यक्ष झाला. हा अनेक विद्या व भाषा यांमध्यें निपुण होता. सेफेर योहासीन. ~~पृ २०.~~

३७७० तिसरा राजा हेरोद दुसरा, पहिल्या हेरोदाचा पुत्र, याने त्याचा भाऊ जीवंत असतां, त्याची बायको आपणास घेतली. यावरून त्यास योहानान मुख्य याजक याने निषेध केला, ह्मणून त्यास व पुष्कळ दुसऱ्या सुज्ञ लोकांस त्याने मारिलें. ही गोष्ट रोमच्या बादशाहाचे कानीं गेल्यावर त्याने त्यास राज्याधिकारावरून काढिलें. तो स्पेन देशास पळून गेला व तेथें मरण पावला. योसीफून. अ ६३.

३७८१ चौथा राजा आग्रीपा, दुसऱ्या हेरोदाचा पुतण्या. योसीफून. अ ६३.

३७८८ सानहेद्रीमास येरूशालेमेहून याबने गांवीं नेलें. सेफेर योहासीन. पृ २१.

३७९२ रब्बान योहानान जक्कायचा पुत्र याच्या पाठशाळेची स्थापना. सेमाह दावीद.

३७९६ आग्रीपास येरूशालेमेहून रोमशहरीं नेऊन टैबीरीयस बादशाहाने कैद केलें; त्यास दुसऱ्या वर्षी क्यालीग्युला बादशाहाने सोडिलें. सेफेर योहासीन पृ. १५८.

३८०० क्यालीग्युला बादशाहाने आपली मूर्त्ति पवित्र मंदिरांत ठेवण्याचा हुकूम केला; तो आग्रीपाच्या मागणीवरून रद्द झाला. सेफेर योहासीन. पृ १५८.

३८०४ पांचवा राजा आग्रीपा दुसरा, पहिल्या आग्रीपाचा मुलगा हा पहिल्याने लोकांचें कल्याण इच्छिणारा होता; परंतु मा-

उत्पत्तीचें वर्षे.

याहून त्याने आपल्या व दुसऱ्या लोकांवर फार जुलूम चालविला. याच्या वेळीं लढाई सतत चालत होती. योसी-फून. अ ६३

१८०५ हेलेना आडियाबेनची* राणी व तिचे दोघे पुत्र मुनबाज व इजाटस यांनी इस्राएली धर्म स्वीकारिला. हेलेना व तिचा नवरा हीं एके दिवशीं एकत्र असतां, त्यांच्या कानीं असी आकाशवाणी आली कीं, तुह्मास या वेळीं पुत्र होईल, तो मोठा, नामांकित व सर्व प्रकारें सुखी होईल. याप्रमाणें त्यांस पुत्र झाला; त्याचें नांव त्यांनी इजाटस ठेविलें. त्यावर बाप फार प्रीति करीत असे, म्हणून कांहीं वाढल्यावर त्याविषयीं त्याच्या भावांच्या मनीं हेवा उत्पन्न होईल, या भयास्तव त्याने त्यास आपल्या एका मित्राच्या दरबारीं पाठविलें. त्या राजाचीहि प्रीति त्याजवर बसून त्याने आपली मुलगी व आपल्या राज्याचा कांहीं भाग त्याच्या स्वाधीन केला. या देशीं इजाटस राज्य चालवीत असतां, हानानया नामें कोणी इस्राएल त्याच्या दरबारीं होता, त्याने त्यास इस्राएली धर्माची व शास्त्राची पूर्ण माहिती करून दिल्ही. तरी इजाटस लोकांच्या भयास्तव प्रसिद्धपणें तो धर्म स्वीकारूं शकला नाहीं. इकडे म्हातारपणामुळें त्याच्या बापाचा अंतकाळ जवळ आला; तेव्हां त्याने आपल्या सरदारांस सांगितलें कीं, माझ्या मागें माझें राज्य माझा पुत्र इजाटस यास द्यावें. या आज्ञेप्रमाणें तो राज्यकारभार इजाटसाच्या स्वाधीन झाला. एके दिवशीं येलीएझेर नांवाचा इस्राएल त्याकडे गेला, आणि त्यास पवित्र शास्त्र वाचितांना पाहून म्हणाला, महाराज, आपण जर त्या शास्त्रांतील आज्ञांप्रमाणें आचरण करीत नाहीं, तर मात्र वाचून काय फळ? सुंता झाल्या वांचून तुम्हास तें शास्त्र पाळितां येणार नाहीं. हें ऐकून इजाटस राजाने लागलीच

* आडियाबेन हा आश्शुर देशाचा एक प्रांत आहे.

आपली सुंता करून घेतली. यावरून त्याच्या आईस व हानानयास फारच भय वाटूं लागलें; तरी झाल्या गोष्टीस उपाय नाहीं म्हणून ईश्वरावर भाव ठेवून तीं स्वस्थ राहिलीं. यानंतर त्याचा वडील भाऊ मुनबाज व त्याची आई व दुसरे आप्त यांनींहि इस्राएली धर्म स्वीकारिला. आपल्या पांच पुत्रांनींहि या धर्माप्रमाणें आचरण करावें म्हणून त्यानें त्यांस अभ्यासा करितां येरूशालेमेस पाठविलें. त्यानें पारथीया देशच्या एका राजास त्याचें राज्य परत देवविलें, म्हणून त्याकडून त्यास पुष्कळ मान व हक्क मिळाले. त्यानें आपला धर्म सोडिला म्हणून एके वेळीं त्याच्या लोकांनीं आरब्बी राजाच्या सहायानें त्याजवर बंडावा केला; तेव्हां पहिल्यानें इजाटसाचा पराजय झाला, परंतु दुसऱ्या वेळीं शत्रूच्या सैन्याची दाणादाण होऊन आरब्बी राजानें आत्महत्या केली. मग ज्या पारथीयाचे राजानें त्यास पुष्कळ मान व हक्क दिल्हे होते, त्याच्या नातवास लोकांनीं बोलावून सांगितलें कीं, आमच्या राजानें धर्म सोडिला आहे, तूं येऊन त्याचें राज्य घे व आम्हावर राज्य कर. यावरून तो पारथीयाचा राजा चढाव करून आला, आणि इजाटसास त्यानें निरोप पाठविला कीं, तूं अन्य लोकांचा धर्म आचरितोस; तर ज्या देवावर तूं भरंवसा ठेवितोस, तो आतां तुला माझ्या हातांतून कसा सोडवितो हें पाहूं. इजाटसानें ईश्वरावर भरंवसा ठेवून उत्तर पाठविलें कीं, मी तुजसीं लढायास सिद्ध आहें. मग त्यानें एकांत ठिकाणीं जाऊन आपल्या डोक्यावर राख घेऊन व तरट पांघरून आपलें संकट ईश्वरापुढें ठेवून म्हणाला, "जे तुजवर आशा ठेवितात त्यांस तुझी दया वेष्टिते," हें तूं आपल्या शत्रूस सिद्ध करून दाखीव. इतक्यांत कोणा दुसऱ्या राजानें पारथीया देशावर चढाव केला. हें वर्तमान ऐकून इजाटसाचा शत्रु विस्मित होऊन आपला देश रक्ष-

ण्यासाठीं त्वरेनें परत गेला. यानंतर इजाटसानें आपलें राज्य निर्भयपणें चालविलें. मग हेलेना, तिचा मुलगा मुनबाज यासंगतीं येरूशालेमेस गेली. व तिनें पवित्र मंदिरास पुष्कळ मोठाल्या देणग्या दिल्ह्या. त्या वेळीं त्या नगरींत मोठा दुष्काळ पडला होता; म्हणून तिनें पुष्कळ द्रव्य खर्चून आपल्या व दुसऱ्या देशांहून धान्य मागविलें व गरीबांस वांटून त्यांचे प्राण वांचविले. इजाटस मेल्यावर त्याचा भाऊ मुनबाज राज्य करूं लागला. यानें इजाटस व हेलेना यांचीं प्रेतें येरूशालेमेस पाठविलीं. त्यांची कबर येरूशालेमेहून कांहीं अंतरावर अद्याप आहे. सेफेर योहासीन. पृ १५९.

३८१० रब्बान शिमओन गामलीएलाचा पुत्र, हा सानहेद्रीमाचा अध्यक्ष व पाठशाळेचा मुख्य गुरु होता. हा येरूशालेमेच्या नाशाच्या वेळीं शौर्यानें लढला, म्हणून शत्रूनें त्यास पुष्कळ यातना देऊन मारिलें. सेफेर योहासीन. पृ २१.

३८१२ योनाथान मुख्य याजक पवित्र मंदिरीं मारला गेला; त्यास कोणी मारिलें याचा शोध लागला नाहीं. योसीफून. अ ६३.

३८१६ क्लाडियस रोमशहरचा बादशाहा मरण पावला, हा आग्रीपा बरोबर मोठया स्नेहानें वागत असे. योसीफून. अ ६३.

३८१६ नीरो बादशाहानें आपला सरदार फ्लोरस यास येरूशालेमेस पाठविलें; त्यानें अनेक प्रकारें जुलूम केल्यावरून आनानी मुख्य याजक याचा पुत्र येलीएझेर यानें व त्याच्या सहायकाऱ्यांनीं रोमीलोकांचा पराजय केला, आणि फ्लोरस हा पळून गेला. योसीफून. अ ६४.

३८२२ आग्रीपा राजा नीरो बादशाहाचे आज्ञेंत वागूं लागला, हें अभिमानी लोकांस न आवडून त्यांनीं त्यासीं लढाई केली; पहिल्यानें अभिमानी लोकांचा जय झाला; परंतु मागाहून जेव्हां राजाचा जय झाला, तेव्हां अभिमानी लोकांनीं राजवाडे जाळून पुष्कळ नाश केला. योसीफून. अ ६४.

उत्पत्तीचें वर्ष.

३८२२ आग्रीपानें रोम शहरीं जाऊन हें वर्तमान नीरो बादशाहास कळविलें, त्यानें आपला सरदार सेसटियस यास पाठविलें; त्याची व आभिमानी लोकांची लढाई होऊन सेसटियसाचा पराजय झाला व तो रोम शहरीं पळून गेला. योसीफून. अ ६५.

३८२४ इस्राएलांबरोबर तह व्हावा ह्मणून नीरोबादशाहानें मोलवान नजराणा व त्याजबरोबर एक गोऱ्हा, त्याचीं शिंगें सोन्यानें मढवून व त्याच्या अंगावर रत्नजडित रेशमी कापड घालून पवित्र मंदिरीं होमा करितां पाठविला; परंतु आनानी मुख्य याजकानें हें सर्व नाकारून हा नजराणा आणणारांस मारून हांकून लाविलें. यावरून आग्रीपा पुनः रोम शहरीं गेला; त्यासंगतीं नीरोनें आपला सरदार पुनः पाठविला, त्याचाही आभिमानी लोकांनी पराजय केला. योसीफून. अ ६६.

३८२५ वेस्पेशन हा येहूदा देशांतील रोमी सैन्याचा सरदार नेमिला गेला. योसीफून. अ ६७.

३८२५ योसेफ गिरयोनाचा पुत्र याजक व इतिहास कर्त्ता हा इस्राएलांच्या सैन्याचा सरदार नेमिला गेला. योसीफून. अ ६७.

३८२५ वेस्पेशनानें योतापाता शहरास वेढा घातला, योसेफ व आंतील दुसरे लोक ४७ दिवस मोठ्या शौर्यानें लढले, शेवटीं रोमी लोकांनी तें शहर घेऊन ४०,००० लोक मारले. योसेफ एका गुहेंत लपाला, तेथूनहि त्यास रोमी लोकांनी धरून नेलें. यानंतर गामाला शहर घेऊन ९००० लोक मारले; आणि गेनेसारें सरोवराजवळ जी लढाई झाली तिजमध्यें १२०० जीवें मारले गेले, ३०,००० गुलामाप्रमाणें विकले आणि ६००० रोमशहरीं कैद करून पाठविले. योसीफून. अ ७१–७५

३८२५ योहानान हाग्गालीली आभिमानी लोकांचा मुख्य व

आनानी मुख्य याजक यांमध्यें बेबनाव झाला म्हणून आभिमानी लोकांनी येरूशालेमेंतील पुष्कळ मोठमोठाले लोकांस मारून त्यांचें द्रव्य लुटलें. योसीफून. अ ७५.

३८२५ नित्याचें अर्पण बंद पडूं लागलें. योसीफून. अ ७५.

३८२६ आभिमानी लोकांत तीन पक्ष झाले, त्यांचे पुढारी योहानान हाग्गालीली, आनानीचा पुत्र येलीएझेर व शिमओन असे होते. हे एकमेकांसीं लढूं लागले यामुळें पुष्कळ जीवांचा नाश होऊन, दोन लक्ष मनुष्यांस वीस वर्षांपर्यंत पुरे एवढें सांठवून ठेविलेलें अन्न त्यांनी जाळिलें. याप्रमाणे इस्राएल आपसांत लढूं लागले, हें पाहून इस्राएलांचें बल उणें होई-पर्यंत वेस्पेशनाने येरूशालेमेस वेढा घालण्याचें काम खोळंबविलें. योसीफून. अ ७६.

३८२७ वेस्पेशन रोम शहरचा बादशाहा झाला म्हणून तो रोम शहरीं गेला, व इस्राएलांसीं लढाई चालविण्यास त्यानें आपला पुत्र टैटस यास मागें ठेविलें. वेस्पेशनाने आपणा बरोबर आग्रीपा व त्याचा मुलगा व योसेफ इतिहास कर्त्ता यांस कैद करून नेलें. योसीफून. अ ७७.

३८२७ आग्रीपा वेस्पेशना विरुद्ध येरूशालेमेंतील लोकांसीं पत्र-व्यवहार चालवितो, असी वेस्पेशना पासीं कोणी चाहाडी केल्यावरून आग्रीपा व त्याचा मुलगा हे मारले गेले. योसीफून. अ ७७.

३८२७ वेस्पेशनाने योसेफास व त्याच्या सांगण्यावरून दुसऱ्या इस्राएलांस कैदेंतून मुक्त केलें; आणि योसेफास टैटसा-कडे पाठविलें. योसीफून. अ ७८.

३८२८ टैटसाने पेसाहा सणाच्या वेळीं येरूशालेमेस वेढा घातला योसीफून. अ ८३.

३८२८ इस्राएलांनी शरण यावें म्हणून टैटसाने त्यांजकडे योसेफास पाठविलें, त्याने त्यांस पुष्कळ समजाविलें, परंतु आभिमा-

उत्पत्तीचें वर्ष.

त्यांच्या पुढाऱ्यांमीं त्याचें म्हणणें मान्य केलें नाहीं. योसीफून. अ ८४–८६.

३८२८ टैटस येरूशालेमेचें एक गांवकूस फोडून आंत शिरला, परंतु इस्राएलांनीं आंतून नवीन तट बांधिला होता. ता. ७ इयार. योसीफून. अ ९१.

३८२८ आभिमानी लोकांनी रोमी लोकांस हटविलें ता. ५ सीवान. योसीफून. अ ९१.

३८२८ नित्याचें अर्पण बंद झालें. ता. १७ तम्मुज. योसीफून अ ९३.

३८२८ टैटसाने येरूशालेम नगर जिंकलें, आणि दुसरें पवित्र मंदिर बांधल्या नंतर ४२० वर्षें होऊन तें नाश पावलें. ता. ९ आब. योसीफून. अ ९४.

हा नाश होण्या पूर्वीं कांहीं अशुभ चिन्हेंहि दृष्टीस पडलीं. एक वर्ष येरूशालेमेवर तरवारीच्या आकाराचें शेंडें नक्षत्र उगवत असे; पेसाहाच्या दिवसांत रात्रीं पवित्रस्थानीं दिवसासारिखा प्रकाश पडत असे; होमा करितां नेलेल्या कालवडीस कोंकरूं झालें; शहराचा पूर्वे कडील दरवाजा जो वीस मनुष्यांवांचून हालत नसे, तो मध्यरात्रीं आपोआप उघडला; कांहीं दिवसां नंतर दिवस मावळण्या पूर्वीं ढगांत रथ व कवच पांघरलेले स्वार दृष्टीस पडत; शाबूओथ सणाच्या रात्रीं "आपण एथून निघून जाऊं या" असी वाणी पवित्र मंदिरीं ऐकूं आली. या पूर्वीं चार वर्षें मंडपाच्या सणापासून कोणीं हानानयाचा पुत्र येहोशूवा हा मोठ्याने ओरडून ह्मणत असे, कीं "पूर्वेकडून, पश्चिमेकडून व आकाशाच्या चोहों कोनांकडून येरूशालेमेच्या, पवित्र मंदिराच्या, नवऱ्याच्या, नवरीच्या व सर्व लोकांच्या विरुद्ध वाणी होत आहे," याप्रमाणे लढाई होईपर्यंत तो ओरडत असे, व लोक त्यास वेडा समजत असत. लढाई चालत असतां एके दिवशीं तटावर चढून "येरूशालेमेस व तिजमधील पवित्र मंदिरास हाय हाय" असें ओरडत

असतां रोमी सैन्या कडून एक दगड आला, तो त्यास लागून तो मरण पावला. यांशिवाय दुश्चिन्हाचे कांहीं लेखहि सांपडले. अशा चिन्हावरून इस्राएलांनी बोध घेऊन आपलें आचरण सुधारिलें नाहीं, ह्मणून ते व त्यांचें संतान ईश्वरी अवकृपेस पात्र झालें. योसीफून. अ ९४.

परंतु परमेश्वर सीयोनेचें सांत्वन करील, आणि तिच्या सर्व ओसाड्यांचें सांत्वन करील, आणि तिचें रान एदेना सारिखें व तिचें जंगल परमेश्वराच्या बागा सारिखें करील; तिजमध्यें आनंद व हर्ष, उपकार मानणें व गायनाचा शब्द हीं होतील. येशा. अ ५१ ओ ३.

पृथ्वी उत्पन्नकर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

वर्गणीदारांचीं नांवें.

मुंबई.

नांवें.	प्रती.
अ. आब्राहाम सकोबा पेणकर. चो.	१
,, योसेफ शेमूएलजी केहीमकर. चो.	५
,, शालोम शेमूएलजी केहीमकर पंतोजी	१
,, मोशे येलीया राजपुरकर......	१
,, शेमूएल मोशे राजपुरकर	१
,, शालोम बिनयामीनजी चीचोलकर	१
,, शेमूएल येलीया वरोलकर गव्बाय	१
,, शिमशोन शालोमजी वरोलकर.	१
,, आब्राहाम शालोमजी भास्तेकर	२
,, योसेफ इसहाक दीवेकर क. मु	१
,, दानीएल योसेफजी इंदापुरकर	१
,, दावीद याकोबजी चरीकर मेस्त्री चो	१
,, योसेफ आब्राहामजी तलकर गव्बाय	१
,, दावीद शेलोमो बोरघरकर. चो.	१
,, सीलेमान दानीएलजी पेझारकर मेस्त्री. चो....................	२
,, येलीयाहू शेमूएलजी नौगांवकर.	१
,, शेमूएल शालोमजी बोरघरकर.	१
,, याकोब सीलेमानजी दीवोरकर.	१
,, दावीद रेऊबेन कोर्लेकर	२
,, रेऊबेन आब्राहाम कोर्लेकर ...	१
,, रेऊबेन योसेफ पेणकर हाज्जान.	१
,, राहामीम रेऊबेन पेणकर	१
,, येहेजकेल शेमूएलजी आवासकर	१
,, मोशे शेलोमो झीराडकर काजी.	१
,, आहारोन शेमूएल नौगांवकर.	१
,, दावीद रेऊबेन चरीकर	१
,, आब्राहाम रेऊबेन राजपुरकर.	१

नांवें.	प्रती.
अ. रेऊबेन बिनयामीनजी पेणकर.	३
,, हाईम रेऊबेन पेणकर	२
,, बिनयामीन शालोमजी गडकर.	१
,, शेमूएल मोशे किल्लेकर. चो ...	१
,, आहारोन शेमूएल किल्लेकर ...	१
,, आहारोन मोशे उमर्डेकर	१
,, येहेजकेल बिनयामीनजी पेणकर कंट्राकटर. चो...........	५
,, आहारोन याकोबजी दीवेकर.	१
,, योसेफ याकोबजी पेझारकर ...	१
मि. हरीसन	१
अ. इसहाक आब्राहामजी दीवेकर.	१
,, शेमूएल सीलेमानजी नागांवकर.	१
,, याकोब फकीरजी शापुरकर...	१
,, आहारोन रेऊबेनजी थलकर.	१
,, शालोम शेमूएलजी तलकर......	१
,, रेऊबेन सीलेमानजी नागांवकर मेस्त्री	१
,, आब्राहाम दानीएलजी कुरुळकर	१
,, बाळाजी पीठाजी भोरपकर. ...	१
,, येलोजी आहारोनजी पेणकर. सु	१
,, इसहाक शेलोमो घोसालकर ...	१
,, शेलोमो आब्राहामजी किल्लेकर	१
,, इसहाक आहारोनजी भास्तेकर	१
,, इसहाक आब्राहामजी शापुरकर	१
,, शालोम शेमुएलजी नौगांवकर ड्राफ्समन	१
,, दानीएल दावीदजी उमर्डेकर हेड क्लार्क. ग्रा. पी. आ.......	१
,, मेनाहशे दानीएल उमर्डेकर ...	१
,, दावीद आब्राहाम आवासकर...	१
,, शेमूएल हाईमजी पेझारकर ...	१
,, योएल शेमूएल शिरकोलकर ...	१

नांवें.	प्रति.
अ. याकोब शेमूएल शिरकोलकर	१
,, मोशे येलीया पिंगले	१
,, याकोब येलीया पिंगले.........	१
,, रेऊबेन शालोम चरीकर	१
,, सीलिमान येहेजकेल नौगांवकर	१
,, शेमूएल शालोमजी अष्टमकर...	१
,, शिमशोन मोशे दीवेकर	१
,, शिमओन इसहाकजी इवलेकर.	१

ठाणें.

,, शेलोमो दानीएल नौगांवकर ...	१
,, शिमशोन आब्राहाम तलकर ...	१
,, दानीएल शिमशोन तलकर ...	१
,, शेमूएल दानीएल खरीलकर...	१
,, शालोम शेमूएल खरीलकर ...	१
,, शेलोमो शिमशोन डांडुलकर ...	१
,, शेमूएल मोशे नागांवकर सु. पे.	१
,, आब्राहाम हाईम आवासकर ...	१

पनवेल.

,, आब्राहाम दावीदजी चरीकर हाज्जान	१
,, शेमूएल आब्राहामजी तरणखोपकर पंतोजी	१
,, आब्राहाम शेमूएल शापुरकर काजी	१
,, योसेफ आहारोनजी कुलाबकर	१
,, आब्राहाम येहेजकेलजी दीवेकर क. मु.	१
,, शेमूएलजी सीलेमानजी नौगांवकर	१
,, शेमूएल शालोमजी चीचोलकर	१
,, इसहाक शेलेमो दीवेकर क. ...	१
,, आब्राहाम दावीदजी भास्तेकर	१

आलिबाग.

,, शालोम सीलेमानजी पेझारकर. फ. क्ला. हा. आ. पे.	१

नांवें.	प्रति.

रेवदंडा.

अ. शेमुएल योसेफ राजपुरकर पंतोजी हाज्जान	१
,, दावीद आहारोनजी ढोकरकर. चो	१
,, शालोम येलीया शापुरकर. गब्बाय	१
,, इसहाक सीलेमानजी अष्टमकर.	१
,, मोशे दावीद मळेकर	१
,, दावीद शेलोमो राजपुरकर......	१

चेऊल.

,, हाईम बिनयामजी दांडेकर......	१

कोर्लई.

,, येलोजी याकोबजी दांडेकर. चो.	१

धोंडखार.

,, बंदुजी नथुजी चोर्डेकर गब्बाय.	१

अष्टमी.

,, बंदुजी येलोजी अष्टमकर म्हेतर.	१

पुणें.

,, हाईम शेमूएल केहीमकर	३
,, रेऊबेन शेमूएल केहीमकर	२
,, दानीएल राहामीमजी तलकर सु. मे. बा. पे.................	२
,, आहारोन दानीएलजी तलकर..	२
,, रेऊबेन दानीएलजी तलकर ...	१
,, शालोम बाळाजी तलकर सु. पे.	१
,, येहेजकेल मोशे नागांवकर फ. क्ला हा. आ.................	१
,, येलीएझेर दानीएलजी कोलेटकर ड्राफ्समन. पे.	१
,, बिनयामीन येलीएजेर कोलेटकर	१
,, शालोम शेमूएलजी चरीकर ज. पे.	१

नांवें.	प्रति.
अ. शिमओन शेमूएलजी चरीकर	१
,, शेलोम दावीद म्हेडेकर सु. पे....	१
,, मोशे याकोबजी तलकर	१
,, एज्रा शालोमजी कोलेटकर; सु. पे.	१
,, हाईम शेमूएलजी पेझारकर सु. पे	१
,, मोशे येहेजकेल सानकर	१
,, सादीक बिनयामीन कांदलेकर. फ. क्ला. हा. आ	१
,, योसेफ शेलोमो झीराटकर......	२
,, दावीद शेलोमो झीराटकर	१
,, येलीयाहू शालोम वालवटकर ...	१
,, योसेफ शेमूएल झीराटकर	१
,, सिप्पोराबाई बाथ शेमूएल झीराटकर	१

सातारा.

,, शालोम बापुजी वरघरकर	१

कारवार.

,, योसेफ दानीएल	१
,, शालाम सीलेमानजी आपटेकर	१

येलापूर.

,, आब्राहाम शालोमजी पेझारकर.	१

भोसावळ.

,, योसेफ हाईम गार्ड	१
,, येलीएझेर सीलेमानजी तलकर.	१
,, जे. एस. स्यामूएल जावलीकर.	१
,, शालोमजी बंदुजी मल्याणकर.	१
,, दावीद सीलेमानजी बेलकर......	१
,, येहेजकेल बिनयामीनजी रामराजकर	१
,, हाईम रेऊबेनजी भास्तेकर	१

ब्ऱ्हाणपूर.

,, याकोब शेमूएलजी वासकर. फ. क्ला. हा. आ.	१

भडोच.

नांवें.	प्रति.
अ. राहामीम दानीएलजी पेणकर.	१
,, शिमशोन योसेफजी घोसालकर. बी. ज्यो	१
,, आब्राहाम येलोजी शीरकोलकर. बी. ज्यो	१

अहमदाबाद.

,, आब्राहाम बिनयामीनजी येरलकर फ. क्ला. हा. आ. पे	५
,, योसेफ सीलेमानजी दांडेकर. फ. क्ला. हा. आ	४
,, शेलोमो येलीया वांक्रुलकर सु.मे. स. बा. पे.....................	१
,, येहूदा आब्राहाम शिरगांवकर.	१
,, योसेफ येहेजकेल भोनकर......	१
,, हाईम शेमूएलजी झीराटकर काजी	१
,, आहारोन बिनयामीनजी येरलकर.	१
,, रेऊबेन दानीएलजी बामनोलकर...........................	१
,, हाईम शेलोमो गालसुलकर......	१

पिंपळगांव बसवत.

,, योसेफ शेलोमो दीघोरकर. डा.	१

आजमीर.

,, येहेजकेल बिनयामीनजी कांदलेकर गार्ड	१

कराची.

,, योसेफ शिमशोनजी सानकर फ. क्ला. आ आपोथिक्यारी......	२
,, योसेफ रेऊबेनजी दुदकर	१
,, बिनयामीन रेऊबेनजी दुदकर ...	१
,, आर. शेमूएल	१
,, आर. शेमूएल म्हेडेकर.........	१
,, शालोमजी दावीदजी उमर्डेकर सर्वेर	१
,, योसेफ इस्राएल	१

नांवें.	प्रति.
अ. आब्राहाम योसेफ...............	१

हैद्राबाद सिंध.

,, मोशे येलीया पेणकर फ. क्वा. हा. आ.	१

मंहमदखानाचा टान्डा.

,, शिमशोन दावीदजी म्हेडेकर फ. क्वा. हा. आ.	१

लारकाना.

,, येहेजकेल इसहाकजी पुगांवकर फ. क्वा. हा. आ.	१

सीबी.

,, यलीएझेर बिनयामीनजी वामनोलकर	१

आदन.

,, रेऊबेन आहारोनजी भोनकर...	१

रेजिमेन्ट २ रें ग्रेनेडियर.

,, येहेजकेल शेमूएलजी भोनकर सु.	१
,, शेमूएल शालोमजी किल्लेकर फ. क्वा. हा. आ.	१

रेजिमेन्ट ३ रें.

,, हाईम शेमूएलजी चरीकर. सु ..	२
,, इसहाक सदकीएलजी वरोलकर. ज.	१
,, सीलेमानजी सदकीएलजी वरोलकर क्वा. मा. हा	१

रेजिमेन्ट ८ वें.

,, बिनयामीन दानीएलजी चोर्डेकर	१

रेजिमेन्ट १० वें.

,, येहेजकेल शिमशोनजी किल्लेकर फ. क्वा. हा. आ...............	१

नांवें.	प्रति.
अ. शालोम याकोबजी खरीलकर. ज.	१
,, शेमूएल याकोबजी खरीलकर. ज.	१

रेजिमेन्ट १२ वें.

,, मोशे बापुजी मळेकर सु. मे. बा.	१
,, रेऊबेनजी बापुजी मळेकर. सु.	१
,, सीलेमानजी सदकीएलजी कोकबानकर. सु	१
,, जखरीएलजी कांदलेकर. सु...	१
,, आब्राहामजी चरीकर. ड्री. हा.	१
,, येहूदा याकोबजी कासूकर ना क्वा. मा, रायटर	१
,, दानीएलजी बंदुजी दीघोरकर ला. ना.	१
,, आब्राहाम मुसाजी चोर्डेकर ला. ना. प्युपिल टीचर............	१
,, येलीयाहू याकोबजी कासूकर प्रा.	१
,, रांहामिम आब्राहामजी शापूरकर. प्रा. क्यानडीडेट..............	१
,, दावीद मोशे चोर्डेकर प्रा.	१
,, रेऊबेन येहेजकेलजी मळेकर. प्रा.	१

रेजिमेन्ट १५ वें.

,, शालोमजी मुसाजी पेणकर सु. मे	१

रेजिमेन्ट २५ वें.

,, बिनयामीन शालोमजी नागांवकर सु. मे	१
,, येहेजकेल बापुजी कोलेटकर. ज.	१
,, दावीदजी शेमूएलजी पिंगले क. हा.	१

रेजिमेन्ट २ री बलोच.

,, शुकूर इसहाकजी नौगांवकर ज.	१
,, मेनाश्शे शेमूएलजी कोर्लेकर ...	१

BOMBAY: PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA.

या कर्त्यानें केलेल्या ग्रंथांचीं नांवें.

THE PRAYERS OF THE DAY OF ATONEMENT.

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

Joseph Ezekiel Rajpurker

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

AND

SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

VOL. II.

BOMBAY:

PRINTED AT THE "ORIENTAL PRESS."

1868–5628.

THIS

WORK

HAS BEEN PUBLISHED

FOR THE

BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY

AT THE EXPENSE OF

ABRAHAM SUKHOBA PENKER, ESQUIRE,

INSPECTOR IN THE MUNICIPAL DEPARTMENT,

IN MEMORY OF

HIS FATHER

SUKHOBA ETTJEE PENKER, ESQUIRE,

AND HIS UNCLE

BENJAMIN ETTJEE PENKER ESQUIRE.

תפלה ליום כפור

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग दुसरा.

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक

व

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे चिटणीस

याणीं

भाषांतर केलें.

मुंबईमध्यें

"ओरिएन्टल" छापखान्यांत छापिलें.

इ. स. १८६८. इस्राएली ५६२८.

हा

ग्रंथ

लोकोपयोगाकरितां

अब्जम आब्राहाम सखोबा पेणकर

म्युनिसिपल खात्यांतील इन्स्पेक्टर, यांणीं आपले खर्चानें

स्वर्गवासी झालेले त्यांचे तीर्थरूप

अज्जम सखोबा येटजी पेणकर

आणि त्यांचे चुलते

अज्जम बिनयामीन येटजी पेणकर

यांचे स्मरणार्थ

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीकरितां

छापून प्रसिद्ध केला.

प्रस्तावना.

या ग्रंथाच्या पूर्व भागीं प्रायश्चित्तच्या दिवशीं पवित्र मंदिरांत जें पूजन होत असे, त्याचें निरूपण केलें आहे. त्या पूजनामध्यें अवघा दिवस जात असे; आणि त्याकडून पापाचें प्रायश्चित्त होऊन क्षमा होईल, या आशेनें सर्व लोक अंगणांत उत्सुकपणें उभे असत. तें पूजनमंदिर नसल्या कारणानें सध्यां मना झालें आहे, तरी या दिवसाचा नियम सर्वकाळपर्यंत चालणार, ह्मणून त्या पूजनाबद्दल आपण आपल्या ओठांचीं वांसरें म्हणजे प्रार्थना वाहातों. आणि पूर्वीं तो अवघा दिवस जसा पूजनांत जात असे, तसा आतां प्रार्थनेंत जावा, आणि त्या शुद्धतेच्या दिवशीं अन्य विचारांचा संचार मनीं होऊं नये, ह्मणून पांचवेळ प्रार्थना करावी, असा नियम आहे. पापाची क्षमा झाली असतां केवळ जीवनच प्राप्त होतें, तें साध्य करायास पूर्ण पश्चात्ताप करून एकाग्र चित्तानें ईश्वरापुढे विनंती केली असतां तो मान्य करितो.

या सर्व गोष्टींवरून या दिवसाचें माहात्म्य फारच मोठें आहे, असें दिसून येतें. नित्य तीन वेळ, शाब्बाथ दिवशीं व सणाच्या दिवशीं चार वेळ, परंतु प्रायश्चित्ताच्या दिवशीं पांच वेळ प्रार्थना करावी; आणि दुसरे सर्व उपास शाब्बाथ दिवशीं आले असतां दुसऱ्या दिवशीं करावे, परंतु हा उपास शाब्बाथ दिवशीं आला असताहि करावा, यावरून व वर्षांतील सर्व दिवसांपेक्षां मोठा दिवस असें ह्मटल्यावरूनहि त्याचें मोठें माहात्म्य कळून येतें.

हा ग्रंथ इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीकरितां तयार झाला. परंतु तो लोकोपयोगाकरितां छापून प्रसिद्ध करण्याचा खर्च अज्जम आब्राहाम सखोबा पेणकर इन्स्पेक्टर यांनी पुरविला, आणि ज्यांजवळ पहिला भाग असेल त्यांस हा दुसरा बक्षीस करावा असें त्यांनीं दर्शविल्यावरून मंडळीनेंहि त्याप्रमाणें ठराव

केला आहे. यावरून त्यांचें लक्ष लोककल्याणाकडे केवढें आहे, हें प्रत्यक्ष दिसून येतें. परंतु अशासाठीं आह्मास त्यांची प्रशंसा करायास नको; जें स्तुत्य काम त्यांनीं केलें आहे त्याकडूनच होईल. आमचे वाचक या ग्रंथाचा यथायोग्य उपयोग करून प्रसिद्ध करणाराचा हेतु पूर्ण करितील अशी आशा आहे.

या ग्रंथांतील संक्षिप्त शब्द.

אֹוֹאֹ	==	אלהינו ואלהי אבותינו
בֹּאֹ	==	ברוך אתה ״
व. प्र. प्रा.	==	वर्षप्रतिपदेची प्रार्थना
पा. क्ष. प्रा.	==	पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना
भा. प.	==	भाग पहिला.
शा. अ.	==	शाब्बाथ असल्यास
दो. वे.	==	दोन वेळा
ती. वे.	==	तीन वेळा
अ. ओ.	==	अध्याय, ओवी.
इ.	==	इब्री.

תפלה ליום כפור

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

מוסף

मुसाफ (अधिक प्रार्थना.)

השיבנו ״ हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव, ह्मणजे आम्ही फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

मुसाफा अगोदर हें बोलतात.

אשפוך דמי נפשי हे अनंता! तुझ्या दयासनापुढें मी आपल्या जिवाचें रक्त ओतितों, आपल्या प्राणाचा व आत्म्याचा सुगंध दाखवितों आणि काकुळती करून आपल्या अश्रूंचें पेय अर्पण करितों; तर हे करूबांत बसणाऱ्या, प्रगट हो, आणि हे माझ्या प्रभू राजा, तारण कर; कारण पूजनाचें तेल व सुगंध हीं नाहींशीं झालीं आहेत. तूं आपल्या नामाकरितां व गौरवाकरितां आपला मुगुट (राज्य) पुन: स्थापन कर. हे इस्राएलाच्या आशापात्रा! आमच्या राजा, आह्मास अगदींच कां विसरलास? आश्चर्यकारक शेवट * कोठपर्यंत तूं आह्मापासून गुप्त राखिशील? हे आमच्या बापा, त्वां आमचा सर्वकाळ धि:कार केला आहे काय? हे अनंत देवा! त्वरा करून दया कर, कारण आह्मामध्यें तुझें नाम गाजविलें आहे, हे जीवंत व निश्चल देवा, आह्मी तुजपुढें अनाथासारिखे आलों आहों; आह्मी विनंती करितों कीं, आह्मास सोडूं नको. आह्मी जाणतों कीं, तूं सर्व गोष्टी करूं शकतोस; कोणतीहि गोष्ट तुला असाध्य आहे काय? हे परमेश्वरा,

---

* माशियाहचा वेळ.

तुझी दया व तुझें एकत्व आह्मास दाखीव, मग तुझा समुदाय तुजकडे परतेल, आणि लोक एकत्र होऊन तुझी सेवा करितील, तुझी दया आणि पाहिल्याप्रमाणें आतांहि तुझें सामर्थ्य थोर केव्हां होतील ? आकाशांतून तूं पाहा, कीं आह्मी नीच झालों, आणि तुजवांचून आह्मास कोणी नाहीं; आह्मावरोबर जी अशुद्धता वास करिते, तिजपासून आह्मास शुद्ध कोण करील ? हे देवा,* मी विनंती करितों कीं, आमच्या सर्व अपराधांचें प्रायश्चित्त कर व ते क्षमा कर; कारण आह्मी पाप केलें, अपराध केले, व उल्लंघनें केलीं; तूं आमचा धिक्कार नाहींसा कर, कारण तुझें नाम आह्मास दिल्हें आहे, तुझे दास व प्रियकर पृथ्वीवर जे सात्विक होते, जे रम्य ठिकाणीं तुझ्या विलक्षण नामाच्या पवित्रते-करितां एक वेळ व सात वेळ रक्त शिंपडीत असत, त्यांची आठवण कर; आणि त्यांस तूं आपल्या रागांत धूपाप्रमाणें ठेव (आणि त्यांची पुण्याई तूं आपल्या रागांत धूपाप्रमाणें मान्य कर;) जरी तुझा जीव (तूं) क्रोधामुळें सियोनेचा कंटाळा करितो, तरी तूं कां संतप्त होतोस ? हे देवा, तूं फीर आणि तेथें तूं आपलें परम पवित्र मंदिर आणि आपलें गौरव पुनः स्थाप. आणि मी विनंती करितों कीं, तुझ्या आसनांतून कोरलेल्या, तुझ्या दयारूप पाण्यांत अंघोळ करणाऱ्या, तुझ्या भयामुळें कांपणाऱ्या, आणि तुझ्या नामांत फुगणाऱ्या (गौरव मानणाऱ्या) आत्म्यास तूं मौल्यवान कर; जर तो आपल्या तर्फेकडून अशुद्ध असला, तर तूं आपल्या तर्फेकडून त्यास पवित्र कर, आणि यासाठींच इस्राएलांचा समुदाय तुजपुढें नेमाप्रमाणें येतो. हे बापा, लेंकरांस आज तूं आपली सत्यता कळीव; हे प्रभू, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

קדיש לעילא भा. प. पृष्ठ ९.

एथें हळू व एकचित्तानें वाचायाचा אדני שפתי भा. प.

---

* एथें देव याचा इब्री शब्द השם आहे. ईश्वराचें नाम वेळोवेळ घेऊं नये ह्मणून त्या पवित्र नामाबद्दल या शब्दाचा उपयोग केला आहे.

पृष्ठ १४ पासून ונתן לנו पृष्ठ १७ याच्या शेवटपर्यंत वाचावें. त्यानंतर हें पुढील वाचावें.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या पापांमुळें आह्मी आपल्या देशांतून पाडाव करून नेले गेलों, आणि आमच्या मुलुकापासून दूर केले गेलों आहों; यास्तव तुजपुढें अर्पण करायास आम्ही शकत नाहीं. आणि आह्मा-करितां प्रायश्चित्त करायास मुख्य याजकहि नाहीं, आमच्या ओठांची विनंती मात्र आहे. हे परमेश्वरा ! आमच्या व आमच्या पूर्वजांच्या देवा, दयाळू राजा, तुजपुढें असी प्रसन्नता होवो कीं, तूं फिरून आह्मावर, आणि आपल्या अनंत दयेनें आपल्या पवित्र मंदिरावर दया कर; आणि तें लवकर बांधून त्याचें वैभव वाढीव. हे आमच्या बापा, राजा व देवा, आह्मावर तूं आपल्या राज्याचें गौरव लवकर प्रगट कर; सर्व प्राण्यांच्या देखतां आह्मावर प्रकाशित होऊन थोर मानिला जा. आमच्या विखरलेल्यांस राष्ट्रांमधून जवळ आण; आणि आमच्या परागंदा झालेल्यांस पृथ्वीच्या शेवटापासून एकवट कर. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझें नगर सियोन एथें आम्हास गायन करीत, आणि तुझें पवित्र नगर येरूशालेम एथें सर्वकाळच्या आनंदानें ने. हे परमेश्वरा, मग तेथें नित्याचीं नेमलेलीं अर्पणें त्यांच्या रीतीप्रमाणें आणि अधिक अर्पणें त्यांच्या पद्धतीप्रमाणें आह्मी करूं ह्मणजे (शा. अ. या शाब्बाथ दिवसाचें व) या प्रायश्चित्ताचे दिवसाचे अपराधांची क्षमा होण्याच्या दिवसाचें, पवित्र मेळा मिळण्याच्या दिवसाचें अधिक अर्पण (शा. अ. अधिक अर्पणें,) असीं आम्ही तुजपुढें प्रीतीनें, तुझ्या इच्छेच्या आज्ञांप्रमाणें, जसें तुझा सेवक मोशे याच्या हातांकडून आम्हाकरितां तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे, त्याप्रमाणें आम्ही करूं व अर्पूं.

यानंतर עלינו לשבח भा. ५. पृष्ठ ६१ हें वाचून त्यापुढें אלהינו ואלהי אבותינו पृष्ठ १७ पासून עושה שלום पृष्ठ २४ याच्या शेवटपर्यंत वाचावें.

אדני שפתי पुनः मोठ्याने बोलल्या अगोदर हीं पुढील दोन गीतें बोलण्याची चाल आहे.

ינוב פי ניב कठोर मन आपल्या तोंडचीं वचनें उच्चारील आणि त्याजकडे (देवाकडे) पुष्कळ भयानें जाईल. मी कोण! कीं, मी मुक्यांस वाचा देणारा पुढें विनंती करावी! अग्नींतून कोरलेलीं मनुष्यें (दूत) स्तवन कधीं बंद करीत नाहींत; परंतु धिःकारलेला व वर्जलेला मनुष्य देवापुढें कसें भाषण करूं शकेल! त्याचें सैन्य लक्षावधि आहे, यद्यपि तें त्याच्या चमत्कारांचें पूर्ण वर्णन करूं शकत नाहीं; त्याच्या (सर्व) प्राणीमात्रांपेक्षां जो अति नीच, तो सदासर्वकाळ जीवंत (जो देव) त्याची स्तुति कसी करील? माझ्या पवित्रापुढें (देवापुढें) मी कसा फिरूं? आपलें डोकें कसें उंचावूं व कसें उत्तर देऊं? माझ्या जीवाकरितां मला फार उकळ येतो; कारण, तो उंचांमध्यें स्थापिलेला आहे, यास्तव जोंपर्यंत मी त्याजबरोबर वास करित आहें, तोंपर्यंत उंचांत वस्ती करणारा जीवंत देव, जो दुर्बळांनी त्याची स्तुति सर्व दिवस करावी ह्मणून त्यास शक्ति देतो, त्याचें मी स्तवन करीन.

שמעתי "हे परमेश्वरा! तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहें.

אלהי ישעתי " हे परमेश्वरा, माझ्या तारणाच्या देवा आणि माझ्या सहायाच्या आशापात्रा, आतां माझ्या तोंडच्या स्वसंतोषाचे अर्पणास तूं प्रसन्न हो, माझ्या आरोळीकडे मन लाव (तो आपल्या मंदिरांतुन माझी वाणी व माझी काकुळती ऐकेल;) हे परमेश्वरा, मी तुला प्रार्थितों. "

חננו לך " हे परमेश्वरा, आह्मावर दया कर; आह्मी तुझी वाट पाहतों; आह्मी पाप केलें व विपरीत वर्त्तलों, आह्मी सर्व मेंढरांप्रमाणें बहकलों आहों; तरी तुजपुढें दया व सत्यता असोत, कारण तूं आमचा बाप आहेस; परमेश्वर दयाळू व कृपाळू आहे. "

ידין עמים " जरी मनुष्य आपणास गुप्तांत लपवील, तरी परमेश्वर लोकांचा न्याय करील; तो नीतीने भूमीची आणि सरळ-

पणें राष्ट्रांची न्यायाधिशी करील, तो दीनांस चालवील, कारण प्रायश्चित्ताच्या दिवसाचें स्मरण राखून ते देवाकडे फिरतात. ”

ידע מחשבות ” परमेश्वर मनुष्याचे विचार व सर्व कल्पना जाणतो. दुष्ट आपला मार्ग आणि पापी आपले विचार सोडील, आणि तो (ईश्वराकडे) फिरून पश्चात्ताप करील, मग त्याचीं सर्व पापें क्षमा करून हें त्याजकडे पुण्य असें मोज, तो परमेश्वराला दान आणील” ”

מנת חלקי ” परमेश्वर माझा विभाग, माझें गुप्तस्थान व माझी ढाल आहे, माझीं उलंघनें खोडून माझा अन्याय जावा म्हणून मला पक्कें धू, माझ्या कण्हण्याच्या वाणीनें हाक मारून माझा गळा बसला आहे; हे परमेश्वरा ! खोलस्थानांतून मी तुला हाक मारीत आहें. ”

משגב לדך ” परमेश्वर दुःखितांचा आश्रय व इस्राएलांचा उद्धारणारा आहे; सर्व इस्राएलांमध्यें माझा न्याय तुझ्या पुढून प्रगट होईल; हे इस्राएलाच्या आशापात्रा ! गुप्त दोषांविषयीं तूं मला निर्दोषी कर, माझ्या पापापासून मला शुद्ध कर; कारण हे परमेश्वरा, जीवनाचा झरा तुझ्याजवळ आहे. ”

ומלך גדול ” हे परमेश्वरा ! महाराजा, माझ्या प्रकाशा व तारका, आपल्या सेवकाविषयीं माझ्या घायांमुळें न्यायांत जाऊं नको; आणि माझा सरळपणा मजविषयीं साक्ष देवो, परंतु माझें उलंघन व माझें पाप (साक्ष न देवोत) ”

דבר ויקרא ” परमेश्वरानें हाक मारून म्हटलें कीं, याच दिवसीं तो तुम्हास शुद्ध करील; यासाठीं परमेश्वर सांपडेल त्या काळीं त्याला शोधा, आणि तुम्ही आपलीं वस्त्रें नव्हे, परंतु आपलीं मनें फाडा; आणि तुम्ही आपणाबरोबर सत्य मार्ग व वचनें घेऊन परमेश्वराकडे फिरा. ”

עשה למען שמך ” हे परमेश्वरा ! तूं आपल्या नामाकरितां माझा जीव अवश्य खंडून सोडीव. माझे अन्याय तर माझ्या डोक्यावरून पार गेले आहेत, आणि (त्यांची) संख्या

शेतांतील कोंबासारिखी अधिक वाढली आहे; याकारितां मी पुढें येऊन आपले दोष झांकीत नाहीं, परंतु ह्मणतों कीं, मीं आपलीं उल्लंघनें परमेश्वरापुढें कबूल होईन.' ”

יִגְמוֹר בַּעֲדִי ” परमेश्वर माझें कार्य सिद्धीस नेईल, मग मी मोठ्या मंडळीमध्यें आपलें गीत गाऊन त्याची स्तुति करीन; हे तारणाऱ्या, स्वामि व आमचे अन्याय धुळीस मिळविणाऱ्या, तो तुझ्या महान व भयंकर नामाचें स्तवन करील. मला माझ्या मोठ्या अतिक्रमाविषयीं निर्दोषी कर; हे परमेश्वरा ! तुझ्या जवळ माझ्या तोंडांतलीं, वाक्यें आणि माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.”

חִזְקוּ וְיַאֲמֵץ ” हे परमेश्वरा ! जे तुजवर भरंवसा ठेवितात त्यांस धैर्य देऊन धीट कर; परमेश्वराने आमची आठवण केली आहे, तो इस्राएलाच्या घराण्याला आपला आशीर्वाद देईल; आणि परमेश्वर इस्राएलाचा पवित्र व त्याचा निर्माण करणारा ह्मणेल कीं, अहो परमेश्वराचे वाट पाहाणारे, तुह्मी सर्व धीर धरा, ह्मणजे तो तुमचें हृदय सबळ करील. ”

אֲתָאנוּ לְחַלּוֹת आह्मी तुजपुढें प्रार्थना करायास आलों आहों, कारण कीं, दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत. आतां आह्मास लज्जित करूं नको, आतां आह्मास तुजसमोरून रिकामे परतवूं नको; आह्मास क्षमा कर आणि आह्मासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אֲתָאנוּ לְבַקֵּשׁ हे भयंकरा, अघोर व संकट समयीं संरक्षण करणाऱ्या, आह्मी तुझ्या जवळून क्षमा मागायास आलों आहों; तूं आह्मास जीवंत राख, आह्मावर दया कर आणि तुझें नाम आह्मास ठेविलें जावूं दे; आह्मास क्षमा कर आणि आह्मासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אָבוֹא כְּעָנִי मी तुझ्या दारीं दरिद्र्या सारिखा मागायास आलों आहें; आणि विनंती व काकळूत करून प्रार्थनेस आरंभ करितों; तर आतां आह्माकरितां तूं दयेचा दरवाजा उघड, आह्मास क्षमा कर आणि आह्मासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אוחילה לאל मी देवाची वाट पाहीन, मी त्याच्या पुढें प्रार्थना करीन; त्यापासून मी जिभेचें उत्तर (वक्तृत्व) मागेन, कीं, त्याजकडून लोकांच्या समुदायामध्यें त्याच्या पराक्रमाविषयीं गाण्यास मी शक्तिमान होईन; त्याच्या आश्चर्य कृत्यांवरून मी हर्षानें कीर्तनें करीन; मनाचे संकल्प मनुष्याचे; परंतु परमेश्वराकडून जिभेचें उत्तर आहे.

אדני שפתי תפתח पुनः मोठयानें बोलते वेळीं
מי כמוך पर्यंत झाल्यावर हें बोलतात.

ובכן נקדישך आणि हे राजा! याप्रमाणें आह्मी तुला पवित्र मानूं. दो. वे.

במרומי ערץ भयंकर उंचांत (आकाशांत) तुझ्या विश्रांतीचें आसन आहे; आणि पृथ्वीवरील वसणाऱ्यांमध्यें तुझ्या अधिकाराचें सामर्थ्य आहे; ते तुझ्या सौंदर्याच्या महत्वास सन्मानितात व हे तुझ्या राज्याच्या नामास पवित्र मानून ह्मणतात कीं, परमेश्वरासारिखा कोणी पवित्र नाहीं, तुझ्याशिवाय कोणी नाहीं. भयंकर आकाशांत त्याच्या स्तुतीचें आसन आहे, आणि त्याच्या पोशाकाच्या कोणाकडून मंदिर भरलें आहे; कांहीं उजव्याकडे व कांहीं डाव्याकडे असे सेराफीम त्याच्याजवळ उभे आहेत. आणि पृथ्वीवरील वसणारांमध्यें देवाला ओळखणारे लोक दरिद्र्याप्रमाणें मागायास आज उभे आहेत, ते उद्धारणाऱ्या व खंडून घेणाऱ्या खडकरूप आश्रयाची स्तुति करितात व त्यापुढें नमन करितात, आणि याकोबाचा पवित्र, इस्राएलाचा देव यास ते पवित्र मानितात. भयंकर आकाशांत महान दूत एकदाच (देवाच्या) भयानें निघून जातात व त्रासानें परत येतात, आणि एकच जो राजा त्यास कंपायमान होऊन सन्मानितात; त्यांतील प्रत्येकास सहा सहा पंख आहेत. आणि पृथ्वीवरील वसणाऱ्यांमध्यें आज समाजांचे समा-

ज पांच प्राथना * करीत तुजकडे येतात; आणि मोठ्या गजरानें देवाचा सन्मान करून ह्मणतात कीं, स्तवनामध्यें राहणारा तूं पवित्र आहेस. भयंकर आकाशांत सर्व शक्तिमानाचें नाम पूर्ण उच्चारिलें जातें; त्याकडून सर्व मनें घाबरतात व सर्व मांसमय थरथरतात. एका पाहाऱ्यावरील पाहेरेकरी दुसऱ्या पाहाऱ्यावरील पाहारेकऱ्यांस विचारितात कीं, त्याचें ठिकाण कोठें आहे ? आणि याप्रमाणें ते एक प्रत्येकाला मोठ्याने बोलतात. आणि पृथ्वीवरील वास करणाऱ्यांमध्यें कोरलेल्या नियमास वतन मानून घेणारे, आणि ज्यांस (ईश्वराने आपली) पहिली संपत्ति असे स्वीकारून घेतलेले लोक त्याच्या नामास लगटून राहतात; आणि सैन्याचा परमेश्वर बळकट हाताने उंचाविला जातो, आणि देव जो पवित्र त्याला न्यायाने पवित्र मानितात. भयंकर आकाशांत दुतांचीं सैन्यें, आणि पृथ्वीवरील वास करणाऱ्यांमध्यें भविष्यकथनांच्या नियमाचें मनन करणारे, यांतून ते मोठ्या गजराने त्यास सन्मानितात, आणि हे शेंकडो व हजारो त्याची पवित्रता गाजवून "पवित्र, पवित्र, पवित्र सैन्यांचा परमेश्वर आहे" असें ह्मणतात.

ובכן ולך תעלה आणि याप्रमाणें तुझी पवित्रता वर्णिली जाईल; कारण तूं आमचा देव आहेस. दो. वे.

ארץ התמוטטה इस्राएलाच्या परमेश्वर देवापुढें पृथ्वी घाबरली व विशकलली; आणि देवाचे डोंगर हालले व कांपले. याकोबाच्या देवापुढें ध्रू व्याकुळ झाले; कडे थरथरले व डगमगून तुकडे झाले; आणि वांकडे मार्ग सरळ झाले. मोठ्या गजराची वाणी ऐकून ते चकित व दंग झाले, आणि भ्याले व घाबरले; कारण त्याच्या पुढें ते व्यग्र झाले. परमेश्वर देवापुढें उंच टेंकड्या उडाल्या, कुदल्या व झुकल्या, आणि त्यांस कंप सुटला व लटलटू

---

* ערבית संध्याकाळची, שחרית पाहांटेची, מוסף अधिक, מנחה नैवेद्यरूपी आणि נעילה दरवार बंद होण्याच्या वेळेची प्रार्थना.

लागल्या. जेव्हां ईश्वरी पूर्ण नामाचें स्मरण मंडळांवर केलें तेव्हां तीं लोटत गेलीं; आणि जेव्हां टेंकड्यांवर केलें तेव्हां त्या हळूच उडाल्या; याविषयीं सैन्याच्या परमेश्वरापुढें सीनाय हा त्यावेळचा साक्ष व खूण असा आहे. याप्रमाणें ते भ्याले व आश्चर्य पावले, महाभय व त्रास यांनी त्यांस व्यापिलें; तुजसमोर जे उभे होते ते गलबलले; तुझ्यापुढें ते कांपले व भयभीत झाले. चार पशूंचीं *(प्राण्यांचीं) पावलें देवाच्या मार्गाकडे वळतात, ते आपल्या स्वामीपुढें हेव्यावांचून व कलहावांचून सेवा करितात. त्यांनीं पाहिलें व ते भ्याले; अपधाकले व थरथर कांपले. आणि सूर्याचा फांकलेला प्रकाश त्यांच्या पुढें अंधारमय झाला. ते चिंतन व ध्यान करितात; आणि ज्या प्रभूला तुह्मी शोधितां त्याचा शोध ते पवित्र मंडळींत करितात. त्वरेंकरून ते जातात आणि अगदीं थांबत नाहींत; ते जवळ येतात आणि उगे राहत नाहींत; आणि जो पवित्रतेचा नैवेद्य ते पवित्र करून वाहतात, तो घेऊन ते जवळ येतात. ते भय धारण करून शंका धरितात; आणि धैर्य धरून आपल्या स्वतःस पारखतात; त्वरा करून न थांबतां एकवट होतात; आणि गजर करीत जवळ येतात; पवित्र मानितात व उगे राहत नाहींत; कांपतात व हालहालतात; आणि पवित्रांच्या मंडळींत सन्मानिलेल्या देवास सन्मानितात; आणि तीन वेळ (त्याची) पवित्रता गाजवितात.

כתר יתנו हे परमेश्वरा, आमच्या देवा, दूतांचीं वरील सैन्यें, खालीं एकवट झालेल्या तुझ्या इस्राएल लोकांसहित तुला मुगुट देतात (तुझा राज्याधिकार मान्य करितात.) आणि तुझ्या भविष्यवाद्याकडून ह्मटलेलें जें वाक्य आहे कीं, "ते एकमेकांला मोठ्याने बोलत ह्मणाले, पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवानें भरली आहे;" त्याप्रमाणें ते सर्व एकदांच तीन वेळ तुझी पवित्रता गाजवितात. त्याच्या गौरवाकडून सर्व जग भरलें आहे; आणि त्याच्या गौरवाचें स्तवन करावें ह्मणून त्याची सेवा करणारे दूत त्याजविषयीं † विचारून शोध

* येहेजकेल अध्याय १ एथें सांगितलेले चार प्राणी ह्मणजे मनुष्य, सिंह, बैल व गरुड. † इ. त्याच्या गौरवाच्या ठिकाणा विषयीं.

करितात. त्यांच्या समोर जे असतात, ते स्तुति करून असें ह्मणतात कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. त्याचे लोक त्याचें एकत्व मानून जे प्रत्येक दिवशीं सकाळीं व संध्याकाळीं असे दोन वेळा प्रीतीनें ह्मणतात कीं, "हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे; त्यांकडे तो आपल्या स्थानांतून दयेनें वळेल. तोच आमचा देव; तोच आमचा बाप; तोच आमचा राजा; तोच आमचा तारणारा; तोच आह्मास तारील आणि दुसऱ्या वेळीं आह्मास सोडवील; आणि सर्व प्राण्यांच्या दृष्टीपुढें दयेनें असें ऐकवील, कीं पाहा, मी परमेश्वर तुमचा देव तुह्मास देव असा व्हावा, ह्मणून पहिल्याप्रमाणें शेवटीं सोडविलें आहे. आणि तुझ्या पवित्र शास्त्रांतही लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे. तुह्मी परमेश्वराला स्तवा.

यापुढें ותתן לנו אתה קדוש पासून च्या शेवटपर्यंत वाचावें; आणि אלהינו ואלהי אבותינו पृष्ठ ३. व עלינו לשבח भा. प. पृष्ठ ६१ एथपर्यंत वाचल्यावर हेखाल* उघडतात.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा! तुझ्या इस्राएल लोकांवर दया व कृपा मागण्याकरितां तुझे लोक इस्राएल यांचें घराणें यांनीं ज्यांस पुढें केलें आहे आणि जे आज तुजपुढें उभे आहेत; † त्यांच्या तोंडच्या वचनांबरोबर तूं ऐस. त्यांनीं काय ह्मणावें तें त्यांस शिकीव; त्यांनीं काय बोलावें तें त्यांस समजीव; त्यांनीं काय मागावें तें त्यांस सुचीव; त्यांनीं आपल्या वचनामुळें गळून पडूं नये; त्यांनीं आपल्या उत्तरेंकरून लज्जित होऊं नये; आणि तुझ्या इच्छेप्रमाणें नाहीं असी कोणतीहि गोष्ट त्यांनीं ह्मणूं नये; कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा! आह्मी जाणतों कीं, ज्यांवर तूं दया करितोस ते खचित दया पावतात; आणि ज्यांस तूं शिकवितोस ते खचीत शिकतात. जसें तुझा सेवक मोशे

* शास्त्राच्या प्रति ठेवण्याचें कपाट. † हज्जान.

याच्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं; "तेव्हां तो बोलला कीं, मी आपलें सर्व बरेंपण तुझ्यापुढें जवळून चालवीन, आणि तुझ्यापुढें परमेश्वराचें नाम प्रगट सांगेन, आणि ज्यावर दया करीन त्यावर दया करीनच, आणि ज्यावर ममता ठेवीन त्यावर ममता ठेवीनच."

पूजनाचा प्रकार वाचून दाखविण्याचा व अधिक प्रार्थना करण्याचा अधिकार मागण्याची रिब्बी शेलोमो बेन गेबीरोल याने रचिलेली प्रार्थना.

ארוממך חזקי हे माझ्या सामर्थ्या व माझ्या विभागा! मोठ्या उत्कंठतेने व तुझें द्वार ठोकीत, आणि आपली विनंती व काकळूत करीत येऊन मी तुला गौरवितों; हे माझ्या यथार्थतेच्या देवा, जेव्हां मी हाक मारितों; तेव्हां मला उत्तर दे. मी सकाळीं व संध्याकाळीं तुला शोधितों, तूं माझी मनीं केलेली प्रार्थना व मोठ्याने केलेली प्रार्थनाहि ऐक; आणि मी विनंती करितों कीं, मजकरितां मांडलेले फांस व जाळीं दूर कर; हे परमेश्वरा, फीर, आणि माझ्या जीवास सोडीव. मजवर दबा धरून राहणारीं व माझ्या टांचेजवळ असणारीं पापें दूर कर; माझ्या दु:खाचे व क्लेशाचे घाय तूं बांध; माझें हृदय व माझें अंत:करण तूं शुद्ध कर; आणि यथास्थित आत्मा मजमध्यें नवा कर. मी (आजच्या) दिवशीं लहानथोरांमध्यें उभा आहें; तर हे अनंता! माझें ताठरपण तूं दाबून टाक, म्हणजे मी नम्र होईन; मी आपले तळहात तुजकडे पसरितों व आपलें मुख तुजकडे लावितों; आणि माझें तोंड हार्षित ओठानीं उत्साह करील. मजवरील जुलमामुळें ज्या दिवशीं माझे गुडघे नमले, त्या दिवसापासून माझी भक्ति व माझें पेय अर्पण बंद झालें; तरी अशा माझ्या दुर्दैवी स्थितीमध्यें मी आपल्या राजाची आशा करितों; तो परमेश्वर माझा देव, माझा अंधार प्रकाशित करील. मी जुलमाने व फटक्याने पिडलेला व जुलूम करणाराच्या व चाहाडाच्या हातून गांजलेला आहें; तरी जो माझें सामर्थ्य व माझा

हर्ष याकडे मी पाहतों; तोच मला सोडवील. पवित्र सुताचीं (विणलेलीं) वस्त्रें व मुख्य याजकाच्या कपाळावरील फूल, हीं नाशास गेलीं आहेत; नवा द्राक्षारस* व शिंपडण्याचें रक्तहि† नाहींसीं झालीं आहेत;‡ आणि ताट व गंगाळ यांचा उपयोग बंद झाला आहे; तरी मी ह्मणतों कीं, (हे देवा,) तूंच माझा आश्रय आहेस. मी सुगंधाबद्दल संबोधाचीं वचनें वाहतों; आणि माझें स्तवन करणें अर्पणाप्रमाणें मान्य कर; आणि माझी विनंती सुगंधित पिंगळाप्रमाणें स्वीकार; (हे परमेश्वरा!) मी आपला आत्मा तुझ्या हातीं सोंपितों. हे माझ्या खडकरूप आश्रया व माझ्या दुर्गा! भक्तीचा व माझ्या मुख्य धर्माचा मार्ग मला शिकीव; आणि माझ्या मंडळीस तुझे प्रमाणनेम समजीव; हे प्रभू! माझी सर्व वांच्छा तुजपुढें आहे. हे थोर (ईश्वरा)! माझ्या पायास व माझ्या झेंड्यास आश्रय दे; जेव्हां मी अडखळतों, तेव्हां माझ्या अशक्ततेस व माझ्या दुर्बळपणास आधार दे; हे अनंता, माझ्या खडकरूप आश्रया, माझ्या दुर्गा व माझ्या निभावणाऱ्या, माझ्या पडण्यास व माझ्या नीचत्वास तूं उभार. माझ्या तुडविलेल्या मुगुटास तूं गौरवानें उंचाव. अर्पण करणाऱ्या उपाध्याच्या डोईवर पुनः तूं फेंटा (बांध); आणि जेव्हां मी विनंती व काकळूत करितों, तेव्हां माझ्या तोंडचीं वचनें मान्य होवोत. जसें लिहिलें आहे कीं, हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया! आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुझ्या जवळ माझ्या तोंडांतील वचनें व माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

---

* इ. द्राक्षाचें रक्त. यासारिखा लिहिण्याचा प्रकार उत्पत्ति अ. ४९ ओ. ११ एथेंहि सांपडतो.

† या शब्दाचा अर्थ कोणी सपीठाचें पेय अर्पण असाहि करितात.

‡ इ. दूर.

पूजनाचा प्रकार वाचून दाखविण्याचा व अधिक प्रार्थना करण्याचा अधिकार मागण्याची रिब्बी मोशे बेनयेजरा याने रचिलेली प्रार्थना.

אערוך מדברי דתי शास्त्रांतील शब्देंकरून पूजनाचा प्रकार मी सिद्ध करून रचितों; आणि मी आपलीं शब्दरूपी फळें वाहतों. कदाचित परमेश्वर मला भेटेल. या शोक करणाऱ्या लोकांपासून मी अधिकार घेतला आहे; त्या सर्वांविषयीं माझा जीव खिन्न होतो; मी बहकलों आणि माझे विचार गडबडले; कदाचित देवाच्या दिसण्यांत हें बरें होईल. त्यांनी सेवा करण्याचे स्तंभ उभारिले आहेत, ते आपलीं सरळ शब्दरूपी फळें वाहतात, आणि त्याच्या मूर्खत्वाचा निषेध होऊन त्याविषयीं वाद केला जातो; (कारण) कदाचित ते ऐकून फिरतील. पापामुळें आमची ताळू कोरडी पडती*, आह्मी आपलीं अश्रु शिंपडून पेय अर्पण करितों, आह्मी देवाजवळ आपला अंधार प्रकाशित करायास विनंती करितों; कदाचित तो आह्मास आमचा मार्ग कळवील. तुह्मी खिन्न आत्म्याने फिरा; काकळूत व विनंती करून (ईश्वरास) हाक मारा, आणि त्याजपुढें गायन व गीतें गा; कदाचित परमेश्वर सैन्याचा देव दया करील. तुह्मी आपले निद्रिस्त विचार जागृत करा, अज्ञान झोंपेंत असणारांस उठवा, आणि शोक करणाऱ्या व खेदीत मनास उंचावा; कदाचित देव आपणास प्रसन्न होईल. मी तुह्मा सर्वांपेक्षांहि लहान असतां, तुह्मा सर्वांकरितां प्रार्थना करायास उठलों आहें; आणि तुह्मास निषेध करायास मला बोलाविलें आहे; कदाचित मजकडून तुमच्या पापांचें प्रायश्चित्त होईल. अहो शुद्ध असणारानों! † तुह्मी आपल्या जीवांस सांभाळा, शुद्ध व्हा आणि आपल्या सर्व मनानें फिरा, तुमच्या दुष्ट वासनेकरितां शुद्ध, (देवास) हाक मारा, कदाचित तो तुह्मावरून आपला हात हलका करील. मी

* इ. अडकती. † हें नाम लाक्षणिक भावेनें चलमतींच्या लोकांस दिल्हेलें आहे.

आपल्या धन्यापुढें अगदीं हलका होतों, माझ्या गर्वाच्या भाराने मी कुजलेला आहें, तोंडचें उत्तर (प्रार्थना करण्याचें सामर्थ्य) मागण्याकरितां माझें तोंड उतरून जातें; परंतु कदाचित परमेश्वर माझ्या दृष्टीकडे पाहील. मी आपल्या गर्वाकरितां आपलें पुष्टपण वाहतों, आणि आपल्या डोळ्यांतील अश्रू पेयअर्पणासारिखीं वाहतों, परमेश्वराने माझ्या मुखाबरोबर व माझ्या विचाराबरोबर असावें ह्मणून मी त्याची वाट पाहतों; कदाचित तो माझी विनंती मान्य करील. त्याच्या न्यायाच्या भयामुळें मला घाम सुटतो, त्यापुढें मी आपल्या पूर्वजांच्या पुण्याईची आठवण करितों, आणि नैवेद्याचीं फळें मी त्यापुढें आणितों, कदाचित त्यापुढें मला क्षमा मिळेल. त्याच्या दयेच्या समुदायास मी हाक मारिली, त्याच्या क्षमेच्या सैन्याची मी वाट पाहिली, आणि त्याच्या दयेच्या तेरा गुणांजवळ मी येतों; कदाचित परमेश्वर आपणाबरोबर आपलीं सर्व आश्चर्य कृत्यें करील. मनाचे संकल्प मनुष्याचे; परंतु परमेश्वराकडून जिभेचें उत्तर आहे. आणखी असें ह्मटलें आहे कीं, हे प्रभू, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

पूजनाचा प्रकार.

אתה כוננת प्रारंभीं त्वां पृथ्वी स्थापन केली; जगाचा पाया घातला; (त्यांत) सर्व वस्तू उत्पन्न केल्या आणि त्यांत प्राणीमात्रही उत्पन्न केले. पृथ्वी अस्ताव्यस्त व शून्य आणि खोलवटीच्या पाठीवर काळोख असें त्वां पाहिल्यावरून, अंधार घालवून उजेड स्थापिला. आपल्या प्रतिच्छायेप्रमाणें मातीपासून एक गोळा * तूं घडिलास; आणि त्यास (बरें व वाईट) जाणण्याच्या झाडाविषयीं आज्ञा केलीस. त्याने तुझें वचन धिःकारल्यामुळें तोहि एदेन (बागेंतून) घालविला गेला; परंतु तूं आपल्या मंद

* प्रथम पुरुष आदाम.

क्रोधामुळें (हाताच्या कष्ट फळामुळें) त्याचा क्षय केला नाहींस. त्याच्या (पोटचें) फळ तूं वाढविलेंस, आणि त्याच्या संतानास आशीर्वाद दिल्हास; आपल्या चांगुलपणाकडून त्यास सफळ केलेंस व शांतीने बसविलेंस (राहावविलेंस.) त्यांनी * तें जोकड मोडिलें (तो अधिकार उडविला;) आणि देवाला ह्मणाले, "आह्मापासून दूर हो;" ह्मणून तूंहि आपल्या (दयेचा) हात त्यांजवरून आटोपलास, आणि एका क्षणांत त्यांचा गवताप्रमाणें नाश झाला. परंतु जो आपल्या पिढींत सरळ होता, † त्याकरितां करार आठवून, त्याच्या पुण्याईकरितां जगांत शेष राखिलास. त्याजबरोबर तूं धनुष्याचा करार केलास; आणि त्याच्या अर्पणाच्या आवडीवरून त्याच्या संतानास तूं आशीर्वाद दिल्हास. द्रव्यामुळें बहकून त्यांनी बुरूज बांधिला; आणि ह्मणाले कीं चला आपण चढूं, अंतराळ फाडूं आणि देवासीं लढूं. मग प्रख्यात मोठ्या राष्ट्रांचा बाप ‡ सभोंवतालचा अंधार प्रकाशित करण्याकरितां एकदांच ताऱ्यासारिखा खासद्यांच्या ऊर गांवांतून प्रकाशला. त्याच्या वर्त्तणुकीवरून तूं आपला क्रोध मोडिलास (शांतविलास;) आणि त्याच्या ह्मातारपणाच्या वेळीं त्याचें मन पारखलेंस. दयेचा व कृपेचा शृंगार त्यापासून काढिलास; मेंढरांतून निवडून घेतलेला जो कोंकरा तो § त्याच्या मुळांतून एक सरळ पुरुष ‖ निघाला; तो उदरांतून निघण्यापूर्वींच कराराने मोहोर केलेला होता. त्यास बारा वंशज्यांस परात्पराचे प्रियकर व उदरांत असतां पाळलेले असें ह्मटलें आहे, ते दिल्हेस. त्यांतून लेवीवर दयेचा व कृपेचा शृंगार ¶ घातलास; आणि सर्व भावांमध्यें त्यास मुगुटमंडित केलेंस. त्या लेवीच्या कुळांतून आमरामास निवडिलें व त्याच्या मुळांतील आहारोन यास परमेश्वराचा पवित्र होण्याकरितां पवित्र (अभिषिक्त) केलास. पदवीच्या वस्त्रांकडून त्यास सुशोभित केलेंस व त्याच्या अर्पणाकडून

---

* ही प्रलयाच्या वेळची पिढी. † नोव्हा. ‡ आब्राहाम. § इसहाक. ‖ याकोब. ¶ ऊरीम आणि थुम्मिम.

तूं आपला राग मोडिलास (शांतविलास. तो जीं वस्त्रें पांघरीत असे, तीं येणेंप्रमाणे.—)

צִיץ וּמְעִיל सोन्याचें फुल, झगा, अंगरखा, चोळणा, उरपट, एफोद, फेटा, व कंमरबंद. * तो गोऱ्ह्याचीं अर्पणें, व मेंढ्याचे होम करीत असे, कोंकरें कापीत असे आणि एडके वेगळे करून ठेवीत असे. गंधाच्या मिश्रणाचा सुवास दाखवीत असे, इंगळ पेटवीत असे, रक्त शिंपडीत असे आणि तें (शिंपडणें) सरळपणें मोजीत असे. तो सुगंध, ती सत्य प्रार्थना, आणि त्याची पवित्रता, यांच्या मान्यते कडून आमच्या पापांचें प्रायश्चित्त होत असे. जवसांचीं वस्त्रें आणि हिरेजडित (एफोद;) या सर्वांकडून (ह्मणजे पांढऱ्या वस्त्रांकडून) सेवा करणाऱ्या दुतासारिखा तो वेष्टिलेला असे.

תִּכֵּנְתָּ כָּל אֵלֶּה हें सर्व त्वां आहारोनाच्या गौरवाकरितां स्थापन केलें, इस्त्राएलाच्या प्रायश्चित्ताचें पात्र असा त्यास नेमिलें, आणि पापाच्या क्षमेचें साधन त्याच्या हातीं दिल्हें. आणि क्षमासाधनाच्या दिवशीं तुजपुढें सेवा करायास आहारोनाच्या ठिकाणीं त्याच्या कुळांतील एक मुख्य याजक नेमिला जात असे. आणि तो या दिवसाच्या पूजनाचे नियम व पूजनाची रीति आमच्या मंदिरीं सात दिवस शिकत असे; आणि तिसऱ्या व सातव्या दिवशीं (पोंवळी सांगोपांग कालवडीची राख पाण्यांत मिश्र करून) त्याजवर शिंपडीत असत. †

שְׁלוּמֵי זִקְנֵי עָם लोकांतील वृद्धांमध्यें जे सरळ ते व त्यांचे भाऊ जे उपाध्ये, यांतील सुज्ञ जन दाहाव्या दिवसापर्यंत नेहमी त्याभोंवतें असत.

(עֶרֶב יוֹם הַכִּפּוּרִים) प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या आदल्या

* टीका १

† हें गणना १९. या अध्यायांत सांगितल्याप्रमाणें करीत; याचें कारण असें कीं, कदाचित न कळतां त्यास प्रेताचा स्पर्श झाला असला तर त्यापासून त्यानें शुद्ध व्हावें; व त्याच्या शुद्धतेविषयीं कांहीं संशय राहूं नये.

दिवशीं सकाळीं त्या मंदिरीं जो वास करीत असे, त्याच्या नामाने त्यास शपथ देत असत; कीं, त्याने मनांत कांहीं कपट राखून ज्या गोष्टि त्यांनी त्यास सांगितल्या त्यांतील एकहि त्याने पालटूं नये. परंतु त्यांनी त्याजवर आळ घेतला, ह्मणून तो वेगळा जाऊन रडत असे; आणि ज्यांचीं कामें गुप्त अशांवर त्यांनी आळ घेतला, ह्मणून तेहि वेगळे जाऊन रडत; परंतु त्याच्या मनांत कांहींच नसेल ह्मणून त्यास याप्रमाणें ह्मणत.—)

ראה לפני מי "पाहा ! तूं कोणासमोर जात आहेस; प्रज्वलित अग्नीच्या ठिकाणीं (तूं जात आहेस); आपली सर्व मंडळी तुजवर आधार धरून आहे; आणि तुझ्या हातांकडून आह्मा सर्वांस आज क्षमा मिळणार आहे." आणि पूजनाच्या प्रकाराची त्यास आठवण (वहिवाट) राहावी, ह्मणून दाहाव्या दिवसापर्यंत त्यास आज्ञा करून या कामांत वहिवाटवीत. अवघे सात दिवसपर्यंत तो रक्त शिंपडीत, दिवे नीट करीत, सुगंध दाखवीत व वधलेले मेंढ्याचें डोकें व पाय (स्थंडिलाजवळ) आणीत असे; आणि प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या आदल्या दिवशीं सकाळीं पूर्वेकडील दरवाज्यांत त्यास उभा करून गोऱ्हे, एडके व मेंढे त्या समोरून चालवीत.) प्रतिदिवसाचा मेंढा कापण्याचा वेळ जवळ आला ह्मणजे विभाग करण्याकरितां एक त्याच्या व लोकांच्या मध्यें एक सणाचा पडदा ताणीत. मग तो आज्ञा दिल्याप्रमाणें मोठ्या काळजीनें व भयानें अंघूळ करून अंघूळ करितांना अंगास कांहींच केर डसला नाहीं ह्मणून मोठ्या चौकशीने पाही;* नियमाप्रमाणें ही आज्ञा पूर्ण झाल्यावर तो आनंद करी. आणि मग इतर दिवसांचीं वस्त्रें काढून खालीं उतरून सुचविल्याप्रमाणें पहिली अंघूळ करी व वर येऊन अंग पुशीत असे. मग ते त्यास सोन्याचीं वस्त्रें देत, तीं तो पांघरून आपले हात व पाय (सोन्याच्या झारीने) धूत असे.

מיד מקבל मग तावडतोब प्रतिदिवशीं अर्पिला जाण्याचा मेंढा घेऊन त्याचे दोन सस † कापून, कापण्याचें काम पूर्ण

* टीका २. † या दोन ससांचीं नावें קנה ह्मणजे श्वास घेण्याचा सस, आणि ושט ह्मणजे अन्नपाण्याचा सस.

करण्यास दुसरा उपाध्या नेमून आपण रक्त घेऊन आज्ञेप्रमाणें स्थंडिलावर शिंपडीत असे. सकाळीं पांच दिवे नीट करण्यास, सुगंध दाखविण्यास आणि राहिलेले दोन दिवे नीट करण्यास तो देवळाच्या आंतल्या बाजूस जाई; आणि बाहेर आल्यावर आज्ञेप्रमाणें त्या मेंढ्याचें डोकें व अवयव अर्पीत असे. मग नित्याप्रमाणें प्रतिदिवसाचा नैवेद्य व भाजलेल्या मासाचा नैवेद्य दाखविल्यावर द्राक्षरस चांगल्या भांड्यांत ओती.

शा. अ. हेंहि बोलावें.

וביום השבת (शाब्बाथ दिवशीं विधीप्रमाणें दोन अधिक मेंढे अर्पण करून त्यांचा नैवेद्य दाखवी, दर्शनीय भाकरी सिद्ध करी, आणि सुगंधाच्या चर्णाचे दोन चमच्यांचा सुगंध दाखवीत असे.)

ואחר כך या (नित्याच्या होमानंतर) गोऱ्ह्याचा, आणि या दिवसाच्या अर्पणाचे सात मेंढ्यांचा होम करून विधीप्रमाणें त्यांचा नैवेद्य दाखवी व पेय अर्पण करी.

ובא מיד मग तावडतोब परवा* यानें बांधलेलें घर, जें पवित्र कामाकरितां निराळें असे, तेथें तो आल्यावर पूर्वीप्रमाणें त्याच्या व लोकांच्या मध्यें पहिल्याप्रमाणें एक सणाचा पडदा ताणीत; परंतु त्यानें आपणावरील सोन्याचीं वस्त्रें काढल्याअगोदर आपले हात व पाय धुवून शुद्ध करी. नंतर सोन्याचीं वस्त्रें काढून खालीं उतरून अंघूळ करी आणि वर येऊन अंग पुशित असे. मग सोन्याचीं वस्त्रें काढून पांढरीं वस्त्रें घाली, कारण या दिवसाचें पूजन पांढरीं वस्त्रें घालून करावें असा विधि होता. नंतर तो त्वरा करून आपले हात व पाय धूऊन स्वच्छ करी; आणि पहिल्यानें आपल्या गोऱ्ह्याजवळ † येई. हा त्याचा गोऱ्हा उत्तरेस देवडीच्या व स्थंडिलाच्या मध्यें उभा असून त्याचें डोकें दक्षिणेकडे; आणि त्याचें तोंड पश्चिमेकडे असे; तो याजक पूर्वेकडे उभा असे, आणि त्याचें तोंड पश्चमेकडे असे; आणि मोठ्या भयाने परात्पर देवापुढें उभा राहून

* टीका ३. † हा गोऱ्हा त्याच्या व त्या कुटुंबाच्याच प्रायश्चित्तासाठीं असे.

त्या (गोन्ह्यावर) आपल्या पापाविषयीं कबूल होत असे. तें येणेंप्रमाणें.—

וסמך שתי ידיו तो आपले दोन हात त्याजवर ठेवून पापें कबूल करून असें ह्मणत असे कीं, हे देवा, मी विनंती करितों कीं, मी व माझ्या कुटुंबानें तुजपुढें पाप केलें, अपराध केला व उल्लंघन केलें आहे. हे देवा, मी व माझ्या कुटुंबानें तुजपुढें जें पाप, जो अपराध व जें उल्लंघन केलें, त्या पापाचें, अपराधाचें व उल्लंघनाचें तूं आपल्या नामाकरितां प्रायश्चित्त दे. कारण तुझा सेवक मोशे याच्या शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, " कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापापासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील".

והכהנים והעם आणि जे उपाध्ये व लोक अंगणांत उभे असत, ते मुख्य उपाध्याच्या मुखांतून पवित्रतेने व शुद्धतेने देवाचें न उच्चारायाचें नाम निघतांना जेव्हां ऐकत; तेव्हां ते गुडघे टेंकून नमन करीत, आणि आपल्या तोंडावर पडून असें ह्मणत कीं, त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदांसर्वकाळ धन्य असो. आणि तोहि तें नाम घेणें धन्य ह्मणणाऱ्यांबरोबरच पूर्ण करण्यास लक्ष ठेवी; आणि त्यांस ह्मणे कीं, तुह्मी शुद्ध व्हा.

ואתה בטובך (तूं आपल्या चांगुलपणाकडून आपली दया जागृत करितोस, आणि सात्विकांस क्षमा करितोस.)

ובא דרך मग तो तेथून निघून अंगणाच्या पूर्वेस व स्थंडिलाच्या उत्तरेस जो नीकानोराचा दरवाजा* होता तेथें येई. त्याच्या उजव्या बाजूस दुयम उपाध्या,† आणि डाव्या बाजूस उपाध्याच्या घराण्यांतील मुख्य असत. तेथें दोन कोंकरें असत; त्यांचीं तोंडें पश्चिमेकडे व त्यांचीं पृष्ठें पूर्वेकडे; त्यांतील एक उजवेकडे व एक डावेकडे असे. मग लागलाच तो (आपले दोन्ही हात) एका पेटींत घालून त्यांतून दोन सोडती‡ काढी. जी ईश्वरी ना-

* टीका ४. † टीका ५. ‡ टीका ६.

माची सोडत असे, ती उजव्याकडील कोंकरावर टाकून ह्मणे कीं, हा ईश्वरी नामाचा दोषहारक यज्ञ. याप्रमाणें ईश्वरी नाम घेतांना जे ऐकत ते ह्मणत कीं, त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदांसर्वकाळ धन्य असो.

कित्येक ठिकाणीं हें पुढील ह्मणत नाहीं.

והכהנים והעם जे उपाध्ये व लोक अंगणांत उभे असत, ते मुख्य उपाध्याच्या मुखांतून पवित्रतेने व शुद्धतेने न उच्चारायाचें नाम निघतांना जेव्हां ऐकत, तेव्हां ते गुडघे टेंकून नमन करीत, आणि आपल्या तोंडावर पडून असें ह्मणत कीं, त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदांसर्वकाळ धन्य असो.

בשעיר עזאזל आज्ञाझेलाच्या* कोंकराच्या शिंगांमध्यें दोन सेला वजनाचा किरमिजी दोरा† बांधीत असे, आणि त्यास पूर्वेकडील दरवाज्यांत त्यास पाठवायाच्या ठिकाणासमोर उभा करीत असे. आणि जो ईश्वरी नामाचा कोंकरा असे, त्याच्याही गळ्यांत ज्या ठिकाणीं त्यास कापायाचा त्या ठिकाणीं किरमिजी दोरा बांधीत असे. आणि मग दुसरे वेळीं तो आपल्या गोऱ्ह्याजवळ येऊन आपलें, आपल्या कुटुंबाचें व आपले बंधु उपाध्ये यांचें पाप कबूल करीत असे. तें येणेंप्रमाणें.—

וסמך שתי ידיו तो आपले दोन हात त्याजवर ठेवून पापें कबूल करून असें ह्मणत असे कीं, हे देवा, मी विनंती करितों कीं, मी, माझें कुटुंब व तुझे पवित्र लोक आहारोनाचे पुत्र, आह्मी पाप केलें, अपराध केला व उल्लंघन केलें आहे. हे देवा, मी विनंती करितों कीं, मी, माझें कुटुंब व तुझे पवित्र लोक आहारोनाचे पुत्र, आह्मी तुजपुढें जें पाप, जो अपराध व जें उल्लंघन केलें, त्या पापाचें, अपराधाचें व उल्लंघनाचें तूं आपल्या नामाकरितां प्रायश्चित्त दे. कारण तुझा सेवक मोशे याच्या शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, "कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापापासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील."

* टीका ७ † टीका ८.

והכהנים והעם आणि जे उपाध्ये व लोक अंगणांत उभे असत, ते मुख्य उपाध्याच्या मुखांतून पवित्रतेने व शुद्धतेने देवाचें न उच्चारायाचें नाम निघतांना जेव्हां ऐकत; तेव्हां ते गुडघे टेंकून नमन करीत, आणि आपल्या तोंडावर पडून असें ह्मणत कीं, त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो. आणि तोहि तें नाम घेणें धन्य ह्मणणाऱ्यांबरोबरच पूर्ण करण्यास लक्ष ठेवी; आणि त्यांस ह्मणे कीं, तुह्मीं शुद्ध व्हा.

ואתה בטובך (तूं आपल्या चांगुलपणाकडून आपली दया जागृत करितोस, आणि आपली सेवा करणाऱ्या वंशास क्षमा करितोस.)

אחר וידוי याप्रमाणें (पापें) कबूल केल्यानंतर आपला व लोकांचा पापहारक यज्ञ करण्याकरितां स्वतः त्वरा करी; सुरा चौकस तपासून आपला गोऱ्हा कापी, आणि त्याचें रक्त एका शुद्ध प्याल्यांत धरी; आणि तें जमूं नये ह्मणून पवित्र ठिकाणाच्या चौथ्या फरसबंदीवर हालविण्याकरितां आपल्या जवळच्या मनुष्याजवळ लागलेंच देत असे, आणि ज्याच्या हातीं तें रक्त हालविण्यास देत असे, त्याच्याच हातीं ठेवून तांबड्या सोन्याचें, हलकें, ज्याचें वजन तीन काब,* आणि ज्याची आकृति रुंदट, असें एक धुपाटणें घेऊन स्थंडिलाच्या शिखरावर चढून, त्या स्थंडिलाच्या पश्चिम बाजूस जे इंगळ असत त्यांतून घेत असे. मग ते प्रज्वलित अग्नीच्या इंगळानीं भरलेलें धुपाटणें खालीं आणून अंगणाच्या चौथ्या फरसबंदीवर ठेवी. मग त्याजवळ एक रिकामें ताट व अति बारीक कुटलेल्या सुगंधानें भरलेलें धुपाटणें आणीत; त्यांतून तो आपली ओंजळ भरून घेई; तें असें कीं, ना उणें ना अधिक भरलेलें; परंतु योग्य रीतीनें भरून मोठ्याच्या मोठ्या ओंजळीप्रमाणें व लाहानाच्या लाहान ओंजळीप्रमाणें घेत असे. तो सुगंध ताटांत ठेवून तें इंगळानीं भरलेलें धुपाटणें डाव्या हातीं आणि सुगंधाचें ताट उजव्या हातीं धरीं नंतर तो त्वरेनें अति पवित्र ठिकाणीं जाऊन तें धुपाटणें कोशाच्या काठ्यांच्या मध्यें

* काब एक प्रकारचें तोल आहे.

ठेवी; (परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं शेथीया या नांवाच्या दगडावर ठेवीत असे.)* आणि त्या ताटाचा कांठ बोटांच्या शेवटानीं किंवा दांतांत धरून, जसें पूर्वी ओंजळ भरलें होतें, त्याप्रमाणें पुन: भरेपर्यंत सुगंध आंगठ्याने घेऊन आपल्या ओंजळांत ओतीत असे. मग तो सुगंध मुठींत घेऊन पश्चिम बाजूच्या इंगळावर तो (सर्व) टाकून, तें सर्व ठिकाणा धुराने भरे तोंपर्यंत तेथें थांबत असे.

טהור לב जो मनाचा शुद्ध तो (डोळे झांकून) माघारें पाऊल टाकून परत येई, तेव्हां तो पडद्याच्या बाहेर येई तोंपर्यंत त्याचें तोंड पवित्र ठिकाणाकडे व पाठ मंदिराकडे असे. ‡ आणि मंदिरांत तो एक लहानसी प्रार्थना करीत असे.

कित्येक ठिकाणीं मुख्य उपाध्याची प्रार्थना एथें वाचितात व कित्येक ठिकाणीं पूजनाच्या प्रकाराच्या शेवटीं वाचितात.

וכך היתה תפלתו मुख्य उपाध्या मंदिरांत असतां जी प्रार्थना करीत असे ती येणेंप्रमाणें.—

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी असी प्रसन्नता होऊं दे कीं, आह्मावर व तुझे लोक इस्राएल ज्या ज्या ठिकाणीं असतील, त्या सर्वांवर हें येतें वर्ष असें होवो कीं, उष्णता झाल्यास पर्जन्याची वृष्टि होवो; आणि जेव्हां पर्जन्याचें सर्व जगास अगत्य असतें, तेव्हां कोणी वाटसराने त्याविषयीं प्रार्थना केल्यास ती तुजपुढें न येवो; तुझे लोक इस्राएलाचें घराणें याने एक प्रत्येकाजवळ किंवा अन्य लोकांजवळ अन्नाविषयीं गरजवंत होऊं नये; या वर्षी स्त्रीच्या पोटच्या फळाचा पात होऊं नये, शेतांतील झाडानीं आपले उत्पन्न द्यावें, आणि यहुदाचे घरांतून राज्यकारभार न जावो.

יצא ונטל דם הפר (बाहेर) निघाल्यावर ज्याच्या

---

* टीका ९ † इ. पर.

‡ या वाक्यांत पवित्र ठिकाण आणि मंदिर हीं नांवें जीं आहेत, त्यांवरून अति पवित्र ठिकाण व पवित्र ठिकाण असे समजावें. कोठें कोठें त्या ठिकाणांस या वाक्यांत लिहिल्याप्रमाणेंहि नावें सांपडतात. अति पवित्र ठिकाण हें पवित्र ठिकाण ज्याला या वाक्यांत मंदिर असें ह्मटलें आहे, त्याच्या पलिकडे आंत असे.

हातीं गोऱ्ह्याचें रक्त हालविण्यास दिल्हें असें, त्याच्या जवळून तें रक्त घेऊन, ज्या ठिकाणीं तो गेला होता त्याच ठिकाणी पुनः जाऊन, ज्या जागीं उभा राहिला होता तेथेंच उभा राहून, प्रत्येक वेळीं तो आपलें बोट त्या रक्तांत बुडवून तें पेटीच्या काठ्यांमधील दयासनाच्या समोर शिंपडीत असे. तें असें; एक वेळ वर व सात वेळ खालीं. परंतु वर किंवा खालीं शिंपडावें याजकडेस त्याचें लक्ष नसे, परंतु जसा कोणी मारायास हात वर करतो त्याप्रमाणें (तो आपला हात उचलून तें शिंपडीत असे.)*

וכך היה מונה आणि तें तो याप्रमाणें मोजीत असे; एक, एक आणि एक, एक आणि दोन, एक आणि तीन, एक आणि चार, एक आणि पांच, एक आणि साहा, एक आणि सात.† अतिपवित्र ठिकाणांतून बाहेर आल्यावर मंदिरांत एक सोन्याची बैठक असे त्यावर तो तें ठेवी.

יצא כ तेथून बाहेर आल्यावर ईश्वरी नामाचा दोषहारक यज्ञाचा कोंकरा त्याजवळ आणीत, त्यास कापून त्याचें रक्त एका शुद्ध प्याल्यांत धरी. (आणि) ज्या रीतीने गोऱ्ह्याचें रक्त शिंपडलें त्याप्रमाणें, ह्मणजे एक वेळ वर व सात वेळ खालीं त्या रक्तांतून शिंपडण्याकरितां (पुनः) आंत जात असे. परंतु वर किंवा खालीं शिंपडावें याजकडे त्याचें लक्ष नसे. जसा कोणी मारायास हात वर करितो त्याप्रमाणें (तो आपला हात उचलून तें शिंपडीत असे.)

וכך היה מונה आणि तें तो याप्रमाणें मोजीत असे; एक, एक आणि एक, एक आणि दोन, एक आणि तीन, एक आणि चार, एक आणि पांच, एक आणि साहा, एक आणि सात. आणि पवित्र ठिकाणांतून बाहेर आल्यावर मंदिरांत दुसरी सोन्याची बैठक असे त्यावर तो तें ठेवी.

---

* टीका. १०

† वरील एक वेळ शिंपडणें खालच्या सात वेळ शिंपडण्यांत मोजिलें न जावें ह्मणून तो याप्रमाणें मोजित असे.

מורק तें कोंकराचें रक्त तेथें ठेविल्यानंतर त्वरेनें सोन्याच्या बैठकीवरून गोऱ्ह्याचें रक्त घेऊन, सोन्याच्या वेदीच्या व पडद्याच्या मध्यें उभा राहून, बाहेरून कोशासमोर त्या पडद्यावर तें शिंपडीत असे; एक वेळ वर व सात वेळ खालीं; परंतु वर किंवा खालीं शिंपडावें याजकडे त्याचें लक्ष नसे, जसा कोणी मारायास हात वर करितो त्याप्रमाणें (तो आपला हात उचलून तें शिंपडीत असे.)

וכך היה מונה आणि तें तो याप्रमाणें मोजीत असे; एक, एक आणि एक, एक आणि दोन, एक आणि तीन, एक आणि चार, एक आणि पांच, एक आणि साहा, एक आणि सात.

נתן मग तें गोऱ्ह्याचें रक्त ठेवून लागलेंच तें कोंकराचें रक्त घेऊन तें बाहेरून कोशासमोर त्या पडद्यावर तें शिंपडीत असे; एक वेळ वर व सात वेळ खाली; परंतु वर किंवा खाली शिंपडावें याजकडे त्याचें लक्ष नसे; जसा कोणी मारायास हात वर करितो त्याप्रमाणें (तो आपला हात उचलून तें शिंपडीत असे.)

וכך היה מונה आणि तें तो याप्रमाणें मोजीत असे; एक, एक आणि एक, एक आणि दोन, एक आणि तीन, एक आणि चार, एक आणि पांच, एक आणि साहा, एक आणि सात.

שש ועירה मग हर्षानें तें गोऱ्ह्याचें रक्त त्या कोंकराच्या रक्तांत ओती; परंतु तें चांगलें मिसळलें जावें ह्मणून तो भरलेला प्याला पुनः त्या रिकाम्या प्याल्यांत ओतून आंत येऊन सोन्याच्या वेदी (जवळ) त्या वेदीच्या आणि दिव्याच्या झाडाच्या मध्यें उभा राहत असे.

ומתחיל לחזות मग तो त्या मिसळलेल्या रक्तांतून (वेदीच्या) चार शिंगांवर त्यांच्या अनुक्रमानें ह्मणजे ईशानीचा शिंगावर शिंपडायास आरंभ करून आग्नेयी शिंगावर संपवीत असे. त्यांतील शेवटील शिंपडणें जें वरून खालीं असे, त्याखेरीज दुसरें सर्व शिंपडणें खालून वर असें. यानंतर तो सोन्याच्या

वेदीवरील इंगळ व राख तिचें सोनें दिसेपर्यंत इकडे तिकडे सारून त्या मिसळलेल्या रक्तांतून वेदीच्या निर्मळ भागावर दक्षिण बाजूस, जेथें शिंगावर रक्त शिंपडणें पूर्ण झालें, तेथें तो सात वेळ शिंपडीत असे. मग पुढें पाऊल टाकून, आणि खांबाच्या बाहेर दक्षिण बाजूस येऊन तें उरलेलें रक्त बाहेरल्या वेदीच्या पश्चिमेकडल्या पायावर ओतीत असे. नंतर आझाझेलकडे जो कोंकरा पाठवायाचा त्याजवळ येऊन त्याजवर मंडळीचे अतिक्रम कबूल होऊन ह्मणत असे (तें येणेंप्रमाणें.)

וסמך שתי ידיו तो आपले दोन हात त्याजवर ठेवून पापें कबूल करून असें ह्मणत असे कीं, हे देवा, मी विनंती करितों कीं, तुझे लोक इस्राएलाचें घराणें यांनीं तुजपुढें पाप केलें, अपराध केला व उल्लंघन केलें आहे. हे देवा, मी विनंती करितों कीं, तुझे लोक इस्राएलाचें घराणें यांनीं तुजपुढें जें पाप, जो अपराध व जें उल्लंघन केलें, त्या पापाचें, अपराधाचें व उल्लंघनाचें तूं आपल्या नामाकरितां प्रायश्चित्त दे. कारण तुझा सेवक मोशे याच्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, "कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील."

והכהנים והעם आणि जे उपाध्ये व लोक अंगणांत उभे असत, ते मुख्य उपाध्याच्या मुखांत पवित्रतेनें व शुद्धतेनें देवाचें न उच्चारायाचें नाम निघतांना जेव्हां ऐकत, तेव्हां ते गुडघे टेंकून नमन करीत, आणि आपल्या तोंडावर पडून असें ह्मणत कीं, त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो. आणि तोहि तें नाम घेणें धन्य ह्मणणाऱ्यांबरोबरच पूर्ण करण्यास लक्ष ठेवी; आणि त्यांस ह्मणे कीं, तुह्मी शुद्ध व्हा.

קרא לאחד मग उपाध्यांतील एक ज्यास आदल्या दिवशींच आमंत्रण केलेलें असे, त्यास बोलावून तो कोंकरा ओसाड देशांत उजाड रानांत नेण्याकरितां त्याच्या स्वाधीन करीत असे. तो कड्याजवळ पोहोंचल्यावर त्या कोंकराच्या शिंगाच्यामध्यें जो

किर्मिजी दोरा असे, तो सोडून अर्धा खडकास व अर्धा त्याच्या शिंगांच्या मध्यें बांधून मागून त्यास दोन हाताने लोटून देत असे. तो लोटत खालीं जात असे; परंतु तो अर्ध्या डोंगराच्या खालीं गेला नाहीं, इतक्यांत त्याचे तुकडे तुकडे होऊन जात. तेव्हां तो (संगातें गेलेला उपाध्या) ह्मणे कीं, तुझे लोक इस्राएलाचें घराणें यांचे अतिक्रम असेच नाहींसे होवोत.

וּדְרְכִּיּוֹת (तो कोंकरा रानांत पोहोंचला असें (देवळांत) समजण्याकरितां मोठाल्या दगडाचे गडगे रचून त्यांवर बावटे उडवीत असत.)

רָץ וּבָא मग जो गोऱ्हा व जो कोंकरा जाळिला जाणार व ज्यांचें रक्त शिंपडलें गेलें, त्यांजवळ धावत येऊन, त्यांस फाडून त्यांचें मांदें वेदीवर जाळण्याकरितां एका पात्रांत काढून ठेवी; आणि त्यांचें मास आकड्यावर टांगून दुसऱ्याच्या हातून जाळायाचे ठिकाणीं * पाठवी. मग तो कोंकरा रानांत पोहोंचल्यानंतर परतून तो स्त्रियांच्या अंगणांत येऊन शास्त्र वाचिल्यापूर्वीं करायाचा धन्यवाद करी; † आणि אַחֲרֵי מוֹת व ‡ בֶּעָשׂוֹר § या भागांत उपाध्यांचा जो विधि आहे तो वाचल्यानंतर, तें शास्त्र गुंडाळून आपल्या उरासीं धरी आणि ह्मणे कीं, मी तुह्मांपुढें जें वाचिलें त्यापेक्षां त्यांत अधिक लिहिलेलें आहे. आणि ज्या भागांत यादी केली आहे, त्यांतील וּבֶעָשׂוֹר ‖ हे तो मुखपाठ बोलत असे. मग शास्त्र वाचल्यानंतर जो धन्यवाद करायाचा † तो करून त्याजवर अणखी सात ह्मणजे भक्तीविषयीं, स्तुतीविषयीं, पापाच्या क्षमेविषयीं, पवित्र स्थानाविषयीं, इस्राएलाविषयीं, उपाध्याविषयीं आणि उरलेल्या प्रार्थनेविषयीं धन्यवाद करी. मग तो आपलें पाऊल अंघूळ करण्याच्या ठिकाणाकडे वळवून तो आपले हात व पाय धूत असे. आणि

* हें जाळायाचें ठिकाण यरूशालेम नगराच्या बाहेर असे.
† हा धन्यवाद भा. प. पृष्ट १०६ एथें सांपडतो.
‡ लेवीय १६.१
§ लेवीय २३.२७ ‖ गणना. २९.७.

पांढरीं वस्त्रें काढून खालीं उतरून अंघूळ करी आणि वर येऊन अंग पुसल्यावर त्याजकडे सोन्याचीं वस्त्रें आणीत; तीं पांघरून तो आपले हात व पाय पुन: धूत असे. तिकडून निघू-न आजच्या अधिक अर्पणाचा कोंकरा, जो बाहेर अर्पिला जात असे, तो अर्पी.

ואחר כך מקריב यानंतर तो आपल्या एडक्याचें व लोकांच्या एडक्याचें अर्पण करी. मग दोषहारक यज्ञाचें मांदें जाळी; मग त्या दोन एडक्यांचा त्यांच्या नेमाप्रमाणें नैवेद्य दाखवी; मग सर्व अधिक अर्पणाचें त्यांच्या विधीप्रमाणें पेय अर्पण करी; मग नित्याचा संध्याकाळचा होम त्याच्या रीतीप्रमाणें करी.

אחר כלותו हें सर्व काम संपल्यावर तो पुन: अंघूळ क-रण्याच्या ठिकाणीं येऊन आपले हात व पाय धूत असे. मग सोन्याचीं वस्त्रें काढून खालीं उतरून अंघूळ करी, आणि वर येऊन अंग पु-सल्यावर त्याजकडे पांढरीं वस्त्रें आणीत, तीं पांघरून तो आपले हात व पाय पुन: धूत असे, आणि सकाळीं जें धुपाटणें व जो प्याला ठेवि-ला होता, तो आणण्याकरितां अति पवित्र ठिकाणीं जाई. (तिकडून परतल्यावर) तो पुन: अंघूळ करण्याच्या ठिकाणीं येऊन आपले हात व पाय धूत असे, मग पांढरीं वस्त्रें काढून खालीं उतरून अंघूळ करी, आणि वर येऊन अंग पुसल्यावर त्याजकडे सोन्याचीं वस्त्रें आणीत; तीं पांघरून तो आपले हात व पाय पुन: धूत असे. मग तो मंदिरांत जाऊन संध्याकाळचा सुगंध दाखवी.

ויצא והקריב तिकडून निघून तो नित्याचा नैवेद्य आणि भाजलेले मासाचा व पेयअर्पणाचा नैवेद्य त्यांच्या विधिप्र-माणें करून दिवे पेटविण्याकरितां आंत जात असे. (बाहेर येते समयीं) नमन करून निघे आणि आपले हात व पाय धुवून सोन्या-चीं वस्त्रें काढून ठेवी. मग त्यास त्याच्या स्वतांचीं वस्त्रें आणून देत, तीं त्यानें पांघरल्यावर (इस्राएलांतील मुख्य व वडील) त्यांस घ-रापावेतों पोहोंचवीत; आणि पवित्र ठिकाणांतून तो सुखरूप निघाला

ह्मणून त्याचे आप्त व प्रियलोक (दुसऱ्या दिवशीं) मोठा सण *
करीत असत.

कित्येक ठिकाणीं एथपर्यंत वाचल्यावर हेखाल उघडतात; आणि
मागें लिहिलेली मुख्य उपाध्याची प्रार्थना एथें वाचितात.

אשרי העם ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य. यास्तव ज्याप्रमाणें मंदिरांत त्वां मुख्य उपाध्याची प्रार्थना ऐकिली; त्याच प्रमाणें आमच्या तोंडची ही प्रार्थना ऐक व आमचें तारण कर.

יהי רצון מלפניך हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी असी प्रसन्नता होऊं दे कीं, आह्मावर व तुझे लोक इस्राएल ज्या ज्या ठिकाणीं असतील, त्या सर्वांवर हें येतें वर्ष प्रकाशाचें, आशीर्वादाचें, आनंदाचें, हर्षाचें, गौरवाचें, चांगल्या मंडळीचें, कीर्तनाचें, उल्हासाचें, चांगुलपणाचें, दहिंवर व पर्जन्य आशीर्वादरूप होतील असें, तारणाचें, अन्नाच्या पुरवठ्याचें, अभ्यासाचें, विश्रांतीचें, सांत्वनाचें, प्रेमाचें, उत्साहाचें, खंडणीचें, खुशालीचें, मोकळीकिचें, पाडाव नेलेले एकवट होण्याचें, प्रार्थना मान्य होण्याचें, प्रसन्नतेचें, कल्याणाचें, संवगाईचें, तूं मोकळेपणीं आह्मास आमच्या देशीं नेशील असें, (इतर) लोकांवर आह्मास जय देण्याचें, आह्मास चांगल्या जीवनाकरितां लिहिण्याचें, तुझे लोक इस्राएलाचें घराणें याने एक प्रत्येकाजवळ किंवा अन्य लोकांजवळ अन्नाविषयीं गरजवंत होऊं नये असें, आह्मावरून व तुझे लोक इस्राएलाचें घराणें याजवरून पटकी व नाश दूर होतील असें, आणि स्त्रीच्या पोटच्या फळाचा पात न व्हावा असें होऊं दे.

" ועתה आणि आतां हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या अपार दयेवर आह्मी भरंवसा ठेवितों; तुझ्या कृपेचा आम्हीं आश्रय धरितों; आणि तुझ्या क्षमेची आह्मी आशा करितों; कारण तूं दयाळू व कृपाळू, मंदक्रोध व फार ममतेचा आणि पुष्कळ चांग-

* पश्चिम हिंदुस्थानांतील बेने इस्राएल लोक प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या दुसऱ्या दिवसीं अद्याप जो सण करितात, तो येचें गोष्टीच्या आठवणीकरितां स्थापिला असावा असें अनुमान होतें.

लें करणारा परमेश्वर देव आहेस, आणि या सर्व जगतास तूं आपल्या कृपेच्या व दयेच्या गुणांकडून चालवितोस; जसें तुझा सेवक मोशे याच्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, "तेव्हां तो बोलला कीं, मी आपलें सर्व बरेंपण तुझ्या पुढें चालवीन, आणि तुझ्या पुढें परमेश्वराचें नाम प्रगट सांगेन, आणि ज्यावर दया करीन त्यावर दया करीनच, आणि ज्यावर ममता ठेवीन त्यावर ममता ठेवीनच."

एथपर्यंत वाचल्यावर हेखाल बंद करितात.

ונכן מה נהדר आणि मुख्य उपाध्या जेव्हां पवित्र ठिकाणांतून बाहेर निघे, तेव्हां त्याचें तेज याप्रमाणें किती सुंदर असे! जसा (राजाच्या डोईवरील) टोपास जडलेला विचित्रक; जसा मुगुटांत बसविलेला आरक्तक; जसी एफोदावर दिसणारी पाच; जसा ऊरपटावर दृष्टीस पडणारा हिरा; जसें सप्तर्षीसारिखें लखलखणारें मणिरत्न; जसा संगमर्वराच्या खांबामध्यें बसविलेला गोमेद; जसा सोन्यांत बसविलेला बिलोर; जसा मोहोरीवर बसविलेला पीतमणी; जसें अति तेजस्वी चकचकणारें माणीक; जसें अतिशय चमकणारें पोवळें; जसा पूर्ण तेजानें प्रकाशणारा चंद्र, जसा गौरवानें उगीवणारा सूर्य; जसा आकाशांतील ताऱ्यांच्या मध्यें रवि, परमेश्वराच्या दुतासारिखा पवित्र (असें त्याचें तेज असे). जसें लिहिलें आहे कीं, याजकाच्या ओंठानीं ज्ञान राखावें, आणि त्याच्या मुखांतून (लोकांनीं) नेमशास्त्र शोधावें; कां कीं तो सैन्याच्या परमेश्वराचा दूत आहे.

אשרי עין ज्या नेत्रानें हें सर्व पाहिलें तें धन्य; परंतु मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो!

הלא למשמע און मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो!*

शारोनांतलें † कमल जें जसा विणकरीचा गळेबंद गळा वेष्टितो त्याप्रमाणें गौरवानें वेष्टिलेलें होतें तें, आणि (ऊरपटावरील) आठ-

---

* इ. कासाविस होत नाहीं काय? † हें एका सुपिक प्रदेशाचें नाम आहे.

वणीच्या मोलवान दगडानें, आणि आहारोनाचीं जीं पवित्र वस्त्रें, त्यांकडून शृंगारलेला याजक ज्या नेत्रानें पाहिला तें धन्य. הלא

लेवी व (इस्राएल) लोक यांस बोध होतांना, आणि तेजस्वी अग्नीच्या ज्वालेसारिखें त्यांवर पाखर घालणारें गौरव, आणि तुह्मी आपल्या सर्व पापांपासून परमेश्वरासमोर शुद्ध व्हा, असें याजक ह्मणत असतां, त्याजकडे लोक उत्कंठतेनें धांव घेतांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

देवालय पूर्ण सौंदर्यानें भरलेलें, आणि जसें लग्नसमारंभांत राजावर तसें त्यावर पाखर घालणारें गौरव, आणि याजकाच्या मुखांतून ईश्वरी न उच्चारायाचें नाम निघतांना, आणि त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम धन्य असो, असें लोकांस ह्मणतांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

मंदिराचें सुंदरपण व महत्व, आणि जसा राजा आपल्या माहालांत तसें त्यावर पाखर घालणारें गौरव, आणि याजक शोभायमान होऊन प्याला व धुपाटणें आणितांना, आणि यानंतर जसा सूर्य गौरवानें उगवितो त्यासारिखा बाहेर निघतांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

प्रियमंदिराची भिंत, आणि शुक्राच्या तेजासारिखें आणि ज्वालेसारिखें तिजवर पाखर घालणारें गौरव, आणि याजकाच्या (मुखांतून) पर्जन्यवृष्टिसारिखा निघणारा बोध, आणि दुसरे याजक व लोक, त्याच्या भोंवतें जाईताच्या रोप्यासारिखे उभे ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

राजाचा सुंदर वाडा, आणि राजाच्या डोईवरील मुगुटासारिखें त्यावर पाखर घालणारें गौरव, आणि याजक इकडे तिकडे गंभीरपणें चालतां, आणि जसा राजाचा सन्मान करण्याकरितां तसे दुयम याजक व पुष्कळ लोक त्याच्या मागें चालतांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

किर्मिजाचा दोरा लखलखीत पांढरा होतांना, आणि अन्न पाणी वर्जणाऱ्या (लोकांवर) पाखर घालणारें गौरव, आणि उंचा-

वर वस्ती करणाऱ्या (देवाकडून) क्षमा झाली असें सांगणारा, आणि ज्याचें स्वरूप देवाच्या दूतासारिखें अशा याजकास ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

אשרי עין ज्या नेत्रानें हें सर्व पाहिलें तें धन्य; परंतु मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो!

הלא मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो।

गौरववान व महत्ववान याजक प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला, आणि ढग्यासारिखा सौंदर्यानें वेष्टिलेला; आपल्या कामावर उभा राहण्याकरितां आपल्या पदवीचीं व शोभायमान आठ वस्त्रें * पांघरून पवित्र मंदिरांत जातांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

त्याचें सुंदर लकलकीत स्वरूप प्रफुल्लित प्रकाशानें भरलेलें, आणि त्यासमोर मार्ग सरळ होतांना, नीच नव्हे परंतु थोर लोकांमध्यें विपरीत न्यायाचें प्रायश्चित्त करण्या करितां ऊरपट पांघरून पवित्र मंदिरांत जातांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

तो प्रायश्चित्त करण्याकरितां गंभीरपणें येतांना, आणि जसा सूर्य गौरवानें उगवितो तसा प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला, आणि मूर्तिपूजनाचें प्रायश्चित्त करण्याकरितां आणि सुशोभित मुगुटाकरितां एफोद पांघरून पवित्र मंदिरांत जातानां ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

त्या (अधिकाऱ्यास) महान राष्ट्राच्या समाजामध्यें ज्योती सारिख्या किंवा ज्वालेसारिख्या प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला, आणि रक्तपाताचें प्रायश्चित्त करण्याकरितां अतिशुद्ध लोकांमधून अंगरखा पांघरून पवित्र मंदिरांत जातांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

त्या कीर्तिमान याजकास (ईश्वरी) गुप्त आत्मा पावलेला, आणि तेजस्वी सूर्यासारिखा प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला, आणि अभिमानी आत्म्याच्या दोषाचें प्रायश्चित्त करण्याकरितां फेटा बांधून, त्यांस अधिक शोभा चढून पवित्र मंदिरांत जातानां ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

---

* टीका. ११

त्याच्या कंबरेस सुंदर कंबरबंद, आणि तो पाहाटच्या फांकलेल्या उजेडाप्रमाणें प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला असतां, (तो कंबरबंद बांधून) कुकल्पनेच्या पापाचें प्रायश्चित्त करण्याकरितां; आणि नागवेंपण उघडें करण्याच्या पापाचें प्रायश्चित्त करण्याकरितां मासावर (पायांत) चोळणा घालून पवित्र मंदिरांत जातांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

त्याच्या झग्याच्या सभोंवतें घुंगरू, आणि तो प्रफुल्लित प्रकाशानें भरलेला असून यथायोग्य उपदेश सांगत असतां, आणि सत्यशील लोकांमध्यें (सोन्याचें) फूल (फेंट्यावर लावून) झगा पांघरून ह्मणजे कपटाचे भाषणाच्या प्रायश्चित्ताकरितां झगा घालून आणि निर्लज्जेचें प्रायश्चित्ता करितां फूल लावून पवित्र मंदिरांत जातांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य. הלא

אשרי עין ज्या नेत्रानें हें सर्व पाहिलें तें धन्य; परंतु मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो!

הלא मात्र कानानें ऐकून आमचा जीव किती कासावीस होतो!

रमणीय देश आणि (त्याजवरील) एकच (विख्यात) राष्ट्र आणि मुख्य याजकास सोन्याच्या एकच (विचित्र) वस्त्रांनी वेष्टिलेला ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य; परंतु आह्मी आमच्या पाडावपणांत या नेमिलेल्या एकच दिवशीं, आमच्या देवास शोधण्याकरितां, आणि एकमेळीं त्याची सेवा करण्याकरितां त्वरा करितों. הלא

दोघां दुयमांचें * उभें राहण्याचें ठिकाण, आणि मुख्य याजक दोन कोंकरांवर सोडत टाकतांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य; परंतु आह्मीं आपल्या पाडावपणांत दोन राष्ट्रांच्या देशांत प्रवासी आहों, आणि देवाच्या नामाचें एकत्व मान्य करायास आह्मी द्विगुणें † आलों आहों. הלא

* मुख्य याजक दोन कोंकरांवर नीकानोराच्या दरवाजाजवळ येऊन सोडत टाकीत असतां त्याच्या उजवेकडे जो दुयम याजक आणि डावेकडे याजकाच्या घराण्यांतील मुख्य असत ते. † टीका १२

तीन अर्पणें,* होतांना, आणि मुख्य याजक तीन वेळ पापें कबूल करितांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य; परंतु आह्मी आपल्या पाडावपणांत तीन शब्देंकरून† आमच्या उत्पन्न करणाऱ्याची प्रसन्नता मिळविण्याकरितां आणि तीन वेळ त्याची पवित्रता गाजविण्याकरितां त्वरा करितों. הלא

चार पूजनांचें माहात्म्य‡ आणि सोन्याचीं चार वस्त्रें§ ल्यालेल्या मुख्य याजकाचें सुंदर स्वरूप ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य; परंतु आह्मी आपल्या पाडावपणांत (पृथ्वीच्या) चोहों कोनीं विखरलेले आहों, आणि जरी चौघां राजांचें¶ ओकड आह्मी वाहिलें, तरी आह्मी (ईश्वरी) नाम विटाळलें नाहीं. הלא

पांचवेळ अंघूळ करण्याचें ठिकाण, आणि मुख्य याजक यास पांच सुंदर पात्रांकडून ‖ सेवा करितांना ज्या नेत्रानें पाहिलें तें धन्य; परंतु आह्मी आपले पाडावपणांत आजच्या दिवशीं पांच गोष्टी × वर्ज करून पांचवेळ प्रार्थना करितों. הלא

ובכן היה לאין यास्तव या सर्व गोष्टी नाहींत, ह्मणून त्या पाहण्यास सर्वांचे डोळे उत्कंठित झाले आहेत. परंतु आमच्या अपराधांमुळें व आमच्या पूर्वजांच्या अपराधांमुळें आमचे वसतिस्थानाचा नाश झाला; आणि आमच्या तारणाचा वेळ लांबविला आहे; तरी त्या गोष्टींच्या स्मरणांकडून आह्मास प्रायश्चित्त दे; आणि आज आह्मी आपल्या जिवास दुःख लावून घेतलें आहे, ह्मणून आह्मास क्षमा होवो.

---

* पाहांटचें अर्पण आधिक अर्पण व संध्याकाळचें अर्पण;

† ותמחול आह्मास क्षमा कर; ותסלח आह्मास माफ कर; ותכפר आह्मास प्रायश्चित्त दे, या शब्देंकरून; अथवा तीन वेळ पापें कबूल होऊन.

‡ चार जातीच्या पशूचें ह्मणजे गोऱ्हा, एडका, मेंढा व बकरा यांचें अर्पण.

§ फुल, एफोद, झरपट, आणि झगा ज्यास सोन्याचे घुंगरू असत तो.

¶ बाबेलो, पारसी, ग्रीक व रोमी.

‖ पांच वेळ पालटलेलीं वस्त्रें.

× अन्न, पाणी, अंघूळ, सुवास, जोडा घालणें व योग.

ועתה יי אלהינו आणि हे परमेश्वरा ! आमच्या देवा, आतां आमचे पवित्र मंदिराचा नाश झालेला आहे; आणि पूजन मना झालें आहे; आणि तुजपुढें प्रगट व उघड आहे कीं, आह्मा-करितां दोषहारक यज्ञ नाहीं व (ईश्वरास) वाहण्याचीं दानेंहि नाहींत, कोशाच्या काठ्या नाहींत व मळलेलें पीठहि नाहीं, (कोंकरांवरील) सोडत नाहीं व अग्नीचे इंगळहि नाहींत, मंदिर * नाहीं व (सुगंध) बारीक कुटण्याचा प्रकारहि नाहीं, पवित्र ठिकाण नाहीं व मोर डोंगरहि नाहीं, (देवळापुढें जमा होणारा इस्राएलांचा) समाज नाहीं व ईश्वरी न उच्चारायाच्या नामानें पापें कबूल होण्याचा प्रकारहि नाहीं, यज्ञ नाहीं व रक्त शिंपडणेंहि नाहीं, पापहारक यज्ञ नाहीं व जाळायाचें मांदेंहि नाहीं, शुद्ध हो-ण्याचा प्रकार नाहीं व अंघूळ करण्याचा प्रकारहि नाहीं, यरूश-लेम नाहीं व लेबानोनाचें रानहि नाहीं, दयासन नाहीं व केरूबहि नाहींत, ऊद नाहीं व दर्शनीय भाकऱ्याहि नाहींत, स्थंडिल नाहीं व दिव्याचें झाडहि नाहीं, (अर्पिलेल्या पशूचे) तुकडे करण्याचा प्रकार नाहीं व पेयअर्पणहि नाहीं, सपीठ नाहीं व (सुगंधी) द्रव्येंहि नाहींत, होम नाहीं व पूजनहि नाहीं, पडदा † नाहीं व पापहारक यज्ञाचा गोऱ्हाहि नाहीं, सियोन नाहीं व पवित्र फूलहि नाहीं, तजाचा सुगंध दाखविणें नाहीं व दालाचिनीचा सुगंध दाखविणेंहि नाहीं, सुगंधी द्रव्याचा सुवास नाहीं व शांतिकारक सुवासहि नाहीं, ईश्वरापुढें आणायाच्या भेटी नाहींत व शांतिकारक यज्ञहि नाहीं, आभार मानण्याचे यज्ञ नाहींत व नित्याचीं अर्पणेंहि नाहींत.

אבל נתת לנו परंतु हे परमेश्वरा आमच्या देवा, त्वां आह्मास हा (शा. अ. शाब्बाथ दिवस व हा) प्रायश्चित्ताचा दिव-स, हा अपराधाची क्षमा होण्याचा दिवस, हा पवित्र मेळा मिळ-ण्याचा दिवस, हा दिवस ज्या (दिवशीं) खाणें, पिणें, अंघूळ

---

* एथें मंदिर हें नाम अति पवित्र ठिकाणास दिलें आहे. जसें १ राजे ६, १९.

† पवित्र आणि अतिपवित्र ठिकाणाच्या मध्यें जो पडदा होता तो.

करणें, अंगावर सुवास घेणें, जोडा घालणें, आणि योग मना आहेत तो, वर्षांतील सर्व दिवसांपेक्षां हा मोठा दिवस, ज्या दिवशीं तूं आमचीं सर्व पापें क्षमा करितोस, आमचे अपराध माफ करितोस, आणि आमचीं उल्लंघनें दूर करितोस, तो दिल्हा आहेस. जसें तुझा सेवक मोशे याच्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, "कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील (आणि) तुह्मी शुद्ध व्हाल. आणखीं असें ह्मटलें आहे कीं, "तुह्मी आपणांबरोबर वचनें घेऊन परमेश्वराकडे फिरा, त्याजवळ ह्मणा कीं, तूं सर्व अन्यायांची क्षमा कर, आणि (आह्मास) प्रसन्न हो; ह्मणजे आह्मी आपल्या ओंठांचीं वांसरें अर्पूं."

שמם הר ציון आमच्या पूर्वजांच्या अपराधामुळें सियोन डोंगर ओसाड पडला; आमच्या मंडळीचें प्रायश्चित्त करण्यासाठीं पवित्र मंदिर नाहीं व याजकहि नाहीं, ह्मणून आमच्या अर्पणाबद्दल आह्मी प्रार्थना * आणिली आहे ; आणि आह्मी आपल्या ओंठांचीं वांसरें अर्पितों.

ונשלמה आणि आह्मी आपल्या ओंठांचीं वांसरें अर्पितों.

חרב מקום שבתי माझ्या वस्तिस्थानाचा नाश झाला; माझें सुंदर घर ओसाड पडलें, ढगाप्रमाणें असणारा माझा सुगंधाचा (धूर) नाहींसा झाला; आणि माझ्याजवळ स्थंडिलहि नाहीं. (हे देवा,) तुझ्या जवळ येण्याकरितां प्रार्थनेवांचून माझ्याजवळ कांहींच उरलें नाहीं; जसी नेमलेल्या मनुष्याबरोबर रानांत कोंकरा पाठवून पापाची क्षमा होत असे, तसी माझ्या लाजीरवाण्या फितुरीची क्षमा कर. तूं आह्माकडे वळून आह्मावर दया कर, आणि आमचे अन्याय धुळीस मिळीव. ונשלמה

עם נדפם ונדלה नीचावलेले व पीडलेले लोकांस, हे चांगल्या व क्षमाशील देवा, तूं प्रसन्न हो; आणि जसा मीठ घालून निर्मळ केलेला सुगंध, तसी त्यांची विनंती सफळ होऊं

* इ. वचनें.

दे, त्यांच्या सर्व कुजट अपराधांकरितां प्रायश्चित्त पाठीव, आणि जसीं कड्यावरून लोटलेल्या कोंकराकडून, तसीं त्यांचीं पापें क्षमा कर; प्रसन्नतेच्या वेळीं आह्मास उत्तर दे, आणि आमचें दुःख तूं धिकारूं नको. ונשלמה

אָנָּא תָאִיר אוֹרֵנוּ हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमचा उजेड तूं प्रकाशित कर, आमचें मंदिर तूं बांध, आमच्या आश्रयाच्या ठिकाणाभोंवतालें तूं कूस बांध, आमचा झेंडा तूं उभार, आमच्या मंदिरास तूं सजीव, आह्मावर तूं प्रकाशित हो आणि आह्मास तार, (आमची मंडळी तूं एकवट कर,) आमचा उन्मत्तपणा तूं क्षमा कर, आमचीं पापें तूं माफ कर, आमचा विटाळ तूं शुद्ध कर, आह्मापुढें मांडलेले फांस तूं मोकळे कर, आह्मावरील डाग तूं धुऊन टाक, आमचें मन तूं सुशिक्षित कर, आमचे अतिक्रम तूं क्षमा कर, आमची आशा तूं स्थापन कर, (आमचा आत्मा तूं शुद्ध कर,) आमची विपरीत वर्त्तणूक तूं माफ कर, आमचे अपराध तूं दूर कर, आमचीं उलंघनें तूं रद्द कर, आमच्या सैन्यास तूं यथार्थ ठरिव, आमच्या मंडळ्या तूं उभार, आमच्या मनीं चांगल्या गोष्टींच्या निघणाऱ्या उकळास तूं प्रसन्न हो, आमची विनंती तूं मान्य कर, आमची प्रार्थना तूं ऐक, आमच्या काकुळतीची आणि तुझे सर्व लोक इस्राएलाचें घराणें यांच्या प्रार्थनेची तूं आवड धर.

אָנָּא מוֹחֵל לַעֲוֹנוֹתֵינוּ भा. १. पृष्ठ. १७

וידוי पापाविषयीं कबूल होणें.

एथें पापाविषयीं कबूल होण्याविषयीं जो भाग आहे तो वाचितात, परंतु त्यांतील רבונו של עולם बद्दल हें पुढील बोलतात.

आरदुतीएल याचा पुत्र रब्बेनु शेमतोब याने रचलेलीं पापें कबूल होण्याची रीति.

רבונו של עולם हे जगदीशा, जेव्हां मी आपल्या ता-

ण्याकडे पाहतों तर पाहा, त्याचें तेज निघून गेलें, आणि माझी प्रतिमा छायेसारिखी आहे, आणि माझ्या आयुष्याच्या पुष्कळ वर्षांमुळें माझीं पापें किरमिजासारिखीं लाल, आणि माझे कुरळ केंस बर्फासारिखे पांढरे झाले आहेत. माझ्या वांच्छांस अनुसरण्यांत आणि आज्ञांचा भंग करण्यांत तीं (वर्षें) लयास गेलीं, आणि माझी निराशा होऊन तीं समाप्त झालीं. (हे देवा,) तुझ्या मागून वळणें सुधारण्यासाठीं आणि पश्चात्ताप करण्यासाठीं माझ्या अंगीं पुर्तेपणा नाहीं, ह्मणून माझी निराशा झाली. कारण दिवस लहान असून कामें पुष्कळ आहेत. मीं स्तुतीचें अर्पण * केव्हां अर्पूं? आणि ज्या गोष्टींविषयीं मीं हट्ट धरिला त्यांविषयीं मंडळींत व सभेंत माझें तोंड केव्हां कळवील? माझ्या (आयुष्याच्या) थोडक्या वेळांत मीं केलेले पापांविषयीं व अपराधांविषयीं कसा कबूल होऊं शकेन? आणि त्यांचीं नांवें आपल्या ओंठानीं कशीं घेऊं शकेन? तीं सांगायास शब्द व बोल पुरणार नाहींत, आणि तीं लिहिल्यास पुस्तकांत व (पत्रांच्या) गुंडाळ्यांतहि तीं मावूं शकणार नाहींत; (लिहितां लिहितां) दिवस व रात्रि संपून जातील. जरी लिहिलीं व सांगितलीं, तरी माझ्या कबूल होण्यांतून दाहापट उरून राहतील. जर मी सुंदर ओंठानीं व ऐकाविणाऱ्या वाणीनें माझ्या उल्लंघनांविषयीं क्षमा मागूं पाहतों, तर (माझ्याजवळ) बरें तें काय? सुंदर तें काय! जर दुर्भाषणाच्या दोषांविषयीं सांगायास मी आपले ओंठ उघडतों, आणि दुर्वचनें बोलण्याविषयीं मृदु शब्दानें मी विनंती करितों; तर पाहा, ज्या तोंडानें योग्य गोष्टी ठरविल्या, त्याच तोंडानें अयोग्य गोष्टी ठरविल्या आहेत. एवढेंच नाहीं, परंतु ओंठांच्या शब्देंकरून रक्तानें भरलेले हातांस, आणि जुलमी तळहातांस काय लाभ? आणि जीं पापें (मजपासून) घडून आलीं व येतात, आणि जीं मी करीत व चालवीत आहें, त्यांसाठीं अगे कपटी जिभे, तुला काय दिल्हें जाईल? आणि तुला

---

* תודה या शब्दाचा अर्थ स्तुति असा होतो आणि कबूल होणें असाहि होतो.

काय प्राप्त होईल ? दाहा वेळा जरी पापें कबूल केलीं, तरी दुष्टाईच्या संग्रहास कांहींच हित होणार नाहीं, आणि शब्दांच्या पांडित्याने* उलंघनें नाहींशीं होणार नाहींत. जीभ आणि ओंठ हालवून ओंवाळणीसाठीं परमेश्वरासमोर ओंवाळणी केल्याने कांहीं उपाय व आरोग्यता होते काय ? मन तर द्वेषभाव राखतें, आणि ओंगळ विचार योजितें. मी न जाणून केलेल्या पापाकरितां जरी आपलीं अश्रु वितळवून तुजपुढें पावसासारिखीं पाडिलीं; तरी जें पाप मी हट्टाने केलें आहे, त्याकरितां मला न्यायांत उभें राहावें लागणार नाहीं कीं काय ? अथवा जें पाप मी तुजपुढें अगत्यामुळें केलें, त्याकरितां जरी आश्चर्य (कृत्यें) करणाऱ्या हाताकडून होणाऱ्या क्षमेची आशा केली; तरी तुजपुढें स्वइच्छेने केलेल्या पापाकरितां मला आत्मिक व दैहिक* दंड नाहीं काय ? जरी गुप्तांत केलेले पापाकरितां मी विनंती करितों व ती मान्य केली जाते; तरी तुजपुढें उघडपणें केलेल्या पापाकरितां माझें मन भयंकर अग्नींत भाजत नाहीं काय ? अथवा जर मी ह्मणतों कीं (तुझा) क्रोध जाईपर्यंत मी पळून जातों, तर त्यांतहि कांहीं रुचि नाहीं, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरलेली नाहीं काय ? त्याच्या हातून कोणी वांचत नाहीं, आणि नरकहि त्यासमोर उघडा आहे. (हे देवा,) तुजसमोरून मी कोठें पळूं शकेन ? तुझ्या दृष्टीपुढून कांहींच लपलें जात नाहीं. जर आकाशांत चढतों तर तूं तेथें आहेस, किंवा मृत्युलोकीं आथरूण धरितों, तर पाहा, तेथेंहि तूं आहेस. यास्तव निश्चयें, मी मौन धरितों व मुका राहतों, आणि आपला हात तोंडावर ठेवितों; कारण मला लज्जा प्राप्त झाली आहे व मी घाबरलों आहें. माझ्या मनास भय प्राप्त होऊन तें कांपतें, आणि माझे विचार थरथरून व डगमगून, योग्य व अयोग्य गोष्टीविषयीं संशययुक्त आहे; त्यांतून कोणतें खरें हें मी जाणत नाहीं. जरी मी उभा राहायास अथवा पळायास पाहतों,

* इ. अधिकाईने.

† इ. भीतलि व बाहेरील.

किंवा भय अथवा विश्वास धरितों; तरी दोन विचारांमध्यें मी लैंगडतों. जर आठवण करितों अथवा मनांतून घालवितों, बोलतों, अथवा उगा राहतों, तर तीहि गोष्ट कठीणच आहे. कारण उगा राहिलों असतां माझीं हाडें झिजून जातात, आणि बोललों असतां माझे अपराध उघडकीस येतात; आणि माझ्या मागल्या आयुष्यामुळें माझें मन फजीत पावतें. जर मी आपल्या हृदयांत (अपराध) लपवूं पाहतों, आणि माझें कपट मजमध्येंच राखून ठेवितों, तर माझा तोंडवळा मजविषयीं साक्ष देतो. आणि जो गुप्त गोष्टीचा शोध लावणारा न्यायाधीश आहे, त्यापुढें विसर पडणें, तोंडओळख धरणें आणि लांचाची आवड धरणेंहि नाहीं. आणि जिवाची खंडणी किती अमोलिक आहे ! असें असतां मी गरीब व भिकारी आहें; मग मी शुद्ध कसा होईन. यावरून माझें डोकें लव्हाप्रमाणें लवतें, आणि माझीं अश्रुं माझ्या काळिजाच्या रक्तानें लाल झालीं आहेत; आणि जसें काळेंजिरीं व जिरीं पेरितात, त्याप्रमाणें तीं विखरलेलीं आहेत. यद्यपि माझ्या गुर्दे कमळांनी बोध करून, आणि माझ्या विचारांनी मला उत्तर करून धैर्य दिल्हें; ते मला ह्मणाले कीं, जरी न्यायाधीश भयंकर व कठोर आहे, तरी दिवस अद्याप आहे (अवकाश आहे) इतक्यांत तूं आपल्या जीवाची खंडणी शोध. तूं दयेविषयीं निराश होऊं नको; कारण अद्याप दिवस वर आहे आणि पूर्ण दिवसाप्रमाणें मावळायास त्वरा करीत नाहीं. तुझा अर्ज मान्य व्हावा, ह्मणून तुझ्या आरोळीसाठीं स्थान व्हावें आणि तुझ्या प्रार्थनेसाठीं द्वार उघडलें जावें ह्मणून तूं काकळूत कर. जरी तुझीं दुष्ट कर्में फारच वाढलीं, तरी देवाची क्षमाशीलता किती चांगली व किती मोठी आहे ! आणि जरी तुझीं पापें समुद्र व त्यांच्या लाटांसारिखीं आणि तुझे अतिक्रम आकाशांतील तारे व त्यांच्या सैन्यासारिखे असले; तरी ईश्वराची दया अनंतकाळापासून आहे, जरी तुझे दोष तुझ्या हातावर वाढून पुष्कळ झाले असले; तरी आकाशावरून त्यांची दया सत्तरपट होईल. असें ते मजबरोबर बोलत असतां माझ्या ठिकाणीं मी

उगाच उभा राहून धैर्य धरिलें, आणि (हे देवा,) मी तुझा दरवाजा ठोकीत आहें. आणि माझ्या पापांच्या कांहीं भागांविषयीं कबूल होण्यास माझ्या दोषांतून एकादा लहान आणि माझ्या हजारों अतिक्रमांमधून एकादा सांगायास मी आपलें हृदय भरलें आहे. मी अतिक्रम केले, माझ्या जुलमाच्या व दग्याच्या अतिक्रमांचीं ओझ्यांचीं ओझीं आहेत. मी विश्वासघात केला, आणि रात्रंदिवस मी आपणावरून मळीण कापडें काढिलीं नाहींत. मी लुटलें आणि त्याची फेड करायास मी शकलों नाहीं; कारण लुटून खालेलें परत देणें कठीण आहे. जसा कोणी मूर्ख बोलतो, तसा मी कपटी व थट्टेखोर जिभेने आळ घेतला. मी विपरीत केलें, आणि जें सरळ होतें, तें मी आपल्या तोंडानें वांकडें केलें, निश्चयें मी त्याला उलटून, उलटून, उलटून ठेविलें आहे. मी दुष्टाई केली आणि माझा जीव आनंदित व हर्षित झाला; परंतु दुष्टांचा मार्ग कां सफल होतो ? मी उन्मत्त झालों; आणि उन्मत्तपणें जो तंटे व झगडे करितो त्यावर मी प्रीति केली. मी बळात्कार केला; आणि ज्याने बळात्कार केला नाहीं अशा यथार्थाची आपल्या तोंडानें अपकीर्ति केली. मी खोटें रचिलें; आणि खोटी साक्ष देण्याकरितां गुलामाप्रमाणें मी विकला गेलों. मी वाईट योजिलें; आणि माझ्या पवित्राची (देवाची) आज्ञा मोडायास मी आपल्या जिवाशीं विचार केला. मी लबाडी केली; आणि खोटेपणा व लबाडी बोलण्याविषयीं माझें मन पाण्याच्या झऱ्यासारिखें वाहतें. मी थट्टा केली; आणि माझ्या मनानें मसलत देणाऱ्यांचा विवेक मोडला, त्याने (मी) निंदकांशीं आपला हात लांब केला (संगत केली.) मी बंडावा केला आणि "निश्चयें तुह्मी परमेश्वराविषयीं केवळ विरुद्ध करूं नका." हें वाक्य मी अपल्या हातानें सर्व पुस्तकांतून काढून टाकिलें. मी अपवाद केला; आणि माझ्या मनानें प्रगटपणें व गुप्तांतहि लोभी, ज्याचा परमेश्वराला वीट आहे त्यास, मी धन्य ह्मटलें. मी कुटिलपणें वर्तलों; आणि सर्व मनुष्यांनीं अनिवार व्हावें ह्मणून मी त्यांस घेतविलें. मी दोष केले; आणि जें वांकडें केलें; तें नीट करण्यास

माझ्या मनानें गर्वेंकरून नाकारिलें. मी उल्लंघन केलें, आणि उल्लंघन करणाऱ्या मनुष्यांस माझा शेजारी होण्यासाठीं मी निवडून घेतलें. मी जुलूम केला; आणि जुलूम करणाऱ्या वैऱ्यासारिखा आपल्या स्वतःस थोर करून सर्व मनुष्यांवर जुलूम केला. मी आपली मान ताठर केली, आणि ताठर गोष्टी बोलण्यापासून मी कधीं उगा राहिलों नाहीं. मी दुष्टाई केली; आणि माझ्या जीवानें उल्लंघनांच्या व दुष्टाईच्या मार्गें शोध करणाऱ्या दुष्टाची ईर्षा धरिली. मी नासलें; व जें मजकडून नासलें गेलें, तें माझ्या दिसण्यांत थोडेंच होतें, आणि त्या नाश करणारासहि उत्पन्न केलें आहे. मी ओंगळ केलें, आणि चिळसकारक कृत्यें करायासाठीं माझा जीव फार इच्छेनें भंगला जातो. मी बहकलों; आणि मेंढपाळ नसल्यास शेरडूं जसें भटकतें, तसें माझें मन भटकत आहे; आणि तें कोणाएकाला असें आढळतें कीं, पाहा, तें बहकलें आहे. मी (दुसऱ्यास) बहकविलें, आणि सर्व धार्मिकांस मूर्ख समजून त्यांस बहकविण्याकरितां त्यांजशीं भाषण केलें; परंतु मी त्यांस ठकविणारा असा दिसलों. आणि मी तुझे सुंदर नियम व न्याय सोडून फितूर झालों; परंतु तेणेंकरून मला कांहीं लाभ झाला नाहीं. तथापि जें अवघें मजवर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस, त्वां सत्यता केली आहे, परंतु मी दुष्टाई केली आहे. निश्चयें मी जाणतों, कीं तूं कृपाळू व दयाळू आहेस, संकटाविषयीं अनुतापत असतोस, आणि आपलें चांगुलपण कधींहि आवरीत नाहींस, जें मी ऐकिलें आहे, त्यापेक्षांहि तूं अधिक दया करितोस. तूं मंदक्रोध व बहुप्रसाद आहेस, ह्मणून तुजपुढें (दया) मागणाऱ्याच्या तोंडास रिकामें परतवूं नको; तूं त्यांचें हृदय सिद्ध करून ऐक. मी स्वभावानें दुराचारी आहें, तसेंच हे पवित्रामध्यें व अतिपवित्रामध्यें भेद राखणाऱ्या, तुला क्षमा करणें शोभतें. मी दोष व दुष्टाई करणारा आहें, परंतु हे देवा, तूं यथार्थ व तारणारा आहेस, ह्मणून तुझी विनंती करीत असतां तारण व्हायास आज्ञा कर. आणि बंडखोरांच्या व उद्धट मनुष्याच्या लज्जेवरून दयेची स्तुति करून येती. जर अतिक्रम करणाऱ्या-

स लज्जा प्राप्त न होती, तर दयेचें मूल्य समजून न येतें; तीं दोन्हीं एकदांच संपतीं. जर (तुजपासून) फिरण्यांत अपवित्रता होत नसती, तर पश्चात्तापाची शुद्धता किती व किती चांगली हें कळून न येतें. जर दुष्कर्माचा नाश करायास व त्याचा चिळस मानायास क्षमेची आशा नसती, तर दुष्ट मनुष्यें वाढलीं असतीं. यास्तव जरी माझीं उल्लंघनें व दुष्कर्में पुष्कळ झालीं आहेत, तरी माझें दुःख व माझे कष्ट पाहून माझ्या शोकांत मला क्षमा होवो. जरी माझीं पापें व बंडें वाढलीं असतील, तरी माझ्या कष्टाचें व माझ्या नीचत्वाचें स्मरण कर, आणि माझ्या जवळ कांहींच नाहीं हें लक्षांत आण.* मधेपेक्षां गोड काय? आणि सिंहापेक्षां बळकट काय? (याचा शोध केला तर असें कळून येतें कीं,) माझ्या पशुवत् जिवाची आवड गोड वाटते, आणि माझ्या दुर्वासनांचें सामर्थ्य मोठें आहे; परंतु क्रूर जन आपले देहावर दुःख आणितो. माझें ज्ञान त्यापुढें कोल्ह्यासारिखें, आणि माझा बुद्धिमंत आत्मा मुक्या मेंढराप्रमाणें असतो; परंतु त्या पशूमध्यें बळकट जो सिंह त्यासारिख्या आहेत. मातीचा केलेला मनुष्य लबाडीची व ठकविण्याची इच्छा करितो; सर्वहि लांचेची आवड धरितात, त्यांतील प्रत्येकास चार चार तोंडें आहेत. आपल्या गरजा शोधण्यासाठीं (पुरविण्यासाठीं) तो वांकड्या मार्गानें जातो, आणि आपलीं शिक्षित मानसेंही हत्यारबंद करितो. त्याचे घरीं चौघे † जन्मलेले आहेत; ते प्रत्येक आपल्या मार्गानें भटकतात; कधींहि ते तृप्त होत नाहींत. प्रत्येक आपल्या भावाबरोबर लढतो, त्यांतून फारसे ज्ञानी होत नाहींत, त्यांचे विचार निरनिराळे आहेत, म्हणून ते नाश पावतील. एकाच्या ज्ञानाचा आश्रय व एकाच्या बुद्धीचा आधार ते धरीत नाहींत; ते चालतांना त्यांच्या चोहों अंगानें चालतात.‡ एक चुलींतून विस्तव घ्यावयास व दुसरा डबक्यांतून पाणी उपसायास इच्छितो, ते चपळ जहा-

* इ. माझ्याजवळ काय आहे तें तूं ओळख.

† मनुष्य चार तत्त्वांचा म्हणजे अग्नि, पाणी, वायु व माती यांचा केलेला आहे.

‡ प्रत्येक आपल्या विचारानें चालतो.

आसारिखे क्रमून जातात. एक नगरासारिखा वारा झोंकितो, दुसरा घरोब्याकरितां खांच खणितो, त्यांनी मजकडे (देवाकडे) आपलें तोंड नाहीं, परंतु पाठ फिरविली आहे. एक दबा धरून राहतो, व दुसरा पाठीस लागतो; एक नाशितो व दुसरा फाडितो; आणि प्रत्येक आपल्या शेजाऱ्याला धोंड्याने अथवा बुकीने मारितो. ते अतिविपरीत पिढींतले व कुसावांचून मोडलेले नगरासारिखे आहेत; मी शांत असतों, * परंतु जेव्हां बोलतों तेव्हां ते लढूं लागतात. विघात व नाश त्यांच्या वाटांत आहेत, आणि त्यांच्या गतींत कांहीं नीति नाहीं; त्यांनी पाहूं नये ह्मणून आपले डोळे मिटले, आणि समजूं नये ह्मणून आपलें हृदय झांकिलें आहे. जर मी त्यांच्या पायावर बांधलेला नसतों, † तर मी बंडावलों नसतों; (नीतीच्या मार्गापासून) मी मागें हटलों नसतों. निश्चयें, माझ्या अंतर्यामास लज्जा प्राप्त झाली आहे; तें मजमागें मोठ्याने ओरडतें कीं, माझ्या पापामुळें हें सर्व झालें आहे. प्रत्येक आपणास थोर मानून ह्मणतो कीं, मी राज्य करीन; एक विनंती करितो व दुसरा फुसलावतो; तर मी काय करावें हें मी जाणत नाहीं. लांडग्यांमध्यें शेरडूं काय करूं शकेल? एक बहुधा समोर उभा राहूं शकेल काय? एका पक्षांत एक व दुसऱ्या पक्षांत बहुत असल्यास बहुमताप्रमाणें वर्तावें असी रीति आहे. यावरून मला अगत्य पडलें होतें असें लक्षांत आणून, तूं मला माझ्या कुटिलपणापासून आणि अतिक्रमापासून सोडीव, आणि आतां माझीं पापें क्षमा कर. माझे अपराध माफ कर, आणि माझ्या उल्लंघनांविषयीं व माझ्या उद्धटपणाविषयीं मला सुटका दे. आणि जर मजसाठीं असें करीत नाहींस, व जर माझें दुःख तूं धिःकारितोस; (परंतु असें न होवो, जरी माझ्या पापाच्या गडबडीमुळें माझ्या काकुळतीची वाणी बंद राहते, तरी पराक्रमी देव ती धिःकारणार नाहीं;) तर या पवित्र मंडळीसाठीं माझी विनंती मान्य कर. त्यांतील प्रत्येक लहान थोर, पुष्ट व शुष्क

* शांति राखूं पाहतों.

† जर मी त्या चार तत्वांचा घडलेला नसतों.

(तुजपुढें) विनंतीरूप पाणी शिंपडीत आहेत. ते आपल्या ओठांचीं प्रार्थनारूप वासरें अर्पितात, आणि खबुतरांच्या बद्दल काकळूत करितात, आणि तुजपुढें कबूल होतात.

यापुढें पापाविषयीं कबूल होणें हा भाग पूर्ण करून אָנָּא בְּאָ הַמְּבָרֵךְ אֶת עַמּוֹ पासून יַעֲלֶה וְיָבֹא याचे शेवटपर्यंत वाचावें.

אָנָּא בָּרְכֵנוּ בַּבְּרָכָה भाग ५. पृष्ठ.९८ हा भाग वाचितांना आहारोनाच्या कुलांतील जर कोणी कोहेन ह्मणजे उपाध्या असला, तर तो हेखालापुढें उभा राहून त्यांत लिहिलेला आशीर्वाद लोकांस देतो. परंतु तो आशीर्वाद देतेवेळीं त्याजकडून कांहीं चूक न व्हावी ह्मणून हाज्जान त्यास एक एक शब्द सांगतो. आणि हाज्जान प्रत्येक शब्द ह्मणत असतां मंडळी त्याच शब्दाच्या अर्थाचीं जीं वाक्यें ह्मणते तीं येणेंप्रमाणें.

יְבָרֶכְךָ आकाश व पृथ्वीचा उत्पन्न करणारा परमेश्वर सियोनेंतून तुला आशीर्वाद देईल.

" हे परमेश्वरा आमच्या प्रभू, तुझें नाम सर्व पृथ्वींत किती महान !

וְיִשְׁמְרֶךָ हे देवा, मला राख, कां तर म्या तुजवर आशा ठेविली आहे.

יָאֵר देवाने आह्मावर कृपा करावी; आणि आह्मास आशीर्वाद द्यावा; आपलें मुख आह्मावर प्रकाशित करावें. सेलाह.

" परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी आणि फार दयेचा व सत्यतेचा.

פָּנָיו तूं मजकडे फीर आणि मजवर दया कर; कारण मी एकला व दुःखित आहें.

אֵלֶיךָ हे परमेश्वरा, मी आपला जीवात्मा तुजकडे लावितों.

וִיחֻנֶּךָּ पाहा, जसी चाकराची दृष्टि आपल्या धन्याच्या

हाताकडे, जसी चाकरिणीची दृष्टि आपल्या धनिणीचे हाताकडे असती, तसी आमची दृष्टि आमचा देव परमेश्वर आह्मांवर कृपा करी तोंपर्यंत त्याकडे आहे.

ישא तो परमेश्वरापासून आशीर्वाद आणि आपल्या तारणाच्या देवापासून नीतिमत्व पावेल. तूं देवाच्या व मनुष्याच्या दृष्टींत प्रसाद व कुशल पावसील.

" हे परमेश्वरा, आह्मांवर कृपा कर, आह्मी तुझी वाट पाहिली आहे. प्रत्येक सकाळीं तूं त्यांचा बाहु हो, संकटसमयीं आमचें तारणाहि हो.

פני माझ्या संकटाच्या दिवशीं तूं आपलें तोंड मजपासून लपवूं नको; आपला कान मजकडे लाव.

אליך जो आकाशांत राहतो, त्या तुजकडे मी आपली दृष्टि वर लावितों.

ושם आणि त्यांनीं माझें नांव इस्राएलाच्या संतानांवर लावावें, ह्मणजे मी त्यांस अशीर्वाद देईन.

לך हे परमेश्वरा, मोठेपणा व पराक्रम व तेज व जय व मान हीं तुझीं; कारण कीं जें आकाशांत व पृथ्वींत तें सर्व तुझें; हे परमेश्वरा, राज्य आणि सर्वांवरला मुख्य अधिकार तुझा आहे.

שלום जो दूर आणि जो जवळ त्याला समाधान समाधानच होईल, असें परमेश्वर ह्मणतो, आणि मी त्याला आरोग्य करीन.

קדיש לעילא

ישראל עבדיך तुझे सेवक इस्राएल तुजपुढें एकत्र झाले आहेत, ते तुझ्या क्षमेची इच्छा धरून तुझ्या तारणाची आवड धरितात; हे देवा, हजारांशीं दया राखणाऱ्या! मी विनंती करितों कीं, ह्यांचें ओरडणें अधिक अर्पणाप्रमाणें तूं मान्य कर.

האל הנוצר חסד हे देवा, हजारांशीं दया राखणाऱ्या ! (तूं मान्य कर.)

तुझे सेवक इस्राएल, जे नीच पदास पावले आहेत, ते सामर्थ्यानें गौरवयुक्त देवापुढें नमन करीत व लोटांगण घालीत येतात; मी विनंती करितों कीं, त्यांचें ओरडणें सुगंधित अर्पणाप्रमाणें मान्य कर. האל

तुझे सेवक इस्राएल तुझाच आश्रय धरितात, तुझ्या दयेची वाट पाहून तुझ्या तारणाची आशा धरितात; मी विनंती करितों कीं, त्यांचें ओरडणें होमाप्रमाणें व पेय अर्पणाप्रमाणें मान्य कर. האל

तुझे सेवक इस्राएल चकित झाले आहेत व घाबरले आहेत, त्यांच्या अगणित पापांमुळें त्यांस भय व त्रास प्राप्त झाला आहे; मी विनंती करितों कीं, त्यांचें ओरडणें अर्पणाप्रमाणें व शांतिकारक यज्ञाप्रमाणें मान्य कर. האל

तुझे सेवक इस्राएल कण्हत व ओरडत आहेत, आणि जरी त्यांजपाशीं सत्कर्में नाहींत तरी ते तुझ्या दयेचा आश्रय धरितात; मी विनंती करितों कीं, त्यांचें ओरडणें पोळी व पापडी* यांचे अर्पणाप्रमाणें मान्य कर. האל

पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना.

אלהי הצבאות " हे करूबांवर बसणाऱ्या परमेश्वरा, सैन्याच्या देवा, तूं आपल्या लोकांस वचन केलें आहेस कीं, अहो मागें फिरणाऱ्या लेंकरानों, फिरा; मजकडे मधुर गोष्टी करीत या; मला शोधा; ह्मणजे तुह्मी पुष्कळ दिवस जगाल. तुझीं वचनें सर्वकाळ स्थापित नाहींत कीं काय ? त्यांवरच भरंवसा ठेवून आह्मी तुजकडे येतों. तूं चांगल्या जीवनांत आमची आठवण कर, तुझ्या फार दयेपैकीं आह्मावर दया कर. तूं चांगल्यांशीं व वाईटांसींही चांगला आहेस; व पश्चात्ताप करणाऱ्यांस अंगीकारण्यासाठीं तुझा

* निर्गम २९. २३

उजवा हात लांबविलेला आहे. तूं अपराध्यांच्या मरणाची आवड धरीत नाहींस; ह्मणून आह्मी (तुजकडे) सकाळीं व संध्याकाळीं (येतों.) हे करूबांच्या सैन्यांत स्तुति पावलेल्या राजा, तूं आह्मास आमच्या पापांपासून व दोषांपासून शुद्ध कर; आमचीं अपार वाढलेलीं उलंघनें तूं क्षमा कर. कोरलेले खडकांकरितां (ज्या पूर्वजांपासून आह्मी कोरले गेलों अथवा उपजलों आहों,) त्यांकरितां तूं आह्मांस उत्तर दे; पश्चात्तापाचीं द्वारें बंद होऊं देऊं नको; परंतु आमचें ओरडणें तुजकडे येऊं दे. हे ज्वाला फाडणाऱ्या, तूं आह्मास आपणाजवळ घे, गुरें व मेंढरें आपिल्याप्रमाणें तूं आह्मास प्रसन्न हो. आह्मी आबालवृद्ध तुझ्या पुष्कळ दयेवर भरंवसा व विश्वास धरून तुजकडे फिरतों; ह्मणून हे उंचांत वास करणाऱ्या खडकरूप आश्रया आणि दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, आह्मावर दया कर.

यानंतर संध्याकाळच्या प्रार्थनेंत पृष्ठ ३७ एथें लिहिलेले אל מלך पासून पृष्ठ ४९ एथें लिहिलेले אלהינו שבשמים पर्यंत वाचावें; परंतु עשה למען אלהי אברהם आणि עננו אלהי אברהם या प्रत्येक भागानंतर אל מלך बोलावें आणि עננו אברהם यामागून אל מלך बोलण्यापूर्वीं हें बोलावें.

שועת שעה गरिबाची विनंती व त्यांचीं वचनें मान्य करून पूर्वींच्या दिवसांप्रमाणें त्यांस उत्तर दे. हे महान व थोर (ईश्वर,) तूं आपल्या नांवाकरितां त्यांचीं सर्व पापें क्षमा कर. त्यांचीं सर्व उलंघनें व अपराध पुसून टाक. आणि हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, जर त्यांकरितां नाहीं, तर तूं आपणाकरितां त्यांविषयीं दयाभरित हो.

शेवटल्या אל מלך पूर्वीं हें पुढील लिहिलें आहे, परंतु कोणी तें बोलत नाहींत.

אל מי कोणत्या रक्ताच्या सूड घेणाऱ्याकडे मी ओरडूं!

(कारण पाहावें तर) माझ्याच हातानें माझा रक्तपात केला. द्वेषणाऱ्यांचींहि मनें मी पारखिलीं, परंतु माझ्याच मनासारिखा माझा द्वेषी कोणी नाहीं. शत्रूचे फटके व घाय (मजवर) वाढले, परंतु माझ्याच हातासारिखा मजवर फटके मारणारा व घाय करणारा कोणी नाहीं. नाश करणारांनी मला व्यर्थतेच्या पुढें केलें; परंतु माझ्याच डोळ्यासारिखा मला फुसलावणारा व पुढें करणारा कोणी नाहीं. अग्नीच्या प्रवाहांचे प्रवाह मी पार केले, परंतु माझ्याच वांच्छेच्या उष्णतेप्रमाणें मला कोणीच जाळिलें नाहीं. मी जाळ्यांत व फासांत पडलों, परंतु माझ्याच जिभेसारिखें मला कोणी फासांत पाडिलें नाहीं. सर्पाच्या व विंचूच्या दंशाच्या वेधना मला लागल्या, परंतु माझ्याच दातांसारिखा माझ्या मासांत कोणी दंश केला नाहीं. सरदारांनी हलक्या गोष्टींवरून माझा पाठलाग केला, परंतु माझ्याच पायांप्रमाणें माझ्यां पाठीस कोणी लागलें नाहीं. माझीं दुःखें मजवर वाढलीं, परंतु माझ्या क्लेशासारिखें कोणतें दुःख नाहीं. माझे मनोविकार फार झाले; परंतु त्या सर्वांपेक्षां माझे अपराध फारच वाढले. मी कोणाकडे आणि कशाविषयीं ओरडूं! माझे नाश करणारे मजपासूनच निघाले आहेत. तुझ्या दयेच्या आश्रयाखालीं आल्यावांचून मला कोठेंच चांगलें सांपडत नाहीं; यास्तव हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा, चकित झालेल्यांच्या मनावर तुझी विशेष दया होऊं दे.

אל מלך

या प्रार्थनेंत אל מלך सात वेळ म्हटला जातो; त्या प्रत्येकामागून या पुढील सात वाक्यांतून एक एक वाक्य म्हणतात.

אנא בכח (हे परमेश्वरा!) मी विनंती करितों कीं, तूं आपल्या उजव्या हाताच्या महत्वाच्या सामर्थ्यानें बंदिवानांस मोकळें कर.

हे गडरूप आश्रया! तूं आपल्या लोकांचें स्तवन मान्य कर; हे भयंकरा, आम्हांस शुद्ध कर.

हे बळवंता! तुझ्या एकत्वाचा शोध करणारांस आतां डोळ्यां-

च्या पुतळीप्रमाणें सांभाळ.

त्यांस आशीर्वाद देऊन शुद्ध कर; आणि नेहमी आपल्या यथार्थतेच्या दयेनें त्यांची फेड कर.

हे पराक्रमा व पवित्र (देवा,) आपल्या पुष्कळ चांगुलपणाकडून आपल्या समुदायास चालीव.

हे स्वतांच महत्ववान असणाऱ्या, तुझ्या पवित्रतेची आठवण करणाऱ्या लोकांस अनुकूळ हो.

हे गुप्त गोष्टी जाणणाऱ्या, आमची विनंती मान्य कर, आणि आमचें ओरडणें ऐक.

אין כאלהינו आमच्या देवासारिखा कोणी नाहीं; आमच्या प्रभूसारिखा कोणी नाहीं; आमच्या राजासारिखा कोणी नाहीं; आमच्या तारणाऱ्यासारिखा कोणी नाहीं. आमच्या देवासारिखा कोण! आमच्या प्रभूसारिखा कोण! आमच्या राजासारिखा कोण! आमच्या तारणाऱ्यासारिखा कोण! आह्मी आपल्या देवाला स्तवूं! आह्मी आपल्या प्रभूला स्तवूं! आह्मी आपल्या राजाला स्तवूं! आह्मी आपल्या तारणाऱ्याला स्तवूं! आमचा देव धन्य; आमचा प्रभु धन्य; आमचा राजा धन्य; आमचा तारणारा धन्य. तूंच आमचा देव; तूंच आमचा प्रभु; तूंच आमचा राजा; तूंच आमचा तारणारा! तूंच आमचें तारण करिशील; तूं उठून सियोनेवर दया करिशील, कारण तिजवर कृपा करण्याचा नेमिलेला वेळ आला आहे.

קדיש תתקבל भा. प. पृष्ठ. ५८.

תנא דבי אליהו येलियाहूच्या विद्यालयांतील विद्यार्थ्यांचें मत असें आहे कीं, जे कोणी प्रतिदिवशीं विधींचें मनन करितात, ते सर्व पुढील जगाचे पुत्र * होतात, असी आशा आहे. जसें ह्मटलें आहे कीं, त्याचे मार्ग सर्वकाळचे आहेत. हें वाक्य वाचितांना “ मार्ग ” असें वाचूं नको, परंतु “ विधि ” असें वाच.

אמר רבי אלעזר रिब्बी एलआजार व रिब्बी हानीना ह्मणतात कीं, ज्ञानीविद्यार्थी जगांत शांति वाढवितात; जसें ह्मटलें आहे

* पुढील जगाचें वतन पावणारे.

कीं, आणि तुझीं सर्व लेंकरें परमेश्वराने शिकविलेलीं होतील; आणि तुझ्या लेंकरांचें अत्यंत कुशल होईल. तें वाक्य "तुझीं लेंकरें" असें वाचूं नको, परंतु "तुझें बांधणारे" असें वाच; तुझ्या कोटामध्यें कल्याण, तुझ्या राजवाड्यांत सुख होईल. मी आपल्या भावासाठीं व आपल्या मित्रासाठीं बोलेन, "तुझ्यामध्यें कल्याणच असो. आमचा देव परमेश्वर याच्या मंदिरासाठीं मी तुझें बरें पाहीन. आपल्या लेंकरांच्या लेंकरांसुद्धां इस्राएलावर समाधानहि पाहशील. जे तुझ्या शास्त्रावर प्रीति करितील, त्यांचें फार कल्याण आहे, त्यांस कांहीं अडखळा नाहीं. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो; परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त अशीर्वाद देतो."

כל ישראל सर्व इस्राएलांस पुढील जगांत विभाग आहे; जसें ह्मटलें आहे कीं, तुझे सर्व लोक न्यायी होतील; आणि म्या गौरवलेलें व्हावें ह्मणून, जसें माझ्या हाताचें कर्म तसें ते सर्वकाळपर्यंत भूमीचें वतन भोगितील. रिब्बी यहुदा असें ह्मणतो कीं, जो कोणी शास्त्राचा अभ्यास करण्याकरितां श्रम करितो, आणि तेणेंकरून आपल्या उत्पन्न कर्त्याचा आत्मा संतुष्ट करितो, तो कीर्ति मिळवितो, आणि या जगांतून कीर्तिनेंच जातो. याजविषयीं शलोमो आपल्या बुद्धीनें असें ह्मणाला आहे, कीं कीर्ति उत्कृष्ट तेलापेक्षां, आणि एकाद्याच्या जन्मदिवसापेक्षां, त्याचा मरणदिवस चांगला आहे. शास्त्र पुष्कळ शिक; ह्मणजे तुला त्याचें वेतन पुष्कळ मिळेल. परंतु असें जाण कीं, पुण्यवंतांस वेतन पुढील जगांत मिळतें.

רבי חנניה आकशयाचा पुत्र रिब्बी हानानया असें ह्मणतो कीं, इस्राएलास पुण्यवंत करावें ह्मणून शास्त्र व आज्ञा वाढवाव्या अशी ईश्वरी इच्छा झाली. जसें ह्मटलें आहे कीं, त्याच्या न्यायाकरितां परमेश्वर संतोषित आहे; तो नेमशास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचा-

विलें, आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु ह्मणा.

על ישראל जे इस्राएल, आमचे गुरु, त्यांचे शिष्य व त्यांच्या शिष्यांचे शिष्य या गावीं व गांवोगावीं पवित्र शास्त्राचा अभ्यास करितात, त्यांजवर व आह्मावर आकाश व पृथ्वीच्या स्वामीपुढून दया, कृपा व अनुग्रह होवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

יהי שלמא आणि आकाशांतून आह्मास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत.) आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेनें आह्मास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עלינו לשבח भा. प. पृष्ठ. ६१.
על כן נקוה לך भा. प. पृष्ठ. ६२.

מנחה

प्रार्थनारूप नैवेद्य.

למנצח על הגתית गीत ८४

" וידבר " आणि परमेश्वरानें मोशाला असें सांगितलें कीं, तूं इस्राएलांच्या संतानास आज्ञा देऊन सांग कीं, माझीं अर्पणें, माझीं अन्नदानें हीं शांतिकारक सुवासासाठीं माझ्याजवळ यथाका-

ळीं करावयास तुह्मी सांभाळा. आणि तूं त्यांस सांग कीं, तुह्मी जे होमपशु नेहमी प्रतिदिवशीं परमेश्वराला अर्पावे, ते असे; पहिल्या वर्षांतील सांगोपांग दोन मेंढे, एक मेंढा सकाळीं तूं अर्पण कर, आणि एक मेंढा संध्याकाळीं अर्पण कर, आणि नैवेद्यासाठीं एकाचा एक दशमांश सपीठ, पावहीन * कुटून काढलेलें तेल यांत मळलेलें व्हावें. हा नित्य सिनाय डोंगरावर नेमलेला, परमेश्वराजवळ शांतिकार सुवासासाठीं अर्पण असा आहे. आणि त्याच्या संगतीं जें पेय अर्पण करावयाचें, तें एका मेंढ्यासंगतीं पावहीन द्राक्षरस; तें तूं पवित्र स्थानांत परमेश्वराजवळ ओतून पेय अर्पण कर; जसा सकाळचा नैवेद्य आणि त्याचें पेय तसें अर्पण कर; हें अर्पण परमेश्वराजवळ शांतिकारक सुवास आहे.

एथें פטום הקטורת सुगंधाचा प्रकार बोलण्याची चाल आहे.

אשרי יושבי ביתך जे तुझ्या घरांत राहतात ते, धन्य; ते नेहेमी तुझा उत्सव करितील, सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

ובא לציון גואל आण उद्धारणारा सियोनेस येईल, व याकोबांत जे अपराधापासून फिरतात, त्यांजकडे येईल असें परमेश्वर ह्मणतो. आणि परमेश्वर ह्मणतो, त्यांसीं माझा करार हाच आहे, जो माझा आत्मा तुझ्याठायीं आहे, व जे माझे शब्द म्या तुझ्या मुखांत घातले आहेत, ते तुझ्या मुखांतून, अथवा तुझ्या संतानाच्या मुखांतून, अथवा तुझ्या संतानाच्या संतानाच्या मुखांतून, आतांपासून सर्वकाळपर्यंत सरणार नाहींत, असें परमेश्वर ह्मणतो. तथापि तूं पवित्र इस्राएलाच्या स्तवनांमध्यें राहतोस आणि ते (दूत) एकमेकाला मोठ्याने बोलत ह्मणाले, पवित्र, पवित्र, पवित्र सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे. आणि त्यांनी एक प्रत्येकाचा शब्द मान्य करून ह्मणाले, उंच आकाश जें

* हीन हें एक माप आहे.

त्याच्या साक्षात्काराचें प्रतिष्ठित वसतिस्थान तेथें पवित्र; त्याच्या पराक्रमाचें कृत्य जी पृथ्वी, तिजमध्यें पवित्र; तो सदासर्वकाळ पवित्र आहे; तो सैन्याचा देव आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाच्या वैभवाने भरली आहे. * तेव्हां आत्म्याने मला उंचावलें आणि म्या आपल्या पाठीमागून मोठा गोंगाटाचा शब्द ऐकिला, तो असा कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. तेव्हां आत्म्याने मला उचललें आणि मी आपल्या मागें स्तुति करणारांचा मोठा सुसाव्याचा आवाज बोलतां ऐकिला कीं, ईश्वराचें गौरव त्याच्या महत्वाच्या मंदिराच्या स्थानांतून सुवंदित असो. * परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. परमेश्वराचें राज्य सर्वकाळ स्थापित आहे * हे परमेश्वरा, आमच्या वडिलांच्या, आब्राहामाच्या, इसहाकाच्या व इस्राएलाच्या देवा, तूं आपल्या लोकांच्या अंतःकरणाच्या कल्पनांतल्या विचारांत असें सर्वकाळ राख आणि त्यांचें अंतःकरण आपल्यासाठीं स्थिर कर. तथापि तो, ममताळु होता; यास्तव त्याने अन्यायाची क्षमा केली, नाश केला नाहीं; त्याने बहुत वेळ आपला राग टाकिला, आणि आपला सर्व संताप चेतविला नाहीं. कां तर, हे प्रभु, तूं चांगला व क्षमाशील आणि जे तुला हाक मारितात, त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. तुझी नीति सर्वकाळ नीतिच; आणि तुझें शास्त्र सत्य आहे. तूं याकोबासाठीं खरेंपण आणि आब्राहामासाठीं करुणा साधिसील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजांपाशीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहिलीस ती प्रभुची स्तुति असो, दिवसोदिवस तो आह्मास उपकार लादून देतो, तो आमचा तारणाराचा देव आहे. सेलाह. सैन्यांचा परमेश्वर आमच्या संगतीं आहे; याकोबाचा देव आह्मास आश्रय आहे. हे सैन्याच्या परमेश्वरा, जो मनुष्य तुजवर आशा ठेवितो, तो धन्य. हे परमेश्वरा, तारण कर; आह्मी हाक मारितों, त्या दिवशीं राजाने आह्मास उत्तर द्यावें.

---

* हीं तीन वाक्यें योनाथान बेन उज्जीएल याने यशाया. ६. ३ येहेजकेल ३. १२ आणि निर्गम. १५. १८ या वाक्यांवर केलेलें तारगूम भाषेतलि भाषांतर आहे.

ברוך אלהינו हे आमच्या देवा, ज्याने आह्मास आपल्या महत्वाकरितां उत्पन्न करून आह्मास अनिष्ठांपासून निराळें केलें, आणि आह्मास सत्यशास्त्र देऊन आह्मामध्यें सर्वकाळच्या जीवनाची लागवड केली; तूं धन्य आहेस. तोच आपल्या शास्त्राकडे आमचीं मनें उघडील (लावील;) आणि आह्मी त्याची इच्छा पूर्ण करून त्याची सेवा पूर्ण मनाने करावी परंतु व्यर्थ कष्ट करूं नयेत व गोंधळ उत्पन्न करूं नये; ह्मणून तोच आमच्या मनांत आपलीं प्रीति व आपलें भय घालील. हे परमेश्वरा ! आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी या जगीं तुझे नेम पाळून पुढील जगाच्या आयुष्यासाठीं पुण्याई करून त्यांतील जीवनास व वतनास योग्य व्हावें असी तुझी प्रसन्नता होवो. यासाठीं कीं, माझ्या गौरवाने तुझें कीर्त्तन करावें. आणि उगेंच राहूं नये; हे परमेश्वरा माझ्या देवा, मी सर्वकाळ तुझी स्तुति करीत जाईन. त्याच्या न्यायाकरितां परमेश्वर संतोषित आहे तो नेमशास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील. आणि जे तुझें नाम जाणतात ते तुजवर आशा ठेवितील; कारण कीं हे परमेश्वरा, जे तुला शोधितात, त्यांस तूं सोडीत नाहींस. हे परमेश्वरा, आमच्या प्रभू, तुझें नाम सर्व पृथ्वींत किती महान ! अहो परमेश्वराचे वाट पाहणारे, तुह्मी सर्व धीर धरा, ह्मणजे तो तुमचें हृदय सबळ करील.

קדיש לעלא

शास्त्र काढल्यापूर्वीं हें बोलतात.

אל ארך אפים हे सहनशील आणि मोठ्या दयेच्या व सत्यतेच्या देवा, तूं आपल्या रागाने आह्मास धमकावूं नको; तूं आपले लोक इस्राएल यांजवर कृपा कर आणि आह्मास सर्व वाईटापासून तार; आह्मी तर तुजविरुद्ध पाप केलें आहे; हे प्रभू देवा, आह्मी विनंती करितों कीं, तूं आपल्या मोठ्या दयेप्रमाणें आह्मास क्षमा कर.

אל ארך אפים हे सहनशील देवा आणि दयासागरा, तूं आह्मापासून आपलें तोंड लपवूं नको; तूं आपले लोक इस्रा-

एल यांच्या शेषावर कृपा कर आणि आह्मास सर्व वाईटापासून सोडी-व. आह्मी तर तुजविरुद्ध पाप केलें आहे. हे प्रभु देवा, आम्ही विनंती करितों कीं, तूं आपल्या मोठ्या दयेप्रमाणें आम्हास क्षमा कर.

शास्त्र काढितांना भा. प. पृ. १०३ एथें लिहिल्याप्रमाणें बोलतात. नंतर शास्त्र काढून त्यांतील लेवी पुस्तकाचा १८ वा अध्याय वाचायास तीन मनुष्यें बोलवितात. त्यानंतर קדיש לעילא बोलून हाफातारा योनाचे पुस्तकांत पहिल्यापासून शेवट-पर्यंत वाचतात. आणि पाहांटेच्या प्रार्थनेंत हाफताऱ्या पूर्वीं व मागें जो धन्य वाद आहे तोच वाचितात.

यानंतर शास्त्र ठेवायास नेतांवेळीं भा. प. पृ. ११० एथें लिहि-ल्याप्रमाणें बोलतात.

शास्त्र ठेविल्यानंतर קדיש לעילא बोलून हळू व एकचि-त्तानें वाचायाचा אדני שפתי संध्याकाळच्या प्रार्थनेंत लिहिल्या-प्रमाणें वाचावा. पुनः मोठ्याने वाचितांना जसें पाहांटेच्या प्रार्थनेंत त्याप्रमाणें वाचावें, परंतु त्यांतील ईश्वरी पवित्रतेच्या वर्णनामध्यें व पापा-विषयीं कबूल होण्यामध्यें मात्र भेद आहे तो येणेंप्रमाणें.

ईश्वरी पवित्रतेचें वर्णन.

ובכן נקדישך מלך आणि हे राजा, याप्रमाणें आह्मी तुला पवित्र मानितों. दो. वे.

בני עליון परात्पराचे पुत्र * उंच आकाशांत आणि शुद्ध लोक ज्योति उगवितांना अनंताला पवित्र मानायास त्वरा करून जातात; आणि चकित मनाने व मोठ्याने गायन करून इस्राएलाच्या देवा-ला थोर मानितात.

परात्पराचे पुत्र ज्यांचा बांधा चमत्कारिक व शरीर चंद्रासारिखें आहे; त्यांस पन्नग, विचित्रक आणि नील यांचें तेज दिल्हें आहे; ते टांकीच्या किंवा नदीच्या पाण्याने नव्हे परंतु अग्नीने स्नान करितात, तर त्याच्या प्रकाशाची तुळणा व बरोबरी कोणत्या प्रका-शासीं होईल; कारण स्त्रीपासून जन्मलेल्या मनुष्याच्या तत्वासारखें

† दूत.

त्यांचें तत्व नाहीं; त्यांचें तत्व पारदर्शक आकाशासारिखें आहे.

प्रिय आणि थोर पूर्वजांपासून * निघालेले शुद्ध लोक आपल्या धोक्याच्या घरांतही † शुद्धपणें वास करितात; निर्दोष मनाने व स्वच्छ शरीराने देव दुतांसारिखे व्हवयास त्वरा करून (त्याकडे) धांवत जातात. आणि निरनिराळ्या प्रदेशांत प्रार्थना करण्यास पाहांटेस उठतात; आणि आगस्त्य नक्षत्रांसारख्या तेजस्वी आत्म्यानें आपलीं वस्त्रें धुवून शुद्ध होतात.

'परात्पराचे पुत्र, ज्यांचें स्वरूप मनुष्यासारिखें नसून लावण्य आहे, आणि ज्यांची प्रतिमा संतांच्या मनांतील विचारांसमोरच असते, त्यांचा आकार चमकत्या उजेडासारिखा आणि अग्नीच्या ज्वालेसारिखा आहे, आणि विजेच्या बाणासारिखीं वस्त्रें पांघरितात; ते भूक व ताहान व दुसऱ्या सर्व मानवी कामनांपासून मोकळे आहेत; पाय व मांडी यांनी पाऊल टाकल्यावांचून ते तुजकडे धांव घेतात आणि आपआपल्या ठिकाणीं तुला पवित्र गायन गातात कारण ते अति पवित्र आहेत.

आणि शुद्ध लोक निर्मल शरीराने तुझ्या मंदिराच्या पवित्र ठिकाणीं एकत्र होण्यास धांव घेत येऊन, तुजपुढें जी नवी स्तुति ते करितात ती तुला अति पवित्र अर्पणासारिखी मान्य व्हावी; म्हणून ते उत्कंठतेने तुझी प्रसन्नता मागतात; आणि मनुष्याच्या वांच्छेपासून दूर राहून मोशेने दिल्हेला नियम ज्यांत "तुम्ही पवित्र व्हावें म्हणून तुम्ही शुद्ध व्हा" असें लिहिलें आहे त्याप्रमाणें ते आज आपणास शुद्ध करितात.

परात्पराचे पुत्र, जेथें रात्र नाहीं व वेळ मोजला जात नाहीं, तेथें ईश्वराचें स्तवन करायास व त्याच्या आश्चर्य कृत्यांविषयीं गावयास, त्यास थोर मानायास व उत्सुकतेने त्याचें भजन करायास धांवतात; आणि शुद्ध लोक तुझी भयंकर स्तुति करायास नेमिलेल्या मंडळीमध्यें उभे राहून प्रार्थना करितात; आणि ज्यास

* ई. उगमापासून.
† प्रवासांतहि.

स्तवन शोभतें त्यासच मात्र "पवित्र, पवित्र, पवित्र सैन्याचा परमेश्वर" असें गौरवून गायन करितात.

रिब्बी इसहाक बेन इस्राएल यानें रचिलेलें ईश्वरी पवित्रतेचें वर्णन.

ובכן ולך תעלה आणि याप्रमाणें तुझी पवित्रता वर्णिली जाईल; कारण तूं आमचा देव आहेस. दो. वे.

אנשי חסד यथार्थ मनुष्यें आपली वाणी उंचावून परमेश्वराला गौरवितात. ते सर्व एकदाच स्तुति करून असें ह्मणतात कीं, गौरवामध्यें एवढी तुझी बरोबरी कोण करील ? त्याचा हात त्यांच्या समुदायांवर गौरवेंकरून लोहस्तंभासारिखा आणि त्यांभोंवतें अग्नीच्या कोटासारिखा आहे. त्यांचा पापरूप विकार तो बरा करो, आणि त्यांच्या कर्मास तो प्रसन्न होवो, आणि भक्त गौरव करून उल्हास करोत. इशायाचें मूळ* त्या लोकांकरितां सर्वकाळ ध्वजासारिखा उभा असो, परमेश्वराचा कोंब* सुंदर व गौरवी होवो. मग ते लोक असें ह्मणतील कीं, त्यांच्या कष्टांच्या वेतनाकरितां हें सर्व गौरव त्यांस प्राप्त झालें आहे. त्यांची वाणी (प्रार्थना) तो मान्य करून संपत्ति, महत्व आणि धारिष्ट त्यांस वतनरूप करून देवो. त्यांचा निर्मिता त्यांच्या मुखदर्शनास प्रसन्न झाला आहे, असें त्याच्या चांगुलपणाकडून शुभवर्तमान कळून येवो, मग त्याच्या पुरातन लोकांपुढें गौरव होईल. त्याचें आसन वाहणारे ह्मणतील कीं, अहो ! सर्वकाळचे दरवाजे हो! तुह्मी उंच व्हा; कारण गौरवी राजा आंत येत आहे. त्या गौरवी राजापूर्वी कोणी उत्पन्न करणारा देव नव्हता, त्या देवानें आपल्या लोकांकरितां आपलें पवित्र वचन पाठविलें आहे. त्यांनीं देवदुताप्रमाणें त्यास थोर मानावा, आणि त्यांनीं याकोबाचा पवित्र आणि इस्राएलाचा देव यास पवित्र मानावें, असें त्यांस सांगितलें आहे.

पापाविषयीं कबूल होणें.

רבונו של עולם हे जगदीशा, प्रार्थनारूप नैवेद्य करायाचे वेळेस असें होतें कीं, जेव्हां मी आपलीं पापें, उल्लंघनें, आणि

* यशाया अ. ११ ओ. १ एथें हीं नांवें माशीयाहास दिल्हीं आहेत.

ऋणें मनीं आणितों; तेव्हां मला भय आणि कंप सुटतो. देव जेव्हां न्याय करायास उठतो, तेव्हां मी चकित होऊन बसतों, माझे विचार विस्मित होतात, आणि माझ्या कल्पना गर्जूं व भिऊं लागतात. जेव्हां तो न्यायासनावर बसेल, तेव्हां त्यास कोण भिणार नाहीं! जेव्हां तो न्याय करायास जवळ येईल, तेव्हां मी त्यास काय उत्तर देऊं! देव उठेल तेव्हां मी काय करूं! आणि तो झडती घेऊं लागला ह्मणजे मी त्याला काय उत्तर करूं! जसा मुका आपलें तोंड उघडीत नाहीं तसा मी झालों; माझ्या फार अपराधांमुळें मी भ्यालों; मला लज्जा प्राप्त झाली आणि मी घाबरलों. परंतु असी जी लज्जा तिला हाय हाय! आणि असें जें घाबरणें त्याला हाय हाय! वर (आकाशांत) राहणाऱ्या (देवास) भूमीवरील माती काय उत्तर देईल? जर मी यथार्थ होऊं पाहतों, तर माझेंच तोंड मला दोषी ठरवितें; आणि जर माझे अपराध मला चिकटून राहतात, तर मी काय बोलूं? व आपणास यथार्थ कसें मानूं? मी आपणाकरितां एकादा चांगला मध्यस्थ इच्छितों, आणि आपले मनीं त्याची आवड धरितों; परंतु शोधाअंतीं तो सांपडत नाहीं. ईश्वर कदाचित मला अंगीकारील ह्मणून, त्यापुढें अर्ज करायास म्यां आपल्या मस्तकास, कपाळास आणि तोंडास बोलाविलें. तेव्हां मस्तकानें उत्तर केलें कीं, मस्तक कसें उंच होईल? त्यास तर हलक्या मस्कऱ्या करण्याची* सवय आहे; आणि सर्वांवरील जो अधिकारी त्यास अनुसरण्यापासून फिरण्यासाठीं, तें असें ह्मणालें आहे कीं, या, आपण आपणासाठीं पुढारी करूं. तोंड जें त्यासमोर घाबरूनच गेलें, त्यानें उत्तर केलें कीं, हें त्याच्या धन्यास कसें मान्य होईल? त्यापुढें दुष्ट मनुष्यास धैर्य आहे काय! माझ्या कपाळानें मला प्रत्युत्तर केलें कीं, स्त्रीपासून जन्मलेला शुद्ध कसा होईल! तुझीं पापें हृदयाच्या पाटीवर कोरलेलीं आहेत, आणि तुझें कपाळ निर्लज्ज † आहे. मग मी आपले मुखास, ओंठांस आणि जिभेस आकाशांत वस्ति करणारा खडकरूप आश्रय जो परमेश्वर, तो कदा-

* इ. मस्तक हलकें करण्याची. † इ. तांब्याचें.

चित माझे दु:खांत मजकडे पाहील, म्हणून त्याची प्रार्थना करायास मी त्यांस सांगितलें. तेव्हां माझ्या मुखानें मला उत्तर केलें कीं, अशुद्ध भाषणें करणाऱ्या मुखास आभाळांत राहणाऱ्यासमोर एकादा शब्द काढण्याची तरी आशा आहे काय ? ओंठांनी अडखळत जाब केला कीं, यथार्थ बोलणाऱ्यापुढें फुसलावणारे ओंठ कसे बोलूं शकतील? आणि जिभेनें मला प्रत्युत्तर केलें कीं, स्तुतीनें भयंकर जो देव, त्यासमोर प्रार्थना करायास गर्विष्ठ गोष्टी करणारी जीभ कशी मान्य होईल ? मग माझें गौरव व माझें मस्तक उंच करणाऱ्या (प्रभु) समोर प्रार्थना व काकुळती करायास मी आपले हृदयास व जीवास सांगितलें. तेव्हां माझ्या हृदयानें उत्तर केलें कीं, चिखलांत गढलेलें, आणि झोपेंतही अपराधाविषयीं विचार करणारें मन कसें प्रार्थना करूं शकेल ? आणि दुष्ट संकल्प योजणारें हृदय एकचित्तानें कसें काकुळती करूं शकेल? आणि माझ्या जीवानें जाब दिल्हा कीं, ज्या जीवानें अपराध केले, तो उंचनीचावरील पदार्थांस उत्पन्न करणाऱ्यापुढें कशी विनंती करील ? मग मी आपले हातांस (देवापुढें) पसरलें जाण्यास विचारलें; त्यांनी उत्तर केलें कीं, हात शुद्ध असल्यावांचून ते आकाशाकडे कसे पसरले जातील ? नंतर ईश्वराचे घरीं शोक करायास जाण्यासाठीं मी आपले पायांस विनंती केली. तेव्हां त्यानी मला उत्तर केलें कीं, दुष्कर्माकडे त्वरित धावणारे पाय, जो दुष्टाईची आवड धरीत नाहीं, त्याचे घरीं कसे जातील ? मला हाय हाय ! म्या कल्पिलें होतें कीं माझे अवयव मला धैर्य देतील, परंतु पापामुळें ते अडखळतात, ह्मणून मला लज्जा प्राप्त होते. म्या आपले प्रियास बोलाविलें, परंतु त्यानें मला फसविलें; तेव्हां प्रभूच्या प्रभूसमोर मजकारितां विनंती व काकळूत करितील, ह्मणून मी वरल्या व खालच्या पदार्थांस बोलावलें. मी ओरडलों, तरी मला कोणी आधार देणारा किंवा सहाय्यकारी सांपडला नाहीं; मी शोक केला, तरी कोणी धैर्य देणारा नाहीं व आश्रय देणाराहि पाहिला नाहीं. कोणी सहाय्य करणारा नाहीं असें म्या

पाहिलें, आणि कोणी उद्धारणारा नाहीं ह्मणून मला आश्चर्य वाटलें. तेव्हां मी आपल्या मनीं विचार केला कीं जर मीच आपणासाठीं नाहीं, तर मजसाठीं कोण? तर आतां, प्रभु परमेश्वर माझें सहाय्य करील, ह्मणून मी आपलीं उल्लंघनें व दुष्कर्में यांविषयीं कबूल होतों. माझे प्रत्येक अवयव स्वतःच्या अपराधामुळें भिऊन चकित होतात; आणि आपल्या पापाविषयीं दुःखभरित वाणीनें कबूल होऊन एक प्रत्येकास हाक मारून ह्मणतात.

पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना यांतील जे भाग वाचावयाचे त्यांपूर्वीं हें बोलावें.

יה שמע אביוניך हे अनंता, तुझ्या मुखदर्शनाची वाट पाहणाऱ्या दरिद्र्यांचें ऐक; हे आमच्या बापा! तूं आपले लेंकरांपासून आपला कान लपवूं नको.

יה עם ממעמקים हे अनंता! जे लोक अत्यंत दुःखामुळें खोल स्थानांतून ओरडतात, त्यांस आज तूं आपणापुढून रिकामें परतवूं नको.

הזדם ועונם त्यांची दुष्टाई, त्यांचीं पापें आणि त्यांचा अतिशय गर्व तूं पुसून टाक; आणि हे माझ्या खडकरूप आश्रया! जर तूं त्यांकरितां तसें करीत नाहींस, तर तूं आपणाकरितां तसें कर.

ומחה היום חובם त्यांचीं ऋणें आज पुसून टाक, आणि त्यांच्या (तोंडच्या) वचनास (तुजपुढे आणलेल्या) भेटीप्रमाणें प्रसन्न हो; त्यांचीं मनें तूं आपणाकडे वळीव आणि (त्यांकडे) आपला कानहि लाव.

דמעת פניהם תשעה त्यांच्या तोंडावरील अश्रु तूं पूस; आणि बहकलेलीं मेंढरें एकवट करून तूं आपणाकरितां मेंढपाळ * उठीव; आणि चांगुलपणानें आपल्या शेरडांस दर्शन दे.

הולכי בדרך נכוחה सरळ मार्गानें चालणारांस तूं क्षमेचें शुभवर्तमान ऐकीव; आणि ही नैवेद्यरूपी प्रार्थना करितांना त्यांस तुझी कृपा सांपडूं दे.

* मशीयाह.

एथें पा. क्ष. प्रा. यांतील जो भाग वाचायाचा तो संध्याकाळच्या प्रार्थनेंत जसा आहे, त्याचप्रमाणें आहे, परंतु לקדושת שמך यापूर्वीं एक वेळ אל מלך अधिक आहे. आणि शेवटचा אל מלך बोलण्याबद्दल कोणी हें बोलतात.

אל ארך אפים तूं मंदक्रोधी देव आणि दयेचा स्वामी आहेस. तूं आपल्या दयेचा व कृपेचा मोठेपणा, पूर्वीं नम्र (जो मोशे) यास कळविलास; आणि तुझ्या शास्त्रांतहि तसेंच लिहिलें आहे कीं, तेव्हां परमेश्वर मेघांत उतरला, आणि तेथें त्याजवळ उभा राहिला आणि त्याने परमेश्वराचें नाम मोठ्यानें सांगितलें.

ויעבור יי

סלח לנו אבינו हे आमच्या बापा, आह्मी पाप केलें आहे; ह्मणून आह्मास क्षमा कर; हे आमच्या राजा, आह्मी उल्लंघनें केलीं, ह्मणून आह्मास माफ कर. कां तर हे प्रभू! तूं चांगला, क्षमाशील आणि जे तुला हाक मारितात त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. तूं आपल्या प्रसन्नतेने सियोनेचें बरें कर; यरूशलेमेचीं गांवकुसें बांध. तेव्हां नीतीचे यज्ञ, होम व सर्वांग होम तुला आवडतील, तेव्हां तुझ्या वेदीवर खोंडाचे होम करितील.

קדיש תתקבל भा. प. पृष्ठ ९८.
עלינו לשבח भा. प. पृष्ठ ६१.
על כן נקוה לך भा. प. पृष्ठ ६२.

נעילה

दरबार बंद होण्याच्या वेळची प्रार्थना.

हें पुढील गीत सूर्य मावळल्याअगोदर बोलावें आणि तें तारे निघाल्याअगोदर पुरें झालें पाहिजे. कोणी कोणी हें गीत ह्या प्रार्थनेच्या आरंभीं न बोलतां, त्यामधील पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थनेपूर्वीं वाचितात.

אל נורא עלילה हे भयंकर कृत्यें करणाऱ्या देवा! आह्मास या नेईलाचे वेळीं* क्षमा सांपडूं दे.

מתי מספר קרואים ज्यांस अल्प संख्येचे लोक असें नांव पडलें आहे; ते या नेईलाचे वेळीं दुःखानें पोळले असतांहि, आपले डोळे तुजकडे लावितात. אל

שופכים לך נפשם ते आपला जीव तुजपुढें ओतितात, ह्मणून तूं त्यांचीं उलंघनें व त्यांचे डागे पुसून टाक, आणि या नेईलाचे वेळीं त्यांस क्षमा सांपडूं दे. אל

היה להם לסתרה (तूं) त्यांस आश्रय होऊन शापापासून त्यांस सोडीव, आणि या नेईलाचे वेळीं त्यांस मोठेपणा व हर्ष प्राप्त व्हावा असी तूं मोहोर कर. אל

חון אותם ורחם त्यांजवर दया व कृपा कर; आणि जे कोणी त्यांवर जुलूम करून त्यांसीं लढतात, त्यांचा या नेईलाचे वेळीं तूं न्याय कर. אל

זכור צדקת אביהם त्यांच्या पूर्वजांच्या पुण्याची आठवण कर; आणि या नेईलाचे वेळीं, त्यांचे दिवस पूर्वीप्रमाणें नवे कर. אל

קרא נא שנת רצון मी विनंती करितों कीं, या नेईलाचे वेळीं तूं प्रसन्नतेचें वर्ष गाजीव, आणि आहोलीबा व आहोला † यांच्या उरलेले शेरडांस परतीव. אל

(מחה כעב פשעים तुझी संपत्ति असें ह्मटलेल्या लोकांचीं उलंघनें या नेईलाचे वेळीं ढगाप्रमाणें पुसून टाक, आणि त्यांजवर दया कर.)

תזכו לשנים רבות अहो बाप लेंकांनो! पुष्कळ वर्षें हर्षानें व आनंदानें वांचण्याची पुण्याई या नेईलाचे वेळीं तुमच्या अंगीं येवो. אל

מיכאל שר ישראל हे इस्राएलाच्या सरदारा, मीखाएला, हे येलीया व गाब्रीएला! या नेईलाचे वेळीं उद्धाराचें शुभवर्तमान तुह्मी गाजवा. אל

---

* दरबार बंद होण्याच्या वेळीं. † येरूशालेम व शोमरोन.

" יהי חסדך " हे परमेश्वरा ! जसी आह्मी तुजवर आशा ठेविली आहे, तसी तुझी दया आह्मांवर होवो. जे तुझ्या घरांत राहतात ते धन्य; ते नेहेमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

קדיש לעילא

यानंतर हळू व एकचित्ताने वाचायाचा אדני שפתי संध्याकाळच्या प्रार्थनेंतल्यासारिखाच आहे, परंतु त्यांत जेथें "आह्मास लिही" असे शब्द असतील, त्यांबद्दल "आह्मा-विषयीं मोहोर कर" असें वाचावें. आणि पृष्ठ २१ एथील. מה נאמר बद्दल हें पुढील बोलावें.

מה נאמר हे उंचस्थानीं राहाणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय ह्मणूं! आणि हे आकाशांत वस्ति करणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय कळवूं! तूं गुप्त व उघड गोष्टी जाणत नाहींस काय ?

מה אנו आम्ही काय ? आमचें जिणें काय ? आमचें यथार्थपण काय? आमचें सामर्थ्य काय ? आमचें बळ काय ? आणि हे परमेश्वरा आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी तुजपुढें काय ह्मणूं ? पराक्रमी (मनुष्यें) तुजपुढें कांहींच नाहींत, नामांकित मनुष्यें जसीं नव्हतींच; ज्ञानी मनुष्यें जसीं बुद्धिहीन; आणि चतुर जसे विवेकहीन असे नाहींत कीं काय ? कारण आमचीं कर्मे बहुतकरून शून्यच आहेत; आयुष्याचे दिवस तुजपुढें व्यर्थ आहेत. आणि मनुष्य पशूपेक्षां श्रेष्ठ नाहीं; कारण सर्व व्यर्थता आहे.

אתה הבדלת त्वां मनुष्यास पूर्वींपासून निराळाच करून ठेविला आहे; आणि त्याने तुजपुढें उभें राहावें ह्मणून त्यावर तूं कृपा केलीस; कारण तूं काय करितोस असें तुला कोण ह्मणेल ? आणि जरि तो यथार्थ झाला; तरि तो तुला काय देऊं शकेल ? आणि आह्मास क्षमा, माफी आणि सुटका व्हावी, आणि आमचीं सर्व पापें क्षमा व्हावीं, आम्ही आपले हात दग्यापासून आवरून धरून पूर्ण मनाने तुझ्या इच्छेचे नेम

पूर्ण करण्यास पश्चात्ताप करावा ह्मणून हा (शा. अ. शाब्बाथ दिवस व हा) प्रायश्चित्ताचा दिवस, हा पापाची क्षमा होण्याचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा दिवस त्वां आह्मास दिल्हा आहे. तर तूं आपल्या अत्यंत दयेने आह्मावर दया कर; कारण जगाच्या नाशाची तुला आवड नाहीं. जसें ह्मटलें आहे कीं, " परमेश्वर सांपडेल त्या काळीं त्याला शोधा; तो जवळ असतां त्यास हाक मारा. दुष्ट आपल्या मार्गास व अन्यायी मनुष्य आपल्या संकल्पास सोडो, आणि परमेश्वराकडे फिरो ह्मणजे तो त्याजवर दया करील; आणि आमच्या देवाकडे फिरा, कां कीं, तो फार क्षमा करील." आणि तूं क्षमा करणारा, कृपाळू, दयाळू, मंदक्रोध, बहुप्रसाद आणि पुष्कळ चांगलें करणारा देव आहेस. दुष्टांनीं पश्चात्ताप करावा, असें तूं इच्छितोस; आणि त्यांच्या मरणाची तूं आवड धरीत नाहींस. जसें ह्मटलें आहे कीं " प्रभु परमेश्वर ह्मणतो, त्यांस सांगा कीं, मी आपल्या जीवाची शपथ वाहतों, कीं निश्चयें मी दुष्टाच्या मरणाविषयीं संतोषत नाहीं. परंतु जर दुष्ट आपल्या मार्गापासून फिरला, आणि वांचला, तर संतोषतों; अहो इस्राएलाच्या वंशानों, तुह्मी फिरा, आपल्या कुमार्गापासून फिरा, तुह्मी कां मरतां. प्रभु परमेश्वर ह्मणतो, दुष्टाच्या मरणाविषयीं मी कांहीं संतोषतों कीं काय ? त्यानें आपले मार्ग सोडून वांचावें, याविषयीं मी संतोषतों कीं नाहीं; कां कीं जो मरतो त्याच्या मरणाविषयीं मी संतोषत नाहीं; ह्मणून तुह्मी आपणाला फिरवा आणि वांचा, असें प्रभु परमेश्वर म्हणतो." कारण कीं, इस्राएलांस क्षमा करणारा आणि येशूरूनाचे वंशास माफ करणारा तूंच आहेस. आह्मास माफी करणारा व क्षमा करणारा तुजवांचून कोणी नाहीं.

मोठ्याने אדני שפתי אתאנו לחלות वाचितांना पहिल्याने पृष्ठ ६, אתאנו לבקש पृष्ठ ६ आणि אוחילה לאל पृष्ठ ७ हे भाग वाचावे; त्यापुढें ईश्वरी पवित्रतेच्या वर्णनांत व पापाविषयीं कबूल होण्यांत मात्र भेद आहे.

नेईलांतील ईश्वरी पवित्रतेचें वर्णन.

ובכן נקדישך आणि हे राजा, याप्रमाणें आह्मी तुझी पवित्रता गाजीवतों. दो. वे.

אראלים והשמלים आरआलिम आणि हाशमालिम दूत ज्यास थोर मानितात आणि स्तवितात, तो देवांचा देव कोठें आहे, असें ते एकप्रत्येकास विचारितात. वे'लोन * आकाशांतील दूत त्याचा मोठेपणा वाखाणितात; कांपून आणि थरथरून त्याची स्तुति गाजवितात; त्याजवळ सेराफीम उभे आहेत. राकीया* आकाशांतील सैन्यें एकदांच त्याची पवित्रता जागवितात; आणि भयानें व धास्तीने त्याची स्तुति गातात; त्यांतील प्रत्येकास साहा साहा पंख आहेत. शेहाकीम * आकाशांतील समुदाय त्याचें स्तवन प्रगट करितात; आणि त्याचें गौरव करायास ते त्याचे वस्तिस्थानांत उभे आहेत; दोन पंखानें ते आपलीं तोंडें झांकितात. झेबूल * आकाशांतील चमकते दूत त्याचें स्तवन करून त्याची पूर्णता गावयास त्वरा करितात; दो (पंखांनीं) ते आपले पाय झांकितात. माओन * आकाशांतील राजकुमार दूत त्याच्या आश्रयाखालीं निवारा घेतात, आणि एकच जो देव तो त्यावर पाखर घालितो; ते दोन (पंखानें) उडतात. माखोन * आकाशांतील टोळ्या पाहारे बदलून वक्तृत्वाने स्तवन करायास एकवट होऊन एक प्रत्येकास हाक मारून ह्मणतात. आराबोथ * आकाशांतील दूतांचीं भयंकर सैन्यें सुंदर स्तुतीने कीर्त्तन करायास उभे राहून पवित्र, पवित्र, पवित्र सैन्यांचा परमेश्वर असें ह्मणतात. ते त्यापुढें त्याचे सेवक इस्राएल याकरितां विनवणी करितात; कीं त्याने आपले दासांस प्रसन्न होऊन त्याची सेवा मान्य करावी; कारण त्याच्या गौरवाने सर्व पृथ्वी भरली.

ובכן ולך תעלה आणि याप्रमाणें तुझी पवित्रता वर्णिली जाईल; कारण तूं आमचा देव आहेस. दो. वे.

אמת בספרך त्वां आपल्या पुस्तकाप्रमाणें † आपलें जग उत्पन्न केलें; त्यांत (आपल्या लोकांविषयीं) लिहून आपल्या मोहोरेने मोहोर कर. तुझे शेष, जे तुझ्या सभामंडपाकडे लक्ष लावितात, आणि आज आपल्या पांच प्रार्थनांकडून तुला थोर मानितात,

---

* हीं सप्ताकाशांचीं नावें आहेत. † गीत. १३९. १६.

त्यांस प्रसन्न हो. ते तुझ्या तारणाची आणि सांत्वनाच्या नेमिलेल्या वेळाची वाट पाहतात; हे परमेश्वरा! ते तुझ्या कृपेची आशा धरितात, कारण तुजपाशीं क्षमा आहे. हे पवित्र (देवा!) तुझ्या नामाच्या दासांप्रमाणें जेव्हां ते तुझी पवित्रता गाजवितात, तेव्हां तूं त्यांचें ओरडणें अति उंच आकाशांत चढूं दे.

כתר יתנו पृष्ठ ९.

रिब्बी इसहाक बेन इस्राएल याने रचिलेली पापाविषयीं कबूल होण्याची रीति.

רבון העולמים हे जगतांच्या स्वामी, आह्माविषयीं जीवनांत मोहोर कर; आणि हे अदृश्य देवा, आह्मास जीवन व शांति दे. हे जीवंत देवा आणि पृथ्वीच्या राजा, तूं आपल्या कराराच्या लेंकरांविषयीं जीवनांत मोहोर कर. शुद्ध व अनुग्रहीत लोकांबरोबर जीवनाच्या पुस्तकांत आमची आठवण करून मोहोर कर; आणि आह्मा सर्वांकरितां जीवन लिही. हे महान व गौरवयुक्त देवा, तुझ्यां जवळ जीवनाचा उगम आहे; तुझ्या प्रकाशाने आमच्या दृष्टीस प्रकाश असतो, ह्मणून आज तूं आह्माविषयीं चांगल्या जीवनांत मोहोर कर. मग आकाशांत वस्ति करणाऱ्याच्या मंदिराचीं द्वारें बंद होण्याच्या समयीं, इस्राएलाचे अन्याय शोधण्यांत येतील, परंतु कांहीं नसेल, आणि येहुदाचीं पातकेंही, परंतु तीं कांहींच सांपडणार नाहींत. आणि आकाशाचीं द्वारें बंद होण्याच्या समयीं तूं त्यांच्या अपराधांची क्षमा कर; आणि त्यांचीं सर्व पापें तूं समुद्राच्या खोलवटींत टाक. तुझें (न्यायाचें दरबार) बंद होतांना जेव्हां आह्मी कबूल होतों, तेव्हां तूं आह्मास जीवनाचा मार्ग (कळीव;) तुझ्या समोर संतोषाचें पूर्णपण होऊं दे. आणि आह्मी तुजपुढें कबूल होतों, ह्मणून यावेळीं तूं आपलें मन फिरीव; मग जे कोणी कबूल होऊन आपलीं दुष्कर्में सोडितात ते दया पावतील.

एथें מה נאמר לפניך हा जो भाग वाचायाचा तो पृष्ठ. ६२ एथें लिहिल्याप्रमाणें वाचावा. आणि दरबार बंद होण्याच्या वेळेच्या प्रार्थनेच्या आरंभीं, אל נורא हा जो भाग लिहिला आहे, तो कोणी आरंभीं वाचितात आणि कोणी पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना करण्याच्या पूर्वीं वाचितात. त्यामागून हीं पुढील वाक्येंहि बोलतात.

המבדיל בין קודש पवित्राच्या व अपवित्राच्या मध्यें भेद राखणारा आमचे अपराध क्षमा करील. आमची संतति रेतीसारखी वाढवील.

זרעינו आमची संतति रेतीसारिखी वाढवील.

יצו יי חסדו त्याचा सेवक याकोब याच्या संततीवर दया होण्याविषयींची तो आज्ञा करील. आणि यहुदा ज्यास त्याने आपला विभाग असें मानिलें आहे, त्यास तो आपलें वतन धन असें करील.

צדק ושלום נשקו नीति व शांति यांनीं चुंबन घेतलें आहे, या पीडलेले लोकांच्या पीडकांस तो दुर्बळ करील.

חסד ואמת נפגשו दया व सत्यता एकत्र मिळाली आहे; त्या आह्माजवळ येऊन पोहोंचल्या आहेत. तो त्यांस आमच्या शिरांवर राखील.

קדוש ישראל מושיעכם इस्राएलाचा पवित्र तुमचा तारक आहे; तो तुमचीं उल्लंघनें क्षमा करीलच करील; तुह्मी भिऊं नका आणि घाबरूं नका.

שובו לכם לאהליכם तुह्मी आपल्या घरीं * परत जा; आणि तुमच्या देवाच्या नामास धन्य ह्मणा, आणि नृत्य करून त्याच्या नांवाची स्तुति करा.

אלהי הצבאות יי पृष्ठ ४६.

שבט יהודה यहुद्याचा वंश जुलुमाखालीं व दुःखांत

---

* इ. राहोट्यांकडे.

आहे; (आतां) रानांत सिंह गर्जतो काय? त्यांतील बाप लेंक, गरीब व दरिद्री तुझ्या तारणाची आशा करितात. आमच्या खंडणाच्या समयीं, आणि आह्मी हासण्याचें पात्र होऊं नये ह्मणून आह्माकरितां तूं उभा राहा. हे परमेश्वरा, तूं दूर कां उभा राहतोस? हे करूबांवर बसणाऱ्या, तुझे प्रिय लोक* मरणाच्या दरवाजाजवळ पोहोंचले आहेत, त्यांवर प्रकाशित हो. संकटसमयीं आह्मास साहाय्य कर; देवाचा हात अखूड आहे काय? या लांबविलेल्या † प्रवासांत आमचे दिवस नवे कर; (हे देवा,) ऊठ, उगा कां राहतोस ‡ जो देश त्यांचा नाहीं, तेथें तुझे पुत्र असतां, त्यांची आठवण कर; परस्यांस त्यांजवळ येऊं देऊं नको. मोहोर करून गुप्त राखलेला शेवट एकुलत्यांस कळीव. मग सियोन ऐकून संतोष पावेल, आणि येहुदाच्या कन्या हर्ष करितील. हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, आमच्या विनंतीला वरील आकाशांत तूं चढूं दे.

אל מלך भा. प. पृष्ठ ३७.
ויאמר אני भा. प. पृष्ठ ३८.
רחמנא אדכר לן भा. प. पृष्ठ ३८.
עננו מלך מלכי המלכים भा. प. पृष्ठ ४४.
חננו " भा. प. पृष्ठ ४६.
אלהינו שבשמים भा. प. पृष्ठ ४९.

זכרון לפניך בשחק (आमची) आठवण तुजपुढें सर्वकाळ राहावी, ह्मणून ती पुस्तकांत कोरून ठेव, आणि आब्राहाम व इसहाक यांजबरोबर केलेला सर्वकाळचा करार तूं मोडूं नको. तुला हाक मारणारे तुजपुढें नमन करायास येतात, तर बांधला गेलेल्या (इसहाकास) स्मर; § आणि तुझ्या शेरडांची दयेने पाहाणी करून त्यांस अन्य लोकांपासून वेगळें कर. ¶ हे

---

* इ. खबुत्र. † जुन्या झालेल्या. ‡ इ. झोपीं कां जातोस.
§ इ. उठीव. ¶ इ. त्याचें तोंड पट्टेदारांकडे लाव.

दयेच्या आसनावर बसणाऱ्या देव राजा, तुझ्या गौरवास उठवून, जे झोपीं गेले आहेत त्यांस जागृत कर; आणि जे दूर केलेले लोक तुझ्यामुळें कांपत उंच आकाशांतून तुझी दया ओढून घेण्यास आले आहेत, त्यांस तूं आपणासाठीं खडून घे.

אל מלך

מי אל כמוך हे देवा, जो तूं अन्यायाची क्षमा करितोस व आपल्या विभागाच्या शेषाचें पातक उल्लंघितोस, त्या तुजसारिखा कोण आहे ? तो आपला क्रोध सर्वकाळ बाळगीत नाहीं, कारण कीं त्याला दया आवडती, तो फिरेल, तो आह्मावर दया करील, व आमचे अन्याय धुळीस मिळवील, आणि त्यांचीं सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाकिसील. तूं याकोबासाठीं खरेपण व आब्राहामासाठीं करूणा साधिसील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजांशीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहीस ती.

קדיש לעילא

एथपर्यंत वाचल्यावर हेखाल उघडतात.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे.

ברוך שם त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदांसर्वकाळ धन्य असो.

קראתי בכל לב

म्या आपल्या संपूर्ण हृदयानें हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

म्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

म्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

म्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

म्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.
म्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.
म्या आपल्या संपूर्ण हृदयाने हाक मारिली; हे परमेश्वरा, मला उत्तर दे; मी तुझे नेम संभाळीन.

יי הוא האלהים

परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.
परमेश्वर तोच आमचा देव आहे; परमेश्वर तोच आमचा देव आहे.

एथें קדיש תתקבל भा. १. पृष्ठ. ९८ एथें लिहिल्याप्रमाणें वाचितात; परंतु त्यांतील תענו ותעתרו हें बोलल्यापूर्वीं दाहा वेळ शोफार वाजवितात; तो येणेंप्रमाणें.— תקרת תשרת תרת आणि קדיש पूर्ण झाल्यावर תרועה גדולה वाजवून हेखाल बंद करितात आणि हीं पुढील वाक्यें तीन वेळ बोलतात.

כל כלי יוצר कोणतेंही हत्यार जें तुजविरुद्ध घडलेलें आहे, तें साधारण नाहीं; आणि जी कोणती जीभ तुजसीं वाद करायास उठेल, तिला तूं अन्यायी ठरविशील, हाच परमेश्वराच्या सेवकांचा विभाग, आणि हेंच मजपासून त्याचें न्यायीपण आहे, असें परमेश्वर ह्मणतो. जे परमेश्वरासीं विरुद्ध होतील, ते पराभव पावतील, तो आकाशांतून त्यांजवर गर्जना करील; परमेश्वर पृथ्वींतील सर्व देशांची न्यायाधिशी करील, आणि तो आपल्या राजाला शक्ति देईल, आणि आपल्या अभिषिक्ताचें शृंग उंच करील. (ती. वे.)

पुढें हीं वाक्येंहि बोलतात.

יבאו ויגידו तीं जाऊन जे जन्मतील त्या लोकांस त्यांचा न्याय सांगतील कीं, "त्याने केला आहे." तूं जा, हर्षाने आपली भाकर खा, आणि आनंदित हृदयाने आपला द्राक्षरस पी, कां कीं, आतां देव तुझीं कर्में मान्य करितो.

ही प्रार्थना संपल्यावर קדיש न करतां लागलेंच नित्याच्या संध्याकाळच्या प्रार्थनेस आरंभ करून אדני שפתי मध्यें אתה חוננתנו मात्र अधिक बोलावें, परंतु प्रायश्चित्ताचा दिवस शाब्बाथ दिवशीं असल्यास ארך ימים हेंहि अधिक बोलावें. आणि द्राक्ष रसावर धन्यवाद करितांना सुगंधावर धन्यवाद करूं नये. त्यानंतर चंद्राच्या मासिक गतीवरून धन्यवाद करावा; आणि आपले कुटुंबांतील सर्व मनुष्यांस व सख्यासोयऱ्यांस आशीर्वाद देऊन पुढें पांचव्या दिवशीं येणाऱ्या मांडव्याच्या सणाकरितां मांडव घालण्यास आरंभ करावा.

תם ונשלם שבח לאל בורא עולם

पृथ्वी उत्पन्नकर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग दुसरा.

टीका.

टीका १.

मुख्य उपाध्याच्या पोषाकाचें वर्णन.

ציץ फूल; हें शुद्ध सोन्याचें केलेलें असे; आणि त्याजवर קדש ליהוה ह्मणजे "परमेश्वरासाठीं पवित्र" असे शब्द कोरलेले असत. तें फूल मुख्य उपाध्या आपल्या फेंट्याच्या समोरच्या बाजूस निळ्या दोरीनें बांधीत असे.

מעיל झगा; तो पूर्ण निळ्या रंगाचा असे, आणि गळ्यांत घालायासाठीं त्याच्या मध्यें तोंड असे. तो फाडला न जावा ह्मणून त्याच्या तोंडाभोंवतें व हाताभोंवतें गुंफित कामाची गोट असे. तो एकाच तुकड्याचा असे, आणि त्याजवर शिवण अगदींच नसे. त्याच्या खालच्या घेरावर निळ्या, जांबळ्या व किरमिजी रंगाच्या सुताचीं डाळिंबें व सोन्याचे घुंगरू असत; एक डाळिंब व एक घुंगरू, एक डाळिंब व एक घुंगरू असीं तीं जोडलेलीं असत. ते घुंगरू अशासाठीं असत कीं, जेव्हां तो सुगंध दाखविण्यास आंत जात असे, तेव्हां तो सुगंध दाखवितांना घुंगरांचा अवाज होऊन सर्व लोकांच्या कानीं पडून, तेव्हांच त्या सर्वांनी ईश्वरापुढें नमन करून धन्य ह्मणावें.

כתנת आंगरखा; हा मुख्य उपाध्यासाठीं व दुसऱ्या उपाध्यासाठींहि केलेला असे, मुख्य उपाध्याचा आंगरखा बहुतकरून दाट व तोकडा असे व तो आंत पांघरीत असे, परंतु दुसऱ्या उपाध्यांचा आंगरखा ढिला व पायघोळ असून, ते तो वर पांघरून त्याजवर कंबरबंद बांधीत, त्यास हातहि असत; आणि तो बहुतकरून सणाचे कापडाचा केलेला असावा असें वाटतें.

מכנסי בד चोळणा, हा सणाच्या कापडाचा केलेला असे आणि कंबरेपासून गुडघ्यापर्यंत एवढा लांब असे. मुख्य उपाध्याचा चोळणा व दुसऱ्या उपाध्यांचा चोळणा सारखाच असे.

חשן ऊरपट, याचें पूर्ण नाम חשן משפט ह्मणजे, न्याय ठरण्याचा ऊरपट; हा एफोदासारिखा सोनें व नीळें, जांबळें व किरमिजी रंगी व कातलेलें बारीक सूत याचा बुटीदार केलेला असे. तो वीतभर रुंद असे, आणि त्याजवर लहान लहान बारा रत्नें चार पंक्तींत ह्मणजे प्रत्येक पंक्तीनें तीन असीं बसविलेलीं असत. आणि त्यांतील प्रत्येक रत्न इस्राएलाच्या प्रत्येक पुत्राच्या नामानें होतें, तीं रत्नें येणेंप्रमाणें असत:—

रेऊबेन. आरक्तक.	शिमओन. पीतमणि.	लेवी. माणीक.
येहुदा. पांच.	दान. नील.	नाफताली. हिरा.
गाद. पन्नग.	आशेर. विचित्रक.	इस्साखार. याकूत.
झेबुलुन. लसणा.	योसेफ. गोमेद.	बिनयामीन. मणिरत्न.

याप्रमाणें तो असून वरल्या बाजूस सांकळ्या व कड्या यांजकडून एफोदावर खांद्यासीं गुंतविलेला असे, आणि खालच्या बाजूसहि कड्या व निळ्या फिती असून कंबरबंदासीं जोडलेला असे.

या ऊरपटाच्या आंतल्या बाजूस जें अस्तर असे त्याला एक

पिशवी असे; या पिशवींत אורים ऊरीम व תומים थुमिम असत. या नांवांचा अर्थ प्रकाश व यथार्थता असा होतो. परंतु त्यांजकडून ईश्वरी इच्छा कळून येत असे. हे ऊरीम व थुमिम तीन रत्नें होतीं आणि त्यांतील एकावर כן ह्मणजे तसेंच किंवा होय; दुसऱ्यावर לא ह्मणजे नाहीं असे शब्द कोरलेले होते; आणि तिसऱ्यावर कांहींच नव्हतें. ज्या कोणास आपल्या कामाविषयीं ईश्वरी मत घ्यावयाचें असे, तो मुख्य याजकाजवळ जाऊन विचारीत असे. मग तो मुख्य याजक ऊरपटाच्या आंत हात घालून त्या तिहींतून एक रत्न काढी. जर होय असें निघालें, तर त्यानें समजावें कीं तें काम सफल होईल; जर नाहीं ह्मणून निघालें, तर तें काम सफल होणार नाहीं असें समजावें; परंतु ज्यावर कांहींच नसे तें निघालें, तर त्या प्रश्नास कांहींच उत्तर नाहीं, तो प्रश्न पुनः दुसऱ्या वेळीं पाहावा असें समजावें. याप्रमाणें कित्येकांचें मत आहे. दुसऱ्यांचें असें मत आहे कीं, त्या पिशवींत एकच रत्न असे, त्या रत्नावर ईश्वराचें न उच्चारायाचें नाम कोरलेलें असे. प्रश्न पाहातां वेळीं तीं अक्षरें जर चमकलीं तर "होय" असें उत्तर; परंतु जर न चमकलीं तर "नाहीं" असें उत्तर समजावें.

हाराम्बाम याने पवित्र मंदिरांतील पात्रांचें, व त्या मंदिरीं पूजन करणाऱ्या याजकांच्या वस्त्रांचें जें वर्णन केलें आहे, त्याच्या ९ व्या अध्यायांत असें आहे कीं, ऊरपट आणि उरीम व थुमिम हे एकच; आणि याच कारणास्तव त्यास न्याय ठरण्याचा ऊरपट असें नाम होतें. परंतु याकोबाच्या बारा पुत्रांच्या नामांत इब्री भाषेंतील सर्व मूळ अक्षरें नाहींत, ह्मणजे ק. צ. ט. ח हीं अक्षरें उणीं आहेत. तीं अक्षरें उणीं असल्यावरून एकाद्या प्रश्नाचें उत्तर मिळण्यास कदाचित अडचण पडेल, ती न पडावी, या कारणावरून त्या ऊरपटावर आब्राहाम, ईसहाक व याकोब यांचीं नावें असून שבטי יה असे शब्दहि त्याजवर असत. शास्त्रांत ह्या ऊरपटावर इस्राएलाच्या पुत्रांचीं नावें मात्र होतीं असें लिहिलें आहे;

परंतु हारामबामानें १२२ व्या गीतांतील שבטי יה "अनंताचे वंश" या शब्दांतील יה या शब्दाच्या अक्षरांची संख्या धरून आब्राहाम, इसहाक, याकोब व याकोबाचे बारा पुत्र, असे अनंताचे पंधरा वंश, होते असें सिद्ध केलें आहे. या मतें त्यावर नांवें कोरलेलीं असत तीं येणेंप्रमाणें.—

आरक्तक. אברהם יצחק יעקב ראובן	पीतमणि. שמעון	माणिक. לוי
पांच. יהודה	नील. דן	हिरा. נפתלי
पन्नग. גד	विचित्रक. אשר	याकूत. יששכר
लसणा. זבולן	गोमेद. יוסף	माणिरत्न. בנימן שבטי יה

אפוד एफोद; हा सोनें, व निळें, जांबळें व किरमिज रंगी व कांतलेलें बारीक सूत यांचा सुंदर बुटीदार केलेला असे. त्याचे दोन निराळे तुकडे, एक समोर व एक मागें असे असून, तो खांद्यावर बंदासारिख्या खांदपट्ट्यानें जडलेला असे. आणि दोन खांद्यांवरील त्या दोन खांदपट्ट्यांवर दोन गोमेद रत्नें सोन्याच्या साखळ्यांनी बसविलेलीं असत. आणि त्या दोन रत्नांवर इस्राएलाच्या बारा

पुत्रांचीं नावें ह्मणजे प्रत्येकावर साहा साहा असीं त्यांच्या जन्माच्या अनुक्रमानें कोरलेलीं असत. त्या नांवाविषयीं रशी व हारामबाम यांमध्यें मत्तभेद आहे तो येणें प्रमाणें.—

हारामबामाचें मत्त.

डाव्याकडे.	उजव्याकडे.
שמעון	ראובן
יהודה	לוי
זבולן	יששכר
דן	נפתלי
אשר	גד
בנימן	יהוסף

रशीचें मत्त.

डाव्याकडे.	उजव्याकडे.
גד	ראובן
אשר	שמעון
יששכר	לוי
זבולן	יהודה
יהוסף	דן
בנימן	נפתלי

आणि या प्रत्येक दगडावर पंचवीस अक्षरें व्हावी ह्मणून योसेफाचे नांवांत ה हें अक्षर अधिक असे.

या एफोदास हात नसून, तो गळ्यापासून गुडघ्यापर्यंत लांब असे. मुख्य उपाध्या हा झग्याच्या वर पांघरून त्याजवर ऊरपट जोडीत असे, आणि त्याजवरून तो ऊरपट कधींच काढला जात नसे. दुसरे याजकाहि एफोद पांघरीत असत, परंतु तो एवढा सुंदर नसे, साधा असे; ह्मणूनच शास्त्रांत त्याचें कोठेंच वर्णन केलें नाहीं असें वाटतें.

מצנפת फेंटा, हा बारीक सणाच्या कापडाचा असे, मुख्य उपाध्याच्या व दुसऱ्या उपाध्यांच्या फेंट्यांमध्यें कांहींच भेद नव्हता; परंतु मुख्य उपाध्याच्या फेंट्यावर मागें लिहिलेलें फूल मात्र अधिक असे.

אבנט कमरबंद; हा सणाच्या कापडाचा असून तो एफोदासारिखा सोनें आणि निळें, जांबळें व किरमिज रंगी व कांतलेलें बारीक सूत यांचा बुटीदार केलेला असे, तो एफोदावर कंमरेस बांधल्यावर त्याचे दोन शेवट खालीं लोंबत असत.

टीका २.

טבילה

याद हाहाझाका या ग्रंथांत טבילה "स्नान करणें" या विषयावर जो भाग आहे, त्याच्या दुसऱ्या अध्यायांत טבילה ह्मणजे शुद्धतेसाठीं स्नान करण्याविषयीं असा एक नेम सांगितला आहे कीं, स्नान करितांना आंगावर केशाएवढा लहान पदार्थ जर असला तर शुद्धता होत नाहीं. याच कारणास्तव मुख्य याजक काळजीने व जपून स्नान करून मोठ्या चौकशीने पाहात असे.

टीका ३.

परवाचें घर.

परवा याचे घराविषयीं גמרא मधील תמיד या भागांत असें आहे कीं, परवा हा कोणी अन्य जातीचा चेटकी होता. मुख्य उपाध्या अति पवित्र ठिकाणीं जाऊन जी सेवा करीत असे, ती पाहाण्याकरितां त्याने पुष्कळ प्रयत्न केला; परंतु ती पाहावयास सांपडत नाहीं, ह्मणून त्याने पवित्र मंदिराच्या बाहेरल्या बाजूस एक लहानसें घर बांधून त्याखालून तळवाट खणीत अति पवित्र ठिकाणाजवळ नेली. तेथें छिद्रें करून त्यांतून तो पाहत असे. हें त्याचें कृत्रिम समजल्यावर त्यास मारून टाकिलें. आणि जें घर त्याने बांधिलें होतें, तें मग अर्पणाच्या पशूंचीं कातडीं खारविण्याच्या कामास लाविलें; आणि त्याच्या गच्चीवर मुख्य उपाध्यास अंघूळ करण्याचें ठिकाण केलें होतें.

टीका ४.

नीकानोराचा दरवाजा.

नीकानोराच्या दरवाज्याविषयीं גמרא मधील יומא या भागांत असें लिहिलें आहे कीं, दुसरें पवित्र मंदिर बांधतेवेळीं नीकानोर या नांवाच्या एका मनुष्यास, मिसरांतील आलेकझांड्रिया शहरास, त्या पवित्र मंदिराकरितां एक दरवाजा आणावयास पाठविला होता. तो दरवाजा घेऊन येतेवेळीं समुद्रांत वादळ पडलें.

तेव्हां त्या नावाडी लोकांनी त्या दरवाज्याची एक झडप समुद्रांत टाकिली, तरी समुद्र शांत होईना व गलबत स्थिर राहीना. तेव्हां ते त्या दरवाजाची दुसरी झडपही समुद्रांत टाकूं लागले. तेव्हां तो नीकानोर ती झडप उरासीं धरून ह्मणाला कीं, तिजबरोबर मलाहि समुद्रांत टाकाल तर मी ती समुद्रांत टाकूं देईन; नाहीं तर टाकूं देणार नाहीं. असें तो ह्मणत आहे, इतक्यांत समुद्र शांत झाला. मग तें गलबत आखा या बंदरीं सुखरूप येऊन पोंचलें. मागाहून ती झडपहि तेथें येऊन जवळच लागली. याविषयीं कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, ती पोहोत आली. परंतु कित्येक असें ह्मणतात कीं, ती पितळेची होती ह्मणून ती पाण्यावर वाहूं शकली नाहीं; परंतु एका मोठ्या माशानें तीस गिळून किनाऱ्यास येऊन ओकून टाकिली. असा चमत्कार झाला व आणायास गेलेला मनुष्य, त्यासाठीं आपला जीव देण्यासहि तयार झाला; ह्मणून त्या दरवाजास त्याचें नांव ठेवून नीकानोराचा दरवाजा असें ह्मटलें.

परंतु योसीफुन इतिहास कर्त्ता २४ व्या अध्यायांत असें लिहितो कीं, आरामाचा राजा डेमत्रीयस यानें नीकानोर या सरदारास इस्राएलांबरोबर लढायाकरितां पाठविला. तो कित्येक वेळा विजयी झाला; परंतु शेवटीं मतातया मुख्य उपाध्याचा पुत्र यहुदा, यानें त्याचा पराजय करून त्यास मारून टाकिलें; आणि त्याचें डोकें व हात आणून त्या दरवाजांत टांगिले. यावरून त्यास निकानोराचा दरवाजा असें ह्मणतात. हा दरवाजा पूर्वेकडेस होता.

टीका ८.

दुयम उपाध्या.

हा दुयम उपाध्या नेमण्याचें कारण असें कीं, या दिवशीं पूजन करणाऱ्या उपाध्यास फारच भय असे. त्याच्या हातून एकादी लहानी चूक झाली, किंवा त्याच्या अंगीं कांहीं लहान दोष असला, तर तो त्याच ठिकाणीं मरत असे. असें झाल्यास या दिवसाच्या पूजनास अटकाव होऊं नये ह्मणून, हा दुयम उपाध्या

नेमिला जात असे; त्याने लागलेंच आंत जाऊन पूजन चालवावें. हें विघ्न आहारोनाचे दोघे पुत्र नादाब आणि आबीहू यांशिवाय दुसऱ्या कोणावर आलेलें शास्त्रांत अढळत नाहीं. परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं असें विघ्न कित्येक वेळां झाल्यावरून प्रायश्चित्ताच्या दिवशीं मुख्य उपाध्या अतिपवित्र ठिकाणीं जातेवेळीं त्याच्या पायास सांखळ बांधीत, कारण असें विघ्न झाल्यास कोणी आंत न जातां त्यास ओढून काढावा. जो निर्दोष तो सुखरूप बाहेर निघत असे; परंतु ज्याचे अंगीं दोष असे, त्यास दयासनावरील दोन केरूबांमधून अग्नि निघून मारून टाकीत असे.

टीका ६.

कोंकऱ्यांवरील सोडती.

मुख्य उपाध्या दोन कोंकऱ्यांवर सोडती काढीत असे त्या अशा, तो त्या दोन कोंकऱ्यांच्या मध्यें येऊन उभा राहिला, ह्मणजे त्याजपुढें एक पेटी आणून ठेवीत; त्या पेटींत दोन सोन्याचे तुकडे असत. त्यांतील एकावर ליהוה ह्मणजे ईश्वरी नामाकरितां आणि दुसऱ्यावर לעזאזל ह्मणजे आझाझेलाकरितां असीं अक्षरें लिहिलेलीं असत. ती पेटी जोराने हालविल्यावर तो आपले दोन्ही हात त्या पेटींत घालून दोन हातीं ते दोन तुकडे बाहेर काढी. जी सोडत उजव्या हातीं निघे ती उजव्याकडील कोंकऱ्यावर आणि जी डाव्या हातीं निघे ती डाव्याकडील कोंकऱ्यावर टाकी. ईश्वरी नामाची सोडत उजव्या हातीं निघाल्यास तो चांगला शकून असें लोक मानीत. शिमओन ज्याचें अडनांव यथार्थ हा मुख्य उपाध्या असतां, ईश्वरी नामाची सोडत नेहेमी उजव्या हातीं निघत असे; परंतु त्याच्या मागून कधीं उजव्या व कधीं डाव्या हातीं निघत असे.

टीका ७.

עזאזל

עזאזל या शब्दाच्या अर्थाविषयीं अनेक मतें आहेत. हें एका भूताचें नाम आहे, असें कोणी समजतात; परंतु असा अर्थ

होऊं शकत नाहीं, कारण भुताची सेवा करण्याविषयीं शास्त्रांत मनाई असतां, ईश्वरी नामाकारितां अर्पिला जाणाऱ्या कोंकऱ्याबरोबर या नामाच्या भूतासहि एक कोंकरा अर्पण करीत असत, असें अनुमान होत नाहीं. यासाठीं कोणीं त्या शब्दाचीं עז आणि אזל असीं दोन पदें करून मोकळा सोडिलेला कोंकरा असा त्याचा अर्थ करितात, परंतु रशीने केलेल्या शास्त्रावरील टीकेमध्यें या शब्दाचा अर्थ उंच उभा कडा असा सांपडतो. एबेन एज्रेर याच्या ग्रंथाच्या יומא या भागांतहि असाच अर्थ केलेला सांपडतो.

टीका ८.

किरमिजी दोरा.

जो किरमिजी दोरा सांगितला आहे, तो लोंकरेचा असे. त्याचा रंग आपोआप पालटून शुभ्र होत असे. आणि असें झाल्यास ईश्वराने सर्व लोकांच्या पापांची क्षमा केली असें समजून येत असे. याप्रमाणें एक दोरा पवित्र ठिकाणाच्या दारावरही बांधीत; त्यावरून बहुदा हें समजून येत असे. कोंकऱ्यांस बांधलेल्या दोरावरून समजत नसे, कारण एक कोंकरा कापला जात असे, आणि एक कोंकरा कड्यावरून लोटला जात असे. या चमत्कारावरून ईश्वरी वचन अक्षरशः पूर्ण होत असे. तें वचन येणेंप्रमाणें;– "परमेश्वर ह्मणतो, याहो, आपण विवाद करूं; तुमचीं पापें जरी लाखेसारिखीं असलीं, तरी तीं बर्फासारिखीं पांढरीं होतील; किरमिजाप्रमाणें जरी तांबडीं असलीं, तरी स्वच्छ लोंकरेसारिखीं होतील." यशाया. अ.१ओ.१८.

टीका ९.

אבן שתיה

या दगडाच्या "शेथिया" या नांवावरून असें अनुमान होतें कीं, हा कांहीं पायाचा दगड असावा; आणि हाखामीम लोक याप्रमाणें अनुमान करून असें ह्मणतात कीं, ज्या डोंगरांवर येरूशालेम नगर बांधलें होतें, त्या डोंगरांच्या पायाचा हा दगड होता. कित्येक त्या नामाचा "शेथाया" असा उच्चार करून "अनंत देवाने मांडलेला" दगड असा अर्थ करितात. हा दगड पहि-

त्या भविष्यवाद्यांच्या दिवसांपासून अति पवित्र ठिकाणीं भूमीच्या वर तीन बोटें निराधार राहिला होता, असें משנה च्या יומא या भागांत सांगितलें आहे.

पहिल्या मंदिराच्या वेळीं सुगंधाचें धुपाटणें कोशाच्या काठ्यांच्या मध्यें ठेवीत, परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं या शेथिया दगडावर तें ठेवीत. याचें कारण असें कीं, दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं तो कोश ज्यास कराराचा कोश असेंहि ह्मणत, आणि ज्यांत ईश्वराने दिल्हेल्या दाहा आज्ञांच्या दोन पाट्या ठेविलेल्या होत्या, तो कोश नव्हता. हा कोश कोठें गेला व काय झाला याविषयीं अनेक मतें आहेत. कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, नबुखादनेसार राजाने परमेश्वराच्या मंदिराच्या व राजाच्या घरच्या भांडारांतल्या ज्या वस्तु नेल्या, त्यांजबरोबर हा कोशहि नेला असावा. दुसऱ्यांचें असें मत आहे कीं, जेव्हां शलमोनाने परमेश्वराचें मंदिर बांधिलें तेव्हांच त्यास असें भविष्य कळलें होतें कीं, या मंदिराचा पुढें नाश होणार; यावरून त्याने कोशास लपवून ठेविण्याकरितां एक गुप्त स्थान बांधिलें होतें. नंतर योशिया राजास परमेश्वराच्या मंदिराचा नाश लवकरच होणार असें समजल्यावरून, त्याने कराराचा कोश शलमोनाने बांधून ठेविलेल्या गुप्त स्थानीं नेऊन लपविला. परंतु माकाबीच्या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, ईश्वराने इर्मेयास सूचना केली कीं, तूं ज्या डोंगरावर मोशे गेला त्या डोंगराजवळ येईस, आणि देवाचें वस्तिस्थान पाहास तेथपर्यंत साक्षापणाची राहुटी व कोश तुझ्या संगातें आणायास आज्ञा कर. याप्रमाणें जेव्हां तो तेथपर्यंत गेला, तेव्हां तेथें त्यास एक गुहा सांपडली. त्यांत त्याने साक्षातपणाची राहुटी, कोश व धूपवेदि नेऊन ठेविली; आणि त्या गुहेचा दरवाजा बंद केला. नंतर जे लोक त्याच्या मागें गेले होते, ते त्या ठिकाणावर कांहीं खूण ठेवायास गेले, परंतु त्यांस ती गुहा सांपडली नाहीं. जेव्हां इर्मेयाने असें पाहिलें, तेव्हां तो त्यांचा निषेध करून त्यांस ह्मणाला कीं, जोंपर्यंत ईश्वर या लोकांस एकवट करी, आणि त्यांवर कृपा

करी, तोंपर्यंत तें ठिकाण गुप्तच राहील; नंतर परमेश्वर या वस्तु दाखवील. माकाबीचें दुसरें पुस्तक अध्याय २ ओवी ४-८. परंतु बहुतेकांचें ह्मणणें असें आहे कीं, हा कोश, आहारोनाचीं फुलें उमललेली व बदामें आलेली काठी, मानाचें पात्र, ऊरीम व थुमिम व दुसऱ्या कांहीं वस्तु अतिपवित्र ठिकाणीं गुप्त होऊन अदृश्य झाल्या.

टीका १०.

כמצליף

"जसा कोणी मारायास हात वर करितो" याचा इब्री शब्द כמצליף असा आहे. या शब्दाची उत्पत्ति कोणत्या मूळ शब्दापासून झाली आहे याचा पूर्ण शोध नाहीं. हा शब्द צלף ह्मणजे मारणें या मूळ शब्दापासून निघाला असावा असें कोणी अनुमान करितात. परंतु हा मूळ शब्द सांप्रत उपयोगांत नाहीं, ह्मणून तो זלף शिंपडणें किंवा वाहाणें या तारगुम शब्दापासून निघाला असावा असें कित्येक कल्पितात. व्याकरणाच्या नियमाप्रमाणें त्या शब्दाचा मूळ शब्द צלף असावा; तरी זלף हा मूळ शब्द धरण्यास असा आधार आहे कीं, ז.ק.צ.ש हीं अक्षरें कधीं कधीं एकमेकांबद्दल लागतात. त्याच प्रमाणें ב.ו.פ आणि ד.ט.ת हीं अक्षरेंही कधीं कधीं एकमेकांबद्दल लागतात त्याचीं उदाहरणें एथें देण्याचें कांहीं अगत्य नाहीं.

टीका ११.

मुख्य उपाध्याच्या वस्त्रांचे गुण.

हाखामीम लोकांच्या मतें मुख्य याजकाच्या आठ वस्त्रांत आठ प्रकारच्या पापाचें प्रायश्चित्त करण्याचे गुण होते. ते असे;—सोन्याच्या फुलाकडून निर्लज्जेचें; झग्याकडून अभद्र भाषणाचें, अंगरख्याकडून रक्तपाताचें, चोळण्याकडून नागवेपण उघडें करण्याचें, ऊरपटाकडून विपरीत न्याय करण्याचें, एफोदाकडून मूर्तिपूजनाचें, फेट्याकडून गर्वाचें आणि कंबरबंदाकडून कुकल्पनेचें प्रायश्चित्त होत असे.

टीका १२.

द्विगुणें भजन करणें.

मनुष्याच्या अंगीं सद्विचार आणि दुर्विचार असे दोन गुण आहेत; त्यांतील पहिला יצר טוב हा त्यास सत्कर्माकडे वळवितो; परंतु दुसरा יצר הרע हा त्यास दुष्कर्माकडे वळवितो. हे नेहमीं एकप्रत्येकाविरुद्ध असतात; परंतु प्रायश्चित्ताच्या दिवशीं संसारसंबंधी कामें करण्यास आणि मनांतील कोणत्याही वांच्छा पूर्ण करण्यास मनाई आहे, ह्मणून त्या दिवशीं दुर्विचाराचें कांहींच सामर्थ्य चालत नसतां, सद्विचाराने मात्र नव्हे, परंतु दुर्विचारासहि जिंकून ईश्वरभजनीं तत्पर असलें पाहिजे.

या कर्त्याच्या पुस्तकांबद्दल मतांचा सारांश.

पुस्तकांची पोंच.—"प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना" "वर्षप्रतिपदेची प्रार्थना" "पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना" अशीं प्रार्थनेसंबंधी तीन पुस्तकें आणि "इब्री पहिलें पुस्तक" मिळून चार पुस्तकें त्यांचे कर्ते मि० योसेफ येहेजकेल राजपुरकर, दावीद सासोन ह्यांच्या शाळेंतील शिक्षक व इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे चिटणीस, ह्यानीं आह्मास पाठविलीं त्यांचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करतों. पहिलीं तीनहीं पुस्तकें हीं मूळ इब्री भाषेंतील प्रार्थनापुस्तकाचीं मराठी भाषांतरें होत. ह्यांत इस्राएल लोकांच्या धर्मांतील प्रार्थनेच्या रीति आहेत; तणेंकरून इब्री भाषा न समजणाऱ्या अशा या देशांत राहणाऱ्या (ज्यांची हल्लीं भाषा ह्मटली ह्मणजे मराठीच झाली आहे) इस्राएल लोकांस स्वधर्मसंबंधानें फार उपयोगाचीं आहेत; चौथ्या पुस्तकांत इब्री व मराठी मूळ अक्षरांचा परस्परसंबंध व अक्षरचिन्हें हीं दाखविलेलीं असून, त्यावरून कांहीं शब्द व वाक्यें मराठी भाषांतरासह घातलेलीं आहेत. हें पुस्तक नूतनच मराठीवरून इब्री शिकणारांस उपयोगी होईल. मिस्तर योसेफ ह्यानीं हीं पुस्तकें केवळ निरापेक्षपणें व परोपकारबुद्धीनें आपल्या लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीच्या उपयोगाकरतांच मुद्दाम केलीं आहेत असें समजावें. ह्या गुणाबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितों. प्रा० दि० प्रा० हें पुस्तक ओरिएन्टल छापखान्यांत व दुसरीं तीन पुस्तकें गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत सुंदर ठसेछापानीं छापलेलीं असून त्यांची भाषाही सुबोध आहे.—मित्रोदय ता० २२ डिसेंबर १८६७

पुस्तकपरीक्षा.

"पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना," "प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना" आणि "वर्षप्रतिपदेची प्रार्थना" हे तीन ग्रंथ, भषांतर कर्ते मि०

योसेफ येहेजकेल राजपुरकर, दावीद सासून शाळेंतील शिक्षक याणीं आह्मास पाठविले त्यांचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. हीं भाषांतरें मूळ इब्री भाषेंतून महाराष्ट्र भाषेंत करून गणपतकृष्णाजी आणि ओरिएन्टल छापखान्यांत सुंदर टैपांवर छापून प्रसिद्ध केलीं आहेत. यांची किंमत ।॥• रुपायापासून १। रुपायापर्यंत आहे.

जो धर्म आपण आचरितों त्याचें आपणास मर्मभेदज्ञान असणें अवश्य आहे, कारण येणेंकरून त्याजवरची आपली श्रद्धा दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन अंतीं दृढ होते. परंतु हें ज्ञान होण्यास ज्या भाषेंत तो धर्म कथन केला आहे, ती भाषा आपणास अवगत असली पाहिजे. नाहीं तर धर्मावर श्रद्धा बसण्यास ज्या भक्तिभावाची गरज आहे तो आपणाठायीं किमपिही उत्पन्न होणार नाहीं. सांप्रत आमच्या देशबांधवांपैकीं कित्येक अन्यधर्मी लोकांची अशी स्थिति झाली आहे. त्यांचे धर्मसंबंधी सर्व ग्रंथ अन्य भाषेंत असल्यामुळें ज्या धर्माचें ते आचरण करितात त्यांची त्यांस फारसी माहिती होत नाहीं. फक्त उपदेशक सांगतो ह्मणून आपणास तो आचरिला पाहिजे इतकेंच त्यांना ठाऊक असतें. अशावरून धर्मावर त्यांची पूर्ण श्रद्धा बसत नाहीं. याच प्रकारें आमचे इस्राएलधर्मी बंधुजन, ज्यांस ह्या देशांत जन्मल्यामुळें महाराष्ट्र भाषेचेंच वळण लागून गेलें आहे त्यांची स्थिति तशीच आहे असें आह्मास वाटतें, कारण तत्धर्मसंबंधी सर्व ग्रंथ इब्री भाषेंत असल्यामुळें त्यांना त्यांचे संपूर्ण ज्ञान नाहीं, तेणेंकरूनच त्यांची स्वधर्मावर श्रद्धा बसण्यास फार व्यत्यय येतो, असें ह्मटलें तरी चालेल. आणि यशायाचा भविष्यवाद अध्याय ६६ ओवी २ एथें परमेश्वर तर असें ह्मणतो कीं, जो दीन व अनुतापी आत्म्याचा असून माझ्या वचनाचें भय धरितो त्याकडे मीं पाहीन असें इस्राएलधर्मी ग्रंथांतील वाक्य असून परमेश्वराच्या वचनाचेंच मुळीं ज्ञान नसेल तर परमेश्वर त्यास पाहील तरी कसें ? यास्तव तें ज्ञान होण्याचें ज्या गृहस्थानें साधन करून दिलें आहे त्याणें तत्धर्मी लोकांवर किती महत् उपकार

केले आहेत यांचा त्यांनींच विचार करावा. आमच्या मतें तर मि० योसेफ आपल्या मोकळीकेचा वेळ अस्या परोपकारी धर्मकृत्यांत घालवून आपल्या स्वजनहितार्थ एवढा महत् प्रयत्न करितात त्याकरितां ते फारच स्तुतीस योग्य आहेत. अशा परोपकारी गृहस्थांचे श्रम सफळ करणें त्यांच्या बंधुजनांवरच आहे ह्मणून सर्वत्रानीं त्यांच्या भाषांतराच्या प्रती विकत घेऊन त्यांस आपला सदाश्रय द्यावा ह्मणजे त्यांस उत्तेजन येऊन ते आणखी असे अनेक ग्रंथ करण्याच्या स्तुत्य कामाकडे सतत लागतील.

मि० योसेफ यांच्या भाषांतराची भाषा बरीच पोक्त आहे आणि त्यांत त्यांणीं सवघड व सुबोध शब्दांची योजना करून तिजला जेवढी गोडी आणवेल तेवढी आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांणीं असाच क्रम ठेविला तर उत्तरोत्तर यांचीं भाषांतरें फारच सुंदर होतील असें वाटतें.

याच गृहस्थानें एक इब्री पहिलें पुस्तक तयार केलें आहे. हें ज्या कोणाची ती भाषा शिकण्याची इच्छा असेल त्यास फारच उपयोगीं आहे. याची किंमतही फारच स्वल्प ४ आणे आहे. मि० योसेफ यांणीं याचप्रमाणें दुसरें, तिसरें इत्यादि अनुक्रमानें त्या भाषेचें पूर्ण ज्ञान होण्यास अवश्य असीं आणखी पुस्तकें रचावीं असी आह्मी त्यांस अत्यादरानें शिफारस करितों.

हिंदुरिफारमर ता० १ जानुएरी सन १८६८.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१८	९	וביו םהשבת	וביום השבת
,,	१८	पहिल्याप्रमाणें एक	एक
४४	४	पूण	पूर्ण
,,	८	काहेने	कोहेन
४२	४	न येतें	येतें
४९	१०	קדיש תתקבל पूर्वी אין כאלהינו	
५९	९	अनिष्ठांपासून	अभिष्ठांपासून

THE

DAY OF ATONEMENT.

VOL. I

תפלה
ליום כפור
חלק א.

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग पहिला.

THE
PRAYERS
OF THE
DAY OF ATONEMENT.

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

Joseph Ezekiel Rajpurker

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

AND

SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

VOL. I.

BOMBAY:

PRINTED AT THE "ORIENTAL PRESS."

1867–5627,

Price 1¼ *Rupee.*

תפלה ליום כפור

חלק א׳

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग पहिला

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

येसिफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक

व

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीचे चिटणीस

यांणीं

भाषांतर केलें

तें

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीने

लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें

"ओरिएन्टल" छापखान्यांत छापविलें.

इ. स. १८६७ इस्राएली ५६२७

किम्मत १। सवा रूपया.

प्रस्तावना.

तिशरी ह्मणजे अश्विन महिन्याच्या दशमीस प्रायश्चित्ताचा दिवस येतो. या दिवसास प्रायश्चित्ताचा दिवस हें नांव पडण्याचें कारण असें कीं, त्या दिवशीं ईश्वर आपल्या परम दयेने आपले प्रिय लोक इस्राएल यांच्या पापाचें प्रायश्चित्त करून क्षमा करितो. पवित्र मंदिराच्या वेळीं या दिवशीं ईश्वराने केलेल्या क्षमेचें प्रमाण प्रत्यक्ष दिसून येत असे. परंतु जरी आतां त्याप्रमाणें प्रमाण दिसून येत नाहीं, तरी कोणी निराश होऊं नये. कारण अपराध क्षमा करणें हा त्याच्या तेरा गुणांतून एक मुख्य गुण असून, आपणाकडून प्रतिदिवशीं होणाऱ्या हजारों दोषांचें योग्य शासन तो न करितां, सर्वकाळ आपली दया राखितो. तर जे पूर्ण पश्चात्तापाने त्यास शरण जातात, त्यांस निःसंशय क्षमा होते. हें प्रायश्चित्त सर्वांस साध्य व्हावें, ह्मणून या दिवसापूर्वीं चाळीस दिवसपर्यंत मोठ्या पाहांटेस उठून आपल्या पापांची क्षमा मागावी, आणि उपास करावे, असा ज्ञानी लोकानी व ईश्वरभक्तानी नियम लावून दिला आहे. या दिवसाचें माहात्म्य सर्व सणांपेक्षां व शाब्बाथ जो सर्वांपेक्षां मोठा त्यापेक्षांहि मोठें आहे; ह्मणून त्यास महादिवस आणि शाब्बाथांचा शाब्बाथ असींहि नांवें दिल्हीं आहेत.

या दिवशीं पापाची क्षमा मागणें, ती मोठ्या विचाराने व भय धरून मागितली पाहिजे. कारण मानवी राजा अथवा न्यायाधीश यापुढें कांहीं न्यायाकरितां किंवा अर्ज करण्याकरितां जाणें असल्यास, त्याविषयीं पूर्वीं ध्यान करून त्यासंबंधी सर्व गोष्टी समजून घ्याव्या लागतात. असें असतां सर्व जगताचा राजा आणि न्यायाधीश यापुढें जाऊन काय मागावें व तें कसें मागावें, याविषयीं फार सावध असलें पाहिजे. यासाठीं आमचे प्रिय बंधुजन या दिवशीं ईश्वराजवळ जी विनंती करितात ती त्यांस समजावी, ह्मणून हें

प्रस्तावना.

या दिवसाच्या प्रार्थनेचें भाषांतर त्यांस नजर केलें आहे. यद्यपि आमची त्यांस असी सूचना आहे कीं, ही प्रार्थना मूळ भाषेंत जसी मधुर वाटती, त्याप्रमाणें तिचें भाषांतर मधुर वाटत नाहीं. तर त्यानीं आपल्या पवित्र भाषेचा अभ्यास केला असतां, ते मोठ्या प्रेमाने व एकाग्रचित्ताने प्रार्थना करितील; आणि ती देवापुढें लवकर मान्य केली जाऊन सर्व पापांची क्षमा होईल.

या ग्रंथांतील संक्षिप्त शब्द.

אוא = אלהינו ואלהי אבותינו

व. प्र. प्रा. = वर्षप्रतिपदेची प्रार्थना.

पा· क्ष. प्रा. = पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना.

दो. वे. = दोन वेळा.

शा. अ. = शाब्बाथ असल्यास

अ. ओ. = अध्याय ओवी.

इ. = इब्री.

תפלה

ליום כפור

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

ערבית

संध्याकाळची प्रार्थना.

शाब्बाथ असल्यास एथून आरंभ करावा.

מזמור שיר ליום השבת गीत ९२.

יי מלך गीत ९३.

पुढील गीतें बोलल्या अगोदर प्रत्येकाने हें गीत बोलावें.

לך אלי תשוקתי हे माझ्या देवा, माझी इच्छा तुजकडे, आणि माझी आवड व प्रीति तुजवर आहे. माझें मन व गुर्देकमळें तुझीं आहेत; माझा जीव व आत्माहि तुझा आहे. माझे हात पाय तुझे आहेत; आणि माझी रचनाहि तुझीच आहे. माझीं हाडें व माझें रक्त आणि कातड्यासहित माझें शरीर तुझें आहे. माझे डोळे, चिंतन, चेहेरा व आकार तुझेच आहेत. माझा जीव तुझा व माझें बळ तुझें; आणि माझा भरंवसा व माझी आशा तुजवरच आहे. मी आपलें मन रक्त व चरबी यांचा होम कोंकराच्या होमाप्रमाणें तुला करितों. ज्यासारिखा दुसरा नाहीं असा जो माझा एकुलता जीव तोहि तुझा; तो माझा एकुलता तुला स्तवितो. राज्य तुझें, ऐश्वर्य तुझें, आणि स्तुति तुलाच शोभते. संकटसमयीं तूझेंच सहाय, ह्मणून माझ्या संकटीं मला सहाय हो. ज्या वेळीं मी रोगी

होतो तेव्हां व दुःखांत असतों तेव्हां, जसी प्रसवणारी तसी मी तुझी वाट पाहतों. माझी आशा तुजवर आहे, मजवरील घाय, क्लेश व फटके बरे कर. मी तुजकडे शोक करितों, आणि तूं माझा अंधार प्रकाशित करीस तोंपर्यंत मी मुका राहाणार नाहीं. तूं माझें आशापात्र, आणि तुजवरच माझा भरंवसा आहे; आणि जो माझें सामर्थ्य तो तूंच. तुजकडे मी ओरडतों, आणि मी आपल्या मातीस पुन: मिळें तोंपर्यंत मी तुलाच लगटून राहीन. मी जीवंत असतां व मरणानंतरहि तुझाच आहें. मी तुला स्तवितों आणि आपणावर आपलीं पापें व दुष्टाई पत्करितों. परंतु तारण तुजकडून होतें, ह्मणून माझी दुष्टाई, माझें उल्लंघन व माझा अतिक्रम क्षमा कर. तुजपुढें मी नमन करितों आणि आपले तळहात पसरितों; आतां तूं माझी विनंती ऐक. चेंचरलेल्या मनानें ध्यान करून दुःखांत मी तुजकडे रडतों. दया व माया तुलाच येती, माझ्या सर्व कष्टांवर तूं दया कर. आणि माझ्या पापाचा दंड सोसण्यापेक्षां अधिक झाला आहे, आणि अपवाद (मजवर) प्रबल झाला आहे. यास्तव माझे क्लेश वाढले, परंतु जसें म्या पेरलें तसें म्या कापलें; आणि जर तूं माझ्या दुष्टाईप्रमाणें माझा न्याय करशील, तर मला हाय-हाय, मला हायहाय! दुष्ट वासना मला सतत त्रास देणारी आहे; जसा केवळ मजपुढें सैतानच आहे; तिने माझ्या नाशाकरितां मला मसलत देऊन भुलविलें. मजवरील बलात्कार व माझी कुरकूर तिजवरच असो, आणि तिच्या शिवाय दुसऱ्या कोणावर नसो. आणि माझ्या बिछान्यावर ज्या वेळीं मी आपले अन्याय स्मरतों, तेव्हां मी फार भयभीत होतों व कांपतों; आणि माझा खेद फारच वाढतो, माझें विपरीतपण जेव्हां मला आठवतें, तेव्हां मी घाबरतों. मी तुजपुढें नागवा* उभा आहें; तर मी काय उत्तर देऊं? ज्या गोष्टी म्या नाकारिल्या त्या ज्या दिवशीं मजविषयीं साक्ष देतील, तेव्हां रीतीप्रमाणें मला फल प्राप्त होईल. जेव्हां मजवरील (पापाचें कर्ज)

* एथें नागवा या शब्दाचा अर्थ पुण्यविरहित असा होतो.

फडण्याचे दिवस येतील, जेव्हां झडतीचा वेळ जवळ येईल, आणि जेव्हां तुझा निरोप माझ्या ऐकण्यांत येईल; तेव्हां मला भय प्राप्त होऊन माझ्या अंगास पाणी सुटेल. तुजपुढें कोण उभा राहूं शकेल? आणि माझ्याबद्दल (तुजसमोर) कोण येईल? मी तुला काय झडती देऊं? आणि माझ्या दुर्मतीपासून मी यथार्थ कसा ठरेन? मी अतिक्रम केले, दवा धरिला; मी विश्वासघात केला व (तुझीं वचनें) धिक्कारिलीं. मी लुटलें व चोरलें, वाईट केलें व दुष्टाई केली. मी हट्ट केला व जुलूमहि केला, पाप केलें व पाप करविलें. तुजकडून वळलों, (वाईट) योजना केल्या, खोटें बोललों व अपवाद केला. मी थट्टा करविली व स्वतांहि थट्टा केली. मी बंडावा केला व भ्रष्ट झालों. मी अपवाद केला व व्यभिचार केला, कुटिलपणानें वर्तलों व खोटें रचिलें. दोष केले व दोष करविले, उलंघनें केलीं व खोडी केल्या. पाठलाग केला व दुःख दिल्हें, शाप दिल्हा व आपले मार्ग निचावले. दुराचार केले व नासिलें, ओंगळ केलें व बहकलों. तुझ्या मार्गापासून वळलों व माझ्या लज्जेनें मला झांकलें आहे. दुष्टाई करण्याकरितां मी आपणास उंचाविलें, आणि आपल्या दुष्टाई करण्यांत धैर्य धरिलें, ठकविलें व विपरीत केलें व पीडिलें व ठेंचिलें. मी आपल्या आरंभीं पाप केलें आणि आपल्या शेवटींहि दुष्टाई केली; मी आपल्या बालपणांत अतिक्रम केले व आपल्या वृद्धपणांत विश्वासघात केला. तुझ्या शास्त्राचा धिक्कार करून मी आपलें स्वतांचें शास्त्र आपणाकरितां निवडून घेतलें; आणि तुझ्या इच्छेप्रमाणें वर्तणें सोडून आपल्या वांछांप्रमाणें वर्तलों. मी आपल्या दुष्ट वासनेची इच्छा पूर्ण केली, परंतु आपला शेवट समजून घेतला नाहीं. आणि आपल्या दुष्टाईंत व अपराधांत अधिक अधिक पाप वाढविलें. यास्तव माझ्या लज्जेनें माझें तोंड झांकलें व मी निंदाहि पावलों; परंतु मला तुजवांचून कोणाचाहि आश्रय नाहीं; मला तुजकडूनच क्षमा होईल. तुजशिवाय माफी करणारा कोणी नाहीं, तुजकडूनच माफी होते. जर तूं आपल्या दासास न्यायांत आणशील, तर माझें सामर्थ्य काय! मी काय ! माझें जिणें काय !

आणि माझें सामर्थ्य काय ! व माझें बळ काय ! जसें धसकट इकडे तिकडे उडविलें जातें, तसें तें उडविलें जाईल. तर मी आपली चूक कशी आठवूं ! मी मुका झालों व निंदा पावलों, आणि माझ्या निंदेनें मला झांकलें. माझ्या मागण्या पूर्ण व्हाव्या ह्मणून मी सर्वदां तुझी प्रसन्नता मागतों; मला माझ्या अन्यायांपासून व पापापासून स्वच्छ धू; माझ्या अतिशय कष्टाकडे व माझ्या दास्यत्वांतील दारिद्राकडे पाहा. माझ्या उसास्यापासून व ओरडण्यापासून तूं आपला कान लपवूं नको. माझें बरें व्हावें ह्मणून तूं आपल्या सेवकाला (मला) हडप दे; आणि माझ्या संकटास ह्मण कीं, आतां पुरे. माझ्या मरणाच्या दिवसापूर्वीं तूं आपलें तारण मला दाखीव; ज्या दिवशीं मी आपल्या फासांत गुंतला जाईन तेव्हां तूं माझे खचण्यास आश्रय दे. माझ्या वांचण्याचा मला कंटाळा येईपर्यंत माझा जीव विषानें धाला; यास्तव माझें बरें होण्याची खूण मला दे; आणि आतां माझ्या सहायाकरितां ऊठ. माझ्या वतनाचा वांटा, माझें स्तुतिपात्र, माझें कल्याण करणारा, माझाच मोठेपणा, माझें स्तवन, आणि माझा सर्व आनंद व हर्ष तूंच नाहींस काय? माझ्या मनाचा उल्हास, माझ्या डोळ्याचा प्रकाश, माझा आश्रय, माझा प्रेम, आराम व हर्ष माझें सांत्वन व माझें-क्षेमहि तूंच आहेस. तूं आपली सेवा मला समजीव ह्मणजे मी तुझीच सेवा करीन, मला तूं फिरीव ह्मणजे मी फिरेन; मग माझ्या पश्चात्तापास* तूं प्रसन्न हो. तूं आपले मार्ग मला शिकीव आणि माझीं पावलें नीटाव; माझी प्रार्थना ऐक व माझे काकुळतीस उत्तर दे. मी आपल्या सर्व मनानें तुला शोधिलें; हे अनंता, माझ्या प्रार्थनेस † उत्तर दे. मी आपलीं अश्रुं तुला वाहतों, ह्मणून माझ्या अश्रूंनी माझीं पापें पुसून टाक. माझा जीव ह्मणतो कीं, परमेश्वर माझा वांटा व माझें वेतन आहे. ज्या दिवशीं मी (आपल्या लोकांस) जाऊन मिळेन तेव्हां तूं आपले दयेंकरून

* या शब्दाचा अर्थ "माझें उत्तर" असाहि होतो.
† या शब्दाचा खरा अर्थ व्याख्यान असा होतो.

माझे अपराध पुसून टाक. ज्या दिवशीं मी तुजपुढें चालेन तेव्हां तूं माझ्या चालण्यास प्रसन्न हो; आणि तुझी इच्छा पूर्ण करणाऱ्यांबरोबर माझ्या कृत्यांचें वेतन मला दे. आणि तुझे दयेचे दूत पाठवून ते मजपुढें येवोत, आणि जेव्हां मी येईन तेव्हां ते एका वाणीनें ह्मणोत कीं, तूं सुखरूपपणें ये. तुझ्या एदेन बागेंत ते मला नेवोत; आणि तेथें माझें राहणें होवो, ह्मणजे मी तुझ्या प्रकाशांत आनंद करीन, आणि गौरवानें माझें सांत्वन होईल. तुजपुढें राखून ठेवलेला उजेड मजकरितां झांकण व मंडप होवो, आणि तुझ्या पंखांच्या छायेखालीं मला आश्रय दे.

שְׁמַע קוֹלִי हे वाणी ऐकणाऱ्या आणि प्रार्थना मान्य करणाऱ्या देवा, माझी वाणी ऐके. हे अंत नाहीं असीं मोठालीं आश्चर्यकारक व भयंकर कृत्यें करणाऱ्या, हे बुद्धिवंता, सर्वकाळ अचळ आणि सर्व सामर्थ्यां पेक्षां अधिक सामर्थ्यवान असणाऱ्या, हे दयावंता, कृपावंता, चांगल्या, यथार्थ व पुष्कळ क्षमा करणाऱ्या, हे आब्राहाम इसहाक व इस्राएल यांस त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याकरितां उत्तर देणाऱ्या, हे योसेफास बंदिशाळेंत उत्तर देणाऱ्या, आणि त्यास खांचेंतून उंच पदास चढविणाऱ्या, मिसरांत आपल्या लोकांस उत्तर देऊन त्यांस बेड्यांतून सोडवून मुक्त करणाऱ्या, त्यांस समुद्रांत उत्तर देऊन पार करणाऱ्या, आणि त्यांच्या वैऱ्यांस खोलपणांत बुडविणाऱ्या, हे सीनाय पर्वतावर मोश्यास उत्तर देणाऱ्या, आणि आपल्या चांगुलपणाकडून सुटकेचें शुभवर्त्तमान त्यास कळविणाऱ्या. * हे आहारोनास धूप दाखवितांना आणि पिनहासास योग्य कृत्य † करितांना उत्तर देणाऱ्या, हे येहोशुआस आणि एलीस उत्तर देणाऱ्या, आणि हान्ना शब्देंकरून काकळूत करीत असतां तिलाहि उत्तर देणाऱ्या, हे शमुएलास तारणाकडून उत्तर

* टीका १

† जेव्हां इस्राएलांनी शिट्टीमांत मोआबी कन्यांसीं व्यभिचार केला तेव्हां पिनहासानें एका इस्राएली माणसास व एका मोआबी स्त्रीस भाल्यानें भोंसकिलें, हें त्याणें योग्य कृत्य केलें, आणि त्यामुळें इस्राएलांवरील पटकी बंद झाली.

देणाऱ्या, आणि प्रसवणारीस तिच्या वेदनांत उत्तर देणाऱ्या, हे पुष्कळ शांततेकडून, शेलोमोस उत्तर देणाऱ्या, आणि दावीद, ज्याने तुला चढण्याचीं गीतें गाइलीं त्यासही, हे येलीयास कार्मेल डोंगरावर जेव्हां (आकाशांतून) अग्नीने उतरून भक्ष खाल्ला* तेव्हां उत्तर देणाऱ्या, हे येलीशास तारणाकडून आणि हिजकीयास आरोग्यतेकडून उत्तर देणाऱ्या, हे योनास समुद्रामध्यें उत्तर देऊन अंधारांतून त्यांस उजेडांत आणणाऱ्या, हे हानानया, आजारया व मीशाएल यांस चमत्काराने सोडवून उत्तर देणाऱ्या, हे दानिएल ज्यास तुझ्या दूताने सिंहापासून सोडविलें त्यास दयेकरून उत्तर देणाऱ्या, हे मोरदेखाय व एस्तेर यांच्या दुःखास पालटून हर्ष करून त्यांस उत्तर देणाऱ्या, हे सहायाकडून एझरास आणि हाशमानीम कुटुंबास † लढाईत उत्तर देणाऱ्या, हे होनी ‡ ज्याने तुझ्या मोठ्या आश्चर्यकारक नामाची शपथ वाहिली, त्यास कुंडलींत उत्तर देणाऱ्या, हे (तुझ्या) मंडळींत पिढोपिढीं झालेल्या सात्विकांस व सरळांस उत्तर देणाऱ्या, हे वादळांत समुद्रांतलि तारवांस उत्तर देणाऱ्या, आणि हे रोग्यास त्याच्या दुःखांत उत्तर देणाऱ्या, हे अरण्यांत चालणाऱ्यांस उत्तर देणाऱ्या, आणि हे वेड्यांनी लादलेल्यांस उत्तर देणाऱ्या, हे सर्व जे तुजपुढें ओरडतात व हाक मारितात त्यांस, आणि जे तुजपुढें प्रार्थना करायास येतात त्यांस उत्तर देणाऱ्या, (माझी वाणी ऐक.)

עֲנֵנִי עֲנֵנִי अति नीच झालेला जो गरीब त्यास उत्तर दे; आणि हे प्रार्थना मान्य करणाऱ्या, त्याचीं पापें क्षमा कर. आणि आपल्या दयेने त्याच्या (आयुष्याचीं) वर्षें वाढीव, आणि त्याच्या सर्व मागण्या पूर्ण होण्यास आज्ञा कर. त्याच्या सर्व प्रार्थ-

---

* राजे. १८, १७-४०.

† दुसऱ्या पवित्र मंदिरांतलि मतातया मुख्य आचार्य याच्या कुटुंबास हासमोनीम कुटुंब असें म्हटलें आहे व० प्र० प्रा० टीक७ पाहा.

‡ याविषयीं पा० क्ष० प्रा० पृष्ठ ३९ याखालीं केलेली टीका पाहावी. योसिफस इतिहासकर्ताहि याविषयीं प्रमाण देतो.

ना तुजपुढें (दाखविलेल्या) धूपासारिख्या आणि तुजपुढें केलेल्या अर्पणासारिख्या व होमासारिख्या मोज. हे देवा, प्रार्थना मान्य करणाऱ्या आणि वाणी ऐकणाऱ्या, माझी वाणी ऐक.

मग शास्त्र काढते वेळीं हें मोठयाने बोलतात.

כהניך ילבשו צדק तुझ्या याजकानीं नीतिमत्व पांघरावें, आणि तुझ्या भक्तानीं हर्षशब्द करावा. तूं आपला सेवक दावीद यामुळें आपल्या अभिषिक्ताचें तोंड विन्मुख करूं नको.

ברוך המקום व. प्र. प्रा. पृष्ठ ८७.

רוממו ״ व. प्र. प्रा. पृष्ठ ८७.

मंडळींत जो वृद्ध असून ज्ञानी व ईश्वरभय धरणारा असेल

त्याने हें बोलावें.

בישיבה של מעלה वरील (आकाशांतिल) न्यायसभेंत व खालच्या (पृथ्वीवरील) न्यायसभेंत, सर्वव्यापक जो धन्य देव त्याच्या हुकुमावरून व या पवित्र मंडळीच्या हुकुमावरून, आह्मास आज्ञाभंग करणाऱ्यांबरोबरहि प्रार्थना करावयास योग्य आहे.

כל נדרי जे सर्व नवस आह्मी केले असतील, नवस करून जीं बंधनें पत्करिलीं असतील, ज्या शपथा वाहिल्या असतील, ज्यांस अपांक केलें असेल, ज्यांस धर्मबाह्य* केलें असेल, जे कोनाम, कोनाह व कोनास † केले असतील, ह्मणजे गेल्या प्रायश्चित्ताच्या दिवसापासून हा प्रायश्चित्ताचा दिवस जो आह्मावर शांतीने आला आहे एथपर्यंत; आणि या प्रायश्चित्ताच्या दिवसापासून पुढील प्रायश्चित्ताचा दिवस आह्मावर शांतीने येईपर्यंत (जे करूं;) ते नवस, नवस नसोत; त्या शपथा, शपथा नसोत; तें अपांक करणें, अपांक करणें नसो; तें धर्मबाह्य करणें, धर्मबाह्य करणें नसो; आणि तें नवस क-

---

* टीका २. † टीका ३.

रून बंधन पत्कारिणें, नवस करून बंधन पत्कारिणें नसो; त्या सर्वांविषयीं आह्मी पश्चात्ताप करितों. आणि (ईश्वराची) अशी प्रसन्नता होवो कीं, ते सर्व बंद व रद्द होवोत, ते मंजूर व स्थापित न होवोत. अशी इस्राएलाच्या संतानांच्या सर्व समुदायाला व त्यांमध्यें राहाणाऱ्या विदेश्याला, त्याची क्षमा होवो; कारण कीं सर्व लोकांकडून तें चुकून झालें होतें. (हें तीन वेळ बोलावें.)

ברשות מורי ורבותי माझे गुरु व स्वामी यांच्या आज्ञेवरून (मी ही स्तुति करितों.)

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मास या वेळेपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोंहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

הנותן תשועה राजास आशीर्वाद व. प्र. प्रा. पृष्ठ ९२.

מי שברך मंडळीस आशीर्वाद व. प्र. प्रा. पृष्ठ ९३.

शास्त्र काढणें विकत घेणाऱ्या नवऱ्यांस आशीर्वाद.

מי שברך ज्याने आमचे पूर्वज आब्राहाम, इसहाक, याकोब, मोशे, आहारोन, दावीद आणि शेलोमो यांस आशीर्वाद दिल्हा तोच, कीर्तिमान नवरा, गौरवयुक्त, महत्त्ववान, व प्रतिष्ठित स्वामी (अमुक,) (पुरी होणारी शास्त्राची प्रत घेणारास) जो आमच्या देवाचें शास्त्र पुरें करण्यास निवडिलेला आहे, (आरंभिली जाणारी शास्त्राची प्रत घेणारास) जो आमच्या देवाचे शास्त्रास आरंभ करण्यास निवडिलेला आहे त्यास, राजांचा राजा रक्षो व जीवंत राखो, आणि सर्व संकटें व भय यांपासून सोडवो, आणि देव त्यास चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिहो, असी त्याची प्रसन्नता होवो, आणि आपण तथास्तु ह्मणूं.

शास्त्र ठेवते वेळीं हें बोलावें.

ימלוך יי לעולם परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो; सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे, तुह्मी परमेश्वराला स्तवा.

מזמור לדוד הבו ליי גीत २९.

שובה למעונך व. प्र. प्रा. पृष्ठ १०३.

शास्त्र ठेविल्यावर हाज्जानानें एथून आरंभ करावा.

שפל רוח मी नम्र आत्म्याचा होऊन व आपले गुढघे व बांधा लववून आणि आपधाकून भयानें तुजपुढें येतों. मी आपल्या दृष्टींत आपणास तुजपुढें भूमीवरील लाहान किडा असें मानितों. ज्याच्या महत्त्वास अंत नाहीं असा जो विश्वंभर, त्या तुझी स्तुति मजसारिखा कशानें करील. तुझ्या गौरवाचें (वर्णन करायास) आकाशांतलि दूतहि शकत नाहींत, तर मी एकटा किती करूं शकेन. तूं चांगलें करितोस व पुष्कळ दया राखितोस याकरितां सर्व प्राणिमात्र तुला थोर मानून स्तवितील.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्यानें (देवानें) आपल्या इच्छेप्रमाणें केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचावलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत आणि सर्व इस्राएलांच्या घराण्यांच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन, त्याचें तारण उगवो आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु; त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति, व जी सिद्धि जगांत गाजविली जाते, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त उंचावलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु ह्मणा.

והוא רחום तो ममताळू आहे यास्तव, तो अन्यायाची क्षमा करितो, नाश करीत नाहीं; तो बहुतवेळ आपला राग टाळितो, आणि आपला सर्व संताप चेतवीत नाहीं; हे परमेश्वरा, तारण कर, आह्मी हांक मारितों, त्या दिवशीं राजानें आह्मास उत्तर द्यावें.

" ברכו את " सुवंदित परमेश्वराला तुह्मी धन्य ह्मणा.

हाज्जान वरील वाक्य बोलत असतां मंडळीनें हें हळू बोलावें.

ישתבח ויתפאר राजा, राजांच्या राजा आणि पवित्र व धन्य जो, त्याचें नाम स्तविलें आणि गौरविलें जावें. पहिला तोच व शेवटालाहि तोच आणि त्यावांचून कोणी देव नाहीं. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाम सुवंदित व सर्व स्तुति व प्रशंसेपेक्षां अधिक उंचावलेलें असो.

मग मंडळीनें मोठयानें हें ह्मणावें.

ברוך " המבורך सुवंदित परमेश्वर सदांसर्वकाळ धन्य असो.

" ברוך אתה " हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या शब्देंकरून संध्याकाळ करणाऱ्या, ज्ञानानें (आकाशाचीं) द्वारें उघडणाऱ्या, बुद्धीनें ऋतूंस पालटणाऱ्या, वेळ फिरविणाऱ्या, आपल्या इच्छेप्रमाणें ताऱ्यांस आकाशामध्यें त्यांच्या मार्गानें चालविणाऱ्या, दिवस व रात्र उत्पन्न करणाऱ्या, काळोखापुढून उजेड आणि उजेडापुढून काळोख हटविणाऱ्या, दिवस घालवून रात्र आणणाऱ्या, आणि दिवस व रात्र यांमध्यें भेद राखणाऱ्या, तूं धन्य आहेस. ज्याचें नाम सैन्याचा परमेश्वर तो तूंच. हे परमेश्वरा, संध्याकाळ करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אהבת עולם त्वां आपला लोक इस्राएल याच्या घराण्यावर अखंड ममतेनें दया केली आहेस. त्वां आह्मास शास्त्र, विधि, नियम व न्याय शिकविले आहेस. यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, निजतांना व उठतांना आह्मी तुझ्या नियमाचें ध्यान करूं. आणि तुझ्या शास्त्रांतील, विधींतील आणि नियमांतील बोधक गोष्टींविषयीं सर्वकाळ आनंद व उल्हास मानूं; कारण त्या आमचें जीवन व आमच्या आयुष्याचें दीर्घत्व आहेत; त्यांविषयीं रात्रंदिवस आह्मी

मनन करूं. आणि तूं आपली दया व कृपा आह्मावरून कधींहि काढूं नको. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांवर प्रीति करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे.

हें वाक्यहि मोठ्याने बोलावें.

ברוך שם त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.

" ואהבת את तर तूं आपल्या सर्व अंतःकरणाने व आपल्या सर्व जिवाने व आपल्या सर्व शक्तीने आपला देव परमेश्वर यावर प्रीति कर. आणि मी आज तुला ज्या गोष्टी आज्ञेने सांगतों, त्या तुझ्या हृदयांत असाव्या. आणि तूं आपल्या लेंकरांजवळ ह्या पुनःपुनः सांग; आणि आपल्या घरीं बसतांना आणि वाटेवर चालतांना, आणि निजतांना आणि उठतांना याविषयीं बोलत जा. आणि तूं ह्या आपल्या हातासीं खुणेसाठीं बांध, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं कपाळभूषण असा असूं दे. आणि आपल्या घरांच्या दारांच्या बाह्यांवर व आपल्या दरवाज्यावर त्या लिही.

והיה אם שמוע आणि ज्या आज्ञा मी आज तुह्मास लावून देतों, त्या जर तुह्मी ऐकालच ऐकाल, ह्मणजे आपल्या सर्व हृदयाने व आपल्या सर्व जिवाने आपला देव परमेश्वर यावर प्रीति कराल, आणि त्याची सेवा कराल; तर असें होईल कीं, मी यथाकाळीं तुमच्या देशाचा पाऊस पहिली व मागली वृष्टि पाडीन; अशाने तूं आपलें धान्य व आपला ताजा द्राक्षारस व आपलें तेल यांचा संग्रह करसील. आणि मी तुझ्या पशूसाठीं तुझ्या कुरणांत गवत वाढवून देईन; असा तूं खाऊन तृप्त होसील. तुह्मी आपणाविषयीं सांभाळा, नाहीं तर तुमचें हृदय फसेल; आणि तुह्मी वळून

दुसऱ्या देवांची सेवा कराल व त्यांचें भजन कराल. मग परमेश्वर तुह्मावर रागें भरेल. आणि तो आकाशाला असें बंद करील कीं, पाऊस होणार नाहीं, भूमीहि आपलें उत्पन्न देणार नाहीं; आणि जो चांगला देश परमेश्वर तुह्मास देतो, त्यांतुन तुह्मी लवकर नाहींसे व्हाल. तर तुह्मी ह्या गोष्टी आपल्या हृदयांत व आपल्या जिवांत ठेवा, आणि आपल्या हातासीं खुणेसाठीं त्या बांधा आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं कपाळभूषण अशा असूं द्या. आणि तुह्मी आपल्या लेंकरांस त्या शिकवा; ह्मणजे जेव्हां तूं आपल्या घरीं बसतोस, आणि जेव्हां वाटेने चालतोस आणि जेव्हां निजतोस, आणि जेव्हां उठतोस, तेव्हां त्यांविषयीं बोलत जा. आणि आपल्या घरांच्या दारांच्या बाह्यांवर व आपल्या दरवाज्यावर त्या लिही. ह्मणजे जी भूमि परमेश्वराने तुमच्या पूर्वजांजवळ शपथ वाहून त्यांस देऊं केली, तिजवर तुमचे दिवस व तुमच्या लेंकरांचे दिवस पुष्कळ होतील; जसे पृथ्वीवर आकाशाचे दिवस तसे.

" ויאמר आणि परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें कीं, तूं इस्राएलाच्या संतानांजवळ बोलून त्यांस सांग कीं, त्यानी आपल्या पिढीपरंपरा आपल्यासाठीं आपल्या वस्त्रांच्या कांठांस झालर लावावी, आणि कांठाच्या झालरीस निळा नाडा लावावा. ती झालर तर तुह्मास असी व्हावी कीं, तुह्मी ती पाहून परमेश्वराच्या सर्व आज्ञा आठवाव्या आणि त्यांप्रमाणें आचरण करावें, असें कीं ज्यांस अनुसरून तुह्मी व्यभिचारी झालां, ह्मणजे आपलें हृदय व आपली दृष्टि, त्याच्या मागें जाऊं नये. यासाठीं कीं, तुह्मी माझ्या सर्व आज्ञा आठवून पाळाव्या, आणि आपल्या देवासाठीं पवित्र व्हावें. मी परमेश्वर तुमचा देव; ज्याने तुमचा देव असा होण्यासाठीं तुह्मास मिसर देशांतून आणिलें तोच मी परमेश्वर तुमचा देव आहें.

אלהיכם אמת " परमेश्वर तुमचा देव सत्य आहे.

אמת ואמונה हें सर्व सत्य, निःसंशय, आणि आह्मा-

मध्यें स्थापित आहे कीं, तोच आमचा परमेश्वर देव आहे; त्या शिवाय दुसरा कोणी नाहीं; आणि आह्मी इस्त्राएल त्याचे लोक आहों. आमच्या तारकाने राजांच्या हातांतून आह्मास खंडून काढलें; आमच्या राजाने बलात्काऱ्यांच्या पंजांतून आह्मास सोडविलें. त्याच देवाने आह्मासाठीं आमच्या वैऱ्यांचा सूड घेतला आणि आमच्या जिवाच्या सर्व शत्रूंस योग्य दंड केला. तो आमचा प्राण वांचवितो, आणि आमचे पाय सरकूं देत नाहीं. त्याने आह्मास आमच्या शत्रूंच्या उंच स्थानावरून चालविलें, आणि आमच्या सर्व द्वेष्ट्यांवर आमचें शिंग उभारिलें. त्याच देवाने हामाच्या वंशाच्या देशांत चमत्कार व आश्चर्यकर्में करून आह्मासाठीं फारोचा सूड उगविला. त्यानेच आपल्या रागानें मिसरांतील सर्व जेष्ठ पुत्र मारून आपल्या इस्त्राएल लोकांस निरंतरच्या मोकळिकीकरितां त्यांमधून काढिलें. त्याने आपल्या लेंकरांस सूफ समुद्राच्या विभागांमधून चालवून त्यांचा पाठलाग व द्वेष करणारांस डोहांत बुडविलें. त्याच्या लेंकरानी (असा) त्याचा पराक्रम पाहून त्याच्या नामाचें कीर्तन व स्तवन केलें, आणि स्वइच्छेने त्याचें राज्य आपणावर मान्य केलें. मोशे व इस्त्राएलांच्या लेंकरानी मोठ्या आनंदाने गायन करून एकदांच म्हणाले, हे परमेश्वरा, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोण? पवित्रतेने महान, स्तवण्याविषयीं भयमान, चमत्कार कर्ता असा तुजसारिखा कोण आहे? हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सर्व लेंकरानी समुद्र (तिरीं) तुझी राजसत्ता पाहिल्यावरून तुझी स्तुति केली, आणि तुझें राज्य आपणावर मान्य करून म्हणाले, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. आणि असें म्हटलें आहे कीं, परमेश्वराने याकोब उद्धरिला आहे, आणि त्यापेक्षां जो बलवान होता त्याच्या हातांतून त्यास सोडविलें आहे. हे परमेश्वरा, इस्त्राएलाच्या उद्धारका, तूं धन्य आहेस.

השכיבנו אבינו हे आमच्या बापा, आह्मास शांतीने झोंप लागूं दे; आणि हे आमच्या राजा, चांगल्या जीवनाने व शांतीने आह्मास उठीव. हे आमच्या राजा, तूं आपला सुखाचा

मंडप आह्मावर पसरून आपल्या सुबोधानें आह्मास सुधार; तूं आपल्या नामास्तव लौकर आमचें तारण व संरक्षण कर; आणि आपला दयेचा व सुखाचा मंडप आह्मावर पसर. हे परमेश्वरा, आह्मावर, आपल्या सर्व इस्राएल लोकांवर, आणि येरूशालेमेवर आपला सुखाचा मंडप पसरणाऱ्या, तूं धन्य आहेस.

शाब्बाथ असल्यास हेंहि बोलावें.

ושמרו בני ישראל आणि शाब्बाथ पाळायास इस्राएलाच्या संतानानी त्यांच्या पिढ्यानपिढीं शाब्बाथाला सर्वकाळ कराराप्रमाणें मानावें. माझ्या व इस्राएलाच्या संतानांमध्यें ती सर्वकाळपर्यंत खूण, कारण कीं सहा दिवसांत परमेश्वराने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली, आणि सातव्या दिवशीं स्वस्थ राहून विसांवा घेतला.

शाब्बाथ नसल्यास मात्र हें बोलावें.

כי ביום הזה कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो* प्रायश्चित्त करील, मग तुह्मी शुद्ध व्हाल.

קדיש לעילא पृष्ठ ९.

हें उभें राहून हळू व एकचित्ताने बोलावें.

אדני שפתי हे प्रभु, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, आब्राहाम, इसहाक व याकोब यांच्या देवा, मोठ्या, पराक्रमी, भयंकर व परात्पर देवा, कृपादानें देणाऱ्या, सर्व पदार्थांच्या धनी, पूर्वजांच्या यथार्थतेची आठवण करणाऱ्या, आणि दयेंकरून आपल्या नामाकरितां त्यांच्या संततीसाठीं उद्धारक पाठविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

זכרנו לחיים हे जीविनांत आनंद मानणाऱ्या देव-

* मुख्य याजक.

राजा ! जीवनाकरितां आमची आठवण कर, हे जीवनाच्या देवा, तूं आपणाकरितां आह्मास जीवनाच्या पुस्तकांत लिही (दरबार बंद होण्याच्या वेळेच्या प्रार्थनेंत– आह्माविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.) हे जीवंत देवा, तूं राजा, सहायकर्ता, तारक व आह्मावर ढालरूप असणारा आहेस. हे परमेश्वरा, आब्राहामाच्या ढालरूप (आश्रया!) तूं धन्य आहेस.

אתה גבור हे प्रभू, तूं सर्वकाळ पराक्रमी आहेस! मेलेल्यांस जीवंत करणारा, तारायास समर्थ, दहिंवर पाडणारा, कृपेने प्राणिमात्रांचें पोषण करणारा, बहुत दयेनें मेलेल्यांस जीवंत करणारा, पडलेल्यांस आश्रय देणारा, रोग्यांस निरोगी करणारा, बंदिवानांस मोकळें करणारा, आणि धुळींत निजलेल्यांबरोबर आपली सत्यता स्थापन करणारा तूंच आहेस. हे अद्भुत कृत्यें करणाऱ्या, तुजसारिखा कोण ! आणि हे राजा, मारणाऱ्या, जिवंत करणाऱ्या व तारण उगीवणाऱ्या, तुझी बरोबरी कोण करूं शकेल !

מי כמוך हे दयाळू बापा, दयेनें प्राणिमात्रांची जीवनाकरितां आठवण करणाऱ्या, तुजसारिखा कोण आहे ? आणि मेलेल्यांस जीवंत करणारा तूं सत्य आहेस. हे परमेश्वरा, मेलेल्यांस जीवंत करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אתה קדוש तूं पवित्र आणि तुझें नामहि पवित्र आहे, आणि धार्मिक मनुष्यें नित्य तुझें स्तवन करितात.

לדור ודור पिढीपिढीं तुह्मी देवाचें राज्य मान्य करा; कारण तो एकटाच महान व पवित्र आहे.

ובכן יתקדש यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या इस्राएल लोकांमध्यें तुझें नाम पवित्र मानिलें जावो.

ובכן תן פחדך यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या सर्व कामांवर आपलें भय, जें सर्व त्वां उत्पन्न केलें आहेस त्यावर आपला त्रास घाल, ह्मणजे सर्व कृत्यें तुला भितील आणि सृष्टींतील सर्व पदार्थ तुजपुढें नमन करितील; आणि पूर्णमनानें तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां ते एकमेळा करितील. कारण

हे परमेश्वरा, आमच्या देवा, आह्मी जाणतों कीं, राज्य तुलाच (शोभतें), सामर्थ्य तुझ्या हातीं व पराक्रम तुझ्या उजव्या हातीं आहे; आणि सर्व उत्पन्न केलेले पदार्थांस तुझें नाम भयंकर आहे.

ובכן תן כבוד यास्तव लवकर व आमच्या आयुष्याच्या दिवसांत तूं आपल्या लोकांस मोठेपणा दे; आपल्या भिणाऱ्यांची प्रशंसा कर, आपल्या शोधणाऱ्यांस चांगली आशा व आपली वाट पाहाणाऱ्यांस भरंवसा दे, आपल्या देशास आनंदित कर, आपल्या नगरास हर्षित कर, आपला सेवक दावीद याचें शिंग उगीव आणि इशायाचा पुत्र माशीयाह याचा दिवा सिद्ध (प्रकाशित) कर.

ובכן צדיקים यामुळें पुण्यवान पाहून आनंद करितील, यथार्थ हर्ष करितील, आणि धार्मिक उल्हासानें गातील; परंतु पापाचें तोंड बंद होईल, दुष्टाई धुराप्रमाणें नाहींसी होईल ; कारण दुष्कर्माचा अधिकार तूं पृथ्वींतून काढून टाकिशील.

ותמלוך אתה मग हे परमेश्वरा आमच्या देवा, तूं आपल्या सर्व कृत्यांवर सियोन डोंगर, जें तुझ्या गौरवाचें वसतिस्थान, आणि यरूशालेम जें तुझें पवित्र नगर, त्यांमध्यें लवकरच राज्य करिशील, तुझ्या पवित्र वचनांतहि तसेंच लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्व काळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढीपिढीं आहे, तुह्मी परमेश्वराला स्तवा.

קדוש אתה तूं पवित्र आहेस, आणि तुझें नामहि भयंकर आहे, आणि तुजवांचून दुसरा कोणी देव नाहीं, आणि लिहिलेलेंहि तसेंच आहे कीं, सैन्यांचा परमेश्वर नीतीनें उंचावेल, आणि देव जो पवित्र त्याला न्यायानें पवित्र मानितील. हे परमेश्वरा, पवित्र राजा, तूं धन्य आहेस.

אתה בחרתנו त्वां आह्मास सर्व लोकांतून निवडून घेतलें, आह्मावर प्रीति करून व आह्मास प्रसन्न होऊन सर्व भाषांपेक्षां (जातींपेक्षां) आह्मास उंचाविलें; आपल्या आज्ञांकडून आह्मास पवित्र केलें; हे आमच्या राजा, आपली सेवा करण्याकरितां आ-

ह्मास जवळ घेतलें, आणि तुझें मोठें व पवित्र नाम आह्मास दिल्हें आहे.

ותתן לנו आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, प्रीतिभावें-करून माफी, सुटका व क्षमा होण्याकरितां, आणि आमचे सर्व अपराध क्षमा होण्याकरितां तूं आह्मास (शाब्बाथ असल्यास—हा शाब्बाथ दिवस व) हा प्रायश्चित्ताचा दिवस, हा अपराधाच्या क्षमेचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा दिवस, जो मिसरांतून निघण्याच्या आठवणीकरितां प्रीतिरूप पवित्र मेळा तो, दिला आहेस.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, (शाब्बाथ असल्यास—या शाब्बाथ दिवशीं, व) या प्रायश्चित्ताच्या दिवशीं, या अपराधांच्या क्षमेच्या दिवशीं, या पवित्र मेळा मिळण्याच्या दिवशीं, आमचे अपराध क्षमा कर, आणि आमचीं उलंघनें पुसून टाक व तुझ्या दृष्टीपुढून दूर कर. जसें ह्मटलें आहे कीं, जो तुझे अपराध आपण होऊन पुसून टा-कितो तो मी, मीच आहें, आणि तुझीं पातकें मी स्मरणार नाहीं. आणखी असें ह्मटलें आहे कीं, म्यां तुझे अपराध अभ्राप्रमाणें व तुझीं पातकें ढगाप्रमाणें पुसून टाकलीं आहेत ; म्यां तुला उद्धारि-लें ह्मणून मजकडे परत ये. आणखीहि असें ह्मटलें आहे कीं, याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुह्मास परमेश्वरा समोर शुद्ध करा-यास तो प्रायश्चित्त करील, मग तुह्मी शुद्ध व्हाल.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची, आमच्या पूर्वजांची, तुझ्या यरूशालेम नगराची, तुझा सेवक दावीद याचा पुत्र जो माशीयाह त्याची, आणि तुझे सर्व लोक इस्राएलाचें घराणें यांची, आठवण (शाब्बा-थ असल्यास—या शाब्बाथ दिवशीं व) या प्रायश्चित्ताच्या दिवशीं, या अपराधाची क्षमा होण्याच्या दिवशीं, या पवित्र मेळा मिळण्याच्या दिवशीं, यशस्वी तारणाकरितां कृपेनें, दयेने व ममतेने तुजपुढें चढो, येवो, पोंहोचो, पाहिली जावो, मान्य होवो, ऐकिली जावो,

लक्षांत आणिली आणि आठविली जावो. आह्मावर दया करण्यास व आमचें तारण करण्यास, हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचें कल्याण होण्याकरितां आमची आठवण कर; आह्मावर आशीर्वाद होण्याकरितां आह्मास दर्शन दे; आह्मास चांगलें जीवन प्राप्त होण्याकरितां आमचें तारण कर; तारणाच्या व दयेच्या वचनाने आह्मास राख, आह्मावर कृपा कर, आमची करूणा येऊं दे, आह्मावर दया कर आणि आह्मास तार; कारण तूंच दयाळू व कृपाळू देवराजा आहेस; ह्मणून आमचे डोळे तुजकडे लागले आहेत.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, सर्व जगावर तूं आपल्या गौरवाने राज्य कर; आपल्या वैभवाने सर्व पृथ्वीवर थोर मानिला जा; आणि आपल्या सामर्थ्याच्या महत्वाने भूमंडळाच्या राहाणाऱ्यांवर प्रकाशित हो, मग सर्व उत्पन्न केलेले(पदार्थ)जाणतील, कीं त्वां त्यांस उत्पन्न केलें; सर्व घडविलेले (पदार्थ) जाणतील, कीं त्वां त्यांस घडिलें; आणि ज्यांच्या नाकपुड्यांत श्वास आहे, ते ह्मणतील कीं, इस्राएलांचा परमेश्वर देव राज्य करितो; आणि त्याचा अधिकार सर्वांवर चालतो.

קדשנו במצותיך तूं आपल्या आज्ञांकडून आह्मास पवित्र कर; तुझें शास्त्र आमचें वतन होऊं दे; आपल्या चांगुलपणाकडून आह्मास तृप्त कर; आपल्या तारणाकडून आमचा जीव आनंदित कर; तुझी सेवा सत्यानें करायास आमचीं मनें शुद्ध कर; कारण तूं (स्वतां) सत्य परमेश्वर देव आहेस; आणि हे आमच्या राजा, तुझें वचन सर्वकाळ सत्य व स्थापित आहे. हे परमेश्वरा राजा, आमचे अपराध व आपले लोक इस्राएल यांचे अपराध माफ व क्षमा करणाऱ्या, आणि वर्षोवर्षीं आमचे अतिक्रम दूर करणाऱ्या, सर्व पृथ्वीच्या राजा, (शाब्बाथ असल्यास— शाब्बाथास व) इस्राएलास व प्रायश्चित्ताच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

רצה " אלהינו हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या इस्राएल लोकांस प्रसन्न हो, त्यांची प्रार्थना मनावर घे,

आपल्या घराच्या प्रसादस्थानीं पूजन पुन: चालू कर, इस्राएलांचीं अर्पणें व त्यांची प्रार्थना लवकर आवडीने मान्य कर, आणि तुझ्या इस्राएल लोकांची भक्ति तुला आवडो.

ואתה ברחמיך הרבים तूं आपल्या बहुत दयेने आह्माविषयीं संतोषित होऊन आह्मास प्रसन्न हो, मग आमचे डोळे तुला कृपेकरून सियोनेकडे फिरतांना पाहतील; हे परमेश्वरा, आपला शेखीना* सियोनेमध्यें पुन: स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

מודים אנחנו לך सदासर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव जो तूं, तुलाच आह्मी स्तवितों.† तूं आमचा व आमच्या जीवाचा खडकरूप आश्रय व आमच्या तारणाची ढाल आहेस. आमचा जीव तुझ्या हातीं सोंपिलेला आहे, आमचा आत्मा तुझ्या स्वाधीन आहे, तुझे चमत्कार आह्मामध्यें नित्य केले जातात, आणि तुझीं आश्वर्यकृत्यें व तुझा चांगुलपणा आह्मी संध्याकाळीं, सकाळीं व दोनप्रहरीं अनुभवितों; त्याकारितां आह्मी पिढोपिढीं तुझें कीर्तन करूं व तुझे स्तुतीचें वर्णन करूं. तूं चांगला आहेस, कारण तुझी दया (आह्मावरून) नाहींसी होत नाहीं. तूं कृपाळू, कारण सर्वकाळ आह्मी तुजवर आशा ठेवितों, ह्मणून तुझी कृपा आह्मावरून सरत नाहीं.

ועל כלם יתברך हे आमच्या राजा, या सर्व (दयेवरून) तुझें नाम अखंडित व सर्वकाळ धन्य ह्मटलें, उंचाविलें व वर्णिलें जावो. आणि सर्व प्राणी तुझें स्तवन करोत. सेलाह. तूं आपल्या कराराच्या लेंकरांस चांगल्या जीवनाकरितां लिही. (दरबार बंद होण्याच्या वेळेच्या प्रार्थनेंत— तूं आपल्या कराराच्या लेंकराविषयीं जीवनाच्या पुस्तकांत मोहोर कर.)

ויהללו ויברכו मग हे आमच्या तारणाच्या व सहायकारी देवा, आणि हे उत्तम देवा, ते सर्वकाळ तुझ्या मोठ्या नामास सत्यतेने स्तवितील; आणि धन्य ह्मणतील, कारण तें चांगलें

---

* साक्षात्कार † स्तवितों याच्या इब्री शब्दाचा अर्थ कोणी अभिकार मान्य करितों असाहि करितात.

आहे. सेलाह. हे परमेश्वरा, तूं धन्य आहेस, चांगलें तुझें नाम आणि स्तवन तुलाच शोभतें.

שים שלום (हे परमेश्वरा,) आह्मावर व तुझ्या सर्व इस्राएल लोकांवर चांगले, आशीर्वाद, जीवन, दया, कृपा, यथार्थता व ममता असूं दे, आणि हे आमच्या बापा, तूं आपल्या मुखतेजाकडून आम्हां सर्वांस एक मेळी आशीर्वाद दे, कारण हे आमच्या बापा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मास शास्त्र व जीवन, प्रीति व दया, यथार्थता व कृपा, आशीर्वाद व शांति दिल्ही आहेत, आणि आह्मास व तुझ्या सर्व इस्राएल लोकांस मोठा सामर्थ्यरूप व कल्याणयुक्त आशीर्वाद देण्यास तुझ्या दिसण्यांत चांगलें असो.

ובספר חיים आणि आम्ही व तुझे सर्व इस्राएल लोक हे (दरबार बंद होण्याच्या वेळेच्या प्रार्थनेंत— आह्माविषयीं व तुझे सर्व इस्राएल लोक यांविषयीं) चांगल्या जीवनाकरितां व कल्याणाकरितां, जीवनाच्या, आशीर्वादाच्या, कल्याणाच्या, चांगल्या अन्नसामग्रीच्या, तारणाच्या, समाधानाच्या, व चांगल्या निवाड्याच्या पुस्तकांत तुजपुढें आठवण होऊन लिहिले जावोत (दरबार बंद होण्याच्या वेळेच्या प्रार्थनेंत— मोहोर केली जावो.)

" **ברוך אתה** हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

יהיו לרצון हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें आणि माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची प्रार्थना तुजपुढें यावी असें आम्ही मागतों; आणि आमच्या विनंतीपासून तूं लपून राहूं नको; कारण आम्ही यथार्थ आहों, आम्ही पाप केलें नाहीं, असें तुजपुढें बोलायास, हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मास धिटाई व धारिष्ट नाहीं. निश्चयें आह्मी व आमच्या वडिलांनीहि पाप केलें आहे.

אשמנו בגדנו आम्ही अतिक्रम केले, विश्वासघात

केला, लुटलें, चाहाडी व वाईट भाषणें केलीं, अपराध केले, दुष्टाई केली, गर्व केला, जुलूम केला, खोटें रचिलें व वाईट योजनाहि केल्या. भोंदलें, थट्टा केली, बंडावा केला, अपवाद केला, व्यभिचार केला, व्यर्थ व खोट्या शपथीहि वाहिल्या. अनिवार झालों, वांकडे वर्तलों, उलंघनें केलीं, दुःख दिल्हें, आह्मी आपली मान ताठरहि केली. दुराचार केले, नासलें, ओंगळ केलें, बहकलों, आणि दुसऱ्यासहि बहकविलें. आणि आह्मी तुझे सुंदर नियम व न्याय सोडून फितूर झालों; परंतु तेणेंकरून आह्मास कांहीं लाभ झाला नाहीं. तथापि जें अवघें आह्मावर आलें आहे त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहेस, परंतु आह्मी दुष्टाई केली आहे.

מה נאמר हे उंचस्थानीं राहणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय ह्मणूं, आणि हे आकाशांत वस्ती करणाऱ्या, आह्मी तुजपुढें काय कळवूं? तूं गुप्त व उघड गोष्टी जाणत नाहींस काय? तूं जगांतील सर्व गुह्य आणि प्राणिमात्रांचीं गुप्तकर्में जाणतोस. तूं सर्वांचीं अंतर्यामें पारखितोस, मन व गुर्दे कमळें पाहातोस, तुजपुढें कांहींच झांकलें जात नाहीं; आणि तुझ्या दृष्टीपासून कांहींच लपलें जात नाहीं.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, त्वां आह्मावर दया करावी, आह्मास आमचीं सर्व पापें माफ करावीं, आह्मास आमचे सर्व अपराध क्षमा करावे, आणि आमचीं सर्व उलंघनें माफ व क्षमा करावीं; असी तुझी प्रसन्नता होवो.

על חטא जें पाप आह्मी अगत्यामुळें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी निर्बुद्धीने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी उघडपणें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी जाणून व कपटाने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी मन विचाराने केलें असेल त्याची.
जें पाप आम्ही तोंडच्या वचनाने केलें असेल त्याची.
जें पाप आम्ही गर्विष्ठपणें केलें असेल त्याची.
जें पाप आम्हीं बळकट हाताने केलें असेल त्याची.

जें पाप आम्ही ओंठाच्या विटाळाने केलें असेल त्याची.
जें पाप आम्ही दुष्टवासनेने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी जाणून आणि न जाणून केलें असेल त्याची.
जें पाप आम्ही ठकबाजीने व लबाडीने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी वाईट जिव्हेने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी डोळ्याच्या नजरेने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी उन्मत्तपणें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी व्याजामुळें व वाढीमुळें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी गुप्तपणें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी उंचदृष्टीने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी आशा देऊन केलें असेल त्याची.
जें पाप आम्ही पायांच्या पावलानीं केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी ताठर मानेने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी चाहाडीने केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी आपल्या शरीरांतलि व त्याप्रमाणें आमचा जीव, आत्मा व प्राण यांतीलहि दोनशें अठेचाळीस अवयव व तीनशें पांसष्ट शिरा, यांकडून केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी विसरतेपणें केलें असेल त्याची.
जें पाप आह्मी मन घाबरल्यामुळें केलें असेल त्याची.

ועל חטאים ज्या पापांकरितां आह्मास दोषार्पण करणें योग्य आहे त्यांची. (खरोखर व संशययुक्त त्यांचीहि.)
ज्या पापांकरितां आह्मास चढतें उतरतें अर्पण* करणें योग्य आहे त्यांची.
(ज्या पापांकरितां आह्मास होम करणें योग्य आहे त्यांची.)
ज्या पापांकरितां आह्मास नेमलेलें पापार्पण करणें योग्य आहे त्यांची.
ज्या पापांकरितां आह्मास ईश्वरसत्तेचें मरण † योग्य आहे त्यांची.
ज्या पापांकरितां आह्मास छेदले जाणें ‡ योग्य आहे त्यांची.
ज्या पापांकरितां आह्मास चाळीस फटके¶ योग्य आहेत त्यांची.

*टीक. ४ † लेवीय २२.९ ‡ निर्गम १२.१५. ¶ अनुवाद २५.३.

(ज्या पापांकरितां आह्मास बंडखोरांचें शासन योग्य आहे त्यांची.)
(ज्या पापांकरितां आह्मास अपांक्त होणें योग्य आहे त्यांची.)
ज्या पापांकरितां आह्मास न्यायसभेचे चार देहांत दंड, ह्मणजे धोंडमार, जाळणें, वधणें व श्वासबंद करून मारणें, * योग्य आहेत त्यांची; करण्याविषयींच्या आज्ञा व न करण्याविषयींच्या आज्ञा (भंग करण्याच्या दोषांची;) काम लावून दिल्हेल्या आज्ञांच्या व काम न लावून दिल्हेल्या आज्ञांच्या दोषांची; जीं पापें आह्मी जाणत आहों त्यांची, आणि जीं आम्ही जाणत नाहीं (त्यांची तूं क्षमा कर.) जीं आम्ही जाणत आहों तीं, हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आम्ही पूर्वींच तुजपुढें म्हणून दाखविलीं आहेत; आणि जीं आह्मी जाणत नाहीं तीं सर्व, हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुजपुढें उघड व प्रगट आहेत. जसें ह्मटलें आहे कीं, ज्या गोष्टी गुप्त ठेविलेल्या त्या आमचा देव परमेश्वर याच्या आहेत, परंतु ज्या उघड्या केलेल्या, त्या आमच्या व आमच्या संतानांच्या सर्वकाळ आहेत; आह्मी शास्त्रांतल्या सर्व गोष्टी पाळाव्या ह्मणून. कारण इस्राएलास क्षमा करणारा, आणि येशूरूनाच्या† वंशांस माफ करणारा तूंच आहेस; आह्मास माफ करणारा व क्षमा करणारा तुजवांचून कोणी नाहीं.

אלהי עד שלא נוצרתי हे माझ्या देवा, जोंपर्यंत मी घडलों नव्हतों तोंपर्यंत मी अयोग्य होतों; आणि आतां जेव्हां मी घडलेला आहें, तेव्हांहि मी घडलेला नाहींच असा आहें; जीवंत असतां मी मातीं आहें; मग माझ्या मरणानंतर अधिकच. हे परमेश्वरा माझ्या देवा व माझ्या पूर्वजांच्या देवा, पाहा, मी तुजपुढें लज्जेने व कालिमेने भरलेल्या पात्राप्रमाणें आहें; आणि पुनः असें करणार नाहीं असें बोलायास मला भाग्य आहे, परंतु मी दुष्ट वासनेला भितों; कारण ती अग्नीपासून (घडलेली) आहे, आणि मी मांस व रक्त आहें. मी तिजवर प्रबल होऊं शकत नाहीं, म्हणून कदाचित माझ्या (सध्यांच्या) पापांपेक्षां अधिक उल्लंघनें वाढतील.

---

* टीका ५. † अनुवाद ३२, १५ एथें येशूरून हें नाम इस्राएलास दिल्हें आहे.

तरी हे परमेश्वरा, माझ्या देवा व माझ्या पूर्वजांच्या देवा, मी आणखी पाप करूं नये; आणि जें मी पाप केलें आहे, त्याचा आपल्या पुष्कळ दयेने नाश कर, परंतु मला कठोर शासन करूं नको व मजवर वाईट रोग आणूं नको. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें आणि माझ्या हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

एथें אלהי נצור व. प्र. प्रा. पृष्ठ. २१ हें बोलण्याची चाल आहे.

עושה שלום जो उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आह्मास व सर्व इस्राएल लोकांस शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

शाब्बाथ असल्यास हें बोलावें.

ויכלו השמים तसें आकाश व पृथ्वी व त्यांतील सर्व समुदाय, हीं समाप्त झालीं. मग देवाने आपलें जें काम केलें होतें त्यापासून तो सातव्या दिवशीं थांबला; आणि आपलें सर्व जें काम केलें होतें त्यापासून सातव्या दिवशीं स्वस्थ राहिला. आणि देवाने सातव्या दिवसाला आशीर्वाद दिल्हा आणि त्याला पवित्र केलें, कारण कीं त्यांत आपलें जें उत्पत्तीचें काम त्यापासून स्वस्थ राहिला.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, आब्राहामाच्या देवा, इसहाकाच्या देवा व याकोबाच्या देवा, मोठ्या, पराक्रमी व भयंकर देवा, परात्पर देवा, दयेने आकाश व पृथ्वी यांवर धनीपणा चालविणाऱ्या, तूं धन्य आहेस. तो आमच्या पूर्वजांची ढाल, आपल्या आज्ञेकडून मेलेल्यांस सजीव करणारा, ज्यासारिखा दुसरा नाहीं असा पवित्र राजा, आपल्या लोकांस आपल्या शाब्बाथ दिवशीं विश्रांति देणारा असा आहे; कारण त्यांस विश्रांति देण्यास त्यास हर्ष झाला. त्याचें आम्ही भयाने व त्रासाने भजन करूं; आणि त्याचें नाम प्रतिदिवशीं अखंडित स्तवूं. तो आशीर्वादांचा उगम, पुष्कळ स्तुतीस योग्य, शांती-

चा स्वामी, शाब्बाथास पवित्र करणारा, सातव्या दिवसास आशीर्वाद देणारा, आणि उत्पत्तीच्या कृत्यांच्या आठवणीकारितां हर्षाने तृप्त झालेले लोकांस पवित्रतेने विसांवा देणारा आहे.

אלהינו ואלהי אבותינו हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या विसांव्यामुळें तूं प्रसन्न हो; आपल्या आज्ञांकडून आह्मास पवित्र कर; आपल्या शास्त्रांत आमचा विभाग राखून ठेव; आपल्या चांगुलपणाकडून आह्मास तृप्त कर; आपल्या तारणाकडून आमचा जीव हर्षित कर; सत्यतेने तुझी सेवा करावी म्हणून आमचीं मनें शुद्ध कर; आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा पवित्र शाब्बाथ आम्हास वतन करून दे, असा कीं तुझें नाम पवित्र मानणाऱ्या सर्व इस्राएलांनी त्यांत स्वस्थ राहावें. हे परमेश्वरा, शाब्बाथास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

קדיש לעילא पृष्ठ ९.

תפלה לדוד दाविदाने केलेली प्रार्थना, हे परमेश्वरा, नीति ऐक, माझ्या रडण्याचें श्रवण कर; माझ्या प्रार्थनेकडे कान दे. कां तर ती कपट ओठांतून नाहीं. दाविदाकडून प्रार्थना, हे परमेश्वरा, तूं आपला कान लावून माझें ऐक; कारण कीं मी दुःखित व दुबळा आहें. देवाचा माणूस मोशे याची प्रार्थना, हे प्रभु, तूं पिढोपिढीं आमचा आश्रय आहेस. दुःखितांसाठीं प्रार्थना, जेव्हां तो बुडतो आणि परमेश्वरापुढें आपुलें हार्द्र ओतितो तेव्हांची. हबाकुक भविष्यवाद्याची शिग्योनोथवेर प्रार्थना. हे इस्राएला, ऐक, परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे. हे परमेश्वरा, ऐक आणि मजवर दया कर; हे परमेश्वरा, मला सहाय हो. हे परमेश्वरा, मी हाक मारितों; तूं माझा शब्द ऐक, मजवर कृपा कर आणि मला उत्तर दे. हे परमेश्वरा, माझी विनंती ऐक; हे परमेश्वरा, माझी प्रार्थना मान्य कर. हे माझ्या लोका, मी बोलतों;

हे इस्राएला, मी तुजवर साक्ष देतों, ऐक; मी देव तुझा देव आहें. अहो माझे लोक, तुह्मी ऐका, मग मी तुह्माला साक्ष देईन, हे इस्राएला, त्वां माझें ऐकावें. कां तर त्याने दुःखिताच्या दुःखाचा धिःकार केला नाहीं, कंटाळा केला नाहीं, आणि त्याने आपलें तोंड त्याच्यापुढें लपविलें नाहीं; परंतु जेव्हां हा त्याजवळ ओरडला, तेव्हां त्याने ऐकिलें. कां तर परमेश्वर दुबळ्याचें ऐकतो, आणि आपल्या बंदिवानाची उपेक्षा करीत नाहीं. जेव्हां मी तुझ्याजवळ ओरडतों, जेव्हां मी आपले हात तुझ्या पवित्र गाभाऱ्याकडे उभारितों, तेव्हां तूं माझ्या काकुळतीची वाणी ऐक. हे परमेश्वरा, तूं माझी प्रार्थना ऐक, आणि माझ्या ओरडण्याकडे कान दे, माझ्या अश्रुपाताविषयीं उगाच राहूं नको, कां तर मी आपल्या सर्व वडिलांसारिखा तुझ्याजवळचा विदेशी प्रवासांत आहें. हे परमेश्वरा, तूं माझी प्रार्थना ऐक, आपल्या सत्यतेने माझ्या काकुळतीकडे कान लाव; आपल्या नीतीने मला उत्तर दे. मी परमेश्वराला हाक मारितों, तेव्हां तो ऐकतो. हे परमेश्वरा, तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहें; हे परमेश्वरा तूं आपलें कार्य वर्षांच्यामध्यें स्थापन कर, वर्षांच्यामध्यें विज्ञापन कर; कोपाच्या समयीं दया स्मर. हे आमच्या राजा, तूं आपणापुढून आह्मास रिकामे परतवूं नको, कारण तूं प्रार्थनेचा ऐकणारा आहेस. हे प्रार्थनेच्या ऐकणाऱ्या; सर्व मांसमय तुजकडे येतील.

" אנא हे परमेश्वरा, मी बिनंती करितों कीं, जे लोक (तुझ्याजवळ) प्रार्थना करितात, त्यांस तूं आपली दया दाखीव, त्यांची काकुळती मान्य कर, आणि त्यांस सांपड; कारण ते तुझ्या नामाने हाक मारितात.

שמע תפלה हे प्रार्थना ऐकणाऱ्या! तुजकडे सर्व मांसमय येतील.

" אנא हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, खेदित मनाने जेव्हां मी हाक मारितों, तेव्हां माझी काकुळती ऐक,

माझा ताठरपणा दूर कर; * हे परमेश्वरा, नीति ऐक व माझ्या वाणीकडे कान लाव. שמע תפלה

" אנא " हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, तुझ्या अशक्त (लोकांस) तूं आश्रय दे; जेव्हां ते तुझा दरवाजा ठोकितात, तेव्हां तूं आपलें महत्व त्यांस दाखीव, आणि जेव्हां मी तुजकडे ओरडतों, तेव्हां माझ्या काकुळतीची वाणी ऐक שמע תפלה

" אנא " हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, दुःखित जिवाकडे लक्ष लाव, आणि जे अश्रूंनी पेरितात ते उत्सावाने कापोत; हे परमेश्वरा, माझी प्रार्थना ऐक, आणि माझ्या विनंतीकडे कान लाव. שמע תפלה

" אנא " हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, माझी आठवण करून मला दर्शन दे; आणि हे परमेश्वरा, माझ्या अतिक्रमाप्रमाणें माझा न्याय करूं नको. हे परमेश्वरा, मी हाका मारितों, माझी वाणी ऐक आणि मजवर दया करून मला उत्तर दे. שמע תפלה

" אנא " हे परमेश्वरा, मी विनंती करितों कीं, तुझ्या गरीब झालेल्या लोकांवर व तुझ्या दयेची वाट पाहाणाऱ्यांवर तूं आपल्या आकाशांतील वस्तिस्थानांतून दया कर; कां कीं तुझ्या नगरास व तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. שמע תפלה

שמע תפלה हे प्रार्थना ऐकणाऱ्या, सर्व मांसमय तुजकडे येतील. हे विनंती ऐकणाऱ्या, सर्व प्राणी तुजडे येतील; तुजकडे सर्व प्राणी व जीव येतील.

הנשמה לך हे खडकरूप आश्रया! तुजसारिखा कोणीच नसतां, प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, म्हणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर.

אשרו דרכיכם अहो (सत्वशील) लोकांनो! तुम्ही आपले मार्ग सरळ करा; हा प्रायश्चित्ताचा दिवस, ज्या दिवशीं खाणें

---

* इ. निरोगी कर.

मना केलें आहे; त्या दिवसाविषयींच्या आज्ञा तुह्मी उलंघूं नका. הנשמה לך

בתענית היו ज्या दिवशीं उंच आकाशांतील (देवाकडून) पिण्याचीहि मनाई आहे त्या दिवशीं त्या दयाळू व कृपाळू देवापुढें तुह्मीं उपास करून काकुळती करा. הנשמה לך

רחמים משמי מעונים ज्या दिवशीं देव प्रसन्न होतो, आणि ज्या दिवशीं अंघूळ करणें मना केलें आहे, त्या दिवशीं आकाशांत वस्ति करणाऱ्या देवापुढें लज्जित तोंडाने तुह्मी दया मागा. הנשמה לך

הודו על עוניכם ज्या दिवशीं उटणें लावणें मना केलें आहे, त्या दिवशीं तुह्मी आपला परमेश्वर देव याजपुढें आपलीं पापें कबूल करून प्रार्थना करा. הנשמה לך

מעל וחטאת עזבו ज्या दिवशीं धनवानास व गरीबास जोडा घालायास मना आहे, त्या दिवशीं तुह्मी आपलीं दुष्ट कर्में व पापाचरण सोडून आपल्या जीवाचें रक्त अर्पण करा. הנשמה לך

חזקו רפי ידים ज्या दिवशीं पापाचें प्रायश्चित्त होतें, आणि (ज्या दिवशीं) स्त्रीपुरुष एकत्र निजायास मना आहे, त्या दिवशीं तुह्मी आपले अशक्त हात बळकट करून देवाकडे आपले तळहात पसरा. הנשמה לך

התבשרו तुह्मी सुवर्तमान कळवा, कारण कीं याच दिवशीं तुमचा खडकरूप आश्रय तुम्हावर शुद्ध पाणी शिंपडून तह्मी केलेल्या पापांपासून तुम्हास शुद्ध करील. הנשמה לך

שמר עלי उद्यां जेव्हां परमेश्वर न्यायाधीश होईल, तेव्हां मजवर साक्षीनिशीं व शपथेनिशीं निघालेल्या (कर्ज) रोख्याची फेड करणें आहे; परंतु जेव्हां (त्याविषयीं) मी दुरून विचार केला, तेव्हां मी अतिशय रडलों; कारण रडण्याची वेळ

आहे, आणि हासण्याचीहि वेळ आहे; जेव्हां न्यायाचा दिवस मला आठवला, तेव्हां मला कंप सुटला, भय आणि त्रास यांणीं मला व्यापिलें; यास्तव मी आपल्या हृदयाच्या हट्टामुळें आपल्या मनीं खेद पावलों, कीं मी आपल्या बापाकडे कसा चढेन!

הנשמה לך हे स्वडकरूप आश्रया, तुजसारिखा कोणीच नसतां, प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, म्हणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर.

שור למי רב זדונו ज्याचे अपराध पुष्कळ आहेत, ज्याच्या पापाची झडती त्या दिवशीं होईल, आणि ज्यास आपले धन्यास हिशेब द्यावा लागेल, त्याजकडे पाहा; त्या दिवशीं जेव्हां तो (देव) शरीरासहित आत्म्यास शासन करण्यास येईल, तेव्हां तो सरदाराचीहि तोंडओळख धरणार नाहीं. त्या दोघांचा न्याय व वाद देव त्यांचा स्वामी, याजकडे येईल; आत्म्याने त्वरेने उत्तर केलें कीं मजवर कांहींच पाप लिहिलेलें नाहीं; याप्रमाणें त्याने आपल्या फिरण्याविषयीं आपणास न्यायी दाखविलें. הנשמה לך

הרפני ועזבני मला जाऊं दे, मला सोड. मजशीं वाद करायास मला थांबवितोस काय? तूं मजशीं कां वाद करितोस हें मला कळीव; माझा पवित्र मजवर प्रीति करीत नाहीं, कारण त्याने मला बेड्या घालून आणून अंधार (कोठडींत) घातलें आहे; अमंगळ देह मला त्रास देतो, त्याकुजट प्रेतापासून मी पडत आहें; मी थकलों व अतिशय जर्जर झालों, कारण त्या ठक देहानें मला ठकविलें ह्मणून मी खालें (पाप केलें.)

בכל חטא יתגלע सर्व प्रकारच्या पापांत तो निमग्न आहे, जसा गोफणींत धोंडा फिरवितात तसा तो मला फिरवितो; अनर्थ करण्यापासून तो आपला हात आवरीत नाहीं; त्याने मला मसलत देवून थांबविलें, आणि नाशाप्रत पोहोंचविलें; निश्चयें, आतां त्याने मला म्लान केलें; सर्व प्रकारच्या लोभांत तो गुंतला आहे, खाण्यापीण्यापासून तो वळत नाहीं; असो, परंतु दुष्टाचें पोट रितें राहील; तो आपल्या स्वतःस विटाळायास लपून राहतो, कारण तो

आपल्या नांवाप्रमाणें आहे, ह्मणजे तो मूर्ख असून त्याजबरोबरहि मूर्खत्व आहे. הנשמה לך

יצורני פורע ह्मणांत तो मला फांसांत धरून आपल्या दांतांखालीं धरितो, मी त्याच्या दिसण्यांत ठकविणाऱ्याप्रमाणें आहें; पाहा, त्याचीं पापें अवर्णनीय आहेत; यास्तव आपल्या दुष्टाईच्या परिणामाप्रमाणें तो लाजतो व संकोचित होतो; त्याचा सूड मजवर उगवूं नको, आणि देहाची शिक्षा उणी करूं नको, कारण तो पूर्ण ढोंगी व दुष्कर्मी आहे. तेव्हां देह आपला बचाव करण्यासाठीं ह्मणाला, मला सोड, मला असूं दे; मी शुद्ध व निष्पाप आहें; पाहा, (मजवर) दगडाप्रमाणें ओझीं आहेत, मी लाजेने व धिक्काराने भरलों आहें, तर मी काय करूं शकेन ? הנשמה לך

גם אני נשכל निश्चयें, मी निष्फलहि आहें, जी द्राक्षाची डाहाळी कांहींच फल देत नाहीं तिजसारिखा मी आहें; जीव नसल्यास, ज्या घरांत कोणी राहणारा, उत्तर देणारा किंवा ऐकणारा नसतो, त्यासारिखा मी आपल्या स्वतःस मानितों; यास्तव सकाळपासून संध्याकाळपर्यंत जो आपल्या जागेवरून हालत नाहीं, त्या दगडाप्रमाणें मी टाकलेला आहें. पाहा, सर्व झडती जीवावर व त्याच्या दुष्ट कृत्यांवर आहे. त्याच्या कर्माप्रमाणें तूं त्याची फेड कर; हे माझ्या जीवा, तुझ्या फितुरीचें दुःख तूंच सोस; आपलें फल खा; आणि आपलें ऋण फेड. सर्व (कोणत्याहि) वाईटाकरितां मी तान्हेला नव्हतों; तुजमध्यें मी अगदी मुक्त होतों, मग मी विटाळलों नाहीं, असें तूं (आपणाविषयीं) कसें म्हणतोस.

מחשבותיך הבינו तुझे विचार (देवास) कळले आहेत; आणि तुझ्याच हाताने सर्व केलें आहे. मग मी काय? कीं तूं मजवर कुरकूर करितोस;* ते (उभयतां) गलबल करून थकले, परंतु त्यांस यथार्थता सांपडली नाहीं. शेवटीं ते एक प्रत्येकास जडले, मग विचार करणारें मन व त्याचीं कृत्यें एकमताचे होऊन हे दोघे साक्ष झाल्यावर ते दोघे † एकदाच स्तब्ध राहिले, परंतु त्यांच्या

* ह. आम्ही काय कीं तुम्ही आह्मावर कुरकुर करितां. † देह व जीव.

दोषांचा अनर्थ दूर होवो, आणि त्यांची शिक्षा भारी न होवो. कारण निश्चयें, तो मांसमय आहे; एकाद्याने हट्टाची आवड धरिली, म्हणून हे दयावंता, जर तूं त्याच्या कर्माप्रमाणें, (त्याच्या पदरीं) मोजून देशिल, तर (तुजपुढें) कोण उभा राहील; तूं आपला पेटलेला क्रोध शांत कर, आपल्या रागाने शिक्षा करूं नको. परंतु आपल्या दासीच्या पुत्रास विसांवा दे; आतां मला मुक्ति व्हावी म्हणून आपणाजवळ घे, आणि ज्या दिवशीं तूं मला न्यायांत आणिशील, तेव्हां तूं आपल्या रागाने मला धमकावूं नको.

הנשמה לך प्राण हा तुझा, व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, ह्मणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर. हे खडकरूप आश्रया, तुजसारिखा कोणिच नसतां, प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे, ह्मणून तूं आपले हस्तकर्मावर दया कर. प्राण हा तुझा व शरीरहि तुझेंच कृत्य आहे ह्मणून, हे परमेश्वरा, तूं आपल्या नामाकरितां कार्य कर. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या नांवाने आम्ही म्हटले गेलों आहों. तुझें नाम आम्हामध्यें गाजविलें जातें, म्हणून हे परमेश्वरा, आमच्या देवा, आम्हास सोडूं नको. आणि मी तुझ्या परम कृपेने तुझ्या मंदिरास येईन, तुझ्या भयाने तुझ्या पवित्र देवळांत भजन करीन. तुझ्या पवित्र देवळाकडे भजन करीन, आणि तुझ्या दयेमुळें व तुझ्या सत्यतेमुळें तुझ्या नांवाची स्तुति करीन, कारण कीं त्वां आपल्या सगळ्या नांवापेक्षां आपलें वचन मोठें मोजिलें आहे. या, आपण आपल्या (उत्पन्न) करणाऱ्या परमेश्वरासमोर नमन करूं, गुडघे टेकूं, व पायां पडूं. पवित्रतेच्या शोभेने परमेश्वराला भजा, अहो पृथ्वीचे सर्व, तुह्मी त्याच्यासमोर भय धरा. परमेश्वराला त्याच्या नामाचें गौरव द्या, पवित्र शोभेने परमेश्वरापुढें नमन करा. आणि त्या समयीं असें होईल कीं, मोठा करणा वाजेल, तेव्हां जे अश्शूर देशामध्यें नाशाच्या लागास आलेले ते, आणि मिसर देशांत घालविलेले ते येतील; आणि यरूशालेमेंत पवित्र पर्वतावर परमेश्वराला भजतील. परमेश्वर आमचा देव याला तुह्मी उंच माना, आणि त्याच्या पवित्र

डोंगरावर भजा, कां तर परमेश्वर आमचा देव पवित्र आहे. तूंच तूं मात्र परमेश्वर आहेस; त्वां आकाशें, आकाशांचीं आकाशें व त्यांचीं सर्व सैन्यें, पृथ्वी व जें कांहीं तिजवर आहे, समुद्र व त्यांतलें सर्व त्वां उत्पन्न केलें, व तीं तूं वांचवितोस आणि आकाशांचीं सैन्यें तुजपुढें नमन करितात.

משתחוים להדרת (तुझे इस्राएल) आरिएल डोंगराच्या पवित्र शोभेकडे आणि हारएलाच्या* पायाच्या मोलवान कोपऱ्याकडे नमन करितात, उद्यांच्या दिवसाकरितां ते आपणास पवित्र करून आतां परमेश्वरापुढें विनंती करितात. हे इस्राएला! तूं आपल्या देवाच्या पुढें जाण्यास सिद्ध हो.

הכון לקראת हे इस्राएला! तूं आपल्या देवाच्या पुढें जाण्यास सिद्ध हो.

הבו עוז देवास द्वीपांमध्यें वैभव द्या, पूर्वेकडील देशांत त्याचें गौरव करा; अहो निवडक लोकहो! अन्य लोकांच्या कुटुंबांपासून वेगळे व्हा, आणि या प्रायश्चित्ताच्या दिवशीं तुम्ही शुद्ध व्हा; सर्व पापापासून मुक्त व्हा, अपराधापासून सांभाळले जा; कारण सर्व इस्राएलाच्या पुत्रांस, ही पाळायाची रात्र आहे. הכון

וקרעו הלבבות तुम्ही आपलीं मनें फाडा आणि त्यांचा गर्व मोडा; आपल्या पूर्वजांची पुण्याई (देवापुढें) वर करा, आपणास त्याच्या प्रकाशांत चालवा; आणि समुद्राच्या गर्जनेच्या वाणीप्रमाणें (तुम्ही ओरडत) आकाशांतील (देव), जो लढाईमध्यें बळवान, जो झोंपीं जात नाहीं व घाबरत नाहीं, आणि जो आब्राहाम, ईसहाक व इस्राएल यांचा देव, त्यापुढें ओरडा. הכון

דלתי קבלה (हे देवा,) त्यांच्या विनंत्यां करितां (प्रार्थना) मान्य करण्याचीं द्वारें तूं उघड; त्यांच्या रोगांकरितां आरोग्यतेचे उपाय त्यांस सांपडूं दे, आपलें दयेचें व कृपेचें मुख त्यांजवर प्रकाशित कर, त्या (दयेची व कृपेची) वाट पाहाणाऱ्यांस क्षमेच्या पुस्तकांत लिहून त्यांत इस्राएलाच्या पुत्रांचीं नावें कोर. הכון

* टीका ५.

המצא לישע लुटला गेलेल्या तुझ्या कळपाच्या-तारणाकरितां (तूं त्यास) सांपड; जरी त्याचा नैवेद्य थोडा किंवा पुष्कळ असला, तरी तो तूं मान्य कर; जरी त्याची दुष्टाई वाढली असली, तरी तुझ्या लोकांची मुक्ति वाढीव, उल्लंघनापासून फिरणाऱ्यांस झांकून ठेवलेला उजेड तूं प्रगट कर, आणि आपल्या रागानें इस्राएलाचा दिवा विझवूं नको. הכון

אורי וישעי " परमेश्वर माझा प्रकाश व माझें तारण आहे, म्या कोणाला भ्यावें; परमेश्वर माझ्या जीवाचा आश्रय आहे, म्या कोणाविषयीं धास्ती धरावी. हे परमेश्वरा, माझ्या देवा, मी तुझ्या जवळ ओरडलों आणि त्वां मला निरोगी केलें आहे. हे परमेश्वरा, सकाळीं तूं माझा शब्द ऐकशील, सकाळीं मी तुझ्यासाठीं सिद्ध होऊन लक्ष लावीन. परमेश्वरानें आपलें सिंहासन आकाशांत स्थापिलें आहे, आणि त्याच्या राज्याचा अधिकार सर्वांवर आहे. हे परमेश्वरा, तुझें चांगुलपण आकाशांत, तुझी सत्यता आभाळापर्यंतहि आहे. हे परमेश्वरा, तूं थोर आहेस, आणि पराक्रमाविषयीं तुझें नाम थोर आहे. सर्व समर्थ देव जो परमेश्वर तो बोलला आहे; आणि त्यानें सूर्याच्या उगवण्यापासून त्याच्या मावळण्यापर्यंत पृथ्वी बोलाविली आहे. तो परमेश्वरच, त्याच्या दिसण्यांत जें चांगलें तें तो करितो. परमेश्वरच, आणखी कोणी नाहीं; त्यावांचून कोणी देव नाहीं. परमेश्वरानें आमची आठवण केली आहे, तो आशीर्वाद देईल, इस्राएलाच्या घराण्याला तो आशीर्वाद देईल. त्याच्या न्यायत्वाकरितां परमेश्वर संतोषित आहे, तो नेमशास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील. कां तर हे प्रभु, तूं चांगला व क्षमाशील आणि जे तुला हाक मारितात, त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. मी परमेश्वराला हाक मारितों तेव्हां तो ऐकतो. परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. जे परमेश्वराविरुद्ध होतील ते पराभव पावतील, तो आकाशांतून त्यांवर गर्जना करील, परमेश्वर पृथ्वींतील सर्व देशांचा न्यायाधिशी करील, आणि तो आपल्या राजाला शक्ति देईल, आणि आपल्या अभिषिक्ताचें शृंग उंच करील. परमेश्वर राज्य

करितो, परमेश्वराने राज्य केलें, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो, परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त आशिर्वाद देतो. हे सैन्याच्या परमेश्वरा, जो माणूस तुजवर आशा ठेवितो तो धन्य. हे परमेश्वरा, मीं तुला हाक मारितों, तूं मजसाठीं उतावळी कर; मी तुला हाक मारितों तेव्हां माझ्या शब्दाकडे कान लाव. हे प्रभू, ऐक, हे प्रभू, क्षमा कर, हे प्रभू, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको, हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कां कीं तुझ्या नगराला आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. हे परमेश्वरा, तूं माझी प्रार्थना ऐक, आपल्या सत्यतेने माझ्या काकुळतींकडे कान लाव, आपल्या नीतीनें मला उत्तर दे.

אנא בקראנו हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, जेव्हां आह्मी तुजकडे ओरडतों, तेव्हां आमच्या काकुळतीची वाणी तूं ऐक; हे देवा, आह्मी विनंती करितों कीं, आमचे लोभाचे अपराध क्षमा कर.

דברים לקחתי हे देवा, जीं वचनें (मी तुजपुढें) उच्चारितों, तीं हे देवा, ऐक; आणि ज्या पापांत मी जन्मलों तें, हे देवा, क्षमा कर. אנא

וממעון שמך तुझ्या आकाशांतील वसतिस्थानांतून, हे देवा, ऐक; आणि तुझ्या लोकांचीं पापें, हे देवा, क्षमा कर. אנא

יום ערכי שבחה ज्या दिवशीं मी स्तुति सिद्ध करितों तेव्हां, हे देवा, माझें ऐक; नेहेमीची (आमची) फितूरी, हे देवा, क्षमा कर. אנא

דלים ואביונים दीन व दरिद्री यांचें, हे देवा, ऐक; लाखेसारिखीं तांबडीं झालेलीं त्यांचीं पापें, हे देवा, क्षमा कर. אנא

הרדים נגדך तुजपुढें जे कांपतात त्यांचें, हे देवा, ऐक; आणि तुझा सेवक जो मी, मला हे देवा, क्षमा कर. אנא

זמירות מהללי माझें स्तुतीचें कीर्तन, हे देवा, ऐक; माझीं वाईट कर्मे हे देवा, क्षमा कर. אנא

קול שארית יעקב याकोबाच्या शेषाची वाणी हे देवा, ऐक; सर्व कपटी मनाचे अपराध, हे देवा, क्षमा कर. אנא

אדני שמעה हे प्रभु, ऐक, हे प्रभु, क्षमा कर, हे प्रभु, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको, हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कां कीं तुझ्या नगराला, आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. हे परमेश्वरा, ऐक, आणि मजवर दया कर; हे परमेश्वरा, माझें सहाय्य कर. परमेश्वराने माझी काकळूत ऐकिली आहे, परमेश्वर माझी प्रार्थना अंगीकारील. हे देवा, म्यां तुला हाक मारिली, कां तर तूं मला उत्तर देत असतोस; तूं आपला कान मजकडे लाव, माझें बोलणें ऐक. हे माझ्या न्यायत्वाच्या देवा, जेव्हां मी हाक मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे, संकटाच्या वेळेस त्वां मला मोकळें केलें, तूं मजवर दया करून माझी प्रार्थना ऐक. आणि मजविषयीं हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळेस माझी प्रार्थना केली आहे; हे देवा, तूं आपल्या पुष्कळ दयेने, आपल्या तारणाच्या सत्यतेने मला उत्तर दे. कारण कीं ह्याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुह्मास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील, मग तुह्मी शुद्ध व्हाल. हे परमेश्वरा, त्वां ज्या इस्राएलाला सोडविलें, त्या आपल्या लोकांस क्षमा करून आपल्या इस्राएल लोकांकडे निर्दोषाचा रक्तपात लावूं नको, असी त्या रक्तपाताविषयीं त्यांवर क्षमा व्हावी. माझ्या शक्तीपेक्षां अन्यायाच्या गोष्टी भारी झाल्या, परंतु आमच्या उलंघनांची क्षमा तूं करसील.

ירצה עם אביון जो दरिद्री लोक तुझें मुख (दर्शन) शोधितो, त्यास तुझी प्रसन्नता सांपडो, तो ओरडत आहे, आपल्या स्वामिला हाक मारण्याच्या वाणीकडून त्याचा घसा बसला आहे; हे देवा, आज रात्रीं व उद्यांहि तूं आपली दया त्याच्या पुढें येऊं दे.

אדני הקשיבה हे प्रभु, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको.

אשר התודה जो आपलें पाप कबूल करितो, आपल्या अतिक्रमाविषयीं पश्चात्ताप करितो, आणि आपले लोभाचे अपराध आपणासमोर व आपणापुढें ठेवितो, त्याकरितां तूं आपल्या दयेचा दुत पाठवून त्याच्या दुःखामुळें त्यांस दर्शन दे, कारण त्याच्या लज्जेच्या घाबरण्यामुळें त्याचें मन त्याजमध्यें धगधगतें. אדני

בליל זה हे स्वामींच्या स्वामी ! आज रात्रीं दीन व दरिद्र्यांकडे प्रसन्नतेने पाहा; जे तुजकडे काकळूत करीत* आहेत, त्यांचे अपराध व जाणून केलेलीं पापें क्षमा कर; जरी तीं लाखेसारिखीं असलीं, तरी तीं लोंकरेसारिखीं शुभ्र होवोत. אדני

והצועקים בשביהם जे आपल्या दासत्वांत अपराधाकरितां व आपल्या फितुरीकरितां ओरडत आहेत, आणि आपल्या उलंघनाकरितां आपल्या गालांवरून अश्रुधारा वाहवीत आहेत, त्यांकरितां मी विनंती करितों कीं, तुझें तारण व तुझी मुक्ति त्यांच्या आयुष्यांच्या दिवसांतच त्वरेने येऊं दे, आणि इस्राएलाची प्रार्थना तूं आपणाजवळ येऊं दे, मान्य कर, आणि तिजमध्यें आनंद मान. אדני

אדני שמעה हे प्रभु, ऐक, हे प्रभु, क्षमा कर; हे प्रभु कान देऊन कार्य कर; उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर, कां कीं तुझ्या नगराला आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. मी परमेश्वराला धन्य ह्मणेन; कां तर तो मला बोधितो, रात्रीं माझीं गुर्दे कमळें देखील मला बोध करितात. त्वां माझ्या अंतःकरणाची परीक्षा केली, रात्रीं चौकसी केली, मला आटिलें, तरी तुला कांहीं सांपडणार नाहीं. म्यां नेम केला आहे, माझ्या तोंडानें उलंघन होणार नाहीं. दिवसां परमेश्वर आपली दया प्रगट करील, आणि रात्रीं त्याचें गायन मजकडून होईल; माझ्या जीवाच्या देवाची प्रार्थना मजक-

* इ. ओतति.

हून होईल. सकाळीं तुझी दया, व रात्रींच्या रात्रीं तुझी सत्यता प्रगट करणें (बरें आहे.) माझा न्याय तुझ्या पुढून प्रगट व्हावा; जा नीट तीं तुझ्या डोळ्यानीं पाहावीं. परंतु मजविषयीं हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळेस माझी प्रार्थना केली आहे; हे देवा, तूं आपल्या पुष्कळ दयेने, आपल्या तारणाच्या सत्यतेने मला उत्तर दे. हे परमेश्वरा, आह्माला तुजकडे फिरीव, ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

סליחות पापाच्या क्षमेची प्रार्थना.

אל מלך हे दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा, दयेंकरून वर्तणाऱ्या, आपल्या लोकांच्या पापांची क्षमा करणाऱ्या, त्यांतिल एक एक पार (दूर) करणाऱ्या, पाप्यांस फारच क्षमा, आणि उलंघन करणाऱ्यांस माफी करणाऱ्या, सर्व मांसमयांबरोबर व प्राण्यांबरोबर यथार्थतेने वागणाऱ्या, त्यांच्या वाईट कृत्यांप्रमाणें त्यांची फेड न करणाऱ्या; हे देवा, तुझे तेरा गुण उच्चारायास त्वां आह्मास शिकविलें आहेस, आणि पूर्वीं नम्र (मोशे) यास कळविलेल्या त्या तेरा गुणांच्या कराराची * आज आह्माकरितां आठवण कर. आणि शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर मेघांत उतरला, आणि तेथें त्याजवळ उभा राहिला, आणि त्याने परमेश्वराचें नांव मोठ्याने सांगितलें.

ויעבור "तेव्हां परमेश्वराने त्याच्या पुढें जवळून जाऊन मोठ्याने असें ह्मटलें कीं, परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी आणि फार दयेचा व सत्यतेचा; हजारोंसीं दया राखितो; अन्याय व उलंघनें व पाप यांची क्षमा करितो; आणि दोष्यांस निर्दोषी ठरविणारच नाहीं; ह्मणून आमच्या अन्यायाची, व आमच्या पापाची क्षमा कर, आणि आम्हास तुझें वतनरूप कर.

---

* निर्गम. ३४.१०

כי ביום הזה कारण कीं याच दिवशीं तुमच्या सर्व पापांपासून तुम्हास परमेश्वरासमोर शुद्ध करायास तो प्रायश्चित्त करील, मग तुम्ही शुद्ध व्हाल.

ויאמר אני אעביר तेव्हां तो बोलला कीं, "मी आपलें सर्व बरेंपण तुझ्यापुढें जवळून चालवीन, आणि तुझ्या पुढें परमेश्वराचें नाम प्रगट सांगेन, आणि ज्यावर दया करीन त्यावर दया करीनच, आणि ज्यावर ममता ठेवीन त्यावर ममता ठेवीनच."

רחמנא אדכר לן हे दयावंता, प्रियकर आब्राहामाबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर.

בדיל ויעביר पार जातांना (कळविलेल्या) तुझ्या गुणाकरितां.

हे दयावंता, बंधन पावलेल्या इसहाकाबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. בדיל ויעבור

हे दयावंता, पूर्ण याकोबाबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, यथार्थ योसेफाच्या पुण्याची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, मोशे भविष्यवाद्याबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, आहारोन आचार्याबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, आवेशी पिनहासाबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, अभिषिक्त दावीदाबरोबर केलेल्या कराराची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, शलोमो राजाच्या प्रार्थनेची आम्हासाठीं आठवण कर. ,,

हे दयावंता, तुझा उजवा हात उभारून आपलें तारण उगीव. ,,

हे दयावंता, लज्जित तोंडाने आह्मी तुला हाक मारायास आलों आहों; ह्मणून आह्मावर दया कर. ,,

हे दयावंता, तुझें सामर्थ्य आह्मांमध्यें प्रगट कर. בדיל ויעבור
हे दयावंता, आमचें न्यायत्व प्रकाशांत आण. „
हे दयावंता, आम्हाविषयीं जीवनाचा निवाडा ठरीव. „
हे दयावंता, तुझें गौरव आह्मावर ठेव. „
हे दयावंता, आमच्या दुष्ट कृत्यांप्रमाणें आमची फेड करूं नको. „
हे दयावंता, तुझें वैभव आह्मावर ओत. „
हे दयावंता, आह्माकरितां यथार्थता योज. „
हे दयावंता, आह्मावर चांगलें मोज. „
हे दयावंता, आह्मावर पुष्कळ चांगलें येऊं दे. „
हे दयावंता, तुझी दया आह्मावर लोट. „
हे दयावंता, आह्मास जीवनाच्या पुस्तकांत लिही. „
हे दयावंता, आह्मास दयेच्या पुस्तकांत लिही. „
हे दयावंता, आह्मास यथार्थतेच्या पुस्तकांत लिही. „
हे दयावंता, आह्मास सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत लिही. „
हे दयावंता, आह्मास चांगल्या उपजीविनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिही. „
हे दयावंता, आह्मावरून तूं आपला राग व क्रोध जिंक (काढ). „
हे दयावंता, तूं आमचा शेवट (नाश) करूं नको. „
हे दयावंता, आमचीं ऋणें व आमचे अपराध आह्मास सोड व क्षमा कर. „
हे दयावंता, तुझ्या चांगुलपणाचा उजेड आह्मावर प्रकाशित कर. „
हे दयावंता, (तूं) आह्माकरितां आश्रय व सहायकारि हो. „
हे दयावंता, आमचें चांगलें होण्याची खूण कर. „
हे दयावंता, आमच्या प्रार्थनेसाठीं आकाश उघड. „
हे दयावंता, प्रसन्नतेने आमची प्रार्थना कबूल कर. „
हे दयावंता जाचणुकीच्या वेळीं आमच्या प्रार्थना व आमचे अर्ज कबूल कर. „
हे दयावंता, (आमच्या) जीवावर दया कर. „
हे दयावंता, चांगलें वर्ष आह्मावर येऊं दे. „

हे दयावंता, तूं आपल्या क्रोधापासून फीर. בדיל ויעבור
हे दयावंता, तुजपुढून आह्मास रिकामें परतवूं नको. "

" ויעבור " "तेव्हां परमेश्वराने त्याच्या पुढें जवळून जाऊन मोठ्याने असें म्हटलें कीं, परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी आणि फार देयचा व सत्यतेचा; हजारोंसीं दया राखितो; अन्याय, उल्लंघनें व पाप यांची क्षमा करितो; आणि दोष्यांस निर्दोषी ठरविणारच नाहीं; म्हणून तूं आमचें अन्यायांची व आमच्या पापांची क्षमा कर, आणि आम्हास तुझें वतरूप कर."

הטיבה ברצונך तूं आपल्या प्रसन्नतेने सियोनेचें बरें कर; यरुशालेमेचीं गांवकुसें बांध. तेव्हां नीतीचे यज्ञ, होम व सर्वांग होम तुला आवडतील, तेव्हां तुझ्या वेदीवर खोंडाचे होम करितील.

כי ביום הזה कारण कीं याच दिवशीं इत्यादिक.

אנשי אמונה प्रमाणिक मनुष्यें नाहींसीं झालीं आहेत, तीं (आपल्या सत्कर्मांच्या) सामर्थ्यानें (तुजपुढें) येत असत; खंडन सोसायास तीं शक्तिमान होतीं आणि तीं दुःखाचें निवारणहि करीत असत. क्रोधाच्यासमयीं तीं आम्हास भिंतीसारिखीं व आश्रयासारिखीं होतीं; तीं आपल्या गुह्य प्रार्थनेकडून राग शमवीत असत. हे देवा, त्यांनी तुला हाक मारिल्याअगोदर, त्वां त्यांस उत्तर दिल्हें. तीं तुला विनवायास व तुझी प्रसन्नता मिळवायास जाणत असत; म्हणून तूं त्यांवर बापाप्रमाणें प्रीति करून, त्यांच्या तोंडांस (त्यांस) रिकामें परतविलें नाहींस. परंतु आमच्या पुष्कळ अपराधांमुळें तीं नाहींसीं झालीं; आणि आमच्या पापामुळें तीं आपल्या पूर्वजांसीं मिळालीं आहेत. आपण विसांव्याप्रत जाऊन, त्यांनी आम्हास धापा देण्यास मागें टाकलें आहे. कुपण नीट करणारे मोडकळीस गेले; राग फिरविणारे शांत (मृत) झाले. आतां खंडनांत उभे राहणारे (संकट दूर करणारे) कोणी नाहींत;

तुझ्या प्रसन्नतेची वाट पाहाणारे नाहींसे झाले. आम्ही पृथ्वीच्या चोहोंकोनीं भटकत फिरत आहों; परंतु कोठेंच आम्हास आरोग्यता सांपडत नाहीं. आतां लज्जित तोंडानें क्षमा साधनाच्या वेळीं, हे देवा, आम्ही तुला शोधायास आलों आहों.

אל מלך पृष्ठ ३७.

תמהנו מרעות आम्ही वाईटामुळें अपधाकतों, संकटामुळें आमचें बळ खचतें; आम्ही फारच नीच होऊन धुळीस मिळालों आहों. हे दयावंता, आमचा स्वभावहि तसाच आहे; आम्ही ताठर मानेचे व बंडखोर आहों. जरीं आम्ही आपल्या तोंडानें ओरडून तुला हाक मारितों; तरीं आम्ही पाप करितों व आमचें मन वांकडें व विपरीत आहे. यद्यपि हे परात्परा,! तुझी दया सर्वकाळापासून आहे, आणि क्षमा ती तुझ्या जवळच आहे. तूं वाईटाविषयीं अनुतापत असतोस, आणि दयेकडे वळतोस ; म्हणून अशा वेळीं लपून राहूं नको, कारण आम्ही मोठ्या विपत्तींत पडलों आहों. आम्हावरील तुझें चांगुलपण व दया सर्वांच्या दृष्टीस समजीव (पाड); आम्हाविषयीं चाहाडी करूं नये, म्हणून सैतानाचें तोंड बंद कर; त्यास धमकाव म्हणजे तो उगा राहील. आणि आम्हास यथार्थ ठरविण्याकरितां चांगला मध्यस्थ उभा कर; म्हणजे तो आमचा सरळपणा कळवील. हे दयावंता व कृपावंता, जेव्हां तुझा घरचा विश्वासू (मोशे) यानें तुजपुढें येऊन विनंती केली; तेव्हां तूं आपला मार्ग त्यास कळविलास व आपली सत्यता त्यास समजविलीस.

אל מלך पृष्ठ ३७.

לײ אלהינו הרחמים प्रभु, जो आमचा देव, त्याविरुद्ध जरीं आह्मी पाप केलें; तरीं त्याला दया आणि क्षमा आहे. प्रभु, जो आमचा देव, त्याविरुद्ध जरीं आह्मी बंडावा केला; तरीं त्याला दया आणि क्षमा आहे. (हे आमच्या प्रभो !) जें पाप आह्मी मूर्खपणानें व पापिष्ठपणानें केलें, तें आह्मावर लावूं नको.

חטאנו צורנו हे आमच्या खडकरूप आश्रया, आह्मी पाप केलें आहे; हे आमच्या निर्माणकर्त्या, आह्मास क्षमा कर.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे.

ברוך שם याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.

הוא האלהים ,, परमेश्वर तोच देव आहे; परमेश्वर तोच देव आहे. (दो० वे०)

אראלי מעלה वरील आरआलिम दूत ह्मणतात कीं, परमेश्वर आमचा प्रभु आहे; आणि निवडलेली संपत्ति (इस्राएल) उत्तरें करून ह्मणते कीं, परमेश्वर तोच देव आहे. ,, הוא האלהים

גלגלי מעלה वरील गलगालिम दूत ह्मणतात कीं, परमेश्वर आमचा प्रभु आहे; आणि प्रख्यात संपत्ति (इस्राएल) उत्तरें करून ह्मणते कीं, परमेश्वर तोच देव आहे. הוא אלהים ,,

המוני מעלה वरील दुतांचीं सैन्यें म्हणतात कीं, परमेश्वर आमचा प्रभु आहे; आणि इस्राएल आपल्या दुःखांत व पाडावपणांत उत्तरें करून म्हणतात कीं, परमेश्वर तोच देव आहे.

מלך ,, परमेश्वर राज्य करीत आहे, परमेश्वराने राज्य केलें आणि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. (दो. वे.)

בטרם שחקים आकाश व पृथ्वी विस्तारल्या पूर्वींपासून परमेश्वर राज्य करीत आहे; ज्योति प्रकाशल्यापूर्वी परमेश्वरानें राज्य केलें; आणि पृथ्वी वस्त्राप्रमाणें जीर्ण झाल्यावर व आकाश धुराप्रमाणें विरघळून गेल्यावरहि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. ,, מלך

ועד לא עשה पृथ्वी व शेतें उत्पन्न केलीं नव्हतीं तेव्हांपासून परमेश्वर राज्य करीत आहे; पृथ्वीवरील घडिवलेले पदार्थ सिद्ध केल्या अगोदर परमेश्वरानें राज्य केलें; आणि परागंदा

झालेले, चोहोंकडून एकत्र होण्याच्या वेळानंतरहि परमेश्वर सर्वकाळ राज्य करील.

" מלך

מיוחד באחיה जो आहे तोच खुद्द आहे; तोच होता, तोच आहे व तोच असेल; तोच मारणारा व जिवंत करणारा; कोणी निर्माण झालेला देव त्याच्यापूर्वी नव्हता, व त्याच्यानंतरहि कोणी व्हावयाचा नाहीं.

ענגו אבינו हे आमच्या बापा, आम्हास उत्तर दे.

ענגו आम्हास उत्तर दे.

हे आमच्या उत्पन्नकर्त्या, आम्हास उत्तर दे. ענגו

हे आमच्या उद्धारका, आम्हास उत्तर दे."

हे आम्हाविषयीं चौकशी ठेवणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे तेज व महत्त्व यानी वेष्टिलेल्या, आम्हास उत्तर दे. "

हे सूड घेण्यांत न्यायी असणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे यथार्थ व सरळ (देवा,) आम्हास उत्तर दे. "

हे जिवंत व निश्चल (देवा) आम्हास उत्तर दे. "

हे निर्मळ दृष्टीच्या, आम्हास उत्तर दे. "

हे आकाशांत राहणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे सर्व शक्तिमान (देवा,) आम्हास उत्तर दे. "

हे दुष्टाईची आवड न धरणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे राजा, व राजांचा राजा, आम्हास उत्तर दे. "

हे भयंकर व गडरूप (देवा,) आम्हास उत्तर दे. "

हे पडलेल्यांस आश्रय देणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे गरीबांचें सहाय करणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे खंडून घेणाऱ्या, व संकटांतून मुक्त करणाऱ्या, आम्हास उत्तर दे. "

हे यथार्थ आणि यथार्थ ठरविणाऱ्या, आह्मास उत्तर दे. "

हे हाक मारणाऱ्यांच्या जवळ असणाऱ्या, आह्मास उत्तर दे. "

हे उंच व महत्त्ववान् (देवा,) आह्मास उत्तर दे. "

हे आकाशांत वस्ती करणाऱ्या, आह्मास उत्तर दे. "

हे पूर्ण लोकांच्या आश्रया, आह्मास उत्तर दे. עננו

עננו מלך מלכי המלכים हे राजा, आणि राजांच्या राजा, आम्हास उत्तर दे.

हे आब्राहामाच्या देवा, आह्मास उत्तर दे.

हे प्रसन्नतेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.

हे इसहाकाच्या भयपात्रा, आह्मास उत्तर दे.

हे संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.

हे याकोबाच्या बळदात्या, आम्हास उत्तर दे.

हे दयेच्या वेळीं उत्तर देणाऱ्या, आह्मास उत्तर दे.

हे दावीदाच्या रक्षका, आम्हास उत्तर दे.

हे (करूबाच्या) रथांत बसणाऱ्या, आह्मास उत्तर दे.

हे दयावंता व कृपावंता, आम्हास उत्तर दे.

רחום וחנון हे दयावंता व कृपावंता, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

אדון הסליחות हे क्षमाशील देवा, मनें पारखणाऱ्या, खोल गोष्टी प्रगट करणाऱ्या, आणि सत्यवक्त्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

הדור בנפלאות हे चमत्काराने सुशोभित, सूड घेण्यांत न्यायी असणाऱ्या, पूर्वजांच्या कराराची आठवण राखणाऱ्या आणि गुर्दे कमळें शोधणाऱ्या, आम्ही तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

טוב ומטיב לבריות हे मनुष्यमात्रांशीं चांगला असणाऱ्या, व चांगलें करणाऱ्या, सर्व गुप्त गोष्टी जाणणाऱ्या, (आमचे) अपराध धुळीस मिळविणाऱ्या, व सात्विकपणा परिधान करणाऱ्या आम्ही तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

מלא זכיות हे यथार्थतेने भरलेल्या, स्तुतीनें भयंकरा, दोष क्षमा करणाऱ्या आणि संकटसमयीं उत्तर देणाऱ्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आम्हावर दया कर.

פועל ישועות हे उद्धारका, भविष्य जाणणाऱ्या, पित्र्यांस बोलविणाऱ्या (उत्पन्न करणाऱ्या,) आकाशमंडळावर स्वारी करणाऱ्या, प्रार्थना ऐकणाऱ्या, आणि पूर्णबुद्धीच्या, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे; आह्मावर दया कर.

אל רחום שמך तुझें नांव दयाळू देव व तुझें नांव कृपाळू देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל אדיר שמך तुझें नांव बळवंत, धन्य, मोठा व कीर्तिमान देव असें आहे; म्हणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל הדור שמך तुझें नांव सुशोभित, न्यायी, यथार्थ व कृपाळू देव असें आहे; म्हणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל טהור שמך तुझें नांव निर्दोष, एकच, पराक्रमी व अनादि देव असें आहे; म्हणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל מלך שמך तुझें नांव राजा, भयंकर, आश्रय देणारा व सहाय करणारा देव असें आहे; म्हणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל פודה שמך तुझें नांव उद्धारक, सात्विक, पवित्र व दयाळू देव असें आहे; म्हणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל שדי שמך तुझें नांव सर्व समर्थ, पूर्ण, आधार देणारा व प्रबळ देव असें आहे; ह्मणून तूं आपल्या लोकांच्या कष्टांकडे पाहून आपल्या जगावर दया कर.

אל רחום שמך तुझें नांव दयाळू देव, तुझें नांव कृपाळू देव, तुझें नांव मंदक्रोधी देव, व तुझें नांव करुणासागर असें आहे;

आणि तुझें नाम आम्हामध्यें गाजविलें जातें, म्हणून तुझ्या नामाकरितां (आमची विनंती मान्य) कर.

חננו והקימנו ,, हे परमेश्वरा, आम्हावर दया करून आम्हास स्थापित कर.

ובספר חיים आणि आह्माविषयीं आठवण करून आह्मास जीवनाच्या पुस्तकांत लिही.

हे परमेश्वरा, तूं आपलें मुखतेज आह्मावर पाड.

हे परमेश्वरा, कृपा करून तारणाचे दिवसांचें शुभवर्त्तमान आह्मास ऐकीव. ובספר חיים

हे परमेश्वरा, तुझ्या दयेचा पूर आह्मावर येऊं दे. ,,

हे परमेश्वरा, आमच्या आरंभापेक्षां आमचा शेवट अधिक चांगला कर. ,,

हे परमेश्वरा, कृपा करून तुझी दया आह्मापुढें येऊं दे. ,,

हे परमेश्वरा, आह्माविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे. ,,

हे परमेश्वरा, आज आह्मास तूं आपल्या हृदयावर मोहोरीप्रमाणें करून ठेव. ,,

हे परमेश्वरा, आमचा वाद व आमची लढाई तूं कर.. ,,

हे परमेश्वरा, आमच्या अन्नपाण्यास आशीर्वाद दे. ,,

עשה למען ,, हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां (आमची विनंती मान्य) कर.

וחוסה על ישראל आणि आपल्या इस्राएल लोकांवर दया कर.

हे परमेश्वरा, तुझ्या पूर्णतेमध्यें जन्मलेल्या (आब्राहामाकरितां) आमची विनंती मान्य कर. וחוסה על ישראל

हे परमेश्वरा, तुझ्या खांबांशीं बांधला गेलेल्या (इसहाकाकरितां) आमची विनंती मान्य कर. ,,

हे परमेश्वरा, आकाशांतून शिडीवरून उत्तर मिळालेल्या (याकोबाकरितां) आमची विनंती मान्य कर.

हे परमेश्वरा, तुझा यथार्थ योसेफ, याच्या पुण्याकरितां आमची विनंती मान्य कर. וְהוּסָה עַל יִשְׂרָאֵל

हे परमेश्वरा, पाण्यांतून काढलेल्या (मोशेकरितां) आमची विनंती मान्य कर. ”

हे परमेश्वरा, तुझ्या उरीम व थुम्मीमाने आचार्यपणा चालविणाऱ्या (आहारोनाकरितां) आमची विनंती मान्य कर. ”

हे परमेश्वरा, तुझ्या नामाचा शुद्ध (खरा) आवेश धरणाऱ्या (पिनहासाकरितां) आमची विनंती मान्य कर. ”

हे परमेश्वरा, (दाविदाच्या) सुंदर गीतांकरितां आमची विनंती मान्य कर.

हे परमेश्वरा, तुझ्या नामासाठीं मंदिर बांधणाऱ्या (शलोमो) राजाकरितां आमची विनंती मान्य कर. ”

हे परमेश्वरा, तुझ्या नामाच्या एकत्वाकरितां जे मारले व जाळले गेले, त्यांकरितां आमची विनंती मान्य कर. ”

हे परमेश्वरा, तुझ्या नामाकरितां आमची विनंती मान्य कर. ”

עֲשֵׂה לְמַעַן שְׁמָךְ (हे परमेश्वरा,) तूं आपल्या नामाकरितां आमची विनंती मान्य कर. तूं आपल्या सत्यतेकरितां, आपल्या कराराकरितां, आपल्या मोठेपणाकरितां, आपल्या नियमाकरितां, आपल्या महत्वाकरितां, आपल्या वचनाकरितां, आपल्या आठवणीकरितां, आपल्या दयेकरितां, आपल्या चांगुलपणाकरितां, आपल्या सरळपणाकरितां, आपल्या गौरवाकरितां, आपल्या मततत्वाकरितां, आपल्या राज्याकरितां, आपल्या अनाद्यंततेकरितां, आपल्या गुप्त भावाकरितां, आपल्या सामर्थ्याकरितां, आपल्या वैभवाकरितां, आपल्या यथार्थतेकरितां, आपल्या पवित्रतेकरितां, आपल्या दयेकरितां, आपल्या साक्षात्काराकरितां, आणि आपल्या शास्त्राकरितां, आमची विनंती मान्य कर.

עֲשֵׂה לְמַעַן אַבְרָהָם (हे परमेश्वरा,) आब्राहाम, इसहाक व याकोब यांकरितां; मोशे व आहारोन यांकरितां; दाविद व शालोमो यांकरितां; पवित्र यरूशालेम नगराकरितां; सीयोन,

जें तुझ्या गौरवाचें वसतिस्थान, त्याकरितां; तुझ्या नाश पावलेल्या मंदिराकरितां; तुझ्या ओसाड पडलेल्या वाड्याकरितां; गरीब इस्राएल लोकांकरितां; दरिद्री इस्राएल लोकांकरितां; दुःख सोसणाऱ्या इस्राएल लोकांकरितां; विधवा व पोरक्याकरितां; तान्हे बाळाकरितां; दूध पिणाऱ्याकरितां; शाळेंत शिकणाऱ्याकरितां; व ज्याकडून कांहींच पाप घडलें नाहीं, त्याकरितां आमची विनंती मान्य कर.

עשה למענך जर आम्हाकरितां नाहीं, तर तूं आपणाकरितां (आमची विनंती मान्य कर;) तूं आपणाकरितां तसें करून आमचें तारण कर आणि आज व नित्य आमच्या प्रार्थना ऐकून आम्हास तार व आम्हास उत्तर दे; कारण तूंच आमचें स्तुतिपात्र आहेस.

אחד אלהינו आमचा देव एकच, आमचा प्रभु मोठा, त्याचें नांव पवित्र व भयंकर आहे. तर तुझी दया आकाशाएवढी, आणि तुझी सत्यता आभाळाएवढी मोठी आहे. तूं मोठा आणि आश्चर्याचीं कृत्यें करणारा आहेस. तूंच केवळ देव आहेस. ज्या राष्ट्रांनी तुला जाणिलें नाहीं, त्यांवर; आणि ज्या राज्यांतील लोकांनी तुझें नाम घेतलें नाहीं, त्यांवर; तूं आपला संताप ओत.

. לא לנו ולקדושת שמך आम्हास नको; परंतु तुझ्या पवित्र नामास गौरव दे. हे परमेश्वरा, आम्हास नको; परंतु तूं आपल्या दयेवरून व आपल्या सत्यतेवरून आपल्या नामास गौरव दे. राष्ट्रांनी कां म्हणावें ! कीं, त्यांचा देव आतां कोठें आहे ! तर आमचा देव आकाशांत; एकच जो देव, तो आकाशांत आहे. प्रत्येक दिवशीं दोन वेळा आम्ही (त्याचें एकत्व) मानितों. तो जिवंत व निश्चळ आहे; तो दयेने व यथार्थतेने व्यापलेला आहे. त्याला जें आवडलें, तें सर्व त्याने आकाशांत व पृथ्वींत केलें आहे. तूं काय करितोस ? असें त्यास म्हणणारा कोणी नाहीं ; आणि तूं

काय चालविलें आहेस ? असें त्यास ह्मणणारा कोणी नाहीं; कारण सर्व त्याच्या हाताचीं कामें आहेत.

אלהינו שבשמים हे आमच्या आकाशांतील देवा, आमची वाणी ऐक, आणि प्रसन्नतेने आमची प्रार्थना कबूल कर.

אמן तथास्तु.

हे आमच्या आकाशांतील देवा, या आमच्या दीर्घ दासत्वांत तूं आमचा नाश करूं नको. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, जे आमच्या वाईटावर उठतात, त्या सर्वांचा नाश कर. ,,

हे आमच्या आकाशांतील देवा, तूं आपल्या कराराची आठवण कर, आह्मास विसरूं नको. ,,

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या अन्नपाण्यास आशीर्वाद दे. ,,

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास शुभवर्त्तमान ऐकीव. ,,

हे आमच्या आकाशांतील देवा, सर्व कठोर व वाईट शासनें आह्मावरून रद्द कर (उडीव). ,,

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या राज्याचें वैभव आह्मामध्यें लवकर प्रगट कर. ,,

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्माविषयीं चांगला निवाडा कर.

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मी तुझा शोध करीत असतां, आह्मास सांपड.

हे आमच्या आकाशांतिल देवा, आह्मावर उठणाऱ्यांपासून आमच्या रक्ताची झडती घे. ,,

हे आमच्या आकाशांतील देवा, आज व नेहमी तूं आमची प्रार्थना ऐक. ,,

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास तुजकडे पूर्ण पश्चात्तापाने परतीव. ,,

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या आशेविषयीं आह्मास लाजवूं नको. ,,

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्ही हाक मारितों आणि तूं आम्हास उत्तर दे. אָבִינוּ

हे आमच्या आकाशांतील देवा, तूं आपल्या समोर आमची चांगली आठवण कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या न्यायांत आह्मास यथार्थ ठरीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमची आणि आमच्या मुलांलेंकरांची करुणा तुला येऊं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या पापापासून आह्मास शुद्ध कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या विटाळापासून आम्हास शुद्ध कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हाविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हास चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिही. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास शुद्धतेच्या पुस्तकांत लिही. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हास यथार्थ व धार्मिक लोकांच्या पुस्तकांत लिही. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आह्मास सरळ व पूर्ण लोकांच्या पुस्तकांत लिही. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हास चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिही. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हास जिंकणाऱ्यांस तूं जिंक. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा तूं विध्वंस करूं नको.

हे आमच्या आकाशांतील देवा, जर आम्हाकरितां नाहीं; तर तूं आपल्या नामाकरितां आमचें कार्य कर. אבינו
हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हावर जुलूम करणाऱ्यांवर तूं जुलूम कर. "
हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हाबरोबर लढणाऱ्यांशीं तूं लढ. "
हे आमच्या आकाशांतील देवा, आमचे मनोरथ चांगल्या प्रकारें पूर्ण कर. "
हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा सूड तूं उगीव. "
हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या खचण्याच्या वेळीं आम्हास आश्रय दे. "
हे आमच्या आकाशांतील देवा, दावीदाच्या पडलेल्या मंडपास आश्रय दे. "
हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या विनंतींत उत्तर दे. "
हे आमच्या आकाशांतील देवा, आम्ही हाक मारितों त्या दिवशीं आम्हास उत्तर दे. "
हे आमच्या आकाशांतिल देवा, आमच्या सर्व शत्रूंच्या हातांतून आम्हास सोडीव. "
हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या वाईट विचारापासून आम्हास मोकळें कर. "
हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हावर तुझा आशीर्वाद होण्याविषयीं आज्ञा कर. "
हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हास तुझें तारण मिळावें म्हणून आज्ञा कर. "
हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या न्यायांत आह्मास यथार्थ ठरीव. "
हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा न्याय करितांना आह्मास यथार्थ ठरीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या उद्धाराचा वेळ आह्मा-
जवळ आण. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या तारणाचा दिवस आम्हा-
जवळ आण. "

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझी सेवा करायासाठीं आह्मास
जवळ ने. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचा वाद करून आह्मास
सोडीव. "

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांच्या
दु:खाकडे पाहा. "

हे आमच्या आकाशांतील देवा, तुझ्या इस्राएल लोकांचे रोग
दूर कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, जुलुमाच्या वेळीं आम्हाकडे पाहा "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचें ओरडणें मान्य कर. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आम्हांमध्यें शांति राख. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या वाड्यांत सुख असूं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमच्या प्रभुराजास जीवन व
शांति दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, त्याच्या मनांत आह्माविषयीं
चांगलें घाल. "

हे आमच्या आकाशांतील देवा, पृथ्वीवर शांतता असूं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, जगांत तृप्तता असूं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, या राज्यांत शांतता असूं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, पृथ्वीवर दहिंवर व पर्जन्य आशी-
र्वादरूप व्हावे; ह्मणून त्यांच्या योग्यसमयीं त्यांस पडूं दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, पेरायास बीज व खावयास
भाकर दे. "

हे आमच्या आकाशांतील देवा, (आमच्या) कुटुंबाच्या संख्येप्रमाणें
भाकर देत ऐस. "

हे आमच्या आकाशांतील देवा, आमची प्रार्थना तुजसमोर धुपासारिखी मानिली जावो. אמן

हे आमच्या आकाशांतील देवा, आमचें चांगलें होण्याची, आमचें तारण होण्याची, आणि आह्मास दया प्राप्त होण्याची खूण कर; मग आमचे द्वेष्टे पाहून लाजतील, आणि आमचे शत्रु अवलोकन करून घाबरतील; कारण हे देवा, तूंच आमचें सहाय व समाधान करणारा आहेस.

אל ארך אפים मंदक्रोधी देव आणि दयेचा स्वामी तूंच आहेस; तूं आपल्या दयेचें व कृपेचें महत्व पूर्वीं नम्र मोशे यास कळविलेंस. आणि शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर मेघांत उतरला, आणि तेथें त्याजवळ उभा राहिला; आणि त्यानें परमेश्वराचें नांव मोठ्यानें सांगितलें.

ויעבור पृष्ठ ४०.

וידוי पापाविषयीं कबूल होणें.

אנא אל תעש हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, तूं आमचा विध्वंस न करितां, न्यायांत आपला हात आटोपून धर. आह्मी तुझ्या समक्ष निषेध पावायास आलों असतां, तूं आमचीं नांवें तुझ्या पुस्तकांतून पुसून टाकूं नको. जेव्हां तूं शिक्षण शोधायास (करायास) लागतोस, तेव्हां (आह्माकडे) रागापूर्वीं तुझी दया येऊं दे. चांगल्या कृत्यांविषयीं तुझ्या दृष्टींत आमची न्यूनता दिसून आली असतां, तुझी उपकारबुद्धि आह्माजवळ आण. हे आमच्या बापा, आह्मी ओरडत व विनंती करीत आहों, तुझी प्रार्थना करितांना आमचें तारण व्हावयास आज्ञा कर. सरळाच्या राहोत्यांस दासत्वांतून परतीव; कारण पाहा, त्याच्या (नगरांचीं) द्वारें ओसाड पडलीं आहेत. तुझ्या वाक्याची आठवण राखून, त्याच्या संततीच्या मुखांतून प्रमाणनेमाचा विसर पडूं

देऊं नको. त्वां मोहोर केलेले प्रमाणनेम उघड, आणि तुझें गुह्य तुझ्या शिष्यांमध्यें ह्मणजे पृथ्वीच्या मध्यभागीं अर्धचंद्राच्या आकृतीसारिखी वाटोळी बसणाऱ्या मोठ्या न्यायसभेच्या सभासदांमध्यें व त्या मोठया सभेचा एक तृतीयांश, ज्या लहान सभेंत असे, तिच्या सभासदांमध्यें स्थापित कर. हे अनंता! जे तुला ओळखितात, त्यांस तूं स्वीकार, परंतु जें राष्ट्र तुला जाणत नाहीं, त्यास नाकार; आणि आशेनें बांधलेल्या (आशा लागलेल्या) बंदिवानास दुर्गाकडे फिरीव.

" אנא हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची प्रार्थना तुजपुढें यावी असें आह्मी मागतों, आणि आमच्या विनंतीपासून तूं लपून राहूं नको, कारण आह्मी यथार्थ आहों, आह्मी पाप केलें नाहीं, असें तुजपुढें बोलायास, हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मास धिटाई व धारिष्ट नाहीं. निश्चयें आह्मी व आमच्या वडिलानीहि पाप केलें आहे.

אשמנו בגדנו आह्मी अतिक्रम केले, विश्वासघात केला, लुटलें, चाहाडी व वाईट भाषणेंहि केलीं. अपराध केले, दुष्टाई केली, गर्व केला, जुलूम केला, खोटें रचिलें, व वाईट योजनाहि केल्या. भोंदलें, थट्टा केली, बंडावा केला, अपवाद केला, आह्मी व्यर्थ व खोट्या शपथाहि वाहिल्या. अनिवार झालों, वांकडे वर्तलों, उल्लंघनें केलीं, दुःख दिल्हें, आह्मी आपली मान ताठरहि केली. दुराचार केले, नासलें, ओंगळ केलें, बहकलों आणि दुसऱ्यासहि बहकविलें. आणि आह्मी तुझे सुंदर नियम व न्याय सोडून फितूर झालों, परंतु तेणेंकरून आह्मास कांहीं लाभ झाला नाहीं. तथापि जें अवघें आम्हावर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहे, परंतु आम्ही दुष्टाई केली आहे.

אשמנו מכל עם आह्मी सर्व लोकांपेक्षां अधिक अतिक्रम केले आहेत, सर्व राष्ट्रांपेक्षां आह्मास अधिक लज्जा प्राप्त

झाली आहे. आमचा हर्ष मावळला आहे; आमच्या पापामुळें आमचें हृदय मूर्छित झालें आहे. आमची आशा व्यर्थ गेली; आमचे अलंकार आह्मावरून हिरावून नेले आहेत. आमच्या पापामुळें आमच्या पवित्र मंदिराचा नाश होऊन नगर ओसाड पडलें आहे; आमचा सुंदर देश परक्यांस, आणि आमची संपत्ति इतरांस (दिल्ही गेली आहे.) असें असतां अद्याप आह्मी आपल्या परिचारापासून मागें वळत नाहीं. मग हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी यथार्थ आहों; आह्मी पाप केलें नाहीं; असें तुजपुढें बोलायास आह्मास धिटाई व धारिष्ट कोठून असेल ? निश्चयें, आह्मी व आमच्या पूर्वजानींहि पाप केलें आहे.

רבונו של עולם हे जगदीशा, पूर्वरात्रीं मी आपलीं लहान व मोठीं उल्लंघनें कबूल करितों. मी आपल्या कुकल्पनेंकडून व दुष्ट कृत्यांकडून तुला चिडविलें; (ह्मणून मी भयाने ह्मणतों,) पाहारेकऱ्या रात्रीचें काय ? पाहारेकऱ्या रात्रीचें काय ? माझ्या मनाने व नेत्रानी पाप करण्याविषयीं मसलत केली, आणि रात्रंदिवस त्यांस विसांवा नव्हता; आणि माझ्या उरलेल्या अवयवानी तुझ्या दृष्टीपुढें वाईट करण्याकरितां आपणामध्यें फुसफुस केली, अवघा दिवस व अवघी रात्र ते उगेच राहात नाहींत. आणि ज्या करायाच्या व न करायाच्या आज्ञा मोडल्या, ह्मणून सर्व रात्रीं आपलें आंथरूण पाणीगत करितों; आपल्या अश्रूनी आपल्या पलंगास भिजवितों. ज्याचीं कृत्यें भयंकर (देव) तो कदाचित माझ्या शोकाची वाणी ऐकेल; ह्मणून रात्रंदिवस मी ओरडत आहें. मी आपल्या उल्लंघनामुळें व आज्ञाभंग करण्यामुळें आपली वाणी उंचावून ओरडतों; रात्रीं मला विश्रांति नाहीं. तो आपणाकरितां आजच्या रात्रीं क्षमेचें व प्रायश्चित्ताचें पाणी आह्मावर शिंपडील. ज्या क्षमा साधनाच्या रात्रीं आकाशांत वस्ती करणारापुढें तुह्मास क्षमा मिळणार आहे, ती हीच रात्र आहे. जो भविष्य जाणणारा (सर्वज्ञ) त्यापुढें आपल्या पापाचा कांहींसा भाग आठवून, या रात्रीं

मी स्तुति करायास येतों ; आणि आजच्या रात्रीं मी देवासमोर आपलीं उल्लंघनें आणि अधर्म कबूल करितों.

कोणी एथें हें पुढील बोलतात आणि कोणी

אשמנו בגדנו पृष्ठ ५४ हें बोलतात.

אשמנו באמר आह्मी शब्देंकरून व कृत्यांकडून दोषी आहों; दुष्कर्में करण्याकरितां आह्मी तुझ्या नियमाचा धिःकार केला; न्याय व यथार्थतेचा आह्मी तिरस्कार केला; आणि आमचा मार्ग कांटेरी कुपणासारिखा झाला आहे. आह्मी करार मोडून, उल्लंघनें अपार वाढविलीं आहेत; तूं शिकविलेलें चांगलें आह्मी टाकून दिल्हें ; आणि तूं धिःकारलेल्या वाईटासाठीं आम्ही श्रम केले. आम्ही खोटें व कपट रचिलें ; आणि पापाची व दोषाची योजना केली; जगत्संबंधी व्यर्थतेमध्यें आह्मी आपलीं (आयुष्याचीं) वर्षें संपविलीं; तूं सर्व गुप्त गोष्टींविषयीं आमचा न्याय करशील याची आठवण राखिलीच नाहीं. आह्मी ज्ञानाचा बोध धिःकारला; बुद्धि आणि ज्ञानाविषयीं आह्मी मूढ झालों आहों. तुझ्या यथार्थ न्यायाविषयीं आम्ही असंतुष्ट झालों; आणि तुझ्या नियमाचा मार्ग आह्मी सोडिला. आमचें तोंड (लक्ष) आमच्या आवडी पुरविण्याकडे लागलें आहे; आह्मी आमच्या वांछांच्या खाणींत बुडालों; ज्ञान्याच्या तोंडच्या निषेधामुळें आह्मास राग आला; आम्ही आपलें तोंड उघडून दुष्टाईचीं भाषणें मोठ्यानें केलीं. तुजपासून निरंतरचें फिरणें आम्ही फिरलों आहों; निषेधणाऱ्या मनुष्यास आह्मी ओंगळ मानिलें आहे. तथापि जें अवघें आह्मावर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस; त्वां सत्यता केली आहे; परंतु आह्मी दुष्टाई केली आहे.

לעינו עשקו आमच्या दुष्कर्मांमुळें आमचे डोळे पीडित झाले आहेत; व आह्मी विखरलेले व लुचाडलेले आहों. शत्रूनें आह्मावर आपलें जोकड ठेविलें आहे; तें आह्मी आपल्या

त्यांच्यावर वाहत आहों; दासानी आह्मावर प्रभुत्व केलें; आम्हास त्यांच्या हातांतून सोडवायास कोणी नाहीं. पुष्कळ संकटानीं आह्मास घेरिलें आहे; हे परमेश्वरा, आमच्या देवा, आम्ही तुला हांक मारितों, परंतु पाहा, आमच्या पापामुळें तूं आम्हापासून दूर झाला आहेस. आम्ही तुझ्या मागून वळलों, आणि शेरडांप्रमाणें बहकून नाश पावलों; असें असतां, अद्यापि आह्मी आपल्या परिचारापासून मागें वळत नाहीं. मग हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी यथार्थ आहों; आह्मी पाप केलें नाहीं; असें तुजपुढें बोलायास आह्मास धिटाई व धारिष्ट कोठून असेल ? निश्चयें, आह्मी व आमच्या पूर्वजानीहि पाप केलें आहे.

חטאתי אודיעך तुझ्याजवळ म्या आपलें पाप कबूल केलें, आपला अन्याय झांकिला नाहीं; म्या ह्मटलें कीं परमेश्वराजवळ मी आपले अतिक्रम आपल्यावर पत्करीन मग त्वां माझ्या पापदोषाची क्षमा केली.

אשמנו בגדנו पृष्ठ २१.

מה נאמר לפניך पृष्ठ २१.

יהי רצון पृष्ठ २१.

על חטא पृष्ठ २१.

על חטאים पृष्ठ २२.

אדיר ונאור हे पराक्रमी व महत्ववान्, आकाश व पृथ्वी उत्पन्नकर्त्या.

מי אל כמוך तुजसारिखा देव कोण आहे!

खोल (गोष्टी) प्रगट करणाऱ्या, आणि सत्यवक्त्या, तुजसारिखा देव कोण आहे!

पांघरूणाने विराजिता आणि ज्यावांचून कोणी नाहीं, त्या तुजसारिखा देव कोण आहे!

करार आठविणाऱ्या आणि (आपल्या लोकांच्या) शेषावर दया करणाऱ्या, तुजसारिखा देव कोण आहे !

निर्मळ दृष्टीच्या आणि आकाशांत वस्ती करणाऱ्या, तुजसारिखा देव कोण आहे !

(आमचे) अपराध धुळीस मिळविणाऱ्या आणि सात्विकपणा परिधान करणाऱ्या, तुजसारिखा देव कोण आहे !

राजांच्या राजा आणि भयंकर व गौरवयुक्त (देवा,) तुजसारिखा देव कोण आहे !

पडलेल्यांस आश्रय आणि पीडितांस उत्तर देणाऱ्या, तुजसारिखा देव कोण आहे !

उद्धारणारा, मुक्त करणारा आणि मोठ्या पराक्रमाने चालणाऱ्या तुजसारिखा देव कोण आहे !

हाक मारणाऱ्यांच्या जवळच असणाऱ्या आणि दयावंता व कृपावंता, तुजसारिखा देव कोण आहे !

आकाशांत वस्ती करणाऱ्या आणि यथार्थास आश्रय देणाऱ्या, तुजसारिखा देव कोण आहे !

ככתוב על יד נביאך जसें तुझ्या भविष्यवाद्यांच्या हातून लिहिलें आहे कीं, हे देवा, जो तूं अन्यायाची क्षमा करितोस, आणि आपल्या विभागाच्या दोषाचें पातक उलंघितोस, त्या तुजसारिखा कोण आहे? तो आपला क्रोध सर्वकाळपर्यंत बाळगीत नाहीं, कारण कीं त्याला दया आवडती. तो फिरेल, तो आह्मावर दया करील; तो आमचे अन्याय धुळीस मिळवील; आणि त्यांचीं सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाकिसील. तूं याकोबासाठीं खरेंपण आणि आब्राहामासाठीं करुणा साधिसील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजापासीं पुरातन दिवसापासून शपथ वाहीस ती.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचा-

विलें, आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

תתקבל צלותהון ובעותהון आकाशांतून (दयेने) तुम्हास उत्तर मिळो व तुमचें ऐकिलें जावो, तुमचें ओरडणें मान्य होवो, तुमची प्रार्थना प्रसन्नतेने ऐकिली जावो, आणि तुमच्या विनंतीचे वाणीचें उत्तरहि मिळो; आणि परमेश्वर आमचा देव आह्मास व आमच्या सर्व इस्राएल बांधवांस, जेथें ते राहात असतील त्या ठिकाणीं प्रकाशाचा, प्रीतीचा व सख्यत्वाचा, आशीर्वादाचा, बुद्धीचा, आपल्या पवित्र मंदिराचा, मुक्तीचा, मोठेपणाचा, आनंदाचा, हर्षाचा, ज्ञानाचा व समजाचा, देवास लगटून राहाण्याचा, गौरवाचा व महत्वाचा, सफलतेचा, विस्ताराचा, शांततेचा व सुटकेचा, चांगल्या मंडळीचा, यथार्थतेचा, अधिकाईचा, पुण्याचा, हुशारीचा, सुबोधाचा, कीर्त्तनाचा, उल्हासाचा, करुणेचा, शाहाणपणाचा, चांगल्या जीवनाचा, अनुग्रहाचा व दयेचा, चांगुलपणाचा, शुद्धतेचा, देहिवराचा, सरळपणाचा, तारणाचा, प्रायश्चित्ताचा, अन्नाच्या पूर्वठ्याचा, सन्मानाचा, शास्त्राचा अभ्यास त्याच्या नामानें करण्याचा, चांगल्या मनाचा, मुगुटाचा, उपजीवनाचा, क्षमेचा, उत्तराचा, विश्रांतीचा, परोपकारबुद्धीचा, मधुरपणाचा, आश्रयाचा, त्याच्या शास्त्राच्या रहस्याचा, माफीचा, सहायाचा, शृंगाराचा, खंडणीचा, शास्त्राचा (अभ्यास करणाऱ्या लेंकरांकडून) पुष्कळ होण्याचा व वाढण्याचा, चांगल्या भक्षसामग्रीचा, न्यायत्वाचा, प्रेमाचा, उगवण्याचा, मोकळेपणाचा, प्रार्थना मान्य होण्याचा, तोंडावरील तेजाचा, पूर्ण आरोग्यतेचा, वाढण्याचा, ईश्वरास

उंचावण्याचा, प्रसन्नतेचा, कल्याणाचा, निर्भयपणाचा, अधिकाई-चा, शास्त्राचा, प्रार्थनेचा, उद्धाराचा, पश्चात्तापाचा दरवाजा उघडो. आणि तुह्मामधून तो सर्व प्रकारचा हेवा, द्वेष व वाद दूर करो; आणि शास्त्रांत जें लिहिलें आहे कीं, "तुमच्या पूर्वजांचा देव, याने तुह्मी जितके आहां, त्यापेक्षां हजारपट अधिक करावें; आणि जसें त्याने तुह्मास वचन दिल्हें आहे; तसा तुह्मास आशी-र्वाद द्यावा." हें तुह्मामध्यें स्थापित होवो आणि तुह्मास तो चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिहो. आणि असी त्याची प्रसन्नता होवो. आणि अपण तथास्तु ह्मणूं.

תתקבל צלותהון सर्व इस्राएलांच्या घराण्याची प्रा-र्थना व काकळूत, आकाश व पृथ्वींतील त्यांच्या बापापुढें मान्य होवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

יהי שלמא आणि आकाशांतून आह्मास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समा-धान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार, आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आह्मास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

אשרי האיש गीत १.

למה רגשו गीत २.

מזמור לדוד गीत ३.

למנצח בנגינות गीत ४.

לדוד מזמור ליי גीत २४.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आप-ल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचावलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत

व तुमच्या दिवसांत, लवकर व थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु; त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

יהא שלמא आकाशांतून आम्हास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्ति, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आम्हांस व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

ברכו את יי सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य म्हणा.

ברוך יי המבורך सुवंदित परमेश्वर सदासर्वकाळ धन्य असो.

עלינו לשבח आम्ही सर्वांच्या प्रभूची स्तुति करावी; आणि प्रारंभीं (पृथ्वी) घडणाऱ्यास थोर मानावें (हा आमचा मुख्य धर्म होय;) कारण त्याने आम्हास जगांतील राष्ट्रांप्रमाणें केलें नाहीं, आणि पृथ्वींतील कुलाप्रमाणें आम्हास ठेवलें नाहीं, त्यांच्या वांट्याप्रमाणें वांटा आणि त्यांच्या समुदायांच्या भाग्यप्रमाणें आमचें भाग्य करून ठेविलें नाहीं. ते व्यर्थतेस व शून्यास नमन करितात; आणि जो देव तारित नाहीं त्यास प्रार्थितात. परंतु राजांचा राजा, जो पवित्र व धन्य, ज्याने आकाश पसरिलें व पृथ्वीचा पाया घातला, ज्याच्या गौरवाची वस्ती वरील आकाशांत आणि ज्याच्या सामर्थ्याचें वैभव उंचांत आहे, त्यास आम्ही नमन करितों. तोच आमचा देव, आणि दुसरा कोणी नाहीं; आमचा राजा सत्य आणि त्यावांचून कोणी नाहीं; जसें शास्त्रांत लिहिलें

आहे कीं, आज तुह्मी जाणून आपल्या हृदयीं असें ठसवून घ्या कीं, वर आकाशांत आणि खालीं पृथ्वीवर परमेश्वर तोच देव आहे, दुसरा कोणी नाहीं.

על כן נקוה לך यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सामर्थ्याच्या गौरवानें पृथ्वींतून ओंगळपणा काढून टाकावा, मूर्ति छेदून टाकाव्या, सर्वसमर्थाच्या राज्याखालीं पृथ्वी स्थापन व्हावी, सर्व मांसमयांच्या संतानानी तुझ्या नामानें हाक मारावी, पृथ्वींतील सर्व दुष्टानी तुजकडे फिरावें, आणि सर्व गुडघे तुजपुढेंच नमावे, आणि सर्व जिव्हानी तुजविषयींच शपथ वाहावी, असें आहे; ह्मणून पृथ्वीवरील सर्व राहणारे तुलाच ओळखतील व जाणतील असें लवकर पाहण्यास आम्ही आवड धरितों. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुजपुढेंच ते नमतील व नमस्कार करितील; तुझ्या नामाच्या गौरवाचा आदर करितील; आणि सर्व तुझ्या राज्याचें जोकड (राज्याधिकार) मान्य करितील. यास्तव तूं लवकर त्यांवर सर्वकाळचें राज्य कर. कारण राज्य तुझेंच आहे; तूंच सर्वकाळ गौरवानें राज्य करिशील; जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, परमेश्वर सदांसर्वकाळ राज्य करील; आणि ह्मटलें आहे कीं, आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्या समयीं एकच परमेश्वर होईल आणि त्याचें नाम एकच.

יגדל אלהים חי जीवंत देव थोर मानिला व स्तविला जाईल. तो आहेच आणि त्याच्या अस्तित्वास काळरूप सीमा नाहीं. तो एकच आहे, आणि त्याच्या एकत्वासारिखें दुसरें एकत्व नाहीं. तो अदृश्य आहे; आणि त्याच्या एकत्वासहि अंत नाहीं. त्यास शरीराकृति नाहीं व शरीरहि नाहीं; त्याचे पवित्रतेची बरोबरी (कोणीच) करूं शकत नाहीं. तो सर्व निर्माण केलेल्या पदार्थांच्या पूर्वींचा आहे. तोच पहिला आणि त्याच्या मुळास आरंभ नाहीं. पाहा, तो जगाचा स्वामी सर्वांस घडणारा आहे; तें त्याचें महत्व व त्याचा अधिकार दाखवितें. त्यानें आपल्या भविष्यकथनाची प्रेरणा आपल्या संपत्तिरूप आणि महत्ववान मनुष्यांस

दिल्हीं. ज्याने त्याचें गौरव पाहिलें, त्या मोशेसारिखा इस्राएलांत कोणी दुसरा भविष्यवादी उठला नाहीं. देवाने आपल्या लोकांस, आपला भविष्यवादी व आपल्या घरचा विश्वासू याच्या हातून सत्य नियम शास्त्र दिल्हें आहे. देव आपल्या या नियमाशिवाय दुसरा लावून देण्याकरितां कधींहि तो पालटणार आणि बदलणार नाहीं. तो आमचीं सर्व गुह्यें पाहतो व जाणतो; सर्व पदार्थांचा शेवट तो पूर्वींच लक्षांत आणितो. धार्मिक मनुष्यांची फेड त्याच्या कर्माप्रमाणें करितो; आणि दुष्टास त्याच्या दुष्टाईप्रमाणें शासन करितो. त्याच्या तारणाच्या वेळेची वाट पाहाणाऱ्यांस खंडून घेण्याकरितां शेवटल्या दिवशीं तो आमच्या माशीयाहास पाठवील. देव आपल्या बहुत दयेने मेलेल्यांस जीवंत करील; त्याचें स्तुत्य नाम सदासर्वकाळ धन्य असो. हीं तेरा मूळतत्वें* देवाच्या नियमांचा व त्याच्या शास्त्राचा पाया आहेत.

संध्याकाळची प्रार्थना झाल्यावर कित्येक लोक घरीं न जातां देवालयांतच राहून रात्रभर पढत असतात, त्या रात्रीं शास्त्रांतील जे भाग विशेषेंकरून वाचावे ते येणेंप्रमाणें;—गीतें. ८८,१२४, ११६, २९ आणि गीतांचें पुस्तक प्रारंभापासून शेवटपर्यंत वाचून मिशनाच्या पुस्तकांतील व जोहारांतीलहि भाग वाचितात, याशिवाय, या दिवसाच्या प्रार्थनेच्या पद्धतीच्या ग्रंथांत כתר מלכות म्हणजे "राजकीय मुगुट" असा जो भाग आहे तोहि वाचितात. या भागांत सृष्टींतील चमत्कारावरून, ईश्वरी गुण वर्णून त्याचें स्तवन केलें आहे. याचें भाषांतर निराळें छापावें असी कर्त्याची इच्छा आहे.

कीर्त्तन.

वर्षप्रतिपदेच्या प्रार्थनेंत पृष्ठ ३० אלהי נשמה पासून पृष्ठ ५२ एथें לדוד ברכי נפשי याच्या शेवटपर्यंत लि-

* टीका ७.

हिल्याप्रमाणें कीर्तन वाचावें, मग खालीं लिहिल्याप्रमाणें वाचावें.

הוא האלהים ,, परमेश्वर तोच देव आहे, परमेश्वर तोच देव आहे. दो. वे.

מלך ,, परमेश्वर राज्य करितो, परमेश्वराने राज्य केलें, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. दो. वे.

והיה ,, למלך आणि परमेश्वर सर्व पृथ्वीचा राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच. हे परमेश्वरा, आमच्या देवा, आह्मी तुझ्या पवित्र नामाने उपकार मानावे, आणि तुझ्या स्तुतीने उत्सव करावा, ह्मणून तूं आम्हास तार आणि राष्ट्रांमधून आम्हास एकवट कर. इस्राएलाचा देव याचे धन्यवाद सर्वकाळापासुन सर्वकाळपर्यंतहि व्हावे; तेव्हां सर्व लोकांनी तथास्तु बोलून परमेश्वराची स्तुति करावी. प्रत्येक श्वासवानाने परमेश्वराला स्तवावें. तुम्हीं परमेश्वराला स्तवा.

למנצח מזמור לדוד गीत. १९.

רננו צדקים गीत ३३ आणि ३४, ९०, ९१, १७, २९, ३२, ९२, ६९, ८५, ८६, १०२, १०३, १०४, ९८, १२१, १२२, १२३, १२४, १३५, १३६ हीं गीतें वाचावीं.

ברוך שאמר जो बोलला आणि पृथ्वी झाली तो धन्य; जो बोलतो आणि करितो तो धन्य; जो ठरवितो आणि स्थापितो तो धन्य; ज्याने प्रारंभीं (पृथ्वी) उत्पन्न केली तो धन्य; जो पृथ्वीवर दया करितो तो धन्य; जो प्राणिमात्रांवर दया करितो तो धन्य; जो आपल्या भिणाऱ्यांस चांगलें वेतन देतो तो धन्य; जो अंधार घालवून प्रकाश आणितो तो धन्य; सदां जीवंत व सर्वकाळ स्थापित जो देव तो धन्य; त्याच्या पुढें दुष्टाई टिकत नाहीं. ज्यास विसर पडत नाहीं, आणि जो तोंडओळख धरीत नाहीं, व लांच घेत नाहीं तो धन्य; तो आपल्या सर्व मार्गांत यथार्थ, व सर्व कामांत दयाळू आहे; जो खंडून घेतो व सोडवितो तो धन्य. ज्याने आपले लोक इस्राएल यांस (शाब्बाथ असल्यास—हा शा-

ब्बाथ दिवस व) हा प्रायश्चित्ताचा दिवस, हा अपराधाच्या क्षमेचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा दिवस दिल्हा तो धन्य.

ברוך הוא וברוך שמו तो धन्य, त्याचें नाम धन्य, आणि त्याचें स्मरणहि सर्वकाळ धन्य. हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, मोठ्या पवित्र राजा, दयाळू बापा, आपल्या लोकांच्या मुखाकडून स्तविला जाणाऱ्या, आणि आपल्या यथार्थीच्या व भक्तांच्या जिव्हेकडून वाखाणिला व गौरविला जाणाऱ्या, तूं धन्य आहेस. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा सेवक दावीद याच्या गीतांकडून आम्ही तुझी स्तुति करूं, स्तवनाकडून व कीर्त्तनाकडून तुला आम्ही सन्मान देऊं, थोर मानूं, स्तवूं, गौरवूं आणि उंचावूं, आमचा राजा असें मान्य करूं, पवित्र मानूं व तुझें भय धरूं; आणि हे आमच्या राजा, आमच्या देवा, सर्वकाळ जीवंत असणारा, जो एकच स्तविलेला, आणि ज्याचें नाम सदासर्वकाळ गौरविलेलें, आम्ही तुझें नाम स्मरूं; हे परमेश्वरा, आमच्या देवा, स्तवनांकडून गौरविलेल्या राजा, तूं धन्य आहेस.

מזמור שיר ליום השבת गीत ९२.

מלך ״ गीत ९३.

מזמור לתודה गीत १००.

״ יהי כבוד परमेश्वराचें गौरव सर्वकाळपर्यंत होत जाईल; परमेश्वर आपल्या कृत्यांवर संतुष्ट होईल. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नांव धन्य धन्य ह्मटलें जावो. सूर्याच्या उगवतीपासून त्याच्या मावळतीपर्यंत परमेश्वराच्या नांवाची स्तुति असो. सर्व राष्ट्रांवर परमेश्वर उंच आहे; त्याचें गौरव आकाशांत आहे. हे परमेश्वरा, तुझें नाम सर्वकालिक आहे; तुझें स्मरण, हे परमेश्वरा, पिढोपिढीं आहे. परमेश्वराने आपलें सिंहासन आकाशांत स्थापिलें आहे, आणि त्याचा राज्याधिकार सर्वांवर आहे. आकाशाने आनंद करावा; आणि पृथ्वीने हर्षावें; आणि तीं राष्ट्रांत सांगतात कीं, परमेश्वराने राज्य केलें. परमेश्वर राज्य करितो, परमेश्वराने राज्य केलें, परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. परमेश्वर

सदांसर्वकाळ राजा आहे, त्याच्या देशांतून राष्ट्रांचा नाश झाला आहे. परमेश्वर लोकांचा विचार नाहींसा करितो; मुलुखांच्या योजना निरस करितो. मनुष्याच्या मनांत बहुत कल्पना असतात, परंतु जो परमेश्वराचा संकल्प तोच ठरेल. परमेश्वराचा विचार सर्वकाळ टिकतो; त्याच्या मनांतल्या योजना पिढोंपिढीं चालतात. कारण तो बोलतांच ती (पृथ्वी) झाली; त्याने आज्ञा करितांच ती स्थिर राहिली. कां तर परमेश्वराने सीयोन निवडून घेतलें, आपल्या राहण्यासाठीं इच्छिलें आहे. कां कीं, परमेश्वराने आपल्यासाठीं याकोब, आपलें स्वकीय धन होण्यासाठीं इस्राएल निवडून घतला आहे. कां तर परमेश्वर आपल्या लोकांला सोडीत नाहीं; आणि आपल्या वतनाला टाकीत नाहीं. तथापि तो ममताळू आहे, यास्तव तो अन्यायाची क्षमा करितो, नाश करीत नाहीं; तो बहुत वेळ आपला राग टाळितो आणि आपला सर्व संताप चेतवीत नाहीं. हे परमेश्वरा, तारण कर; आम्ही हांक मारितों, त्या दिवशीं राजाने आम्हास उत्तर द्यावें.

אשרי יושבי ביתך जे तुझ्या घरांत राहातात ते धन्य; ते नेहेमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

הללויה הללי נפשי गीत १४६.

הללויה כי טוב गीत १४७.

הללויה הללו את יי गीत १४८.

הללויה שירו ליי गीत १४९.

הללויה הללו אל בקדשו गीत १५०.

ברוך יי לעולם परमेश्वराची सर्वकाळ स्तुति असो. आमेन व आमेन. यरूशालेमांत वस्ती करितो जो परमेश्वर त्याची सीयोनांतून स्तुति असो. तुम्ही परमेश्वराचें स्तवन करा. परमेश्वर देव इस्राएलाचा देव, त्याची स्तुति असावी; केवळ तोच आश्चर्य कृत्यें करितो. त्याच्या गौरवी नामाची स्तुति सर्वकाळ-

हीं असावी; आणि त्याच्या गौरवानें सर्व पृथ्वी भरली जावी. आमेन व आमेन.

ויברך דויד आणखी दावीदानें सर्व समुदायाच्या देखतां परमेश्वराची स्तुति केली; तेव्हां दावीदानें म्हटलें, " हे परमेश्वरा, इस्राएलाच्या देवा, आमच्या बापा, सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत तुझी स्तुति व्हावी. हे परमेश्वरा, मोठेपणा व पराक्रम व तेज व जय व मान, हीं तुझीं. कारण कीं जें आकाशांत व पृथ्वींत तें सर्व तुझें; हे परमेश्वरा, राज्य आणि सर्वांवरला मुख्य अधिकार तुझा आहे. संपत्ति व गौरवहि तुझ्याकडून होतें, आणि तूं सर्वांवर अधिकार करितोस. तुझ्याच हातीं शक्ति व पराक्रम, आणि सर्वांस मोठेपण व शक्ति देणें हें तुझ्या हातीं आहे. तर हे आमच्या देवा, आतां आह्मी तुझे उपकार मानितों, आणि तुझ्या अतितेजस्वी नामाची स्तुति करितों. आणि तुझें गौरवविशिष्ट नाम, सर्व स्तुति व प्रशंसा यांवरतीं उंचावलेलें असतां वंदिलें जावें. तूंच तूं मात्र परमेश्वर आहेस; त्वां आकाशें, आकाशांचीं आकाशें व त्यांचीं सर्व सैन्यें, पृथ्वी व जें कांहीं तिजवर आहे, समुद्र व त्यांतलें सर्व उत्पन्न केलेलें तीं सर्व तूं वांचवितोस व आकाशांचीं सैन्यें तुझें भजन करितात. तूं परमेश्वर देव आहेस, ज्या त्वां आब्रामाला निवडून खास्द्यांच्या ऊर गांवांतून काढून घेतलें, आणि त्याचें नाम आब्राहाम ठेविलें. आणि त्याचें मन तुजपुढें विश्वासू असें सांपडलें, आणि खनानी, हित्ती, अमोरी व परिज्जी व यबूसी व गिर्गाशी, यांचा देश त्याच्या संततीला द्यायाला त्यासीं करार केला, आणि आपलीं वचनें खरीं केलीं आहेत, कां कीं, तूं सात्विक आहेस. आणि त्वां मिसरांत आमच्या पूर्वजांची पीडा पाहिली, आणि सूफ समुद्राजवळ त्यांची आरोळी ऐकिली. आणि फारोवर व त्याच्या सर्व चाकरांवर व त्याच्या देशच्या सर्व लोकांवर अद्भुतें व उत्पात केले. कां कीं, त्यांनी त्यांजवर गर्व केला असें त्वां जाणिलें, आणि आजच्या प्रमाणें आपल्याला नाम प्राप्त केलें. तेव्हां त्वां त्यांपुढें समुद्र दुभागला, मग ते समुद्रामधून कोरड्या भू-

मीवरून पार गेले, आणि त्यांच्या पाठीस जे लागले, ते त्वां, जसा धोंडा खोल पाण्यांत तसे अगाधांत टाकून दिल्हे."

" ויושע " तसें त्या दिवशीं परमेश्वराने इस्राएलास मिसऱ्यांच्या हातांतून सोडविलें, आणि इस्राएलाने समुद्राच्या कांठीं मिसरी मेलेले पाहिले. तेव्हां जो मोठा पराक्रम परमेश्वराने मिसऱ्यांवर केला, तो इस्राएलाने पाहिला; तेव्हां लोकानी परमेश्वराचें भय धरिलें आणि परमेश्वरावर व त्याचा सेवक मोशे यावर भरंवसा ठेविला.

אז ישיר משה मग इस्राएलाच्या संतानासुद्धां मोशाने परमेश्वराला हें गायन गाऊन असें ह्मटलें कीं, परमेश्वराला मी गाईन, त्याने तर जयच जय केला आहे; त्याने घोडा व त्यावरील स्वार समुद्रांत टाकिला आहे. परमेश्वर माझें बळ व कीर्त्तनपात्र, कां कीं तो माझा तारण झाला आहे; तो माझा देव, ह्मणून मी त्याचें गौरव करीन; तो माझ्या पूर्वजांचा देव, ह्मणून मी त्याला थोर मानीन. परमेश्वर युद्ध करणारा, त्याचें नाम परमेश्वर. त्याने फाराचे रथ व त्याचें सैन्य समुद्रांत टाकिलें आहे; त्याचे निवडलेले सरदारहि सूफ समुद्रांत बुडाले. डोहानी त्यांस झांकिलें, ते धोंड्यासारिखे तळीं गेले. हे परमेश्वरा, तुझा उजवा हात बळाने महान झाला; हे परमेश्वरा, तुझ्या उजव्या हाताने शत्रूला आपटून टाकिलें आहे. त्वां आपल्यावरील उठणाऱ्यांस आपल्या अतिथोरपणाने पाडिलें आहे; त्वां आपला मोठा संताप लाविला, याकडून ते भूसासारिखे नष्ट झाले. तेव्हां तुझ्या नाकपुड्यांच्या श्वासाने पाणी गोळा झालें, राशीसारिखे ओघ उभे राहिले, समुद्राच्या पोटांत जळें थिजलीं. शत्रूने ह्मटलें, मी पाठीस लागेन, मी आटोपीन, मी लुट वांटीन, माझा जीव त्याकडून तृप्त होईल; माझी तरवार मी उपसीन, माझा हात त्यांचें ग्रहण करील. त्वां आपल्या वाऱ्याने फुंकिलें; समुद्राने त्यांस झांकिलें; ते शिस्यासारिखे महापाण्यांत बुडाले. हे परमेश्वरा, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोण ! पवित्रतेने तुझ्यासारिखा महान कोण ! (तूं) स्तवण्याविषयीं भयमान, चमत्कार

कर्त्ता आहेस. त्वां आपला उजवा हात लांबविला, पृथ्वीनें त्यांस गिळिलें. त्वां हे खंडून घेतलेले लोक दयेने आणिले, आपल्या सामर्थ्यानें आपल्या पवित्र स्थानाकडे नेले. राष्ट्रें ऐकून कांपतील, पलेशेतांतील राहणाऱ्यांस दुःख व्याप्त करील. तेव्हां अदोमाचे अग्रसर विस्मित होतील; मोआबी बलाढ्य यांस कंप व्यापील; खनानांतील सर्व राहाणारे विरून जातील. भय व घाबरेपण त्यांवर पडेल, तुझ्या मोठ्या भुजामुळें ते दगडासारिखे एथपर्यंत स्तब्ध होतील कीं, हे परमेश्वरा, तुझे लोक पार जातील. जे लोक त्वां विकत घेतले ते पार जातील. तोंपर्यंत तूं त्यांस आणून आपल्या वतनाच्या डोंगरांत लावसील; हे परमेश्वरा, तें ठिकाण त्वां आपल्या वस्तीसाठीं केलें आहे; हे प्रभू, तें पवित्र स्थान तुझ्या हातांनी सिद्ध केलें आहे. परमेश्वर सदांसर्वकाळ राज्य करील. (परमेश्वराचें राज्य सर्वकाळ आणि सर्वकाळांच्या सर्वकाळ स्थापित आहे.) कां तर फाराचे घोडे त्याच्या रथासुद्धां व त्याच्या स्वारांसुद्धां समुद्रांत गेले, आणि परमेश्वराने समुद्राचें पाणी त्यांजवर फिरवून आणिलें, परंतु इस्राएलाचीं संतानें समुद्राच्या मधून कोरड्या भूमीवरून गेलीं.

כי ליי המלוכה कां तर राज्य परमेश्वराचें आहे; तोच राष्ट्रांवर अधिकार करितो. आणि एसावाच्या पर्वताचा न्याय करायाला सीयोन पर्वतावर तारणारे चढतील; आणि राज्य परमेश्वराचें असत जाईल. आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या शास्त्रांतहि लिहिलें आहे कीं, हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे; आणि परमेश्वर एकच आहे.

שחרית पाहांटेची प्रार्थना.

נגדך „ हे परमेश्वरा, माझी सर्व वांच्छा तुजपुढें आहे;

जरी मी आपल्या ओठाने उच्चारीत नाहीं तरी एक क्षण मी तुझी प्रसन्नता मागतों, नाहीं तर मी मरेन; परंतु माझी मागणी कोणाकडून पूर्ण होईल. मी आपला उरलेला आत्मा तुझ्या हातीं सोंपून झोंपीं जातों; ह्मणजे माझी झोंप मधुर होईल. तुजपासून दूर झालों तर मी जीवंत असतां मेल्यासारिखा; आणि तुला लगटून राहिलों तर मेलों असतां जीवंतासारिखा आहें. मी तुजपुढें कशाने यावें आणि माझी भक्ति व माझा नियम हीं कसीं असावीं हें मी जाणत नाहीं. हे परमेश्वरा, तूं आपले मार्ग मला शिकीव; आणि ह्या मूर्खपणें केलेल्या फितुरीच्या बंदांतून मला सोडीव. मजमध्यें कष्ट भोगायास सामर्थ्य आहे इतक्यांत मला शिकीव; आणि माझे कष्ट तूं धिःकारूं नको. मी आपले स्वतांस ओझें होण्याच्या आणि माझा एक अवयव दुसऱ्यास भारी होण्याच्या दिवसापूर्वीं, आणि माझ्या इच्छेविरुद्ध माझी कंबर वांकल्यापूर्वीं, आणि माझीं हाडें कसरेने खाऊन तीं मला आधार देण्यास अशक्त होण्याच्या पूर्वीं, आणि माझे पूर्वज ज्या ठिकाणीं गेले त्या ठिकाणा मी गेल्याच्या, आणि त्यांच्या विश्रांतीच्या ठिकाणीं मी विश्रांति केल्याच्या (अगोदर मला शिकीव). पृथ्वीच्या पाठीवर मी केवळ परका व प्रवासी यासारिखा आहें, आणि निश्चयें, तिच्या पोटांत माझ्या वतनाचा वांटा आहे. माझे तारूण्याने एथपर्यंत सर्व कामें आपणाकरितांच केलीं, तर आतां मी आपल्या घराची * सामग्री केव्हां करूं? हें जग † जें माझ्या मनांत आहे, तें मला आपला अंत शोधण्यास मना करितें. मी आपल्या दुष्टवासनेच्या बंदांत असतां, आणि आपल्या वांच्छेचा दास झालों असतां, आपल्या उत्पन्न कर्त्याची सेवा कसी करूं? उद्यां कीड माझी बहीण होणार, मग मी उंच पद कसें शोधूं? उद्यांचा (दिवस) मला चांगला जाईल असें जर मी जाणत नाहीं, तर आजच्या दिवसाच्या चांगल्यामुळें माझें मन कसें हर्षित होईल! माझ्या त्वचेचा पूर्ण नाश व्हावा ह्मणून दिवस व रात्र

---

* घर हें नाम एथ लाक्षणिक भाषेंत पुढल्या जगास दिल्हें आहे.
† संसार माया.

हीं जामीन झालीं आहेत. माझा अर्धा अंश हावेंत जाऊन मिसळेल आणि अर्धा अंश परत मातीस जाऊन मिळेल. माझ्या (दुष्ट) वासनेनें माझ्या तरूणपणापासून वयानें मी जर्जर होईंपर्यंत शत्रूप्रमाणें माझा पाठलाग केला आहे, तर मी काय ह्मणूं? जर तुझी प्रसन्नता नाहीं तर (या आयुष्याच्या) वेळेचा मला काय उपभोग? आणि जर तूं माझा विभाग नाहींस, तर माझा विभाग काय? चांगल्या कृत्यांविषयीं मी उघडा व नागवा आहें; आणि तुझें पुण्य मात्र माझें आच्छादन आहे. अझून मी आपलीं * वचनें किती लांबवूं. हे परमेश्वरा, माझ्या सर्व वांच्छा तुजपुढें आहेत.

אלהים אלי אתה हे देवा, तूंच माझा देव आहेस, मी तुझें गुप्त राखलेलें रहस्य लवकर शोधीन; तुझी सत्यता मी कळवीन आणि तुझें महत्व मी गाजवीन. ज्या दिवशीं मीं तुझ्या मंडळींत उभा राहतों, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां, तूं मला उत्तर दे; हे देवा, तूं माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील. हे देवा, तूंच माझा देव आहेस, माझे गुप्त अपराध तुजपुढें प्रगट आहेत, माझा जीव व माझीं हाडें तुझ्या भयामुळें कांपतात. ज्या दिवशीं घाबरलेले लोक तुझ्या तारणाची आवड धरितात आणि कुलीन लोक एकत्र होतात, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां तूं मला उत्तर दे. हे देवा, यथार्थता पांघरणारा व धारण करणारा माझा देव तूंच आहेस; तुझें भय धरणारांनी त्यांसाठीं काकळूत करण्यास मला परवानगी दिल्ही आहे; तर मी त्वरा करितों, परंतु मी लज्जित न व्हावें. आणि ज्या दिवशीं तूं माझा (मोहो) † दाबून टाकणार आणि माझे घाव बरे करणार त्या दिवशीं, जेव्हां मी तुला हाक मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे; आणि मी लज्जित न व्हावें म्हणून माझें मन तुझ्या विधीविषयीं यथास्थित असावें. हे देवा, तूंच माझा देव आहेस, माझ्या विचा-

---

* इ. जीभ. † इ. फांस.

रानी मला तुजपासून वळवूं नये; आणि माझ्या ओंठानी चूक करण्याविषयीं त्वरा करूं नये; म्हणून त्यांस तूं सांभाळ. ज्या दिवशीं तुझ्या स्तुतीमुळें मला माझ्या कष्टांचा विसर पडतो, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों, तेव्हां मला उत्तर दे; तुझ्या प्रकाशानें, व तुझ्या सत्यतेनें मला चालवावें ह्मणून त्यांस पाठीव. हे देवा, तूंच माझा देव आहेस, हे माझ्या खडकरूप आश्रया! मी तुजकडे पाहातों, तूं मला शिकीव व धैर्य दे, कारण मजमध्यें कांहींच शक्ति नाहीं. ज्या दिवशीं मी आपल्या ऋणापासून शुद्ध व निर्मळ होणार, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों, तेव्हां मला उत्तर दे; हे देवा, मजमध्यें शुद्ध मन उत्पन्न कर, आणि सरळ आत्मा मजमध्यें नवा कर. हे देवा, तूंच माझा देव आहेस, अति उंच आकाशांत वस्ती करणाऱ्या, खोल स्थानांतून ओरडून मी तुजकडे विनंती करितों. ज्या तुझी स्तुति उच्चारण्याच्या दिवशीं (पापाच्या) क्षमेची आवड धरणारांच्या, आणि * देव वळेल, आणि रागापासून फिरेल असें जाणणारांच्या मंडळींत जेव्हां मी हाक मारितों, तेव्हां मला उत्तर दे. हे देवा, तूंच माझा देव आहेस, मी तुजपुढें अतिक्रमानें भरलेला आहें; हे अनंता, जर तूं अन्याय मोजितोस, तर हे प्रभु, तुजपुढें कोण उभा राहील? जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां तूं मला उत्तर दे; मजशीं वाद करायास आज तूं येऊं नको; कारण मी अन्यायांत जन्मलों आणि माझ्या आईनें माझा गर्भ पापांत धरिला. हे देवा, तूंच माझा देव आहेस, मला सरळमार्गीं चालवायास पूर्वींच तूं उपाय दाखवून ठेविला आहेस; मला प्रसन्नतेनें सुशोभित करायास त्वां प्रायश्चित्ताचा दिवस नेमून ठेविला आहे. ज्या दिवशीं मी बांधलें गेलेले बंद तुटणार, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां तूं मला उत्तर दे; माझ्या अन्यायापासून मला पूर्ण धू, आणि माझ्या पापापासून मला शुद्ध कर. हे देवा, तूंच माझा देव आहेस, जरी

---

* या वाक्याचा कोण असा अर्थ करितात कीं, जो कोणी (ईश्वराकडे) फिरायास जाणतो त्यानें पश्चात्ताप करावा.

माझ्या जाणून केलेल्या पापामुळें मी शोककारक नीचत्वांत आहें, तरी माझे विचार तुझ्या जवळ येण्याची आवड धरितात. ज्या दिवशीं त्वां विश्वासू कळपास तुह्मी आपणासुद्धां वचनें घेऊन (प्रार्थना करून *) ईश्वराकडे फिरा, असें सांगितलें, त्या दिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां तूं मला उत्तर दे. हे देवा, तूं माझा देव आहेस, जे तुजमध्यें हर्ष मानितात त्यांनी आपलीं अंतःकरणें शुद्ध करून त्यागें † पिणें वर्जिलें आहे. तुला लगटून राहणारांनी ज्या दिवशीं आपणास दुःख लावून घ्यावें असें नेमिलें आहेस, त्यादिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे; त्या तुझे नेम शिकावे ह्मणून मी पिडीत होतों हें मला बरें आहे. हे देवा, तूंच माझा देव आहेस, आह्मी आपले डोळे ‡ तुजकडे उंचाविले आहेत, आह्मी आपली दृष्टी तुजकडे लाविली आहे, आणि आपलीं तोंडें खालीं घालून तुजसमोर उभे आहों. त्यादिवशीं खोटे विचार स्पष्ट दिसणार, त्यादिवशीं जेव्हां मी तुला हाक मारितों तेव्हां तूं मला उत्तर दे; आपण आपलीं हृदयें व आपले हात, देवाकडे उंचावूं या. हे देवा, दयाळू व आकाशांतील सेराफीमांच्या मंडळींत सन्मानिलेला तूंच माझा देव आहेस, मी जेव्हां मनन करून तुझी काकळूत करितों, तेव्हां माझी आठवण कर आणि मला दर्शन दे. हे परमेश्वरा, सर्व प्राण्यांचा आत्मा तुला धन्य ह्मणेल असें मी तुझा विश्वासू लोकांच्या मंडळींत ह्मणून जेव्हां मी तुला हांक मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे.

נשמת כל חי हे परमेश्वरा ! आमच्या देवा, सर्व प्राण्यांचा आत्मा तुझ्या नामाला धन्य ह्मणतो; आणि हे आमच्या राजा ! सर्व मांसमयाचा जीव तुझ्या स्मरणाचें नित्य गौरव करून प्रशंसा करितो. सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत तूंच देव आहेस; आह्मास तुजवांचून कोणी राजा, खंडून घेणारा, तारणारा, मुक्त करणारा, सोडविणारा, आणि दुःखाच्या व संकटाच्या समयीं

* इ. वचनें घेऊन. † इ. रुचि घेणें. ‡ इ. पापण्या.

उत्तर देणारा व दया करणारा कोणी नाहीं. आह्मास तुजवांचून राजा, सहायकर्ता व आश्रय देणारा कोणी नाहीं. हे आदिकाळच्या व अंतकाळच्या देवा ! सर्व प्राण्यांच्या देवा ! सर्व उत्पत्तीच्या स्वामी ! तूं सर्व स्तुतींकडून वर्णिला आहेस; तूं आपल्या जगाला दयेने, आणि सर्व प्राण्यांस कृपेने चालवितोस. आणि परमेश्वर जागृत आहे; तो निजत नाहीं व झोंप घेत नाहीं; झोंपीं गेलेल्यांस सावध करितो; निजलेल्यांस जागृत करितो; मेलेल्यांस जिवंत करितो; रोग्यांस निरोगी करितो; आंधळ्यांस दृष्टी देतो; ओणव्यांस उभे करितो, मुक्यांस वाचा देतो; गुप्त गोष्टी प्रगट करितो; (हे देवा,) तुजपुढेंच मात्र आह्मी नमन करितों.

ואלו פינו जरी आमचे मुखांत सागराप्रमाणें गायन, आमच्या जिव्हेंत त्यांतील लाटांच्या गर्जनेसारिखी स्तुति, आमच्या ओठांत विस्तीर्ण अंतराळासारिखें कीर्त्तन, आणि जरी आमचे डोळे सूर्य व चंद्र यांसारिख्या तेजाने भरले आहेत, आमचे हात आकाशांतील गरूडा सारिखे पसरले आहेत, आणि आमचे पाय हरणासारिखे चपळ आहेत; तरी हे परमेश्वरा, आमच्या देवा, पूर्वीं त्वां आह्मावर व आमच्या पूर्वजांवर जे हजारों व लक्षावधि उपकार, चिन्हें व चमत्कार केले आहेस, त्यांतील एकाकरितांहि तुझें स्तवन करायास; आणि हे आमच्या राजा, तुझें नाम सुवंदित करायास आह्मामध्यें पूर्णता नाहीं. हे परमेश्वरा ! आमच्या देवा, त्वां आह्मास मिसरांतून काढिलें, दासत्वाच्या वस्तींतून त्वां आह्मांस सोडावलें, दुष्काळांत अन्न पुरविलें, सुकाळांत आह्मास पोषिलें, तरवारीपासून आह्मास मुक्त केलें, पटकींतून आह्मास वांचविलें, आणि वाईट व पुष्कळ रोगांपासून आह्मास सोडविलें. एथपर्यंत (आजपर्यंत) तुझ्या दयेने आमचें सहाय केलें, आणि तुझ्या कृपेने आह्मास सोडिलें नाहीं, ह्मणून जें निरनिराळें अवयव त्वां आह्मामध्यें (उत्पन्न) केले आहेस; जो आत्मा व जीव आह्मामध्यें फुंकिला आहेस; आणि जी जीभ आमच्या मुखांत ठेविली आहेस; पाहा, तीं, हे आमच्या राजा, तुझ्या नांवाला सर्वकाळ

स्तवितील, धन्य ह्मणतील, वाखाणितील, गौरव करितील आणि गातील. कारण सर्व मुखें तुझेंच स्तवन करितील; सर्व जिव्हा तुलाच वाखाणितील, सर्व डोळे तुजकडेसच लागतील; सर्व गुडघे तुजपुढेंच टेंकले जातील; सर्व बांधे (मनुष्यांचीं शरीरें) तुजपुढेंच नमन करितील; सर्व मनें तुझेंच भय धरितील; आणि सर्व अंतर्यामें व गुर्दकमळें तुझ्याच नांवाचें स्तवन करितील. जसें ह्मटलें आहे कीं, माझीं सर्व हाडें ह्मणतील कीं, "हे परमेश्वरा! तुझ्यासारिखा कोण? दीनापेक्षां जो शक्तिमान त्यापासून. आणि दीनाला व दरिद्र्याला त्याच्या लुटणाऱ्यापासून तूं सोडवितोस; दीनाची विनंती तूं ऐकितोस आणि गरीबांच्या ओरडण्याकडे कान लावून त्याचें तारण करितोस." आणखी असें लिहिलें आहे कीं, "अहो नीतिमान, तुह्मी परमेश्वराविषयीं हर्ष शब्द करा; कीर्त्तन करणें हें सरळांस शोभतें; सरळांच्या मुखांकडून तूं उंचाविला जाशील; पुण्यवंताच्या ओंठांकडून सुवंदित होशील; यथार्थांच्या जिव्हेकडून पवित्र मानिला जाशील; आणि पवित्र लोकांमध्यें तुझी स्तुति केली जाईल."

במקהלות तुझे लोक इस्राएल यांच्या घराण्यांच्या दाहा हजारांच्या मंडळ्यांमध्यहि (असें तुझें गौरव केलें जाईल); कारण सर्व उत्पन्न केलेले पदार्थांचा असा धर्म आहे कीं, इशायचा पुत्र दावीद याच्या गीतांपेक्षां व स्तुतीपेक्षां त्यांनी तुझी अधिक स्तुति करावी, स्तवन करावें, सुवंदन करावें, गौरव करावें, उंचावावें; सन्मान करावा, आणि वाखाणावें.

ובכן ישתבח שמך यास्तव, हे आमच्या राजा; तुझें नाम सर्वकाळ सुवंदित असो: आकाशांत व पृथ्वींत तूंच सर्वाधिकारी, मोठा व पवित्र देव आहेस; कारण, हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, गायन व सुवंदन, स्तुति व कीर्त्तन, शक्ति व अधिकार, जयजयकार, मोठेपणा व सामर्थ्य, स्तवन व गौरव, पवित्रता व राज्य हें तुलाच, आणि धन्यवाद व उपकार स्तुति तुझ्याच मोठ्या व पवित्र नामाला शोभतात; आणि

सर्वकाळांपासून सर्वकाळपर्यंत तूंच देव आहेस. हे परमेश्वरा! मोठ्या व स्तुतिकडून वर्णिलेल्या राजा, महत्ववान देवा, आश्चर्य कृत्यांच्या स्वामी, सर्व प्राण्यांस उत्पन्न करणाऱ्या, सर्व कामांच्या धनी, कीर्त्तनाच्या गायनामध्यें आवड धरणाऱ्या, जगतांच्या जीवंत देव राजा, तूं धन्य आहेस. आमेन.

שנאנים שאננים शांतीचे शीनअनिम * दूत ज्वालेसारिखे प्रकाशतात; ज्या तेजाने ते वेष्टिलेले आहेत, तें निर्मल आरस्या सारिखें चमकतें; गौरव युक्त आसनापुढें ते मोठ्या वाणीने हर्ष करितात; आणि दृष्टांताकडून ते एक प्रत्येकास हाक मारितात, देवास पवित्र मानणें त्यांस आवडतें.

הבו ליי अहो परमेश्वराच्या दुतानों, परमेश्वराला द्या, (परमेश्वराला गौरव व वैभव) द्या.

לך חיות वरील हाय्योथ * दूतहि तुझेच आहेत, त्यांस तुझ्या आसनाखालीं नेमून ठेविलें आहे, आणि आरआलिम * व हाशमालिम * जे तेजस्वी रंगाने वेष्टिलेले आहेत, ते आपल्या चार टोळ्या करून तुझी स्तुति व तझें महत्व गाजवितात. एक सन्मानाने व दुसरी धैर्याने तुझें कीर्त्तने व गायन करितात; हे पराक्रमी दूतांरात्रदिवस आपल्या पाहाऱ्यावर उभे असतात. הבו ליי

מכון משמר वर सांगितलेल्या पाहाऱ्याची नेमणूक तुझ्या सर्व सैन्याच्या तळांच्यावर आहे, आणि ती तुझ्या नामांकित सरदार मीखाएल याच्या हातीं सोंपिलेली नाहीं कीं काय? (त्या पाहाऱ्यावरील दूत) लक्षावधि रथांमध्यें तझ्या उजव्याकडे उभे आहेत; याप्रमाणें ते एकवट होऊन व एकत्र राहून तुझें वसतिस्थान कोठें आहे याचा शोध करितात; तेथें पडद्याच्या आड ‡ नमन करून ते तुझें भजन करीत जवळ येतात. הבו ליי

המון מחנה दुसऱ्या तळाचें सैन्य तुझ्या डाव्याबाजूस

---

* या दुताच्या जाति आहेत.
† इ. पराक्रमी पुत्र.
‡ इ. पुढें.

उभें आहे; त्यांच्या सैन्यावर पाहाणीकरितां गाब्रीएल हा आहे, हजारो सेराफीम इकडून, आणि फार बळकट व मोठें सैन्य तिकडून तुझ्या पवित्र आसनास घेरितात, ते अग्नीचे घडलेले आणि अग्नीने वेष्टिलेले असून अग्नीच्या घोड्यांवर स्वार होतात. הבו ליי

קול יצפצף तिसऱ्या तळाचें सैन्य गुंगण्याच्या वाणीचें गीत रचितात, आणि बलिष्ठ सरदार नुरीएल त्यामध्यें हत्यारखाण्याच्या बुरूजासारिखा उभा आहे; त्यांच्या पाऊळच्या गडबडीमुळें, आणि अनादि देव, आकाशाचा व पृथ्वीचा * घडणारा कोठें आहे? अशा त्यांकडून वारंवार निघणाऱ्या शब्दाच्या गर्जनेमुळें अति उंच आकाशमंडळाहि थरथरतें; ते तुझें पूर्ण सौंदर्य पाहाण्याकरितां रात्रंदिवस आवड धरितात. הבו ליי

מכוסי הוד चौथ्या (तळाचें) गौरवाने शृंगारलेलें (सैन्य) तुजविषयीं साक्ष व प्रमाण देतें, आणि रेफाएलाबरोबर तुझें वचन व गौरव कळवितें; ते सामर्थ्याच्या पुष्पाने व पराक्रमाच्या मुगुटाने तुला शृंगारित व सुशोभित करितात. ते चारहि तळ एकत्र होऊन सदांसर्वकाळ गीतें व सुवर्णवाक्यें गातात; कारण त्यां त्यांस असें घडलें आहे कीं, ते कधींच थकत नाहीं व म्लान होत नाहींत. הבו ליי

נצוצים נקבצים त्या एकत्र झालेल्या ज्योति एकदांच तुला स्तवितात, आणि जुलुमामुळें कण्हणाऱ्यांकरितां † तुजपुढें काकळूत करितात, आणि तुझ्या भयामुळें व त्रासामुळें आपलीं पाउलें स्थापून गडगडाटासारिख्या मोठ्या वाणीने वेळोवेळ तुझी पवित्रता गातात; आणि पवित्र देवास पवित्र उत्तरें करून परम पवित्रापुढें मध्यस्थ होतात. הבו ליי

קדיש לעילא पृष्ठ ९.

ברכו את יי सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य म्हणा.

ישתבח ויתפאר राजा, राजांचा राजा आणि पवित्र

* इ. उंच व नीचाचा. † इस्राएलांकरितां.

व धन्य जो, त्याचें नाम स्तविलें आणि गौरविलें जावो. पहिला तोच व शेवटलाहि तोच आणि त्यावांचून कोणी देव नाहीं. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाम सुवंदित व सर्व स्तुति व प्रशंसेपेक्षां अधिक उंचाविलेलें असो.

ברוך ״ המבורך सुवंदित परमेश्वर सदांसर्वकाळ धन्य असो.

״ ברוך אתה ״ हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, उजेड घडणाऱ्या आणि काळोख उत्पन्न करणाऱ्या, शांति करणाऱ्या आणि सर्व पदार्थ उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस. सर्व तुला स्तवितील, सर्व तुला सुवंदितील आणि सर्व ह्मणतील कीं, परमेश्वरासारिखा पवित्र कोणीच नाहीं. हे सर्वांस घडणाऱ्या, प्रतिदिवशीं पूर्वेच्या द्वारांचीं कवाडें उघडणाऱ्या देवा, आणि अंतराळाच्या खिडक्या उघडणाऱ्या, सूर्यास त्याच्या ठिकाणांतून आणि चंद्रास त्याच्या विश्रांतीच्या जागेतून काढणाऱ्या, आणि सर्व जगास व दयेच्या गुणाकडून उत्पन्न केलेल्या त्याजवरील राहाणाऱ्यांस प्रकाशित करणाऱ्या, सर्व तुलाच उंच मानितील; सेलाह. पृथ्वीला व तिजवर राहाणाऱ्यांला दयेने प्रकाश देणाऱ्या, आणि आपल्या चांगुलपणाकडून नेहमी प्रतिदिवशीं उत्पत्तीचीं कृत्यें नवीं करणाऱ्या, हे परमेश्वरा, तुझीं कृत्यें किती आहेत ! तीं सर्व त्वां चातुर्याने केलीं; पृथ्वी तुझ्या संपत्तीने भरली आहे. पूर्वकाळांपासून उंच मानिलेल्या आणि अनंतकाळाच्या दिवसांपासून स्तविलेल्या, गौरवयुक्त व थोर मानलेल्या राजा, अनादि देवा ! तुझ्या पुष्कळ दयेने आह्मावर दया कर. आमच्या सामर्थ्याचा देव, आमचा खडकरूप आश्रय, आमच्या तारणाची ढाल आणि आमच्या आश्रयाचा दुर्ग (तूंच आहेस.) तुजबरोबर तुळणा करणारा कोणी नाहीं; आणि तुजवांचून कोणी नाहीं; तुजविना कोणी नाहीं; आणि तुजसारिखाहि कोणी नाहीं. हे परमेश्वरा ! आमच्या देवा, या जगांत तुजबरोबर तुळणा करणारा कोणी नाहीं, आणि हे आमच्या राजा, पुढील जगांत तुजवांचून कोणी

नाहीं; हे आमच्या खंडून काढणाऱ्या, माशीयाहच्या दिवसापर्यंत तुजविना आम्हास कोणीच नाहीं; आणि हे आमच्या तारणाऱ्या, पुनरुत्थितीच्या वेळेस आम्हास तुजसारिखा कोणीच असणार नाहीं.

אל אדון देव सर्व कृत्यांचा स्वामी आहे; तो सर्व प्राण्यांच्या मुखांकडून धन्य मानलेला व सुवंदित आहे. त्याच्या मोठेपणाकडून व चांगुलपणाकडून पृथ्वी भरलेली आहे; ज्ञान व बुद्धि त्याच्या सभोंवर्ती आहेत. तो पवित्र हाय्योथापेक्षां * श्रेष्ठ आणि रथांवर गौरवाने शोभायमान आहे. पुण्य व सरळपणा त्याच्या आसनापुढें आहेत, आणि कृपेने व दयेने त्याचें गौरव भरलें आहे. आमच्या देवाने ज्या ज्योति उत्पन्न केल्या त्या उत्कृष्ट आहेत; त्या त्याने ज्ञान, बुद्धि व चातुर्याने घडिल्या आहेत. त्यांस त्याने सामर्थ्य व बळ दिल्हें आहे कीं, त्यांनी सृष्टि चालवावीं. त्या तेजाने व किरणाच्या उजेडाने भरल्या आहेत, सर्व जगांत त्यांचें तेज सुंदर आहे. निघतांना त्या आनंद करितात व परत येतांना उल्हास करितात; आणि आपल्या उत्पन्न करणाऱ्याची इच्छा भयाने (पूर्ण) करितात. ते त्याच्या नामाचें गौरव व महत्व करितात; आणि त्याच्या राज्याच्या आठवणीवरून हर्ष व उल्हास करितात. सूर्यास हाक मारतांच तो प्रकाशला, आणि चंद्राचे आकार पाहून त्याने त्यांस सुधारलें. (यावरून) उंचावरील सर्व सैन्य त्याचें स्तवन करितें, आणि सेराफीम, ओफानीम आणि पवित्र हाय्योथ † त्याचें गौरव करून त्यास थोर मानितात.

शाब्बाथ असल्यास हें बोलावें.

לאל אשר שבת जो सर्व कामांपासून स्वस्थ राहून सातव्या दिवशीं थोर मानिला जाऊन गौरवाच्या आसनावर बैसला, त्या देवाची ते (दूत) स्तुति करितात. विसांव्याच्या दिवसास त्याने सौंदर्याने शृंगारित करून शाब्बाथ दिवसास त्याने हर्ष

* हाय्योथ एक प्रकारचे दूत आहेत.

† हीं निरनिराळ्या प्रकारच्या दूतांचीं नावें आहेत.

असें ह्मटलें. जेव्हां देव आपल्या सर्व कामांपासून स्वस्थ राहिला त्या सातव्या दिवसाच्या स्तुतीचें गीत तें हेंच. आणि सातवा दिवस शाब्बाथ दिवशीं गाण्याचे गीताकडून * स्तुति करून ह्मणतो. यास्तव ईश्वराने सर्व घडलेले पदार्थ त्याचें गौरव करून सर्व पदार्थ घडणाऱ्या राजास, ज्याने आपले लोक इस्राएल यांस शाब्बाथ दिवशीं विसांवा दिल्हा, त्याचें गौरव व माहात्म्य करून त्यास थोर मानितात.

शाब्बाथ नसल्यास एथून बोलावें.

שמך יי אלהינו हे परमेश्वरा! आमच्या देवा, तुझ्या हातांच्या स्तुत्य कामाकरितां,आणि ज्या तेजस्वी ज्योति त्वां घडिल्या त्यांकरितां वर आकाशांत व खालीं पृथ्वींत तुझें नाम पवित्र मानिलें जावो; आणि हे आमच्या राजा, तुझी आठवण स्तविली जावो. तीं (सर्व) तुझें गौरव करितील. सेलाह.

תתברך לנצח हे आमच्या खडकरूप आश्रया, आमच्या राजा, आमच्या खंडून घेणाऱ्या, आणि पवित्र (दूतांस) उत्पन्न करणाऱ्या, तूं सदांसर्वकाळ धन्य आहेस; हे आमच्या राजा, सेवा करणारे दूत उत्पन्न करणाऱ्या, आणि ज्याचे सेवा करणारे दूत जगताच्या उंच भागीं उभे राहून भयाने एकाच वाणीने जीवंत देव व जगताच्या राजाच्या गोष्टी ऐकवितात, तुझें नाम सर्वकाळ स्तविलें जावो. ते सर्व प्रिय, शुद्ध, पराक्रमी व पवित्र असून ते सर्व आपल्या उत्पन्नकर्त्याची इच्छा भयाने व त्रासाने पूर्ण करितात. आणि सर्व आपलीं मुखें पवित्रतेने, शुद्धतेने, गायनाने व कीर्त्तनाने उघडून थोर, पराक्रमी,भयंकर व पवित्र जो देव राजा,त्याच्या नामास धन्य ह्मणतात, स्तवितात, गौरव करितात, पवित्र मानितात, सन्मान देतात व राज्याधिकार देतात.आणि सर्व आपणावर देवाच्या †राज्याचें जोकड एक प्रत्येकापासून मान्य करून आणि स्वस्थ आत्म्याने, शुद्ध

* दावीदाचें ९२ वें गीत.

† मूळ ग्रंथांत देव या शब्दाकरितां आकाश असा शब्द आहे; आणि इब्री ग्रंथांत असें पुष्कळ वेळ आढळतें.

ओठाने व पवित्र मधुरपणाने आपल्या घडणाऱ्यास पवित्र मानायास सर्व एकदांच भयाने उत्तर देवून त्रासाने म्हणतात कीं, "पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे." आणि ओफानिम व पवित्र हाय्योथ उंच होऊन मोठ्या स्वराने त्यांसमोर स्तवन करीत ह्मणतात कीं, "त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो."

לאל ברוך सुवंदित देवासाठीं मधुर गायन करून राजा आणि जीवंत व निश्चल देव, याचें कीर्तन करून व स्तुति ऐकवून (ते दूत) असें ह्मणतात कीं, थोर व पवित्र, पराक्रम करणारा, नवीन कृत्यें करणारा, युद्धांचा स्वामी, यथार्थता पेरणारा, तारण उगविणारा, आरोग्यता उत्पन्न करणारा, स्तुतीने भयंकर, आश्चर्य कर्मांचा धनी आणि प्रतिदिवशीं आपल्या दयेने उत्पत्तीचीं कृत्यें नवीन करणारा, तो एकटाच आहे. जसें ह्मटलें आहे कीं, ज्याने मोठ्या ज्योति उत्पन्न केल्या, त्याची स्तुति करा; कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे. हे परमेश्वरा, ज्योति घडणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אהבת עולם हे परमेश्वरा, आमच्या देवा, सर्वकालिक प्रीतीने त्वां आह्मावर प्रीति केली; हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या मोठ्या नामाकरितां व ज्या आमच्या पूर्वजानी तुजवर भरंवसा ठेविला, त्यांकरितां त्वां अति मोठ्या दयेने आमची करुणा केली; आणि त्यानी आपल्या पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करावी, ह्मणून जसे त्वां त्यांस जीवनाचे नियम शिकविले, तसी हे आमच्या बापा, दयाळू पित्या, आह्मावर कृपा कर; हे दयावंता, आतां आह्मावर कृपा कर, आणि तुझ्या शास्त्रीय विषयांच्या गोष्टी आम्ही आवडीने समजाव्या, लक्षांत घ्याव्या, ऐकाव्या, शिकाव्या, शिकवाव्या, सांभाळाव्या, पूर्ण कराव्या, आणि स्थापित कराव्या, ह्मणून तूं आमच्या मनांत बुद्धि दे; आणि तुझ्या शास्त्राकडे आमचे डोळे प्रकाशित कर (उघड); आमचीं मनें तुझ्या आज्ञांकडे लागूं दे. आह्मी कधींच लज्जित होऊं नये, घाबरूं नये, व

गळून पडूं नये; यासाठीं तुझ्या नांवावर आह्मी प्रीति करावी व त्याचें भय धरावें, ह्मणून आमचीं मनें एकचित्त कर; कारण तुझ्या पवित्र, थोर व पराक्रमी नांवावर आह्मी भरंवसा ठेविला आहे. आह्मी तुझ्या तारणाविषयीं आनंद व हर्ष करूं. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या दयेने व पुष्कळ कृपेने आह्मास सदांसर्वकाळ सोडूं नये. सेलाह. त्वरा करून पृथ्वीच्या चोहों कोंनांकडून आह्मावर आशीर्वाद व शांति येऊं दे; राष्ट्रांचें जोकड आमच्या मानेवरून मोडून टाक. आणि आह्मास आमच्या देशीं लवकर सुखरूप ने; कारण तारण करणारा देव तूंच आहेस. त्वां आह्मास सर्व लोकांतून व सर्व भाषांच्या राष्ट्रांतून निवडून घेतलें; आणि आह्मी तुझें स्तवन करावें, तुझें एकत्व मानावें, आणि तुझ्या नांवाचें भय धरून त्याजवर प्रीति करावी; ह्मणून हे आमच्या राजा, प्रीतिने त्वां आह्मास आपल्या थोर नामाजवळ नेलें. हे परमेश्वरा, आपले लोक इस्राएल यांस प्रीतीने निवडून घेणाऱ्या, तूं धन्य आहेस.

קריאת שמע पृष्ठ ११.

אלהיכם אמת ״ परमेश्वर तुमचा देव सत्य आहे.

אמת ויציב ही गोष्ट सर्वकाळ आह्मास सत्य, खरी, स्थापित, सिद्ध, सरळ, विश्वसनीय, प्रिय, लाडकी, आवडती, मधुर, भयंकर, उत्कृष्ट, नियमित, स्वीकारणीय, चांगली व सुंदर अशी आहे. जगतांचा देव आमचा राजा, याकोबाचा खडकरूप आश्रय, आमच्या तारणाची ढाल, हें सत्य आहे; पिढीपिढीं तो निश्चल, त्याचें नांवहि निश्चल, त्याचें आसन स्थापित आहे, आणि त्याचें राज्य व सत्य सर्वकाळ राहातें. त्याने ज्या गोष्टी आमच्या पूर्वजांविषयीं, आह्मांविषयीं, आमच्या लेंकरांविषयीं, आमच्या पिढीविषयीं, आणि आपला सेवक इस्राएल याच्या बीजाच्या पिढ्यांविषयीं केल्या आहेत त्या सदांसर्वकाळ जीवंत (सिद्ध) स्थापित, सत्य, प्रिय आहेत. पूर्वींच्या व मागल्या (लोकांविषयीं) जें त्याचें ह्मणणें आहे, तें चांगलें सत्य व खरेपणा यांत स्थापित असून कधीं उलं-

घून न जाणारा असा करार आहे. परमेश्वर आमचा देव व आमच्या पूर्वजांचा देव; आमचा राजा व आमच्या पूर्वजांचा राजा; आह्मास खंडून घेणारा व आमच्या पूर्वजांस खंडून घेणारा; आह्मास घडणारा; आणि आमच्या तारणाची ढाल तूं आहेस; हेंहि सत्य आहे. आमचा सोडविणारा व मुक्त करणारा, हें सर्वकाळापासून तुझें नाम आहे, तुजवांचून आह्मास दुसरा कोणी देव नाहीं. सेलाह.

עזרת אבותינו जो आमच्या पूर्वजांस सर्वकाळापासून सहाकारी, आणि जो त्यांस आणि त्यांच्या मागें पिढोपिढीं त्यांच्या लेंकरांस ढाल व तारक, तो तूंच; जगाच्या वर तुझें वस्तिस्थान आणि तुझा न्याय व तुझी यथार्थता पृथ्वीच्या सीमेपर्यंत आहे. जो पुरुष तुझ्या आज्ञा ऐकितो, आणि तुझें शास्त्र व तुझीं वचनें आपल्या मनांत ठेवितो, तो आशीर्वाद पावतो; हें सत्य आहे. जो आपल्या लोकांचा स्वामी आणि बापांचा व पुत्रांचा वाद (स्वतां) चालविणारा पराक्रमी राजा तो तूंच, हें सत्य आहे. जो पहिला व शेवटला तो तूंच; तुजवांचून आह्मास राजा, उद्धारक व तारक कोणीच नाहीं, हें सत्य आहे. हे परमेश्वरा! आमच्या देवा, त्वां आम्हास मिसरांतून सोडविलेंस; दासत्वाच्या घरांतून आम्हास खंडून काढलेंस; त्यांच्या सर्व ज्येष्ठ पुत्रांस मारून आपले ज्येष्ठ पुत्र इस्राएल यांस सोडाविलेंस; त्यासाठीं सूफ समुद्र दुभागलास; गर्विष्ठांस त्यांत बुडवून आपल्या प्रियकरांस समुद्राच्या पार नेलेंस; शत्रूला पाण्याने झांकिलें; त्यांतून एकहि उरला नाहीं; (असे चमत्कार करणारा) तो तूंच आहेस, हें सत्य आहे. यावरून प्रियकरानी देवाची स्तुति करून त्यास थोर मानिलें; आणि आवडत्यांनी राजा, आणि जीवंत व निश्चल देव याचें कीर्त्तन व गायन केलें, स्तुति केली, सुवंदन केलें व उपकारस्तुति केली. उंच, थोर, मोठा, पराक्रमी, भयंकर, गर्विष्ठांस भूमीएवढें नीच करणारा, पडलेल्यांस आकाशाएवढें उंच करणारा, बंदिवानांस मोकळें करणारा, नम्रांस खंडून घेणारा, गरिबांस सहाय करणारा, आणि आपले लोक इस्राएल यांस काकुळतीच्या वेळेस

उत्तर देणारा (तूंच आहेस.) धन्य व सुवंदित जो थोर देव त्यांचा उद्धारक त्याची स्तुति असो. मौशे व इस्राएलाचे पुत्र यानी मोठ्याने तुला गाऊन सर्वांनी ह्मटलें कीं, हे परमेश्वरा, देवांमध्यें तुजसारिखा कोण? पवित्रतेने महान, स्तविण्याविषयीं भयमान, चमत्कारकर्ता तुजसारिखा कोण आहे! जे सोडविले गेले त्यानी समुद्रतीरीं गाऊन तुझ्या मोठ्या नामाची स्तुति केली, त्या सर्वांनी तुझी उपकारस्तुति करून व तुझें राज्य मान्य करून ह्मटलें कीं, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. आणखी असेंहि ह्मटलें आहे कीं, आमचा उद्धारणारा कोण? तर त्याचें नाम सैन्यांचा परमेश्वर, इस्राएलाचा पवित्र आहे. हे परमेश्वरा, इस्राएलांचा उद्धार करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אדני שפתי תפתח पृष्ठ १४.

पाहांटेच्या प्रार्थनेमध्यें (शाहारीथमध्यें) אדני שפתי पहिल्याने हळू बोलून पुनः मोठ्याने बोलल्याअगोदर हें पुढील गीत बोलण्याची चाल आहे.

שמעתי " हे परमेश्वरा, तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहें.

שמעתי " हे परमेश्वरा, तूं मला आपल्या रागाने कदाचित नाहींसें करशील, ह्मणून माझ्या झडतीच्या दिवसाविषयीं ऐकल्यामुळें मी कांपतों, आणि माझ्या न्यायाच्या दिवसामुळें मी भितों व थरथरतों, कारण देवाचा दिवस मोठा आहे. "

מי לא יירא " हे परमेश्वरा, न्यायाच्या भयंकर दिवसामुळें कोण भिणार नाहीं! कारण अग्नीसारिख्या स्वच्छ ठिकाणीं तुलाच मात्र मोठेपणा व पराक्रम शोभतो; परमेश्वराशीं स्नेहाने कोण वागेल! "

מלך יושב " हे परमेश्वरा, न्यायासनावर बसणाऱ्या राजा, तुझा सरळपणा कळविण्याकरितां, हे परमेश्वरा, सेराफीम गाद्यांवर भोवतालें उभे आहेत, कां कीं नेम व न्याय जाणणाऱ्या

सर्व लोकांचा धर्म असा आहे कीं, परमेश्वर (राजा) सरळ आहे असें त्यानी दाखवावें. "

מלך אדיר " हे पराक्रमी राजा, मनुष्यांस नीच व उंच करणाऱ्या, ज्या पवित्राच्या वचनानें व जागणाऱ्याच्या * निवाड्यानें खडकांचा चुराडा होतो आणि फुटतात, तें परमेश्वराच्या मुखांतून निघतें, त्याकडूनच होतें. "

לפני חילו " हे परमेश्वरा, तूं आपल्या सैन्यापुढें मोठ्यानें ओरडतोस, मग बळवान मनुष्यांस (सत्वशीलांस) जीवनाचें औषध कसें सांपडतें ? तर बलवान मनुष्यें † नमल्या अगोदर ते उठून ईश्वराकडे फिरल्यानें (त्यांस तें सापडतें). "

לבי " हे परमेश्वरा, तुझ्या बाणाच्या अग्नीसारिख्या ज्वाळेपासून मी पळतों, आणि उंच मानिलेल्या लोकांवरील तुझ्या भयामुळें मी शोकानें ओरडतों; ईश्वराच्या अति तीव्र दाहाच्या ठिकाणीं टकळ्या कसा चढून जाईल ! "

ענה עני " हे परमेश्वरा, तुजपुढें उभा राहिलेला गरीब, जो भिकाऱ्याप्रमाणें तुजपासून क्षमा मागतो, त्यास उत्तर दे; त्याचें मन तूं स्थिर करून आपला कान त्याजकडे लाव; आणि हे परमेश्वरा, तूं आपलें मुखतेज आह्मावर पडूं दे. "

נחלי דמעותי " हे परमेश्वरा, माझ्या अश्रुपातामुळें माझीं आंतडीं उकळतात, आणि परमेश्वर राजापुढें न्यायसभा बसली आहे, आणि त्यापुढें पुस्तकें उघडलीं आहेत, म्हणून माझ्या पापांमुळें माझीं गुर्दकमळें प्रदीप्त होतात. "

ספרי חיים " हे परमेश्वरा, जीवंतांचीं व मेलेल्यांचीं पुस्तकें तुजपुढें उघडीं आहेत; आमच्या पूर्वजांवरील तुझ्या दयेप्रमाणें आह्मी (तुजवर) भरंवसा ठेवितों, ह्मणून आमची प्रार्थना

---

* पवित्र व जागणारा याचे इब्रीशब्द अनेक वचनांत आहेत; ते दानिएल ४ अध्यायाच्या १४ व्या ओवींत सांपडतात. त्या वाक्यावर टीका करणारानें त्या उपमा ईश्वरास दिल्ह्या आहेत.

† शरीराचे बळकट अवयव.

शांतिकारक सुवासाप्रमाणें स्थाप, आणि हे परमेश्वरा, तूं आपलें (हस्त) कर्म (या दुःखाच्या) वर्षांत जीवंत राख. "

אתאנו לחלות: आह्मी तुजपुढें प्रार्थना करायास आलों आहों, कारण कीं, दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत. आतां आह्मास लज्जित करूं नको, आतां आह्मास तुजसमोरून रिकामे परतवूं नको; आम्हास क्षमा कर आणि आम्हासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אתאנו לבקש हे भयंकरा, अघोर व संकट समयीं संरक्षण करणाऱ्या, आम्ही तुझ्याजवळून क्षमा मागायास आलों आहों; तूं आम्हास जीवंत राख, आम्हावर दया कर आणि तुझें नाम आम्हास ठेविलें जाऊं दे; आम्हास क्षमा कर आणि आम्हासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

कित्येक ठिकाणीं हेंहि बोलतात.

אבוא כעני मी तुझ्या दारीं दरिद्र्यासारिखा मागायास आलों आहें; आणि विनंती व काकळूत करून प्रार्थनेस आरंभ करितों; तर आतां आम्हा करितां तूं दयेचा दरवाजा उघड, आम्हास क्षमा कर, आणि आम्हासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אדני שפתי पुनः मोठ्याने बोलतेवेळीं מי כמוך पर्यंत झाल्यावर हें बोलतात.—

रिब्बी येहूदा हाल्लेवी याणें रचिलेलें.

ईश्वरी पवित्रतेचें वर्णन.

ובכן נקדישך מלך हे राजा! याप्रमाणें आह्मी तुला पवित्र मानूं. दो. वे.

ליושב תהלות स्तवनामध्यें बसणारा आणि आकाश मंडळांवर स्वारी करणारा (देव) पवित्र व धन्य असो.

אפירי שש साहा पंख धारण करणारे* साहा गोष्टींचा† वांट मानणाऱ्या देवास पवित्र ह्मणतात; पृथ्वींतील मुख्य जन§ पृथ्वीच्या शिमा उत्पन्न करणाऱ्यास धन्य ह्मणतात; अग्नीमध्यें चमकणारे (दूत) त्यांस अग्नीपासून घडणाऱ्यास पवित्र म्हणतात; आणि अग्नि व पाणी यांकडून परीक्षित,§ जे प्रतिदिवशीं दोनवेळ त्याचें एकत्व मान्य करितात,§ ते त्यास पवित्र आणि धन्य ह्मणतात. **ליושב**

גלגלי טהרה शुद्ध गलगालिम दूत कीर्त्तनाच्या वाणीनें स्तवून त्यास धन्य ह्मणतात; पैक्यावांचून खंडून घेतलेले§ एकत्र होऊन पूर्ण मनानें त्यास धन्य ह्मणतात; एक्या पळांत त्वरेनें धावत जाणारे, आणि क्षणांत परत येणारे (दूत) त्यांस पवित्र ह्मणतात; त्याच्या नियमाचा शोध करणारे, आणि त्याजवांचून दुसरा कोणी (देव) नाहीं, असी साक्ष देणारे‡ त्यास पवित्र व धन्य ह्मणतात. **ליושב**

המון אראלים देवांमध्यें जो महत्ववान, त्यास आरआलिम दूतांचीं सैन्यें पवित्र ह्मणतात, विश्वासांत जे समर्थ¶ त्यांचे पुत्र तुला नेहेमी गौरवण्याकरितां धन्य ह्मणतात, रोज सकाळीं नवे होणारे (दूत) तुझ्या नांवाला गौरवून पवित्र ह्मणतात, आणि राजांचे पुत्र इस्राएल नमन करून व गुडघे टेंकून तुला पवित्र आणि धन्य ह्मणतात. **ליושב**

זיום כעין קלל ज्यांचें तेज निर्मळ आरस्यासारखें ते (दूत) स्तुतीच्या राजा पुढें पवित्र ह्मणतात, शुद्ध (पूर्वजांचे¶) बीज अत्यंत पराक्रमी (देवास) धन्य ह्मणतात, विंगळ चिरून केलेले दूतांचीं सैन्यें त्यांस पवित्र म्हणतात, बेड्यांतून मुक्त केलेले आणि ज्यांस (देवानें) आपल्या वतनाचा वांटा§ असें म्हटलें आहे, ते त्यास पवित्र व धन्य म्हणतात. **ליושב**

טבולים בנהר (अग्नीच्या) प्रवाहामध्यें अंघूळ करणारे दूत,

---

* सेराफीम दूत. † टीका८. ‡ इस्राएल.
¶ आब्राहाम, इसहाक व याकोब.

ज्यांचें स्वरूप निळ्या आकाशासारिखें आहे, ते त्यास पवित्र ह्मणतात; कराराच्या * खाचेंत गडदलेले (इस्राएलांचे) उरलेले शेष त्यास धन्य ह्मणतात, सुंदर पंखांचे (दूत) हर्षानें मनन करून गायन करीत त्यास पवित्र ह्मणतात; आणि पृथ्वींतील लोकांमध्यें विलक्षण, † आणि (सर्व) तरण्यांतून निवडलेली (तरणी ‡) त्यास पवित्र व धन्य ह्मणते. ליושב

כבירי רומה उंचावरलि पराक्रमी (दूत) आकाशांत वस्ति करणारास पवित्र ह्मणतात; पूर्ण स्तुति करणारे §भयंकर कृत्यें करणारास धन्य म्हणतात; ज्यांस तो भयंकर आहे, ते दूत त्यास आदरानें उत्तर देऊन पवित्र म्हणतात; आणि (इस्राएलाच्या) मंडळ्या त्याजकडे येऊन आपल्या वचनाकडून त्याची पवित्रता गाजविण्याकरितां पवित्र व धन्य म्हणतात. ליושב

ובכן ולך תעלה आणि याप्रमाणें तुझी पवित्रता वर्णिली जाईल, कारण तूं आमचा देव आहेस. दो. वे.

אלהים אל מי אמשילך हे देवा, मी तुला कोणाची उपमा देऊं! तुजसीं तुलना करण्यासारिखा तर कोणीच नाहीं. तुला कशासारिखा समजूं! सर्व (पदार्थ) तर तुझ्याच मोहेरेच्या प्रतिमा आहेत. तूं सर्व वहनांपेक्षां उंच आहेस, आणि कल्पना (पोहोंचत नाहीं) एवढा थोर आहेस. कोणाचीं वचनें तुला व्यापूं शकतील! आणि कोणाची जीभ तुझें पूर्ण वर्णन करूं शकेल! तुझा शोध लावणारें मन आणि तुला पाहणारा डोळा आहे काय? कोणाबरोबर त्वां मसलत केली, कीं त्यानें तुला समजाविलें; परंतु तुझ्यापूर्वीं निर्माण झालेला कोणी देव नव्हता. हीं तुझी सृष्टी तुजविषयीं साक्ष देते कीं, तुजवांचून कोणी नाहीं. सर्व (पदार्थांमध्यें) तुझें ज्ञान प्रगट आहे; आणि सर्वांत तुझ्या मोहोरेची खूण ओळखली जाते. पर्वतांचा जन्म झाल्यापूर्वीं, आणि आकाशाचे स्तंभ उभारल्या पूर्वीं; तूं दैवत्वाच्या आसनीं बैसलास तेव्हां डोहो व डोंगरहि नव्हते.

* सुंतेचा करार. † ह्र एकुलतें ‡ हें इस्राएलास लाक्षणीक नाम दिल्हे आहे

तूं सर्वांस व्यापितोस, परंतु सर्व मिळूनहि तुला व्यापूं शकत नाहीं, त्वां सर्वांस भरून टाकिलें आहे; परंतु ते तुला ग्रासूं शकत नाहींत. तुझा शोध करितांना मनें स्तब्ध होतात, आणि तुझें वर्णन करितांना जिव्हा थकून जातात. ज्ञान्यांचे विचार थकित होतात; आणि चतुरांच्या कल्पना चकित होतात. तूं स्तविण्याविषयीं भयमान असा ह्मटलेला आहेस; आणि सर्व स्तुतींपेक्षां तूं पुष्कळ थोर मानिलेला आहेस. हे परम समर्थ (देवा), किती आश्चर्यकारक रीतीने तूं गुप्त आहेस! तरीं त्वां आकाश व पृथ्वी भरली आहे: तुझें गुप्तपण अति खोल, कोणास सांपडेल ? अति दूर, कोणास दिसेल? तुझ्या कृत्यांचा व तुझ्या सत्यतेचा मात्र शोध पवित्रांच्या मंडळीस लागतो; (जगांत) तुझी यथार्थता मात्र गाजविलेली आहे, आणि तुझें शास्त्र मात्र जाणविलेलें आहे. पश्चात्ताप करणारांस तूं फार जवळ आहेस; परंतु वांकडे वर्तणाऱ्यांपासून तूं फार दूर आहेस. शुद्ध आत्मे तुला पाहतात, त्यांस उजेडाची गरज लागत नाहीं. बुद्धिरूप कानाने ते तुझें ऐकतात; कारण (अशा गोष्टी ऐकण्याकरितां) त्यांचे मांससंबंधी कान बहिरे आहेत. पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे, (असें ह्मणून) सतत ते तुझी पवित्रता गाजवितात.

צבאות ” तुझ्या राज्याचें नाम सैन्याचा परमेश्वर असें आहे; आणि तुझ्या दैवत्वांचें नाम एकच देव असें आहे. तुझ्या राज्याचा विस्तार वर्णिला व उच्चारिला जात नाहीं; आणि तुझ्या दैवत्वांत तुजबरोबर कोणी जडूं शकत नाहीं. भयंकर पुढल्या अंगांस आणखी किती पुढलीं अंगें, आणि दिसत्या मागल्या अंगांस आणखी किती मागलीं अंगें आहेत!* साक्षीकरितां व खुणेकरितां त्वां रथांचे झेंडे उभारिले आहेस; कीं ही गोष्ट सैन्याच्या परमेश्वराकडून आहे. सर्व तुझे दास तुजपुढें सेवा करणारे आहेत; ते तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां सामर्थ्याने बळकट आहेत. ते तुझ्या प्राणिमात्रांस अदृश्य आहेत, परंतु तुझ्या भविष्यवाद्यांच्या (ज्ञानचक्षूंस)

---

* हे निर्गम अ० ३३. श्लो० २३ या वाक्यावरून रचिलें आहे.

दृश्य आहेत. ते दूर पाठविले जातात व जवळ बोलाविले जातात; परंतु गमन केल्यावांचून (पुढें) धावतात व मागें येतात. त्यांचे मार्ग जसे पवित्र स्थानांत माझ्या देवाचे, माझ्या राजाचे मार्ग तसे, जसा सीनाय डोंगरावरील पवित्र स्थानांत, तसा परमेश्वर त्यामध्ये आहे. निश्चयें, ते तुझ्या हुकमावरून बोलतात, तुझ्याच इच्छेप्रमाणें ते कृत्यें करितात. यावरून त्यांचे शब्द ऐकणारे ह्मणतात कीं, तुझेंच तोंड त्यांसीं भाषण करितें.

ראש הממשלה पहिल्या संस्थानाचा अधिपति व त्याचीं सर्व सैन्यें व आकाशांतील सर्व हत्यारबंदी सैन्य, यांजवर त्याने सर्व काळ प्रकाश ठेविला आहे; यामुळें त्यांच्या राहुट्यांत शांति असते त्यांपासून ज्ञानाचा उगम निघतो; आणि त्यांजवळ जीवनाचा झरा सांपडतो. तेथें अंधार नाहीं व मृत्यूछायाहि नाहीं; तेथें कांहींच उणें नाहीं व मृत्युहि नाहीं. आपणास त्यांच्या पवित्रतेकडून पवित्र करण्याकरितां; आणि दावीदाप्रमाणें "अहो परमेश्वराचे दूतांनो, तुह्मी त्याला धन्य ह्मणा;"* असें ह्मणायास जो आपणास त्यांमध्यें सकाळीं व संध्याकाळीं मिसळतो तो धन्य.

הממשלה השנית दुसऱ्या संस्थानांत आकाशांतील सैन्य, आणि रथांचे हाय्योथ दूत ज्यांच्या सर्व अंगीं डोळे आहेत ते आहेत. उजव्याकडे व डाव्याकडे राहून ते धांवत जातात व परत येतात, ते सृष्टींत उंचस्थानीं उभे असतात. आणि ओफानिम दूत त्यांच्या समोर उभेराहून तुझ्या शेखीनास † नमन करण्याची उत्कंठतेने आवड धरितात. (त्यांच्या मागून) लक्षावधि सैन्यांच्या सैन्यांचे झेंडे (दिसतात,) त्यांतील सर्व ज्ञानाचीं व पराक्रमाचीं कृत्यें करणारे आहेत. त्यांच्या मागून सूर्य व चंद्र येतात, ते प्रत्येक आपल्या ठिकाणीं आकर्षिलेले असून प्रकाशतात. त्यांजशीं निरनिराळ्या संस्थानांस उजेड देण्यासाठीं नेमलेले तारेहि जडतात. त्यांस आकाशांतिल सैन्यें व आकाशांवरील जलेंहि

---

* हें वाक्य व पुढील दोन भागाच्या शेवटलीं वाक्यें दावीदाने आपले गीतांत लिहिलीं आहेत. गीत १०३ अ.२०, २१, २२ ओ.

† साक्षात्कारास.

लगटून राहतात. त्यांतील प्रत्येक आपापल्या संस्थानाची सेवा करायास व आपापलीं कामें करायास पाहतात. त्यांस कांहींच अडखळा व अडचण पडत नाहीं; आणि त्यांत कोणीच कुटिल व वावगा नाहीं. ते एक प्रत्येकापासून परवानगी मागतात व एक प्रत्येकास परवानगी देतात. परमेश्वर जो अनंत देव, याच्या नांवानें स्तवन करण्यास ते एकदांच गजर करितात. आणि गाणाराही* आपल्या स्तोत्रांत हाक मारून ह्मणतो कीं, अहो परमेश्वराचे सर्व सैन्यानो! तुम्ही त्यास धन्य म्हणा.

הממשלה השלישית तिसरें संस्थान व त्याचें सैन्य पृथ्वी व तिजवरील सर्व (पदार्थ) असीं आहेत. हवेचा व अग्नीचा विस्तार व त्यांपासून उत्पन्न होणारे पदार्थ आणि समुद्र व त्यांत जे सर्व आहेत तेही. त्याच्या भांडारांतून अग्नि, गारावृष्टि व बर्फ निघतात, आणि वादळाचा वारा त्याचें वचन पूर्ण करितो. पाण्याचे झरे त्याच्या आज्ञेवरून फुटतात, आणि लैबानोनांचे फांटे त्याच्या ज्ञानाकडून उघड होतात. हिरवळ बीज देण्यासाठीं, झाडें लावण्यासाठीं, आणि शेतांतील गवत पशूंस तृप्त करण्याकरितां उगवतात. समुद्रांतलि मासे व त्यांतील मगर, आणि उडणाऱ्या पक्ष्यांच्या निरनिराळ्या जाति त्यानें वृद्धिंगत होऊं दिल्ह्या. पृथ्वी मेजासारिखी तयार झाल्यावर तिनें ग्रामपशु, वळवळणारे व वनपशु यांस उपजविलें. ते सर्व त्वां आपला अधिकारी मनुष्य, यांच्या हातीं सोंपिले, त्वां आपल्या हाताच्या कामावर त्यांस प्रभुत्व दिल्हें. यासाठीं कीं त्याच्या कबरेंतून राजे, याजकांचें राज्य व दूतांचें सैन्य निघणार. आपल्या पवित्र नामाची उपकारस्तुति करायास त्वां त्यास उत्पन्न केलें; आणि आपल्या स्तवनांत त्यांनी गौरव मानावा ह्मणून त्वां त्यांस जगांत बोलाविलें. त्यांमध्यें तूं पवित्र मानिलेला व सन्मानिलेला आहेस; आणि बाळ व तान्हे यांच्या तोंडांतून त्वां प्रशंसा साधिली आहे. तुझी सेवा करणारे व तुझा कारभार चालविण्याकरितां पाठविलेले, यांच्या तोंडाकडून तुझ्या

---

* दावीदानें.

राज्याचें नाम सर्वांपेक्षां अधिक उंचाविलें जावो. आणि मधुर गाणारानेंही * आपल्या निर्मित्यास असें गायन केलें कीं, "अहो परमेश्वराचे सर्व उत्पन्न केलेले पदार्थहो! तुह्मी त्यास धन्य ह्मणा."

" ברכו " परमेश्वराला त्याच्या सर्व संस्थानांच्या ठिकाणीं तुह्मी धन्य ह्मणा; परमेश्वरासारिखा कोणी पवित्र नाहीं; कां कीं त्याच्या शिवाय कोणी नाहीं. येशूरून † जो मौल्यवान त्यास वावग्यांतून ‡ काढिलें, आणि आपला भविष्यवादी मोशे याच्या हातून त्यास समुद्रांतून काढून पार नेलें. त्यानें आपलें गौरव आपल्या पवित्र पादासनावर उतरिलें, आणि आपल्या भविष्यवाद्यास उंच ढगांत चढविलें. भविष्यकथनाचें अमौल्य वतन (आत्मा) त्यानें आपल्या ओळखणाऱ्यास दिल्हें, आणि आपला उदार आत्मा आपलीं (वचनें) ऐकणारावर ओतिला. त्यानें त्यांस आपल्या भक्तीच्या नेमलेल्या रीतीप्रमाणें चालविलें, कीं त्यांनीं पहिल्या संस्थानाची बरोबरी करावी. कारण जसे त्याचे सेवा करणारे दूत, तसे तेहि त्यास पवित्र मानून पवित्र उपकारस्तुति त्यापुढें आणून वाहातात, त्यापुढें त्यांसाठीं प्रायश्चित्त केलें जातें, तेव्हां ते प्रायश्चित्त पावतात; मग ते परमेश्वराची स्तुति गाजवितात. सेराफीम व आरआलिम यांसारिखे तेहि आपणास झांकून घेतात, आणि तारशीशिम व हाशमालिम § यांसारिखेहि ते आहेत. धांवत येऊन व त्वरा करून ते एकवट होतात, आणि तुजबरोबर चालायास ते धैर्य धरितात. भय धारण करून लज्जितहि होतात; यद्यपि तुझी सेवा करण्याकरितां ते धैर्य धरून एकवट होतात; त्वरा करितात आणि मुके राहात नाहींत. पवित्राच्या मंडळींत सन्मानिलेल्या देवास सन्मानितात, पवित्र मानितात आणि ती वेळ त्याची पवित्रता गाजवितात.

---

* दाविदानें.

† अनुवाद अ० ३२ श्लो० १५ एथें व दुसऱ्या कित्येक जागीं येशूरून हें इस्राएलांस दिल्हें आहे.

‡ इस्राएलांचा पूर्वज आब्राहाम ज्यास मूर्तिपूजकांमधून निवडून घेतला.

§ ह्या दूताच्या जाति आहेत.

נקדישך ונעריצך जसी पवित्र सेराफीमांची मंडळी, जें तुझ्या भविष्यवाद्याच्या हाताकडून लिहिलें आहे कीं, ते एकमेकाला मोठ्याने बोलत ह्मणाले, "पवित्र पवित्र पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे;" याप्रमाणें तीन वेळ तुझी पवित्रता गाजविते, त्याप्रमाणे आह्मी तुला पवित्र मानूं आणि तुझें भय धरूं. त्यांच्या समोर जे असतात, ते स्तुति करून असें ह्मणतात कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. आणि तुझ्या पवित्र वचनांमध्यें असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढी आहे, तुह्मी परमेश्वराला स्तवा.

यानंतर אוא מחול לעונותינו पासून אתה קדוש एथपर्यंत वाचून त्यामागून संध्याकाळच्या प्रार्थनेत וידוי ह्मणजे पापाविषयीं कबूल होणें याविषयीं जो भाग आहे तो वाचितात; परंतु त्यांतील רבונו של עולם बद्दल हें पुढील बोलतात.

रेब्बनु निसीम बाबेलच्या विद्यालयाचा मुख्य गुरु याने रचिलेलीं पापें कबूल होण्याची रीति.

רבונו של עולם हे जगदीशा! सर्व गोष्टींच्या आधीं मला तुजकडे परतायास * तोंड, आणि डोकें † उंच करायास धैर्य नाहीं; कां तर माझे अन्याय माझ्या डोक्यावर आले; ते ओझ्यासारिखे माझ्या शक्तीहून फार झाले आहेत; माझीं उलंघनें अगणित वाढलीं आहेत; आणि माझीं पापें अवर्णनीय झालीं आहेत. जीं पापें, जे अपराध व जीं उलंघनें म्या तुजविरुद्ध केलीं आहेत, त्यांविषयीं हे परमेश्वरा, माझ्या देवा व माझ्या पूर्वजांच्या देवा, तुजसमोर डोकें लववून, देहाचा बांधा लववून, नम्र आत्म्याने, अशक्तपणें, हृदय फोडून, नमन करितांना, गुढघे टेकून, लवून आणि नमस्कार करून त्रासाने, धास्तीने, भयाने, कांपतांना, अपधाकून

* या इब्री शब्दाचा अर्थ उत्तर द्यावयास असाहि होतो.

† इ. कपाळ.

आणि दुःखानें कबूल होऊन, हे परमेश्वरा माझ्या देवा, मी ह्मणतों कीं, माझ्या वाईट कृत्यांच्या व माझ्या वांकड्या वाटांच्या व माझ्या नीच कर्मांच्या कांहींशा भागाचेंहि स्पष्टीकरण अशक्य आहे. आणि तीं उघड करून सांगण्यास व त्यांचा विस्तार करण्यास मजमध्यें शक्ति नाहीं; अथवा त्यांस संक्षिप्त रीतीनें सांगायासहि मला सामर्थ्य नाहीं. आणि मी त्यांविषयीं माफी, सुटका व क्षमा मागण्यासारखाहि नाहीं. मी काय? माझें जिणें काय? मी व्यर्थ व शून्य, माती व राख, जंतु व किडा आहें. माझ्या पापांमुळें मला लाज वाटते, आणि माझ्या अपराधांमुळें मी ओशाळा होतों आणि माझ्या उल्लंघनांमुळें मला मान खालीं घालावी लागती. आणि जर मी तीं सविस्तर अथवा संक्षिप्त रीतीनें किंवा स्पष्ट सांगायास लागलों * तर वेळ संपेल, परंतु तीं संपणार नाहींत. आणि तीं पत्करायास मांझ्यानें तोंड उघडवत नाहीं; माझा दंड सोसण्यापेक्षां अधिक आहे; कारण माझीं उल्लंघनें अवर्णनीय झालीं आहेत. मला लज्जा वाटती व मी ओशाळा होतों, कारण जसा चोर (घर) फोडतांना सांपडतो तसा मी आहें.

רבונו של עולם हे जगदीशा, जर मी आपलीं पापें सविस्तर आणि स्पष्ट करून, किंवा संक्षिप्त रीतीनें सांगूं लागलों, तर वेळ संपेल; परंतु तीं संपणार नाहींत. त्यांतुन कोणत्यांसाठीं मी सत्तेनें मागूं? कोणत्यांविषयीं कबूल होऊं? आणि कोणत्यांविषयीं मी माफी, सुटका व क्षमा मागूं? सर्वांकरितां किंवा एकाद्याकरितां, गुप्त आहेत त्यांकरितां किंवा प्रगट आहेत त्यांकरितां, पहिल्यांकरितां किंवा मागल्यांकरितां, नव्यांकरितां किंवा जुन्यांकरितां, झांकलेल्यांकरितां किंवा उघड आहेत त्यांकरितां, ज्यांची आठवण आहे त्यांकरितां किंवा ज्यांचा विसर पडला आहे त्यांकरितां? मी स्वतां जाणत आहें कीं, मजमध्यें शास्त्र नाहीं, ईश्वरी आज्ञा सांभाळणेंहि नाहीं; ज्ञान नाहीं व बुद्धिहि नाहीं; यथार्थता

* इ. आलों.

नाहीं व योग्यताहि नाहीं, परोपकार नाहीं व अंत:करणाचा सरळपणाहि नाहीं. निश्चयें, मी मूर्ख व कांहीं जाणत नाहीं; वेडा व कांहीं समजत नाहीं; घातक व विश्वासू नव्हे; दंडास पात्र व शुद्ध नव्हें; दुष्ट व यथार्थ नव्हे; वाईट व चांगला नव्हे; आणि कोणतेंहि चांगलें कृत्य मी केलें नाहीं.

אבל אשמתי בתורתך निश्चयें, तुझ्या शास्त्राविरुद्ध मी अतिक्रम केले आहेत, तुझ्या आज्ञेविरुद्ध विश्वासघात केला, तुझीं वचनेंहि धि:कारलीं आहेत. म्या चोरी केली आहे, लुटलें, चाहाडी व वाईट भाषणें केलीं, वाईट करविलें, अपराध केले, तुजशीं वांकडाहि वर्तलों, दुष्टाई केली, गर्व केला, शिंदळकी केली, जुलूम केला, लोभ केला, पाप केलें, चुका केल्या, खोटें रचिलें व वाईट योजनाहि केल्या, ठकविलें, भोंदलें, थट्टा केली, थट्टा करविली, भ्रष्ट झालों, तुझे भाषणावर बंडावा केला, तुझ्या आज्ञांचा धिक्कारहि केला, तुजविषयीं अपवाद केला, व्यभिचार केला, फांसांत पाडिलें, माझ्या तोंडच्या भाषणेंकरून पेंचांत पाडलें, तुझ्या मागूनहि वळलों आहें, कुटिलपणानें वर्तलों, दोष केले, उलंघनें केलीं, दु:ख दिल्हें, आपली मान ताठर केली, तुझ्या निषेधाचा तिरस्कार केला, आपले मार्गाहि नीच केले. दुराचार केले, नासलें, लबाडी केली, ओंगळ केलें, बहकलों, बहकविलें, आणि सर्वप्रकारचीं कुत्सित कर्में केलीं.

ואם אתה דן אותי आणि जर तूं माझ्या कर्मांप्रमाणें माझा न्याय करितोस, तर मला हायहाय, माझ्या जीवालाहि हायहाय. आणि जसें रुपें गाळून स्वच्छ करितात, तसा जर तूं मला शुद्ध करूं पाहतोस; तर मजमधून कांहींच उरणार नाहीं.

יהי רצון מלפניך हे परमेश्वरा, माझ्या देवा व माझ्या पूर्वजांच्या देवा, तूं प्रसन्न होऊन आपल्या सेवकास न्यायांत आणूं नको; कारण तुजपुढें कोणताहि प्राणी यथार्थ ठरूं शकत नाहीं. मी काय? माझें जिणें काय? जसें अग्नीपुढें गवत, आणि भट्टीपुढें सुकीं लांकडें तसा, आणि हिणकस रुपें मुशींत गाळलें असतां, सर्व व्यर्थता होऊन कांहीं तत्व नसतें, तसा मी आहें.

בַּמֶּה אֲקַדֵּם פָּנֶיךָ हे परमेश्वरा, माझ्या देवा, तुझ्या दृष्टीपुढें वाईट करायास मी अनिवार व वावग्या मुलासारिखा, आणि आपल्या धन्याविरुद्ध बंडावा करणाऱ्या चाकरासारिखा, आणि आपल्या गुरूबरोबर वाद करणाऱ्या शिष्यासारिखा झालों असतां, मी तुजपुढें कसा येऊं ? अथवा तुजपासून काय समाधान मागूं ? जें तूं शुद्ध केलेंस, तें मी अशुद्ध मानिलें; जें तूं अशुद्ध केलेंस तें मी शुद्ध मानिलें; जें तूं मना केलेंस, तें मी चालू केलें; जें तूं चालू केलेंस, तें मी मना केलें; ज्यावर तूं प्रीति केलीस, त्याचा मी द्वेष केला; ज्याचा तूं द्वेष केलास, त्यावर मीं प्रीति केली; जें तूं हलकें केलेंस, तें मी मोठें मानिलें; जें तूं मोठें केलेंस, तें मी हलकें मानिलें; जें तूं जवळ राखिलेंस, तें मी दूर केलें; आणि जें तूं दूर राखिलेंस, तें मी जवळ आणिलें; यद्यपि तुला राग आणावा असी माझी इच्छा नव्हती. आणि निर्लज्जपणें* मी तुजसमोर माफी, सुटका आणि क्षमा मागायास आलों आहें. मी धैर्य धरून† तुजकडे आलों आहें; आणि मी जाणतों कीं मी लज्जित होणार नाहीं, कारण मी तुजवर भरंवसा ठेविला आहे; आणि ह्मणतों कीं तूंच माझा देव आहेस. आणि तूं दयाळू व कृपाळू, मंदक्रोध व फार ममतेचा आणि पुष्कळ चांगलें करणारा आहेस, ह्मणून मी तुझ्या फार दयेवर भाव ठेविला आहे.

हें पुढील हाज्जानाने एकट्याने बोलावें.

רִבּוֹנוֹ שֶׁל עוֹלָם हे जगदीशा, तूं आपल्या मोठ्या व भयंकर नामाकरितां असें कर कीं, जे तुजवर आशा ठेवितात त्यांनी माझ्यामुळें लाजूं नये; आणि जे तुला शोधितात त्यांनीं माझ्यामुळें ओशाळें होऊं नये, कारण स्वतःसाठींच मात्र नाहीं, परंतु जी पवित्र मंडळी तुजसमोर उभी आहे, तिजसाठीं-हि मी प्रार्थना करितों, कबूल होतों आणि काकुळती करितों.

---

* इ. धीट कपाळावें.

† इ. मी आपलें तोंड गारेसारिखें केलें आहे.

परंतु जर स्वत:साठींच कबूल व्हावयास, प्रार्थना करायास, आणि काकुळती करायास मजमध्यें योग्यता, लायकी व पूर्णता नाहीं, तर दुसऱ्यासाठीं माझ्यानें कसी करवेल. तरी जे तुला शरण येतात, तुजपुढें कबूल होतात व आपलीं उल्लंघनें सोडून त्यांविषयीं पश्चात्ताप करितात, आणि त्यांत लपून राहत नाहींत; त्यांसाठीं राग सोडायाची रीति तुजमध्यें आहे, तुझा क्रोध मंद करण्याचा तुझा नियम आहे, आणि प्राणिमात्रांवर दया कारण्याची तुझी चाल आहे. कारण असें लिहिलें आहे कीं, जो आपलीं पातकें झांकितो तो कल्याण पावणार नाहीं, परंतु जो पाप कबूल होऊन तें सोडितो तो दया पावेल.

רבונו של עולם हे जगदीशा, तुझ्या यथार्थ न्यायाची रीति मनुष्यांच्या * न्यायाच्या रीतीप्रमाणें नाहीं. कारण मनुष्यांची वहिवाट असी आहे कीं, जर कोणी आपल्या शेजाऱ्यास पैक्याविषयीं ठकवितो, तर त्यास न्यायांत आणावा; आणि जर तो नाकबूल जातो, तर तो त्या पैक्यापासून मुक्त होतो. जर तो कबूल होतो, तर त्यास तो परत देणें भाग पडतें. परंतु तुझा यथार्थ न्याय असा नाहीं; जर कोणी नाकबूल जातो, तर त्याला हायहाय व त्याच्या जीवालाहि हायहाय; आणि जर तो कबूल होतो, तर त्यावर तूं दया करून त्याचा जीव नरकाच्या दंडापासून सोडवितोस, आणि तुझ्या लोकांच्या पापांची क्षमा होऊन तुझ्या दयेचें सामर्थ्य आज आह्मास कळावें, ह्मणून तुजपुढें आह्मी कबूल होतों.

पुढें हाज्जान—מודים אנחנו לך हें बोलत असतां मंडळीनें हें बोलावें.

מודים דרבנן सदांसर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव, सर्व मांसमयांचा देव, आमचा व प्रारंभीं (पृ-

* इ. मांस व रक्तमयांच्या.

थ्वीचा) घडणारा जो तूं, तुलाच आह्मी स्तवितों. त्वां आह्मास जीवंत राखिलें व आह्मास रक्षिलें, ह्मणून आह्मी तुझ्या मोठ्या व पवित्र नामास धन्य ह्मणतों व त्याचें स्तवन करितों. आणि आह्मी तुझे नियम पाळावे, तुझी इच्छा पूर्ण करावी, आणि पूर्ण मनाने तुझी सेवा करावी, ह्मणून (आह्मी विनंती करितों कीं) त्याचप्रमाणें आह्मास जीवंत राख, आह्मावर दया कर, आणि आपल्या मंदिरीं आमच्या पाडाव करून नेलेल्यांस एकवट कर; कीं यावरून, हे सुवंदित व धन्य देवा, आह्मी तुझी स्तुति करावी.

मग ויהללו ויברכו यामागून हें बोलावें.

אוא ברכנו בברכה हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, जो तिप्पट आशीर्वाद तुझा सेवक मोशे याच्या हातांकडून शास्त्रांत लिहिला आहे, आणि जो आहारोन व त्याचे पुत्र उच्चारीत असत कीं, "परमेश्वराने तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वराने आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वराने आपली दृष्टि तुजवर लावून तुझें कल्याण करावें. तसें त्यानी माझें नाम इस्राएलाच्या संतानावर लावावें, ह्मणजे मी त्यास आशीर्वाद देईन;" तो आशीर्वाद तूं आह्मास दे.

שים שלום पृष्ठ २०.

ואתם הדבקים आणि जे तुह्मी तुमचा परमेश्वर देव याला लगटून राहिलां, ते तुह्मी सर्व आजपर्यंत जीवंत आहां, (असें आह्माविषयीं ह्मटलें आहे त्याप्रमाणें;) आज तूं आह्मास सदृढ कर, आज आह्मास आशीर्वाद दे, आज आह्मास मोठें कर, आज आमचा झेंडा उभार, आज आह्मास गौरवयुक्त कर, आज आह्मास चांगल्या मंडळीमध्यें मिळीव, आज आम्हास शुद्ध कर, आज आम्हास जीवदान दे, आज आम्हावर दया कर, आज आम्हास आमच्या पापापासून शुद्ध कर, आज आमचे मार्ग नीटाव,

आज आम्हास कीर्तीने मुगुटमंडित कर, आज आम्हास ज्ञानी कर, आज आम्हास सोडीव, आज आम्हास उंचाव, आज आमचें सहाय कर, आज आम्हास सुशोभित कर, आज जीवनाकरितां आम्हास दर्शन दे, आज आम्हास यथार्थ कर, आज आम्हास तुझी सेवा करण्याकरितां जवळ घे, आज आम्हावर दया कर, आज आमची प्रार्थना ऐक, (आज आम्हावर दया, कृपा व ममता कर,) आज आम्हास चांगल्या जीवनाकरितां लिही.

ובספר חיים आणि आह्मी व तुझे सर्व इस्राएल लोक हे चांगल्या जीवनाकरितां व कल्याणाकरितां, जीवनाच्या, आशीर्वादाच्या, कल्याणाच्या, चांगल्या अन्नसामग्रीच्या, तारणाच्या, समाधानाच्या व चांगल्या निवाड्याच्या पुस्तकांत तुजपुढें आठवण होऊन लिहिले जावोत.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त अशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אבינו מלכנו हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मी तुजपुढें पाप केलें आहे.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजवांचून आह्मास कोणी राजा नाहीं.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या नामाकरितां आह्मावर उपकार कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर चांगल्या वर्षास आरंभ कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावरून सर्व कठोर व वाईट निवाडे रद्द कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या द्वेषणाऱ्यांचे विचार रद्द कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या शत्रूंच्या मसलती मोड.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या शत्रूस व आह्मावर बलात्कार करणारांस नाहींसे कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या करारांच्या लेंकरांवरून पटकी, तरवार, वाईट, दुष्काळ, पाडावपण, लुटणें, नाश आणि मरी नाहींसी कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या लोकांच्या रोगांसाठीं पूर्ण आरोग्यता पाठीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या वतनावरून मरी बंद कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्ही माती आहों अशी आठवण राख.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमचे सर्व अपराध क्षमा व माफ कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या न्यायाचा वाईट निवाडा फाडून टाक.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या पुष्कळ दयेनें आमच्या ऋणाचे रोखे खोडून टाक.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमचीं उल्लंघनें तुझ्या पुढून पुसून टाक व दूर कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मास नीतिमानांच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास यथार्थांच्या व सरळांच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मास क्षमेच्या, माफीच्या व प्रायश्चित्ताच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मास चांगल्या उपजीवनाच्या व भक्ष्यसामग्रीच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास मुक्ततेच्या व तारणाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या समोर आमची चांगली आठवण कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्माकरितां तारण लवकरच उगीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझे लोक इस्राएल यांचें शिंग उभार.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या अभिषिक्ताचें शिंगहि उभार.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, पूर्ण पश्चात्तापानें आह्मास फिरीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमची वाणी ऐक आणि आह्मावर दया व कृपा कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, जर आह्माकरितां नाहीं तर तूं आपणाकरितां तसें कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, दयेनें व प्रसन्नतेनें आमची प्रार्थना मान्य कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजपुढून आम्हास रिकामें परतवूं नको.

קדיש לעילא पृष्ठ ९.

סלחות पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना.

למענך אלהי हे माझ्या देवा, जे लोक पाहांटेस उठून तुजपुढें विनंती करण्याकरितां तुला शोधितात, त्यांस तूं आपणाकरितां, प्रसन्न हो.

אדני הקשיבה हे प्रभू, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको.

हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां विखरण्याच्या व पाडावपणाच्या देशांत *विष व कडू दवणा यांनी घालेल्यांस समुद्राच्या खोलवटीं तून काढ, त्यांचे क्लेश व दुःखें पाहा, त्याचें फितूर होणें मनावर धरूं नको, आणि पाहांटेची प्रार्थना करितांना त्यांची विनंती कान देऊन ऐक.

हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां त्यांचें चांगलें होण्याची खूण कर, खेद पावलेले जीव जे तारणमय पाण्याकरितां तान्हेले आहेत त्यांजवर दया कर, घालविलेले लोक जे, पृथ्वीच्या सर्व कोनीं विखरलेले आहेत, आणि अतिशय कष्टामुळें ज्यांचें कातडें काळें झालें आहे, त्यांस एकवट कर.

हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां आपल्या दयेला द्रव येऊं दे, आणि आकाशांतील आपल्या वसतिस्थानांतून जे तुझा राग, क्रोध व धिःकार वाहातात आणि तुझ्या त्रासामुळें ज्यांचें मन फार धडधडतें, त्या तुझ्या लोकांची वाणी ऐक.

हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां आपल्या दरिद्र्यांवर दया कर, त्यांचीं दुःखें पालटून हर्ष कर, आणि त्यांस आपल्या विचाराप्रमाणें चालीव, आपली आश्चर्यवंत दया त्यांस दाखीव, आणि मी विनंती करितों कीं, ज्यांस तूं उदरापासून पाहांटेच्या उदरापासूनहि संभाळलेस † त्यांजवर दया व कृपा कर.

यापुढें संध्याकाळच्या प्रार्थनेंत लिहिल्याप्रमाणें पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना करावी.

קדיש תתקבל पृष्ठ ९८.

אתה הראת परमेश्वर तोच देव, त्याखेरीज दुसरा कोणी देव नाहीं, असें तुम्ही जाणावें म्हणून हें सर्व तुम्हास दाखवून दिल्हें आहे. हे प्रभु, देवांमध्यें तुझ्यासारिखा* कोणी नाहीं, आणि तुझ्या कृत्यांसारिखें कांहीं काम नाहीं.

" יה" आमचा देव परमेश्वर आमच्या वाडिलांस जसा

* इ. घरांत. † इ. वाहिलेंस.

अनुकूळ होता, तसा आम्हास अनुकूळ व्हावा; त्याने आम्हास टाकूं नये, आम्हास सोडूंच नये. तूं आपल्या लोकांस तार, आणि आपल्या वतनाला आशीर्वाद दे; त्यांचा मेंढपाळ असा हो, आणि त्यांस सर्वकाळ वाहा. आणि कोश निघाला तेव्हां असें होत असे कीं, मोशे म्हणे, हे परमेश्वरा, ऊठ; म्हणजे तुझ्या शत्रूंची दाणादाण होवो, आणि तुझे द्वेषी तुझ्या पुढून पळोत. हे परमेश्वरा, तूं आपल्या सामर्थ्याच्या कोशासुद्धां आपल्या विसांव्यासाठीं ऊठ. तुझ्या याजकांनीं नीतिमत्व पांघरावें, आणि तुझ्या भक्तांनीं हर्ष शब्द करावा. तूं आपला सेवक दावीद यामुळें, आपल्या अभिषिकाचें तोंड विन्मुख करूं नको.

ברוך המקום ज्या सुवंदित सर्वव्यापकानें,* आपल्या इस्राएल लोकांस शास्त्र दिल्हें, तो धन्य. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य. तुह्मी माझ्या संगतीं परमेश्वराला थोर माना; आह्मी एकत्र त्याचें नाम उंचावूं.

,, רוממו परमेश्वर आमचा देव याला तुह्मी उंच माना, आणि त्याच्या पायांच्या आसनाजवळ भजा; तो पवित्र आहे. परमेश्वर आमचा देव, याला तुह्मी उंच माना; आणि त्याच्या पवित्र डोंगरावर भजा; कां तर परमेश्वर आमचा देव पवित्र आहे. परमेश्वरासारिखा कोणी पवित्र नाहीं, तुझ्याशिवाय कोणी नाहीं, आमच्या देवासारिखा खडकरूप असा कोणी नाहीं. कां तर परमेश्वराखेरीज देव कोण आहे? आणि आमच्या देवावांचून कोण खडकरूप आश्रय आहे? मोशानें आज्ञा करून आह्मास शास्त्र दिलें; हेंच याकोबाच्या समुदायाचें वतन आहे. जे तें धरितात, त्यांला तें जीवनाचें झाड आहे, आणि जे बाळगतात, ते प्रत्येक धन्य आहेत. त्याचे मार्ग

---

* המקום या इब्री शब्दाचा मूळ अर्थ जागा असा होतो, परंतु हाखामीम लोकांच्या ग्रंथांत या शब्दांचा उपयोग सर्व व्यापक देव या अर्थानें पुष्कळ ठिकाणीं केलेला आढळतो.

आनंदाचे मार्ग, आणि त्याच्या सर्व वाटा कुशल आहत. जे तुझ्या शास्त्रावर प्रीति करितात, त्यांचें फार कल्याण आहे; आणि त्यांस कांहीं अडखळा नाहीं. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो; परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देतो.

ברוך שמיה जगताच्या स्वामीचें नाम धन्य असो. हे परमेश्वरा, तुझें राहण्याचें व वस्ती करण्याचें स्थानहि धन्य असो; तुझी प्रसन्नता तुझे लोक इस्राएल यांबरोबर सर्वदा असो. आणि तुझ्या उजव्या हाताचें तारण तुझ्या लोकांस तुझ्या पवित्र मंदिरांत दाखीव, कीं त्वां आपल्या उत्तम उजेडाकडून आह्मास तिकडे पोहोंचवावें; आणि दयेनें आमची प्रार्थना मान्य करावी. आमचें आयुष्य चांगल्या प्रकारें वाढावें असी तुजपुढें प्रसन्नता होवो. आणि तुझा सेवक जो मी, मला तूं न्यायी लोकांमध्यें गणून मला, जें माझें असेल त्याला, आणि तुझे लोक इस्राएल यांचें जें असेल त्याला तूं सांभाळ. तूं सर्वांचें पोषण व पाळण करितोस; तूंच सर्वांवर अधिकार करितोस; तूं राजांवरहि अधिकार करितोस; राज्य हें तुझेंच आहे. पवित्र जो धन्य, त्याचा सेवक मी आहें; त्याच्या गौरवयुक्त शास्त्रापुढें नमन करितांना मी त्याच्या पुढें नमन करितों. मनुष्यावर मी भरंवसा ठेवीत नाहीं, आणि देवाच्या पुत्रांवरहि* मी आशा ठेवीत नाहीं, परंतु जो आकाशाचा देव, जो सत्य देव आहे, ज्याचें शास्त्र सत्य, ज्याचे भविष्यवादीहि सत्य, ज्याचीं चांगलीं व सत्कर्में पुष्कळ आहेत, त्याजवरच मी भरंवसा ठेवितों; आणि त्याच्या पवित्र नामाची मी स्तुति करितों. हे प्रभु! त्वां आपल्या शास्त्राकडे माझें मन लावावें; आमचें चांगलें व्हावें; आह्मास जीवन प्राप्त व्हावें; आणि आमचें कल्याण व्हावें. अशा माझ्या मनांतील व तुझे लोक सर्व इस्राएल यांच्या मनांतील इच्छा पूर्ण कर. तथास्तु.

---

* दुतांवर.

ישמחו השמים आकाशानीं संतोष करावा, पृथ्वीनेंहि हर्ष करावा, आणि परमेश्वर राज्य करितो असें राष्ट्रांमध्यें सांगितलें जावें. सियोन डोंगराने आनंद करावा; तुझ्या न्यायामुळें यहुदाच्या कन्यांनीं हर्षावें. राजांचा राजा, पवित्र जो धन्य राजा, यानें जीं जगतें उत्पन्न केलीं आहेत; ह्मणजे हें जग व पुढिल जग, यांमध्यें त्याच्या इच्छेप्रमाणें, त्याच्या भिणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणें आणि त्याचे लोक इस्राएलाचें घराणें यांच्या इच्छेप्रमाणें, त्याचें नाम सर्वांपेक्षां मोठें, पवित्र, धन्य, उंच व थोर मानिलें जावो. तो आपलें राज्य आह्मावर लवकर प्रगट करून आह्मास दाखवो; आणि आमच्या निभावलेल्यांवर व त्याचे लोक इस्राएलाचें घराणें यांच्या निभावलेल्यावर दयेकरून ममतेंकरून व कृपेंकरून तो दया, करुणा व कृपा करो. आणि सर्व लोकहो, तुह्मी तथास्तु ह्मणा. जो दयाळू तो आमचें पाडावपण आणि त्याचे लोक इस्राएलाचें घराणें यांचें पाडावपण लवकर आमच्याच दिवसांत परतवो. आणि आह्मास दुःखांतून काढून सुखांत, आणि अंधारांतून काढून प्रकाशांत नेवो आणि सर्व लोकहो, तुम्ही तथास्तु म्हणा. कारण कीं मी परमेश्वराचें नाम गाजवीन; तुम्ही आमच्या देवाला थोर मानून द्या. देवाला पराक्रमाचा मान द्या, आणि शास्त्राला मान द्या.

शास्त्र उचलून दाखवितांना मंडळी हें ह्मणते.

וזאת התורה तर जें शास्त्र मोशानें इस्राएलाच्या संतानास सांगून ठेविलें तें हेंच. मोशानें आज्ञा करून आम्हास शास्त्र दिल्हें; हेंच याकोबाच्या समुदायाचें वतन आहे.

כהן קרב וכהן हे आचार्या, ये, आणि आपलीं क्रिया कर्मे कर. परमेश्वराचें नेमशास्त्र पूर्ण आहे, जिवाला ठिकाणीं आणितें; परमेश्वराचा प्रमाणनेम खरा आहे, भोळ्याला ज्ञानी करितो. परमेश्वराचीं बंधारणें नीट आहेत, हृदयाला आनंदवितात; परमेश्वराची आज्ञा निर्मळ आहे, डोळ्यांस उजेड करिती.

האל תמים דרכו देवाचा मार्ग नीट आहे,

परमेश्वराचें वचन पवित्र आहे, जे सर्व त्याचा आश्रय धरितात त्यांस तो ढालरूप आहे.

ज्यास शास्त्र वाचायास बोलावितात तो शास्त्र वाचल्यापूर्वी हें बोलतो.

" עִמָּכֶם " उठणारा.—परमेश्वर तुम्हाबरोबर असो.

" יְבָרֶכְךָ " मंडळी.—परमेश्वर तुला आशीर्वाद देवो.

" בָּרְכוּ אֶת " उठणारा.— सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य म्हणा.

" בָּרוּךְ " मंडळी. — सुवंदित परमेश्वर सदांसर्वकाळ धन्य असो.

" בָּרוּךְ " उठणारा. — सुवंदित परमेश्वर सदांसर्वकाळ धन्य असो.

" בָּרוּךְ אַתָּה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास सर्व लोकांतून निवडून घेऊन आपलें नेमशास्त्र आम्हास देणारा जो, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा, शास्त्र देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

शास्त्र वाचल्यानंतर उठणारा हें बोलतो.

" בָּרוּךְ אַתָּה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास सत्य शास्त्र देणारा आणि आम्हामध्यें सर्वकाळचें जीवन लावून ठेवणारा जो, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा, शास्त्र देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

प्रायश्चित्ताच्या दिवशीं पाहांटेच्या प्रार्थनेंत लेवीय अध्याय १६ आणि या दिवसाच्या आठवणीकरितां गणना अ. २९ ओ. ७ पासून ११ पर्यंत, आणि हाफतारा * ह्मणजे भविष्यकथनांतील भाग यशाया अ. ५७. ओ. १४ पासून अ. ५८ शेवटपर्यंत वाचितात.

भविष्यकथनांतील भाग वाचल्यापूर्वी हें बोलतात.

" בָּרוּךְ אַתָּה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, (आपणाकरितां) चांगले भविष्यवादी निवडून

* व. प्र. प्रा. टीका ७.

घेऊन त्यांनीं ह्मटलेल्या सत्य गोष्टींस प्रसन्न असणारा जो, तूं धन्य आहेस.

" ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, शास्त्र, आपला सेवक मोशे, आपले लोक इस्राएल, आणि सत्य व यथार्थ भविष्यवादी यांस निवडून घेणाऱ्या, तूं धन्य आहेस.

भविष्यकथनांतील भाग वाचल्यानंतर हें बोलतात.

" גאלנו " आमचा उद्धारणारा कोण ! तर त्याचें नाम सैन्याचा परमेश्वर, इस्राएलाचा पवित्र आहे.

" ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, सर्व जगतांच्या खडकरूप आश्रया, सर्व पिढ्यांत न्यायीं असणाऱ्या, ज्याचे शब्द सत्य व न्यायी असा विश्वसनीय देव, ह्मणणारा व त्याप्रमाणें करणारा, बोलणारा व तें सिद्ध करणारा; सत्य जो, तूं धन्य आहेस. परमेश्वर आमचा देव जो विश्वसनीय तो तूंच; तुझीं वचनेंहि विश्वसनीय; तुझ्या वचनांतून एकहि शब्द माघारें रिकामा परतत नाहीं; कारण तूं विश्वसनीय व दयाळू देव राजा आहेस. हे परमेश्वरा, आपल्या सर्व वचनांत विश्वसनीय असणाऱ्या देवा, तूं धन्य आहेस.

רחם על ציון सियोनेवर तूं दया कर, कारण तें आमचें जिवनाचें घर; आणि लवकर आमच्या दिवसांत खिन्न झालेल्या जीवांस तूं तार. हे परमेश्वरा ! सियोनेस तिच्या लेकरांत हर्षित करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

שמחנו " אלהינו हे परमेश्वरा ! आमच्या देवा, तुझा सेवक येलीया भविष्यवाद्याचें आणि तुझा अभिषिक्त दावीद याच्या घराण्याच्या राज्याचें येणें होऊन आह्मास आनंदित व आमच्या मनांस हर्षित कर. त्याच्या आसनावर दुसऱ्यानें बसूं नये, आणि परक्यानें आणखी त्याच्या गौरवाचें वतन पावूं नये; कारण कीं, तूं त्याचा दिवा सदासर्वकाळ विझविणार नाहींस, असी तूं त्याजवळ आपल्या पवित्र नामानें शपथ वाहिली आहेस,

हे परमेश्वरा ! दावीदाच्या ढालरूप आश्रया, तूं धन्य आहेस.

על התורה शास्त्र, भक्ति, भविष्यवादी (शा. अ- हा शाब्बाथ दिवस, व) हा प्रायश्चित्ताचा दिवस, हा अपराधाच्या क्षमेचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा दिवस, जो हे परमेश्वरा, आमच्या देवा, त्वां आह्मास (शा० अ० पवित्रतेकरितां, विश्रांति-करितां व) क्षमा माफी व सुटका होण्याकरितां, आणि त्या दिवशीं आमच्या सर्व अपराधांची क्षमा होण्याकरितां दिल्हा आहे; त्यापेक्षां व सर्व गोष्टींपेक्षां आह्मी तुला अधिक मानितों आणि धन्य ह्मणतों. सर्व प्राण्याच्या तोंडाकडून नित्य व सर्वकाळ तुझें नाम सुवंदित असो. आणि हे आमच्या राजा, तुझीं वचनें सर्वकाळ सत्य व स्थापित आहेत. हे परमेश्वरा राजा, आमचे अपराध व आपले लोक इस्राएल यांचे अपराध माफ व क्षमा करणाऱ्या, आणि वर्षोवर्षीं आमचे अतिक्रम दूर करणाऱ्या, सर्व पृथ्वीच्या राजा, (शा. अ. शाब्बाथास व) इस्राएलास व प्रायश्चित्ताच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

राजास आशीर्वाद पृ. प्र. प्रा. पृष्ठ ९२.
मंडळीस आशीर्वाद पृ. प्र. प्रा. पृष्ठ ९३.

" יהי חסדך " हे परमेश्वरा! जशी आह्मी तुजवर आशा ठेविली आहे, तशी तुझी दया आह्मावर होवो. जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

शाब्बाथ असल्यास एथून बोलावें.

" ברוך " परमेश्वराची स्तुति असो, कांतर जें जें त्याने सांगि-तलें, त्या सर्वांप्रमाणें आपल्या इस्राएल लोकांस विसांवा दिल्हा; त्याने आपला सेवक मोशे याकडून जें जें सांगितलें त्याच्या त्या सर्व चांगल्या वचनांतली एकाहि गोष्ट पडून गेली नाहीं.

इतर दिवस असल्यास एथून बोलावें.

יהי יי אלהינו आमचा देव परमेश्वर आमच्या वडिलांस जसा अनुकूळ होता, तसा आह्मास अनुकूळ व्हावा; त्याने आह्मास टाकूं नये, आह्मास सोडूंच नये. ह्मणजे त्याच्या सर्व मार्गांत चालायास आणि त्याच्या आज्ञा व त्याच्या नेमणुकी व त्याचे न्याय, जे त्याने आमच्या वडिलांस आज्ञा करून लाविले, ते पाळायास त्याने आपल्याकडे आमचें अंतःकरण वळवावें. आणि ज्या शब्दांकडून म्या परमेश्वरापुढें विनंती केली, ते रात्रंदिवस आमचा देव परमेश्वर याच्या जवळ व्हावे; ह्मणजे त्याने आपल्या सेवकाचा न्याय व आपल्या इस्राएल लोकांचा न्याय दिवसादिवसाच्या प्रसंगाप्रमाणें करावा; यासाठीं कीं, पृथ्वीच्या सर्व लोकानी जाणावें कीं, परमेश्वर तोच देव, त्यावांचून कोणी देव नाहीं. त्या शास्त्राच्या लेखाने तुझें तोंड न सोडावें; तर दिवस व रात्रीं त्वां त्याचें मनन करावें; यासाठीं कीं त्यांत जें लिहिलेलें त्या सर्वांप्रमाणें त्वां सांभाळून चालावें; कारण कीं तशाने तूं आपला मार्ग सफल करिशील, आणि तेव्हां सुज्ञपणाने वागसील. म्या तुला आज्ञा दिल्ही कीं नाहीं? तूं धीर धरून धीट हो; घाबरूं नको, आणि भिऊं नको; कारण कीं जेथें कोठें तूं जासील, तेथें तेथें तुझा देव परमेश्वर तुला अनुकूळ होईल.

हें पुढील वाक्य हाज्जान उंच स्वराने दो. वे. बोलतो.

ימלוך יי לעולם परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढीपिढीं आहे. तुह्मी परमेश्वराला स्तवा. दो. वे.

शास्त्र ठेवायास नेतांना २९ वें गीत बोलतात.

שאו שערים अहो दरवाजे, तुह्मी आपले शिरोभाग ऊंच करा; सर्वकाळाचीं दारें हो, तुह्मी उंचविलीं जा; मग गौरवाचा राजा आंत जाईल, हा गौरवाचा राजा कोण? बळवान व पराक्रमी परमेश्वर, युद्धांत पराक्रमी परमेश्वर तो. अहो दरवाजे, आपले शिरोभाग उंच करा; सर्वकाळचीं दारें हो, तुम्हीं उंच व्हा; मग गौरवाचा राजा आंत जाईल. जो गौरवाचा

राजा हा कोण ? सैन्याचा परमेश्वर, तो गौरवाचा राजा आहे. सेलाह. तर तूं हें जाण कीं परमेश्वर जो तुझा देव तोच देव; तो विश्वसनीय देव; जे त्यावर प्रीति करितात, व त्याच्या आज्ञा पाळितात, त्यांजवळ तो हजारांच्या पिढीपर्यंत करार पाळून त्यांवर दया करितो. कारण कीं तुमचा देव परमेश्वर कृपाळू देव आहे; तो तुम्हास सोडणार नाहीं, आणि तुम्हाला नाहींसे करणार नाहीं; आणि त्याने तुमच्या पूर्वजांसीं जो करार शपथ वाहून केला त्याला तो विसरणार नाहीं. कां कीं, परमेश्वर म्हणतो कीं, याकोबासाठीं हर्षानें गायन करा, आणि राष्ट्रांतल्या मुख्यांमध्यें गजर करा; वदा आणि ह्मणा, हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांस इस्राएलाच्या शेषास तार.

हेखालाच्या दरवाजापुढें हें बोलतात.

" יהללו את שם " (सर्व पदार्थ) यांनी परमेश्वराच्या नांवाला स्तवावें; कारण कीं केवळ त्याचेंच नांव उंच मानायाचें; त्याचें गौरव पृथ्वीवरतीं व आकाशावरतीं आहे. आणि तो आपल्या लोकांचें शिंग उभारितो; त्याचे सर्व भक्त, त्याच्या जवळचे लोक इस्राएलसंतानें यांनी स्तवन करावें.तुह्मी परमेश्वराला स्तवा. वर आकाशांत आणि खालीं पृथ्वीवर परमेश्वर तोच देव; परमेश्वर तोच देव; दुसरा नाहीं. हे प्रभु, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोणी नाहीं. आणि तुझ्या कृत्यांसारिखें कांहीं काम नाहीं.

हेखालांत शास्त्र ठेवतांना हें बोलतात.

שובה למעונך. (हे देवा,) तूं आपले वसतिस्थानाकडे फीर, आणि तुझ्या इष्टमंदिरांत राहणें कर; कारण कीं सर्व तोंडें व सर्व जिभा तुझें गौरव करितील, आणि तुझ्या राज्याचें महत्त्वाहि करितील. आणि तो उतरतेवेळेस तो ह्मणे, हे परमेश्वरा, इस्राएलाच्या हजारांच्या अयुतांकडे फीर. हे परमेश्वरा ! आह्माला तुजकडे फिरीव, ह्मणजे आह्मी फिरूं, पूर्वींप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

תם ונשלם שבח לאל בורא עולם

पृथ्वी उत्पन्नकर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग पहिला.

टीका.

टीका १.

ईश्वराने मोश्यास सीनाय पर्वतावर दिल्हेलें उत्तर आणि कळविलेलें शुभवर्त्तमान.

मोशे सीनाय पर्वतावर शास्त्र आणायास गेला होता, तेव्हां त्यास फार दिवस झाल्यावरून इस्राएल लोकानी ओर्तीव वासरूं केलें. हें ईश्वराने मोशेला तो पर्वतावर असतांच सांगितलें; आणि या पापाकरितां त्याचा समूळ नाश करणार असें दर्शविलें. हें पाहून मोश्याने त्यांसाठीं प्रार्थना करून क्षमा मागितली व ती ईश्वराने मान्य केली. निर्गम अ० ३२. यापूर्वीं मोशे इथरोच्या घरीं असतां जेव्हां तो होरेब डोंगरावर शेरडें राखीत होता, तेव्हां ईश्वराने त्यास दर्शन देऊन इस्राएलांच्या मुक्ततेचें शुभवर्तमान कळवून त्यास इस्राएलांस सोडवायास जाण्याविषयीं आज्ञा केली. होरेब व सीनाय हे एकच. होरेब हें त्या सर्व पर्वतांचें नांव असून सीनाय हा त्याचा एक शिखर आहे. हें निर्गम अ० ३. ओ० १२ यावरून उघड दिसून येतें.

टीका 2.

अपांक्त करण्याचे प्रकार.

अपांक्त करण्याचे दोन प्रकार आहेत; एक— נדוי व दुसरा חרם यांतील पहिला प्रकार कांहींसा हलका आहे. ज्यास हें शासन होतें त्याने आपली बायको व मुलें यांशिवाय दुसऱ्या कोणाजवळहि जाऊं नये. इतरांजवळ जाण्याचें प्रयोजन असल्यास

त्यानें चार हातांच्या अंतरावर राहावें. त्यास आमंत्रण होत नाहीं, आणि ज्या कामाकरितां दाहा मनुष्यें असावीं, त्यांमध्यें तो त्यांबरोबर गणला जात नाहीं. परंतु त्यास शास्त्र वाचायास व ऐकायास, मजुरी करण्यास व मजुरीस लावायास मोकळीक असते. परंतु दुसऱ्या प्रकारचें शासन ज्यास होतें, त्यास पहिल्या प्रकाराचेंहि शासन भोगावें लागून, मजुरी करण्यास, करविण्यास आणि शास्त्र ऐकण्यास मोकळीक नसती. त्यास शास्त्राचा विसर पडूं नये ह्मणून स्वतां त्यास मात्र शास्त्र वाचण्याची मोकळीक असते. न्यायसभेनें जर त्याबरोबर भाषण करण्याचाहि मनाई केली असेल, तर तेंही करूं नये. मनाई नसल्यास अगत्य पडेल तेवढेंच मात्र त्याबरोबर बोलावें. आणि जसी त्याची वहिवाट बंद होऊन धर्मसंबंधी क्रिया कर्में करण्यास त्यास मनाई असते, त्याप्रमाणें त्याच्या कुटुंबासहि मनाई असते.

या दोन प्रकारांशिवाय שמתא ह्मणून आणखी एक प्रकार आहे. कित्येक ह्मणतात कीं हा प्रकार मागील दोहोंपेक्षां कठीण असून ज्यास हें शासन करायाचें त्याजवर शास्त्रांतील सर्व श्राप वाचून शोफार वाजवून ही गोष्ट सर्वांस कळविली जाते. परंतु अलिकडे असें शासन कोणास होत नाहीं; ह्मणून कोणी असें ह्मणतात कीं חרם आणि שמתא हें एकच. याविषयींचे सर्व नियम शुलहानआरूख या ग्रंथाच्या योरेदेआ या भागांत सांपडतात.

टीका ३.

कोनाम, कोनाह व कोनास.

हे कालदी शब्द आहेत. तेथें स्पष्ट सांगितलेले नवस, व शपथी यांशिवाय दुसरे कोणत्याहि प्रकारचे नवस व शपथी असल्यास त्याहि रद्द व्हाव्या, असें दर्शविण्याकरितां उच्चारांत कांहींसा भेद ठेवून या शब्दांचा तेथें उपयोग केला आहे. गेमारा. नेदारीम. अ० १. आणि हारामबाम हालाखोथ नेदारीम अ० १.

टीका ६.

चढतें व उतरतें अर्पण.

चढतें व उतरतें अर्पण, ह्मणजे शक्तीप्रमाणें वाहाण्याचें अर्पण. जसें अविचाराने वाहिलेल्या शपथेकरितां धनवानाने एक मेंढी अथवा शेळी, गरिबाने दोन पारवे, आणि अतिगरीबाने एका मापाचा दाहावा भाग याजकाकडे वाहाण्यासाठीं न्यावा. लेवीय. अ० ५.

टीका ७.

न्यायसभेचे देहांत दंड.

न्यायसभेच्या देहांत दंडाचे चार प्रकार आहेत; ह्मणजे धोंडमार, जाळणें, छेदणें व श्वास बंद करून मारणें. याविषयीं हारामबाम याने असें लिहिलें आहे कीं, पहिले तिन्ही प्रकार शास्त्रांत सांगितलेले आहेत. धोंडमार याविषयीं अनुवाद अ० १३ ओ० १०; जाळणें याविषयीं लेवीय अ० २० ओ० १४; आणि छेदणें याविषयीं लेवीय अ० २० ओ० १६ एथें सांगितलें आहे. परंतु श्वास बंद करून मारणें याविषयीं स्पष्ट कोठेंच दर्शविलेलें नाहीं, ह्मणून जी देहांतशिक्षा मोहोगमांत लिहिली आहे, ती श्वास बंद करून मारण्याची शिक्षा असें समजावें. हारामबामाच्या सानहेद्रीम पुस्तकाचा अ० १४ व १५.

टीका ८.

आरीएल व हारएल.

आरीएल ह्मणजे देवाचा सिंह आणि हारएल ह्मणजे देवाचा डोंगर. हीं दोन नावें यहेजकेल अ० ४३ ओ० १५ एथें वेदीच्या अर्थाने योजिलीं आहेत. परंतु आरीएल हें नांव यशाया अ० २९ ओ० १२ एथें येरूशालेमेस दिल्हें आहे.

टीका ७.

इस्त्राएली धर्माचीं मूळतत्वें.

ईश्वराचें एकत्व हें इस्राएली धर्माचें मुख्यत्वेंकरून मूळतत्व आहे; आणि तें " हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे;" या वाक्यांत दर्शविलें आहे. यास्तव जे आपणास इस्राएल म्हणवितात त्यांनीं हें वाक्य सकाळीं व संध्याकाळीं अगत्य म्हटलें पाहिजे. लहान बाळ बोलूं लागतांच पहिल्याने त्यास हेंच वाक्य शिकवावें. आणि अंतकाळींहि हेंच वाक्य म्हणतात.

याशिवाय सुमारें सातशें वर्षांमागें हाराम्बाम यानें आणखी तेरा मूळतत्वें ठरविलीं आहेत, तीं सर्व इस्राएलांनीं मान्य करून प्रतिदिवशीं त्यांचें ध्यान केलें पाहिजे. तीं तेरा मूळतत्वें येणेंप्रमाणें ;—

१. मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम; असा जो ईश्वर, तोच सर्व पदार्थांचा उत्पन्नकर्त्ता व नियंता, आणि सर्व उत्पत्ति त्यानेच केली, तोच करितो, आणि तोच करील.

२. मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, तो एकच; आणि कोणत्याहि प्रकारचें एकत्व त्याच्या एकत्वासारिखें नसून तो एकच आमचा देव होता, आहे व असेल.

३. मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, तो निराकार आहे, आणि ज्या विकारांस पदार्थ पात्र आहेत, त्यांस तो पात्र नसून त्यास कशाचीहि प्रतिमा नाहीं.

४. मी पूर्ण विश्वासाने मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, तोच आद्यंताचा आहे.

५. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, त्याची मात्र प्रार्थना करणें योग्य आहे; त्यावांचून दुसऱ्याची प्रार्थना करणें योग्य नाहीं.

६. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, शास्त्रांतलि भविष्यभाष्यांचीं सर्व वचनें सत्य आहेत.

७. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, आमचा गुरु मोशे (त्याजवर शांति असो) याचें भविष्यकथन सत्य आहे; आणि त्याच्या पूर्वीं झालेल्या आणि मागाहून झालेल्या सर्व ज्ञान्यांचा तो गुरु होता.

८. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, आमचा गुरु मोशे (त्याजवर शांति असो) यास जें दिल्हेलें शास्त्र, तेंच हल्लीं आह्माजवळ आहे.

९. मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, हें शास्त्र कधींच पालटणार नाहीं; आणि धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, तो दुसरें कधींच देणार नाहीं.

१०. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम, असा जो ईश्वर, तो मनुष्यपुत्रांचीं सर्व कृत्यें व विचार जाणतो, जसें ह्मटलें आहे कीं, "तो त्यांचें हृदय एकसारिखें घडितो; त्यांचीं सर्व कामें ध्यानांत आणितो."

११. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, धन्य ज्याचें नाम असा जो ईश्वर, तो आपल्या आज्ञा पाळणारांस प्रतिफळ देतो, आणि आपल्या आज्ञा भंग करणारांस शासन करितो.

१२. मी पूर्ण विश्वासानें असें मान्य करितों कीं, माशीयाह येईल; आणि जरी त्याच्या येण्यास एवढा विलंब झाला, तरी त्याच्या येण्याची मी प्रतिदिवशीं वाट पाहीन.

१३. मी पूर्ण विश्वासाने असें मान्य करितों कीं, सदासर्वकाळ धन्य व थोर ज्याचें नाम, असा जो ईश्वर, त्याची जेव्हां इच्छा होईल तेव्हां मेलेल्यांची पुनरुत्थिति होईल.

टीका ८.

ईश्वराने वीट मानलेल्या साहा गोष्टी.

ज्या साहा गोष्टींचा ईश्वर वीट मानितो, त्या नीति अ० ६, ओ० १६ एथें लिहिल्या आहेत; त्या येणेंप्रमाणें; गर्वदृष्टि, लबाड बोलणारी जीभ, निर्दोष रक्त पाडणारे हात, दुष्ट संकल्प योजणारें हृदय, दुष्ट कर्माकडे त्वरित धावणारे पाय, खोटें रचणारा असा लबाड साक्षी; परंतु त्याच वाक्यांत लिहिल्याप्रमाणें सात गोष्टी धरिल्या, तर भावांमध्यें तंटे उठविणारा हाहि त्यांमध्यें गणला जातो.

प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना.

भाग पहिला.

वर्गणीदारांचीं नांवें.

मुंबई.

हासकेलजी आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम. २
शलिमानजी आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम. १
इसहाक शलेमानजी दीवेकर कमोदान मुकादम. १
आहारोन आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम २
एस्तेरबाई दीवेकरां कमोदाना मुकादमा. १
सिप्पोराबाई बाथ आहारोन आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम. १
दावीद हाईम दीवेकर कमोदान मुकादम. १
एस्तेरबाई दीवेकरां कमोदाना मुकादमा. १
योसेफ इसहाक दीवेकर कमोदान मुकादम. १
आहारोन दानिएलजी तळकर. ५
शेमोएल येलीया वरोलकर गब्बाय. १
दावीद शेमोएल वरोलकर. १
शालोम शेमोएलजी नौगांवकर. १
शिमओन बिनयामीनजी वांकुळकर. १
मोशे येलीयाहु गालसुलकर. १
येलीया योसेफ राजपुरकर, हाज्जान. १
रऊबेन येलीया राजपुरकर. १
मोशे येलीया राजपुरकर. १
शेमोएल मोशे किलेकर. १
राहेलबाई किलेकरां. १
शेमोएल शिमशोनजी किलेकर टेलेग्राफ सिगनालर. १

मोशे बिनयामीनजी पेझारकर मेस्त्री. १
शेमोएल येहेजकेलजी पेझारकर ड्राफ्तस्म्यान. १
येहेजकेल येटुजी आवासकर. १
मिर्यामबाई आवासकरीं. १
योसेफ आहारोनजी खुलाबकर. १
हाईम इसाजी गालसुलकर. २
दानिएल योसेफजी तळकर दाकर पेनशनर. १
मोशे दानिएलजी तळकर. १
सिमहाबाई तळकरीं. १
आब्राजी बालाजी आवासकर. १
सिमहाबाई गालसुलकरीं. १
योसेफ बिनयामीनजी गालसुलकर. १
योसेफ शिमशोनजी सानकर. १
हाईम आब्राहामजी मलेकर. २
बिनयामीन शालोमजी वालवटकर. १
येलीया शालोमजी वालवटकर. १
शालोम बिनयामीनजी सानकर. १
शिमशोन मोशे दीवेकर. १
याकोब फकीरजी शापुरकर. १
रऊबेन आब्राहामजी कोरलेकर. १
शालोम शेमोएलजी कुरूलकर दाकर चोगले. १
शेमोएल शालोमजी कुरूलकर. १
आब्राहाम येलीएझेर भोरपकर. १
शलेमान हासकेलजी नौगांवकर. १
मोशे येहेजकेलजी खंडालकर. १
रऊबेन आब्राहाम भिंजेकर. १
बिनयामीन बाबा खानावकर. १
शालोम बनाजी आवासकर. १
आब्राहाम झेबूलून दांडेकर. १

शालोम दानिएलजी भास्तेकर. १
आब्राहाम सकोबा पेनकर. १
योसेफ आब्राहाम पेनकर. १
बिनयामीन आब्राहाम पेनकर. १
शालोम येलोजी चेऊलकर. १
बनाजी दावीदजी शापुरकर मेस्त्री. १
आहारोन शेमोएलजी दीवेकर. १
येहेजकेल बिनयामीन पेनकर. १
शिमशोन शेमोएलजी दिवेकर. १
रऊबेन बिनयामीनजी पेनकर. १
दावीद आहारोनजी गडकर. १
शालोम योसेफजी पेनकर. १
आब्राहाम शीलेमानजी उमर्डेकर दाक्तर पेनशनर. १
हासकेल इसुबजी तळकर व त्यांचे मुलगे. २
आब्राहाम दानिएलजी सातामकर. १
आहारोन इसहाकजी भास्तेकर दाक्तर. १
येहेजकेल याकोबजी भोरपकर. १
शेमोएल येहेजकेलजी नौगांवकर. १
हासाजी शेमोएलजी कुरूलकर. १
दावीद शीलेमानजी बोरघरकर. १
शालोम शीलेमानजी बोरघरकर. १
बिनयामीन शेमोएल सासुनकर. १
शीलेमान दानिएल भास्तेकर. १
योसेफ आबाजी तळकर. १
येलीएझेर योसेफ सानकर. १
दावीद याकोबजी चरीकर. १
शीलेमान दानिएलजी पेझारकर मेस्त्री. १
शालोमजी इसाजी सोगांवकर. १
हाईम शेमोएल भास्तेकर. १

शेमोएल शालोमजी आष्टमकर. १
याकोब शलेमानजी वासकर. १
मोशे शलेमानजी वासकर. १
येलीयाहु शलेमानजी वासकर. १
येहेजकेल दावीद दीवेकर. १
सतकेल शेमोएलजी चरीकर सुभेदार. १
शेमोएल येलोजी तलकर हावलदार. १
शेमोएल रऊबेन पुगांवकर. १
रेऊबेन शेमोएल पुगांवकर. १
हाईम शिमशोन दीवेकर. १
हाईम बंदुजी गडकर. १
इसहाक आब्राहाम इवलेकर हावलदार. १
रऊबेन आहारोनजी थलकर. १
याकोब शेमोएल दीवेकर. १
आहारोन याकोबजी आवासकर. १
शालोम बाळाजी पेझारकर. १
शिमशोनजी आब्राहामजी आधरनेकर मेस्त्री. १
आब्राहाम बापुजी तळगांवकर मेस्त्री. १
मोशे रऊबेनजी पुगांवकर. १
शलेमान राहामीम तलकर. १
राहामीम शलेमान तलकर. १
हानोख शलेमान तलकर. १
लीयाबाई बाथ शलेमान राहामीन तलकर. १
आब्राहाम राहामीम मलेकर. १
येलीयाहु शेमोएल नौगांवकर. १
येहुदा येलीयाहु नौगांवकर. १
इसहाक शालोमजी नौगांवकर १
आब्राहाम दानिएल कुरूलकर १
शालोम आब्राहाम चीचोलकर १

शलेमान आबाजी चरीकर १
याकोब शेमोएल शीरकोलकर १
मुसाजी दानिएलजी केहीमकर १
येहेजकेल दावीद ढाकरकर १
आहारोन इसहाक नौगांवकर १
शालोमजी सामाजी कासुकर सुभेदार पेनशनर १
बिनयामिन शलेमानजी कासुकर दाक्तर १
शालोम अब्राहाम मोशे हिब्बा १
शालोम बाबाजी म्हशीलकर १
योएल शेमोएल म्हशीलकर १
आब्राहाम शेमोएलजी नौगांवकर १
रऊबेन योसेफ गडकर १
शेमोएल राहामीम भोनकर १
याकोजी गौरोजी उमर्डेकर १
दावीद मोशे नौगांवकर १
हिल्लेल शालोमजी नौगांवकर १
शालोमजी नेथानएल दिवेकर पेनशनर १
आहारोन मोशे नागांवकर हावलदार १
हाईम येहेजकेलजी म्हेडेकर १
शिमशोनजी सामाजी आकशीकर १
आब्राहाम शेलोमो नौगांवकर १

ठाणें.

मुसाजी बाळाजी उमर्डेकर सुभेदार मेजर बाहादर कमान्डान्ट. १
आब्राहाम मुसाजी उमर्डेकर माजी फौजदार १
हिल्लेल मुसाजी उमर्डेकर इन्स्पेक्टर बडोदा रेलवे १
मीखाएल हिल्लेल उमर्डेकर १
शिमशोनजी येलोजी डांडुलकर सुभेदार पेनशनर १
शलेमान शिमशोनजी डांडुलकर १

नेरळ.

रऊबेन येहेजकेलजी शिरकोलकर १

चीनेर.

येलोजी सामाजी फनसापुरकर १

पनवेल.

शेमोएल आब्राहामजी तरणखोपकर पंतोजी. १
आब्राहाम शेमोएलजी भोरपकर १
आब्राहाम दावीदजी चरीकर १
शेमोएल शालोमजी चीचोलकर १
बिनयामीन शालोमजी चीचोलकर. १
रऊबेन आब्राहामजी नौगांवकर. १
दावीद येहेजकेल भास्तेकर १
शेमोएल आलोजी शापुरकर काजी. १
शालोम इसहाक पिंगले. १
आहारोन भाऊजी कोलाटकर. १
शेमोएल शालोमजी नौगांवकर. १
बिनयामीन दावीदजी कोलाटकर. १
याकोब शेमोएलजी वांसकर दाकर. १

पोयनाड.

शालोम सकोजी गडकर. १

वसोंली.

येलोजी नथुजी शापुरकर. १

आलीबाग.

शालोम शलिमानजी पेझारकर दाकर. १

आंबेपुर.

शीलिमान दानिएलजी तलकर पंतोजी १
हाईम आबाजी चरीकर. १

आगलाची वाडी.

येलीया ऊर्फ बाबाजी तानाजी ढोकरकर. १

रेवदंडा.

शेमोएल योसेफ राजपुरकर पंतोजी. १
दावीद बाबाजी दांडेकर १

आष्टमी.

शेमोएल बाबाजी आष्टमकर म्हेतर. १
बेंदुजी येलोजी आष्टमकर म्हेतर. १
हाईम आबाजी आष्टकर म्हेतर. १
आहारोन शीलेमानजी आष्टमकर पंतोजी. १
हाईम बेंदुजी चीचोलकर. १

(हावसान) बोरलय.

शालोमजी शीलेमानजी दांडेकर. १
मुसाजी आब्राहामजी आधरनेकर. १

नादगांव.

बेंदु बनाजी चेऊलकर १

मुरूड.

बिनयामीन योसेफ राजपुरकर काजी १

कारवार.

इसहाक शालोमजी पोलीस दाक्तर १
शालोम शिलेमानजी आपटेकर ड्राफ्समान १
दानिएल बिनयामीनजी कांदलेकर दाक्तर १
मुसाजी शीलेमानजी नागांवकर मेस्त्री १

पुणें.

याकोब राहामीम तलकर दाक्तर. २
मोशे याकोब तलकर १
बिनयामीन याकोब तलकर १
योसेफ याकोब तलकर १
शिमशोन याकोब तलकर १
येहेजकेल मोशे नागांवकर दाक्तर १

लेवीयोनाथान बेन येहेजकेल नागांवकर.......... .... १
दानिएलजी तानाजी कोलाटकर जमादार १
येलीएझेर दानिएलजी कोलाटकर ड्राफ्समान.... .... १

अहमदनगर.

बापुजी आब्राहामजी वरघरकर सुभेदार नेटीव कमांडान्ट.... १

सातारा.

हाईम येहेजकेल ह्मशीलकर दाक्तर १
बंदुजी इसाजी भोनकर जमादार.... .... १
बंदुजी याकोबजी किलेकर जमादार. १

नासीक.

हाईम शलिमानजी चीचोलकर ड्राफ्समान. २

भोसावळ.

रऊबेन शीलेमानजी नागांवकर मेस्त्री. १
आब्राहाम रऊबेनजी नागांवकर. १

जबलपूर.

शालोमजी दानिएलजी कासुकर मेस्त्री. १

सुरत

योसेफ शीलेमानजी कुरूलकर टेलेग्राफ सिगनलर. १
येहेजकेल शालेमजी दीवेकर. १

किईम.

शालोम बिनयामिनजी वांसकर स्टेशन मास्तर............... १

अहमदाबाद.

आब्राहामजी बिनयामीनजी येरलकर. दाक्तर. १

द्वारका.

येहेजकेलजी येलोजी सानकर दाक्तर. १

हैद्राबाद.

शिमशोन दावीदजी झेंडेकर दाक्तर. ४

रऊबेन येलीया दुदकर. १
सतकेलजी रामाजी गडकर मेस्त्री. १
हासकेल शलेमानजी वरसोलकर दाक्तर. १
येलीया शेमोएल शीरकोलकर दाक्तर. १
योसेफ रऊबेन दुदकर. १
बिनयामीन रऊबेन दुदकर. १
येलीया रऊबेन दुदकर. १
मोशे रऊबेन दुदकर. १
बाथशेबा बाथ रऊबेन दुदकर. १

हाला.

दानिएलजी सकोजी भोरपकर दाक्तर. १
बिनयामीन दानिएलजी भोरपकर. १
याकोब दानिएलजी भोरपकर. १

उमरकोट.

शालोमजी मोशे सातामकर सबओवरसीयर. १
आब्राहामजी दावीदजी हेडेकर रैटर. १

शीकारपूर.

आहारोनजी दावीदजी हेडेकर दाक्तर. १

आदन.

दानिएल आब्राहामजी आधरनेकर मेस्त्री. १

वलसार.

रऊबेन इसहाक नीगडेकर.. १

रेजीमेंट ३.

हाइमजी बापुजी वढावकर नाईक १
आब्राहामजी इसाजी भास्तेकर लान्स नाईक. १
सतकेलजी याकोबजी किलेकर लान्स नाईक पे आर्डरली १

रेजीमेंट ४.

दानिएल राहामीम तलकर सुभेदार. १
हासकेलजी दानिएलजी तलकर जमादार........ १
याकोबजी दानिएलजी पालकर हावलदार. १
मुसाजी बालाजी तलकर ब्युगल मेजर. १
सतकेल याकोबजी नौगांवकर नाईक. १
रऊबेन हाईमजी उमर्डेकर ब्युगलर. १
आब्राहाम हाईमजी आष्टीवकर........ १
हासकेलजी शालोमजी इंदापूरकर........ १
शमोएल शालोमजी इंदापुरकर........ १

रेजीमेंट ६.

याकोबजी शालोमजी किलेकर नाईक बेंडमास्तर........ १
दानिएलजी शालोमजी किलेकर वींगरैटर........ १

रेजीमेंट १०.

शेमोएल मोशे नागांवकर सुभेदार........ १
याकोब योसेफजी मेंद्रीकर जमादार........ १
येलीएझेर येलीया वांसकर दाकर........ १
शेमोएलजी दानिएलजी खरवीलकर दाकर........ १
शेमोएल याकोबजी खरवीलकर हवलदार........ १
शालेम मोशे नागांवकर ड्रील नाईक........ १

रेजीमेंट १२.

यहेजकेल बापुजी मलेकर सुभेदार मेजर बाहादर........ १
मुसाजी दानिएलजी कोलेटकर सुभेदार........ १
मुसाजी बापुजी मलेकर सुभेदार........ १
रऊबेन बापुजी मलेकर जमादार आजीटन........ १
शलिमानजी शालोमजी गरपकर हावलदार........ १

शलेमानजी सतकेलजी कोगबानकर कलर हावलदार पे आर्डरली १
येहेजकेल इसहाकजी पुगांवकर दाकर. १
योसेफ दानिएलजी कोरलेकर दाकर १
बनाजी शलेमानजी भास्तेकर हावलदार पे आर्डरली १
बिनयामीन सादीक भास्तेकर स्कुलमास्तर नाईक. १
जेखारएल शलेमानजी कांदलेकर नाईक पे आर्डरली. १
आब्राहामजी दानिएलजी थलकर नाईक पे आर्डरली. १
याकोबजी भावजी तलकर नाईक हास्पिटल आर्डरली. १
शालोमजी सकोजी पेणकर ड्रीलनाईक. १
शलेमानजी एरलकर लान्स नाईक. १
दानिएल बिनयामीनजी केहीमकर फैफर. १
रऊबेनजी शलेमानजी भास्तेकर. १
शालोमजी शलेमानजी खांबकर. १
हाईमजी शेमोएलजी चरीकर. १
दानिएलजी सकोजी कांदलेकर. १

रेजीमेंट १८.

शालोमजी मुसाजी पेणकर सुभेदार. १
शिमशोनजी याकोबजी नौगांवकर नाईक पे आर्डरली. १
शालोमजी शलेमानजी दीघोरकर दाकर. १

रेजीमेंट १६.

आहारोनजी शेमोएलजी आष्टमकर सुभेदार मेजर १
योसेफ दानिएलजी खरवीलकर सुभेदार. १
दावीद शेमोएलजी आष्टमकर नाईक. १

रेजीमेंट १९.

शेलोमो येलीया वाकुलकर सुभेदार. १

याकोब दावीदजी बोरगांवकर सुभेदार. १
शालोम येलीया वाकुलकर जमादार. १
रऊबेन येहेजकेल झशीलकर जमादार. १
शिमशोन दानिएल मजगांवकर जमादार. १
आब्राहाम इसहाक मोरबेकर हावलदार पे आर्डरली. १
आब्राहाम शेमोएल दीवेकर हावलदार पे आर्डरली. १
आब्राहाम शिमशोन भोरपकर रैटर. १
रऊबेन इसहाक केहीमकर. १

रेजीमेंट २३.

हाईम शेमोएलजी पेझारकर सुभेदार. १
रऊबेन शालोमजी पेनकर दाकर. १
हासकेल हाईमजी तलकर स्कुल मास्तर. १
बंदुजी शेमोएलजी पेझारकर नाईक. १
शेमोएल शालोमजी पेझारकर. १
योसेफ दावीदजी पेझारकर. १

रेजीमेंट २५.

शलेमानजी दानिएलजी घोसालकर सुभेदार मेजर बाहादर १
दावीदजी शलेमानजी घोसालकर. १
बनेमजी शालोमजी नागांवकर हावलदार मेजर १

रेजीमेंट २६.

रऊबेन इसहाकजी नौगावकर..................... १

रेजीमेंट २९.

शुकूर इसहाकजी नौगांवकर..................... १

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
३	२८	यायांत	न्यायांत
६	११	हाशमानीम	हाशमोनीम
१३	२९	तं	तूं
३२	२९	टीका ५	टीका ६
७२	२४	बांधले गेलेले	बांधला गेलेले
८७	१७	गौवण्याकरितां	गौरवण्याकरितां
८८	२८	दवैत्वाच्या	दैवत्वाच्या
८९	२८	अदश्य	अदृश्य
९२	२४	ती वेळ	तीन वेळ
९४	३	सष्टीकरण	स्पष्टीकरण

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीनें छापविलेलीं पुस्तकें.

	रु.	आ.	पै.
प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबूल होणें.	,,	१	३
पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना.	,,	८	,,
इस्राएलांचा लग्नविधि	,,	२	,,
वर्षप्रतिपदेची प्रार्थना	१	,,	,,
नवसांची सुटका आणि समुद्रतिरीं करायाची प्रार्थना	,,	४	,,
आनतिओखोस राजाचा इतिहास अथवा हान्नुक्याच्या सणाची स्थापना	,,	२	,,
इब्री पहिलें पुस्तक	,,	४	,,
प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना, भाग पहिला	१	४	,,

,, ,, भाग दुसरा तयार होत आहे.

THE
JEWISH NEW YEAR'S DAY.

ראש השנה

[illegible]तिपदेची प्रार्थना.

THE PRAYERS OF THE JEWISH NEW YEAR'S DAY:

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKER

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

AND

SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY.

BOMBAY.

PRINTED AT GUNPUT KRUSHNAJEE'S PRESS.

1862—5623

Price 1 *Rupee.*

ראש השנה

वर्षप्रतिपदेची प्रार्थना.

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठी भाषेंत

योसेफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक

व

इस्राएल लोकांच्या सद्गुण शोधकमंडळीचे चिटणीस

यांणीं

भाषांतर केलें.

तें

इस्राएल लोकांच्या सद्गुण शोधक मंडळीनें

लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें

गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत छापिलें.

इ० स० १८६२

इस्राएली ५६२३

किम्मत १ रुपाया.

प्रस्तावना.

या ग्रंथांत ज्या प्रार्थनेचें भाषांतर केलें आहे, ती प्रार्थना तिशरी महिन्याच्या प्रतिपदेस करितात. तिशरी म्हणजे आश्वीन महिन्याची प्रतिपदा हीच इस्राएल लोकांची वर्षप्रतिपदा; कारण या दिवसापासून त्यांच्या राजकीय वर्षास आरंभ होतो. आणि नीसान म्हणजे चैत्र महिन्याच्या प्रतिपदेच्या दिवशीं त्यांच्या धर्मसंबंधी वर्षास आरंभ होतो. या प्रमाणे इस्राएल लोकांत दोन प्रकारचे शक चालतात. राजकीय शक पृथ्वीच्या उत्पत्ती पासून चालू आहे, आणि तो बहुदा शास्त्राखेरीज जीं पुस्तकें आहेत त्यांत सांपडतो; आणि धर्मसंबंधी शक इस्राएल लोकांच्या मिसरांतून निघण्यापासून चालू असून फार करून शास्त्रांतच सांपडतो.

राजकीय शकाच्या वर्षप्रतिपदेस, म्हणजे ज्या दिवशीं ही प्रार्थना करितात त्या दिवसास अनेक कारणा वरून "वर्षप्रतिपदा" "स्मरणाचा दिवस" "न्यायाचा दिवस" आणि "गजराचा दिवस" असीं निरनिराळीं नामें आहेत. वर्ष प्रतिपदा हें नाम यादिवसास कोणत्या कारणावरून दिल्हें आहे, हें मागे दर्शविलें आहे. जे ईश्वरी भक्त होऊन गेले त्यांची आणि विशेषें करून इसहाक जो ईश्वरी नामा करितां याच दिवशीं अर्पिला जाण्यास सिद्ध झाला, त्याची आठवण ईश्वरापुढें होऊन, त्याने त्याच्यां लेंकरांस जीवनाच्या पुस्तकांत ल्याहावें; म्हणून इस्राएल लोक यादिवशीं प्रार्थना करिताना त्यांच्या पुण्याचें स्मरण देतात, म्हणून या दिवसास "स्मरणाचा दिवस" असें नाम पडलें आहे. "न्यायाचा दिवस" हें नाम पडण्याचें कारण असें

कीं, या दिवशीं ईश्वर सर्वांचा न्याय करून प्रत्येक मनुष्याचें बरें किंवा वाईट होणें, हें या दिवशीं ठरवितो. आणि गणना २९.१. एथें या दिवसास "गजराचा दिवस" असें नाम दिल्हें आहे; आणि त्या दिवशीं शोफार म्हणजे करणा वाजवून गजर करावा असें सांगितलें आहे.

या नावांवरून व तीं पडण्याच्या कारणावरून हा दिवस किती भयंकर आहे हें लक्षांत येतें. या शिवाय हा दिवस पश्चात्तापाच्या दाहा दिवसांतील पहिला दिवस आहे; ह्मणून ही प्रार्थना करिते समयीं सर्वांनी आपल्या पापांविषयीं पूर्ण पश्चात्ताप करून, ह्रदय फोडून, नम्र आत्म्याने व एक चित्ताने ही प्रार्थना केली पाहिजे. परंतु जी प्रार्थना समजत नाहीं, तिजकडे बहुदा लक्ष लागत नाहीं; यासाठीं ती समजली असतां, माझे प्रिय बंधू ही विनंती दयाळू व यथार्थ न्यायाधीशापुढें लक्ष लावून करितील व तो ती मान्यकरून त्या सर्वांस जीवनाच्या पुस्तकांत लिहील असी आशा करितों.

या ग्रंथाचें भाषांतर करिताना जे गूढ विषय सांपडले, त्यांजवर टीका केल्या आहेत; त्यांतील कांही पृष्ठाखालीं व कांहीं ग्रंथाच्या शेवटीं सांपडतील.

वर्षप्रतिपदेची प्रार्थना.

शाब्बाथ असल्यास एथून आरंभ करावा.

מזמור לדוד הבו ליי गीत. २९

במה מדליקין * (शाब्बाथ दिवशीं) दिवा कशाचा लावावा व कशाचा लावूं नये ? एरेझ वृक्षा वरील शेवाळीचा, तयार न केलेले जवसाचा, रेशमाचा, लव्हाळ्याच्या वातीचा, रानांतील पानांच्या वातीचा, पाण्यावरील कफाचा, राळेचा, मेणाचा, कापसाच्या बोंडाचा, जळलेले तेलाचा, मेंढ्याच्या शेपटींतील चरबीचा, आणि चरबीचे मेणाचा दिवा लावूं नये. नाहूम हामाद्दी म्हणतो, कढवलेले चरबीचा दिवा लावावा; परंतु ज्ञानी म्हणतात कीं, कढवलेली असो किंवा न कढवलेली असो, यद्यपि त्याने दिवा लावूं नये. सणाच्या दिवशीं जळलेले तेलाचा दिवा लावूं नये. रिब्बी इश्माएल म्हणतो शाब्बाथाच्या माहात्मामुळें राळेच्या गाळाचा दिवा लावूंनये. आणि ज्ञानी म्हणतात, कीं सर्व (जातीचें) तेल चालेल. तिळांचें तेल, अक्रुडांचें तेल मुळ्याचे बीजाचें तेल, माशाचें तेल, दुध्याच्या बीजाचें तेल, राळेचा गाळ, आणि नखतेल चालेल. रिब्बी तरफोन म्हणतो जाइताच्या तेला शिवाय दुसऱ्या कशाचाहि दिवा लावूं नये. जवस खेरीज करून जें सर्व झाडापासून उत्पन्न होतें, त्याचा दिवा लावूं नये; आणि जवसा खेरीज, जें सर्व झाडापासून उत्पन्न होतें तें राहुटीच्या विटाळास पात्र नाहीं.× कापडाची वळलेली

---

* टीका १.

× गणना १९.१४.

आणि न शेकावलेली वात, रिब्बी एलीएझेर म्हणतो, ती अशुद्ध आहे, आणि त्याचा दिवा लावूंनये; रिब्बी आकीबा म्हणतो ती शुद्ध आहे, आणि त्याचा दिवा लावावा. कोणी मनुष्याने अंड्यास भोंक पाडून, त्यांत तेल भरून तें गळावें म्हणून, अथवा जरी तें मातीचें भांडें असलें, तरी दिव्यावर ठेवूं नये. परंतु रिब्बी येहुदा त्याविषयीं मोकळीक देतो. यद्यपि जर घडणाराने पूर्वीपासून जोडलेले असलें, तर तें एकच पात्र आहे, म्हणून त्याविषयीं मोकळीक आहे. कोणी मनुष्याने थाळींत तेल भरून आणि दिव्याच्या बाजूस ठेवून वातीने तेल शोषून घ्यावें म्हणून, वातीचें टोंक त्या (थाळींत) घालूं नये; आणि रिब्बी येहुदा त्याविषयीं मोकळीक देतो. अन्य लोकांमुळें, चोरांमुळें, वाईट आत्म्यामुळें भिऊन, अथवा रोग्यास झोंप लागावी म्हणून जो दिवा विझवितो, तो दोषी नव्हे; परंतु जो दिव्याची, तेलाची किंवा वातीची कसर करून तसें करितो, तो दोषी आहे. रिब्बी योसे हा वात खेरीज करून सर्व गोष्टी निर्दोषी अशा ठरवितो, कारण (वात विझविणाराच्या हातून) कोळसा होतो. तीन उल्लंघनामुळें म्हणजे विटाळाविषयीं, उंड्याचें दान करण्याविषयीं, आणि शाब्बाथाचा दिवा लावण्याविषयीं न सांभाळल्यामुळें स्त्रिया प्रसवतेवेळीं मरण पावतात. मनुष्यानें शुक्रवारीं अंधार होताना तीन गोष्टींविषयीं विचारावें. दाहावा भाग निराळा केला काय ? खिचडी तयार केली काय ? दिवा लाविला काय? अंधार झाला किंवा न झाला याविषयीं संशय असल्यास ज्याचा दाहावा भाग न देण्याविषयीं खात्री असेल त्याचा दाहावा भाग काढूंनये; भांडीं धुवूंनये; आणि दिवे लावूंनये. परंतु ज्याचा दाहावा भाग देण्याविषयीं संशय असेल, त्याचा दाहावा भाग काढावा, खिचडी तयार करावी, आणि जेवण उष्ण राहावें म्हणून तें झांकून ठेवावें.

אמר רבי אלעזר रिब्बी एलआजार व रिब्बी

ह्यांनीना म्हणतात, कीं ज्ञानी विद्यार्थी जगांत शांति वाढवितात; जसें म्हटलें आहे कीं, आणि तुझीं सर्व लेंकरें परमेश्वराने शिकविलेलीं होतील; आणि तुझ्या लेंकरांचें अत्यंत कुशल होईल; तें वाक्य तुझीं लेंकरें असें वाचूं नको, परंतु तुझे बांधणारे असें वाच: तुझ्या कोटामध्यें कल्याण, तुझ्या राज वाड्यांत सुख होईल. मी आपल्या भावासाठीं व आपल्या मित्रासाठीं बोलेन, "तुझ्यामध्यें कल्याणच असो". आमचा देव परमेश्वर याच्या मंदिरासाठीं मी तुझें बरें पाहीन. आपल्या लेंकरांच्या लेंकरांसुद्धां इस्राएलावर समाधानहि पाहसील. जे तुझ्या शास्त्रावर प्रीति करितात, त्यांचे फार कल्याण आहे; त्यांस कांहीं अडखळा नाहीं. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो; परमेश्वर आपल्या लोकांस* कल्याणयुक्त आशीर्वाद देतो.

קדיש דרבנן

לכה דודי हे प्रियकरा ! चल आपण नवरीस* भेटायास जावूं; आणि शाब्बाथाचा आदर सत्कार करूं.

שמור וזכור तुम्ही सांभाळा आणि आठवण धरा, असें एकच जो देव, त्याने एकाच गोष्टीविषयीं + (सांगून) आम्हास ऐकविलें; परमेश्वर एकच व त्याचें नामहि एकच, आणि (त्याच्याच नामास) कीर्ति, महत्त्व, आणि स्तुति शोभते. לכה

לקראת שבת चला, आपण शाब्बाथास भेटायास जाऊं; कारण तो आशीर्वादाचा उगम आहे; तो पुरातन काळाच्या प्रारंभापासून स्थापला गेला; आणि जरी तो उत्पत्तीमध्यें शेवटला, तरी पहिल्याने योजलेला होता. לכה

* नवरी हें नाम एथें शाब्बाथास दिल्हें आहे.

+ अनुवाद ५.१२ एथें शाब्बाथाविषयीं सांभाळायास आणि निर्गम २०.८ एथें शाब्बाथाविषयीं आठवण धरायास सांगितलें आहे.

מקדש מלך हे राजाच्या पवित्र मंदिरा, अगे राजकीय नगरे, ऊठ आणि आपल्या नाशांतून बाहेर नीघ, शोकाच्या खिंडींत तूं फार दिवस राहिलीस, आतां त्यास तुझी काकळूत येऊन तो तुजवर दया करील. לכה

התנערי מעפר हे माझ्या लोका, ऊठ (आपणावरील) धूळ झाड, आणि आपल्या सुंदर पणाचीं वस्त्रें पांघर; कारण इशाय जो बेथलेहेमकर याच्या पुत्राच्या हाताकडून* तारण माझ्या जीवाजवळ येत आहे. לכה

התעוררי התעוררי तूं हर्षकर, हर्षकर; कारण तुझा दीपक येत आहे; ऊठ आणि प्रकाशीत हो; जागी हो, जागी हो आणि गायन कर; तुजवर देवाचें गौरव प्रकाशलें आहे. לכה

לא תבושי हे येरूशालेमे! तूं लज्जित होऊंनको व घाबरूंनको; तूं खिन्न कां होतीस व कां तळमळतीस? तुजमध्यें माझ्या लोकांतील दरिद्री आश्रय पावतील, आणि तेंच नगर आपल्या नाशाच्या ठिकाणीं पुनः बांधलें जाईल. לכה

והיו למשסה तुझा नाश करणाऱ्यांचा नाश होईल, आणि तुला गिळणारे दूर घालविले जातील; जसा नवरा नवरी विषयीं आनंद मानितो, तसा तुझा देव तुजविषयीं हर्ष मानील. לכה

ימין ושמאל तूं उजव्याकडे व डाव्याकडे विस्तारिली जाशील व परमेश्वराचा सन्मान राखशील; आणि पेरेसाच्या+ कुळांतील एका मनुष्यामुळें आम्ही आनंद व उल्हास करूं. לכה

בואי בשלום अगे आपल्या नवऱ्याचा मुगुट अ-

* इशाय जो दावीदाचा बाप याच्या कुळांत जन्मलेले माशीयाहकडून.

+ पेरेस जो दावीदाचा पूर्वज होता त्याचे कुळांत जन्मलेले मशीयाहमुळें. रूथ ४.१८.

सणारे, शांतीनें, आनंदानें, हर्षानें व उल्हासानें सत्य व प्रिय लोकांमध्यें ये. अगे नवरे ये ! अगे नवरे ये ! לכה

מזמור שיר ליום השבת गीत ९२

יי מלך गीत ९३

शाब्बाथ नसल्यास कोणी पहिल्यानें एथून आरंभ करितात, परंतु पहिल्यानें אחות קטנה बोलतात.

למנצח על הגתית לאסף गीत ८१

אחות קטנה (हे परमेश्वरा,) धाकटी बहीण+आपली प्रार्थना सिद्ध करून स्तुति करीत आहे; हे देवा, मी विनंती करितों कीं, तिचे रोग तूं बरे कर.

תכלה שנה वर्ष संपलें आहे; आणि त्यांतील शापहि (संपोत)

בנועם מלים मधुर शब्दें करून, आणि जें गायन व जी स्तुति तुलाच शोभते, त्यांकडून ती तुला हाक मारिते; आणि परके तिचें वतन खात आहेत, असें पाहत असतांहि, कोठपर्यंत तूं आपली दृष्टी लपविशील ! תכלה שנה

רעה את צאנך सिंहानें विखरलेल्या तुझ्या शेरडांस तूं चार; आणि (पवित्र नगर) मोडून टाका, असें म्हणणाऱ्यांवर तूं आपला राग ओत; कारण तुझ्या उजव्या हातानें लावलेला मळा त्यांनी लुचाडला व नाशिला आहे. ते तिचीं तान्हींहि राहूं देत नाहींत. תכלה שנה

(הקם משפלות) तिला नीचत्वांतून राज्याधिकारास चढीव, कारण भवासरूप खाचेंत तिचा जीव बुडत आहे, दुष्टाईच्या महत्वामुळें तिचा जीव ओतून (निघून) जातो, आणि अ-

+ शलोमोनाचे गीत ८.८ एथें हें नाव इस्राएल लोकांस दिल्हें आहे.

ति दरिद्रावस्थेंत ती राहत आहे.) תכלה שנה

מתי תעלה तूं आपल्या कन्येला खाचेंतून केव्हां वर चढविशील? बंदिशाळेचें जोकड केव्हां मोडशील? आणि चमत्कार करून तिचा नाश करणाऱ्यांस भस्म करायास व त्यांचा विध्वंस करायास शूराप्रमाणें तूं केव्हां निघशील? תכלה שנה

חילה קבעו अन्य राष्ट्राने तिची संपत्ति हिराहून घेतली, त्यांनी तिच्या उत्तम वस्तू कडून आपणास तृप्त करून घेतलें, आणि तिच्या लुटींतून प्रत्येकाने आपला वांटा घेतला आहे; हें सर्व करून त्यांनी तिचें मन फाडलें असतांहि, तिने आपला मार्ग तुजकडून वळविला नाहीं. תכלה שנה

זמירת שבת जरी तिचें गाणें बंद झालें आहे, तरी ती आपल्या प्रियकराच्या जवळ जाण्याची आवड करिते; तिने आपल्या लग्नांतील प्रीति (पुनः) शोधावी; म्हणून तूं तिच्या जिवास झालेले कष्ट तिच्या मनांतून काढून टाक. תכלה שנה

נחה בנחת शांततेच्या ठिकाणीं तिला हळूहळू ने. कारण पुष्कळ दिवसांपासून ती आपल्या आवडत्या प्रियकरापासून दूर केलेली आहे; आणि जरी अद्याप तिचें फूल पूर्ण वाढलें नाहीं; तरी तिला कळ्या आल्या आहेत (जरी तिचें तारण झालें नाहीं, तरी त्याची तिला आशा लागली आहे.) תכלה שנה

חזקו וגילו तुम्ही धैर्य धरा आणि हर्ष करा, कारण जुलूम बंद झाला आहे; ज्या खडकरूप आश्रयाने तुम्हाबरोबर केलेला करार सांभाळला, त्याची आवड धरा; म्हणजे सडक बांधा, सडक बांधा, असें म्हटल्याप्रमाणें तुम्ही सियोनेस चढून जाल; आशीर्वादांसहित वर्षास आरंभ होवो.

दुसऱ्यादिवशीं वरील गीता बद्दल हें गीत बोलावें.

חון תחון तुजकडे परतणाऱ्या तुझ्या पुत्रांवर तूं दया करच कर, ते भयाने तुजपुढें उभे आहेत; ज्यावेळीं ते त्यायांत

बोलाविले (उभे केले) जातील, त्यांविषयीं त्यांस भय वाटतें, कारण त्यामुळें (त्यांवर) दुःखें आलीं आहेत.

तुला भीणाऱ्यांसाठीं व तुझ्या नामाविषयीं विचार करणाऱ्यांसाठीं न्यायाच्या दिवशीं तूं दया आठीव, आणि निवाडा करण्याच्यासमयीं आपला राग व क्रोध मोड (सोड); तेहि एकवेळ न्यायांत बसणारे* (न्याय करणारे होते.)

(हे देवा) माझ्या मुक्तीचें वर्ष जवळ आणून मला खंडून घे, स्थिरपाण्यावर मला ने, आणि मजकरितां सरळ पुरुषाच्या (याकोबाच्या) पुण्याची आठवण कर; मला तुझ्या मनावर मोहोरीप्रमाणें करून ठेव.

מלך אלהים राष्ट्रांवर देव राजा आहे, देव आपल्या पवित्र सिंहासनावर बसला आहे. अन्य जातींतील कुळीन आब्राहामाच्या देवाच्या लोकांकडे मिळाले, कांकीं पृथ्वींतल्या ढाली देवाच्या; तो फार वरिष्ठ आहे. परमेश्वर सर्व काळ राज्य करितो. हे सीयोने, तुझा देव पिढीपिढी आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचावलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत आणि सर्व इस्राएलांच्या घराण्यांच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन, त्याचें तारण उगवो आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु; त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति, व जी सिद्धि जगांत

* न्यायांत बसणारे यांच्या מדין या इब्री शब्दाच्या मतभेदाविषयीं "पापाच्या क्षमेसाठीं प्रार्थना" या पुस्तकाच्या आरंभीं सूचना आहे त्यांत पाहावें.

गाजविली जाते, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त उंचावलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

ברכו את יי सुवंदित परमेश्वराला तुह्मी धन्य ह्मणा.

हाज्जान वरील वाक्य बोलत असतां मंडळीने हें हळू बोलावें.

ישתבח ויתפאר राजा, राजांच्या राजा आणि पवित्र व धन्य जो, त्याचें नाम स्तविलें आणि गौरविलें जावो. पहिला तोच व शेवटलाहि तोच आणि त्यावांचून कोणी देव नाहीं. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाम सुवंदित व सर्व स्तुति व प्रशंसेपेक्षां अधिक उंचावलेलें असो.

मग मंडळीनें मोठ्यानें हें ह्मणावें.

ברוך יי המבורך सुवंदित परमेश्वर सदांसर्वकाळ धन्य असो.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आपल्या शब्देंकरून संध्याकाळ करणाऱ्या ज्ञानाने (आकाशाचीं) द्वारें उघडणाऱ्या, बुद्धीने ऋतूंस पालटणाऱ्या, वेळ फिरविणाऱ्या, आपल्या इच्छेप्रमाणे ताऱ्यांस आकाशामध्यें त्यांच्या मार्गानें चालविणाऱ्या, दिवस व रात्र उत्पन्न करणाऱ्या, काळोखापुढून उजेड आणि उजेडापुढून काळोख हटविणाऱ्या, दिवस घालवून रात्र आणणाऱ्या, आणि दिवस व रात्र यांमध्यें भेद राखणाऱ्या, तूं धन्य आहेस. ज्याचें नाम सैन्याचा परमेश्वर तो तूंच. हे परमेश्वरा, संध्याकाळ करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אהבת עולם त्वां आपला लोक इस्राएल याच्या घराण्यावर अखंड ममतेने दया केली आहेस. त्वां आह्मास शास्त्र, विधि, नियम व न्याय शिकविले आहेस. यास्तव हे प-

रमेश्वरा, आमच्या देवा, निजतांना व उठतांना आह्मी तुझ्या नियमाचें ध्यान करूं. आणि तुझ्या शास्त्रांतील, विधींतील आणि नियमांतील बोधक गोष्टींविषयीं सर्वकाळ आनंद व उल्हास मानूं; कारण त्या आमचें जीवन व आमच्या आयुष्याचें दीर्घत्व आहेत; त्यांविषयी रात्रंदिवस आह्मी मनन करूं. आणि तूं आपली दया व कृपा आह्मावरून कधींहि काढूनको. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांवर प्रीति करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

שמע ישראל हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे.

हें वाक्य हळू बोलावें.

ברוך שם त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.

ואהבת את יי तर तूं आपल्या सर्व अंतःकरणानें व आपल्या सर्व जिवानें व आपल्या सर्व शक्तीनें आपला देव परमेश्वर यावर प्रीति कर. आणि मी आज तुला ज्या गोष्टी आज्ञेनें सांगतों, त्या तुझ्या ह्रदयांत असाव्या. आणि तूं आपल्या लेंकरांजवळ ह्या पुनः पुनः सांग; आणि आपल्या घरीं बसतांना आणि वाटेवर चालतांना, आणि निजतांना आणि उठतांना यांविषयीं बोलत जा. आणि तूं ह्या आपल्या हातासीं खुणेसाठीं बांध, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं कपाळभूषण अशा असूं दे. आणि आपल्या घराच्या दारांच्या बाह्यांवर व आपल्या दरवाज्यावर त्या लिही.

והיה אם שמוע आणि ज्या आज्ञा मी आज तुम्हास लावून देतों, त्या जर तुम्ही ऐकालच ऐकाल, म्हणजे आपल्या सर्व ह्रदयानें व आपल्या सर्व जिवानें आपला देव परमेश्वर यावर प्रीति कराल, आणि त्याची सेवा कराल. तर असें होईल कीं, मी यथाकाळीं तुमच्या देशाचा पाऊस पहिली व मा-

गली वृष्टि पाडीन; अशाने तूं आपलें धान्य व आपला ताजा द्राक्षरस व आपलें तेल यांचा संग्रह करसील. आणि मी तुझ्या पशूसाठीं तुझ्या कुरणांत गवत वाढवून देईन; असा तूं खाऊन तृप्त होसील. तुम्ही आपणाविषयीं सांभाळा, नाहीं तर तुमचें ह्रदय फसेल; आणि तुम्ही वळून दुसऱ्या देवांची सेवा कराल व त्यांचें भजन कराल. मग परमेश्वर तुम्हावर रागें भरेल. आणि तो आकाशाला असें बंद करील कीं पाऊस होणार नाहीं, भूमिहि आपलें उत्पन्न देणार नाहीं; आणि जो चांगला देश परमेश्वर तुम्हास देतो, त्यांतून तुम्ही लवकर नाहींसे व्हाल. तर तुम्ही ह्या गोष्टी आपल्या ह्रदयांत व आपल्या जिवांत ठेवा, आणि आपल्या हातासीं खुणेसाठीं त्या बांधा, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं कपाळ भूषण अशा असूं द्या. आणि तुम्ही आपल्या लेंकरांस त्या शिकवा; म्हणजे जेव्हां तूं आपल्या घरीं बसतोस, आणि जेव्हां वाटेने चालतोस आणि जेव्हां निजतोस, आणि जेव्हां उठतोस, तेव्हां त्यांविषयीं बोलत जा. आणि आपल्या घरांच्या दारांच्या बाह्यांवर व आपल्या दरवाज्यावर त्या लिही. ह्मणजे जी भूमि परमेश्वराने तुमच्या पूर्वजांजवळ शपथ वाहून त्यांस देऊं केली, तिजवर तुमचे दिवस व तुमच्या लेंकरांचे दिवस पुष्कळ होतील; जसे पृथ्वीवर आकाशाचे दिवस तसे.

" ויאמר " आणि परमेश्वराने मोशेला असें सांगितलें कीं, तूं इस्राएलाच्या संतानाजवळ बोलून त्यांस सांग कीं, त्यांनी आपल्या पिढी परंपरा आपल्यासाठीं आपल्या वस्त्रांच्या कांठांस झालर लावावी, आणि कांठाच्या झालरीस निळा नाडा लावावा. ती झालर तर तुम्हास असी व्हावी कीं, तुम्ही ती पाहून परमेश्वराच्या सर्व आज्ञा आठवाव्या आणि त्याप्रमाणे आचरण करावें, असें कीं ज्यास अनुसरून तुम्ही व्यभिचारी झालां,

म्हणजे आपलें हृदय व आपली दृष्टि त्याच्या मागें जाऊंनये. यासाठीं कीं तुम्ही माझ्या सर्व आज्ञा आठवून पाळाव्या, आणि आपल्या देवासाठीं पवित्र व्हावें. मी परमेश्वर तुमचा देव; ज्याने तुमचा देव असा होण्यासाठीं तुम्हास मिसर देशांतून आणिलें तोच मी परमेश्वर तुमचा देव आहें.

יי אלהכם אמת परमेश्वर तुमचा देव सत्य आहे.

אמת ואמונה हें सर्व सत्य, निःसंशय, आणि आम्हामध्यें स्थापित आहे कीं, तोच आमचा परमेश्वर देव आहे; त्याशिवाय दुसरा कोणी नाहीं; आणि आम्ही इस्राएल त्याचे लोक आहों. आमच्या तारकानें राजांच्या हातांतून आम्हास खंडून काढलें; आमच्या राजाने बलात्काऱ्यांच्या पंज्यांतून आम्हास सोडिवलें. त्याच देवाने आम्हासाठीं आमच्या वैऱ्यांचा सूड घेतला, आणि आमच्या जिवाच्या सर्व शत्रूंस योग्य दंड केला. तो आमचा प्राण वाचवितो, आणि आमचे पाय सरकूं देत नाहीं. त्यानें आम्हास आमच्या शत्रूंच्या उंच स्थानावरून चालविलें, आणि आमच्या सर्व द्वेष्ट्यांवर आमचें शिंग उभारिलें. त्याच देवाने हामाच्या वंशाच्या देशांत चमत्कार व आश्चर्य कर्में करून आम्हासाठीं फारोचा सूड उगविला. त्यानेच आपल्या रागाने मिसरांतील सर्व जेष्ठ पुत्र मारून आपल्या इस्राएल लोकांस निरंतरच्या मोकळीकीकरितां त्यांमधून काढिलें. त्याने आपल्या लेंकरांस सूफ समुद्राच्या विभागांमधून चालऊन त्यांचा पाठलाग व द्वेष करणारांस डोहांत बुडविलें. त्याच्या लेंकरांनी (असा) त्याचा पराक्रम पाहून त्याच्या नामाचें कीर्त्तन व स्तवन केलें, आणि स्वइच्छेने त्याचें राज्य आपणावर मान्य केलें. मोशे व इस्राएलांच्या लेंकरांनी मोठ्या आनंदाने गायन करून एकदांच म्हणाले, हे परमेश्वरा देवांमध्यें तुझ्यासारिखा कोण! पवित्रतेने महान, स्तवण्याविषयीं भयमान,

चमत्कार कर्त्ता असा तुजसारिखा कोण आहे ! हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सर्व लेंकरांनी समुद्र (तिरीं) तुझी राजसत्ता पाहिल्यावरून तुझी स्तुति केली, आणि तुझें राज्य आपणावर मान्य करून म्हणाले, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. आणि असें म्हटलें आहे कीं, परमेश्वराने याकोब उद्धारिला आहे, आणि त्यापेक्षां जो बलवान होता त्याच्या हातांतून त्यास सोडविलें आहे. हे परमेश्वरा, इस्राएलाच्या उद्धारका, तूं धन्य आहेस.

השכיבנו אבינו हे आमच्या बापा, आम्हास शांतीने झोंप लागूं दे; आणि हे आमच्या राजा, चांगल्या जीवनाने व शांतीने आम्हास उठीव. हे आमच्या राजा, तूं आपला सुखाचा मंडप आम्हावर पसरून आपल्या सुबोधाने आम्हास सुधार; तूं आपल्या नामास्तव लौकर आमचें तारण व संरक्षण कर; आणि आपला दयेचा व सुखाचा मंडप आम्हावर पसर. हे परमेश्वरा! आम्हावर, आपल्या सर्व इस्राएल लोकांवर, आणि येरुशालेमावर आपला सुखाचा मंडप पसरणाऱ्या, तूं धन्य आहेस.

शाब्बाथ असल्यास हेहि बोलावें.

ושמרו בני ישראל आणि शाब्बाथ पाळायास इस्राएलाच्या संतानानी त्यांच्या पिढ्यानपिढी शाब्बाथाला सर्वकाळ कराराप्रमाणें मानावें. माझ्या व इस्राएलाच्या संतानांमध्यें ती सर्वकाळ पर्यंत खूण, कारण कीं साहा दिवसांत परमेश्वराने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली, आणि सातव्या दिवशीं स्वस्थ राहून विसांवा घेतला.

शाब्बाथ नसल्यास मात्र हें बोलावें.

וביום שמחתכם आणि तुम्ही आपल्या हर्षाच्या दिवसांत व आपल्या सनांत व आपल्या महिन्यांच्या प्रारंभीं व आपल्या होमांजवळ, व आपल्या शांतिकारक यज्ञाजवळ करणे

वाजवा; म्हणजे ते तुमच्या देवाच्या लक्षांत तुम्हांविषयीं सूचक असे होतील; मी परमेश्वर तुमचा देव आहें.

קדיש לעילה पृष्ठ. ७

हें उभें राहून हळू व एक चित्ताने बोलावें.

אדני שפתי हे प्रभू, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, आब्राहाम, इसहाक व याक़ोब यांच्या देवा, मोठ्या, पराक्रमी, भयंकर व परात्पर देवा, कृपा दाने देणाऱ्या, सर्व पदार्थांच्या धनी, पूर्वजांच्या यथार्थतेची आठवण करणाऱ्या, आणि दयेकरून आपल्या नामाकरितां उद्धारक पाठविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

זכרנו לחיים हे जीवनांत आनंद मानणाऱ्या देव राजा! जीवनाकरितां आमची आठवण कर; हे जीवनाच्या देवा तूं आपणाकरितां आम्हास जीवनाच्या पुस्तकांत लिही. हे, जीवंत देवा, तूं राजा, सहायकर्त्ता, तारक व (आम्हावर) ढालरूप असणारा आहेस. हे परमेश्वरा, आब्राहामाच्या ढालरूप (आश्रया), तूं धन्य आहेस.

אתה גבור हे प्रभू, तूं सर्वकाळ पराक्रमी आहेस! मेलेल्यांस जीवंत करणारा, तारायास समर्थ, दहिंवर पाडणारा, कृपेने प्राणीमात्रांचें पोषण करणारा, बहुत दयेनें मेलेल्यांस जीवंत करणारा, पडलेल्यांस आश्रय देणारा, रोग्यास निरोगी करणारा, बंदिवानांस मोकळें करणारा, आणि धुळींत निजलेल्यांबरोबर आपली सत्यता स्थापन करणारा, तूंच आहेस. हे अद्भुत कृत्यें करणाऱ्या, तुजसारिखा कोण! आणि हे राजा, मारणाऱ्या, जी-

वंत करणाऱ्या व तारण उगीवणाऱ्या, तुझी बरोबरी कोण करूं शकेल !

מי כמוך हे दयाळू बापा, दयेने प्राणीमात्रांची जीवना करितां आठवण करणाऱ्या, तुजसारिखा कोण आहे ! आणि मेलेल्यांस जीवंत करणारा तूं सत्य आहेस. हे परमेश्वरा, मेलेल्यांस जीवंत करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

पाहाटेची प्रार्थना (शाहरीथ) आणि प्रार्थना रूप नैवेद्य (मिनहा) यांमध्यें मात्र मोठ्याने बोलतांना हें बोलावें.

נקדישך जसी पवित्र सेराफीमाची मंडळी, जें तुझ्या भविष्य वाद्याच्या हाताकडून लिहिलें आहे कीं, ते एकमेकाला मोठ्यानें बोलत म्हणाले "पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे;" याप्रमाणे तीन वेळ तुझी पवित्रता गाजविते, त्याप्रमाणे आम्ही तुला पवित्र मानूं आणि तुझें भय धरूं. त्यांच्या समोर जे असतात, ते स्तुति करून असें म्हणतात कीं, त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. आणि तुझ्या पवित्र वचनामध्यें असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सीयोने, तुझा देव पिढोपिढीं आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

אתה קדוש तूं पवित्र आणि तुझें नामहि पवित्र आहे; आणि धार्मिक मनुष्यें नित्य तुझें स्तवन करितात.

לדור ודור पिढोपिढीं तुम्ही देवाचें राज्य मान्य करा; कारण तो एकटाच महान व पवित्र आहे.

ובכן יתקדש यास्तव हे परमेश्वरा ! आमच्या देवा, तुझ्या इस्राएल लोकांमध्ये तुझें नाम पवित्र मानिलें जावो.

ובכן תן פחדך यास्तव हे परमेश्वरा ! आमच्या देवा, तूं आपल्या सर्व कामावर आपलें भय, जें सर्व त्वां उत्पन्न केलें आहेस त्यावर आपला त्रास घाल, म्हणजे सर्व कर्में तुला भि-

तील आणि सृष्टींतील सर्व पदार्थ तुजपुढें नमन करितील; आणि पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां ते एक मेळा करितील. कारण आम्ही जाणतों कीं, राज्य तुलाच (शोभतें); सामर्थ्य तुझ्या हातीं, व पराक्रम तुझ्या उजव्या हातीं आहे; आणि सर्व उत्पन्न केलेले पदार्थांस तुझें नाम भयंकर आहे.

ובכן תן כבוד यास्तव लवकर व आमच्या आयुष्याच्या दिवसांत तूं आपल्या लोकांस मोठेपणा दे; आपल्या भिणाऱ्यांची प्रशंसा कर, आपल्या शोधणाऱ्यांस चांगली आशा व आपली वाट पाहाऱ्यांस भरंवसा दे, आपल्या देशास आनंदित कर; आपल्या नगरास हर्षित कर, आपला सेवक दावीद याचें शिंग उगीव (उभार) आणि इशायाचा पुत्र माशीयाह याचा दिवा सिद्ध (प्रकाशित) कर.

ובכן צדיקים यामुळें पुण्यवान पाहून आनंद करितील, यथार्थ हर्ष करितील, आणि धार्मिक उल्हासाने गातील; परंतु पापाचें तोंड बंद होईल, दुष्टाई धुराप्रमाणे नाहींसी होईल; कारण दुष्कर्माचा अधिकार तूं पृथ्वींतून काढून टाकिशील.

ותמלוך אתה मग हे परमेश्वरा आमच्या देवा, तूं आपल्या सर्व कृत्यांवर सियोन डोंगर जें तुझ्या गौरवाचें वसतिस्थान आणि यरूशालेम जें तुझें पवित्र नगर, त्यांमध्यें लवकरच राज्य करिशील. तुझ्या पवित्र वचनांतहि तसेंच लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

קדוש אתה तूं पवित्र आहेस, आणि तुझें नामहि भयंकर आहे, आणि तुजवाचून दुसरा कोणी देव नाहीं; आणि लिहिलेलेंहि तसेंच आहे कीं, सैन्याच्या परमेश्वर नीतीनें उंचावेल, आणि देव जो पवित्र त्याला न्यायाने पवित्र मानितील. हे परमेश्वरा पवित्र राजा, तूं धन्य आहेस !

אתה בחרתנו त्वां आम्हास सर्व लोकांतून निवडून घेतलें, आम्हावर प्रीति करून व आम्हास प्रसन्न होऊन सर्व भाष्यांपेक्षां (जातींपेक्षां) आम्हास उंचाविलें; आपल्या आज्ञा करून आम्हास पवित्र केलें, हे आमच्या राजा, आपली सेवा करण्याकरितां आम्हास जवळ घेतले, आणि तुझें मोठें व पवित्र नाम आम्हास दिल्हें आहे.

शनवार संध्याकाळ असल्यास हें बोलावें.

ותודיענו हे परमेश्वरा, आमच्या देवा, त्वां आपले यथार्थ न्याय आम्हास समजाविले; तुझ्या इच्छेचे नियमाप्रमाणे वर्त्तायास त्वां आम्हांस शिकविलें; प्रीतीने त्वां आपले सरळ न्याय, सत्य शास्त्र, व चांगले नियम व आज्ञा आम्हास दिल्हा; त्वां आम्हास (नेमलेले) हर्षयुक्त वेळ, पवित्र सण, व स्वसंतोषाच्या पर्वणी, यांचें वतन दिल्हें; शाब्बाथाची पवित्रता, सणाचे महात्म व पर्वणीचा समारंभ यांचे आम्हास धनी केले; आणि त्वां शाब्बाथाच्या पवित्रते मध्यें व (सणाच्या) सुदिनाच्या पवित्रतेमध्यें भेद केला; काम करायाच्या साहा दिवसांपासून सातव्या दिवसास पवित्र राखिलें; आणि आपल्या पवित्रते करून आपले लोक इस्राएल यांसहि पवित्र व निराळें केलें आहे.

ותתן לנו आणि हे परमेश्वरा, प्रीति भावेंकरून तूं आम्हास (शाब्बाथ असल्यास हा शाब्बाथ दिवस व) हा स्मरणाची दिवस, हा पवित्र मेळामिळण्याचा सुदिन; गजराचा दिवस (शाब्बाथ असल्यास गजर आठविण्याचा दिवस) जो मिसरांतून निघण्याच्या आठवणीकरितां प्रीतिरूप पवित्र मेळा तो; दिल्हा आहेस.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची, आमच्या पूर्वजांची, तुझ्या

यरूशालेम नगराची, तुझा सेवक दावीद याचा पुत्र जो माशीयाह त्याची, आणि तुझे सर्व लोक इस्राएलांचें घराणें, यांची आठवण या (शाब्बाथ असल्यास शाब्बाथ दिवशीं व) या स्मरणाच्या दिवशीं, या पवित्र मेळामिळण्याच्या सुदिनी, यशस्वी तारणाकरितां कृपेने, दयेने व ममतेने तुजपुढें चढो, येवो, पोंहोचो, पाहिली जावो, मान्य होवो, ऐकिली जावो, लक्षांत आणिली आणि आठविली जावो. आम्हावर दया करण्यास व आमचें तारण करण्यास; हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचें कल्याण होण्याकरितां आमची आठवण कर; आम्हावर आशीर्वाद होण्याकरितां आम्हास दर्शन दे; आम्हास चांगलें जीवन प्राप्त होण्याकरितां आमचें तारण कर; तारणाच्या व दयेच्या वचनानें आम्हास राख, आम्हावर कृपा कर, आमची करुणा येऊंदे, आम्हावर दया कर आणि आम्हास तार, कारण तूंच दयाळू व कृपाळू देवराजा आहेस; म्हणून आमचे डोळे तुजकडे लागले आहेत.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, सर्व जगावर तूं आपल्या गौरवानें राज्य कर; आपल्या वैभवाने सर्व पृथ्वीवर थोर मानिला जा; आणि आपल्या सामर्थ्याच्या महत्वाने भूमंडळाच्या, राहाणाऱ्यांवर प्रकाशीत हो; मग सर्व उत्पन्न केलेले (पदार्थ) जाणतील, कीं त्वां त्यांस उत्पन्न केलें; सर्व घडविलेले (पदार्थ) जाणतील, कीं त्वां त्यांस घडिलें; आणि ज्यांच्या नाकपुड्यांत स्वास आहे, ते म्हणतील कीं, इस्राएलांचा परमेश्वर देव राज्य करितो; आणि त्याचा अधिकार सर्वांवर चालतो.

קדשנו במצותיך तूं आपल्या आज्ञांकडून आम्हास पवित्र कर; तुझें शास्त्र आमचें वतन होऊंदे; आपल्या चांगुलपणाकडून आम्हास तृप्त कर; आपल्या तारणाकडून आमचा

जीव आनंदित कर; तुझी सेवा सत्याने करायास आमचीं मनें शुद्ध कर; कारण तूं (स्वतां) सत्य परमेश्वर देव आहेस; आणि हे आमच्या राजा, तुझें वचन सर्वकाळ सत्य व स्थापित आहे. हे परमेश्वरा, सर्व पृथ्वीच्या राजा, (शाब्बाथ असल्यास शाब्बाथास व) इस्राएलांस व या स्मरणाच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

רצה יי אלהינו हे परमेश्वरा आमच्या देवा, तूं आपल्या इस्राएल लोकांस प्रसन्न हो; त्यांची प्रार्थना मनावर घे; आपल्या घराच्या प्रसाद स्थानी पूजन पुनः चालू कर; इस्राएलांचीं अर्पणें व त्यांची प्रार्थना लवकर आवडीने मान्यकर; आणि तुझ्या इस्राएल लोकांची भक्ति तुला आवडो.

ואתה ברחמך הרבים तूं आपल्या बहुत दयेने आम्हाविषयीं संतोषित होऊन आम्हास प्रसन्न हो; मग आमचे डोळे, तुला कृपेकरून सियोनेकडे फिरताना पाहतील. हे परमेश्वरा ! आपला शेखीना* सियोनेमध्यें पुनः स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

מודים אנחנו לך

सदांसर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव जो तूं, तुलाच आम्ही स्तवितों.÷ तूं आमचा व आमच्या जीवांचा खडकरूप आश्रय, व आमच्या तारणाची ढाल आहेस. आमचा जीव तुझ्या

מודים דרבנן

सदासर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव, सर्व मांसमयांचा देव, आमचा व प्रारंभीं (पृथ्वीचा) घडणारा जो तूं, तुलाच आम्ही स्तवितों. त्वां आम्हास जीवंत राखिलें व आम्हास रक्षिलें,

* साक्षात्कार.

÷ स्तवितों याच्या इथीं מודים शब्दाचा अर्थ कोणी अधिकार मान्य करितों असाहि करितात;

हातीं सोंपिलेला आहे, आमचा आत्मा तुझ्या स्वाधीन आहे; तुझे चमत्कार आम्हामध्यें नित्य केले जातात, आणि तुझी आश्चर्य कर्त्यें व तुझा चांगुलपणा आम्ही संध्याकाळीं, सकाळीं व दोन प्रहरीं अनुभवितों; त्यांकरितां आम्ही पिढोपिढीं तुझें कीर्तन करूं व तुझे स्तुतीचें वर्णन करूं. तूं चांगला आहेस, कारण तुझी दया (आम्हावरून) नाहींसी होत नाहीं.; तूं कृपाळू, कारण सर्व काळ आम्ही तुजवर आशा ठेवितों, म्हणून तुझी कृपा आम्हावरून सरत नाहीं.

म्हणून आम्ही तुझ्या मोठ्या व पवित्र नामास धन्य म्हणतों व (त्याचें) स्तवन करितों. आणि आम्ही तुझे नियम पाळावे, तुझी इच्छा पूर्ण करावी, आणि पूर्ण मनाने तुझी सेवा करावी, म्हणून (आम्ही विनंती करितों कीं) त्याचप्रमाणें आम्हास जीवंत राख, आम्हावर दया कर, आणि आपल्या मंदिरीं आमच्या पाडाव करून नेलेल्यांस एकवट कर; कीं यावरून, हे सुवंदित व धन्य देवा आम्ही तुझी स्तुति करावी.

ועל כלם יתברך हे आमच्या राजा, या सर्व (दयेवरून) तुझें नाम अखंडित व सर्वकाळ धन्य म्हटलें, उंचावलें व वर्णिलें जावो. आणि सर्व प्राणी तुझे स्तवन करोत. सेलाह. तूं आपल्या कराराच्या लेंकरांस चांगल्या जीवनाकरितां लिही.

ויהללו ויברכו मग हे आमच्या तारणाच्या व सहायकारी देवा, आणि हे उत्तम देवा, ते सर्वकाळ तुझ्या मोठ्या नामास सत्यतेने स्तवितील; आणि धन्य म्हणतील. कारण तें चांगलें आहे. सेलाह. हे परमेश्वरा ! तूं धन्य आहेस, चांगलें तुझें नाम आणि स्तवन तुलाच शोभतें.

पांहाटेच्या प्रार्थनेमध्यें मात्र हें बोलावें,

אלהנו ואלהי אבותנו हे आमच्या देवा, आमच्या पूर्वजांचा देवा, जो तिप्पट आशीर्वाद, तुझा सेवक मोशे याच्या हाताकडून शास्त्रांत लिहिला आहे, आणि जो आहारोन व तुझे पवित्र लोक त्याचे पुत्र, हे उच्चारीत असत, कीं "परमेश्वराने तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वराने आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वराने आपली दृष्टि तुजवर लावून तुझें कल्याण करावें. तसें त्यानी माझें नाव इस्राएलाच्या संतानावर लावावें, ह्मणजे मी त्यांस आशीर्वाद देईन"; तो आशीर्वाद तूं आह्मास दे.

שים שלום (हे परमेश्वरा,) आह्मावर व तुझ्या सर्व इस्राएल लोकांवर चांगलें, आशीर्वाद, जीवन, दया, कृपा, यथार्थता व ममता असूं दे; आणि हे आमच्या बापा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मां सर्वांस एकमेळीं आशीर्वाद दे; कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मास शास्त्र व जीवन, प्रीति व दया, यथार्थता व कृपा, आशीर्वाद व शांति दिल्ही आहेस. आणि आह्मास व तुझ्या सर्व इस्राएल लोकांस मोठा सामर्थ्यरूप व कल्याणयुक्त आशीर्वाद देण्यास तुझ्या दिसण्यांत चांगलें असो.

पांहाटेच्या प्रार्थनेमध्यें व प्रार्थनारूप नैवेद्यामध्यें मोठ्यानें बोलतांनां हें बोलावें.

ואתם הדבקים आणि जे तुह्मी तुमचा परमेश्वर याला लगटून राहिलां, ते तुह्मी सर्व आजपर्यंत जीवंत आहां (असें आह्माविषयीं ह्मटलें आहे, त्याप्रमाणें;) आज तूं आह्मास सदृढ कर. आज आह्मास आशीर्वाद दे, आज आह्मास मोठे कर, आज आमचा झेंडा उभार, आज आह्मास गौरवयुक्त कर, आज आह्मास चांगल्या मंडळीमध्यें मिळीव, आज आह्मास दृढ कर, आज आह्मास जीवदान दे, आज आह्मावर दया कर,

आज आह्मास आमच्या पापापासून शुद्ध कर, आज आमचे मार्ग निटाव, आज आह्मास कीर्तीनें मुगुट मंडित कर, आज आह्मास ज्ञानी कर, आज आह्मास सोडीव, आज आह्मास उंचाव, आज आमचें सहाय कर, आज आह्मास शुशोभित कर, आज जीवनाकरितां आम्हास दर्शन दे, आज आह्मास यथार्थ कर, आज आह्मास तुझी सेवा करायास जवळ घे, आज आह्मावर दया कर, आज आमची प्रार्थना ऐक, (आज आह्मावर दया, कृपा व ममता कर,) आज आह्मास चांगल्या जीवनाकरितां लिही.

ובספר חיים आणि आम्ही व तुझे सर्व इस्राएल लोक हे चांगल्या जीवनाकरितां व कल्याणाकरितां, जीवनाच्या, आशीर्वादाच्या, कल्याणाच्या, चांगल्या अन्नसामग्रीच्या, तारणाच्या, समाधानाच्या व चांगल्या निवाड्याच्या पुस्तकांत तुजपुढें आठवण होऊन लिहिले जावोत.

ברוך אתה हे परमेश्वरा; आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

मोठ्यानें बोलतांना मात्र एथपर्यंत बोलावें.

יהיו לרצון हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें आणि माझ्या ह्रदयांतलें ध्यान मान्य होवो.

मोठ्यानें म्हणतांना हें बोलूं नये.

אלהי נצור हे माझ्या देवा, माझी जीभ वाईटापासून, आणि माझे ओंठ कपटी भाषणापासून राख. हे माझ्या जीवा, जे कोणी मला शाप देतात, त्यांविषयीं तूं मौन्य धर. आणि माझा जीव सर्वांपुढें धुळी प्रमाणे (नम्र) होवो. माझ्या जीवानें तुझ्या आज्ञांप्रमाणे चालावें, म्हणून माझे मन तूं आपल्या शास्त्राकडे उघड (लाव), आणि जे कोणी माझ्या वाईटावर उठतात त्यांचे विचार लवकर मोडून त्यांचा कुकल्पनाचा नाश कर;

असें तूं आपल्या नावाकरितां, आपल्या उजव्या हाताकरितां (पराक्रमाकरितां), आपल्या शास्त्राकरितां, आपल्या पवित्रते करितां तसें कर. तुझा प्रियमुक्त व्हावा; म्हणून तूं आपल्या-उजव्या हाताने मला तार व मला उत्तर दे. हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, व माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें व माझ्या हृदयांतील ध्यान मान्य होवो.

עושה שלום जो उंच (आकाशांत) शांति राखितो, तो दयेने आम्हास व सर्व इस्राएल लोकांस शांति देवो. आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

शनवार असल्यास हें बोलावें

ויכלו השמים तसें आकाश व पृथ्वी व त्यांतील सर्व समुदाय, हीं समाप्त झालीं. मग देवाने आपलें जें काम केलें होतें त्यापासून तो सातव्या दिवशीं थांबला; आणि आपलें सर्व जें काम केलें होतें त्यापासून सातव्या दिवशीं स्वस्थ राहिला. आणि देवाने सातव्या दिवसाला आशीर्वाद दिल्हा आणि त्याला पवित्र केलें, कारण कीं त्यांत आपलें जें उत्पत्तीचें काम त्यापासून स्वस्थ राहिला.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, आब्राहामाच्या देवा, इसहाकाच्या देवा व याकोबाच्या देवा, मोठ्या, पराक्रमी व भयंकर देवा, परात्पर देवा, दयेने आकाश व पृथ्वी यांवर धनीपणा चालविणाऱ्या, तूं धन्य आहेस. तो आमच्या पूर्वजांची ढाल, आपल्या आज्ञेकडून मेलेल्यांस सजीव करणारा, ज्यासारिखा दुसरा नाहीं असा पवित्र राजा, आपल्या लोकांस आपल्या शाब्बाथदिवशीं विश्रांति देणारा असा आहे; कारण त्यांस विश्रांति देण्यास त्यास हर्ष झाला. त्याचें आम्ही भयाने व त्रासाने भजन करूं; आणि त्याचें नाम प्रतिदिवशीं अखंडित स्तवूं. तो आशीर्वादांचा उगम, पुष्कळ स्तुतीस योग्य,

शांतीचा स्वामी,, शाब्बाथास पवित्र करणारा, सातव्या दिवसास आशीर्वाद देणारा आणि उत्पत्तीच्या कृत्यांच्या आठवणीकरितां हर्षाने तृप्त झालेले लोकांस पवित्रतेने विसावा देणारा आहे.

אלהינו ואלהי אבתינו हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या विसाव्यामुळें तूं प्रसन्न हो; आपल्या आज्ञाकडून आम्हास पवित्र कर; आपल्या शास्त्रांत आमचा विभाग राखून ठेव; आपल्या चांगुलपणाकडून आम्हास तृप्त कर; आपल्या तारणाकडून आमचा जीव हर्षित कर; सत्येतेने तुझी सेवा करावी म्हणून आमचीं मनें शुद्ध कर; आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा पवित्र शाब्बाथ आम्हास वतन करून दे, असा कीं तुझें नाम पवित्र मानणाऱ्या सर्व इस्राएलांनी त्यांत स्वस्थ राहावें. हे परमेश्वरा! शाब्बाथास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचाविलें, आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरव युक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरव युक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोरमानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुह्मीहि तथास्तु असें म्हणा.

תתקבל צלותהון सर्व इस्राएलांच्या घराण्याची प्रार्थना व काकलूत, आकाश व पृथ्वींतील त्यांच्या बापापुढें मान्य होवो. आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

יהא שלמא आणि आकाशांतून आम्हास व सर्वे इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आम्हास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

शाब्बाथ असेल तर १५० वें गीत व हें गीतहि बोलण्याची चाल आहे.

מזמור לדוד יי רעי गीत २३

הללויה गीत १५०

לדוד מזמור ליי गीत २४

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचाविलें आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर व थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु, त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरव युक्त असो. आणि जो अशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरव युक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

יהא שלמא आकाशांतून आम्हास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार, आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुम्ही तथास्तु म्हणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आह्मास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

ברכו את יי सुवंदित परमेश्वराला तुह्मी धन्य ह्मणा.

ברוך יי המבורך सुवंदित परमेश्वर सदासर्वकाळ धन्य असो.

עלינו לשבח आह्मी सर्वांच्या प्रभुची स्तुति करावी; आणि प्रारंभी (पृथ्वी) घडणाऱ्यास थोर मानावें (हा आमचा मुख्य धर्म होय;) कारण त्याने आह्मास जगांतील राष्ट्रांप्रमाणें केलें नाहीं, आणि पृथ्वींतील कुलांप्रमाणें आह्मास ठेविलें नाहीं, त्यांच्या वांट्याप्रमाणें वांटा आणि त्यांच्या समुदायांच्या भाग्याप्रमाणें आमचें भाग्य करून ठेविलें नाहीं. ते व्यर्थतेस व शून्यास नमन करितात; आणि जो देव तारीत नाहीं त्यास प्रार्थितात. परंतु राजांचा राजा, जो पवित्र व धन्य, ज्याने आकाश पसरिलें व पृथ्वीचा पाया घातला, ज्याच्या गौरवाची वस्ति वरील आकाशांत आणि ज्याच्या सामर्थ्याचें वैभव उंचांत आहे, त्यास आह्मी नमन करितों. तोच आमचा देव, आणि दुसरा कोणी नाहीं; आमचा राजा सत्य आणि त्यावांचून कोणी नाहीं; जसें शास्त्रांत लिहिलें आहे कीं, आणि आज तुह्मी जाणून आपल्या ऱ्हदयीं असें ठसवून घ्या कीं, वरतीं आकाशांत आणि खालतीं पृथ्वीवर परमेश्वर तोच देव आहे, दुसरा कोणी नाहीं.

על כן נקוה לך यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या सामर्थ्याच्या गौरवाने पृथ्वींतून ओंगळपणा काढून टाकावा, मूर्ति छेदून टाकाव्या, सर्व समर्थाच्या राज्याखालीं पृथ्वी स्थापन व्हावी, सर्व मासमयांच्या संतानांनी तुझ्या नामाने हाक मारावी, पृथ्वींतील सर्व दुष्टांनी तुजकडे फिरावें, आणि सर्व

गुडघें तुजपुढेंच नमावें आणि सर्व जिव्हांनीं तुजविषयींच शपथ वाहावी, असें आहे; ह्मणून पृथ्वीवरील सर्व राहणारे तुलाच ओळखतील व जाणतील; असें लवकर पाहाण्यास आह्मी आवड धरितों. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुजपुढेंच ते नमतील व नमस्कार करितील; तुझ्या नामाच्या गौरवाचा आदर करितील; आणि सर्व तुझ्या राज्याचें जोकड (राज्याधिकार) मान्य करितील. यास्तव तूं लवकर त्यावर सर्वकाळचें राज्य कर. कारण राज्य तुझेंच आहे; तूंच सर्वकाळ गौरवानें राज्य करिशील; जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं, परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील; आणि ह्मटलें आहे कीं, आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्या समयीं एकच परमेश्वर होईल आणि त्याचें नाम एकच.

יִגְדַּל אֱלֹהִים חַי जीवंत देव थोर मानिला व स्तविला जाईल. तो आहेच आणि त्याच्या अस्तित्वास काळरूप शिमा नाहीं. तो एकच आहे, आणि त्याच्या एकत्वासारिखें दुसरें एकत्व नाहीं. तो अदृश्य आहे; आणि त्याच्या एकत्वासहि अंत नाहीं. त्यास शरीराकृति नाहीं व शरीरहि नाहीं; त्याचे पवित्रतेची बरोबरी (कोणीच) करूं शकत नाहीं. तो सर्व निर्माण केलेल्या पदार्थांच्या पूर्वींचा आहे. तोच पहिला आणि त्याच्या मूळास आरंभ नाहीं. पाहा, तो जगाचा स्वामी सर्वांस घडणारा आहे; तें त्याचें महत्व व त्याचा अधिकार दाखवितें. त्यानें आपल्या भविष्य कथनाची प्रेरणा आपल्या संपत्तिरूप आणि महत्ववान मनुष्यांस दिल्ही. ज्यानें त्याचें गौरव पाहिलें, त्या मोशे सारिखा इस्राएलांत कोणी दुसरा भविष्यवादी उठला नाहीं. देवानें आपल्या लोकांस, आपला भविष्यवादि व आपल्या घरचा विश्वासू याच्या हातून सत्य नियम शास्त्र दिल्हें आहे. देव आपल्या या नियमाशिवाय दुसरा लाऊन देण्याकरितां कधींहि

पालटणार आणि बदलणार नाहीं. तो आमचीं सर्व गुह्यें पाहतो व जाणतो; सर्व पदार्थांचा शेवट तो पूर्वींच लक्षांत आणितो. धार्मिक मनुष्याची फेड त्याच्या कर्माप्रमाणे करितो. आणि दुष्टास त्याच्या दुष्टाईप्रमाणे शासन करितो. त्याच्या तारणाच्या वेळेची वाट पाहणाऱ्यांस खंडून घेण्याकरितां शेवटल्या दिवशीं तो आमच्या माशीयाहस पाठवील. देव आपल्या बहुत दयेने मेलेल्यांस जीवंत करील; त्याचें स्तुत्य नाम सदासर्वकाळ धन्य असो. हीं तेरा मूळतत्त्वें देवाच्या नियमाचा व त्याच्या शास्त्राचा पाया आहेत.

वर्षप्रतिपदेचें पवित्रकरण.

शाब्बाथ असल्यास पहिल्याने יום הששי ויכלו השמים पृष्ठ २३ हें बोलावें आणि शाब्बाथ नसल्यास खालीं लिहिलेल्या वाक्यापासून बोलावें.

סברי מרנן * (गुरुच्या मताप्रमाणें).÷

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, द्राक्ष फळें उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, ज्याने लोकांमधून आम्हास निवडून घेतलें, आणि सर्व भाष्यांपेक्षां (राष्ट्रांपेक्षां) आम्हास उंच केलें, आणि आपल्या आज्ञाकडून आम्हास पवित्र केलें, तो तूं धन्य आहेस. आणि परमेश्वरा आमच्या देवा प्रीती भावेंकरून तूं आम्हास, (शाब्बाथ असल्यास हा शाब्बाथ दिवस व) हा स्मरणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन, गजराचा दिवस, (शाब्बाथ असल्यास गरज आठविण्याचा दिवस) जो मिसरांतून निघण्याच्या

---

* टीका. २

÷ या दोन शब्दाचा अर्थ कोणी अहो स्वामी तुमच्या आज्ञेवरून असाहि करितात.

आठवणीकरितां (शाब्बाथ असल्यास प्रीतिरूप) पवित्र मेळा, तो दिल्हा आहेस. आणि हे आमच्या राजा, तुझें वचन सर्व काळ सत्य व स्थापित आहे. हे परमेश्वरा, सर्व पृथ्वीच्या राजा, (शाब्बाथ असल्यास शाब्बाथास व) इस्राएलांस व या स्मरणाच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

בָּרוּךְ אַתָּה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास या वेळेपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

शनवार संध्याकाळ असल्यास שֶׁהֶחֱיָנוּ बोलल्या पूर्वी हें बोलावें.

בָּרוּךְ אַתָּה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, अग्नीपासून प्रकाश उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

בָּרוּךְ אַתָּה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, पवित्र व अपवित्र, उजेड व काळोख, इस्राएल व (दुसरे) लोक, सातवा दिवस व काम करायाचे साहा दिवस, यांमध्यें भेद राखणाऱ्या तूं धन्य आहेस. त्वां शाब्बाथाच्या पवित्रतेमध्यें व सुदीनाच्या पवित्रतेमध्यें भेद केला, काम करायाच्या साहा दिवसांपेक्षां सातव्या दिवसास पवित्र करून त्यांमध्यें भेद केला, आणि त्वां आपल्या पवित्रतेकडून आपल्या इस्राएल लोकांस पवित्र केलें आहे. हे परमेश्वरा, (एक) पवित्र (गोष्टीमध्यें व दुसऱ्या) पवित्र (गोष्टीमध्यें) भेद करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

בָּרוּךְ אַתָּה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास यावेळपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

पहिल्या रात्रीं जेवणापूर्वीं पुढें सांगितलेले पदार्थांवर देवा पुढें चांगली आठवण व्हावी म्हणून पुढील वाक्यें बोलावीं.

सफरदलाचा मुरब्बा.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, पहिल्यापासून शेवटपर्यंत चांगलें व सुखावह वर्ष आम्हावर चालू व्हावें, असी तुझी प्रसन्नता होवो.

काराते (दनदना)

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझे शत्रु व तुझा द्वेश करणारे आणि आमचे वाईट इच्छिणारे छेदले जावे अशी तुझी प्रसन्नता होवो. (मग हें बोलावें) तुझा हात तुझ्या शत्रूंवर उंचावेल, आणि तुझे सर्व वैरी नाश पावतील.

(बीट)

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजाच्या देवा, तुझे शत्रु व द्वेष करणारे आणि आमचें वाईट इच्छिणारे दूर व्हावे, असी तुझी प्रसन्नता होवो. (मग हें बोलावें.) अहो सर्व दुष्टकर्मी, मजपासून दूर जा, परमेश्वराने माझ्या रडण्याचा शब्द ऐकिला आहे. तेथून निघून जा, निघून जा मलिनास शिवूं नका; तिच्या मध्यांतून जा; जे तुम्ही परमेश्वराचीं पात्रें वाहतां ते तुम्ही पवित्र असा.

खजूर.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझे शत्रु व द्वेष करणारे, आणि आमचें वाईट इच्छिणारे संपावे, असी तुझी प्रसन्नता होवो. (मग हे बोलावें) पापी पृथ्वींतून संपतील; दुष्ट नाहींसेच होतील. हे माझ्या जीवा, तूं परमेश्वराची स्तुति कर, तुम्ही परमेश्वराला स्तवा. आ-

णि आपल्या दयेनें माझ्या शत्रूंचा संहार; आणि माझ्या जिवाच्या सर्व वैऱ्यांचा नाश कर; कारण कीं मी तुझा सेवक आहे.

दुध्या.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या न्यायाच्या शिक्षेचा हुकूमनामा फाडून आमचें पुण्य तुजपुढें बोलाविलें जावें, असी तुझी प्रसन्नता होवो.

मच्छ.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमचें पुण्य वाढावें, असी तुझी प्रसन्नता होवो.

कोकराचें डोकें.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आम्ही डोकें व्हावें परंतु पुच्छ न व्हावें (आम्ही श्रेष्ठ व्हावें परंतु कनिष्ठ न व्हावें) असी तुझी प्रसन्नता होवो. आणि इसहाकाच्या एडक्याची तूं आम्हाकरितां आठवण कर.

कीर्त्तन.

אלהי נשמה हे माझ्या देवा! जो जीव त्वां मजमध्यें दिल्हा आहे, तो शुद्ध आहे; त्वां त्यास उत्पन्न करून व घडवून मजमध्यें फुंकिला, आणि तूंच त्यास मजमध्यें राखितोस; आणि पुढें तूंच त्यास मजपासून घेशील; आणि उत्तरकाळीं मजमध्यें परत आणिशील. जोंपर्यंत मजमध्यें जीव आहे, तोंपर्यंत हे परमेश्वरा माझ्या देवा, व माझ्या पूर्वजांच्या देवा, तूं सर्व कृत्यांचा धनी, व सर्वप्राण्याचा स्वामी आणि सर्वसृष्टीचा सतत जीवंत व निश्चल असणारा सत्ताधारी आहेस, असा मान्य करितों.

हे परमेश्वरा, मेलेल्यांचे प्रेतांत पुनः जीव घालणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हेपरमेश्वरा ! आमच्या देवा जगताच्या राजा, दिवस व रात्र यांमधील भेद जाणण्यास कोंबड्यास बुद्धि देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, आंधळ्यास दृष्टि देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, बंदिवानास मोकळें करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, ओणव्यांस उभे करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, नागव्यांस वस्त्र नेसविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हे परमेश्वरा! आमच्या देवा जगताच्या राजा, थकलेल्यांस शक्ति देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हे परमेश्वरा आमच्या देवा, जगताच्या राजा पाण्यावर पृथ्वी विस्तारणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, मनुष्याचीं पावलें स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, आमच्या गरजा पुरविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, इस्राएलांस पराक्रमाकडून वेष्टिणाऱ्या, तूं धन्य आहेस.

'' ברוך אתה '' हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, इस्राएलास सुंदरपणाने सुशोभित करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, मला मूर्तिपूजक न करणाऱ्या (स्त्रीने ह्मणावें मला मूर्तिपूजनारीण न करणाऱ्या) तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, मला दास न करणाऱ्या (स्त्रीने ह्मणावें. मला दासी न करणाऱ्या) तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, मला स्त्री न करणाऱ्या (स्त्रीने ह्मणावें, मला आपले इच्छेप्रमाणें करणाऱ्या) तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, आमच्या डोळ्यांवरून झोंप व आमच्या पापण्यावरून निद्रा घालविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

ויהי רצון आणि हे परमेश्वरा! आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन तूं आह्मास तुझ्या शास्त्राभ्यासास लाव; तुझ्या आज्ञांस चिकटून राहावीव; आह्मास पापांत, उल्लंघनांत, मोहांत व धिक्कारांत पडूं देऊं नको. आह्मास कुकल्पनापासून दूर राखून सद्विचारास लगटून राहावीव; आणि तुझ्या दिसण्यांत व जे कोणी आह्मास पाहून आह्माबरोबर परोपकार बुद्धीने वर्ततात, त्यांच्या दिसण्यांत आह्मास प्रीति, अनुग्रह, दया व कृपा मिळूं दे. हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा, इस्राएलांस कृपा दाने देणाऱ्या, तूं धन्य, आहेस.

יהי רצון हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी प्रसन्नता होऊन आज व प्रत्येक दिवशीं तूं आह्मास निष्ठुरता, निलाजरेपणा, वाईट मनुष्य, वाईट स्त्री कुकल्पना, वाईट मित्र, वाईट शेजारी, अरिष्ट, पापदृष्टि, वाईट जिव्हा, चाहाडी, खोटी साक्ष, मनुष्य मात्रांचा द्वेष करणे, कुभांड, अपघात,

वाईट रोग, अनर्थ, व कठोर न्याय यांपासून; आणि कराराचा पुत्र* असून किंवा कराराचा पुत्र नसून जो कठोर न्यायाधीश, यापासून व नरकाच्या दंडापासून आह्मास सोडीव.

ברוך אתה יי हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मास आपल्या आज्ञां कडून पवित्र करणाऱ्या व शास्त्राविषयीं आह्मास आज्ञा देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

והערב נא हे परमेश्वरा, आमच्या देवा, आह्मी विनंती करितों कीं, तुझ्या शास्त्रांतील गोष्टी आमच्या व तुझे लोक इस्राएलांचें घराणें, यांच्या तोंडांस मधुर लागाव्या; आणि आह्मी, आमच्या लेंकरांनी व आमच्या लेंकरांच्या लेंकरांनी तुला जाणून शास्त्राचा अभ्यास करावा, ह्मणून आह्मी तें शिकावें असें तूं कर. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस शास्त्र शिकविणाऱ्या, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, आह्मास सर्व लोकांतून निवडून घेऊन आपले नेम शास्त्र आह्मास देणारा जो, तूं धन्य आहेस.

וידבר יי आणखी परमेश्वरानें मोश्याला असें सांगितलें कीं, तूं आहारोनाला आणि त्याच्या पुत्रांस बोलून सांग कीं, तुह्मी इस्राएल संतानास आशीर्वाद देत असतां त्यांस असें ह्मणा कीं, परमेश्वराने तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वराने आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वराने आपली दृष्टि तुजवर लावून तुझें कल्याण करावें; तसें त्यानी माझें नांव इस्राएलाच्या संतानांवर लावावें, ह्मणजे मी त्यांस आशीर्वाद देईन.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा तुजपुढें चांगल्या आठवणीने

* सुंतेचा करार व नेम शास्त्र जो मान्य करितो तो.

आमची आठवण करून पूर्वींच्या आकाशांच्या आकाशांतून द-येच्या व तारणाच्या दर्शनाकडून आह्मास दर्शन दे. आणि हे परमेश्वरा! आमच्या देवा, (आमचे) पूर्वज आब्राहाम, इसहाक व याकोब यांजवरील तुझी प्रीति; आब्राहामाबरोबर केलेला करार; त्याजवरील दया व त्याजवळ वाहिलेली शपथ; आणि त्याचा पुत्र इसहाक याचें स्थंडिलाच्या बाजूवर बांधलें जाणें तूं आठीव. जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे कीं. —

ויהי אחר उत्पत्ति अध्याय २२ ओवी १-१९

ושחט אתו आणि त्याने वेदीच्या उत्तर बाजूस परमेश्वरासमोर तो (होम पशू) कापावा; मग आहारोनाचे पुत्र याजक यांनी त्याचें रक्त वेदीवर चहुंकडे शिपडावें.

רבונו של עולם हे जगदीशा, जसें आमचा बाप आब्राहाम याने पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां आपल्या दयेस जिकिलें, तसें तुझ्या दयेने तुझ्या रागास जिकावें. तुझ्या दयेने तुझ्या (न्यायत्वाच्या) गुणास अगदीं झांकावें असें कर; आणि आम्हाबरोबर दयेच्या व कृपेच्या गुणाप्रमाणे वर्तून आम्हास परिमित न्यायाच्या शिमेच्या आंत राख; आणि आपल्या मोठ्या चांगुलपणामुळें आपल्या लोकांवरून, नगरावरून, देशावरून व वतनावरून आपला राग फिरीव. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा सेवक मोशे याजकडून तूं आपल्या शास्त्रांत आम्हास अभय वचन दिल्हेल्या गोष्टी आमचे प्रत्ययास आण. जसें म्हटले आहे कीं, आणि मी याकोबासीं जो माझा करार तो आठवीन, आणि इसहाकासींहि जो माझा करार व आब्राहामासींहि जो माझा करार तो आठवीन, आणि तो देशहि आठवीन. आणि असें असतांहि ते आपल्या शत्रूच्या देशांत राहतील, तेव्हां मी त्यांची समाप्ति करावी आणि त्यांसीं क्या केलेला करार मोडावा, असा मी त्यांस धिक्कारणार नाहीं.

आणि त्यांचा कंटाळाहि करणार नाहीं; कांतर मी परमेश्वर त्यांचा देव आहें. तर त्यांच्या पूर्वजांसीं जो करार, तो मी त्यांसाठीं आठवीन; कां तर त्या पूर्वजांस त्यांचा देव व्हावा म्हणून त्या राष्ट्रांच्या देखतां मिसर देशांतून काढिलें; मी परमेश्वर आहें. तर तुझा देव परमेश्वर तुझे पाडाव करून नेलेल्यांस फिरवील, आणि तुजवर ममता करील; असें ज्या लोकांमध्यें तुझा देव परमेश्वर याने तुझीं दाणादाण केली, त्या सर्वांतून तुला फिरून गोळा करील. जरी आकाशाच्या कांठापर्यंत तुला ढकललें असलें, तरी तुझा देव परमेश्वर तुला तेथून गोळा करील; तेथून देखील तुला मिळवून घेईल. आणि तुझ्या पूर्वजांस जो देश वतनाचा होता, त्यांत तुझा देव परमेश्वर तुला आणील, आणि तो तुझ्या वतनाचा होईल; तुझ्या पूर्वजांपेक्षांहि तुझें बरें करून तुला वाढवील. आणि (हे देवा,) तुझ्या भविष्यवाद्यांच्या हातूनहि म्हटलें (लिहिलें) गेलें आहे कीं, हे परमेश्वरा, आह्मावर कृपा कर, आह्मी तुझी वाट पाहिली आहे, प्रत्येक सकाळीं तूं त्यांचा बाहु हो, संकटाच्या समयीं आमचें तारणहि हो. आणखी ह्मटलें आहे कीं, त्याच्या सर्व कष्टांत तो (देव) कष्ट पावे, आणि त्याचा समक्ष राहणारा दूत त्यांस तारी; तो आपल्या प्रीतीने व लीनतेने त्यांस उद्धारी; आणि सर्व पुरातन दिवसांत त्यांस उचलून वाही. आणखी असे ह्मटलें आहे कीं, हे देवा, तो याकोबाचा संकट समय आहे, तथापि तो त्यांतून निभावेल. आणखी ह्मटलें आहे कीं, हे देवा, जो तूं अन्यायाची क्षमा करितोस, आणि आपल्या विभागाच्या शेषाचें पातक उल्लंघितोस, त्या तुजसारिखा कोण आहे? तो आपला क्रोध सर्वकाळपर्यंत बाळगीत नाहीं, कारण कीं त्याला दया आवडती. तो फिरेल, तो आह्मावर दया करील; तो आमचे अन्याय धुळीस मिळवील; आणि तूं त्यांची सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाकिशील. (आणि आमचीं व तुझे लोक

इस्राएल यांच्या घराण्याचीं पापें, आठवण न पडे व झडती न होय व कधींहि मनांत नयेत अशा ठिकाणीं तूं टाक.) तूं याकोबासाठीं खरेपणा आणि आब्राहामासाठीं करुणा साधिशील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजांपाशीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहीस ती. आणखी असें ह्मटलें आहे कीं, त्यांसहि मी आपल्या पवित्र पर्वतांत आणीन, आणि आपल्या प्रार्थनेच्या घरांत त्यांस हर्षित करीन; त्यांचे होम व त्यांचे बळी माझ्या वेदींवर मला मान्य होतील; कारण कीं माझें घर सर्व लोकांसाठीं प्रार्थनेचें घर असें ह्मटलें जाईल.

אלו דברים ज्या गोष्टींस परिमाण नाहीं, त्या येणेप्रमाणे; शेताचा कांठ कापणें, प्रथम उत्पन्न वाहणें, भेटीसाठीं कांहीं आणणें, परोपकार करणें, व शास्त्राचा अभ्यास करणें. आणि ज्या गोष्टी आचरल्याने मनुष्य या जगीं त्याचें फल भोगून पुढील जगांत त्याचें शृंग स्थापित होतें (मुख्य वेतनपावतो,) त्या येणेप्रमाणे; आई बापांचा मान राखणें, परोपकार करणें, रोग्यांचा समाचार घेणे, पाहुण्यांचा आदर सत्कार करणें, देवालयांत पाहांटेस जाणें, आणि मनुष्यामध्यें व त्याच्या शेजाऱ्यामध्यें व पुरुषामध्यें व त्याच्या स्त्रीमध्यें समेट करणें; परंतु शास्त्राचा अभ्यास करणें सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे.

לעולם יהא אדם मनुष्याने देवाचें * भय, उघडपणें व गुप्तपणेंहि धरावें, सत्य अंगिकारावें व मनांत असेल तसें सत्य बोलावें, आणि पाहांटेस उठून असें म्हणावें कीं, हे जगतांच्या + स्वामी व प्रभुंच्या प्रभु, आमच्या न्यायीपणामुळें नव्हे, परंतु तुझ्या फार दयेमुळें आम्ही आपल्या विनंत्या तुजपुढें

---

* हाखामीम लोकांच्या ग्रंथांत कोठे कोठे देवाचें नाव उघडपणे लिहिण्या बद्दल आकाश असें सांपडतें.

+ या व पुढल्या जगाचाहि स्वामी तोच आहे.

ओतितों. हे प्रभो, ऐक; हे प्रभो, क्षमाकर; हे प्रभो, कान देऊन कार्य कर, उशीर करूंनको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कांकीं तुझ्या नगरास, आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. आम्ही काय! आमचें जिणें काय! आमचें यथार्थपण काय! आमचें पुण्य काय! आमचें सामर्थ्य काय! आमचें बल काय! आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आम्ही तुजपुढें काय म्हणूं! पराक्रमी (मनुष्यें) तुजपुढें कांहींच नाहींत; नामांकित मनुष्यें जशीं नव्हतींच; ज्ञानी मनुष्यें जशीं बुद्धिहीन; आणि चतुर जशीं विवेकहीन अशीं नाहींत कीं काय? कारण आमचीं कर्में बहुत करून शून्यच आहेत; आणि आमच्या आयुष्याचे दिवस तुजपुढें व्यर्थ आहेत. आणि मनुष्य पशुपेक्षां श्रेष्ठ नाहीं कारण सर्व व्यर्थता आहे; मात्र जो शुद्ध आत्मा तुझ्या गौरवाच्या आसनासमोर पुढें झडती व हिशोब देणार तो त्यास (अधिक) आहे. आणि पाहा, राष्ट्रें मोटेंतल्या बिंदुप्रमाणे आहेत; आणि पारड्यांतल्या बारिक धुळीप्रमाणे मोजलीं आहेत. पाहा तो द्वीपें कणासारिखीं उचलितो; असें म्हटल्याप्रमाणें सर्व राष्ट्रें तुजपुढें जशीं कांहींच नाहीं. परंतु आम्ही तुझे लोक, तुझ्या कराराचीं लेंकरें, तुझा प्रियकर आब्राहाम ज्यासीं त्वा मोरिया डोंगरावर शपथ केलीस त्याचीं लेंकरें; इसहाक, जो तुजकरितां स्थंडिलाच्या बाजूवर बांधला गेला त्याचें बीज; तुझा ज्येष्ठ पुत्र याकोब, ज्यावर आपल्या आवडीने प्रीतिकरून आणि त्यामध्यें आनंदाने हर्ष मानून, ज्यास इस्राएल आणि येशुरून म्हटलें त्याचा आम्ही समुदाय आहों.

לפיכך אנחנו חייבים यास्तव आम्हास तुझे उपकार मानायास, तुला स्तवायास, तुझें गौरव करायास व तुला उंच मानायास; आणि तुझ्या मोठ्या नामाचें गायन, कीर्त्तन व उपकार स्तुति करायास योग्य आहे. आणि आम्हा-

स नेहमी प्रति दिवशीं गीत गाणें योग्य आहे. आम्ही सुखी ! आमचा विभाग किती चांगला ! आमचें भाग्य किती सुंदर ! आणि आमचें वतन किती उत्तम ! आम्ही सुखी कीं आम्ही पाहांटेस व संध्याकाळीं देवालयांत व विद्यालयांत जाऊन, आणि तुझ्या नामाचें एकत्व मान्य करून दोनवेळा प्रीतीने असें म्हणतों कीं, हे इस्राएला ऐक, परमेश्वर आमचा देव आहे; परमेश्वर एकच आहे. त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.

אתה הוא אחד पृथ्वी उत्पन्न केल्यापूर्वीं व पृथ्वी उत्पन्न केल्यानंतर जो एकच, तो या जगांतील देव तूंच; पुढल्या जगांतील देव तूंच; आणि ज्याचीं वर्षें संपत नाहींत तोहि तूंच. तूं आपल्या जगांत तुझें नाम पवित्र मानणाऱ्या लोकांमध्यें आपलें नाम पवित्र कर; तूं आपल्या तारणाकडून आमचें शिंग उभार व उंचाव; आणि आपल्या नामाकरितां आमचें लवकर तारण कर. बहुतांमध्यें (प्रसिद्धपणें) आपलें नाम पवित्र करणारा धन्य आहे.

אתה הוא יי האלהים वरील आकाशांतील, खालील पृथ्वींतील, आकाशांच्या आकाशांतील, उंचावरील व नीचामधील परमेश्वर देव तूंच आहेस. पहिला तूंच व मागलाहि तूंच; तुजवांचून दुसरा कोणी देव नाहीं. तुजवर आशा ठेवणाऱ्या विखरलेले लोकांस पृथ्वीच्या चोहों कोनापासून एकवट कर, म्हणजे जगांतील सर्व येणारे (वसणारे) जाणतील व समजतील, कीं पृथ्वीच्या सर्व राज्याचा तूंच देव आहेस; तूंच आकाश, पृथ्वी, समुद्र व त्यांतील सर्व (पदार्थ) उत्पन्न केलेस. आणि तूं काय करितोस व तूं काय चालविलें आहेस असे म्हणणारा, वरील व खालील तुझ्या हस्त कर्मांमध्यें कोण आहे ? हे आकाशांतील आमच्या जीवंत व निश्चल बापा, ज्या तुझ्या मोठ्या परा-

क्रमी व भयंकर नामाने आम्ही म्हटलों गेलों आहों, त्याकरितां आम्हावर उपकार व दया करून ज्या गोष्टीविषयीं तूं आपला दृष्टांत सांगणारा सेफानया याचे हातून आम्हास अभय वचन दिल्हें आहेस, ती गोष्ट आम्हामध्यें स्थापित कर. जसें, म्हटलें आहे कीं, ज्या समयीं मी तुला एकवटीन त्यासमयीं तुम्हाला परत आणीन, कांकीं जेव्हां मी तुमचा पाडावपणाचा प्रवास तुमच्या समक्ष परत आणीन, तेव्हां तुम्हाला पृथ्वींतल्या सर्व लोकांमध्यें कीर्ति व प्रशंसा मिळत असें करीन. असें परमेश्वर म्हणतो.

יהי רצון מלפניך हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, तुझी असी प्रसन्नता होवो कीं, तूं आम्हावर दया कर; आमचीं सर्व पापें क्षमा कर; आमचे सर्व अपराधांचें प्रायश्चित कर; आमचीं सर्व उल्लंघनें क्षमा व माफ कर; आणि आमच्या दिवसांत लवकरच पवित्र मंदिर बांध; मग तुझा भविष्यवादी मोशे याच्या हातून लिहिल्याप्रमाणे आमचें प्राय-श्चित होण्याकरितां नित्याचें अर्पण आम्ही तुजपुढें अर्पूं. जसें म्हटलें आहे कीं:—

וידבר יי आणि परमेश्वराने मोशाला असें सांगित-लें कीं, तूं इस्राएलांच्या संतानास आज्ञा देऊन सांग कीं, माझीं अर्पणें, माझीं अन्नदानें हीं शांतिकारक सुवासासाठीं माझ्या जव-ळ यथाकाळीं करावयास तुह्मी सांभाळा. आणि तूं त्यांस सांग कीं, तुह्मी जे होम पशू नेहमी प्रतिदिवशीं परमेश्वराला अर्पावे, ते असे, पहिल्या वर्षांतील सांगोपांग दोन मेंढे. एक मेंढा सकाळीं तूं अर्पण कर, आणि एक मेंढा संध्याकाळीं अर्पण कर. आणि नैवेद्यासाठी एकाचा एक दशमांश सपीठ पाव हीन* कुटून काढ-लेलें तेल यांत मळलेलें व्हावें. हा नित्य होम सीनाय डोंगरावर

* हीन हें एक माप आहे.

नेमलेला, परमेश्वराजवळ शांतिकारक सुवासासाठीं अर्पण असा आहे. आणि त्याच्या संगतीं जें पेय अर्पण करायाचें, तें एका मेंढ्या संगतीं पाव हीन द्राक्षरस; तें तूं पवित्र स्थानांत परमेश्वराजवळ ओतून पेय अर्पण कर. आणि संध्याकाळीं तूं दुसऱ्या मेंढयाचें अर्पण कर; जसा सकाळचा नैवेद्य आणि त्याचें पेय तसें अर्पण कर; हें अर्पण परमेश्वराजवळ शांतिकारक सुवास आहे.

शाब्बाथ असल्यास हीं वाक्येंहि बोलावीं.

וביום השבת आणि शाब्बाथ दिवसीं पहिल्या वर्षांतील सांगोपांग दोन मेंढे, आणि तेलांत मळलेल्या दोन दशमांश सपीठाचा नैवेद्य, आणि त्याचें पेय अर्पण व्हावें. नित्य होम व त्याचें अर्पण यां खेरीज हा होम प्रत्येक शाब्बाथीं व्हावा.

אתה הוא אלהינו जेव्हां पवित्र मंदिर होतें, तेव्हां तुझा भविष्यवादी मोशे याच्या हातांकडून तुझ्या नेमशास्त्रांत लिहिल्याप्रमाणें जसी (आमच्या पूर्वजांस) आज्ञा दिल्ही होती, त्याप्रमाणे ज्यापुढें ते सुगंधी द्रव्यें जाळीत असत; तो तूंच आमचा देव. तें येणेप्रमाणे.—

ויאמר יי आणि परमेश्वराने मोशाला सांगितलें तूं आपल्यापासीं किराणे बलासान व नखी व गंधाबेरोज हे किराणे, आणि निर्मळ ऊद घे, भागाप्रमाणें भाग व्हावा. आणि यांचा धूप गांध्याच्या कामाने मीठ घालून निर्मळ पवित्र असा कर. आणि त्यांतील कांहीं बारीक कूट, मग त्यांतील कांहीं संकेत लेखाच्या पुढें सभामंडपांत जेथें मी तुला साक्षांत भेटेन, तेथें ठेव; तो तुह्मांला परम पवित्र असावा. आणखी असेंहि ह्मटलें आहे कीं, आणि आहारोनाने सुगंध द्रव्यांचा धूप तिजवर जाळावा. सकाळच्या सकाळीं, जेव्हां तो दिवे नीट करितो, तेव्हां त्याने तिजवर धूप जाळावा. आणि संध्याकाळीं जेव्हां आहारोन दिवे लावितो,

तेव्हां त्याने तिजवर परमेश्वरासमोर धूप नित्य जाळावा; तुमच्या पिढ्यांनपिढीं असें असावें.

תנו רבנן आमच्या गुरुनी आम्हास सुगंधाचें चूर्ण कसें तें सांगितलें आहे. त्यांत तीनशें आंडसष्ट मानीमं[1] होते; सूर्याच्या दिनमानाप्रमाणे तीनशें पांसष्ट, म्हणजे प्रति दिवसास एक माने, त्यांतील अर्धें सकाळीं व अर्धें संध्याकाळीं; आणि उरलेले तीन मान्यांतील मुख्य उपाध्या प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या पूर्व दिवशीं, अगदीं बारीक कुटण्याची आज्ञा पूर्ण करण्याकरितां ओंजळ भर घेऊन हामामांत कुटीत असे. त्यांत अकरा गंधे[2] होते; ते येणेप्रमाणें; बलासान, नखी (लवंग), गंधाबेरोजा व ऊद प्रत्येक सत्तर माने; बोल, तज, जटामांशी व केशर प्रत्येक सोळा माने; कोष्ट बारा माने; आगर तीन माने; दालचिनी नऊ माने करशीनाचा साबु[3] नऊ काब[4]; कफरीसीनाचा अर्क तीन सेआ व तीन काब; जर कफरीसीनाचा अर्क न मिळाला, तर पांढरा जुना मद्य घ्यावा; सदोमी मीठ पाव काबा; आणि थोडी "माआलेआशान" या नावाची वनस्पतिहि घ्यावी. रिब्बी नाथान बाबेल कर म्हणतो, कीं त्यांत थोडें यार्देनेजवळचें तेल स्फटिकहि घ्यावें; आणि त्यांत मद्य असल्यास तें अशुद्ध होय; आणि त्यांत एकादा गंध उणा असल्यास, तो (उपाध्या) मारला जाण्यास योग्य आहे.

רבן שמעון गमलीएलाचा पुत्र रब्बान शिमओन असें म्हणतो कीं, जो बालसीमोन झाडावर केलेले क्षतांतून गळता रस, तोच बलासान; करशीनाचा साबू कां घेत असत? नखी सुंदर दिसावी म्हणून स्वच्छ करायास. कफरीसीनाचा अर्क कां घेत

१ माने हें एक वजन आहे. २ टीका. ३. ३ या पदार्थाची उत्पत्ति झाडापासून आहे म्हणून हा पदार्थ शिकेकाइ अथवा रिठा असावा असें वाटतें. ४ काब व सेआ हीं कैली मापें आहेत. ५ हा पदार्थ बाटाण्या एवढा आहे, याचें विलायतेहून लोंनचें येतें.

असत ? नखी कठीण असती ती भिजविण्याकरितां. या (कामास) मेरगलाइम* या नावाच्या झऱ्याचें पाणी योग्य नव्हतें काय ? परंतु मेरगलाइम या नावाच्या झऱ्याचें पाणी पवित्र मंदिराच्या गौरवामुळें आंत आणायास योग्य नव्हतें.

תַּנְיָא רַבִּי נָתָן אוֹמֵר रिब्बी नाथान कुटणाऱ्याला म्हणतो कीं, बारीक व चांगलें, चांगलें व बारीक कूट, कीं त्याचा आवाज होऊन चांगला स्वास यावा. आणि (त्या चूर्णांतून) अर्ध्यांचा (धूपे दाखविल्यास) शुद्ध आहे; परंतु त्यांतील तिसऱ्या व चवथ्या भागाचा धूप दाखविण्याविषयीं आम्ही (कधीं) ऐकिलें नाहीं. रिब्बी यहुदा म्हणतो कीं, हें सर्व त्याच्या परिमाणाप्रमाणें असल्यास त्यांतील अर्ध्यांचा धूप दाखवायास शुद्ध आहे; परंतु जो त्यांतील एकादा गंध उणा करितो तो (उपाध्या) मारला जाण्यास योग्य आहे.

תָּנֵי בַּר קַפָּרָא कप्पाराचा पुत्र असें सांगतो कीं, साठ किंवा सत्तर वर्षांत एकवेळ त्यांतील अर्धें भिजऊन धूप दाखवायास आणीत असत. कप्पाराचा पुत्र आणखी असें सांगतो कीं त्यांत मधाचा कोरतोब+ जर असला, तर मनुष्य त्याच्या वासा पुढें उभा राहूं शकत नसे. आणि त्यांत मध कां मिसळीत नसत ? कारण शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, प्रत्येक आंबट पदार्थ व मध, यांतून घेऊन परमेश्वरासाठीं अग्नि अर्पणाचा धूप तुम्ही करूं नका. परमेश्वराकडून तारण होतें; तुझ्या लोकांवर तुझा आशीर्वाद आहे. सैन्याचा परमेश्वर आम्हास अनुकूळ आहे. याकोबाचा देव आम्हास आश्रय आहे. सेलाह. हे सैन्याच्या परमेश्वरा, जो मनुष्य तुजवर आशा ठेवितो तो धन्य. हे परमेश्वरा तारण कर; आम्ही हांक मारितों, त्या दिवशीं राजानें आम्हास उत्तर द्यावें. हे परमेश्वरा, आम्हास तुज-

* टीका ४ + कोरतोब हें एक लहानसें माप आहे.

कडे फिरीव म्हणजे आम्ही फिरूं, पूर्वीप्रमाणे आमचे दिवस नवे कर. तेव्हां जसें पुरातन दिवसांत, आणि जसें पूर्वीच्या वर्षांत, तसें यहुदाचें आणि येरुशालेमेचें अर्पण परमेश्वराला मनोरम होईल.

אבּיי הוה आबये याने अनुष्ठानाचा क्रम गेमारांत सांगितल्याप्रमाणे आणि आब्बाशाऊल याच्या मताप्रमाणे लाऊन ठेविला आहे. (तो येणेप्रमाणे;) धूपाच्या दुसऱ्या अनुष्ठाना पूर्वी मोठें अनुष्ठान; लांकडाचे दोन तुकडे रचण्या पूर्वी धुपाचें दुसरे अनुष्ठान; आंतल्या स्थंडिलांतून राख काढण्या पूर्वी लांकडाचे दोन तुकडे रचणे; पांच दिवे नीट करण्या पूर्वी आंतल्या स्थंडिलांतून राख काढणे. नित्याचे रक्त शिंपडल्या पूर्वी पांच दिवे नीट करणे. दोन दिवे नीट करण्यापूर्वी नित्याचें रक्त शिंपडणें; धूप दाखविण्या पूर्वी दोन दिवे नीट करणे; गात्रें (सांधे) अर्पिल्या पूर्वी नित्याचें रक्त शिंपडणे; नैवेद्या पूर्वी गात्रांचे (सांध्याचें) अर्पण करणे; भाजलेलें (मांस) अर्पण्यापूर्वी नैवेद्य दाखविणे; तर्पण करण्या पूर्वी भाजलेलें मांस अर्पणे; अधिक अर्पणा पूर्वी तर्पण करणे; सुगंधाच्या चूर्णाचे दोन चमचे वाहण्या पूर्वी अधिक अर्पण करणें; आणि नित्याचें संध्याकाळचें अर्पण केल्यापूर्वी सुगंधाच्या चूर्णाचे दोन चमचे वाहणे; जसें ह्मटलें आहे कीं, आणि तिजवर (वेदीवर) होम पशु ठेवावा, आणि तिजवर शांतिकारक यज्ञाचें मेदें जाळावें; याकडून सर्व अर्पणे संपवावी.

אנּא בכח (हे परमेश्वरा !) मी विनंति करितों, कीं, तूं आपल्या उजव्या हाताच्या महत्वाच्या सामर्थ्यानें बंदिवानांस मोकळे कर. हे गडरूप आश्रया ! तूं आपल्या लोकांचें स्तवन मान्य कर; हे भयंकरा, आह्मास शुद्ध कर. हे बळवंता ! तुझ्या एकत्वाचा शोध करणारांस आतां डोळ्याच्या पुतळी-

प्रमाणे सांभाळ. त्यांस आशीर्वाद देऊन शुद्ध कर; आणि आपल्या यथार्थतेच्या दयेने त्यांची फेड कर. हे पराक्रमी व पवित्र देवा, आपल्या पुष्कळ चांगुलपणाकडून आपल्या समुदायास चालीव. हे स्वतांच महत्त्ववान असणाऱ्या, तुझ्या पवित्रतेची आठवण करणाऱ्या लोकांस अनुकूळ हो. हे गुप्त गोष्टी जाणणाऱ्या, आमची विनंती मान्यकर, आणि आमचें ओरडणे ऐक. त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सदासर्वकाळ धन्य असो.

רבון העולמים हे जगतांच्या स्वामी, त्वां आह्मास नित्याचें अर्पण नेमलेल्या वेळीं करण्याविषयीं आणि उपाध्याने अनुष्ठाने करावीं आणि लेव्यांनी मेजाजवळ व इस्राएलांनी उभे राहाण्याच्या ठिकाणीं (अंगणांत) असण्याविषयीं आज्ञा दिल्ही आहेस. परंतु आतां आमच्या अन्यायामुळें पवित्र मंदिराचा नाश झाला; नित्याचें अर्पण बंद झालें; उपाध्ये अनुष्ठाने करीत नाहींत; लेवी मेजाजवळ व इस्राएल आपल्या उभे राहण्याच्या ठिकाणीं नाहींत; परंतु तूं ह्मटलें आहेस कीं, आह्मी आपले ओठांची वासरें अर्पावीं.

לכן יהי רצון यास्तव हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, जसें आह्मी नित्याचें अर्पण नेमलेल्या वेळीं अर्पित असूं व आपल्या उभे राहण्याच्या ठिकाणीं उभे असूं; आणि आह्मी आपलीं ओठांची वासरें अर्पूं; असें ह्मटल्या प्रमाणे आमच्या ओठांची विनवणी मान्य, कबूल व प्रसन्नता संपादण्यासारिखी असो. आणि असें ह्मटलें आहे कीं, त्याने वेदीच्या उत्तर बाजूस परमेश्वरासमोर तो कापावा; मग आहारोनाचे पुत्र याजक यांनी त्याचें रक्त वेदीवर चहुंकडे शिंपडावें. आणखी असें ह्मटलें आहे कीं, होमाविषयीं, नैवेद्याविषयीं, पापहारक यज्ञाविषयीं, दोषहारक यज्ञाविषयीं, संस्काराविषयीं व शांतिकारक यज्ञाविषयीं हाच नेम.

איזהו מקומן यज्ञ केले जात तीं ठिकाणें कोणतीं ? त्यांतील परम पवित्र उत्तर बाजूस कापले जात; प्रायश्चित्ताच्या दिवसाचा बैल व बोकड उत्तर बाजूस कापला जात असे. आणि त्यांचें रक्त उत्तर बाजूनें उपकरणांत घेत; त्यांचें रक्त (संकेत लेखाच्या कोशाच्या) काठ्यांवर पडद्यावर व सोनेरी स्थंडिलावर शिपडावें लागत असे. त्यांतील एकादें शिपडणें उणें झालें, तर प्रायश्चित्तास अडथळा होत असे; उरलेलें रक्त बाहेरल्या स्थंडिलाच्या पश्चिमेकडल्या बाजूच्या पायावर ओतीत; जरी न ओतलें, तरी (प्रायश्चित्तास) अडथळा होत नसे.

פרים הנשרפים जाळायाचे बैल व जाळायाचे बोकड हे उत्तरेस कापले जात; आणि त्यांचें रक्त उत्तर बाजूनें उपकरणांत घेत; आणि त्यांचें रक्त पडद्यावर व सोनेरी स्थंडिलावर शिपडावें लागत असे; त्यांतील एकादें शिपडणें उणें झालें, तर प्रायश्चित्तास अडथळा होत असे; उरलेलें रक्त बाहेरल्या स्थंडिलाच्या पश्चिमेकडल्या बाजूच्या पायावर ओतीत; जरी न ओतलें तरी (प्रायश्चित्तास) अडथळा होत नसे; हे व मागले यज्ञ राखेच्या सांठवण्यात जाळीत असत.

חטאת הצבור मंडळीचे व एका मनुष्याचे पापहारक यज्ञ. मंडळीचे पापहारकयज्ञ ते हे — प्रतिपदेचे व पर्वणिचे बोकड उत्तर बाजूस कापले जात; त्यांचें रक्त उत्तर बाजूनें उपकरणांत घेत; आणि त्यांचें रक्त चार वेळां (स्थंडिलाच्या) चार शिंगांवर (कोनांवर) शिपडावें लागत असे. तें कसें ? (उपाध्या) स्थंडिलावर चढून वांकणाकडे फिरे आणि आग्नेयी कोनाकडे, मग ईशान्य कोनाकडे, मग वायव्य कोनाकडे, मग नैर्ऋत्य कोनाकडे असा फिरे. उरलेलें रक्त बाहेरल्या स्थंडिलाच्या दक्षिणेकडल्या पायावर ओतीत; आणि उपाध्याचे

घराण्यांतील पुरुष पडद्याचे आंत कोणत्याहि प्रकारें शिजवून त्या दिवशीं व अर्ध रात्रपर्यंत खात.

העלה קדש קדשים होम हा परम पवित्र असून उत्तर बाजूस कापला जात असे; त्याचें रक्त उत्तर बाजूने उपकरणांत घेत; आणि ते चारवेळ शिपडल्याप्रमाणे दोन वेळ शिपडावें लागत असे; त्याचें कातडें काढावें व तो तोडून अग्नीने भस्म करावा लागत असे.

זבחי שלמי הצבור मंडळीचे शांतिकारक व दोषहारक यज्ञ. दोषहारक यज्ञ ते हे.—लुटण्याच्या दोषाचा, न जाणता पवित्र वस्तु आपल्या उपयोगास लावण्याचे दोषाचा मागणी घातलेल्या दासी बरोबर (न जाणतां विषय बुद्धीने वागण्याच्या) दोषाचा, नाझोऱ्याच्या दोषाचा, कोढ्याच्या दोषाचा, आणि संशययुक्त दोषाचा यज्ञ; हे उत्तर बाजूस कापले जात. त्याचें रक्त उत्तर बाजूने उपकरणांत घेत; तें चारवेळ शिपडाल्याप्रमाणें दोन वेळ शिपडावें लागत असे; आणि उपाध्याच्या घराण्यांतील पुरुष पडद्याचे आंत कोणत्याहि प्रकारें शिजवून त्या दिवशीं व अर्ध रात्रपर्यंत खात.

התודה ואיל נזיר आभार मानण्याचा यज्ञ व नाजीराचा मेंढा हे कांहींसे पवित्र होते, ते अंगनाच्या कोणत्याहि भागीं कापले जात; आणि त्यांचें रक्त चार वेळ शिपडल्याप्रमाणे दोन वेळ शिपडावें लागत असे, व ते नगराच्या कोणत्याहि ठिकाणीं कोणताहि मनुष्य त्या दिवशीं अर्ध रात्रपर्यंत खात असे. जो भाग (उपाध्यास) उचलून देत असत * तो दुसऱ्या सारिखा असे; परंतु तो उचलून दिल्हेला भाग मात्र उपाध्ये, त्यांच्या बायका, त्यांचीं लेंकरें व त्यांचे चाकर खात असत. प्रथम उत्पन्न, दाहावा भाग व वल्हांडण सनाचा यज्ञ हे कांहींसे

* लेवीय ७. ३२,३३, ३४.

पवित्र होते; ते अंगनाच्या कोणत्याहि भागीं अर्पिले जात; आणि त्यांचें रक्त एकवेळ ह्मणजे स्थंडिलाच्या पायावरच मात्र शिंपडावें लागत असे; परंतु त्याच्या खाण्यांत भेद असे. प्रथम उत्पन्न उपाध्याने खावें; दाहावा भाग कोणताहि मनुष्य नगराचे कोणत्याहि भागीं कोणत्याहि प्रकारें शिजवून दोन दिवस व एक रात्र पर्यंत खात असे; आणि वल्हांडण सनाचा यज्ञ मात्र रात्रीं अर्धरात्रपर्यंत, संख्येंत असतील तेच भाजून मात्र खात असत.

רבי ישמעאל אומר रिब्बी इश्माएल ह्मणतो, तेरा नियमावरून* शास्त्राचा अर्थ समजून येतो.

१ लहान गोष्टीवरून मोठ्या गोष्टीविषयीं, आणि मोठ्या गोष्टीवरून लहान गोष्टीविषयीं अनुमान करणे.

२ सारखेपणावरून अनुमान करणे.

३ एका वाक्यांतील मूळविषय दुसऱ्या वाक्यास लावणे; आणि दोन वाक्यांतील मूळविषय एक प्रत्येकास लावणे.

४ पहिल्याने मोहोगम पद असून मग विशेष पद असलें, तर मात्र विशेष पदाचा अर्थ धरावा.

५ पहिल्याने विशेष पद असून मग मोहोगम पद असलें, तर मोहोगम पदाचा अर्थ धरावा.

६ पहिल्याने मोहोगम पद, मग विशेष पद, आणि पुनः मोहोगम पद असलें, तर विशेष पदाप्रमाणे अर्थ धरावा.

७ ज्या मोहोगम पदाचें विशेष पद, आणि ज्या विशेष पदाचें मोहोगम पद सांगण्याचें अगत्य आहे, त्यांविषयीं अनुमान करणे.

८ जें काहीं मोहोगम पदांत असून विशेष पदांत निराळेंच दाखविलेलें असतें, त्या विशेष पदाविषयीं जें सांगितलेलें असतें,

---

* टीका ५

तें त्या विशेष पदाविषयीं मात्र नसतें, परंतु मोहोगम पदास-
हि तें लागू होतें.

९ जें काहीं मोहोगम पदांत असून पुनः त्याविषयाचा संबंधी सि-
द्धांत ठरविण्याकरितां निराळेंच दाखविलें असतें, त्याचा
निर्णय भारी होत नाहीं, परंतु हलका होतो.

१० जें काहीं मोहोगम पदांत असून त्यापासून निराळा सिद्धांत
ठरविण्याकरितां निराळेंच दाखविलें असतें, त्याचा निर्णय
हलका व भारीहि होतो.

११ जें काहीं मोहोगम पदांत असून नवी गोष्ट ठरविण्याकरितां
पुनः निराळेंच दाखविलें असतें, त्याविषयीं उघडपणे सांगि-
तल्यावांचून तें पुनः मोहोगम पदांत मोजलें जात नाहीं.

१२ मूळ विषयावरून आणि शेवटीं सांगितलेल्या गोष्टीवरून
अनुमान करणे.

१३ जर दोन वाक्यांचा अर्थ एक प्रत्येका विरुद्ध असला, तर
तिसरे वाक्यावरून त्याचा अर्थ मिळवून घ्यावा.

יהודה בן תימא אומר तेमाचा पुत्र येहुदा असें म्हणतो, कीं तूं आपल्या आकाशांतील बापाची इच्छा पूर्ण करण्याकरितां चित्त्याप्रमाणे धीट, गरुडाप्रमाणे हलका, हरिणाप्रमाणे चपळ आणि सिंहाप्रमाणे बळकट हो. तो म्हणत असे, कीं जे निर्लज ते नर्कास, व मर्यादशील ते एदेन बागास (स्वर्गास) योग्य आहेत.

יהי רצון מלפניך हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, पवित्र मंदिर लौकरच आमच्या दिवसांत त्वां बांधावें असी तुझी प्रसन्नता होऊन, सरळ पूर्ण अंतःकरणाने आह्मी तुझी इच्छा पूर्ण करावी, ह्मणून तुझें शास्त्र आमचें वतन होऊं दे.

קדיש דרבנן

הודו ליי קראו בשמו तुह्मी परमेश्वराचे उपकार माना; त्याचें नाम घ्या, राष्ट्रामध्यें त्याचीं चरित्रें कळवा. त्याच्याजवळ गायन करा; त्याचें कीर्त्तनकरा; त्याच्या सर्व आश्चर्याच्या कृत्यांवर ध्यान करीत जा. त्याच्या पवित्र नामाविषयीं उत्साह करा. जे परमेश्वाराला शरण जातात त्यांचे ऱ्हदय संतुष्ट व्हावें. तुह्मी परमेश्वराचा व त्याच्या शक्तीचा शोध करायास यत्न करा; नेहेमी त्याला शोधा. जीं आश्चर्याचीं कृत्यें त्यानी केलीं, त्याचे चमत्कार व त्याच्या तोंडचे न्याय, यांची आठवण करा. त्याचा सेवक इस्राएल याच्या संतानहो, त्याचा निवडलेला याकोब याच्या संतान हो, तुह्मी असें करा. तोच परमेश्वर आमचा देव; त्याचे न्याय सर्व पृथ्वींत आहेत. तो आपला करार, जें वचन हजार पिढ्यांस आज्ञेने बोलला, तें सर्व आठवीत आहे. त्याच्या विषयीं तो आब्राहामा जवळ करारी झाला, आणि इसहाकाजवळ आपली शपथ केली, तें. आणि त्याने तें याकोबाजवळ नेम, इस्राएलाजवळ सर्वकाळ करार स्थापिलें. असें कीं, मी तुला खनान देश तुझा वतनाचा वांटा देईन. तेव्हां ते गणतीने थोडे, हलके, व त्यांत प्रवासी होते. आणि ते देशोदेशीं एका राष्ट्रा पासून दुसऱ्या राष्ट्रामध्यें आणि एका राज्यापासून दुसऱ्या लोकांत असे फिरत होते. त्यानी त्यांपासून त्यांस जांचणूक होऊं दिल्ही नाहीं, राजांस देखील त्यांसाठीं निषेधिलें. तुह्मी माझ्या अभिषिक्तांस शिवूं नका, माझ्या भविष्यवाद्यांचें वाईट करूंच नका. अहो पृथ्वीचे सर्व, तुह्मी परमेश्वरा जवळ गा; दिवसो दिवस त्याच्या तारणाचें सुवर्त्तमान सांगा. राष्ट्रांमध्यें त्याचें गौरव; सर्व लोकांमध्यें

त्याचीं आश्चर्याचीं कृत्यें वर्णीत जा. कारण कीं परमेश्वर थोर आणि फार स्तुति योग्य; सर्व देवांवर तो भययोग्य आहे. कारण कीं लोकांचे सर्व देव बाहुल्या आहेत, परंतु परमेश्वरानें आकाश उत्पन्न केलें. त्याच्या पुढें मान व महत्त्व; त्याच्या ठिकाणीं पराक्रम व आनंद आहे. लोकांच्या कुळांनो, परमेश्वराला द्या, परमेश्वराला गौरव व पराक्रम द्या. परमेश्वराला त्याच्या नामाचें गौरव मानून द्या; अर्पण घेऊन त्याच्या दर्शनास या; पवित्रतेच्या शोभेनें परमेश्वराला भजा. अहो पृथ्वीचें सर्व, तुह्मी त्याच्या पुढें कांप धरा, भूगोलहि न हलावा असा स्थापलेला आहे. आकाशानें संतोष करावा, पृथ्वीनेंहि हर्ष करावा, आणि परमेश्वर राज्य करितो असें राष्ट्रांमध्यें सांगितलें जावें. समुद्र आणि त्यांतील भरण यांनी गरजावें, भूमि आणि जें तिजवर, त्या सर्वांनी उत्साह करावा. तेव्हां जंगलांतल्या झाडांनी परमेश्वरापुढें सुशब्द करावे, कारण कीं तो पृथ्वीचा न्याय करायास आला आहे. तुह्मी परमेश्वराचे उपकार माना, कारण कीं तो चांगला, आणि त्याची दया सर्वकाळ आहे. तर तुह्मी असें ह्मणा कीं, हे आमच्या तारणाच्या देवा, आह्मास तार ह्मणजे आह्मास राष्ट्रांतून गोळा करून सोडीव; यासाठीं कीं आह्मी तुझ्या पवित्र नामानें उपकार मानून तुझ्या स्तुतीनें नावाजून घ्यावें. इस्राएलाचा देव याचे धन्यवाद सर्वकाळापासून सर्वकाळ पर्यंतहि व्हावे. तेव्हां सर्व लोकांनी आमेन बोलून परमेश्वराची स्तुति करावी. परमेश्वर आमचा देव, याला तुह्मी उंच माना, आणि त्याच्या पायांच्या आसना जवळ भजा; तो पवित्र आहे. परमेश्वर आमचा देव, याला तुह्मी उंच माना; आणि त्याचा पवित्र डोंगरावर भजा; कां तर परमेश्वर आमचा देव पवित्र आहे. आणि तो ममताळू होता, यास्तव त्यानें अन्यायाची क्षमा केली, नाश केला नाहीं; त्यानें बहुत वेळ

आपला राग टाकिला आणि आपला सर्व संताप चेतविला नाहीं. हे परमेश्वरा, तूं आपला कळवळा मजवरून आटोपूं नको; तुझ्या दयेने व तुझ्या सत्यतेने मला अखंड राखावें. हे परमेश्वरा, तूं आपल्या फार ममतेची आणि आपल्या फार दयेची आठवण कर, कांतर त्या सर्वकाळापासून आहेत. जो देव त्याला पराक्रमाचा मान द्या; त्याची उत्कृष्टता इस्राएलावर व त्याचा पराक्रम अभाळांपर्यंत आहे. हे देवा, तूं आपल्या पवित्र स्थानीं भयंकर आहेस; जो लोकांस शक्ति व सामर्थ्य देतो, तोच इस्राएलाचा देव आहे; देवाची स्तुति असो.

אל נקמות יי हे सूड घेणाऱ्या देवा, हे परमेश्वरा, सूड घेणाऱ्या देवा, तूं प्रकाशित हो. हे पृथ्वीच्या न्यायाधीशा तूं ऊठ, अभिमान्यांस प्रतिफळ फेडून दे. परमेश्वराकडून तारण होतें; तुझ्या लोकांवर तुझा आशीर्वाद आहे. सैन्यांचा परमेश्वर आमच्या संगतीं आहे; याकोबाचा देव आम्हास आश्रय आहे. हे सैन्यांच्या परमेश्वरा, जो माणूस तुजवर आशा ठेवितो तो धन्य. हे परमेश्वरा, तारण कर; आम्ही हाक मारितों त्या दिवशीं राजाने आम्हास उत्तर द्यावें. तूं आपल्या लोकांस तार आणि आपल्या वतनाला आशीर्वाद दे; त्यांचा मेंढपाळ असा हो; आणि त्यांस सर्वकाळ वाहा. आमचा जीव परमेश्वराची वाट पाहतो; तो आमचें सहाय व आमची ढाल आहे. वास्तव आमच्या हृदयाचा संतोष त्यावर होईल, कांतर आम्ही त्याच्या पवित्र नामावर आशा ठेविली आहे. हे परमेश्वरा, जसी आम्ही तुजवर आशा ठेविली आहे, तसी तुझी दया आम्हावर होवो. हे परमेश्वरा, तूं आपली दया आम्हास दाखीव, आणि आपलें तारण आम्हास दे. तूं आमच्या सहायासाठीं ऊठ आणि आपल्या दयेमुळें आम्हास खंडून सोडीव. मी तुझा देव परमेश्वर ज्याने तुला मिसरदेशांतून वर आणिलें, तो मी आहें;

तू आपलें तोंड उघड, म्हणजे मी तें भरीन. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य. परंतु म्या तुझ्या दयेवर आशा ठेविली आहे; तुझ्या कडून जें तारण त्यामुळें माझें त्दय हर्षित होईल.

ארוממך יי गीत ३०

לדוד ברכי נפשי את יי गीत१०३

יי הוא האלהים परमेश्वर तोच देव आहे; परमेश्वर तोच देव आहे. (दोन वेळा.)

יימלך परमेश्वर राज्य करितो; परमेश्वरानें राज्य केलें; परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. (दो. वे)

והיה יי למלך आणि परमेश्वर सर्व पृथ्वीचा राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच. हे परमेश्वरा, आमच्या देवा; आम्ही तुझ्या पवित्र नामानें उपकार मानावे, आणि तुझ्या स्तुतीनें उत्सव करावा, म्हणून तूं आम्हास तार आणि राष्ट्रांमधून आम्हास एकवट कर. इस्राएलाचा देव याचे धन्यवाद सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंतहि व्हावे; तेव्हां सर्व लोकांनी तथास्तु बोलून परमेश्वराची स्तुति करावी. प्रत्येक श्वासवानानें परमेश्वराला स्तवावें. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

למנצח מזמור לדוד गीत १९

רננו צדיקים ביי गीत ३३

לדוד בשנותו गीत ३४

תפלה למשה गीत ९०

ישב בסתר עליון गीत ९१

למנצח על הגתית לאסף गीत ८१

מזמור שירו ליי गीत ९८

שיר למעלות אשא עיני गीत १२१

שיר המעלות לדוד שמחתי गीत १२२

שיר המעלות אליך נשאתי गीत १२३
שיר המעלות לולי יי गीत १२४
הללויה הללו את שם יי गीत १३५
הודו ליי כי טוב गीत १३६

ברוך שאמר जो बोलला आणि पृथ्वी झाली तो धन्य; जो बोलतो आणि करितो तो धन्य; जो ठरवितो व स्थापितो तो धन्य; ज्याने प्रारंभीं (जग) उत्पन्न केलें तो धन्य; जो पृथ्वीवर दया करितो तो धन्य; जो प्राणिमात्रांवर दया करितो तो धन्य; जो आपल्या भिणाऱ्यांस चांगलें वेतन देतो तो धन्य; जो अंधार घालवून प्रकाश आणितो तो धन्य; सदा जीवंत व सर्वकाळ स्थापित जो देव तो धन्य; ज्याच्यापुढें दुष्टाई टिकत नाहीं, ज्यास विसर पडत नाहीं, आणि जो तोंड ओळख धरीत नाहीं व लांच घेत नाहीं तो धन्य; तो आपल्या सर्व मार्गांत यथार्थ व सर्व कामांत दयाळू आहे: जो खंडून घेतो व सोडवितो तो धन्य आहे; ज्यानें आपले लोक इस्राएल यांस (शाब्बाथ असल्यास हा शाब्बाथ दिवस व) हा स्मरणाचा दिवस व पवित्र मेळामिळण्याचा हा सुदिन दिल्हा तो धन्य.

ברוך הוא וברוך שמו तो धन्य, त्याचें नाव धन्य, आणि त्याचें स्मरणहि सर्वकाळ धन्य आहे. हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, मोठ्या व पवित्र राजा, दयाळू बापा, आपल्या लोकांच्या मुखांकडून स्तविला जाणाऱ्या; आणि आपल्या यथार्थांच्या व भक्तांच्या जिव्हेकडून वाखाणिला व गौरविला जाणाऱ्या, तूं धन्य आहेस. आणि हे परमेश्वरा ! आमच्या देवा, तुझा सेवक दावीद याच्या गीतांकडून आम्ही तुझी स्तुति करूं, स्तवनाकडून व कीर्त्तनाकडून तुला आम्ही सन्मान देऊं, थोर मानूं, स्तवूं, गौरवूं आणि उंचावूं, आमचा राजा असें मान्य करूं, पवित्र मानूं व तुझें भय धरूं. आ.

णि हे आमच्या राजा, आमच्या देवा, सर्वकाळ जीवंत असणारा जो एकच, स्तविलेला, आणि ज्याचें नाम सदासर्वकाळ गौरविलेलें, आम्ही तुझें नाम स्मरूं; हे परमेश्वरा! आमच्या देवा, स्तवनांकडून गौरविलेल्या राजा, तूं धन्य आहेस.

מזמור שיר ליום השבת गीत ९२
יי מלך गीत ९३
מזמור לתודה गीत १००

יהי כבוד יי परमेश्वराचें गौरव सर्वकाळपर्यंत होत जाईल; परमेश्वर आपल्या कृत्यांवर संतुष्ट होईल. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाव धन्य धन्य म्हटलें जावो. सूर्याच्या उगवतीपासून त्याच्या मावळतीपर्यंत परमेश्वराच्या नावाची स्तुति असो. सर्व राष्ट्रांवर परमेश्वर उंच आहे; त्याचें गौरव आकाशांत आहे. हे परमेश्वरा, तुझें नाम सर्वकालिक आहे; तुझें स्मरण, हे परमेश्वरा, पिढोपिढीं आहे. परमेश्वराने आपलें सिंहासन आकाशांत स्थापिलें आहे, आणि त्याचा राज्याधिकार सर्वांवर आहे. आकाशाने आनंद करावा; आणि पृथ्वीने हर्षावें; आणि तीं राष्ट्रांत सांगतात कीं, परमेश्वर राज्य करितो परमेश्वराने राज्य केलें, परमेश्वर सर्वकाळ राज्य करील. परमेश्वर सदासर्वकाळ राजा आहे; त्याच्या देशांतून राष्ट्रांचा नाश झाला आहे. परमेश्वर लोकांचा विचार नाहींसा करितो; मुलुखांच्या योजना निरस करितो. मनुष्याच्या मनांत बहुत कल्पना असतात, परंतु जो परमेश्वराचा संकल्प तोच ठरेल. परमेश्वराचा विचार सर्वकाळ टिकतो; त्याच्या मनांतल्या योजना पिढोपिढीं चालतात. कारण तो बोलतांच, ती (पृथ्वी) झाली; त्यानें आज्ञा करितांच ती स्थिर राहिली. कांतर परमेश्वराने सीयोन निवडून घेतलें, आपल्या राहण्यासाठीं इच्छिलें आहे कांकीं परमेश्वराने आपल्यासाठीं याकोब, आपलें स्वकीयधन

होण्यासाठीं इस्राएल निवडून घेतला आहे. कांतर परमेश्वर आपल्या लोकाला सोडीत नाहीं; आणि आपल्या वतनाला टाकीत नाहीं. तथापि तो ममताळू आहे, यास्तव तो अन्यायाची क्षमा करितो, नाश करीत नाहीं; तो बहुत वेळ आपला राग टाळितो आणि आपला सर्व संताप चेतवीत नाहीं. हे परमेश्वरा, तारण कर; आम्ही हाक मारितों, त्यादिवशीं राजाने आम्हास उत्तर द्यावें.

אשרי יושבי ביתך जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, तें धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५
הללויה הללי נפשי गीत १४६
הללויה כי טוב गीत १४७
הללויה הללו את יי गीत १४८
הללויה שירו ליי गीत १४९
הללויה הללו אל בקדשו गीत १५०

ברוך יי לעולם परमेश्वराची सर्वकाळ स्तुति असो. आमेन व आमेन. यरूशालेमांत वस्ति करितो जो परमेश्वर त्याची सीयोनांतून स्तुति असो. तुम्ही परमेश्वराचें स्तवन करा. परमेश्वर देव इस्राएलाचा देव, त्याची स्तुति असावी; केवळ तोच आश्चर्य कृत्यें करितो. त्याच्या गौरवी नामाची स्तुति सर्वकाळ ही असावी, आणि त्याच्या गौरवाने सर्व पृथ्वी भरली जावी. आमेन व आमेन.

ויברך דוד अणखी दावीदाने सर्व समुदायाच्या देखतां परमेश्वराची स्तुति केली; तेव्हां दावीदाने म्हटलें "हे परमेश्वरा, इस्राएलाच्या देवा, आमच्या बापा, सर्वकाळापासून सर्व-

काळपर्यंत तुझी स्तुति व्हावी. हे परमेश्वरा, मोठेपणा, व पराक्रम व तेज व जय व मान, हीं तुझीं; कारण कीं जें आकाशांत व पृथ्वींत तें सर्व तुझें; हे परमेश्वरा, राज्य आणि सर्वांवरला मुख्य अधिकार तुझा आहे. संपत्ति व गौरवहि तुझ्याकडून होतें, आणि तूं सर्वांवर अधिकार करितोस; तुझ्याच हातीं शक्ति व पराक्रम, आणि सर्वांस मोठेंपण व शक्ति देणें हें तुझ्या हातीं आहे. तर हे आमच्या देवा, आतां आम्हीं तुझे उपकार मानितों, आणि तुझ्या अतितेजस्वी नामाची स्तुति करितों. आणि तुझें गौरव विशिष्ट नाम सर्व स्तुति व प्रशंसा यांवरतीं उंचावलेलें असतां वंदिलें जावें. तूंच तूं मात्र परमेश्वर आहेस; त्वां आकाशें, आकाशांचीं आकाशें व त्यांचीं सर्व सैन्यें, पृथ्वी व जें कांहीं तिजवर आहे, समुद्र व त्यांतलें सर्व उत्पन्न केलेलें व तीं सर्व तूं वाचवितोस व आकाशाचीं सैन्यें तुझें भजन करितात. तूं परमेश्वर देव आहेस, ज्या त्वां आब्राहामाला निवडून खास्द्यांच्या ऊर गावांतून काढून घेतलें, आणि त्याचें नाम आब्राहाम ठेविलें. आणि त्याचें मन तुजपुढें विश्वासू असें सांपडलें, आणि खनानी, हित्ती, अमोरी व परिज्झी व यबूसी व गिर्गाशी, यांचा देश त्याच्या संततीला द्यायाला त्यासीं करार केला, आणि आपलीं वचनें खरीं केलीं आहेत, कांकीं तूं सात्विक आहेस. आणि त्वां मिसरांत आमच्या पूर्वजांची पीडा पाहिली, आणि सूफ समुद्राजवळ त्यांची आरोळी ऐकिली. आणि फारोवर व त्याच्या सर्व चाकरांवर व त्याच्या देशाच्या सर्व लोकावर अद्भुतें व उत्पात केले, कांकीं त्यांनी त्यांजवर गर्व केला असें त्वा जाणिलें, आणि आजच्या प्रमाणे आपल्याला नाम प्राप्त केलें. तेव्हां त्वां त्यांपुढें समुद्र दुभागला, मग ते समुद्रामधून कोरड्या भूमीवरून पार गेले, आणि त्यांच्या पाठीस जे लागले, ते त्वां जसा धोंडा खोल पाण्यांत तसे अगाधांत टाकून दिल्हे.

" ויושע " तसें त्या दिवशीं परमेश्वराने इस्राएलास मिसऱ्यांच्या हातांतून सोडविलें, आणि इस्राएलाने समुद्राच्या काठीं मिसरी मेलेले पाहिले. तेव्हां जो मोठा पराक्रम परमेश्वराने मिसऱ्यांवर केला, तो इस्राएलाने पाहिला; तेव्हां लोकांनी परमेश्वराचें भय धरिलें आणि परमेश्वरावर व त्याचा सेवक मोशे यावर भरंवसा ठेविला.

אז ישיר משה मग इस्राएलाच्या संतानासुद्धां मोशाने परमेश्वराला हें गायन गाऊन असें म्हटलें कीं, परमेश्वराला मी गाईन, त्याने तर जयच जय केला आहे; त्याने घोडा व त्यावरील स्वार समुद्रांत टाकिला आहे. परमेश्वर माझें बळ व कीर्त्तनपात्र, कांकीं तो माझा तारण झाला आहे; तो माझा देव, म्हणून मी त्याचें गौरव करीन; तो माझ्या पूर्वजांचा देव, म्हणून मी त्याला थोर मानीन. परमेश्वर युद्ध करणारा, त्याचें नाम परमेश्वर. त्याने फारोचे रथ व त्याचें सैन्य समुद्रांत टाकिलें आहे; त्याचे निवडलेले सरदारहि सूफ समुद्रांत बुडाले. जळानी त्यांस झांकिलें, ते धोंड्यासारिखे तळीं गेले. हे परमेश्वरा, तुझा उजवा हात बळाने महान झाला; हे परमेश्वरा, तुझ्या उजव्या हाताने शत्रूला आपटून टाकिलें आहे. त्वां आपल्यावरील उठणाऱ्यांस आपल्या अतिथोरपणाने पाडिलें आहे; त्वा आपला मोठा संताप लाविला, याकडून ते भुसासारिखे नष्ट झाले. तेव्हां तुझ्या नाकपुड्यांच्या स्वासाने पाणी गोळा झालें, राशीसारिखे ओघ उभे राहिले, समुद्राच्या पोटांत जळें थिजलीं. शत्रूने म्हटलें, मी पाठीस लागेन, मी आटोपीन, मी लूट वांटीन, माझा जीव त्याकडून तृप्त होईल; माझी तरवार उपसीन, माझा हात त्यांचें ग्रहण करील. त्वा आपल्या वाऱ्याने फुंकिलें; समुद्राने त्यांस झांकिलें; ते शिस्या सारिखे महापाण्यांत बुडाले.

हे परमेश्वरा, देवांमध्यें तुझ्या सारिखा कोण! पवित्रतेने तुझ्या सारिखा महान कोण! (तूं) स्तवण्याविषयीं भयमान, चमत्कार कर्त्ता आहेस. त्वां आपला उजवा हात लांबविला, पृथ्वीने त्यांस गिळिलें. त्वां हे खंडून घेतलेले लोक दयेने आणिले, आपल्या सामर्थ्याने आपल्या पवित्र स्थानाकडे नेले. राष्ट्रें ऐकून कांपतील, आपलेशेतांतील राहणाऱ्यांस दुःख व्याप्त करील. तेव्हां अदोमाचे अग्रसर विस्मित होतील; मोआबी बळाढ्य यांस कंप व्यापील; खनानांतील सर्व राहणारे विरून जातील. भय व घाबरेपण त्यांवर पडेल, तुझ्या मोठ्या भुजामुळें ते दगडासारिखे एथपर्यंत स्तब्ध होतील कीं, हे परमेश्वरा, तुझे लोक पार जातील, जें लोक त्वां विकत घेतले ते पार जातील. तोंपर्यंत तूं त्यांस आणून आपल्या वतनाच्या डोंगरांत लावसील; हे परमेश्वरा, तें ठिकाण त्वां आपल्या वस्ती साठीं केलें आहे; हे प्रभू, तें पवित्र स्थान तुझ्या हातानी सिद्ध केलें आहे. परमेश्वर सदांसर्वकाळ राज्य करील. (परमेश्वराचें राज्य सर्वकाळ आणि सर्वकाळांच्या सर्वकाळ स्थापित आहे) कांतर फारोचे घोडे त्याच्या रथासुद्धां व त्याच्या स्वारांसुद्धां समुद्रांत गेले, आणि परमेश्वराने समुद्राचें पाणी त्यांजवर फिरवून आणिलें, परंतु इस्राएलाचीं संतानें समुद्राच्यामधून कोरड्या भूमीवरून गेलीं.

כי ליי המלוכה कांतर राज्य परमेश्वराचें आहे; तोच राष्ट्रांवर अधिकार करितो. आणि एसावाच्या पर्वताचा न्याय करायाला सीयोन पर्वतावर तारणारे चढतील; आणि राज्य परमेश्वराचें असत जाईल. आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या शास्त्रांतहि लिहिलें आहे कीं, हे इस्राएला, ऐक; परमेश्वर, आमचा देव आहे; आणि परमेश्वर एकच आहे.

שחרית पाहांटेची प्रार्थना

पहिल्या दिवशीं

אלהי אל תדינני हे देवा, माझ्या अतिक्रमा प्रमाणे माझा न्याय करूं नको; आणि माझीं (दुष्ट) कृत्यें माझ्या उदराकडे (जीवाकडे) मोजूं नको. तूं आपल्या दयेने मजवर कृपा कर, ह्मणजे मी जगेन; हे देवा मी विनंती करितों कीं, मला योग्य फल (दंड) देऊं नको. माझ्या मनांतील अहंकार मी तुजपुढें नमवितों; आणि दुःखाने आपला झगा नव्हे, परंतु आपलें मन फाडितों. माझ्या उल्लंघनामुळें, पुष्कळ दुष्टाईमुळें, आणि मूर्खपणामुळें माझें मन मूर्छित होऊन मी उभा आहें. मी द्राक्षरसाने मस्त झालों नाहीं, परंतु दुःखाने गांजलेला असून जसा नाहींसाच होतों, कारण तुझ्या मार्गापासून मी आपलीं पावलें व पांय वळविले. मी काय उत्तर देऊं? आणि सहाया· करितां कोठें वळूं? न्यायाच्या दिवशीं मी कोठें पळूं? आणि मला कोण आश्रय देईल? न्या जाणून केलेलीं पापें माझ्या तोंडाच्या व दृष्टीच्या समोर आहेत; आणि माझी लज्जा माझ्या समोर व माझ्या जवळच आहे. माझ्या पापांची घाण माझ्या शेजाऱ्यांस येती; म्हणून ते मजपासून पळतात, आणि माझ्या शीमेपासून दूर जातात. मी अशुद्ध मनाचा असून वांकडा वर्तणारा बंडखोर असा आहें; कारण माझें मन मजमध्यें सर्व पापांकडे वळणारें आहे. जेव्हा तीं माझ्या मनांत आलीं, तेव्हां मी त्यांस ओळखिलें, मी आपल्या उजव्या व डाव्या बाजूकडेस त्यांस पाहिलें. जसें धसकट (इकडे तिकडे उडविलें जातें,) तसें (पापाकडे वळवायास) माझा पाठलाग केला व मला ओढलें; यद्यपि माझा हट्ट मोडला व निचावला नाहीं. हे परमेश्वरा, काकळूत करितांना माझे डोळे तुजकडे लागले आहेत; माझ्या

दुःखाच्या समयीं माझें हार्द्र व माझी वाणी ऐक. माझ्या वतनाचा वांटा, माझ्या सामर्थ्याचा खडकरूप आश्रय, माझें प्रीतिपात्र, आशापात्र, आणि माझें बळ व शक्तिहि तूंच आहेस. तुजपुढील स्थापित मार्गानें तूं मला ने; आणि माझा मार्ग स्थिर कर. माझीं ऋणें मला क्षमा कर; आणि मूर्ख मेंढपाळासारिखें भटकणाऱ्या माझ्या मनास तूं सरळ कर. मी तुझा दरवाजा ठोकीत असतां माझें कन्हणें ऐक; आणि माझ्या यातना व घाय बरे कर. हे माझ्या महत्वाच्या खडकरूप आश्रया, आणि या दासत्वांत व नीचत्वामध्यें आधार देणाऱ्या, माझ्या अपराधांपासून मला सोडीव. माझ्या दुःखास सुगंध, माझ्या मनांतील हर्ष, आणि माझ्या कन्हण्यांतील व शोकांतील आनंद (तूंच आहेस.) मी शोक करीत तुजपुढें येऊन नमतों; आणि तुजपासून क्षमा मागतांना मजमध्यें कांहींच सामर्थ्य राहत नाहीं. हे आनंता ! पाहा, तुझी आठवण माझ्या मनांत व माझ्या लक्षांत रात्रंदिवस आहे. हे सत्याच्या देवा, माझी विनंती मान्य कर, आणि मला प्रसन्न हो; आणि माझें स्तुतिरूप अर्पण तुला संतोषित करो. माझ्या आयुष्याच्या नेमलेल्या दिवसांत तूं मला चालीव; आणि या क्षणभंगुर जगांतील दिवसांत तूं माझें मेंढवळण कर. मजवर दया करून माझीं दुष्कर्में मला क्षमा कर; आणि माझें कीर्त्तन माहाली आणि मुशी * यांच्या कीर्त्तनाप्रमाणे मान्य कर. जेव्हां तूं घडिवलेले पदार्थ न्यायांत आणशील, तेव्हां हे देवा, माझ्या अतिक्रमाप्रमाणे माझा न्याय करूं नको.

רעה בשבטך जे तारणाची वाट पाहतात, त्या लोकांचें तूं आपल्या काठीनें मेंढवळण कर; कारण आज ते तुझ्या न्यायापुढें उभे आहेत.

מחשבות אוני मी आपले अभिमानी विचार

* माहाली आणि मुशी हे दोघे लेवी होते.

आपल्या मनांत ठेवितों (आणितों), आणि माझ्या अहंकारामुळें मला लज्जा प्राप्त होती व मी घाबरतों; आणि पाहा, मी माझ्या पुष्कळ अपराधांविषयीं पश्चात्ताप करितों; आणि आज मी आपलीं पापें आठवितों.

שקרי סתריו ज्या लबाड्या त्याने गुप्तांत मूर्खपणाने केल्या, त्यांविषयीं क्षमा मागायास त्याचे अवयव भयभीत होतात; ज्या मनुष्याचीं वचनें पापाने विटाळलीं आहेत, तीं कशीं वाढतील! त्याचे विचार बाळपणापासून सर्व दिवसांमध्यें केवळ वाईट आहेत.

הוצא שבוים पाडाव करून नेलेल्यांस त्यांजवर जुलूम करणारांच्या हातांतून तूं सोडीव; त्यांच्या पापापासून त्यांस शुद्ध करून; (आणि त्यांजवर तुझी) प्रसन्नता होऊं दे; अहो खंडून काढलेले लोकांनो! ऐका, तुह्मी परमेश्वराला लगटून राहिलां; ह्मणून तुह्मी सर्व आजपर्यंत जिवंत आहां.

שואף כמו עבד जसा सेवक आपल्या धन्याच्या हातांकडून (वेतन मिळविण्याची) आवड धरितो, तसी (इस्राएलाने तुझी) आवड धरिली आहे; ह्मणून तूं आपली दया त्यावर विस्तार आणि त्याचें कर्जखत फाडून टाक. שואף

לולי אמירתך तुह्मी फिरा, ह्मणजे मी फिरेन असें तुझें वचन नसतें, तर तो अगदीं कुजल्या सारिखा होऊन त्याची स्थिति नीच झाली असती. שואף

משעול תשובתך (तुजपुढें) उभा राहिलेल्या सेवकासाठीं तुझा पश्चात्तापाचा संकोचित मार्ग उघड; त्याने तुझी प्रार्थना केल्या अगोदर त्याचीं वचनें तूं सिद्ध कर. שואף

הה לי माझे पिकलेले केंस विखरलेले आणि माझें मन मजमध्यें पापाच्या सागरांत पडलेलें असें जेव्हां मी पाहतों, तेव्हां मला हाय हाय! तें कष्टरूपी जलांत बुडालें आहे. שואף

נשמת מיחליך तुझी वाट पाहाणाऱ्यांचा जीव माझ्या मनाशीं निश्चयपूर्वक सांगतो, कीं फिरल्या नंतर (पश्चात्ताप केल्यानंतर) तो पुनः अन्याय करणार नाहीं.

שופט כל הארץ हे सर्व जगाच्या न्यायाधीशा, आणि (सर्वांस) न्यायांत उभे करणाऱ्या, तुला मी विनंती करितों कीं, दरिद्री लोकांकरितां तूं जीवन व दया बांध (वाढीव). आणि ही पाहांटेची प्रार्थना तूं होमा बद्दल मान्य कर.

עולת הבוקר जो सकाळचा होम ह्मणजे नित्य होम (त्याबद्दल) आमची प्रार्थना मान्य कर.

לובש צדקה हे यथार्थता पांघरणाऱ्या व धारण करणाऱ्या, अधिकार तुलाच मात्र (शोभतो); आणि जर आम्हामध्यें काहींच सत्कर्में नसलीं, तर (आह्माकरितां) हेब्रोनांत निजणारांची* आठवण कर. हे परमेश्वरा, ते तुजपुढें आठवणी करितां सर्वकाळ चढोत (असोत). עולת הבוקר

מטה כלפי חסד हे दयेकडे वळणाऱ्या आणि मनुष्यास जीवनाकडे चालविणाऱ्या, तूं आपल्या लोकाकडे दयेने फीर; त्याजवर दया कर ह्मणजे तो जगेल. आणि त्याच्या कपाळावर सर्वकाळ राहील, असी खूण लिही (कर.) עולת הבוקר

הטיבה ברצונך आपल्या प्रसन्नतेने माझें पवित्र नगर सीयोन याचें बरें कर; आणि तूं आपल्या घरांत माझ्या पवित्रांस जागा व कीर्त्ती दे; आणि सर्वकाळ जळत राहावयास इशायच्या पुत्राचा दिवा तूं सिद्ध कर. עולת הבוקר

---

* आब्राहाम व सारा, इसहाक व रिबका, याकोब व लेआ, आणि कोणी ह्मणतात कीं आदाम व हाव्वा हीं उभयतांहि तेथेंच पुरलीं गेलीं.

חזקו ויאמץ לבבכם अहो माझ्या लोकांनो, ईश्वरामध्यें व त्याच्या सामर्थ्यामध्यें तुह्मी धैर्य व बळ धरा; तुह्मी जगावें ह्मणून एकापुढें एक त्याचे प्रमाण नेम सांभाळा, (मग तो तुमच्या पापाचें प्रायश्चित्त करील, आणि तुह्मास आश्रय देऊन क्रोधाच्या समयीं दया आठवील;) परमेश्वरास व त्याच्या सामर्थ्यास तुह्मीं शोधा, आणि सर्वकाळ त्यापुढें विनंती करा. עולת הבוקר

בני עבדיך तुझ्या सेवकांचीं लेंकरें आज तुझ्या देवालयांत आलीं आहेत; (आणि तीं आपल्या पापाविषयीं (तुजपुढें) ओरडत आणि आपल्या अतिक्रमांविषयीं शोक करीत आहेत; तीं आपलें हाडें ओतीत (कळवीत) आणि जीवन मागत आहेत;) तीं आपल्या पूर्वजांच्या पुण्याची आठवण करितात, हे परमेश्वरा! ते (त्यांचे पूर्वज) त्यांजवर जगोत (त्यांची आठवण सर्वकाळ राहो;) तूं त्यांस आठीव आणि ते सर्वकाळ, परमेश्वरा समोर असोत. עולת הבוקר

दुसऱ्या दिवशीं

יום זה דר במרומים उंचात वस्ति करणारा आणि सर्व गुप्त गोष्टी जाणणारा खडकरूप आश्रय, आज सर्व लोकांस, त्यांच्या कृत्यांची झडती घेण्यासाठीं न्यायांत उभे करितो; मी विनंती करितों कीं, ज्या वेळीं ते सर्व ह्मणतात कीं, याच दिवशीं पृथ्वीने गर्भ धरिला (उत्पन्न झाली); आणि याच दिवशीं पृथ्वीवरील सर्व घडलेले पदार्थ न्यायांत उभे केले जातात; तेव्हां इस्राएलांसाठीं सर्वकाळचा करार तूं आठीव, आणि त्यांची वाणी ऐकून लक्षांत ठेव. היום

צדקת איתן हे महत्त्ववान व गौरवयुक्त देवा दरिद्र्यां करितां व धिःकारलेल्यां करितां दृढ विश्वासू* आणि शेरडा

* आब्राहाम.

प्रमाणे बांधला गेलेला एकुलता,+ यांचें पुण्य तूं आठीव. गरीब व दुबळ्यांवर प्रकाशीत हो व थोर मानिला जा; गांजलेल्यांनी लज्जित होऊं नये. היום חמול בנים तुजपुढें आपलें मन ओतणाऱ्या (हाई सांगणाऱ्या) व धुळीसारिखे झालेल्या लेंकरांची तुला करुणा येवो; आजच्या नेमलेल्या वेळीं ते आठवणीनें व करणा वाजवून तुझा राज्याधिकार मान्य करितात; आणि नऊ धन्यवाद योजून तितक्याच वेळा (शोफार) वाजवितात;* त्यांची स्तुति व त्यांचें कीर्त्तन तुला मेंढरांगुरांपेक्षां अधिक चांगलें वाटो. היום קול שופר तूं त्यास शोफाराची वाणी ऐकीव, ह्मणजे तो तुझ्या वस्तिस्थानाकडे चढून जाईल; आणि तो प्रार्थना करीत व करणा वाजवीत असतां, आतां तूं आपला कान लाव; हे माझ्या तारणाच्या खडकरूप आश्रया! माझा न्याय तुजपुढून काढून टाकिला जावो; हे माझ्या राजा! तूं आपली दृष्टी मजवरून लपवूं नको. היום

दुसऱ्या दिवशीं.

יוד योद.

יי יום לך אערוך हे परमेश्वरा, आज तुजकडे मी आपली प्रार्थना सिद्ध करितों; हे परमेश्वरा, माझी वाणी व विनंती ऐक.

हे परमेश्वरा, तुझा हात दाखीव, व तुझें सामर्थ्य प्रगट कर; आणि हे परमेश्वरा, मजवर दया कर.

हे परमेश्वरा, माझें मन मजमध्यें घाबरतें, आणि हे परमेश्वरा मी दुःखानें आच्छादलों आहें.

+ इसहाक. * टीका ६

हे परमेश्वरा, चांगल्याकरितां माझी आठवण (तुजपुढें) चढूं दे; आणि हे परमेश्वरा, माझी आठवण करून मला दर्शन दे.

हे परमेश्वरा, तुझ्या तारणाची मी सर्वकाळ वाट पाहतों; हे परमेश्वरा, माझें सांत्वन करायास तुझी दया होऊं दे.

हे परमेश्वरा, माझा घडविणारा व खडकरूप आश्रय तूंच आहेस. हे परमेश्वरा, तुजवांचून माझा सहायकारी कोण आहे?

हे परमेश्वरा, मजविषयीं तुझ्या दयेला द्रव येऊं दे; आणि हे परमेश्वरा माझीं पापें मनावर धरूं नको.

हे परमेश्वरा, माझे विचार तुझें एकत्व (मान्य करितात); आणि माझा जीव ह्मणतो कीं, परमेश्वर माझा वांटा आहे.

हे परमेश्वरा, माझें मन दुःखांत बुडालें आहे; यद्यपि हे परमेश्वरा, मी आपला जीव तुजपुढें ओतितों.

हे अनंत परमेश्वरा ! तूं आपल्या नावांकरितां (माझें) ऐक; आणि हे परमेश्वरा, आज माझी प्रार्थना घे (मान्य कर.)

५ गाहे.

हे परमेश्वरा, पाहा, माझे विचार तुझ्या हातीं आहेत; आणि हे परमेश्वरा, माझें सर्व गुह्य तुजपुढें प्रगट आहे.

हे परमेश्वरा, माझ्या घायास आरोग्यता होऊं दे; आणि हे परमेश्वरा, आपले डोळे उघडून ते पाहा.

हे परमेश्वरा, सरळपणांत माझ्या पायांस स्थापित कर; हे परमेश्वरा, मंडळीमध्यें मी तुझ्या नावाची स्तुति करीन.

हे परमेश्वरा, जोंपर्यंत तूं पाहीस आणि लक्ष देस; तोंपर्यंत हे परमेश्वरा, पाहा, मी तुझ्या तारणाची वाट पाहीन.

हे परमेश्वरा, माझ्या ओरडण्याकडे कान लाव, हे परमेश्वरा, मजवर दया करून (माझें) ऐक.

ואו वाव.

हे परमेश्वरा, माझ्या देवा, मी तुझी वाट पाहातों, आणि हे परमेश्वरा, माझें मन तुझ्या तारणाची आवड धरितें.

हे परमेश्वरा, तुझ्या सेवकाचें बरें होण्याविषयीं त्यास हडप दे; आणि हे परमेश्वरा, त्याचीं पापें मनावर धरूं नको.

हे परमेश्वरा, तो तुझा बंदिवान असा कोठपर्यंत राहील? आणि हे परमेश्वरा, तो आपल्या उल्लंघनाच्या बंदांत कोठपर्यंत बांधलेला राहील?

हे परमेश्वरा, माझ्या मनांत माझे सर्व विचार एकत्र होतात; हे परमेश्वरा, दुःखांत असतांहि ते तुझें एकत्व (मान्य) करितात.

हे परमेश्वरा, तुजमध्यें मी हर्ष करीन; हे परमेश्वरा, दरिद्र्यास त्याच्या सर्व काळजीपासून सोडीव.

हे परमेश्वरा जगताच्या स्वामी, मी तुझी वाट पाहीन; कारण हे परमेश्वरा, जे तुझी वाट पाहातात त्यासर्वांशीं तूं चांगला आहेस.

חה हे

हे परमेश्वरा, जो तुझी दया शोधितो, त्याकरितां, हे परमेश्वरा तूं आपला राग थांबीव.

हे परमेश्वरा, पाहा, मी (तुजपुढें) काकळूत पाडितों (करितों;) कारण हे परमेश्वरा तुला हाक मारिल्या पूर्वीं, तूं मला उत्तर देशील.

हे परमेश्वरा, तूं आपल्या दयेने मला निरोगी कर; आणि हे परमेश्वरा, माझ्या मूर्च्छित मनास आरोग्यता होण्यास आज्ञा कर.

हे परमेश्वरा, दुःखामुळें मी रोगी झालों आहे; आणि हे परमेश्वरा, रात्रंदिवस माझा जीव घाबरा होतो.

हे परमेश्वरा, खोल स्थानांतून मला चवीव; आणि हे परमेश्वरा, तूं आपल्या सेवकास दासत्वांतून परतीव.

נשמת כל חי हे परमेश्वरा! आमच्या देवा, सर्व प्राण्यांचा आत्मा तुझ्या नामाला धन्य म्हणतो; आणि हे आमच्या राजा! सर्व मांसमयांचा जीव तुझ्या स्मरणाचें नित्य गौरव करून प्रशंसा करितो. सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत तूंच देव आहेस; आम्हास तुजवांचून कोणी राजा, खंडून घेणारा, तारणारा, मुक्त करणारा, सोडविणारा, आणि दुःखाच्या व संकटाच्या समयीं उत्तर देणारा व दया करणारा कोणी नाहीं आम्हास तुजवांचून राजा, सहाय कर्त्ता व आश्रय देणारा कोणी नाहीं. हे आदिकाळच्या व अंतकाळच्या देवा! सर्व प्राण्यांच्या देवा! सर्व उत्पत्तीच्या स्वामी! तूं सर्व स्तुतींकडून वर्णिला आहेस; तूं आपल्या जगाला दयेने आणि सर्व प्राण्यांस कृपेने चालवितोस. आणि परमेश्वर जागृत आहे; तो निजत नाहीं व झोंप घेत नाहीं; झोंपी गेलेल्यांस सावध करितो; निजलेल्यांस जागृत करितो; मेलेल्यांस जीवंत करितो; रोग्यांस निरोगी करितो; आंधळ्यांस दृष्टी देतो; ओणव्यांस उभे करितो; मुक्यांस वाचा देतो; गुप्त गोष्टी प्रगट करितो; (हे देवा,) तुजपुढेंच मात्र आम्ही नमन करितों.

ואלו פינו जरी आमचे मुखांत सागराप्रमाणे गायन; आमच्या जिव्हेंत त्यांतील लाटांच्या गर्जनेसारिखी स्तुति; आमच्या ओठांत विस्तीर्ण अंतराळासारिखें कीर्त्तन; आणि जरी आमचे डोळे सूर्य व चंद्रा यांसारिख्या तेजाने भरले आहेत; आमचे हात आकाशांतील गरुडा सारिखे पसरले आहेत; आणि आमचे पाय हरणासारिखे चपळ आहेत; तरी हे परमेश्वरा!

आमच्या देवा, पूर्वीं त्वां आम्हावर व आमच्या पूर्वजांवर जे हजारो व लक्षावधि उपकार, चिन्हें व चमत्कार केले आहेस, त्यांतील एकाकरितांहि तुझें स्तवन करायास; आणि हे आमच्या राजा, तुझें नाम सुवंदित करायास आह्मामध्यें पूर्णता नाहीं. हे परमेश्वरा! आमच्या देवा, त्वां आह्मास मिसरांतून काढिलें; दासांच्या वस्तींतून त्वां आम्हांस सोडविलें; दुष्काळांत अन्न पुरविलें; सुकाळांत आम्हास पोषिलें; तरवारीपासून आम्हास मुक्त केलें; पटकींतून आम्हास वांचविलें; आणि वाईट व पुष्कळ रोगांपासून आम्हास सोडविलें. एथपर्यंत (आजपर्यंत) तुझ्या दयेने आमचें सहाय केलें, आणि तुझ्या कृपेने आम्हास सोडिलें नाहीं; म्हणून जे निरनिराळे अवयव त्वां आम्हामध्यें (उत्पन्न) केले आहेस; जो आत्मा व जीव आम्हामध्यें फुंकिला आहेस; आणि जी जीभ आमच्या मुखांत ठेविली आहेस; पाहा! तीं, हे आमच्या राजा, तुझ्या नावाला सर्वकाळ स्तवितील, धन्य म्हणतील, वाखाणितील, गौरव करितील आणि गातील. कारण सर्व मुखें तुझेंच स्तवन करितील; सर्व जिव्हा तुलाच वाखाणितील, सर्व डोळे तुजकडेसच लागतील; सर्व गुडघे तुजपुढेंच टेंकले जातील; सर्व बांधे (मनुष्यांचीं शरीरें) तुजपुढेंच नमन करितील; सर्व मनें तुझेंच भय धरितील; आणि सर्व अंतर्यामें व गुर्दकमळें तुझ्याच नांवाचें स्तवन करितील. जसें म्हटलें आहे कीं, माझीं सर्व हाडें म्हणतील कीं, "हे परमेश्वरा! तुझ्यासारिखा कोण? दीनापेक्षा जो शक्तिमान त्यापासून आणि दीनाला व दरिद्र्याला त्याच्या लुटणाऱ्यापासून तूं सोडवितोस; दीनाची विनंती तूं ऐकितोस आणि गरीबांच्या ओरडण्याकडे कान लाऊन त्याचें तारण करितोस." आणखी असें लिहिलें आहे कीं, "अहो नीतिमान, तुम्ही परमेश्वरा विषयीं हर्ष शब्द करा; कीर्तन करणें हें सरळांस शोभतें; सरळांच्या मुखांकडून तूं उचावला

जाशील; पुण्यवंतांच्या ओठांकडून सुवंदित होशील; यथार्थांच्या जिव्हेकडून पवित्र मानिला जाशील; आणि पवित्र लोकांमध्यें तुझी स्तुति केली जाईल."

במקהלות तुझे लोक इस्राएल यांच्या घराण्यांच्या दाहा हजारांच्या मंडळ्यामध्येंहि (असें तुझें गौरव केलें जाईल); कारण सर्व उत्पन्न केलेले पदार्थांचा असा धर्म आहे कीं, इशायचा पुत्र दावीद याच्या गीतांपेक्षां व स्तुतिपेक्षां त्यानी तुझी अधिक स्तुति करावी, स्तवन करावें, सुवंदन करावें, गौरव करावें, उंचावावें, सन्मान करावा, आणि वाखाणावें.

ובכן ישתבח שמך यास्तव, हे आमच्या राजा; तुझें नाम सर्वकाळ सुवंदित असो: आकाशांत व पृथ्वींत तूंच सर्वाधिकारी, मोठा, व पवित्र देव आहेस; कारण, हे परमेश्वरा आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, गायन व सुवंदन, स्तुति व कीर्त्तन, शक्ति व अधिकार, जयजयकार, मोठेपणा व सामर्थ्य, स्तवन व गौरव, पवित्रता व राज्य हें तुलाच, आणि धन्यवाद व उपकार स्तुति तुझ्याच मोठ्या व पवित्र नामाला शोभतात; आणि सर्वकाळांपासून सर्वकाळपर्यंत तूंच देव आहेस. हे परमेश्वरा! मोठ्या व स्तुतिकडून वर्णिलेल्या राजा, महत्ववान देवा, आश्चर्य कृत्यांच्या स्वामी, सर्व प्राण्यास उत्पन्न करणाऱ्या, सर्व कामांच्या धनी, कीर्त्तनाच्या गायनामध्यें आवड धरणाऱ्या, जगतांच्या जीवंत देव राजा, तूं धन्य आहेस. आमेन.

पाहिल्या दिवशीं हें बोलावें.

ידי רשים (हे देवा !) तुझ्या दरिद्री लोकांचे हात मोकळीक मिळवायास खंडणी भरण्यासाठीं अशक्त (खालीं) झाले आहेत, परंतु (सरळ) अंतःकरणाने व कडवटपणे (खेदाने) शोक करीत ते आपल्या उत्पन्न कर्त्या समोर आले आहेत; ते विलक्षण लोक असून दरिद्री होत आहेत, यद्यपि त्यांची प्रार्थ-

ना उंच (स्वरानें) चालत आहे; जेव्हां ते आपल्या मंडळगृहांत-एकवट होतात, तेव्हां याकोबाचा पवित्र आणि इस्राएलाचा देव, यास पवित्र मानायाकरितां त्यांच्या कंठांत (मुखांत) स्तुति असते.

הלא אם סף जरी मंदिर व (पवित्र) भांडीं नाहिंसीं झालीं आहेत, आणि जरी एफोद[1], तेराफीम[2], पडदा, दर्शनीय भाकऱ्यांच्या पंक्ति, नित्यार्पणें व अधिक अर्पणें यांशिवाय ते आहेत, आणि जरी त्यांच्या अपराधांची क्षमा होण्याकरितां धूप आणि दयासनहि नाहीं; तरी इस्राएलांत सेराफीमां सारिखी ईश्वराची पवित्रता आहे; आणि दुःखांत असतां दासत्वाच्या घरांतहि (देशांतहि) देवाचें स्तवन करायास ते एकवट होतात; आणि इस्राएलाच्या पुत्रांचीं सैन्यांचीं सैन्यें याकोबाचा पवित्र व इस्राएलाचा देव यास पवित्र मानायास एकत्र होऊन जातात.

ואל נורשא तूं पूर्वीं त्यांस क्षमाशील देव, आणि खडकरूप आश्रय असा होतास, त्वां त्यांचा झेंडा करुबांवर आणि ताऱ्यांवर उंचावला, आपल्या नामानें आपल्या उंचस्थानांतून त्यांवर छाया केली, दूतांस त्यांचीं शस्त्रें वाहणारे नेमिले होते; परंतु पाहा, आतां त्यांच्या राजाचा व त्यांच्या सैन्याचाहि हात (सामर्थ्य) मोडला आहे, परक्यानें त्यांचें वतन घेऊन त्यांस हाकून लाविलें आहे; याकोबाचा पवित्र आणि इस्राएलाचा देव यास पवित्र मानायास इस्राएलाचें संतान राहिलें नाहीं असें झालें आहे.

דרור יקושה फासांत गुंतलेली चिमणी[3] गांविष्ठ

---

१ मुख्य उपाध्याचा झगा, ज्यावर ऊरपट लावीत असे तो.

२ शास्त्रांत ज्या ठिकाणीं तेराफीम हा शब्द सांपडतो तेथें बहुत करून शकून पाहाण्याच्या संबंधानें लावलेला आहे; ह्मणून तेराफीम हे शकून सांगणारे पदार्थ होते असें समजावें.

३ दासत्वांत पडलेले इस्राएल.

स्वामीच्या हातांतून सुटायास शोधितें; हे तिच्या आशा पात्रा! अगाध पाण्यांतून तिला काढ, आणि जेव्हां तूं तिच्या पूर्वजांचें पुण्य तोलून पाहतोस, तेव्हां तें हलकें न भरो; तुजकडे विनंती करायास जो दरिद्री त्वरित येतो त्यास दर्शन दे, त्याच्या पूर्वजांची पिढी आणि त्याचे सर्व मेलेले थोडक्याच वर्षांत जीवंत होवोत; आणि त्यांनी याकोबाचा पवित्र आणि इस्राएलाचा देव यास पवित्र मानावें, ह्मणून जसी दंहिवराने तसी त्यांस विश्रांति देऊन त्यांस सजीव कर.

המבורך जो खालच्या व वरच्या पदार्थांपेक्षां सर्व प्रकारें धन्य आहे, त्याजविषयीं व त्याच्या कृत्यांविषयींहि अग्नि, पाणी, आकाश व पृथ्वी जी अवलंबून राहिली आहे, हीं साक्ष देतात, कीं तीं किती महान व किती आश्चर्य कारक आहेत! त्याचे सेवक व त्याच्या हाताखालचीं शेरडें त्याच्या न्यायापुढें उभीं आहेत; सेलाह. ज्या दिवशीं तो आपल्या जगांतील (सर्व) मनुष्यांची झडती घेईल, तेव्हां दुष्टाईचें मुख बंद केलें जाईल; आणि याकोबाचा पवित्र व इस्राएलाचा देव यास पवित्र मानायास इस्राएलाचें सर्व संतान त्याजमध्यें यथार्थ व प्रशंसित होईल.

दुसऱ्या दिवशीं हें बोलावें.

יה שמך हे अनतां! मी तुझें नाम उंचावीन, आणि तुझी यथार्थता लपवून ठेवणार नाहीं; मी ऐकिलें व विश्वासिलें आहे; मी त्याविषयीं विचारणार व शोध करणार नाहीं; मातीचा घडलेला (मनुष्य) आपल्या घडणारास, तूं काय करितोस? असें कसें ह्मणेल! मी त्याचा शोध केल्या अंतीं, तो सामर्थ्याचा दुर्ग व खडक रूप आश्रय, तेजस्वी व प्रदीप्त, आच्छादला व लपविला न जाणारा प्रकाश आहे, असा मला सांपडला.

ישתבח तो सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविला आणि वर्णिला असो.

הדר כבודך आकाश (मंडळ) उगवतांना व मावळतांना नमनकरून तुझ्या महत्वाचें तेज आणि तुझ्या हाताचें सामर्थ्य वर्णितें; आणि हे ओठांचें फल (शब्द) उत्पन्न, करणाऱ्या दगड, अग्नि आणि पाणी यांतून चालणारे दूत तुजविषयीं साक्ष देतात, आणि तुला स्तवितात कीं, तुला भुजा व हात नसतांहि तूं खालच्या व वरच्या पदार्थांस, प्राणिमात्रांस आणि आपल्या आसनास सांभाळतोस आणि कधींहि थकत नाहींस. ישתבח

ומי ימלל ज्याने आपल्या सत्यतेने आकाश उत्पन्न केलें, जो सर्वकाळ जीवंत आहे आणि जो आपल्या उंच वसति स्थानांत गुप्त असतो, त्याचे गौरवाचें वर्णन कोण करील! परंतु त्याने आपल्या घरच्या पुत्रास प्रसन्न होऊन आपलें माहात्म्य (साक्षांतपणाच्या) राहुटींत ठेवलें होतें; आणि तेथें आपली प्रतिमा दाखविण्यासाठीं दृष्टांत दाखविता झाला; परंतु त्याला कशाचाहि सारखेपणा व आकार नाहीं, आणि त्याच्या बुद्धीलाहि अंत नाहीं; त्याच्या भविष्यवाद्याच्या डोळ्यांनी उंच व थोर राजाच्या महात्मासारिखें मात्र कांहीं पाहिलें. ישתבח

דבר גבורות ज्याच्या पराक्रमाच्या गोष्टींस गणती नाहीं, त्याची स्तुति कोण करू शकेल! जो मनुष्य त्याच्या पराक्रमाची आठवण करायास त्या समजून घेतो, पृथ्वीस तिच्या शोभेमध्यें राखणाऱ्या देवावर आधार धरून राहतो, येतां जातां (सर्वकाळ) त्याचें भय धरितो, त्याच्या सर्व कृत्यांचें न्यायत्व मान्य करितो, आणि जें त्याने केलें, तें त्याने आपलें महत्त्व (दाखविण्याकरितां) केलें, आणि सर्व मनुष्यांचा न्याय करण्याकरितां त्याने एक भयंकर दिवस नेमिला आहे, असें जो प्रकारितो, तो धन्य. ישתבח

השתונן तूं आपल्या आत्म्याच्या गुह्याविषयीं जाण,

विचारकर आणि समजून घे. तूं काय आहेस ? तुझें मूळतत्व कोठून आहे ? तुला कोणी घडिलें ? तुला बुद्धि कोणी दिल्ही ? तुला कोणी उत्पन्न केलें ? आणि कोणाच्या सामर्थ्यानें तुला चलन वलन आलें आहे ? याकडे लक्ष दे; आणि देवाचें सामर्थ्य ध्यानांत आणून, आणि आपल्या गौरवाला (जीवाला) जागृत करून त्याचीं महान कृत्यें शोधून पाहा; मात्र त्याचा शोध करायास तूं आपला हात लांबवूं नको; कारण (तसें केल्यानें) तूं आदि अंताचा आणि गुह्य व खोल गोष्टीचा शोध केल्यासारिखें होईल.

קדיש לעילא पृष्ठ ७.

ברכו את יי सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य म्हणा.

ישתבח ויתפאר राजा, राजांचा राजा आणि पवित्र व धन्य जो, त्याचें नाम स्तविलें आणि गौरविलें जावो. पहिला तोच व शेवटलाहि तोच आणि त्यावांचून कोणी देव नाहीं. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नाम सुवंदित व सर्व स्तुती व प्रशंसेपेक्षां अधिक उंचावलेलें असो.

ברוך יי המבורך सुवंदित परमेश्वर सदां-सर्वकाळ धन्य असो.

ברוך אתה יי हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, उजेड घडणाऱ्या आणि काळोख उत्पन्न करणाऱ्या, शांति करणाऱ्या आणि सर्व पदार्थ उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस. सर्व तुला स्तवितील, सर्व तुला सुवंदितील आणि सर्व म्हणतील कीं, परमेश्वरासारिखा पवित्र कोणीच नाहीं. हे सर्वांस घडणाऱ्या, प्रतिदिवशीं पूर्वेच्या द्वारांचीं कवाडें उघडणाऱ्या देवा, आणि अंतराळाच्या खिडक्या उघडणाऱ्या, सूर्यास त्याच्या ठिकाणांतून आणि चंद्रास त्याच्या विश्रांतीच्या जागेंतून काढणाऱ्या, आणि सर्व जगास व दयेच्या गुणाकडून उत्पन्न केलेल्या पृथ्वीवरील राहणाऱ्यांस प्रकाशित करणाऱ्या, सर्व तुलाच उंच

मानितील; सेलाह. पृथ्वीला व तिजवर राहणाऱ्यांला दयेनें प्रकाश देणाऱ्या, आणि आपल्या चांगुलपणाकडून नेहेमी प्रति दिवशीं उत्पत्तीचीं कृत्यें नवीं करणाऱ्या, हे परमेश्वरा! तुझीं कृत्यें किती आहेत! तीं सर्व त्वां चातुर्यानें केलीं; पृथ्वी तुझ्या संपत्तीने भरली आहे. पूर्वकाळांपासून उंच मानिलेल्या आणि अनंतकाळच्या दिवसांपासून स्तविलेल्या, गौरवयुक्त, व थोर मानलेल्या राजा, अनादि देवा! तुझ्या पुष्कळ दयेने आम्हावर दया कर. आमच्या सामर्थ्याचा देव, आमचा खडकरूप आश्रय, आमच्या तारणाची ढाल आणि आमच्या आश्रयाचा दुर्ग (तूंच आहेस.) तुजबरोबर तुळणा करणारा कोणी नाहीं; आणि तुजवांचून कोणी नाहीं; तुजविना कोणी नाहीं; आणि तुजसारिखाहि कोणी नाहीं. हे परमेश्वरा! आमच्या देवा, या जगांत तुजबरोबर तुळणा करणारा कोणी नाहीं, आणि हे आमच्या राजा, पुढील जगांत तुजवांचून कोणी नाहीं; हे आमच्या खंडून काढणाऱ्या, माशीयाहच्या दिवसापर्यंत तुजविना आम्हास कोणीच नाहीं; आणि हे आमच्या तारणाऱ्या, पुनरुत्थितीच्या वेळेस आम्हांस तुजसारिखा कोणीच असणार नाहीं.

אל אדון देव सर्व कृत्यांचा स्वामी आहे; तो सर्व प्राण्यांच्या मुखांकडून धन्य मानलेला व सुवंदित आहे. त्याच्या मोठेपणाकडून व चांगुलपणाकडून पृथ्वी भरलेली आहे; ज्ञान व बुद्धि त्याच्या सभोवतीं आहेत. तो पवित्र हाय्योथापेक्षां * श्रेष्ठ आणि रथांवर गौरवानें शोभायमान आहे. पुण्य व सरळपणा त्याच्या आसनापुढें आहे, आणि कृपेनें व दयेने त्याचें गौरव भरलें आहे. आमच्या देवानें ज्या ज्योती उत्पन्न केल्या त्या उत्कृष्ट आहेत; त्या त्यानें ज्ञान, बुद्धि व चातुर्यानें घडिल्या आहेत. त्यांस त्याने सामर्थ्य व बळ दिल्हें आहे, कीं त्यांनी

* हाय्योथ एकप्रकारचे दूत आहेत.

सृष्टी चालवावी. त्या तेज व किरणाच्या उजेडाने भरल्या आहेत, सर्व जगांत त्यांचें तेज सुंदर आहे. निघतांना त्या आनंद करितात व परत येतांना उल्हास करितात; आणि आपल्या उत्पन्न करणाऱ्याची इच्छा भयाने (पूर्ण) करितात. त्यानें आपल्या नामाकरितां त्यांस गौरव व महत्त्व, आणि आपल्या राज्याच्या आठवणी करितां त्यांस हर्ष व उत्साह दिल्हा आहे. सूर्यास हाक मारतांच तो प्रकाशला, आणि चंद्राचे आकार पाहून त्याने त्यांस सुधारलें. (यावरून) उंचावरील सर्व सैन्य त्याचें स्तवन करितें, आणि सेराफीम, ओफानीम आणि पवित्र ह्याय्योथ * त्याचें गौरव करून त्यास थोर मानितात.

शाब्बाथ असल्यास हें बोलावें.

לאל אשר שבת जो सर्व कामापासून स्वस्थ राहून सातव्या दिवशीं थोर मानिला जाऊन गौरवाच्या आसनावर बैसला, त्या देवाची ते (दूत) स्तुति करितात. विसाव्याच्या दिवसास त्याने सौंदर्याने शृंगारित करून शाब्बाथ दिवसास त्याने हर्ष असें ह्मटलें. जेव्हां देव आपल्या सर्व कामापासून स्वस्थ राहिला, त्या सातव्या दिवसाच्या स्तुतीचें गीत तें हेंच. आणि सातवा दिवस शाब्बाथ दिवसीं गाण्याचे गीताकडून+स्तुती करून ह्मणतो. यास्तव ईश्वराने सर्व घडलेले पदार्थ त्याचें गौरव करून सर्व पदार्थ घडणाऱ्या राजास, ज्याने आपले लोक इस्राएल यांस शाब्बाथ दिवशीं विसावा दिल्हा, त्याचें गौरव व माहात्म्य करून त्यास थोर मानितात.

शाब्बाथ नसल्यास एथून बोलावें.

שמך יי אלהינו हे परमेश्वरा! आमच्या देवा, तुझ्या हातांच्या स्तुत्य कामाकरितां आणि ज्या तेजस्वी ज्योती

* हीं निरनिराळ्या प्रकारच्या दूतांचीं नावें आहेत.

+ दावीदाचें ९२ वें गीत.

त्वां घडिल्या त्यांकरितां वर आकाशांत व खालीं पृथ्वींत तुझें नाम पवित्र मानिलें जावो; आणि हे आमच्या राजा, तुझी आठवण स्तविली जावो. तीं (सर्व) तुझें गौरव करितील. सेहाल.

תתברך לנצח हे आमच्या खडकरूप आश्रया, आमच्या राजा, आमच्या खंडून घेणाऱ्या आणि पवित्र (दूतांस) उत्पन्न करणाऱ्या, तूं सदासर्वकाळ धन्य आहेस; हे आमच्या राजा, सेवा करणारे दूत उत्पन्न करणाऱ्या, आणि ज्याचे सेवा करणारे दूत जगताच्या उंच भागीं उभे राहून भयाने एकाच वाणीने जीवंत देव व जगताच्या राजाच्या गोष्टी ऐकवितात, तुझें नाम सर्वकाळ स्तविलें जावो. ते सर्व प्रिय, शुद्ध, पराक्रमी व पवित्र असून ते सर्व आपल्या उत्पन्न कर्त्याची इच्छा भयाने व त्रासाने पूर्ण करितात. आणि सर्व आपलीं मुखें पवित्रतेने, शुद्धतेने, गायनाने व कीर्तनाने उघडून थोर, पराक्रमी, भयंकर व पवित्र जो देव राजा, त्याच्या नामास धन्य म्हणतात, स्तवितात, गौरव करितात, पवित्र मानितात, सन्मान देतात, व राज्याधिकार देतात. आणि सर्व आपणावर देवाच्या * राज्याचें जोकड एक मत्येका पासून मान्य करून, आणि आपल्या घडणाऱ्यास स्वस्थ आत्म्याने, शुद्ध ओंठाने व पवित्र मधुरपणाने आपल्या घडणाऱ्यास पवित्र मानायास सर्व एकदांच भयाने उत्तर देवून त्रासाने म्हणतात कीं, "पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे." आणि सेराफीम व पवित्र हाय्योथ उंच होऊन मोठ्या स्वराने त्यांसमोर स्तवन करीत म्हणतात कीं "त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो."

לאל ברוך सुवंदित देवासाठीं मधुर गांयन करून

* मूळ ग्रंथांत देव या शब्दाकरितां आकाश असा शब्द आहे; आणि इमी ग्रंथांत असें पुष्कळ वेळा आढळतें.

राजा आणि जीवंत व निश्चल देव, याचें कीर्त्तन करून व स्तुति ऐकवून (ते दूत) असें म्हणतात कीं, थोर व पवित्र, पराक्रम करणारा, नवीन कृत्यें करणारा, युद्धांचा स्वामी, यथार्थता पेरणारा, तारण उगविणारा, आरोग्यता उत्पन्न करणारा, स्तुतीने भयंकर, आश्चर्य कर्मांचा धनी आणि प्रतिदिवशीं नित्य आपल्या दयेने उत्पत्तीचीं कृत्यें नवीन करणारा, तो एकटाच आहे. जसें म्हटलें आहे कीं, ज्याने मोठ्या ज्योती उत्पन्न केल्या, त्याची स्तुति करा; कारण कीं त्याची दया सर्व काळची आहे. हे परमेश्वरा, ज्योती घडणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אהבת עולם· हे परमेश्वरा, आमच्या देवा, सर्व कालिक प्रीतीने त्वां आम्हावर प्रीति केली; हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या मोठ्या नामाकरितां व ज्या आमच्या पूर्वजांनी तुजवर भरंवसा ठेविला, त्यां करितां त्वां अति मोठ्या दयेने आमची करुणा केली; आणि त्यानी आपल्या पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करावी, म्हणून जसे त्वां त्यांस जीवनाचे नियम शिकविले, तसी हे आमच्या बापा, दयाळू पित्या आम्हावर कृपा कर, हे दयावंता, आतां आम्हावर कृपा कर, आणि तुझ्या शास्त्रीय विषयांच्या गोष्टी आम्ही आवडीने समजाव्या, लक्षांत घ्याव्या, ऐकाव्या, शिकाव्या, शिकवाव्या, सांभाळाव्या, पूर्ण कराव्या आणि स्थापित कराव्या; म्हणून तूं आमच्या मनांत बुद्धी दे; आणि तुझ्या शास्त्राकडे आमचे डोळे प्रकाशित कर (उघड); आमचीं मनें तुझ्या आज्ञांकडे लागूं दे; आम्ही कधींच लज्जित होऊं नये, घाबरूं नये, व गळून पडूं नये; या साठीं तुझ्या नावावर आम्ही प्रीति करावी व त्याचें भय धरावें म्हणून आमचीं मनें एक चित्त कर; कारण तुझ्या पवित्र, थोर, व पराक्रमी नावावर आम्ही भरंवसा ठेविला आहे. आह्मी तुझ्या तारणाविषयीं आनंद व हर्ष करूं. हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या दयेने व पुष्कळ कृपेने आम्हांस स-

दांसर्वकाळ सोडूं नये: सेलाह; त्वरा करून पृथ्वीच्या चोहों कोनाकडून आम्हावर आशीर्वाद व शांति येऊंदे; राष्ट्रांचें जोकड आमच्या मानेवरून मोडून टांक. आणि आम्हांस आमच्या देशीं लवकर सुखरूप ने; कारण तारण करणारा देव तूंच आहेस. त्वां आम्हांस सर्व लोकांतून व सर्व भाषांच्या राष्ट्रांतून निवडून घेतलें; आणि आम्ही तुझें स्तवन करावें, तुझें एकत्व मानावें, आणि तुझ्या नावाचें भय धरून त्याजवर प्रीति करावी; ह्मणून हे आमच्या राजा, प्रीतीने त्वां आम्हास आपल्या थोर नामाजवळ नेलें. हे परमेश्वरा, आपले लोक इस्राएल यांस प्रीतीने निवडून घेणाऱ्या, तूं धन्य आहेस.

קריאת שמע पृष्ठ ९.

אלהיכם אמת ״ परमेश्वर तुमचा देव सत्य आहे.

אמת ויציב ही गोष्ट सर्वकाळ आह्मास सत्य, खरी, स्थापित, सिद्ध, सरळ, विश्वसनीय, प्रिय, लाडकी, आवडती, मधुर, भयंकर, उत्कृष्ट, नीयमित, स्वीकरनीय, चांगली व सुंदर असी आहे. जगतांचा देव आमचा राजा, याकोबाचा खडकरूप आश्रय आमच्या तारणाची ढाल, हें सत्य आहे; पिढोपिढीं तो निश्चल, त्याचें नावहि निश्चल, त्याचें आसन स्थापित आहे, आणि त्याचें राज्य व सत्य सर्वकाळ राहातें. त्याने ज्या गोष्टी आमच्या पूर्वजांविषयीं, आह्माविषयीं, आमच्या लेकरांविषयीं, आमच्या पिढीविषयीं, आणि आपला सेवक इस्राएल याच्या बीजाच्या पिढ्यांविषयीं केल्या आहेत त्या सदांसर्वकाळ, जीवंत (सिद्ध) स्थापित, सत्य, प्रिय आहेत. पूर्वीच्या व मागल्या (लोकांविषयीं) जें त्याचें ह्मणणे आहे, तें चागलें आणि सत्य व खरेपणा यांत स्थापित असून कधीं उल्लंघून न जाणारा असा करार आहे. परमेश्वर आमचा देव, व आमच्या पूर्वजांचा

देव; आमचा राजा व आमच्या पूर्वजांचा राजा; आह्मास खंडून घेणारा व आमच्या पूर्वजांस खंडून घेणारा; आह्मास घडणारा; आणि आमच्या तारणाची ढाल तूं आहेस; हेंहि सत्य आहे. आमचा सोडविणारा व मुक्त करणारा हें सर्वकाळापासून तुझें नाम आहे, तुजवांचून आह्मास दुसरा कोणी देव नाहीं. सेलाह.

עזרת אבותינו जो आमच्या पूर्वजांस सर्वकाळापासून सहायकारी, आणि जो त्यांस आणि त्यांच्या मागें पिढोंपिढी त्याच्या लेंकरास ढाल व तारक, तो तूंच; जगाच्या वर तुझें वस्तिस्थान आणि तुझा न्याय वतुझी यथार्थता पृथ्वीच्या शिमेपर्यंत आहे. जो पुरुष तुझ्या आज्ञा ऐकितो, आणि तुझें शास्त्र व तुझीं वचनें आपल्या मनांत ठेवितो, तो आशीर्वाद पावतो; हें सत्य आहे. जो आपल्या लोकांचा स्वामी आणि बापांचा व पुत्रांचा वाद (स्वता) चालविणारा पराक्रमी राजा, तो तूंच, हें सत्य आहे. जो पहिला व शेवटला तो तूंच; तुजवांचून आम्हांस राजा, उद्धारक व तारक कोणीच नाहीं, हें सत्य आहे. हे परमेश्वरा! आमच्या देवा, त्वां आम्हास मिसरांतून सोडविलेंस; दास त्वाच्या घरांतून आम्हास खंडून काढलेंस; त्यांच्या सर्व ज्येष्ठ पुत्रांस मारून आपले ज्येष्ठ पुत्र इस्राएल यांस सोडविलेंस; सूफ समुद्र दुभागलास; गर्विष्टांस त्यांत बुडवून आपल्या प्रियकरांस समुद्राच्या पार नेलेंस; शत्रूला पाण्याने झाकिलें; त्यांतून एकहि उरला नाहीं; (असे चमत्कार करणारा) तो तूंच आहेस, हें सत्य आहे. यावरून प्रियकरांनी देवाची स्तुति करून त्यास थोर मानिलें; आणि आवडत्यांनी राजा, आणि जीवंत व निश्चल देव याचें कीर्त्तन व गायन केलें, स्तुति केली, सुवंदन केलें, व उपकार स्तुति केली. उंच, थोर, मोठा, पराक्रमी, भयंकर, गर्विष्टांस भूमी एवढे नीच करणारा, पडलेल्यांस आकाशा एवढे उंच करणारा, बंदिवा-

नांस मोकळे करणारा, नम्रास खंडून घेणारा, गरिबांस सहाय्य करणारा, आणि आपले लोक इस्राएल यांस काकुळतीच्या वेळेस उत्तर देणारा (तूंच, आहेस.) धन्य व सुवंदित जो थोर देव त्यांचा उद्धारक त्याची स्तुति असो. मोशे व इस्राएलाचे पुत्र यांनी मोठ्या आनंदाने तुला गाऊन सर्वांनी ह्मटलें कीं, हे परमेश्वरा, देवांमध्यें तुजसारिखा कोण ! पवित्रतेने महान, स्तविण्याविषयीं भयमान, चमत्कार कर्त्ता तुजसारिखा कोण आहे ! जे सोडविले गेले त्यांनी समुद्रतिरीं गाऊन तुझ्या मोठ्या नामाची स्तुति केली. त्यासर्वांनी तुझी उपकार स्तुतिकरून व तुझें राज्य मान्य करून म्हणाले कीं, परमेश्वर सदांसर्वकाळ राज्य करील. आणखी असेंहि म्हटलें आहे कीं, आमचा उद्धारणारा कोण ? तर त्याचें नाम सैन्याचा परमेश्वर, इस्राएलाचा पवित्र आहे. हे परमेश्वरा, इस्राएलांचा उद्धार करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

אדני שפתי תפתח पृष्ठ.

पाहांटेच्या प्रार्थनेमध्यें (शाहारीथमध्यें) אדני שפתי पहिल्याने हळू बोलून पुनः मोठ्याने बोलल्या अगोदर हें पुढील गीत बोलण्याची चाल आहे.

“ שמעתי ” हे परमेश्वरा, तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहे.

“ שמעתי ” हे परमेश्वरा, तूं मला आपल्या रागाने कदाचित नाहींसें करशील, ह्मणून माझ्या झडतीच्या दिवसाविषयीं ऐकल्यामुळें मी कांपतो, आणि माझ्या न्यायाच्या दिवसामुळें मी भितों व थरथरतों; कारण देवाचा दिवस मोठा आहे. ”

“ מי לא ייראּ ” हे परमेश्वरा, न्यायाच्या भयंकर दिवसामुळें कोण भिणार नाहीं ! कारण अग्नीसारिख्या स्वच्छ ठिकाणीं तुलाच मात्र मोठेपणा व पराक्रम शोभतो; परमेश्वराशीं स्नेहाने कोण वागेल ! ”

מלך יושב ॥ हे परमेश्वरा, न्यायासनावर बसणाऱ्या राजा, तुझा सरळपणा कळविण्याकरितां, हे परमेश्वरा सेराफीम गाद्यांवर भोंवताले उभे आहेत, कांकीं नेम व न्याय जाणणाऱ्या सर्व लोकांचा धर्म असा आहे कीं, परमेश्वर (राजा) सरळ आहे असें त्यांनी दाखवावें. ॥

מלך אדיר ॥ हे पराक्रमी परमेश्वर राजा, मनुष्यांस नीच व उंच करणाऱ्या, ज्या पवित्राच्या वचनानें व जागणाऱ्याच्या निवाड्यानें +खडकांचा चुराडा होतो आणि फुटतात, तें परमेश्वराच्या मुखांतून निघतें त्याकडूनच होतें. ॥

לפני חילי ॥ हे परमेश्वरा, तूं आपल्या सैन्या पुढें मोठ्यानें ओरडतोस, मग बळवान मनुष्यांस (सत्वशीलांस) जीवनाचें औषध कसें सापडतें ? तर बलवान मनुष्यें * नमल्या अगोदर ते उठून ईश्वराकडे फिरल्यानें (त्यांस तें सापडतें). ॥

לבי ॥ हे परमेश्वरा, तुझ्या बाणाच्या अग्नीसारिख्या ज्वाळेपासून मी पळतों, आणि उंच मानिलेल्या लोकांवरील तुझ्या भया मुळें मी शोकानें ओरडतों; ईश्वराच्या अति तीव्र दाहाच्या ठिकाणीं टकळ्या कसा चढून जाईल ! ॥

ענה עני ॥ हे परमेश्वरा, तुजपुढें उभा राहिलेला गरीब, जो भिकाऱ्याप्रमाणें तुजपासून क्षमा मागतो, त्यास उत्तर दे; त्याचें मन तूं स्थिर करून आपला कान त्याजकडे लाव; आणि हे परमेश्वरा, तूं आपलें मुखतेज आम्हावर पडूं दे. ॥

נהלי דמעותי ॥ हे परमेश्वरा, माझ्या अश्रुपातामुळें माझीं आंतडी उकळतात, आणि परमेश्वर राजापुढें न्याय सभा बसली आहे, आणि त्यापुढें पुस्तकें उघडलीं आहेत, म्हणून माझ्या पापांमुळें माझीं गुर्देकमळें मलीन होतात.

+ पवित्र व जागणारा यांचे इब्रीशब्द अनेक वचनांत आहेत; ते दानिएल ४ अध्यायाच्या १४ व्या ओवींत सांपडतात. त्या वाक्यावर टीका करणारांनी त्या उपमा ईश्वरास दिल्ह्या आहेत. * शरीराचे बळकठ अवयव.

יי ספרי חיים ॥ हे परमेश्वरा, जीवंतांचीं व मेलेल्यांचीं पुस्तकें तुजपुढें उघडीं आहेत; आमच्या पूर्वजांवरील तुझ्या दयेप्रमाणे आह्मी (तुजवर) भरंवसा ठेवितों, ह्मणून आमची प्रार्थना शांतिकारक सुवासा प्रमाणे स्थाप, आणि हे परमेश्वरा, तूं आपलें (हस्त) कर्म (या दुःखाच्या) वर्षांत जीवंत राख. ॥

אתאנו לחלות आम्ही तुजपुढें प्रार्थना करायास आलों आहों, कारण कीं, दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत. आतां आम्हांस लज्जित करूंन नको, आतां आम्हास तुजसमोरून रिकामे परतवूं नको; आम्हांस क्षमा कर आणि आम्हासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אתאנו לבקש हे भयंकरा, अघोर व संकट समयीं संरक्षण करणाऱ्या, आम्ही तुझ्या जवळून क्षमा मागायास आलों आहों; तूं आम्हास जीवंत राख, आम्हावर दया कर आणि तुझें नाम आम्हास ठेविलें जाऊं दे; आम्हास क्षमा कर आणि आम्हासाठीं तुझ्या वस्तिस्थानांतून तारण व दया पाठीव.

אבינו מלכנו हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजवांचून आम्हास कोणी राजा नाहीं.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या नामा करितां आम्हावर (उपकार) कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मावर चांगल्या वर्षास आरंभ होऊं दे.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हावरून सर्व कठोर व वाईट निवाडे रद्द कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या द्वेषणाऱ्यांचे विचार रद्द कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या शत्रूंच्या मसलती मोड.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमच्या शत्रूस व आह्मावर बलात्कार करणाऱ्यांस नाहींसे कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या कराराच्या लेंकरांवरून पटकी, तरवार, वाईट, दुष्काळ, पाडावपण, लुटणें नाश, आणि मरी नाहींसीं कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या लोकांच्या रोगासाठीं पूर्ण आरोग्यता पाठीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या वतनावरून मरी बंद कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आह्मी माती आहों असी आठवण राख.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमचा राजा, आम्हास नीतीमानाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास यथार्थांच्या व सरळांच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास चांगल्या उपजीवनाच्या व भक्षसामग्रीच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास मुक्तेच्या व तारणाच्या पुस्तकांत लिही.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तूं आपल्या समोर आमची चांगली आठवण कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हाकरितां तारण लवकरच उगीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझे लोक इस्राएल यांचे शिंग उभार.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुझ्या अभिषिक्ताचें शिंगहि उभार.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आम्हास तुजपुढें पूर्ण पश्चात्तापानें परतीव.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, आमची वाणी ऐकून आम्हावर दया व कृपा कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, जर आम्हाकरितां नाहीं, तर तूं आपणाकरितां तसें कर.

हे आमच्या बापा व आमचा राजा, दयेनें व प्रसन्नतेनें आमची प्रार्थना मान्य कर.

हे आमच्या बापा व आमच्या राजा, तुजपुढून आम्हास रिकामें परतवूं नको.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्यानें (देवानें) आपल्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचाविलें, आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविले जातें, त्या सर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें थोर मानिलें आणि स्तविलें जावो. आणि तुम्हीहि तथास्तु म्हणा.

תתקבל ותתעתר आकाशांतून (दयेने) तुम्हांस उत्तर मिळो व तुमचें ऐकिलें जावो, तुमचें ओरडणे मान्य होवो, तुमची प्रार्थना प्रसन्नतेने ऐकिली जावो, आणि तुमच्या विनंतीचे वाणीचें उत्तरहि मिळो; आणि परमेश्वर आमचा देव आम्हास व

आमच्या सर्व इस्राएल बांधवांस, जेथें ते राहत असतील त्या ठिकाणी प्रकाशाचा, प्रीतिचा व सख्यत्वाचा, आशीर्वादाचा, बुद्धीचा, आपल्या पवित्र मंदिराचा, मुक्तीचा, मोठेपणाचा, आनंदाचा, हर्षाचा, ज्ञानाचा व समजाचा, देवास लगटून राहाण्याचा, गौरवाचा व महत्वाचा, सफलतेचा, विस्ताराचा, शांततेचा व सुटकेचा, चांगल्या मंडळीचा, यथार्थतेचा, अधिकाइचा, पुण्याचा, हुशारीचा, सुबोधाचा, किर्तनाचा, उल्हासाचा, करूणेचा, शाहणपणाचा, चांगल्या जीवनाचा, अनुग्रहाचा व दयेचा, चांगुलपणाचा, शुद्धतेचा, दंहिवराचा, सरळपणाचा, तारण्याचा, प्रायश्चित्ताचा, अन्नाच्या पूर्वठ्याचा, सन्मानाचा, शास्त्राचा अभ्यास त्याच्या नामानें करण्याचा, चांगल्या मनाचा, मुगुटाचा, उपजीवनाचा, क्षमेचा, उत्तराचा, विश्रांतीचा, परोपकारबुद्धीचा, मधूरपणाचा, आश्रयाचा, त्याच्या शास्त्राच्या रहस्याचा, माफीचा, सहायाचा, शृंगाराचा, खंडणीचा, शास्त्राचा (अभ्यास करणाऱ्या लेकरांकडून) पुष्कळ होण्याचा व वाढण्याचा, चांगल्या भक्षसामग्रीचा, न्यायत्वाचा, प्रेमाचा, उगवण्याचा, मोकळेपणाचा, प्रार्थना मान्य होण्याचा, तोंडावरील तेजाचा, पूर्ण आरोग्यतेचा, वाढण्याचा, ईश्वरास उंचावण्यांचा, प्रसन्नतेचा, कल्याणाचा, निर्भयपणाचा, अधिकाईचा, शास्त्राचा, प्रार्थनेचा, उद्धाराचा, पश्चात्तापाचा दरवाजा उघडो. आणि तुम्हामधून तो सर्व प्रकारचा हेवा, द्वेष व वाद दूर करो; आणि शास्त्रांत जें लिहिलें आहे कीं, "तुमच्या पूर्वजांचा देव, याने तुम्ही जितके आहां, त्यापेक्षां हजारपट अधिक करावें; आणि जसें त्याने तुम्हास वचन दिल्हें आहे; तसा तुम्हास आशीर्वाद द्यावा" हें तुम्हामध्यें स्थापित होवो, आणि तुम्हास तो चांगल्या जीवनाच्या पुस्तकांत लिहो. आणि असी त्याची प्रसन्नता होवो. आणि आपण तथास्तु म्हणू.

תתקבל צלותהון सर्व इस्राएलांच्या घराण्या-

ची प्रार्थना व काकळूत आकाश व पृथ्वींतील त्यांच्या बापापुढें मान्य होवो. आणि तुह्मी तथास्तु म्हणा.

יהי שלמא आणि आकाशांतून आम्हास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, आरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार, आणि मुक्ति होवोत (मिळोत). आणि तुह्मी तथास्तु म्हणा.

עשה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आम्हास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु म्हणा.

शास्त्र काढतेवेळीं हें बोलतात.

אתה הראת परमेश्वर तोच देव, त्याखेरीज दुसरा कोणी देव नाहीं, असें तुम्ही जाणावें ह्मणून हें सर्व तुम्हास दाखवून दिल्हें आहे. हे प्रभु, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोणी नाहीं, आणि तुझ्या कृत्यांसारिखें कांहीं काम नाहीं.

יי יהי आमचा देव परमेश्वर आमच्या वडिलांस जसा अनुकूळ होता, तसा आम्हास अनुकूळ व्हावा; त्याने आम्हास टाकूं नये, आम्हास सोडूंच नये. तूं आपल्या लोकांस तार, आणि आपल्या वतनाला आशीर्वाद दे; त्यांचा मेंढपाळ असा हो, आणि त्यांस सर्वकाळ वाहा. आणि कोश निघाला तेव्हां असें होत असे कीं, मोशे म्हणे, हे परमेश्वरा, ऊठ; म्हणजे तुझ्या शत्रूंची दाणादाण होवो, आणि तुझे द्वेषी तुझ्या पुढून पळोत. हे परमेश्वरा, तूं आपल्या सामर्थ्याच्या कोशासुद्धां आपल्या विसाव्यासाठीं उठ. तुझ्या याजकांनी नीतिमत्व पांघरावें, आणि तुझ्या भक्तांनी हर्ष शब्द करावा. तूं आपला सेवक दावीद यामुळें, आपल्या अभिषिक्ताचें तोंड विन्मुख करूं नको.

ברוך המקום ज्या सुवंदित सर्वव्यापकानें* आपल्या इस्राएल लोकांस शास्त्र दिल्हें, तो धन्य. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य. तुम्ही माझ्या संगतीं परमेश्वराला थोर माना; आम्ही एकत्र त्याचें नाम उंचावूं.

רוממו יי परमेश्वर आमचा देव याला तुम्ही उंच माना, आणि त्याच्या पायांच्या आसना जवळ भजा; तो पवित्र आहे. परमेश्वर आमचा देव, याला तुम्ही उंच माना; आणि त्याच्या पवित्र डोंगरावर भजा; कांतर परमेश्वर आमचा देव पवित्र आहे. परमेश्वरासारिखा कोणी पवित्र नाहीं, तुझ्याशिवाय कोणी नाहीं, आमच्या देवासारिखा खडकरूप असा कोणी नाहीं. कांतर परमेश्वराखेरीज देव कोण आहे? आणि आमच्या देवावांचून कोण खडकरूप आश्रय आहे? मोशानें आज्ञा करून आम्हांस शास्त्र दिल्हें; हेंच याकोबाच्या समुदायाचें वतन आहे. जे तें धरितात, त्यांला तें जीवनाचें झाड आहे, आणि जे तें बाळगतात, ते प्रत्येक धन्य आहेत. त्याचे मार्ग आनंदाचे मार्ग, आणि त्याच्या सर्व वाटा कुशल आहेत. जे तुझ्या शास्त्रावर प्रीति करितात, त्यांचें फार कल्याण आहे; आणि त्यांस कांहीं अडखळा नाहीं. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देतो; परमेश्वर आपल्या लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देतो.

בריך שמיה जगताच्या स्वामीचें नाम धन्य असो. हे परमेश्वरा, तुझें राहण्याचें व वस्तिकरण्याचें स्थानहि धन्य असो; तुझी प्रसन्नता तुझे लोक इस्राएल यांबरोबर सर्वदा असो. आणि तुझ्या उजव्या हाताचें तारण तुझ्या लोकांस तु-

*המקום या इब्री शब्दाचा मूळ अर्थ जागा असा होतो, परंतु हाखामीम लोकांच्या ग्रंथांत या शब्दाचा उपयोग सर्व व्यापक देव या अर्थानें पुष्कळ ठिकाणीं केलेला आढळतो.

ङ्या पवित्र मंदिरांत दाखीव, कीं त्वां आपल्या उत्तम उजेडाकडू-न आम्हांस तिकडे पोंहोचवावें; आणि दयेनें आमची प्रार्थना मान्य करावी. आमचें आयुष्य चांगल्या प्रकारें वाढावें असी तुजपुढें प्रसन्नता होवो. आणि तुझा सेवक जो मी, मला तूं न्यायी लोकांमध्यें गणून मला, जें माझें असेल त्याला, आणि तुझे लोक इस्राएल यांचें जें असेल त्यांला तूं सांभाळ. तूं सर्वां-चें पोषण व पाळण करितोस; तूंच सर्वांवर अधिकार करितोस; तूं राजांवरहि अधिकार करितोस; राज्य हें तुझेंच आहे. पवित्र जो धन्य, त्याचा सेवक मी आहे; त्याच्या गौरवयुक्त शास्त्रापुढें नमन करितांना मी त्याच्या पुढे नमन करितों. मनुष्यावर मी भरंवसा ठेवीत नाहीं, आणि देवाच्या पुत्रांवरहि (दूतांवरहि) मी आशा ठेवीत नाहीं; परंतु जो आकाशाचा देव, जो सत्य देव आहे, ज्याचें शास्त्र सत्य, ज्याचे भविष्यवादीहि सत्य, व ज्याचीं चांग-लीं व सत्य कृत्यें पुष्कळ आहेत, त्याजवरच मी भरंवसा ठेवितों; आणि त्याच्या पवित्र नामाची मी स्तुति करितों. हे प्रभु! त्वां आपल्या शास्त्राकडे माझें मन लावावें; आमचें चांगलें व्हावें; आ-म्हास जीवन प्राप्त व्हावें; आणि आमचें कल्याण व्हावें. अशा माझ्या मनांतील व तुझे लोक सर्व इस्राएल यांच्या मनांतील इ-च्छा पूर्ण कर. तथास्तु.

ישמחו השמים आकाशानी संतोष करावा, पृथ्वीनेहि हर्ष करावा, आणि परमेश्वर राज्य करितो असें राष्ट्रां-मध्यें सांगितलें जावें. सीयोन डोंगरानें आनंद करावा; तुझ्या न्यायामुळें यहुदाच्या कन्यानी हर्षावें. राजांचा राजा, पवित्र जो धन्य राजा, यानें जीं जगतें उत्पन्न केलीं आहेत; म्हणजे हें जग व पुढील जग, यामध्यें त्याच्या इच्छेप्रमाणें, त्याच्या भिणा-ऱ्यांच्या इच्छेप्रमाणें आणि त्याचे लोक इस्राएलाचें घराणें यां-च्या इच्छेप्रमाणें, त्याचें नाम सर्वांपेक्षां मोठें, पवित्र, धन्य, उंच व

थोर मानिलें जावो. तो आपलें राज्य आम्हावर लवकर प्रगट करून आम्हास दाखवो; आणि आमच्या निभावलेल्यांवर व त्याचे लोक इस्राएलाचें घराणे यांच्या निभावलेल्यांवर दयेकरून, ममतेकरून व कृपेकरून तो दया, करुणा व कृपा करो. आणि सर्व लोक हो, तुम्ही तथास्तु म्हणा. जो दयाळू तो आमचें पाडावपण आणि त्याचे लोक इस्राएलाचें घराणे यांचे पाडावपण लवकर आमच्याच दिवसांत परतवो. आणि आम्हास दुःखांतून काढून सुखांत, आणि अंधारांतून काढून प्रकाशांत नेवो. आणि सर्व लोकहो, तुम्ही तथास्तु म्हणा. कारण कीं मी परमेश्वराचें नाम गाजवीन; तुम्ही आमच्या देवाला थोर मानून द्या. देवाला पराक्रमाचा मान द्या, आणि शास्त्राला मान द्या.

शास्त्र उचलून दाखवितांना मंडळी हें म्हणते.

וזאת התורה तर जें शास्त्र मोशाने इस्राएलाच्या संतानास सांगून ठेविलें तें हेंच. मोशाने आज्ञा करून आम्हास शास्त्र दिल्हें; हेंच याकोबाच्या समुदायाचें वतन आहे.

כהן קרב וכהן हे आचार्या, ये आणि आपलीं क्रिया कर्में कर. परमेश्वराचें नेम शास्त्र पूर्ण आहे, जिवाला ठिकाणी आणितें; परमेश्वराचा प्रमाण नेम खरा आहे, भोळयाला ज्ञानी करितो. परमेश्वराचीं बंधारणे नीट आहेत, ह्रदयाला आनंदवितात; परमेश्वराची आज्ञा निर्मळ आहे, डोळ्यांस उजेड करिती.

האל תמים דרכו देवाचा मार्ग नीट आहे, परमेश्वराचें वचन पवित्र आहे, जे सर्व त्याचा आश्रय धरितात त्यांस तो ढालरूप आहे.

ज्यास शास्त्र वाचायास बोलवितात तो शास्त्र वाचल्या पूर्वीं हें बोलतो.

עמכם '' उठणारा. - परमेश्वर तुम्हाबरोबर असो.

יברכך '' मंडळी. - परमेश्वर तुला आशीर्वाद देवो.

" ברכו את " उठणारा,— सुवंदित परमेश्वराला तुम्ही धन्य म्हणा.

" ברוך ' मंडळी.— सुवंदित परमेश्वर सदा सर्वकाळ धन्य असो.

" ברוך उठणारा.— सुवंदित परमेश्वर सदासर्वकाळ धन्य असो.

" ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास सर्व लोकांतून निवडून घेऊन आपलें नेम शास्त्र आम्हास देणारा जो, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा शास्त्र देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

शास्त्रवाचल्या नंतर उठणारा हें बोलतो.

" ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास सत्य शास्त्र देणारा आणि आम्हामध्यें सर्वकाळचें जीवन लावून ठेवणारा जो, तूं धन्य आहेस. हे परमेश्वरा ! शास्त्र देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

वर्ष प्रतिपदेच्या पहिल्या दिवशीं उत्पत्ति अध्याय २१ आणि या दिवसाच्या आठवणी करितां गणना २९·१-६ ओवीपर्यंत आणि हाफतारा * म्हणजे भविष्य कथनांतील भाग, १ शेमोएल अध्याय १ पासून २ अध्यायाच्या १० व्या ओवीपर्यंत वाचितात. दुसऱ्या दिवशीं उत्पत्ति अध्याय २२ आणि यादिवसाच्या आठवणी करितां गणना २९·१-६ ओवीपर्यंत, आणि हाफतारा म्हणजे भविष्य कथनांतील भाग इर्मया ३१·२-२० ओवीपर्यंत वाचितात.

भविष्य कथनांतील भाग वाचल्या पूर्वीं हें बोलतात.

" ברוך אתה " हे परमेश्वरा ! आमच्या देवा,

* टीका ७

जगताच्या राजा, (आपणाकरितां) चांगले भविष्यवादी निवडू-न घेऊन त्यांनी म्हटलेल्या सत्य गोष्टींस प्रसन्न असणारा जो, तूं धन्य आहेस.

ברוך אתה יי हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, शास्त्र, आपला सेवक मोशे, आपले लोक इस्राएल, आणि सत्य व यथार्थ भविष्यवादी यांस निवडून घेणाऱ्या, तूं धन्य आहेस.

भविष्यकथनांतील भाग वाचल्यानंतर हें बोलतात.

גאלנו יי आमच्या उद्धारणारा कोण? तर त्याचें नाम सैन्याचा परमेश्वर, इस्राएलाचा पवित्र आहे.

ברוך אתה יי हे परमेश्वरा! आमच्या देवा, जगताच्या राजा, सर्व जगतांच्या खडकरूप आश्रया, सर्व पिढ्यांत न्यायी असणाऱ्या, ज्याचे शब्द सत्य व न्यायी असा विश्वसनीय देव, म्हणणारा व त्याप्रमाणे करणारा, बोलणारा व तें सिद्ध करणारा; सत्य जो, तूं धन्य आहेस. परमेश्वर आमचा देव जो विश्वसनीय, तो तूंच; तुझीं वचनेंहि विश्वसनीय; तुझ्या वचनांतून एकहि शब्द माघारें रिकामा परतत नाही; कारण तूं विश्वसनीय व दयाळू देव राजा आहेस. हे परमेश्वरा आपल्या सर्व वचनांत विश्वसनीय असणाऱ्या, तूं धन्य आहेस.

רחם על ציון सियोनेवर तूं दया कर, कारण ते आमचे जिवनाचें घर; आणि लवकर आमच्या दिवसांत खिन्न झालेल्या जीवांस तूं तार. हे परमेश्वरा! सियोनेस तिच्या लेंकरांत हर्षित करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

שמחנו יי אלהינו हे परमेश्वरा! आमच्या देवा, तुझा सेवक येलीया भविष्यवाद्याचें आणि तुझा अभिषिक्त दावीद याच्या घराण्याच्या राज्याचें येणे होऊन आम्हास आनंदित व आमच्या मनांस हर्षित कर. त्याच्या आसनावर दुस-

ऱ्याने बसूं नये, आणि परक्याने आणखी त्याच्या गौरवाचें वतन पावूं नये; कारण कीं, तूं त्याचा दिवा सदासर्वकाळ विझविणार नाहींस, असी तूं त्याजवळ आपल्या पवित्र नामाने शपथ वाहिली आहेस, हे परमेश्वरा ! दावीदाच्या ढालरूप आश्रया, तूं धन्य आहेस.

על התורה शास्त्र, भक्ति, भविष्यवादी (शाब्बाथ असल्यास हा शाब्बाथ दिवस व) हा स्मरणाचा दिवस, हा पवित्र मेळामिळण्याचा सुदिन, जो हे परमेश्वरा, आमच्या देवा, त्वां आम्हास (शाब्बाथ असल्यास पवित्रतेकरितां विश्रांतिकरितां व) गौरवाकरितां व शोभे करितां दिल्हा आहेस, यांपेक्षां आणि सर्व गोष्टीपेक्षां आम्ही तुला अधिक मानितों; आणि धन्य म्हणतों. सर्व प्राण्यांच्या तोंडाकडून नित्य व सर्वकाळ तुझें नाम सुवंदित असो. आणि हे आमच्या राजा, तुझीं वचने सर्वकाळ सत्य व स्थापित आहेत. हे परमेश्वरा, सर्व पृथ्वीवरील राजा, (शाब्बाथ असल्यास शाब्बाथास व) इस्राएलास व स्मरणाच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

राजास आशीर्वाद.

जो राजांस तारण आणि अभिषिक्तांस अधिकार देतो; ज्याचें राज्य सर्वकाळचें राज्य आहे; जो आपला सेवक दावीद यास नाशकारक तरवारीपासून सोडवितो; जो समुद्रांत वाट आणि अगाध जलांत मार्गकरितो तो आमचा प्रभु; राजा-सुभेदार आणि सर्व सरदार लोक यांस आशीर्वाद देवो, सांभाळो, रक्षण करो, सहायकरो, उंचावो, मोठे करो आणि अति थोर पदास चढवो. राजांचा माहाराजा आपल्या दयेंकरून त्यांस रक्षो, जीवंत राखो, आणि सर्व दुःख व संकट यांपासून सोडवो. राजांचा माहाराजा आपल्या दयेकरून त्याच्या न्यायसभेचें नक्षत्र चढवो, उंचावो आणि त्यांच्या राज्यावर त्यांचे दिवस वाढवो. त्यांनी आम्हासी

व आमचे बंधू सर्व इस्राएल यांजसी चांगलें करावे म्हणून राजांचा माहाराजा दयेंकरून त्यांच्या मनांत व त्याच्या मसलत देणारांच्या व सरदारांच्या मनांत आम्हाविषयीं दया उत्पन्न करो. आणिं आमच्या दिवसांत व त्यांच्या दिवसांतहि येहुदाचें तारण होवो; इस्राएल निर्भयपणें वसो; उद्धार करणारा सियोनेस येवो! आणि असी त्याची प्रसन्नता होवो, आणि आपण तथास्तु म्हणावें.

मंडळीस आशीर्वाद.

מי שברך ज्याने आमचे पूर्वज आब्राहाम, इसहाक, याकोब, मोशे, आहारोन, दावोद, शेलोमो आणि सर्व पवित्र व शुद्ध मंडळ्या यास आशीर्वाद दिल्हा, तो या पवित्र मंडळीस, तिजमधील लाहान थोरांस, त्यांस, त्यांच्या पुत्रांस, त्याच्या स्त्रियांस, त्यांच्या शिष्यांस व जें त्यांचें असेल त्यास, तो आशीर्वाद देवो. जगताचा राजा तुम्हास आशीर्वाद देवो; शुद्ध करो; तुमच्या विनंतीची वाणी ऐको; सर्व दुःखापासून व क्लेशापासून तुम्हास सोडवो व मुक्त करो. ईश्वराचें वचन तुम्हास आश्रय व तुम्हावर छाया असें होवो; तो आपला शांतीचा मंडप तुम्हावर विस्तारो; आणि प्रीति, सख्यत्व, सल्ला, व मित्रत्व यांची लागवड तुम्हामध्यें करो; आणि व्यर्थ हेवा तुम्हापासून दूर करो; आणि अन्यराष्ट्रांचें जोडक(राज्याधिकार)तुमच्या खांद्यावरून मोडूनटाको. आणि शास्त्रांत जें वाक्य लिहिलें आहे कीं, “ तुमच्या पूर्वजांचा देव, याने तुम्ही जितके आहां, त्यापेक्षां हजार पट अधिक करावे; आणि जसें त्याने तुम्हास वचन दिल्हें आहे, तसा तुम्हास आशीर्वादहि द्यावा; ” हें तुम्हामध्यें स्थापित होवो; आणि तुम्हास तो चांगल्यीं जीवनाच्या पुस्तकांत लिहो. आणि असी त्याची प्रसन्नता होवो. आणि आपण तथास्तु म्हणूं.

शाब्बाथ असला तरी हें गीत बोलावें.

עת שערי רצון (हे परमेश्वरा) मी विनंती करितों कीं, प्रसन्नतेचा दरवाजा उघडण्याच्या वेळीं, आणि ज्या दिवशीं मीं आपले तळहात देवापुढें पसरितो; त्या निषेधाच्या दिवशीं मजकरितां बांधणाराची, * बांधला गेलेल्याची × व स्थंडिलाची आठवण कर.

עוקד והנעקד बांधणाराची, बांधला गेलेल्याची व स्थंडिलाची (आठवण कर.)

באחרית נסה (आब्राहामाच्या) दाहाव्या +परिक्षेच्या शेवटीं, (ईश्वर त्यास म्हणाला) तुला सारेपासून जो पुत्र झाला आहे आणि जरी तुझा जीव त्याशीं गुंतला आहे, तरी ऊठ आणि ज्या डोंगरावर गौरव प्रकाशलेलें (दिसेल) त्यावर मजकरितां त्याचा शुद्ध होम कर. עוקד והנעקד

אמר לשרה तो सारेस म्हणाला कीं, तुझा आवडता इसहाक वाढला, परंतु आकाशाची (देवाची) सेवा करायास शिकला नाहीं; म्हणून मी जातों आणि देवाने जें स्थापन केलें आहे तें मी त्यास शिकवितों; ती म्हणाली स्वामी जा, परंतु दूर जाऊं नका; मग त्याने उत्तर केलें कीं, तूं आपल्या मनाने देवावर भरंवसा ठेव. עוקד והנעקד

שחר והשכים सकाळीं जाण्याकरितां तो मोठ्या पाहाटेस उठून त्याने खोटे मनुष्यांतून (अन्यजातीचीं) दोन मुलें आपणाबरोबर घेतलीं; आणि तिसऱ्या दिवशीं शोधलेले ठिकाणीं पोहोंचला; आणि गौरव, महत्व आणि वैभव यांची प्रतिमा पाहिल्यावर अभिषिक्त करण्याविषयीं उभा राहून विचार करूं लागला. עוקד והנעקד

ידעו נעריו त्यामुलांस त्याने असें विचारलें कीं,

* आब्राहाम × इसहाक + टीका ८

मोरीया डोंगराचे शिखरावर प्रफुल्लित झालेला उजेड तुम्हास दिसतो काय ? तेव्हां ते म्हणाले आम्हास दिसत नाहीं, खांच मात्र दिसती; तेव्हां त्याने उत्तर केलें कीं, अहो गाढवासारिख्या लोकांनो, तुम्ही एथें राहा, आणि मी व मुलगा साष्टांग नमस्कार करावयास जातों. עוקד והנעקד

הלכו שניהם ते दोघे आपलें कार्य करायास जाते झाले, तेव्हां इसहाकाने आपले बापास असें उत्तर केलें कीं, बापा, पाहा, विस्तव आणि रचायाचीं लांकडें आहेत, परंतु हे माझे स्वामी, रीतीप्रमाणें मेंढरूं (पाहिजे) तें कोठें आहे ? तुम्ही आपला नियम आज विसरलां काय ? עוקד והנעקד

ויענה אביו त्याच्या बापाने उत्तर केलें कीं, तूं जीवंत देवावर भरंवसा ठेव, ह्मणजे तो होमाकरितां शेरडूं पाहून मिळवील, कारण असें जाण कीं, जसी देवाची इच्छा असेल तसें तो करील; माझ्या पुत्रा आज आपण त्यापुढें आसन (स्थंडील) बांधूं; मग अर्पला जाणारा व आर्पण करणारा वाखाणिले जातील. עוקד והנעקד

דפקו בשערי רחמים पुत्र आर्पिला जाण्यास आणि बाप आर्पण करण्यास सिद्ध होऊन त्यांनी दयेचा दरवाजा उघडला जावा म्हणून ठोकलें (प्रार्थना केली), देवावर आशा ठेविली, आणि त्याच्या दयेवर भरंवसा ठेविला, (कारण असें आहे कीं) परमेश्वरावर आशा ठेवणारे आपली शक्ति नवी करितील; आणि देवाकडील वतनास आपण योग्य व्हावें ह्मणून त्यांनी तें शोधिलें. עוקד והנעקד

הכין עצי עולה त्याने धैर्याने व धिटाईने होमाचीं लाकडें रचून जसा एडक्यास बांधावा तसा इसहाकास बांधला; तेव्हां असें झालें कीं, दिवसाचा प्रकाश असतां त्याच्या डोळ्यांवर (झांक येऊन) रात्रीसारिखा अंधार दिसूं लागला,

आणि अश्रूधारा जोराने वाहूं लागल्या. परंतु जरी त्याचे डोळे मोठ्या खेदाने शोक करीत होते, तरी त्याचें मन हर्षित होतें. עוקד והנעקד

שיחו לאמי तुम्ही माझे आईस सांगा, कीं तिचा हर्ष संपला आहे, तिला नव्वद वर्षांनी झालेला पुत्र अग्नि आणि सुरा यांमध्यें विभागला गेला; आतां तिजकरितां मी सांत्वन कोठें शोधूं; हे माझे आई, तूं शोक करशील व घुसमशील ह्मणून मला दुःख वाटतें. עוקד והנעקד

ממאכלת יהמה सुरा पाहून माझा शब्द गर्जतो (मी ओरडतों) म्हणून हे माझ्या बापा, आतां, तो पाजीव, आणि माझे बंद आंवळ, आणि माझें मांस जाळण्याचे समयीं तूं धैर्य धरून जी माझी राख उरेल त्यांतून कांहीं घेऊन सारेला असें म्हण कीं, हा इसहाकाचा सुगंध. עוקד והנעקד

ויהמו כל (या मुळें) स्वारीचे सर्व दूत घाबरले, आणि ओफान, साराफ * आणि त्यांचे सेनापतिहि भिक्षा मागून ईश्वराजवळ विनंती करून म्हणाले (हे परमेश्वरा,) आम्हीं विनंती करितों कीं, आम्हासाठीं जीवदान देऊन त्याच्या बद्दल दे; आतां पृथ्वीस चंद्रावाचून×ठेऊं नको. עוקד והנעקד

אמר לאברהם तेव्हां आकाशाचा स्वामी आब्राहामास म्हणाला, तूं आपला हात तीन ज्योतींतील+ एका ज्योतीवर टाकूं नको; आणि अहो, माहानाइमांतल्या दूतानो तुम्ही शांतीने परता; हा दिवस येरूशालेमेच्या पुत्रास पुण्याचा दिवस आहे, त्या (दिवशीं) मी दयेचीं द्वारें उघडीन עוקד והנעקד

शाब्बाथ असल्यास कित्येक ठिकाणी हें बोलत नाहीं

לבריתך שוכן हे आकाश मंडळांत वस्ति क;

* ओफान आणि साराफ ह्या दूतांच्या जाती आहेत. × इसहाक.

\+ आब्राहाम, इसहाक व याकोब या तीन ज्योतींतील इसहाक या ज्योतीवर.

रणाऱ्या, विखरलेल्या आणि पिडलेल्या मंडळीकरितां तुझा करार व शपथ आठीव; (शाब्बाथ नसल्यास त्यांच्या करण्याची वाणी व गजर ऐक,) (शाब्बाथ असल्यास त्यांची प्रार्थना ऐक, आणि गजराची आठवण कर;) आणि सीयोनेस असें ह्मण कीं, तुझ्या तारणाचा वेळ जवळ आला आहे, मी इन्नोन * आणि एलिया यांस पाठवीन.

कित्येक ठिकाणीं हें गीतहि बोलतात.

המלך יי हे परमेश्वर राजा, वरील व खालील पदार्थ, ज्यांकडून माझा विश्वास वाढविला जातो त्यांच्या स्वामी, गीताच्या व उत्तराच्या मधुरपणाने (मी स्तवन करितों), आणि अहो त्याचे भक्तहो तुह्मीहि त्यासमोर तुताऱ्यांनी व करण्याच्या शब्दाने गजर करा. בחצרות

हे परमेश्वर राजा, माझ्या विनंतीकडे कान लाव; आणि पूर्वींच्या दिवसांप्रमाणें तूं आपलें घर स्थापून आपलें पवित्र मंदिर लवकर बांध. בחצרות

परमेश्वर राजा, पुस्तकें उघडून सात्विकांचीं, ज्ञान्यांचीं, आणि अति दुष्टांचींहि (कर्में लिहितो;) परंतु या लोकांस नीतिमान, व शुद्ध (सात्विक) लोकांबरोबर तो मोजील. בחצרות

हे परमेश्वर राजा, त्यागलेले लोकांचें तूं मेढवळण कर, आणि "त्यांनी हाक मारिल्यापूर्वी मी त्यांस उत्तर देईन" हें तुझें सत्य वचन त्यांवर पूर्ण कर. בחצרות

हे परमेश्वर राजा, उंच (आकाशांत) राहाणाऱ्या, उघडे पडलेल्या, पिडलेल्या, आणि जुलूम करणाऱ्यांच्या हातांकडून लुटलेल्या व नाशिलेल्या लोकाकडे पाहा आणि लक्ष लाव. בחצרות

हे परमेश्वर राजा, तुझ्या सोडून जाण्यापासून लवकर फीर,

---

* हासामीम लोकांच्या मताप्रमाणे इन्नोन हें नाम ७२ व्या गीतांत माशीयाहास दिल्हें आहे.

मग त्यादिवशीं तुझे लोक सर्व नगरांतून व बुरजांतून एकवट करण्याकरितां मोठा करणा वाजेल, आणि त्यांचे कळप पुनः गणणाऱ्यांच्या हातांकडून पार जातील. בחצרות

हे परमेश्वर राजा, प्रसवतेवेळीं वेदना देणाऱ्या स्त्रीसारिखे दुःखित मनाचे होऊन संकटाचे दिवशीं आम्ही तुला शोधितों पाहा, तारण करण्याविषयीं तुझा हात आखूड नाहीं; आमचें तारण करायास त्वरा करून आम्हामध्यें तूं वस्ति कर. בחצרות

हे परमेश्वर राजा, ज्याचीं कामें थोरपणाची व वैभवाचीं आहेत, तूं आपल्या लोकांच्या पापाची व (वाईट) कर्माची क्षमा कर; आणि त्यांच्या वैऱ्याने व शत्रूने लादलेले जोकडाचें ओझें हलकें कर. בחצרות

हे परमेश्वर राजा, भिकाऱ्याप्रमाणें तुझें दार ठोकणाऱ्या तुझ्या लोकांची विनंती तूं ऐक. कारण तुझें वचन असें आहे कीं, त्यांनी हाक मारिल्या अगोदर मी त्यांस उत्तर देईन. בח צרות

हे परमेश्वर राजा, जीवनासाठीं लिहिले जाणाऱ्या यथार्थांच्या नियमाप्रमाणे आम्हासहि जीवनासाठीं लिही; म्हणजे एक मी परमेश्वराचा आहें असी सई करील, आणि दुसरा आपणावर इस्राएल असें अडनाव लावून घेईल. בחצרות

शोफार वाजावेणाऱ्याने उभें राहून हें बोलावें.

יי בקול שופר परमेश्वर विखरलेल्या शेरडांस एकवट करायास करण्याच्या शब्दाने तारण ऐकवील; तेव्हां तारणाचें भविष्य पूर्ण होईल; आणि तेव्हां देव जयनादाने, परमेश्वर करण्याच्या शब्दाने चढेल.*

---

* चढेल याचा עלה हा इब्री शब्द भूतकाळांत आहे, परंतु मूळ कवीने त्याचा उपयोग भविष्यकाळांत केला आहे कारण कवितेमध्ये असें करण्यास अगत्य पडतें आणि ते शास्त्रांतील वाक्य आहे म्हणून तें पाळूंहि नये.

עלה אלהים देव जयनादाने, परमेश्वर करण्याच्या शब्दाने चढेल.

परमेश्वर करण्याच्या शब्दाने पवित्र डोंगरावर आणि येरुशालेमेवर आकाशांतून आवाज करील. तेव्हां तुझ्या उजव्या हाताचा रोपा पहिल्या प्रमाणे लावला जाईल. עלה אלהים

परमेश्वर करणा वाजवीत, आणि दक्षणेंतील वावटळींतून जातेसमयीं करणा वाजवून शेवट आणि नेमलेला वेळ कळवील; तेव्हां दुष्टाईचें राज्य नाशाप्रत जाईल. עלה אלהים

हे परमेश्वरा पवित्र डोंगरावर तूं करण्याचा शब्द काढून सीयोनेची वस्ती विस्तारशील; तेव्हां सेईर डोंगर फोडला आणि बसविलेली मेख * उपटली व तोडली जाईल. עלה אלהים

शोफार वाजविल्या अगोदर हीं वाक्यें म्हणावीं, तीं असीं कीं जें वाक्य हाज्जान म्हणेल तेंच मंडळीने पुनः म्हणावे.

עלה אלהים בתרועה देव जयनादाने, परमेश्वर करण्याच्या शब्दानें चढला. परमेश्वर जो राजा त्यासमोर करण्याच्या शब्दाने तुताऱ्यानी गजर करा. चंद्र तिथीस व पौर्णिमेस, आमच्या सनाच्या दिवशीं करणा वाजवा. कां तर हा इस्राएलाचा नेम, याकोबाच्या देवाचा ठराव आहे. अहो सर्व लोकहो, तुम्ही टाळ्या वाजवा; हर्ष नादाने देवाजवळ जय शब्द करा. अहो पृथ्वींतले सर्व तुम्ही परमेश्वराजवळ गजर करा. त्याजवळ नवें गायन गा; तुम्ही हर्षनादाने उत्तम प्रकारें वाजवा. अहो पृथ्वींतले सर्व, तुम्ही परमेश्वराजवळ गजर करा, हाक फोडा, आणि हर्ष शब्द काढून कीर्त्तन करा. आणि परमेश्वर त्यांवरती दृष्टीस पडेल, आणि त्याचा तीर विजेप्रमाणे निसटून जाईल; आणि प्रभु परमेश्वर करणा वाजवील, आणि दक्षिणेच्या

* यशाया २२.२५.

वावटुळी सुद्धां चालेल. मग शिंगाचा शब्द वाढून फार मोठा झाला तेव्हा मोशे बोलला, आणि देवाने शब्दें करून त्याला उत्तर दिल्हें. आणि त्यासमयीं असें होईल, कीं मोठा करणा वाजेल, तेव्हां जे अश्शुर देशामध्यें नाशाच्या लागास आलेले ते, आणि मिसर देशांत जे घालविलेले ते येतील, आणि यरूशालेमेंत पवित्र पर्वतावर परमेश्वराला भजतील. अहो जगांतले सर्व लोकांनी व पृथ्वींतले राहणारे हो, तो पर्वतावर झेंडा उभारील, तेव्हा पाहा; आणि करणा वाजवील, तेव्हां ऐका.

शोफार वाजविल्यापूर्वीं ही स्तुति करावी.

ברשות מורי ורבותי माझे गुरू व स्वामी यांच्या आज्ञेकरून (मी शोफार वाजवितों).

ברוך אתה ... हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, शोफाराची वाणी ऐकविण्याची आज्ञा * आम्हास देऊन पवित्र करणारा जो, तूं धन्य आहेस.

ברוך אתה ... हे परमेश्वरा ! आमच्या देवा, जगताच्या राजा, आम्हास या वेळपर्यंत जीवंत राखणाऱ्या, रक्षिणाऱ्या व पोहोंचविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

תשרת תשרת תשרת +
תשת תשת תשת
תרת תרת תרת

शोफार वाजविल्यानंतर मंडळीने तीन वेळा हें बोलावें.

אשרי העם जे लोक उत्साह शब्द जाणतात ते धन्य, हे परमेश्वरा तुझ्या मुखतेजाने ते चालतील. तुझ्या नामाने सर्व दिवस हर्ष करितील, तुझ्या नीतीने उंच होतील. कांतर तूं त्यांच्या शक्तीचें गौरव आहेस; तुझ्या प्रसन्नतेने आमचें शिंग

* टीका ९. + टीका १०.

उंच असतें. कारण कीं परमेश्वर आमची ढाल, इस्राएलाचा पवित्र आमचा राजा आहे. कोणतेंहि हत्यार जें तुजविरुद्ध घडलेलें आहे, तें साधणार नाहीं; आणि जी कोणती जीभ तुजसीं वाद करायाला उठेल, तिला तूं अन्यायी ठरविशील, हाच परमेश्वराच्या सेवकांचा विभाग, आणि हेंच मजपासून त्याचें न्यायीपण आहे, असें परमेश्वर म्हणतो. जे परमेश्वराशीं विरुद्ध होतील ते पराभव पावतील, तो आकाशांतून त्यावर गर्जना करील; परमेश्वर पृथ्वींतील सर्व देशांची न्यायाधिशी करील, आणि तो आपल्या राजाला शक्ति देईल, आणि आपल्या अभिषिक्ताचें शृंग उंच करील.

יהי חסדך יי हे परमेश्वरा! जसीं आम्ही तुजवर आशा ठेविली आहे तसी तुझी दया आम्हावर होवो. जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५

शाब्बाथ असल्यास एथून बोलावें.

ברוך יי परमेश्वराची स्तुति असो, कांतर जें जें त्याने सांगितलें, त्या सर्वा प्रमाणे आपल्या इस्राएल लोकांस विसांवा दिल्हा; त्याने आपला सेवक मोशे याकडून जें जें सांगितलें त्याच्या त्या सर्व चांगल्या वचनांतली एकहि गोष्ट पडून गेली नाहीं.

इतर दिवस असेल्यास एथून बोलावें.

יהי יי אלהינו आमचा देव परमेश्वर आमच्या वडिलांस जसा अनुकूळ होता, तसा आम्हास अनुकूळ व्हावा; त्याने आम्हास टाकूं नये आम्हांस सोडूंच नये. म्हणजे त्याच्या सर्व मार्गांत चालायास आणि त्याच्या आज्ञा व त्याच्या नेमणुकी व त्याचे न्याय, जे त्याने आमच्या वडिलांस आज्ञाकरू-

न लाविलें, ते पाळायास त्यानें आपल्याकडे आमचें अंतःकरण वळवावें. आणि ज्या शब्दांकडून म्या परमेश्वरा पुढें विनंती केली, ते रात्रंदिवस आमचा देव परमेश्वर याच्या जवळ व्हावे; म्हणजे त्याने आपल्या सेवकास न्याय व आपल्या इस्राएल लोकांचा न्याय दिवसादिवसाच्या प्रसंगाप्रमाणे करावा; यासाठीं कीं, पृथ्वीच्या सर्व लोकांनी जाणावें कीं, परमेश्वर तोच देव, त्यावांचून कोणी देव नाहीं. त्या शास्त्राच्या लेखानें तुझें तोंड न सोडावें; यासाठीं कीं त्यांत जें लिहिलेलें त्यासर्वांप्रमाणे त्वां सांभाळून चालावें; कारण कीं तशानें तूं आपला मार्ग सफल करिशील; आणि तेव्हां सुज्ञपणानें वागसील. म्या तुला आज्ञा दिल्ही कीं नाहीं ? तूं धीर धरून धीट हो; घाबरूं नको, आणि भिऊं नको; कारण कीं जेथें कोठें तूं जासील, तेथें तेथें तुझा देव परमेश्वर तुला अनुकूळ होईल.

हें पुढील वाक्य हाज्जान उंच स्वरानें दोन वेळ बोलतो.

ימלוך יי לעולם परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने तुझा देव पिढोपिढीं आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

शास्त्र ठेवायास नेतांना २९ वें गीत बोलतात.

שאו שערים अहो दरवाजे, तुह्मी आपले शिरोभाग उंच करा; सर्वकाळाचीं दारें हो, तुम्ही उंचाविलीं जा; मग गौरवाचा राजा आंत जाईल, हा गौरवाचा राजा कोण ? बळवान व पराक्रमी परमेश्वर, युद्धांत पराक्रमी परमेश्वर तो. अहो दरवाजे आपले शिरोभाग उंच करा; सर्वकाळचीं दारें हो, तुम्ही उंच व्हा; मग गौरवाचा राजा आंत जाईल. जो गौरवाचा राजा हा कोणः सैन्याचा परमेश्वर, तो गौरवाचा राजा आहे. सेलाह. तर तूं हें जाण कीं परमेश्वर जो तुझा देव तोच देव; तो विश्वसनीय देव; जे त्यावर प्रीति करितात व त्याच्या आज्ञा पालि-

तात, त्यांजवळ तो हजारांच्या पिढी पर्यंत करार पाळून त्यांवर दया करितो. कारण कीं तुमचा देव परमेश्वर कृपाळू देव आहे; तो तुह्मांस सोडणार नाहीं आणि तुम्हाला नाहींसे करणार नाहीं; आणि त्याने तुमच्या पूर्वजांसीं जो करार शपथ वाहून केला त्याला तो विसरणार नाहीं. कां, कीं परमेश्वर म्हणतो, कीं याकोबासाठीं हर्षानें गायन करा, आणि राष्ट्रांतल्या मुख्यांमध्यें गजर करा; वदा, आणि म्हणा हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांस, इस्राएलाच्या शेषास तार.

हेखालाच्या दरवाजापुढें हें बोलतात.

" יהללו את שם " (सर्व पदार्थ) यांनी परमेश्वराच्या नावाला स्तवावें; कारण कीं केवळ त्याचेंच नाव उंच मानायाचें; त्याचें गौवर पृथ्वीवरतीं व आकाशावरतीं आहे. आणि तो आपल्या लोकांचें शिंग उभारितो; त्याचे सर्व भक्त, त्याच्या जवळचा लोक इस्राएलसंताने यांनी स्तवन करावें. तुम्ही परमेश्वराला स्तवा. वर आकाशांत आणि खालीं पृथ्वीवर परमेश्वर तोच देव; परमेश्वर तोच देव; दुसरा नाहीं. हे प्रभु, देवांमध्यें तुझ्यासारिखा कोणी नाहीं. आणि तुझ्या कृत्यांसारिखें कांहीं काम नाहीं

हेखालांत शास्त्र ठेवितांना हें बोलतात.

שובה למעונך (हे देवा) तूं आपले वसतिस्थानाकडे फीर, आणि तुझ्या इष्टमंदिरांत राहणे कर; कारणकीं सर्व तोंडें व सर्व जीभा तुझें गौरव करितील आणि तुझ्या राज्याचें महत्वहि करितील. आणि तो उतरतेवेळेस तो म्हणे, हे परमेश्वरा, इस्राएलाच्या हजारांच्या अयुत्यांकडे फीर. हे परमेश्वरा! आम्हाला तुजकडे फिरीव, ह्मणजे आम्हीं फिरूं; पूर्वींप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

पहिल्यादिवशीं अधिक प्रार्थने अगोदर (मुसाफा अगोदर) हें बोलावें.

אהיה במאמר अनंत देव* कथनांत गौरवयुक्त आहे, त्यांत कांहींच न्यूनता नाहीं; शोभायमान आकाशाच्या सौंदर्यासहि सीमा आहे, परंतु त्यास (देवाला) अंत नाहीं. हे माझ्या बापा, जें पहिलें अर्पण अर्पिलें जाणार, तें आजच होवो; जो सर्वांच्या आदीपासून असणारा माझा बाप, त्याची दया पुष्कळ भयंकर आहे. अगदीं नाशास जाणें हेंहि तुझ्या मोठेपणाच्या आठवणीसारिखें आहे; हें स्तविण्याविषयीं भयंकर, उगा राहिल्यानेंहि तुझी स्तुति होते. अनंत (देव) जीवंत, निश्चल, चांगला, प्रसन्न होणारा व सर्व शक्तिमान आहे; तर विशेष तत्वाकडून सर्व व्यापक जें तत्व, त्याची स्तुति कशी होऊं शकेल! निश्चयें, माझा बापा (माझ्या) तोंडच्या वचनांमुळें (प्रार्थनेमुळें) मजवर कृपा करील, ह्मणून जें त्याचें तेंच मी त्यापुढें आणितों, कारण मी गरीब आहें. माझे अवयवांस (मरणानंतर) राहायास चार हातहि जागा नको; ते माझ्या पुष्कळ ओझ्यामुळें गळून पडतात. वरील आकाशें एकत्र होऊनहि तुला (व्यापूं) शकत नाहीं; यद्यपि मजमधील एका अंधारमय कोठडींत तुला जागा होऊं शकते. हे देवा, करुणा करून आणि प्रसन्नता हातीं धरून तुझ्या आवडत्या उत्पन्न केलेल्या पदार्थांचे शब्द, जरी उणे अथवा अधिक असले, तरी तूं त्यांस वश्य हो. (तूं) जो पहिला व शेवटला, तुझ्या थोर गौरवापुढें मी आपलें डोकें लववून गायन करून तुझें वैभव गाजवीन. जो पवित्र व पवित्र कर्त्ता ह्मरा, यास दया यावी, ह्मणून हे उठविणाऱ्या, व नवीन कृत्यें करणाऱ्या, तुला मी एकादें लहानसें नवें गीत गातों. ईश्वराचीं सर्व कामें एकत्र होऊन त्याच्या दूतांप्रमाणें त्याचें एकत्व

---

* अनंत देव या शब्दांच्या **אהיה** या शब्दाचा अर्थ मी असेन असा होतो, परतु निर्गम ३·१४ एथें हें ईश्वराचें नाम आहे असें सांपडतें.

मानितात; त्यांचीं सैन्यें आपल्या रीतिप्रमाणे त्यांची उपकार स्तुति करितात. जगांतील पदार्थांकडून आम्हांसीं बोलणाऱ्या हे खडकरूप आश्रया, मी आपल्या गळ्यानें तुला गाईन; हे माझ्या राजा, तुझें स्तवन करण्यासाठीं मी आपली वाणी करण्या प्रमाणे उंचावीन. अशुद्धांस शुद्ध करणें तुझ्या हातीं आहे; म्हणून आम्ही एकत्र होऊन शुद्धतेने तुला पवित्र मानितों.

दुसऱ्या दिवशीं हें बोलावें.

ארשת שפתינו हे दयाळू बापा, आमच्या ओठांची विनंती तूं ऐक. तोच आम्हावर दया करून आमच्या प्रार्थनेची वाणी व त्याचे लोक इस्राएलाचें घराणे, यांच्या प्रार्थनेची व काकुळतीची वाणी ऐकून तिजकडे आपला कान व लक्ष लावून आम्हास उत्तर देईल; आणि आपल्या कृपेने व प्रसन्नतेनें आम्हास दर्शन देऊन आह्मास उत्तर देईल व आमचा गजर ऐकेल. आणि तुम्ही तथास्तु ह्मणा.

आधिक प्रार्थनेंतील (मुसाफांतील) אדני שפתי मोठ्याने बोलल्या अगोदर हें पुढील गीत बोलण्याची चाल आहे.

שמעתי יי हे परमेश्वरा, तुझी कीर्ति ऐकून मी भयभीत झालों आहें.

חסד ואמת יי हे परमेश्वरा, दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत; ह्मणून न्यायाधीश जेव्हां न्याय करायास उठेल, तेव्हां हे परमेश्वरा, तूं आपली दया आवरून धरूं नको; आणि जे तुझें नाम जाणतात, ते तुजवर आशा ठेवितात; कारण कीं, हे परमेश्वरा, जे तुला शोधितात, त्यांस तूं सोडीत नाहींस.

יושב על כסא יי हे परमेश्वरा, आकाशावरील आपल्या माड्यांतील आसनावर बसणाऱ्या, तूं मनुष्यास त्याच्या मार्गाप्रमाणे व त्याच्या गुणाप्रमाणे देतोस; ह्मणून दुष्ट

आपल्या मार्गास, व अन्यायी मनुष्य आपल्या संकल्पास सोडून ईश्वराकडे फिरो.

ידין אפסי ארץ "" परमेश्वर पृथ्वींतील सर्व देशांचा न्याय करील, आणि त्यापुढें अगणित (मनुष्यें उभीं) राहतील; तेव्हां पृथ्वीचे शेवट जसें करण्याच्या शब्दाने व गजराने तसे कांपतील, आणि ईश्वराच्या भयामुळें तीं (मनुष्यें) खडकांच्या गुहांत व भुमीच्या बिळांत शिरतील. ""

מגן בעדי "" हे परमेश्वरा, मजवर ढाल असणाऱ्या, मी आपलें हाडें तुजपुढें ओतितों; पाहा, कीं मला दुःख झालें आणि पापामुळें माझें बळ खचतें; हे परमेश्वरा, मी आपला आत्मा तुझ्या हातीं सोंपितों, तूंच मला खंडून सोडविशील.

מלכנו "" हे परमेश्वरा, आमच्या राजा, तारणाच्या उगमांकडून तूंच आमचें तारण करशील; आम्ही जगूं आणि मरणार नाहीं; परमेश्वर देव माझीं अश्रूं पुसून टाकील, आणि मी त्याच्या राहुटींत गजराचें अर्पण करीन; आणि परमेश्वरासाठीं गाईन व कीर्त्तन करीन.

וכל קרבי "" हे परमेश्वरा, मजमधील सर्व अवयव, व माझे सर्व उगम (तुला धन्य म्हणतात); माझ्या जीवानें तुजवर भरंवसा ठेविला; मी आपले डोळे तुजकडे लावितों; जेव्हां त्वां म्हटलें कीं, तुम्ही माझें तोंड शोधा, तेव्हां माझें मन तुला म्हणालें कीं, हे परमेश्वरा, मी तुझें तोंड (शोधीन)

דרך חקיך "" हे परमेश्वरा, तुझ्या नियमाचा मार्ग मला शिकीव; आणि तुझ्या आज्ञांच्या मार्गानें मला चालीव; हे परमेश्वरा, तुझ्या वचनाप्रमाणें तुझी बहुत दया, आणि तुझें तारण मला प्राप्त होऊं दे; मी तुझ्या दयेवर भरंवसा ठेवितों, तुझ्या तारणामुळें माझें ह्रदय आनंदित होईल; मी परमेश्वराला गाईन.

עיניך "" हे परमेश्वरा, तुझी दृष्टी सत्याकडे व सर-

ळ मनुष्यांकडे नाहीं काय? आणि स्तुति व प्रार्थना ऐकणें हें तुला गुरांपेक्षां अधिक आवडत नाहीं काय? माझे पांय सरळ मार्गीं उभे राहातात, मी सभांमध्यें परमेश्वराला धन्य म्हणेन.

ישמע יי परमेश्वर नागव्याची, दीनाची व दरिद्र्याची प्रार्थना ऐकेल; आणि माझ्या जीवाची खंडणी अमोलीक असतांहि तो त्यास नरकापासून सोडवील; हे परमेश्वरा, तुला माझ्या तोंडचीं वाक्यें व माझ्या मनांतील ध्यान मान्य होवो.

אתאנו לחלות आम्ही तुजपुढें प्रार्थना करायास आलों आहों, कारण कीं दया व सत्यता तुझ्या दृष्टीपुढें आहेत. आतां आम्हास लज्जितकरूं नको, आतां आम्हास तुजसमोरून रिकामे परतवूं नको.

אוחילה לאל मी देवाची वाट पाहीन, मी त्याच्या पुढें प्रार्थना करीन; त्यापासून मी जिभेचें उत्तर (वक्तत्व) मागेन, कीं त्याकडून लोकांच्या समुदायामध्यें त्याच्या पराक्रमाविषयीं गाण्यास मी शक्तीमान् होईन; त्याच्या आश्चर्य कृत्यांवरून मी हर्षानें किर्त्तन करीन; मनाचे संकल्प मनुष्याचे; परंतु परमेश्वरा कडून जिभेचें उत्तर आहे.

מוסף

अधिक प्रार्थना.

אדני שפתי हे प्रभु, माझे ओंठ उघड, मग माझें तोंड तुझी स्तुति प्रगट करील.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमच्या पूर्वजांच्या देवा, अब्राहाम, इसहाक व याकोब यांच्या देवा, मोठ्या, पराक्रमी, भयंकर व परात्परदेवा, कृपादानें देणाऱ्या, सर्व पदार्थांच्या धनी, पूर्वजांच्या यथार्थतेची आठवण करणाऱ्या, आणि दयेकरून आपल्या नामाकरितां उद्धारक पाठविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

זכרנו לחיים हे जिवनांत आनंद मानणाऱ्या देव राजा! जीवनाकरितां आमची आठवण कर; हे जीवनाच्या देवा, तूं आपणाकरितां आम्हास जीवनाच्या पुस्तकांत लिही. हे जीवंत देवा, तूं राजा, सहायकर्त्ता, तारक, व (आम्हावर) ढालरूप असणारा आहेस. हे परमेश्वरा, आब्राहामाच्या ढालरूप (आश्रया,) तूं धन्य आहेस

אתה גבור हे प्रभु, तूं सर्वकाळ पराक्रमी आहेस! मेलेल्यांस जीवंतकरणारा, तारायास समर्थ, दहिवर पाडणारा, कृपेने प्राणिमात्रांचें पोषणकरणारा, बहुत दयेने मेलेल्यांस जीवंत करणारा, पडलेल्यांस आश्रय देणारा, रोग्यांस निरोगी करणारा, बंदिवानांस मोकळें करणारा, आणि धुळींत निजलेल्यांबरोबर आपली सत्यता स्थापन करणारा, तूंच आहेस. हे अद्भुत कृत्यें करणाऱ्या, तुजसारिखा कोण ! आणि हे राजा, मारणाऱ्या, जीवंत करणाऱ्या व तारण उगविणाऱ्या, तुझी बरोबरी कोण करूं शकेल!

מי כמוך हे दयाळू बापा, दयेने प्राणिमात्रांची जीवनाकरितां आठवण करणाऱ्या, तुजसारिखा कोण आहे ! आणि मेलेल्यांस जीवंत करणारा तूं सत्य आहेस. हे परमेश्वरा मेलेल्यांस जीवंत करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

मोठ्याने बोलताना हें बोलतात.

כתר יתנו हे परमेश्वरा, आमच्या देवा, दूतांचीं वरील सैन्यें. खालीं एकवट झालेल्या तुझ्या इस्राएल लोकांसहित तुला मुगुट देतात (तुझा राज्याधिकार मान्य करितात.) आणि तुझ्या भविष्यवाद्या कडून म्हटलेलें जें वाक्य आहे कीं, "तें एकमेकांला मोठ्याने बोलत म्हणाले, पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे;" त्याप्रमाणे ते सर्व एकदांच तीन वेळ तुझी पवित्रता गाजवितात.

त्याच्या गौरवाकडून सर्व जग भरलें आहे; आणि त्याच्या गौरवाचें स्तवन करावें म्हणून त्याची सेवा करणारे दूत त्याजविषयीं विचारून शोध करितात. त्याच्या समोर जे असतात, ते स्तुति करून असें म्हणतात कीं, त्याचया स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. त्याचे लोक त्यांचें एकत्व मानून जे प्रत्येक दिवशीं सकाळीं व संध्याकाळीं असे दोन वेळा प्रीतीने ह्मणतात कीं, हे इस्राएला ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे; त्यांकडे तो आपल्या स्थानांतून दयेने वळेल.- तोच आमचा देव; तोच आमचा बाप; तोच आमचा राजा; तोच आमचा तारणारा; तोच आम्हास तारील आणि दुसऱ्यावेळीं आम्हास सोडवील; आणि सर्व प्राण्यांच्या दृष्टीपुढें दयेने असें ऐकवील, कीं पाहा, मी परमेश्वर तुमचा देव तुह्मास देव असा व्हावा ह्मणून पहिल्याप्रमाणें शेवटीं तुह्मास सोडविलें आहे. आणि तुझ्या पवित्र शास्त्रांतहि लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढी आहे. तुम्ही परमेश्वराला स्तवा.

אתה קדוש तूं पवित्र आणि तुझें नामहि पवित्र आहे; आणि धार्मिक मनुष्यें नित्य तुझें स्तवन करितात.

לדור ודור पिढोपिढीं तुम्ही देवाचें राज्य मान्य करा; कारण तो एकटाच महान व पवित्र आहे.

ובכן יתקדש यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या इस्राएल लोकांमध्यें तुझें नाम पवित्र मानिलें जावो.

ובכן תן פחדך यास्तव हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या सर्व कामांवर आपलें भय, जें सर्व त्वां उत्पन्न केलें आहेस त्यावर आपला त्रास घाल; ह्मणजे सर्व कृत्यें तुला भितील, आणि सृष्टींतील सर्व पदार्थ तुजपुढें नमन करितील, आणि पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करण्या करितां ते एक मेळा करि-

तील. कारण आह्मी जाणतों कीं, राज्य तुलाच शोभतें; सामर्थ्य तुझ्या हातीं व पराक्रम तुझ्या उजव्या हातीं आहे; आणि सर्व उत्पन्न केलेले पदार्थांस तुझें नाम भयंकर आहे.

ובכן תן כבוד यास्तव लवकर व आमच्या आयुष्याच्या दिवसांत तूं आपल्या लोकांस मोठेपणा दे, आपल्या भिणाऱ्यांची प्रशंसा कर, आपल्या शोधणाऱ्यांस चांगली आशा व आपली वाट पाहाणाऱ्यांस भरंवसा दे. आपल्या देशास आनंदित कर, आपल्या नगरास हर्षित कर, आपला सेवक दावीद याचें, शिंग उगीव (उभार), आणि इशायाचा पुत्र माशीयाह याचा दिवा सिद्ध (प्रकाशित) कर.

ובכן צדיקים यामुळें पुण्यवान् पाहून आनंद करितील, यथार्थ हर्ष करितील, आणि धार्मिक उल्हासानें गातील; परंतु पापाचें तोंड बंद होईल, दुष्टाई धुराप्रमाणें नाहींसी होईल; कारण दुष्कर्मांचा अधिकार तूं पृथ्वींतून काढून टाकिशील.

ותמלוך אתה मग हे परमेश्वरा, आमच्या देवा, लवकरच तूं आपल्या सर्व कृत्यांवर सियोन डोंगर जें तुझ्या गौरवाचें वसतिस्थान, आणि येरूशालेम जें तुझें पवित्र नगर, त्यामध्यें लवकरच राज्य करिशील. तुझ्या पवित्र वचनांतहि तसेंच लिहिलें आहे कीं, परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो. हे सियोने, तुझा देव पिढोपिढीं आहे. तुह्मी परमेश्वराला स्तवा.

קדוש אתה तूं पवित्र आहेस, आणि तुझें नामहि भयंकर आहे, आणि तुजवांचून दुसरा कोणी देव नाहीं; आणि लिहिलेलेंहि तसेंच आहे कीं, सैन्याचा परमेश्वर नीतीनें उंचावेल, आणि देव जो पवित्र त्याला न्यायानें पवित्र मानितील. हे परमेश्वरा पवित्र राजा, तूं धन्य आहेस !

אתה בחרתנו त्वां आम्हास सर्व लोकांतून निवडून घेतलें, आम्हावर प्रीतिकरून व आम्हास प्रसन्न होऊन

सर्व भाषांपेक्षां (जातींपेक्षां) आम्हास उंचाविलें, आपल्या आज्ञांकडून आम्हास पवित्र केलें, हे आमच्या राजा, आपली सेवा करण्याकरितां आम्हास जवळ घेतलें, आणि तुझें मोठें व पवित्र नाम आम्हास दिल्हें आहे.

ותתן לנו आणि हे परमेश्वरा, प्रीतिभावेंकरून तूं आम्हास (शाब्बाथ असल्यास हा शाब्बाथ दिवस व) हा स्मरणाचा दिवस, हा पवित्र मेळा मिळण्याचा सुदिन; गजराचा दिवस (शाब्बाथ असल्यास गजर आठविण्याचा दिवस) जो मिसरांतून निघण्याच्या आठवणी करितां प्रीतिरूप पवित्र मेळा, तो दिल्हा आहेस.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या पापांमुळें आम्ही आपल्या देशांतून पाडाव करून नेले गेलों आणि आमच्या मुलुकापासून दूर केले गेलों आहों; यास्तव नेमून दिल्हेलीं अर्पणें तुजपुढें अर्पायास आम्हास सामर्थ्य नाहीं. हे परमेश्वरा ! आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, दयाळू राजा, तुजपुढें असी प्रसन्नता होवो कीं, तूं फिरून आम्हावर आणि आपल्या अत्यंत दयेने आपल्या पवित्र मंदिरावर दया कर; आणि तें लवकर बांधून त्याचें वैभव वाढीव. हे आमच्या बापा, राजा, व देवा, आम्हावर तूं आपल्या राज्याचें गौरव लवकर प्रगट कर; सर्व प्राण्यांच्या देखतां आम्हावर प्रकाशित होऊन थोर मानिला जा; आमच्या विखरलेल्यांस राष्ट्रांमधून जवळ आण; आणि आमच्या परागंदा झालेल्यांस पृथ्वीच्या शेवटापासून एकवट कर. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझें नगर सियोन एथें आम्हास गायन करीत आणि तुझें पवित्र नगर येरूशालेम एथें सर्वकाळाच्या आनंदाने ने. हे परमेश्वरा, मग तेथें नित्याचीं नेमलेलीं अर्पणें त्यांच्या रीतीप्रमाणे आणि अधिक अर्पणें त्यां-

च्या पद्धतीप्रमाणे आम्ही करूं; म्हणजे (शाब्बाथ असल्यास या शाब्बाथ दिवसाचें अधिक अर्पण व) या स्मरणाच्या दिवसाचें, या पवित्र मेळा मिळण्याच्या सुदिनाचें अधिक अर्पण, असें आम्ही तुजपुढें प्रीतीने तुझ्या इच्छेच्या आज्ञां प्रमाणे, जसें तुझा सेवक मोशे याच्या हातांकडून आम्हाकरितां तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे, त्या प्रमाणे आम्ही करूं व अर्पूं.

עלינו לשבח पृष्ठ २५

על כן נקוה לך पृष्ठ २५

ונאמר לא הביט און आणि असें म्हटलें आहे कीं, त्याने याकोबाकडलें अनुचित न्याहाळिलें नाहीं; इस्राएलांतलें दुष्कर्म पाहिलेंच नाहीं; त्याचा देव परमेश्वर त्याला अनुकूळ आहे; आणि त्यामध्यें राजाचा जयजयकार आहे. आणि तो येशुरूनावर राजा होता; जेव्हां लोकांचे अधिकारी व इस्राएलाचे वंश एकत्र मिळाले तेव्हां.

ובדברי קדשך आणि तुझ्या पवित्र वचनांत असें लिहिलें आहे कीं, कांतर राज्य परमेश्वराचें आहे; तोच राष्ट्रांवर अधिकार करितो. आणखी असें म्हटलें आहे कीं, परमेश्वर राज्य करितो; तो उत्कृष्टता ल्यालेला; परमेश्वर ल्यालेला आहे, त्याने आपल्याला पराक्रम वेष्टिला आहे, आणखी पृथ्वी स्थिर स्थापलेली आहे; ती हालणार नाहीं. आणखी असें म्हटलें आहे कीं, अहो दरवाजे, तुम्ही आपले शिरोभाग उंच करा; सर्वकाळचीं दारें हो, तुम्ही उंचाविलीं जा; मग गौरवाचा राजा आंत जाईल. हा गौरवाचा राजा कोण ! बळवान व पराक्रमी परमेश्वर, युद्धांत पराक्रमी परमेश्वर तो. अहो दरवाजे, तुम्ही आपले शिरोभाग उंचकरा; सर्वकाळचीं दारें हो, तुम्ही उंच व्हा; मग गौरवाचा राजा आंत जाईल. जो गौरवाचा रा-

जा हा कोण? सैन्याचा परमेश्वर, तो गौरवाचा राजा आहे. सेलाह.

ועל ידי עבדיך तुझे सेवक भविष्यवादी यांच्या हातांकडून असें लिहिलेलें आहे कीं, परमेश्वर इस्राएलाचा राजा आणि त्याचा उद्धारणारा सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं मीं पहिला व शेवटलाहि मीं आहें, आणि मजवांचून कोणी देव नाहीं. आणखी असें ह्मटलें आहे कीं, आणि एसावाच्या पर्वताचा न्याय करायाला सियोन पर्वतावर तारणारे चढतील; आणि राज्य परमेश्वराचें असत जाईल. आणखी असें ह्मटलें आहे कीं, आणि परमेश्वर सर्व पृथ्वीवर राजा होईल; त्यासमयीं एकच परमेश्वर होईल, आणि त्याचें नाम एकच. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझ्या शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, हे इस्राएला, ऐक; परमेश्वर आमचा देव आहे, आणि परमेश्वर एकच आहे.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, सर्व जगावर तूं आपल्या गौरवानें राज्य कर; आपल्या वैभवानें सर्व पृथ्वीवर थोर मानिला जा; आणि आपल्या सामर्थ्याच्या महत्वानें भूमंडळाच्या राहाणाऱ्यांवर प्रकाशित हो; मग सर्व उत्पन्न केलेले पदार्थ जाणतील, कीं त्वां त्यांस उत्पन्न केलें; सर्व घडिवलेले पदार्थ जाणतील, कीं त्वां त्यांस घडिलें; आणि ज्यांच्या नाकपुड्यांत श्वास आहे, ते ह्मणतील कीं, इस्राएलाचा परमेश्वर देव राज्य करितो; आणि त्याचा अधिकार सर्वांवर चालतो.

קדשנו במצותיך तूं आपल्या आज्ञांकडून आह्मास पवित्र कर; तुझें शास्त्र आमचें वतन होऊं दे; आपल्या चांगुलपणाकडून आह्मास तृप्त कर; आपल्या तारणाकडून आमचा

जीव आनंदित कर; तुझी सेवा सत्याने करायास आमचीं मने शुद्धकर; कारण तू (स्वतां) सत्य परमेश्वर देव आहेस आणि हे आमच्या राजा, तुझें वचन सर्वकाळ सत्य व स्थापित आहे. हे परमेश्वरा सर्व पृथ्वीच्या राजा, (शाब्बाथ असल्यास— शाब्बाथास व) इस्राएलास व स्मरणाच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

एथें कोणी **תשרת** तीन वेळ वाजवितात

आणि कोणी **תשרת.תשת.תרת** एकवेळा असे वाजवितात.

היום הרת עולם आजच पृथ्वीने गर्भ धरिला; आणि आजच जगांतील सर्व घडविलेले पदार्थ न्यायांत उभे केले जातात. जरी तूं आम्हास लेंकरांप्रमाणे अथवा सेवकांप्रमाणे जाणिलेंस (तरी आमचें तारण होईल;) जर आम्हास लेंकरांप्रमाणें जाणसील, तर बापाप्रमाणे आम्हावर दया कर; आणि जर आम्हास सेवकांप्रमाणे जाणसील, तर तूं आम्हावर दया करीस तोंपर्यंत आमचे डोळे तुजकडे लागले आहेत; आणि हे पवित्र (देवा,) आमचा न्याय तूं उजेडांत आण.

אתה זוכר तूं जगांतील कृत्यांचें स्मरण राखितोस आणि पूर्वींच्या घडविलेल्या पदार्थांची पाहाणी करितोस; सर्व गुह्य आणि प्रारंभापासून गुप्त राखलेल्या बहुत गोष्टी तुजपुढें प्रगट आहेत; कारण तुझ्या गौरवाच्या आसनापुढें विस्मरण नाहीं, आणि तुझ्या दृष्टीपुढून काहींच लपलें जात नाहीं तूं सर्व कामांची आठवण ठेवितोस आणि तुजपुढून घडलेले पदार्थांतून कोणताहि दडून राहात नाहीं. हे परमेश्वरा ! आमच्या देवा, सर्व पिढ्यांचा शेवट पाहून लक्षांत ठेवणाऱ्या ! सर्व तुजपुढें उघड व प्रगट आहेत. कारण सर्व प्राणी व जीव यांची पाहाणी करण्याकरितां, पुष्कळ कर्मांची व अगणीत गुह्यांची आठवण देण्याकरितां तूं नियम व याद (पुढें) आणिशील. याप्रमाणे तूं

प्रारंभापासून कळविलें आहेस; आणि पूर्वीपासून तें प्रगट केलें आहेस; कीं हा दिवस तुझ्या कृत्यांच्या आरंभाचा आणि पहिल्या दिवसाच्या स्मरणाचा दिवस असा आहे; कांतर हा इस्राएलाजवळ नेम व याकोबाच्या देवाचा ठराव आहे.

ועל המדינות आणि (याचदिवशीं) नगरांविषयीं ठराव विदित केला जातो; ह्मणजे (पुढीलवर्षीं कोणत्यावर तरवार व कोणत्यावर समाधान येणार; कोणत्यावर दुष्काळ व कोणत्यावर सुकाळ येणार; हें आजच ठरतें; आणि जीवनाकरितां किंवा मरणाकरितां आठवण व्हावी, ह्मणून सर्व प्राणिमात्रांची आजच पाहाणी होते. आज ज्याची पाहाणी होणार नाहीं असा कोण आहे? कारण सर्व कृत्यें, मनुष्याचीं कामें व त्यांची वर्त्तणूक; त्याचीं दुष्कर्मे व आचरण; त्याचे विचार व संकल्प यांची आठवण तुजपुढें होते. जो मनुष्य तुला विसरत नाहीं; जो मनुष्यपुत्र तुजवर विश्वास ठेऊन राहातो, तो धन्य; कांतर तुला शोधणारे कधीं गळून पडत नाहीं; आणि तुजवर भरंवसा ठेवणारे कधींच विस्मित होत नाहीं. सर्व घडलेल्या पदार्थांची आठवण तुजपुढें होते; आणि तूं सर्वांचीं कामें शोधितोस. आणि जेव्हां मासमयांचा त्यांच्या कर्मांच्या दुष्टाईमुळें नाश करायास जलप्रलय आणिलास, तेव्हां तूं दयेनें नोहाची आठवण केलीस, आणि तारणाच्या व दयेच्या वचनाकडून त्यास दर्शन दिल्हेंस. यास्तव हे परमेश्वरा, आमच्यादेवा, त्याचें बीज पृथ्वीवरील धूळीप्रमाणें आणि त्याचें संतान समुद्राच्या कांठावरील रेतीप्रमाणें वाढावें ह्मणून त्याची आठवण तुजपुढें होवो; जसें तुझ्या शास्त्रांत लिहिलें आहे.- आणि नोहा आणि त्याच्या संगती तारवांत जे सर्व पशू त्यांची आठवण देवानें केली; आणि देवानें पृथ्वीवर वारा वाहविला, मग पाणी शमलें. आणखी असें म्हटलें आहे कीं, तसीं देवानें त्यांचीं कण्हणीं ऐकिलीं, आणि देवानें आब्राहामासीं, इस-

इाकासीं, व याकोबासीं जो आपला करार तो आठविला, आणखी असें म्हटलें आहे कीं, आणखी इस्राएलाचीं संताने ज्यांस मिसरी लोक चाकर करितात त्यांचें कण्हणें म्या ऐकिलें, आणि आपला करार आठविला आहे.

ובדברי קדשך तुझ्या पवित्र वचनांत असें लिहिलें आहे कीं, त्याने आपल्या आश्चर्य कृत्यांविषयीं सूचना केली आहे; परमेश्वर कृपाळू व ममताळू आहे. आणखी असें म्हटलें आहे कीं, तो आपल्या भीणाऱ्यांस भक्ष देतो; तो आपला करार सर्वकाळ आठवील. आणखी असें ह्मटलें आहे कीं, आणि त्यांच्यासाठीं त्याने आपला करार आठवून आपल्या मोठ्या दयेप्रमाणे अनुताप केला.

ועל ידי עבדיך तुझे सेवक भविष्य वादी यांच्या हातांकडून असें लिहिलेलें आहे कीं, तूं जाऊन येरुशालेमेच्या कानांत गाजवून सांग, परमेश्वर ह्मणतो, कीं मी तुझ्या तरुणपणाची दया, तुझ्या वाङ्‌निश्चयाची प्रीति स्मरतों, ज्या त्वां रानांत न पेरलेल्या भूमींत मला अनुसरून केली ती. आणखी असें ह्मटलें आहे कीं, तथापि तुझ्या तरुणपणाच्या दिवसांत जो माझा करार तुजसीं झाला, तो मी स्मरेन, आणि तुजसीं सर्वकाळचा करार ठरवीन. आणखी असेंहि ह्मटलें आहे कीं, काय, एफ्राइम माझा प्रियपुत्र आहे ? आणि मनोरम लेंकरु आहे कीं नाहीं? तर मी त्याला बोललों, तेव्हांपासून एव्हांपर्यंत मी त्याला खचीत स्मरतों; याकरितां माझें अंतर्याम त्याविषयीं कळवळतें; निश्चयें त्याजवर दया करीन, असें परमेश्वर ह्मणतो.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमची, आमच्या पूर्वजांची, तुझ्या येरूशालेम नगराची, तुझा सेवक दावीद याचा पुत्र जो माशीयाह त्याची, आणि तुझे सर्व लोक इस्राएलाचें घराणे यांची आठवण

या (शाब्बाथ असल्यास शाब्बाथ दिवशीं व या) स्मरणाच्या दिवशीं, या पवित्र मेळा मिळण्याच्या सुदिनीं यशस्वी तारणाकरितां कृपेने, दयेने व ममतेने तुजपुढें चढो, येवो, पोंहोचो, पाहिली जावो, मान्य होवो, ऐकिली जावो, लक्षांत आणिली आणि आठविली जावो. आह्मावर दया करण्यास व आमचें तारण करण्यास; हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचें कल्याण होण्याकरितां आमची आठवण कर; आह्मावर आशीर्वाद होण्याकरितां आह्मास दर्शन दे; आह्मास चांगलें जीवन प्राप्त होण्याकरितां आमचें तारण कर; तारणाच्या व दयेच्या वचनाने आह्मास राख, आह्मावर कृपाकर, आमची करुणा येऊं दे, आह्मावर दयाकर आणि आह्मास तार, कारण तूंच दयाळू व कृपाळू देव राजा आहेस; ह्मणून आमचे डोळे तुजकडे लागले आहेत.

אלהנו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा तुजपुढें चांगल्या आठवणीने आमची आठवण करून पूर्वींच्या आकाशांच्या आकाशांतून दयेच्या व तारणाच्या दर्शनाकडून आह्मास दर्शन दे. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, आमचा बाप आब्राहाम याजबरोबर केलेला करार, त्याजवरील दया व मोरिया डोंगरावर त्याजवळ वाहिलेली शपथ; आणि त्याचा पुत्र इसहाक याचें स्थंडिलाच्या बाजूवर बांधलें जाणे तूं आठीव. आणि जसें त्याने पूर्ण मनाने तुझी इच्छा पूर्ण करण्याकरितां आपल्या दयेस जिंकिलें, तसें तुझ्या दयेने तुझ्या रागास जिंकावें; आणि तुझ्या दयेने तुझ्या न्यायत्वाच्या गुणास अगदीं झांकावें असें कर; आणि आपल्या मोठ्या चांगुलपणामुळें आपल्या लोकांवरून, नगरावरून, देशावरून व वतनावरून आपला राग फिरीव. आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा सेवक मोशे याजकडून तूं आपल्या शास्त्रांत आह्मास अभयवचन दिल्हेल्या गोष्टी आमचे प्रत्ययास आण. जसें ह्मटलें

आहे कीं, तर त्यांच्या पूर्वजांशीं जो करार, तो मी त्यांच्या सा- ठीं आठवीन; कांतर त्या पूर्वजांस त्यांचा देव व्हावा ह्मणून त्या राष्ट्रांच्या देखतां मिसर देशांतून काढिलें; मी परमेश्वर आहें.

כי זוכר כל הנשכחות तूं सर्व विसरलेल्या गो- ष्टींची आठवण करितोस, आणि तुझ्या गौरवाच्या आसनापुढें वि- स्मरण नाहीं; म्हणून आज इसहाकाचें बांधलें जाणें त्याच्या बीजा- करितां आठीव. हे परमेश्वरा! करार आठविणाऱ्या, तूं धन्य आहेस.

एथें कोणी תשת तीन वेळ वाजवितात

आणि कोणी תשרת תשת תרת एक वेळ असें वाजवितात.

היום הרת עולם आजच पृथ्वीने गर्भ धरिला; आणि आजच जगांतील सर्व घडविलेले पदार्थ न्यायांत उभे केले जातात जरी (तूं) आम्हास लेंकरांप्रमाणे अथवा सेवकांप्रमाणे जाणिलेंस (तरी आमचें तारण होईल;) जर आम्हास लेंक- रांप्रमाणे जाणसील, तर बापाप्रमाणे आम्हावर दया कर; आणि जर आम्हास सेवकांप्रमाणे जाणसील, तर तूं आम्हावर दया करीस तोंपर्यंत आमचे डोळे तुजकडे लागले आहेत. आणि हे पवित्र (देवा,)आमचा न्याय तूं उजेडांत आण.

אתה נגלית तूं आपल्या पवित्र लोकांशी बोलण्याकरितां गौरवयुक्त ढगांत प्रगट झालास; तूं आपली वाणी आकाशांतून त्यांस ऐकविलीस; आणि तेजस्वी मेघांतून प्रगट झा- लास. आणि हे आमच्या राजा! आपल्या लोकांस शास्त्र व आज्ञा शिकविण्यासाठीं जेव्हां तूं सीनाय पर्वतावर प्रसिद्ध झालास, जेव्हां तूं आपल्या वाणीचे गौरव व अग्नीच्या ज्वालांतून आपलीं पवित्र वचने त्यांस ऐकविलींस; तेव्हां सर्वलोक तुजपुढें कांपले आणि प्रारंभीं उत्पन्न केलेले (पदार्थ) घाबरले. तूं गर्जनेकडून व विजांकडून त्यांजवर प्रसिद्ध झालास, आणि शिंगाच्या वाणीकडून त्यांजवर प्रकाशित झालास. जसें शास्त्रांत लिहिलें आहे कीं, प्रग

तिसऱ्यादिवशीं सकाळीं असें झालें कीं, गर्जना, व विजा, व डोंगरावर भारी ढग, आणि शिंगाचा फार मोठा शब्द झाला, यास्तव तळांतील सर्व लोक कांपले. आणखी असें म्हटलें आहे कीं, मग शिंगाचा शब्द वाढून फार मोठा झाला तेव्हां मोशे बोलला, आणि देवानें शब्देंकरून त्याला उत्तर दिल्हें. आणखी असेंहि म्हटलें आहे कीं, तेव्हां त्या गर्जना, व ते जाळ, व शिंगाचा शब्द, व धुरयुक्त डोंगर हीं सर्वलोकांनीं पाहिलीं; यास्तव लोक पाहून पळाले आणि दूर उभे राहिले.

ובדברי קדשך तुझ्या पवित्र वचनांत असें लिहिलें आहे कीं, देव जयनादानें, परमेश्वर करण्याच्या शब्दानें चढला. आणखी असें म्हटलें आहे कीं, परमेश्वर जो राजा त्यासमोर करण्याच्या शब्दानें तुताऱ्यांनीं गजर करा. चंद्रतिथीस व पौर्णिमेस, आमच्या सणाच्यादिवशीं करणा वाजवा.

הללויה गीत १५०

ועל ידי עבדיך तुझे सेवक भविष्यवादी यांच्या हातांकडून असें लिहिलेलें आहे कीं, आणि त्यासमयीं असें होईल, कीं मोठा करणा वाजेल, तेव्हां जे अश्शुर देशांमध्यें नाशाच्या लागास आलेले ते, आणि मिसर देशांत जे घालविलेले ते येतील, आणि येरूशालेमेंत पवित्र पर्वतावर परमेश्वराला भजतील. आणखी असें म्हटलें आहे कीं, अहो जगांतले सर्वलोकानो व पृथ्वींतले राहाणारे हो, तो पर्वतांवर झेंडा उभारील, तेव्हां पाहा; आणि करणा वाजवील, तेव्हां ऐका. आणखी असेंहि म्हटलें आहे कीं, आणि परमेश्वर त्यावरतीं दृष्टीस पडेल, आणि त्याचा तीर विजेप्रमाणें निसटून जाईल; आणि प्रभु परमेश्वर करणा वाजवील, आणि दक्षिणेच्या वावटुळीसुद्धा चालेल. सैन्याचा परमेश्वर त्यांचें निवारण करील; सैन्याचा परमेश्वर तुमचें निवारण करील; सैन्याचा परमेश्वर आमचें निवारण करील.

אלהינו ואלהי אבותינו हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आमच्या मुक्ततेकरितां मोठा करणा वाजीव, आणि आमच्या पाडाव करून नेलेल्यांस एकवट करण्याकरितां झेंडा उभार, आणि तुझ्या गौरवी मुखांतील जें वचन तुझा सेवक मोशे याचा हातांकडून लिहून तूं आपल्या शास्त्रांत आह्मास अभयवचन दिल्हें आहेस तें पूर्ण कर. जसें ह्मटलें आहे कीं, आणि तुह्मी आपल्या हर्षांच्या दिवसांत व आपल्या सणांत व आपल्या महिन्याच्या प्रारंभीं व आपल्या होमाजवळ, व आपल्या शांतिकारक यज्ञाजवळ करणे वाजवा; ह्मणजे ते तुमच्या देवाच्या लक्षांत तुह्माविषयीं सूचक असे होतील; मी परमेश्वर तुमचा देव आहें.

כי שומע קול שופר तूं करण्याची वाणी ऐकितोस, आणि गजराकडे लक्ष लावितोस, आणि तुजसारिखा कोणी नाहीं; ह्मणून हे परमेश्वरा, इस्राएलाच्या गजराची वाण (शा. अ. बोलूं नये आज) दयेने ऐकणाऱ्या, तूं धन्य आहेस.

एथे कोणी תרת तीन वेळ वाजवितात

आणि कोणी תשרת תשת תרת एकवेळ असे वाजवितात.

רצה יי אלהינו हे परमेश्वरा, आमच्या देवा; तूं आपल्या इस्राएल लोकांस प्रसन्न हो; त्यांची प्रार्थना मनावर घे; आपल्या घराच्या प्रसाद स्थानीं पूजन पुनः चालूकर; इस्राएलांचीं अर्पणें व त्यांची प्रार्थना लवकर आवडीने मान्यकर; आणि तुझ्या इस्राएल लोकांची भक्ति तुला आवडो.

ואתה ברחמיך הרבים तूं आपल्या बहुत दयेने आम्हाविषयीं संतोषित होऊन आम्हास प्रसन्न हो, मग आमचे डोळे तुला कृपेकरून सियोनेकडे फिरताना पाहतील. हे परमेश्वरा! आपला शखीना सियोनेमध्यें पुनः स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

מודים דרבנן सदां-सर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव, सर्व मांसमयांचा देव, आमचा व मारंभी (पृथ्वीचा) घडणारा जो तूं, तुलाच आम्ही स्तवितों. त्वां आम्हास जीवंत राखिलें व आम्हास रक्षिलें, म्हणून आम्ही तुझ्या मोठ्या व पवित्र नामांस धन्य म्हणतों व त्याचें स्तवन करितों. आणि आम्ही तुझे नियम पाळावे, तुझी इच्छा पूर्ण करावी आणि पूर्ण मनाने तुझी सेवा करावी; म्हणून (आम्ही विनंती करितों कीं,) त्याचप्रमाणे आम्हास जीवंत राख, आम्हावर दया कर, आणि आपल्या मंदिरीं आमच्या पाडाकरुन नेलेल्यांस एकवट कर; कीं यावरून, हे सुवंदित व धन्य देवा, आम्ही तुझी स्तुति करावी.

מודים אנחנו לך

सदासर्वकाळ आमचा परमेश्वर देव व आमच्या पूर्वजांचा देव जो तूं, तुलाच आम्ही स्तवितों. तूं आमचा व आमच्या जीवांचा खडकरूप आश्रय, व आमच्या तारणाची ढाल आहेस. आमचा जीव तुझ्या हातीं सोंपिलेला आहे, आमचा आत्मा तुझ्या स्वाधीन आहे; तुझे चमत्कार आम्हामध्यें नित्य केले जातात आणि तुझीं आश्चर्य कृत्यें व तुझा चांगुलपणा आह्मी संध्याकाळीं, सकाळीं व दोन प्रहरीं अनुभवितों, त्यांकरितां आम्ही पिढोपिढी तुझें कीर्त्तन करूं व तुझे स्तुतीचें वर्णन करूं. तूं चांगला आहेस, कारण तुझी दया आम्हावरून नाहींसी होत नाहीं; तूं कृपाळू, कारण सर्वकाळ आम्ही तुजवर आशा ठेवितों; म्हणून तुझी कृपा आम्हावरून सरत नाहीं.

ועל כלם יתברך हे आमच्या राजा, या सर्व (दयेवरून) तुझें नाम अखंडित व सर्वकाळ धन्य म्हटलें, उंचावलें व वर्णिलें जावो. आणि सर्व प्राणी तुझें स्तवन करोत. सेलाह. तूं आपल्या कराराच्या लेंकरांस चांगल्या जीवनाकरितां लिही.

ויהללו ויברכו मग हे आमच्या तारणाच्या व सहायकारी देवा, आणि हे उत्तम देवा, ते सर्वकाळ तुझ्या मोठ्या नामास सत्यतेने स्तवितील; आणि धन्य ह्मणतील कारण ते चांगले आहे. सेलाह. हे परमेश्वरा! तूं धन्य आहेस, चांगलें तुझे नाम, आणि स्तवन तुलाच शोभतें.

मोठ्याने बोलताना हें बोलतात

אלהנו ואלהי אבותינו हे आमच्या देवा, व आमच्या पूर्वजांच्या देवा, जो तिप्पट आशीर्वाद, तुझा सेवक मोशे याच्या हातांकडून शास्त्रांत लिहिला आहे, आणि जो, आहारोन व तुझे पवित्र लोक त्याचे पुत्र, हे उच्चारित असत, कीं "परमेश्वराने तुला आशीर्वाद देऊन तुझें रक्षण करावें. परमेश्वराने आपल्या दृष्टीचा प्रकाश तुजवर पाडून तुजवर कृपा करावी. परमेश्वराने आपली दृष्टी तुजवर लावून तुझें कल्याण करावें. तसें त्यानी माझें नाम इस्राएलाच्या संतानावर लावावें, ह्मणजे मी त्यांस आशीर्वाद देईन; तो आशीर्वाद तूं आह्मास दे.

שים שלום (हे परमेश्वरा,) आम्हावर व तुझ्या सर्व इस्राएल लोकांवर चांगलें, आशीर्वाद, जीवन, दया, कृपा, यथार्थता व ममता असूं दे. आणि हे आमच्या बापा, तूं आपल्या मुखतेजाकडून आम्हासर्वांस एकमेळीं आशीर्वाद दे; कारण हे परमेश्वरा, आमच्या देवा, तूं आपल्या मुखतेजाकडून आह्मास शास्त्र व जीवन, प्रीति व दया, यथार्थता व कृपा, आशीर्वाद व शांति दिल्ही आहेस. आणि आम्हास व तुझ्या सर्व इस्राएल लोकांस मोठा सामर्थ्य रूप व कल्याणयुक्त आशीर्वाद देण्यास तुझ्या दिसण्यांत चांगलें असो.

ואתם הדבקים पृष्ठ २०

ובספר חיים आणि आह्मी व तुझे सर्व इस्राएल लोक हे चांगल्या जीवनाकरितां व कल्याणाकरितां, जी·

धनाच्या, आशीर्वादांच्या, कल्याणाच्या, चांगल्या अन्नसामग्री-च्या, तारणाच्या, समाधानाच्या व चांगल्या निवाड्याच्या पुस्त-कांत तुजपुढें आठवण होवून लिहिले जावोत.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याण युक्त आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

יהיו לרצון हे परमेश्वरा, हे माझ्या खडकरूप आ-श्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडची वा-क्यें आणि माझ्या ऱ्हदयांतलें ध्यान मान्य होवो.

אלהי נצור हे माझ्या देवा, माझी जीभ वाईटा-पासून, आणि माझे ओंठ कपटी भाषणापासून राख. हे माझ्या जीवा, जे कोणी मला शाप देतात, त्यांविषयीं तूं मौ-न्य धर; आणि माझाजीव सर्वांपुढें धुळीप्रमाणे नम्र होवो. मा-झ्या जीवानें तुझ्या आज्ञाप्रमाणें चालावें; ह्मणून माझे मन तूं आपल्या शास्त्राकडे उघड (लाव). आणि जे माझ्या वाई-टावर उठतात, त्यांचे विचार लवकर मोडून त्यांच्या कुकल्पना-चा नाश कर; असें तूं आपल्या नावांकरितां, आपल्या उजव्या हाताकरितां (पराक्रमाकरितां), आपल्या शास्त्राकरितां व आ-पल्या पवित्रतेकरितां, तसें कर. तुझा प्रिय मुक्त व्हावा; ह्मणून तूं आपल्या उजव्या हातानें मला तार व मला उत्तर दे. हे पर-मेश्वरा, हे माझ्या खडकरूप आश्रया, व माझ्या खंड भरणाऱ्या, तुजपुढें माझ्या तोंडचीं वाक्यें व माझ्या ऱ्हदयांतील ध्यान मान्य होवो.

עושה שלום जो उंच (आकाशांत) शांति रा-खितो, तो दयेने आह्मास व सर्व इस्राएल लोकांस शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

קדיש תתקבל पृष्ठ ८४

मागें लिहिल्याप्रमाणे קדיש תתקבל बोलताना

त्यांतील תעבר बोलल्या अगोदर תשרת תשת תרת हे एक एक वेळ वाजवितात. आणि קדיש תתקבל झाल्यावर वरील प्रकार प्रत्येक तीन तीन वेळ ह्मणजे एकंदर तीस वेळा वाजवितात.

אין כאלהינו आमच्या देवासारिखा कोणी नाहीं; आमच्या प्रभुसारिखा कोणी नाहीं; आमच्या तारणाऱ्या सारिखा कोणी नाहीं. आमच्या देवासारिखा कोण! आमच्या प्रभुसारिखा कोण। आमच्या राजासारिखा कोण। आमच्या तारणाऱ्यासारिखा कोण! आह्मी आपल्या देवाला स्तवूं! आह्मी आपल्या प्रभुला स्तवूं! आह्मी आपल्या राजाला स्तवूं! आह्मी आपल्या तारणाऱ्याला स्तवूं। आमचा देव धन्य; आमचा प्रभु धन्य; आमचा राजा धन्य; आमचा तारणारा धन्य. तूंच आमचा देव; तूंच आमचा प्रभु; तूंच आमचा राजा; तूंच आमचा तारणारा। तूंच आमचें तारण करिशील, तूं उठून सियोनेवर दया करिशील, कारण तिजवर कृपा करण्याचा नेमिलेला वेळ आला आहे.

כל ישראל सर्व इस्राएलांस पुढील जगांत विभाग आहे; जसें ह्मटलें आहे कीं, तुझे सर्व लोक न्यायी होतील; आणि त्या गौरवलेलें व्हावें ह्मणून, जसें माझ्या हाताचें कर्म तसें ते सर्वकाळपर्यंत भूमीचें वतन भोगितील. रिब्बी येहुदा असें ह्मणतो, कीं जो कोणी शास्त्राचा अभ्यास करण्याकरितां श्रम करितो, आणि तेणेंकरून आपल्या उत्पन्न कर्त्याचा आत्मा संतुष्ट करितो, तो कीर्ति मिळवितो, आणि या जगांतून कीर्तीनेच जातो, याजविषयीं शेलोमो आपल्या बुद्धीने असें ह्मणाला आहे, कीं कीर्ति उत्कृष्ट तेलापेक्षां, आणि एकाद्याच्या जन्म दिवसापेक्षां, त्याचा मरण दिवस चांगला आहे. शास्त्र पुष्कळ शिक; ह्मणजे

तुला त्याचें वेतन पुष्कळ मिळेल. परंतु असें जाण कीं, पुण्यवंतां स वेतन पुढील जगांत मिळतें.

רבי חנניה आकशयाचा पुत्र रिब्बी हानानया असें ह्मणतो कीं, इस्राएलास पुण्यवंत करावें ह्मणून शास्त्र व आज्ञा वाढवाव्या अशी ईश्वरी इच्छा झाली. जसें ह्मटलें आहे कीं, त्याच्या न्यायाकरितां परमेश्वर संतोषित आहे; तो नेम शास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील.

יתגדל ויתקדש जी पृथ्वी त्याने (देवाने) आपल्या इच्छेप्रमाणे उत्पन्न केली आहे, तिजमध्यें त्याचें मोठें नाम उंचाविलें, आणि पवित्र मानिलें जावो. आणि तुमच्या आयुष्यांत व तुमच्या दिवसांत, लवकर आणि थोडक्याच वेळांत त्याचें राज्य स्थापित होऊन त्याचें तारण उगवो; आणि अभिषिक्ताचें येणें लवकर होवो. तथास्तु. त्याचें थोर नाम सर्वकाळ धन्य व गौरवयुक्त असो. आणि जो आशीर्वाद, जें गायन, जी स्तुति व जें सौंदर्य जगांत गाजविलें जातें, त्यासर्वांपेक्षां पवित्र जो धन्य, त्याचें नाम अधिक सुवंदित, गौरवयुक्त, उंचाविलें, वाखाणिलें, सन्मानिलें, थोर मानिले आणि स्तविलें जावो. आणि तुह्मीहि तथास्तु ह्मणा.

על ישראל जे इस्राएल, आमचे गुरु, त्यांचे शिष्य व त्याच्या शिष्यांचे शिष्य या गावीं व गांवोगावीं पवित्र शास्त्राचा अभ्यास करितात, त्यांजवर व आह्मावर आकाश व पृथ्वीच्या स्वामी पुढून दया कृपा व अनुग्रह होवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

יהי שלמא आणि आकाशांतून आह्मास व सर्व इस्राएल लोकांस पुष्कळ शांति, जीवन, तृप्तता, तारण, समाधान, सुटका, अरोग्यता, मोकळीक, क्षमा, माफी, उद्धार आणि मुक्ति होवोत (मिळोत.) आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עושה שלום जो आपल्या उंच आकाशांत शांति राखितो, तो दयेने आह्मास व सर्व इस्राएलांसहि शांति देवो. आणि तुह्मी तथास्तु ह्मणा.

עלינו לשבח पृष्ठ. २५

על כן נקוה לך पृष्ठ. २५

מנחה.

प्रार्थनारूप नैवेद्य.

למנצח על הגתית गीत ८४

וידבר יי पृष्ठ ३९

एथें פטום הקטרת सुगंधाचा प्रकार बोल. त्याची चाल आहे.

וערבה יי तेव्हां जसें पुरातन दिवसांत, आणि जसें पूर्वींच्या वर्षांत, तसें यहुदाचें आणि येरूशालेमेचें अर्पण परमेश्वराला मनोरम होईल.

אשרי יושבי ביתך जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहेमी तुझा उत्सव करितील. सेलाह. ज्या लोकांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव परमेश्वर आहे, ते धन्य.

תהלה לדוד गीत १४५.

ובא לציון גואל आणि उद्धारणारा सियोनेस येईल, व याकोबांत जे अपराधापासून फिरतात, त्यांजकडे येईल असें परमेश्वर ह्मणतो. आणि परमेश्वर ह्मणतो, त्यांसीं माझा करार हाच आहे, जो माझा आत्मा तुझ्याठायीं आहे, व जे माझे शब्द म्या तुझ्या मुखांत घातले आहेत, ते तुझ्या मुखांतून,

अथवा तुझ्या संतानाच्या मुखांतून, अथवा तुझ्या संतानाच्या संतानाच्या मुखांतून, आतांपासून सर्वकाळपर्यंत सरणार नाहींत, असें परमेश्वर म्हणतो. तथापि तूं पवित्र इस्राएलांच्या स्तवनांमध्यें राहतोस. आणि ते (दूत) एकमेकाला मोठ्याने बोलत म्हणाले, पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाने भरली आहे. आणि त्यांनी एक मत्येकाचा शब्द मान्यकरून म्हणाले, उंच आकाश, जें त्याच्या साक्षात्काराचें प्रतिष्ठित वसतिस्थान तेथें पवित्र; त्याच्या पराक्रमाचें कृत्य जी पृथ्वी, तिजमध्यें पवित्र; तो सदासर्वकाळ पवित्र आहे; तो सैन्याचा देव आहे, सर्व पृथ्वी त्याच्या गौरवाच्या वैभवाने भरली आहे.* तेव्हां आत्म्याने मला उंचावलें आणि म्या आपल्या पाठीमागून मोठा गोंगाटाचा शब्द ऐकिला, तो असा, कीं त्याच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. तेव्हां आत्म्याने मला उंचललें आणि मी आपल्या मागें स्तुति करणारांचा मोठा सुसाट्याचा आवाज बोलतां ऐकिला कीं, ईश्वराचें गौरव त्याच्या महत्वाच्या मंदिराच्या स्थानांतून सुवंदित असो.* परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. परमेश्वराचें राज्य सर्वकाळ स्थापित आहे.* हे परमेश्वरा, आमच्या वडिलांच्या, आब्राहामाच्या, इसहाकाच्या व इस्राएलाच्या देवा, तूं आपल्या लोकांच्या अंतःकरणाच्या कल्पणांतल्या विचारांत असें सर्वकाळ राख आणि त्यांचें अंतःकरण आपल्यासाठीं स्थिर कर. तथापि तो, ममताळु होता, यास्तव त्याने अन्यायाची क्षमा केली, नाश केला नाहीं; त्याने बहुतवेळ आपला राग टाळिला आणि आपला सर्व संताप चेतविला नाहीं. कां तर, हे मभु, तूं चांगला व

हीं तीन वाक्यें योनाथान बेन उज्जीएल याने यशाया. ६. ३ येहेजकेल ३. १२ आणि निर्गम. १५ १८ यावा वाक्यांवर केलेले तारगूम भाषेंतील भाषांतर आहे.

क्षमाशील आणि जे तुला हाक मारितात, त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. तुझी नीति सर्वकाळ नीतिच; आणि तुझें शास्त्र सत्य आहे. तूं याकोबासाठीं खरेपण आणि आब्राहामासाठीं करुणा साधिसील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजांपाशीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहिलीस ती. प्रभुची स्तुति असो, दिवसोंदिवस तो आह्मास उपकार लादून देतो, तो आमच्या तारणाचा देव आहे. सेलाह. सैन्यांचा परमेश्वर आमच्या संगती आहे; याकोबाचा देव आह्मास आश्रय आहे. हे सैन्यांच्या परमेश्वरा, जो मनुष्य तुजवर आशा ठेवितो, तो धन्य. हे परमेश्वरा, तारण कर; आह्मी हाक मारितों, त्या दिवशीं राजाने आह्मास उत्तर द्यावें.

ברוך אלהינו हे आमच्या देवा, ज्याने आम्हास आपल्या महत्वाकरितां उत्पन्न करून आह्मास भ्रमिष्टांपासून निराळे केलें, आणि आह्मास सत्य शास्त्र देऊन आह्मामध्यें सर्वकाळच्या जीवनाची लागवड केली; तूं धन्य आहेस. तोच आपल्या शास्त्राकडे आमचीं मनें उघडील (लावील;) आणि आह्मी त्याची इच्छा पूर्ण करून त्याची सेवा पूर्ण मनाने करावी परंतु व्यर्थ कष्ट करूं नयेत व गोंधळ उत्पन्न करूंनये; म्हणून तोच आमच्या मनांत आपली प्रीति व आपलें भय घालील. हे परमेश्वरा ! आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मी या जगीं तुझे नेम पाळून पुढील जगाच्या आयुष्यासाठीं पुण्याईकरून त्यांतील जीवनास व वतनास योग्य व्हावें असी तुझी प्रसन्नता होवो. यासाठीं कीं माझ्या गौरवानें तुझें कीर्त्तन करावें. आणि उगेंच राहूंनये; हे परमेश्वरा माझ्या देवा, मी सर्वकाळ तुझी स्तुति करीत जाईन. त्याच्या न्यायाकरितां परमेश्वर संतोषित आहे; तो नेम शास्त्रास मोठेपणा देऊन प्रतिष्ठित करील. आणि जे तुझें नाम जाणतात ते तुजवर आशा ठेवितील; कारण कीं हे परमेश्वरा, जे तुला शोधितात, त्यांस तूं सोडीत नाहींस.

हे परमेश्वरा, आमच्या प्रभु, तुझें नाम सर्व पृथ्वींत किती महान! अहो परमेश्वराची वाट पाहणारे, तुह्मी सर्व धीर धरा, ह्मणजे तो तुमचें ऱ्हदय सबळ करील.

शाब्बाथ असल्यास हें बोलावें.

ואני תפלתי परंतु मजविषयीं हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळेस माझी प्रार्थना केली आहे; हे देवा, तू आपल्या पुष्कळ दयेने, आपल्या तारणाच्या सत्यतेने मला उत्तर दे.

मग पाहाटेच्या प्रार्थनेंत लिहिल्याप्रमाणे शास्त्र काढून पुढल्या शनवारीं जो शास्त्राचो भाग वाचायाचा असेल, त्यांतील दाहा वाक्यें वाचायास तीन मनुष्यें उठवावीं. नंतर शास्त्र गुंडाळावें.

מזמור שיר ליום השבת गीत. ९२

शास्त्र ठेवायास नेतांना पाहाटेच्या प्रार्थनेंत लिहिल्याप्रमाणे **יהללו** बोलावें.

השיבנו יי हे परमेश्वरा! आह्माला तुजकडे फिरीव, ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वीप्रमाणे आमचे दिवस नवे कर.

כי לקח טוב कांकीं मी तुह्माला उत्तम विद्या देतों, माझा नेम सोडूं नका. माझी प्रार्थना धूपासारिखी, माझें हात उभारणें संध्याकाळच्या नैवेद्यासारिखें तुझ्या समोर सादर होवो.

קדיש לעילא पृष्ठ ७

אדני שפתי पृष्ठ १६

אבינו מלכנו पृष्ठ ८२

शाब्बाथ असल्यास हें बोलावें.

צדקתך כהררי אל तुझी नीति सबळ डोंगरांसारिखी, तुझा न्याय मोठा समुद्र आहे; हे परमेश्वरा, तूं मनुष्याचें व पशूंचें संरक्षण करितोस. हे देवा, तुझे न्याय फार उंच आहेत; त्वां मोठालीं कामें केलीं आहेस; हे देवा तुजसारिखा कोण आहे ? तुझी नीति सर्वकाळ नीतीच; आणि तुझें शास्त्र सत्य आहे.

קדיש תתקבל पृष्ठ ८४

למנצח על הגתית לאסף गीत ८१

קדיש יהא שלמא पृष्ठ २४

עלינו לשבח पृष्ठ २५

על כן נקוה לך पृष्ठ २५

תם ונשלם שבח לאל בורא עולם

पृथ्वी उत्पन्नकर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

टीका

टीका १

במה מדליקין

हा मिशनांतील एक अध्याय आहे. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे शाब्बाथ दिवशीं अग्नि पेटवूं नये; ह्मणून त्या रात्रीं दिवा विझून अडचण न पडावी, यासाठीं दिव्यांत कशाची वात लावावी आणि कोणतें तेल घालावें हें, व शाब्बाथास आरंभ झाल्या अगोदर कोणत्या गोष्टी करणे अवश्य आहे हेंही त्यांत सांगितलें आहे.

टीका २

סברי מרנן

द्राक्षरसाच्या प्याल्यावर धन्यवाद करितांनां हाज्जान סברי מרנן म्हणजे "आमच्या गुरूच्या मताप्रमाणें" असें म्हणतो व मंडळी त्यास उत्तर करून לחיים म्हणजे "जीवनाकरितां" असें म्हणते. हें म्हणण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वीं अपराधी मनुष्यास जेव्हां धोंडमार करायास नेत; तेव्हां त्यास शुद्दी न राहावी, म्हणून त्यास एक द्राक्षरसाचा प्याला प्यावयास व थोडा ऊद श्वास घेण्यास देत असत. त्यासारिखा हा प्याला मरणाचा नव्हे, परंतु जीवनाचा आहे असा भेद दर्शविण्याकरितां असें म्हणतात.

टीका ३

सुगंधाचा प्रकार

צרי या पदार्थास נטף असेंहि आणखी इब्री नाम आहे. हा पदार्थ या देशांत उत्पन्न होत नाहीं; म्हणून त्यास मराठी नाम सांपडत नाहीं. त्यास "रोगाने बलासान" या आरबी नावावरून ओळखतात. बलासान या नावाचे आणखीहि पदार्थ आहेत, परंतु हा पदार्थ मात्र आरबस्थानाच्या उत्तर प्रांतांकडून येतो.

צפורן या पदार्थास שחלת असेंहि आणखी इब्री नाम आहे; त्यास मराठींत नखी असें म्हणतात, परंतु तो समुद्रांत उत्पन्न होतो; तो शिंपीसारिखा आहे.

חלבנה यास गंधाबेरोजा असें म्हणतात. हा पदार्थ फारकरून राळेसारिखा दिसतो; आणि तो राळेचाच एक प्रकार आहे.

לבונה ऊद; शास्त्रांत निर्मळ ऊद असें लिहिलें आहे, म्हणून कवड्या ऊद असावा.

מור बोळ; म्हणजे तांबडा बोळ.

קציעה तज; या पदार्थामध्यें व दालचीनीमध्यें फारसा भेद नाहीं; कित्येक हे दोन्ही पदार्थ एकच असें मानितात; परंतु तज हा दालचीनीपेक्षां जाड असून सुवासहि थोडा निराळा आहे.

שבלת נרד जटामांशी; या पदार्थाच्या नांवावरून असा कांहीं भास होतो कीं, हा पदार्थ केसांच्या जटांसारिखा असावा, आणि तो काहींसा तसा दिसतो. हें एक प्रकारचें सुगंधी गवत आहे.

כרכם केशर.

קשט कोष्ट; या पदार्थाचें नाव इब्री, इंग्लिश व मराठी या तिन्ही भाषेंत सारखेंच आहे. इंग्लिश भाषेंत त्यास कास्टस असें म्हणतात.

קלופה या पदार्थाची अलीकडे पूर्ण माहिती नाहीं. या आकरा सुगंधाचा प्रकार משנה मधील כריות या अध्यायांत सांपडतो. याजवर टीका करणारांची या קלופה पदार्थाविषयीं निरनिराळीं मत्तें आहेत. परंतु त्याच्या इब्री नावावरून असें समजून येतें कीं, ती एका सुगंधी झाडाची साल असावी. हा पदार्थ आगरु आहे असेंहि कित्येक मानितात.

קנמון दालचीनी; या पदार्थाविषयीं तज या पदार्थावर केलेले टीकेंत सांगितलें आहे.

टीका ४

מי רגלים

מי רגלים या शब्दाचा अर्थ मूत्र असाहि होतो; परंतु एथें हा अर्थ लागत नाहीं. एथें मेरगलाइम झऱ्याचें पाणी असा अर्थ होतो. हा झरा दोन डोंगराच्या मधील खिंडींतून वाहात होता, ह्मणून त्यास मेरगलाईम ह्मणजे मूत्र झरा असें नाव दिल्हें होतें. या झऱ्याचें पाणी सुगंधी द्रव्यें तयार करण्याच्या कामास उपयोगी होतें. परंतु त्या झऱ्यास मूत्र झरा असें नाव होतें; ह्मणून या अमंगळ नावावरून तें पाणी पवित्र मंदिरांत आणीत नसत.

टीका ५

शास्त्राचे अर्थ समजण्याचे तेरा नियम.

१ מקל וחומר लहान गोष्टीवरून मोठ्या गोष्टी विषयीं; आणि मोठ्यागोष्टीवरून लहान गोष्टीविषयीं अनुमान करणे. लाहान गोष्टीवरून मोठ्या गोष्टीविषयीं अनुमान करणें. उदाहरण. गणना १२. १४, “ तिचा बाप तिच्या तोंडावर थुंकलाच (रागें भरला) असता, तर ती सात दिवस न लाजती कीं काय ? तिला सात दिवस छावणी बाहेर घालून प्रतिबंध व्हावा आणि मग तिला घ्यावें ” यावरून जर बापाच्या रागामुळें सातदिवस छावणी बाहेर राहावें लागतें; तर ईश्वराचा राग झाला असतां, खचितच सर्वकाळपर्यंत त्याच्या लोकांबाहेर राहावें लागेल, असें अनुमान करितां येतें.

मोठ्या गोष्टीवरून लहान गोष्टीविषयीं अनुमान करणे. उदाहरण. उत्पत्ति ४४.८ “जो पैका आम्हास आमच्या गोणीच्या तोंडीं सांपडला, तो आम्ही खनान देशाहून परत आणिला; तर

तुझ्या धन्याच्या घरांतून रुपें अथवा सोनें आह्मी कसें चोरूं ?" जर त्यांनी मोठ्या लाभावर दृष्टी दिल्ही नाहीं, तर खचितच त्यांनी अल्प लाभावर दृष्टि दिल्ही नसेल असें अनुमान होतें.

२. מגזרה שוה सारखेपणावरून अनुमान करणें. उदाहरण. लेवीय. २१. ५. "त्यांनी आपल्या डोक्यावर टक्कल करूं नये;" आणि अनुवाद. १४.१ (तुह्मी) "मेलेल्यामुळें फांसण्या करून घेऊं नका, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं टक्कल करूं नका." या वाक्यांतील पहिलें उपाध्यांविषयीं मात्र, आणि दुसरें सर्व इस्राएल लोकांविषयीं आहे. या दोंहीं वाक्यांमध्यें "टक्कल करूं नये" हा सारखेपणा असल्यामुळें, असें अनुमान होतें कीं, जरी इस्राएलांस "दोंही डोळ्यांच्या मध्यभागीं टक्कल करूं नका" असें मात्र सांगितलें आहे; तरीं त्यांनी सर्व डोक्यावर टक्कल करूं नये असें अनुमान होतें. आणखी जरी इस्राएलास मात्र सांगितलें आहे कीं (तुह्मी) "मेलेल्यामुळें आपल्या दोही डोळ्यांच्या मध्यभागीं टक्कल करूं नका" तरी त्या वाक्यांच्या सारखेपणावरून असें अनुमान होते कीं, उपाध्यानींहि मेलेल्यांमुळें फांसण्याकरून घेऊं नये आणि आपल्या दोही डोळ्यांच्या मध्यभागीं टक्कल करूं नये.

३. מבנין אב וכתוב אחד एका वाक्यांतील मूळ विषय दुसऱ्यास लागू करणें. उदाहरण निर्गम १२.१६ "आणि तुह्मास पहिल्यादिवशीं पवित्र मेळा व सातव्या दिवशीं पवित्र मेळा व्हावा; त्यामध्यें काहीं काम करायाचें नाहीं, केवळ जें प्रत्येक मनुष्यानें खावें तें मात्र तुह्मी करावें." परंतु जरी जेवणाचें काम करायास या एका वाक्यांतच आणि पेसाच्या सणाविषयीं मात्र सांगितलें आहे; तरी हा मूळ विषय दुसऱ्या सणाच्या दिवसांसहि लागू आहे.

מבנין אב ושני כתובים दोन वाक्यांतील मूळ

विषय एक मत्येकांस लागू करणें. उदाहरण. लेवीय. २१. १८-२० एथें उपाध्यांस ज्या खोडी नसाव्या त्या सांगितल्या आहेत. आणि २२. २२. एथें अर्पणाच्या गुरांस अथवा शेरडांस ज्या खोडी नसव्या त्या सांगितल्या आहेत. यांतील ज्या उपाध्यांच्या खोडी गुरांविषयीं किंवा शेरडांविषयीं सांगितल्या नाहींत; आणि ज्या गुरांच्या किंवा शेरडांच्या खोडी उपाध्याविषयीं सांगितल्या नाहींत, त्या या नियमावरून एक मत्येकांस लागू आहेत.

४ מכלל ופרט. पहिल्याने मोहोगम पद असून मग विशेष पद असलें, तर विशेष पदाचा मात्र अर्थ धरावा. उदाहरण. लेवीय. १. २. "जर तुमच्यांतला माणूस परमेश्वराला पशूंतल्याचें अर्पण करील, तर तुम्ही आपलें अर्पण गुराचें किंवा शेरडांचें करा." या वाक्यांत पहिल्याने "पशू" हें मोहोगम पद असून मागून "गुरें आणि शेरडें" हीं विशेष पदें आहेत; ह्मणून "गुरें आणि शेरडें" हीच अर्पावीं असा अर्थ होतो.

५. מפרט וכלל जर पहिल्याने विशेष पद आणि मागाहून मोहोगम पद असलें, तर मोहोगम पदाचा अर्थ धरावा. उदाहरण. अनुवाद. २२. ३ "आणि त्याच्या गाढवाविषयीं तसें कर; त्याच्या वस्त्रांविषयीं तसें कर; आणि तुझ्या भावाचें जें कांहीं हरवलेलें म्हणजे त्यापासून गाहाळलेलें असतां तुला सांपडतें, त्याविषयीं तसें कर;" यावाक्यांत पहिल्याने "गाढव आणि वस्त्र" हीं विशेष पदें आहेत; आणि मागाहून जें कांहीं हरवलेलें हें मोहोगम पद आहे; म्हणून सर्व पदार्थांविषयीं तसें करावें; म्हणजे ज्याचें त्यास परत करावें असा अर्थ होतो.

६ כלל ופרט וכלל पहिल्याने मोहोगम पद, मग विशेष पद आणि पुनः मोहोगम पद असल्यास, विशेष पदाप्रमाणें त्याचा अर्थ करावा. उदाहरण. निर्गम २२. ८. "मत्येक अपराधा-

च्या गोष्टीविषयीं, गुरांविषयीं, गाढवांविषयीं, शेरडांविषयीं, पांघरूणाविषयीं, कांहीं हरपलेल्याविषयीं, हें आपलें असे कोणी म्हणतो, तर त्याविषयीं दोघांचा वाद न्यायाधीशाजवळ जावा; ज्यास न्यायाधीश अन्यायी ठरवितील, त्याने आपले शेजाऱ्याला दुप्पट मोल भरून द्यावें. ”या वाक्यांत पहिल्याने “प्रत्येक अपराधाच्या गोष्टीविषयीं”हें मोहोगम पद मग“गुरांविषयीं, गाढवांविषयीं, शेरडांविषयीं, पांघरूणाविषयीं”हीं विशेष पदें आहेत; आणि कांहीं हरपलेल्यांविषयीं “हें पुनः मोहोगमपद आलें; यावरून गुरू ” गाढव, शेरडूं, पांघरूण इत्यादिक, जे हरपण्याजोगे पदार्थ आहेत, त्यांविषयीं मात्र न्यायाधीशांनी चौकशी करावी; ज्यास न्यायाधीश अन्यायी ठरवितील, त्यानें आपल्या शेजाऱ्याला दुप्पट मोलभरून द्यावें. हा निवाडा जमीन, चाकर इत्यादिक न हारपण्यासारिखें पदार्थ आहेत त्यांस लागू नाहीं, आणि लेख यांसहि लागू नाहीं; कारण तें प्रमाणासाठीं मात्र असतात.

७ מכלל שהוא צריך לפרט ज्या मोहोगम पदाच्या विशेषपदाचें अगत्य आहे. उदाहरण. निर्गम. १३. २ तूं प्रत्येक ज्येष्ठ, मजसाठीं पवित्र कर. या इब्रीवाक्यांत ज्येष्ठ एवढेंच मात्र आहे यावरून ज्येष्ठ पुत्र अथवा ज्येष्ठ कन्या असल्यासहि देवासाठीं पवित्र करावी असा अर्थ होईल; परंतु तेथें विशेषपदाचें अगत्य आहे, कारण तें ज्येष्ठ पुत्रांविषयीं मात्र म्हटलें आहे.

ומפרט שהוא צריך לכלל ज्या विशेषपदाच्या मोहोगमपदाचें अगत्य आहे. उदाहरण अनुवाद २२. १० “ बैल व गाढव एकत्र लावून तूं नागरूं नको. ” या वाक्यांत बैल व गाढव हीं विशेषपदें आहेत; ह्मणून मात्र बैल व गाढव या दोन जातीचीं जनावरें एकत्र लावूंनये असा अर्थ होईल; परंतु तेथें मोहोगमपदाचें अगत्य आहे, कारण त्या वाक्यांवरून असें समजलें पाहिजे, कीं कोणत्याहि दोन जातीचीं श्वापदें एकत्र

लावून नांगरूं नये.

८ ויצא מן הכלל ללמד जें कांहीं मोहोगम पदांत असून विशेषपदांत निराळेंच दाखविलेलें असतें, त्या विशेष पदाविषयीं जें सांगितलेलें असवें, तें त्या विशेषपदाविषयीं मात्र नसतें; परंतु मोहोगमपदासहि तें लागू होतें. उदाहरण लेवीय. २०. २ "जो कोणी आपलें कांहीं संतान मोलेखाला देईल, त्याला मारावेंच मारावें; देशांतल्या लोकांनी त्याला धोंडमार करावा." जीं कामें ईश्वरास ओंगळ असून त्याविषयीं जिवें मारण्याची शिक्षा आहे, त्यांतील हें एक आहे. परंतु " मोलेखाला देईल " हें विशेष पद निराळेंच दाखविलें असून त्याविषयीं " धोंडमार करावा " असें सांगितलें आहे. यावरून धोंडमार करणें हा शिक्षेचा प्रकार, जीं कामें ईश्वरास ओंगळ असून त्याविषयीं जिवें मारण्याची शिक्षा आहे, त्यांसहि लागू होतो.

९ ויצא לטעון טען जें कांहीं मोहोगम पदांत असून पुन: त्या विषयाचा संबंधी सिद्धांत ठरविण्याकरितां निराळें दाखविलें असतें, त्याचा निर्णय भारी होत नाहीं, परंतु हलका होतो, उदाहरण. लेवीय. २४. २१ "जो मनुष्याला मारील, त्याला मारावेच मारावें; परंतु अनुवाद १९. ५. एथें पुन: त्याच विषयाचा संबंधीसिद्धांत ठरविण्याकरितां निराळेंच दाखविलें आहे, ते असें कीं " जर कोणी लाकडें कापायास आपल्या शेजाऱ्या संगतीं जातो, आणि लाकूड तोडायास आपल्या हाताने कुऱ्हाड मारिताना लोखंड दांड्यांतून निसटून आपल्या शेजाऱ्याला लागून तो मरतो, तर तशाने (आश्रयाच्या) एका नगरांत पळून जाऊन जगावें." पहिलें वाक्य मोहोगम असल्यामुळें जाणून किंवा न जाणून खून करणारा मरावा असा अर्थ होतो. परंतु मागल्या वाक्यांत "लोखंड दांड्यांतून निसटून आपल्या शेजाऱ्याला लागून तो मरतो, म्हणजे न जाणून तो मरतो" हा त्या

विषयाचा संबंधी सिद्धांत ठरविला आहे; म्हणून त्याचा निर्णय भारी होत नाहीं, परंतु हलका होतो; म्हणजे तो न मरावा परंतु त्याने आश्रयाच्या एका नगरांत पळून जावून जगावें.

१० ו.ל. ט. אחד שלא כענינו

जें काहीं मोहोगम पदांत असून त्यापासून निराळा सिद्धांत ठरविण्याकरितां निराळेंच दाखविलें असतें, त्याचा निर्णय हलका व भारीहि होतो. उदाहरण. निर्गम. २१.२ "जर तूं इब्री चाकर (म्हणजे पुरुष किंवा स्त्री) विकत घेतोस, तर त्याने साहा वर्षे चाकरी करावी, परंतु सातव्या वर्षीं तो फुकट मोकळा व्हावा." परंतु त्याच अध्यायाच्या ७ ओवींत असें आहे कीं "जेव्हां कोणी आपली कन्या चाकरीण होण्यास विकितो, तेव्हां जसे चाकर निघतात तसें तिने न निघावे." यांतील पहिलें वाक्यांत चाकर व चाकरीण या दोहोंविषयीं "चाकर" हे मोहोगम पद आहे. कारण अनुवाद १५.१२. एथेंहि त्या दोघांविषयीं उघडपणें तसेच सांगितलें आहे कीं, "जर तुझा भाऊ इब्री किंवा इब्रीण तुला विकली जाते, तर तशाने तुझी चाकरी साहा वर्षें करावी, मग सातव्या वर्षीं तूं त्याला मोकळें करून आपणाजवळून सोड." असें असतां निर्गम २१.७ या वाक्यांत चाकरीणीविषयीं मात्र निराळा सिद्धांत ठरविला आहे. यावरून त्याचा निर्णय हलका व भारीहि होतो, म्हणजे जर तिचा स्वामी मरण पावला, तर ती साहा वर्षें भरल्या अगोदरहि सुटूं शकते, परंतु ती तारुण्यावस्थेंत आल्यावर तिचा स्वामी तिला जाऊं नदेतां तिजशीं लग्नहि करूं शकेल.

११ ויצא לדון בדבר חדש जें काहीं मोहोगम पदांत असून नवी गोष्ट ठरविण्याकरितां पुनः निराळेंच दाखविलें असतें, त्याविषयीं उघडपणें सांगितल्यावांचून तें पुनः मोहोगम पदांत मोजलें जात नाहीं. उदाहरण. लेवीय २२. ११. जर याजक

कोणाला विकत घेतो, तर तो त्याच्या पैक्याचा माल आहे; आणि त्याने तें (पवित्र पदार्थ) तें खावें; आणि त्याच्या घरीं जन्मलेले यांनीही त्याचें अन्न खावें. या वाक्यांत " घरीं जन्मलेले " असें आहे, म्हणून त्याच्या कन्येनें लग्न झालें नसतां व असतांहि तें खावें असा अर्थ होतो. आणि त्याच अध्यायाच्या १२ ओवींत असी नवी गोष्ट ठरविली आहे कीं, याजकाची कन्या जर परक्यांतल्या नवऱ्याला दिल्हेली आहे, तर तिने पवित्र अर्पणांतून खावूंनये; म्हणजे लग्नानंतर कधींच खाऊंनये. परंतु या नियमांत, सांगितल्याप्रमाणें १३ ओवींत तिजविषयीं उघडपणें सांगितल्यावरून ती पुनः मोहोगम पदांत मोजली जाते; म्हणजे ती विधवा झाली असतां, अथवा तिला नवऱ्याने घालविली असतां, आपल्या बापाचे घरीं राहते, तर तिने पवित्र अर्पणांतून खावें.

१२ הלמד מענינו ומסופו मूळ विषयावरून आणि शेवटीं सांगितलेल्या गोष्टीवरून अनुमान करणे.

मुळविषयावरून अनुमान करणे. उदाहरण लेवीय. २१, १२, "आणि (उपाध्याने) पवित्र स्थानांतून जाऊं नये." या वाक्यावरून असा अर्थ होतो कीं, उपाध्याने पवित्रस्थान सोडून कोठें जाऊं नये. परंतु या वाक्याचा मूळ विषय ११व्या ओवींत सांगितला आहे; म्हणजे त्याने कोणतेहि मेलेल्याचे शरिराजवळ जाऊं नये; आपला बाप किंवा आपली आई यांचेहि त्याने विटाळ घेऊं नये. यावरून असें अनुमान होतें कीं त्याने मात्र कोणाचा विटाळ घेण्यासाठीं पवित्रस्थानांतून जाऊं नये.

शेवटीं सांगितलेल्या गोष्टीवरून अनुमान करणे; उदाहरण लेवीय १८.६ "तुम्हांतील कोणीएकाने आपल्या नातलगाचें गुह्य उघडें करायास जवळ जाऊं नये " (म्हणजे कोणत्याहि नातलगाबरोबर लग्न करूं नये,) परंतु मागांहून ज्या ज्या नातलगांबरोबर लग्न करूं नये, त्यांची नावें स्पष्ट सांगितलीं आहेत

म्हणून त्यांखेरीज दुसऱ्या नातलगांबरोबर लग्न करायास अड-थळा नाहीं.

१३ ושני כתובים המכחשים जर दोन वाक्यांचा अर्थ एक मत्येका विरुद्ध असला; तर तिसरे वाक्यांवरून त्याचा अर्थ मिळवून घ्यावा. उदाहरण. उत्पत्ति १.१"प्रारंभीं देवानें आकाश व पृथ्वी यांस उत्पन्न केलें;" या वाक्यावरून पहिल्यानें आकाश व मागाहून पृथ्वी उत्पन्न झाली असें अनुमान होतें; आणि उत्पत्ति २.५"ज्या काळीं परमेश्वर देव यानें पृथ्वी व आकाश यांस उत्पन्न केलें." इ. या वाक्यावरून पहिल्यानें पृथ्वी व मागाहून आकाश उत्पन्न झालें असें अनुमान होतें. या दोन वाक्यांचा अर्थ एक मत्येकाविरुद्ध आहे; म्हणून यशाया ४८.१३ या तिसऱ्या वाक्यावरून त्याचा अर्थ मिळवून घ्यावा; तें वाक्य असें कीं, माझ्या हातानें पृथ्वीचा पाया घातला, आणि माझ्या उजव्या हातानें आकाशें विस्तारिलीं; म्हणजे आकाश आणि पृथ्वी हीं एकदांच उत्पन्न झालीं.

टीका ६

वर्षप्रतिपदेच्या दिवशीं ईश्वरास नऊ धन्यवाद योजून तितक्याच वेळा करणा वाजवितात, ते धन्यवाद व तें वाजविणें येणेप्रमाणे.

हे नऊ धन्यवाद अधिकप्रार्थनेंत (मुसाफांत) सांपडतात, ते येणेप्रमाणे; १ पृष्ठ १०८ ओळ. ५ हे परमेश्वरा, आब्राहामाच्या ढालरूप आश्रया, तूं धन्य आहेस; २. पृष्ठ १०८ ओळ१८ हे परमेश्वरा, मेलेल्यांस जीवंत करणाऱ्या, तूं धन्य आहेस; ३ पृष्ठ११० ओळ२४ हे परमेश्वरा, पवित्र राजा, तूं धन्य आहेस; ४ पृष्ठ ११४ ओळ ४ हे परमेश्वरा, सर्व पृथ्वीच्या राजा, (शा. अ. शाब्बाथास व) इस्राएलास व स्मरणाच्या दिवसास पवित्र करणाऱ्या, तूं धन्य आहेस;५ पृष्ठ११८ओळ७ हे परमेश्वरा, करार आठविणाऱ्या, तूं धन्य आहेस;६ पृष्ठ१२० ओळ१४ हे परमेश्वरा,

इस्राएलाच्या गजराची वाणी (शा. अ. आज) दयेने ऐकणाऱ्या, तूं धन्य आहेस; ७ पृष्ठ १२० ओळ २५ हे परमेश्वरा, आपला शेखीना सियोननेमध्यें पुनः स्थापन करणाऱ्या, तूं धन्य आहेस; ८ पृष्ठ १२२ ओळ ४ हें परमेश्वरा, तूं धन्य आहेस; चांगलें, तुझें नाम आणि स्तवन तुलाच शोभतें ९ पृष्ठ १२३ ओळ ४ हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देणाऱ्या, तूं धन्य आहेस.

आणि या दिवशीं शोफार वाजवितात तोहि प्रत्येक नऊवेळा असा वाजवितात; कारण תרשת वाजवितांना शोफार वाजविण्याच्या प्रकारांत सांगितल्याप्रमाणें שברים आणि תרועה एकदांच वाजवितात. तर תשרת תשת תרת किंवा תרת हे प्रत्येक तीनवेळा वाजविल्यास अथवा हे तिन्ही प्रकार एकवेळा वाजविल्यास नऊवेळ होतात.

टीका ७.

हाफतारा म्हणजे भविष्य कथनांतील भाग वाचण्याचें कारण.

शास्त्र वाचल्यानंतर भविष्य कथनातून जो भाग वाचितात, त्यास הפטרה म्हणजे शेवट असें म्हणतात. आणि तो वाचण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वींपासून शाब्बाथ दिवशीं व सणांच्या दिवशीं शास्त्रांतील भाग अनुक्रमानें वाचण्याची रीति आहे. परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराचा संस्कार झाल्यावर ३४९ व्या वर्षीं आरामाचा राजा आनतिओखोस यानें यरूशालेमेवर स्वारी करून तिच्या सभोवतें तळ धरिला. आणि शाब्बाथ दिवशीं सर्व इस्राएल ईश्वरी भजनांत व धर्म कृत्यांत गुंतलेले पाहून त्यानें हल्ला केला, आणि नगरास आग लावून व लुटून लोकांचा वध केला. याशिवाय त्यानें असी आज्ञा केली कीं, कोणी इस्राएलानें सुंता करूं नये, शाब्बाथ दिवस पाळूं नये आणि शास्त्र वाचूं नये; त्याच्याच देवाचें मात्र भजन करावें. यद्यपि बहुतेक पुरुषांनीं व

स्त्रियांनीं त्या आज्ञा न मानिल्या, आणि आपल्या धर्मावरील दृढ विश्वास दाखविल्यावरून तीं आपल्या जीवास मुकलीं. त्या दुष्टाच्या हातीं ज्या शास्त्राच्या प्रति सांपडल्या, त्या सर्व त्याने फाडून व जाळून टाकिल्या. असें झाल्यावरून इस्राएलांस शाब्बाथ दिवशीं शास्त्र वाचायास न सांपडे असें झालें; म्हणून त्यांनी असे ठरविलें कीं, शाब्बाथ दिवशीं शास्त्राचा जो भाग वाचायाचा असेल; त्यांतील विषयाप्रमाणेच भविष्य कथनांत जो भाग असेल तो वाचावा. हा जुलूम सहन होत नाहीं; म्हणून मतातया मुख्य आचार्य व त्याचे पांच पुत्र यांनीं ईश्वरी नामाचा आवेश धरून त्याशीं लढले व त्याचा पराजय केला.

याप्रमाणें ही भविष्यकथनांतील भाग वाचण्याची चाल पडली आहे. आणि या संकटाची व त्यांतून ईश्वराच्या दयेकरून मुक्त होण्याची सर्वांनी आठवण ठेवावी; म्हणून ती चाल अझून चालू ठेवून शास्त्र वाचल्यानंतर त्याच विषयांसंबंधी भाग भविष्य कथनांतून वाचितात.

टीका ८

आब्राहामाच्या दाहा परिक्षा.

ईश्वराने आब्राहामाच्या दाहा परिक्षा केल्या त्या येणेप्रमाणे. १. त्यास आपली जन्म भूमि व बापाचें घर सोडावें लागलें; २ तो प्रवासी असतां खानान देशांत दुष्काळ पडला, हा दुष्काळ हाखामीम लोकांच्या मतें पृथ्वीवरील पहिलाच व तो त्या देशांत मात्र पडला होता; ३ सारेवर फारोचें धरणें; ४ लोटास केदोरलाओमेराने धरून नेलें, म्हणून त्याबरोबर लढाई करावी लागली; ५ त्याच्या संततीचें दुःख त्यास अगोदरच कळविलें; ६ सुंता करावी लागली; ७ सारेवर आबीमेलेखाचें धरणें; ८ हागारीचें पळून जाणें; ९ इस्माएलास घालविणें; १० इसहाकास अर्पण करणें. येणेप्रमाणे आब्राहामाच्या दाहापरिक्षा शास्त्रांत सांपडतात; परंतु

हास्तामीम लोकांच्या मतें, त्याने बापाच्या घरांतील मूर्ति फोडल्या ही पहिली; आणि त्याकरितां त्यास अग्नीच्या भट्टींत टाकिलें ही दुसरी; अशा धरून वर सांगितलेल्या दाहांतील आठ मात्र धरून दाहा पुऱ्या करितात.

टीका ९

वर्ष प्रतिपदेच्या दिवशीं शोफार वाजविण्याचीं कारणें.

रिब्बी सादीयाच्या मतें वर्ष प्रतिपदेच्या दिवशीं शोफार वाजविण्याचीं मुख्य दाहा कारणें आहेत, तीं येणेंप्रमाणें.

१ ईश्वराने जग उत्पन्न करून त्याजवर राज्य करूं लागला त्या उत्पत्तीचा हा पहिला दिवस आहे; आणि राजांस अभिषिक्त करिताना त्यांच्या राज्यास आरंभ होतो, हें सर्वांस कळविण्याकरितां जसे करणे वाजवितात; तसेंच आपला उत्पन्न करणारा हा आपला राजा आहे, हें सर्वांस कळविण्यासाठीं शोफार वाजवितात. जसें दावीदाने म्हटलें आहे कीं, परमेश्वर जो राजा त्यासमोर करण्याच्या शब्दाने तुताऱ्यानीं गजर करा.

२ वर्ष प्रतिपदेचा दिवस पश्चात्तापाच्या दाहा दिवसांतील पहिला आहे; म्हणून जसे मानवीराजे आपल्या कायद्याविषयीं गैरमाहितीचें निमित्त कोणी सांगूंनये, म्हणून ते कायदे जाहीर करितात; तसी शोफार वाजवून सर्वांस असी सुचना केली जाते कीं, त्यानी गैरमाहितीचें काहींच निमित्त नसांगतां ईश्वराकडे फिरून पश्चात्ताप करावा.

३ ईश्वराने आपणास जें शास्त्र सीनाय पर्वतावर देताना शिंगाचा फार मोठा शब्द झाला, त्याची आपणास आठवण व्हावी; आणि परमेश्वराची जी प्रत्येक गोष्ट, ती आम्ही करूं व पाळूं, असें जें आपल्या पूर्वजांनी वचन केलें व त्याप्रमाणे वर्तले, तसें आपणहि त्या शास्त्राप्रमाणे वर्तलें पाहिजे, असें कळविण्यासाठीं शोफार वाजवितात.

४ भविष्यवादी व त्यांचीं वचनें यांविषयीं आपण सावध राहावें, म्हणून शोफार वाजवितात. कारण येहेजकेल ३३. ४ एथें भविष्यवाद्यास करणा वाजविणाऱ्या पाहारेकऱ्याची उपमा दिल्ही आहे, ती असी; जो कोणी करण्याचा शब्द ऐकून सुचना घेत नाहीं, त्याला जर तरवार येऊन घेऊन जाईल, तर त्याचें रक्त त्याच्याच डोईवर राहील. त्यानें करण्याचा शब्द ऐकून बोध घेतला नाहीं, त्याचें रक्त त्याजवरच राहील; परंतु जो बोध घेईल तो आपला जीव सोडवील.

५ पवित्र मंदिराच्या नाशाची आणि शत्रूच्या लढाव मनुष्याच्या लढाईकरितां ओरडण्याच्या गजराची आठवण व्हावी ह्मणून शोफार वाजवीत. जसें इर्मेया ४. १९ एथें सांगितलें आहे कीं, कारण त्वां करण्याचा शब्द, लढाईचा गजर ऐकिला आहे. असें आहे ह्मणून आपलें पवित्र मंदिर पुनः बांधलें जावें, म्हणून सर्व शक्तिमान देवाची आपण विनंती करावी.

६ ईश्वराच्या इच्छेस स्वेच्छेने मान्य होऊन अर्पिला जाण्यास सिद्ध झाला जो इसहाक, त्याच्या बंधनाची आठवण करून देवाच्या पवित्रनामाच्या एकत्वास पवित्र मानण्याकरितां आपला जीव देण्यासहि सिद्ध राहावें म्हणून शोफार वाजवितात.

७. जेव्हां आपल्या कानीं करण्याचा शब्द पडतो, तेव्हां आपण भयभीत होऊन परात्पर देवापुढें नम्र व्हावें; ह्मणून शोफार वाजवितात; कारण “ करणा नगरांत वाजेल तर लोक भिणार नाहींत काय ? असें आमोस ३. ६ एथें लिहिल्याप्रमाणें या लढाऊ वाद्यांत भय व त्रास उत्पन्न करण्याचा गुण आहे.

८. ज्या मोठ्या व भयंकर न्यायाच्या दिवशीं करणा वाजविला जाणार, त्याची आठवण राहावी ह्मणून शोफार वाजवितात. कारण जफान्या १.१४—१६ एथें असें लिहिलें आहे कीं, परमेश्वराचा मोठा दिवस जवळ आहे, तो जवळच आहे, आणि फार

त्वरा करितो, परमेश्वराच्या दिवसाचा शब्द होईल; तेथें वीर कडूपणें ओरडेल. तो दिवस कोपाचा दिवस, पिडेचा व संकटाचा दिवस; उजाडीचा, व ओसाडीचा दिवस; अंधाराचा, व काळोखाचा दिवस; आभाळाच्या काळोखाचा व दाट अधाराचा दिवस होईल; तो गांवकुसवी नगरांवर व उंच दुर्गांवर करण्याचा व आरोळीचा दिवस होईल. ”

९. इस्राएलाचे दूर केलेले एकत्र होण्याच्या वेळेसाठीं प्रार्थना करण्याची आठवण व्हावी, म्हणून शोफार वाजवितात. जसें यशाया २७.१३ एथें ह्मटलें आहे कीं, “ त्यासमयीं असें होईल, कीं मोठा करणा वाजेल, तेव्हां जे अश्शूर देशामध्यें नाशाच्या लागास आलेले ते, आणि मिसर देशांत जे घालविलेले तें येतील, आणि यरूशालेमेंत पवित्र पर्वतावर परमेश्वराला भजतील. ”

१० जे मेलेले ते खचित पुन: उठतील याची आठवण व्हावी, म्हणून शोफार वाजवितात; जसें यशाया १८. ३ एथें ह्मटलें आहे कीं “ अहो जगांतले सर्व लोकांनो व पृथ्वींतले राहाणारे हो तो पर्वतांवर झेंडा उभारील, तेव्हां पाहा; आणि करणा वाजवील, तेव्हां ऐका. ”

टीका १०.

शोफार वाजविण्याचा प्रकार.

शोफार वाजविण्याचा प्रकार असा आहे की ת म्हणजे תקיעה हा एकसारिखा वाजवावा; ש म्हणजे שברים हा तुटक वाजवा, हा वाजवितेवेळीं तीनवेळ तोडावें; ר म्हणजे תרועה हा घोळवून वाजवावा. बहुदा שברים आणि תרועה एकदांच वाजवितात; प्रत्येक दिवशीं एकशें एक वेळा वाजविला पाहिजे; तो असा कीं, मुसाफ ह्मणजे अधिक प्रार्थनेअगोदर तीस वेळा. आणि अधिक

प्रार्थना मोठ्याने बोलतांना היום הרת עולם म्हणजे " आजच पृथ्वीने गर्भ धरिला" असें तीन वेळ लिहिलें आहे; त्यांतील पहिल्यापूर्वी तीनवेळा תשרת ह्मणजे बारा वेळा; दुसऱ्यापूर्वी תשת ह्मणजे नऊवेळा; तिसऱ्यापूर्वी תרת ह्मणजे नऊवेळा; תשרת תשת תענו ותעתרו यापूर्वी תרת असें दाहावेळा; आणि אין כאלהינו यापूर्वी पहिल्याप्रमाणें तीसवेळा. कित्येक ठिकाणीं अशी रीति आहे कीं अधिक प्रार्थना मोठ्याने बोलतानां " आजच पृथ्वीने गर्भ धरिला " असें तीनवेळ लिहिलें आहे, त्यापूर्वी जसें तीनवेळ वाजवितात, तसें अधिक प्रार्थना हळू बोलतांना हि त्याठिकाणीं त्याचप्रमाणें वाजवितात. आणि प्रार्थना आटोपल्यावर शेवटीं एकवेळ תרועה גדולה वाजवितात.

वर्गणीदारांचीं नावें.

मुंबई.

हासकेलजी आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम २
आहारोन आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम ४
एस्तेर बाई दीवेकरां कमोदाना मुकादमा २
शीलेमान आब्राहामजी दीवेकर कमोदान मुकादम .. २
सीमहाबाई दीवेकरां कमोदाना मुकादमां १
दावीद हाईम दीवेकर कमोदान मुकादम २
शेमोएल याकोब दीवेकर मेस्त्री २
इसाजी पीठाजी नवगांवकर मेस्त्री ३
दानीएल इसूबजी तालकर दाक्तर १
आहारोन दानीएल तलकर २
याकोब दानीएल तलकर १
मोशे दानिएल तेलकर १
सीमहा बाई तलकरां १
येहेजकेल शेमोएल नवगांवकर २
बनाजी भाऊजी घोसालकर व त्यांचे मुलगे ४
दावीद शेलोमो बोरघरकर १
हाईमजी येलोजी झीराटकर २
हाईम आबाजी मलेकर १
शेमोएल सकोजी नवगांवकर १
शीमशोन येहेजकेल मजगांवकर १
येटुजी दावीदजी आवासकर मेस्त्री १
येहेजकेल येटुजी आवासकर १
मीर्याम बाई आवासकरां १
मोशे येहेजकेल खंडालकर १

हाईम दानीएल थलकर	१
येहेजकेल शेमोएलजी कुरूलकर	१
इसहाक शालोम नौगावकर	१
हाईम आबाजी चरीकर	१
तानाजी शेमोएल मल्यानकर मेस्त्री	१
राहामीम तानाजी मल्यानकर	१
शिमशोन मोशे दीवेकर	१
आब्राहाम धोंडजी चीचोलकर	१
बीनयामीन शालोम वालवटकर	१
शालोमजी दानीएलजी भास्तेकर	१
शेमोएल शालोमजी कुरूलकर	१
मोशे येहेजकेल सानकर	१
मोशे राहामीम मलेकर	१
याकोब शेलोमो वासकर	१
शालोमजी धोंडजी सारलकर	१
शालोम बाळाजी पेझारकर	१
शालोमजी शेमोएलजी कुरुलकर दाक्तर	१
रऊबेन आब्राहामजी भीनजेकर	१
याकोबजी फकीरजी शापुरकर	२
रऊबेन हाईमजी आपटेकर	१
आहारोन याकोबजी आवासकर	१
आब्राहाम राहामीम मलेकर	१
शालोम आब्राहाम मोशे हिब्रा	१
आब्राहाम येलीएजेर भोरपकर	१
योसेफ आबाजी तलकर	१
दावीद याकोब चरीकर	१
योसेफ इसहाक तलकर	१

शेमोएल दावीद शापुरकर	१
शेमोएल याकोब शीरगांवकर	१
हाईम इसाजी गालसुलकर	२
शेमोएल रऊबेनजी पुगांवकर	१
मोशे रऊबेनजी पुगांवकर	१
शेमोएल येहेजकेल पेझारकर	१
शालोमजी बापुजी थळकर	१
येटु पीठाजी आवासकर मेस्त्री	१
पीनहास दादजी सासोनकर मेस्त्री	१
हासकेल इसूबजी तळकर व त्यांचे मुलगे	२
हाईम शिमशोनजी दीवेकर	१
हाईम इसूबजी तळकर हावलदार	२
आब्राहाम इसाजी गालसुलकर	१
शेमोएल शालोमजी आष्टमकर	१
शालोमजी शीलेमानजी चेऊलकर सुभेदार	१
हासकेल याकोबजी भोरपकर	२
शीमशोन शेमोएल दीवेकर	२
शेमोएल येलोजी तळकर	१
येलीयाहु शेमोएल नौगांवकर	१
शालोम दावीदजी तळकर	१
येहेजकेल दावीद दीवेकर	१
शेमोएल येलीया वरोलकर गब्बाय	१
दावीद शेमोएल वरोलकर	१
शिमशोन बेंडुजी वरोलकर.	१
योसेफ आहारोन खुलाबकर	१
येलीया योसेफ राजपुरकर हाज्जान	१
रऊबेन येलीया राजपुरकर	१

मोशे येलीया राजपुरकर	१
आब्राहाम सकोबा पेनकर	१
शालोम सकोबा पेनकर..	१
शेमोएल मोशे किलेकर..	१
राहेल बाई किलेकरीं..	१
रऊबेन शेलोमो नागांवकर मेस्त्री..	२
शीलेमानजी मुसाजी आगरवारकर दाक्तर..	१
आब्राहाम शीलेमानजी उमर्डेकर दाक्तर..	१
शेमोएल राहामीम भोनकर	१
रऊबेन योसेफ गडकर..	१
मोशे बीनयामीनजी पेझारकर..	१
आहारोन इसहाकजी भास्तेकर दाक्तर	१
आब्राहाम आबाजी केहीमकर पंतोजी	१
आहारोन आब्राहामजी केहीमकर	१
दावीद बीनयामीन शापुरकर	१
शालोम बीनयामीन चीचोलकर..	१
शालोम बीनयामीनजी सानकर..	१
रऊबेन इसहाकजी नीगडेकर	१

ठाणे.

मुसाजी बाळाजी उमर्डेकर सुभेदार मेजर बाहादुर.. ..	१
आब्राहाम मुसाजी उमर्डेकर फौजदार	१
हिलेल मुसाजी उमर्डेकर	१

भींवडी.

शिमशोनजी आवासकर जमादार..	१

टिटवाला.

याकोब शेमोएल शीरकोल्कर..	१

पनवेल.

याकोब दावीदजी उमर्डेकर	१
दावीद बावाजी मशीलकर	१
मुसाजी बनाजी दीवेकर	१
रऊबेन योसेफजी सानकर	१
योसेफ रऊबेन सानकर	१
शेमोएल आब्राहामजी तरणखोपकर पंतोजी	१
आब्राहाम शेमोएल तरणखोपकर	१
शेमोएल शालोमजी चीचोलकर	१
शेमोएल शीलेमानजी नवगांवकर	१
शेमोएल आलोजी शापुरकर काजी	१
हासाजी बाळाजी शापुरकर काजी	१
आब्राहाम दावीदजी चरीकर	१
आब्राहाम येहेजकेलजी भास्तेकर	१

साय.

बेंदुजी आबाजी सायकर हेतर	२
आहारोनजी भावजी कोलेटकर	१
बावाजी येलोजी तळकर	१

चीरनेर.

सकोजी शालोमजी फनसापुरकर	१
येलोबा सामाजी फनसापुरकर	१

पेण.

शालोम येहेजकेल बेलकर पंतोजी	१
आब्राहाम राहामीमजी पेनकर	१
बीनयामीन येहेजकेल पेनकर	१
बीनयामीनजी बापुजी वरवटनेकर जमादार	१
बेंदुजी दावीदजी पेनकर हेतर	१

दावीदजी आब्राहामजी खरीलकर १
शेलोमो येहेजकेल वरसोलकर हावलदार मेजर १
भीकाजी उर्फ दावीदजी दानीएलजी पेनकर १
शेलोमो आहारोनजी दीवेकर १
शेमोएल इसाजी नागांवकर १
शालोम आहारोनजी दीवेकर १
रोबेनजी गौरोजी कांदलेकर १
बेंदुजी सामाजी मुलना १
येहेजकेल सकोजी चांडगांवकर मेस्त्री १
शालोम योसेफजी पेनकर १

आलीबाग.

बाळाजी शेमोएलजी भोनकर सुभेदार मेजर ३
शेमोएल बाळाजी भोनकर २
एस्तेर बाई भोनकरीण १

रेवदंडा.

दावीदजी बावाजी दांडेकर १
शेलोमो योसेफ राजपुरकर पंतोजी १
शेमोएल योसेफ राजपुरकर पंतोजी १
सामाजी बापुजी भोरपकर सुभेदार मेजर बाहादुर १
हाईमजी सामाजी भोरपकर १
शेमोएल याकोबजी दांडेकर १
हीराचंद ऊर्फ रऊबेन बाबाजी ढोकरकर १
दावीद योसेफजी मलेकर १
दावीद आबाजी खानावकर १

बोरलय.

बाळाजी इसूबजी सोगांवकर १
शालोमजी शीलेमनजी दांडेकर १

रऊबेन जेबुलुन दांडेकर	१
फकीरजी येलोबा भास्तेकर	१

कोरलय.

येलोजी याकोबजी दांडेकर	१

आष्टमी.

बंदुजी येलोजी आष्टमकर म्हेतर. . . .	१
आहारोन शेमोएल आष्टमकर म्हेतर	२
आबाजी येलोजी आष्टमकर म्हेतर	१
आहारोन शीलेमानजी आष्टमकर पंतोजी	१

शीवर्धन.

शालोम शेमोएलजी सायगांवकर	१

पुणे.

याकोब राहामीम तलकर दाक्तर	२
मोशे याकोब तलकर	१
बीनयामीन याकोब तलकर	१
योसेफ याकोब तलकर	१
शीमशोन याकोब तलकर	१
येहेजकेल मोशे नागांवकर दाक्तर	१
आब्राहाम शेमोएल नागांवकर	१
बापुजी याकोबजी भोनकर	१
रऊबेन बापुजी भोनकर	१
शेमोएल दानीएल खरीलकर दाक्तर	१
आहारोनजी शीलेमानजी नागांवकर	१
बंदुजी केहीमकर हावलदार	१

अहमदनगर.

आब्राहाम दावीद चरीकर सुभेदार नेटीव कमांडान्ट	१

बीनयामीन आब्राहाम चरीकर १
शेलोमो आब्राहाम चरीकर १
बापुजी आब्राहामजी वरघरकर सुभेदार.. .. .. १
शालोम बापुजी वरघरकर १

सातारा.

आब्राहामजी आहारोनजी आगरवारकर सरवेर.. .. १
बंदुजी इसाजी भोनकर सुभेदार.. .. .. .. १
हाईम येहेजकेल म्हशीलकर दाक्तर १
बंदुजी याकोबजी किलेकर सुभेदार १
दावीदजी आहारोनजी आगरवारकर ड्राफ्समान १

बेलगांव.

बंदुजी बापुजी भोनकर ड्राफ्समान १

म्हौ.

इसहाक आब्राहामजी वरघरकर रैटर १

मसावद (जिल्हा खानदेश)

इसहाक आबाजी मेंद्रेकर १

भडोच.

शालोम बीनयामीन वासकर टेलेग्राफ सीगनेलर १

अहमदाबाद.

आब्राहाम बीनयामीनजी येरलकर दाक्तर.. .. .. १

राजकोट.

इसहाक शीलेमानाजी तलकर रैटर १

कराची.

येलीएझेर दानीएल कोलाटकर.. .. .. .. २

हैद्राबाद (सिंद)

रऊबेन येलीया दुदकर.. .. .. २

योसेफ रऊबेन दुद्कर १
बीनयामीन रऊबेन दुद्कर १
येलीया रऊबेन दुद्कर १
इसहाक बीनयामीन पेनकर १
शालोम बंदुजी चरीकर १
आब्राहाम दावीद ह्लेडेकर १
येलीया आहारोन नागोटनेकर १

सक्कर.

हाईम शीमशोनजी किलेकर ड्राफ्समान १

शीकारपुर.

बीनयामीन शीलेमानजी कासुकर दाक्तर १

आदन.

याकोब आब्राहामजी केहीमकर टौन ओवरसीयर २
शेमोएल याकोबजी केहीमकर १

रेजीमेंट २ ग्रेनेडीयर.

शीलेमान दावीदजी ह्लेडेकर सुभेदार १
सादीकजी कांद्लेकर दाक्तर १
दानीएलजी शेमोएलजी भोनकर हावलदार १
रऊबेनजी आब्राहामजी कोरलेकर १
हासकेलजी शीलेमानजी वरसोलकर दाक्तर १

रेजीमेंट ३.

येहेजकेल इसहाकजी जावलीकर सुभेदार मेजर २
शेमोएल इसहाकजी जावलीकर सुभेदार १
हाईमजी हासाजी आवासकर सुभेदार १
शेमोएल मुसाजी आष्टीवकर जमादार १

येलोजी दावीदजी चरीकर कलर हावलदार १
हासकेलजी सामाजी वासकर कलर हावलदार १
शालोमजी शेमोएलजी चरीकर हावलदार रैटर १
हाईमजी बापुजी वढांवकर लान्स नाईक.. .. .. १
आब्राहामजी हाईमजी आवासकर १
हासकेलजी सतकोजी इंदापुरकर.. .. .. .. १
सतकेलजी याकोबजी किलेकर.. .. .. .. १
दावीदजी म्हेडेकर १
रऊबेन शालोमजी चरीकर १
इसहाकजी शालोमजी चरीकर दाक्तर १
हासकेलजी हाईमजी बीरवाडकर.. .. .. .. १
येलीएझेर रऊबेन रोहेकर १
शीलेमानजी सतकेलजी वरोलकर लान्स नाईक १
योसेफ येहेजकेल जावलीकर १
बीनयामीन येहेजकेल जावलीकर.. .. .. .. १
सादीक येलोजी चरीकर १

रेजीमेंट ४ रैफलकोर.

दावीद सकोजी भोरपकर सुभेदार २
दानीएल राहामीम तलकर सुभेदार १
आहारोन दानीएलजी तलकर.. .. .. .. १
हासकेलजी तलकर हावलदार.. .. .. .. १
याकोबजी पालकर हावलदार १
शालोमजी इंदापुरकर नाईक १
मुसाजी तलकर बीगलर.. .. .. १
रऊबेनजी उमर्डेकर बीगलर १
शालोमजी घोसालकर.. .. .. १

आब्राहामजी आष्टमकर १
सतकीएलजी नवगांवकर १
रऊबेन दावीदजी भोरपकर १
रऊबेन इसहाकजी वरघरकर १
शालोमजी सीलेमानजी दीघोरकर १

रेजीमेंट ६.

याकोब शेमोएलजी वासकर दाक्तर १
शेलोमो राहामीम तलकर रैटर १

रेजीमेंट ८.

सीलेमान दानीएलजी चरीकर १

रेजीमेंट १०.

शेमोएल मुसाजी नागांवकर सुभेदार १
याकोब येसबा मेंद्रेकर जमादार १
शालोम मोशे नागांवकर स्कुलमास्तर १
शालोम आबाजी खरीलकर १
शालोम याकोबजी खरीलकर १
येहेजकेल शीमशोनजी किलेकर दाक्तर १

रेजीमेंट १२.

येहेजकेलजी बापुजी मलेकर सुभेदार मेजर १
सीमशोनजी येलोजी डांडुलकर सुभेदार १
मुसाजी दानीएलजी कोलेटकर सुभेदार १
मुसाजी बापुजी मलेकर जमादार १
आब्राहामजी गौरोजी तलकर हावलदार १
रऊबेनजी बापुजी मलेकर क्वारटर मास्तर हावलदार .. १
लीयाबाई मलेकरीं १

इसाजी धंबाजी सामकर हावलदार	..	..	..	१
सीलेमानजी शालोमजी गरबकर नाईक		..	..	१
सीलेमानजी सतकीएलजी कोकबानकर नाईक		..	..	१
दावीदजी इसाजी सातामकर लान्स नाईक		..	..	१
आब्राहामजी दानीएलजी थलकर लान्स नाईक		..	..	१
बनाजी सीलेमानजी भास्तेकर लान्स नाईक		..	..	१
जक्काएलजी सीलेमानजी कांदलेकर लान्स नाईक		..	..	१
सीमशोनजी शालोमजी शापुरकर	..	..	..	१
शालोमजी सकोजी पेनकर	..	..	..	१
आब्राहामजी शेमोएलजी चरीकर	..	..	..	१
बनाजी सादीकजी भास्तेकर स्कुलमास्तर	..	..	..	१
दानीएलजी बनाजी केहीमकर	..	..	..	१
सतकेलजी याकोबजी बीरवाडकर	..	..	..	१
आब्राहामजी बंदुजी चांडगांवकर	..	..	..	१
शालोमजी सीलेमानजी खांबकर	..	..	..	१
याकोबजी भाऊजी तलकर	..	..	..	१
योसेफजी दानीएलजी कोरलेकर दाक्तर	..	..	..	१
बनाजी मुसाजी तलकर	..	..	..	१

रेजीमेंट १४.

सीलेमानजी बाळाजी झीराटकर सुभेदार मेजर	..	..	२
शालोमजी बाळाजी तलकर जमादार	..	..	१
येलीएझेर शालोमजी कोलेटकर ड्रील हावलदार	..	..	१
शेमोएल शीलेमानजी चीचोलकर कलर हावलदार		..	१
आब्राहामजी आहारोनजी कोलाटकर	..	..	१
शेमोएलजी शालोमजी बांबनोलकर	..	..	१

रजीमेंट १६.

आहारोनजी शेमोएलजी आष्टमकर सुभेदार १
योसेफ दानीएलजी खरीलकर सुभेदार १
दावीद शेमोएलजी आष्टमकर हावलदार १
इसाजी बावाजी म्हेडेकर हावलदार १
याकोब मुसाजी आवासकर नाईक १
आब्राहाम बीनयामीनजी वरोलकर १
रऊबेनजी शीलेमानजी सोनगांवकर १
रऊबेन योसेफजी पेनकर १

रेजीमेंट १८.

शालोमजी सामाजी कासुकर सुभेदार १
आहारोनजी मुसाजी नागांवकर हावलदार १
दावीदजी दानीएलजी बोरघरकर १
रऊबेनजी बापुजी पालकर १

रेजीमेंट १९.

रऊबेनजी हांसाजी म्हशीलकर जमादार १
शमोएलजी शीलेमानजी उमर्डेकर नाईक १

रेजीमेंट २२.

आब्राहामजी सामाजी शापुरकर जमादार १

रेजीमेंट २३.

हाईमजी शेमोएलजी पेझारकर १

रेजीमेंट २४.

शीमशोनजी शेमोएलजी किलेकर सुभेदार मेजर बाहादर .. १
इसुबजी शीमशोनजी किलेकर हावलदार मेजर १
यलीएझेर शीमशोनजी किलेकर नाईक १
शेमोएल शीमशोनजी किलेकर १

मोशे शीमशोनजी किलेकर १
शेमोएल बापुजी झीराटकर काजी जमादार १
शीलेमानजी दावीदजी कुरूलकर नाईक १

रेजीमेंट २५.

शीलेमानजी दानीएलजी घोसालकर सुभेदार मेजर .. २
बीनयामीनजी नागांवकर हावलदार आर्डरली १
हासकेलजी बापुजी कोलाटकर १
हाईमजी शेमोएलजी पींगले १
शालोमजी बापुजी बांबनोलकर १
येहुदा इसाजी आष्टमकर स्कुलमास्तर १

रेजीमेंट २७.

शेमोएलजी हासकेलजी ढोंकरकर हावलदार १
हासकेल इसहाक पुगांवकर दाक्तर १

रेजीमेंट २८.

येलोजी आहारोनजी पेनकर हावलदार १

रेजीमेंट २९.

दानीएल शेलोमो नौगांवकर रैटर १
येलीया शेमोएल शीरकोलकर १

स्यापरस आन्ड मैनरस

हासकेलजी कासुकर १
सकोजी पालकर १

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
३	२५	अनुवाह	अनुवाद
८	७	राजाच्या	राजाचा
११	२०	जेष्ठ	ज्येष्ठ
१६	२१	स्मरणाची	स्मरणाचा
२०	२७	द्ध	शुद्ध
२६	१	गुढगे	गुढघे
३३	१५	आहेस या शब्दापुढें हे परमेश्वरा शास्त्र देणाऱ्या तूं धन्य आहेस.	
४१	१८	मद्य	मध
४६	१८	आभार मानण्याचा यज्ञ व नाजीराचा मेंढा याचा नेम व मूळ ग्रंथांत त्याच्या मागून सांगितलेला शांतिकारक यज्ञाचा नेम सारखाच आहे. शांतिकारक यज्ञ दोन दिवस व एक रात्र खावा एवढा मात्र भेद आहे.	
५४	१८	परमेश्वर राज्य करितो. हे शब्द दोन वेळा.	
५६	१४	आब्राहाम	आब्राम
५८	६	आपले शेतांतील	पलेशेतांतील
८०	१४	पृष्ठ	पृष्ठ १३
९१	१९	असणाऱ्या	असणाऱ्या देवा
१०२	८	नसोडावें,	नसोडावें, तर दिवस व रात्रीं त्वां त्याचें मनन करावें

शूद्धिपत्र.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध.	शुद्ध.
११०	१६	लवकरच तूं	तूं
१२९	५	קדיש לעילא यापूर्वी ואני תפלתי	९
१४१	१	(शा-अ.)	(शा. न)

२

התרת נדרים ह्मणजे नवस शपथी इत्यादिकांपासून मोकळे होण्यासाठीं जी प्रार्थना आहे ती, आणि תשליך ह्मणजे वर्षप्रतिपदेच्या दिवशीं समुद्रतिरीं जाऊन करायाची प्रार्थना; या निराळ्या छापल्या जातील.

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधकमंडळीने छापविलेलीं पुस्तकें.

	रु.	आ.	पै.
प्रायश्चित्ताच्या दिवशीं पापाविषयीं कबूल होणे..	”	१	३
पापाच्या क्षमेसाठी प्रार्थना ..	”	८	”
इस्राएलांचा लग्नविधि	”	३	”
वर्षप्रतिपदेची प्रार्थना..	१	”	”

THE

REMISSION OF VOWS

AND THE

PRAYER

OFFERED ON THE SEA SHORE.

התרת נדרים

ותשליך

नवसांची सुटका.

आणि

समुद्रतिरीं करावयाची प्रार्थना.

THE

REMISSION OF VOWS

AND THE

PRAYER

OFFERED ON THE SEA SHORE

TRANSLATED

FROM HEBREW INTO MARATHI

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKER

TEACHER IN DAVID SASSOON'S BENEVOLENT INSTITUTION

AND

SECRETARY TO THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY

PUBLISHED BY THE BENE-ISRAEL IMPROVEMENT SOCIETY

BOMBAY

PRINTED AT GUNPUT KRUSHNAJEE'S PRESS.

1864-5624.

Price annas 4.

התרת נדרים
ותשליך

नवसांची सुटका

आणि

समुद्रतिरीं करायाची प्रार्थना

या ग्रंथाचें

इब्री मूळग्रंथावरून मराठी भाषेंत

यासेफ येहेजकेल राजपुरकर

दावीद सासोन यांच्या शाळेंतील शिक्षक

व

इस्राएल लोकांच्या सद्गुण शोधक मंडळीचे चिटणीस

यांणी

भाषांतर केलें

तें

इस्राएल लोकांच्या सद्गुणशोधक मंडळीनें

लोकोपयोगाकरितां

मुंबईमध्यें

गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत छापिलें

इ० स० १८६४

इस्राएली ५६२४

किम्मत च्यार आणे.

प्रस्तावना.

ज्या प्रायश्चित्ताच्या दिवशीं ईश्वर आपल्या लोकांचीं आणि विशेषेंकरून आपल्या भक्तांचीं पापें क्षमा करितो; त्यादिवशीं त्याजपुढें प्रार्थना करायास त्यांनी सिद्ध व्हावें, ह्मणून अनेक प्रकार नेमिलेले आहेत. त्यांतील एक प्रकार असा आहे कीं, जर कोणी काहीं नवस, वचन इत्यादिक करितो, तर ते त्यानें पूर्ण केले पाहिजेत. परंतु काहीं अडचनीमुळें जर तो ते पूर्ण करूं शकत नाहीं; तर त्याकडे त्यांचा दोष मोजिला न जावा, ह्मणून ज्ञानी लोकांनी असें कल्पिलें आहे कीं, जर दाहा किंवा तीन मनुष्यांनी त्याची सुटका केली, तर ईश्वरहि त्याची सुटका करील. यासाठीं त्यानी सुटका मागण्याची व प्रार्थना करण्याची जी पद्धति लाऊन दिल्ही आहे, तिचें भाषांतर या ग्रंथांत केलें आहे. परंतु ज्याच्या अंगीं सामर्थ्य असून आपले नवस, वचन इत्यादिक पूर्ण करीत नाहीं त्यास त्यांची सुटका न होतां त्याकडे दोष मोजिला जातो. ही प्रार्थना कोणी वर्षप्रतिपदेच्या आदल्या दिवशीं व प्रायश्चित्ताच्या दिवसाच्या आदल्या दिवशीं अशी दोन वेळ करितात; आणि कोणी एलुल ह्मणजे भाद्रपद महिन्याच्या प्रतिपदेच्या आदल्या दिवशींहि करितात.

दुसऱ्या भागांत ज्या प्रार्थनेचें भाषांतर केलें आहे, ती प्रार्थना वर्षप्रतिपदेच्या दिवशीं नैवेद्यरूपि प्रार्थना केल्यानंतर समुद्राच्या किंवा नदीच्या तिरीं अथवा विहीरीजवळ जाऊन करितात. मीखा भविष्यवाद्याचे वचन आहे कीं, ईश्वर आपल्या भक्तांचे अन्याय धुळीस मिळवील आणि त्यांचीं सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाकिल्यासारिखीं नाहींसीं करील. हें वा-

प्रस्तावना.

क्य आपल्या मन्ययास यावें, ह्मणून समुद्राची उपमा दिल्याप्र- माणें समुद्राच्या तिरीं जाऊन ही प्रार्थना करितात.

किल्येकांचा असा समज आहे कीं, जरी ईश्वराची प्रार्थ- ना कधींच न करितां आपला नवस वचन इत्यादिकांची सुटका व्हावी, ह्मणून पहिल्या भागांतील प्रार्थना मात्र केली; आणि आ- पल्या पापांची क्षमा होण्याकरितां दुसऱ्या भागांतील प्रार्थना केली; तर आपले सर्व नवस, वचनें इत्यादिकांची सुटका होते, आणि आपलीं सर्व पापें क्षमा होतात. परंतु असें नसतां, जो आपल्या पापांविषयीं पूर्ण पश्चात्ताप करून नेहेमी क्षमा मागतो, त्याजवरच ईश्वर दया करून त्याचीं सर्व पापें क्षमा करितो.

התרת נדרים

नवसांची सुटका.

שמעו נא רבותינו अहो आमचे स्वामी, ऐका, आह्मी सावध असतां अथवा स्वप्नांत जे नवस केले असतील, ज्या शपथा वाहिल्या असतील, नवस करून जीं बंधनें पत्कारिलीं असतील, जे उत्सर्ग केले असतील, जे निश्चय केले असतील, अथवा रद्द होणार नाहींत अशा नामाच्या, किंवा धन्य जो (देव) त्याच्या הויה (या गुह्य) नामाच्या शपथा वाहिल्या असतील, जें कोणत्याहि प्रकारचें वेगळें राहाणें, कोणत्याहि कामापासून वेगळें राहाणें हि, आणि कोणत्याहि प्रकारचे नवस करून जीं बंधनें पत्कारिलीं असतील, आणि योग्य रीतीचे नवस करून आह्मी स्वतः जीं बंधनें पत्कारिलीं असतील अथवा दुसऱ्यास पत्कारायास भाग्य पाडलें असेल; तीं कोणत्याहि अर्थाचीं असोत, नवस करून बंधन पत्कारण्याच्या अर्थाचे अथवा उत्सर्गाच्या अर्थाचे असोत; आणि जें काहीं आह्मी मान्य केलें असेल, आणि जें कोणत्याहि आज्ञेचें (बंधन) नवसाच्या दानाच्या, शपथेच्या, वेगळें राहाण्याच्या अथवा कोणत्याहि अर्थाचें असेल; आणि हातावर हात मारून नवसाविषयीं दानाविषयीं, किंवा एकाद्या आज्ञेची चाल लावून घेण्यास जें वचन केलें असेल; आणि जें काहीं आमचे ओंठाचे शब्द आमच्या तोंडांतून निघाले असतील; अथवा (सर्व) आज्ञांतून कोणतीहि आज्ञा पूर्ण करण्याकरितां, किंवा कोणतीहि चांगली रीति

करण्याकरितां आह्मी जे नवस किंवा आपल्या मनांत जे पूर्ण ठराव केले असतील; अथवा कोणतीहि चांगली गोष्ट, ती नवसाप्रमाणें मानिली नजावी ह्मणून कांहीं आड न ठेवितां, जी आह्मी आपणाविषयीं किंवा दुसऱ्याविषयीं तीन वेळा चालविली असेल; अथवा ज्याची आह्मास आठवन असेल, किंवा ज्याविषयीं आह्मास विसर पडला असेल; त्या सर्वांविषयीं व त्यांच्या मूळ विषयांविषयीं पश्चात्ताप करून आह्मी तुह्मापासून सुटका मागतों. कारण आह्मास भय वाटतें कीं, (नाहीं तर) कदाचित नवसांच्या, शपथांच्या, वेगळे राहाण्याच्या, उत्सर्गांच्या, नवस करून बंधनें पत्कारण्याच्या, निश्चय करण्याच्या, आणि अनुमोदन देण्याच्या पापामुळें आह्मी गळून पडूं व त्यांत सांपडले जावूं; परंतु असे न होवो. आह्मी केलेल्या चांगल्या कृत्यांच्या निवाड्याविषयीं आह्मी घाबरतों असें नाहीं; आणि तसें न होवो. नवसाच्या, शपथेच्या, वेगळे राहाण्याच्या, नवस करून बंधन पत्कारण्याच्या, उत्सर्गांच्या, निश्चय करण्याच्या, अनुमोदन देण्याच्या, किंवा मनांत निर्णय करण्याच्या अर्थाचे जे मूळ विषय आह्मी कबूल केले असतील, त्यांविषयीं आह्मी पश्चात्ताप करितों. आणि नवस करणें, शपथ वाहणें, वेगळे राहाणें, नवस करून बंधन पत्कारणें, उत्सर्ग व निश्चय करणें, अनुमोदन देणें किंवा मनांत निर्णय करणें यांशिवाय, पाहा, ही (अमुक गोष्ट आह्मी करूं, असे ह्मणण्याविषयींहि आह्मी पश्चात्ताप करून त्या सर्वांविषयीं आह्मी सुटका मागतों. आणि वर सांगितलेल्या सर्व गोष्टी, जरी द्रव्यासंबंधी, शरीर संबंधी, किंवा आत्म्यासंबंधी असल्या; तरी त्यांविषयीं आह्मी पश्चात्ताप करितों. आणि त्या सर्वांविषयीं, त्यांच्या नवसाच्या, शपथेच्या, वेगळे राहाण्याच्या नवस करून बंधन पत्कारण्याच्या, उत्सर्गांच्या, निश्चय करण्या-

ण्या, अनुमोदन देण्याच्या आणि मनांत निर्णय करण्याच्या अ-र्थावरून आह्मी पश्चात्ताप करितों. आणि पाहा, कीं जे कोणी पश्चात्ताप करून सुटका मागतात, त्यांनी न्यायाप्रमाणें ते नवस विस्तारानें सांगितले पाहिजेत, परंतु हे आमच्या स्वामी, निश्चयें तुह्मी जाणतच आहा, कीं ते पुष्कळ असल्यामुळें आह्मी ते वि-स्तारानें सांगूं शकत नाहीं. आणि ज्या नवसांची सुटका होत नाहीं त्याविषयीं आह्मी सुटका मागत नाहीं. ह्मणून ते तुमच्या दृष्टीपुढें आह्मी केवळ विस्तारानें सांगितल्या प्रमाणेंच असोत.

जे अर्धे लोक बसलेले असतात, ते सुटका करितांना उत्तरें करून तीन वेळ हें बोलतात.

כלם מותרים לכם सर्व तुह्मास योग्य, सर्व तुह्मा-स क्षमा व सर्व तुह्मास मोकळें आहे (तीन वेळ). आतांपासून न-वस, शपथा, निर्णय, अनुमोदन देणें, रीति, वेगळें राहाणें, उत्सर्ग, नवस करून बंधन पत्कारणें आणि निश्चय करणें हीं काहींच नसोत. त्यांच्या मूळविषयांविषयींहि तुह्मास क्षमा, मोकळीक व सुटका असो. ज्याप्रमाणें खालच्या (पृथ्वीवरील) न्याय स-भेच्या मुखांतून तुह्मास सुटका केली जाते; त्याप्रमाणें वरील (आकाशांतील) न्याय सभेच्या मुखांतूनहि तुह्मास सुटका केली जावो; आणि तुमचे अपराध व तुमचीं पापें क्षमा होवोत.

नंतर जे उभे असतात त्यांनी हें ह्मणावें.

הרי אנו מוסרים हे आमचे स्वामी, पाहा, दु-सरे दिवशीं उपवास करण्याचा नवस आदल्या दिवशीं प्रार्थनारू-प नैवेद्यांत करणें खेरीज करून, जे नवस, ज्या शपथा, जें वेगळें राहाणें, नवस करून बंधन पत्कारणें, जे निश्चय व उत्सर्ग, जीं अ-

नुमोदनें, किंवा जे निर्णय सावधपणें अथवा स्वमांत आह्मी आतांपासून पुढें मान्य करूं; त्यांविषयींहि आह्मी तुह्मास आतांच कळवितों, कीं तेहि रद्द असोत. आणि कळविण्याची अड ठेवायास विसरून आजपासून पुढें जे आह्मी नवस करूं; त्यांविषयींहि आह्मी आतांच पश्चात्ताप करून, ते सर्व अगदीं रद्द व्हावे ह्मणून आतांच अड करून ठेवितों. ते अगदींच स्थापित, मंजूर व बाधक होऊं नयेत; त्या सर्वांविषयीं आतांपासून सर्वकाळ पश्चात्ताप करूं.

श्रापांची क्षमा मागणें.

יהי רצון हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आह्मावर तुझी अशी प्रसन्नत्ता होऊं दे, कीं आह्मी आपले स्वतःस, आमच्या कुटुंबांतील कोणी मनुष्यास, किंवा इस्राएलाच्या वंशांतील दुसऱ्या कोणा एकास, ज्या शिव्या दिल्ह्या असतील, श्राप दिल्हे असतील, अपांक्त, बहिष्कृत, अथवा धर्मबाह्य केलें असेल; अथवा दुसऱ्यांनी आह्मास किंवा आमचे कुटुंबांतील मनुष्यास, ज्या शिव्या दिल्ह्या असतील, जे श्राप दिल्हे असतील, किंवा अपांक्त, बहिष्कृत किंवा धर्मबाह्य केलें असेल; तें सर्व आह्मास क्षमा कर.

יהי רצון हे आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, आकाश व पृथ्वीच्या स्वामी, आह्मावर तुझी प्रसन्नता होऊं दे; आणि आह्मावर कोणी अधिकार करूं नये, किंवा आह्मास कांहींच अडथळा करूं नये असें कर. आणि शास्त्रांत लिहिल्याप्रमाणें सर्व श्राप आशीर्वाद रूपें पालटिले जावोत; कारण शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं, तुझ्यासाठीं तुझा देव परमे-

श्वर यानें तो श्राप आशीर्वाद रूपें पालटिला; कारण कीं तुझा दे-
व परमेश्वर यानें तुजवर प्रीति केली.

जे अर्धे लोक बसलेले असतात; ते सुटका करितांना उत्तरें करून तीन वेळ हें बोलतात.

כלם מותרים לכם सर्व तुह्मास योग्य, सर्व तुह्मास क्षमा, व सर्व तुह्मास मोकळें आहे (तीन वेळ). आतांपासून तुमचे अपांक्त करणें, बहिष्कृत करणें, धर्म बाह्य करणें, शिव्या देणें, शापपूर्वक शपथ घालणें आणि अपवाद करणें, हीं कांहींच नसोत. त्यांच्या मूळ विषयां विषयींहि तुह्मास क्षमा, मोकळीक व सुटका असो. ज्याप्रमाणें खालच्या (पृथ्वी वरील) न्याय सभेच्या मुखांतून तुह्मास सुटका केली जाते; त्याप्रमाणें वरील आ- काशांतील) न्याय सभेच्या मुखांतूनहि तुह्मास सुटका केली जावो. आणि शास्त्रांत लिहिल्याप्रमाणें सर्व श्राप चांगल्या व आशीर्वाद रूपें पालटिले जावोत; कारण शास्त्रांत असें लिहिलें आहे कीं तुझ्यासाठीं तुझा देव परमेश्वर यानें तो श्राप आशीर्वाद रूपें पाल- टिला; कारण कीं तुझा देव परमेश्वर यानें तुजवर प्रीति केली. आणि तुमचे अपराध व तुमची पापें क्षमा होवोत.

नंतर जे उभे असतात त्यांनी हें बोलावें.

יהי רצון हे परमेश्वरा! आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, ज्याच्या हातीं सर्व प्राणी मात्रांचा जीव व मां- समयांचा आत्मा आहे, अशा मोठ्या, पराक्रमी व भयंकर देवा, व ज्याचें नाम धन्य, त्याची सेवा करितांना पुष्कळ दिवसांनंतर व वर्षांनंतर आमच्या झडतीचा (मरणाचा) वेळ जवळ येऊन जेव्हां देव चांगल्या व विस्तीर्ण प्रसन्नतेनें, दयेनें, कृपेनें व मायेनें आमचा आत्मा काढून घेईल; तेव्हां सध्यांच्या वेळाप्रमाणें

आमची बुद्धि निर्मळ, स्थिर व अचल राहून आतांप्रमाणें व पूर्वीप्रमाणें आम्ही व आमच्या बुद्धीनेंहि, जो धन्य त्यास व त्याच्या एकत्वास लगटून राहण्यास सिद्ध असावें. आणि आमचा जीव अगदीं निघून जाईपर्यंत आम्ही त्याच्या भयापासून व त्यावर प्रीति करण्यापासून वळूं नये. जो एकच देव व ज्याचें नामहि एकच, त्याच्या राज्याचें जोकड (राज्याधिकार) मान्य करावें. जो धन्य त्याचा न्याय यथार्थ, तो सत्य, त्याचा न्याय सत्य व त्याचा निवाडाहि सत्य, असें मान्य करण्यास आमची बुद्धि निर्मळ व स्थिर राहो. ते सर्व निवाडे मजवर दयेनें व कृपेनें केलेले आहेत. आणि तो (सर्वांचा) स्वामी व प्रभु आहे; म्हणून आम्ही त्याची इच्छा भयानें व प्रीतीनें पूर्ण करूं. ज्याचें नाम धन्य, त्या चांगल्या व यथार्थ उत्पन्न कर्त्याची सेवा करितांना पुष्कळ दिवसानंतर, व वर्षानंतर आम्हास कठोर शासन होण्याचा वेळ आल्यावर, जरी आमची बुद्धि भ्रमिष्ट व चकित झाली; (परंतु असें न होवो,) तरी आम्हाविषयीं दयेनें व कृपेनें केलेल्या पवित्र व शुद्ध न्यायास आह्मी यथार्थ मानितों. आणि जें अवघें आम्हावर आलें आहे, त्याविषयीं तूं सात्विक आहेस, त्वा सत्यता केली आहे, परंतु आह्मी दुष्टाई केली आहे. आणि आमच्या बाळपणापासून आह्मास भुलविणाऱ्या, चांगल्या कृत्यांपासून वळविणाऱ्या आणि त्यांस आड येणाऱ्या वाईट कल्पना, त्यावेळीं जो आमचा जनक, घडविणारा व उत्पन्न करणारा धन्य जो पवित्र राजा व राजांचा राजा, त्याविरुद्ध, त्याच्या पवित्र व निष्प्रांजल शास्त्राविरुद्ध, त्याच्या आज्ञाविरुद्ध ,शास्त्रांतील अथवा कब्बालांतील* आज्ञाविरुद्ध, गुरूच्या आज्ञाविरुद्ध, लिहिलेल्या अथवा कथित शास्त्राविरुद्ध, किंवा कोणतीहि आड, हद्द

* कब्बाला ही एक लाक्षणिक भाषेंत लिहिलेली शास्त्रावरील टीका आहे.

अथवासांभाळा याचा नेम यांविरुद्ध अपवाद करायास, त्या आ-ह्मास भुलवायास, वळवायास व मोहित करायास येतील; (परंतु असे अगदीं नहोवो,) तर अहो, या पवित्र मंडळीच्या सभासदानो, धन्य जो पवित्र तो व त्याचा साक्षात्कार तुह्मासहित असतां, अगोदर कळविण्याच्या पूर्ण रीतीप्रमाणें व ज्यांचे स्मरण धन्य, त्या ज्ञान्यांनी ठरविलेल्या अगोदर कळविण्याच्या सर्व प्रकाराप्रमाणें, आह्मी तुह्मास इतक्यांतच असें कळवितों कीं, ते भुलविणें व वळविणें शून्य, रद्द व फुटक्या पात्राप्रमाणें असो. आणि आह्मी दुःखांत असतां श्रमिष्ट व चकित बुद्धीनें व ज्ञानानें जर आह्मी त्याची स्तुति केली; (परंतु असे अगदींच न होवो,) तर ती स्तुति आतांपासूनच शून्य व रद्द असो; ती सिद्ध व स्थापित नहोवो; आणि ती मुळीं केली नव्हती असी मानिली जावो; कारण दुःखामुळें कोणी मनुष्य गुंतला जात नाहीं.

निश्चयें, आम्ही सत्यानें, पुर्तेपणीं व आमच्या सर्व मनानें तुम्हापुढें असें मान्य करितों कीं, ज्याचें नाम धन्य, जो एकच व ज्याचें नामहि एकच, त्या उत्पन्न कर्त्यावर आमचा विश्वास आहे; आणि मी आपणावर त्याच्या राज्याचें जोकड (राज्याधिकार) मान्य करितों. हे इस्राएला, ऐक, परमेश्वर आमचा देव आहे, परमेश्वर एकच आहे. (त्याच्या राज्याच्या गौरवाचें नाम सर्वकाळ धन्य असो. हे वाक्य हळू बोलावें.) परमेश्वर देव सत्य, त्याचें शास्त्र सत्य, त्याच्या घरचा विश्वासू सेवक मोशे सत्य, त्याचे लिहिलेलें व कथित शास्त्र सत्य, शास्त्रांतील, कब्बालांतील व गुरुच्या सर्व आज्ञा सत्य, आणि सर्व लहान लहान आज्ञाहि सत्य आहेत. आणि धन्य ईश्वराची स्तुति असो, कीं मी त्या सर्व पूर्ण विश्वासानें व मनानें व उल्हासित जीवानें मान्य करितों. एकच देव जो सर्व कर्त्यांचा स्वामी, तो विश्वसनीय आहे. त्या शास्त्रांतील, कब्बालांतील व गुरूच्या आज्ञां-

तून कोणत्याहि लहान अथवा मोठ्या आज्ञेविरुद्ध आह्मी अपवाद करीत नाहीं. मात्र देवास आह्मी भीतों. आणि जीं तेरा मूळ तत्वें आहेत त्यासर्वांवर व त्यांतील प्रत्येकांवर आह्मी विश्वास ठेवितों. आणि ज्या उत्पन्न कर्त्याचें नाम धन्य, तोच पहिला व तोच शेवटला; त्यावांचून कोणी देव नाहीं. आणि पुढील जगांत सात्विकांस चांगलें वेतन मिळेल परंतु दुष्टांस कठोर व उग्र शासन होईल. आणि ज्या उत्पन्न कर्त्याचें नाम धन्य, त्याची जेव्हा इच्छा होईल तेव्हां मेलेले पुनः उठतील; मारणें व जीवंत करणें त्याच्याच हातीं आहे. आणि माशीयाह येणार आहे. आणि ज्या उत्पन्न कर्त्याचें नाम धन्य, तो निराकार आहे, त्यास कशाचीहि प्रतिमा नाहीं. तो मोठा व फार भयंकर, पवित्र व निर्दोष, मूळचा, स्वच्छ, तेजस्वी, निर्मळ व प्रांजल, गुप्त व अदृश्य, अंत नाहीं असा विस्तीर्ण धन्य प्रकाश तो आहे. तोच जीवंत व निश्चल, जीवंत पाण्याचा झरा आहे; त्याच ईश्वरापासून जीवन निघतें. आणि जें वाक्य लिहिलें आहे कीं, " आणि जे तुम्ही तुमचा देव परमेश्वर याला लगटून राहिलां, ते तुम्ही सर्व आजपर्यंत जीवंत आहां. " आणखी असें म्हटलें आहे कीं, मजमध्यें तुझे दिवस बहुत होतील, आणि तुझ्या आयुष्याचीं वर्षे वाढतील (हें वाक्य आमच्या प्रत्ययास येवो. आणि जीवनाचा देव आम्हास चांगल्या व कल्याणयुक्त जीवनाकरितां लिहो व मोहोर करो. तथास्तु. हे परमेश्वरा ! हे माझ्या खडकरूप आश्रया व माझ्या खंड भरणाऱ्या ! तुझ्या जवळ माझ्या तोंडांतील वाक्यें, आणि माझ्या ऱ्हदयांतलें ध्यान मान्य होवो.

תשליך

समुद्र तीरीं करायाची

प्रार्थना.

हीं वाक्यें तीन वेळ बोलावीं.

"מי אל כמוך" हे देवा, जो तूं अन्यायाची क्षमा करितोस व आपल्या विभागाच्या शेषाचें पातक उल्लंघितोस, त्या तुज सारिखा कोण आहे ? तो आपला क्रोध सर्वकाळ बाळगीत नाहीं, कारण कीं त्याला दया आवडती. तो फिरेल, तो आम्हावर दया करील, तो आमचे अन्याय धुळीस मिळवील; आणि त्याचीं सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाकिसील. तूं याकोबासाठीं खरेपण व आब्राहामासाठीं करुणा साधिसील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्वजांसीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहीस ती "

רבונו של עולם हे जगदीशा, तुझी सेवा करण्यांत, तुझ्या पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्यांत, व तुझ्या आज्ञा स्थापित करण्यांत आमची न्यूनता जेव्हां आम्ही आपल्या मनीं आणितों; तेव्हां आमच्या हाडांस कंप व्यापितो, आणि आमचें मन वितळून पाण्यासारिखें होतें, आम्ही काय उत्तर देऊं व काय म्हणूं ! कारण दुःखदायक शत्रु * त्रासदायक माती बरोबर स्नेह करून आम्हास त्रास देतात. त्यांबरोबर दासत्वहि मिळालें आहे. ते (तुझेलोक) आत्म्याच्या व देहाच्या कठोर दास्यत्वांत,

* दुष्टवासना.

बंदांत व पीडित आहेत. खचीत तुझ्यापुढें उघड व प्रगट आहे कीं, आह्मी तुझी इच्छा पूर्ण करायास व तुझ्या द्वारापुढें यावयास त्वरा करितों; कारण तुझ्या अंगणांत एक दिवस सहस्रापेक्षां उत्तम आहे. यास्तव आह्मीं तुजपुढें डोकें लववून, शरीराचा बांधा लववून व अशक्तपणें तुझ्या दयेचें स्मरण करायास, व तिला जागृत करायास आलों आहों.

יהי רצון आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा व आमच्या पूर्वजांच्या देवा, दयेच्या तेरा गुणाकडून मुकुट मंडित थोर ईश्वरा, हा तुजपुढें प्रसन्नतेचा समय व्हावा अशी तुझी प्रसन्नता होवो. आणि (आमोस ७. १८, १९, २०, यांतील) हे देवा, जो तूं अन्यायांची क्षमा करितोस, व आपल्या विभागांच्या शेषाचें पातक उल्लंघितोस, त्या तुजसारिखा कोण आहे ? इत्यादिक वाक्यें यांतील (निर्गम ३४. ६, ७ या वाक्यांत लिहिलेल्या, "दयाळू व कृपाळू देव" इत्यादिक अर्थाचे जे दयेचे गुण आह्मी वाचिले, तें वाचन तुजपुढें चढो; जसें कीं त्यांतून निघणारें सर्व रहस्य, आणि पवित्र जोडनामें व कठोर न्याय मधुर करण्यास एक प्रत्येका जवळ असून जडित असणारे त्यांचे गुण, यांपर्यंत आह्मी केवळ पोहोंचलोंच. यास्तव तूं आह्मावर दया करून आमचीं सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाक. आणि तूं आपल्या चांगुलपणानें आपल्या दयेस जागृत कर; ह्मणजे आह्मी आपल्या सर्व अशुद्धतेपासून, रोगांपासून, मळीणपणापासून व विटाळापासून मोकळे होऊं. आणि आमच्या हातांकडून (आह्माकडून) विखरलेल्या पवित्र थिगळ्या वर चढतील व त्या तुझ्या चांगुलपणाच्या गुणाकडून शुद्ध व शुभ्र होतील. हे आमच्या तारणाच्या देवा ! तूं हजारांसीं दया राखितोस, याकरितां तूं आपल्या पुष्कळ दयेकरून दीर्घ आयुष्य, शांतीचें, चांगले, आशीर्वादाचे, चांगल्या उपजीवनाचें, अरोग्यतेचें, ज्यांत पापाचें

भय असेल तें, ज्यांत काहींच लज्जा व निंदा नसेल तें, तुझी सेवा करण्याकरितां द्रव्याचें व प्रतिष्ठेचें, आह्मास शास्त्राची आवड व पापाचें भय लागेल असें, आणि आमच्या मनांतील मागण्या चांगल्या प्रकारें पूर्ण होतील असें आयुष्य आह्मास दे. हे जीवनांत आनंद मानणाऱ्या देव राजा! जीवनाकरितां आमची आठवण कर; आणि हे जीवनाच्या देवा, आह्मास जीवनाच्या पुस्तकांत लिही; आणि आमच्या न्यायाच्या शिक्षेचे हुकुमनामे फाडून आमचें पुण्य तुजपुढें येऊं दे.

אל מלא רחמים हे देवा, दयासागरा! आमची नम्रता व आह्मामध्यें उगिवलेले पश्चात्तापाचे विचार त्वा मान्य करावे असा तुझ्या दयेला द्रव येऊं दे. आमच्या मनाच्या मूर्खपणामुळें, हें आमचें तुजपुढें येणे व हें आमचें (तुजकडे) परतणें कोठपर्यंत आहे! आह्मी काय! आणि आह्मी काय सुधारायास आलों! हें आह्मापासून गुप्त, बंद व मोहोर करून ठेवलेलें आहे; तें आह्मी जाणत नाहीं. हे तारायास समर्थ (देवा,) जसें त्वा आपल्या दयेच्या मोठेपणाप्रमाणें आह्मास अभयवचन दिल्हें आहे कीं, तुह्मी सुईच्या नोके एवढे मजकरितां द्वार उघडा; ह्मणजे मी तुह्माकरितां मोठाल्या खांबांचें द्वार उघडीन; तसें तूं आमचे डोळे प्रकाशित कर. आणि पराक्रम होऊन गेला; आणि कोंडलेला व उरलेला कोणी नाहीं असे पाहा. कृपा व दया करणारा तुजवांचून कोणी नाहीं. ज्यावर तूं कृपा करितोस ते कृपा पावतात, आणि ज्यांवर तूं दया करितोस ते दया पावतात; जसें लिहिलें आहे कीं, ज्यावर मी दया करीन त्यावर दया करीनच आणि ज्यावर ममता ठेवीन त्यावर ममता ठेवीनच. यास्तव हे देवा, मजमध्यें स्वच्छ हृदय उत्पन्न कर व माझ्या अंगीं शुद्ध आत्मा नवा कर. आणि तुजवरील प्रीतीची व तुझ्या शास्त्राची जी ज्वाला आमच्या मनीं पेटली आहे, तिचा

भंग न होता, ती सतत राहावीव व वाढीव. हे आमच्या तारणाच्या देवा, तूं आपल्या नामाच्या गौरवासाठीं आह्मास सहाय करून आशीर्वादांसहित वर्षास आरंभ होऊंदे. आणि आमचें मन स्थीर आमचे स्वाधीन राहावें, आणि आह्मी कोपूंनये व तुला कोपवूंनये अशी आमच्या अंगी पुण्याई होऊंदे. आणि आह्मी सर्व वाईट व मना केलेल्या गुणापासून दूर राहावें असें पुर्तेपण आमच्या हातीं दे. आणि विशेषें करून गर्व, क्रोध उत्कंठता, उद्धटमन यांपासून दूर राहावें; आमची बुद्धि अचल राहावी; आमचें मोल किती थोडें आहे हें आह्मी जाणावें; आमचा जीव सर्वांपुढें धुळीप्रमाणें व्हावा; आह्मी निराश होऊंनये व त्रास पावूंनये; आह्मी शांतीवर प्रीति करावी, शांति वाढवावी; आणि तुझ्या पंखाच्या छायेखालीं आह्मी आश्रय घ्यावा अशी आमच्या अंगीं पुण्याई होऊंदे. आणि थट्टेपासून, लबाडीपासून, खुशामतीपासून, वाईट जिव्हेपासून, शाब्बाथ दिवशीं कोणत्याहि संसारिक गोष्टी करण्यापासून आह्मी दूर राहावें; आणि तुझ्या शास्त्राविषयीं तुझ्या पवित्र सेवेच्या मार्गाविषयीं व विचाराविषयीं आह्मी पुष्कळ संवाद करावा असींहि आमच्या अंगी पुण्याई होऊंदे. आणि जसें तोबड्यानें तसें आह्मी आपल्या तोंडास पाप करण्यापासून राखावें ह्मणून आह्मास बळानें वेष्ट.

אב הרחמן हे दयाळू बापा! या जगांतील विलासांच्या व व्यर्थतेच्या वांच्छांपासून दूर राहावें; आह्मी खाऊन तृप्त असावें; आणि आमच्या गरजा (पूर्णाण्याकरितां) जीं कामें आह्मीं करितों तीं सर्व ईश्वराच्या (तुझ्या) नामाकरितां असावीं, ह्मणून आह्मास सामर्थ्य, शक्ति, व पुण्याई दे. आणि तुझ्या शास्त्राचा व तुझ्या आज्ञाचा अभ्यास करण्यांत आनंद मानावा, व सतत तुजवर भरंवसा ठेऊन तुझी सेवा करण्यांत आमचें मन हर्षित व्हावें. अशी आमच्या अंगी पुण्याई होऊंदे.

